बृहत

हिंदी-मराठी शब्दकोश

संपादक

गो. प. नेने

श्रीपाद जोशी

महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणें

बृहत्

हिंदी-मराठी शब्दकोश

(शब्दसंख्या ७०,०००)

संपादक
गो. प. नेने
श्रीपाद जोशी

महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणें

प्रकाशक :
ग. वा. करमरकर
मंत्री, महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा,
३८७ नारायण पेठ, पुणें २

प्रथमावृत्ति प्रती ५०००
मार्च १९६५

किंमत रु. २०/-

मुद्रक
मा. ह पटवर्धन
संगम प्रेस प्रा. लि.,
३८३ नारायण पेठ, पुणें २

संकेत - सूची

* पद्यांत अथवा जुन्या हिंदींत वापरला जाणारा शब्द

+ स्थानिक किंवा बोली भाषेंतील शब्द

अ. अरबी
अनेक० अनेक वचन
अव्य. अव्यय
इं. इंग्रजी
इ० इत्यादि
उदा० उदाहरणार्थ
उप. उपसर्ग
क्रि. अ. क्रिया अकर्मक
क्रि. स. क्रिया सकर्मक
ग० गणित
ग्रा० ग्राम्य
तु. तुर्की
पा० पाहा
पु. पुंल्लिंगी
पोर्तु. पोर्तुगीज
प्र. प्रत्यय
फा. फारसी
बा० बायकी (स्त्रियांमध्यें प्रचलित)
मु० मुहावरा (वाक्प्रचार)
मुसल० मुसलमानी
यू. यूनानी (ग्रीक)
वा. वाक्य किंवा वाक्यांश
वि. विशेषण
व्यं. व्यंग्य (उपहासार्थानें)
व्या० व्याकरण
सं. संस्कृत
सं० संगीत
सर्व. सर्वनाम
सा० साहित्य
स्त्री. स्त्रीलिंगी
हिं. हिंदी

बृहत् हिंदी-मराठी शब्दकोश

अ

अ–देवनागरी आणि संस्कृत कुटुंबांतील इतर वर्णमालांतील पहिलें अक्षर व स्वरवर्ण. व्यंजन-वर्णांचा उच्चार याच्या मदती-शिवाय सुलभतेनें होऊं शकत नाहीं, म्हणून क, ख, वगैरे व्यंजनें 'अ'-कारासह लिहिलीं व बोललीं जातात.

अंक–*पु.* १. अंक; आंकडा. २. मांडी. ३. चिह्न. ४. डाग; कलंक. ५. तीट. **–कार**–*पु.* निवाडा देणारा; सरपंच. **–गणित**–*पु.* अंकगणित. **–धारण**–*पु.* शरीरावर शंख, चक्र, त्रिशूल वगैरे सांप्रदायिक चिह्नें करून घेणें; तप्त मुद्रा घेणें. **–पत्र**–*पु.* 'तिकिट'; 'स्टांप'. **–पत्रित**–*वि.* स्टांप किंवा तिकिट लावलेलें. **मु०–देना; –भरना; –लगाना**–आलिंगन देणें; मिठी मारणें; हृदयाशीं धरणें. **–लेना**–मांडीवर घेणें.

अंकक–*पु.* १. हिशेब लिहिणारा. २. खुणा करणारा, [–*स्त्री.* **अंकिका**]

अँकटा–*पु.* खडा; लहान दगड. [–*स्त्री.* **अँकटी**]

अँकड़ी–*स्त्री.* १. आंकडी; हूक २. बाणाचें बांकदार टोंक.

अंकन–*पु.* १. खूण करणें. २ लेखन. ३. 'रिझर्व्हेशन'. ४. अंक शब्दाचें अनेक० ५. मोजणें.

अंकनी–*स्त्री.* 'पेन्सिल'.

अंकपलई–*स्त्री.* अंकपल्लवी; आंकड्यांची गुप्त भाषा (हिच्यांत अक्षरांऐवजीं अंक लिहितात व त्यांतून जाणकारांना वाक्यांप्रमाणें अर्थबोध होतो).

अंकपाली–*स्त्री.* दाई; आया.

अंकमाल*–*पु.* आलिंगन; भेट. [–*स्त्री.* **अंकमालिका**]

अँकरा–*पु.* गव्हावरोबर उगवणारें एक कडधान्य. [–*स्त्री.* **अँकरी**]

अंकरो(रौ)री–*स्त्री.* चिमखडा.

अंकवार–*स्त्री.* कूस; मांडी. **मु० –देना**–आलिंगन देणें; मिठी मारणें. **–भरना** – पुत्रवती असणें.

अँकवारना*–*क्रि. स.* आलिंगन देणें; भेटणें; उराशीं धरणें.

अँकाई–*स्त्री.* १. अदमास; अटकळ. २. मालक व खंडकरी यांच्यांत पिकाच्या वांटणीबद्दल होणारा करार.

अँकाना–*क्रि. स.* १. चिह्न करणें; खूण करणें. २. किंमत ठरवून घेणें. ४. अंदाज करविणें ४. पारख करविणें.

अंकानीक–*पु.* तबकडी (घड्याळाची किंवा टेलिफोनची); 'डायल'.

अँकाव–*पु.* अंदाज; अनुमान.

अंकावतार–*पु.* नाटकांतील चालू अंकाच्या शेवटीं पुढील अंकाविषयीं पात्राकरवीं सूचना देण्यांत आलेला भाग.

अंकित–*वि.* १. चिह्नांकित; खूण केलेलें. २. मोजलेलें. ३. कोरलेलें. ४. नोंदलेलें; लिहिलेलें; वर्णिलेलें. ५. 'मार्क्ड' **–मूल्य.**–*पु.* दर्शनी किंमत; 'फेसव्हॅल्यू'.

अंकुड़ा–*पु.* वांकडी सळई; आंकडा; हूक [–*स्त्री.* **अँकुड़ी**]

अंकुर–*पु.* १. कोंब; अंकुर. २. टोंक. ३. सूज; पुरळ. ४. कळी. ५. रोमांच; अंगावर उभा राहणारा कांटा.

अंकुरण–*पु.* अंकुरोद्भव; उद्भवन; अंकुर फुटण्याची क्रिया; उत्पत्ति सुरू होणें; 'जर्मिनेशन'.

अँकुराना–*अ. क्रि.* अंकुर येणें; उगणें.

अंकुरित–*वि.* उगवलेलें; कोंब आलेलें. **–यौवना**–*स्त्री.* वयांत आलेली मुलगी.

अंकुश–*पु.* १. अंकुश २. नियंत्रण. ३. अडथळा. **–ग्रह; –धारी**–*पु.* माहूत. **–दंता**–*पु.* ज्याचा एक दांत सरळ व दुसरा खालीं वांकलेला आहे असा हत्ती.

अँकुस–**पु.* अंकुश.

अँकुसी–*स्त्री.* आंकडी; हूक.

अंकेक्षित लेखा–*पु.* तपासलेला हिशेब किंवा जमाखर्च; 'ऑडिटेड अकाउंट'.

अँकोड़ा–*पु.* जहाजावरील शिडाच्या दोऱ्या ओढण्याचा एक मोठा लोखंडी आंकडा; नांगर.

अँकोर*–*पु.* १. कूस; मांडी. २. आलिंगन; भेट. ३. लांच. ४. शिदोरी; फराळाचें सामान.

अंकोल–*पु.* एक जंगली झाड. याची साल वमन, विरेचन, उपदंश वगैरे रोगांवर वापरली जाते.

अँखड़ी*–*स्त्री.* डोळा; नेत्र.

अँखमोचनी–*स्त्री.* लपंडावाचा खेळ.

अँखिया–*स्त्री.* १. छाप; ठसा २. डोळा; नयन.

अँखुआ–*पु.* अंकुर; मोड.

अँखुआना–*क्रि. अ.* अंकुर येणें; फुटणें.

अंग–*पु.* १. अंग; शरीर. २. भाग; विभाग. ३. उपाय; साधन. ४. पक्ष.–*वि.* गौण; संलग्न.–**ग्रह**–*पु.* अंग आंखडणें; पेटके येणें. –**चालन**–*पु.* हातपाय हालविणें. –**च्छेद**–*पु.* शरीराचे अवयव छाटणें; हात, पाय, नाक वगैरे कापण्याची शिक्षा; 'अॅम्प्यूटेशन'. –**ज**; –**जात**–*वि.* शरीरापासून उत्पन्न झालेला –*पु.* १. पुत्र. २. घाम. ३. रोम ४. रोग. –**जा**; –**जाई**; –**जाता**–*स्त्री.* मुलगी; कन्या. –**त्राण**–*पु.* १. कवच; चिलखत. २. अंगरखा.–**दान**–*पु.* १. पळ काढणें (युद्धांतून) २. शरण; आत्मसमर्पण. ३. आसन. ४. देहसमर्पण (स्त्रीचें). –**भंग**–*पु.* १. शरीराचा एखादा अवयव तुटणें. २. अंग मोडून येणें.–*वि.* भग्न अवयवाचा; लुळा-पांगळा. –**भंगी**–*स्त्री.* १. मोहक हावभाव; नखरा. २. आळोखापिळोखा. ३. आकृति. –**भाव**–*पु.* संगीतामध्यें डोळे, हात वगैरे अवयवांच्या द्वारें भाव प्रकट करणें.–**भूत**–*वि.* अंतर्गत; अंगरूप बनलेलें.–*पु.* पुत्र.–**मर्द**–*पु.* १. हाड दुखावणें.२.मालिश करणारा नोकर. –**मर्दन**–*पु.*मालिश.-**यष्टि**–*स्त्री.*कृश शरीर. –**रक्षक**–*पु.* शरीररक्षक; 'बॉडीगार्ड'.–**रक्षा**–*स्त्री.* शरीराचें रक्षण.–**रस**–*पु.* पानें, फळें वगैरेचा पिळून काढलेला रस.–**राग**–*पु.* १. उटणें; उटी; चंदनाचा लेप. २. स्त्रियांच्या शरीराची पांच अंगांची सजावट: भांगांत शेंदूर, कपाळाला कुंकूं, गालावर तीट, केशराचा लेप आणि हातापायांना मेंदी किंवा अळता.–**राज**–*पु.*अंगदेशाचा राजा; कर्ण.–**विकृति**–*स्त्री.* फेंफरें; मिरगी. –**विक्षेप**–*पु.* अंगविक्षेप; हावभाव. –**विद्या**–*स्त्री.*सामुद्रिक विद्या.-**संग**–*पु.* संभोग.–**सिहरी**–*स्त्री.* हुडहुडी; कांटा; कंप. –**हीन**–*वि.* विकलांग. –*पु.* कामदेव.–**मु०**–**उभरना**–वयांत येणें.–**करना**–स्वीकार करणें. –**छूना**–शपथ घेणें. –**टूटना** – आळसणें. –**तोडना**; –**मोड़ना**– आळोखे-पिळोखे देणें. –**लगना**– १. मिठी मारणें. २. आहार अंगीं लागणें. –**लगाना**– १. संवयीचें करणें; माणसाळविणें. २. मुलगी देणें (लग्नांत). ३. आलिंगन देणें.

अंगक–*पु.* –अंग; शरीर.

अंगड़-खंगड़–*वि.* १. उरलें सुरलेलें २. मोडकें-तोडकें.

अँगड़ाई-*स्त्री.*आळस; आळेपिळे. **मु०**–**लेना**–आळे पिळे देणें; आळस झाडणें. [देणें.

अँगड़ाना– *क्रि. अ.* आळेपिळे

अंगण–*पु.* आंगण; परसूं.

अंगद–*पु.* बाजूबंद.

अंगन–*पु.* १. आंगण. २. वाहन. ३. चौक. ४. फिरणें.

अँगना–*पु.* आंगण.

अंगना–*स्त्री.* १. सुंदरी, २. कलहप्रिया *स्त्री.* –**गण**; –**जन**–*पु.* स्त्रीवर्ग; स्त्रियांचा समूह. –**प्रिय**–*पु.* अशोकवृक्ष.

अंगनाई*–*स्त्री.* आंतील किंवा अंत:पुरांतील आंगण. [अंगरखा.

अँगरखा–*पु.* बंद असलेला लांब

अँगरखी–*स्त्री.* लहान बंडी.

अँगरा–*पु.* निखारा; अंगार; विस्तव. [ड़ाना'

अँगराना*–*क्रि. अ.* पा० 'अँग-

अंगरी*–*स्त्री.* कवच.

अँगरेज़–*पु.* [पोर्तु.] इंग्रज.

अँगरेज़ियत–*स्त्री.* [पोर्तु+अ.] पाश्चात्यपणा; पाश्चात्य पद्धति. (व्यवहार, पोषाख वगैरे बाबतींतील). [इंग्रजी.

अँगरेज़ी–*वि.* [पोर्तु. + हि.]

अंगलेट–*पु.* अंगाची ठेवण; शरीराचा बांधा.

अँगवना*–*क्रि. स.* १. अंगावर घेणें; जबाबदारी पत्करणें. २. सहन करणें.

अँगवारा*–*पु.* १. गांवाच्या लहान भागाचा मालक. २. एका शेताच्या नांगणीमध्यें एकमेकांना साह्य करणें.

अंगांगी भाव–*पु.* १. अंशाचा संपूर्णाशीं संबंध. २. गौण व मुख्य यांचा परस्पर संबंध.

अंगा–*पु.* १. अंग. २. अंगरखा.

अंगाकड़ी–*स्त्री.* निखाऱ्यावर भाजलेली जाड भाकरी; रोट.

अंगार–*पु.* निखारा; विस्तव. –**पुष्प**–*पु.* हिंगोठाचें किंवा हिंगणबेटाचें झाड. –**मणि**–*पु.* पोवळें. –**वल्ली**–*स्त्री.* गुंजेचा वेल. **मु०** –**उगलना**–आग पाखडणें; रागाच्या भरांत फाडफाड बोलणें. –**बरसना**– १. प्रखर ऊन्ह पडणें. २. दैवी कोप होणें.

अंगारक–*पु.* १. निखारा. २. मंगळग्रह ३. माका (वन.). ४. 'कार्बन'.

अंगारकाडी–‡ *स्त्री.* आगकाडी.

अंगारपेटी*–*स्त्री.* आगपेटी.

अंगारा–*पु.* निखारा. **मु०**–**बनना**; –**होना**–रागानें लाल होणें. –(**रे**) **उगलना** – आग पाखडणें.–(**रे**)–**फाँकना**–ज्याचा परिणाम वाईट होईल असें काम करणें. –(**रों**) **पर पैर रखना**–विस्तवाशीं खेळणें; जाणून बुजून संकट ओढवून घेणें; –(**रों**) **पर लेटना**–

जळफळणें; द्वेषानें चडफडणें.

अंगारिणी–*स्त्री.* १. लहान शेगडी. २. सूर्यास्ताचा लालिमा पसरलेली दिशा.

अँगारी–*स्त्री.* १. करवा; गंडेरी. २. उंसाचीं लांब पानें; वाढें.

अंगिका–*स्त्री.* चोळी; कंचुकी; काचोळी.

अँगिया–*स्त्री.* चोळी; **–की कटोरी**–*स्त्री.* चोळीचा स्तनांवरील भाग.

अंगिरस–*पु.* १. एक प्राचीन ऋषि; सप्तर्षींपैकीं एक; दहा प्रजापतींपैकीं एक २. बृहस्पति ३. डिंक. ४. एक संवत्सर.

अंगी–*वि.* १. देहधारी २. मुख्य; प्रमुख. [स्वीकार.

अंगीकार-*पु.*अंगीकार; मान्यता;

अंगीकृत–*वि.* स्वीकृत; मान्य.

अँगीठा–*पु.***अंगीठी**-*स्त्री.* शेगडी; आगटी.

अंगुर*–*पु.* बोट; अंगुलि.

अँगुरी*–*स्त्री.* बोट; अंगुलि.

अंगुल–*पु.* १. अंगुळ; पाऊण इंचाचें माप. २. बोट. ['फिंगरप्रिंट'.

अंगुलांक–*पु.* बोटाचा ठसा;

अंगुलि–ली–*स्त्री.* हाताचें किंवा पायाचें बोट. **– त्राण**–*पु.* बाण मारतांना बोटांत घालावयाचें कातडी अंगुस्तान किंवा हातमोजा.– **पर्व**–*पु.* बोटाचें पेर. **मु० – उठाना**–बोट दाखविणें; नांवें ठेवणें.

अंगुल्यादेश–*पु.* इशारा; खूण (बोटानें केलेली).

अंगुल्यानिर्देश–*पु.* १. बोट दाखविणें; अंगुली–निर्देश. २. बदनामी; कलंक; लांछन.

अंगुश्त–*स्त्री.* [*फा.*] बोट. **–नुमाई**–*स्त्री.*लांछन; दूषण; कलंक.

अंगुश्तरी– *स्त्री.* [*फा.*] अंगठी.

अंगुश्ताना–*पु.* [*फा.*] अंगुस्तान.

अंगुष्ठ–*पु.* अंगठा–**मात्र**–*वि.* अंगठ्याच्या आकाराचें.

अँगुसी– *स्त्री.* १ नांगराचा फाळ. २. सोनाराची फुंकणी.

अँगूठा–*पु.*आंगठा. **मु०–चूमना**–खुशामत करणें. **– दिखाना**–तुच्छतेनें नकार देणें; अंगठा दाखविणें. **–(ठे)पर मारना**–तुच्छ समजणें.

अंगूठी– *स्त्री.* अंगठी; वेढें.

अंगूर–*पु.* [*फा.*] द्राक्ष.

अंगूर–*पु.* १. किरळ. २. अंकुर; मोड; ३. जखम भरून येत असतां तेथें तयार होणारे मांसाचे बारीक दाणे.**मु०–तडकना; –फटना**–जखम उलणें; **–बँधना; –भरना**–जखमेवर खपली धरणें.

अंगूरशेफा–*पु.* [*फा.*] दमा व वात यांवर उपयोगी पडणारी एक औषधी मुळी. ही हिमालयांत होते.

अंगूरी–*वि.*[*फा.*] फिकट हिरव्या रंगाचा. **–खाँड़**–*स्त्री.* 'ग्लुकोज.'

अँगेजना– *क्रि. स.* १. सहन करणें. २. स्वीकार करणें.

अंगेट– *स्त्री.* अंगावरील तेज.

अँगेठी– *स्त्री.* शेकोटी; शेगडी.

अँगेरना-*क्रि.स.* पा०'अँगेजना'.

अँगोछना–*क्रि.स.* ओल्या पंचानें किंवा टॉवेलनें अंग पुसणें.

अँगोछा–*पु.* पंचा; टॉवेल; उपवस्त्र. [– *स्त्री.* **अँगोछी**]

अँगोरा‡*पु.* मच्छर; डांस.

अँगौंगा-*पु.* दान करण्यासाठीं आधीं काढून ठेवलेला अन्नाचा किंवा धान्य वगैरेचा भाग.

अँगौरिया–*पु.* कूळ; भागेली; वाहुदार; खंडकरी.

अंग्रेज–*पु.* पा० 'अँगरेज'.

अँघड़ा–*पु.* काशाचें जोडवें.

अँघिया–*स्त्री.* बारीक चाळणी.

अंघ्रि–*पु.* पाय; चरण.

अंचरा–ला–*पु.* पा० 'आँचल'

अंचल–*पु.* १. अंचल; लुगड्याचा पदर. २. सरहद्दीजवळील भाग किंवा प्रांत. ३. किनारा; कांठ. **–धन**–*पु.* लाडका मुलगा.

अँचवना–*क्रि. स.* १. आचमन करणें. २. पिणें ३. हात धुणें; आंचवणें.

अंचित–*वि.* १. वांकलेला; कुरळा; वक्र. २. पूजित. ३. सुंदर.

अँचुर–**पु.* पदर.

अंच्छ–* *स्त्री.* डोळा.

अंछर–*पु.* १. तोंड येणें.२. मंत्र जादूटोणा; ३. अक्षर **–मु० मारना**–जादूटोणा करणें.

अंजन–*पु.* **१.** अंजन; काजळ; सुरमा. २. शाई. ३. लेप. **–केश**–*पु.* दीपक; दिवा.– **केशी**–*स्त्री.* जें लावल्यानें केंस अत्यंत काळे होतात असें एक सुगंधित द्रव्य. **–शलाका**–*स्त्री.* डोळ्यांत अंजन किंवा सुरमा घालण्याची सळई. **– सार**–*वि.* काजळयुक्त. **मु०– करना;– लगाना; – सारना**– काजळ घालणें.

अंजनहारी–*स्त्री.* १. रांजणवाडी २. कुंभारीण (किडा).

अँजना– * *क्रि. स.* डोळ्यांत काजळ घालणें अगर सुरमा लावणें.

अंजना–*स्त्री.* १ अंजनी; हनुमानाची माता. २. कुंभारीण (किडा). ३. रांजणवाडी.

अंजनी.–*स्त्री.* १. मारुतीची आई. २. चंदन वगैरे लावलेली स्त्री. ३ कुंभारीण (किडा) ४. रांजणवाडी.

अंजर–**वि.* उज्ज्वल.

अंजर–पंजर–*पु.* १. शरीरांतील सांधा. २. हाडांचा सांपळा. ३. बरगडी. **मु० – ढीला होना**–हाडें

खिळखिळी होणें.

अंजल –*पु.* १. ओंजळ. २. अन्नपाणी (?).

अंजलि–ली– *स्त्री.* – ओंजळ; पसा. **–पुट.** –*पु.* ओंजळ.

अँजवाना; अँजाना–*क्रि. स.* काजळ घालून घेणें [निष्कपट.

अंजस–*वि.* सरळ; प्रामाणिक;

अंजसा–*अव्य.* १. झटपट; लौकर. २. योग्य प्रकारें.

अंजही– *स्त्री.* धान्याचा बाजार; दाणेबाजार; दाणेआळी.

अंजाम–*पु.* [*फा.*] १. शेवट; समाप्ति २. परिणाम; फळ. **–कार**–*अव्य.*- अखेर शेवटीं. **मु०–करना; –को पहुंचाना; –देना**– पूर्ण करणें; संपविणें; तडीस नेणें. **–होना**–पूर्ण होणें.

अंजि–*पु.* प्रेरक; पाठविणारा. – *स्त्री.* १. अंगराग. २. जननेंद्रिय. –*अव्य.* डोळयांत घालून. [घातलेलें.

अंजित–*वि.* अंजनयुक्त; काजळ

अंजीर–*पु.* [*फा.*] अंजीर फळ व त्याचें झाड

अंजुमन– *स्त्री.* [*फा.*] १ संस्था; समिति. २ परिषद; सभा.

अँजुरी–ली*– *स्त्री.* ओंजळ.

अँजोर–रा* *पु.* उजेड; प्रकाश.

अँजोरना– *क्रि. स.* १. गोळा करून घेणें. २.छिनावणें; हिसकावून घेणें.

अँजोरी–* *स्त्री.* १. प्रकाश. २. चांदणें. –*वि.* प्रकाशमान.

अंझा– *पु.* सुट्टी; खाडा; अनध्याय.

अँटना– *क्रि. अ.* १. मावणें. २. व्यवस्थित बसणें (झांकण इ.). ३. पुरेसें होणें.

अंटसंट–*वि. पु.* पा० 'अंडबंड'.

अंटा–*पु.* १. सुताचा किंवा रेशमाचा गुंडाळा; बिंडा. २. गोटी (मोठी). ३. बिलीयर्ड. ४. मोठी कौडी.–**घर**–*पु.* बिलीयर्ड खेळण्याची जागा.

अंटागुडगुड–*वि.* कैफ किंवा नशा चढलेला; गुंग. **मु०– होना**– डाराडूर झोंपणें

अंटाचित–*अव्य.* चारी मुंडेचीत; उताणा. **मु०– होना**– विस्मित होणें; थक्क होणें; दिङ्मूढ होणें.

अंटाबंधू–*पु.* १. जुगारांत टाकावयाची कवडी किंवा फांसा. २. सर्वस्व हरल्यानंतर पणाला लावावयाची शेवटची कवडी (खेळण्याची). [मोळी.

अँटिया– *स्त्री.* पेंढी; भारा;

अँटियाना–*क्रि. स.* १. मुठींत लपविणें. २. चार बोटांभोंवतीं गुंडाळून दोऱ्याची लडी बनविणें.

अंटी– *स्त्री.* १. बेंचकें; दोन बोटांतील अंतर किंवा जागा. २. कनवटी; धोतराची गांठ. ३. सुताची लडी; गुंडी.**–बाज**–*वि.* कपटी.**मु०–करना**–१. लंपास करणें. २. गुंडी बनविणें**–देना**–गचांडी देणें. **–मारना**– १.लंपास करणें; लावविणें; पळविणें. २. वजन करतांना दांडी मारणें; नकळत काढून घेणें.

अँटौतल–*पु.* ढापणी; अंधारी (घाण्याच्या बैलाची).

अंठी– *स्त्री.* अठळी; आठी; कोय; बाठी.

अंड–*पु.* १. अंडें. २. अंडकोश; वृषण. ३. वीर्य. ४. ब्रह्मांड, ५. कस्तुरी मृगाची नाभि. **–कटाह**-*पु.* ब्रह्मांड.**–कोश–ष**–*पु.* १. वृषण. २. ब्रह्मांड.**–ज**–*पु.* अंड्यांतून जन्म घेणारे प्राणी (पक्षी, साप, मासे वगैरे) **–वृद्धि**– *स्त्री.* अंडकोष (वृषण) मोठा होण्याचा रोग.

अंडबंड– *स्त्री.* प्रलाप; विसंगत भाषण; बडबड. –*वि.* असंबद्ध; विसंगत [दाणे येणें.

अंडरना–*क्रि. अ.* कणसाला

अंडस– *स्त्री.* अडचण; संकट.

अंडा–*पु.*– १. अंडें. २. वृषण. **मु०–खटकना**–अंडें फुटणें. **–ढीला होना**–१. खूप दमणें; शिथिल होणें २. दिवाळखोर बनणें. **–फूटना** –अंड्यांतून पिलूं बाहेर येणें. **–सरकाना**– हातपाय हलविणें; प्रयत्न करणें. **– सेना –** १. अंडीं उबविणें. २. घरांत बसून राहाणें.

अंडी– *स्त्री.* १. एरंड; एरंडी. २. एक प्रकारचें रेशमी कापड.

अंडुआना–*क्रि. स.* खच्ची करणें.

अंडुआ–*वि.* खच्ची न केलेला (पशु).**–बैल**–*पु.* १.सांड; पोळ २. मोठ्या अंडकोषांचा किंवा आळशी माणूस.

अंडैल–*वि. स्त्री.* अंडीं घालणारी.

अंत:कोण–*पु.* अंत:कोन; 'इंटीरियर अँगल'.

अंत:क्षिप्त–*वि.* सुईच्या द्वारें आंत प्रविष्ट केलेलें; टोंचलेलें; 'इंजेक्टेड'. [अँगल'

अंत:प्रवेशी कोण–*पु.* 'री-ए ट्रंट

अंत:क्षेप; अंत:क्षेपण– टोंचणें; टोंचून शरीरांत घालणें; इंजेक्शन देणें; 'इंजेक्शन'

अंत:पटी– *स्त्री.* १. ज्यांत पर्वत नद्या वगैरे दाखविलीं आहेत असें चित्र. २. नाटकाचा पडदा.

अंत:पुर– *पु.* जनानखाना; राणीवसा. [रक्षक; कंचुकी.

अंत:पुरिक– *पु.* अंत:पुरावरील

अंत–*पु.* शेवट. अखेर; समाप्ति.

अंतक–*वि.* नाश करणारा. **–पु.** मृत्यु; यम; ईश्वर; काल २. सन्निपात ज्वर.

अंतगति– *स्त्री.* मृत्यु.

अँतड़ी– *स्त्री.* आंतडें. **मु०–गलेमें पड़ना**– संकटांत सांपडणें.–**जलना**– पोटांत कावळे कोकावू लागणें. (**अँतड़ियों**) **का बल खोलना**– पुष्कळ दिवसांनीं जेवावयास मिळाल्यानंतर अन्नावर ताव मारणें. (**अँतड़ियों**) **में बल पड़ना**–पोटांत पिळवटणें; मुरकुंडी वळणें.

अंतत-तः–*अव्य.* शेवटीं.

अंतपाल–*पु.* द्वारपाल.

अंतरंकित; अंतर्लिखित–*वि.* ज्याच्या आंत एखादी आकृति काढण्यांत आली आहे असें (वर्तुळ वगैरे); 'इन्स्क्राइब्ड'.

अंतरंग–*वि.* आंतील; घनिष्ठ– –*पु.* आंतील भाग. –**सचिव** –*पु.* खाजगी चिटणीस; 'प्रायव्हेट सेक्रेटरी.' [जिवलग मित्र.

अंतरंगी–*वि.* आंतील –*पु.*

अंतर–*पु.* १. फरक; अंतर. २. आंतील भाग. ३. मध्य; मधला काळ. ४. आडोसा. ५ हृदय; मन; आत्मा. –*वि.* १. आंतील. २. दुसरा; भिन्न. ३. जवळचा. –*अव्य.* १. आंत. २. दूर.

अंतरचक्र–*पु.* १. शरीरांतील सहा चक्रें. २. दिशा व विदिशा यांतील अंतराचा चतुर्थांश. ३. पक्ष्यांच्या बोलण्यावरून शुभाशुभ जाणण्याची विद्या ४. आत्मीय जन.

अंतरछाल– *स्त्री.* अंतरसाल; सालीच्या आंतील मऊ भाग.

अंतरजामी–**पु.* अंतर्यामी.

अंतरजाल–*पु.* व्यायाम करण्याचें एक दांडकें.

अंतरण–*पु.* अंतर ठेवणें; पूरक टाकणें; 'स्पेसिंग'. [जवळचें.

अंतरतम–*वि.* आत्मीय; अत्यंत

अंतरदिशा– *स्त्री.* दोन मुख्य-दिशांमधील उपदिशा; विदिशा.

अंतरधान–*पु.* अदृश्य होणें; अंतर्धान पावणें; लपून राहाणें.

अंतरपट–*पु.* १. पडदा २. अंतरपाट ३. ओल्या मातीचा थर देऊन गुंडाळावयाचें कापड.

अंतरप्रादेशिक–*वि.* १. आपल्या प्रांताशीं वा प्रदेशाशीं संबंध असलेलें २. आंतरप्रांतीय. ['क्शन'.

अंतरवाचन–*पु.* निवड; 'सिले-

अंतरस्थापन–*पु.* स्वतःला मध्यें घालणें; 'इंटरपोज'.

अंतरहित–*वि.* गुप्त; अदृश्य.

अँतरा–*वि.* १ खाडा; सुट्टी. २. एक दिवसाआड येणारा ताप. ३. कोपरा.

अंतरा–*पु.* १. गाण्यांतील अंत्रा. २. अंतर; फरक. *अव्य.* १. आंत; मध्यें २. जवळ; निकट. ३ जवळजवळ. ४. शिवाय.

अंतरागम–*पु.* पाण्याचा किंवा माणसांचा लोंढा आंत घुसणें; 'इन्फ्लेक्स'. [*स्त्री.*

अंतरापत्या–*वि. स्त्री.* गर्भवती

अंतराभिमुख कोण–*पु.* 'इंटीरियर ऑपोझिट अँगल'.

अंतराय–*पु.* विघ्न; बाधा.

अंतरारंभ–*पु.* 'एंडार्क'.

अंतराल–*पु.* १. अंतराळ; घेर. २. मध्य; मधला भाग किंवा काळ. ३. आंतील भाग. ४. मध्यवर्ती स्थान. –**राज्य**–*पु.* दोन मोठ्या देशांमधील तटस्थ लहान देश; 'बफर स्टेट'.

अंतरिका– *स्त्री.* दोन घरांमधील गल्ली; बोळ.

अंतरिक्ष–*पु.* आकाश पृथ्वी व स्वर्ग यांच्यामधील स्थान.–**विज्ञान**–*पु.* खगोलशास्त्र; 'मीटिअरॉलॉजी'.

अंतरिख-छ* *पु.* १. आकाश; अंतरिक्ष. २. ओंठ.

अंतरित–*वि.* १. आंत आलेला; आंत घातलेला. २. गुप्त; झांकलेला. –*पु.* बाकी (गणित).

अंतरिम–*वि.* मध्यंतरीच्या काळांतील; तात्पुरतें; 'इंटेरिम.'

अँतरिया–*वि.* एक दिवसाआड येणारा (ताप).

अंतरी–*वि.* अधून मधून येणारा; अंतरित; 'इंटर्मिटेंट'.

अंतरीक*–*पु.* आकाश.

अंतरीप–*पु.* भूशिर.

अंतरु–**पु.* अंतर –*अव्य.* आंत.

अँतरौटा–*पु.* तलम साडीच्या आंत नेसावयाचा परकर.

अंतर्– *वि.* अंतर्गत; आंतील; 'इंटीरियर'. [गंगा.

अंतर्गंगा–*स्त्री.* गुप्तपणें वाहाणारी

अंतर्गत–*वि.* १. आंतील. २. सामील. ३. गुप्त.

अंतर्गत वृत्त; अंतर्वृत्त–*पु.* अंतर्गत वर्तुळ; 'इन्सर्कल'.

अंतर्गति– *स्त्री.* आंतरिक भावना; चित्तवृत्ति; मनोवृत्ति

अंतर्गृह–*पु.* माजघर; मधलें घर.

अंतर्ग्रस्त–*वि.* गोवला गेलेला; गुंतलेला; अडकलेला. 'इनव्हॉल्व्ह्ड.' [घातलेला.

अंतर्जानु–*वि.* गुडघ्यांमध्यें हात

अंतर्जातीय–*वि.* आंतरजातीय; दोन किंवा अधिक जातींमधील.

अंतर्दशा– *स्त्री.* प्रत्येक ग्रहाचा भोगकाल; ग्रहदशा.

अंतर्दशाह–*पु.* मृताबद्दल दहा दिवसांचे आंत होणारें क्रियाकर्म.

अंतर्देशीय–*वि.* १. देशांतील परस्पर भागांशीं संबंधित. 'इन्लंड'. २. आंतरदेशीय; दोन किंवा अधिक देशांमधील –**जलपथ** –*पु.* देशांतील जलमार्ग; 'इन्लंड वॉटरवेज'. –**वाणिज्य** *पु.* देशांत

चालणारा व्यापार; अंतर्गत व्यापार; 'इंटर्नल ट्रेड.'

अंतर्द्वार–*पु.* १. आंतील किंवा गुप्त द्वार. २. खिडकी.

अंतर्ध्वंस–*पु.* जाणून बुजून गुप्तपणें केलेली नासधूस; विध्वंस; मोडतोड; डाव उधळून लावणें; 'सॅबोटेज'.

अंतर्नियम–*पु.* कलम; पोटनियम; 'आर्टिकल'.

अंतर्निविष्ट–*वि.*आंत बसलेला; हृदयांत गेलेला. [समाविष्ट.

अंतर्निहित–*वि.* आंत लपलेला;

अंतर्बोध–*पु.* आत्मज्ञान; आत्मदर्शन

अंतर्भाव–*पु.* १. समावेश. २. विलीनता; नाश ३. अभाव.

अंतर्भूत–*वि.* सामील; समाविष्ट. –*पु.* जीवात्मा; प्राण.

अंतर्मना–*वि.* १. बाह्य जगांतून आपलें मन काढून घेऊन आत्मचिंतनांत मग्न होणारा २. अन्यमनस्क.

अंतर्माप–*पु.* ठराविक माप; प्रमाण; मापक; 'गॉज'.

अंतर्मुख–*वि.* १. आंतील बाजूस तोंड असलेला. २. आत्मचिंतन करणारा. [मूल.

अंतर्मृत–*वि.* गर्भांतच मेलेलें

अंतर्यामी–*वि.* मनांतील जाणणारा. –*पु.* ईश्वर.

अंतर्राष्ट्रीय–*वि.* इतर राष्ट्रांशीं संबंध असलेलें; 'इंटरनॅशनल'.

अंतर्राष्ट्रीय मुद्राकोष–*पु.* आंतरराष्ट्रीय नाणेनिधि; 'इंटरनॅशनल मॉनेटरी फंड'.

अंतर्लापिका– *स्त्री.* ज्याचें उत्तर त्याच्या शब्दांतच सांपडतें असें कोडें.

अंतर्वती–*वि. स्त्री.* गर्भवती; गरोदर.

अंतर्वर्ण–*पु.* शूद्र.

अंतर्वस्तु– *स्त्री.*एखाद्या भांड्यांत लेखांत किंवा पुस्तकांत जें कांहीं असेल तें; 'कंटेंट्स' [क्शन'

अंतर्वाचन–*पु.* निवड; 'सिले-

अंतर्वाणिज्य–*पु.* देशांतर्गत व्यापार; आंतरप्रादेशिक व्यापार; 'इंटर्नल ट्रेड.'

अंतर्वाद–*पु.* अंतरात्म्याचा आवाज किंवा आदेश.

अंतर्वासित करना– *क्रि. स.* स्थानबद्ध करणें; 'टु इंटर्न'.

अंतर्वासी रोगी–*पु.* इस्पितळांत राहून औषधोपचार घेणारा रोगी; 'इनडोअर पेशंट'. [दोषी ताप.

अंतर्वेगी ज्वर–*पु.* विषमज्वर;

अंतर्वेद–*पु.* **अंतरर्वेदि–दी**–*स्त्री.* १. गंगा व यमुना या दोन नद्यांच्या मधील प्रदेश. २. अंतर्वेदी; दोआब.

अंतर्वेदी–*वि.* गंगा व यमुना यांच्या मधील प्रदेशांत राहणारा.

अंतर्शय्या– *स्त्री.* १. मृत्युशय्या. २. स्मशान.

अंतर्स्थापन–*पु.* मध्यें घालणें; मध्यें पडणें; 'इंटर पोझ'.

अंतर्हित–*वि.* गुप्त; अदृश्य.

अंतसद्–*पु.* शिष्य; चेला.

अंतस्–*पु.* हृदय; अंतःकरण.

अंतस्तल–*पु.* अंतःकरण; अंतरात्मा; हृदय. [डर्मिस'.

अंतस्त्वचा–*स्त्री.*अंतस्तर; 'एन्डो

अंतस्त्वचिका – *स्त्री.* मेंदूची कवची; झाडाची साल; 'कॉर्टेक्स'.

अंतस्थराज्य–*पु.* दोन मोठ्या देशांमधील लहान (तटस्थ) देश; 'बफर स्टेट'.

अंतस्सलिला– *स्त्री.* जमिनीखालून वाहाणारी व वरून न दिसणारी नदी.

अंताराष्ट्रि(ष्ट्री)य –*वि.* दोन किंवा अधिक राष्ट्रांमधील; आंतरराष्ट्रीय; 'इंटरनॅशनल'.

अंतावरी– *स्त्री.* आंतडें.

अंतावशा(सा)ई–*पु.* १. न्हावी. २. हिंसक; कसाई. ३. चांडाळ.

अंति– *स्त्री.* थोरली बहीण.

अंतिक–*वि.*जवळचा; निकटचा.

अंतिम-*वि.*शेवटचा; कमालीचा.

अंतिमेत्थम्–*पु.* अंतिमोत्तर; निर्वाणीचें उत्तर, खलिता वगैरे. 'अल्टीमेटम्'.

अंती– *स्त्री.* चूल.

अंतेउ(व)र–*पु.* अंतःपुर.

अंतेवासी–*पु.* (गुरू) जवळ राहाणारा; विद्यार्थी.

अंत्य–*वि.* शेवटचा; अखेरचा. –*पु.* दहा लाख अब्जांची संख्या. **–कर्म**–*पु.*; **–क्रिया**– *स्त्री.* मृत्यूनंतरचें क्रियाकर्म. **–वर्ण**–*पु.* शूद्र; अस्पृश्य.

अंत्यज–*पु.* शूद्र; अस्पृश्य; –*वि.* शेवटीं जन्मलेला.

अंत्या– *स्त्री.* अस्पृश्य स्त्री.

अंत्याक्षरी– *स्त्री.*भंड्या; भेंड्या

अंत्यानुप्रास–*पु.* काव्यांतील चरणांचीं अंतिम अक्षरें समान असणें; यमक.

अंत्येष्टि- *स्त्री.* मृत्यूनंतरचें क्रियाकर्म; अंत्यसंस्कार.

अंत्र–*पु.* आंतडें. **–वृद्धि**– *स्त्री.* अंतर्गळाचा विकार; अंडवृद्धि.

अँथइहि–**क्रि. अ.* अस्त पावेल (भविष्य०चें रूप). [भोजन.

अंथऊ–*पु.* जैनांचें सायंकाळचें

अंदर–*अव्य.* [*फा.*] १. आंत; आंतल्या बाजूस. २. ठराविक मुदतीच्या पूर्वी. –*पु.* अंतःकरण.

अँदरसा–*पु.* अनरसा.

अंदरी–*वि*. आंतील.

अंदरूनी–*वि*. [*फा*.] १. आंतील. २. गुप्त. [पक्षी.

अंदलीब–*स्त्री*. [अ.] बुलबुल

अंदाज़–*पु*. [*फा*.] १. अंदाज; अदमास; अटकळ; अनुमान. २. ढंग; शैली; थाट.–*वि*. फेकणारा [उदा० तीरंदाज; गोलंदाज]. **–पट्टी**–*स्त्री*. उभ्या पिकाचा अंदाज किंवा आणेवारी. **मु०–उड़ा लेना**–एखाद्याच्या शैलीची नक्कल करणें.

अंदाज़न–*अव्य*. [*फा*.] अदमासें; सुमारें. [अनुमान.

अंदाज़ा–*पु*. [*फा*.] अटकळ;

अंदु; अंदुक; अंदू–*पु*. १. स्त्रियांचा पायांत घालावयाचा दागिना; पैंजण. २. हत्ती बांधण्याचा साखळदंड किंवा दोरखंड.

अंदुआ–*पु*. हत्तीच्या मागील पायांत घालावयाचा लाकडी खोडा.

अंदेश–*प्रत्य*. [*फा*.] विचार करणारा; चिंतिणारा [उदा० दूर–अन्देश = दूरवरचा विचार करणारा; दूरदर्शी].

अँदेशा–*पु*. [*फा*.] १. चिंता; काळजी. २. संशय; शंका; अंदेशा.

अंदोख्ता–*वि*. [*फा*.] मिळविलेलें; कमावलेलें; जमविलेलें; वांचविलेलें (धन वगैरे). [धांवपळ.

अँदोर–**पु*. १. कोलाहल २.

अंदोह–*पु*. [*फा*.] १. खेद; दुःख; शोक. २. अंदेशा; फिकीर. **–नाक**–*वि*. दुःखद

अंध–*वि*. १. आंधळा. २. मूर्ख. **–कार–ल**–*पु*. अंधार **–कूप**–*पु*. १. खोल, अंधारी व कोरडी विहीर. २. एक नरक. **–खोपडी**–*वि*. मूर्ख; ठोंब्या; मठ्ठ.

अंधक–*वि*. आंधळा–*पु*. १. एक दैत्य. २. एक यादव.

अंधकारि–*पु*. महादेव; शिव.

अंधड़–*पु*. वावटळ; झंझावात. २. वादळ; तुफान.

अंधधुंध–*पु*. १. घोर अंधकार. २. अंदाधुंदी; दुराचार.

अंधबाइ-ई-य-ह–*स्त्री*. वावटळ.

अंधर–**पु*.१.वावटळ; झंझावात. २. अंधेर; अंधार ३. वादळ; तुफान.

अंधरा–*पु*. आंधळा माणूस–*वि*. आंधळा. [आंधळी स्त्री.

अँधरी–*स्त्री*. चाकाचा आरा. २.

अंधस–*पु*. भात.

अंधा–*वि*. १. आंधळा. २. विचारशक्तिहीन–*पु*.आंधळा मनुष्य. **–कुआँ**–*पु*. १. पा० 'अंधकूप'. २. मुलांचा एक खेळ–; **चिराग**;–**दि(दी)या**– मिणमिणणारा दिवा. **–तारा**–*पु*. १. नेपचून तारा. २. वरुण ग्रह. **–भैंसा**–*पु*. डोळे बांधून मडकें फोडण्याचा एक खेळ.**–शीशा**–*पु*. ज्यांत स्पष्ट प्रतिबिंब दिसत नाहीं असा मळका आरसा. **मु० –बनना**–१. फसणें २. जाणूनबुजून उपेक्षा करणें – (**धे**) **की लकड़ी**–एकमात्र आधार; एकुलता एक मुलगा.–(**धे**)**के हाथ बटेर लगना**–अकल्पितपणें लाभ होणें.

अंधाकुप्प–*पु*. मुद्दाम केलेला किंवा झालेला संपूर्ण काळोख; 'ब्लॅकआउट'.

अंधाधुंध–*स्त्री*. १. काळोख. २. गोंधळ; अंदाधुंदी; अन्याय. – *वि*. १. अंदाधुंद. २. अतिशय; पुष्कळ.

अँधिआ (या) रे–*अव्य*. अंधारांत; अंधार पडल्यावर.

अंधिका–*स्त्री*. १. रात्र. २. डोळ्याचा एक रोग. ३. जुगार.

अंधियार–रा–*पु*. अंधार; काळोख.

अंधियारी-ली-*स्त्री*.१. काळोख; अंधार. २. डोळे बांधण्याची पट्टी (विशेषतः उपद्रवी पशुपक्ष्यांच्याकरितां).

अंधेर–*पु*.१. अन्याय; अत्याचार. २. अव्यवस्था; अंदाधुंदी. **–खाता**–*पु*. अनागोंदी कारभार; अव्यवस्थित हिशेब. – **नगरी**–*स्त्री*. अंदाधुंदीचा कारभार असलेलें स्थान.

अँधेरा–*पु*. १.अंधकार; काळोख. २. नैराश्य; उदासीनता. –वि. अंधकारमय. **–उजाला**–*पु*. १. ऊनसांवलीचा खेळ. २. पांढऱ्या व रंगीत कागदांचें एक खेळणें. **–गु(घु)प्प**–*पु*. गुडुप अंधार. **–पाख**–*पु*. कृष्णपक्ष. **मु० –छा जाना**–१. अंधार पसरणें. २. नैराश्य येणें. **–(रे) घरका उजाला**–१. एकुलता मुलगा; कुलदीपक. २. अत्यंत सुंदर व सुलक्षणी पुत्र. –(**रे**) **मुँह**–*अव्य*. भल्या पहांटे.

अँधेरिया–*स्त्री*. १. काळोख; अंधकार. २. काळोखी रात्र. ३. कृष्ण पक्ष.

अंधेरी–*स्त्री*.१.अंधार; काळोख. २. वावटळ. ३. काळोखी रात्र ४. ढापणी; झांपड. **–कोठरी**–*स्त्री*. १. गर्भ; पोट. २. रहस्य. **मु०–डालना**; **–देना**– झांपड घालून दुर्दशा करणें; फसविणें; डोळ्यांत धूळ फेंकणें.

अंधो(धौ)टी–*स्त्री*.१. डोळ्यांवरील झांपड. २. ढापणी (जनावरांची).

अंध्र–*पु*. १. आंध्र प्रदेश. २. शिकारी. ३. एक अंत्यज जाति. ४. मगधाचा एक राजवंश.

अंध्रभृत्य–*पु*. अंध्रवंशानंतर गादीवर आलेला मगधाचा राजवंश.

अंपीमापी–*पु*. 'ॲमीटर'.

अंब–*स्त्री*. १. माता. २. दुर्गा.–

–पु. १. पिता २. वेद. ३. डोळा. ४. आंबा. [२. तांबें. ३. पिता.

अंबक–*पु.* १. नेत्र; शिवनेत्र.

अंबत–*पु.* आंबटपणा.

अंबर–*पु.* १. वस्त्र. २. आकाश. ३. एक प्रकारचा सुगंधित व औषधी पदार्थ. ४. एक प्रकारचें अत्तर. ५. प्राचीन ग्रंथानुसार उत्तर भारतांतील एक प्रदेश. ६. मेघ; ढग. **–डंबर**–*पु.* सूर्यास्ताच्या वेळची लालिमा.– **बारी**– *स्त्री.* दारुहळद; आंबेहळद. **–बेल**– *स्त्री.* आकाशवेल.

अंबरसारी– *स्त्री.* घरपट्टी.

अंबरांत–*पु.* १. क्षितिज. २. वस्त्राचें टोंक.

अँबराई– *स्त्री.*; **अँबराव**–*पु.* आमराई; आंब्याची बाग.

अंबल–*पु.* १. मादक पदार्थ. २. आंवट रस.

अंबष्ट–*पु.* १. एक प्राचीन जनपद (लाहोर व त्याच्या आसपासचा प्रदेश) आणि तेथील रहिवासी. २. ब्राह्मण पिता व वैश्य माता यांची संतति. ३. कायस्थांची एक पोटजात.

अंबा– *स्त्री.* १. देवी. २. जननी. ३. पार्वती. –*पु.*आंबा.**–पोली**– *स्त्री.* आंबेपोळी.

अंबार–*पु.* [*फा.*] रास; ढीग. **–खाना**–*पु.* भांडार; गोदाम.

अंबारी– *स्त्री.* अंबारी; हौदा.

अंबाला– *स्त्री.* माता.

अंबालिका– *स्त्री.* १. माता. २. पांडुराजाची माता.

अंबिका– *स्त्री.* १. पार्वती. २. माता. ३. जैनांची एक देवी. ४. धृतराष्ट्राची माता.

अंबिकेय–*पु.* १. धृतराष्ट्र. २. गणपति. ३. कार्तिकेय.

अंबिया– *स्त्री.* कोंवळी कैरी.

अँबिरथा*–*अव्य.* वृथा; व्यर्थ; फुकट.

अंबु–*पु.* १. पाणी २. चाराची संख्या.**–कंटक**; **–किरात**–*पु.* मगर; सुसर. **–क्रिया**– *स्त्री.* पितृतर्पण.**–घन** –*पु.* गार (पावसाची).**–ज**–*पु.* १. कमल. २. चंद्र. ३. शंख. **–जा**– *स्त्री.* १. लक्ष्मी. २ कमलिनी. **–तस्कर**–*पु.* सूर्य.**–द**–*पु.*मेघ.**–धि**–*पु.*समुद्र.**–प**–*पु.* १. समुद्र. २. वरुण. ३. टाकळा. **–पत्रा**–*पु.* नागरमोथा.**–भृत**–*पु.* १. ढग. २. समुद्र. ३. मोथा. ४. अभ्रक. **–रुह**–*पु.* कमल. **–वाह**–*पु.* १. ढग. २. तलाव. **–शायी**–*पु.* विष्णु. **–र्सापणी**–*स्त्री.* जळू.

अँबुवा–*पु.* आंबा; आम्र.

अंबोह–*पु.* [*फा.*] लोकांची गर्दी; दाटी.

अंभ–*पु.* १. पाणी. २. आकाश. ३. देव. ४. मनुष्य. ५. पितर.

अंभोज–*पु.* १. कमळ. २. शंख. ३. चंद्र. ४. सारस पक्षी. ५. कापूर.

अंभोधि; **अंभोनिधि**–*पु.* समुद्र.

अंभोरुह–*पु.* १. कमळ. २. सारस पक्षी.

अंमि*–*पु.* १. अमृत. २. कैरी.

अँवदा–*वि.* पालथा.

अँवरा–ला–*पु.* आंवळा.

अंश–*पु.* १. भाग; हिस्सा. २. चौथा भाग; सोळावा भाग. ३. भाज्य अंक; अपूर्णांकाच्या रेषेच्या वरील संख्या. ४. समकोणाचा ९० वा भाग; 'डिग्री.' ५. लव; अल्पांश. ६. 'न्यूमरेटर'.

अंशक–*पु.* १. भाग; खंड. २. भागीदार. – *वि.* १. भाजक. २. हिस्सा मिळविणारा.

अंशकालिक–*वि.* थोडया वेळेपुरता; अंशकाळ; 'पार्टटाइम.'

अंशतः–*अव्य.* कांहीं अंशीं.

अंशदान–*पु.* वर्गणी; देणगी; हातभार; 'काँट्रिब्यूशन'.

अंशधर–*पु.* भागधारक; 'शेयर-होल्डर'.

अंशपूंजी– *स्त्री.* १. भाग भांडवल; 'शेयर'. २. सांठा; स्टॉक.

अंशभागी– *वि.* हिस्सेदार.

अंशांकन–*पु.* क्रमांकन; 'ग्रॅज्युएशन.'

अंशांकित–*वि.* ज्यावर खुणा केलेल्या आहेत असा (पेला, बाटली वगैरे). 'ग्रेडेड'.

अंशावतार–*पु.* ज्यांत परमेश्वराचा कांहीं अंश आहे असा अवतार.

अंशी–सी–*वि.* १. हिस्सेदार; २. अवतारी; अंश धारण करणारा ३. सामर्थ्यवान.

अंशु–*पु.* १. किरण; प्रभा. २. टोंक. ३. वस्त्राभूषण.

अंशुक–*पु.* १. तलम वस्त्र. २. रेशमी कापड. ३. उपरणें.

अंशुमान–अंशुमाली–*पु.* सूर्य.

अंषि–षी– *स्त्री.* डोळा.

अंस–सु*–*पु.* १. अंश, २. खांदा.

अँसुआ–वा–*पु.* अश्रु; आंसू

अँसुआ(वा)ना–*क्रि. अ.* अश्रू येणें; डोळे भरून येणें.

अँसुवन*–*पु.* आंसू; अश्रू ('आँसू' चें अनेक०)

अंह–*पु.* १. पाप. २. चिंता. ३. त्रास.

अंहति–ती–*स्त्री.* १. दान. २. त्याग. ३. त्रास. ४. रोग.

अंहि–*पु.* १. चरण. २. वृक्षमूल. **–प**–वृक्ष.

अँहुड़ी– *स्त्री.* टाकळा.

अ–*वि.* रक्षक; उत्पन्न करणारा. –*उप.*– नकार किंवा अभाव दर्शविणारा उपसर्ग. –*पु.* १. विष्णु;

शिव; ब्रह्मा. २. विश्व. ३. अमृत.

अउठा–*पु.* विणकराची कापड मापण्याची दोन हात लांबीची लाकडी पट्टी.

अउर*–*अव्य.* आणि; व.

अउरउ*–*अव्य.* इतरहि.

अऊत*–*वि.* निपुत्रिक. [*वि.स्त्री.* अऊती]

अऊलना–*क्रि. अ.* १. तापणें; भाजणें. २. कडक ऊन पडणें. ३. बोचणें.

अकंटक–*वि.* १. कांटा नसलेलें. २. निर्विघ्न. ३. शत्रुरहित.

अकंठ–*वि.* १. कंठ नसलेला. २. कर्कश. [त्रास.

अक–*पु.* १. पाप. २. दुःख.

अकच–*वि.* केस नसलेला; टक्कल पडलेला. –*पु.* केतु ग्रह.

अकच्छ–*वि.* १. नागवा; बिन-काष्टयाचा. २. लंपट; व्यभिचारी.

अकड़–*स्त्री.* १. ताठरपणा; ताठा; घमेंड. २. ताण; तणाव; **–तकड़**–*स्त्री.* ऐट; थाट. **–बाई–** *स्त्री.* १ खेंच; ताण; ओढ (शरीरांतील नसा). २. नाडचा आंखडणें; झटके येणें (रोग). **–बाज़**–*वि.* घमेंडखोर. **–बाज़ी**–*स्त्री.* ऐट; घमेंड.

अकड़ना–*क्रि. अ.* १. आकसणें; संकोच पावणें. २. ऐट दाखविणें; घमेंड करणें. ३. हट्ट करणें. ४. टणक होणें. ५. गारठणें; बधिर होणें.

अकड़ा–*पु.* जनावरांचा एक रोग.

अकड़ाव–*पु.* पीळ; ताण. २. ऐट; ताठा; तोरा. [बाज.

अकडू–*वि.* घमेंडखोर; अक्कड-

अकड़ैत–*वि.* घमेंडखोर.

अकत–*वि.* संपूर्ण; एकूण. –*अव्य.* पूर्णपणें.

अकद–*पु.* [*अ.*] पा० 'अक्द'.

अकत्थ; अकथ; अकथनीय; अकथ्य–*वि.* अकथनीय; अवर्णनीय; सांगतां न येण्यासारखें.

अकधक–**पु.* आशंका; भय.

अकनना–**क्रि. स.* कान देणें; ऐकणें; कानोसा घेणें

अकना–*क्रि. अ.* १. त्रासणें; कंटाळणें; विटणें. २. घाबरणें.

अकनि–*अव्य.* ऐकून.

अकबक–*स्त्री.* असंबद्ध भाषण; वटवट; बडबड.

अकबकाना–*क्रि. अ.* चकित होणें; थक्क होणें. [महान्.

अकबर–*वि.* [*अ.*] श्रेष्ठ;

अकबरी–*स्त्री.* [*फा.*] १. एक पक्वान्न. २. लाकडावरील नक्षीकाम. –वि. अकबरानें चालू केलेलें; अकबराशीं संबंधित.

अकबाल–पा० 'इकबाल'.

अकर–*वि.* १. हात नसलेला. २. कररहित. ३. निष्क्रिय.

अकरकरा–*पु.* अक्कलकरा; अक्कलकाढा.

अकरण–*वि.* १. इंद्रियरहित. २. अकृत्रिम. ३. न करण्याजोगें; अनुचित. ४. कारणरहित. ५. शेष; अवशिष्ट; बाकी राहिलेलें.– पु. १. कर्माचा अभाव; कांहीं न करणें. २. ईश्वर; परमात्मा.

अकरणीय–*वि.* न करण्यासारखें.

अकरब–*पु.* [*अ.*] १. विंचू. २. वृश्चिक रास.

अकरा–*वि.* १. महाग. २. चोख; उत्तम. –*स्त्री.* लहान आंवळा.

अकराम–*पु.* [अ. 'करम' चें अनेक०] १. अनुग्रह; कृपा. २. बक्षीस.

अकराल–*वि.* १. सौम्य; सुन्दर. २. * भयंकर.

अकरास–*पु.* सुस्ती; आळस.

अकरासू–*वि. स्त्री.* गर्भवती; गरोदर.

अकरी–*स्त्री.* पाभर.

अकरुण–*वि.* निष्ठुर.

अकर्ण–*वि.* १. लहान कानांचा. २. बहिरा. –*पु.* साप.

अकर्ता–*वि.* कर्म न करणारा; कर्मापासून अलिप्त राहाणारा.

अकर्तृक–*वि.* कर्ता किंवा निर्माता नसलेला.

अकर्म–*पु.* १. निष्क्रियता. २. वाईट काम. **–भोग** *पु.* कर्मफलाच्या भोगापासून मुक्ति मिळणें.

अकर्मण्य–*वि.* आळशी; ऐदी.

अकर्मी–*वि.* दुष्कृत्य करणारा; पापी.

अकलंक–*वि.* १. कलंकरहित; निर्दोष २. * दोषास्पद; **लांछना**-स्पद. –*पु.* जैनांचा एक पंथ.

अकल–*वि.* १. अवयवरहित. २. अखंड. ३. अगम्य; निराकार. (परमेश्वराचें विशेषण).

अकल–*वि.* अस्वस्थ; बेचैन.

अकल–*स्त्री.* [अ.] अक्कल; बुद्धि.

अकलखुरा–*वि.* [*सं.+फा.*] १. आपलपोटचा; स्वार्थी. २. उदासीन; एकलकोंडा. ३. मत्सर करणारा; द्वेष करणारा.

अकलब (बी) र–*पु.* एक वनस्पति. हिच्या मुळचा रेशीम रंगविण्याच्या कामीं येतात.

अकलीम–*स्त्री.* [अ.] देश; प्रदेश; महाद्वीप; खंड.

अकवन–*पु.* रुई; मंदार.

अक़्वाम–*स्त्री.* [*अ.* 'क़ौम' चें अनेक०] जाती; राष्ट्रें. –**(मे) मुत्तहिदा**–*स्त्री.* संयुक्त राष्ट्रें; 'यूनो'.

अकवार–*पु.* १. कांख. २. मांडी.

अकस–*पु.* आकस; द्वेष; वैर.

अकस–**अव्य.* अकस्मात्.

अकसना–**क्रि.स.* द्वेष करणें; वैर करणें.

अकसर–*अव्य.* [*अ.*] प्रायः; बहुधा; नेहमीं. –*वि.* पुष्कळ; अधिक.

अक़साम– *स्त्री.* [अ. ' किस्म 'चें अनेक०] १. प्रकार; भाग; हिस्से. २. शपथा. (' कसम चें अनेक०)

अकसीर– *स्त्री.* [*अ.*] रसायन; किमया; –*वि.* रामबाण; अचूक गुण देणारें. [वर्णनीय; अकथनीय.

अकह; अकहुवा* –*वि. अ*–

अकांड–*अव्य.* अकारण; अचानक. – **तांडव**–*पु.* निष्कारण केलेला आरडाओरडा.

अकाउंट–*पु.* [इं.] हिशेब.

अकाउंटंट–*पु.*[इं.] हिशेबनीस; मुनीम.

अकाचित–*वि.* झिलई नसलेलें; ' अन्ग्लेझ्ड '.

अकाज–*पु.* १. बिघाड; कार्यनाश; हानि. २. कुकर्म; दुष्कर्म. –*अव्य.* व्यर्थ; निष्कारण.

अकाजना–*क्रि. स.* हानि करणें. *क्रि. अ.*–नष्ट होणें.

अकाट–ट्य–*वि.* अखंडनीय; दृढ; मजबूत.

अकादेमी–*स्त्री.* [इं.] विद्वत् परिषद्; ' अकादेमी '.

अकाय–*वि.* देहरहित. पु. १. राहू. २. परमात्मा.

अकायद–*पु.* [*अ.* ' अकीदा'चें अनेक०] धर्मश्रद्धा; अनेक धर्म.

अकारज–*पु.* हानि; अपकार.

अकारत–थ–*वि. अव्य.* व्यर्थ; निरर्थक.

अकारिब–*पु.* [*अ.* ' अक़ब ' चें अनेक०] जवळचे नातेवाईक.

अकार्थ–*वि.* व्यर्थ; निष्प्रयोजन.

अकाल–*पु.* १. दुष्काळ. २. अयोग्य–काळ; अवेळ–**पुरुष**–*पु.* परमेश्वर.–**मृत्यु**- *स्त्री.* अकालीं किंवा अल्प वयांत आलेलें मरण.–**मृत्यु-विचारणा**– *स्त्री.* आकस्मिक मृत्यू-संबंधींची चौकशी; ' इन्क्वेस्ट '.

अकालिक–*वि.* अवेळींचा.

अकाली–*पु.* नानकपंथी साधु; शीख.

अकास–*पु.* आकाश. **गुण–न**–*पु.* शब्द; आवाज. **–दिया;–दीया** –*पु.* आकाशदिवा.–**बानी**–*स्त्री.* आकाशवाणी. **–बेल**– *स्त्री.* अमरवेल. **मु०–बाँधना**–अशक्य गोष्ट करण्याचा प्रयत्न करणें.

अकासी– *स्त्री.* १. ताडी. २.घार (पक्षी).

अकिंचन–*वि.* १. निर्धन; दरिद्री. २. अपरिग्रही.

अकिंचनवाद–*पु.* नादारी; ज्या खटल्यांत वादी किंवा प्रतिवादी असें म्हणतो कीं, " खटल्याच्या खर्चासाठीं आवश्यक पैसा मजजवळ नाहीं, म्हणून सरकारकडून वकील व इतर खर्च मला मिळावा ", असा खटला; ' पॉपर सूट '.

अकिंचित्कर–*वि.* १. ज्याच्या हातून कांहींहि होत नाहीं असा; असमर्थ. २. तुच्छ; निरर्थक.

अकि–*अव्य.* अथवा; किंवा.

अकिल– *स्त्री.* अक्कल; बुद्धि.–**दाढ़**– *स्त्री.*–अक्कलदाढ.

अकिलैनि–** स्त्री.* अनन्य प्रेमिका.

अक़ीक–*पु.* [*अ.*] १. मोहर खोदण्याचा लाल दगड. २. एक प्रकारचें तांबूस रत्न.

अक़ीदत– *स्त्री.* [*अ.*] श्रद्धा. –**मंद**–*वि.* श्रद्धाळू.

अक़ीदा–*पु.* [*अ.*] १. दृढ श्रद्धा. २. धर्म; पंथ.

अकीरति*; अकीर्ति– *स्त्री.* बदनामी; कुख्याति. [शहाणा.

अक़ील–*पु.* [*अ.*] बुद्धिमान्;

अकुंठ; अकुंठित–*वि.* १. तीक्ष्ण; तीव्र; धारदार. २. कार्यक्षम. सामर्थ्यवान्. ३. न अडणारा. ४. श्रेष्ठ; उत्तम.

अकुचना–*क्रि. अ.* उदास होणें.

अकुतोभय–*वि.* निर्भय; ज्याला कसलेंहि भय नाहीं असा.

अकुल–*वि.* जातकुळी नसलेला; अकुलीन; हीन कुळांतील.

अकुलाना–*क्रि. अ.* १. उतावीळ होणें. २. घाबरणें; व्याकुळ होणें.

अकुशल–*वि.* १. अडाणी, अतज्ज्ञ; अनभिज्ञ. २. अशुभ. –*पु.* अकल्याण; अमंगल.

अकूत–*वि.* अपरिमित; अमर्याद.

अक़ूबत– *स्त्री.*[*अ.*] १. यातना; त्रास. २. पाप.

अकूल–*वि.* अमर्यादा; किनारा नसलेला.

अकूहल–*वि.* अधिक, असंख्य.

अकृत–*वि.* १. न केलेलें. २. योग्य प्रकारें न केलेलें. ३. अविकसित; अपूर्ण काल. –*वि.* मुदतीचें बन्धन नसलेली (ठेव).

अकृत्रिम–*वि.* स्वाभाविक; अस्सल; खरें.

अकृपा– *स्त्री.* अवकृपा; नाराजी.

अकृषित–*वि.* पडीत; वहितीखाली नसलेली (जमीन); ' अन्कल्टिव्हेटेड '.

अकृष्टपूर्वा भूमि– *स्त्री.* पूर्वी कधीं लागवडीस न आलेली जमीन; ' व्हर्जिन सॉइल '.

अकेतन– *वि.* गृहहीन; घर-दार नसलेला.

अकेला–*वि.* एकाकी; एकटा. –**दम**–*पु.* एकटा, एकाकी जीव. –**दुकेला**–*वि.* एकटा-दुकटा. –(**ली**) **कहानी**– *स्त्री.* एकतर्फी बोलणें; आत्मसमर्थन. – (**ली**) **जान**– *स्त्री.* एकटा जीव; एकाकी.

अकेलास–*वि.* आकारहीन; बेडौल; ' ॲमॉर्फस '.

अकेले–*अव्य.* १. केवळ; फक्त; २. एकट्यानें. **मु०–में कहना**– एकांतांत सांगणें. [थैला; गोण.

अकैया–*पु.* सामान भरण्याचा

अकोट–*पु.* सुपारी अथवा तिचें झाड. *वि.* कोटचवधि; अगणित.

अकोणिक रेखा– *स्त्री.* कोनरहित रेषा; ' ॲगॉनिक लाइन '.

अकोतर सौ–*वि.* एकशें एक; (१०१).

अकोर–*पु.* १. अहेर. २. लांच.

अकोसना–*क्रि. स.* घालून-पाडून बोलणें; टोमणे मारणें.

अकौआ-वा–*पु.* रुई.

अक्काड़– *स्त्री.* माता; जननी.

अक्खड़–*वि.* अक्कडबाज; उच्छृं-खल. –**पन**–*पु.* असभ्यता; उद्धट-पणा; उच्छृंखलता.

अक्खर*–*पु.* अक्षर; वर्ण.

अक्खा–*पु.* गोणी; सबंध पोतें.

अक्खो-मक्खो–*पु.* मुलाची दृष्ट काढतांना उच्चारिले जाणारे शब्द. (अक्खो मक्खो दिया बरक्खो, जो मेरे बच्चेको तक्के उसकी फूटें दोनों अक्खों !).

अक्टू(क्तू)बर–*पु.* [इं.] ऑक्टो-बर; इंग्रजी वर्षाचा दहावा महिना.

अक्द–*पु.* [*अ.*] १. विवाह. २. विक्री. ३. करार. –**नामा**–*पु.* विवाहाचें प्रतिज्ञापत्र. –**बंदी**–*स्त्री.* विवाहसूत्रांत बांधलें जाणें.

अक्रम–*वि.* अव्यवस्थित; विसंगत. [शाकाहारी.

अक्रव्याद–*वि.* मांस न खाणारा;

अक्रांत–*वि.* अपराजित.

अक्रिय–*वि.* गतिहीन; जड; ' इनर्ट '. [फुकटचा.

अक्रीत–*वि.* विकत न घेतलेला;

अक्रूर–*वि.* दयाळु.–*पु.* कृष्णाचा चुलता व भक्त असलेला एक यादव.

अक्ल– *स्त्री.* [*अ.*] अक्कल; बुद्धि; समज.–**का पुतला**–*वि.* अत्यंत बुद्धिमान्. –**का पूरा**–*वि.* मूर्ख; निर्बुद्ध; ठोंब्या. –**का फतूर**–*पु.* अक्कल कमी असणें. –**का मारा**–*वि.* मूर्ख.–**की पुड़िया**– *स्त्री.* बुद्धि-मान् *स्त्री.* –**मंद**–*वि.* बुद्धिमान्; चतुर; समजूतदार. –**०की दुम**–*वि.* मूर्ख; निर्बुद्ध. –**मंदी**– *स्त्री.* हुशारी; बुद्धिमत्ता. **मु० –आना**– अक्कल येणें. –**का चरने जाना**– अक्कल ठिकाणावर नसणें. –**का चिराग गुल होना**–बुद्धि नष्ट होणें. –**के घोडे दौड़ाना**–कल्पनातरंगांत रंगून जाणें; मनोराज्य रचणें. –**के तोते उड़ जाना**-घाबरगुंडी उडणें. –**के पीछे लट्ठ लिये फिरना** – मूर्खपणा करणें. –**दौड़ाना**; –**भिड़ाना**; –**लड़ाना**–डोकें चालविणें. –**पर पत्थर (पर्दा) पड़ना**– बुद्धि नष्ट होणें. –**में आना**–१. डोक्यांत शिरणें. २. शुद्धीवर येणें.–**में फतूर आना**–बुद्धि बिघडणें. –**सठियाना** –साठी बुद्धि नाठी होणें. –**से बाहर होना**–न कळणें. –(**क्ले**) **कुल**–*वि.* जिच्या सल्ल्याशिवाय कोणतीहि गोष्ट केली जात नाहीं अशी व्यक्ति.

अक्लांत–*वि.* न थकलेला.

अक्ली– *वि.* बुद्धीसंबंधीं; बौद्धिक. **मु०– गद्दा लगाना**–अट-कळ बांधणें; अंदाजानें सांगणें.

अक्ष–*पु.* १. खेळण्याचा फांसा; फांशांचा खेळ; सारीपाट. २. चाक. ३. कणा; आंस. ४. पृथ्वीच्या पोटांतून उत्तरध्रुव व दक्षिणध्रुव यांना जोडणारी काल्पनिक रेषा. ५. डोळा. ६. कायदा; न्याय. –**वार**–*पु.* १. जुगार खेळण्याची जागा. २. आखाडा. –**विद्या**–*स्त्री.* जुगार. –**वृत्त**–*पु.* १. अक्षांशदर्शक रेखा. २. राशिचक्र.

अक्षत–*पु.* १. अक्षता. २. जव. –*वि.* अखंडित; क्षतहीन. –**योनि**–*वि. स्त्री.* जिचें कौमार्य भंग पाव-लेलें नाहीं अथवा जिचा पुरुषाशीं समागम झालेला नाहीं अशी.

अक्षता– *स्त्री.* कुमारी; अक्षत-योनि.

अक्षम–*वि.* १. असमर्थ. २. असहिष्णु.–**ता**– *स्त्री.* १.असमर्थता; नालायकी. २. असहिष्णुता; द्वेष.

अक्षम्य–*वि.* क्षमा करतां न येण्यासारखा.

अक्षय–*वि..* क्षयरहित; अवि-नाशी. –**तृतीया**– *स्त्री.* वैशाख शुद्ध तृतीया.–**नवमी**– *स्त्री.* कार्तिक शुद्ध नवमी. –**पद**– *पु.* मोक्ष. –**लोक**–*पु.* स्वर्ग. –**वट**; –**वृक्ष**–*पु.* प्रयाग व गया येथील पवित्र वटवृक्ष (प्रलयाच्या वेळींहि त्यांचा नाश होत नाहीं, अशी समजूत आहे).

अक्षर–*वि.* अविनाशी; नित्य; अक्षय. –*पु.* वर्ण; स्वर; शब्द. –**गणित**– *पु.* बीजगणित.– **जननी**–*स्त्री.* लेखणी. –**जीवक**; –**जीवी**–*पु.* लेखनव्यवसाय करणारा; लिखा-णावर पोट भरणारा.–**माला**– *स्त्री.* वर्णमाला.–**शत्रु**–*वि.* निरक्षर. **मु०–से भेंट न होना**– अगदीं निरक्षर असणें.

अक्षरशः–*अव्य.* खरोखरीं; तंतोतंत.

अक्षरी–*स्त्री.* वर्णविन्यास; शब्दांतील अक्षरें; शुद्धलेखन; 'स्पेलिंग'.

अक्षरौटी–*स्त्री.* वर्णमाला.

अक्षि–*स्त्री.* १. डोळा; नेत्र. २. दोनाची संख्या. ३. व्यवहार.

अक्षीय–*वि.* कण्यासंबंधीं; 'ॲक्झियल'. ['हेट्रोस्टाइली.'

अक्षुकवृन्ती–*वि.* विषमवर्तिका;

अक्षुण्ण–*वि.* १. अभंग; संपूर्ण; अविकृत. २. अपराजित.

अक्षोनि-नी; * अक्षौहिणी–*स्त्री.* चतुरंग सैन्य. [यांत १,९०,३५० पायदळ; ६५,६१० घोडे; २१,८७० रथ आणि तितकेच हत्ती असत.]

अक्स–*पु.* [*अ.*] १. प्रतिबिंब; छाया चित्र; २. तसबीर. **मु०–उतारना**–हुबेहूब चित्र रेखाटणें; फोटो काढणें.

अक्सर–*अव्य.* [*अ.*] पा०–'अकसर'. [बहुसंख्या.

अक्सरियत–*स्त्री.* [*अ.*] बहुमत;

अखंडनीय–*वि.* अविद्राव्य; भाग किंवा अवयव पाडतां न येणारें; 'इर्‌रिझॉल्व्हेबल.'

अखज–*पु.* [*अ.*] १. घेणें; ग्रहण करणें. २. काढून घेणें. ३. उतारा घेणें; उद्‌धृत करणें.

अखज–**वि.* १. अखाद्य; खाण्यास अयोग्य. २. खराब; वाईट.

अखड़ैत–*पु.* मल्ल; तालीमबाज मनुष्य. [तृतीया.

अखती; अखतीज–** स्त्री.* अक्षय

अखनी–*स्त्री.* ['फा. यख्नी'] मसाला न घातलेला मांसाचा रस (हा आजाऱ्यांना देतात).

अखबार–*पु.* [*अ.* 'खबर'चें अनेक०] वर्तमानपत्र; वृत्तपत्र. **–नवीस**–*पु.* पत्रकार; संपादक. **–नवीसी**–*स्त्री.* वृत्तपत्रव्यवसाय.

अखय–**वि.* अक्षय.

अखर–**पु.* अक्षर; वर्ण.

अखरना–*क्रि. स.* मनास लागणें; वाईट वाटणें; खटकणें.

अखरावट–*स्त्री.* वर्णमाला.

अखरोट–*पु.* अक्रोड.

अखर्ब-र्व–*वि.* मोठा; लांबलचक; उंच.

अख़लाक–*पु.* [*अ.* 'खुल्क'चें अनेक०] १. शील; नीतिमत्ता. २. शिष्टाचार. ३. संवय.

अखाड़ा–*पु.* १. आखाडा; कुस्ती करण्याचें स्थान किंवा तालीम; व्यायामशाळा. २. सांप्रदायिक साधूंची जमात, मठ. ३. दरबार. ४. रंगभूमि. ५. अड्डा ६. नाचगाणें करणाऱ्यांची टोळी. ७. आंगण. **मु० –गरम होना**–खूप गर्दी होणें. **–जमना**–खेळाडू जमणें व प्रेक्षकांची गर्दी होणें. **–(ड़े) में उतरना**–दोन हात करण्यासाठीं तयार होणें.

अखाड़िया–*वि.* पहिलवान; मल्ल. [२. खाडी; आखात.

अखात–*पु.* १ नैसर्गिक तलाव.

अखाद्य–*वि.* खाण्यास योग्य नसलेलें; अभक्ष्य.

अखानी–*स्त्री.* मळणीच्या वेळीं खळ्यावर धान्याच्या पेंढ्या एकत्र करण्याची कोयती किंवा काठी.

अखार–*पु.* भांडीं वगैरे तयार करण्यासाठीं कुंभाराच्या चाकावर ठेवला जाणारा मातीचा गोळा.

अखिल–*वि.* १. संपूर्ण; सर्व. २. शेतीस योग्य (जमीन).

अखीन–**वि.* स्थिर; नित्य; अक्षीण; अक्षुण्ण.

अख़ीर–*पु.* [*अ.*] शेवट; अंत.

अख़ीरी–*वि.* [*अ.*] अंतिम; अखेरचें; शेवटचें.

अखुटिंत–**वि.* निरंतर; सतत.

अखूट–*वि.* कमी न होणारा; अखंड; अक्षय.

अखेटिक–*पु.* ज्याला शिकारीचा पाठलाग करण्यास शिकविण्यांत आलें आहे असा कुत्रा.

अखेलत*–*वि.* १. अचंचल; स्थिर. २. गुंगलेला. ३. खेळत नसलेला; सुस्तावलेला.

अखैवट–*पु.* अक्षयवट.

अखोर*–*वि.* १. निरुपयोगी; तुच्छ. २. सालस; सज्जन. ३. सुंदर. ४. निर्दोष.

अखोह–*पु.* खडबडीत किंवा उंचसखल जमीन.

अखौट-टा–*पु.* १. जात्याच्या खालच्या तळीची मधली खुंटी. २. हुंडा. ३. खराडीचा लोखंडी किंवा लांकडी दांडा.

अख़्ख़ाह–*अव्य.* उद्वेग किंवा आश्चर्यसूचक शब्द. [करणें.

अख़्ज़–*पु.* [*अ.*] घेणें; ग्रहण

अख़्तर–*पु.* [*अ.*] १. तारा; नक्षत्र. २. झेंडा.**– शुमार**–*पु.* ज्योतिषी. **मु०–चमकना**–भाग्योदय होणें.

अख़्तियार–*पु.* [*अ.*] अधिकार; सामर्थ्य.

अग–*वि.* १. चालण्यास असमर्थ. २. वाकडा चालणारा. ३. स्थावर. –*पु.* १. पर्वत. २. सूर्य. ३. वृक्ष **–ज**–*वि.* पर्वतापासून किंवा वृक्षापासून निर्माण झालेला.–*पु.* १. शिलाजित. २. हत्ती. **–जग**–*पु.* चराचर.

अगट–*पु.* मांसाचें दुकान.

अगटना–*क्रि. अ.* एकत्र होणें; गोळा होणें. [ताठा.

अगड़*–*पु.* अभिमान; ऐट;

अगड़धत्ता–*वि.* १. उंच; लांबटांग्या. २. श्रेष्ठ; मोठा.–*पु.* अमरवेल.

अगड़-बगड़–*पु.* असंबद्ध प्रलाप; बडबड. २. अनावश्यक काम; नसता खटाटोप.– *पु.* निरर्थक; निरुपयोगी.

अगड़म बगड़म–*पु.* अडगळ; नाना प्रकारच्या वस्तूंचा अव्यवस्थित ढीग. [णीय. २. असंख्य.

अगण्य–*वि.* १. तुच्छ; उपेक्ष-

अगत–ति– *स्त्री.* १. गतिहीनता. २. दुर्गति; वाईट दशा.

अगतिक–*वि.* नाइलाज झालेला; निराश्रित; लाचार.

अगत्या–*अव्य.* १. निरुपायानें; नाइलाजानें. २. कालांतरानें; शेवटीं. [औषध. २. आरोग्य.

अगद–*वि.* निरोगी. –*पु.* १.

अगन– *स्त्री.* अग्नि.–*वि.*अगणित

अगन(नि)त; अगनिया–* *वि.* अगणित, अनेक; असंख्य.

अगनी– *स्त्री.* १. घोडयाच्या मस्तकावरील भोंवरा. २. अग्नि. –*वि.**अगणित. [दिशा.

अगनेउ; अगनेत–**पु.* आग्नेय

अगम–*वि.* १. न चालणारा; स्थावर. २. मजबूत. ३. अगम्य; दुर्बोध. –*पु.*१. आगमन. २. भविष्यकाळ. ३. वेदशास्त्र. ४. उत्पत्ति. ५. योगशास्त्रानुसार शब्दप्रमाण.

अगमति–*वि.* अधिक; मोठा.

अगमन–**अव्य.* १. अगोदर; प्रथम. २. पूर्वीपासून.

अगम्या– *वि. स्त्री.* जिच्याशीं संभोग करणें निषिद्ध आहे अशी स्त्री. **–गमन**–अगम्या स्त्रीशीं संभोग करणें (एक महापातक).

अगर–*पु.* अगरु; एक प्रकारचें सुगंधी झाड. **–बत्ती**– *स्त्री.* उदबत्ती.

अगर–**पु.* घर; आगर.

अगर–*अव्य.* [*फा.*] जर; जरी. **मु०–मगर करना**–हुज्जत घालणें.

अगरचे–*अव्य.* [*फा.*] यद्यपि; जरी. [पुढाकार घेणें.

अगरना–**क्रि. अ.* पुढें जाणें;

अगरवाला–*पु.* वैश्यांची एक जात; अग्रवाल.

अगराई–**स्त्री.* अग्रता; श्रेष्ठता.

अग़राज़–*पु.* [*अ.* 'ग़रज़'चें अनेक०] इच्छा, स्वार्थ.

अगराना–**क्रि. स.* लाडावून ठेवणें.–*क्रि. अ.* लाडावणें.

अगरी– *स्त्री.* १. अडसर. २. गवताच्या छपराचा एक प्रकार. ३. वाईट गोष्ट.

अगरु–*पु.* ऊद; अगराचें लांकूड.

अगरे–*अव्य.* समोर; पुढें.

अगरो–रौ*–*वि.* १. पुढला. २. श्रेष्ठ. ३. अधिक. ४. निपुण. –*पु.* समूह. [नक्की.

अग़लब–*वि.* [*अ.*] निश्चित;

अग़लबग़ल–*अव्य.* [*फा.*] इकडे तिकडे; आसपास.

अगला–*वि.* १. पुढचा; समोरचा. २. पूर्वीचा. ३. आगामी. ४. चतुर; चलाख. –*पु.* पुढारी.

अगवना*– *क्रि. स.* १. पुढाकार घेणें. २. सहन करणें–*क्रि. अ.* तत्पर असणें.

अगवाँसी– *स्त्री.* नांगराचा दांडा.

अगवाई– *स्त्री.* सामोरें जाणें; स्वागत करणें.–*पु.* पुढारी.

अगवाड़ा–*पु.* घराच्या पुढचा भाग; पुढील आंगण.

अगवान–*पु. वि.* स्वागत करणारा; सामोरा जाणारा.

अगवानी– *स्त्री.* स्वागत करणें; सामोरें जाणें. वरपक्षाच्या स्वागतासाठीं वधूपक्षानें सामोरें जाणें. –*पु.* पुढारी.

अगवार*–*पु.* १. गांवांतील भटजी, फकीर वगैरेंना देण्यासाठीं खळयावर वेगळें काढून ठेवलेलें धान्य. २. वारा देतांना भुशाबरोबर उडणारें हलकें धान्य. ३. गांवचा चांभार. ['आगे'.

अगस(सा)र*-री–*अव्य.* पा०

अगस्त–*पु.* [इं.] ऑगस्ट महिना.

अगह*–*वि.* १. हातीं न लागणारा; चंचल. २. अवर्णनीय. ३. अगम्य. ४. कठिण.

अगहन–*पु.* मार्गशीर्ष महिना.

अगहनिया; अगहनी–*वि.* मार्गशीर्षांत तयार होणारें पीक.

अगहर*–*अव्य.* पुढें; अगोदर.

अगहाट+–*पु.* दीर्घकाळपर्यंत एखाद्याच्या ताब्यांत असलेली व तो ताबा सोडण्यास तयार नसल्यामुळें विकतां न येणारी जमीन.

अगहुँड़*–*वि.* पुढें जाणारा; पुढारी–*अव्य.*–पुढें.

अगाऊँ–ऊ–*वि.* आगाऊ; आधींचा.– *अव्य.* आधीं; पूर्वीं.

अगाड़–*पु.* १. हुक्क्याची नळी. २. ढेंकलीच्या टोंकास लावलेली बारीक काठी. [पा० 'ढेंकली'].

अगाड़–*पु.* पुढें पाठवावयाचें प्रवासांतील सामान.

अगाड़ी–*अव्य.* १. पुढें; समोर. २. भविष्यकाळीं. ३. प्रत्यक्ष. –*पु.* १. घोडयाच्या गळयाला पुढच्या बाजूला बांधण्याच्या दोऱ्या. २. वस्तूच्या पुढचा किंवा समोरचा भाग.

अगाद*–*वि.* अगाध.

अगाध–*वि.* १. अथांग; अपार. २. अधिक. ३. दुर्बोध. [भाग; वाढें.

अगाव*–*पु.*उसाचा वरचा नीरस

अगाही–*स्त्री.* [*फा.*] पूर्वसूचना

अगिन–*स्त्री.* अग्नि; विस्तव.–**बोट**–*पु.* आगबोट; 'स्टीमर'.

अगिया–*स्त्री.* १. एक प्रकारचें गवत. २. घोडे व बैल यांचा एक रोग.–**कोइलिया**–*पु.* वेताळपंचविशींतील दोन वेताळ.–**बैताल**–*पु.* आग्यावेताळ.

अगियाना*–*क्रि. अ.* दाह होणें; अंग तापणें.–*क्रि. स.* मांडें तावून सुलाखून शुद्ध करणें.

अगियार–*पु.* पूजेसाठीं पेटविलेला अग्नि.

अगियारी–*स्त्री.* १. अग्नींत टाकावयाचा धुपासारखा पदार्थ. २. पारशांचें मंदिर.

अगिलाई*–*स्त्री.* अग्निदाह.

अगुआ–वा–*पु.* १. नेता; पुढारी. २. मार्गदर्शक; वाटाड्या. ३. लग्न जुळविणारा मध्यस्थ.

अगुआई–*स्त्री.* पुढाकार; अग्रेसरत्व. [विणें.–*क्रि. अ.* पुढें होणें.

अगुआना–*क्रि. स.* पुढारी बन-

अगुआ(वा)नी–*स्त्री.* सामोरें जाणें.

अगुरु–*वि.* १. लघु. २. हलका. ज्यानें गुरूकडून उपदेश घेतलेला नाहीं असा.–*पु.* १. ऊद. २.शिसवी.

अगूढ़गंधा–*स्त्री.* हिंग.

अगोई*–*वि. स्त्री.* गुप्त नसलेली, प्रकट गोष्ट. [अप्रकट.

अगोचर–*वि.* इंद्रियातीत;

अगोट–*पु.* १. आडोसा; प्रतिबंध; अडथळा; मनाई. २. आश्रय; आधार.–*वि.* एकटा.

अगोटना*–*क्रि. स.* १. घेरणें; अडविणें. २. कैद करणें. ३. स्वीकार करणें. निवडणें.–*क्रि. अ.* १. अडणें. २. अडकणें.

अगोरदार–*पु.* संरक्षक; देखरेख ठेवणारा; राखण करणारा.

अगोरना+–*क्रि. स.* १. वाट पाहाणें; प्रतीक्षा करणें. २. राखण करणें. [चौकीदारी; रखवाली.

अगोरा+–*पु.* १. प्रतीक्षा. २.

अगोरिया+–*पु.* रखवालदार; राखणदार.

अगौनी*–*स्त्री.* १. पा० 'अगवानी.' २. लग्नामध्यें द्वारपूजेच्या-वेळीं उडविली जाणारी शोभेची दारू.–*अव्य.* पुढें.

अगौरा–*पु.* उसाचें वाढें; उसाचा वरील नीरस भाग. [भाग.

अग्ग*–*पु.* अग्र; टोंक; पुढचा

अग्नि–*स्त्री.* अग्नि; आग.–**कण**–*पु.* ठिणगी.–**कर्म**–*पु.* १. अग्निहोत्र. २. अग्निसंकार.–**कांड**–*पु.* १ आग लागणें. २. जाळपोळ.–**कुल**–*पु.* अग्निकुंडांतून उत्पन्न झालेला एक क्षत्रिय वंश. प्रमार (परमार), परिहार, चालुक्य किंवा सोळंकी व चौहान (चव्हाण) हीं या वंशांतील घराणीं होत.–**क्रिया**–*स्त्री.*–**दाह**–*पु.* प्रेताचें दहन.–**दिव्य**–*पु.* अग्निपरीक्षा.–**दीपक**–*वि.* पाचनशक्ति वाढविणारें.–**पुत्र**–*पु.* १. सूर्यवंशी लोक. २. रजपूत जाति.–**पूजक**–*पु.* पारशी.–**प्रवेश**–*पु.* मृत पतीबरोबर त्याच्या चितेंत प्रवेश करणें; सती जाणें.–**वारक**–*वि.* आगबंद; न जळणारें; 'फायरप्रुफ'.–**शामक दल**–*पु.* आग विझविणारे लोक; 'फायर ब्रिगेड'.–**सह**–*वि.* पाहा, 'अग्निवारक'.

अग्य*–*वि.* अज्ञ. [परवानगी.

अग्याँ–ग्या*–*स्त्री.* आज्ञा; हुकूम;

अग्यारी–*स्त्री.* पा० 'अगियारी'.

अग्र–*वि.* १. पुढचा. २. आधींचा. ३. मुख्य.–*अव्य.* **पुढें**–*पु.* १. पुढचा भाग; टोंक. २. उत्कर्ष. ३. आरंभ.–**गामी**–*वि.* पुढें चालणारा–*पु.* नायक; पुढारी–**गामी दल**–*पु.* पुरोगामी गट; 'फॉरवर्ड ब्लॉक'.–**घर्षक**–*वि.* आक्रमक; हल्लेखोर.–**घर्षण**–*पु.* आक्रमण; हल्ला.–**ज**–*वि.* आधीं जन्मलेला; थोरला. २. श्रेष्ठ.–*पु.* १. थोरला भाऊ. २. पुढारी; नेता.–**जात**; –**जातक**; –**जाति**–*पु.* ब्राह्मण.–**जाधिकार**–*पु.* बापाचें राज्य, संपत्ति वगैरे थोरल्या मुलाला मिळण्याचा अधिकार; 'प्राइमोजेनीचर'.–**तर**–*वि.* पुढील; आणखी नंतरचें; पलीकडील.–**दीप**–*पु.* समोरचा दिवा; 'हेडलँप'.–**दूत**–*पु.* पुढें जाऊन एखाद्याच्या आगमनाची सूचना देणारा.–**लेख**–*पु.* वृत्तपत्रांतील मुख्य संपादकीय लेख.–**शाला**–*स्त्री.* ओसरी.–**शोची**; –**सोची**–*वि.* दूरदर्शी.–**सर**–*पु. वि.* १. अग्रेसर; पुढारी. २. आरंभ करणारा.–**सारण**–*पु.* (अर्ज वगैरे) वरिष्ठांकडे पाठविणें; 'फॉरवर्डिंग'.–**सारित**–*वि.* वरिष्ठांकडे पाठविलेला; पुढें धाडलेला (अर्ज वगैरे); 'फॉरवर्डेड'.–**हायण**–*पु.* मार्गशीर्ष महिना.–**हार**–*पु.* सरकारकडून ब्राह्मणाला निर्वाहार्थ दान मिळालेली भूमि.

अग्राशन–*पु.* देव, गाय वगैरेसाठीं काढून ठेवलेला भोजनांतील भाग; गोग्रास.

अग्राह्य–*वि.* ग्रहण करतां न येण्यासारखा; अविश्वसनीय; त्याज्य.–**व्यक्ति**–*पु.* एखाद्या देशांतील उच्च अधिकाऱ्यांना अग्राह्य किंवा अमान्य वाटणारा दुसऱ्या एखाद्या देशाचा राजदूत, राजपुरुष किंवा अन्य एखादी व्यक्ति; 'परसोना नॉनग्रेटा'.

अग्रिम–*वि.* १. अगाऊ, आधीं दिलेला; आधींचा. २. श्रेष्ठ; उत्तम.

–पु. उचल; तसलमात; अगाऊ दिलेली रक्कम; 'ॲडव्हान्स'.–देय–पु. पेशगी; अग्रदत्त धन; 'इम्प्रेस्ट मनी'.–धन–पु. उचल; 'ॲडव्हान्स'.

अग्रेमूल्य–*पु.* भावी किंमत; नंतर विकल्या जाणाऱ्या वस्तूची आधींपासून ठरविली जाणारी किंमत; 'फॉरवर्ड प्राइस'.

अग्रेसर–*वि. पु.* पुढें जाणारा; पुढारी.

अघ–*पु.* १. पाप. २. दुःख. ३. व्यसन. ४. अघासुर नांवाचा राक्षस. **–मर्षण**–*वि.* पापनाशक (मंत्र).–*पु.* संध्येंतील एक पापनाशक क्रिया; त्या क्रियेचा मंत्र.

अघट–*वि.* कधीं कमी न होणारा; न घटणारा; अक्षय.

अघटित–*वि.* न घडलेलें; असंभव; **–घटना पटीयसी**–*वि. स्त्री.* न घडलेलें घडविण्यांत कुशल (माया).

अघवाना–*क्रि. स.* १. पोटभर खाऊं घालणें. २. संतुष्ट करणें.

अघाइ–य–*अव्य.* यथेच्छ; पोटभर.

अघाऊ*–*पु.* तृप्ति; संतोष.

अघाट⁺–*पु.* मालकास विकतां न येणारी जमीन.

अघात⁺–*पु.* आघात; प्रहार. –*वि.* पोटभर; खूप.

अघाती⁺–*वि.* १. घातक नसलेला. २. आघात करणारा.

अघाना–*क्रि. अ.* १. पोटभर खाणें. २. संतुष्ट होणें; तृप्त होणें. ३. प्रसन्न होणें; खुष होणें.

अघारि–*पु.* पापाचा नाश करणारा; श्रीकृष्ण.

अघोर–*वि.* १. घोर; भयंकर. २. सौम्य; सुंदर. ३. एक शिवोपासक पंथ. **–नाथ**–*पु.* शिव.

अघोष–*वि.* शब्दरहित.–*पु.* एक वर्णसमूह (प्रत्येक वर्गातील पहिलीं दोन व्यंजनें व श, ष, स.)

अघौघ–*पु.* पापसमूह.

अघ्न्य–*वि.* ज्याची हत्या करूं नये असा. *पु.* १. ब्रह्मा. २. वळू.

अघ्न्या–*स्त्री.* गाय.

अचंभा–*पु.* अचंबा; आश्चर्य.

अचक–*वि.* १. पूर्ण; भरपूर. २. न चुकणारा. –*स्त्री.* १. आश्चर्य; विस्मय २. दचकणें. [होणें; दचकणें.

अचकचाना–*क्रि. अ.* चकित

अचकन–*पु.* १. उत्तर हिंदुस्थानी लांब कळीदार अंगरखा. २. बंद गळ्याचा आखूड कोट. [नक.

अचकाँ–*अव्य.* एकाएकीं; अचा-

अचक्का–*वि. पु.* अपरिचित. **–(क्के) में**–*अव्य.* अचानक; फसवून. [हूड.

अचगरा–*वि.* खटचाळ; वात्रट;

अचगरी– *स्त्री.* वात्रटपणा; खटचाळपणा; फाजीलपणा; खोडकरपणा; खोडी.

अचपल–*वि.* १. अचंचल; गंभीर. २. चंचल; अचपळ.

अचर–*वि.* अचल; स्थावर; स्थिर. [**आना**–थक्क होणें.

अचरज–*पु.* आश्चर्य. **मु० –में**

अचल–*वि.* स्थिर.–*पु.* पर्वत.–**संपत्ति**– *स्त्री.* स्थावर मालमत्ता.

अचला– *स्त्री.* १. पृथ्वी. २. हिमालयाची पत्नी. ३. बिन बाह्यांची कफनी. **–सप्तमी**– *स्त्री.* माघ शुद्ध सप्तमी. [चूळ भरणें.

अचवन–*पु.* १. आचमन. २.

अचवना–*क्रि. स.* १. आचमन करणें. २. आंचवणें; हात धुणें. ३. गमाविणें.

अचवाना–*क्रि. स.* १. आचमन करविणें. २. हातावर पाणी घालणें; आंचवणें. ३. पाजविणें.

अचांचक; अचांक– का– *अव्य.* अचानक; अकस्मात्.

अचान*; अचानक–*अव्य.* एकाएकीं; अकस्मात्; अनपेक्षितपणें.

अचार–*पु.* [*फा.*] लोणचें.

अचारी–*वि. पु.* आचार-विचार सांभाळणारा.- *स्त्री.* आंब्याच्या फोडी उन्हांत शिजवून बनविलेलें लोणचें.

अचालक–*वि.* अवाहक; ज्यांतून वीज, उष्णता वगैरे प्रवाहित होऊं शकत नाहीं अशी (वस्तु); 'नॉन कंडक्टर'.

अचाह* –*वि.* १. ज्याची अभिलाषा कोणी बाळगीत नाहीं असें. २. इच्छारहित; निष्काम.

अचाहा*–*वि.* नको असलेला; नावडता. [निष्काम.

अचाही*–*वि.* इच्छारहित;

अचिकित्स्य–*वि.* असाध्य (रोग); 'इन्क्युअरेबल'.

अचिज्ज*–*पु.* आश्चर्य; अचंबा.

अचित्–*वि.* जड; अचेतन.

अचिर–*अव्य.* नुकताच; शीघ्र. –*वि.* कायम न टिकणारा.

अचिरात्–*अव्य.* शीघ्र; लवकर.

अचीता–*वि.* १. आकस्मिक; अनपेक्षित. २. अत्यधिक. ३. निश्चित.

अचूक–*वि.* न चुकणारा; निश्चित. –*अव्य.* निश्चितपणें; कौशल्यानें; न चुकतां.

अचेत– *वि.* चेतनारहित; मूर्च्छित; बेशुद्ध.

अचेतन– *वि.* चैतन्यरहित; बेशुद्ध; निर्जीव. –*पु.* जड पदार्थ.

अचेतनक–*पु.* बधिरता आणणारा, बेशुद्ध करणारा पदार्थ (क्लोरोफॉर्म वगैरे); 'ॲनिस्थेटिक'.

अचेतनीकरण–*पु.* बेशुद्ध केलें जाणें; बेशुद्ध होणें; 'ॲनिस्थेसिस.' [बेचैनी; अस्वस्थता.

अचैन–*वि.* बेचैन. अस्वस्थ.–*पु.*

अचौना*–*पु.* १. आचमनाचें पात्र. २. पिण्याचें भांडें; वाडगा.

अचौन*–*पु.* पा० 'अचवन'.

अच्–*पु.* स्वरवर्ण. –**संधि**– *स्त्री.* स्वरसंधि.

अच्छ–*वि.* १. चांगलें; सुंदर, २. स्वच्छ; निर्मळ.– *पु.* * डोळा.

अच्छत–*पु.* अक्षता. –*वि.* अखंडित. [२. ब्रह्मा; ईश्वर.

अच्छर–* *पु.* १. अक्षर; वर्ण.

अच्छरा–री*– *स्त्री.* अप्सरा.

अच्छा–*वि.* चांगला; छान; उत्तम; ठीक. –**खासा**– *वि.* पुष्कळ चांगला; खूप. –**पन**–*पु.* उत्तमता; सुंदरता.–**बिच्छा**–*वि.* १. निरोगी. २. निवडक. **मु०**–**आना**– योग्य वेळीं येणें.–**लगना**–आवडणें; बरें वाटणें. –**(च्छी) कटना ;** –**बीतना**– आरामांत दिवस जाणें. [चांगली गोष्ट.

अच्छाई– *स्त्री.* चांगुलपणा;

अच्छिर*–*पु.* अक्षर.

अच्छोद–*वि.* निर्मळ पाण्याचा (जलाशय वगैरे). [हिणी'.

अच्छौहिनी*–*स्त्री.* पा० 'अक्षौ-

अछक*–*वि.* अतृप्त. [राहणें.

अछकना*–*क्रि. अ.* अतृप्त

अछग*–*वि.* अतृप्त.

अछत*–*अव्य.* असतांना; जीवित असतांना.

अछन*–*पु.* दीर्घकाळ. –*अव्य.* थांबत थांबत; हळूहळू.

अछना⁺–*क्रि. अ.* असणें; विद्यमान राहाणें.

अछरौटी– *स्त्री.* वर्णमाला.–**वर्तनी**– *स्त्री.* प्रत्येक वर्ण निराळा सांगणें.

अछल–*वि.* निष्कपट; साधासुधा. [सजविणें.

अछवाना*–*क्रि. स.* साफ करणें;

अछवानी– *स्त्री.* बाळंतिणीस द्यावयाची एक औषधियुक्त पौष्टिक मिठाई, अवलेह.

अछूत–*पु.* १. अस्पृश्य; हरिजन.–*वि.* १. अस्पृश्य; न शिवलेला. २. नवीन.

अछूता–*वि.* १. नवीन; नाविन्यपूर्ण. २. अस्पृष्ट. ३. कोरा.

अछेव*–*वि.* निर्दोष; छिद्ररहित.

अछेह*–*वि.* अधिक. –*अव्य.* सतत; निरंतर; लागोपाठ.

अछोभ*–*वि.* गंभीर; शांत; क्षोभरहित. [२. निर्दयता.

अछोह–*पु.* १. शान्ति; स्थिरता.

अछोही–*वि.* निर्दय; निष्ठुर.

अज–*वि.* स्वयंभू–*पु.* १. ईश्वर. २. मेंढा. ३. कामदेव.

अज़–*प्रत्य.* [*फा.*] कडून; पासून.–**ख़ुद**–*अव्य.* आपण होऊन; आपोआप.

अजगर–*पु.* अजगर.

अजगरी–*स्त्री.* अजगराप्रमाणें श्रम न करतां पोट भरणें; सुस्तपणा.

अजगव–*पु.* शिवधनुष्य.

अज(जु)गुत–*पु.* १. आश्चर्यकारक गोष्ट; चमत्कार. २. अयोग्य गोष्ट.–*वि.* आश्चर्यकारक.

अज़ग़ैब*–*पु.* [*फा. अ.*] अदृष्ट स्थान. [गुप्त. २. रहस्यपूर्ण.

अज़ग़ैबी–*वि.* [*फा. अ.*] १.

अजज़ा–*पु.* [*अ.* 'जुज़'चें अनेक०] १. अंश; भाग. २. अवयव.

अज़दहा–*पु.* [*फा.*] अजगर.

अजदहाम–*पु.* [*अ.* 'इज्दिहाम'] गर्दी; जमाव.

अजदाद–*पु.* [*अ.*] पूर्वज.

अजनबी–*वि.* [*अ.*] १. अज्ञात; अपरिचित. २. नवखा; परदेशी.

अजनास– *स्त्री.* [*अ.* 'जिन्स'चें अनेक०] जिनसा; वस्तू; सामान.

अजनि– *स्त्री.* मार्ग; सडक.

अजन्मा–*वि.* जन्मरहित; अनादि. [करावयाचा जप.

अजपा–*पु.* मनांतल्या मनांत

अजब–*वि.* [*अ.*] विलक्षण; अद्भुत. –*पु.* आश्चर्य.

अज़बर–*अव्य.* [*फा.*] तोंडपाठ.

अज़बस–*अव्य.* [*फा.*] १. खूप; पुष्कळ. २. अशासाठीं कीं.

अज़मत– *स्त्री.* [*अ.*] १. प्रताप; महत्त्व; थोरवी. २. चमत्कार.

अज़माइश–पा० 'आज़माइश'.

अज़माना–*क्रि. स.* [*फा.*] १. अजमावणें. २. अंदाज करणें.

अज़मूदा–*पु.* ओव्याची एक जात; शोपा.

अजमोद–दा–*पु.* ओव्याची एक जात; शोपा. [३. माया.

अजया- *स्त्री.* १. भांग. २. बकरी.

अजर–*वि.* १. जरारहित; चिरतरुण. २. न पचणारा. –*पु.* देव.

अजरा– *स्त्री.* पाल (प्राणी).

अजरायल*–*वि.* जीर्ण न होणारें; टिकाऊ; चिरस्थायी; पक्कें. २. निर्भय; निःशंक.

अजराल*–*वि.* बलवान्.

अजरावन*–*वि.* बदल घडून न येणारा; निर्विकार; अपरिवर्तनीय (ईश्वराचें एक विशेषण). [प्रमाणें.

अज़रूए–*अव्य.* [*फा.*] अनुसारें;

अजल–*वि.* निर्जलीय; 'ॲनहायड्राउस.'

अज़ल– *स्त्री.* [*अ.*] मृत्यु.

अज़ल– *स्त्री.* [*अ.*] १. आराम; विश्रांति. २. मूळ; उद्गम. ३. अनादि काळापासून चालत आलेला.

–रोज़े अज़ल–*पु.* सृष्टीचा उत्पत्ति-दिन.

अज़ली–*वि.* [*अ.*] शाश्वत.

अजवाइ(य)न–*स्त्री.* ओवा.

अजस–*पु.* १. अपकीर्ति; बद-नामी. २. अपेश. [अपेशी.

अजसी*–*वि.* १. बदनाम. २.

अज़ सरे नौ–*अव्य.* [*फ़ा.*] अगदीं नव्यानें; पुनः पहिल्यापासून.

अजस्र–*अव्य.* निरंतर; सतत. –*वि.* अविच्छिन्न. [पुष्कळ.

अज़हद–*वि.* [*फ़ा.*] अमर्याद;

अजहुँ–हूँ–*अव्य.* आतांपावेतों; अजून. [' अज्ञान '.

अज़ाँ– *स्त्री.* [*अ.*] पा०

अजा–१. प्रकृति; माया. २. बकरी; शेळी. –**गलस्तन**– *पु.* शेळीच्या गळाजवळील स्तना-सारखा असणारा निरुपयोगी भाग.

अज़ा–*स्त्री.* [*अ.*] १. कष्ट; यातना. २. मृत्युशोक; विलाप. –**दार**–*वि.* विलाप करणारा.

अज़ाज़ील–*पु.* [*अ.*] सैतान जेव्हां देवदूत होता तेव्हांचें त्याचें नांव.

अजातशत्रु–*वि.* शत्रुविहीन. –*पु.* सम्राट् बिंबिसाराचा मुलगा.

अजाती–*वि.* जातिबहिष्कृत.

अजान–*वि.* अजाण; अज्ञानी; अडाणी.

अज़ान– *स्त्री.* [*अ.*] नमाजा-पूर्वीचें आवाहान किंवा हांक; बांग.

अजानि–*वि.* विधुर.

अजान्यो–*वि.* मूर्ख; अजाण.

अज़ाब–*पु.* [*अ.*] १. दुःख; कष्ट. २. संकट; आपत्ति. ३. पाप.

अजायब–*वि.* [*अ.*] विलक्षण; अद्भुत. –**खाना**; –**घर**–*पु.* वस्तु-संग्रहालय; ' म्यूझियम '.

अजारकजीवी–*वि.* वात-निर-पेक्ष; अवातजीवी; ' ॲनएरोबिक '.

अजारक श्वसन–*पु.* ' ॲनएरो-बिक रेस्पिरेशन. '

अजिऔरा–*पु.* आजीच्या वडि-लांचें घर; पित्याचें आजोळ.

अजित–*वि.* अपराजित; अजेय अजिक्य.–*पु.* विष्णु. [जिन.

अजिन–*पु.* १. कांतडें. २. मृगा-

अजिर–*पु.* १. आंगण. २. वारा. ३. शरीर. [धनसूचक शब्द).

अजी–*अव्य.* अहो; अरे (संबो-

अज़ीज़–*वि.* [*अ.*] १. प्रिय. २. प्रतिष्ठित.–*पु.* मित्र.

अजीटन–*पु.* [*इं.*] एक सहायक लष्करी अधिकारी; ' ॲडजुटंट '.

अजीत–*वि.* १. न कोमेजलेला; प्रफुल्लित. २.* अजिक्य.

अजीब–*वि.* [*अ.*] विलक्षण; अद्भुत; विचित्र. – व (बो) गरीब–अत्यंत अद्भुत; विचित्र.

अज़ीम–*पु.* [*अ.*] वृद्ध.–*वि.* विशाल; महान्. [महान्.

अज़ीमुश्शान–*वि.* [*अ.*] भव्य;

अज़ीयत–*स्त्री.* [*अ.*] अत्या-चार; पीडा.

अजीरन–*पु.* अजीर्ण; अपचन.

अजू–पा० ' अजी '.

अजूजा*– *पु.* प्रेतें खाणारा उदासारखा एक हिंस्र प्राणी.

अजूबा–*पु.* [*अ.*] अद्भुत व विलक्षण गोष्ट. –*वि.* अद्भुत.

अजूरा*–*वि.*वेगळा; न जोड-लेला.–*पु.* मजुरी.

अजूह*–*पु.* युद्ध.

अजे–जै; अजेय–*वि.* अजिंक्य.

अजैव–*वि.* अप्राणिज; निरिं-द्रिय; जड; ' इनऑर्‌गॅनिक '.

अज़ो–*पु.* [*अ.* 'उज़्व'] अवयव; अंग; भाग.

अजोग–*वि.* अयोग्य; बेजोड.

अजोतर–*वि.* स्वच्छंद.

अजोता–*पु.* चैत्री पौर्णिमा (या दिवशीं बैल जोडीत नाहींत.); एक सण. [सुद्धां; आतांपर्यंत.

अजौं–*अव्य.* अद्यापि; अजून

अज्ज*–*अव्य.* आज.

अज्जान*– *अव्य.* आजानु; गुडघ्यापर्यंत.

अज्ञात–*वि.* माहीत नसलेला; अप्रकट. –**कुल**– *वि.* ज्याच्या कुळाचा पत्ता नाहीं असा. –**चर्या**–*स्त्री.* गुप्त वास. –**पूर्व**–*वि.* पूर्वी माहीत नसलेला. –**यौवना**– *स्त्री.* आपल्या यौवनाची जिला कल्पना नाहीं, अशी मुग्धा नायिका.

अज्ञान–*पु.* अज्ञान; मूर्खता. –*वि.* मूर्ख; अज्ञ.

अज्ञेय–*वि.* ज्ञानातीत; अगम्य. –**वाद**–*पु.* परमेश्वर किंवा परमात्मा अज्ञेय आहे हें मत; ' ॲग्नॉस्टि-सिझम् '.

अज़्म–*पु.* [*अ.*] १. निश्चय. २. अनुकरण- –**बिल अज़्म**–*पु.* दृढ-निश्चय. [महानता.

अज़्मत–*स्त्री.* [*अ.*] श्रेष्ठत्व;

अज्र–*पु.* [*अ.*] पुण्य; मोब-दला; प्रत्युपकार.

अझ्ना*–*पु.* आग.

अझोरी*–*स्त्री.* कागदाची लांब-लचक पिशवी; झोळी. [लटांबर.

अटंबर–*पु.* १. ढीग; रास. २.

अट–*स्त्री.* १. अट. २. अडथळा, प्रतिबंध. [बंध; अडचण.

अटक–*स्त्री.* अडवणूक; प्रति-

अटक⁺–*स्त्री.* ज़रूर; आव-श्यकता.

अटकन बटकन–*पु.* मुलांचा एक खेळ (अटक मटक).–**खेलना**–निरर्थक काम करणें.

अटकना–*क्रि. अ.* १. थांबणें; अडणें. २. प्रेमांत सापडणें.

अटकनी– *स्त्री.* अडकणी (चरख्याची). [अन्दाज करणें.

अटकर(ल)ना–*क्रि. स.*–

अटकल– *स्त्री.* अटकळ; अनुमान; अंदाज. **मु० –पच्चू.**– *पु.* आडाखा; अंदाज; *–वि.* अंदाजी; काल्पनिक. *–अव्य.* अंदाजें; अदमासपंचे.

अटका–*पु.* पुरीच्या जगन्नाथाच्या नैवेद्याचा भात किंवा इतर अर्पण केलेल्या वस्तू.

अटकाना–*क्रि. स.* थोपविणें; अडकवणें; हरकत करणें.

अटकाव–*पु.* अडथळा; प्रतिबंध.

अटखट*–*वि.* तोडकामोडका; वेढव. [टिवल्या-बावल्या.

अटखेली– *स्त्री.* खेळ; गंमत;

अटन–*पु.* भ्रमण; हिंडणें; फिरणें.

अटना–*क्रि. अ.* १. सामावणें. २. पुरें होणें. ३. कमी होणें. ४. फिरणें. [कठिण; बिकट.

अटपटा–*वि.* १. असंबद्ध; २.

अटपटाना–*क्रि. अ.* घोटाळणें; गोंधळणें; गडबडून जाणें.

अटपटी– *स्त्री.* खोडी; उपद्व्याप; उचापत. [कुटुंब.

अटब्बर–*पु.* १. अवडंबर. २.

अटमबम–*पु.* [इं.] अणुबाँब; 'ॲटमबाँब'.

अटरम-पटरम+–*पु.* सटरफटर वस्तूंचा ढीग. [२. सटरफटर.

अटरसटर+–*अव्य.* १. असंबद्ध.

अटल–*वि.* स्थिर; दृढ; नित्य.

अटलस–*पु.* [इं.] मानचित्र संग्रह; नकाशासंग्रह; 'ॲटलास'.

अटवाटी–खटवाटी– *स्त्री.* बाडबिस्तरा; सामानसुमान. **मु०–लेकर पड़ना**–रुसून एका बाजूला जाऊन बसणें. [कर अरण्य.

अटवी– *स्त्री.* जंगल; वन; भयं-

अटहर–*पु.* १. ढीग. २. अडचण.

अटा– *स्त्री.* १. वरची खोली; गच्ची; माळवद. २. पर्यटन –*पु.** ढीग. [बेसुमार.

अटाटूट–*वि.* अगणित; गडगंज;

अटारिया; अटारी– *स्त्री.* १. गच्ची. २. माडी. ३. माळा.

अटाल–*पु.* १. बुरूज. २. मनोरा.

अटाला–*स्त्री.* अट्टालिका; महाल.

अटाला–*पु.* १. रास; ढीग. २. सामान-सुमान. [पक्षी.

अटी– *स्त्री.* वगळ्यासारखा एक

अटूट–*वि.* अभंग; अविचल; अखंडित.

अटेरन–*पु.* सूत गुंडाळण्याचा फाळका. *–वि.* हडकुळा. **मु०–कर देना**– १. दमविणें; पराभूत करणें. २. गोंधळांत टाकणें (?).– **होना** –अत्यंत कृश होणें.

अटेरना–*क्रि. स.* फाळक्यावर सूत गुंडाळणें.

अट्ट–*वि.* १. उंच; उच्चस्वरयुक्त. २. निरंतर. *–पु.* १. गच्ची; सज्जा. २. बुरुज. ३. अतिशयता–**हास; –हास्य**–*पु.* खो खो हंसणें; खदखदां हंसणें.

अट्टा–*पु.* मचाण; माळा.

अट्टालिका– *स्त्री.* १. गच्ची २. महाल.

अट्टी– *स्त्री.* फाळक्याभोंवतीं गुंडाळलेलें सूत; लड; लट.

अट्ठा–*पु.* अठ्ठा (पत्त्यांतील).

अट्ठाइ(ई)स–*वि.* अठ्ठावीस.

अट्ठानबे–*वि.* अठ्ठ्याण्णव.

अट्ठा(ठा)सी–*वि.* अठ्ठ्याऐंशी.

अठई*– *स्त्री.* अष्टमी तिथि.

अठएँ–*वि.* आठवा.

अठकौसल– *पु.* १. पंचायत. २. सल्लामसलत.

अठखेली– *स्त्री.* खेळ; गंमत; विनोद; क्रीडा. *–वि.* खेळकर.

अठत्तर–*वि.* अठ्ठ्याहत्तर.

अठन्नी– *स्त्री.* अधेली (नाणें).

अठपतिया– *स्त्री.* आठ पाकळ्यांचें फूल कोरण्याचें नक्षीकाम.

अठपहला–*वि.* अष्टपैलू.

अठपाव*– *पु.* खटचाळपणा; हूडपणा.

अठपृष्ठी; अठपेजी– *वि.* अष्टपत्री; छपाईस उपयोगी पडणाऱ्या कागदाचा आठवा भाग; 'ऑक्टेवो'.

अठमासी– *स्त्री.* आठ मासे वजनाचें सोन्याचें नाणें; 'गिनी;' 'सॉव्हरिन'. [ओरड.

अठयाव+–*पु.* उपद्रव; आरडा-

अठलाना–*क्रि. अ.* पा० 'इठलाना.'

अठवाँसा–*वि.* आठोळा; आठव्या महिन्यांत झालेला.–*पु.* गरोदरपणीं आठव्या महिन्यांत होणारा संस्कार; अठुंगळें.

अठवारा–*पु.* आडवडा.

अठवाली– *स्त्री.* १. आठ भोयांनीं उचलावयाची पालखी. २. जड वस्तु उचलण्यासाठीं बांधलेलें दांडकें.

अठहत्तर–*वि.* अठ्याहत्तर.

अठाई–*वि.* खटचाळ; हूड.

अठान–*पु.* १. वैर; शत्रुता. २. दुष्कृत्य. [पा० 'ठानना'.

अठाना–*क्रि. स.* १. सतावणें २.

अठारह–*वि.* अठरा.

अठासी–*वि.* अठ्ठ्याऐंशी.

अठिलाना–*क्रि. अ.* पा० 'इठलाना'.

अठी–**पु.* शिपाई; योद्धा.

अठे+–*अव्य.* १. येथें २. इकडे.

अठोठ+–*पु.* पाखण्ड; ढोंग.

अठोतरसौ–*पु.* एकशें आठ.

अठोतरी–*स्त्री.* एकशें आठ मण्यांची माळ.

अठौरा–*पु.* १. आठ विडे असलेला पुडा. २. आठ पानांचा द्रोण.

अड़ंगा–*पु.* १. पायांत पाय घालणें. २. अडथळा; अडवणूक. ३. कुस्तीचा एक पेंच. **मु०–डालना; –लगाना**–अडथळा निर्माण करणें **–मारना**–१. पेंच घालणें २. अडथळा आणणें.

अडंड*– *वि.* अदंडच; ज्याला शिक्षा देतां येत नाहीं असा.

अड़–*स्त्री.* अडून बसणें. हट्ट.–**गड़ा**–*पु.* १. गाडीतळ. २. बैलांचा बाजार. **–डंडा**–*पु.* डोल–काठीवरील शीड चढविण्याचें आडवें लाकूड.

अड़काना[+]–*क्रि. स.* १. टेकविणें; ठेवणें. २. अडकविणें. [स्थिर.

अडग–*वि.* न डगमगणारा;

अड़गोड़ा–*पु.* लोढणें; अडथळा.

अड़चन–ल–*स्त्री.* अडचण; अडथळा. [ज्योतिषी. २. थापाड्या.

अड़ड़पोपो–*पु.* १. कुडबुड्या.

अड़तल–*पु.* १. आडोसा. २. बहाणा. ३. आश्रय. **मु०–पकड़ना**–बहाणा करणें.**–लेना**–आश्रय घेणें.

अड़तालि(ली)स–*वि.* अट्ठेचाळीस.

अड़तीस–*वि.* अडतीस; ३८.

अड़दार–*वि.* अडेलतट्टू.

अड़ना–*क्रि. अ.* १. अडणें. २. हट्ट करणें.

अड़बंग–गा[+]–*वि.* १. वेडावाकडा; बिकट. २. बेढब. ३. विलक्षण.

अड़बंध–*पु.* १. प्रेताला नेसविली जाणारी लंगोटी. २. लंगोट.

अडर*–*पु.* निर्भय.

अड़सठ–*वि.* अडुसष्ट.

अड़हुल–*पु.* जास्वंदीचें फूल.

अड़ाअड़ी–*स्त्री.* १. चढाओढ; स्पर्धा. २. शत्रुत्व.

अड़ाड़–*पु.* जनावरांचा उघडा गोठा. (याच्या भोंवतीं लाकडी कुंपण असतें.) [२. मुक्काम.

अड़ान–*स्त्री.* १. आधार; टेंकण.

अड़ाना–*क्रि. स.* अडविणें.–*पु.* एक राग; अडाणा.

अड़ानी–*पु.* मोठा पंखा. – *स्त्री.* १. कुस्तींतील एक डाव. (टांग मारणें). २. खिडकीला किंवा दाराला लावलेला टेकू.

अड़ार–*पु.* १. ढीग. २. जळाऊ लाकडांचा ढीग. ३. लाकडाची वखार.

अड़ार–*वि.* वांकडा, तिरपा.

अडिग–*वि.* दृढ; स्थिर; न डगमगणारा. [२. मठ्ठ.

अड़ियल–*वि.* १. अडेलतट्टू.

अडिया–*स्त्री.* साधूंची कुबडी.

अड़ी–*स्त्री.* १. हट्ट; आग्रह. २. गरजेची वेळ; मोका; गरज. ३. आडकाठी; अडथळा.

अड़ूसा–*पु.* अडूळसा.

अडोर*–*पु.* आरडा-ओरडा.

अडोल*–*वि.* १. स्थिर; अचल. २. स्तब्ध. [पास.

अड़ोस पड़ोस–*पु.* शेजार; आस-

अड़ोसी पड़ोसी–*पु.* शेजारी-पाजारी. [जागा.

अड्डा–*पु.* अड्डा; जमण्याची

अढ़तिया–*पु.*१. वखारवाला. २. दलाल; अडत्या.

अढ़ना*–*क्रि. अ.* लागणें.

अढवना; अढौना–*क्रि. स.* कामाला लावणें. –*पु.* सोंपविलेलें काम.

अढाई–*वि.* अडीच.

अढ़िया–*स्त्री.* घमेलें. [युक्त.

अढ़ी*–*वि. स्त्री.* करणारी;

अढुक–ठोकर; ठेंच.

अढुकना–*क्रि. अ.* ठोकर खाणें.

अढ़ैया–*पु.* १. अडीच शेरी; अडीसरी. २. अडीचकीचा पाढा.

अणक–*वि.*अत्यंत लहान; तुच्छ.

अणि–*स्त्री.* १. टोंक. २. धार. ३. खीळ. ४. कोपरा.

अणिमा–*स्त्री.* १. सूक्ष्मता; अणुत्व. २. योगाच्या अष्टसिद्धींपैकीं पहिली. ही प्राप्त झाली असतां योगी अणुरूप धारण करून अदृश्य होऊं शकतो.

अणी–*स्त्री.* पा० ' अणि '.

अणु–*पु.* अणु; परमाणु; कण; ' मॉलेक्यूल ' **–बम**–*पु.* ॲटमबाँब; **–वीक्षण**–*पु.* १. सूक्ष्मदर्शक यंत्र. २. छिद्रान्वेषण.**–व्रत**–*पु.* जैन धर्मानुसार गृहस्थधर्माचें एक अंग.

अतंद्र; अतंद्रिल–*वि.* १. जागृत; जागा. २. सावधान.

अतः–*अव्य.* म्हणून; यासाठीं. **–परम्**–*अव्य.* यापुढें; यानंतर.

अतएव–*अव्य.* म्हणून; म्हणूनच.

अतथ्य–*वि.* असत्य; चुकीचें; अयथार्थ.

अतद्‌गुण–*पु.* एक अर्थालंकार. दोन वस्तूंमध्यें अत्यंत साम्य असूनहि जेव्हां एक वस्तु दुसऱ्या वस्तूचा गुण घेत नाहीं तेव्हां हा अलंकार बनतो.

अतनु–*वि.* लठ्ठ; जाड.

अतप–*वि.* थंड; अनुत्तेजित.

अतर–*पु.* [*अ.*] अत्तर.**–दान**–*पु.* अत्तरदाणी.

अतरवन–*पु.* छपरावरील गवत, तुरकाठी किंवा फरशी.

अतरसों–*अव्य.* तेरवां; दोन दिवसांआडचा दिवस. (व्यतीत किंवा येणारा.)

अतर्क–*वि.* तर्कहीन; विसंगत. –*पु.* चुकीचें अनुमान.

अतर्कित–*वि.* ज्याची कल्पनाहि नव्हती असा; आकस्मिक.

अतर्क्य–*वि.* तर्क करता न येण्यासारखा. [रचें रेशमी वस्त्र.

अतलस– *स्त्री.* [*अ.*] एक प्रका-

अतलस्पर्शी–*वि.* तळाला स्पर्श न करणारा; सखोल; अथांग.

अतलांतक–*पु.* अटलांटिक महासागर; पूर्वेस युरोप, आफ्रिका व पश्चिमेस अमेरिका यांमधील समुद्र.

अतवार–*पु.* [*अ.* 'तौर' चें अनेक०] १. वर्तन; वागणूक. २. चालरीत; पद्धत. ३. राहणी.

अतवार–*पु.* रविवार.

अतसी–*स्त्री.* १.अळशी (धान्य); जवस. २. ताग; ज्यूट.

अता– *स्त्री.* [*अ.*] दान; देणगी; –**नामा**–*पु.* बक्षीसपत्र; दानपत्र. **मु०–करना; फरमाना**–देणें. –**होना** –मिळणें.

अताई–*वि.* [*अ.*] १. कुशल; दक्ष. २. धूर्त; चलाख.–*पु.* आपल्या विद्येचें ज्यानें शिक्षण घेतलेलें नाहीं असा गवई किंवा वैद्य.–**नुस्खा**–*पु.* वैदूनें सांगितलेलें औषध; इकडून-तिकडून ऐकलेलें औषध.

अताब–*पु.* [*अ.* '*इताब*'] क्रोध; राग. ['अत्तार'.

अतार–*पु.* [*अ.*] पा०

अतारांकित प्रश्न–*पु.* विधानसभा वगैरेंच्या अधिवेशनांत प्रश्नोत्तराच्या वेळीं विचारला जाणारा प्रश्न. याच्यावर खूण केलेली नसते व त्याचें उत्तर तोंडीं न देतां लेखी दिलें जातें. 'अन्स्टार्ड क्वेश्चन'.

अतालीक–*पु.* [*तु.*] गुरु; शिक्षक.

अति उत्पादन–*पु.* गरजेपेक्षां अधिक उत्पादन; 'ओव्हर प्रॉडक्शन'. [अविश्वसनीय.

अतिकथ–*वि.* अतिरंजित;

अतिकर–*पु.* 'सुपर टॅक्स.'

अतिकल–*पु.* अवेळ; उशीर.

अतिक्रम–*पु.* मर्यादा ओलांडणें; उल्लंघन.

अतिक्रमण–*पु.* दुसऱ्याच्या हद्दींत जबरी प्रवेश; बेकायदेशीर कब्जा करणें; हस्तक्षेप; 'एन्क्रोचमेंट'. **मु०–करना**–कायदा मोडणें; नियमभंग करणें; उल्लंघन, अतिक्रमण करणें.

अतिचरण–*पु.* मर्यादेच्या किंवा अधिकाराच्या बाहेर जाणें; सीमातीत होणें; 'ट्रान्सग्रेशन'.

अतिचार–*पु.* १. अतिक्रमण; मर्यादेचें उल्लंघन. २. फार वेळ तमाशा पाहाण्याचा दोष; रंगेलपणा.

अतिजीवन–*पु.* इतरांपेक्षां अधिक टिकाव धरणें. टिकून राहणें. जगणें; तगून राहणें; 'सरव्हाइव्हल'.

अतिजीवी–*वि.* इतरांपेक्षां अधिक टिकाव धरणारा; टिकून राहाणारा; 'सर्व्हाइव्हर'.

अतिथि–*पु.* १. पाहुणा. २. अनपेक्षितपणें आलेली अपरिचित व्यक्ति. –**गृह**–*पु.*–**भवन**–*पु.*–**शाला** –*स्त्री.* –**सदन**–*पु.*–अतिथिनिवास; 'गेस्टहाउस'.

अतिदेय–*वि.* कबुलीपेक्षां जास्त दिवस थकबाकी राहिलेलें; मुदतीबाहेर गेलेलें; 'ओव्हरड्यू.'

अतिपरवलय–*पु.* अतिपरवलय; अपरावर्त; 'हायपरबोला'.

अतिप्रजनन–*पु.* लोकसंख्येंतील भरमसाट वाढ; 'ओव्हर पॉप्युलेशन.'

अतिबला– *स्त्री.* तहान व भूक यांचा त्रास नाहींशी करणारी, विश्वामित्रानें रामाला शिकविलेली अस्त्रविद्या.

अतिब्बा–*पु.* [*अ.* '*तबीब*'चें *अनेक०*] वैद्य; हकीम.

अतिभारित–*वि.*ज्यावर बाजवीपेक्षां जास्त ओझें लादलें आहे असें, 'ओव्हर लोडेड.'

अतिमानुष–*वि.* मानवी शक्तीच्या बाहेरचें; अलौकिक.

अतिया–*पु.*[*अ.*] दिलेली वस्तु; भेंट; नजराणा.

अतिरथी–*पु.* एकटा अनेकांशीं लढणारा रथारूढ योद्धा.

अतिरिक्त–*अव्य.* शिवाय; खेरीज–*वि.* १. उरलेलें. २. वेगळें; निराळें. २. जादा; खास; विशेष. –**पत्र**–*पु.* पुरवणी. –**लाभ**–*पु.* जास्तीचा फायदा; 'एक्सेस प्रॉफिट'.

अतिवृष्टि– *स्त्री.* फार पाऊस पडणें. [अत्यधिक.

अतिशय–*वि.* फार; अधिक;

अतिशयोक्ति–*स्त्री.* १. भरमसाट केलेलें वर्णन. २. अतिरंजित वर्णन असलेला एक अर्थालंकार.

अतिसंधान–*पु.* योग्य लक्ष्याच्या पुढें नेम मारणें; 'ओव्हर हिटिंग' 'ओव्हर शूटिंग'.

अतिसर्पण–*पु.* अतिक्रमण.

अतिसूक्ष्मदर्शी– *वि.* अतिसूक्ष्मदर्शक; 'अल्ट्रामायक्रोस्कोप'.

अतींद्रिय–*वि.* इंद्रियांच्या कक्षेबाहेरील; अगोचर.

अतीत–*वि.* १. गेलेला; व्यतीत. २. मृत. ३. अलग; पृथक्.

अतीत–*पु.* संन्यासी; गोसावी.

अतीव–*अव्य.* अत्यंत; अत्यधिक.

अतीस–*पु.* अतिविषा (वनस्पति).

अतुकांत–*वि.* निर्यमक; मुक्त (काव्य). [चंचलता.

अतुराई–* *स्त्री.* आतुरता;

अतुराना– * *क्रि. अ.* १. आतुर होणें; घाई करणें. २. व्याकुळ होणें; घाबरणें. [पम. २. पुष्कळ.

अतुल–*वि.* १. अद्वितीय; अनु-

अतूथ *– *वि.* अपूर्व; अतुल्य.

अतोर*–*वि.* दृढ; न मोडणारा.

अत्त*–*वि.* आप्त; प्राप्त.–*स्त्री.*+ अधिकपणा; अतिशयता.

अत्ता–*स्त्री.* १.माता. २.मावशी. ३. सासू. ४ थोरली बहीण.

अत्तार–*पु.* [*अ.*] अत्तर विकणारा; सुगंधी.

अत्युक्ति–*स्त्री.* अतिशयोक्ति.

अत्र– *अव्य.* १. येथें; या ठिकाणीं. २. या विषयीं–**भवान्**–*वि.* माननीय; पूज्य; श्रेष्ठ.

अथ–*अव्य.* आरंभ व मंगल-सूचक शब्द; आतां.–*पु.* आरंभ.–**किम्**–*अव्य.* आणखी काय; होय; अवश्य. –**से इति तक**–अथपासून इतिपर्यन्त; संपूर्णपणें.

अथक–*वि.* कधींहि न थकणारा; अविरत.

अथच– *अव्य.* आणि; तसेंच.

अथना;– **अथयना***– *क्रि. अ.* अस्त होणें.

अथरा– *पु.* १. घंगाळासारखें मातीचें भांडें; यांत कपडे रंग-वितात. २. मोठा परळ.

अथरी– *स्त्री.* दहीं विरजण्याची मातीची कुंडी; परळ.

अथवना*–*क्रि. अ.* अस्त होणें.

अथवाद–*पु.* उपोद्घात; प्रास्ता-विक.

अथाई– *स्त्री.* १. बैठकीची जागा. २. पंचायतीची जागा. ३. घरापुढील चबुतरा. ४. मंडळ; सभा; जमाव.

अथान*– *पु.* लोणचें.

अथाह– *वि.* १. अथांग. २. अपरिमित.–*पु.* १. खोली. २. जलाशय. ३. समुद्र. **मु०– में पड़ना**– संकटांत सांपडणें; अड-चणींत येणें.

अथाही +– *स्त्री.* वसुली.

अथिर–*वि.* अस्थिर; क्षणभंगुर.

अथोर*– *वि.* पुष्कळ; खूप.

अदंक*– *पु.* भय; भीति; दहशत. [शुद्ध.

अदग–*वि.* निष्कलंक; निर्दोष;

अदगन– *पु.* आधणाचें पाणी.

अदत्ता– *स्त्री.* अविवाहित स्त्री. –*वि.* न दिलेली.

अदद– *स्त्री.* [*अ.*] १. संख्या. २. डाग; नग.

अदन– *पु.* [*अ.*] ईश्वरानें आदम या आदिमानवाला जेथें ठेवलें होतें ती स्वर्गांतील बाग. २. एडन बंदर.

अदना– *वि.* [*अ.*] १. क्षुद्र; तुच्छ. २. सामान्य.

अदब– *पु.* [*अ.*] १. शिष्टा-चार; आदर; सन्मान; नम्रता. २. साहित्य; वाङमय. –**लिहाज**–*पु.* मान ठेवणें; मानसन्मान.

अदबदाकर–*अव्य.* टेकीनें; पैज लावून; अवश्य.

अदब्ब– *पु.* पा० 'आदाब'.

अदभ्र–*वि.* पुष्कळ; अपार.

अदम– *पु.* [*अ.*] १. अभाव. २. परलोक.–**तामील**– *स्त्री.* समन्स वगैरे लागू न होणें.–**पैरवी**– *स्त्री.* खटल्यामध्यें एका पक्षाच्या बाजूनें आवश्यक त्या गोष्टी न होणें–**मौजूदगी**–*स्त्री.* अनुपस्थिति; गैर-हजिरी. **मु०–का रास्ता लेना**;–**को सिधारना**–परलोकवासी होणें; मरणें. [सारखें; प्रचंड; प्रबल.

अदम्य– *वि.* दावतां न येण्या-

अदरक– *पु.* आलें (औषधी वनस्पति). [२. सुंठवडा.

अदरकी– *स्त्री.* १. आलेपाक.

अदरा +– *पु.* आर्द्रा नक्षत्र.

अदराना–*क्रि. अ.* गौरवामुळें चढून जाणें; घमेंडखोर बनणें– –क्रि. स. गौरवानें चढविणें.

अदरावन*– *पु.* आदर; मान.

अदर्शनीय– *वि.* न पाहण्या-सारखें; कुरूप. [पत्नी.

अदल–+ *स्त्री.* पार्वती; शिव-

अदल–*पु.* [*अ.*] न्याय.

अदल – *वि.* १. पर्णरहित. २. सेनारहित. [परिवर्तन.

अदलबदल – *पु.* अदलाबदल;

अदलीय–*वि.* कोणत्याहि पक्षांत नसलेला; स्वतंत्र; अपक्ष; 'इंडिपेंडंट'.

अदवान– *स्त्री.* बाजेच्या पाया-गतची दोरी.

अदह –*पु.* एक न जळणारा खनिज पदार्थ; 'ॲझबेस्टॉस'.

अदहन– *पु.* आधण; उकळतें पाणी. **मु०– देना**–आधण ठेवणें.

अदा– *स्त्री.* [*अ.*] १. नखरा; हावभाव. २. चाल; पद्धत.

अदा– *वि.* [*अ.*] फेडलेलें; बेबाक. **मु०– करना**–पार पाडणें; चुकतें करणें; फेडणें.

अदाई*–*वि.* १. धूर्त; लटपटच्या. २. निर्दय; कपटी.

अदाकार–*पु.* [*अ.*+*फा.*] नट; अभिनय करणारा; अभिनेता.

अदाबंदी –*स्त्री.* [*अ.*+*फा.*] वायदा. [मिळण्याचा हक्कदार.

अदाय– *वि.* वांटणी मिळ-

अदायगी– *स्त्री.* [*अ.*] (कर्ज वगैरे) देऊन टाकणें; फेडणें.

अदालत– *स्त्री.*]*अ.*] कचेरी; कोर्ट. – **अपील**; –**आलिया**– *स्त्री.* वरिष्ठ न्यायालय. –**खफीफा**– *स्त्री.* ' स्मॉल कॉज कोर्ट '.–**दीवानी** *स्त्री.* दिवाणी न्यायालय. – **फौजदारी** – *स्त्री.* फौजदारी न्यायालय.–**माल**– *स्त्री.* शेती, खंड, वगैरे संबंधींचें न्यायालय; ' रेव्हेन्यू कोर्ट '.– **मु०–करना**–कोर्टकचेरी करणें.

अदालती– *वि.* [*अ.*] कचेरी–संबंधीं. [२. घोटाळा; अडचण.

अदावँ – *पु.* १. कठोरता.

अदावत– *स्त्री.*] *अ.*] वैर; शत्रुता. [विरोधी.

अदावती– *वि.* [*अ.*] वैरी;

अदिन–नु–*पु.* १. वाईट दिवस. २. दुर्दैव. [अदृष्ट; गुप्त.

अदीठ – *वि.* न पाहिलेलें;

अदीब – *वि.* [*अ.*] १ साहित्यिक. २. कलावंत.

अदीम– *वि.* [*अ.*] अलभ्य; अप्राप्य; न मिळणारें. –*पु.* कच्चें व दुर्गंधयुक्त कातडें.

अदू– *पु.* [*अ.*] शत्रु; वैरी.

अदूर – *अव्य.* जवळ. – *वि.* जवळचें. –**दर्शी**–*वि.* दूरवरचें न पाहाणारा; अविचारी.

अदृष्ट– *वि.* १. न पाहिलेलें; अदृश्य. २. अज्ञात. –*पु.* भाग्य. –**पूर्व**–*वि.* १. पूर्वी न पाहिलेला. २. अद्‌भुत.–**वाद**.–*पु.* प्रारब्धवाद; नियतिवाद. [करणारा.

अदेखी – *वि.*. द्वेष्टा; हेवा

अदेय – *वि.* न देण्यासारखें; देतां न येणारें.

अदेस*– *पु.* १. आदेश. २. प्रणाम.

अदौरी+–*स्त्री.* उडदाच्या पिठाची वडी.

अद्धा – *पु.*१. अर्धा भाग; अर्धी बाटली. २. एक बाटलीभर किंवा एक ड्राम दारू. ३. चार मात्रांचा एक ताल. ४. पावती देणाऱ्याजवळ राहाणारा पावतीचा अर्धा भाग.

अद्यतन – *वि.* १. आजचा, २. अद्ययावत्; 'अपटुडेट'.

अद्यावधि – *अव्य.* आजपर्यंत; आतापर्यंत.

अद्यावधिक – अद्ययावत्; अद्यतन; ' अपटुडेट '.

अद्रक– *पु.* पा० ' अदरक '.

अद्वैत – *पु.* जीव व ब्रह्म किंवा आत्मा व परमात्मा यांतील अभेद.–**वाद** *पु.* जीव व ब्रह्म यांत भेद नाहीं असें प्रतिपादणारें तत्त्वज्ञान.

अध:– *अव्य.* खालीं; पाताळांत किंवा नरकांत. – **पतन**; –**पात** –*पु.* अधोगति; अवनति.

अध–*वि.* अर्धा. – **कचरा** – *वि.* १. अर्धाकच्चा; अपरिपक्व. २. अपूर्ण; अर्धवट.–**कछार** *पु.* डोंगराच्या पायथ्याची उतरती जमीन.–**कपारी**–*वि.* अर्धशिशी. –**करी** – *स्त्री.* खंडाचा किंवा साऱ्याचा अर्धा हप्ता. –**कहा**– *वि.* अर्धवट सांगितलेलें.– **खिला**–*वि.* अर्धवट फुललेलें.–**खुला**–*वि.* अर्धविकसित; अर्धोन्मीलित.– **गोरा**–*वि.* यूरेशियन; अँग्लोइंडियन. – **जला**–*वि.* १. अर्धवट जळलेला; भाजलेला. २. जखमी. – **पई**– *स्त्री.* अदपाव. –**बुध**–*वि.* अर्धवट शिकलेला; मंदबुद्धि.–**मरा**; –**मुआ**–*वि.* अर्धमेला; मृतप्राय. –**सेरा**–*पु.* अच्छेर.

अधनिया–*वि.* अर्ध्या आण्याचा; दोन पैशांचा.

अधन्ना–*पु.* **अधन्नी**– *स्त्री.* अर्ध्या आण्याचें नाणें; ढबू पैसा.

अधन्य*– *वि.* दुःखी; दुर्दैवी.

अधपर+– *अव्य.* अर्ध्यावर; मध्यावर. [पुढील भागावर.

अधपैया– * *अव्य.* पायाच्या

अधफर–* *पु.* अंतरिक्ष; अंतराळ. [मध्येंच.

अधबिच–*अव्य.* मध्यावर;

अधम–*वि.* १. नीच; निकृष्ट. २. पापी; दुष्ट. [ऋणको; 'डेटर '.

अधमर्ण–*पु.* कर्ज घेणारा;

अधर–*पु.* १. ओंठ. २. अंतरिक्ष. –*पु.* खालचा.–**पान**–*पुं.* चुंबन.– **मु०–में लटकना**–मध्येंच लोंबकळणें; अर्धवट राहाणें.

अधराधर–*पु.* खालचा ओंठ.

अधवा–*स्त्री.* विधवा.

अधवारी– *स्त्री.* धावडा (एक झाड). [णारा; चोर.

अधश्चर–*पु.* घरफोडी कर-

अधातु–*वि.* ' नॉनमेटल '.

अधार*– *पु.* आधार.

अधारिया–*पु.* बैलगाडींत गाडीवानाची बसण्याची जागा.

अधारी– *स्त्री.* १.आधार; आश्रय. २. कुबडी; ३. प्रवासी पिशवी.

अधावट–*वि.* आटून अर्धे झालेलें; आटवून अर्धे केलेलें (दूध इ.).–*पु.* आटविल्यानंतर निम्में उरलेलें दूध.

अधिक–*वि.* १. जास्त; वाढलेला. २.असामान्य.–**मास**–*पु.* धोंडा महिना; तेरावा महिना.

अधिकई–*स्त्री.* १. आधिक्य. २. महत्ता; महिमा. ३. कौशल्य, विशेषता.

अधिक कोण–*पु.* विशाल कोन; ' ऑबच्यूज अँगल '.

अधिककोण त्रिभुज–*पु.* विशालकोनत्रिकोण; ' ऑबच्यूज अँगल्ड ट्रायंगल '.

अधिकतम–*वि.* जास्तींत जास्त; कमाल.

अधिकतर–*अव्य.* बहुधा; अधिकांशपणें.–*वि.* अधिक; जास्त.

अधिकमूल्यपर–*अव्य.* मूळ किमतीपेक्षां जास्त; 'अबव्हपार'.

अधिकर–*पु.* १. अधिक आकार; जास्त आकारलेला कर; 'सरचार्ज'. २. अतिरिक्त कर; 'सुपर टॅक्स'.

अधिकरण–*पु.* १. आधार; अधिष्ठान. २. सप्तमी विभक्तीचा प्रत्यय. ३. निवाडामंडळ; न्यायमंडळ; न्यायालय; 'ट्रिब्यूनल'.

अधिकर्मी–*पु.* मुकादम; 'ओव्हरसियर'.

अधिकांश–*पु.* मोठा भाग.–*वि.* अधिकतर; बहुतेक; बहुसंख्य.–*अव्य.*–बहुतकरून; बहुधा.

अधिकाई–* *स्त्री.* १. अधिकता. २. विशेषता. ३. महत्त्व.

अधिकाना–*क्रि. अ.* अधिक होणें; वाढणें.

अधिकार–*पु.* १. प्रभुत्व; सत्ता. २. ताबा. ३. स्थान; पद. ४. हक्क. ५. योग्यता; पात्रता. **–करना**–ताबा मिळविणें; कब्जा घेणें. **–का अवक्रमण**–*पु.* एका व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या हातून दुसऱ्याकडे अधिकार जाणें; 'डिव्हॉल्यूशन ऑफ पॉवर.' **–क्षेत्र**–*पु.* अधिकार क्षेत्र; 'ज्यूरिस्डिक्शन'.**–पत्र**–*पु.* सनद; 'चार्टर'. **–पृच्छा**–*पु.* दावा करणाऱ्याला त्या बाबतींतील त्याचा अधिकार विचारणारा लेखी आदेश; 'क्वो वारंटो'.

अधिकारिका सेना–*स्त्री.* जिंकलेल्या प्रदेशावर मुलकी प्रशासन सुरू होईपर्यंत अंमल चालविणारें सैन्य. 'आर्मी ऑफ ऑक्युपेशन'.

अधिकारिराज्य–*पु.* नोकरशाही; 'ब्यूरॉक्रसी'.

अधिकृत–*वि.* १. अधिकारयुक्त, २. ताब्यांत आलेला. ३. अधिकृत; 'ऑथराइज्ड.'**–गणक**–*पु.* अधिकृत; सरकारमान्य, हिशेबतपासनीस; 'चार्टर्ड अकाउंटंट'.

अधिकोष–*पु.* पेढी; 'बँक'.

अधिकोषण कार्य (व्यापार)–पेढीचा व्यवहार; सावकारी; पैशाच्या देवघेवीचा व्यवसाय; 'बँकिंग बिझिनेस'.

अधिक्षेत्र– अधिकारक्षेत्र; 'ज्यूरिस्डिक्शन'.

अधिक्षेप–*पु.* १. फेंकणें. २ निंदा; अपमान. ३. उपहास.

अधिग्रहण–*पु.* १. मागणी (ताबा मिळवण्यासाठीं); 'रिक्विझिशन.' २. ताबा; कब्जा; 'ॲक्विझिशन'. [सभासद; 'फेलो.'

अधिछात्र–*पु.* शैक्षणिक संस्थेचा

अधिछात्रवृत्ति–*स्त्री.* शैक्षणिक संस्थेचें सभासदत्व; 'फेलोशिप'.

अधित्यका–*स्त्री.* पठार; 'टेबललँड'. [स्वत्वनिवृत्ति.

अधित्याग– *पु.* स्वत्वत्याग;

अधिदेय–*पु.* भत्ता; 'अलाउन्स'.

अधिदैविक–*वि.* आध्यात्मिक.

अधिनहन–*पु.* खालसा करणें.

अधिनायक– *पु.* १. नेता; पुढारी; सर्वाधिकारी. २. हुकूमशाहा; 'डिक्टेटर'.**–तंत्र**–*पु.* हुकूमशाही; 'डिक्टेटरशिप'.

अधिनियम–*पु.* कायदा; 'ॲक्ट'.

अधिनियमन–*पु.* कायदा करणें; 'इनॅक्टमेंट'.

अधिनिर्वाचित करना–*क्रि. स.* बाहेरच्या व्यक्तीला सभासद करून घेणें; 'टु को-ऑप्ट'.

अधिनिष्कासन– *पु.* कायदेशीर मार्गानें बाहेर काढणें; काढून टाकणें; 'एव्हिक्शन'.

अधिपत्र–*पु.* एखाद्याला पकडण्याचा किंवा जप्तीचा लेखी हुकूम; 'वॉरंट'. २. लेखी अधिकारपत्र; सनद.

अधिपुरुष– *पु.* अधिकारप्राप्त व्यक्ति; वरिष्ठ अधिकारी; साहेब; 'बॉस.'.

अधिप्रतिनिधित्व; अधिकप्रतिनिधित्व–*पु.* एखाद्या अल्पसंख्याक वर्गाला त्याच्या संख्येच्या प्रमाणापेक्षां दिलें जाणारें अधिक प्रतिनिधित्व; 'वेटेज'.

अधिभार–*पु.* अतिरिक्त कर, शुल्क वगैरे; जास्त आकारलेला कर; 'सरचार्ज'.

अधिमान–*पु.* प्राधान्य; पसंती; पहिला हक्क; 'प्रेफरन्स'.

अधिमान्य–*वि.* अधिक पसंत; अधिक बरा; 'प्रेफरेबल'.

अधिमान्यता–*स्त्री.* मान्यता; प्राधान्य; श्रेष्ठत्व; अधिक पसंती; 'प्रेफरन्स'. [धोंडामहिना.

अधिमास–*पु.* अधिक महिना;

अधिमुद्रण–*पु.* अतिरिक्त मुद्रण; 'ऑफ प्रिंट'.

अधिमूल्यपर–*अव्य.* ठरलेल्या किंमतीपेक्षां जास्त दरानें; 'अबव्ह पार'. [२. अर्धेला–ली; बटाई.

अधिया–*स्त्री.* १. अर्धा भाग.

अधियाचन–*पु.* १. एखादी वस्तु हक्कानें मागणें. २. सभासदांनीं सभेची बैठक बोलावण्याची लेखी मागणी करणें; 'रिक्विझिशन'.

अधियाना–*क्रि. स.* निम्मी-निम्मी वांटणी करणें; अर्धें अर्धें वांटून घेणें.

अधियार–*पु.* १. अर्धा वांटा. २. अर्धा भागीदार. २. एका गांवाशीं अर्धा संबंध असलेला जमीनदार

किंवा शेतकरी. [–स्त्री. अधियारी]

अधियुक्त–*वि.* नोकरी करणारा; नियुक्त; कामास लागलेला; 'एम्प्लॉइड'.

अधियोक्ता; अधियोजक–*पु.* नोकरीस ठेवणारा; काम पुरविणारा; मालक; 'एम्प्लॉयर'.

अधियोग–*पु.* प्रवासासाठीं शुभ मानला जाणारा एक योग.

अधियोजन–*पु.* काम-धंदा; नोकरी; 'एम्प्लॉयमेंट'.

अधियोजनालय–*पु.* कामधंदा, नोकरी मिळवून देणारी कचेरी; एजन्सी; 'एम्प्लॉयमेंट ब्यूरो–एक्स्चेंज'.

अधिरथ–*वि.* १. रथारूढ. –*पु.* सारथी. २. कर्णाचें पालन करणारा सूत.

अधिराज–*पु.* सम्राट्; अधीश्वर.

अधिराज–*पु.* १. आधिपत्य; सत्ता. २. साम्राज्य. ३. वसाहतीचें स्वराज्य; 'डोमीनियन'.

अधिरोप–*पु.* १. भाडें, दंड वगैरेची रक्कम. २. आरोप; 'चार्ज'.

अधिरोहण–*पु.* १. वर चढणें. २ स्वार होणें. ३. धनुष्याला दोरी लावणें. [२. जिना. ३. पायरी.

अधिरोह(हि)णी–*स्त्री.* १. शिडी.

अधिलाभांश–*पु.* पगाराव्यतिरिक्त मिळणारें बक्षीस; नफ्यांतील वांटा; 'बोनस'.

अधिवक्ता–*पु.* १. एखाद्या पक्षाचें समर्थन करणारा; समर्थक; वकील; 'अ‍ॅडव्होकेट'. २. वक्ता. ३. प्रवक्ता; 'स्पोक्समन'.

अधिवक्तृता–*स्त्री.* वकिली; कैवार.

अधिवर्ष–अधिक दिन किंवा अधिक मास असलेलें वर्ष; 'लीप-ईयर'. [निवडणूक. २. नियुक्ति.

अधिवाचन–*पु.* १. निवड;

अधिवास–*पु.* १. निवास; मुक्काम. २. शेजारी. ३. रहिवासी. ४. उटणें. ५. लग्नापूर्वी तेल–हळद लावणें. ६. परदेशांत किंवा परप्रांतांत जाऊन कायमचें राहाणें; 'डोमिसाइल'.

अधिवासी–*पु.* दुसऱ्या देशांत किंवा राज्यांत राहाणारा; 'डोमिसाइल्ड पर्सन'. –*वि.* सुगंधित करणारा. **–किसान**–*पु.* पोटकूळ.

अधिविकर्ष–*पु.* बँकेंत आपल्या खात्यावर असलेल्या रकमेपेक्षां अधिक रकमेचा चेक काढणें; 'ओव्हर ड्राफ्ट'.

अधिवेशन–*पु.* बैठक; अधिवेशन.

अधिशिक्षिक–*पु.* मुख्याधिष्ठाता; विद्यापीठांतील एक अधिकारी; 'रेक्टर'.

अधिशीतित–*वि.* जरुरीपेक्षां अधिक गार केलेलें; 'ओव्हरकूल्ड'.

अधिशुल्क–*पु.* १. खऱ्या किंमतीपेक्षां अधिक घेतली जाणारी रक्कम. २. एखाद्या नाण्याचें त्याहून अधिक मूल्यवान् नाण्यांत परिवर्तन करण्यासाठीं घेतली जाणारी वेगळी रक्कम; 'प्रीमियम'.

अधिशोषण–*पु.* शोषण.

अधिष्ठाता–*पु.* १. देखरेख करणारा. २. नियामक; अध्यक्ष. ३. प्रमुख. ४. ईश्वर. [–*स्त्री.* **अधिष्ठात्री**]

अधिष्ठान–*पु.* १. निवासस्थान. २. आधार; आश्रय. ३. आशीर्वाद. ४. सान्निध्य. ५. अधिकार.

अधिष्ठापन–*पु.* उभारणी; स्थापना; बसविणें (यंत्र वगैरे); 'इन्स्टॉलेशन'. [सद; 'फेलो'.

अधिसदस्य–*पु.* सामान्य सभा-

अधिसूचन–*पु.* प्रसिद्धीकरण; विज्ञापना; 'नोटिफिकेशन'.

अधिसूचना–*स्त्री.* अधिकृत सूचना; प्रकटन; विज्ञापना; 'नोटिफिकेशन'. [स्वर; 'ओव्हरटोन'.

अधिस्वर–*पु.* अधिक उच्च

अधीक्षक–*पु.* कार्यालय-प्रमुख; व्यवस्थापक; विभाग प्रमुख; 'सुपरिंटेंडेंट'. [टेंडेन्स'.

अधीक्षण–*पु.* देखरेख; 'सुपरि-

अधीजना*–*क्रि.अ.* अधीर होणें.

अधीत–*वि.* शिकलेला; पारंगत.

अधीन–*वि.* आश्रित; हाताखालचा; ताब्यांतील. **–अधिकारी**–*पु.* दुय्यम अधिकारी; हाताखालचा अधिकारी; 'सबॉर्डिनेट ऑफिसर'. **–न्यायालय**–*पु.* दुय्यम न्यायालय; 'सबॉर्डिनेट कोर्ट'. **–राज्य**–मांडलिक राष्ट्र; परतंत्र राष्ट्र.

अधीनता–*स्त्री.* १. पारतंत्र्य; परवशता. २. दीनता.

अधीनीकरण–*पु.* ताब्यांत आणणें; नियंत्रण; अंमल; 'सब्जुकेशन'.

अधीश; अधीश्वर – *पु.* १. मालक; धनी; २. अध्यक्ष. ३. राजा.

अधीसारक–*पु.* वारंवार वेश्यांकडे जाणारा; वेश्यागमनी.

अधुना–*अव्य.* १. आतां. २. हल्लीं; अलीकडे. [एकटा.

अधूरन–*वि.* अपूर्ण; अर्धवट;

अधूरा–*वि.* अर्धवट; अपूर्ण. **मु०–जाना**–अवेळीं गर्भपात होणें.

अधेड़–*वि.* मध्यम वयाचा.

अधेली–*स्त्री.* आठ आण्यांचें नाणें; अधेली.

अधोगति–*स्त्री.* १. पतन; अवनति. २. नरकांत जाणें.

अधोटी[+]–*स्त्री.* गाय, म्हैस

वगैरेच्या कातडयाची चांभाराकडून घेतली जाणारी अर्धी किमत.

अधोतर–*पु.* दुहेरी विणीचें एक जाडें-भरडें कापड. [ट्रोपस.

अधोमुख–*वि.* उदावर्त; ‘ अॅने-

अधोरध*–*अव्य.* वरखालीं.

अधोवस्त्र–*पु.* शरीराचा कमरेखालचा भाग झांकणारें वस्त्र. (धोतर, विजार वगैरे).

अधौड़ी–*स्त्री.* अर्धवट कमावलेलें कातडें; जाड कातडें.–**अस्तर**–*पु.* पादत्राणाच्या तळाच्या वरच्या बाजूचें जाड कातडें.–**मु०–तनना**–पोट खूप भरणें; डेरकें भरणें.–**तानना**–चापून खाणें.

अध्यक्ष–*पु.* मुख्य अधिकारी; अध्यक्ष; निरीक्षक; ‘ चेयरमन ’; ‘ स्पीकर ’.–**पीठ**–*पु.* अध्यासन; ‘चेयर’.–**दीर्घा**–*स्त्री.* संसदेंत किंवा विधानसभेंत अध्यक्षांच्या मागीलबाजूस असलेला सज्जा. ‘ स्पीकर्स गॅलरी ’.

अध्ययन–*पु.* अभ्यास; शिक्षण.–**कक्ष**–*पु.* अभ्यासिका; ‘ स्टडी ’.

अध्यवसान–*पु.* १. निश्चय २. प्रयत्न; चिकाटी.

अध्यवसाय–*पु.* १. सतत उद्योग; चिकाटी. २. उत्साह. ३. निश्चय.

अध्यवसायी–*वि.* १. उद्योगी; चिकाटीचा. २. उत्साही.

अध्यशन–*पु.* अतिभोजन; एकदां खाल्लेलें पचण्यापूर्वींच पुनः खाणें.

अध्यादेश–*पु.* वटहुकूम; ‘आर्डिनन्स ’. [शिक्षक; मास्तर.

अध्यापक–*पु.* शिकविणारा;

अध्यापन–*पु.* शिकविणें; शिक्षण.

अध्यापिका–*स्त्री.* शिक्षिका; मास्तरीण.

अध्याय–*पु.* १. शिकणें; अध्ययन. २. पुस्तकाचें प्रकरण. ३. शिकण्याची वेळ.

अध्यारोप; अध्यारोपण–*पु.* १. एका वस्तूचे गुणधर्म चुकीनें दुसऱ्या वस्तूवर लादणें; मिथ्या आरोप. २. अध्यास; मिथ्या ज्ञान; आभास.

अध्यास–*पु.* मिथ्या ज्ञान; आभास.

अध्यासन–*पु.* १. आसन; ‘ चेयर ’. २. वसणें. ३ निरीक्षण करणें.

अध्याहार–*पु.* १. वादविवाद; चर्चा. २. वाक्य पूर्ण करण्यासाठीं त्यांत आणखी शब्द जोडणें. ३. अस्पष्ट वाक्य दुसऱ्या शब्दांत स्पष्ट करणें. ४. निष्कर्ष; अनुमान; ‘ इन्फरन्स ’.

अध्येता–*पु.* अध्ययन करणारा; विद्यार्थी. [२. आकाश.

अध्वर–*पु.* १. यज्ञ; सोमयज्ञ.

अध्वर्यु–*पु.* यज्ञकर्मातील यजुर्वेदानुसार अनुष्ठान करणारा ऋत्विज.

अनंग –*पु.* कामदेव; मदन.

अनंगीकार करना –*क्रि. स.* नाकारणें; न जुमानणें; ‘ रिप्यूडिएट ’.

अनंत –. *वि.* अपार; अनंत; ‘ इनफिनिट. ’– *पु.* परमेश्वर; विष्णु.–**वीर्य**–*वि.* अपार सामर्थ्य असणारा. –*पु.* जैनांचे तेवीसावे तीर्थंकर (भावी). [२. सतत.

अनंतर – *अव्य.* १. नंतर.

अन – *अव्य.* शिवाय; खेरीज. –वि. दुसरा; अन्य.

अनअहिवात*– *पु.* वैधव्य.

अनइस*; **अनइसा*** – *वि.* पा० ‘ अनैस ’; ‘ अनैसा ’.

अनक–*पु.* १. नगारा; मृदंग. २. गरजणारे मेघ.

अनकटोटा – *वि.* उपटसुंभ.

अनकना*– *क्रि. स.* आडून ऐकणें; कानोसा घेणें.

अनक़रीब – *अव्य.* [*अ.*] १. अगदीं थोडया वेळांत; लौकरच. २. सुमारें; जवळजवळ.

अनकस – *अव्य.* कसेंसेंच. **मु०–लगना**–कसेंसेंच होणें.

अनकहा – *वि.* न बोललेलें; न सांगितलेलें –**मु०– (ही) देना**–गप्प राहणें.

अनख – *पु.* १ राग; रुसवा. २. दुःख; खिन्नता; ३. ईर्ष्या.

अनखना *– *क्रि.अ.* मनांतल्या मनांत चडफडणें; रागावणें.

अनखनाना *– *क्रि. स.* भडकविणें.

अनखाना *– *क्रि. अ.* रुष्ट होणें; रागावणें; चिडणें; –*क्रि. स.* चिडविणें; रुष्ट करणें.

अनखाहट–*स्त्री.* रुसवा; राग.

अनखी; अनखौंहा*–*वि.* चिडखोर; लवकर रागावणारा.

अनगढ़–*वि.* १ अनघड; बेडौल. २.* स्वयंभू. [असंख्य.

अनग(गि)ना– *वि.* अगणित;

अनगनिया *– *वि.* अगणित; बेसुमार.

अनगवना; * **अनगाना***– *अव्य.* १. मुद्दाम उशीर लावणें; खोळंबा करणें. २. टाळाटाळ करणें.

अनगार; अनगारिक *वि.* गृहहीन; घरदार नसलेला. –*पु.* सतत भ्रमण करणारा संन्यासी.

अनगिनत, अनगिना– *वि.* अगणित; अनंत.

अनगैया – *स्त्री.* आंगण.

अनगैर–री – *वि.* अपरिचित; परका. [२ निर्मळ; सुंदर.–*पु.* पुण्य.

अनघ–*वि.* १ निष्पाप; पवित्र.

अनघे(घै)री*– *वि.* अनाहूत; न बोलाविलेला.

अनचाहत *– *वि.* अनासक्त; प्रेम न करणारा. –*अव्य.* इच्छा नसतांना; अनिच्छेनें.

अनचाहा– *वि. पु.* नको असलेला; नावडता.

अनचीता–*वि. पु.* अनपेक्षित; अचिंतित.

अनजान – *वि.* १. अज्ञानी; अनभिज्ञ. २. अनोळखी.

अनजाने – *अव्य.* अजाणतां; न कळत.

अनट–**पु.* अन्याय; अत्याचार.

अनत–*वि.* ताठ; न वांकलेला. –*अव्य.** अन्यत्र; दुसरीकडे.

अनदेखा–*वि.पु.* न पाहिलेला.

अनधिकार– *वि.* अधिकार नसलेला; अयोग्य; अपात्र; –*पु.* अयोग्यता.–**चेष्टा**–*स्त्री.* अधिकार किंवा पात्रता नसतांना केलेली लुडबुड; मर्यादेचें अतिक्रमण.

अनधिकारी– *वि.* अधिकार नसलेला; अपात्र; अयोग्य.

अनधिकृत–*वि.* १. अधिकारावर नेमणूक न झालेला. २. ज्यावर कब्जा मिळविलेला नाहीं असा. ३. अनधिकृत; 'अनअथॉराइज्ड.'

अनधिगत–*वि.* १. न जाणलेलें. २. अप्राप्त; न मिळविलेलें.

अनध्याय–*पु.* १. शिकविणें न होणें. २. सुटी; खाडा. ३. सुटीचा दिवस.

अननुज्ञापित–*वि.* नामंजूर; अस्वीकृत; परवानगी नाकारलेलें; 'डिस्-अलाउड'. [लेट'.

अननुपत्री–*वि.* 'एक्सस्टिप्यु-

अननुभूत–*वि.* १. ज्याचा अनुभव पूर्वीं कधीं घेतलेला नाहीं असें. २. अज्ञात; अपरिचित.

अननुरूप–*वि.* विजोड; 'इन्कॉम्पॅटिबल'.

अनन्नास–*पु.* [पोर्तु.] अननस.

अनन्य–*वि.* १. एकनिष्ठ. २. एकाग्र. ३. अद्वितीय. –**गतिक**–*वि.* ज्याला दुसरा कांहीं आधार किंवा उपाय नाहीं असा.–**साधारण**–*वि.* असामान्य; अलौकिक.

अनन्वित–*वि.* असंबद्ध; अयोग्य.

अनपच–*पु.* अजीर्ण.

अनपढ़–*वि.* निरक्षर; मूर्ख.

अनपाकरण–*पु.* १. करारांचें पालन न करणें २. कर्जाची फेड न करणें. ३. ठरलेली मजुरी न देणें. –**विवाद**–*पु.* कामगार व मालक यांच्यांतील वेतनासंबंधींचा झगडा.

अनपाय–*वि.* १. एकनिष्ठ; अनन्य. २. अविनाशी; अनश्वर.

अनपायी–*वि.* १. निश्चल; स्थिर; अविनाशी; स्थायी. २. एकनिष्ठ. [–*स्त्री.* **अनपायिनी** [

अनपेक्ष; अनपेक्षी–*वि.* १. इच्छा किंवा पर्वा न करणारा. २. तटस्थ.

अनपेक्षित; अनपेक्ष्य–*वि.* ज्याची अपेक्षा किंवा इच्छा नाहीं असें.

अनफाँस–*पु.* मोक्ष; मुक्ति.

अनबन– *स्त्री.* **अनबनाव**– *पु.* भांडण; बिघाड; बेबनाव; वैमनस्य.

अनबाद*–*पु.* निरर्थक गोष्ट.

अनबि(बे)धा–*वि.* वेध किंवा छेद न केलेला. [मुखस्तंभ.

अनबोल–*वि.* अबोल्या; घुम्या;

अनबोलता–*वि.* मुका; बोलतां न येणारा (पशु).

अनब्याहा–*वि.* अविवाहित.

अनभल-ला–*वि.* १. वाईट. २. कुत्सित.

अनभाया; अनभावना–*वि.* अप्रिय; नावडता; अरुचिकर.

अनभिज्ञ–*वि.* माहिती नसलेला; अपरिचित; अज्ञ.

अनभो-भौ*–*पु.* आश्चर्यकारक गोष्ट.–*वि.* अलौकिक.

अनभ्यस्त–*वि.* १. ज्याचा अभ्यास किंवा संवय नाहीं असा. २. ज्यानें अभ्यास किंवा संवय केलेली नाहीं असा.

अनभ्र–*वि.* ढग नसलेला; मेघविरहित; निरभ्र. –**वज्रपात**–*पु.* अकस्मात् कोसळलेली आपत्ति.

अनम–*वि.* न नमणारा; उद्धट. –*पु.*–ब्राह्मण. (ब्राह्मणानें इतरांना नमस्कार करावयाचा नसतो.)

अनमन-ना–*वि.* १. उदास; विमनस्क. २. बेचैन; अस्वस्थ.

अनमिल–*वि.* विजोड; विसंगत.

अनमेल–*वि.* १. विजोड; विसंगत. २. शुद्ध; भेसळ नसलेला.

अनमोल–*वि.* अमूल्य; मूल्यवान्.

अनय–*पु.* १. दुर्भाग्य; २. अनीति.

अनरथ–१. अनर्थ. २. अयोग्य मार्गानें मिळविलेलें धन. [अयाचित.

अनमाँगा–*वि.* न मागितलेला;

अनरना*–*क्रि. स.* अनादर दाखविणें; अपमान करणें.

अनरस–*पु.* रसहीनता; रुक्षपणा.–*वि.* नीरस. [अस्वस्थ; बेचैन.

अनरसा–*वि.* १. उदास. २.

अनराता*–*वि.* न रंगविलेला; साधा.

अनरीति–*स्त्री.* १. कुरीति; वाईट चाल. २. अनुचित व्यवहार.

अनर्गल–*वि.* उच्छृंखल; अडकाठी नसलेला; बेजबाबदार.

अनर्घ–*वि.* कमी किमतीचा; स्वस्त. –*पु.* चुकीची किंमत; अयोग्य मूल्य. –**क्रय**–*पु.* बाजारभावापेक्षां जास्त किंवा कमी किंमत देऊन विकत घेणें.

अनर्जित–*वि.* न मिळविलेला;

अप्राप्त; 'अन्अर्न्ड'.–आय– *स्त्री.* वस्तूंच्या किमती अकस्मात् वाढल्या-मुळें होणारी प्राप्ति किंवा फायदा.

अनर्थ–*पु.* १. अर्थहानि. २. नैराश्यजनक घटना; कार्यनाश; संकट. **–कर; –कारी**– *वि.* अनर्थ-कारक; अनिष्टकारक.

अनर्थक–*वि.* १. निरर्थक; व्यर्थ. २. हानिकारक. ३. भाग्यहीन.

अनर्हता– *स्त्री.* अयोग्यता; 'डिस्क्वालिफिकेशन'.

अनर्हीकरण–*पु.* अयोग्य ठर-विणें; 'डिस्क्वालिफाय'.

अनल–*पु.* १. अग्नि; आग. २. वायु. **–चूर्ण**– *पु.* स्फोटाची दारू; शोभेची दारू.

अनलस–*वि.* १. आलस्यरहित; जागरूक; तत्पर. २. अयोग्य; असमर्थ.

अनलहक– *वा.* [*अ.*] मी सत्य आहें; अहं ब्रह्मास्मि; सोऽहम्.

अनलहता*–*वि.* अनुपयुक्त; अविश्वासार्ह.

अनल्प–*वि.* १. अधिक; पुष्कळ. २. उदार.**–घोष**–*पु.* फार जोराचा आरडाओरडा. **–मन्यु**–*वि.* अत्यंत क्रुद्ध.

अनवट–*पु.* १. जोडवें. २. घाण्याच्या बैलाच्या डोळ्यांवरची झांपड.

अनवद्य–*वि.* निर्दोष; अनिंद्य.

अनवधान–*पु.* दुर्लक्ष; बेसावध-पणा.

अनवधि–*वि.* अमर्याद; बेहद्द.

अनवरत–*वि.* अविश्रांत; निरं-तर. –*अव्य.* सतत.

अनवलोभन– *पु.* गरोदरपणीं तिसऱ्या महिन्यांत केला जाणारा एक संस्कार.

अनवसित–*वि.* असमाप्त; न संपलेलें. **–संधि**– *स्त्री.* १. वसाहती-संबंधींचा तह. २. जंगलाच्या किंवा पडित जमिनीच्या जागीं वसाहत करण्यासंबंधीं दोन व्यक्ती किंवा राज्यें यांच्यांत झालेला करार.

अनवस्था– *स्त्री.* १. अस्थिरता; अव्यवस्था. २. चारित्र्यभ्रष्टता. ३. एक तर्कदोष; कोणत्याहि निर्णया-वर पोहोंचतां येणार नाहीं अशी कार्य-कारणपरंपरा.

अनवाँसना–*क्रि. स.* नवीन भांडें वगैरे प्रथम उपयोगांत आणणें.

अनवाँसा–*पु.* गंजी; उडवी.

अनवांसी– *स्त्री.* एका बिघ्याचा १/८००० भाग. [विस्व्याचा ४०० वा किंवा विस्वांसीचा विसावा भाग].

अनवेक्षण–*पु.*; **अनवेक्षा**– *स्त्री.* १. बेपर्वाई; गैरसावधगिरी. २. दुर्लक्ष.

अनशन–*पु.* उपोषण; उपवास.

अनश्वर–*वि.* नष्ट न होणारें; चिरस्थायी. [अन्न; निर्लेप पदार्थ.

अनसखरी– *स्त्री.* तुपांत तळलेलें

अनसुनी– *वि.* न ऐकलेली (गोष्ट); अश्रुत. **मु०–करना**– दुर्लक्ष करणें; टाळाटाळ करणें.

अनसूया– *स्त्री.* १. द्वेष, मत्सर किंवा असूया न वाटणें. २. अत्रि ऋषीची पत्नी. [हत नाद.

अनहद–*पु.* अंतर्नादध्वनि; अना-

अनहित*–*पु.* १. अहित; हानि. २. शत्रु. [चिंतणारा.

अनहितू–*वि.* हितशत्रु; अहित

अनहोता– *वि.* १. निर्धन; दरिद्री. २. अलौकिक.

अनहोनी–*वि.* *स्त्री.* असंभव; न होणारी. *स्त्री.* – न होणारी गोष्ट.

अनाकानी– *स्त्री.* कानाडोळा; ऐकलें न ऐकल्यासारखें करणें; टंगळ-मंगळ.

अनाक्रमण संधि– *स्त्री.* अना-क्रमणाचा करार; 'नॉन ॲग्रेशन पॅक्ट.' [बोबड.

अनाखर+–*वि.* बेडौल; ओबड-

अनागत–*वि.* १. न आलेला. २. अज्ञात. –*पु.* १. भविष्यकाळ. २. एक ताल (संगीत).**– विधाता**– *पु.* पुढें येणाऱ्या संकटाचा आधीं विचार करून त्याच्या निवारणाची तरतूद करणारा.

अनागार; अनागारिक– *वि.* घरदार नसलेला. – *पु.* साधु; संन्यासी.

अनाघात–*पु.* संगीतांतील एक ताल.

अनाघ्रात–*वि.* १. न हुंगलेलें; ज्याचा वास घेतलेला नाहीं असें. २. न वापरलेलें. ३. पवित्र.

अनाचार–*पु.* दुराचार; वाईट आचरण; अत्याचार.

अनाज–*पु.* धान्य.

अनाड़ी–*वि.* १. अडाणी; मूर्ख. २. अकुशल.

अनाढ्य–*वि.* दरिद्री; धनहीन.

अनात्म–*वि.* चैतन्यरहित; जड. **–वाद**–*पु.* जडवाद.

अनादरण–*पु.* खात्यांत शिल्लक नसल्यामुळें चेकचे किंवा बिलाचे पैसे देण्याचें नाकारणें; 'डिस-ऑनर.' [न केलेला

अनादृत–*वि.* तिरस्कृत; आद

अनाधिकारिक–*वि.* अनधिकृत; 'अनअथॉराइज्ड.' [मागविणे

अनाना*– *क्रि. स.* आणविणें

अनापद– *स्त्री.* आपत्ति किं संकट नसणें. [ब

अनाप-शनाप–*पु.* वायफळ ब

अनाम–*वि.* नांव नसलेल अप्रसिद्ध.–*पु.* मूळव्याध.**–पृष्ठांकन** *पु.* निनांवी बेचनपत्र; 'ब्ले

एंडोर्समेंट'. [निर्दोष.–पु. आरोग्य.

अनामय–*वि.* १. निरोगी. २.

अनामा; अनामिका–*स्त्री.* करंगळीजवळचें बोट. [प्रलोभनरहित.

अनामिष–*वि.* १. मांसरहित २.

अनायत–*वि.* १. अनियंत्रित. २. निराधार. ३. लांबी नसलेलें.–*स्त्री.* पा० 'इनायत.'

अनायत्त–*वि.* १. ताब्यांत नसलेला; स्वतंत्र, २. उच्छृंखल.

अनायास–*अव्य.* अनायासें; सहजासहजीं.

अनायासिक विजय–*स्त्री.* सहजीं मिळालेला जय; 'वॉक ओव्हर.'

अनार–*पु.* [*फा.*] डाळिंब. –दाना–*पु.* आंबट डाळिंबाचे सुकलेले दाणे.

अनारी–*वि.* १.डाळिंबी रंगाचा; लाल. २.अडाणी.–*पु.*लाल डोळ्यांचें कबूतर. [आरोग्यास विघातक.

अनारोग्य–*पु.*आजार.–**कर**–*वि.*

अनार्किस्ट–*पु.* [इं.] १. अराजकवादी. २. अराज्यवादी.

अनावरण–*पु.* उद्‌घाटन; 'अनव्हीलिंग.'

अनावरित करना–*क्रि. स.* अनावरण करणें; 'टु अन्व्हील.'

अनावर्तक; अनावर्ती–*वि.* एकदांच द्यावयाचा, दिलेला किंवा केलेला; वारंवार न होणारा; 'नॉन रिकरिंग.'

अनावर्ती–*वि.* अनियतकालिक; 'ॲपीरियॉडिक'.

अनावर्षण–*पु.* अवर्षण; कोरडा दुष्काळ.

अनावासिक–*वि.*स्थानिक रहिवासी नसलेला; 'नॉनरेसिडेंट.'. –**छात्र**–*पु.* विद्यालयीन वसतिगृहांत न राहातां शिक्षण घेणारा विद्यार्थी; 'डे स्कॉलर'.

अनाविल–*वि.* निर्मळ; स्वच्छ.

अनावृत–*वि.* न झांकलेलें; उघडें.

अनावृत्त–*वि.* १. परत न आलेलें. २. ज्याची आवृत्ति करण्यांत आलेली नाहीं असें.

अनासिर–*पु.* [*अ. 'अन्सर' चें अनेक०*] मूलतत्त्वें; पंचमहाभूतें.

अनासीन–*वि.* स्थानभ्रष्ट; पदभ्रष्ट; पदच्युत; 'अन्सीटेड'.

अनास्था–*स्त्री.* आस्था नसणें; अश्रद्धा, अनादर; उदासीनता.

अनाह–*पु.*पोटफुगी. निष्कारण.

अनाहक–*अव्य.* नाहक;

अनाहत–*वि.* आघातरहित.–**नाद**–*पु.* योग्यांना ऐकूं येणारा एक आंतला आवाज; ॐ ध्वनि.

अनाहूत–*वि.* न बोलावलेला; अनिमंत्रित; आगंतुक.–**प्रवेश**–*पु.* आगंतुकी; अकारण प्रवेश; 'इंट्रूजन'. [नीय; सुंदर.

अनिंद्य–*वि.* निर्दोष; प्रशंस-

अनिकेत–*वि.* ज्याचें निश्चित निवासस्थान नाहीं असा; भटक्या; घरदार नसलेला; संन्यासी.

अनिक्षिप्त सैन्य–*पु.* मोडून टाकलेलें किंवा मुक्त केलेलें सैन्य.

अनिच्छ; अनिच्छुक–*वि.* इच्छारहित; इच्छा नसलेला; नाखुष.

अनिच्छा–*स्त्री.* नाखुषी; नावड.

अनिच्छित–*वि.* न इच्छिलेलें.

अनित–*वि.* १. रहित; वंचित. २. *अनित्य.

अनित्य–*वि.* १. क्षणभंगुर; तात्पुरतें. नाशवंत; नश्वर. २. अनियमित. ३. असामान्य.–**दत्तक**–*पु.* दत्तक घेण्यासाठीं तात्पुरता बाळगण्याकरितां देण्यांत आलेला मुलगा.

अनिप–*पु.* सेनापति.

अनिपुण श्रमिक–*पु.* बिनकसबी कामगार; 'अन्स्किल्ड लेबर'.

अनिमि(मे)ष–*वि.* १. स्थिरदृष्टि. २. जागरूक. ३. उघडें.–*अव्य.* टक लावून; स्थिर दृष्टीनें.

अनिमेखी*–*अव्य.* निरंतर.

अनियंत्रित–*वि.* निरंकुश; स्वच्छंद.–**शासन**–*पु.* एकतंत्री राज्यकारभार. [अस्थिर.

अनियत–*वि.* १. अनिश्चित. २.

अनियारा*–*वि.* भेदक; तीक्ष्ण.

अनिरुद्ध–*वि.* न अडविलेला; स्वच्छंद. –*पु.* १. कृष्णाचा नातू. २. गुप्तचर; हेर.

अनिर्दिष्ट–*वि.* न सांगितलेलें. –**भोग**–*पु.* एखाद्याच्या वस्तूचा त्याच्या परवानगीशिवाय वापर करणें.

अनिर्वचनीय–*वि.* ज्याचीं लक्षणें सांगतां येत नाहींत असें; अवर्णनीय.–*पु.* १. माया. २. अज्ञान. ३. जग.

अनिर्वाच्य–*वि.* ज्याची निवड होऊं शकत नाहीं असा.

अनिर्वाह–*पु.* १. पूर्ण न होणें. २. विसंगति. ३. अपुरी प्राप्ति.

अनिर्वाह्य–*वि.* न चालण्यासारखें. –**पण्य**–*पु.* जिला राज्यांत किंवा शहरांत आणण्याची मनाई आहे अशी वस्तु.

अनिर्वेद–*पु.* १. विषादाचा अभाव. २. स्वावलंबन.

अनिल–*पु.* वारा; वायु.–**कुमार**–*पु.* १. मारुति; हनुमान. २. भीम.

अनिलाशन; अनिलाशी–*पु.* साप.–*वि.* वारा खाऊन राहाणारा.

अनिवार्य–*वि.* १. अटळ; अत्यावश्यक; अपरिहार्य. २. सक्तीचें; 'कंपलसरी'.–**भरती**–*स्त्री.* सक्तीची

सैन्यभरती; 'कॉन्स्क्रिप्शन'.

अनिष्ट–*वि.* अहितकारक; वाईट.–*पु.* अहित; हानि; अमंगल.

अनिस*–*अव्य.* अहर्निश; सतत.

अनी–*स्त्री.* १. टोंक; अग्रभाग. २. टोंचणारी गोष्ट. ३. ग्लानि. ४. आपत्तिकाळ. ५. समूह. ६. सैन्य. –**दार**–*वि.* अणकुचीदार. **सु०–पर कनी चाटना**–निराशेनें हिरकणी खाऊन जीव देणें.

अनीक–*पु.* १. सैन्य. २. युद्ध. ३. किनारा.–*वि.** वाईट; खराब.

अनीठ*–*वि.* १. अप्रिय; अनिष्ट. २. वाईट. [आंधळा.

अनीतन*–*वि.* नेत्रहीन;

अनीस–*पु.* अनाथ.

अनीस–*पु.* [*अ.*] १. दोस्त, मित्र. २. प्रेम करणारा; स्नेही.

अनीसून–*पु.* [यू.] एक प्रकारची बडिशेप.

अनीह–*वि.* १. इच्छारहित; निरिच्छ. २. उदासीन; बेपर्वा.

अनु–*अव्य.* १. आतां. २. होय; ठीक.–उप.– शब्दाच्या सुरुवातीला जोडल्यानें– १. मागें (अनुचर). २. समान (अनुरूप). ३. बरोबर (अनुपान). ४. वारंवार (अनुशीलन). ५. प्रत्येक (अनुदिन) आणि उचित, योग्य, हीन, गौण इत्यादि अर्थ–द्योतन होतें. [भूति.

अनुकंपा–*स्त्री.* दया; सहानु-

अनुकथन–*पु.* नंतर सांगणें; वर्णन करणें; गोष्टी करणें.

अनुकर्ता–*पु.* १. नकलाकार; नकल्या. २. नट.

अनुकर्म; अनुकार–*पु.* नक्कल.

अनुकल्प–*पु.* धर्मकृत्यांत मुख्य वस्तूच्या अभावीं वापरली जाणारी तसलीच वस्तु [उदा० जव नसल्यास गहूं.]

अनुकूलन–*पु.* जुळणी; अनुकूल करून घेणें; जुळवून घेणें; 'ॲडॅप्टेशन'.

अनुकूलना–*क्रि. अ.* १. प्रसन्न होणें. २. रुचकर वाटणें. ३. जुळणें; जमणें.

अनकूलित–*वि.* अनुकूल करून घेतलेलें; 'ॲडॅप्टेड'.

अनकूलीकरण–*पु.* अनुकूल करून घेणें; 'ॲडॅप्टेशन'.

अनुकृति–*स्त्री.* १. नक्कल; प्रतिकृति. २. एक काव्यालंकार. यामध्यें एक वस्तु दुसऱ्या एखाद्या कारणामुळें दुसऱ्या वस्तूसारखी असल्याचें दाखविण्यांत येतें.

अनुकृतिकाव्य– पु. विडंबनकाव्य; 'पॅरडी'. [न सांगितलेलें.

अनुक्त–*वि.* न बोललें गेलेलें;

अनुक्रम–*पु.* १. क्रम. २. अनुक्रमणिका.

अनुक्रोश–*पु.* दया; अनुकंपा.

अनुग–*वि.* १. मागोवा घेणारा (सामासिक प्रयोगांत). २. आज्ञाधारक; सेवक.

अनुगत–*वि.* १. अनुगामी २. अनुकूल. ३. उपयुक्त.–*पु.* १. सेवक. २. खुशामत. [अर्थ असलेलें.

अनुगतार्थ–*वि.* मिळता-जुळता

अनुगम; अनुगमन–*पु.* १. मागोमाग जाणें. २. नक्कल करणें. ३. सहमरण; सती जाणें. ४. अर्थबोध होणें. [अनुयायी; साथी.

अनुगामी–*वि.* मागून जाणारा;

अनुगीति–*स्त्री.* एक मात्रिक छंद.

अनुगृहीत–*वि.* उपकृत; कृतज्ञ.

अनुग्रह–*पु.* १. कृपा; दया. २. सरकाराकडून मिळणारें साह्य. –**काल**–*पु.* वाढवून दिलेली मुदत; 'डेज ऑफ ग्रेस'. –**धन**–*पु.* नोकरी संपतांना नोकराला दिलेले पैसे; इनाम; बक्षीस; 'ग्रॅच्युइटी'.

अनुच–*वि.* १. लहान; कनिष्ठ; सामान्य. २. नीच. [णारा; नोकर.

अनुचर–*पु.* मागोमाग चाल-

अनुचित–*वि.* अयोग्य; वाईट; न शोभणारें.

अनुच्छेद–*पु.* १. कलम. २. परिच्छेद; 'आर्टिकल'; 'पॅराग्राफ'.

अनुज; अनुजात– *पु.* धाकटा भाऊ. –*वि.* मागून जन्मलेला.

अनुजा; अनुजाता– *स्त्री.* धाकटी बहीण. –*वि.* मागून जन्मलेली.

अनुज्ञ–*पु.* लहान भाऊ.

अनुज्ञप्ति– *स्त्री.* परवाना; 'लायसेन्स'.

अनुज्ञा– *स्त्री.* अनुमति; आज्ञा; परवानगी; 'परमिशन'. –**धारी**–*पु.* परवानाधारक; 'लायसेन्सी'. –**पत्र**–*पु.* परवाना; 'लायसेन्स.'

अनुज्ञात–*वि.* परवानगी मिळालेलें. –**क्रय**–*पु.* कांहीं वस्तूंची विक्री करण्याचा सरकारकडून मिळालेला परवाना; 'परमिट'; 'लायसेन्स.' [परवानगी देणारा.

अनुज्ञापक– *पु.* अनुमति किंवा

अनुतप्त– *वि.* १. पश्चात्ताप झालेला. २. दुःखी. [दुःख.

अनुताप– *पु.* १. पश्चात्ताप. २.

अनुतोषण–*पु.* वश, प्रसन्न करून घेणें; 'ग्रॅटिफिकेशन'.

अनुत्तर–*वि.* १. निरुत्तर. २. प्रमुख; सर्वोत्तम. ३. स्थिर.

अनुत्तान–*वि.* उताणा नसलेला; पालथा.

अनुत्पादक–*वि.* १. उत्पन्न न करणारा. २. ज्यांतून कांहीं उत्पन्न होत नाहीं असें. [कारी मदत; 'ग्रँट'.

अनुदान–*पु.* आर्थिक मदत; सर-

अनुदार–*वि.* १. कंजूष; कृपण. २. संकुचित मनाचा. ३. जहाल.

अनुदारू– पु. महावाहिनी; 'मेटॅक्सिलिम'. [दररोज.

अनुदिन; **अनुदिवस**– *अव्य.*

अनुदेश– पु. सूचना; आदेश; 'इन्स्ट्रक्शन'.

अनुधावन– पु. १. अनुसरण. २. चिंतन. ३. एखाद्या स्त्रीच्या प्राप्तीसाठीं प्रयत्न करणें; मागें लागणें. [मनधरणी; आराधना.

अनुनय–पु. १. विनंती. २.

अनुनाद–पु. प्रतिध्वनि.

अनुन्मुक्त–*वि.* न फेडलेलें (कर्ज); न सोडलेला (कैदी); बंधनांत ठेवलेला; 'अन् डिस्चार्ज्ड'.

अनुपम–*वि.* अद्वितीय; सर्वोत्तम.

अनुपयुक्त–*वि.* १. अयोग्य; अनुचित. २. निरर्थक. [निरर्थक.

अनुपयोगी–*वि.* निरुपयोगी;

अनुपलब्ध–*वि.* १. अप्राप्त. २. न कळलेलें. [नसलेला.

अनुपस्थित–*वि.* गैरहजर; हजर

अनुपात–पु. १. प्रमाण. २. त्रैराशिक.

अनुपाती प्रतिनिधित्व–पु.प्रमाणशीर प्रतिनिधित्व; 'प्रपोर्शनल रिप्रेझेंटेशन'.

अनुपान–पु.औषधाबरोबर किंवा औषधानंतर खावयाचा पदार्थ.

अनुपालन–पु. पालन.

अनुपूरक–पु. पुरवणी; 'सप्लिमेंट'. –*वि.* पूरक; पुरवणी; 'सप्लिमेंटरी'. –**प्रश्न**–पु. पुरवणी प्रश्न; 'सप्लिमेंटरी क्वेश्चन'.

अनुपूरण–पु. पुरवणी जोडणें; 'सप्लिमेंट'.

अनुपूरित–*वि.* मागून जोडलेला; 'सप्लिमेंटेड'. [पूर्वक.

अनुपूर्व–*वि.* क्रमबद्ध; नियम-

अनुप्रयोग–पु. उपयोग.

अनुप्रयोज्य–*वि.* योग्य; लागू.

अनुप्रस्थक–पु. 'लोमेंटम'.

अनुप्राणित–*वि.* १. प्रेरित. २. भारलेलें.

अनुबंध–पु.१. बंधन. २. संबंध; संसर्ग. ३. क्रम. ४. प्रारंभ. ५. परिणाम. ६. शुभाशुभ. ७. करार; करारनामा; 'कॉंट्रॅक्ट'. ८. उत्तरगामी प्रत्यय; 'सफिक्स'.

अनुबद्ध करना–*क्रि. स.* जोडणें; सामील करून घेणें; 'टु ॲनेक्स'. [तुकडी; 'रियर गार्ड'.

अनुबल–पु. पिछाडीचें सैन्य,

अनुबाह्यदल–पु. बहिःकोश; 'एपिकॅलिक्स'. [होणारी आठवण.

अनुबोध–पु. स्मरण; नंतर

अनुभए–*क्रि. स.* भूत० मिळालें; मागाहून झालें.

अनुभवना–*क्रि. स.* अनुभवणें.

अनुभवोक्ति–*स्त्री.* नीतिवचन; म्हण; 'मॅक्झिम'.

अनुभाऊ–पु. प्रभाव; महत्ता; संकल्प; दृढ विश्वास; मनांतील भावना व्यक्त करणारी बाह्य कृति.

अनुभाजन करना–*क्रि. स.* विभागून देणें.

अनुभाव–पु. मनांतील भावनांच्या सूचक बाह्यक्रिया.

अनुभूत–*वि.* अनुभवास आलेलें; ज्याची प्रचीति आली आहे असें.

अनुभूति–*स्त्री.* १. अनुभव. २. संवेदना.

अनुभूतिवाद–पु. स्वानुभववाद; 'एंपीरिसिझम्'.

अनुमति–*स्त्री.* १. संमति; मान्यता; स्वीकृति. २. आज्ञा.

अनुमरण–पु. सती जाणें; सहगमन. [अंदाज.

अनुमान–पु. तर्क; कयास;

अनुमाप–पु. प्रमाण; 'स्केल'.

अनुमिति–*स्त्री.* अनुमान; तर्क.

अनुमोदक–*वि.* अनुमोदन देणारा; पाठिंबा देणारा.

अनुमोदन–पु. १. प्रसन्नता. २. २. अनुमति; समर्थन; पाठिंबा; स्वीकृति; 'ॲप्रूव्हल'.

अनुमोदित–*वि.* मंजूर केलेला; पाठिंबा दिलेला; स्वीकारलेला; 'ॲप्रूव्हड'. ['कॅन्व्हासर'.

अनुयाचक–पु. मत-प्रचारक;

अनुयाचन–पु. प्रचार; मतप्रचार; 'कॅनव्हासिंग'.

अनुयोग–पु. १. प्रश्न; विचारपूस. २. जाब-जबाब.

अनुरंजन–पु. मनोरंजन.

अनुरणन–पु. निनाद; घंटा, नूपुर वगैरेंचा प्रतिध्वनि.

अनुराग– पु. १. प्रेम. २. आसक्ति. ३. भक्ति. ४. लाल रंग.

अनुरागना–*क्रि. स.* प्रेम करणें. –*क्रि. अ.*–प्रेममग्न होणें.

अनुरागी–*वि.* १. प्रेम करणारा. प्रणयी. २. भक्त.

अनुरिक्थ–पु. वारसा; 'लीगसी'.

अनुरेखन– पु. कोरून दुसरी प्रत काढणें; 'ट्रेसिंग'.

अनुरोध– पु. १. आग्रहपूर्वक विनंती. २. प्रेरणा; उत्तेजन.

अनुरोधक– पु. निवेदन; मागण्यांचा खलिता; 'मेमोरॅंडम'.

अनुलंब–पु. आधाररेखा; 'ऑफसेट'.

अनुलंबखाता–पु. उचल खातें; अनामत खातें; 'सस्पेन्स अकाउंट'.

अनुलंबन–पु. कांहीं मुदतीपुरतें कामावरून कमी करणें; तहकूब करणें; 'सस्पेन्शन'.

अनुलंबित– *वि.* कांहीं मुदतीपुरता कामावरून काढून टाकलेला; तहकूब केलेला; 'सस्पेंडेड'.

अनुलाभ– पु. १. पगाराव्यतिरिक्त दिली जाणारी रक्कम; भत्ता; २. अवांतर नफा; 'परक्विझिट'.

अनुलिपि– स्त्री. प्रतिलिपि; नक्कल; 'फॅक्सिमिलि'.

अनुलोम–वि. १. वरून खालीं येणारा. २. यथाक्रम. –**विवाह**–पु. उच्च वर्णीय पुरुष व कनिष्ठ वर्णीय स्त्री यांचें लग्न.

अनुवंश–पु. वंशवृक्ष.

अनुवर्ती–वि. अनुसरण करणारा; मागून जाणारा; अनुयायी; आज्ञाधारक; समान; उपयोगी; रक्षक; सेवक. –**प्रस्ताव**–पु. नंतर येणारा ठराव; 'सबसिक्वेंट मोशन'.

अनुवाद–पु. भाषांतर.

अनुवादक– पु. भाषांतरकार.

अर्रबर्र–*पु.* बडबड; निरर्थक वटवट. [झाड.

अर्रा–*पु.* अर्जुन वृक्षासारखें एक

अर्ल–*पु.* [इं.] इंग्लंडांतील सरदार-दरकदारांना दिली जाणारी एक आदरणीय पदवी (ही 'मार्क्विस'हून खालची व 'व्हायकाउंट'च्या वरची असून वंशपरंपरा चालते).

अर्वा–*पु.* १. घोडा. २. चंद्राच्या दहा घोड्यांपैकीं एक. ३. इंद्र.

अर्वाक्-च्–*अव्य.* १. इकडे; या बाजूला. २. मागें. ३. जवळ ४. खालीं–**(क्)कालिक**–वि. अर्वाचीन; आधुनिक. **– स्रोता** – *वि.* व्यभिचारी; कामुक; लंपट.

अर्वाचीन–*वि.* १. नंतर उत्पन्न झालेलें. २. अलीकडील; आधुनिक. ३. नवीन.

अर्श–पु. मूळव्याध.

अर्श–पु. [*अ.*] १. आकाश २. स्वर्ग. **मु०–पर चढ़ाना**–हरभऱ्याच्या झाडावर चढविणें.**–पर दिमाग होना**–गर्व होणें. **– से फ़र्शतक**– आकाशापासून जमिनीपर्यंत.

अर्हत; अर्हत्; अर्हन्–*पु.* १. जैनांचा देव; जिनदेव. २. गौतमबुद्ध. [नीय. २. योग्य.

अर्ह–*वि.* १. पूजनीय; सन्मान-

अर्हता– *स्त्री.* योग्यता; पात्रता; 'क्वालिफिकेशन'.

अलं; अलम्–*अव्य.* १. पुरें; पुरेसें २. पुष्कळ ३. बस्स. ४. खूप झालें. [सजावट.

अलंकरण–*पु.* सजविणें;

अलंकार–*पु.* १. दागिना; आभूषण. २. उपमा, रूपक वगैरे साहित्यांतील विशिष्ट शब्दयोजना अथवा अर्थचमत्कार. [विभूषित.

अलंकृत–*वि.* अलंकारयुक्त;

अलंकृति–*स्त्री.* अलंकार; सजावट.

अलंग–*पु.* दिशा; बाजू. **मु० –पर आना**–(घोडी) माजाला येणें.

अलंघनीय; अलंघ्य–*वि.* १. ओलांडतां किंवा पार करतां न येण्यासारखा; अटळ.

अल–*उप.* [*अ.*] १. इंग्रजींतील 'दि' प्रमाणें. २. षष्ठीचा प्रत्यय.

अलक–*पु.* केसांच्या बटा; कुरळे केंस.

अलकतरा–*पु.* [*अ.*] डांबर.

अलकलड़ैता; अलकसलोरा–*वि.* लाडका; लाडावलेला.

अलका– *स्त्री.* १. कुबेरनगरी. २. आठ ते दहा वर्षांच्या दरम्यान वय असलेली मुलगी.

अलकावलि– *स्त्री.* केसांच्या बटा; केशपाश. ['स्पिरिट'.

अलकोहल–*पु.* [*इं.*] मद्यार्क;

अलक्षित–*वि.* न पाहिलेलें; अज्ञात; अदृश्य; गुप्त.

अलख–*वि.* अदृश्य; अगोचर. –*पु.* ईश्वर. **मु०– जगाना** – १. मोठ्यानें देवाचें नामस्मरण करणें. २. देवाच्या नांवानें भिक्षा मागणें.

३. लोकांना जागृत करणें.–धारी; –नामी–*पु.* गोरखपंथी साधूंचा एक संप्रदाय व त्याचा अनुयायी.

अलखला–*पु.* झगा.

अलग–*वि.* वेगळें; स्वतंत्र. **–अलग**–*अव्य.* व्यक्तिशः; वेगवेगळें.**–थलग**–*वि.* वेगळें; तुटक; सवता सुभा असलेलें.**–मु०–करना**–१. वेगळें करणें. २. नोकरीवरून काढून टाकणें.

अलगनी– *स्त्री.* दांडी; दोरी (कपडे वाळत घालण्याची).

अलगाई– *स्त्री.* वेगळेपणा.

अलगाऊ–*वि.* विभक्त, वेगळें करणारा.

अलगाना–*क्रि. स.* १. वेगळें करणें. २. दूर सारणें ३. निवडणें. **–** क्रि. अ. वेगळें होणें.

अलगाव–*पु.* तुटकपणा; दूर राहाण्याची वृत्ति; विभक्तपणा.

अलग़ोज़ा–*पु.* [*अ.*] अलगूज; पांवा. [दारी.

अलगौझा[+]–*पु.* वांटणी हिस्से-

अलग्न–*वि.* मुक्त.

अलग्नकमोच्य–*वि.* जामिनावर सोडतां न येणारा (गुन्हा); 'नॉन बेलेबल.' [–*स्त्री.* दारिद्रय; गरिबी.

अलच्छि*–*वि.* दरिद्री; गरीब.

अलता–*पु.* बायका पायांना लावतात तो लाल रंग; अळता.

अलपाका–*पु.* [*स्पॅ.*] अलपाक (कापड).

अलफ़–*पु.* [*अ.*] मागील दोन पायांवर उभा राहिलेला घोडा.

अलफ़ा–*पु.* [*अ.*] बिनबाह्यांचा लांब सदरा; मुसलमानी कफनी.

अलफ़ाज़–*पु.* [*अ.* 'लफ़्ज़ ' चें अनेक०] शब्दसमूह.

अलबत्ता–*अव्य.* [*अ.*] अलबत; निःसंदेह; अर्थात्.

अलबम–*पु.* [*इं.*] चित्रसंग्रह.

अलबीतलबी– *स्त्री.* [*अ.*] अरबी–फारसी किंवा कठिण उर्दू (उपेक्षाभाव). **मु०– छाँटना**– पांडित्य दाखविणें.**–धरी रहना**– ऐट जिरणें. [छोकीचा; फांकडा.

अलबेला–*वि.* छानदार; छान-

अलम्–*अव्य.* पुरे. पा० 'अलं'.

अलम–*पु.* [*अ.*] १. सैन्याच्या पुढें असणारा मोठा ध्वज. २. पर्वत. **–बरदार**–*वि.* सैन्याच्या आघाडीस झेंडा घेऊन चालणारा; हिरीरीनें भाग घेणारा.

अलम–*पु.* [*अ.*] दुःख; क्लेश. **–नाक**–*वि.* दुःखप्रद; क्लेशदायक.

अलमस्त–*वि.* (*फा.*) १. बेशुद्ध. २. निश्चिंत. ३. मस्तीचा कैफ चढलेला; धुंद.

अलमारी– *स्त्री.* [पोर्तु.] कपाट.

अलमास–*पु.* [*फा.*] हिरा.

अलमीया–*पु.* [*अ.*] शोकांतिका; 'ट्रॅजिडी.' [विशेषेंकरून.

अललखसूस–*अव्य.* विशेषत;

अलल टप्पू–*वि.* १. अनुमानधपक्याचा. २. अव्यवस्थित. ३. भलतासलता. [२. अल्लड मनुष्य.

अलल बछेड़ा–*पु.* १. शिंगरूं.

अललाना[+]–*क्रि. अ.* ओरडणें; घसा फाडून बोलणें.

अलल्ल*–*पु.* घोडा. [स्त्री.

अलवाँती–*वि. स्त्री.* बाळंतीण

अलवाई–*वि. स्त्री.* नुकतीच व्यालेली (गाय, म्हैस).

अलवान–*पु.* [*अ.*] लोंकरीचें जाड पांघरूण. [पायाची चिखली.

अलस–*वि.* आळशी; सुस्त.–*पु.*

अलसा– *स्त्री.* लाजाळूचें झाड.

अलसान–नि*– *स्त्री.* आळस; शिथिलता. [गळून जाणें; कंटाळणें.

अलसाना–*क्रि.अ.* आळसावणें;

अलसामिनी*– *स्त्री.* निद्रामग्न अगर आळसावलेली युवती.

अलसी– *स्त्री.* आळशी; जवस.

अलसेट*– *स्त्री.* १. आळस. २. दिरंगाई; टाळाटाळ. ३. अडचण.

अलसेटिया–*वि.* १. कामांत अळंटळं करणारा. २. बेमुर्वतखोर; भांडखोर. [लेला; थकलेला.

अलसौंहा*–*वि.* आळसाव-

अलस्तबाह; अलस्सुबह–*अव्य.* [*अ.*] भल्या पहांटे.

अलहक़–*अव्य.* (*अ.*) वस्तुतः; खरोखर; वास्तविक.–*पु.* १. सत्य. २. परमेश्वर.

अलहदगी–*स्त्री.* [*अ.*] विभक्तपणा; सवता सुभा; वेगळेपणा.

अलहदा–*वि.* [*अ.*] अलग; पृथक्; अलाहिदा. [अल्हैया.

अलहिया– *स्त्री.* एक रागिणी;

अलहैरी–*पु.* [*अ.*] एकच कुबड असलेला व वेगवान् उंट.

अलाई–*वि.* आळशी; सुस्त.

अलात–*पु.* १. निखारा. २. जळतें लाकूड.**–चक्र**–*पु.* जळतें लाकूड फिरविण्यामुळें बनणारें चक्र; जळती बोथाटी. [साखळदंड किंवा खुंटा.

अलान– *पु.* हत्ती बांधण्याचा

अलानिया– *अव्य.* [*अ.*] जाहीरपणें; उघडउघड.

अलाप–*पु.* स्वर; राग; तान.

अलापना–*क्रि. अ.* १. गाणें; स्वर लावणें. २. गातांना आलाप घेणें. ३. बोलणें.

अलाबू–*स्त्री.* तुंबा; भोपळा.

अलाभकर जोत– *स्त्री.* बिनकिफायतशीर जमीन; 'अनएकॉनॉमिक होल्डिंग'. [चिह्न.

अलामत– *स्त्री.* [*अ.*] खूण;

अलायबलाय– *स्त्री.* [*फा.*] इडापिडा.

अलार–पु. १. दार. २.* आवा.

अलारम; अलार्म–पु. [इं.] १. धोक्याची सूचना. २. गजर.

अलाल*–वि. आळशी; सुस्त.

अलालत–स्त्री. [अ.] आजारीपण; आजार.

अलाव–पु. १. शेकोटी; आगटी. २. कुंभाराचा आवा.

अलावा–अव्य. [अ.] शिवाय; व्यतिरिक्त; खेरीज.

अलास–पु. एक रोग. (यामध्यें जिभेचा खालचा भाग सुजून त्यांत पू होतो.)

अलिंजर–पु. घडा; मातीचें भांडें.

अलिंद–पु. ओटा; सज्जा.

अलिंद*–पु. भ्रमर; भुंगा.

अलि–पु. भ्रमर; भुंगा.–स्त्री. पा० 'अली'.

अलिनी–स्त्री. भुंग्यांचा समूह.

अलिप्त–वि. १. दूर; असंलग्न. २. निर्दोष.

अलिबा(वा)हन–+पु. कमळ.

अली–स्त्री. सखी; मैत्रीण.–पु.* भुंगा. [मर्यादशील; निलाजरा.

अलीक–वि. १. खोटा. २. अ-

अलीक*–स्त्री. अप्रतिष्ठा; अमर्यादा.

अलीन–पु. दरवाज्याच्या चौकटीचें उभें लांकूड.–वि. निरुपयोगी; टाकाऊ. [रुग्ण.

अलील–वि. [अ.] आजारी;

अलीह-हा–वि. असत्य; खोटें.

अलुझना*–क्रि. अ. १. गुंतणें; अडकणें. २. झगडणें; भांडणें.

अलुटना–क्रि. अ. १. लटपटणें. २. कोसळणें; कोलमडणें.

अलुमीनम–पु. [इं.] ॲल्युमिनियम धातु. [२. बुडबुडा.

अलूला*–पु. १. ज्वाळा; आंच.

अलेख*–पु. अदृश्य; निराकार ब्रह्म; देव.

अलेखा*–वि. १. अपरिमित. २. बेहिशेबी; अव्यवस्थित. ३. व्यर्थ; निरर्थक. [बेहिशेबी.

अलेखी–*वि. १. अन्यायी. २.

अलैया-बलैया–स्त्री. १. इडापिडा टळावी म्हणून बोटें मोडणें. २. ओवाळून टाकण्याची क्रिया. ३. एक खेळ.

अलोक–वि. १. अदृश्य. २. निर्जन.–पु. १. इहलोकाखेरीज इतर (पाताळ वगैरे) लोक. २. जगाचा विनाश. –सामान्य–वि. लोकोत्तर; असामान्य. [अवलोकन करणें.

अलोकना*–क्रि. स. पाहाणें;

अलोना–वि. १. आळणी. २. मजा नसलेलें. ३. रूपहीन.

अलोप–पु. लुप्त न होणें (वर्ण वगैरे). *–वि. लुप्त; अदृश्य.

अलोल–वि. निश्चल; स्थिर; दृढ. [अद्भुत; विरळा.

अलौकिक–वि. असामान्य;

अल्कत–वि. [अ.] १. कापलेलें. २. रद्द केलेलें. ३. काढून टाकलेलें.

अल्काब–पु. [अ. 'लकब'चें अनेक०] १. पदव्या; किताब. २. पत्राचा मायना. ३. प्रशंसा.

अल्काबोआदाब–पु. [अ.] १. संबोधनाची सन्माननीय पदवी. २. मायना. [सारांश; तात्पर्य असें कीं.

अल्‌किस्सा–अव्य. [अ.]

अल्‌गरज्–अव्य. [अ.] तात्पर्य असें कीं.

अल्-गरजी–वि. [अ.] निष्काळजी; हलगर्जी.–स्त्री. हलगर्जीपणा.

अल्प–वि. १. तुच्छ. २. थोडें. ३. लहान –कालीन ऋण–पु. अल्पमुदतीचें कर्ज; 'शॉर्ट टर्म लोन'. –जनतंत्र–पु. थोडच्या लोकांनीं चालविलेलें राज्य. –जीवी–वि. अल्पायुषी.–ज्ञ–वि. अडाणी; मूर्ख. –तंत्र–पु. अल्पलोकसत्ताक राज्यपद्धति.–तम–वि. किमान.–दृष्टि–वि. अदूरदर्शी; संकुचित दृष्टीचा. –प्राण–पु. प्रत्येक व्यंजन-वर्गातील पहिलें, तिसरें व पांचवें अक्षर आणि य, र, ल, व हीं व्यंजनें, (व्या.). –भोग योजना–स्त्री. काटकसरीची योजना; 'ऑस्टेरिटी स्कीम'.–वादी सदस्य–पु. क्वचित् बोलणारा सभासद; 'बॅकबेंचर.'–विराम–पु. –स्वल्पविराम.–संख्य; –संख्यक–वि. ज्यांची संख्या कमी आहे असे. –संधि–स्त्री. तात्पुरता तह; विरामसंधि.–सूचित प्रश्न–अल्पमुदतीचा प्रश्न; 'शॉर्ट नोटिस क्वेश्चन.'

अल्पावकाश–पु. मधली सुटी; 'रिसेस'. [कमी; न्यूनतम.

अल्पिष्ठ–वि. किमान; कमींत

अल्पीकरण–पु. अधिकार, महत्त्व वगैरे कमी होणें; 'डेरोगेशन'; कमीपणा; अप्रतिष्ठा.

अल्फाकण–पु. [इं + सं.] 'अल्फा पार्टिकल'. [बलक.

अल्ब्यूमेन–पु. [इं.] पांढरा

अल्मस्त–वि. [अ.] झिंगलेला; मस्त.

अल्ल–पु. [अ.] आडनांव; घराण्याचें किंवा कुळाचें नांव.

अल्लम-गल्लम – पु. बडबड; बकवा.–वि. असंबद्ध; विसंगत.

अल्ला–स्त्री. माता; परा शक्ति. –पु. पा० 'अल्लाह'.

अल्लाना*–क्रि.अ. ओरडणें.

अल्लाम–वि. [अ] विद्वान्; महापंडित. [जहांबाज; कैदाशीण.

अल्लामा+–वि. स्त्री. कर्कशा;

अल्लाह–पु. [अ.] ईश्वर. –ताला–पु. सर्वश्रेष्ठ ईश्वर; परमेश्वर. मु०–का नाम–नांवापुरतें;

मुळींच नाहीं. (उसकी पढ़ाई-लिखाई बस अल्लाहका नाम है).–**बेली** –ईश्वर रक्षणकर्ता आहे.–**मियाँकी गाय**–साधा भोळा; छक्केपंजे माहीत नसलेला.

अल्लोल*–*वि.* चंचल.

अल्विदा–*अव्य.* [अ.] आतां निरोप द्यावा; नमस्ते. – *स्त्री.* निरोप; रामराम. [पहांटे.

अल्सुबह–*अव्य.* [अ.] भल्या

अल्हक़–*अव्य.* [अ.] वस्तुतः; खरोखरीं.–*पु.* १. सत्य. २. ईश्वर.

अल्हड़–*वि.* १, खुशालचेंडू; २. अननुभवी; अल्लड ३. उद्धट ४. अडाणी; गांवठी.–*पु.* गोऱ्हा; पाडा. –**पन**–*पु.* १. अल्लडपणा. २. भोळेपणा. ३. बेपर्वाई. ४. अशिष्टपणा; उद्धटपणा.

अवकरण–*क्रि. अ.* कमी होणें.

अवकरपात्र–*पु.* **अवकरी**– *स्त्री.* रद्दीची, केराची टोपली; 'डस्टबिन' [होणें; समजणें.

अवकलना*– *क्रि. अ.* आकलन

अवकलित–*वि.* १. पाहिलेलें; नक्की; निश्चित. २. धरलेलें.

अवकारक–*वि.* कमी करणारें.

अवकाश–*पु.* १. पोकळ जागा. २. अंतर. ३. वेळ. ४. रिकामा वेळ; सुट्टी; फुरसत. ५. रजा. –**ग्रहण**–*पु.* निवृत्ति; सेवानिवृत्त होणें; पेन्शन घेणें; रिटायर होणें. –**प्राप्त**–*वि.* सेवानिवृत्त; 'रिटायर्ड.'

अवकीर्ण–*वि.* १. विखुरलेलें; पसरलेलें २. चूर्ण झालेलें ३. ज्याचें ब्रह्मचर्यव्रत भंग पावलें आहे असा.

अवकृत–*वि.* कमी केलेलें.

अवकेशी–*वि.* १. फळ न येणारें (झाड). २. आंखूड केंस असलेला –ली. – *पु.* फळ न येणारें झाड.

– *स्त्री.* वंध्या स्त्री

अवक्रम करना–*क्रि. स.* पुढें जाणें; मागें टाकणें; आधीं नेमलेल्या व्यक्तीच्या जागीं दुसऱ्या व्यक्तीची नेमणूक करणें; आपल्या अधिकारांत एखादा हुकूम रद्दबातल करणें; 'सुपरसीड.'

अवक्षयकोष–*पु.* घसारा निधि; 'डिप्रीशिएशन फंड.'

अवक्षेप; अवक्षेपण–*पु.* १. खालीं टाकणें किंवा फेंकणें; तळाशीं बसविणें. २. निंदा करणें. ३. पराभूत करणें. ४. एखाद्या वस्तूंतून पलीकडे जातांना प्रकाशकिरण वक्र होणें. [तिरस्कार.

अवगणना – *स्त्री.* अवहेलना;

अवगत–*वि.* माहीत असलेला; परिचित. [२. विचार करणें.]

अवगतना*–*क्रि. स.* १. समजणें.

अवगति– *स्त्री.* १. जाणीव; समज. २. निश्चयात्मक ज्ञान. ३. वाईट गति.

अवगनना*–*क्रि. अ.* १. निन्दा करणें; अपमान करणें. २. पराजित करणें. ३. मोजणें.

अवगरा*–*वि.* हुशार; बुद्धिमान्.

अवगाद–*पु.* नावेंतील पाणी बाहेर काढून टाकण्याचें लहान लांकडी भांडें.

अवगारना*–*क्रि. स.* १. समजावणें. २. निक्षून सांगणें. ३. निंदा करणें. [अथांग.

अवगाह*–*वि.* खूप खोल;

अवगाह–*पु.* १. प्रवेश; शिरकाव. २. बुचकळी; बुडी.

अवगाहन–*पु.* १. स्नान. २. शोध; तपास. ३. चिंतन; मनन.

अवगाहना*– *क्रि. स.* १. घुसळणें; मंथन करणें. ३. बारकाईनें पाहाणें; तपासणें. –*क्रि. अ.* बुडी मारणें; स्नान करणें.

अवगुंठन–*पु.* घुंघट; साडीच्या पदराचा चेहऱ्यावरील भाग; बुरखा. [विलेलें.

अवगुंठित–*वि.* झांकलेलें; लप-

अवगुंठित–*वि.* १. गुंफलेलें. २. विणलेलें. [अपराध.

अवगुन–*पु.* अवगुण; दोष;

अवग्रह–*पु.* १. अडथळा. २. संधि-विच्छेद (व्या.) ३. शब्दामध्यें ए व ओ या स्वरांनंतर येणारा लुप्ताकार (ऽ) ४. अवकृपा (अनुग्रहाच्या उलट).

अवघट*–*वि.* अवघड; विकट; कठिण.

अवचट–*पु.* अडाणीपणा; अज्ञान. –*अव्य.* एकाएकीं; अचानक.

अवचेतना– *स्त्री.* अंतःसंज्ञा.

अवच्छद–*पु.* झांकण; आवरण.

अवछंग–*पु.* मांडी

अवज्ञा– *स्त्री.* १. अनादर; अपमान. २. उपेक्षा. ३. आज्ञाभंग. ४. एक अर्थालंकार. [तुच्छ.

अवज्ञेय–*वि.* तिरस्करणीय;

अवट–*पु.* १. खड्डा. २. विहीर. ३. कांख, दांत वगैरेचा खड्डा. ४. हत्ती पकडण्याचा तृणाच्छादित खड्डा. –**कच्छप**–*पु.* अनुभवहीन व्यक्ति.

अवटना–*क्रि. स.* १. आटविणें. २. घुसळणें– (टि) **मरना**–त्रास सहन करणें; ठेंचा खाणें.

अवडंग–*पु.* बाजार; पेठ.

अवडेर+–*पु.* भानगड; बखेडा.

अवडेरना*–*क्रि. स.* १. भानगडींत पाडणें. २. तुच्छतापूर्वक त्याग करणें. ३. दुःख देणें.

अवडेरा–*वि.* १. भानगडीचा; त्रासदायक. २. बेढब.

अवढर–*वि.* पा. 'औढर'.

अवतंस–*पु.* १. कर्णफूल; भिकबाळी. २. आभूषण. ३. मुकुट. ४.+ नवरदेव.

अवतरण–*पु.* १. उतरणें; खालीं येणें; उतार. २. पैलतीराला जाणें. ३. अवतार. ४. घाट; घाटाची पायरी. ५. अनुवाद. ६. भूमिका; प्रस्तावना. ७. उद्धरण; उध्दृत केलेला भाग.

अवतरण–*पु.* १. खालीं उतरणें. २. अवतरण; 'कोटेशन'.–**चिह्न**–*पु.* अवतरण चिह्न; 'इनव्हर्टेड कॉमा'. –**छत्र**–*पु.* विमानांतून उडी घेण्याची छत्री; पॅरॅशूट.–**पथ**–*पु.* विमानाचा जमिनीवरील मार्ग; 'रनवे'. –**भूमि**–*स्त्री.* विमान उतरण्याची जागा; विमानतळ; 'लँडिंग ग्राउंड'.

अवतरणिका–*स्त्री.* १. ग्रंथाच्या आरंभीं केलेली सरस्वती वगैरेची संक्षिप्त प्रार्थना. २. प्रस्तावना.

अवतरना–**क्रि. अ.* अवतरणें; अवतार, जन्म घेणें; उत्पन्न होणें.

अवतरित–*वि.* १. उतरलेला. २. अवतार घेतलेला. ३. उद्धृत. ४. पार तरून गेलेला. ['कॉन्केव्ह्'.

अवतल– *वि.* अंतर्गोल;

अवतार–*पु.* १. जन्म घेणें; २. खालीं येणें. ३. अवतार. ४. तीर्थ. ५. अनुवाद. ६. प्रस्तावना–**वाद**–*पु.* धर्मग्लानि झाली असतां धर्माची पुनः स्थापना करण्यासाठीं ईश्वर अवतार घेतो, हें मत किंवा श्रद्धा.–**धरना**; **लेना**–अवतार घेणें.

अवतारना*–*क्रि.अ.स.* १. जन्म घेणें, देणें. २ उत्पन्न करणें.

अवतीर्ण–*वि.* १. उतरलेला; खालीं आलेला. २. अवतार घेतलेला. ३. उद्धृत.

अवदात–*वि.* १. पवित्र. २. उज्ज्वल; निर्मळ. ३. सुंदर. ४. शुभ्र. [साह्य; 'कॉंट्रिब्यूशन'.

अवदान–*पु.* वर्गणी; मदत;

अवदान–*पु.* १. चांगलें कृत्य. २. पराक्रम.

अवदारण–*पु.* १. फाडणें. २. विभाजन करणें. ३. खोदणें. ४. तुकडे-तुकडे करणें. ५ कुदळ.

अवध–*पु.* १. अयोध्या नगरी; २. अयोध्या प्रदेश.– **ईस**– *पु.* अवधेश; श्रीराम.

अवधा– *स्त्री.* वर्तुलखंड; वृत्तखंड; 'सेगमेंट ऑफ ए सर्कल'.

अवधाता– *पु.* सांभाळ करणारा; काळजीवाहू; 'केअर टेकर'.

अवधात्री सरकार–*स्त्री.* काळजीवाहू सरकार; 'केअर टेकर गव्हर्नमेंट'.

अवधान–*पु.* काळजी वाहाण्याचें कार्य; देखरेख; 'केयर'; 'चार्ज.'

अवधान–*पु.* १.मनाची एकाग्रता. २. सावधगिरी.

अवधायक अधिकारी–*पु.* तात्पुरता अधिकारी; 'ऑफिसर इन् चार्ज'.

अवधायक सरकार– *स्त्री.* काळजीवाहू सरकार; 'केअर टेकर गव्हर्नमेंट'.

अवधारण *पु.* निर्धार.

अवधारणा– *स्त्री.* कल्पना; विचार; 'कन्सेप्शन'.

अवधारणा*–*क्रि.स.* १. धारण करणें. २. ग्रहण करणें. ३. ऐकणें; मानणें. [निर्धारित.

अवधारित–*वि.* निश्चित;

अवधि– *स्त्री.* १ सीमा; मर्यादा. २. ठरविलेला काळ; मुदत. ३. अंत समय. –*अव्य.* पर्यंत; पावेतों. **मु०–देना**; **–धरना**; **–बदना**– मुदत ठरवून देणें.

अवधिमान*–*पु.* समुद्र.

अवधी–*वि.* 'अवध' प्रांतासंबंधींचा –*स्त्री.* अवधी बोली.

अवधूत–*पु.* अवधूत; संन्यासी; योगी. –**वेश**–*वि.* नग्न.

अवध्य–*वि.* ज्याचा वध किंवा हत्या करणें निषिद्ध आहे असा (ब्राह्मण, गाय, वगैरे).

अवन–*पु.* १ रक्षण. २. प्रसन्न करणें. ३. इच्छा. ४. प्रेम.

अवनति–*स्त्री.* १. अधःपतन. २. मंदी; 'डिप्रेशन'

अवनमन–*पु.* १. वांकणें २. मंदी; 'डिप्रेशन'.

अवनि–नी– *स्त्री.* १. पृथ्वी. २. जमीन.–**सुत**–*पु.* मंगळ (ग्रह).–**तल**–*पु.* पृथ्वीचा पृष्ठभाग.

अवनिप–*पु.* राजा.

अवबोधक–*वि.* १. ज्ञान करून देणारा. २. जागें करणारा.–*पु.* १. सूर्य. २. शिक्षक.

अवभृथ–*पु.* १. यज्ञाचा शेवट. २. यज्ञ समाप्त झाल्यावर शुद्धीसाठीं करावयाचें स्नान.

अवमंदन–*पु.* दमटपणा.

अवमतिथि– *स्त्री.* क्षयतिथि.

अवमर्षण–*पु.* १. असाहिष्णुता. २. नष्ट करणें; पुसून टाकणें.

अवमान–*पु.* अपमान; तिरस्कार; 'कंटेंप्ट'.

अवमुक्ति– *स्त्री.* सुटका.

अवमूल्यन–*पु.* किंमत कमी करणें; अवमूल्यन; 'डीव्हॅल्युएशन'.

अवमूल्यपर–*अव्य.* ठरलेल्या किंमतीहून कमी दरानें; 'बिलो पार'.

अवयव–*पु.* १. शरीर किंवा शरीराचें एखादें अंग. २. भाग. –**रूपक.**–*पु.* एक प्रकारचा रूपक-

अलंकार. यांत अंगांच्या गुणांचें साधर्म्य दाखविलें जातें.

अवयस्क–*वि.* वयांत न आलेला; अज्ञान; ‘ मायनर ’.

अवर–*वि.* दुय्यम; खालचें. –**सदरन**–*पु.* खालचें सदन; ‘ लोअर हाउस ’. [२. अधम; नीच.

अवर*–*वि.* १. अन्य; दुसरा.

अवरक्त–*वि.* ‘ इन्फ्रारेड ’.

अवरागार– *पु.* संसदेची किंवा विधान मंडळाची कनिष्ठ सभा किंवा सदन; ‘ लोअर हाउस ’.

अवराधन–*पु.* आराधना; पूजा; उपासना.

अवरुद्ध–*वि.* १. अडविलेलें; अडलेलें. २. बंद; झांकलेलें, ‘ इन्सुलेटेड ’.

अवरुद्धा– *स्त्री.* रखेली.

अवरेखना*–*क्रि. स.* आकृति काढणें; रेखाटणें.

अवरेब–व*–*पु.* १. वक्रगति; वांकडी चाल. २. गुंतागुंत. ३. बिघाड. ४. विवाद.

अवरोक्त–*वि.* नंतर सांगितलेलें किंवा लिहिलेलें; ‘ लॅटर ’.

अवरोध–*पु.* १. अडचण; विरोध. २. अंतःपुर. [लेशन ’.

अवरोधन–*पु.* रोधन; इन्सु-

अवरोधी–*पु.* विसंवाहक; विद्यु-द्रोधक; ‘ इन्सुलेटर ’.

अवरोप–*पु.* एखाद्या आरोपांतून मुक्त करणें किंवा होणें; सोडणें; विसर्जन; ‘ डिसचार्ज ’.

अवरोहण–*पु.* १. खालीं उतरणें. २. वर चढणें.

अवरोही–*वि.* खालीं येणारा; –*पु.*–उतरत येणारे सूर (संगीत).

अवर्ण्य–*वि.* अवर्णनीय; अप्रतिम. [दुष्काळ.

अवर्ष; अवर्षण –*पु.* कोरडा

अवलंघना*– *स्त्री. स.* उडी मारून ओलांडणें; उल्लंघन करणें.

अवलंब; अवलंबन–*पु.* आश्रय; आधार. [लेलें; आधारलेलें.

अवलंबित–*वि.* अवलंबून अस-

अवली– *स्त्री.* ओळ; पंक्ति; रांग.

अवलीक–*वि.* शुद्ध; निष्कलंक.

अवलेप–*पु.* उटणें; लेप.

अवलेह–*पु.* चाटण.

अवलोकन–*पु.* निरीक्षण; देख-रेख. [लाचार.

अवश–*वि.* नाइलाज झालेला;

अवशिष्ट–*वि.* उरलेलें; बाकीचें; जास्तीचें.–**शक्तियाँ**– *स्त्री.* इतर अधिकार; शेषाधिकार; ‘ रेसीडयुअरी पॉवर्स ’.

अवशेष–*पु.* उरलेली वस्तु; गाळण्यांत सांचणारा गाळ; प्रेसि-पिटेट ’. २. समाप्ति. –*वि.** १. उरलेलें. २. समाप्त. [सॉर्बर ’

अवशोषक– *पु.* शोषक; ‘ ॲब-

अवशोषण–*पु.* शोषण; शोषून घेणें. [निश्चितपणें घडणारें.

अवश्यंभावी–*वि.* अटळ;

अवश्य–*अव्य.* नक्की; खात्रीनें; निःसंशय. [खात्रीपूर्वक.

अवश्यमेव– *अव्य.* नक्कीच;

अवसन्न– *वि.* १. सुस्त. २. उदास; खिन्न.

अवसर–*पु.* समय; संधि.–**ग्रहण** –*पु.* सेवानिवृत्ति; ‘ रिटायरमेंट ’. –**प्राप्त**–सेवानिवृत्त; ‘ रिटायर्ड ’–**वाद**–*पु.* संधिसाधूपणा; ‘ अपॉर्च्यु-निझम ’. –**वादी**–*वि.* संधिसाधू.–**मु०** –**चूकना**–संधि गमावणें.–**ताकना** –संधि शोधणें.–**मारा जाना**–संधि हुकणें. [कमी करणें.

अवसर्ग–*पु.* दंड, शिक्षा वगैरे

अवसाद–*पु.* १. विषाद. २. नाश. ३. थकवा. ४. अशक्तता.

अवसान–*पु.* १. समाप्ति; शेवट. २. मृत्यु.

अवसि*–*अव्य.* अवश्य.

अवसेर*– *स्त्री.* १. व्याकुळता; व्यग्रता; चिंता; अस्वस्थता. २. उशीर; विलंब. ३. अडथळा.

अवसेरना*–*क्रि. स.* त्रास देणें; दुःख देणें. [वय. ३. आकृति.

अवस्था– *स्त्री.* १. स्थिति. २.

अवस्थान–१. थांबणें; राहणें. २. स्थान; घर. ३. स्थानक; अड्डा; रेल्वे स्टेशन.

अवस्थित–*वि.* १. उपस्थित; हजर. २. थांबलेला; स्थिर.

अवस्थितत्व–*पु.* स्थितिसातत्य; जडता; ‘ इनर्शिया ’.

अवस्थिति– *स्त्री.* स्थिति.

अवहार–*पु.* १. अपहरण. २. चोर. ३. सूट; ‘ रिबेट ’.

अवही–*पु.* एक प्रकारची बाभळ.

अवहेला– *स्त्री.* अवहेलना; उपेक्षा; तिरस्कार.

अवाँ–*पु.* भट्टी.

अवांछनीय–अप्रिय; ज्याची इच्छा करूं नये असें; अश्लाघ्य.

अवांतर–*वि.* १. अंतर्गत; आंतील; मधला. २. गौण. –*पु.* मध्यभाग.

अवाँसी– *स्त्री.* नवान्न पौर्णिमे-करितां तोडलेली लोंबी किंवा कणीस.

अवाइ(य)ल–*पु.* [*अ.* ‘अव्वल’ चें अनेक०.] सुरुवात; प्रारंभकाळ.

अवाई– *स्त्री.* १. आगमन. २. खोल नांगरणी.

अवाक्–*वि.* १. स्तंभित; विस्मित. २. गप्प होणें; निःशब्द.

अवाच्य–*वि.* न सांगण्यासारखें. –*पु.* अपशब्द. –**देश**–*पु.* योनि.

अवापित–*वि.* पेरलेलें नव्हे

रोपाचें.

अवाम; **अवामुन्नास**–*पु.* [*अ.*] सर्वसाधारण लोक; जनता.

अवाया–*वि.* उच्छृंखल; उद्धट.

अवार–*पु.* ऐलतीर; अल्याड.

अवारजा–*पु.* [*फा.*] रोजखर्डा.

अवारणीय–*वि.* ज्याचें निवारण शक्य नाहीं असें; उपाय नसलेलें.

अवारना*–*क्रि. स.* अडवणें; निवारण करणें. [नग्न.

अवासा–*पु.* दिगंबर जैन. –*वि.*

अवास्तव–*वि.* १. अवास्तविक; मिथ्या. २. निराधार.

अविकल–*वि.* १. जसेंच्या तसें. २. पूर्ण. ३. निश्चल; शांत.

अविगत–*वि.* १. न गेलेलें; विद्यमान. २.* अज्ञेय. ३. अविनाशी.

अविच्छिन्न–*वि.* १. अविभक्त. २. सतत चालणारें.

अविजन*–*पु.* वंश; कुल.

अविदग्ध–*वि.* १. अर्धवट जळलेलें. २. अर्धेकच्चें. ३. अपंडित; मूर्ख. [चित.

अविदित–*वि.* अज्ञात; अपरि-

अविद्य–*वि.* १. निरक्षर; मूर्ख. २.* नष्ट; लुप्त.

अविद्या–*स्त्री.* १. विद्येचा किंवा ज्ञानाचा अभाव; अज्ञान. २. भ्रम; माया. [बेकायदेशीर.

अविधि–*वि.* नियमाविरुद्ध;

अविधिक–*वि.* बेकायदेशीर; 'इल्लीगल'. [ष्टता.

अविनय–*पु.* उद्धटपणा; अशि-

अविनाशिता–*स्त्री.* जपून ठेवणें; अविनाशित्व. [अक्षय; नित्य.

अविनाशी–*वि.* नाशरहित;

अविनीत–*वि.* उद्धट; घमेंडखोर; असभ्य.

अविरत–*अव्य.* सतत; नीरंतर.

अविरथा*–*अव्य.* निष्कारण; नाहक.

अविरल–*वि.* घनदाट

अविराम–*अव्य.* सतत; निरंतर.

अविर्था*–*अव्य.* व्यर्थ; निष्प्रयोजन. [लगेच.

अविलंब–*अव्य.* ताबडतोब;

अविलंब्य–*वि.* निकडीचें; तांतडीचें; 'अर्जंट'.

अविलेय–*वि.* न विरघळणारें; अविद्राव्य; 'इन् सोल्यूबल'.

अविश्रांत–*वि.* न थकणारा; विश्रांति न घेणारा.–*अव्य.* सतत; निरंतर. [लायक नसलेलें.

अविश्वस्त–*वि.* संदिग्ध; खात्री-

अविश्वास-प्रस्ताव–*पु.* अविश्वासाचा ठराव; 'मोशन ऑफ नो कॉन्फिडन्स'.

अविस्तृत–*वि.* दाट; घट्ट.

अविहड़*–*वि.* अनश्वर; अखंड; अविनाशी.

अविहित–*वि.* निषिद्ध; वर्ज्य; शास्त्रविरुद्ध.

अवी–*स्त्री.* ऋतुमती स्त्री.

अवीचि–*पु.* एका नरकाचें नांव.

अवीरा–*वि. स्त्री.* १. स्वतंत्र स्त्री. २. विधवा व निपुत्रिक स्त्री.

अवेज–*पु.* [*अ. एवज़*] १. मोबदला; बदला. २. प्रतिकार.

अवेला–*स्त्री.* १. अवेळ. २. उशीर.

अवेश*–*वि.* १. उन्मत्त. २. नखरेल. ३. आवेशयुक्त.–*पु.* आवेश.

अवैज्ञानिक–*वि.* अशास्त्रीय.

अवैतनिक–*वि.* पगार न घेतां काम कारणारा; 'ऑनररी'.

अवैध–*वि.* बेकायदेशीर; नियमाविरुद्ध.–**जात**–*वि.* बेकायदेशीरपणें उत्पन्न झालेलें, केलेलें किंवा मिळालेलें; गैरकायदा; 'इल्लिसिट.–**निरोधन**–*पु.* बेकायदेशीर अटकाव; 'रॉंगफुल कन्फाइनमेंट'. –**प्रेषण**–*पु.* कर चुकवून आणणें; चोरटा व्यापार; 'स्मग्लिंग'.

अवैधाचरण–*पु.* बेकायदेशीर आचरण; 'इल्लीगल प्रॅक्टिस'.

अव्यंग–*वि.* वेडेंवांकडें नसलेलें; सरळ.

अव्यक्त–*वि.* १. अप्रकट; अदृश्य; अप्रत्यक्ष; गुप्त. २. अनिश्चित.–*पु.* १. ईश्वर. २. ब्रह्म. ३. आत्मा. [२. निश्चल.

अव्यभिचारी–*वि.* १. शुद्ध.

अव्यय–*वि.* ज्यांत विकृति होत नाहीं असा; नित्य.–*पु.* व्याकरणांतील अविकारी शब्द.

अव्ययित शेष–*पु.* खर्च न झालेली रक्कम; 'अन्स्पेंट बॅलन्स'.

अव्यर्थ *वि.* व्यर्थ न जाणारें; अचूक.

अव्यवस्था–*स्त्री.* १. नियम वगैरेचा अभाव; अनिर्बंधता; गोंधळ. २. बेकायदेशीरपणा.

अव्यवस्थित–*वि.* १. व्यवस्थाहीन. २. अस्थिर. –**चित्त**–*वि.* अस्थिरचित्त.

अव्यवहार्य–*वि.* १. आचरणांत आणतां न येण्यासारखें. २. जातिच्युत.

अव्याज–*वि.* निष्कपट; सरळ.

अव्याहत–*वि.* अबाधित; अखंडित.

अव्युत्पन्न–*वि.* १. अकुशल; अनुभवहीन. २. व्युत्पत्तिरहित.–*पु.* व्याकरण न येणारी व्यक्ति.

अव्वल–*वि.* [*अ.*] १. पहिला; प्रथम. २. श्रेष्ठ; उत्तम; पहिल्या प्रतीचा.

अश-अश–*पु.* [*अ.*] आश्चर्य. **मु०–करना**– १. तारीफ करणें. २.

आश्चर्योद्‌गार काढणें.

अशआर– *पु.* [*अ.* 'शेर' चें अनेक०] कविता; पद्यें.

अशकाल– *पु.* [*अ.* 'शक्ल' चें अनेक०] चेहरे.

अशकुन– *पु.* अपशकुन.

अशक्त– *वि.* शक्तिहीन; दुर्बळ.

अशक्य– *वि.* १. असाध्य. २. असंभव.

अशखास– *पु.* [*अ.* 'शख्स' चें अनेक०] माणसें; व्यक्ती.

अशजार–*पु.* [*अ.* 'शज्र' चें अनेक०] झाडें; वृक्षसमूह.

अशन–*पु.* १. भोजन; खाद्य पदार्थ. २. प्रवेश. ३. व्याप्ति.

अशनि– *पु.* १. वीज. २. अग्नि. ३. अस्त्र. ४. इंद्र.

अशरण–*वि.* आश्रयहीन; असहाय्य. **–शरण**– *वि.* निराधाराला आश्रय देणारा (परमेश्वर).

अशरफ़्–*वि.* [अ] १. अत्यंत सज्जन; भला. २. कुलीनतम.

अशरफी–*स्त्री.* [*फा.*] मोहोर (नाणें).

अशरा– *पु.* [*अ.*] १. दशमी; महिन्याची दहावी तारीख. २. मोहरमचा दहावा दिवस.

अशराफ़्–*पु.* [*अ.* 'शरीफ' चें अनेक०] भले लोक; सज्जन.

अशरीर– *वि.* शरीररहित; निराकार. **–पु.** १. परमात्मा. २. कामदेव. [बळ; असंतोष.

अशांति–*स्त्री.* अस्वस्थता; खळ-

अशिया–*स्त्री.* [अ. 'शय' चें अनेक०] वस्तू; चिजा; पदार्थ.

अशिव–*वि.* अमंगल; अशुभ.

अशिष्ट–*वि.* असभ्य; अडदांड.

अशुचि–*वि.* १. अपवित्र. २. गलिच्छ. [चूक.

अशुद्धि– *स्त्री.* १. अशुद्धता. २.

अशेष– *वि.* १. संपूर्ण; सगळें. २. असंख्य. ३. समाप्त.

अशोक– *वि.* शोकरहित. **–पु.** एक वृक्ष. **–मंजरी**– *स्त्री.* अशोकाचें फूल. **–वनिकान्याय**– अमक्यानें अमुकच न करतां अमुक गोष्ट कां केली तें सांगतां न येणें. (रावणानें सीतेला दुसऱ्या कोणत्या बागेंत न ठेवतां अशोकवनांतच कां ठेवलें हें सांगणें कठिण आहे, त्यावरून हा न्याय बनला).

अशोधित–*वि.* शुद्ध किंवा स्वच्छ न केलेलें; अशुद्ध. **–शेष**–*पु.* न फिटलेलें कर्ज. 'अन्‌रिडीम्ड बॅलन्स'.

अशोभनीय–*वि.* न शोभणारें; असभ्य; असुंदर. [सोयर; सुतक.

अशौच–*पु.* १. अपवित्रता. २.

अश्क– *पु.* [*फा.*] आसू; अश्रू.

अश्ग़ाल–*पु.* [*अ.* 'शुग्ल' चें *अनेक०*] १. कामें; उद्योग. २. मन गुंतविण्याचीं साधनें.

अश्म; अश्मा–*पु.* १. डोंगर. २. दगड. ३. गारगोटी.

अश्रद्ध–*वि.* श्रद्धाहीन.

अश्रांत–*वि.* न थकलेला.

अश्रु– *पु.* आंसू.**– कला**– *स्त्री.* अश्रुबिंदु. **– पात**–*पु.* रुदन.**–मुख**– *वि.* रडकुंडीस आलेला.

अश्रुगॅस – *स्त्री.* [*सं.* + *इं.*] अश्रुधूर; अश्रुवायु; 'टीयरगॅस'

अश्रुतपूर्व–*वि.* कधींहि न ऐकलेलें; अपूर्व.

अश्लाघ्य– *वि.* निंद्य.

अश्व– *पु.* घोडा.**–तर**–*पु.* खेंचर. **–पति**– *पु.* १. घोडेस्वार. २. घोड्याचा मालक.**–पाल**–*पु.* मोतद्दार. **–शक्ति**– *स्त्री.* अश्वशक्ति; 'हॉर्सपॉवर'.**शाला**– *स्त्री.* तबेला.

अश्वत्थ–*पु.* पिंपळ. [सेनापति.

अश्वाध्यक्ष– *पु.* घोडदळाचा

अश्वारोहण – *पु.* घोड्यावर बसणें. [**–सेना**– *स्त्री.* घोडदळ.

अश्वारोही– *वि.* घोडेस्वार.

अश्विनी– *स्त्री.* १. पहिलें नक्षत्र. २. घोडी. **– कुमार**–*पु.* – सूर्याची पत्नी प्रभा हिनें घोडीचें रूप घेतल्यानंतर तिला झालेले दोन पुत्र. हे देवांचे वैद्य होते.

अष्ट–*पु.* आठाची संख्या–*वि.* आठ.**–कमल**–*पु.* हठयोगांत मूलाधारापासून मस्तकापर्यंत मानण्यांत आलेलीं आठ चक्रें.**–छाप**–*पु.* गोसाई विठ्ठलनाथ यांनीं स्थापन केलेलें, कृष्णभक्तिपर काव्य लिहिणाऱ्या आठ कवींचें दल. या कवींचीं नांवें अशीं : सूरदास, कुंभनदास, परमानंददास, कृष्णदास, छीतस्वामी, गोविंदस्वामी, चतुर्भुजदास, नंददास. **–प्रधान**–*पु.* आठ प्रकारचे मंत्री : प्रधान, अमात्य, सचिव, मंत्री, धर्माध्यक्ष, न्यायशास्त्री, वैद्य, सेनापति. **–भुज**– *पु.*अष्टकोण; 'ऑक्टॅगॉन'. **–वर्षा**– *स्त्री.* आठ वर्षें वयाची मुलगी.**–सिद्धि**– *स्त्री.* योगसिद्धीनें मिळणाऱ्या आठ सिद्धी किंवा अलौकिक शक्ती : अणिमा, महिमा, गरिमा, लघिमा, प्राप्ति, प्राकाम्य, ईशित्व, वशित्व.

अष्टक– *पु.* १. आठ वस्तूंचा संग्रह. २. आठ श्लोकांचें काव्य.

अष्टम– *वि.* आठवें.

अष्टांग– *वि.* आठ अंगें किंवा भाग असलेलें. – *पु.* ज्यांनीं प्रणाम करावयाचा तीं शरीराचीं आठ अंगें : गुडघा, हात, पाय, छाती, डोकें, वचन, दृष्टि, बुद्धि.**–आयुर्वेद**–*पु.*–आयुर्वेदाचे आठ विभाग : शल्य, शालाक्य, कायचिकित्सा, भूतविद्या, कौमारभृत्य, अगदतंत्र रसायनतंत्र, वाजीकरण.**–मार्ग**– *पु.*

भगवान् गौतम बुद्धांनीं उपदेशिलेला आठ अंगांचा दुःखनिवृत्तीचा मार्ग :– सम्यक् दृष्टि, सम्यक् संकल्प, सम्यक् वाक् सम्यक् कर्म, सम्यक् आजीव, सम्यक् व्यायाम, सम्यक् स्मृति, सम्यक् समाधि. –**योग**–पु. योगाचीं आठ अंगें : यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधि.

अष्टाक्षर– *वि.*आठ अक्षरांचें.–पु. 'ॐ नमो नारायणाय ' हा मंत्र.

अष्टादश– *वि.* अठरा.

अष्टाध्यायी– *स्त्री.* पाणिनिकृत व्याकरण-ग्रंथ.

अष्टावक्र– *वि.* आठ ठिकाणीं वांकडा झालेला; कुरूप.

अष्टिफल– *पु.* अष्टि वर्गाचें (आंत बीं असलेलें) फळ.

असंका*– *स्त्री.* शंकाकुशंका.

असंकुल– *वि.* जेथें गर्दी नाहीं असें (स्थान); प्रशस्त; मोकळें.–पु. रुंद रस्ता. [णित.

असंख्यात– *वि.* असंख्य; अग-

असंगत– *वि.* विसंगत; विजोड.

असंगति– *स्त्री.* विसंगति; अनुपयुक्तता; मेळ नसलेली गोष्ट. –**प्रदर्शन**– पु. विसंगति दाखवून देणें; ' रिडक्शियो ॲबसर्डम् '.

असंत– *वि.* दुष्ट. [नाराजी.

असंतोष – पु. असमाधान;

असंदिग्ध– *वि.* निश्चित; पक्कें.

असंनाद– *वि.* विसंवादी; बेसूर.

असंनादी–*वि.* विसंवादी; 'डिसोनंट '.

असंपीडयता– *स्त्री.* अपीडनीयता; न दवण्याचा गुण.

असंबद्ध–*वि.* १. संबंध नसलेलें. २. विसंगत. ३. परकीय ४. बेसूर.

असंभव-*वि.* अशक्य.

असंभार–*वि.* १. ज्याच्याजवळ गरजेच्या वस्तू नाहींत असा; निराधार. २.* ज्याला सांभाळणें अशक्य आहे असा. ३.* अपार; मोठा.

असंभावना –*स्त्री.*. अशक्यता.

असंभाष्य–*वि.* १. अनिर्वचनीय. २. न सांगण्यासारखी गोष्ट (वाईट).

असंभूति– *स्त्री.* १. विद्यमान नसणें. २. पुनर्जन्म न होणें.

असंमिति– *स्त्री.* अप्रमाणबद्धता.

असंयत–*वि.* संयमरहित; अनियंत्रित; अनिर्बंध; स्वैर.

अस*–*वि.* **१.** असा; ह्या प्रकारचा. २. समान; तुल्य.

असकताना– *क्रि. अ.* आळशी होणें; आळसावणें; कंटाळणें.

असकन्ना–पु. तलवारीचें म्यान आंतून साफ करण्याचें एक लोखंडी अवजार.

असगंध–पु. आस्कंद; अश्वगंधा.

असगुन–पु. अपशकुन.

असगुनियाँ*– पु. ज्याचें तोंड पाहाणें अशुभ समजलें जातें असा माणूस. [असलेला एक निर्विष साप.

असढ़िया⁺ –पु. पाठीवर ठिपके

असती– *स्त्री.* वाईट चालीची स्त्री; व्यभिचारिणी.

असन*– पु. भोजन; जेवण.

असन–ना–पु. ऐन (वृक्ष); पीतशाल.

असनान*–पु. स्नान; आंघोळ.

असनि*– पु. १. वज्र. २. वीज ३. इंद्र ४. अग्नि.

असन्नद्ध–*वि.* १. सज्ज नसलेला २. घमेंडखोर; अहंमन्य.

असफल–*वि.* अयशस्वी.

असबर्ग–पु. रेशीम रंगविण्याच्या कामीं उपयोगी पडणारें एक गवत.

असबाब–पु. [*अ.* ' *सबब* 'चें *अनेक*०] १. कारणें. २. सामान; चीजवस्तु. [न सुधारलेला.

असभ्य–*वि.* अशिष्ट; जंगली;

असमंजस– *स्त्री.* १. भ्रम; घोटाळा; गोंधळ. २. अडचण.

असमंत–पु. चूल.

असम–*वि.* १. विषम. २ उंचसखल.–पु. आसाम प्रदेश.–**शर**–पु. कामदेव. [अव्य. अवेळीं

असमय–पु. अवेळ; कुवेळ. –

असमयोचित–*वि.* अप्रासंगिक; ' इनएक्स्पीडियंट '

असमर्थ–*वि.* १ अशक्त; दुर्बल. २. ज्याला शक्य नाहीं असा.

असमर्थता निवृत्तिवेतन– पु. पंगुत्व आल्यामुळें मिळणारें वेतन; 'इनव्हॅलिडिटी पेन्शन '.

असमान–*वि.* बरोबरीचा नसलेला; विजोड.

असम्मत–*वि.* १. मतभेद असलेला २. अस्वीकृत; नामंजूर ३. विरुद्ध.

असयाना–* *वि.* साधा; भोळा.

असर–पु. [*अ.*] प्रभाव; परिणाम.–**कारी**–*वि.* प्रभावकारक; प्रभावी.

असरा–पु. आसामचा तांदूळ.

असरार–पु. [*अ.* ' *सिर* 'चें *अनेक.*] रहस्यें; मर्में.

असरार–*वि.* बेशुद्ध; बेभान.

असल-ली–*वि.* [*अ.*] अस्सल; शुद्ध. २. सच्चा; खरा. ३. उत्तम; पहिल्या प्रतीचा.–पु. १. मुद्दल; मूलधन. २. मूळ; वास्तविकता.

असलह–पु. [*अ.*] हत्यार; शस्त्र.

असला–*अव्य.* [*अ.*] १. मुळींच; कदापि २. बिलकुल; जरासुद्धां.

असलि(ली)यत– *स्त्री.* [*अ.*] तथ्य; वास्तकविकता.

असवार–पु. [*फा.*] स्वार.

असहनशील–*वि.* चिडखोर; रागीट. [होणारें.

असहनीय–*वि.* असह्य; सहन न

असहयोग–*पु.* असहकारिता; असहकार्य. [नसलेला.

असहाई*–*वि.* असहाय्य; मदत

असहाय–*वि.* निराधार; ज्याला कोणाचें साह्य नाहीं असा.

असहिष्णु–*वि.* सहन न करणारा; चिडखोर; रागीट.

असही*–*वि.* दुसऱ्याचा उत्कर्ष न पाहवणारा; मत्सरी.

असाँच*–*वि.* असत्य; खोटें.

असांसद–*वि.* असंसदीय; संसदेच्या नियमांविरुद्ध; अशोभनीय; 'अन्पार्लमेंटरी'.

असा–*पु.* [*अ.*] सोटा; दंडा. **–ए-शाही**–*पु.* राजदंड.**–बरदार**–*पु.* भालदार-चोपदार.

असाड़ा*–*सर्व.* आमचें.

असाढ़–*पु.* आषाढ महिना.

असाढ़ा–*पु.* १. रेशमाचें सूत. २. कच्ची साखर.

असाढ़ी–*वि.* आषाढी; आषाढ महिन्यांतील. –*स्त्री.* १. आषाढी पौर्णिमा. २. आषाढ महिन्यांत पेरलेलें पीक.

असाध*–**ध्य**–*वि.* १. साध्य न होणारा; कठिण. २. बरा न होणारा (रोग).**–साधन**–*पु.* होऊं न शकणारें काम करणें.

असाधारण–*वि.* असामान्य; अपवादात्मक.**–राजदूत**–*पु.* विशेष राजदूत; 'अ‍ॅम्बॅसिडर एक्स्ट्रा-ऑर्डिनरी'.

असाधु–*वि.* दुष्ट; वाईट.

असानी–*पु.* रिसीव्हरची नेमणूक होईपर्यंत त्याचें काम पाहाण्यासाठीं कोर्टानें नेमलेला अधिकारी.

असानूं*–*सर्व.* आम्हांला.

असामयिक–*वि.* अकालीं, अवेळीं झालेलें, केलेलें.

असामी–*पु.* [*अ.*] १. व्यक्ति. २. देण्याघेण्याचा संबंध असलेली व्यक्ति; असामी. ३. वाहुदार; कुळ. ४. अपराधी; गुन्हेगार. ५. नोकरी.

असार*–*पु.* स्वार.

असालत–*स्त्री.* [*अ.*] १. कुलीनता. २. सचोटी; खरेपणा. ३. अस्सलपणा. **मु०–में फ़र्क़ होना**–वर्णसंकर होणें. [जातीनें.

असालतन्–*अव्य.* [*अ.*] स्वतः;

असावधानी–*स्त्री.* बेसावधपणा.

असावरी–*स्त्री.* एक रागिणी; आसावरी.

असास–*स्त्री.* [*अ.*] पाया; मूळ.–*पु.* सामान; चीजवस्तु.

असासा–*पु.* [*अ.*] धनदौलत.

असि–*स्त्री.* तलवार; खड्ग. **–गंड**–*पु.* गालाखालीं ठेवावयाची उशी.**–चर्या**–*स्त्री.* तलवार चालविण्याचा अभ्यास.**–दंष्ट्रक**–*पु.* मगर; सुसर.**–धाराव्रत**–*पु.* १. तलवारीच्या धारेवर उभें राहाण्यासारखें कठिण व्रत. २. पतिपत्नींनीं एकाच अंथरुणावर, परंतु ब्रह्मचर्य–रक्षणासाठीं मध्यें तलवार ठेवून झोंपणें.

असित–*वि.* पांढरें नसलेलें; काळें; निळें.**–फल**–*पु.* गोड नारळ.

असिद्ध–*वि.* १. नाशाबित. २. कच्चें; न शिजलेलें.

असिद्धि–*स्त्री.* १. अपूर्णता. २. विफलता. ३. कच्चेपणा. ४. नाशाबिती.

असिस्टेंट–*वि.* [*इं.*] सहाय्यक; दुय्यम; **–कलेक्टर**–*पु.* डेप्युटी कलेक्टर; तहसीलदार.

असिस्टेंटी–*स्त्री.* [*इं.*] दुय्यम अधिकाराचें पद किंवा कार्य.

असिव*–*वि.* अशिव; अमंगळ.

असीम–*वि.* १. सीमारहीत; अमर्याद. २. अपरिमित; खूप.

असीर–*पु.* [*अ.*] कैदी; बंदी.

असील–*वि.* [*अ.*] १. उच्च वंशांतील; खानदानी; २. सुशील.

असीस–*स्त्री.* आशीर्वाद.

असीसना–*क्रि. स.* आशीर्वाद देणें; दुवा देणें.

असुंदर–*वि.* कुरूप.

असुख–*पु.* १. दुःख; कष्ट. २. आजार.

असुचि–*वि.* अशुचि; अशुद्ध; अपवित्र; घाणेरडा.

असुर–*वि.* दैत्य; दानव; राक्षस. **–सेन**–*पु.* एक राक्षस. याच्या शरीरावर गया शहर वसलेलें आहे, असें म्हणतात.

असुरारि–*पु.* दैत्यांचा नाश करणारा; देव. [अडचण.

असुविधा–*स्त्री.* १. गैरसोय. २.

असूझ–*वि.* १. विकट; कठीण; न सुचणारा. २. अंधकारमय.

असूत*–*वि.* विरुद्ध; असंबद्ध.

असूया–*स्त्री.* मत्सर; हेवा.

असूर्यपश्या–*वि. स्त्री.* सूर्यालाहि जी पाहूं शकत नाहीं अशी अत्यंत कडक पडद्यांत राहाणारी स्त्री. –*स्त्री.* १. राणी. २. पतिव्रता स्त्री.

असूल–*पु.* [अ. 'उसूल'] १. सिद्धांत. २. वसूल.

असेंब्ली–*स्त्री.* [*इं.*] १. सभा. २. कायदेमंडळ.

असेसमेंट–*पु.* [*इं.*] १. कर बसविण्यासाठीं घर. जमीन वगैरेची किंमत ठरविणें. २. कराची रक्कम निश्चित करणें.

असेसर–*पु.* [*इं.*] १. फौजदारी खटल्यांत न्यायाधीशाला सल्ला देण्यासाठीं नेमलेला मनुष्य. २.

कराचें प्रमाण ठरवून देणारा. ३. कर ठरविण्यासाठी मालमत्तेचा अंदाज घेणारा किंवा तपास करणारा, करनिर्धारक.

असैनिक– *वि.* नागरी; मुलकी; 'सिव्हिल',–**व्यय**– *पु.* सैन्याव्यतिरिक्त इतर कामांवर होणारा खर्च; 'सिव्हिल एक्स्पेंडिचर'.

असैनिकीकरण– *पु.* सैन्य काढून घेणें; 'डी मिलिटरायझेशन'.

असैला*– *वि.* १. वाईट मार्गाला लागलेला; विघडलेला. २. अयोग्य; अनुचित.

असोक*–*वि. पु.* पा० 'अशोक'.

असोच*– *वि.* चितारहित; निश्चित; निर्द्वन्द्व.

असोज+– *पु.* आश्विन मास.

असोस*– *वि.* न सुकणारा.

असोसियेशन–*पु.* [इं] १. संघ. २. समिति. ३. सभा.

असौंध*– *स्त्री.* दुर्गंध; घाण.

असौच– *पु.* पा० 'अशौच'.

अस्कर– *पु.* [अ.] लष्कर; सैन्य. [शिपाई.

अस्करी– *पु.* [अ.] सैनिक;

अस्तन*– *पु.* स्तन; पयोधर.

अस्तबल– *पु.* [अ.]. अश्वशाळा; तबेला.

अस्तमित– *वि.* १. लपलेला; अस्तंगत; दृष्टीआड झालेला. २. नष्ट.

अस्तव्यस्त– *वि.* अस्ताव्यस्त; छिन्नविछिन्न.

अस्तर– *पु.* [फा.] अस्तर; दुहेरी कपडयाच्या आंतील कापड. –**कारी**– *स्त्री.* १. कपडयाच्या आंतील बाजूस अस्तर लावणें. २. भिंतीला गिलावा करणें.–**बट्टी**– *स्त्री.* तसबिरीचा कागद घासून गुळगुळीत करण्याचादगड.

अस्ताचल; अस्ताद्रि–*पु.* पश्चिमेकडील एक काल्पनिक पर्वत. याच्या मागें सूर्य अस्ताला जातो अशी समजूत आहे.

अस्ति– *स्त्री.* १. असणें; विद्यमानता.–**त्व**– *पु.* असणें.– **मंत**– *पु.* श्रीमंत; 'आहे रे'; 'दि हॅव्ज.' –**रूप**–*वि.* भावरूप; 'पॉझिटिव्ह'.

अस्तु–*अव्य.* असो.

अस्तुत–ति*– *स्त्री.* स्तुति.

अस्तुरा– *पु.* [फा.] वस्तरा.

अस्तेय–*पु.* चोरी न करणें.

अस्त्रनिर्माणशाला– *स्त्री.* शस्त्रांचा कारखाना; 'आर्डिनन्स फॅक्टरी.'

अस्थान*–*पु.* स्थान.

अस्थानिक मूल–*पु.* आगंतुक मूळ; 'अॅडवेन्टिशस रूट'.

अस्थायी–*वि.* तात्पुरता; हंगामी. –**संधि**– *स्त्री.* तात्पुरता तह; 'आर्मिस्टिस'.

अस्थि– *स्त्री.* १ हाड; २. मृत व्यक्तीचीं हाडें. –**भंग**–*पु.* हाड मोडणें; 'फ्रॅक्चर'.

अस्थिर*–*वि.* स्थिर.

अस्ना–*अव्य.* [अ.] मध्यें; दरम्यान; मध्यंतरीं.

अस्नाद–*पु.* [अ. 'सनद'चें अनेक०] सनदा; प्रमाणपत्रें.

अस्नान*–*पु.* स्नान; आंघोळ.

अस्पताल–*पु.* [इं.] दवाखाना; इस्पितळ.

अस्फंज–*पु.* [फा.] स्पंज.

अस्फटिक–*वि.* अपारदर्शक; ज्याचें चूर्ण खरखरीत किंवा चमकदार नाहीं असें; 'अॅमार्फस'.

अस्फुट–*वि.* अस्पष्ट; अप्रकट.

अस्मत– *स्त्री.* [अ.] १. पातिव्रत्य. २. पावित्र्य. [लोक.

अस्मदादिक–*सर्व.*अनेक०आम्ही

अस्मदीय–*वि.* माझें.

अस्मिता– *स्त्री.* अहंकार; मीपण.

अस्र–*पु.* [अ.] १. समय; काल; वेळ. २. सूर्यास्ताच्या पूर्वीची वेळ. –**की नमाज**– *स्त्री.* संध्याकाळची नमाज (प्रार्थना). [३ अश्रु.

अस्र–*पु.* १. कोण. २. रक्त.

अस्रु*–*पु.* अश्रु; आंसू.

अस्ल–*वि.* पा० 'असल'.

अस्वस्थ–*वि.* १. आजारी; रोगी. २. विमनस्क.

अस्वास्थ्य–*पु.* रोग; आजार.

अस्वीकार–*पु.* १. कबूल न करणें; इन्कार करणें. २ न घेणें.

अस्वीकृत–*वि.* १. नामंजूर; नापास (ठराव). २. न घेतलेलें.

अस्सी–*वि.* ऐंशी; ८०

अहं–*सर्व.* मी.–*पु.* अहंकार; अभिमान.

अहंता– *स्त्री.* गर्व.

अह–*अव्य.* खेद, आश्चर्य, दुःख वगैरे सूचक उद्गार; अरेरे!

अह–*पु.* १. दिवस. २. अहंकार. ३. दुःख.

अहउँ–ऊँ–**क्रि.* अ.* मी आहें.

अहक*–*पु.* लालसा; अतृप्त आकांक्षा. [अभिलाषा बाळगणें.

अहकना*–*क्रि. स.* इच्छिणें;

अहकर–*वि.* [अ. ?] अत्यंत तुच्छ. [*अनेक*०] आज्ञा; हुकूम.

अहकाम–*पु.* [अ. '*हुक्म*'चें

अहतमाल–*पु.* [अ. 'एहतिमाल'] शंका; संशय.

अहथिर*–*वि.* स्थिर.

अहद–*पु.* [अ.] १. प्रतिज्ञा; निश्चय. २. करार; वायदा; ३. शासन; राज्य. ४. काळ.–**दार**–*पु.* मुसलमानी अमदानींतील एक अधिकारी (करवसुलीचा ठेकेदार).–**नामा**–*पु.* करारनामा; प्रतिज्ञापत्र.

अहदी–*वि.* [*अ.*] १. अत्यंत आळशी; सुस्त. २. अकर्मण्य; रिकामटेकडा. *पु.*– १. अत्यंत आणीबाणीच्या परिस्थितींतच ज्यांचा उपयोग केला जात असे, असे राखीव सैनिक (अकबराच्या सैन्यांतील एक भाग). २. आळशी माणूस. [२. होणें.

अहना*– *क्रि. अ.* १. असणें.

अहनिसि *–*अव्य.* अहर्निश; रात्रंदिवस.

अहने*– *पु.* पुकारा; गोंगाट. (याचा प्रयोग अनेकवचनांतच होतो.)

अहप्पति*–*पु.* शेषनाग.

अहबाब–*पु.* [*अ.* 'हबीब 'चें अनेक०] मित्र; दोस्त.

अहम–*वि.* [*अ.*] १. अत्यंत महत्त्वाचें. २. जरुरीचें; निकडीचें.

अहमक़–*वि. पु.* [*अ.*] मूर्ख.

अहमहमिका–*स्त्री.* चढाओढ; स्पर्धा.

अहमिति*–*स्त्री.* घमेंड; गर्व.

अहमियत–*स्त्री.* [*अ.* ' अहम्मीयत '] १. महत्त्व २. श्रेष्ठत्व.

अहम्मन्य–*वि.* स्वतःला फार मोठा समजणारा; घमेंडखोर.

अहरन– *स्त्री.* [*फा.*] ऐरण. **मु० –की चोरी, सुई का दान**–आवळा देऊन कोहळा काढणें.

अहरा–*पु.* १. गोवऱ्यांचा ढीग. २. मुक्कामाची जागा. ३. पाणपोई.

अहराम–*पु.* [*अ.* ' हरिम 'चें अनेक०] १. म्हातारीं माणसें २. जुन्या इमारती. ३. ईजिप्तचे पिरॅमिड. [हौद.

अहरी–*स्त्री.* १. पाणपोई २.

अहल–*वि.* [*अ.*] योग्य; लायक.–*पु.* कुटुंबांतील व्यक्ति; माणूस.–**कार**–*पु.* कारभारी; मुनीम.– **मद**–*पु.* शिरस्तेदार; नाझर.

अहलिया– *स्त्री.* [*अ.*] पत्नी.

अहले क़लम–*पु.* [*अ.*] १. लेखक; कवि. २. सुशिक्षित माणूस.

अहले किताब–*पु.* [*अ.*] कुराण, बायबल वगैरेसारख्या ईश्वरी धर्मग्रंथांवर आधारलेल्या धर्माचा अनुयायी. (ख्रिस्ती, मुसलमान, यहुदी वगैरे).

अहले खाना– *स्त्री.* [*अ.*+*फा*] घरधनीण; पत्नी.

अहले ज़बाँ–*पु.* [*अ.*] १. एखादी विशिष्ट भाषा आपली मातृभाषा आहे असें अधिकारपूर्वक सांगणारी व्यक्ति. २. जिची भाषा प्रमाणभूत मानली जाते अशी व्यक्ति· [वासी; देशबांधव.

अहले वतन–*पु.* [*अ.*] देश-

अहवान–*पु.* १. आवाहन; निमंत्रण. २. आह्वान.

अहवाल–*पु.* [*अ.* ' हाल' चें अनेक०] १. वृत्तांत; खबर. २. स्थिति; अवस्था. ३. विवरण.

अहसान–*पु.* [*अ.*] १. उपकार; कृपा. २. कृतज्ञता.–**फरामोश**–*वि.* कृतघ्न.– **मंद**–*वि.* कृतज्ञ.

अहसि*– *क्रि. अ.* तूं आहेस.

अहस्तक्षेपनीति– *स्त्री.* मुक्त व्यापाराचें धोरण; ' लेसेज फेयर'.

अहस्तांतरकरणीय–*वि.* ज्याचा ताबा दुसऱ्याला देतां येत नाहीं असें; ' इन ॲलायनेबल '.

अहस्तांतरणीय–*वि.* दुसऱ्याला देतां न येणारें; 'नॉन ट्रान्सफरेबल'.

अहह–*अव्य.* अरेरे ! (दुःख, क्लेश व आश्चर्यसूचक उद्गार).

अहहिं–हीं*– *क्रि. अ.* आहेत.

अहहू*– *क्रि. अ.* आहांत.

अहा–अहाहा–*अव्य.* अहाहा (आनंदोद्गार; आश्चर्योद्गार).

अहागति*– *स्त्री.* आनंदाची स्थिति. [कुंपण.

अहाता–*पु.* [*अ.*] आवार;

अहारना–*क्रि. स.* १. लाकूड तासून गुळगुळीत करणें. २. * आहार करणें; खाणें.

अहाली-मवाली–*पु.* [*अ.*] नोकरचाकर.

अहि–*पु.* १. साप. २. राहु. ३. वृत्रासुर. ४. फसव्या माणूस; ठग. ५. पृथ्वी.

अहिरा–*पु.* सारा वसूल करण्यासाठीं शेतावर बसवून ठेवलेला जमीनदाराचा माणूस. [२. अफू.

अहिफेन–*पु.* १. सापाचें गरळ.

अहिबेल– *स्त्री.* विड्याचें पान.

अहियान*–*पु.* शेषशायी विष्णु. **–पदी**– *स्त्री.* गंगा.

अहिवात–*पु.* स्त्रीचें सौभाग्य.

अहिवाती–*वि. स्त्री.* सौभाग्यवती. [यांची एक जात.

अहीर–*पु.* १. गवळी. २. क्षत्रि-

अहीश–*पु.* १. शेषनाग; सर्पराज. २. लक्ष्मण. ३. बलराम.

अहुटना*–*क्रि. अ.* १. मागें हटणें. २. समोरून बाजूला होणें.

अहुठ*–*वि.* साडेतीन; औट.

अहुरमज़्द–*पु.* [पहलवी] पारसी धर्मानुसार धर्म, प्रामाणिकपणा व प्रकाश यांचा देव.

अहुराना*–*क्रि. स.* दूर सारणें; मागें ओढणें. [बचावून.

अहुरि–बहुरि*–*अव्य.* कसें बसें

अहेर–*पु.* शिकार; मृगया.

अहेरी–*पु.* शिकारी; व्याध.

अहै*–*क्रि. अ.* आहे.

अहो–*अव्य.* विस्मय, प्रशंसा, विषाद, धिक्कार वगैरे सूचक उद्गार.–**रूपमहोध्वनिः** –परस्पर-

प्रशंसा.

अहोर–बहोर–*अव्य.* वारंवार.

अहोरा–बहोरा–*पु.* लग्नांतील एक विधि; गृहप्रवेशासाठीं वधूनें सासरीं जाऊन त्याच दिवशीं माहेरी परत येणें.

अह्ल–*वि.* [*अ.*] योग्य; अधिकारी; पात्र.–*पु.* कुटुंबीजन; पा० 'अहल'.

आ

आ–देवनागरी वर्णमालेंतील दुसरा स्वर–वर्ण.–*अव्य.* शब्दाच्या आरंभीं आल्यास 'पर्यंत' असा अर्थ होतो.

आँ–*अव्य.* विस्मयसूचक शब्द.

आँक–*पु.* १. चिह्न; अक्षर. २. अंक; संख्या. ३. ठराविक गोष्ट. ४. अंश; भाग. ५. प्रसिद्ध घराणें. ६. आकांक्षा. –*स्त्री.* –कूस; मांडी.

आँकड़ा–*पु.* १. संख्या; आंकडा. २. पेंच; विकट प्रश्न.

आँकड़ी– *स्त्री.* सांखळी.

आँकना–*क्रि. स.* १. खूण करणें; चिह्न करणें. २. अनुमान करणें. [३. अत्यधिक.

आँकर–*वि.* १. खोल. २. महाग.

आंकिक–*पु.* आंकडेशास्त्रज्ञ 'स्टॅटिस्टीशियन'. [माहूत.

आंकुशिक–*पु.* अंकुश मारणारा;

आँकुस*–*पु.* अंकुश.

आँकू–*पु.* १. अंदाज वर्तविणारा. २. पाहाणी करणारा. ३. मूल्यमापन करणारा.

आँख– *स्त्री.* १. डोळा; नेत्र. २. दृष्टि; नजर. **–की किरकिरी**–*स्त्री.* डोळ्यांत सलणारी, नकोशी वाटणारी व्यक्ति.– **फोड़ टिड्डा**–*पु.* १. नाकतोडा (किडा). २. कृतघ्न-व्यक्ति. **–मिचौनी–ली; –मीचली; –मुँदाई; –मुचाई**–*स्त्री.* लपंडाव (खेळ).– **मु०– आना; – उठना**– डोळे येणें (आजार).**–उठाकर न देखना**– १. लक्ष न देणें; उपेक्षा करणें. २. लाजेमुळें डोळ्यास डोळा न भिडविणें. **–उठाना**–वांकडया नजरेनें पाहाणें.**–उलट जाना**–१. मरतांना डोळे फिरणें २. गर्व होणें. **–ऊँची न होना**– लाजेमुळें समोर न पाहाणें.**–ऊपर न उठाना**–लाज किंवा भीति यांमुळें समोरासमोर न पाहाणें. **–ओट पहाड ओट**– १. समोर नसल्यामुळें दूर व जवळ सारखें होणें २. दृष्टीआड सृष्टि. **–कडुआना**– टक लावून पाहिल्यामुळें किंवा जाग्रणामुळें डोळे चुरचुरणें. **–का अंधा, गाँठ का पूरा**– श्रीमंत परंतु मठ्ठ. **–का अंधा नाम नयनसुख**– नांव सोनूबाई, हातीं कथलाचा वाळा. **–का काँटा**– डोळ्यांत सळणारा; शत्रु. **–का काजल चुराना**– सफाईनें चोरी करणें.– **का कोया; –का डेला**– डोळ्यांतील पांढरा भाग; बुबुळ. **–का जाला**–सारा ? (रोग). **–का तारा; –का तिल**– १. डोळ्यांतील बाहुली. २. अत्यंत प्रिय व्यक्ति. **–का तेल निकालना**– डोळ्यांवर ताण पडणारें काम करणें.**–कान खुला रहना**–सावध राहाणें.**–का परदा उठना**–भ्रम दूर होणें. **–का पानी ढल जाना; – का पानी मरना** –निर्लज्ज बनणें.**–की ठंढक**–प्रिय व्यक्ति किंवा वस्तु.**–की पुतली**– १. डोळ्यांतील बाहुली. २. अत्यंत प्रिय वस्तु.**–की बदी भौंके आगे**– एखाद्याचे दोष त्याच्या प्रियजनांसमोर सांगणें.– **की सूइयाँ निकालना**–शेवटीं थोडेंसें काम करून सर्व श्रेय मिळविणें.**–के आगे चिनगारी छूटना**– डोळ्यांपुढें काजवे चमकणें.**–के आगे पलकों की बुराई**– एखाद्याची नालस्ती त्याच्या मित्राजवळ करणें.**–के तारे छूटना**– डोळ्यांपुढें काजवे चमकणें.**–चुराना; –छिपाना**–नजर चुकविणें. **–को रो बैठना**– डोळे जाणें.**–खटकना**–डोळे दुखणें. **–खुलना**–१. जाग येणें. २. भ्रम दूर होणें.**–खुलवाना**–मुस्लिम विवाहांतील एक विधि. यामध्यें वरवधूपुढें आरसा ठेवतात; त्यांत तीं आपलीं तोंडें पाहातात. या विधीस 'आंख खुलवाना' असें म्हणतात.**–खोलना** –१. ताळ्यावर आणणें. २. सावध होणें. **–गड़ना**–डोळे दुखणें. २. टक लावणें; ध्यास लागणें. **–गड़ाना**– टक लावून पाहाणें. **– चूकना** – दुर्लक्ष होणें. **– झपकना**– डुलकी येणें.**–तरेरना; – दिखाना**–डोळे वटारणें. **–नाकसे डरना**– देवाला भिणें; जनाची नाही तर मनाची तरी लाज बाळगणें.**–निकालना**–डोळे वटारणें; रागानें पाहाणें. **–नीची करना या होना**–लज्जित होणें. **–नीलीपीली, लालपीली करना**– डोळे वटारणें; रागावणें. **–फड़कना**–डोळा लवणें. **–फूटना**– १. डोळे जाणें. २. जळफळणें. **–फूटी पीर गयी**– मूळ कारण व त्याचा परिणाम दोन्ही नष्ट होणें; महार मेला विटाळ गेला. **–फेरना**–तोंड फिर-

विणें; कृपादृष्टि कमी होणें.–**बंदकर (मूँदकर) कोई काम करना**–कसलाहि विचार किंवा पर्वा न करतां काम करणें.–**बचाना**–डोळा चुकविणें.–**बचेका चाँटा**– मुलांचा एक खेळ (ज्याचें लक्ष नसेल त्याला थप्पड. तोबा पाणी).–**बदल जाना**–स्नेह कमी होणें. –**बहाना**–अश्रू ढाळणें.–**बैठना**–१. डोळे जाणें. २. डोळे खोल जाणें. –**भर देखना**–डोळे भरून पाहाणें. –**भौं टेढी करना**–नाराज होणें; कपाळाला आंठ्या घालणें. –**मचकाना**–डोळे मिचकावणें.–**मारना**–१. डोळ्यानें खूण करणें. २. डोळा घालणें.–**मिलाना**– डोळ्यास डोळा भिडविणें.–**मूँद लेना**– डोळेझांक करणें; दुर्लक्ष करणें.–**में आँख डालना**– डोळ्यास डोळा भिडवणें. –**में खटकना**–डोळ्यांत सलणें.–**में बसना**– मनांत ठसणें. –**मोड़ना**–तोंड फिरविणें; तिटकारा वाटणें. –**लगना**–१. झोंप येणें. २. प्रेम बसणें.– **लड़ना**–नजरानजर होणें; प्रेम बसणें.– **लड़ाना** –डोळे भिडविणें; प्रेम करणें.–**सेंकना**–दर्शनसुख लुटणें; सुंदरींकडे टक लावून पाहाणें. –**से भी न देखना**–तुच्छ समजणें. –**होना**– पारख असणें. (**आँखें**)– **घुलना**–१. नजरानजर होणें. २. दृष्टि खिळणें.– **चढ़ना**–डोळे तारवटणें. –**चमकाना**–डोळा मारणें; खूण करणें.–**चरने जाना**–डोळे फुटणें (व्यंग) ; न दिसणें.–**चार करना**–नजर भिडविणें.–**छतसे लगना**–मरतांना डोळे पांढरे होणें. –**जमना** – नजर ठरणें.– **झेंपना**–लाज वाटणें. –**टँगना**–डोळे पांढरे होणें; बुबुळें स्थिर होणें.–**ठंडी होना**–मनासारखें होणें. –**डबडबाना**–डोळे भरून येणें. –**डालना**–लक्ष देणें. –**तरसना**– पाहाण्यासाठीं व्याकुळ होणें. –**दबाना**–डोळा मिचकावणें. –**दिखाना**–डोळे वटारणें; दटावणें.–**पटपटा जाना; पट्टम होना**– डोळे फुटणें (शिवी). –**पथराना**–डोळे निर्जीव होणें. –**फटना**–१. डोळ्यांत सलणें; २. अत्यंत आश्चर्य वाटणें. –**फाड़फाड़कर देखना**– आश्चर्यानें पाहाणें. –**बिछाना**–प्रेमपूर्वक स्वागत करणें. (**आँखों**)– **का तारा**–अतिशय प्रिय व्यक्ति.– **के आगे अँधेरा छाना**–डोळ्यांपुढें अंधेरी येणें.– **तले न लाना**–तुच्छ समजणें.– **देखा हुआ** प्रत्यक्ष पाहिलेला. –**पर ठिकरी रख लेना**–बेपर्वाईनें वागणें; दुर्लक्ष करणें.–**पर पट्टी बाँध लेना**–दुर्लक्ष करणें.– **पर परदा पड़ना**–भ्रम होणें.–**पर पलकोंका बोझ न होना**–आपल्या माणसांचें ओझें न वाटणें.–**पर बि(बै)ठाना**–अत्यंत आदर–सत्कार करणें–**पर रखना**–तळहाताच्या फोडाप्रमाणें जपणें; खूप आदर करणें.–**में काजल घुलना**–काजळ छान लागणें.–**में खून उतरना**–रागानें डोळे लाल होणें.– **में घर करना**–मन मोहून टाकणें.– **में चढ़ना**–पसंत पडणें. –**में चरबी छाना**–मस्ती येणें; धुंदी चढणें.–**में चोब आना**–कांहीं लागून डोळा लाल होणें.– **में झाँई पड़ना**–१. डोळे थकणें. २. दिसेनासें होणें.–**में टेसू, तीसी या सरसों फूलना**–सगळीकडे मनांत असलेलेंच दिसणें; मस्ती येणें.–**में तरावट आना**–डोळ्यांत तेज, स्फूर्ति येणें.–**में नोन देना**–डोळे फोडणें.–**में नोन राई**–'तळपट होवो' असें शापणें (स्त्रियांचा वाक्प्रचार).–**में पालना**–लाडांत वाढविणें. **में फिरना**–मनांत ठसणें.–**में बसना**–मनांत घर करणें.–**बैठना**–पसंत पडणें; डोळ्यांत भरणें.–**में रखना**–सुखांत ठेवणें.–**में शील होना**–मर्यादशील असणें.–**में रात काटना**–काळजीनें रात्रभर जागरण करणें. –**में समाना**–डोळ्यांत भरणें, सामावणें.–**से उतरना**–मनांतून उतरणें.–**से ओझल होना**–दिसेनासें होणें,–**से काम करना**–नुसत्या खुणेनें काम करवून घेणें.–**से गिरना**–मनांतून उतरणें.–**से लगाकर रखना**–प्रेमांत ठेवणें. [दृष्टि.

आँखड़ी*– *स्त्री.* १. डोळा. २.

आँखा–*पु.* मोठी चाळण.

आँग*–*पु.* शरीर; अंग.

आँगन–*पु.* अंगण; चौक.

आँगार–*पु.* निखाऱ्यांचा ढीग.

आंगिक–*वि.* अंगासंबंधीं–*पु.* अंगविक्षेप; हावभाव.–**अभिनय**–*पु.* शारीरिक अभिनय.

आँगी*– *स्त्री.* चोळी.

आँगुरी*– *स्त्री.* बोट; अंगुली.

आँघी– *स्त्री.* कापडी चाळण.

आँच– *स्त्री.* १. आंच; विस्तवाची धग. २. ज्वाला. ३. हानि. **मु०–खाना**–१. आगीवर शिजविलें जाणें. २. जास्त शिजलें किंवा भाजलें जाणें.–**दिखाना**–गरम करणें; उकळणें.–**न आने देना**–त्रास होऊं न देणें; आंच लागूं न देणें. [दोरी.

आँचका–*पु.* शीड सोडण्याची

आँचना–*क्रि. स.* ऊन करणें; आंच देणें.

आँचर*–*पु.* पदर; अंचल.

आँचल–*पु.* पदर (लुगड्याचा) **मु०– देना**–मुलाला दूध पाजणें. –**डालना**–मुस्लिम विवाहांतील एक

प्रथा.–**दबाना**–दूध पिणें (मुलाचें). **–देना**–१. वर लग्नाला निघण्याच्या वेळची एक प्रथा. २. पदरानें वारा घालणें.–**पड़ना**–पदर पडणें, लागणें. (मुलाच्या अंगावर पदर पडणें वाईट समजतात.)–**फाड़ना**–एक तोडगा करणें (वांझ स्त्री लेकुरवाळीचा पदर कातरते).–**में बाँधना**–पदराला खूणगांठ बांधणें; पक्कें ध्यानांत ठेवणें.–**लेना**–पदरानें पायाला स्पर्श करून प्रणाम करणें.–**सँभालना**–पदर सांवरणें.

आँजन–*पु*. अंजन; काजळ.

आँजना–*क्रि. स*. काजळ घालणें.

आंजनेय–*पु*. हनुमान; मारुती.

आँट *स्त्री*. १. टीच. २. गांठ. ३. वैर. ४. बेचकें. मु०–**पर चढ़ना**– इरेला पेटणें.

आँट–साँट– *स्त्री*. गुप्त करार; कट; बेकायदेशीर देवाण–घेवाण.

आँटी– *स्त्री*. १. सुताची गुंडी; आटी. २. गवताची पेंढी. ३. विटी. ४. कनवट. ५. टांग (कुस्तीचा पेंच.) मु०–**काटना**–खिसा कापणें.

आँठी– *स्त्री*. १. आठळी; बीं. २. दह्याची कवडी ३. बेडका ४. गांठ ५. वयांत येणाऱ्या मुलीचे स्तन.

आँड़– *पु*. अंडकोष.

आँडी– *स्त्री*. १. गांठ. २. कंद. ३. घाण्याच्या खांबाचा जाड भाग. ४. चाकाच्या मोकांतील लोखंडी वेढें.

आँडू–*वि*. खोंड; अंडिल (पाडा); खच्ची न केलेला बैल.

आँड़े बाँड़े खाना–*पु*. १. मुलांचा एक खेळ २. उगीच भटकणें.

आँत– *स्त्री*. आंतडें. मु०–**उतरना**– अंडवृद्धि, 'हार्निया', होणें.–(**तें**) **उलट जाना** – उलटी होणें. –०**कुल कु(बु) लाना**–पोटांत कावळे ओरडणें; खूप भूक लागणें; –०**गले (मुँह) में आना**– १. तंगडचा गळयांत येणें. २. मुरकुंडी वळणें. –०**समेटना** – भूक मारणें किंवा सहन करणें.–०**सूखना**–भुकेनें व्याकुळ होणें. –(**तों**) –०**का बल खुलना**-पुष्कळ दिवसांनंतर पोटभर जेवावयास मिळणें. –०**में बल पड़ना**– मुरकुंडी वळणें.

आँतकट्टू–*पु*. जनावरांना होणारी हगवण.

आंतरायिक– *वि*. अंतरित; अधून मधून येणारा; [संबंधीं.

आंत्र; आंत्रिक–*वि*. आंतडचा-

आँदू*–*पु*. वेडी. २. साखळदंड; ३. लोखंडाचें कडें.

आंदोलन–*पु*. चळवळ; खळबळ. **–समिति**–*स्त्री*. प्रत्यक्ष कृतिसमिति; 'कमिटी ऑफ ॲक्शन'.

आँध– *स्त्री*. १. अंधार २. रातांधळें. ३. धुंदी. ४. अघेरी. मु० **–आना**–जिवावर संकट येणें.

आँधरा*–*वि*. आंधळा

आँधारंभ*–*पु*. १. सावळा गोंधळ; अंधेर नगरी. २. स्वैर वर्तन.

आँधी– *स्त्री*. झंझावात; तुफान. मु०–**उठना**– वादळ उठणें; खळबळ माजणें. **–के आम**–१. फुकटची वस्तु. २. स्वस्तांत मिळालेली वस्तु.

आँब*–*पु*. आंबा; कैरी.

आँबाहलदी– *स्त्री*. आंबेहळद.

आँय–बाँय–*स्त्री*. वटवट; बडबड. [–*पु*. रक्ती आंव.

आँव–*पु*. आंव (शौच) **–लोहू**

आंवठ–*पु*. कांठ; किनार.

आँवड़ना*–*अ. क्रि*. १. पूर येणें. २. पसरणें ३. आवेश येणें.

आंवड़ा*–*वि*. गहन; खोल.

आँवन–*पु*. १. चाकाच्या मध्यभागीं असणारें लोखंडी वेढें. २. छिद्र मोठें करण्याचें अवजार; छिन्नी.

आँवरा–*पु*. आंवळा. [जार.

आँवल–*पु*. वार; गर्भवेष्टन;

आँवलगट्टा– *पु*. आंवळकाठी.

आँवला–*पु*. आवळा.

आंवलापत्ती– *स्त्री*. मुरड (शिवणाची).

आँवाँ– *पु*. कुंभाराची भट्टी. मु०– **का आँवाँ बिगड़ना**– कुटुंबाची किंवा समाजाची आढी नासणें. [संबंधीचें; थोडें.

आंशिक– *वि*. अंशत: अंशा-

आँस*– *स्त्री*. संवेदना; जाणीव. –*पु*. अश्रु; आंसू.

आँस+–*स्त्री*. मिसरूड. मु०–**आँसें भीगना**–मिसरूड फुटणें. [खटकणें.

आँसना+–*क्रि. अ*. बोचणें;

आँसी– *स्त्री*. आनंदाप्रीत्यर्थ इष्टमित्रांत वांटावयाची मिठाई.

आँसू– *पु*. अश्रु; आंसू. मु० **–उमड़ना**– १. डोळे डबडबणें. २. अश्रू वाहाणें. **–गिराना या ढालना**– अश्रू ढाळणें; रडणें. **–पीकर रह जाना**– दु:ख गिळणें; सहन करणें. **– पोंछना**– धीर देणें. (**आँसुओं**)**की झड़ी लगना**;–०**का तार बँधना**– अश्रूंच्या धारा लागणें. **–०से मुँह धोना**–खूप रडणें.

आँह*–*अव्य*. भरवंशावर.

आँहड़– *पु*. भांडें.

आँहाँ–*अव्य*. नाहीं; नको; अंहं.

आ– *उप*. १. पर्यंत (आसेतु). २. पासून (आजन्म). ३. भर (आजीवन). ४. सहित (आबालवृद्ध).

आइंदा– *वि*. [*फा*.] भविष्यकालीन.–*अव्य*. यापुढें; भविष्य

काळीं. –पु. भविष्य काळ.

आइ*– *स्त्री.* आयुष्य; वय.

आइस-सु*– *पु.* आदेश; आज्ञा.

आई*– *स्त्री.* १. मृत्यु; मरण. २. आयुष्य.

आईन– *पु.* [*अ.*] १. नियम; कायदा. २. आरास; सजावट.

आईना– *पु.* [*फा.*] १. आरसा. **–दार**– *वि.* गुणदोष दाखविणारा – *पु.* आरसा दाखविणारा; न्हावी. **–बंदी**– *स्त्री.* १. हंडया, झुंबरें लावून सजविणें. २. जमिनीला फरशी बसविणें.**–साज**– *वि.* आरसे बनविणारा; कांचकाम करणारा. **–साजी** – *स्त्री.* आरसे बनविण्याचें काम; कांचकाम. **मु०** **–होना** –स्पष्ट होणें–. **(ने)में मुँह देखना**– आपली योग्यता पडताळून पाहाणें.

आईनी– कायदेशीर; नियमबद्ध. [काल.

आउ–ऊ*– *स्त्री.* वय; आयुष्य-

आउज-झ*–*पु.* एक वाद्य; ताशा.

आउबाउ*–*पु.* निरर्थक बडबड; वटवट. [साळीचें पीक; हळवें भात.

आउस–भाद्रपदांत तयार होणारें

आक– *पु.* रुई. **–की बुढ़िया** – *स्त्री.* १. रुईचा कापूस; म्हातारी. २. जख्ख म्हातारी.

आकड़ा– *पु.* रुई.

आक़बत*– *स्त्री.* [*अ.*] मृत्यूनंतरची अवस्था; परलोक. **–अंदेश** –दूरदर्शी. **मु०** **–बिगड़ना**–परलोकीं वाईट गति मिळणें. **–में दिया दिखाना**– परलोकीं उपयोगी पडणें.

आकबती लगर– *पु.* [*अ.* + *फा.*] संकटाच्या वेळीं वापरावयाचा जहाजाचा नांगर. [वटवट.

आकबाक*–*पु.* निरर्थक बडबड;

आकर– *पु.* खाण; उत्पत्तिस्थान. **–ग्रंथ**–*पु.* संदर्भग्रंथ; 'रेफरन्स बुक'.

आक़रक़रहा– *पु.* [*अ.*] अक्कल करा; अक्कलकाढा (झाड).

आकरिक– *पु.* १. खाणीवर देखरेख ठेवणारा. २. खाण मजूर.

आकर्ण– *अव्य.* कानापर्यंत– *वि.* कानापर्यंत आलेलें, ताणलेलें.

आकर्ष– *पु.* १. ओढ; ओढणें. २. फांशांचा खेळ; फांसा ३. चुंबक. ४. कसोटी.

आकलन– *पु.* १. ग्रहण करणें. २. संग्रह करणें. ३. मोजणें.

आकली*– *स्त्री.* १. व्याकुळता; बैचेनी. २. चिमणी (पक्षी).

आकल्पक– *पु.* १. अंधार; मोह. २. गांठ. ३. उत्कंठा.

आकष– *पु.* कसोटी.

आकस्मिक– *पु.* नैमत्तिक रजा. –*वि.* आकस्मिक; अचानक. **–अधिकार**– *पु.* आणीबाणीचे अधिकार.

आकस्मिकतानिधि– *स्त्री.* प्रसंगोपात, आकस्मिक निधि; 'कंटिंजन्सी फंड'. [धनी. २. ईश्वर.

आक़ा– *पु.* [*अ.*] १. मालक;

आका– *पु.* भट्टी; आवा; चुलाण.

आकारपत्र–*पु.* अर्जाचा नमुना; 'फॉर्म'.

आकारविज्ञान– *पु.* आकृतिशास्त्र; 'मॉरफॉलॉजी'.

आकारी+– *वि.* बोलविणारा; हांक मारणारा.

आकालिक– *वि.* १. क्षणिक; २. अवेळीचें. ३. अनपेक्षित.

आकाश–*पु.* १. आभाळ. २. शून्य स्थान.**–कक्षा; –की कोर**–*स्त्री.* क्षितिज.**–कुसुम**–*पु.* १. खपुष्प. २. अशक्य गोष्ट.**– दिया**– *पु.* आकाशदिवा. **–बेल**– *स्त्री.* अमरवेल.**–लोचन**–*पु.* वेधशाळा**–वृत्ति**– *स्त्री.* अनिश्चित उपजीविका. **मु०– खुलना**–आकाश निरभ्र होणें. **–छूना** १. खूप उंच होणें. २. आकाशाला गवसणी घालणें. **–पाताल एक करना**–आटोकाट प्रयत्न करणें.**–पाताल का अंतर** –जमीन अस्मानाचें अंतर.**–बाँधना** –अशक्य गोष्ट बोलणें. **–से बातें करना**–गगनचुंबी असणें.

आकाशी– *स्त्री.* १. चांदणी २. २. वस्त्राचें छत.

आक़िल– *वि.* [*अ.*] अक्कलवान्; बुद्धिमान्; हुशार.

आकिलखानी–*पु.*[*अ.* + *फा.*] काळसर लाल रंग.

आकीर्ण– *वि.* १. पसरलेलें; विखुरलेलें २. भरलेलें; व्याप्त.

आकुंचित– *वि.* १. आक्रसलेलें. २. कुरळे (केस).

आकुंठित–*वि.* १. लज्जित. २. २. जड; बोथट.

आकुल–*वि.* १. उद्विग्न; व्याकुळ. २. विव्हळ.

आकुलता– *स्त्री.* १. व्याकुळता. २. अस्वस्थता.

आकूति– *स्त्री.* १. इच्छा; इरादा. २. अभिप्राय. ३. मनूच्या तीन मुलींपैकीं एक. [केलेलें, झालेलें.

आकृष्ट–*वि.* ओढलेलें; आकर्षित

आक्रमण–*पु.* हल्ला.

आक्रय–*पु.* १. व्यापार. २. व्यापारी; फेरीवाला.

आक्रांत–*वि.* १. आक्रमण झालेला; घायाळ. २. पराजित.

आक्रोश–*पु.* १. डागण्या; टोचून बोलणें; मर्मभेदी भाषण. २. शिव्याशाप; जळफळाट.

आक्षिप्त–*वि.* १. फेंकलेलें. २. परित्यक्त. ३. आक्षेप घेतलेलें. ४. निंदित; दूषित. [दोष.

आक्षेप–*पु.* आक्षेप; हरकत;

आक्साइड–*पु.* [इं.] प्राणिल; गंज; ऑक्सिजन व धातु यांच्या संयोगानें बनणारा पदार्थ.

आक्सिजन–*पु.* [इं.] प्राणवायु; अम्लजन.

आखत–*पु.* १. अक्षता. २. लग्न-प्रसंगीं न्हाव्याला वगैरे दिला जाणारा शिधा [केलेला (घोडा).

आखता–*वि.* [*फा.*] खच्ची

आखथू–*अव्य.* खांकरून थुंकण्याचा आवाज; छी:थू.

आखना*–*क्रि.स.* १. सांगणें. २. पाहाणें. ३. उल्लंघन करणें; ओलांडणें.

आखर–*पु.* अक्षर.

आखा–*पु.* कापडी चाळणी –*वि.* संपूर्ण; अख्खा.

आखात–*पु.* १. उत्खनन. २. कुदळ. ३. उपसागर.

आखातीज– *स्त्री.* अक्षय्यतृतीया.

आखिर– *स्त्री.* [*फा.*] १. शेवट. २. परिणाम; फळ.–*अव्य.* सरतेशेवटीं; अखेर.–**कार**–*अव्य.* शेवटीं; अखेर.

आखिरत– *स्त्री.* [*अ.*] १. प्रलयदिन. २. परलोक. ३. मृत्युदिन. [अंतिम.

आखिरी–*वि.* [*फा.*] शेवटचा;

आखु–*पु.* १. उंदीर. २. चोर. ३. कुदळ. ४. कंजूष. –**पाषाण**–*पु.* १. लोहचुंबक. २. सोमल (विष).

आखेट–*पु.* शिकार.

आखेटक–*पु.* शिकारी; पारधी.

आखोट–*पु.* अक्रोड.

आखोर–*पु.* [*फा.*] १. जनावरांच्या खाण्यानंतरचा उरलेला चारा; चघळ. २. केरकचरा. ३. तबेला. –**की भरती**–खोगीरभरती; निरुपयोगी वस्तूंचा ढीग.

आख्या– *स्त्री.* १. नांव. २. यश; कीर्ति. ३. व्याख्या. ४. अहवाल; प्रतिवेदन; 'रिपोर्ट'.

आख्यात–*वि.* विख्यात; प्रसिद्ध. –*पु.* राजवंशांतील लोकांचे वृत्तांत.

आख्यानिक–*वि.* पौराणिक; काल्पनिक.

आख्यापन–*पु.* घोषणा; विज्ञप्ति.

आगंतुक–*वि.* अतिथि; पाहुणा; अभ्यागत.

आग– *स्त्री.* १. विस्तव; अग्नि. २. दाह; ताप. ३. ईर्ष्या; मत्सर. ४. कढ (मायेचा).–*पु.* उंसाचें वाडें.–*वि.* १. जळत असलेलें; गरम. २. अत्यंत क्रुद्ध. –**मु० उगलना** –आग पाखडणें; रागानें बोलणें. –**उठाना**–भांडण उकरून काढणें. –**का पुतला**–रागीट; जमदग्नीचा अवतार.–**का बाग**–१. सोनाराची भट्टी. २. शोभेचें दारूकाम.–**के मोल**–अत्यंत महाग.–**खाना अंगार हगना**–करावें तसें भरावें.–**जोड़ना** –विस्तव पेटविणें.–**झाड़ना**–चकमकीनें ठिणगी पाडणें.–**दिखाना**– १. आग लावणें. २. तोफ डागणें. –**देना**–१. दहन करणें. २. दारूकाम उडविणें. ३. नष्ट करणें; जाळणें. –**धोना**–निखाऱ्यावरील राख झाडणें.–**पर लोटना**–१. तडफडणें; तळमळणें. २. जळफळणें.–**पानीका बैर**–हाडवैर.–**फाँकना**–प्रौढी मिरविणें.–**फूँकना**–क्रुद्ध करणें.–**फूसका बैर**–हाडवैर.–**बगू(बू)ला होना**–रागानें लाल होणें.–**बरसना**–१. कडक ऊन्ह पडणें; उन्हाच्या झळा लागणें. २. गोळ्यांचा वर्षाव होणें. –**बरसाना**–शत्रूवर गोळ्यांचा पाऊस पाडणें.–**बुझा लेना**–उट्टे काढणें; सूड घेणें.–**बोना**–कुरापत काढणें:–**में कूदना**–संकट ओढवून घेणें.–**में मूतना**–अमर्याद वागणें; वाकड्यांत शिरणें.–**लगना**–१ चुलींत जाणें. (स्त्रियांचा संताप किंवा उद्वेग). २. भयंकर क्रुद्ध होणें. ३. फार महागणें.–**लगाकर तमाशा देखना**–भांडण लावून गंमत पाहाणें.–**लगाकर पानीको दौड़ना**–भांडण लावून स्वतःच तें मिटविण्याचा प्रयत्न करणें.–**लगाना**– १. जाळून टाकणें. २. चहाडी करणें; भांडण लावणें. ३. नाश करणें. –**लगेपर कुआँ खोदना**–तहान लागल्यावर विहीर खणणें.–**लेने आना**–त्याच पावलीं परतणें.–**से पानी होना**–रागावल्यानंतर शांत होणें.–**होना**–क्रुद्ध होणें.

आगज़नी– *स्त्री.* [*सं.* + *फा.*] जाळपोळ. [धान्यचें कणीस.

आगड़ा–*पु.* दाणे गळलेलें

आगणन–*पु.* कामाचा किंवा खर्चाचा अंदाज; 'एस्टिमेट'.

आगत–*वि.* आलेला; हजर; उपस्थित.– **भर्तृका**– *स्त्री.* जिचा पति परदेशाहून, परगांवाहून परत आला आहे अशी नायिका. –**स्वागत**–*पु.* आदरातिथ्य; पाहुणचार. [पेटी.

आगपेटी– *स्त्री.* आगकाड्यांची

आगम–*पु.* १. भविष्यकाळांत घडणारी गोष्ट. २. आगमन. ३. संगम; एकत्र मिसळणें. ४. भविष्यकाळ. ५. उत्पन्न; मिळकत.–**जानी** –*वि.* दूरदर्शी; भविष्य जाणणारा. –**पायी**–*वि.* जन्ममरणशील; अनित्य.–**सोची**–*वि.* धोरणी; दूरदर्शी.

आगम–*पु.* १. कर; महसूल; 'रेव्हेन्यू'. २. आगम; 'इंडक्शन'.

आगमना–*पु.* १. आघाडीचें सैन्य. २. पूर्वदिशा.

आगमी– *वि.* *पु.* ज्योतिषी

(सामुद्रिक जाणणारा).

आगर–*पु.* १, खाण; ढीग. २. घर. ३. खजिना.

आगरबध*–*पु.* हार. [करणारा.

आगरी– *पु.* मीठ तयार

आगल–* *पु.* अडसर– वि. पुढचा; नंतरचा. –अव्य. समोर; पुढें.

आगवन– *पु.* आगमन.

आगा–*पु.* कोणत्याहि वस्तूचा पुढचा भाग. २. भविष्य. ३. लिंगेंद्रिय.–**पीछा**–*पु.* **१.** कांकूं करणें. २. संशयावस्था. ३. परिणाम; शेवट. ४. शरीराचा पुढचा व मागचा भाग. ५. मागला पुढला (विचार, गोष्ट इ.). **मु०–काटना** –आडवें जाणें. (मांजर वगैरे).–**तागा लेना**–आदरसत्कार करणें.–**भारी होना**–गरोदर असणें.–**मारना**–अडथळा आणणें.–**रोकना** –१. हल्ला अडविणें. २. मोठें काम संभाळणें. – **लेना** – हल्ल्याला तोंड देणें.–**सँभालना**–१. शत्रूचा हल्ला अडविणें. २. गुप्तेंद्रिय झाकणें.

आग़ा–*पु.* [*तु.*] १. वडील भाऊ. २. सद्गृहस्थ. ३. मालक ४. काबुली; पठाण. [आरंभ.

आग़ाज–*पु.* (*फा.*) सुरुवात;

आगान*–*पु.* आख्यान; वृत्तांत.

आगामि–मी– *वि.* पुढें येणारें; भावी. [३. स्थान.

आगार–*पु.* १. घर. २. खजिना.

आगाह–*वि.* [*फा.*] माहितगार; जाणता. **मु०– करना**–पूर्वसूचना देणें; सावध करणें.

आगाही– *स्त्री.* १. पूर्वसूचना; माहिती. २ जाणीव; दखलगिरी.

आगि–गी* – *स्त्री.* अग्नि; विस्तव.

आगिल–ला–* *वि.* भविष्यकाळात घडणारा; आगामी; पुढील.

आगू–* *अव्य.* पा० 'आगे'.

आगृहीत– *वि.* जमा केलेल्या पैशांतून पुनः काढून घेतलेलें; 'ड्रॉन'.

आगृहीता; आग्राहक–*पु.* जमा केलेल्या पैशांतून कांहीं भाग पुनः काढून घेणारा; 'ड्रॉअर'.

आगे– *अव्य.* १. पुढें. २. भविष्यकाळीं. ३. समोर; सन्मुख. ४. नंतर. ५. पूर्वीं. – **आगे**–*अव्य.* १. क्रमशः २. कांही दिवसांनंतर; पुढें. **मु०–आना** –१. सामना करणें २. कर्माचें फळ मिळणें.–**करना**– १. समोर ठेवणें २. हजर करणें ३. आड लपणें. –**का उठा** – उष्टें.–**का कपड़ा**–पदर; घुंगट. –**की उखेड़**–कुस्तींतील एक डाव. –**को**–यापुढें; पुनः. –**चलकर** –– कालांतरानें; नंतर.–**डोलना**–१. समोर फिरणें. २. मूलबाळ खेळणें. –**दौड़ पीछे चौड़** – पुढें पाठ, मागें सपाट. – **धरना** – १. पुढें ठेवणें. २. आदर्श बनविणें. –**पीछे**– १. एकामागून एक. २. मागें पुढें. ३. जवळ जवळ. ४ वंशांत, घराण्यांत (उसके आगे-पीछे कोई नहीं है –त्याला कोणी वारस नाही). –**से**– १. पूर्वींपासून. २. यापुढें. –**से लेना**– स्वागत करणें.

आग़ोश– *स्त्री.* [फा.] मांडी.

आगौ*– *वि.* अग्रगण्य; पुढें सरलेला.

आगौन*– *पु.* आगमन.

आग्नेय– *वि.* १. अग्नीसंबंधी; ज्यांतून आग निघते असें. २. तिरपा; वांकडा.

आग्नेयी– *स्त्री.* १. आग्नेय (दक्षिण-पूर्व) दिशा. २. अग्निपत्नी ३. प्रतिपदा.

आघ–घु–* *पु.* किंमत; मूल्य.

आघात–*पु.* १. धक्का २. घाव; प्रहार ३. वध ४. लघ्वी बंद होणें. –**स्थान**– *पु.* वधस्थान. **०मु**– धक्का बसणें. [–**०पहुँचना**– खाणें.

आघूर्णन–*पु.* फिरणें; चक्कर

आघोषणा– *स्त्री.* दवंडी. [तृप्त.

आघ्रात– *वि.* १. हुंगलेलें २.

आचमनी– *स्त्री.* आचमन करण्याची पळी. [करणें.

आचय–*पु.* गोळा करणें; ढीग

आचरणपंजी; आचरण पुस्तक– *स्त्री.* कर्मचाऱ्यांच्या वर्तणुकीचें नोंदणी पुस्तक; 'कॉंडक्टबुक'.

आचरना–* *क्रि. अ.* आचरणें; व्यवहार करणें.

आचरित–*वि.* १. आचरिलेलें. २. केलेलें –*पु.* ऋणकोचीं बायकामुलें घेऊन किंवा त्याच्या दारीं धरणें धरून आपलें येणें वसूल करणें. [पेज.

आचाम– *पु.* **१.** आचमन; २.

आचार–*पु.* १. आचरण. २. चारित्र्य; शील. –**दीप**–*पु.* नीरांजन.

आचारी– *वि.* चारित्र्यवान्; सदाचारी.

आचार्य–१. गुरु. २. मुंज करणारा व वेद शिकविणारा गुरु. ३. महाविद्यालयांतील एखाद्या विषयाचा मुख्य प्राध्यापक ४. असामान्य पंडित. ५. पूज्य पुरुष. ६. मतप्रवर्तक. [लपलेलें.

आच्छन्न–*वि.* १. झांकलेलें २.

आच्छादक–*वि.* झांकणारें; लपविणारें. [वस्त्र.

आच्छादन–*पु.* १. झांकण २.

आच्छादित–*वि.* झांकलेलें; लपलेलें. [स्थितींत; समोर.

आछत*–*अव्य.* असतांना; उप-

आछना–*क्रि. अ.* असणें; राहाणें.

आछा–छो*–*वि.* चांगला.

आछी*–*वि. स्त्री.* चांगली.

आछे*–*अव्य.* चांगल्या रीतीनें.

आछचौ*–*वि.* चांगला; भला; सुंदर.

आज–*अव्य.* आज.–**कल**–*अव्य.* आजकाल; सध्यां. **मु०–कल करना**; –**कल–बताना**– टाळाटाळ करणें. –**कलसें**– लौकरच. –**कल लगना**–मरण काल जवळ येणें.–**कल को**–या वेळीं; आजला. –**मुये कल दूसरा दिन**–मेल्यानंतर कांहींहि होवो. –**लौं**–आजपर्यंत.–**से**–यापुढें.

आजना*–*क्रि. स.* अंथरणें; पसरणें.

आज़म–*वि.* [*अ.*] मोठा; श्रेष्ठ.

आज़माइश–*स्त्री.* [*फा.*] अनुभव; परीक्षा.

आज़माना–*क्रि. स.* १. अनुभव घेणें. २. पारखणें; परीक्षा करणें; अजमावणें.

आज़मूदा–*वि.* [*फा.*] अजमावलेलें; पारखलेलें.

आजा–*पु.* आजोबा; वडिलांचे वडील.–**गुरु**–*पु.* गुरूचा गुरु.

आज़ाद–*वि.* [*फा.*] १. मुक्त; स्वतंत्र २. निष्काळजी. –**खयाल**–*वि.* स्वतंत्र विचाराचा. –**गी**–*वि.* स्वातंत्र्य. –**तबीयत**–*वि.* खुल्या दिलाचा; मोकळा; स्वतंत्र वृत्तीचा.

आज़ादाना–*अव्य.* [*फा.*] स्वतंत्रपणें; मुक्त मनानें.–*वि.* १. स्वच्छंदी; लहरी. २. मुक्त.

आज़ादी–*स्त्री.* [*फा.*] १. स्वातंत्र्य. २. सुटका.

आजान–*पु.* जन्म; उत्पत्ति. –*अव्य.* सृष्टीच्या उत्पत्तीपासून. –**देव**–*पु.* जन्मजात देव; सृष्टीच्या प्रारंभीं देवरूपानें जन्मास आलेला देव.

आजानु–*अव्य.* गुडघ्यापर्यंत. –**बाहु**–*वि.* ज्याचे हात गुडघ्यापर्यंत पोंचतात असा.

आजिज़–*वि.* [*अ.*] १. हैराण; त्रासलेला. २. दीन; नम्र. **मु०** –**आना** – विटणें; कंटाळणें.

आजिज़ी–*स्त्री.*[*अ.*] १. नम्रता; दीनता. २. विनंती. [आजी.

आजी–*स्त्री.* वडिलांची आई;

आजीव–*पु.* उपजीविका; पेशा; व्यवसाय.–*वि.* तहहयात.

आजीवक–*पु.* जैन साधु.

आजीवन–*अव्य.* जन्मभर; आजन्म.

आजीविका–*स्त्री.* धंदा; वृत्ति; व्यवसाय; उपजीविका; रोजगार.

आजु*–*अव्य.* आज. [दुःख.

आज़ुर्दगी–*स्त्री.* [*फा.*] खिन्नता;

आज़ुर्दा–*वि.* [*फा.*] दुःखी; चिंतित.

आजू– *पु.* मजुरीशिवाय काम करणारा; बिगारी; वेठीला लावलेला माणूस. –*स्त्री.* १. वेठ; बिगार २. नरकवास.

आज्ञप्ति– *स्त्री.* १. आज्ञा; आदेश २. दिवाणी दाव्याचा निकाल; हुकूमनामा; 'डिक्री'.

आज्ञा–*स्त्री.* १. हुकूम; आदेश. २. अनुमति; परवानगी.–**कर**–*पु.* नोकर.–**करण**–*पु.* आज्ञाधारकपणा. –**कारी**–*वि.* आज्ञाधारक. –**पत्र**–*पु.* हुकूमनामा.–**प्रतिघात**–*पु.* आज्ञेचें उल्लंघन.

आज्ञाता; आज्ञापक – *वि.* आज्ञा, हुकूम देणारा; मालक.

आज्ञापन–*पु.* हुकूम देणें. २. सांगणें.

आज्ञापित–*वि.* ज्याला आदेश देण्यांत आलेला आहे असा.

आज्य–*पु.* १. तूप. २. तुपाच्या ऐवजीं वापरला जाणारा पदार्थ (तेल, दूध वगैरे).

आटना–*क्रि. स.* दाबणें; दडपणें. २. झांकणें ३. लाजविणें.

आटा–*पु.* १. पीठ. २. कणीक. **मु० – कर देना**–पीठ करणें; खूप बारीक करणें. (कंगालीमें, मुफलिसीमें)– **गीला होना**– संकटावर संकट ओढवणें.–**माटी होना**–नाश होणें. –(**टे**) **की आपा**–भोळी भावडी स्त्री.– (**टे**)**के साथ घुन पीसना**– मोठ्या माणसाबरोबर लहानाचेंहि नुकसान करणें; सुक्याबरोबर ओलें जाळणें.– (**टे**)**दालका भाव मालूम होना**–खरी वस्तुस्थिति समजणें (उपरोधिक).–(**टे**) **दालकी फिक्र**– पोटाची काळजी. –(**टे**) **में नमक**– किंचित्; थोडेंसें.

आटोप–*पु.* १. फुगणें; पसारा. २. घमेंड. ३. पोटांतील गुरगुर. ४. आच्छादन; फैलाव.

आठ–*वि.* आठ. **मु०–आठ आँसू रोना**–खूप रडणें; विलाप करणें. –**पहर चौंसठ घड़ी**–अष्टौप्रहर. –(**ठों**) **गाँठ कुम्मैत**–१. सर्व अवयव चांगले असलेला भुऱ्या रंगाचा घोडा; सर्वगुणसम्पन्न. २. धूर्त; पक्का ३. दुष्ट.–०**पहर**–अष्टौप्रहर. –०**पहरसूलीपर रहना**–नेहमीं अडचणींत असणें. [अष्टमी तिथि.

आठईं; आठें–ठैं–ठों*– *स्त्री.*

आडंबर–*पु.* ढोंग; देखावा; अवडंबर.

आडंबरी–*वि.* ढोंगी.

आड़–*स्त्री.* १. आश्रय; आसरा. २. आडोसा. ३. आडकाठी.

आडगीर–*पु.* शेताच्या बांधावरील गवत.

आड़न– *स्त्री.* ढाल.

आड़ना–*क्रि. स.* १. रोखून धरणें, आडविणें, मनाई करणें २. गहाण ठेवणें.

आडबंद–*पु.* लंगोट.

आड़ा–*पु.* १. रेघांचें कापड. २. होडी अथवा बोट यांमध्यें आडोसा म्हणून लावलेल्या फळ्या.– वि. आडवें.–**खेमटा**–*पु.* मृदंगाचा साडेतेरा मात्रांचा ताल. –**चौताल**–*पु.* मृदंगाचा पूर्ण नऊ मात्रांचा ताल. –**ठेका**–*पु.* मृदंगाचा पूर्ण सात मात्रांचा ताल. –**पंचताल**–*पु.* मृदंगाचा पांच आघात नऊ मात्रांचा ताल. –**लोट**–*पु.* हेलकावे खाणें. (होडी). **मु० –तिरछा होना**– वर्दळीवर येणें; क्रुद्ध होणें.–**पडना, होना**– अडथळा आणणें.–(**ड़े**) **आना**–१. अडचणीच्या वेळीं उपयोगीं पडणें. २. आडवें येणें.–०**हाथों लेना**–फैलावर घेणें; खरडपट्टी काढणें.

आड़ी– *स्त्री.* १. बाजू; दिशा. २. पक्षाचा; गटांतला. ३. तबला वाजविण्याची विशिष्ट तऱ्हा. ४. चांभारांची एक सुटी.

आड़ू–*पु.* पीच (फळ).

आढ़–*पु.* पायली; चार शेर (वजनी किंवा मापी).– *स्त्री.* १. आड. २. अंतर. ३. टीका नांवाचा दागिना. **मु० –करना**–टाळाटाळ करणें.

आढ़क–*पु.* चार शेरी माप अथवा वजन; पायली.

आढ़की– *स्त्री.* तुरीची डाळ.

आढ़त– *स्त्री.* १. अडत. २. वखार; कोठी.

आढ़तिया– *पु.* १. वखारवाला. २. दलाल; अडत्या.

आढ़ौ*–*अव्य.* मध्यें.

आढय–*वि.* धनवान्; सम्पन्न. –**रोगी**–वि. संधिवात झालेला.

आणक–*पु.* आणा (नाणें)–वि. अधम; निंद्य. [' अॅटोमिक '.

आणविक–*वि.* अणूसंबंधींचा;

आणि– *स्त्री.* १. चाकाच्या कण्याचा खिळा. २. सीमा. ३. मर्मस्थान. ४. कोपरा.

आतंक–*पु.* १. भय; धाक; दहशत. २. साशंक व भीतियुक्त वातावरण. –**युद्ध**–*पु.* प्रचारयुद्ध; 'वॉर ऑफ नर्व्हज '. –**वाद**–*पु.* दहशतवाद.–**वादी** –वि. दहशतवादी. **मु०– छाना**–दहशत बसणें. –**जमना**–दरारा बसणें; दबदबा असणें.

आततायी–*पु.* १. आततायी. २. आगलाव्या. ३. अपहरण करणारा. (जमीन, स्त्री, धन इ०चें) ४. अत्याचारी.; जिवावर उठलेला, हत्या करावयास उत्सुक असलेला.

आतप–*पु.* १. ऊन्ह. २. उष्णता; गरमी. ३. सूर्याचा प्रकाश. –**स्नान** –*पु.* सूर्यस्नान; 'सनबाथ'.

आतपी–*पु.* सूर्य.

आतम*–*वि.* आपला; स्वतःचा.

आतमा*– *स्त्री. पु.* आत्मा.

आत(ति)श– *स्त्री.* [*फा.*] १. अग्नि; विस्तव. २. प्रकाश. ३. राग. –**कदा**; –**खाना**–*पु.* १. पारशांचें अग्निकुंड; अग्निशाला. २. भट्टी; चुलाण; शेगडी. ३. अत्यंत गरम स्थान. – **दान** – *पु.* शेगडी.– **परस्त** –*वि.* अग्निपूजक; –*पु.* पारसी. –**फ़िशाँ**–*वि.* आग ओकणारा.–*पु.* ज्वालामुखी पर्वत. –**बाज़ी**– *स्त्री.* दारूकाम; आतिषबाजी.–**मिज़ाज** –*वि.* तापट.

आतशक–*पु.* [*फा.*] १. सांसर्गिक रोग. २. उपदंश, गरमी रोग.

आतशी–*वि.* [*फा.*] अग्नीसंबंधींचा; अग्नींतून उत्पन्न झालेला. –**आईना**; –**शीशा**–*पु.* ज्यांतून पडणारें सूर्याचें ऊन्ह कापूस वगैरे जाळतें, अशी कांच.

आतापी–*पु.* घार (पक्षी).

आतार–*पु.* [*अ.*] अत्तार; अत्तरें विकणारा. [जाण्याचें भाडें.

आतार–*पु.* नावेंतून पलीकडे

आतिश–पा० ' आतश '.

आती-पाती– *स्त्री.* लपंडावाचा एक खेळ.

आतुर–*वि.* १. आजारी; रोगी. २. अधीर.–*पु.* १. रोग. २. आजारी व्यक्ति.– *अव्य.* शीघ्र.–**संन्यास**–*पु.* मरणोन्मुख व्यक्तीनें घेतलेला संन्यास.

आतुराना*–*क्रि. अ.* आतुरणें; उतावीळ होणें.

आतुरालय –*पु.* दवाखाना; इस्पितळ.

आतू– *स्त्री.* पंडिताची पत्नी.

आत्म–*वि* आपला; स्वतःचा. –**गौरव**–*पु.* आत्मसम्मान; प्रौढी. –**घात**–*पु.* आत्महत्या.–**तुष्टि**– *स्त्री.* आत्मसंतोष.–**त्याग**–*पु.* १. आत्महत्या. २. स्वार्थत्याग. –**निर्णय**– *पु.* स्वयं-निर्णय. –**निर्भर**–*वि.* स्वावलंबी.–**निर्भरता**–*स्त्री.* स्वावलंबन.–**बोध**–*पु.* आत्मज्ञान; आत्मसाक्षात्कार.–**भरित योजना**–*स्त्री.* स्वावलंबी योजना; 'सेल्फसफीशियन्सी प्लॅन.'–**श्लाघा**–*स्त्री* स्वतःची बढ़ाई; आत्मस्तुति.

आत्मा– *स्त्री. पु.* आत्मा. **मु०–ठंडी होना**–जीव शांत होणें. –**मसोसना**–भूक सहन करणें.

आत्मा– *स्त्री.* जीभ; धुनकणीच्या एका टोंकाला असलेला चामड्याचा तुकडा.

आत्माधिक–*वि.* स्वतःपेक्षांहि अधिक (प्रिय).

आत्मानात्मविवेक–*पु.* आत्मायुक्त व आत्मारहित वस्तूंतील, चेतन व जड यांतील तारतम्य.

आत्मानुभूति–*स्त्री.* आत्म-साक्षात्कार.

आत्माभिमान–*पु.* स्वाभिमान.

आत्माराम–*पु.* १. अध्यात्मयोगी. २. जीव. ३. पोपट.

आत्मावलंबी–*वि.* स्वावलंबी.

आत्मिक–*वि.* १. आपला. २. मानसिक. ३. आत्म्यासंबंधींचा.

आत्मीय–*वि.* आपला; जवळचा–*पु.* स्वजन; नातेवाईक.

आत्मोत्सर्ग–*पु.* स्वार्थत्याग.

आत्मौपम्य–*पु.* इतरांना स्वतःसारखें समजणें.

आत्यंतिक–*वि.* १. पराकाष्ठेचा. २. सर्वाकालिक–**दुःखनिवृत्ति**–*स्त्री.* मोक्ष.

आत्रेय–*वि. वि.* अत्रिऋषीशीं संबंधित; अत्रीच्या गोत्रांतील. –*पु.* १. दत्त २. अत्रीचा वंशज.

आथना*–*क्रि. अ.* १. होणें. २. असणें. [णारा ब्राह्मण.

आथर्वण–*पु.* अथर्ववेद जाण-

आथी*–*स्त्री.* भांडवल; संपत्ति; समृद्धि; संपन्नता.

आदत–*स्त्री.* [*अ.*] १. स्वभाव. २. संवय; अभ्यास.

आदतन्–*अव्य.* १. स्वभावतः २. नेहमीं; सातत्यानें (उदा. आदतन् खादीधारी = नेहमीं खादी वापरणारा).

आदम–*पु.* [*अ.*] मानव जातीचा आदिपुरुष; मनु. –**कद**–*वि.* १. माणसाच्या आकाराचा. २. सुमारें सहाफूट किंवा एक पुरुष उंचीचा. –**खोर**–*वि.* नरमांसभक्षक.–**चश्म**–*पु.*–माणसासारखे काळे डोळे असलेला घोडा.–**ज़ाद**–*पु.* आदमची संतति; मानव. – ० **नंगा** – *वि.* संपूर्ण नग्न.

आदमी–*पु.* [*अ.*] १. 'आदम'-च्या वंशांतला. २. मनुष्य; मानव. **मु०–बनना**–सभ्यतेनें वागणें; माणुसकी धरणें. [माणुसकी.

आदमीयत–*स्त्री.* [*अ.*+फा.]

आदर्श–*पु.* १. नमुना; अनुकरणीय वस्तु; कित्ता २. आरसा. ३. मूळ लेख.–**वाद**–*पु.* साहित्यामध्यें एखाद्या आदर्श व्यक्तीचें किंवा परिस्थितीचें चित्रण करणें.

आदा–*वि.* खाणारा; भक्षक.

आदाता–*वि.* घेणारा.

आदानप्रदान–*पु.* देवाण-घेवाण; देवघेव.

आदाब–*पु.* [*अ.* '*अदब*'*चें अनेक*०] १. नियम; कायदा. २. शील; मर्यादा. ३. नमस्कार; प्रणाम. –**अर्ज़**–*पु.* नमस्कार.–**मु०–०करना** –१. सलाम करणें. २. निरोप घेणें. –**अलकाब**–*पु.* संबोध्य व्यक्तीची पदवी, विशेषण वगैरे; मायना. –**तस्लीमात**–*पु.* नमस्कार-चमत्कार. **मु०–बजा लाना**–यथोचित नमस्कार वगैरे करणें.

आदाय–*पु.* घेणें; प्राप्त करणें.

आदि–*अव्य.* वगैरे; इत्यादि. –*वि.* पहिला; सुरुवातीचा; प्रथम; प्रारंभिक. २. अगदीं.–*पु.* मूळ; आरंभ.

आदिम–*वि.* पहिला; पूर्वींचा. –**जाति**–*स्त्री.* आदिवासींची जमात.

आदिल–*वि.* [फा.] न्यायी.

आदिष्ट–*वि.* ज्याला आदेश देण्यांत आलेला आहे असा. –**धनादेश**–*पु.* धनीजोग चेक; 'ऑर्डर चेक'.–**संधि**–*स्त्री.* प्रबळ शत्रूला कांहीं भाग देऊन केला जाणारा तह. [लेला; अभ्यस्त.

आदी–*वि.* [*अ.*] संवय अस-

आदी–*स्त्री.* आलें.

आदृत–*वि.* ज्याचा आदरसत्कार करण्यांत आलेला आहे असा; सन्मानित.

आदेय–*पु.* मालमत्ता; जिंदगी; येणीं; वस्तूंत गुंतलेलें भांडवल; 'असेट्स'.– वि. घेण्यायोग्य.

आदेश–*पु.* १. आज्ञा. २ उपदेश. ३. एका अक्षराच्या जागीं दुसरें अक्षर येणें (व्या.).–**देय**–*वि.* धनीजोग; नामजोग; 'पेयेबल टु ऑर्डर'. **लेख**–*पु.* न्यायालयाचा लेखी हुकूम; 'रिट'.

आदेशिका–*स्त्री.* आज्ञा; हुकूम.

आद्यक्षर–*पु.* अद्याक्षर; 'इनीशल्स'.

आद्यक्षरित–*वि.* ज्यावर नांवाची अद्याक्षरें लिहिलीं आहेत असे; 'इनीशल्ड'. [बाकी.

आद्यशेष – *पु.* सुरुवातीची

आद्योपांत–*अव्य.* सुरुवातीपासून शेवटपर्यंत.

आध–*वि.* अर्धा; निम्मा.

आधा–*वि.* अर्धा; निम्मा. –**सीसी**–*स्त्री.* अर्धशिशी (डोकेदुखी). **मु०–तीतर, आधा बटेर**–कांहीं एका प्रकारचें व कांहीं दुसऱ्या प्रकारचें; विजोड. –**होना**–रोडावणें; सुकणें.–(**धी**) **बात न पूछना**–कदर न करणें; किंमत न देणें.

– (धे) आध
– (धों) आध } अर्धे अर्धे; दोन समान भाग.

आधाझारा–*पु.* आघाडा.

आधारक–मूल – *पु.* 'बट्रेस रूट'. [लेख; 'व्हाउचर'.

आधारपत्र–पावती; प्रमाण-

आधि–*स्त्री.* चिन्ता; काळजी.

आधिकरणिक– *पु.* १. न्यायाधीश. २. सरकारी अधिकारी.

आधिकारिक– *वि.* सरकारी; 'ऑफीशियल'. [णारा; 'पॉनर'.

आधिकर्ता–*पु.* ठेव, गहाण ठेव-

आधिकोषिक–*पु.* बँकेचा मालक, भागीदार, संचालक वगैरे; 'बँकर'.

आधिग्राही – *पु.* ठेव ठेवून घेणारा; 'पॉनी'.

आधिदैविक– *वि.* देव किंवा दैव यांच्याशीं संबंधित.

आधिभौतिक– *वि.* प्राण्यांशीं किंवा पंचमहाभूतांशीं संबंधित.

आधिपत्य–*पु.* प्रभुत्व; राज्य.

आधिराज्य–*पु.* सर्वोच्च प्रभुत्व.

आधीन*– *वि.* ताब्यांत असलेला; आश्रित. [बित.

आधृत–*वि.*आधारित; अवलं-

आधेय–*वि.*आधार मिळविलेला.

आध्यात्मिक– *वि.* आत्म्याशीं संबधित; मानसिक; धार्मिक.

आनंदकानन; **आनंदवन** – *पु.* काशी; वाराणसी.

आन– *स्त्री.* १. मर्यादा. २. शपथ; प्रतिज्ञा. ३. ऐट; तोरा. ४. क्षण; पळ.–*वि.* अन्य दुसरा.–**तान** –*स्त्री.* १. ऐट; थाट. २. अब्रू. –**बान**– *स्त्री.* १. थाटमाट. २. ऐट; मिजास; तोरा. **मु०–की आन में**– क्षणार्धात; पाहातां पाहातां.–**पर मिटना**–प्रतिज्ञा अथवा वचन-पूर्तीसाठीं सर्वस्व पणाला लावणें.–**तोड़ना**–प्रतिज्ञाभंग करणें; आग्रह सोडणें.–**रखना**–प्रतिज्ञा पूर्ण करणें.

आनक– *पु.* डंका; दवंडी.

आनद्ध– *वि.* १. बांधलेला २. मढविलेला. [अध्याय; खंड.

आनन– *पु.* १. तोंड; चेहरा. २.

आनन-फ़ानन– *अव्य.* [*अ.*] झट्दिशीं एकाएकीं.

आनना– *क्रि. स.* आणणें.

आनम्य–*वि.* लवचिक.–**संविधान** –*पु.* लवचिक राज्य-घटना; 'फ्लेग्झिबल कॉन्स्टिटयूशन'.

आना– *क्रि. अ.* येणें; आगमन करणें. **मु० आ धमकना**–दाखल होणें; येऊन ठेपणें. **आया गया**– अतिथि; पाहुणा. **आता जाता**– येणारा-जाणारा.– **आनी जानी**– अस्थिर; नश्वर. **आये दिन**–*अव्य.* दररोज; नेहमीं. **आ निकलना** –अकस्मात् जाऊन कोसळणें. पोंचणें. **आ पड़ना**– येऊन पडणें. **आ बनना**–संधि सांपडणें. **आ रहना** –खालीं पडणें. **आ लेना**–धरणें; जाऊन पोंचणें.

आना– *पु.* आणेली (नाणें).

आनाकानी– *स्त्री.* १. दुर्लक्ष; टाळाटाळ. २. ऐकलें न ऐकल्यासारखें करणें. ३. कुजबूज.

आनि– *स्त्री.* १. शपथ; आणभाक. २.* पा० 'आन'.

आनुक्रमिक–*वि.* क्रमवद्ध; क्रमयुक्त; 'ग्रॅज्जुएटेड'.

आनुग्रहिक– *वि.* अनुग्रहप्रेरित. –**कर नीति**– *स्त्री.* कांहीं वस्तूंवर कमी कर घेण्याचें धोरण.–**दारोदयशुल्क**– *पु.* कांहीं विशिष्ट वस्तूंवर कमी घेतली जाणारी जकात किंवा कर.

आनुतोषिक– *पु.* देणगी; बक्षीस; नोकरी संपतांना बक्षिसादाखल दिली जाणारी रक्कम; 'ग्रॅच्युइटी'.

आनुपातिक प्रतिनिधित्व– *पु.* प्रमाणशीर प्रतिनिधित्व; 'प्रपोर्शनल रिप्रेझेंटेशन'.

आनुपूर्व–र्व्य–*पु.*; **आनुपूर्वी** –*स्त्री.* अनुक्रम; क्रमबद्धता. [ष्ठित.

आनुभविक– *वि.* अनुभवाधि-

आनुमानिक– *वि.* काल्पनिक.

आनुषंगिक– *वि.* १. संबद्ध २. गौण. [इतर.

आनै*– *वि.* अन्य; दुसरा;

आन्वीक्षकी–*स्त्री.* १. तर्कशास्त्र. २. अध्यात्मशास्त्र.

आप–*सर्व.* आपण. –**काजी**–*वि.* अप्पलपोटचा; स्वार्थी.–**बीती**–*स्त्री.* स्वतःवर गुदरलेला बरावाईट प्रसंग; आत्मकथा.–**रूप**–*वि.* स्वतः; साक्षात्.–**मु०–आप करना** –खुशामत करणें; हांजी हांजी करणें.–**आपको पड़ना**– आपापल्या कामांत व्यग्र असणें–**आपको**– वेगवेगळें; आपल्यापुरतें.–**से आप**– आपोआप.–**ही आप**–स्वतः; मनांतल्या मनांत.

आपगा–*स्त्री.* नदी.

आपचारना–*क्रि. अ.* स्वैर वर्तन करणें. [पडणें; घटना.

आपतन–*पु.* आपतन; (वर)

आपत्सहायकार्य– *पु.* मदतकार्य; 'रिलीफ वर्क'.

आपत्ति–*स्त्री.* १. दुःख. २. २. संकट; विपत्ति. ३. आक्षेप; विरोध; हरकत. ४. दोषारोप. –**जनक**–*वि.* आक्षेपार्ह. **मु०**– –**उठाना**; **करना**– १. विरोध करणें. २. हरकत घेणें.

आपदा–*स्त्री.* १. दुःख. २. संकट.

आपन–नो*–*सर्व.* आपला.

आपनपो–पौ–*पु.* आत्मभाव; अहंकार.

आपस–*स्त्री.* नातें; संबंध.–**दारी** –*स्त्री.* परस्पर निकट संबंध; **मु०** –**का**–आपसांतील; नात्यांतील. नातें. –**में**–आपसांत; एकमेकांत –**वाले**–स्वजन; नातेवाईक.

आपसी– *वि.* आपसांतील; नात्यांतील; घरगुती; स्वतःचें.

आपहु*– *सर्व.* स्वत:देखील; आपणदेखील.

आपा– *पु.* १. गर्व; घमेंड. २. स्वत:चें अस्तित्व. ३. आपल्या अस्तित्वाची जाणीव –*स्त्री.* वडील वहीण. **मु०–खोना**–१. गर्व सोडणें. २. स्वत:ला नष्ट करणें. **–डालना; –तजना;** **–मेटना**– अहंकाराचा त्याग करणें.–**(पे)में आना**–शुद्धीवर येणें. **–(पे)में न रहना**–मर्यादा सोडणें; वेभान होणें.–**(पे)से बाहर होना**– क्रोधामुळें मनावरील तावा जाणें.

आपात–*पु.* १. अध:पात; पतन. २. अनपेक्षित घडलेली गोष्ट; आणीवाणी; 'इमर्जन्सी'. ३. भार; बोजा; वजन. **–अधिकारी**– आणीवाणीच्या वेळचा अधिकारी.

आपातिक; आपाती–*वि.* आणीबाणीचा; 'इमर्जंट'.

आपापंथी–*वि.* स्वच्छंदी; स्वैर.

आपातत:–*अव्य.* १. अचानक; अकस्मात्. २. अखेरीस; शेवटीं.

आपाधापी–*स्त्री.* १. आपल्याच कामासाठीं धांवपळ; तारांबळ. २. विवंचना. [वानी).

आपानक–*पु.* मदिरापान (मेज-

आपुन–नो*–*सर्व.* आपला.

आपूरना*– *क्रि. अ.* भरणें.

आपृच्छा – *स्त्री.* सार्वमत; एखाद्या विषयावर लोकमत अजमावणें; 'रिफरेंडम'.

आपेक्षिक–*वि.* १. तुलनात्मक; सापेक्ष; 'रिलेटिव्ह'. २. आधारित. **–ताप**– *पु.* सापेक्ष ताप; 'स्पेसिफिक हीट'.

आप्रवास– *पु.* परदेशांत जाऊन कायमचें राहणें; 'इमिग्रेशन'.

आप्रवासी – *वि.* परदेशांत जाऊन कायम राहणारा; 'इमिग्रंट'

आफ़त–*स्त्री.* (*अ.*) १ आपत्ति; संकट. २. दु:ख; कष्ट. **मु० – उठाना**– दु:ख भोगणें. **–का टुकडा; –का परकाला** –१. चलाख; धूर्त. २. प्रचंड उद्योग करणारा. ३. महाभयंकर. **–का मारा**– दुर्दशा ग्रस्त.– **ढाना;– –तोड़ना; –मचाना**– दंगा, गोंधळ करणें. **–मोल लेना; –सिरपर लेना**– संकट ओढवून घेणें; दुसऱ्याचें श्राद्ध विकत घेणें.– **लाना**– संकट आणणें. [२. ऊन्ह.

आफ़ताब–*पु.* (*फा.*) १. सूर्य.

आफताबा–*पु.* (*फा.*) पाण्याचें तोटीदार भांडें; झारी. [गिरी.

आफ़ताबी– *स्त्री.* (*फा.*) अब्दा-

आफ़रीन–*अव्य.* (*फा.*) वाहवा; शाबास. [*अनेक०*] संकटें; विपत्ती.

आफ़ात– *स्त्री.* [*अ. 'आफत'चें*

आफ़ियत– *स्त्री.* [*अ.*] क्षेम; कुशल; समाचार.

आब– *स्त्री.* [*फा.*] १. तेज; कांति; रुवाब. २. पाणी. ३. मद्य; दारू; अर्क. **–कार**– *पु.* कलाल; दारू गाळणारा. **–कारी**– *वि.* १. दारू गाळण्याची भट्टी. २. दारूचा व्यवसाय. ३. गुत्ता; **–०महकमा**– *पु.* दारूसंबंधींचा, मादक पदार्थांशीं संबंधित सरकारी खातें. –एक्साइज डिपार्टमेंट, **–खोरा**– *पु.* पाणी पिण्याचें भांडें; पेला. **–गीना**– *पु.* १. आरसा; कांच; स्फटिक. २. पातळ कांचेची बाटली. **–गीर**– *पु.* १. डबकें; लहान तळें. २. ताण्यावर पाणी शिंपडण्याची विणकराची झाडणी. **–जोश** – *पु.* १. गरम पाण्यांत उकळलेल्या मनुका. २. रस्सा. **–ताब**– *स्त्री.* भपका; शोभा; वैभव. **–दस्त**– *पु.* बहिर्दिशेनंतर हातपाय धुणें; ढुंगण धुणें. **–दाना**–*पु.* १. अन्न पाणी; दाणा पाणी; २. उपजीविका. **–दार**– *वि.* १. चमकदार; पाणीदार. २. पाणी देणारा; शागीर्द.**–दारी**–*स्त्री.* चमक; कांति; तजेला; पाणी; तकाकी. **–दीदा**–*वि.* ज्याचे डोळे अश्रूंनीं डबडबले आहेत असा; अश्रुपूर्ण.**–दोज़ किश्ती**– *स्त्री.* पाणबुडी; 'सबमरीन.'**–नज़ल**–*पु.* अंडवृद्धि (आजार). **–नाए**– *स्त्री.* सामुद्रधुनी.**–पाशी** –*स्त्री.* पाटबंधाऱ्याची व्यवस्था.**–रवाँ**– *स्त्री.* एक प्रकारची पातळ मलमल. **–शनास**– *वि.* १. नावाडी. २. समुद्रांत कोठें किती पाणी आहे, हें जाणणारा. **–शार**– *पु.* १. झरा. २. धबधबा. **–हवा**– *स्त्री.* हवापाणी.

आबद्ध–माल– *पु.* बांधलेला माल; 'बाउंडेड गुड्स'.

आबनूस– *पु.* [*फा.*] जंगलांतील शिसवीसारखें एक काळें झाड. **मु०– का– कुंदा** काळाकुट्ट; काळा ठिक्कर माणूस. [काळाकुट्ट.

आबनूसी– *वि.* काळाठिक्कर;

आबरू– *स्त्री.*]*फा.*] इज्जत; अब्रू; प्रतिष्ठा.

आबला–*पु.* [*फा.*] फोड; व्रण.

आबाद–*वि.* [*फा.*] १. वसलेलें. २. सुखी; संपन्न.**–कार**–*पु.* वसाहत करणारा. **मु० –करना**– १. वसविणें २. लागवडीस आणणें.

आबादान–*वि.* [*फा.*] १. वसलेलें. २. समृद्ध.

आबादानी– *स्त्री.* [*फा.*] १ वस्ती. २. आबादी आबाद. ३. संस्कृति.

आबादी– *स्त्री.* [*फा*] १. वसाहत. २. लोकसंख्या; वस्ती. ३. लागवडीस आलेली जमीन.

आबिद–*पु.* [*अ.*] इबादत म्हणजे पूजा करणारा; भक्त.

आबी–*वि.* [*फा.*] १. पाण्या-संबंधींचा. २. जलचर. ३. फिकट निळा.

आबे ज़िंदगानी–*पु.* [*फा.*] अमृत

आबे रूद–*पु.* [*फा.*] नदीचें पाणी.

आबे हयात–*पु.* [*फा.*] अमृत.

आबोहवा–*स्त्री.* [*फा.*] हवा-पाणी. [पाणी; चमक.

आभ–भा– *स्त्री.* १. शोभा २.

आभरण*–न–*पु.* १. दागिना; भूषण; अलंकार. २. पालनपोषण.

आभा– *स्त्री.* कांति; तेज.

आभारी–*वि.* आभारी; कृतज्ञ.

आभासी–*वि.* वरकरणी; दिखाऊ

आभीर–*पु.* गोप; गवळी.

आभूषण-न* – *पु.* दागिना; भूषण; अलंकार.

आभ्यंतर–*वि.* आंतरिक; आंतील. –**कोष**–*पु.* मंत्री, सेनापति वगैरे मंडळींनीं केलेलें बंड. –**व्यापार**–*पु.* आंतरिक व्यापार; 'इंटर्नल ट्रेड.'

आम–*पु.* आंबा (झाड व फळ). –**पापड़**– पु. आंबावडी. –**रस**–*पु.* आंबेपोळी. म्हु०–**के आम, गुठली के दाम**–– नफाच नफा. –**खानेसे काम या पेड़ गिननेसे ?** – नसत्या चौकश्या कशाला ?

आम–*पु.* १. आंव. २. अजीर्ण.

आम–*वि.* कच्चा; अपरिपक्व.

आम–*वि.* [*अ.*] साधारण; सर्वसमान्य; मामुली.–**जलसा**– *पु.* सार्वजनिक सभा. –**तौरपर**–*अव्य.* सामान्यतः. –**लोग**–*पु.* जनता. –**फ़हम**– *वि.* सर्वसामान्य लोकांना कळणारा; सोपा.

आमड़ा–*पु.* आंब्यासारखें लहान व आंबट फळ किंवा त्याचें झाड; आंबाडी.

आमद–*स्त्री.* [*फा.*] १. आग-मन; येणें. २ उत्पन्न; मिळकत. –**रफ्त**–*पु.स्त्री.* १. ये-जा; रहदारी. २. उत्पन्न; मिळकत.

आमदनी–*स्त्री.* [*फा.*] उत्पन्न; प्राप्ति; मिळकत.

आमन–*पु.* १. मार्गशीर्षांत पेरलें जाणारें भात (बंगाल). २. एक-पिकी जमीन.

आमनस्य–*पु.* दुःख; पीडा.

आमनासामना–*पु.* समोरासमोर भेट; दृष्टादृष्ट. [समोर.

आमने सामने–*अव्य.* समोरा-

आमय–*पु.* १. रोग; आजार २. अजीर्ण.

आमरखना*–*क्रि. अ.* क्रुद्ध होणें.

आमलक; आमला–*पु.* आंवळा.

आमातिसार–*पु.* आंव; मुरडा (आजार). [तत्परता.

आमादगी–*स्त्री.* [*फा.*] तयारी;

आमादा–*वि.* [*फा.*] तयार; तत्पर; सिद्ध; उद्युक्त.

आमाल–*पु.* [*अ.* '*अमल*'*चें अनेक०*] १. कृत्यें; वर्तणूक; करणी. २. जप–तप. –**नामा**– *पु.* १. शेरे-बुक; 'सर्व्हिस बुक'. ३. कैद्याच्या वर्तणुकीचें पत्रक.

आमाशय–*पु.* जठर.

आमास–*पु.* सूज.

आमाहल्दी– *स्त्री.* आंबोहळद.

आमिख*–*पु.* पा. 'आमिष'.

आमिन– *स्त्री.* लहान आंब्याची एक जात (अवध प्रांतांतील).

आमिल–*पु.* [*अ.*] १. काम करणारा. २. कर्तव्यपरायण. ३. अंमलदार; अधिकारी. ४. जादू-टोणा करणारा.

आमिष–*पु.* १. मांस २. शिकार. ३. भोग्य वस्तु. ४. लांच. –**भोजी**– *वि.* मांसाहारी.

आमी–*स्त्री.* लहान आंबा; कैरी.

आमीन–*अव्य.*[*अ.*] तथास्तु; ईश्वर करो; आमेन.

आमुख–*पु.* प्रस्तावना; उपोद्घात. [पूर्ण.

आमूदा–*पु.* [*फा.*] भरलेलें;

आमूल सुधारवाद–*पु.* जहाल सुधारणावाद; 'रॅडिकॅलिझम्'.

आमेज़–*वि.* [*फा.*] मिसळलेला; मिश्रित. [भेसळ.

आमेज़िश–*स्त्री.* [*फा*] मिश्रण;

आमोखास–[*अ.* + *फा.*] खास दिवाणखाना; राजा किंवा बादशहाची बसण्याची जागा.

आमोख्ता–*वि.* [*फा.*] शिकलेला; वाचलेला. –*पु.* शिकलेला, वाच-लेला धडा; उजळणी.

आमोद–*पु.* १. सुगंध. २. आनंद; प्रसन्नता. –**प्रमोद**– **पु.** मौज; चैन; मजा. –**यात्रा**– *स्त्री.* सहल; 'ट्रिप'.

आमोनिया–*पु.* [इं] नवसागर.

आम्नाय–*पु.* १. परंपरा; रीति. २. संवय; अभ्यास. [कंटक पर्वत.

आम्र–*पु.* आंबा.–**कूट**–*पु.* असर-

आम्ल–*पु.* आम्ल; 'अॅसिड'.

आयँती –पायँती – *स्त्री.* उसें–पायथें.

आयंदा–पा० '**आइंदा**'.

आय– *स्त्री.* प्राप्ति; उत्पन्न; मिळकत. – **कर** – पु. प्राप्तिकर; 'इनकम टॅक्स'.–**की मद्द** – *स्त्री.* उत्पन्नाची बाब '. – **व्यय** – पु. जमाखर्च. –– ०का **चिट्ठा** – पु. अंदाजपत्रक; 'बजेट'.–०**निरीक्षक** पु.– हिशेबतपासनीस; 'ऑडि-टर'.– **व्ययक** – पु. अंदाजपत्रक; अर्थसंकल्प; 'बजेट'. –**व्ययफलक** –पु. ताळेबंद; 'बॅलन्सशीट'.

आयत–*वि.* विस्तृत; लांबरुंद. –*पु.* समकोन; समचतुष्कोण; 'रेक्टँगल'. –**रूप**–*वि.* लांबट.

आयत–*स्त्री.* [*अ.*] चिह्न. खूण. २. कुराणांतील वाक्य.

आयतन–*पु.* १. स्थान; घर; मंदिर. २. आश्रय. ३. रोगाचें कारण. ४. समाव-शक्ति; व्याप-शक्ति; 'कपॅसिटी'. ५. विस्तार; परिमाण; आकार; 'व्हॉल्यूम'.

आयताकार–*वि.* लांबट; समचतुष्कोणाकृति; 'रेक्टँग्युलर'.

आयत्त–*वि.* आधीन; वश झालेला.

आयद–*वि.* [*अ.*] १. परतणारें; उलटणारें. २. लागू होणारें. **मु०–होना** –लागू होणें; लावलें जाणें.

आयनीकरण–*पु.* [*इं.+स.*] 'आयोनायझेशन'.

आयमा–*स्त्री.* सारामाफ भूमि.

आयस–*पु.* १. लोखंड; लोखंडी वस्तु. २. हत्यार. –*वि.* लोखंडाचें; लोखंडी रंगाचें. [खत; कवच.

आयसी–*स्त्री.* लोखंडी चिल-

आयसु* आदेश; आज्ञा; हुकूम.

आया–*अ.* [*फा.*] काय; किंवा नाहीं; अथवा. [नर्स.

आया–*स्त्री.* [*पोर्तु.*] दाई;

आयात–*वि.* आलेलें –*पु०* आयात; बाहेरून माल येणें किंवा मागविणें. ['इंपोर्टर'.

आयातक–*पु.* आयात करणारा;

आयाम–*पु.* १. लांबी; विस्तार. २. नियमन (प्राणायाम). ३. प्रशस्तपणा. ४. माप.

आयास–*पु.* परिश्रम; मेहनत.

आयु–*स्त्री.* १. वय. २. आयुष्य. **म०–खुटाना***–आयुष्य कमी होणें. **–सिराना***– आयुष्य संपणें.

आयुक्त–*वि.* नियुक्त. –*पु.* १. मंत्री; प्रतिनिधि. २. 'कमिशनर'. **–अधिकारी**–*पु.* 'कमिशंड ऑफिसर'.

आयुध–*पु.* शस्त्र; हत्यार.

आयुर्दा–*स्त्री.* दीर्घायु.

आयुष्मान्–*वि.* दीर्घायुषी; चिरंजीव.

आयोग–*पु.* १. नियुक्ति २. काम ३. मंडळ; 'कमिशन'.

आयोजक–*वि.* व्यवस्थापक.

आयोजन–*पु.* १. योजना. २. व्यवस्था. ३. तयारी.

आयोजना–*स्त्री.* १. योजना. २. व्यवस्था. ३. तयारी.

आयोजित–*वि.* योजिलेलें; आंखलेलें; भरविलेलें (प्रदर्शन).

आयोधन–*पु.* १. युद्ध. २. रणभूमि ३. वध.

आर–*पु.* १. निकृष्ट प्रतीचें व स्वच्छ न केलेलें लोखंड. २. कांठ; किनारा. ३. खाना; घर. ४. पितळ. ५. चाकाचे आरे.

आर–*स्त्री.* १. अणकुचीदार बारीक खिळा; चूक. २. कोंबडयाच्या पंजांतील कांटा. ३. डंख. दंश. [पाडण्याचें हत्यार; आरी.

आर–*स्त्री.* कातडयास भोंक

आर–*स्त्री.* [*अ.*] १. तिरस्कार; घृणा. २. वैर ३. लाज.

आरकाटी–*पु.* मुदतबंदीच्या मजुरांची भर्ती करणारा. (हे मजूर मुख्यतः मद्रासच्या अर्काट जिल्ह्यांतून भर्ती केले जात असत.)

आरक्षक–*पु.* १. पहारेकरी. २. 'पोलिस.'– **बल**–*पु.* पोलिसदल; 'पोलिस फोर्स'.

आरक्षित कोष–*पु.* राखीव निधि; 'रिझर्व्हड फंड'.

आरक्षित विषय–*पु.* राखीव विषय; 'रिझर्व्हड सब्जेक्टस'.

आरक्षी–*पु.* पोलिस. – **त्वरित-दल**–*पु.* 'फ्लाइंगस्क्वॅड ऑफ दि पुलीस'.

आरज* –*वि.* श्रेष्ठ; उत्तम; पूज्य. –*स्त्री.* अर्ज. –*पु.* सासरा.

आरज़ा–*पु.* [*अ.*]. रोग.

आरज़ी–*वि.* [*अ.*] तात्पुरता; हंगामी; अस्थायी.

आरज़ू–*स्त्री.* [*फा.*] १. इच्छा; अभिलाषा; आकांक्षा. २. विनंती. **–मंद**–*वि.* इच्छुक; अभिलाषा बाळगणारा. **मु०–बर आना**–इच्छा पुरी होणें. **–मिटाना**–इच्छा पूर्ण करणें. [दुःख.

आरत–*वि.* आर्त; दुःखी.–*पु.*

आरण्यक–*वि.* वन्य; वनांतील. –*पु.* वनवासी. [लाषा; लोभ.

आरति*–*स्त्री.* लालसा; अभि-

आरतिवंत*–*पु.* दुःखी मानवांवर दया दाखविणारा; कनवाळू.

आरती–*स्त्री.* आरती; नीरांजन. **मु० –उतारना**–ओवाळणें.

आरन*–*पु.* अरण्य; जंगल; वन.

आरनालक–*पु.* गव्हाचें सत्त्व; कांजी.

आरपार–*पु.* नदीचे दोन्ही तीर. –*अव्य.* आरपार. [पुरुष.

आरभट–*पु.* १. साहस. २. धाडसी

आरस*–*पु.* आळस. [गांठ.

आरसा+–*पु.* नाडा; दोराची

आरसी–*स्त्री.* १. आरसा. २. खडयाची आंगठी.

आरा–*पु.* मोठी करवत. **–कश–स**–*पु.* करवत्या; करवतीनें लाकूड कापणारा.

आराइश–*स्त्री.* [फा]सजावट.

आराज–*वि.* राजहीन; अराजक.

आराज़ी–*स्त्री.* [*अ.*] १. भूमि; जमीन. २. शेत.

आराति–*पु.* शत्रु.

आराधन–*पु.* पूजा; उपासना.

आराध्य–*वि.* पूजनीय; उपास्य. –*पु.* उपास्य देवता.

आराम–*पु.* [*फा.*] १. सुख; चैन. २. विश्रांति; आराम. ३. आरोग्य; स्वास्थ्य. –**कुर्सी**–*स्त्री.* आराम खुर्ची. –**गाह**–*स्त्री.* १. विश्रांतिस्थान. २. शयनागार. –**तलब**–*वि.* १. विलासी; चैनी. २. आळशी; खुशालचेंडू. –**देह**–*वि.* सुखदायक; सुखकर. –**से**–सावकाश. **मु०** –**से गुज़रना** –सुखांत दिवस जाणें.

आराम–*पु.* १. सुख; प्रसन्नता. २. बाग; उद्यान.

आरामिक–*पु.* बागेचा माळी.

आरास्ता–*वि.* [*फा.*] सजवलेला.

आरि–*स्त्री.* १. हेका; हट्ट. २. मर्यादा.

आरिज़–*पु.* [*अ.*] गाल.

आरिज़ा–*पु.* [*अ.*] १. रोग; आजार. २. व्यसन.

आरिज़ी–*वि.* [*अ.*] हंगामी-तात्पुरतें; क्षणिक; अस्थायी.

आरिफ़–*पु.* [*अ.*] साधु; भक्त.

आरियत–*स्त्री.* [*अ.*] १. हंगामी-पणा; अस्थायित्व. २. उसनवारी.

आरियतन्–*अव्य.* [*अ.*] उधार; उसनवार; मागून (आणलेलें).

आरिया–*स्त्री.* (पावसाळ्यांत होणारी) काकडी.

आरी–*स्त्री.* १. लहान करवत. २. बैलांना ढोसकण्याची अणकुची-दार कांठी; अरी. ३. चांभाराची आरी.

आरी–*वि.* [*अ.*] १. नग्न. २. वंचित ३. त्रस्त; कंटाळलेला. **मु०**–**आना**–कंटाळून जाणें; त्रासणें.

आरेसु–*पु.* द्वेष; ईर्षा; मत्सर.

आरोगना*–*क्रि. स.* खाणें; भक्षण करणें; जेवणें.

आरोग्य–*पु.* रोगाचा अभाव; स्वास्थ्य.–**शाला**–*स्त्री.* उपचार-गृह; इस्पितळ. आरोग्यधाम; 'सॅनिटोरिअम'.–**स्नान**–*पु.* आजारां-तून बरें झाल्यानंतर करावयाचें स्नान.–**लाभ**–*पु.* आजारांतून उठणें 'कॉनव्हेलेसन्स'. [थांबविणें.

आरोधना*–*स. क्रि.* अडविणें;

आरोप–*पु.* १.स्थापणें; लावणें; ठेवणें (उदा. दोषारोप). २. वृक्षारोपण. (झाड एका ठिकाणाहून काढून दुसरीकडे लावणें). –**पत्र**; –**फलक**– *पु.* आरोपपत्रक; 'चार्ज-शीट'.

आरोहण–*पु.* १. वर चढणें. २. राज्यारोहण; अधिकार–प्राप्ति.

आर्जव–*पु.* सरळपणा; साल-सत्ता; सचोटी.

ऑर्डिनेंस–*पु.* [*इं.*] वटहुकूम.

आर्द्रतामापी–*पु.* आर्द्रतामापक; 'हायग्रोमीटर'. ['हायग्रोमेट्री'.

आर्द्रतामिति–*स्त्री.* आर्द्रतामान;

आर्य–*पु.* एक जातिविशेष. *वि.* श्रेष्ठ; उत्तम कुळांतला. –**पुत्र**–*पु.*– आदरसूचक शब्द; पतीसाठीं संबोधन.

आर्ष–*वि.* वैदिक; ऋषिकृत. –**प्रयोग**–*पु.* ऋषींनीं किंवा मोठ्या विद्वानांनीं केलेला व्याकरणविरुद्ध शब्दप्रयोग. –**विवाह**–*पु.* स्मृतींनीं मान्य केलेल्या आठ प्रकारच्या विवाहांपैकीं एक. या प्रकारांत वधू-पिता वराकडून दोन बैल घेऊन कन्या देत असे.

आर्सेनिक–*पु.* [*इं.*] जहर; विष.

आलंग–*पु.* घोड्यांची मस्ती. **मु०**–**पर आना, होना**–मस्तींत येणें; कामवेग वाढणें.

आलंबन–*पु.* १. अवलंब; आश्रय. २. साधन.

आलंभ; आलंभन–*पु.* वध; हिंसा.

आल–*पु.* १. हरताळ (औषधि) २. विषाचा स्राव. ३. कटकट. ४. आर्द्रता. ५. अश्रु.

आल–*स्त्री.* [*अ.*] १. संतति; वंशज. २. मुलीची संतति.–**औलाद**–*स्त्री.* मुलें–बाळें; नातवंडें.

आलकस*–*पु.* आळस.

आलजाल*–*पु.* १. वेडीवाकडी, निरर्थक गोष्ट. २. तंटाबखेडा. ३. जंजाळ; कटकट.

आलथी – पालथी – *स्त्री.* पद्मासन. **मु०**– **मारना**; –**लगाना**– १. मांडीवर पाय चढवून बसणें. २. ऐसपैस बसणें.

आलन–*पु.* १. गिलाव्याच्या चिखलांत घालावयाचें गवत वगैरे. २. भाजीला लावावयाचें पीठ.

आलपीन–*स्त्री.* [*पोर्तु.*] टांचणी.

आलबाल–*पु.* झाडाच्या बुंध्याशीं करण्यांत येणारें आळें; वाफा.

आलम–*पु.* [*अ.*] १. जग; दुनिया. २. जनसमूह. ३. अवस्था; स्थिति. –**गीर**–*वि.* जगद्विजयी; विश्वव्यापी.

आलमनक–*पु.* [*पोर्तु.*] पंचांग.

आलमारी–*स्त्री.* [*पोर्तु.*] कपाट.

आलय–*पु.* १. घर; स्थान. २. आधार.

आलवाल–*पु.* आळें; वाफा.

आलस–*पु.* आळस; सुस्ती.

आलसी–*वि.* आळशी; सुस्त.

आला–*पु.* कोनाडा.

आला–*वि.* [*अ.*] श्रेष्ठ; उत्तम.

आला–*पु.* [*अ.*] हत्यार.

आलाइश–*स्त्री.* [*फा.*] घाण; शरीरांतील मळ.

आलात–*पु.* [*अ.* 'आला'चें अनेक०] १. उपकरणें. २. शस्त्रें.

–खाना–पु. जहाजांतील नाडे ठेवण्याची खोली. –(ते) काश्तकारी–शेतीचीं अवजारें. – (ते) जंग–पु. युद्धसामग्री; आयुधें.

आलात–पु. १. ठिणगी; निखारा. २. मशाल; जळती बोथाटी. –चक्र–पु. जळतें लाकूड फिरविल्यामुळें बनणारें अग्निचक्र.

आलान–पु. हत्ती बांधण्याचा दोर; साखळदंड किंवा खुंट.

आलाप–पु. १. संभाषण. २. तान (संगीत).–चारी–स्त्री. स्वर–साधना.

आलापक– वि. १. संभाषण करणारा. २ गवई; गाणारा.

आलापना–क्रि. स. गाणें; आलाप घेणें. ['अलाय बलाय.'

आलाय– बलाय–पु. पा०

आलारासी–वि. निष्काळजी; बेपर्वा; अंदाधुंद. –कारखाना–पु. अंदाधुंदी; सांवळागोंधळ.

आलिंजर–पु. मोठी घागर; डेरा.

आलि– १. निरर्थक. २. रिकामटेकडा; सुस्त. ३. प्रामाणिक. पु.–१. विंचू. २. भ्रमर; मुंगा.–स्त्री. पा० 'आली'.

आलिम–वि. [अ.] विद्वान्; पंडित. –फ़ाजिल–वि. महापंडित.

आली–वि. [अ.] उच्च; श्रेष्ठ. –जनाब; –हज़रत–वि. अत्यंत श्रेष्ठ. (व्यक्ति); महाशय.–ज़र्फ़– वि. उदार; विशाल अंतःकरणाचा. –जाह–वि. उच्चपदस्थ. –दिमाग़–वि. अत्यंत बुद्धिमान्; उदारधी. फ़हम– वि. समजूदार. –शान–वि. भव्य; विशाल. [२. रेखा.

आली– स्त्री. १. सखी; मैत्रीण.

आलू– पु. बटाटा.

आलूचा– पु. [फ़ा.] पंजाबमधील एक फळ. हें फळ पिवळें व आंबटगोड असून तें वाळल्यावर त्याला आलूबुखारा म्हणतात.

आलूदा– वि. [फ़ा.] भरलेला; लडबडलेला; बरबटलेला.

आलूवालू–पु. आलूचासारखें एक फळ. [बुखार (फळ).

आलूबुखारा–पु. [फ़ा.] आलू–

आलूशफ्तालू– पु. [फ़ा.] घोड्याप्रमाणें पाठीवर बसण्याचा एक खेळ.

आलेख– पु. १. लिपि; लेख; शिलालेख. २. श्रुतिलेख; शुद्धलेखन; 'डिक्टेशन'.

आलेख्य– पु. चित्र; तसबीर. –वि. लिहिण्यास योग्य. –विद्या–स्त्री. चित्रकला.

आलोक– पु. प्रकाश; उजेड.–चित्रण–पु. छायाचित्रण; 'फोटोग्राफी'. –पथ– पु. दृष्टिपथ.

आलोचक– वि. १. पाहाणारा. २. टीकाकार. [विचार; विवेचन.

आलोचन– पु. गुणदोषांचा

आलोचना–स्त्री. टीका; समालोचना.

आलोड़न– पु. १. मंथन; हलविण्याची क्रिया. २. विचार.

आलोड़ना*– क्रि. स. १. मंथन करणें; खूप हलविणें. २. अतिशय विचार करणें.

आल्हा– पु. १. पृथ्वीराज चव्हाणाच्या काळीं महोबा येथें प्रसिद्धीस आलेला वीर. २. त्याचें गुणवर्णन करणारें गीत; पोवाडा. मु०– का पँवारा–लांबण; रटाळ वर्णन. [टमेंट'.

आवंटन– पु. वांटणी; 'अॅलॉ–

आवंट्य– वि. ज्याला वांटणींतील भाग मिळाला आहे असा; 'अॅलॉटी'.

आवन– पु.; आवनि*– स्त्री. आगमन; येणें.

आवनहार*–वि. येणारा; येण्यास उद्युक्त झालेला.

आवभगत– स्त्री. आदरसत्कार.

आवरा+– पु. आवरण; खोळ. – वि.* व्याकुळ; दीन.

आवर्त–पु. १. पाण्यांतील भोंवरा; चक्र. २. आवर्तक. –दशमलव–पु. आवर्त दशांश.

आवर्तक; आवर्ती– वि. वारंवार होणारें किंवा मिळणारें (अनुदान, खर्च वगैरे); 'रिकरिंग'.

आवर्तबिंदु– पु. परिवर्तन बिंदु; विवर्तन स्थान; 'टर्निंग पॉइंट'.

आवर्दा–वि. [फ़ा.] १. आणलेलें. २. कृपापात्र. ३. दलाल; एजंट.

आवलि–ली– स्त्री. १. पंक्ति; रांग; हार. २. परंपरा. [जरुरीचें.

आवश्यकीय– वि. आवश्यक;

आवाँ– पु. कुंभाराचा आवा; भट्टी. मु०– बिगड़ना– आव्यांतील भांडीं नीट भाजलीं न जाणें.–(वें) का आवाँ बिगड़ना– सारें कुटुंब, समाज बिघडणें.

आवागमन– पु. १. ये–जा; येरझारा. २. पुनर्जन्म. ३. रहदारी. मु०–छूटना–मोक्ष, मुक्ति मिळणें

आवागवन; आवागौन*– पा० 'आवागमन'.

आवाज़–स्त्री. [फ़ा.] १. ध्वनि; आवाज. २. वाणी. मु०–उठाना – विरोध करणें.– देना –१. हांक मारणें. २. ओ देणें. –खुलना–घसा बसल्यानंतर आलेला स्वरदोष नाहींसा होणें; आवाज लागणें. –पड़ना; –बैठना – आवाज बसणें. –पर लगना–आवाज ओळखून त्याप्रमाणें जाणें किंवा काम करणें. – भर्राना, भारी होना – घोगरा स्वर निघणें. – मारना – मोठ्यानें

हांक मारणें. –में आवाज़ मिलाना– सहमत होणें. होस हो देणें. –लगाना–हांक मारणें.

आवाज़ा– *पु.* [*फा.*] १. ख्याति; प्रसिद्धि. २. उपरोधिक भाषण; टोंचून बोलणें; टोमणा. मु० –कसना – टोमणा मारणें.

आवाजाही– *स्त्री.* ये–जा; आवागमन.

आवाय– *पु.* १. थाळ. २. कंकण.

आवारगी– *स्त्री.* [*फा.*] उनाडकी; उडाणटप्पूपणा.

आवारजा– *पु.* [*फा.*] जमाखर्चाची वही.

आवारा, आवारागर्द– *वि.* [*फा.*] उनाड; भटक्या; उडाणटप्पू. – **गर्दी–** *स्त्री.* १. उडाणटप्पूपणा; निष्कारण भटकणें. २. मवालीपणा.

आवास– *पु.* निवास.

आवासिक; आवासी– *वि.* त्याच जागीं राहाणारा; 'रेसिडेंट'.

आवासिक विद्यालय– *पु.* वसतिगृहयुक्त विद्यालय; 'बोर्डिंग स्कूल'.

आवासी– *पु.* विदेशवासी. –**प्रतिनिधि–** *पु.* राजप्रतिनिधि; एखाद्या अर्धस्वतंत्र देशांत राहाणारा दुसऱ्या स्वतंत्रदेशाचा प्रतिनिधि; 'रेसिडेंट'.

आवाहन– बोलावणें; निमंत्रण.

आविर्भाव– *पु.* १. प्रकट होणें; उत्पत्ति २. आवेश.

आविर्भावन– शोध; 'इन्व्हेन्शन'.

आविष्कर्ता– *वि.* शोध लावणारा.

आविष्कार– *पु.* १. प्रयोग. २. शोध. ३. प्रकटीकरण; प्रकट होणें.

आविस-पत्र– *पु.* जाहिरनामा; 'मॅनिफेस्टो'. [लेला; गुंडाळलेला.

आवृत– *वि.* झांकलेला; लपेट-

आवृत्ति– *स्त्री.* एखादी गोष्ट पुनः पुनः करणें; पुनरावृत्ति. २. पुस्तक वगैरे पुनः छापलें जाणें; आवृत्ति. ['इंपल्स'.

आवेग– *पु.* आवेग; जोर;

आवेज़ाँ– *वि.* [*फा.*] लटकणारा; लोंबकळणारा.

आवेज़ा– *पु.* लोलक; कानांतील डूल वगैरे.

आवेदन– *पु.* विनंती; अर्ज; निवेदन.–**पत्र–** *पु.* अर्ज; विनंती-पत्र.

आवेल-तेल– *पु.* खोबरेल.

आवेश– *पु.* आवेश; 'चार्ज'.

आवेषण– *पु.* विद्युतीकरण; 'इलेक्ट्रिफिकेशन'.

आशंका– *स्त्री.* १. शंका; संशय. २. भय; भीति. ३. अनिष्ट गोष्टीची धागधुग. [खीचा; परिचित.

आशना– *वि.* [*फा.*] ओळ-

आशनाई– *स्त्री.* [*फा.*] १. परिचय; ओळख. २. प्रेम. ३. गुप्त संबंध; अयोग्य संबंध.

आशकार– पा० 'आश्कार'.

आश(स)र*– *पु.* १. राक्षस. २. अग्नि, ३. सूर्य.

आशा– *स्त्री.* आशा; उमेद. –**जनक–** *वि.* आशा उत्पन्न करणारें. मु०–**टूटना–** आशाभंग होणें.–**तोड़ना** –निराशा करणें. – **देना** – आशा लावणें; धीर देणें. –**बँधना–** आशा वाटणें. [अधिक.

आशातीत – *वि.* आशेपेक्षां

आशान्वित– *वि.* आशा वाटणारा; आशापूर्ण; आशादायक.

आशिक़– *पु.* [*अ.*] प्रियकर; प्रेमी.–**मिज़ाज–** प्रत्येक सुंदर वस्तूवर भाळणारा

आशिक़ाना– *वि.* [*अ.+फा.*] प्रेमिकासारखा; प्रेमपूर्ण.

आशिक़ी– *स्त्री.* [*अ.*] प्रेमीपणा; प्रेम; आसक्ति.

आशियाँ; आशियाना –*पु.* –[*फा.*] घरटें.

आशिष– *स्त्री.* आशीर्वाद.

आशुकवि– शीघ्रकवि.

आशुग– *वि.* वेगवान्; शीघ्रगामी.–*पु.* १. वारा. २. सूर्य. ३. बाण. ['एक्सप्रेस लेटर'.

आशुपत्र– *पु.* तांतडीचें पत्र;

आशुफ्ता– *वि.* [*फा.*] दुर्दशाग्रस्त; घाबरलेला. ['स्टेनोग्राफर'.

आशुलिपिक– *पु.* लघुलेखक;

आशोब– [*फा.*] *पु.* १. बंड; धामधूम; दंगा. २. डोळे लाल होणें; डोळें दुखणें.

आश्कार– *वि.* [*फा.*] प्रत्यक्ष; स्पष्ट; जाहीर.

आश्वस्त– *वि.* निश्चित; ज्याला आश्वासन देण्यांत आलेलें आहे असा. [संबंध. ३. प्रेम.

आसंग– *पु.* १. बरोबर; सह २.

आसंजक– *वि.* चिकटणारा.

आसंदी– *स्त्री.* १. चौकी (बसण्याची); लहान पाट; चौरंग. २. आरामखुर्ची.

आस– *स्त्री.* १. आशा, उमेद. २. इच्छा; कामना. ३. आधार; भरंवसा. मु०–**तकना–** १. वाट पाहाणें. २. मदतीची अपेक्षा बाळगणें; –**पूज(र)ना–** आशा पूर्ण होणें.–**होना–** १. आशा असणें. २. आधार असणें. ३. गरोदर असणें. [इतर वाक्प्रचारांसाठीं 'आशा' पाहा].

आसकत+– *स्त्री.* आळस; सुस्ती.

आसकती*– *वि.* आळशी.

आसक्ति– *स्त्री.* चिकटून असणें; आसक्ति. [२. मुक्ति. ३. सत्य.

आसति*– *स्त्री.* १. निकटता.

आसते*– *अव्य.* हळू; आस्ते.

आसन– *पु.* १. बसणें; बसण्याची पद्धति; बैठक. २. ज्यावर

बसावयाचें तें.–**पाटी**– *स्त्री.* अंथरूण-पांघरूण. **मु०–उखड़ना**– १. पदच्युत होणें. २. घोडयावर मांड न टिकणें.– **उठना** – स्थान सुटणें. –**कसना**–अंगाचा मुटकुळा करून बसणें.–**जमना**–प्रस्थ वसणें; स्थिर राहाणें.–**जमाना**–१. स्थिर वसणें. २. आपलें स्थान पक्कें करणें. –**डिगना**; –**डोलना**–१. चित्त विचलित होणें. २. स्थान डळमळीत होणें.–**तले आना**–ताव्यांत येणें; वश होणें.–**देना**–आदरपूर्वक बसविणें.–**बाँधना**–घोडयावर मांड दावून बसणें.–**मारना**; –**लगाना**–मांडा ठोकणें; पाय रोवून बसणें.–**लेकर पड़ना**–फुरंगटून निजणें.

आसनी– *स्त्री.* लहान आसन; पाट.

आसन्न–*वि.* १. जवळ आलेलें. २. मरणोन्मुख.–**काल**–*वि.* मरणोन्मुख.–**कोण**–*पु.* सन्निकट कोण; 'ॲडजेसन्ट अँगल'.–**प्रसवा**–*वि. स्त्री.* लौकरच बाळंत होणारी.–**भूत**–*पु.* भूतकाळाचा एक प्रकार (व्या.)–**मरण**–*वि.* ज्याचें मरण जवळ आलेलें आहे असा.

आसपास–*अव्य.* भोंवतीं; जवळपास, आजूबाजूला.

आसमाँ; आसमान–*पु.* [*फा.*] १. आकाश. २. स्वर्ग. **मु० –के तारे तोड़ना**–आकाशाला गवसणी घालणें; अशक्य गोष्ट शक्य करून दाखवणें.–**छूना**–गगनचुंबी असणें.–**ज़मीन के कुलाबे मिलाना**–१. थापा, बढाई मारणें. २. भगीरथ प्रयत्न करणें.–**झाँकना**; –**ताकना**.–घमेंड बाळगणें. –**टूटना**–आकाश कोसळणें; दैवी कोप होणें.–**दिखाना**–(कुस्तींत) चीत करणें.–**पर उड़ना या चढ़ना**–१. दिमाख किंवा डौल मिरवणें; घमेंड करणें. २. हवेंत किल्ले बांधणें. –**पर चढ़ाना** – हरभऱ्याच्या झाडावर चढविणें.–**पर थूकना**–सूर्यावर थुंकणें; मोठ्या माणसाची निंदा करण्याच्या प्रयत्नांत स्वतः निंदित होणें.–**फटना**–आकाश कोसळणें. –**में छेद होना**–सतत वृष्टि होणें–**में थिगली या थूनी लगाना**–अशक्य गोष्ट करणें. –**सिरपर उठाना**–घर डोक्यावर घेणें; गोंगाट करणें.–**से टपकना**–अचानक, न बोलावतां येणें.–**से बातें करना**– १. गगनचुंबी असणें. २. वायुवेगानें धांवणें.

आसमानी – *वि.* आकाशी रंगाचा. २. दैवी; ईश्वरी.

आसरा– *पु.* आसरा; आश्रय; आधार.

आसरैत– *पु.* १. आश्रित. २. आश्रयाची इच्छा करणारा.

आसव–*पु.* आसव; मद्यार्कयुक्त द्रव पदार्थ.

आसवन–*पु.* अर्क काढणें; दारूगाळणें; 'डिस्टिलेशन'.

आसवनी– *स्त्री.* अर्क काढण्याची भट्टी; दारूची भट्टी; 'डिस्टिलरी'.

आसा*– *स्त्री.* आशा; उमेद; संतोष.

आसा–*पु.* [*फा.*] भालदार किंवा चोपदाराच्या हातांतील दंड.

आसाइश – *स्त्री.* [फा.] आराम; सुख; आनंद.

आसाढ़–*पु.* आषाढ महिना.

आसान–*वि.* [फा.] सोपें; सरळ; साधें. [पणा; सुबोधता.

आसानी– *स्त्री.* सरलता; सोपे-

आसामी–*पु.* [*अ.*] १. असामी. २. धनिक व्यक्ति. ३. खंडकरी.

आसा(शा)मुखी–*वि.* आशाळभूत.

आसार–*पु.* [*अ.*] चिन्हें; लक्षणें. [पाऊस. २. शत्रूला वेढणें.

आसार –*पु.* १. मुसळधार

आसारे क़दीमा – *पु.* [*अ.*] प्राचीन भग्नावशेष; जुनी इमारत.

असिद्ध–*वि.* जप्त; 'ॲटॅच्ड'.

आसीन–*वि.* बसलेला.

आसीस*– *स्त्री.* आशीर्वाद.

आसीसा–*पु.* १. उशी. २. तक्क्या.

आसु*–सर्व. याचा-ची-चें.-*अव्य.* शीघ्र; तावडतोब. –**तोष** – *वि. पु.* शंकर; त्वरित प्रसन्न होणारा.

आसुत जल– *पु.* वाफेचें पाणी; 'डिस्टिल्ड वॉटर'.

आसुन–*पु.* आश्विन. [समाधान.

आसूदगी– *स्त्री.* [फा.] तृप्ति;

आसूदा–*वि.* [फा.] १. संतुष्ट; तृप्त; २. संपन्न; सुखी.

आसेध–*पु.* जप्ती; 'अटॅचमेंट'.

आसेधक–*पु.* जप्ती कारकून; 'बेलीफ'.

आसेब–*पु.* [*फा.*] १. भूतबाधा. २. आपत्ति; कष्ट. ३. नुकसान; हानि.

आसेर–*पु.* किल्ला.

आसोज–*पु.* आश्विन.

आसौँ–*अव्य.* या वर्षीं; यंदा.

आस्ताना–*पु.* १. उंबरठा; २. प्रवेशद्वार.

आस्ति– *स्त्री.* मालमत्ता; जिंदगी.

आस्तीन– *स्त्री.* [*फा.*] कपडयाची बाही; अस्तनी. **मु०–का साँप**–अस्तनींतील साप (निखारा). –**चढ़ाना**– १. भांडणास तयार होणें; अस्तन्या मागें सारणें. २. कामास तयार होणें. [यन्स'.

आस्थगन– *पु.* तहकुबी; 'अवे-

आस्थगित– *वि.* तहकूब.

आस्था– *स्त्री.* आपलेपणा; जिव्हाळा.

आस्फालन– पु. १. घासणें; हलविणें; धक्का देणें. २. घमेंड.

आस्मारक– पु. १. स्मारक. २. स्मरणपत्र; 'मेमोरियल'.

आह– *स्त्री*. निःश्वास; सुस्कारा; दुःखाचा उच्छ्वास. –अव्य. अरेरे; हाय हाय. **सु०–करना; –खींचना**– कण्हणें; उसासा टाकणें. **–पड़ना**– शाप लागणें; दुष्कृत्याचें फळ मिळणें. **–भरना**–उसासा टाकणें. **–लेना**–तळतळाट घेणें; सतावणें.

आहट–*स्त्री*. पावलांचा आवाज; चाहूल. **–पाना; –मिलना**–चाहूल लागणें. **–लेना**–चाहूल घेणें; कान टवकारणें.

आहत– *वि*. जखमी; घायाळ.

आहतोपचारी दल– पु. शुश्रूषा-पथक; 'ॲम्ब्युलन्स कोअर'.

आहन–पु. [*फा.*] लोखंड.–**गर**–पु. लोहार. **–रुबा**– लोहचुंबक.

आहनी–*वि*. लोखंडी; लोखंडापासून बनविलेलें.

आहर*– पु. वेळ; समय.

आहर– पु. १. आणणें; घेणें. २. श्वासोच्छ्वास करणें ३. लढाई; युद्ध.

आहरण–पु. अपहरण.

आहरन– पु. ऐरण.

आहरी– *स्त्री*. लहान तलाव.

आहाँ– *स्त्री*. १. धांवा; करुण हांक. २. हांक; पुकार.

आहा– *अव्य*. अहाहा! (आनंद व आश्चर्य व्यक्त करणारें उद्गार-वाचक अव्यय).

आहारविज्ञान– पु. आहार-शास्त्र; 'डायटेटिक्स'.

आहार्याभिनय–पु. कांहीं न बोलतां किंवा न करितां केवळ चेहे-ऱ्यावरून अथवा वेशभूषेच्या साह्यानें भाव व्यक्त करणें.

आहाव– पु. १. गुरांना पाणी पिण्यासाठीं विहरीजवळ बांधलेली टाकी; डबकें. २. युद्ध ३. आह्वान.

आहिंडन– पु. भटकंती; मवालीपणा; 'व्हॅग्रन्सी'.

आहि*– *क्रि. अ*. आहे.

अहिताग्नि– पु. अग्नीची स्थापना करून तो सतत प्रज्वलित ठेवणारा अग्निहोत्री.

आहिस्तगी– *स्त्री*. [*फा.*] १. धिम्मेपणा; जपून, सावधपणें काम करण्याचें धोरण. २. कोमलता.

आहिस्ता– *अव्य*. [*फा.*] हळू-हळू; सावकाश; आस्ते.

आहुक– पु. श्रीकृष्णाचे आजोबा (वसुदेवाचे वडील).

आहू– पु. [*फा.*] हरिण.

आहूत पूँजी– *स्त्री*. मागणी केलेलें भांडवल; 'कॉल्ड अप कॅपिटल'.

आहै*–*क्रि.अ*. आहे. ['आसना' क्रि. चें वर्त० तृ० पु० चें रूप].

आहोजारी– *स्त्री*. [*फा.*] रडारड; आक्रोश. [प्रशंसा.

आहोपुरुषिका– *स्त्री*. आत्म-

आह्निक–*वि*. दैनिक.–पु. नित्य-कर्म.

आह्लाद–पु. आनंद; हर्ष.

आह्वय–पु. नांव.

आह्वान–पु. निमंत्रण; आवाहन; बोलाविणें. **–पत्र**–पु. हजर राहाण्याचा हुकूम; 'समन्स'.

आह्वाय–पु. १. बोलावणें; 'समन्स'. २. नांव.

इ

इ– देवनागरी वर्णमालेंतील तिसरा स्वर–वर्ण. [इशारा.

इंग–पु. संकेत; खूण; चिह्न;

इंगन–पु. १. हालणें; चालणें. २. हलविणें. ३. इशारा, खूण करणें.

इंगनी– *स्त्री*. [इं.] मँगनीज (एक खनिज धातु).

इंगला– *स्त्री*. इडानाडी.

इंगित–पु. खूण; इशारा; संकेत.– वि. सांकेतिक; सूचित.

इंगुद–पु.; **इंगुदी**– *स्त्री*.; **इंगुल**–पु. हिंगणबेट; मालकांगणी.

इंगुर–पु. शेंदूर.

इंगुरौटी– *स्त्री*. कुंकवाची डबी.

इंग्लिस्तान–पु. [इं.+*फा.*] इंग्लंड. [आकर्षित होणें.

इँचना–*क्रि. अ*. ओढलें जाणें;

इंज(जि)न–पु. [इं.] एंजिन; यंत्र.

इंजील– *स्त्री*. [यू.] ख्रिस्ती लोकांचा धार्मिक ग्रंथ; बायबल.

इँटकोहरा–पु. विटचा तुकडा; रोडा. [वर्गाचा डबा.

इंटर–पु. [इं.] रेल्वेंतील मधल्या

इंटरव्यू–पु. [इं.] मुलाखत.

इँडहर–पु. उडदाच्या डाळीचा एक खाद्य पदार्थ; कळण्याचें शेंगोळें.

इंडुरी *स्त्री*.; **इंडुवा**–पु. चुंबळ.

इंत(ति)काम–पु. [*अ.*] सूड.

इंत(ति)काल–पु. [*अ.*] १. मृत्यु; मरण. २. स्थलांतर. **–जायदाद**–पु. गहाण, वारसा, वगैरेमुळें एकाची संपत्ति दुसऱ्याकडे जाणें.

इंतख़ाब–पु.[*अ.*] १. निवडणूक. २. निवड. ३. पसंती.

इंतज़ाम–*पु.* [*अ.*] बंदोवस्त; व्यवस्था.

इंतज़ार–*पु.* [*अ.*] प्रतीक्षा; वाट पाहाणें. [चिंता.

इंत(ति)शार–*पु.* [*अ.*] १. विखुरणें; विस्कटणें. २. उद्विग्नता;

इंत(ति)हा– *स्त्री.* [*अ.*] १. अंत; सीमा. २. हद्द; अतिरेक. **–पसंद**–*वि.* अतिरेकवादी; जहाल; 'एक्स्ट्रीमिस्ट'. [अतिशय.

इंत(ति)हाई–*वि.* [*अ.*] बेहद्द;

इंद–*अव्य.* [*अ.*] १. जवळ; निकट. २ वर.

इंदर*– *पु.* इंद्र.

इंद(दि)राज–*पु.* [*फ़ा.*] नोंद; नोंदणी; नोंदलें जाणें; वहींत किंवा खात्यांत लिहिलें जाणें.

इँदारा–*पु.* आड; विहीर.

इँदारुन–*पु.* एक वेल व तिचें फळ; हें फळ दिसावयास अत्यंत सुंदर परंतु भयंकर कडु व विषारी असतें; इंद्रायन.

इंदिया–*पु.* [*अ.*] मत; विचार.

इंदीवर–*पु.* नीलकमल.

इंदु–*पु.* १. चंद्र. २. कापूर. ३. एकाची संख्या. **–कर**–*पु.* चंद्राचे किरण.

इँदुआ–*पु.* चुंबळ.

इंदु(दू)र–*पु.* उंदीर.

इंद्र–*पु.* इंद्र. **मु०–का अखाड़ा**– इंद्रसभा; नाचमहाल.**– की परी**– *स्त्री.* अप्सरा; अत्यंत रूपवती स्त्री. **–जाल**–*पु.* जादूटोणा. **–नील**–*पु.* नीलकांत मणि.

इंद्री– *स्त्री.* इंद्रिय. २. जननेंद्रिय.

इंधन–*पु.* जळाऊ लाकूड; सरपण; जळण. [जागा.

इँधरौड़ा–*पु.* सरपण ठेवण्याची

इंशा–*स्त्री.* [*अ.*] १. लेखन. २. पत्रें वगैरे लिहिण्याचे नियम असलेलें पुस्तक. पा० 'इन्शा'.

इंसाफ़–*पु.* [*अ.*] १. न्याय. २. निर्णय; निकाल.

इ+–*सर्व.* हा.

इकंग–*वि.* एकांगी.

इकंत–*वि.* एकटा; निर्जन.

इक–*वि.* एक.

इकआंक–*अव्य.* अवश्य.

इकइस*–*वि.* एकवीस.

इकजोरा–*पु.* [*इं.*] ईश्वराती; 'इक्झोरा'.

इकट्ठा–*वि.* एकत्र; एकंदर.

इकडाही– *स्त्री.* एकसंधी कढई.

इकतन–*अव्य.* एकीकडे.

इकतरा–*पु.* एक दिवसाआड येणारा ताप.

इकतार–*वि.* समान; बरोबर; सारखा. *–अव्य.* सतत; लागोपाठ.

इकतारा–*पु.* एकतारी; तुणतुणें.

इकताला–*पु.* एकताल.

इकतीस–*वि.* एकतीस.

इक़दाम–*वि.* [*अ.*] पाऊल टाकणें; पुढें सरणें. **मु० –करना**– कार्य करणें. [आणा.

इकन्नी– *स्त्री.* आणेली; एक

इकपेचा–*पु.* एकप्रकारची पगडी (दिल्लीच्या बाजूस वापरली जाणारी). [एकदांच.

इकबारगी–*क्रि. वि.* एकदम;

इक़बाल–*पु.* [*अ.*] १. भाग्य; दैव. २. ऐश्वर्य. ३. स्वीकृति; मान्यता. ४. प्रताप; कीर्ति. **–मंद**– *वि.* १. भाग्यशाली. २. प्रतापी.

इक़बाली गवाह–*पु.* [*अ.*] माफीचा साक्षीदार; सरकारी साक्षीदार.

इकराम–*पु.* [*अ.*] १. इनाम; बक्षीस; पारितोषिक; २. आदर; सन्मान.

इक़रार–*पु.* [*अ.*] करार; वायदा. **–नामा**– *पु.* प्रतिज्ञापत्र; करारपत्र.

इकल(ला)ई– *स्त्री.* स्त्रियांचें पांघरण्याचें वस्त्र; ओढणी.

इकला–*वि.* एकटा. [महाद्वीप.

इकलीम– *स्त्री. पु.*[*अ.*] भूखंड;

इकलोई– *स्त्री.* अखंड लोखंडी पत्र्याची कढई.

इकलौता–*पु.* एकुलता एक.

इकल्ला–*वि.* १. एकेरी २. एकटा; एकटी.

इकवाई– *स्त्री.* एकाच बाजूला कोर असलेली ऐरण.

इकसठ–*वि.* एकसष्ट.

इकसर*–*वि.* एकटा; एकाकी.

इकसार*–*अव्य.* एकसारखें; समानपणें.

इकहरा–*वि.* १. एकेरी २. कृश (शरीरयष्टि); सडपातळ.

इकहाई–*अव्य.* बरोबर; एकदम; अचानक. [घटक; अवयव.

इकाई– *स्त्री.* १. एकम्. २.

करगी–*स्त्री.* १. साखर-कारखान्यांत साखर खरवडण्यासाठीं वापरलें जाणारें अवजार. २.+ पूर.

करघा–*पु.* [*फा.*] १. माग. २. मागाच्या खालची पाय ठेवण्याची जागा. [ण्याचें वाद्य).

करचंग–*पु.* डफ. (ताल धर-

करछा–*पु.* मोठी पळी; पळा; झारा.

करछाल–*स्त्री.* उडी; उसळी.

करछिया–*स्त्री.* पाण्याच्या कांठीं राहाणारा एक पक्षी.

करछी–*स्त्री.* पळी.

करछुला–*पु.* मोठा झारा.

करछुली–*स्त्री.* १. लहान झारा. २. उलथणें. ३. पळी.

करछैयाँ*–*वि. स्त्री.* फिकट काळया रंगाची गाय; सांवळी (गाय).

करज–*पु.* १. नख. २. बोट. –*पु.* [*अ.*] ऋण; कर्ज.

करजुवा*–*पु.* काळीज; कलेजा.

करट–टा; करटक–*पु.* १. कावळा. २. हत्तीचें गंडस्थळ.

करड़करड़–*पु.* कुडुमकुडुम खाण्याचा आवाज.

करड़ना–*क्रि. अ.* १. अधिक होणें. २. वृद्धिंगत होणें. [दायक.

करडा*–*वि.* कठोर; कष्ट-

करण–*पु.* १. करणें; क्रिया. २. अवजार; हत्यार. ३. तृतीया विभक्ति (व्या.) ४. कायस्थांची एक पोटजात. ५. दस्तऐवज.

करणिक–*पु.* कारकून.

करतब–*पु.* १. काम; कार्य; करणी. २. करामत; कौशल्य. ३. कर्तृत्व; कर्तबगारी. [निपुण.

करतबी–*वि.* १. कर्तबगार. २.

करतरी*– *स्त्री.* कात्री; सुरी.

करत(ता)ल–*पु.* १. तळहात. २. टाळी. [– *स्त्री.* **करतली**]

करता–*पु.* १. कर्ता. २. प्रमुख; कर्ता पुरुष. ३. वर्णवृत्त.–**खानदान**–*पु.* संयुक्त कुटुंबांतील कुटुंबप्रमुख. –**धरता**–*पु.* सर्वाधिकारी.

करतार–*पु.* ईश्वर; सृष्टिकर्ता.

करतारी–ली*– *स्त्री.* कर्तृत्व. २. ईश्वरी लीला ३. टाळी.

करताल–*पु.* १. टाळी. २. झांज. ३. चिपळी. [–*स्त्री.* **करताली**]

करती– *स्त्री.* ज्या गाईचें वासरूं मेलेलें आहे तिची धार काढतांना तिच्यासमोर ठेवण्यासाठीं मेलेल्या वासराच्या कातड्यांत भुसा भरून बनविलेलें बनावटी वासरूं.

करतूत–*स्त्री.* १. काम; करणी; कर्तृत्व; कर्म. २. कला; गुण.

करद– *स्त्री.* सुरी; चाकू.

करदा–*पु.* १. विक्रीच्या धान्यांत मिसळलेले खडे, माती वगैरे. २. विक्रीच्या वस्तूंतील कचऱ्यामुळें होणारी किंमतींतील घट. **मु०** –**काटना** –विक्रीच्या वस्तूंतील कचऱ्यामुळें तिची किंमत कमी देणें, किंवा माल अधिक देणें. [कृत.

करदा–*वि.* [*फा*] केलेला;

करधन; **करधनी**+– *स्त्री.* १. करगोटा; कंबरेंतील सांखळी. २. सुताची मेखला.

करधर–*पु.* मेघ; ढग.

करन+–*पु.* १. कर्ण; कान. २. दारूहळद.

करनधार*–*पु.* कर्णधार; सुकाणू धरणारा.

करनफूल–*पु.* कानांतील एक दागिना; कर्णफूल. [संस्कार.

करनबेध–*पु.* कान टोंचण्याचा

करना–*क्रि. स.* १. करणें; संपविणें; तडीस नेणें. २. तयार करणें. ३. पोहोंचविणें. ४. भाडें देऊन ठरविणें. **कर मिट या मर मिट**–करा किंवा मरा (डू और डाय). [कार्य. २. ईडलिंबू.

करना*–*पु.* १. करणी; कृत्य;

करनाई– *स्त्री.* [*अ.*] शिंग; तुतारी.

करनाटकी–*पु.* १. जादूगार. २. डोंबारी. –*वि.* कर्नाटकी.

करनाल–*पु.* [*अ.*] १. तुतारी २. मोठा ताशा. ३. तोफ.

कर-निर्धारण–*पु.* कर ठरविणें; 'अॅसेसमेंट'.

करनी– *स्त्री.* १. कार्य; करणी. २. अंत्यकर्म. ३. करणी (गवंड्याचें उपकरण).

करनैल–*पु.* [इं] कर्नल.

करपरी+– *स्त्री.* सांडगा.

करपा–*पु.* लोंबी आलेलें धान्याचें रोप; उभें पीक.

करपान+–*पु.* पुरळ.

करपाल–*पु.* कृपाण; खड्ग; तलवार.

करपीड़न-*पु.* पाणिग्रहण; विवाह.

करपुट–*पु.* ओंजळ.

करपृष्ठ–*पु.* हाताच्या तळव्याचा मागील भाग.

करबच–*पु.* बैलाच्या किंवा घोड्याच्या पाठीवर लादण्याची गोण. [करणें (पक्ष्यांचें).

करबरना*– *क्रि. अ.* कलरव

करबराना–*क्रि. अ.* कुरकुरणें; पुटपुटणें.

करबला– *पु.* [*अ.*] १. अरबस्तानांतील एक ठिकाण. येथें हजरत अलींचें कनिष्ठ पुत्र हजरत हुसैन मारले गेले होते. २. मोहरममध्यें मुसलमान आपले तावूत जेथें गाडतात ती जागा. ३. जेथें पाणी मिळत नाहीं अशी जागा.

करबस–*पु.* घोड्याच्या कातड्यापासून तयार केलेला हंटर.

करबी– *स्त्री.* कडबा.

करबूस– *पु.* घोड्याच्या जिनांत हत्यार खोंचून ठेवण्याची जागा.

करभ–*पु.* हत्तीचा किंवा सिंहाचा छावा.

करभा+–*पु.* गोंड, भिल्ल वगैरे वन्य जातींचें एक विशेष गाणें.

करभीर–*पु.* सिंह.

करभोरु–*वि. स्त्री.* हत्तीच्या सोंडेप्रमाणें सुंदर मांड्या असलेली.

करम–*पु.* [*अ.*] १. कृपा. २. औदार्य.

करम–*पु.* १. काम. २. कर्म; दैव. –**भोग**–*पु.* कर्मभोग; कर्मफल. **मु०–का धनी**–भाग्यवान्.–**फूटना**–नशीब फुटणें; दुर्दैव ओढवणें.

करमकल्ला–*पु.* कोबीचा कांदा; गड्डा; पानकोबी.

करमचंद*–*पु.* कर्म.

करमठ*–*वि.* कर्मठ.

करमठ्ठा*–*वि.* कंजूष; चिक्कू.

करमरिया*– *स्त्री.* शांति; सागराच्या लाटा शांत होणें.

करमरी–*पु.* जन्मठेपेची शिक्षा झालेला कैदी.

करमरेख– *स्त्री.* १. कपाळावरची रेषा. २. नशिबांत असलेली गोष्ट.

करमात*–*पु.* भाग्य; दैव.

करमी*–*वि.* १. कर्मठ. २. कार्यकर्ता; उद्योगी.

करमुँहा; **करमुखा**–*वि.* १. काळतोंड्या; पापी. २. कलंकित.

करमेस*–*पु.* हातमागाची वर बांधलेली काठी.

करमोद–*पु.* कमोद (तांदूळ).

करयोग्य मूल्य–*पु.* कराच्या दृष्टीनें आकारलेली किंमत; 'रेटेबल व्हॅल्यू' किंवा 'टॅक्सेबल व्हॅल्यू.'

करर*–*पु.* १. एक विषारी किडा २. घोड्याची एक जात ३. एक जंगली झाड (याच्या बियांचें तेल मेणकापड तयार करण्यासाठीं वापरतात).

करर(रा)ना–*वि.अ.* १. कर्कश आवाज काढणें. २. कडाडून पडणें.

कररी–*पु.* रानतुळस.

करला–*पु.*; **करली**– *स्त्री.* पालवी; कोंब.

करवट–*स्त्री.* १. कूस; कुशी. २. बाजू. –*पु.* करवत. **मु०– न लेना**– गप्प बसणें; कर्तव्य न करणें. **–बदलना; –लेना** १. कूस बदलणें; या कुशीवरून त्या कुशीवर वळणें. २. तळमळत पडणें. **–लेना–स्वर्ग–**प्राप्तीच्या आशेनें काशी, प्रयाग वगैरे तीर्थक्षेत्रीं करवतीखालीं मान देऊन प्राणत्याग करणें.

करवर*– *स्त्री.* विपत्ति; संकट.

करवरना–*क्रि.अ.* किलबिलणें; कलरव करणें.

करवल*– *स्त्री.* दोन आणे भार जस्त मिसळलेली चांदी; रुपें.

करवा–*पु.* तोटी असलेला तांब्या; झारी.

करवा चौथ–*स्त्री.* कार्तिक वद्य चतुर्थी (या दिवशीं स्त्रिया चंद्राची पूजा करून करवा दान देतात).

करवाना–*क्रि. स.* करविणें; करवून घेणें.

करवार– *स्त्री.* तलवार.

करवाल–*पु.* १. नख. २. तलवार.

करवाली– *स्त्री.* लहान तलवार.

करवीर–*पु.* १. कण्हेरीचें झाड. २. खड्ग; तलवार.

करवील*–*पु.* कांटेरी झुडूप.

करवैया*–*पु.* १. कर्ता; करणारा २. जादूचे खेळ करणारा.

करश्मा–*पु.* [*फा.*] १. चमत्कार; करामत. २. डोळ्यांनीं किंवा भुंवईनें केलेला इशारा. ३. नखरा.

करष–*पु.* १. ओढ; ताण. २. आकस; वैर. ३. आवेश; त्वेष.

करषक–*पु.* कृषक; शेतकरी.

करष(स)ना*–*क्रि. स.* १. ओढणें; ताणणें; आकर्षणें. २. शोषून घेणें. ३. बोलावणें; निमंत्रण देणें.

करसाइल; करसायर-ल– *पु.* काळवीट; काळें हरीण.

करसी–*स्त्री.* गोवरीचा चुरा किंवा तुकडे.

करहँज–*पु.* उत्तम पोसलेलें पण दाणे कमी भरलेलें धान्याचें कणीस किंवा पीक.

करह*–*पु.* १. फुलाची कळी. २. उंट.

करहनी–*पु.* तांदुळाची एक जात.

करहा–*पु.* पांढऱ्या शिरीषाचें झाड. [(तुम्ही) करा.

करहु*–*क्रि. स.* (तूं) कर;

करांकुल–*पु.* करकोचा; क्रौंच पक्षी.

करांगण–*पु.* १. बाजार. २. कर गोळा करण्याचें ठिकाण.

करांत–*पु.* करवत.

करांती–*पु.* करवत चालविणारा; आरेकस. [नाग; कृष्णसर्प.

कराइत–*पु.* काळा विषारी

कराई*–*क्रि. स.* करवितात; करविलें; केली.– *स्त्री.* १. श्यामता. २. घडवून, करवून घेण्याचा मुशाहिरा. ३. मूग, तूर वगैरेचें फोलकट, टरफल (हें जनावरांना घालतात).

कराड़–*पु.* सावकार; पंजाबांतील एक वैश्य जाति.

करात–*पु.* [*अ.*] एक वजन (साधारणतः अर्ध्या माशाएवढें).

कराना–*क्रि. स.* करविणें.

करापवंचन–*पु.* कर चुकविणें; 'इव्हेजन ऑफ टॅक्स'

क़राबत– *स्त्री.* [*अ.*] १. सामीप्य; सान्निध्य. २. नातें; संबंध.**–दार**–*पु.* संबंधी; नातेवाईक.

क़राबा–*पु.* [*अ.*] वनस्पतींचे अर्क वगैरे सांठवून ठेवण्याचें कांचेचें मोठें भांडें.

कराबीन– *स्त्री.* [*तु.*] पा० 'कडाबीन.'

करामत– *स्त्री.* [*अ.*] १. श्रेष्ठत्व; महत्व २. चमत्कार; सिद्धि.

करामात–*स्त्री.* [*अ.* 'करामत' चें अनेक०] चमत्कार.

करामाती–*वि.* [*अ.*] चमत्कार करून दाखविणारा; सिद्ध पुरुष.

करार–*पु.* नदीची उंच दरड, कांठ.

क़रार–*पु.* [*अ.*] १. स्थैर्य. २. वायदा; करार. ३. आराम; चैन. ४. संतोष; समाधान. **–दाद**–*पु.* १. ठराव. २. निश्चय ३. करार. **मु० –पाना**– १. करार होणें; ठरणें. २. मनाला स्वस्थता लाभणें.

कराना– *क्रि. अ.* कर्कश आवाज काढणें; काव काव करणें.

करारा– *पु.* दरड. –*वि.* १. खडबडीत. २. दृढचित्त. ३. कुरकुरीत. ४. कडक. ५. खोल. ६. बलवान. ७. खरा; चोख; सडेतोड. ८. अवघड.

करारापन– *पु.* १. खडबडीत-पणा. २. कडकपणा; उग्रता.

करारोपण–*पु.* कर बसविणें, वसूल करणें वगैरे; 'लेव्ही.'

कराल– *वि.* १. भयानक; भयंकर. २. मोठ्या दांतांचा.

कराला– *स्त्री.* भयंकर रूप असलेली, दुर्गा; काली.

कराव–वा– *पु.* पति जिवंत असतां हिंदू स्त्रीनें दुसरें लग्न करणें.

करावल–*पु.* [तु०] १. सैन्याच्या पुढें जाऊन बातमी काढणारा सैनिक किंवा पथक. २. शिकारी.

कराह–*पु.* कण्हण्याचा आवाज; कण्हणें. [तिटकारा.

कराहत– *स्त्री.* [अ.] घृणा;

कराहना– *क्रि. अ.* कण्हणें; विव्हळणें.

कराहा*– *पु.* मोठी कढई.

कराही*– *स्त्री.* लहान कढई.

करिंगा– *पु.* विदूषक.

करिंद*– *पु.* १. ऐरावत. २. सर्वांत उत्तम किंवा मोठा हत्ती.

करि*– १. हत्ती. २. रुचि. –*प्रत्य.* ला [कलंक.

करिखई*– *स्त्री.* काळेपणा;

करिखा+– *पु.* काजळ; काजळी.

करिणी–नी*– *स्त्री.* हत्तीण.

करित– *पु.* सांगून करविलेली वस्तु.

करिबू+– *पु.* सांबर.

करिया–१. सुकाणू. २. नावाडी. *वि.* काळा.

करियाई– *स्त्री.* काळेपणा.

करियारी*– *स्त्री.* लगाम.

करिल*– *स्त्री.* वेळूचा कोंब; पालवी.– *वि.* काळा.

करिश्मा– *पु.* [*फा.*] पा. 'करश्मा'

करिहाँ; करिहाँऊँ; करिहाँव; **करिहँयाँ***– *स्त्री.* कमर; कटि; कंबर.

करी– *पु.* हत्ती.

करी*– *स्त्री.* १. कळी. २. कडी. ३. कडेपाट.

क़रीन– *वि.* [*अ.*] १. जवळ असलेला. २. समान; तुल्य. –(ने) क़यास– *वि.* बुद्धीला पटणारें. –मसलहत– *वि.* उचित; योग्य.

करीना*– *पु.* किराणा माल.

क़रीना– *पु.* [*अ.*] १. तऱ्हा; पद्धति; ढंग. २. क्रम. ३. कामाची योग्यता; अक्कल; बुद्धि.

क़रीब–*अव्य.* [*अ.*] १. समीप; जवळ. २. जवळ-जवळ; सुमारें. –करीब–*अव्य.* जवळ-जवळ; बहुधा. –तरीन– *वि.* सर्वांत जवळचा; निकटतम.

क़रीबन्– *अव्य.* [*अ.*] जवळ-जवळ; सुमारें. [नातेवाईक.

क़रीबी–*वि.* [*अ.*] जवळचा;

क़रीबुलमर्ग– *वि.* [*अ.*] आसन्न-मरण; मरणोन्मुख.

करीम– *वि.* [*अ.*] कृपाळु; दयाळु.–*पु.* ईश्वर.

करीर– *पु.* १. बांबू; वेळूचा कोंब. २. घागर. ३. कारवी.

करील–*पु.* एक कांटेदार झुडूप; कारवी.

करीष– *पु.* रानशेणी.

करुआ–वा*– *वि.* कडू; कटु; कडवट; अप्रिय.

करुआई*–*स्त्री.* कडूपणा; कडवटपणा; कटुता.

करुआ(वा)ना– *क्रि. अ.* १. दुखणें; खुपणें. २. तोंड कडू होणें; चव नसणें.– *क्रि. स.* तोंड कडू करणें.

करुखिअनि; करुखी*– *स्त्री.* नेत्रकटाक्ष; तिरपी नजर.

करुना*– *स्त्री.* करुणा; दया.

करुल– *पु.* मोठ्या जातीचा एक पक्षी. [वल्हें.

करुवार– *पु.*; **करुवारि***– *स्त्री.*

करूर*– *वि.* क्रूर; निष्ठुर.

करेजवा; करेजा*– *पु.* काळीज; हृदय.

करेब–*पु.* [*इं.*] बारीक रेशमी कापड; 'क्रेप'. [पालेभाजी.

करेमू–*पु.* पाण्यांत होणारी एक

करेर–*वि.* कठोर; कडक; टणक.

करेल–ला–*पु.* व्यायाम कर-ण्याची लहान लांकडी जोडी; मुद्गल; करेला.

करे(रै)ला–*पु.* कारलें; किरोर.

करेवा+–*पु.* पुनर्विवाह; म्होतुर.

करैत–*पु.* काळा नाग.

करैल; करैली मिट्टी– *स्त्री.* काळी चिकण माती.

करैल–*पु.* १. डोम कावळा. २. बांबूचा कोंवळा कोंब.

करोट–*पु.*; **करोटी**– *स्त्री.* १. कवटी (डोक्याची). २. पेला.

करोटन–*पु.* [*इं.*] क्रोटन; रंगी-बेरंगी आणि आकर्षक पानांचीं विलायती झाडें.

करोड़–*वि.* कोटि (संख्या).

करोड़ खुख–*वि.* थापेबाज; घमेंडखोर. [नाकें.

करोड़गीरी–*स्त्री.* जकात खातें,

करोड़पति–*वि.* क्रोडोपति; कोट्याधीश.

करोड़ी–*पु.* १. तलाठी; कर गोळा करणारा. २. नगदी कारकून; 'कॅशियर'.

करोत–*पु.* करवत.

करोदना; करोना–*क्रि. स.* खरवडणें; उकरणें. [उलथनें.

करोनी–*स्त्री.* १. खरवड. २.

करोर*–*वि. पु.* कोटि; कोट

(शंभर लाख). [– स्त्री. घामोळें.

करोरी–*वि.* कोटयवधि; अनेक.

करौंछा*–*वि.* काळा.

करौंजी– *स्त्री.* पा० 'कलौंजी'.

करौंट*– *स्त्री.* कूस; कुशी.

करौंदा–*पु.* करवंद; करवंदी.

करौंदिया–*वि.* करवंदाच्या रंगाचा; तपकिरी.

करौत– *स्त्री.* रखेली.

करौत–ता–*पु.*; **करौती**– *स्त्री.* करवत.

करौता–*पु.* मोठी बाटली; कांचेचा परळ.

करौती–*स्त्री.* १. कांचेचें लहान भांडें. २. कांचेची भट्टी.

करौना–*पु.* भांडयांवर नक्षी कोरण्याची छिन्नी.

करौल–ला*–*पु.* [*तु.*] शिकारी-पूर्वी हांका घालणारा; हांक्या.

करौली–*स्त्री.* सरळ व लांब सुरी.

कर्क; कर्कट–*पु.* १. खेकडा. २. कर्कराशि.

कर्कर–*वि.* कठोर; दृढ.–*पु.* १. खडा. २. कुरुंदाचा दगड. ३. अस्थि.

कर्करेखा– *स्त्री.* कर्कवृत्त.

कर्कश–*वि.* १. कर्कश; कठोर. २. कांटेदार.

कर्कश–*पु.* १. तलवार; ३. ऊंस.

कर्कशा–*वि. स्त्री.* भांडकुदळ स्त्री; कैदाशीण. [आंबेहळद.

कर्च(र्चू)द–*पु.* १. सोनें. २.

कर्ज़–र्ज़ा–*पु.* [*अ.*] ऋण; कर्ज.
मु०– उतारना–कर्ज फेडणें. **–खाना**– कर्ज काढणें.

कर्ज़दार–*वि.* [*अ.* +*फा.*] ऋणको; कूळ.

कर्ज़े हसना–*पु.* [*अ.*] बिन-व्याजी व बिन मुदतीचें कर्ज.

कर्ण–*पु.* १. कान. २. कुंतीपुत्र; कर्ण. ३. सुकाणूं. ४. 'हॅपोटिन्यूज'. **मु०–का पहर**–प्रातःसमय; दान-दक्षिणेची वेळ.

कर्णधार–*पु.* १. सुकाणूं धर-णारा. २. संचालक; सूत्रधार; पुढारी. **–समिति**– *स्त्री.* संचालन समिति; 'स्टीयरिंग कमिटी'.

कर्णमूल–*पु.* १. कानाचें मूळ. २. कानाच्या मुळाशीं येणारी सूज.

कर्णवेध–*पु.* कान टोंचण्याचा संस्कार.

कर्णिका– *स्त्री.* १. कर्णफूल (अलंकार). २. करंगळी जवळचें बोट. ३. हत्तीच्या सोंडेचें टोंक. ४. लेखणी; कलम.

कर्णिकार–*पु.* सोनचांफा; कण्हेर.

कर्णी–*पु.* बाण. [वदंता.

कर्णोपकर्णिका– *स्त्री.* अफवा;

कर्तनी– *स्त्री.* कातरी; कात्री.

कर्तरी– *स्त्री.* १. कात्री. २. लहान तलवार; सुरी.

कर्ता–धर्ता; **–कर्ता–हर्ता**–*वि.* प्रमुख; सूत्र-संचालक; सर्वेसर्वा.

कर्दन–*पु.* पोटांतील गुरगुर.

कर्नेता*–*पु.* घोडयांची एक जात. [फाटका व मळका कपडा.

कर्पट–*पु.* लक्तर; चिंधी;

कर्पटी–*वि.* जीर्णशीर्ण लक्तरें घातलेला (भिकारी).

कर्पूर–*पु.* कापूर. **–गौर**–*वि.* कापरासारखा पांढरा शुभ्र.

कर्बुर–*पु.* १. सोनें. २. धोतरा (बीं).–वि. चित्रविचित्र रंगांचा; काळे-पांढरे ठिपके असलेला.

कर्मकर–*पु.* मजूर; कामगार.

कर्मकांड–*पु.* होम-हवन-यज्ञादि-कृत्यें अथवा त्या संबंधींचे शास्त्र-ग्रंथ.

कर्मकार–*पु.* १. लोहार. २. सोनार. ३. बैल. ४. नोकर; कर्मचारी; सेवक. ५. बिगारी; कामगार. ६. कारागीर. **–हानिपूरण अधिनियम**–*पु.* कामगारांची नुक-सान भरपाई करण्याचा कायदा; 'वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन अॅक्ट'.

कर्मचारितंत्र–*पु.* नोकरशाही; 'व्यूरॉक्सी'. ['स्टाफ'.

कर्मचारिवृंद–*पु.* नोकरवर्ग;

कर्मचारी–*पु.* १. कार्यकर्ता. २. सरकारी अधिकारी. ३. नोकर.

कर्मठ–*वि.* १. वाकबगार; कार्यकुशल. २. धर्माप्रमाणें वाग-णारा; कट्टर. [शील.

कर्मण्य–*वि.* उद्योगी; प्रयत्न-

कर्मण्यता– *स्त्री.* कार्यकुशलता.

कर्मरोधन–*पु.* संप; हरताळ; 'स्ट्राइक'.

कर्मनाशा–*स्त्री.* उत्तर प्रदेशाच्या शाहाबाद जिल्ह्यांतील एक नदी. हिच्या जलस्पर्शानें समस्त पुण्याचा नाश होतो, अशी समजूत आहे.

कर्ममास–*पु.* श्रावण मास.

कर्मरेख– *स्त्री.* दैवरेखा; नशीब.

कर्मवाद–*पु.* केलेल्या कर्माचें फळ अवश्य भोगावें लागतें, असें प्रति-पादणारें शास्त्र; प्रारब्धवाद; मीमांसाशास्त्र.

कर्मविपाक–*पु.* पूर्वजन्मीं केलेल्या शुभाशुभ कर्मांचें फळ.

कर्मशाला– *स्त्री.* कारखाना; 'वर्कशॉप'. [परिश्रमी.

कर्मशील–*वि.* उद्योगी;

कर्मसंन्यास–*पु.* कर्मत्याग; कांहीं कार्य न करणें. [कुशल.

कर्मिष्ठ–*वि.* कार्यनिष्ठ; कार्य-

कर्मी–*वि.* १. काम करणारा; उद्योगी. २. फळाच्या इच्छेनें कर्म करणारा.

कर्रा–*पु.* सूत ताणण्याचें काम. –वि. कठिण; टणक.

कर्राना–*क्रि.अ.* १. कडक होणें. २. मिजास चढणें.

कर्रोफर्र–*पु.* वैभव; थाट.

कर्ष–*पु.* १. खेंचणें; ओढणें. २. नांगरणें. ३. १६ मासे वजनाचें एक जुनें नाणें. [करी.

कर्षक–*वि.* ओढणारा. –*पु.* शेत-

कर्षण–*पु.* १. ओढणें. २. नांगरणें; शेती. ३. नांगरलेली जमीन. ३. ताण; हिसका; 'हॉलेज'; 'हॉलिंग'; 'पुल'. [खेंचणें.

कर्षना*–*क्रि. स.* ओढणें;

कलंक–*पु.* १. डाग. २. बदनामी. **–का टीका** –*पु.* बदनामीचा डाग; लांछन. [२. कलंकी अवतार.

कलंकी–*वि.* दोषी; अपराधी.

कलँगा–*पु.* भांड्यांवर नक्षीकाम करण्याची छिन्नी. ['कलगी'.

कलँगी – *स्त्री.* [*तु.*] पा०

क़लंदर–*पु. अ.* [*अ.*] १. मुसलमान फकिरांचा एक वर्ग; अवलिया. २. अस्वल किंवा माकड नाचविणारा.–*वि.* अवलिया.

कलंदरा–*पु.* [*फा.*] एक प्रकारचें रेशमी कापड.

क़लंदरी–*वि.* [*फा.*] कलंदरासारखा; अवलिया वृत्तीचा.– *स्त्री.* १. अवलिया वृत्ति. २. गोंडेदार झालर लावलेली राहुटी.

कलंब–*पु.* १. बाण. २. कदंबाचें झाड किंवा फळ.

कल–*अव्य.* १. आगामी दिवस; उद्यां. २. गलेला दिवस; काल. **मु०–का**– कालचा; कांहीं दिवसांपूर्वींचा; नुकताच (झालेला, आलेला वगैरे).

कल– *स्त्री.* १. भाग; अवयव. २. कळ; यंत्र. ३. चाप; बंदुकीचा घोडा. **मु०–ऐंठना; –घुमाना**–१. किल्ली फिरविणें. २. मन वळविणें. **–बेकल होना**–१. बेचैन होणें. २. सांधा निखळणें. **– हाथ में होना**– नाडी, किल्ली हातांत असणें.

कल–*पु.* १. अव्यक्त मधुरध्वनि; कलरव. २. सुख. ३. संतोष; तृप्तता. – *स्त्री.* आरोग्य; स्वाथ्य; चैन.

कल–*वि.* 'काला' शब्दाचें समासांतील रूप. **–जिब्भा**–*वि.* काळी जीभ असलेला; ज्याच्या तोंडून निघालेली अशुभ गोष्ट खरी होते असा.**–ठोरा**–*पु.* काळी चोंच असलेलें पांढरें कबूतर.**–दुमा**–*वि.* काळ्या शेपटीचें (कबूतर).

क़लई– *स्त्री.* [*अ.*] १. कल्हई. २. दिखाऊपणा; पोकळ डामडौल. ३. सफेती लावणें.**– का कुश्ता**–*पु.* वंगभस्म. **–गर** –*वि.* कल्हईवाला; कल्हई लावणारा.**–दार**–*वि.* कल्हई असलेला. **मु०– खुलना**– बिंग, बेंड फुटणें.

कलकंठ–*वि.* गोड आवाज असलेला.–*पु.* १. कोकिळ. २. हंस. ३. कबूतर.

क़लक़–*पु.* [*अ.*] १. अस्वस्थता; घाबरें होणें; बेचैनी. २. दुःख; खेद; उद्विग्नता.

कलकना– *क्रि. अ.* ओरडणें. आवाज करणें; चीत्कार करणें.

कलकल–*पु.* १. पाणी पडतांना होणारा आवाज. २. गोंगाट; गोंधळ. ३. भांडण; वाद. [जिल्हाधीश.

कलक्टर–*पु.* [*इं.*] कलेक्टर;

कलग़ी– *स्त्री.* [*तु.*] कोंबडा, शहामृग इ. पक्ष्यांच्या डोक्यावरील तुरा. २. शहामृग, मोर इ. चें पीस. ३. टोपी, पागोटें इ. वर खोंवावयाचें एक शिरोभूषण; शोभादायक पिसें किंवा तुरा.

कलचिड़ा–*पु.*; **कलचिड़ी**– *स्त्री.* काळें पोट व लाल चोंच असलेला एक मधुर आवाजाचा पक्षी.

कलछा–*पु.* मोठी पळी; पळा. [–*स्त्री.* कलछी].

कलछुला–*पु.* १. मोठा लोखंडी डाव; पळा. २. भट्टींतील गरम वाळू काढण्याचा मोठा झारा.

कलजुग–*पु.* कलियुग.

कलझँवाँ–*वि.* काळासावळा.

कलत्र–*पु.* पत्नी.

कलदार–*पु.* [*सं.+फा.*] टांकसाळींत तयार झालेलें नाणें; सरकारी रुपया. –*वि.* पेंचदार; फिरकीचा.

कलधूत–*पु.* चांदी.

कलधौत–*पु.* १. सुवर्ण. २. चांदी. ३. मंद, मधुर आवाज.

कलन–*पु.* १. उत्पन्न करणें. २. धारण करणें; गर्भधारणा. ३. ग्रहण करणें; जाणणें. ४. गणिताची क्रिया.

कलप–१. केसांना लावण्याचा रंग; कलप. २. पा० 'कलफ़'.

कलपत्तर*–*पु.* कल्पतरु.

कलपना–*क्रि. स.* १. शोक, विलाप करणें; तळमळणें. २.* कापणें; छाटणें. ३. कल्पना करणें.

कलपनी*– *स्त्री.* कात्री.

कलपाना–*क्रि. स.* मन दुखविणें; त्रास देणें; रडविणें.

कलफ़–*पु.* [*अ.*] १. चेहऱ्यावरील काळा डाग. २. कपड्यांना कडक इस्त्री करण्यासाठीं लावण्याची खळ.

कलफा– *स्त्री.* देशी दालचिनी.

कलब+–*पु.* १. पळसाच्या फुलांपासून बनविलेला रंग. २ पा० 'कलब'.

कलबल–*पु.* उपाय; डावपेंच; युक्ति.

कलबल*–*पु.* गोंगाट; गडबड.– *वि.* अस्पष्ट (स्वर).

कलबूत–पु. [*फा.*] १. सांगाडा; सांचा. २. ठोकळा. [पिलूं.

कलभ–पु. हत्तीचें किंवा उंटाचें

क़लम–पु. *स्त्री.* [*अ.*] १. लेखणी; फाउंटनपेन. २. ब्रश; कुंचली. ३. तोडणें; कापणें; 'कट'. ४.झाडाचें कलम.५. कांच कापण्याचें अवजार. –*वि.* कापलेलें. **–कसाई** –पु. लेखणीच्या द्वारें लोकांची हानि करणारा; क्रूर. **–कार**–पु. चित्रकार; लेखक. **– कारी**– *स्त्री.*१. लेखन.२.चित्रकला.**–ज़द**–*वि.* खोडलेलें.**–तराश**– *पु.* चाकू (लेखणी, पेन्सिल इ. करण्याचा). **–दान**–*पु.* दौत, टांक, वाळू वगैरे ठेवण्याची पेटी. **–बंद**–*वि.* १. लिहिलेलें. २. योग्य; पूर्ण. **–रौ**–*स्त्री.* राज्य; सल्तनत. **मु०–करना**–छाटणें; तोडणें. **–घसीटना**; **–चलाना**– लिहिणें; खरडणें. **–तोड़ना**–लिहिण्यांतील कौशल्याची पराकाष्ठा करणें. **–दान देना**–मंत्रीपद देणें. **–फेरना**–खोडणें; रद्द करणें.

कलमना*–*क्रि. स.* कापणें; दोन तुकडे करणें. २. कलम करणें.

कलमलाना–*क्रि. अ.* १. व्याकुळ होणें २. कुरबूर करणें. ३. वळवळणें.

कलमा–पु. [*अ.*] १. वाक्य. २. इस्लामी धर्माचा मूलमंत्र. **मु०–पढ़ना**–इस्लामी धर्म स्वीकारणें.

कलमास–*वि.* चितकबरा; करडा; काळसर.

कलमी–*वि.* [*अ.*] १. हस्तलिखित; लिहिलेला. २. कलम केलेला; उत्कृष्ट (फळ).

कलमुंड़ा+–*स्त्री.* कोलांटी.

कलमुँहा–*वि.* १. काळ्या तोंडाचा; काळतोंड्या. २. कलंकित.

कलरव–पु. १. मधुर शब्द. २. पक्ष्यांची किलबिल.

कलरिन–*स्त्री.* जळवा लावणारी स्त्री. ['कॅलरी'.

कलरी–*स्त्री.* [*इ.*] उष्णांक;

कलल–पु. १. गर्भाचें प्रारंभिक रूप. २. गर्भाशय. [गुत्ता.

कलवरिया–*पु. स्त्री.* दारूचा

कलवार–पु. दारू वगैरे मद्यपदार्थ विकणारी एक जात; कलाल.

कलविंक–पु. १. कोकिळ. २. कलंक. ३. टरबूज. ४. पांढरी चवरी.

कलश–पु. १. कळस; देवळाचें शिखर. २. घागर; कळशी.

कलशी–सी–*स्त्री.* १. कळशी. २. मंदिरावरील लहान कळस.

कलसा–पु. १. घागर. २. मंदिराचें शिखर.

कलहंस–पु. राजहंस.

कलहप्रिय–पु. नारद.

कलहांतरिता–*स्त्री.* पतीचा किंवा प्रियकराचा अपमान करून मग पस्तावणारी नायिका.

कलहा–ही–*वि.* भांडखोर; कांगावखोर.

कलहारा–*वि.* भांडखोर.

कलहीन.*–*वि.* १. कलारहित; सामान्य. २. बचैन. [कर्कशा.

कलहारी–*वि. स्त्री.* भांडकुदळ;

कलाँ–*वि.* [*फा.*] १. मोठ्या आकाराचा; विशाल. २. थोरला; मोठा.

कला–*स्त्री.* १. कला. २. चंद्रकला. ३. स्वरूप. ४. बाजू. ५. अवस्था 'फेज़'.

कलाई–*स्त्री.* मनगट. [बर्फी.

कलाकंद–पु. [*फा.*] खव्याची

कलापंजी– *स्त्री.* सभेच्या बैठकीच्या संक्षिप्त कार्यविवरणाची वही; 'मिनिट बुक'.

कलाद; कलादक–पु. सोनार.

कलादा*–पु. हत्तीच्या मानेवरील माहुताच्या बसण्याची जागा.

कलाप–पु. १. समूह; झुंड. २. मोराचा पिसारा. ३. पेंडी; गुंडाळी. ४. बाणांचा भाता. ५. करगोटा. ६. चंद्र. ७. दागिना.

कलापिनी–*स्त्री.* १. लांडोर. २. रात्र. ३. नागरमोथा.

कलापी–पु. १. मोर. २. कोकिळ. ३. वडाचें झाड.

कलाबत्तू–पु. [*तु.*] कलाबूत; कलाबतु.

कलाबा–पु. [*अ.*] १. सुताची गुंडी. २. चातीवर गुंडाळलेलें सूत. ३. लग्नांत गुंडाळण्यासाठीं बनविलेल्या पिवळ्या सुताची गुंडी. ४. हत्तीच्या गळ्यांतील दोर. ४. हत्तीची मान.

कलाबाज़–*वि.* [*फा.*] १. डोंबारी. २. ललित, तमाशा वगैरे करणारा. [उडी; कसरत.

कलाबाज़ी–*स्त्री.* [*फा*] कोलांटी

कलाम–पु. [*अ.*] १. वाक्य; वचन; अवतरण. २. उक्ति. ३. वायदा; कबुली. ४. आक्षेप; हरकत. **मु०– करना** –बोलणें; व्याख्यान देणें.

कलामुल्लाह; **कलामे पाक**; **कलामे मजीद**–पु. [*अ.*] कुराण.

कलाय–पु. वाटाणा.

कलार–ल–पु. दारू गाळण्याचा व विकण्याचा धंदा करणारा; कलाल.

कलारी– *स्त्री.* दारू विकण्याचा धंदा.

कलावा–पु. १. सुताची लडी. २. लग्न आदि प्रसंगीं हाताला बांधण्याचा पिवळ्या अगर तांबड्या रंगाचा धागा.

कलासी– *स्त्री.* दोन फळचां-मधील फट. [प्रदेश. २. कलिंगड.

कलिंग–*पु.* १. उत्कल; ओरिसा

कलिंगडा–*पु.* संगीतांतील एक राग.

कलिंद–*पु.* १. सूर्य २. बेहडा. ३. जेथून यमुना नदी उगम पावते तो पर्वत.

कलिंदजा; **कलिंदी**–*स्त्री.* यमुना नदी.

कलि–*पु.* १. भांडण. २. पाप. ३. कलियुग. –**कर्म**–*पु.* युद्ध; संग्राम. –**कारण**–*पु.* नारद. –**काल**–*पु.* कलियुग.– **मल**–*पु.* –पाप. –**हारी**–*स्त्री.* पा० 'कलियारी.'

कलिकान–*वि.** त्रस्त; हैराण.

कलित–*वि.* १. प्रसिद्ध. २. सुसज्जित; सुंदर.

कलिया–*पु.* [*अ.*] माजलेलें व शिजविलेलें मांस; मांसाचा रस्सा.

कलियाना–*क्रि. अ.* १. आनंदांत मग्न होणें. २. कळी येणें. ३. पक्ष्यास पंख फुटणें.

कलियारी–*स्त्री.* १. एक विषारी झुडुप. २. खड्या नाग. ३. कळलावी वेल.

कलिल– *वि.* १. भरलेलें; व्याप्त. २. मलिन; संशयित. ३. श्लेषाभ; 'कॉलॉइड.'

कलींद-दा–*पु.* कलिंगड; टरबूज.

कली–*स्त्री.* १. फुलाची कळी. २. पक्ष्याचें नवें पीस. ३ कपड्याचा त्रिकोणी तुकडा. ४. हुक्क्याचा खालचा भाग. ५. वयांत न आलेली मुलगी. **मु०–खिलना**–खुलणें; खुष होणें. –**फूटना**–नवीन पंख फुटणें.

कलीम–*वि.* [*अ.*] बोलणारा; वक्ता.

कलील– *वि.* [*अ.*] थोडा; अल्प; किंचित्.

कलीसा–*पु.* [*फा.*] ख्रिश्चन लोकांचें प्रार्थना-मंदिर; चर्च.

कलीसाई–*पु.* ख्रिस्ती; किरिस्तांव. [संप्रदाय.

कलीसिया–*पु.* एक ख्रिस्ती

कलुआ(वा)बीर–*पु.* मंत्रतंत्रानें येणारा एक देव; म्हसोबा·

कलुष–*पु.* १. घाण २. पाप. ३. क्रोध.– *वि.* १. घाणेरडा. २. पापी. ३. क्रुद्ध; क्रूर. [त्रता.

कलुषाई–* *स्त्री.* दोष; अपवि-

कलूटा–*वि.* काळा; काळाकुट्ट.

कलेऊ*–न्याहारी; शिदोरी.

कलेजा–*पु.* १. काळीज; यकृत; जिगर; २. हृदय; छाती; अंतःकरण. ३. साहस; हिंमत. ४. अत्यंत प्रिय व्यक्ति किंवा वस्तु. **मु०–उछलना**; –**उड़ना** – अंतःकरण धडधडणें.– **उलटना**–ओकतांना जीव घाबरा होणें.–**कटना**–१. पोटांत विष गेल्यामुळें तडफड होणें, आंतड्याला भोंकें पडणें. २. दुःखानें काळजाला घरें पडणें. ३. रक्ताचे जुलाब होणें. –**कबाब होना**–जळफळाट होणें. –**काँपना**–थरकांप उडणें.–**काढ़ना**; –**निकालना**– १. मनाला यातना देणें. २. सर्वस्व हरण करणें.–**खाना**–जीव खाणें; सतावणें.–**खिलाना**– १. प्रिय वस्तु देणें. २. अत्यंत प्रेमानें आदरसत्कार करणें.–**खुरचना**–१. भुकेनें व्याकुळ होणें. २. विरहानें तळमळणें.–**गोदना**–काळजाला घरें पाडणें. –**छलनी होना**; –**छिदना**; –**बिंदना** – काळजाला घरें पडणें.–**जलना**–मनाला अत्यंत क्लेश होणें.– **जलाना**–त्रास देणें; सतावणें. –**टूक टूक होना**– हृदय शतधा विदीर्ण होणें. – **टूटना**–१. हिरमोड होणें. २. धीर सुटणें. –**ठंढा करना**–संतुष्ट करणें. –**ठंढा होना**–मन शांत होणें; मनासारखें होणें.–**तर होना**–मन प्रसन्न होणें; सुखांत असणें.–**थामकर बैठ (रह) जाना**– दुःख मनांतल्या मनांत गिळणें.–**थामना**–मन घट्ट करणें. –**थाम लेना**; –**पकड़ लेना**–दुःख बाहेर दिसूं न देणें; आंतल्या आंत तळमळणें.–**दहलना**–थरकांप होणें. –**धकधक करना**; **धड़कना**– हृदय धडधडणें; भयव्याकुळ होणें.– **धकसे हो जाना**–भयचकित होणें; भीतीनें गाळण उडणें. –**निकलना**–मेटाकुटीस येणें.–**निकालकर धर या रख देना**– १. अत्यंत प्रिय वस्तु अर्पण करणें. २. सारें सामर्थ्य पणास लावणें. –**पक जाना**–मेटाकुटीस येणें; जीव नकोसा होणें.– **पकड़ लेना**– मन घट्ट करणें.– **पकाना** – डोकें उठविणें; सतावणें. –**पत्थरका करना** –मन घट्ट, कठोर बनविणें.–**पसीजना**– मन द्रवणें. –**पानी होना**–हृदयाला पाझर फुटणें.–**फट जाना**–दुःखानें हृदय विदीर्ण होणें.–**बढ़ना**–धीर चेपणें; साहस होणें.–**बल्लियों, बाँसों उछलना**– अत्यंत आनंदामुळें हृदय धडधडणें.–**बैठ जाना**–निराश होणें; गळून जाणें; भयभीत होणें. –**मसोसकर रह जाना**–१. मन घट्ट करून गप्प बसणें. २. हात चोळीत बसणें. –**मुँहको (मुँहतक) आना**–दुःखानें व्याकुळ होणें.-(**जे**) –**की कोर**–मुलगी; कन्या.–**पर छुरी चल जाना**–मनावर भयंकर आघात होणें; अत्यंत दुःख होणें. –**पर साँप लोटना**–१. मागील आठवणीनें मन कष्टी होणें; हळहळणें २. हेवा वाटणें; ईर्ष्येनें जळफळाट होणें.–**पर हाथ धरना, फेरना, रखना**– आपल्या मनाला

विचारणें.–**में आग लगना**–१. द्वेषानें जळफळणें. २. तहानेनें व्याकुळ होणें. ३. अत्यंत दुःख होणें. **–में डालना**–प्रेमानें जवळ बाळगणें. **–में तीर लगना**– अंतःकरणावर भयंकर आघात होणें. **–में पैठना**–पोटांत शिरणें.**–में लगना**–१. ठसका लागणें. २. पोट फुगणें.**–से लगाकर रखना**–प्रेमानें, काळजीपूर्वक सांभाळणें.**–से लगाना** – छातीशीं धरणें; आलिंगन देणें.

कलेजी– *स्त्री.* काळजाचें मांस.

कलेवर–*पु.* १. शरीर. २. सांपळा. ३. आकार. **मु०–चढ़ाना**–मूर्तीवर गंधाचा किंवा शेंदराचा लेप देणें.**–बदलना**–१. नवीन शरीर धारण करणें. २. पुरी येथील जगन्नाथाच्या जुन्या मूर्तीच्या जागीं नव्या मूर्तीची स्थापना होणें.

कलेवा–*पु.*१. न्याहारी; फराळ. २. शिदोरी.

कलेस–*पु.* क्लेश; दुःख; पीडा.

कलैया+ – *स्त्री.* कोलांटी उडी (खाना, मारना).

कलोर– *स्त्री.* मोठी कालवड; न व्यालेली किंवा गाभण नसलेली जवान गाय.–*पु.** वासरूं.

कलोल– *पु.* खेळ, क्रीडा; नाचणें–बागडणें.

कलोलना– *क्रि. अ.* क्रीडा करणें; विहार करणें.

कलौंजी– *स्त्री.* १. काळें जिरें. २. मसालेदार वांग्याची भाजी.

कलौंस–*वि.* – काळसर. *स्त्री. पु.*–काळिमा; कलंक.– *स्त्री.* काळी शाई.

कलौथी– *स्त्री.* कुळीथ.

कल्क–*पु.* १. तेलाच्या तळाशीं सांठणारा गाळ; किटण. २. कानांतील मळ. ३ विष्ठा ४. पाप; दंभ. –*वि.* पापी; दुष्ट. **–फल**–*पु.* डाळिंब.

कल्प–*पु.* १. कृत्य. २. वेदानुसार यज्ञविधि. ३. सकाळ. ४. प्रकरण. ५. चौदा मन्वन्तरें किंवा चार अब्ज बत्तीस कोटी वर्षांचा काळ.

कल्पक–*पु.* न्हावी; हजाम. –*वि.* १. रचणारा; कल्पना करणारा. २. कापणारा.

कल्पकार–गृह्य किंवा श्रौत सूत्रें रचणारा.

कल्पवास–*पु.* गंगेच्या तीरावर माघ महिन्यांत व्रतवैकल्यें करून राहाणें.

कल्पसूत्र–*पु.* वैदिक यज्ञादि कृत्यें व गृहस्थकर्में यांची माहिती असलेला सूत्रग्रंथ (श्रौत व गृह्य सूत्र). [अंत.

कल्पांत–*पु.* प्रलय; सृष्टीचा

कल्पित– *वि.* काल्पनिक; कल्पना केलेलें; मनानें रचलेलें.

क़ल्ब–*पु.* [*अ.*] १. हृदय. २. मन.

कल्मष–*पु.* १. पाप. २. घाण.

कल्माष–*वि.* काळापांढरा; रंगीबेरंगी. [२. मद्य.

कल्य–*पु.* १. पहांट; सकाळ.

कल्यान*–*पु.* कल्याण.

कल्याणकारी राज्य–*पु.* लोककल्याणकारक राज्य; 'वेल्फेअर स्टेट.'

कल्ल–*वि.* बहिरा. [रेती.

कल्लर–*पु.* १. खारी माती. २.

कल्लाँच–*पु.* [*तु.*] १. लुच्चा; लबाड; गुंड. २. दरिद्री; कंगाल.

कल्ला–*पु.* १. मोड; अंकुर. २. बर्नर (दिव्याचा).

कल्ला–*पु.* [*फा.*] १. जबडा. २. गालफड.**–तोड़**–*वि.* बरोबरीचा; समर्पक; सडेतोड (उत्तर).**–दराज़**–*वि.* वाचाळ; तोंडाळ; फटकळ. **मु०–चलाना**–तोंड चालविणें; खाणें.**–चले बला टले**–खायला मिळालें कीं कटकट गेली.**–दबाना**–बोलूं न देणें; तोंड दाबणें.**–फुलाना**–गाल फुगवणें; रुसणें. **–मारना**–गप्पा मारणें. –(**ल्ले**)**तले दबाना**–आरडाओरडा करून दुसऱ्याला दडपून टाकणें.

कल्लाना–*क्रि. अ.* आग होणें; जळजळणें; दुखणें.

कल्लू–*वि.* काळा; काळाकुट्ट.

कल्लोल–*पु.* १. तरंग; लाट. २. मौज; आनंद; प्रफुल्लता.

कल्लोलिनी– *स्त्री.* जिच्या प्रवाहांत लाटा आहेत अशी नदी.

कल्ह*–*अव्य.* १. काल. २. उद्यां.

कल्हर*–*पु.* खारी माती.–*वि.* ओसाड; पडीक.

कल्हारना+–*क्रि. स.* (ओले हरभरे किंवा वाटाणे) तुपांत किंवा तेलांत परतणें; तळणें.–*क्रि. अ.* कण्हणें.

कवक–*पु.* बुरशी; अळंबें; 'फंगस'.–**तंतु**–*पु.* 'हायफा'.

कवच–*पु.* १. चिलखत. २. कठिण आवरण; आच्छादन. ३. फळाची जाड साल; टरफल.

कवचित यान–*पु.* चिलखती गाडी.

कवचोद्‌गम–*पु.* निभाग; 'शॅलझा'.

कवन–*पु.* पाणी.–*सर्व.** कोण. –*वि.* कोणता; कसा.

कवयित्री– *स्त्री.* कविता करणारी *स्त्री.* [ग्रास.

कवर–ल–*पु.* कवळ; घांस;

कवरी– *स्त्री.* १. वेणी. २. रानतुळस.

कवल–पु. १. घांस. २. चूळ.

कवलित–*वि.* खाल्लेला; ग्रासलेला.

क़वाम–पु. [*अ.*] १. पाक; काकवी. २. विडयाच्या पानावरोवर खाण्याचा पाकवलेला मसालेदार तंबाखू.

क़वायद–*स्त्री.* [*अ.*] १. नियम; व्यवस्था. २. कवाईत (सैन्याची). ३. व्याकरण.

कवि–पु. १. कविता करणारा; कवि. २. ऋषि. ३. सूर्य.–*वि.* अतींद्रिय गोष्टी जाणणारा; क्रांतदर्शी; मनीषी.–**राज**–पु. १. कविश्रेष्ठ २. वैद्यराज.–**समय**–पु. प्राचीन काळापासून काव्यांत रूढ असलेल्या कल्पना. (उदा० स्त्रीच्या पदाघातानें अशोक फुलतो, वगैरे).

कविक–पु. लगाम. [केवडा.

कविका–*स्त्री.* १. लगाम. २.

कविताई*–*स्त्री.* सरस काव्य; कविता. [२. एक वर्णवृत्त.

कवित्त–पु. १. कविता; काव्य.

कविनासा*–*स्त्री.* कर्मनाशा नदी.

कविलास*–पु. कैलास.

क़वी–*वि.* [*अ.*] सामर्थ्यवान; ताकदवान.–**हैकल**–*वि.* उंचापुरा; धिप्पाड.

कवेला–पु. कावळयाचें पिलूं.

कव्वाल; कव्वाली – पा० 'कौवाल'; 'कौवाली.'

कश–पु. चाबूक.

कश–पु. [*फा.*] १. ओढ. २. चिलमीचा झुरका; दम.–*वि. प्रत्य.* आकर्षक; खेचणारा (दिलकश= चित्ताकर्षक).

क़श्क़ा–पु. [*फा.*] गंध; टिळा.

कशमकश– *स्त्री.* [*फा.*] १. ओढाताण; खेंचाखेंच. २. गर्दी. ३. दुग्ध्यांत पडणें; मनाची चलविचल.

कशिश– *स्त्री.* [*फा.*] १. आकर्षण; ओढ. २. वैमनस्य; वेवनाव.

कशीदगी– *स्त्री.* [*फा.*] वैमनस्य; वेवनाव; तेढ.

कशीदा–*वि.* [*फा.*] ओढलेला; खेंचलेला. –पु. कशिदा; भरतकाम (काढ़ना).–**कामत**–*वि.* उंचापुरा; उंच. [कोणीतरी.

कश्चित्–*वि. सर्व.* कोणी;

कश्ती– *स्त्री.* [*फा.*] १. नाव; नौका. २. तबक.

कश्नीज़–पु. [*फा.*] धणे.

कश्मीर–पु. काश्मीर.

कश्मीरज–पु. केशर.

कश्मीरी–*वि.* काश्मीर प्रदेशासंबंधींचा.–पु. १. काश्मीर-निवासी. २. काश्मीरमधील घोडा. –*स्त्री.* काश्मीरी भाषा.

कष–पु. १. कसोटी; परीक्षा. २. कसोटीचा दगड.

कषाय–*वि.* १. तुरट; कडू. २. सुगंधित. ३. भगवा. ४. अनुचित. –पु. १. काढा. २. काव (माती). ३. भगवा रंग.

कष्ट–पु. १. त्रास; तसदी. २. पीडा; व्यथा; वेदना.–**सहन योजना**-*स्त्री.* काटकसर योजना; 'ऑस्टेरिटी स्कीम'. **मु०– उठाना; –झेलना** –त्रास सहन करणें; तसदी घेणें.

कस–पु. कसोटी; परीक्षा.

कस–पु. १. बल; जोर. २. ताबा; अधिकार. ३. अडथळा; अवरोध. –**का**–ताब्यांतील. –**बल**–पु. जोर; बळ. **मु०– में करना, रखना**–ताब्यांत ठेवणें.

कस–पु. १. तुरटपणा. २. अर्क; सार. ३. निष्कर्ष; तात्पर्य.

कस*–*अव्य.* १. कसें. २. कां.

कसक–*स्त्री.* १. ठणका; वेदना; कळ. २. अढी; आकस; द्वेष. ३. आकांक्षा; अभिलाषा. ४. सहानुभूति. **मु०– निकालना**–सूड घेणें.

कसकना–*क्रि. स.* ठणका मारणें; ठुसठुसणें; सलणें.

कसकुट–पु. कांसें (मिश्र धातु).

कसगर–पु. मुसलमान कुंभार.

क़सदन्; क़स्दन्–*अव्य.* [*अ.*] मुद्दाम; हेतुपुरस्सर.

कसन– *स्त्री.* १. आवळण्याची क्रिया; बांधणें. २. बांधण्याची दोरी. ३. तंग (घोडयाचा). ४. क्लेश; यातना.

कसना–*क्रि. स.* १. कसणें; आवळणें. २. ताणणें. ३. करकचून ४. पारख करणें; अजमावणें; सोन्याची निकषावर पारख करणें. ५. दूध आटवून खवा तयार करणें. ६. कष्ट देणें. ७. ठांसून भरणें –*क्रि. अ.* १. आवळलेंजाणें; ताणलें जाणें. २. घट्ट होणें; संकुचित होणें. ३. ठासून भरलें जाणें. **मु० कसकर**– जोरानें. **कसाकसाया**– कसलेला; सज्ज; तयार.

कसनी– *स्त्री.* १. बांधण्याची दोरी. २. वेष्टण. ३. चोळी. ४. कसोटी; निकष; पारख.

कसब–पु. [*अ.*] १. मेहनत; परिश्रम. २. व्यवसाय; धंदा. ३. हुन्नर; कला. ४. वेश्यावृत्ति. ५. उपार्जन. [अनेक० **कसबात**

क़सबा–पु. [*अ.*] लहान शहर.

क़सबाती–*वि.* [*अ.*] नागरिक; अर्धशहरी. [कसबीण.

क़सबी– *स्त्री.* [*अ.*] वेश्या;

क़सम– *स्त्री.* [*अ.*] आणभाक; शपथ. **मु० –उतारना**–१. 'शपथ सुटली' असें म्हणणें. २. एखादें काम शपथेला करणें. **–खाना**– शपथ घेणें; प्रतिज्ञा करणें.–

खानेको–१. नाममात्र; नांवापुरतें. २. मुलीसुद्धां.

कसमसाना–*क्रि. अ.* १. कसकसणें; तळमळणें. २. कंटाळून अस्वस्थतेमुळें हलणें; लोळणें. ३. अस्वस्थ होणें (तापानें); घाबरें होणें. [बेचैनी; घाबरें.

कसमसाहट–*स्त्री.* अस्वस्थता;

कसमाकसमी–*स्त्री.* आणभाक; दोन्ही पक्षांनीं शपथा घेणें.

कसमि(मी)या–*अव्य.* [*अ.*] शपथपूर्वक; शपथेवर.

कसर–*स्त्री.* [*अ.*] १. उणीव; न्यूनता. २. द्वेष; मनोमालिन्य. ३. तोटा. ४. दोष. **मु०–न उठा-रखना**–कार्यसिद्धीकरितां कोणताहि उपाय करावयाचें बाकी न ठेवणें. **–निकालना**–उट्टे काढणें.

कसरत–*स्त्री.* [*अ.*] १. विपुलता; आधिक्य. २. व्यायाम. **–राय**–*स्त्री.* बहुमत.

कसरहट्टा–*पु.* तांबट आळी; भांडीं बाजार.

कसली–*स्त्री.* लहान फावडें; कुदळ. [बांधविणें.

कसवाना–*क्रि. स.* आवळून

कसवार–*पु.* एक विशेष प्रकारचा भरपूर रस असलेला ऊंस.

कसहँड़–*पु.* कांशाच्या भांड्याचे तुकडे. [कांशाची तपेली.

कसहँड़ी–*स्त्री.* १. कासंडी. २.

क़साई–*पु.* [*अ.*] १. कसाई; खाटीक. २. मांग. *–वि.* निर्दय; निष्ठुर. **–खाना**–*पु.* कत्तलखाना. **मु०–का पिल्ला**–गलेलठ्ठ माणूस. **–के खूँटे बँधना**–१. निर्दय व्यक्तीशीं संबंध येणें. २. निष्ठुर पुरुषाशीं लग्न होणें. [२. तेढ; भांडण.

कसाकसी–*स्त्री.* १. ओढाताण.

कसाना–*क्रि. अ.* १. कळकणें. २. पदार्थाची रुचि बिघडणें. ३. आंबुसणें.

कसाफ़त–*स्त्री.* [*अ.*] १. घट्टपणा; दाटपणा. २. स्थूलता; लठ्ठपणा. ३. घाण; गलिच्छता.

कसार–*पु.* तुपांत भाजलेली व साखर घातलेली कणीक; गुळपापडीचें पीठ. [आळस.

कसालत–*स्त्री.* [*अ.*] सुस्ती;

कसाला–*पु.* १. कष्ट; त्रास. २. परिश्रम; मेहनत; श्रम.

कसाव–*पु.* तुरटपणा; उग्रपणा.

कसाव–*पु.* आवळून बांधणें; घट्ट बांधणें. [बांधणें.

कसावट–*स्त्री.* कसणें; घट्ट

कसावड़ा–*पु.* कसाई.

कसी–*स्त्री.* १. दोन पावलांचें (४९।इंचांचें) जमीन मोजण्याचें एक माप. २. नांगराचा फाळ.

क़सीदा–*पु.* [*अ.*] १. चारणगीत. २. उर्दू किंवा फारसी स्तुतिकाव्य. **–गो**–*वि.* स्तुतिकाव्य लिहिणारा.

कसीदा–*पु.* [*फा.*] कशिदा; बेलबुट्टीचें काम; भरतकाम.

क़सीफ़–*वि.* [*अ.*] १. जाडजूड; स्थूल. २.बेढब. ३. घाणेरडें.

कसीर–*वि.* [*अ.*] अत्यंत; अधिक. [निर्दयता २. प्रयत्न.

कसीस–*पु.* हिराकस.–*स्त्री.** १.

कसीसना*–*क्रि. स.* ओढणें; खेंचणें.

कसुंभ*–*पु.* कुसुंबी रंग.

कसूँभा–भी*–*वि.* कुसुंब्याच्या रंगाचें; लाल.

क़सूर–*पु.* [*अ.*] दोष; अपराध. **–मंद; –वार**–*वि.* दोषी; अपराधी.

कसेरा–*पु.* पितळ, तांबें, कांसें इत्यादि धातूंचीं भांडीं घडविणारा; कासार.

कसेरू–*पु.* १. केसाळ सालीचें बोराएवढें गोड कंदमूळ. २. नागरमोथा.

कसैया–*पु.* १. करकचून बांधणारा. २. पारख करणारा.

कसैला–*वि.* तुरट व आंबट.

कसैली–*स्त्री.* सुपारी.

कसोरा–*पु.* पणतीच्या आकाराचें मातीचें मोठें भांडें; परळ.

कसौंजा–दा–*पु.* काशाच्या जातीची एक वनस्पति; कासविंदा (झोपडीचें छप्पर करण्यासाठीं व मूळव्याधीवर याचा उपयोग होतो).

कसौंदी–*स्त्री.* कसुंदी; कैरीच्या किसाचें लोणचें.

कसौटी–*स्त्री.* १. कसोटी; पारख. २. कस पाहाण्याचा दगड; निकष.

कस्तरी–*स्त्री.* दूध आटविण्याचें रुंद तोंडाचें मातीचें भांडें.

कस्तीर–*पु.* पत्रा; 'टिन'.

कस्तूरा–*पु.* कस्तुरी मृग.

कस्तूरी–*स्त्री.* कस्तुरी

क़स्द–*पु.* [*अ.*] इरादा; विचार; बेत; हेतु.

क़स्दन्–*अव्य.* [*अ.*] जाणून बुजून; हेतुपूर्वक.

क़स्बा–*पु.* [*अ.*] मोठें खेडें; लहान शहर.

कस्र–*पु.* [*अ.*] १. अंश; भाग; एकाहून कमी संख्या. २. महाल; राजवाडा.–*स्त्री.* उणीव; कमतरता. **–आशारिया**–*पु.* दशांश अपूर्णांक.

कस्सा–*पु.* १. बाभळीची साल. २. बाभळीच्या सालीपासून बनणारी दारू.

कस्साब–*पु.* [*अ.*] कसाई; कसाब; खाटीक.

कहँ*–*प्रत्य.* ला, करितां (चतुर्थीचा प्रत्यय); चा, ची, चें

(षष्ठीचा प्रत्यय).–*अव्य.* कोठें.

कह*–*वि.* काय; किती.

कह–*पु.* [*फा.* 'काह'चें संक्षिप्त रूप.] गवत.**–रुबा**–*पु.* १. एक पिवळ्या रंगाचा गोटा. हा चमड्यावर किंवा रेशमावर घासून वाळलेल्या गवताजवळ नेल्यास गवताला ओढून घेतो. २. राळ; डिंक. [गंगा.

कहकशाँ–*स्त्री.* [*फा.*] आकाश-

क़हक़हा–*पु.* [*फा*] खदखदां हंसणें; खिदळणें. [गारा.

कहगिल–*स्त्री.* [*फा.*] गिलावा;

क़हत–*पु.* [*अ.*] १. दुष्काळ; दुर्भिक्ष. २. एखाद्या वस्तूचा अभाव; तंगी.–**ज़दा**–*वि.* दुष्काळपीडित. **–साली**–*स्त्री.* दुष्काळ. [णारा

कहता–*वि.* सांगणारा; बोल-

कहन–नि–नी*–*स्त्री.* १. कथन. २. म्हण. ३. गोष्ट. ४. उक्ति. ५. कविता.

कहना–*क्रि. स.* १. बोलणें सांगणें; म्हणणें; वर्णन करणें; २. कविता करणें. ३. उघड करणें. ४. संबोधणें; नांव देणें. ५. समजाविणें. ६. सूचना देणें; आज्ञा देणें.–*पु.* १. म्हणणें; कथन. २. आज्ञा. **मु०–सुनना**– १. समजावणें. २. विनंती करणें.–(**ने**) **की बात**– तथ्य नसलेली गोष्ट.–(**ने**) **को**– नाममात्र; नांवापुरतें. –(**ने**) **में आना**–भूलथापांना बळी पडणें.– (**ने**) **में होना**–कह्यांत असणें.

कहबदकर–१. दृढ संकल्प करून २. आव्हान देऊन. [२. म्हण.

कहनाउ(ब)त–**स्त्री.* १.कथन; विधान. २. म्हण.

कहनि*-नी*–*स्त्री.* पा० 'कहन'.

कहर–*पु.* [*अ.*] आपत्ति; संकट. –*वि.* घोर; भयंकर.– **इलाही**–*पु.* ईश्वरी कोप.–**का**– भयंकर; पराकाष्ठेचा. **मु०– करना**–जुलूम करणें; भयंकर कृत्य करणें.–**टूटना**–दैवी संकट कोसळणें. **–ढाना**–जुलूम करणें; संकट कोसळविणें.

कहरना–*क्रि. अ.* कण्हणें.

कहरवा–*पु.* १. केरवा ताल. २. या तालावार गायिला जाणारा दादरा.

कहरुबा–*पु.* पा० 'कह' मध्यें.

कहल–*पु.* १. उष्णतेपासून होणारी तगमग; काहिली. २. त्रास, पीडा; ३. उष्मा.

कहलना–*क्रि. अ.* व्याकुळ होणें; कासावीस होणें.

कहलाना; कहाना–*क्रि. स.* १. सांगविणें. २. निरोप धाडणें. ३. म्हणविणें.

कहवाँ–* *अव्य.* कोठें.

क़हवा–*पु.* [*अ.*] कॉफी.

कहाँ–*अव्य.* कोठें.–*पु.* टँ हँ. **मु०–का**–१. कुठला. २. निरर्थक. **–का कहाँ**–कुठल्या कुठें. **–की बात**– अशक्य गोष्ट; कसचें काय.

कहा–* *पु.* कथन; आज्ञा; उपदेश. –*सर्व.* काय; कां. –*वि.* कसें. –*अव्य.* १. कसें. २. कां.

कहाकही–*स्त्री.* १. वादविवाद. २. भांडण. ['कहलाना'.

कहाना–*क्रि. स.* पा०

कहानी–*स्त्री.* १. कथा; गोष्ट. २. लघुकथा. [भरणारा; पाणक्या.

कहार–*पु.* १. भोई. २. पाणी

कहारा–*पु.* मोठी टोपली; हारा. [म्हण.

कहावत–*स्त्री.* लोकोक्ति;

कहासुना–*पु.* अयोग्य कथन व व्यवहार; चूकभूल. [भांडण.

कहासुनी–*स्त्री.* बोलाचाली;

कहिया*– *अव्य.* केव्हां; कोणत्या दिवशीं.

कहीं–*अव्य.* कोठें; कोठेंहि.– **मु०–का न रहना**–कांहीं स्थान न राहाणें; कामांतून जाणें. –**न कहीं** –कोठें ना कोठें.

कहुँ–हूँ* *अव्य.* १. कोठें २. जर.

कहुक*–*वि.*; *अव्य.* कोठलें.

कहुवा–*पु.* सुंठीचें चाटण (पडशासाठीं दिलें जाणारें).

कह्र–*पु.* [*अ.*] पा० 'कहर'

काँइयाँ–*वि.* धूर्त; लुच्चा

काँई*–*अव्य.*–कां. *सर्व.*– कोणाला. [ओरडणें; कावकाव.

काँ-काँ–*स्त्री.*–*पु.* कावळ्याचें

काँकर*–*पु.* खडा; बारीक दगड.

काँकरी–*स्त्री.* खडी; खडे.

काँकिनिभाग–*वि.* दुर्दैवी.

कांक्षा–*स्त्री.* १. इच्छा; अभिलाषा २. प्रवृत्ति.

कांक्षी–*वि.* इच्छिणारा.

काँख–*स्त्री.* कांख; बगल; खांक. [हुश्श करणें. २. कुंथणें.

काँखना–*क्रि. अ.* १. हाय,

काँखासोती–*स्त्री.* उजव्या कांखेंतून डाव्या खांद्यावर उपरणें घेण्याची पद्धत. [अभिलाषी.

काँखी*–*वि.* इच्छा करणारा;

काँगड़ा–*पु.* १. पंजाबचा एक जिल्हा. २. एक पक्षी.

काँगड़ी–*स्त्री.* गळ्यांत अडकविण्याची शेगडी; काश्मीरी शेगडी.

कांग्रेस–*स्त्री.* [*इं.*] सभा; परिषद; 'काँग्रेस'.

काँच–*पु.* कांच.

काँच–*स्त्री.* १. कासोटा. २. गुदद्वाराच्या आंतील भाग; गुदाचक्र. **मु०–खोलना**-संभोग करणें. **–निकलना**–१. मलत्यागाबरोबर

अंग बाहेर येणें. २. पिट्टा पडणें. **–निकालना**–नाकीं नऊ आणणें; हैराण करणें.

कांचनी– *स्त्री.* १. हळद. २. गोरोचन.

काँचरी-ली– *स्त्री.* सापाची कात.

काँचा*–*वि.* १. कच्चा. २. क्षणभंगुर.

काँछा*– *स्त्री.* इच्छा; आकांक्षा.

काँजी– *स्त्री.* १. पेज; कांजी. २. दह्याची निवळी.

कांजी हाउस–पु. [तमिळ 'कांजी'–बेवारशी पशु+इं. हाऊस] कोंडवाडा.

काँट*–*पु.* १. कांटा; खिळा. २. शल्य.

काँटा–*पु.* १. कांटा २. घड्याळ, वजन, इ. चा कांटा. ३. गळ. ४. खिळा. ५. चमकी; लवंग. ६. गुणकाराचा पडताळा. ७. तराजू. **मु०–डालना**–गळ टाकणें (माशासाठीं). **–निकलना**–कष्ट, त्रास, दूर होणें. **–निकालना**–विघ्न दूर करणें. **–पड़ना**–तहानेनें घशाला कोरड पडणें. **–बिछाना**–विघ्नें निर्माण करणें; अडथळा आणणें. **–बोना**–१. वाईट चिंतणें. २. अडचणी निर्माण करणें. **–होना**–रोडावणें; वाळून जाणें. **–(टे) की तौल**–अगदीं बरोबर वजन; धारवाडी कांटा. **–(टों) पर लोटना**–दुःखानें तळमळणें; तडफडणें. **–(टों)में घसीटना**–हरभऱ्याच्या झाडावर चढवणें; स्तुति करून लाजविणें.

काँठा–*पु.* १. गळा; मान. २. कंठ; पक्ष्याच्या, विशेषतः पोपटाच्या गळ्यावरील रेघ. ३. नदीचा तट; किनारा.

कांड–*पु.* १. पेर.; गांठ; जोड. २. विभाग; प्रकरण. ३. फांदी; शाखा. ४. घटना; भानगड.

काँड़ना*–*क्रि. स.* १. कुटणें; कांडणें २. खूप बडवणें.

काँडली– *स्त्री.* कांडी; कुलफी; चिलमीच्या आकाराचें आइस्क्रीमचें लहान भांडें.

कांडवान्–*पु.* तिरंदाज.

काँड़ा–*पु.* १. दातांची कीड. २. लांकडाला लागणारी कीड; भुंगा. ३. झाडांचा एक रोग.

काँड़ी– *स्त्री.* १. टोकर; बांबू. २. सोटा; वासा. ३. तुरकाठी. ४. उखळ. ५. तरफ ६. हत्तीच्या तळव्याचा एक रोग. ७.+गुरांना औषध पाजविण्याचें बांबूचें नळकांडें. **मु०– कफन**–अंत्यविधीचें (विशेषतः तिरडीचें) सामान.

कांत–*वि.* १. प्रिय; मनोरम. २. शोभिवंत.–*पु.* प्रियकर. [सुंदरी.

कांता– *स्त्री.* १. प्रिया; पत्नी २.

कांतार–*पु.* १. भयानक स्थान. २. जंगल; अरण्य. ३. खेद. ४. तडा. ५. बांबू. [प्रकाश; शोभा.

कांति– *स्त्री.* सौंदर्य; चमक;

कांतिसार–*पु.* एक प्रकारचें उत्तम लोखंड.

कांती– *स्त्री.* एक प्रकारचें हलक्या जातीचें, भेसळ असलेलें लोखंड.

कांती*– *स्त्री.* १. विंचवाची नांगी. २. कातर. ३. लहान तलवार. ४. सुरी. ५. तीव्र वेदना.

काँथरि*– *स्त्री.* गोधडी [करणें.

काँदना*–*क्रि. अ.* रडणें; शोक

काँदव+–*पु.* चिखल.

काँदा–*पु.* १. कांदा. २. चिखल.

काँदू–*पु.* वैश्यांची एक पोटजात.

काँदो*–*पु.* चिखल.

काँध*–*पु.* खांदा. **मु०–देना**–१. आधार देणें. २. स्वीकार करणें.**–मारना**–फसविणें; तोंडघशीं पाडणें.

काँधना*–*क्रि. स.* १. उचलणें; डोक्यावर घेणें. २. स्वीकार करणें.

काँधर*–*पु.* १. कृष्ण; कान्हा.

काँधा*–*पु.* १. कृष्ण. २. खांदा.

काँन*–*पु.* कृष्ण.

काँप– *स्त्री.* १. बांबूची लवचीक पातळ कामटी; कांब. २. काप. (स्त्रियांच्या कानांतील दागिना). ३. डुकराचे सुळे.

काँपना–*क्रि. अ.* १. कांपणें; थरारणें. २. हलणें.

काँय-काँय; काँव-काँव–*पु.* कावळ्याचें ओरडणें; कावकाव.

काँवर–*स्त्री.* कावड. [झालेला.

काँवरा*– *वि.* कावराबावरा

काँवरिया–*पु.* कावडवाला.

काँवरी*–*स्त्री.* घोंगडी.

काँवाँरथी–*पु.* कावड घेऊन तीर्थयात्रा करणारा. [कासें.

काँस–*पु.* एक प्रकारचें गवत;

काँसा–*पु.* कासें (धातु).

काँसा–*पु.* [फा.] भिक्षापात्र; खापरी.

काँसागर– *पु.* [सं.+फा.] कासार; भांडीं घडविणारा.

काँसार–*पु.* तांबट; कासार.

काँसी– *स्त्री.* भाताच्या पिकावर पडणारा एक रोग. **मु०–लगना**–रोग पडणें.

काँसुला–*पु.* गुंड्या, मणी वगैरे बनविण्याच्या कामीं वापरला जाणारा सोनाराचा कांशाचा चौफुला. [कांशाचा.

कांस्य–*पु.* कासें (धातु).–*वि.*

कांस्ययुग–*पु.* ज्या वेळीं ब्राँझ धातूचीं हत्यारें तयार केलीं जात असत तें युग; 'ब्राँझ एज'.

का–*प्रत्य.* षष्ठीचा पुल्लिंगी प्रत्यय; चा.

काइयाँ–*वि.* धूर्त; लबाड.

काई– *स्त्री.* १. शेवाळ. २. तांबें इ. वर लागणारा तांब; गंज. **मु० –छुड़ाना**–१. घाण काढून टाकणें. २. दुःख दूर करणें.–**सा फटना**–१. विखुरणें. २. दाणादाण होणें.

काई*–*अव्य.* १. कधीं २. कांहीं.

काऊ*–*सर्व.* १. कोणीहि. २. कांहीं; थोडेंसें.–*अव्य.* केव्हां.

काक–*पु.* कावळा. –**पद**–*पु.* लिहितांना सुटलेल्या शब्दाची जागा दाखविण्यासाठीं वापरण्यांत येणारें (‸) चिन्ह.

काकड़ासींगी–*स्त्री.* काकडशिंगी.

काकण–*पु.* तांवडें कोड.

काकणी– *स्त्री.* गुंज.

काकतालीय–*वि.* योगायोगानें घडून येणारी (गोष्ट).

काकदंत–*पु.* १. कावळ्याचा दांत. २. एखादी असंभाव्य गोष्ट.

काकपाली– *स्त्री.* कोकिळा.

काकबली– *स्त्री.* काकवळी; वैश्वदेव व बलिहरण होऊन उरलेला भात घराबाहेर कावळ्यांना टाकतात तें; कागवळ.

काकभुशुंडि–*पु.* शापामुळें कावळा बनलेला एक रामभक्त.

काकरी*– *स्त्री.* काकडी.

काकरेज़ा–*पु.* [*फा.*] १. भुऱ्या रंगाचें कापड. २. भुरा रंग.

काकलि–ली– *स्त्री.* अस्फुट मधुर ध्वनि. –**ख**–*पु.* कोकिळ.

काकवंध्या– *स्त्री.* एका मुलानंतर वांझपण आलेली स्त्री. [२. कावळा.

काका–*पु.* १. काका; चुलता.

काकाकौआ, काकातुआ – *पु.* काकाकुवा (पक्षी). [२. कावळी.

काकी– *स्त्री.* १. काकी; चुलती.

काकी*–*सर्व.* कोणाची.

काकु–*पु.* वक्रोक्ति; टोमणा.

काकुल– *स्त्री.* [*फा.*] केंसांच्या वटी; कानांवरील केसांचा झुपका.

काके–कैं–*सर्व.* कोणाचे, कोणाकडे. [कोणाला.

काको–कौ–*सर्व.* कोणाचा;

काख़–*पु.* [*फा.*] १. प्रासाद; भवन. २. पाऊस.

काखी*–*वि.* इच्छिणारा.

काग–*पु.* कावळा.–**भुसुंडि-डी***–पा० 'काकभुशुंडि'.

काग–*पु.* बाटलीचें बूच; 'कॉर्क'

काग़ज़–*पु.* [*फा.*] १. कागद. २. वर्तमानपत्र. ३. दस्तऐवज; प्रमाणभूत लेख. –**का रुपया**–*पु.* नोट. –**की नाव**– *स्त्री.* क्षणभंगुर वस्तु. –**पत्र**–*पु.* कागदपत्र. **मु०–काला करना**–निरर्थक लिखाण करणें. –**के घोड़े दौड़ाना**– १. फक्त लिखापढी करणें; कागदी घोडे नाचविणें. पत्र-व्यवहाराचा फापटपसारा मांडणें.

काग़ज़ात–*पु.* [*फा.* 'कागज़'चें अनेक०] कागदपत्रें.

काग़ज़ी–*वि.* [*फा*] १. कागदी. २. लेखी (पुरावा वगैरे). ३. पातळ सालीचा (लिंबू वगैरे). –*पु.* कागद तयार करणारा किंवा विकणारा; कागदी. –**कार्रवाई**–*स्त्री.* पत्रव्यवहार; लेखी व्यवहार.

कागर*–*पु.* १. पर; पीस. २. कागद.

कागा*–*पु.* कावळा. –**बासी**–*स्त्री.* पहांटे बनविलेली भांग. –**रोर–ल**–*पु.* १. कावळ्याची काव-काव. २. ओरडा; गोंधळ.

कागौर–*पु.* पा० 'काकबली'.

काच–*पु.* १. कांच. २. खारी माती; काळें मीठ. ३. मेण. ४. डोळ्यांतील खुपरी (रोग).–**मणि**–*पु.* स्फटिक.–**मल; –लवण**–*पु.* काळें मीठ.

काचा–चो*–*वि.* कच्चा.

काछ–*पु.* १. काचा; कासोटा. २. चड्डी (शिखांची). ३. नटाचें वेषांतर. **मु०– खोलना**–१. नागवें होणें. २. संभोग करणें. –**लगना**–१. चालतांना काच्यामुळें जांघा सोलणें. २. जांघेंत पुटकुळ्या उठणें.

काछना–*क्रि. स.* १. कमरेभोंवतीं धोतराचा सोगा बांधणें. २. काचा मारणें.

काछनी– *स्त्री.* गुडघ्याच्या वर धोतर नेसण्याची पद्धत.

काछा–*पु.* काचा मारून नेसलेलें धोतर किंवा पातळ.

काछी–*पु.* काची; माळी; भाजीपाला विकण्याचा धंदा करणारा.

काछे–छैं*–*अव्य.* जवळ; समीप.

काज–*पु.* १. कार्य. २. व्यवसाय. ३. हेतु; उद्देश्य.

काज–*पु.* बटनाचें काज.

काजकारी–*वि.* कार्यकारी; 'एक्झिक्यूटिव्ह'.

काजर–*पु.* काजळ.

काजरी– *स्त्री.* काजळी डोळ्याची गाय.

काजल–*पु.* १. काजळ; सुरमा. २. काजळी. **मु०– की–कोठरी**–कलंक लागण्याचें स्थान; अब्रूला धोका असलेलें ठिकाण. –**देना; –सारना**–काजळ घालणें. –**पारना**–दिव्यावरील काजळी धरणें.

काज–वेतन–*पु.* कार्य-वेतन; 'ड्यूटी पे'.

क़ाज़ी–*पु.* [*अ.*] इस्लामी धर्माप्रमाणें न्याय देणारा, न्यायाधीश; काझी. –**उल्‌कुज़्ज़ात**–*पु.* न्यायाधीशांवरील अधिकारी; सर्वश्रेष्ठ न्यायाधीश. **मु०–जी की**

दाढ़ी तबर्रुक में गयी–एखादी चांगली वस्तु नमुन्यावारीच जाणें. **–जी दुबले क्यों, शहर के अंदेशेसे**– आपल्याशीं संबंध नसलेल्या गोष्टीची निष्कारण काळजी करणें.

काजूभोजू[+]–*वि.* तकलादी (वस्तु); टिकाऊ नसलेला.

काट–*स्त्री.* १. कापण्याची पद्धत; 'कट'; 'फॅशन'. २. जखम. ३. कुस्तीच्या पेचाची तोड. ४. खोडल्याची खूण. ५. तेलाच्या तळाशीं सांचणारा गाळ; बेरी. ६. गंज; तांबेरा. **–कपट**–*स्त्री.* गुप्तपणें कापणें; कपट. **मु०–करना**–१. फसविणें २. खोडून काढणें. **–कबाला**–*पु.* ठराविक मुदतीच्या आंत किंमत परत न केल्यास कायम होणारें खरेदीखत; मुदतीचें खरेदीखत. **–कूट**–*स्त्री.* १. कापाकापी; मारामारी. २. खोडाखोड. **–छाँट**–*स्त्री.* १. कमी-जास्त करणें; काटछाट. २. दुरुस्ती.

काटकी–*स्त्री.* छडी; दरवेशी लोकांच्या हातांतील जनावरांना खेळविण्याची काठी.

काटना–*क्रि. स.* १. कापणें. २. चावणें. ३. (मार्ग) आक्रमण करणें. ४. खोडणें. ५. खोदणें (रस्ता, कालवा). ६. निःशेष भागणें. **मु०– काट खाना**–चावणें. **काटो तो खून नहीं**–स्तंभिस्त होणें. थिजणें. (आश्चर्य, भीति).–**(ने) दौड़ना**–रागानें अंगावर धांवून जाणें. **काटे खाना**–सुनेपणा वगैरे-मुळें खायला उठणें.

काटू–*वि.* १. चावणारा; चावरा. २. अक्राळविक्राळ; भयानक (माणूस).

काठ–*पु.* १. लाकूड. २. जळण. ३. लाकडी खोडा. ४. *लाकडी कळसूत्री बाहुली. **–कटौअल बाँसुरी**–लाकडाच्या भोग्यास शिवण्याचा खेळ.**–कबाड**–*पु.* निरुपयोगी झालेलें लाकडाचें सामानसुमान. **– बेल**–*स्त्री.* एक कडू वेल. **मु०–का उल्लू**–महामूर्ख. **–का घोड़ा**–कुबडी. **–की हाँड़ी**–दिखाऊ वस्तु; फसवी गोष्ट. **–०बारबार नहीं चढ़ती**–खोटी गोष्ट जास्त वेळ चालत नाहीं. **–मारना**–१. खोडयांत घालणें. २. हालचालीं-वर निबंध घालणें.**–में पाँव देना**–१. खोडयांत घालणें. २. स्वतः होऊन बंधनांत अडकणें.**-होना**-बधिरहोणें; ताठरणें; स्तंभित होणें; थिजणें.

काठड़ा–*पु.* लांकडाचें भांडें.

काठी–*स्त्री.* उंटाच्या पाठी-वरील सांगड; पलाण; माकण. २. लांकडी म्यान. ३. अंगकाठी; शरीरयष्टि. **मु०– धरना**–जीन चढविणें.

काड़ी[+]–*स्त्री.* तुरकाठी.

काढ़ना–*क्रि. स.* १. बाहेर काढणें. २. अलग करणें. ३. कशिदा काढणें; भरतकाम करणें. ४. कर्ज काढणें. ५. तळणें; तुपांत किंवा तेलांत परतणें.

कात–*पु.* १. मेंढयांची लोकर कातरण्याची कात्री. २. कोंबडयाच्या पायाचा कांटा. [(सूत).

कातना–*क्रि. स.* कातणें

कात(द)र–*वि.* १. व्याकुळ; अधीर. २. भयभीत झालेला. ३. भित्रा. [व्याकुळता.

कातरता–*स्त्री.* भित्रेपणा;

काता–*पु.* १. कातलेलें सूत; धागा. २. बांबू कापण्याचा अर्ध-चंद्राकार कोयता.

कातिक–*पु.* कार्तिक महिना.

क़ातिब–*पु.* [*अ.*] लेखक; लिहिणारा.

क़ातिल–*वि.* [*अ.*] १. कत्तल करणारा; खुनी. २. कसाई. ३. निर्दय. [चाकू. ३. सुरी.

काती–*स्त्री.* १. कात्री. २.

कातैं*–*सर्व.* कोणाकडून.

काथ*–*पु.* कात. –*स्त्री.* गोधडी.

काथरी*–*स्त्री.* गोधडी.

कादंब–*पु.* १. कदंबाचें झाड, फूल किंवा फळ. २. कलहंस. ३. ऊंस. ४. बाण. [२. व्याकुळ.

कादर–*वि.* १. भित्रा; भ्यालेला.

क़ादिर–*वि.* [*अ.*] बलवान्; शक्तिवान्. **–मुतलक़**–सर्वशक्तिमान् (परमेश्वर).

कादिरी–*स्त्री.* [*अ.*] एक-प्रकारची चोळी.

कान–*पु.* १. कान; कर्ण. २. सुकाणूं. – *स्त्री.** लोकलज्जा; मान-मर्यादा. – *स्त्री.* [*फा.*] खाण. **मु०– उठाना**– –कान टवकारणें (पशूचें); सावध होणें; कानोसा घेणें. **–उड़ना**–कान किटणें.**– उमेठना**; **– ऐंठना**–कान उपटणें; कान-पिचक्या देणें; कान धरणें.**–कतरना**; **काटना**–मात करणें; वरचढ होणें. **–करना**– ऐकणें; लक्ष देणें. **–का कच्चा**–हलक्या कानाचा. **–खड़े करना**–कान टवकारणें; सावध होणें. **–खाना**–कटकट करणें; बडबडीनें डोकें उठविणें. **–खुलना**–सावध होणें; डोळे उघडणें. **–खोलना**–सावध करणें. **–गरम करना**–कान उपटणें; कान-पिचक्या देणें. **–दबाना**–विरोध न करणें; दबणें. **–देना**–ऐकणें; मना-वर घेणें; लक्ष देणें. **–धरना– १.** लक्ष देऊन ऐकणें. २. कान पकडणें. ३. कानाला खडा लावणें. **–न दिया जाना**– १. कान किटणें. २. गोंधळामुळें ऐकू न येणें. **–न**

हिलाना– विरोध न करणें; मुकाट्यानें मान्य करणें. –पकड़कर उठना-बैठना– कान धरून उठाबशा काढणें. (मुलांना दिली जाणारी शिक्षा).–पकड़कर निकाल देना– अपमान करून हाकलून लावणें. –पकड़ना– कानाला खडा लावणें; आपली चूक कबूल करून पुनः तशी चूक होऊं न देण्याची प्रतिज्ञा करणें. –पकड़ी लौंड़ी– अर्ध्या वचनांत राहाणारी दासी; पायाची दासी. –पड़ी आवाज़ सुनाई न देना–भयंकर गोंगाट होणें. –पर जूँ न रेंगना– मुळींच पर्वा नसणें; परिणाम न होणें. –पूँछ दबाकर चले जाना– मुकाट्यानें निघून जाणें. –फटना– कानठळ्या बसणें. –फुँकवाना– गुरुमंत्र घेणें. –फूँकना– १. दीक्षा देणें; कानमंत्र देणें. २. कान फुंकणें; बहकाविणें. –बंद या बहरे कर लेना– जाणूनबुजून दुर्लक्ष करणें.–बजना– कानांत सूं सूं असा आवाज होणें. –बहना– कान फुटणें; कानांतून पूं वाहाणें. –भर जाना–कान किटणें. –भरना– कान भरणें; एखाद्या विषयीं मत कलुषित करणें. –मलना– कान उपटणें. –में कौड़ी डालना– गुलाम बनणें. –में डाल देना– कानावर घालणें; ऐकविणें. –में तेल डालना– लक्ष न देणें; गप्प बसणें. –में पारा या सीसा भरना– कानांत शिसें ओतणें (जुन्या काळची एक शिक्षा). –लगना– कानांत कुजबुजणें. –होना– १. दुसऱ्याचें ऐकणें. २. सावध होणें. –(नों)कान खबर न होना–कांहींहि पत्ता नसणें. –(नों)–पर हाथ धरना– कानांवर हात ठेवणें; नाकारणें; माहीत नसल्याचा आव आणणें.

कानड़ा– *वि.* काणा; तिरळा.

कानन– *पु.* १. वन; जंगल; बाग. २. घर.–१.* 'कान'चें अनेक० २. कानांत.

काना– *वि.* १. काणा; तिरळा; एकाक्ष. २. किडलेलें; डागळलेलें (फळ वगैरे). ३. वाकडा; तिरका. ४. सारीपटांतील फांशावरील ठिपका.

कानाकानी– *स्त्री.* कुजबूज.

कानागोसी–* *स्त्री.* कानगोष्ट.

कानाफूसी– *स्त्री.* १. कानगोष्ट. २. कुजबूज

कानाबाती– *स्त्री.* १. कानगोष्ट. २. कुजबूज. ३. लहान मुलाच्या कानांत कुर्रर असा आवाज करून त्याला हंसविणें.

कानि– *स्त्री.* १. लोकलज्जा; मर्यादा. २. संकोच.

कानि–नी– *स्त्री.* दुःख; त्रास.

कानी– *वि. स्त्री.* १. काणी; एकाक्ष (*स्त्री*). २. सर्वांत लहान. –उँगली– *स्त्री.* करंगळी. –कौड़ी– *स्त्री.* फुटकी कौडी.

कानीन– *पु.* कुमारिकेस झालेला मुलगा. –*वि.* १. कन्याजात. २. एक शिवी. [[इं.] कोंडवाडा.

कानीहाउस; **कानीहौद**– *पु.*

क़ानून– *पु.* [*अ.*] कायदा; नियम. **मु०** –छाँटना– कायद्याचा कीस काढणें; हुज्जत घालणें. –बघारना– कायदेबाजी करणें.

क़ानूनगो– *पु.* [*अ.* + *फा.*] रेव्हिन्यू खात्यांतील अधिकारी; कानगो. [पंडित; विधिज्ञ.

क़ानूनदाँ– *पु.* [*अ.*] कायदे-

क़ानूनन्– *अव्य.* [*अ.*] कायद्याप्रमाणें; कायदेशीर रीत्या.

कानूनिया– *वि.* [*अ.*] १. कायदे जाणणारा. २. कायदेबाज; हुज्जत घालणारा.

क़ानूनी– *वि.* [*अ.*] १ कायद्यासंबंधीं. २ कायदेशीर. ३. कायदेबाज. [कृष्ण.

कान्ह; **कान्हर**;* **कान्हा**– *पु.*

कापट्य– *पु.* १. कपट. २. दुष्टपणा.

कापर*– *पु.* कापड.

कापालिक– *पु.* एका वाममार्गी शैव संप्रदायाचा अनुयायी. हा नेहमीं आपल्याजवळ माणसाची कवटी बाळगतो व तिच्यांतूनच खाणें-पिणें करतो.

कापाली– *पु.* शंकर. –*स्त्री.* चलाख स्त्री.

कापी– *स्त्री.* [*इं.*] १. प्रत; नक्कल. २. वही; कॉपीबुक.

कापुरुष– *पु.* भ्याड, नीच पुरुष.

क़ाफ़– *पु.* [*अ.*] एक काल्पनिक पर्वत (येथें अप्सरा राहातात अशी मुसलमानी दंतकथा आहे). २. काळा समुद्र व कास्पियन सागर यांच्या मध्यें असलेली एक पर्वतमाला; कॉकेशस.

क़ाफ़िया– *पु.* [*अ.*] यमक; अंत्यानुप्रास. **मु०** –तंग करना– नाकीं नऊ आणणें. –मिलाना– यमक जोडणें.

काफ़िर– *पु.* [*अ.*] १ इस्लाम न मानणारा. २. इस्लामविरोधी. ३. नास्तिक. ४. निर्दय. ५. दुष्ट.

क़ाफ़िला– *पु.* [*अ.*] काफला; तांडा.

काफ़ी– *वि.* [*अ.*] पुरेसें; भरपूर. **मु०**–से ज्यादा– जरुरीपेक्षां जास्त.

काफ़ूर– *पु.* [*अ.*] कापूर. **मु०**– –हो जाना– नाहींसें होणें; उडून जाणें. [रंगाचा; स्वच्छ; पारदर्शक.

काफ़ूरी– *वि.* [*अ.*] कापराच्या

क़ाब– पु. [तु.] मोठें तबक.

खपना–क्रि. अ. १. खर्च होणें; व्यय होणें; २. खपणें; विकणें; विकलें जाणें. ३. उपयोगास येणें. ४. संपणें; नाश होणें; मरणें. ५. निभणें. [२. पा० ' खपड़ा '.

खपरा–पु. १. धान्यांतील किडा.

खपरिया– स्त्री. मोरचूद.

खपरैल–पु. स्त्री. १. कौल. २. कौलार. ३. कौलारू छप्पर किंवा घर. ४. खापर.

खपली–पु. खपली जातीचा गहूं.

खपाच– स्त्री. १. कामटी; ढलपी. २. रेशीम विणणाऱ्यांचें एक अवजार.

खपाट–पु. भात्याचे दोन दांडे.

खपाना–क्रि. स. १. खपविणें. २. खर्च करणें. ३. निर्वाह करणें; निभावणें. ४. संपविणें. ५. त्रास देणें; सतावणें. **मु० –माथा अथवा सिर खपाना**–डोकें पिकविणें; फार विचार करणें.

खपिंड–पु. आकाशस्थ गोल; ' सिलेस्टियल बॉडी '.

खपुआ*–वि. भित्रा; भेदरट; भ्याड. –पु. दाराचें खालचें कुसूं मोकांत नीट बसावें म्हणून लावलें जाणारें लाकूड.

खप्पड–पु. १. खापरी. २. कौल. ३. मातीचा परळ. ४. भिक्षापात्र. ५. डोक्याची कवटी. ६. कालीच्या हातांतील रुधिरपात्र. **मु० –भरना**–कवटीमध्यें दारू किंवा रक्त भरून देवीस वाहणें.

ख़फ़क़ान–पु. [अ.] १. हृदयाची धडधड; हृदय धडधडण्याचा आजार. २. मेंदूंतील विकृति.

ख़फ़गी–स्त्री. [फा.] १. रोष; राग. २. अप्रसन्नता; नाराजी.

ख़फ़ा–वि. [फा.] १. अप्रसन्न. २. रूक्ष; नाराज; खप्पा; क्रुद्ध.

ख़फ़ीफ़–वि. [अ.] १. थोडा; कमी २. किंचित्. ३. तुच्छ; हलका; हीन. ४. शरमलेला; लज्जित झालेला.

ख़फ़ीफ़ा– स्त्री. [अ.] लहान व नकदी रकमेचे दावे चालविणारें

दिवाणी कोर्ट; 'स्मॉल कॉज कोर्ट'. २. बदचाल स्त्री.

ख़बर– *स्त्री.* [*अ.*] १. बातमी; वृत्तांत. २. माहिती. ३. निरोप. ४. सावधपणा; शुद्ध. ५. पत्ता; शोध. **–गीर**–*वि.* १.हेर; गुप्तचर. २. पालनपोषण करणारा; संरक्षक. **–गीरी**– *स्त्री.* १. देखरेख; काळजी. २. हेरगिरी. **–दार**– *वि.* सावध; जागृत. **–दारी**–*स्त्री.* सावधगिरी. **–नवीस**–*पु.* बातम्या लिहिणारा नोकर.**–रसाँ**–*पु.* बातमी पोंचविणारा; दूत; बातमीदार. **मु० – उड़ना –** बातमी पसरणें; बाजारगप्प उठणें. **–उड़ाना–** अफवा पसरविणें. – **–करना–** कळविणें; सूचना देणें. **–लेना–**१. समाचार घेणें; सहानुभूति दाखविणें. २. शिक्षा करणें.

ख़बरि; ख़बरिया*– *स्त्री.* 'खबर' पा०

ख़बरी–*पु.* [*अ.*] बातमीदार.

ख़बस–*स्त्री.* [*अ.*] अपवित्रता; गलिच्छपणा.

खबाई– *स्त्री.* १. खादाडपणा. २. खूप खाणें; आकंठ जेवणें.

ख़बीस–*पु.* [*अ.*] १. खवीस; दुष्ट; खुनशी. २. राक्षस, पिशाच; सैतान. [पणा; नाद.

ख़ब्त–*पु.* [*अ.*] वेड; छांदिष्ट-

ख़ब्ती– *वि.* [*अ.*] वेडा; विक्षिप्त; नादिष्ट; छांदिष्ट; चक्रम.

ख़ब्तुलहवास–*वि.* [*अ.*] विमनस्क; अस्वस्थचित्त; 'अॅबसेंट माइंडेड'. [मरतुकडा.

खब्ब(ब्भ)ड़– *वि.* खप्पड;

खब्बा*–*वि.* १. डावा. २ डावखुरा.

खभड़(र)ना*– *क्रि. स.* १. मिसळणें. २. गोंधळ माजविणें; उलटा-पालट करणें.

खभार–रू*–*पु.* १. चिंता; दुःख. २. भय; व्याकुळता.

ख़म–*पु.* [*अ.*] १. वांकडेपणा; झुकाव.२. दंड; बाहु.–*वि.* वांकडा; वक्र. **मु०–खाना–** १. पराजय कबूल करणें; २. हार खाणें. ३. वांकणें. झुकणें. **–ठोंकना–** कुस्तीसाठी दंड थोपटणें; युद्धास आह्वान देणें.

खमकना–*क्रि. अ.* १. खमखम असा शब्द करणें. २. ठुमकणें.

खमखम–*अव्य.* खणखण.

ख़मदम–*पु.* [*अ.+फा.*] पुरुषार्थ; पराक्रम; हिम्मत.

ख़मसा–*पु.* [*अ.*] १. पांच श्लोकांचें कडवें; पांच चरण. २. पांच बोटें.–*वि.* पांचाशीं संबंधित; पंचक.

खमाच–*पु.* खमाज (राग).

ख़मियाज़ा–*पु.* [*फा.*] १. आळस; आळोखे-पिळोखे. २. खोडच्यांत घालून आवळण्याची शिक्षा; दंड; यातना. **मु०–उठाना** –फळ भोगणें; अद्दल घडणें.

ख़मीदा–*वि.* [*फा.*] वांकलेला; झुकलेला; वांकडा.

ख़मीर–*पु.* [*अ.*] १. कणीक भिजवून बराच वेळ ठेवल्यानंतर तिच्यांत उत्पन्न होणारा आंबटपणा; अंबवण. २. अननस, गरे वगैरे आंबवून काढलेलें पाणी. ३. ३. किण्व; 'यीस्ट'. ४. स्वभाव; प्रकृति.

ख़मीरा–*पु.* [*अ.*] १. एक प्रकारची सुगंधित तंबाखू. २. औषधी काढा. –*वि.* खमीर असलेला. [वण) असलेली चपाती.

ख़मीरी–*वि. स्त्री.* खमीर (फुग-

ख़मोश–*वि.* [*फा.*] गप्प; चुप; शांत. [स्तब्धता.

ख़मोशी– *स्त्री.* [*फा.*] शांति;

खम्माच– *स्त्री.* खमाज (राग).

खय*– *स्त्री.* क्षय; विध्वंस.

खया*–*पु.* खांदा; दंड; भुजमूल.

ख़यानत– *स्त्री.* [*अ.*] १. दुसऱ्याच्या ठेवीची किंवा पैशाची अफरातफर; पैसा खाणें. २. अप्रामाणिकपणा; बेइमानी.

ख़याल*–*पु.* [*अ.*] १. विचार; कल्पना; समज. २. स्मृति; आठवण. ३, लक्ष; ध्यान. ४. संगीतांतील ख्याल (गायकी).–**(ले)ख़ाम** –*पु.* चुकीची, विसंगत कल्पना, समज. **मु०–में न लाना**–पर्वा न करणें. **–में समाना**–सतत आठवण राहाणें. **–से उतरना**–विसरून जाणें.

ख़यालात–*पु.* [*अ.* 'ख़याल'चें अनेक०] विचार; कल्पना.

ख़याली–*वि.* [*फा.*] काल्पनिक; कल्पित. **–पुलाव**–*पु.* मनोराज्य. **मु०–पुलाव पकाना**–मनोराज्य रचणें; शेखमहंमदी करणें.

खर–*वि.* १. तीक्ष्ण; तीव्र. २. कठोर; निष्ठुर. ३. राठ. ४. अशुभ. –*पु.* १. गाढव. २. खेचर. ३. गवत. –*पु.* पालापाचोळा. **–सान**– *स्त्री.* खूप धार लावणारी सहाण. [करपलेला.

खर–*वि.* जास्त भाजलेला;

ख़र–*पु.* [*फा.*] गाढव; गर्दभ.– *वि.* १. मट्ठ; मद्दड. २. घमेंडखोर. **–गोश**–*पु.* ससा. **–दिमाग**– १. ठोंब्या. २. हट्टी. **–मस्त–स्ता**–१. कामुक. २. मूर्ख.

खरक–*पु.* १. गोठा. २. कुरण. ३. बांबूच्या कामटयांचें दार.

खरकना–*क्रि.अ.* १. ठसठसणें;

दुखणें. २. निसटणें; जाणें.

खरका–पु. गवताची वाळलेली काडी; दांत कोरणें. **मु०–करना–** कांडीनें दांत कोरणें. [बडीत.

खरखरा–*वि.* खरखरीत; खड-

खरख़शा–पु. [*फा.*] १. भांडण; बखेडा. २. आशंका; भीति.

खरखोट*–पु. भलेंबुरें; खरेंखोटें.

खरच–पु. [*फा.*] खर्च.

खरचना–*क्रि. स.* [*फा.*] १. खर्च करणें. २. कामीं लावणें; उपयोगांत आणणें.

खरचा–पु. [*फा.*] खर्च.

खरची–*स्त्री.* [*फा.*] १. वेश्येला दिली जाणारी रक्कम; व्यभिचाराचा मोबदला. २⁺. पुरवठा; रसद.

खरज–पु. षड्ज; सा (संगीत).

खरतर–ल–*वि.* १. स्पष्टवक्ता. २. शुद्ध मनाचा. ३. प्रचंड; उग्र.

खरता–*वि.* तीक्ष्ण धारेचा.–*स्त्री.* तीक्ष्णता.

खरतुआ⁺–पु. रानगवताचा एक प्रकार; एक निरुपयोगी गवत.

खरदुक*–पु. एक जुना पोषाख.

खरधार–पु. तीक्ष्ण शस्त्र.–*वि.* प्रखर; तीक्ष्ण. [लोकर धुणें.

खरना⁺–*क्रि. स.* गरम पाण्यांत

खरपा–पु. १. एक प्रकारची वंडी. २.⁺. एक प्रकारच्या गांवठी चपला. या फक्त बायका वापरतात.

खरब–पु. खर्व; शंभर अब्जांची संख्या.

खरबूज़ा–पु. [*फा.*] खरबूज; टरबूज. **मु०– (ज़े) को देखकर खरबूज़ा रंग पकड़ता (बदलता) है** –एकाच्या संगतीनें दुसरा तसाच बनतो. [खळबळ.

खरभर*–पु. १. गलबला. २.

खरभराना–*क्रि. अ.* गोंधळ होणें; गडबड माजणें.

खरमंडल–पु. अव्यवस्था; गडबड. –*वि.* १. नष्टभ्रष्ट. २. उलटसुलट.

खरमस्ती– *स्त्री.* [*फा.*] दुष्टपणा; पाजीपणा; द्वाडपणा.

खरमास–पु. पौष व चैत्र महिने. या वेळेस सूर्य अनुक्रमें धन व मीन राशींत असतो हे महिने मंगलकार्यांकरितां वर्ज्य मानले आहेत.

खरमिटाव*–पु. न्याहारी.

खरल–पु. औषधें कुटण्याचा खल. **मु० –करना**–खलांत घालून घोटणें; पिसणें.

खरवाँस–पु. पा० 'खरमास'.

खरसा*–पु. एक पक्वान्न.

खरसान– *स्त्री.* हत्यारांना धार लावण्याचा दगड किंवा यंत्र; सहाण. [(जनावर).

खरसैला–*वि.* लूत भरलेलें

खरहरना⁺– *क्रि. अ.* खराटा मारणें; केर काढणें. [खरारा.

खरहरा–पु. १. खराटा. २.

खरहरी–*वि. स्त्री.* जिच्यावर कांहीं अंथरलेलें नाहीं अशी (खाट).

खरहरी*– *स्त्री.* खारीक.

खरहा–पु. ससा.

खरा–*वि.* १. तीक्ष्ण; तिखट धारेचा. २.शुद्ध. ३. चांगला; उत्तम. ४. खरपूस. ५. चिवट; कडकडीत. ६. निर्दोष. ७. रोख; नगद. (दाम). ८. स्पष्टवक्ता. ९. सत्य; वास्तविक. **–असामी**–पु. व्यवहाराला सच्चा, प्रामाणिक मनुष्य.–**ई**– *स्त्री.* खरेपणा; इमानदारी. **मु०–खोटा परखना**–बरेंवाईट ओळखणें.

खराई⁺– *स्त्री.* सकाळीं बराच वेळपर्यंत खावयास न मिळाल्यामुळें होणारी कासाविसी. **मु०– मारना**– न्याहारी करणें.

खराऊँ*–पु. खडावा.

ख़राज–पु. [*अ.*] खंडणी.

ख़राद–पु. [*फा.*] रंधा; लांकूड, धातू इ. तासण्याचें व गुळगुळीत करण्याचें चाक; लेथ. **मु०– पर चढ़ाना**–१. लेथवर चढविणें. २. दुरुस्त करणें; सुधारणें.

ख़रादना–*क्रि. स.* [*फा.*] लाकूड, धातू इ. लेथवर चढवून तासणें, गुळगुळीत करणें; डौलदार बनविणें.

ख़रादी–पु. [फा.] धातु तासून गुळगुळीत व सुडौल करणारा; लेथकाम करणारा.

खरापन–पु. खरेंपणा; सचोटी.

ख़राब–*वि.* [*अ.*] १. खराब; वाईट. २. निकृष्ट; पतित; हलकट.

ख़राबा–पु. [*अ.*] १. खराबी; नासाडी. २. दुर्दशा. ३. दोष; अवगुण.

ख़राबात–पु. [फा.] १. दारूचा गुत्ता; मदिरालय. २. जुगाराचा अड्डा.

ख़राबाती–*वि.* [फा.] १. झिंगलेला; सदैव नशेंत असलेला. २. जुगारी. ३. रंडीबाज.

ख़राबी– *स्त्री.* [फा.] १. दोष; व्यंग. २. नाश.

खरायँध– *स्त्री.* लघवीची घाण.

खरारि–री*–पु. १. राम. २. विष्णु. ३. कृष्ण.

ख़राश– *स्त्री.* [फा.] १. ओरखडा. २. कांतून निघालेला भुसा; सालपट; टवका; तासून निघालेला ढलपा.

खरिक*–पु. गायरान; गोठा.

खरिका– *स्त्री.* चूर्ण केलेली कस्तुरी. –पु.* गोठा. २. कुरण. ३.⁺ पा० 'खरका'

खरिया– *स्त्री.* १. बारीक दोरीचें जाळें (गवत इ. बांधण्यासाठीं). २. पिशवी; पडशी. ३. खडू.

खरियाना+–*क्रि.स.* १. हस्तगत करणें; छेनें. २. थैलींत भरणें.

खरिहान+–*पु.* खळें.

खरी– *स्त्री.* पेंड. –*वि.* 'खरा' चें स्त्री० –**खोटी**– *स्त्री.* खरडपट्टी; कटु भाषण. **मु०–खरी सुनाना**– साफ साफ बोलणें; सुनावणें.–**खोटी सुनाना**– फैलावर घेणें; वाक्ताडन करणें; खरडपट्टी काढणें.

खरीक*–*पु.* काडी; गवत; तृण.

ख़रीता–*पु.* [*अ.*] १. थैली; पैशाची पिशवी. २. खलिता; लखोटा. ३. खिसा.

ख़रीद– *स्त्री.* [*फा.*] खरेदी. –**फरोख़्त**– *स्त्री.* खरेदीविक्री.

ख़रीदना–*क्रि. स.* [*फा.*] विकत घेणें; खरेदी करणें.

ख़रीदा–*वि.* [*फा.*] विकत घेतलेला; क्रीत. –*पु.* दासपुत्र; क्रीतदास.

ख़रीदार–*पु.* [*फा.*] गिऱ्हाईक.

ख़रीदारी– *स्त्री.* [*फा.*] खरेदी करण्याची क्रिया; खरेदी.

ख़रीफ़– *स्त्री.* [*अ.*] खरीपाचें पीक; आषाढ-श्रावण महिन्यांत पेरून कार्तिक-मार्गशीर्षांत तयार होणारें पीक; पावसाळी पीक.

खरु–*वि.* १. पांढरा. २. मूर्ख. ३. निष्ठुर. –*पु.* १. घोडा. २. दांत. ३. घमेंड. ४*. पा० 'खर'. –*स्त्री.* आपला पति स्वतः निवडणारी स्त्री. [अत्यंत.

खरे(रो)ई*–*अव्य.* खरोखरी;

खरोंच– *स्त्री.* ओरखडा; खरचटणें.

खरोंचना–*क्रि. स.* १. ओरखडणें; बोचकारा काढणें; खरचटणें. २. खरडणें. [खडा; बोचकारा.

खरोच; खरोट– *स्त्री.* ओर-

ख़रोश–*पु.* [*फा.*] १. आरडाओरडा; कोलाहल. २. आवेश.

खरोष्ट्री– *स्त्री.* प्राचीन काळीं वायव्य भारतांत प्रचलित असलेली एक लिपि. ही फारसीप्रमाणें उजवीकडून डावीकडे लिहिली जात असे.

खरौंहा*–*वि.* किंचित् खारट.

ख़र्च–र्चा–*पु.* [*फा.*] खर्च.–**मु० –उठाना**–खर्च सहन करणें; खर्च अंगावर घेणें.

ख़र्ची–*वि.* [*फा.*] खर्च करणारा. – *स्त्री.* वेश्येचें पारिश्रमिक.

ख़र्चीला–*वि.* [*फा.*]१.खर्चिक; उधळचा. २. पुष्कळ खर्चाचें.

खर्जूर–*पु.* १. खजूर. २. विंचू. –**रस**–*पु.* ताडी; नीरा.

खर्पर–*पु.* १. खापरी; परळ. २. कवटी. ३. चोर; ठग. ३. 'क्युपेल'.

खर्ब–*वि.* १. ठेंगणा. २. विकलांग. ३. खर्व (शंभर अब्ज).

खर्रा–*पु.* १. लांबलचक पत्र; मोठा कागद; खर्डा. २. अहवाल; मसुदा. [उधळचा.

खर्राच–*वि.* [*फा.*] खर्चिक;

खर्राट–*वि.* १. हुशार; अनुभवी. २. वृद्ध.

खर्राटा–*पु.* घोरणें **मु०–(टे) भरना –मारना**; –**लेना**–डाराडूर निजणें; घोरणें.

खर्व–*वि.* १. अपंग. २. लहान. ३. ठेंगणा. ४. शंभर अब्ज.

खल–*वि.* नीच; दुर्जन; अधम; दुष्ट; चहाडखोर.

खल–*पु.* १. जागा; पृथ्वी. २. खल. (खलबत्त्यांतील). ३. खळें. ४. मोठा दगड. **मु० –करना**–खलून वारीक करणें.–**होना**–चूरचूर होणें.

खलई*– *स्त्री.* दुष्टावा; वाईटपणा. [२. जग; विश्व.

ख़लक़–*पु.* [*अ.*] १. जीव सृष्टि.

ख़लक़त– *स्त्री.* [*अ.*] १. जग; सृष्टि. २. जनसमूह; प्राणी.

खलखल–*पु.* १. पातळ पदार्थ बाटलींतून वगैरे ओततांना होणारा आवाज. २. खदखदून हंसण्याचा आवाज.

खलड़ी– *स्त्री.* कातडें.

खलता–*पु.* मोठा थैला.

खलता– *स्त्री.* नीचता; दुष्टावा.

खलना–*क्रि. अ.* वाईट वाटणें; मनाला लागणें; टोचणें; बोचणें. –*क्रि. स.* १. वांकविणें. २.* पूड करणें; खलणें. ['व्हिलन.'

खलनायक–*पु.* खलनायक;

खलबल–*पु.* १. खळबळ; गडबड. २. घाबरें, व्याकुळ होणें. ३. गोंगाट; गोंधळ.

खलबलाना–*क्रि. अ.* १. खळबळणें; उकळणें; २. क्षुब्ध, अस्वस्थ होणें.

खलब(भ)ली– *स्त्री.* खळबळ; अस्वस्थता; प्रक्षोभ.

ख़लल–*पु.* [*अ.*] अडथळा; आडकाठी.–**अंदाज़**–*वि.* अडथळा आणणारा; बाधक. –**दिमाग़**–*पु.* डोकें बिघडणें. [पा० 'खिलवत'.

ख़लवत– *स्त्री.* [*अ.*] एकांत.

खलसा– *स्त्री.* एक मोठी मासळी.

ख़ला–*पु.* १. अंतरिक्ष; अवकाश; पोकळी. २. रिकामें असणें; एकाकी असणें.

खलाइत+– *स्त्री.* फुंकणी.

खलाई+– *स्त्री.* दुष्टता.

खलाना–*क्रि. स.* १. रिकामें करणें. २. खळगा करणें. ३. पिचकणें; आंत दाबणें. **मु० पेट**

खलाना–रिकामें पोट दाबून दाखविणें; पोटावर हात मारणें.

ख़लार+–*वि*. खोल; खालीं आलेला; सखल.–*पु*. सखल जमीन.

ख़लाल–*पु*. [*अ*.] दांतकोरणें.

ख़लास–*वि*. [*अ*.] १. खलास; समाप्त. २. सुटलेला; मुक्त. ३. रिकामा.–*पु*. १. सुटका. २. समाप्ति.

ख़लासी– *स्त्री*. [*अ*.] सुटका; मुक्तता.–*पु*. १. खलाशी. २. तोफ डागणारा; गोलंदाज. ३. जहाजावरील किंवा तोफखान्यावरील सामान्य मजूर.

खलित*–*वि*. स्खलन पावलेला; पदच्युत झालेला; स्खलित.

खलियान–*पु*. १. खळें. २. रास; ढीग. **मु०–करना**–१. कापलेल्या पिकाचा ढीग रचणें. २. नष्ट करणें.

खलियाना–*क्रि. स*. १. कातडें काढणें, सोलणें २.+ रिकामें करणें; मोकळें करणें.

ख़लिश– *स्त्री*. [*फा*.] १. बोंच; टोंचणी. २. दुःख; क्लेश. ३. चिंता; अंदेशा; भीति.

खलिहान–*पु*. पा० 'खलियान'.

खली–*स्त्री*. पेंड.–*वि*. बोचणारा; क्लेशदायक.

ख़लीक़–*वि*. [*अ*.] १. सुस्वभावी; सुशील. २. मनमिळावू.

ख़लीज– *स्त्री*. [*अ*.] खाडी; उपसागर.

खलीता–*पु*. पा० 'खरीता'.

ख़लीफ़ा–*पु*. [*अ*.] १. खलीफा; वारस. २. अध्यक्ष; अधिकारी. ३. न्हावी. ४. वयोवृद्ध व्यक्ति.–*वि*. धूर्त; लुच्चा.

ख़लील–*पु*. [*अ*.] खरा मित्र.

खलु–*अव्य*. खरोखरीं; वस्तुत. –*पु*.*–१. खलपुरुष. २. प्रश्न. ३. प्रार्थना. ४. कारण. ५. नियम. ६. निषेध. ७. निश्चय.

खलेल–*पु*. तेलाचें कीट; तेलांत राहिलेला पेंडीचा अंश.

ख़ल्क़–*पु*. पा० 'खलक़'.

ख़ल्त–मल्त–*वि*. मिसळलेला; भेसळ झालेला; मिश्रित.

खल्लड़–*पु*. १. चामड्याची पखाल. २. खल. ३. अंगावर सुरकुत्या पडलेला म्हातारा माणूस.

खल्वाट–*पु*. टक्कल.–*वि*. टक्कल पडलेला; टकल्या.

खल्ली– *स्त्री*. पेंड.

खवा*–*पु*. खांदा.

खवाई+– *स्त्री*. खाण्याची क्रिया.

खवाना*– *क्रि. स*. खावविणें; जेवावयास घालणें; भरविणें.

ख़वास–*पु*. [*अ*.] १. हुजऱ्या; शागीर्द. २. खास नोकर. ३ खाशा स्वाऱ्या; निवडक लोक.–*स्त्री*. दासी.

खवासी– *स्त्री*. [*अ*.] १. शागीर्दी; चाकरी. २. हौद्यांतील किंवा गाडींतील खास नोकराची बसण्याची जागा. [खाणारा.

खवैया–*पु*. १. खादाड. २.

ख़श–*पु*. [*फा*.] खसखशीचें झाड.

ख़शख़ाश– *स्त्री*. [*फा*.] खसखस.

ख़स – *पु*. [*फा*.] १. वाळा; खस. २. वाळलेलें गवत.–**ख़ाना**–*पु*. वाळ्याचे पडदे लावलेली खोली. **–व ख़ाशाक**–*पु*. पालापाचोळा; कचरा.

खसकंत*–*स्त्री*. निसटणें.

खसकना– *क्रि. अ*. निसटणें; सटकणें.

खसकाना– *क्रि. स*. १. सरकविणें; हटविणें; बाजूला सारणें. २. हळूच पळविणें.

खसखस–*पु*. खसखस.

खसखसा–*वि*. १ अगदीं लहान; बारीक. २. भुसभुशीत.

खसखासी–*वि*. निळसर पांढऱ्या रंगाचा.

खसना* – *क्रि. अ*. १. स्थानच्युत होणें; सरकणें. २. पडणें.

ख़सम–*पु*. [*अ*.] १. पति; नवरा. २. स्वामी; मालक. **–पीटी** –*वि. स्त्री*. विधवा; रांड (शिवी). **मु०–करना**–लग्न करणें (स्त्रीचें); एखाद्याला नवरा बनविणें.

ख़सरा–*पु*. [*अ*.] १. चोपडी; बुक. २. शेताचें नोंदणी-बुक; तलाठ्याची खातेवही. ३. जमाखर्चाची चोपडी. **–आबादी**–*पु*. गांवांतील प्रत्येक घराचा क्रमांक, क्षेत्रफळ, मालकाचें नांव वगैरे ज्यांत नोंदलेलें असतें ती वही. [२. संवय. ३. गुण.

ख़सलत– *स्त्री*. [*अ*.] १. स्वभाव.

खसाना– *क्रि. स*. पाडणें; फेंकणें. [तोटा; घसारा.

ख़सारा–*पु*. [*अ*.] नुकसान;

ख़सासत– *स्त्री*. [*अ*.] १. चिक्कूपणा; कंजुषपणा. २. क्षुद्रता.

खसिया*–*वि*. १. खच्ची केलेला. २. नपुंसक. [करणें.

खसियाना– *क्रि. स*. खच्ची

ख़सी–*पु*. [*अ*.] १. खच्ची केलेला बैल किंवा बकरा. २. नपुंसक; हिजडा. –*वि*. खच्ची केलेला. **मु०–कराना**– खच्ची करणें.

ख़सीस– *वि*. [*अ*.] १. कृपण. २. कंजूष. ३. दुष्ट; वाईट. ४. अयोग्य.

खसोट– *स्त्री*. १. उपटून काढणें. २. ओरखडणें. ३. ओढाताण; झोंबाझोंबी. ४. छिनावणें.

खसोटना–*क्रि. स*. १. उखडणें; उपटून टाकणें. २. हिसकावून घेणें; छिनावणें.

खसोटा–*पु.* कुस्तीचा एक पेंच.

ख़स्ता– *वि.* [*फ़ा.*] १. खुसखुशीत; खमंग. २. घायाळ. ३. दु:खी. **–कचौड़ी**– *स्त्री.* खुसखुशीत बटाटेवडा. **–हाल**– *वि.* १. दुर्दशाग्रस्त. २. खिन्न. ['खसी '.

ख़स्सी– *वि.* पु० [*अ.*] पा०

खहि*– *स्त्री.* धूळ.

ख़ाँ–*पु.* [*तु.*] पा० ' ख़ान '.

खाँख⁺– *स्त्री.* छिद्र; भोक.

खाँखर– *वि.* १. भोकाचें; जाळीदार. २. पोकळ.

खाँग–*पु.* १. कांटा; न्यूनता; कमतरता. २. सुळा; दांत. ३. गेंड्याचें शिंग. ४. खुरीरोग (जनावरांचा).

खाँगड़–ड़ा–*वि.* १. अणकुचीदार; सुळेदार. २. हत्यारबंद. ३. बळकट. ४. उद्धट; उच्छृंखल.

खाँगना*– *क्रि. अ.* १. खंगणें; कमी होणें. २. लंगडें होणें.–*क्रि. स.* छेदणें; भोंक पाडणें.

खाँगी*– *स्त्री.* कमतरता; उणीव; तोटा.

खाँच– *स्त्री.* १. सांधा; जोड. २. रेघोटी; खूण. ३. जडणकाम; वीण.

खाँचना*– *क्रि. स.* १. रेखाटणें. २. चिन्ह करणें. ३. आकर्षित करणें; ओढणें.

खाँचा–*पु.* १. पाटी; हारा; मोठी टोपली; करंडा. २. कामट्यांचा पिंजरा.

खाँची– *स्त्री.* लहान हारा; टोपली; करंडी.

खाँड़– स्त्री. स्वच्छ न केलेली साखर; गुळी साखर. **–सारी**–*स्त्री.* पा० ' खँड़सारी '.

खाँडना⁺– *क्रि. स.* १. खांडके पाडणें; तुकडे करणें. २. तुडवणें.

खाँड़ा–*पु.* दुधारी तलवार. **मु०–बजना**–युद्ध होणें. [अंश.

खाँडा– *पु.* १. तुकडा. २. भाग;

खाँद⁺–*पु.* पावलाची खूण; गुरांच्या पावलांच्या खुणा.

खाँधना*– *क्रि. स.* खाणें; बकाबका खाणें.

खाँप– *स्त्री.* फांक; तुकडा.

खाँपना⁺– *क्रि. स.* १. खोंवणें. २. लावणें. ३. खाटेची वीण आवळणें.

खाँभ*–*पु.* खांब.

खाँभना– *क्रि. स.* पिशवींत अगर लखोट्यांत भरणें.

खाँवाँ–*पु.* अरुंद व खोल खंदक; शेताच्या सभोंवतीं खोदलेला खड्डा.

खाँसना– *क्रि. अ.* खोकणें; खाकरणें.

खाँसी– *स्त्री.* खोकला.

खाई– *स्त्री.* खंदक.

खाऊ– *वि.* खादाड.

ख़ाक– *स्त्री.* [*फ़ा.*] १. धूळ; माती. २. राख; भस्म. ३. तुच्छ वस्तु. – *वि.* तुच्छ; क्षुद्र. – *अव्य.* कांहीं नाहीं; कशासाठीं.**–अंदाज़**– पु. १. चुलींतून राख काढण्याचें मांडें. २. शत्रूवर गोळीबार करण्यासाठीं तटामध्यें ठेवलेलें भोक. **–दान**– १. *पु.* धूळ, कचरा, माती फेंकण्याची जागा. २. जग. **–नाय**– *पु.* संयोगभूमि; 'इस्थमस'. **–रोब**–*पु.* झाडूवाला; भंगी. **–सार**– *वि.* तुच्छ; क्षुद्र; विनीत (नम्रता प्रकट करण्यासाठीं स्वत:ला हें विशेषण लावतात). **–सारी**– *स्त्री.* नम्रता; दीनता. **–(के) पा**– *स्त्री.* पायधूळ. –*वि.* दीन; नम्र; विनीत. **मु०–उड़ना**– १. उध्वस्त होणें. २. बदनामी होणें. **–उड़ाना**–वणवण भटकणें. **–का पुतला**– मनुष्य. **–का पैवंद होना**– पुरलें जाणें; मरणें.**–चाटना**– १. दैन्य दाखविणें. २. दीनता मान्य करणें. **–छानना**– एखाद्या वस्तूच्या शोधासाठीं वणवण भटकणें. **–में मिलना**–धुळीस मिळणें. **–सियाह (स्याह) कर देना**– धूळधाण करणें; नष्ट करणें. **–सिरपर उड़ाना**– विलाप करणें.

ख़ाकसाही*– *स्त्री.* काळी राख; काळें भस्म.

ख़ाका–*पु.* [*फ़ा.*] १. रूपरेषा; आराखडा; कच्चा नकाशा. २. मसुदा. ३. कच्ची यादी. ४. खर्चाचें अंदाजपत्रक. **मु० –उड़ाना**– रेवडी उडविणें; टर उडविणें. **–उतारना**– नक्कल करणें.

ख़ाक़ान–*पु.* [*तु.*] सम्राट्; चीनच्या प्राचीन सम्राटांची पदवी.

ख़ाकिस्तर– *स्त्री.* [*फ़ा.*] १. धूळ. २. राख.

ख़ाकी– *वि.* [*फ़ा.*] १. मातीचा; मातीच्या रंगाचा; खाकी. २. पडीक (जमीन). –*पु.* १. खाकी रंगाचें कापड. २. पोलिस किंवा सैनिक यांचा गणवेष.**–अंड़ा**– *पु.* १. ज्यांत पिलूं नसतें असें अंडें. २. दोगला.

खाख*– *स्त्री.* १. माती; धूळ. २. राख; भस्म. ३. चूर्ण.

ख़ाग–*पु.* [*फ़ा.*] कोंबडीचें अंडें.

खागना*– *क्रि. अ.* १. बोचणें; गडणें; घुसणें; टोचणें. २. कमी होणें.

ख़ागीना–*पु.* [*फ़ा.*] तळलेलीं अंडीं किंवा त्यांचें कालवण.

खाज– *स्त्री.* खाज; कंडु.

खाजा–*पु.* खाद्य वस्तु. २. एक मिठाई.

खाजी⁺– *स्त्री.* खाद्य पदार्थ.

मु०–खाना– थप्पड खाणें.

खाट–*स्त्री.* बाज; खाट; वाजलें. **–खटोला**–*पु.* चंबूगबाळें; वाडविस्तर. **मु०–से उतारा जाना**– आसन्नमरण होणें.

खाटा–टो*– *वि.* आंबट.

खाटि–टी– *स्त्री.* तिरडी.

खाड़*–*पु.* खड्डा.

खाड़व–*पु.* सहा स्वरांचा राग; षाडव. [सागर; खाडी.

खाड़ी–*स्त्री.* आखात; उप-

खाडू+–*वि.* गोड.–*पु.* ज्यांवर कौलें ठेवतात ते छपराचे वांबू.

खात–*पु.* १. खोदणें. २. तलाव; विहीर; खड्डा. **–***वि.* खोदलेलें.

ख़ातमा–*पु.* [*अ.*] १. शेवट; निकाल. २. अंत; मृत्यु.

खाता–*पु.* खातें; खातेंवही. **मु० –खोलना**–खातें उघडणें; देव-घेव सुरू करणें.

खातिमा–*पु.* [*अ.*] १. अंत; समाप्ति; शेवट. २ मृत्यु.

ख़ातिर– *स्त्री.* [*अ.*] १. आदर; सन्मान. २. इच्छा; मर्जी. –*अव्य.* साठीं; करितां. **–ख्वाह**– *अव्य.* अनुरूप; यथेच्छ; मनाजोगें; मनपसंत. **–जमा** –*स्त्री.* खात्री; समाधान; खातरजमा. **–दारी**– *स्त्री.* आगतस्वागत; मानसन्मान; आदरातिथ्य. **मु०–में न लाना**– पर्वा न करणें; तुच्छ समजणें.

ख़ातिरी+–*स्त्री.* [*अ.*] १. आदरातिथ्य. २. सांत्वन; संतोष.

खाती–*स्त्री.* १. खड्डा. २. तलाव. –*पु.* १. सुतार. २. जमीन खोदणारी एक जात.

ख़ातून–*स्त्री.* [*तु.*] १. विदुषी. २. सभ्य स्त्री; श्रीमती.

खाद–*स्त्री.* खत; राब.–*पु.* खाद्य; भक्षण.

खादर–*पु.* १. सखल जमीन. २. कुरण. + ३. खत; शेणखत.

ख़ादिम–*पु.* [*अ.*] मुसलमानी तीर्थस्थानाचा पुजारी किंवा अधि-कारी. २. सेवक. [–*स्त्री.* **ख़ादिमा**].

खादी– *स्त्री.* हातसुताचें व हात-विणीचें कापड. [कांटेरी.

खादी– *वि.* १. खाणारा २.

खाद्य–*पु.* अन्न; भोजन.–*वि.* खाण्यास योग्य. **–समवितरण**–*पु.* शिधावांटप; 'फूड रेशनिंग'.

खाद्योज– *पु.* जीवनसत्त्व; 'व्हिटॅमिन'. [खजिना; भांडार.

खान–*स्त्री.* १. खाण. २.

खान–*पु.* १. जेवणखाण. २. जेवण्याची पद्धत. ३. भोजनसामग्री. **–पान**–*पु.* १. जेवणखाण. २. अन्नपाणी; दाणापाणी. ३. रोटी-व्यवहार. ४. जेवण्याची पद्धत.

ख़ान–*पु.* [*तु.*] १. स्वामी; मालक. २. सरदार; उमराव. ३. पठाण.–(**ने**) **ख़ानान**–*पु.* सरदा-रांचा सरदार; सेनापति.**–सामाँ**– *पु.* बबरची; इंग्रजांचा किंवा मुसलमानांचा स्वयंपाकी.

ख़ानक़ाह–*स्त्री.* [*अ.*] मठ; विहार (मुसलमानी).

ख़ानगी–*वि.* [*फा.*] खाजगी; घरगुती.–*स्त्री.* नायकीण; वेश्या.

ख़ानदान–*पु.* [*फा.*] कुळ; वंश; घराणें.

खानदानी–*वि.* [*फा.*] १. घरं-दाज; उच्च कुलीन. २. वंशपरंपरा-गत. [बायको. २. सभ्य स्त्री.

ख़ानम–*स्त्री.* [*फा.*] १. खानाची

खाना–*क्रि. स.* १. खाणें; जेवणें. २. गिळणें; गट्ट करणें. ३. फस्त करणें. ४. लांच घेणें. ५. सहन करणें; सोसणें. **मु० मुँहकी खाना**– तोंडघशीं पडणें; हारणें; पराजित होणें.

ख़ाना–*पु.* [*फा.*] १. घर; स्थान. (उदा० दवाखाना). २. कप्पा; खण. ३. रकाना; कोष्टक. ४. घराचा भाग.**–आबाद**–*वि.* १. धनधान्याची समृद्धि होवो (आशीर्वाद). **–आबादी**–*स्त्री.* १. गृहस्थी; विवाह. २. समृद्धि. **–ख़राब**–*वि.* १. ज्याचें घरदार उध्वस्त झालेलें आहे असा. २. लफंगा; उडाणटप्पू. **–जंगी**–*स्त्री.* गृहयुद्ध; यादवी; कलह.**–ज़ाद**–*वि.* घरीं वाढलेला (नोकर). –*पु.* नोकर; दास.**–तलाशी**–*स्त्री.* घरची झडती.**–दार**–*पु.* गृहस्थ. **–पुरी**– *स्त्री.* कोष्टक भरण्याचें काम; रकाने भरणें.**–बदोश**–*वि.* १. स्थायी घरदार नसलेला; भटक्या. २. निराश्रित.**–बरबाद**–*वि.* १. ज्याचें घर उध्वस्त झालेलें आहे असा. २. उधळ्या. **–शुमारी**–*स्त्री.* गांवांतील घरांची खानेसुमारी.**–साज़**– *वि.* घरीं तयार केलेलें.

खानि*–*स्त्री.* १. खाण. २. दिशा; बाजू. ३. तऱ्हा; प्रकार.

खानिक*–*स्त्री.* खाण.–*पु.* भिंतीला पाडलेलें भोंक.

खानी*–*स्त्री.* १. खाण. २. खजिना. ३. आगर. ४. घर.

खाप–*स्त्री.* म्यान. [सखल.

खाबड़–*वि.* खडबडीत; उंच-

ख़ाम–*वि.* [*फा.*] १. कच्चा; अपरिपक्व; अनुभवहीन. २. वाईट. **–ख़याल**–*वि.* अडाणी; मूर्ख. **–ख़याली**–*स्त्री.* निरर्थक विचार; चुकीची समजूत.

खाम–*पु.* १. पाकीट. २.* खांब. ३. जोड.–*वि.* कमी होणारा.

खामख़ाह–*अव्य.* [*फा.*] १.

जाणून बुजून; हेतुपुरस्सर. २. जबरदस्तीनें; निष्कारण. ३. अवश्य.

खामना–*क्रि. स.* १. घागरीचें किंवा मडक्याचें तोंड कणकीनें किंवा मातीनें लिंपून टाकणें. २. पाकिटांत घालून बंद करणें.

ख़ामा–*पु.* [*फा.*] लेखणी; टांक. [कच्चेपणा; दोष.

ख़ामी– *स्त्री.* [*फा.*] उणीव;

ख़ामुशी–*स्त्री.* [*फा.*] पा० ' खामोशी. ' [चूप; स्तब्ध.

ख़ामोश–*वि.* [*फा.* [गप्प;

ख़ामोशी– *स्त्री.* [*फा.*] मौन; स्तब्धता; शांतता.

ख़ायफ़–*वि.* [*अ.*] १. भयभीत. २. भित्रा.

ख़ाया–*पु.* [*फा*] १. अंडकोश. २. कोंबडीचें अंडें. **–बरदार**–*वि.* खुशामत्या–**बरदारी**–*स्त्री.* खुशामत.

खार–*पु.* १. क्षार. २. खारटपणा. ३. राख. ४.* डबकें; ५. लोणा.

ख़ार–*पु.* [*फा.*] १. कांटा. २. असूया; द्वेष. ३. कोंबडयांच्या पायांना होणारा एक रोग. **–दार**– *वि.* कांटेरी. **मु०–खाना**–जळफळणें; डूक धरणें; द्वेष करणें. **–निकालना**–सूड घेणें.

खारक*–*पु.* खारिक.

खारा–*वि.* १. खारट २. बेचव. –*पु.* १. रेघांचें कापड. २. गवत किंवा वाळलेलीं पानें बांधण्याची जाळी; जाळीदार पिशवी. ३. हारा; डालगें. [२. खजूर.

ख़ारिक*–*पु.* [*फा.*] १. खारीक.

ख़ारिज–*वि.* [*अ.*] १. फेटाळून लावलेला; रद्द केलेला; बहिष्कृत. २. वेगळा; भिन्न; अलग. **मु०–करना**–१. फेटाळून लावणें; ' डिसमिस ' करणें. २. काढून टाकणें.

ख़ारिजा–*वि.* [*अ.*] १. बाह्य; परराष्ट्रीय; वैदेशिक. २. बहिष्कृत.

ख़ारिजी–*वि.* [*अ.*] पा० ' खारिजा.'–*पु.* हजरत अली यांना खलीफा न मानणारा एक मुस्लिम संप्रदाय. [खरूज; खाज.

ख़ारिश–श्त– *स्त्री.* [*फा.*]

खारी–*वि.* खारट.**–नमक**–*पु.* लोणा असलेल्या मातीपासून बनविलेलें मीठ. हें जनावरांना खाऊं घालतात.

खारुआँ–आ–*पु.* १. एक प्रकारचा तांबडा भडक रंग. २. या रंगाचें कापड.

खाल–*स्त्री.* १. चामडी; कातडें. २. भाता. ३. मृत शरीर. ४. मोट. **मु०–उधेड़ना**– पाठीचें धिरडें काढणें; बेदम मारणें.**–खींचना**– जिवंत शरीरावरील कातडें सोलून काढणें.

खाल*– *स्त्री.* १. खोलगट, सखल जमीन. २. आखात; खाडी. ३. रिकामी जागा. ४. प्रेत. [तीळ.

ख़ाल–*पु.* [*अ.*] अंगावरील

ख़ाल-ख़ाल–*अव्य.* [*फा.*] विरळा; क्वचित्.

ख़ालसा–*पु.* [*अ.*] १. सरकारच्या मालकीची जमीन. २. शिखांचा एक संप्रदाय. –*वि.* पा० ' खालिसा '.

ख़ाला– *स्त्री.* [*फा.*] मावशी. **मु०–(जी) का घर**– १. सोपें काम. २. बापाचें घर (उपरोध).

खाला– *वि.* खोलगट; सखल. – *स्त्री.* १. सखल जमीन. २. रिकामी जागा. ३. खाडी. [ईश्वर.

ख़ालिक–*पु.* [*अ.*] सृष्टिकर्ता;

ख़ालिस– *वि.* [*अ.*] १. शुद्ध; पवित्र; निर्मळ. २. खरा; सच्चा.

ख़ालिसा– *वि.* [*अ.*] १. शुद्ध; सच्चा. २. खालसा केलेलें; सरकारच्या मालकीचें.

ख़ाली– *वि.* [*अ.*] १. रिकामा; रिता; मोकळा. २. वृथा; वांया. ३. निरुपयोगी. ४. वापरांत नसलेली (वस्तु). ५. रहित; विहीन; वांचून;. –*अव्य.* केवळ. **–दिन**–*पु०* शुभ कार्यासाठी योग्य नसलेला दिवस. **–पेट**–*अव्य.* १. अनुशा पोटीं. २. उपाशी पोटीं. **मु०–जाना**–निरर्थक होणें; नेम चुकणें.

ख़ालू–*पु.* [*अ.*] मावसा; मावशीचा नवरा.

खाले– *अव्य.* खालीं; खालतीं.

खावाँ–*पु.* पा० ' खाँवा '.

ख़ाविंद–*पु.* [*फा.*] १. पति. २. धनी; मालक.

ख़ाशाक–*पु.* [*फा.*] केरकचरा.

ख़ास–*वि.* [*अ.*] १. विशेष; प्रमुख. २. खाजगी; स्वतःचा. ३. निखालस; शुद्ध; **–कर**– *अव्य.* विशेषतः; मुख्यतः **–कलम**–*पु.* १. खाजगी चिटणीस; 'प्रायव्हेट सेक्रेटरी'. **–दान**–*पु.* पानदान. **–नवीस**–*पु.* पा० ' खास क़लम '. **–बरदार** – *पु.* १. राजाच्या (स्वारीपुढें चालणारा शिपाई. २. राजाचें पानदान घेऊन बरोबर चालणारा. ३.+ भालदार; चोपदार. **–महल**–*पु.* १. अंतःपुर. २. पट्टराणी.

ख़ासगी–*पु.* [*अ.*] १. राजाजवळ राहाणारा. २. सेनापति. – *स्त्री.* राजाची खास रखेली. –*वि.*+ खासगी; स्वतःचें.

ख़ासा–*वि.* [*अ.*] १. चांगला; उत्तम. २. निकोप; निरोगी.

३. सुंदर; सुरेख. ४. भरपूर; पुरेसें. –पु. १. खाशा स्वारीचें भोजन, वाहन इत्यादि. २. एक प्रकारची उंची मलमल. ३. राजाच्या स्वारीचा घोडा, हत्ती.

ख़ासि(सी)यत– *स्त्री.* [*अ.*] १. विशेषता; वैशिष्टच. २. स्वभाव; संवय. ३. गुणधर्म.

ख़ासी– *स्त्री.* [*अ.*] १. केवळ राजानें वापरावयाचें शस्त्र. २. पा० 'ख़ासा'.

ख़ास्सा–*पु.* [*अ.*] १. गुणधर्म. २. स्वभाव. ३. वैशिष्टच. [ख्वाह'.

ख़ाहमख़ाह–*अव्य.* पा० 'ख्वाहम

खिंचना–*क्रि. अ.* १. ओढलें जाणें; ताणलें जाणें; आकर्षित होणें. २. चित्रित होणें.

खिँचवा–*वि. पु.* ओढणारा; नावेला दोर बांधून किनाऱ्यावरून ओढणारा.

खिंचवाना–*क्रि. स.* दुसऱ्याकडून ओढविणें वा ताणविणें.

खिंचाई– *स्त्री.* १. ओढाताण. २. ओढण्याची क्रिया किंवा मजुरी.

खिंचाना–*क्रि. स.* दुसऱ्याकडून ओढविणें; ओढावयास लावणें.

खिंचाव–*पु.* १. ताण. २. नाराजी; अप्रसन्नता.

खिँड जाना+–*क्रि. अ.* विस्कटणें; विखुरणें. [पसरविणें.

खिँड़ाना*–*क्रि. स.* विखुरणें;

ख़िआल+–*पु.* थट्टा; विनोद.

खिचड़वार–*पु.* मकरसंक्रांत.

खिखिंद*–*पु.* १. किष्किंध पर्वत. २. उंचसखल, खडकाळ जमीन.

खिचड़ा–*पु.* मोहरममध्यें वांटली जाणारी एक प्रकारची खिचडी. हिच्यांत गहूं व अनेक डाळी असतात.

खिचड़ी–१. खिचडी. २. मिश्रण; भेसळ. –*वि.* मिश्रित. –**बाल**–*पु.* काळे-पांढरे केस. –**मु०**– **पकाना**–गुप्त सल्ला मसलत करणें. –**होना**–१. भेसळ होणें. २. केस पिकूं लागणें. **ढाई चावल की खिचड़ी अलग पकाना**–आपला सवता सुभा उभारणें. [रागावणें.

खिजना–*क्रि. अ.* चिडणें;

खिजमत-ति*– *स्त्री.* पा० 'खिदमत.' [–*क्रि. स.* चिडविणें.

खिजलाना– *क्रि. अ.* चिडणें.

ख़िज़ाँ– *स्त्री.* [*फा.*] १. हेमंत ऋतु; पानगळ ऋतु. २. पडता काळ. ३. वार्धक्य. ['खिझाना.'

खिजाना–*क्रि. स.* पा०

ख़िज़ाब–*पु.* [*अ.*] केसांना लावण्याचा कलप. (करना, लगाना). [शरम; खजीलपणा.

ख़िजालत–*स्त्री.* [*अ.*] लज्जा;

खिझना– *क्रि. अ.* चिडणें; त्रागा करणें. [खिजविणें.

खिझाना– *क्रि. स.* चिडविणें;

खिझअ(व)र+– *वि.* लौकर चिडणारा; चिडखोर.

खिझौना+– वि पु० चिडविणारा; खिजविणारा.

खिड़कना*– *क्रि. अ.* पाय काढणें; निघून जाणें; बाजूला होणें.

खिड़काना–*क्रि. स.* १. निकालांत काढणें; विकून टाकणें. २. बाजूला सारणें.

खिड़की– *स्त्री.* १. खिडकी. २. दिंडी दरवाजा. –**बंद**–*वि.* भाडयानें घेतलेले सबंध (घर).

ख़िताब–*पु.* [*अ.*] किताब; पदवी. – **याफ़्ता** – *वि.* पदवीधर.

ख़ित्ता–*पु.* [*अ.*] प्रदेश; प्रांत; भूखंड.

ख़िदमत– *स्त्री.* [*अ.*] सेवा; चाकरी. – **गार**; – **गुज़ार** – *पु.* चाकर; सेवक. – **में** – सेवेसीं; समोर.

ख़िदमती– *वि.* [*फा.*] १. चाकरीबद्दल मिळणारें (वेतन, जहागीर). २. कष्टाळू (सेवक).

ख़िदमात– *स्त्री.* [*अ.* 'खिदमत'चें अनेक०] सेवा; नोकऱ्या.

खिन*– *पु.* क्षण.

खिन्न– *वि.* १. उदासीन; चिंतित. २. दीन; असहाय्य. ३. नाराज; अप्रसन्न.

खिपना*– *क्रि. अ.* १. खपणें; खर्च होणें; व्यतीत होणें. २. तादात्म्य पावणें; तल्लीन होणें.

खियरानि*– *स्त्री.* खेदपूर्ण स्थिति. [विश्वासघात.

ख़ियानत– *स्त्री.* [*अ.*] दगा;

खियाना+– *क्रि. अ.* झिजणें; घासलें जाणें. – *क्रि. स.* पा० 'खिलाना.'

ख़ियाल+–*पु.* विचार.

खिर– *स्त्री.* विणकराचा धोटा.

ख़िरक़ा–*पु.* [*अ.*] गोधडी; जुना कपडा.

खिरका–*पु.* गोठा.

ख़िरद– *स्त्री.* [*फा.*] बुद्धि; अक्कल. –**मंद**– *वि.* बुद्धिमान्.

खिरनी– *स्त्री.* िरणीचें झाड व फळ. [ढीग; २. खळें.

ख़िरमन–*पु.* [*फा.*] १. रास;

ख़िराज–*पु.* [*अ.*] कर; खंडणी.

ख़िराम– *पु.* [*फा*] नखऱ्यांत चालणें; नखरेबाज चाल.

ख़िरामाँ– *वि.* [*फा.*] नखऱ्यानें, लचकत-मुरडत चालणारा-री.

खिरिरना*– *क्रि. स.* धान्य चाळणें किंवा पाखडणें.

खिरो(रौ)रा– *पु.* केवडयाचा सुगंध असलेली कातगोळी.

खिरौरी– *स्त्री.* पा० 'खिरोरा.'

खिलंदर–रा– *वि.* १. निष्णात खेळाडू. २. खेळखंडोबा करणारा.

ख़िलअत– *स्त्री.* [*अ.*] राजाकडून मिळणारीं मानाचीं वस्त्रें.

ख़िलक़त– *स्त्री.* [*अ.*] १. सृष्टि; जग. २. जनसमूह. ३. गर्दी.

खिलकौरी+– *स्त्री.* खेळ; थट्टा.

खिलखिलाना– *क्रि. अ.* मोठमोठ्यानें हंसणें; खदांखदां हंसणें; खो खो करून हंसणें.

खिलखिलाहट– *स्त्री.* खदखदां हंसण्याचा आवाज. ['खिलअत'.

खिलत–ति*– *स्त्री.* पा०

खिलना– *क्रि. अ.* १. उमलणें; विकसणें. २. प्रफुल्लित होणें. ३. शोभणें. ४. उलणें.

ख़िलवत– *स्त्री.* [*अ.*] १. एकांत; निर्जनस्थान. २. झोपण्याची खोली. –**ख़ाना**–*पु.* गुप्त सल्लामसलत करण्याची जागा; खलवतखाना.– **नशीं**– *वि.* एकांतवासी.

खिलवती*–*पु.* घनिष्ठ मित्र.

खिलवाड़–*पु.* १. खेळ; मौज. २. पोरखेळ.

खिलवाना– *क्रि. स.* दुसऱ्याकडून खाऊं घालणें किंवा भरविणें.

खिलाई– *स्त्री.* खाणें; जेवणखाण.

खिलाई– *स्त्री.* लहान मुलांना खेळविणारी दाई किंवा मोलकरीण.

खिलाड़– *वि. स्त्री.* १. चंचल; नखरेल (स्त्री). २. बदचाल (स्त्री). [डोंबारी. ३. कसरत्या.

खिलाड़ी–*पु.* खेळाडू. २.

खिलाना– *क्रि. स.* १. जेवविणें; जेऊं घालणें; खाऊं घालणें. २. शपथ घेववविणें ३. खेळविणें.

ख़िलाफ़– *वि.* [*अ.*] प्रतिकूल; विरुद्ध; उलट. –**क़ानून**– *वि.* बेकायदेशीर. –**वरज़ी**; –**वर्ज़ी** *स्त्री.* १. अवज्ञा. २. विरुद्ध आचरण.

ख़िलाफ़त– *स्त्री.* [*अ.*] १. खलीफाचें पद. २. वारसा. ३. सर्व मुसलमान बादशहांवर असणारी खलीफाची राजवट.

खिलाफ़ी–*स्त्री.* विरोध.

ख़िलाल– *स्त्री.* [*अ.*] १. दांतकोरणें. २. अंतर. ३. मात; पत्त्याच्या खेळांतील पराभव.

खिलौना– *पु.* खेळणें (बाहुली वगैरे); खेळण्याची वस्तु.

ख़िल्त– *पु.* [*अ.*] १. भेसळ. २. युनानी वैद्यकानुसार शरीरांतील चार धातूंपैकीं एक. –**मिल्त**– *वि.* मिसळलेला; मिश्रित.

खिल्ली–*स्त्री.* १. हंशा; विनोद. २. थट्टा; मस्करी. ३. पानाचा विडा. –**बाज़**– *वि.* थट्टेखोर; विनोदी. **मु०–उड़ाना**– टर उडविणें; टिंगल करणें. [स्त्री.

खिल्लो+– *स्त्री.* खूप हंसणारी

खिवना*–*क्रि. अ.* चमकणें.

ख़िश्त– *स्त्री.* [*फा.*] वीट (मातीची).

खिसकना–*क्रि. अ.* १. निसटणें; नजर चुकवून जाणें; सटकणें. २. सरकणें.

खिसकाना– *क्रि. स.* १. सरकविणें; हटविणें; बाजूला सारणें. २. हळूंच उपटणें; चोरणें.

खिसना*– *क्रि. अ.* १. वरून पडणें. २. निघून जाणें. ३. सटकणें.

खिसलना+– *क्रि. अ.* घसरणें; सरकणें.

खिसाना*– *क्रि. अ.* १. संतापणें; रागावणें; नाखुष होणें. २. लज्जित होणें; शरमणें; खजील होणें. [हानि. २. घसारा.

ख़िसारा+–*पु.* [*फा.*] १. तोटा;

खिसारा+–*वि.* लांब सुळे असलेला (रानडुक्कर).

खिसियाना–*क्रि. अ.* १. चिडणें. २. कातावणें; रागावणें. ३. खजील होणें; शरमणें. ४. रुसणें. –*वि.* खजील; लज्जित. **मु०**– (नी) **बिल्ली खंभा नोचे**–खजील झालेली व्यक्ति आपला राग कोणावर तरी काढते.

खिसियाहट– *स्त्री.* १. चीड; लाज; शरम. २. रुसणें; कातावणें. ३. खजीलपणा. [निसरणें.

खिसिलना+–*क्रि. अ.* घसरणें;

खिसी*– *स्त्री.* १. लाज; शरम. २. उद्धटपणा. [लज्जित.

खिसौंहा*– *वि.* खजील;

खींच– *स्त्री.* ओढ; ताण; तणाव. –**तान**–*स्त्री.* १. ओढाताण. २. शाब्दिक हल्ला-प्रतिहल्ला. ३. ओढून ताणून अर्थ लावणें.

खींचना–*क्रि. स.* १. ओढणें. २. ताणणें. ३. पिळणें. ४. आकर्षित करणें. ५. (दारू इत्यादि) गाळणें. ६. (अर्क वगैरे) काढणें. ७. चित्र काढणें.

खींचाखींची; खींचातानी–*स्त्री.* १. ओढाताण. २. परस्परांविरुद्ध कारवाई. ३. पा० 'खींचतान'.

खीखर– *पु.* एक प्रकारचें रानमांजर. [२. चिडण्याजोगी गोष्ट.

खीज– *स्त्री.* १. चीड; त्रागा.

खीजना– *क्रि. अ.* चिडणें; त्रागा करणें. [चिरड; चीड.

खीझ*– *स्त्री.* खिजवणी;

खीझना*– *क्रि. अ.* पा० 'खीजना'. [२. सूक्ष्म.

खीन*– *वि.* १. क्षीण; दुर्बल.

खीनता*– *स्त्री.* दौर्बल्य; क्षीणता. [–*स्त्री.* **खीनताई***].

खीप– *पु.* लाजाळूचें झाड.

ख़ीमा– पु. [अ.] तंबू.

खीर– स्त्री. खीर. –चटाई– स्त्री. उष्टावण. मु० –चटाना–उष्टावण करणें; लहान मुलांना प्रथम अन्न खाऊं घालणें. [बंगाली मिठाई.

खीरमोहन– पु. एक प्रकारची

खीरा– पु. खिरा काकडी; कोंवळी काकडी. [कांस.

खीरी–स्त्री. दुभत्या जनावराची

खीरी*– स्त्री. खिरणीचें फळ.

खील– स्त्री. १. लाही. २. साळीच्या लाह्या.

खील+– स्त्री. १. बायकांच्या नाकांतील चमकी. २. कांटा; खीळ. ३. फोड वगैरेमध्यें दाटलेला पू. ४. पुष्कळ वर्षांनंतर लागवडीस आणलेली पडीक जमीन.

खीलना– क्रि. स. द्रोण, पत्रावळी टोंचणें. [कांटा. ३. खुंटा.

खीला+– पु. १. खिळा. २.

खीली+– स्त्री. पानाचा विडा.

खीवन–नि–स्त्री. मत्तता; मद; मस्ती.

खीवर*– वि. वीर; बहादुर.

खीस– स्त्री. १. राग; रुसवा. २. बाहेर आलेले दांत. ३. लज्जा. ४. दीनपणें दांत बाहेर काढणें.–वि. नष्ट. मु० खीसें काढ़ना, निकालना, निपोड़ (र) ना– १. दांत विचकणें. २. गयावया करणें.

खीसना*–क्रि. अ. नष्ट होणें; वायां जाणें.–क्रि. स.* नष्ट करणें.

ख़ीसा– पु. [फा.] खिसा. २. पिशवी; थैली. [काढणारा.

खुँटकढ़वा– पु. कानांतील मळ

खुँटिला+– पु. कानांत घालण्याचा एक दागिना.

खुँटिहई*– वि. गुडघ्यावर धोतर नेसण्याची पद्धत. [गवत.

खुँड– पु. एक प्रकारचें जाड

खुंडा+– वि. मोडका; तुटका (चाकू).

खुँदवाना– क्रि. स. घोड्याच्या टापेखालीं तुडवावयास लावणें.

खुंबी-भी– स्त्री. पा० 'खुमी'.

खुआर*– वि. [फा.] १. आपन्न; बापुडा; दीन. २. नष्ट; नाश पावलेला. ३. अपमानित.

खुक्ख-क्खा–वि. १. मोकळा; रिता; पोकळ. २. कफल्लक.

खुखड़ा– पु. आंतून पोखरलें गेलेलें झाड.

खुखड़ी– स्त्री. १. चातीवरील सुताची किंवा लोकरीची गुंडी. २. नेपाळी सुरा; कुकरी.

खुगीर– पु. [फा.] खोगीर. मु० –की भरती– खोगीर–भरती.

खुचड़-र; खुचुर– स्त्री. व्यंग काढणें; व्यर्थ दूषण देणें.

खुजलाना; खुजाना– क्रि. अ. १. खाजणें; कंड सुटणें. २. अस्वस्थ होणें.–क्रि. स. खाजविणें.

खुजलाहट– स्त्री. खाज; कंडू.

खुजली– स्त्री. १. खाज. २. खरूज.

खुट– 'खोट' किंवा 'खोटा' या शब्दाचें समासांतील रूप. –चाल*– स्त्री. १. खोटेपणा; छद्मी वागणूक. २. हलकटपणा; पाजीपणा. ३. दुराचरण. ४. खोडसाळपणा. – चाली – वि. १. हलकट. २. उपद्व्यापी. ३. दुराचारी; बदफैली.–पन-ना–पु. १. खोटेपणा. २. दोष; अवगुण. ३. दुष्टपणा; नीचता. [शंका; भीति.

खुटक*–का+– स्त्री. संदेह;

खुटकना– क्रि. स. खुडणें; तोडणें. [भीति; आशंका.

खुटका– पु. १. बोल्ट. २.

खुटना– क्रि. अ. १. संपणें; पूर्ण होणें. २. उघडणें. ३. वेगळें होणें. [दोष.

खुटाई– स्त्री. १. खोटेपणा. २.

खुटाना*– क्रि. अ. संपणें; खलास होणें.

खुटिला– पु. कर्णफूल.

खुट्टी+– स्त्री. गट्टी फू.

खुठ्ठी– स्त्री. जखमेवरील खपली.

खुड्डी; खुड्ढी– स्त्री. १. शौचकूपांतील खड्डा किंवा पाय ठेवून बसण्याची जागा. २. संडासांतील भांडें.

खुतबा– पु. [अ.] १. प्रशंसा; तारीफ. २. राजाची स्तुति व गादीवर आल्याची घोषणा. ३. प्रार्थनेनंतरचें धार्मिक प्रवचन. ४. पुस्तकाची प्रस्तावना. ५. व्याख्यान; भाषण. [अनेक०] पत्रें.

खुतूत – पु. [अ. 'खत'चें

खुत्थ– पु. कापलेल्या झाडांचें मूळ व त्यावरील खोड.

खुत्थी– स्त्री. १. शेतांतील कापलेल्या पिकाचे सड; खुंट. २. कसा; थैली.

खुद– अव्य. [फा.] स्वतः खुद्द. –इख़्तियार– वि. स्वतंत्र; खुद मुखत्यार. –काश्त– स्त्री. कुळास न देता स्वतः लागवड केलेली जमीन. –कशी; –कुशी– स्त्री. आत्महत्त्या. –ग़रज़–वि. आपमतलबी; स्वार्थी. –ग़रज़ी–स्त्री. स्वार्थ; आपलपोटेपणा; आपमतलबीपणा. –दार– वि. स्वाभिमानी. – नुमा– वि. १. स्वतःचा बडेजाव दाखविणारा. २. घमेंडखोर. –नुमाई– स्त्री. आत्मप्रदर्शन. –परस्त– वि. स्वार्थी; अहंमन्य. –पसंद– वि. १. हट्टी. २. घमेंडखोर. –फ़रामोशी– स्त्री. १. आत्मविस्मृति; स्वतःला विसरणें. २. बेशुद्ध पडणें. –ब-खुद–

अव्य. आपोआप; आपण होऊन. **–बीं–** *वि.* घमेंडखोर. **–बीनी–***स्त्री.* घमेंड; गर्व. **–मुख्तार–** *वि.* १. स्वतंत्रपणें वागण्यास मोकळीक असलेला. २. स्वैर; अनियंत्रित. **–रो; –रौ–** *वि.* आपोआप उगवलेलें; जंगली. **–साख्ता–** *वि.* स्वयंनिर्मित; 'सेल्फमेड'. **–सिताई–** *स्त्री.* आत्मस्तुति.

खुदना– *क्रि. अ.* खणलें जाणें; खोदलें जाणें. [फुटकळ माल.

खुदरा– *पु.* किरकोळ वस्तु;

खुदवाई– *स्त्री.* खणण्याचें काम किंवा मजुरी. [खोदविणें.

खुदवाना– *क्रि. स.* खणविणें;

ख़ुदा– *पु.* [*फा.*] ईश्वर; परमात्मा. **–ई–** *स्त्री.* ईश्वरनिर्मित सृष्टि.–*वि.* ईश्वरी; दैवी. **–तर्स–** *वि.* धर्मभीरु; ईश्वराला भिणारा. **–ताला–** *पु.* ईश्वर; परमात्मा. **–दाद–** *वि.* ईश्वरदत्त; स्वाभाविक. **–परस्त–***वि.* ईश्वरपूजक; अस्तिक. **–या–** *अव्य.* हे ईश्वरा. **–बंद–***पु.* १. ईश्वर. २. मालक; स्वामी; बड्या लोकांकरितां उपयोजिलें जाणारें संबोधन. **मु० – का कारखाना–** जग. **–का घर–** १. स्वर्ग. २. मशीद; उपासनास्थान. **–की मार–** ईश्वराचा कोप होवो (शाप). **–की राह–** देवाच्या नावानें; देवाच्या प्रीत्यर्थ. **–के घर जाना–** मरणें. **–ख़ुदा करके–** मोठ्या मुष्किलीनें; कसेंबसें. **–गंजेको नाखून न दे–**ईश्वरानें नीच माणसाला संपत्ति किंवा अधिकार देऊं नये. **–न ख़्वास्ता–** देव न करो; असें न होवो. **–हाफ़िज़–** ईश्वर तुमचें रक्षण करो (निरोप घेतांना वापरला जाणारा वाक्प्रचार); ईश्वर रक्षक आहे.

खुदाई– *स्त्री.* १. खणण्याची क्रिया किंवा मजुरी. २. उत्खनन.

ख़ुदी– *स्त्री.* १. अहंकार. २. अभिमान. ३. आत्मभाव; अस्मिता. [कण्या; भरडा.

खुद्दी– *स्त्री.* धान्याची कणी;

ख़ुनक– *वि.* [*फा.*] थंड; गार.

खुनकी– *स्त्री.* [*फा.*] १. शीतलता; गारवा; गारठा. २. आर्द्रता.

खुनखुना– *पु.* खुळखुळा (खेळणें).

खुनस– *स्त्री.* राग; क्रोध; रुसवा. [रुसणें.

खुनसाना–*क्रि. अ.* रागावणें;

खुनसी–*वि.* रागीट; हट्टी; दुराग्रही; खुनशी.

ख़ुफ़िया–*वि.* [*अ.*] १. गुप्त. २. लपलेला; अप्रकट. **–ख़ाना–***पु.* कुंटणखाना. **–नवीस–***पु.* गुप्त अहवाल लिहिणारा; गोपनीय वृत्त लिहिणारा. **–पुलिस–** *स्त्री.* हेर; गुप्त पोलिस; 'सी. आय. डी.'

खुब(भ)ना–*क्रि. अ.* खुपणें; घुसणें; टोंचणें; बोंचणें.

खुभी– *स्त्री.* १. कानांत घालावयाची लवंग; बुगडी. २. हत्तीच्या दांतावरील धातूचें कडें किंवा वाळा.

ख़ुम–*पु.* [*फा.*] १. मातीची घागर. २. मद्याची सुरई. ३. भट्टी. **–ख़ाना–***पु.* दारूचा गुत्ता.

खुमरा–*पु.* [*फा.*]१. मुसलमान फकिरांचा एक संप्रदाय. २. तट्टचे चटया विणणारी एक मुसलमान जाति. [ष्मान् (आशीर्वाद).

खुमान*–*वि.* दीर्घायुषी; आयु-

ख़ुमार– *स्त्री.* [*अ.*] १. कैफ; नशा; मद; धुंदी. २. जागरणामुळें आलेला थकवा. ३. नशा उतरताना येणारा थकवा, जडपणा. [*–स्त्री.* **खुमारी**].

खुमी– *स्त्री.* १. भूछत्र; अळंबें. २. दांतांत भरलेली चांदी किंवा सोनें. ३. हत्तीच्या दांतांवर घालावयाचें धातूचें कडें.

खुरंड– *स्त्री.* जखमेवरील खपली.

खुर–*पु.* जनावराचा खूर, नखी. **–तार*–***पु.* टाप, खूर इ. चा आघात. **–त्राण–***पु.* नाल. **–पका; –हा–***पु.* जनावरांच्या जिभेवर व खुरावर व्रण निघतात तो रोग.**–हर⁺–** *स्त्री.* खुराचें चिन्ह; गुरांच्या चालण्यानें तयार झालेली रानवाट.

खुरखुर– *स्त्री.* घशांतील घरघर

खुरखुरा–*वि.* १. खडबडीत; खरखरीत.

खुरखुराना–*क्रि. अ.* खोकल्यामुळें घशांत खरखर होणें; खरखरणें.

खुरखुराहट– *स्त्री.* १. घशांतील खरखर. २. घोरतांना होणारा आवाज. [खरवडून काढलेली वस्तु.

खुरचन– *स्त्री.* १. खरवड. २.

खुरचना–*क्रि. स.* खरडणें; खरवडणें. [ण्याचें अवजार.

खुरचनी– *स्त्री.* खरवडून काढ-

खुरचाली⁺–*वि.* १. कुरापत काढणारा. २. दुष्ट; नीच.

ख़ुरजी– *स्त्री.* [*फा.*] १. गोणी. २. पडशी. ३. 'होल्डॉल'.

खुरट–*पु.* जनावरांच्या खुरांचा रोग. [खरीत.

खुरदरा–*वि.* खडबडीत; खर-

खुरदा–*पु.* १. मोड (नाण्याची). २. बारीक सारीक वस्तु. –*वि.* फुटकळ. [**खुरपी**].

खुरपा–*पु.* विळा; खुरपें. [*–स्त्री.*

खुरफ़–फ़ा–*पु.* [*फा.*] घोळाची भाजी.

खुरमा–*पु.* [*फा.*] १. खारीक; खजूर. २. एक प्रकारचें पक्वान्न; बालूशाही.

खुरशीद–पु. [*फा.*] सूर्य.

खुराक– *स्त्री.* [*फा.*] १. भोजन; खाणें. २. खाण्याचें प्रमाण. ३. चंदी. ४. औषधाचा भाग; 'डोस.' **–बंदी**– *स्त्री.* धान्यवांटप; 'राशनिंग'.

खुराकी– *स्त्री.* [फा.] १. जेवणखाण्याच्या खर्चासाठीं दिलेले पैसे; भोजनखर्च. –*वि.* खादाड.

खुराफ़ात– *स्त्री.* [*अ.*] १. वायफळ वडवड. २. कुरापत; कुचाळी. ३. शिवीगाळ ४. भांडण; तंटा. [–*वि.* **खुराफ़ाती**].

खुरासान–*पु.* [*फा.*] एक प्राचीन देश. हल्लीं हा इराणचा पूर्वेकडील एक प्रांत आहे.

खुरिया– *स्त्री.* १. लहान वाटी. २. गुडघ्याची वाटी.

खुरी– *स्त्री.* घोड्याच्या टापेचें चिन्ह. **मु०–करना**–खुरानें जमीन खणणें. २. घाई करणें.

खुर्द–*वि.* [फ़ा.] १. लहान; सूक्ष्म. २. फुटकळ. –*पु.* भोजन; खाणें. **–बीन**– *स्त्री.* सूक्ष्मदर्शक यंत्र. **–बुर्द**–*पु.* १. वाईट मार्गानें मिळविलेलें धन. २. द्रव्याचा अपहार. –*वि.* नष्टभ्रष्ट. **–साल** – *वि.* अल्पवयस्क; लहान.

खुर्दा–*वि.* [*फा.*] खाल्लेलें.–*पु.* १. तुकडा. २. मोड; चिल्लर. ३. फुटकळ, किरकोळ सामान. –**फ़रोश**–*वि.* किरकोळ विक्रेता. **मु० –करना**–मोड करणें (नाण्याची).

खुर्रम–*वि.* [*अ.*] १. नुकताच शिंपडलेला. २. प्रसन्न; खुष.

खुर्राट–*वि.* १. अनुभवी; वृद्ध; म्हातारा. २. कावेबाज; धूर्त.

खुलना–*क्रि. अ.* १. उघडणें; खुलें होणें; मोकळें होणें. २. सुटणें (गांठ). ३. प्रकट होणें; उघडकीस येणें. ४. सुरुवात होणें. ५. उलणें; फाटणें. ६. गाडी निघणें. **खुलकर**– *अव्य.* उघडपणें; स्पष्टपणें; निःसंकोचपणें. **मु० खुल खेलना**– १. लपून करण्याचीं कामें उघडपणें करणें. २. लाजलज्जा सोडून देणें. **खुलता रंग**–फिका सुंदर रंग.

खुलवाना–*क्रि. स.* उघडविणें; उघडावयास लावणें.

खुला–*वि. पु.* १. खुला; उघडा. २. बंधनरहित; मोकळा. ३. स्पष्ट; प्रकट. [–*स्त्री.* **खुली**] **मु०–(ली) मुट्ठी होना**–देण्याच्या बाबतींत उदार असणें.– **(ले) आम**; –**खज़ाने**; –**बंदाँ**; –**बाज़ार**; –**मैदान** – उघडपणें; जाहीरपणें; बेधडक. –**दिलसे** – उदारतापूर्वक; खुल्या दिलानें.

खुलासा–पु. [*अ.*] सारांश; तात्पर्य.–*वि.* १. मोकळा. २. उघडउघड. ३. स्पष्ट. ४. संक्षिप्त. –*अव्य.* उघडणें.

खुलूस–*पु.* [*अ.*] १. पावित्र्य. २. सरळपणा. ३. निष्ठा.

खुलेड़ना– *क्रि. स.* १. खोदणें. २. हलविणें; वरखालीं करणें.

खुल्क–पु. [*अ.*] सौजन्य; सुशीलता. [उघड; जाहीरपणें.

खुल्लमखुल्ला–*अव्य.* उघड–

खुवारी*–*स्त्री.* [*फा.*] १. अपमान. २. विनाश.

खुश–*वि.* [*फा.*] १. खुष; प्रसन्न; आनंदी. २. उत्तम; चांगला (उदा० खुशहाल). **–आमदीद**–*अव्य.* सुस्वागतम्. **–क़िस्मत**–*वि.* भाग्यवान; सुदैवी. **–क़िस्मती**–*स्त्री.* सुदैव; भाग्य. **–खत**–*वि.* सुंदर हस्ताक्षर असलेला; सुलेखक. **–खबरी**–*स्त्री.* आनंददायक बातमी; शुभ वार्ता.**–गवार**–*वि.* मनोहर; प्रिय; सुखद.**–गुलू**–*वि.* मधुर आवाजाचा.**–ज़ायका**–*वि.* स्वादिष्ट. **–दामन**– *स्त्री.* पत्नीची आई; सासू. **–दिल**–*वि.* १. आनंदी; उत्साही; प्रसन्नचित्त. २. गमत्या; थट्टेखोर. **–नवीस**–*वि.* पा० 'खुशखत.' **–नसीब**–*वि.* भाग्यवान्; सुदैवी. **–नुमा**–*वि.* सुंदर; मनोहर; चांगला दिसणारा.**–पोश**–*वि.* सुंदर कपडे घातलेला.**–बख्ती**– *स्त्री.* भाग्य; सुदैव.**–बू**–*स्त्री.* सुगंध; सुवास.**–बूदार**–*वि.* सुगंधी; सुवासिक.**–मिज़ाज**–*वि.* हंसतमुख; आनंदी स्वभावाचा; गमत्या.**–रंग**–*वि.* सुंदर रंग असलेला; चमकदार रंगाचा.–*पु.*–सुंदर, आकर्षक रंग. **–हाल**–*वि.* १. सुखी; संपन्न. २. कुशल; खुशाल.**–हाली**– *स्त्री.* १. संपन्नता; समृद्धि. २. खुशाली.

खुशामद–*स्त्री.* [*फा.*] खुशामत; खोटी स्तुति.

खुशामदी–*वि.* [*फा.*] हांजीखोर; खुशामत्या.**–टट्टू**–*वि.* लाळघोट्या; हांजीहांजी करणारा.

खुशी– *स्त्री.* [*फा.*] १. आनंद; खुषी; प्रसन्नता. २. इच्छा; मर्जी. **–का सौदा**–*पु.* मर्जीची गोष्ट. **–खुशी**–*अव्य.* आनंदानें.

खुश्क–*वि.* [*फा.*] १. कोरडा; वाळलेला; शुष्क. २. कांहीं उत्पन्न नसलेला; कफल्लक. ३. नीरस. **–साली**– *स्त्री.* अवर्षण; दुष्काळ.

खुश्की–*स्त्री.* [*फा.*] १. कोरडेपणा. २. नीरसता. ३. जमिनीचा भाग.**–की राह**–जमिनीवरून; खुष्कीच्या मार्गानें. ['फुसफुसाना.'

खुसफुसाना+–*क्रि. अ.* पा०

खुसर–*पु.* [*फा.*] श्वशुर; सासरा. [शाही; राजेशाही थाटाचें.

खुसरवाना–*वि.* [*फा.*] बाद-

खुसरू–रौ–*पु.* [*फा.*] बादशाह; सम्राट्. [खुशाल; आनंदी.

खुसा(स्या)ल*–*वि.* [*फा.*]

खुसिया–*पु.* [*अ.*] अंडकोश. **–बरदार** *वि.* खुशामतखोर; लाळ-घोटचा.

खुसुरफुसुर–*स्त्री.* कुजबूज. –*अव्य.* हलक्या आवाजांत.

खुसूफ़–*पु.* [*अ.*] चंद्रग्रहण.

खुसूमत–*स्त्री.* [*अ.*] शत्रुत्व; वैर. [करून; विशेषत:

खुसूसन–*अव्य.* [*अ.*] खास-

खुसूसियत–*स्त्री.* [*अ.*] वैशिष्टच; विशेषता. [वैशिष्टचपूर्ण.

खुसूसी–*वि.* [*अ.*] खास;

खुही–*स्त्री.* डोकीवर घेण्याची घोंगडीची खोळ.

खूँ–*पु.* [*फा.*] १. रक्त. २. खून; हत्या.**–खार**; **–ख्वार**–*वि.* १. निर्दय; क्रूर; भयावह; भयंकर. २. रक्तपिपासु; खुनी. **–रेज़**–*वि.* रक्तपात करणारा; खुनी.**–रेज़ी**–*स्त्री.* रक्तपात.

खूँट–*पु.* १. कोना; कोपरा; टोंक. २. बाजू; दिशा. ३. भाग; हिस्सा. ४. खुंट. ५. कानांतील एक दागिना.

खूँट–*स्त्री.* कानांतील मळ.

खूँटना–*क्रि. स.* १. चौकशी करणें; प्रश्न विचारून अडथळा आणणें. २. सतावणें; थट्टा करणें. –*क्रि. अ.* कमी होणें; संपणें; खुंटणें.

खूँटा–*पु.* १. मेख. २. खुंटा.

खूँटी–*स्त्री.* १. खुंटी. २. तूर, ज्वारी, वगैरेचे खुंट (कापणी-नंतर उरलेले). ३. विटी. ४. हद्द; सीमा.

खूँद–*स्त्री.* १. घोडयाचें उधळणें, खिदळणें, टाप आपटणें. २. तुडविणें; पाय आपटणें.

खूँदना–*क्रि. अ.* १. नाचणें; पाय आपटणें. २. तुडविणें.

खू–*स्त्री.* [*फा.*] स्वभाव; वृत्ति. **–गर**–*वि.* स्वभावाचा.

खूझा–*पु.* फळांतील रेषा किंवा केसर असलेला भाग.

खूटना*–*क्रि. अ.* १. व्यतीत होणें. २. खुंटणें; बंद होणें; थांबणें. –*क्रि. स.* १. अडविणें. २. चौकशी करणें. [नीरस.

खूटा⁺–*वि.* वाईट; अरसिक;

खूद; खूदड़–र⁺–*पु.* एखादा द्रव पदार्थ गाळल्यानंतर खालीं उरणारा गाळ.

खून–*पु.* [*फा.*] १. रक्त. २. खून; हत्या. **मु०–आँखोंमें उतरना** – रागानें डोळे लाल होणें.**–उबलना**–रक्त सळसळणें. **–का घूँट पीना**–अपमान गिळून टाकणें; सहन करणें. **–का प्यासा**–रक्तपिपासु; जानी दुष्मन.**–के आँसू बहाना**–फार शोक करणें.**–खच्चर; खराबा** –रक्तपात; कत्तल. **–खुश्क होना** –घाबरून जाणें; भीतीनें थिजणें. **–खौलना**–रक्त उसळणें; क्रोध येणें. **– पानी एक करना**–पाण्या-प्रमाणें रक्त वाहविणें.**–पीना–१.** रक्ताचा घोट घेणें; मारून टाकणें. २. फार त्रास देणें. **–बहाना**–रक्त-पात करणें**–मुँह को लगना**–रक्ताची चटक लागणें. **–रुलाना**–फार त्रास देणें.**–लगाकर शहीदोंमें दाखिल होना**–नाममात्र कार्य करून त्याचें फळ इच्छिणें; मोंदूगिरीनें पुढारी बनणें.**–सफ़ेद होना**–माया-ममता नष्ट होणें. **–सिरपर चढ़कर बोलता है**–खुनाचें पाप लपून राहात नाहीं. **–सिरपर चढ़ना**–१. खून चढणें. २. खुनी इसमाच्या चेहऱ्यावरून त्याचा खुनीपणा दिसून येणें.**–सूखना**–भीतीनें रक्त गोठणें. [लाल.

खूनी–*वि.* [*फा.*] रक्तरंजित;

ख़ूनी–*वि.* [*फा.*] १. खून करणारा; खुनी. २. क्रूर. ३. रक्त-युक्त. **–बवासीर**–*स्त्री.* रक्ताची मूळव्याध.

खूब–*वि.* [*फा.*] १. चांगला; भला; उत्तम. २. खूप; पुष्कळ. ३. सुंदर.–*अव्य.* चांगल्या किंवा उत्तम तऱ्हेनें. २. छान; वाहवा. **–रू**; **–सूरत**–*वि.* सुंदर; रूप-वान. **– सूरती** –*स्त्री.* सौंदर्य.

खूबकलाँ–*पु.* [*फा.*] एक प्रका-रचें गवत. याचें बीं औषधी असतें.

खूबड़ खाबड़–*वि.* ओबड धोबड. [स्त्रिया.

खूबाँ–*स्त्री.* [*फा.*] सुन्दर

ख़ूबानी–*स्त्री.* [*फा.*] जरदाळू.

खूबी–*स्त्री.* [*फा.*] १. चांगुल-पणा; उत्तमता. २. वैशिष्टच; गुणविशेष; खुबी.

ख़ूराक–*स्त्री.* [*फा.*] १. खुराक; भोजन. २. औषधाची मात्रा.

खूसट–*पु.* घुबड.–*वि.* १. अप-शकुनी. २. निर्बुद्ध; खुळचट. ३. अरसिक. ४. थेरडा.

खूसर*–*वि.* १. अरसिक; शुष्क. २. थेरडा. –*पु.* घुबड.

खृष्ट–*पु.* [*इं.*] येशू ख्रिस्त.

खेक(ख)सा – *पु.* एक फळ-भाजी; करटुलें.

खेचर–*वि.* आकाशांतून संचार करणारा. –*पु.* १. ग्रह. २. पक्षी. ३. विमान.

खेजड़ी–*स्त्री.*⁺ शमीचें झाड.

खेट; खेटक– *पु.* १. गांव; खेडें. २. घोडा. ३. शिकार. ४. गदा; लाठी.

खेड़– पु. १. खेडें. २. सैनिकांचा तळ.

खेड़ा– पु. खेड़ें.

खेड़ी–ढ़ी *स्त्री*. १. एक प्रकारचें पोलाद. २. वार (गर्भावरण).

खेत– पु. १. शेत. २. पीक. ३. युद्धक्षेत्र. **मु० –आना** – युद्धांत कामास येणें; मारलें जाणें.–**कमाना**–शेताची मशागत करणें. –**करना**–१. सपाट करणें. २. युद्ध करणें.–**रखना**–युद्धांत विजय मिळविणें. –**लेना**–युद्ध करणें. – **रहना; –होना**–युद्धांत मारलें जाणें.

खेतिहर– पु. शेतकरी.

खेती– *स्त्री*. १. शेती. २. पीक. –**बाड़ी–री–** *स्त्री*. १. शेतीवाडी. २. शेतीचें काम; शेतकी.

खेद– पु. १. खेद; दुःख. २. शैथिल्य; थकवा.

खेदना*– *क्रि. स*. १. हुसकून लावणें. २. शिकारीच्या मागें धांवणें; पाठलाग करणें.

खेदा– पु. १. रान उठविण्याचें काम; हांका. २. शिकार.

खेना– *क्रि. स*. १. वल्हविणें. २. वेळ घालविणें; कालक्षेप करणें.

खेप– *स्त्री*. १. खेप; फेरी. २. २. एका खेपेंत येण्याइतकी वस्तु.

खेपना– *क्रि. स*. १. घालविणें; व्यतीत करणें. २. निरोप देणें.

खेम*– पु. क्षेमकुशल; खुशाली.

खेमटा– पु. १. बारा मात्रांचा एक ताल. २. या तालावर गायिलें जाणारें गीत.

ख़ेमा– पु. तंबू; डेरा; राहुटी. **मु० –(में) डालना**–सैन्याचा तळ टाकणें.

खेरा*–पु. खेडें.

खेल– पु. खेळ. २. सोपी गोष्ट. –**कूद** – *स्त्री*. खेळ; क्रीडा. –**पंच**– पु. पंच; 'अंपायर'. –**मध्यस्थ**– पु. निर्णायक; लवाद; 'रेफरी'. **मु०– जानना; –समझना**–अत्यंत सोपें समजणें.

खेलक*– पु. खेळाडू.

खेलनप्रतियोगिता– *स्त्री*. खेळांचे सामने; 'टूर्नामेंट.'

खेलना– *क्रि. अ*. १. खेळणें; क्रीडा, विहार करणें. २* निघून जाणें.–*क्रि. स*. १ करमणूक करणें २. अभिनय करणें. **मु० जान** अथवा **जी पर खेलना**–जिवावर उदार होणें.

खेलवाड़– पु. १. मनोरंजन; करमणूक; मौज. २. खेळ.

खेलवाड़ी– *वि*. १. खेळाडू; खेळणारा. २. खेळकर. ३. विनोदी; गमती; खिलाडू.–पु. १. खेळकरी. २. तमासगीर; गारुडी.

खेलवार*–पु. १. खेळ. २. हास्यविनोद; मौज; तमाशा– *वि*. खेळ करणारा.

खेला–*स्त्री*. मनोरंजन; विनोद.

खेलाड़ी–*वि*. पु. पा० 'खिलाड़ी'.

खेलाधार–पु. क्रीडांगण; 'प्लेग्राउंड'.

खेलाना–*क्रि. स*. खेळविणें; खेळांत सामील करून घेणें.

खेलुआ+–पु. कातडें कमाविण्याचें लांकडी अवजार.

खेव–पु. घोडयांना आवडणारें एक प्रकारचें गवत.

खेवइया*–पु. पा० 'खेवैया'.

खेवक*–*पु*. नावाडी; कोळी.

खेवट–पु. १. पटवाऱ्याजवळील पट्टेकऱ्यांच्या नांवांची यादी; हिच्यांत प्रत्येक पट्टेदाराचा हिस्सा लिहिलेला असतो. २.* नावाडी.

खेवटिया; खेवनहार*–पु. नावाडी; वल्हविणारा.

खेवना–*क्रि. स*. पा० 'खेना'.

खेवा–पु. १. नावेचें भाडें. २. नावेंतून नदी ओलांडणें. ३. खप; फेरी.

खेवाई–१. नांव हांकारण्याची मजुरी. २. हांकारणी (नावेची).

खेवैया–पु. नावाडी; होडींतून पैलतीराला नेणारा. [चादर.

खेस–पु. जाड धाग्याचें उपरणें;

खेसारी– *स्त्री*. लाख (वाटण्याच्या किंवा तुरीच्या जातीचें एक कडधान्य).

खेह; खेहर– *स्त्री*. १. धूळ. २. भस्म. **मु०–खाना**– धूळधाण होणें; दुर्दशा होणें.

खैंचना–*क्रि. स*. 'खींचना'.

ख़ैयाम–पु. [*अ*.] १. तंबू शिवणारा. २. उमर खैयाम.

खैर–पु. १. खैराचें झाड. २. कात.

ख़ैर– *स्त्री*. [*फा*.] कल्याण; क्षेमकुशल.–*अव्य*. असो; अस्तु; कांहीं हरकत नाहीं; ठीक.–**अंदेश**; –**ख्वाह**–*वि*. शुभचिंतक; हितचिंतक; हितेच्छु. –**बाद**–पु. खुशाल राहा (निरोप देतांना म्हणतात) **मु०–बाद कहना**–निरोप देणें. –**मक़्दम**– पु. स्वागत (कोणी आलें असतां 'या, बसा' म्हणण्याची पद्धत).–**व आफियत**– *स्त्री*. खुशाली; क्षेमकुशल (विचारणें). –**सल्ला**– *स्त्री*. खुशाली.

खैरभैर–ल*–पु. १. गोंगाट; कोलाहल. २. खळबळ.

खैरा–*वि*. खैरी; पिंगट रंगाचा. –पु. खैरी रंगाचा घोडा, कबूतर किंवा बगळा. [पुण्य.

ख़ैरात– *स्त्री*. [*अ*.] दान;

ख़ैराती–*वि*. [*अ*.] धर्मार्थ; धर्मादाय; फुकटचें.

ख़ैरि(री)यत– *स्त्री.* [*फा.*] आनंदमंगल; कल्याण; हित.

खैलर; खैला*–*स्त्री.* ताक घुसळण्याची रवी.

खोंखना+–*क्रि. अ.* खोकणें.

खोंखर–ल+–*वि.* पोकळ.

खोंखों–*पु.* १. खोकण्याचा आवाज. २. माकडाचें ओरडणें; गुरकावणें.

खोंगा+–*पु.* अडथळा.

खोंच– *स्त्री.* १. ओरखडा. २. अणकुचीदार वस्तूनें कापड फाडणें. –*पु.* मूठभर धान्य. [पिशवी.

खोंच*–*पु.* १. झोळी. २.

खोंचा–*पु.* पक्षी पकडण्याचा लांब वासा. २. पा० 'ख़ोन्चा'.

खोंचिया+–*पु.* भिकारी.

खोंची– *स्त्री.* – भीक; भिक्षा.

खोंचेवाला–*पु.* मेळवाला.

खोंटना–*क्रि. स.* एखाद्या वस्तूचा (विशेषतः भाजीचा) वरचा भाग तोडणें; खुडणें. [२. कोटर.

खोंड़र–*पु.* १. झाडाची ढोली.

खोंड़हा; खोंड़ा–*वि.* १. बोथरा; दांत तुटलेला. २. पंगु.–*पु.*+ कुंपण.

खोंतल+**; खोंता**–*पु.* घरटें.

खोंप–*पु.* १. धांवता दोरा; लांब टांका. २.+ मुसा ठेवण्याची खोप; झोंपडी. [खुपसणें.

खोंपना+–*क्रि. स.* भोसकणें;

खोंपा–*पु.* १. वेणी; बुचडा. २. फाळ बसविलेलें नांगराचें लाकूड. ३. मुसा ठेवण्याची खोप.

खोंसना–*क्रि. स.* खोंचणें; खोंवणें; अडकविणें.

खोआ–*पु.* खवा; मावा.

खोई– *स्त्री.* उंसाचें चिपाड. २. घोंगडयाची खोळ.

खोखना–*क्रि. अ.* खोकणें.

खोखला–*वि.* पोकळ.

खोखा–*पु.* १. भरपाई केलेली हुंडी. २. लहान मूल.

खोज–*स्त्री.* १. शोध: तपास. २. ठसा; निशाणी. –**बीन**– *स्त्री.* संशोधन. **मु०–खबर लेना**–चौकशी करणें. [णारा; संशोधक.

खोजक*–*वि. पु.* शोध कर-

खोजना–*क्रि. स.* शोधणें; हुडकणें; धुंडाळणें. [झालेला.

खोजमिटा+–*वि.* नामशेष

ख़ोजा–*पु.* [*फा.*] १. हिजडा. २. कंचुकी; अंतःपुरावरील सेवक. ३. मुसलमानांतील एक व्यापारी जात. [धक.

खोजी–*वि.* शोधणारा; संशो-

खोजु+– *स्त्री.* चिह्न; पत्ता; खूण.

खोट– *स्त्री.* १. दोष; खोड. २. भेसळ; खोट. –*वि.* दुष्ट; अवगुणी. **मु०–होना**–१. दूषित असणें. २. भेसळ असणें. [वाईटपणा.

खोटता*– *स्त्री.* खोटेपणा;

खोटा–*वि.* १. खोटा; असत्य. २. सदोष. ३. वाईट. **मु० खोटी खरी सुनाना**–फैलावर घेणें; खरडपट्टी काढणें.

खोटाई– *स्त्री.* १. खोटेपणा; दुष्टावा. २. कपट; द्वेष. ३. दोष; वैगुण्य. [देवाचा कोप; भूतबाधा.

खोड़– *स्त्री.* मुताचा किंवा

खोड़रा–*पु.* १. जुन्या वृक्षाच्या खोडांतील पोकळी; ढोली. २. दांतांच्या आंतील पोकळी; 'कॅव्हिटी'.

खोड़ा–*वि.* १. ज्याचे पुढील दोन–तीन दांत पडले आहेत असा. २. विकलांग; लंगडा.

ख़ोद–*पु.* [*फा.*] शिरस्त्राण; लोखंडी टोपी.

खोद–*पु.* १. खोदण्याची क्रिया. २. छाननी. –**पूछ; विनोद**–*स्त्री.* पूसतपास; छाननी.

घमासान–*वि.* पा० 'घमसान'.

घमोई– *स्त्री.* बांबूला लागणारी कीड.

घमोय– *स्त्री.* १. एक कांटेदार झुडूप; कांटेधोत्रा. २. करडई.

घर–*पु.* १. घर; निवासस्थान. २. जन्मभूमि. ३. घराणें; कुळ. ४. कार्यालय. ५. खोली. ६. मूळ कारण. ७. संसार. ८. खाना.–**गिरस्ती**; –**गृहस्थी**– *स्त्री.* संसार; घरकाम. –**घर**–*अव्य.* घरोघरीं; सर्वत्र.– **घाल**; –**घालन**–*वि.* १. घरबुडव्या; कुळाला बट्टा लावणारा; कुलटा. २. कुटुंबात असंतोष माजविणारा. –**घुसड़ा**–**ना**– *वि.* घरकोंबडा.– **जाया**–*पु.* घरचा गुलाम; दास; सेवक.–**जुगत**–*स्त्री.* घरची व्यवस्था. –**झॅकनी**–*वि. स्त्री.* उंडगी बाई; दुसऱ्यांच्या घरीं भटकणारी स्त्री. –**दुआर**; –**द्वार**–*पु.* घरदार; घरचें सामान. –**फोड़नी**; –**फोरी**–*वि.स्त्री.* कुटुंबात कलह माजविणारी स्त्री. –**बसा**–*वि. पु.* १. घरकोंबडा. २. प्रियकर; जार; उपपति.–**बसी** –*स्त्री.* रखेली. –*वि. स्त्री.* १. सौभाग्यवती; गृहिणी. २. घराचा नाश करणारी. –**बार**–*पु.* १. घरदार; कुटुंब. २. संसार. –**बारी**–

पु. संसारी; मुलेवाळें असलेला; गृहस्थ. **–वात–** *स्त्री.* १. घरांतील सामान किंवा संपत्ति. २. संसार; गृहस्थी. **–वाला–** *पु.* १. घराचा मालक. २. नवरा. ३. कर्तासवरता पुरुष. **–वाली–** *स्त्री.* गृहिणी; बायको. **–हाई*–** *स्त्री.* १. चहाडखोर स्त्री. २. घरांत भांडण लावणारी किंवा फूट पाडणारी स्त्री. ३. कुलटा. **मु०–आबाद होना–** १. लग्न होणें. २. संसार मांडला जाणें. **–उजड़ना–** १. संसार विस्कटणें. २. पत्नी मरणें. **–करना–** **(मनमें)–** १. अत्यंत प्रिय होणें. २. स्थान बनविणें. **–का–**आपला; घरगुती; आपसांतील. **–का उजाला–** कुलदीपक; सर्वांचा लाडका. **–का न घाटका–** घरचा न दारचा; कोठेंच थारा नसलेला; त्रिशंकु; निकामी. **–की मुर्गी दाल बराबर–** सहजप्राप्य वस्तूची किंमत माणसाला कळत नाहीं. **–के घर–** घरांतल्या घरांत. **के घर रहना–** एखाद्या व्यवहारांत फायदा किंवा नुकसान न होणें. **–घालना–** १. कुळाला कलंक लावणें. २. घराचा नाश करणें. **–फूंक तमाशा देखना–** ख्यालीखुशालींत पैसा उडविणें; घरची संपत्ति उधळून चैन करणें. **–फोड़ना–** घरांत भांडणें लावणें. **–बसना–** १. लग्न होणें; २. संसार मांडला जाणे. **–बसाना–** पा० 'घर आबाद करना'. **–बैठना–** १. घरांत बसून राहणें; बाहेर न जाणें. २. नोकरी सोडून देणें. ३. पावसानें घर पडणें. **(किसीके) –बैठना –** एखाद्याची पत्नी किंवा रखेली बनून राहाणें. **–में डालना–** रखेली म्हणून ठेवून घेणें. **–सिर पर उठा लेना–** आराडा ओरडा करून घर डोकीवर घेणें. **–से–** स्वतःच्या खिशांतून. **–सेना–**रिकामटेकडें बसून राहाणें.

घरऊ+– *वि.* घरगुती.

घरघराना– *क्रि. अ.* घरघरणें; खरखरणें (घसा).

घरघराहट– *स्त्री.* घरघर; घशांतील आवाज. [तोफ.

घरनाल– *स्त्री.* एक प्रकारची

घरनी– *स्त्री.* गृहिणी; घरधनीण. [**–कर–** *पु.* सूर्य.

घरम*– *पु.* १. ऊन्ह. २. घाम.

घरमना+– *क्रि. अ.* वाहाणें.

घररना– *क्रि. अ.* १. घांसणें. २. भरडणें. [घर; घरकुल.

घरवा; घरवाहा– *पु.* लहानसें

घरसा*– *पु.* १. घर्षण. २. पा० 'घिस्सा'.

घरा*– *पु.* मोठी घागर; घडा.

घराऊ– *वि.* १. घरगुती. २. आपसांतील.

घराती– *पु.* वधूपक्षाकडील मंडळी; नवरीकडील व्यक्ती.

घराना– *पु.* घराणें; कुळ; वंश.

घरिया– *स्त्री.* मूस. [घालणें.

घरियाना+– *क्रि. स.* घडचा

घरियार–+ *पु.* पा० 'घडियाल'.

घरी–+ *स्त्री.* १. घडचाळ. २. घडी. ३. कळशी. [वेळ; घडीभर.

घरीक*– *अव्य.* क्षणभर; थोडा

घरुआ–वा+– *पु.* १. घरखर्च. २. घरची व्यवस्था. ३. चश्मा वगैरेचें घर. [२. खासगी.

घरू– वि. १. घरगुती; घरचा.

घरेलू– *वि.* १. घरगुती. २. पाळीव. ३. स्वकीय; आप्तेष्ट.

घरैया+– *पु.* घरचा माणूस; स्वजन. **–** *वि.* घरचा; निकटचा.

घरौंदा–धा– *पु.* १. घरकुल. २. लहान घर.

घरौना– *पु.* १. घर. २. घरकुल.

घर्रा– *पु.* १. एक प्रकारचें अंजन. २. घशांतील घरघर (–चलना).

घर्राटा– *पु.* घोरणें (–भरना).

घर्षरोध – *पु.* घर्षणावरील उपाय; 'अँटीफिक्शन'.

घलना+– *क्रि. अ.* १. सुटून पडणें; गोळीबार अगर बाण सुटणें. २ मारामारी होणें.

घलाघल–ली*– *स्त्री.* मारामारी; ठोकाठोकी.

घलुआ–वा+– *पु.* धार; वर्तावळा; गिऱ्हाइकाला वस्तु देतांना योग्य वजन केल्यावर जास्त वस्तु देणें. [घड (फळांचा).

घवद+– *पु.* **घवरि*–** *स्त्री.* घोंस;

घसकना+– *क्रि. अ.* सरकणें; सटकणें.

घसखुदा– *पु.* १. गवत कापणारा; गवत खोदणारा. २. मूर्ख; अडाणी.

घसना– *क्रि. अ.* घासलें जाणें. **–** *क्रि. स.* घासणें; चोळणें.

घसिटना– *क्रि. अ.* ओढलें जाणें.

घसियारा– *पु.* १. गवत कापणारा. २. गवत विकणारा. ३. तुच्छ मनुष्य. [**–** *स्त्री.* **घसियारिन; घसियारी**].

घसीट– *स्त्री.* १. घाईनें खरडलेला मजकूर. २. ओढणें. ३. खरडणें. **–** *वि.* खरडलेला; घाईनें लिहिलेला.

घसीटना– *क्रि. स.* १. फरफटणें; ओढणें. २. गुंतविणें; बळेंच ओढणें (कामांत). ३. खरडणें; घाईनें लिहिणें.

घसीला– *वि.* गवताळ.

घस्मर– *वि.* खादाड.

घस्सा– *पु.* धक्का; रेटा.

घहनाना; घहर(रा)ना– *क्रि.*

अ. घणघणणें; गरजणें; मोठा आवाज करणें; गडगडाट होणें.

घहरानि*– *स्त्री.*; **घहरारा*–** *पु.*; **घहरारी*–** *स्त्री.* –१. गर्जना; गर्जना करणारा २. गंभीर ध्वनि.

घाँ*– *स्त्री.* दिशा; बाजू.

घाँ*– *पु.* प्रकार; पद्धत.

घाँघरा– *पु.* लहंगा; मोठा परकर; घागरा.

घाँटी+– *स्त्री.* गळ्याची घांटी; कंठ; २. घंटा. [एक गाणें.

घाँटो– *पु.* चैत्रांत गायिलें जाणारें

घाँह–ही; घा– *पु.* बाजू; दिशा.

घाइ*– *पु.* घाव; जखम.

घाइल*– *वि.* घायाळ; जखमी.

घाई*– *स्त्री.* १. बाजू; दिशा. २. दोन वस्तूंच्या मधील जागा. ३. भोंवरा ४. पाळी.

घाई– *स्त्री.* १. दोन बोटां-मधील बेंचकें. २. घाव; जखम.

घाउ*– *पु.* घाव; जखम.

घाऊघप– *वि.* दुसऱ्याची संपत्ति गुपचुप गडप करणारा. २. धूर्त; लुच्चा. [माणूस.

घाग–घ– *पु.* धूर्त; कावेबाज

घाघरा– *पु.* मोठा परकर; लहंगा. **–पलटन–** *स्त्री.* स्कॉट-लंडच्या गोऱ्यांची फलटण. यांतील सैनिकांच्या विजारींचा घेरा पर-करासारखा असतो.

घाघरा– *स्त्री.* शरयू नदी.

घाट– *पु.* १. नदीचा घाट; नदीं-तील उतार २. पर्वतांतील उंच-सखल मार्ग. ३. दिशा; बाजू. ४. तऱ्हा; पद्धत; वर्तणूक. ५. तल-वारीची धार. ६. डोंगर. ७. नावें-तून किंवा पुलावरून पलीकडे जाण्याचा कर. **–** *स्त्री.* कपट; कुकर्म. **–वाल–** *पु.* घाटावरील ब्राह्मण; पंड्या. **मु०–घाटका पानी पीना–** वारा गांवचें पाणी पिणें.

घाटा– *पु.* तोटा; नुकसान. **–(टे)का आयव्ययक–** *पु.* तुटीचें अंदाजपत्रक; 'डेफिसिट बजेट'.

घाटारोह*– *पु.* नदीकाठची जागा अडविणें किंवा राखून ठेवणें; कोणाला जाऊं न देणें.

घाटि*– *वि.* न्यून; थोडें; कमी. **–** *स्त्री.* नीच कर्म.

घाटिया– *पु.* १. नदीकांठचा उपाध्याय. २. गंगापुत्र.

घाटी– *स्त्री.* दरी; दोन पर्वतां-मधील सखल भाग. **–मार्ग–** *पु.* खिंड; 'गॉर्ज'.

घात– *पु.* १. आघात; प्रहार; धक्का. २. वध; हत्या. ३. शक्ति; सामर्थ्य; 'पॉवर'. ४. अहित; वाईट चिंतणें. ५. क्लृप्ति; डाव साधणें; संधि; टपून बसणें. **मु०––पर चढना; –में आना–**तावडींत सांपडणें; तडाख्यांत येणें. **–में होना** –टपून बसणें. **–लगना–** संधि सांप-डणें. **–लगाना –**युक्ति योजणें; टपून बसणें.

घातक-की– *वि. पु.* १. घात करणारा; घातकी. २. कत्तल कर-णारा; क्रूर.

घातकक्रिया– *स्त्री.* **घातकरण–** *पु.* घातक्रिया; 'इनव्हॉल्यूशन'.

घातांक– *पु.* गुणक; घात; 'इन्डेक्स'. [पोनंट'.

घातांक– *पु.* घातचिह्न; 'एक्स्-

घाता– *पु.* गिऱ्हाइकाला वजना-मापाप्रमाणें वस्तु दिल्यानंतर वर पुनः थोडी वस्तु देणें; वर्तावळा; धार. **–** *वि.*+ समाप्त.

घातिनी– *वि. स्त्री.* घात कर-णारी; घातकी. [विश्वासघातकी.

घाती– *वि.* घात करणारा;

घान– *पु.* १. घाणा; एका खेपेस जेवढी वस्तु जात्यांत, घाण्यांत किंवा कढईंत टाकली जाते ती; ढीग. २. आघात; प्रहार.

घाना*–१. प्रहार. २. युद्ध. **–** *क्रि. स.* १. मारणें; नष्ट करणें. २. पकडणें.

घाम– *पु.* ऊन्ह.

घामड़– *वि.* १. उन्हामुळें व्याकुळ झालेलें (जनावर). २. मूर्ख. ३. आळशी. ४. वांदरट.

घाय*– *पु.* जखम; घाव.

घायक*– *वि.* नाश करणारा.

घायल– *वि.* घायाळ; जखमी.

घार+– *स्त्री.* पाण्याच्या प्रवाहा-मुळें होणारा खळगा. **–** *पु.* पाणी शिंपडणें; ओलें करणें.

घाल– *पु.* वर्तावळा; मापापेक्षां थोडें वर घालणें. **मु०– न गिनना–** तुच्छ समजणें. [करणारा.

घालक– *वि.* मारणारा; नाश

घालना– *क्रि. स.* १. नाश करणें. २. फेंकणें. ३. घालणें; ठेवणें.

घालमेल– *पु.* १. स्नेह; घनि-ष्ठता. २. वस्तूंचें मिश्रण. **–** *वि.* भेसळ; मिसळलेलें.

घाव– *पु.* जखम; व्रण. **मु०–पर नमक छिड़कना–** जखमेवर मीठ चोळणें. **– पूजना; –भरना–** जखम भरून येणें.

घावरिया*– *पु.* १. शस्त्रवैद्य. २. जखमेवर उपचार करणारा.

घास– *स्त्री.* गवत; चारा. **–पात** –पालापाचोळा. **–फूस–** *स्त्री.* केर-कचरा, गवत वगैरे. **मु० –काटना, खोदना अथवा छीलना–** फुकट वेळ घालविणें; निरर्थक, तुच्छ, फालतू काम करणें. [घाणेरडें.

घासलेटी– *वि.* निकृष्ट; गलिच्छ

घासी*– *स्त्री.* १. गवत; तृण. २. पा० 'घसियारा'.

घाह*– पु. बेचकें.

घिअ-उ+– पु. तूप.

घिआँड़ा– पु. तूप ठेवण्याचें मातीचें भांडें.

घिग्घी– स्त्री. १. हुंदका. २. बोबडी. ३. उचकी. **मु०–बँध जाना**– बोबडी वळणें; तोंडांतून शब्द बाहेर न पडणें.

घिघियाना– क्रि. अ. केविलवाणें होऊन विनंती करणें; गयावया करणें.

घिचपिच– स्त्री. १. जागेचा संकोच; जागेची अडचण. २. गर्दी; दाटी. –वि. गिचमिड; अस्पष्ट.

घिन– स्त्री. १. घृणा; तिरस्कार. २. शिसारी; किळस; जुगुप्सा.

घिनाना– क्रि. अ. घृणा करणें; तिरस्कार करणें.

घिनावना; **घिनौना**– वि. १. शिसारी उत्पन्न करणारा; किळसवाणा; घाणेरडा. २. तिरस्करणीय; त्याज्य. [किडा.

घिनौरी– स्त्री. एक पावसाळी

घिय; घियरा+– पु. तूप.

घिया– पु. १. दुध्या भोपळा. २. घोसाळें.– **कश**– पु. किसणी. –**–तरोई; –तुरई; –तोरी**– स्त्री. घोसाळें; गिलकें.

घिर(रि)त*– पु. तूप.

घिरना– क्रि. अ. १. वेढलें जाणें; घेरलें जाणें. २. एकत्र होणें.

घिरनी– स्त्री. १. खराडी; कप्पी. २. खोबणीचें चाक; 'पुली.' ३. दोर वळण्याचें चाक. –**दार विमान**–वर लावलेल्या गराडींच्या साह्यानें आकाशांत जाणारें विमान; 'जायरोप्लेन'.

घिराई–स्त्री. १. घेरा; परिघ; वेढा. २. गुरें चरावयास नेण्याचें काम किंवा मोबदला.

घिराव– पु. घेर; घेरा; परिघ.

घिरौरा– पु. घुशीचें अगर उंदराचें बीळ.

घिर्राना– क्रि. स. फरफटणें; नाकदुऱ्या काढणें. ['पुली'.

घिर्री– स्त्री. खोबणीचें चाक;

घिलौना+–पु. पा० 'घलुवा'.

घिसघिस–स्त्री. दिरंगाई; दीर्घसूत्रीपणा; अनिश्चय.

घिसना–क्रि. स. रगडणें; घासणें; उगाळणें. क्रि. अ. –१. झिजणें. २. घासलें जाणें. **घिसापिटा; घिसा-पिसा**–वि. झिजलेला; वापरलेला; जुनाट.

घिसपिस; घिसिरपिसिर; घिस्टपिस्ट– स्त्री. १. घासाघीस. २. गांठभेट (वाईट अर्थानें); घसट.

घिसवाना–क्रि. स. घासून घेणें; घासविणें; उगाळून घेणें.

घिसाई– स्त्री. १. घासण्याचें काम किंवा घासणावळ. २. झीज; घसारा.

घिस्समघिस्सा–पु. १. गर्दी. २. धक्काबुक्की. ३. मुलांचा एक खेळ.

घिस्सा–पु. १. घासण्याची क्रिया; झीज. २. धक्का; ठोसा; रेटा. ३. ठेंच.

घींच*– स्त्री. मान; गर्दन.

घी–पु. तूप; घृत. **–कुआर; कुवाँ(वा)र**–पु. कोरफड. **मु०–के चिराग(दिये)जलाना** –१. आनंदोत्सव करणें. २. चैन करणें.

घीया–पु. दुध्याभोपळा. **–कश**–पु. किसणी. **–पत्थर** –पु. पांढरा दगड. [कांदा; अळकुडी.

घुँइँ; घुँइँयाँ– स्त्री. अळवाचा

घुँघची–स्त्री. गुंज; रत्ती.

घुँघनी–स्त्री. उसळ; घुघऱ्या.

घुँघराराे–ला– वि. कुरळा (केंस). हा शब्द अनेकवचनींच वापरला जातो. (**घुँघरारे–ले**).

घुँघरू– स्त्री. १. घुंगुर. २. घुंगुरांचा सर. ३. घागरी.

घुंडी– स्त्री. १. गुंडी; बटण. २. हातांत किंवा पायांत घालण्याच्या कड्याच्या तोंडाजवळील गांठ; फांसा.

घुइँयाँ– स्त्री. अळूचा कांदा.

घुग्घी– स्त्री. धनगराची किंवा शेतकऱ्याची कांबळी; खोळ; कुंची.

घुग्घू–पु. घुबड.

घुघुआना–क्रि. अ. १. घुबडाचें ओरडणें. २. मांजराचें गुरगुरणें. [पिणें. २. गिळणें.

घुटकना+–क्रि. १. घोट घोट

घुटकी– स्त्री. अन्ननलिका.

घुटना–क्रि. अ. १. श्वास कोंडणें; जीव गुदमरणें. २. घोटलें जाणें. ३. एकजीव होणें. **घुटा हुआ**–वि. १. तासलेला; मुंडन केलेला. २. धूर्त; बनेल. **मु० घुट घुट कर मरना**–गुदमरून मरणें; तडफडून मरणें.

घुटना–पु. गुडघा. **मु०–टेकना**– गुडघे टेकून बसणें. – **(ने) टेकना**– हरणें; शरण जाणें.

घुटन्ना–पु. १ चड्डी; अर्धी विजार. २. गुडघ्याच्या खालीं येणारा अरुंद तोंडाचा पायजमा.

घुटरूँ–रू–पु. गुडघा.

घुटवाना–क्रि. स. १ घोटविणें. घोटून घेणें. २. हजामत करविणें.

घुटाई– स्त्री. १. घोटण्याचें काम. २. घोटणावळ.

घुटाना–क्रि. स. घोटवून घेणें.

घुटुरुन; **घुटुरुवन**– अव्य. रांगत; गुढघ्यावर चालत.

घुट्टा–पु. उगाळण्याची वस्तु.

घुट्टी– स्त्री. बाळगुटी; बाळ-

गोळी. मु०– में पड़ना– बाळकडू मिळणें; स्वभावांत असणें.

घुड़–'घोडा' चें समासांतील रूप. –चढ़ा–वि. घोडेस्वार. –चढ़ी –स्त्री. १. वरानें घोड्यावर बसून लग्नासाठीं वधूगृहीं जाण्याची रीत किंवा विधि. २. एक तोफ. ३. कलावंतीण. –दौड़– स्त्री. १. घोडदौड; घोड्यांची शर्यत. २. घोडदौडीचें मैदान. ३. एक प्रकारचा जुगार; 'रेस'. ४. एक प्रकारची मोठी नाव. –नाल– स्त्री. घोड्यावरून हलविली जाणारी तोफ. –बहल– पु.; –बहली–स्त्री. घोड्यांचा रथ; घोडागाडी. –मुहाँ–वि. लांबतोंड्या.–पु. किन्नर. –सवार– पु. घोडेस्वार. –सार–ल– स्त्री. तबेला; घोड्यांची पागा.

घुड़कना–क्रि. स. दटावणें; धमकी देणें; वसकन अंगावर येणें.

घुड़की– स्त्री. धमकी; दटावणी.

घुड़िया– स्त्री. १. तट्टू. २. भिंतीवरची खुंटी. ३. घोडी.

घुन–पु. १. कसर; कीड. २. घृणा. मु०– लगना–१. कसर, कीड लागणें. २. मनाला टोंचणी लागणें; आंतल्या आंत पोखरलें जाणें.

घुनघुना–पु. खुळखुळा.

घुनना– क्रि. अ. कीड, कसर लागणें (लांकूड धान्य इ. स).

घुन्ना–वि. १. कुढ्या; मनांत अढी बाळगणारा. २. घुम्या.

घुन्नाना–क्रि. अ. गप्प बसणें; मौन राहाणें.

घुप–वि. दाट; गुडुप (अंधार).

घुमक्कड़– वि. भटक्या.

घुमक्कड़ी– स्त्री. भटकंती.

घुमटा–पु. भोंवळ; चक्कर.

घुमड़– स्त्री. मेघांचा जमाव; मेघांची दाटी.

घुमड़ना–क्रि. अ. १. ढग जमून येणें. २. एकत्र होणें; जमणें. ३. गरजणें.

घुमड़ी–री– स्त्री. १. चक्कर; मूर्च्छा; भोंवळ; तिरमिरी. २. प्रदक्षिणा. [भटक्या.

घुमना–वि. १. फिरणारा. २.

घुम(म्म)रना–क्रि. अ. १. ढग एकत्रित येणें. २. मोठा आवाज होणें. ३. फिरणें.

घुमाना–क्रि. स. १. फिरविणें. २. परतविणें; वळविणें.

घुमाव–पु. १ वळण; बांक. २. फेरा; चक्कर; घेरा.–दार–वि. घेरेदार; फिरकीचा. [होणें.

घुमेरी*– स्त्री. मूर्च्छा; बेशुद्ध

घुर–'घूरा'चें समासांतील रूप. –बिन– वि. उकिरड्यांतील धान्य किंवा मोडक्यातोडक्या वस्तू गोळा करणारा. – बिनिया– स्त्री. रस्त्यावरील केरकचऱ्याच्या ढिगांतून धान्य, कागद, कपडे वगैरे उपयुक्त वस्तू गोळा करण्याचा धंदा.

घुरकना*– क्रि. स. दटावणें; भीति दाखविणें.

घुरघुर–पु. घरघर; खरखर.

घुरघुराना–क्रि. अ. खरखर आवाज होणें (घशांत).

घुरना*–क्रि. अ. १. मिसळणें; एकजीव होणें. २. वाजणें. ३. आवळलें जाणें; बांधलें जाणें;

घुर(रु)हुरी– स्त्री. पाऊलवाट; जंगलामध्यें गुरांच्या चालण्यानें बनलेली वाट. [व्याप्त होणें.

घुराना–क्रि. अ. भरून जाणें;

घुलनशीलता– स्त्री. द्रवणशीलता; 'सोल्यूबिलिटी.'

घुलना–क्रि. अ. १. विरघळणें; मिसळणें; एकजीव होणें. २. रोगानें झिजणें; निःसत्त्व होणें. मु० घुलकर काँटा होना–झुरून, झिजून, अशक्त होणें; वाळून जाणें. घुलघुलकर बातें करना–गुलगुल गोष्टी करणें. घुलघुलकर मरना–तिळतिळ झिजून मरणें; खितपत पडून मरणें. घुलमिलकर–प्रेमानें; मिळून–मिसळून. घुला हुआ–१. खूप पिकलेला; बिलबिलीत. २. वृद्ध.

घुलवाना–क्रि. स. १. विरघळविणें. २. वितळविणें.

घुलाना–क्रि. स. १. विरघळविणें. २. चघळणें. ३. सुरमा, काजळ घालणें. ४ मऊ करणें.

घुलावट– स्त्री. १. मिसळणें; एकजीव होणें; मऊपणा. २. काजळ किंवा सुरमा यांची शोभा.

घुल्य–पु. द्रवणशील पदार्थ; 'सोल्यूट'.

घुसना–क्रि. अ. १. शिरणें; आंत जाणें; घुसणें. २. हस्तक्षेप करणें.

घुसपैठ– स्त्री. प्रवेश; शिरकाव.

घुसर-पुसर– स्त्री. कुजबुज.

घुसाना; घुसेड़ना–क्रि. स. १. घुसडणें; खुपसणें; आंत घालणें. २. टोंचणें; बोचणें.

घुस्की– स्त्री. व्यभिचारिणी.

घूँघट–पु. बुरखा; पडदा; घुंघट; ओढणीचा किंवा तोंडावरील भाग; अवगुंठन. मु०–करना; –काढ़ना; –निकालना–साडीच्या किंवा ओढणीच्या पदरानें तोंड झांकून घेणें.

घूँघर–पु. १. केसांचें नागमोडी वळण. २. * घुंगरू. –वारे–ले–वि. कुरळे.

घूँट–पु. घोट. [घोट घेणें.

घूँटना–क्रि. स. पिणें; गिळणें;

घूँटी–स्त्री. बाळगुटी; बाळगोळी.

घूँसा–पु. १. ठोसा; बुक्की. २. हाताची मूठ.

घूआ–पु. बुलबुल इ. पक्ष्यांना खावयास घालतात तो किडा.

घूक–पु. घुबड.

घूघ–पु. स्त्री. शिरस्त्राण; लोखंडी किंवा पितळी टोपी.

घूठन*– अव्य. गुडघ्यांवर.

घूमना–क्रि. अ. १. फिरणें; भटकणें; गमणें. २. वळणें. ३. परत येणें; प्रवास करणें. ४. * वेड लागणें. [युक्त.

घूमरा*– वि. मादक; मद-

घूर–पु. उकिरडा.

घूरना–क्रि. अ. १. डोळे वटारून पाहाणें; रागानें रोखून पाहाणें. २. टक लावून पाहाणें.

घूरा–पु. १ केरकचरा. २. उकिरडा. ['मोमेंट'.

घूर्ण; घूर्णन–पु. गरगर फिरणें;

घूर्णन करना–क्रि. अ. गरगर फरणें; वाटोळें फिरणें; 'रोटेट'.

घूस– स्त्री. लांच. –पु. स्त्री. घूस. **–खोर**–पु. लांचखाऊ.

घृणा–स्त्री. १. तिरस्कार; किळस. २. द्वेष. [कोरफड.

घृत–पु. तूप. **–कुमारी**– स्त्री.

घेंट–पु. मान; नरडें.

घेंटा–पु. डुकराचें पिलूं.

घेंटी+–स्त्री. घांटा; घाटाणा; ओल्या हरभऱ्याचा टरफलासहित असलेला दाणा.

घेघा–पु. १. अन्ननलिका. २. गळा. ३. गंडमाळा (रोग).

घेपना+– क्रि. स. १. एखादा घट्ट पदार्थ बोटानें काढणें. २. खरवडून काढणें.

घेर–पु. घेर; परिघ. **–घार**–पु. १. वेढा घालण्याची क्रिया. २. सभोंवतालचा फैलाव; पसारा. ३. खुशामत; विनंती.

घेरना–क्रि. स. १. घेरणें; वेढा घालणें; गराडा घालणें. २. गुरें चरावयास नेणें. ३. जागा ताब्यांत ठेवणें.

घेरा–पु. १. परिघ; वर्तुळ; वेढा. २. परिवेष्टित स्थान; वेढलेली जागा; आवार. **मु०–डालना**–वेढा घालणें. **–बाँधना**–वेढणें.

घेवर–पु. घीवर (पक्वान्न).

घैया–स्त्री. १. दुधाची धार; धारोष्ण दूध. २. कच्च्या दुधावरची निवळी; लोणी. ३. दिशा; बाजू.

घैर-रू-रो*– पु. अपकीर्ति; लांछन; बदनामी. २. चहाडी.

घैला+–पु. घागर; कळशी.

घोंघा–पु. १. शंख. २. गोगलगाय. –वि. मूर्ख. **–बसंत**– वि. महामूर्ख.

घोंटना– क्रि. स. १. घोंट घोंट पिणें. २. पचविणें. ३. गळा दाबणें. ४. घोटणें; वांटणें.

घोंपना– क्रि. स. १. भोकसणें; घुसविणें. २. धांवता दोरा घालणें.

घोंसला–पु. घरटें.

घोंसुआ*–पु. घरटें. [करणें.

घोखना– क्रि. स. घोकणें; पाठ

घोटना– क्रि. स. १. घोटणें; वांटणें; घोटून बारीक पूड करणें. २. अभ्यास करणें; परिश्रम करणें. ३. दाबणें (गळा). ४. चिकण अथवा चकचकीत करणें.

घोटनी– वि. लहान खल; घोटण्याचें लहान उपकरण.

घोटवाना– क्रि. स. घोटवून घेणें; वांटवून घेणें.

घोटा–पु. १. बत्ता. २. घोटण्याची किंवा वांटण्याची क्रिया. ३. भांग घोटण्याचा सोटा. ४. जनावरांना औषध पाजण्याचें बांबूचें नरसाळें.

घोटाई– स्त्री. १. घोटण्याची किंवा वांटण्याची मजुरी; घोटणावळ. २. घोटण्याची क्रिया; घोटणी.

घोटाला–पु. घोटाळा; गडबड; भानगड.

घोटू+–पु. वि. १. घोटणारा. २. निर्बुद्धपणें पाठ करणारा. ३. गडघा.

घोड़ा–पु. घोडा. **–नस**– स्त्री. घोडशीर; पायाच्या टांचेच्या वरच्या बाजूस असलेली शीर, नाडी. **मु०–उड़ाना; –डालना; –फेंकना**– घोड्याला वेगानें पाळविणें. **घोड़े बेचकर सोना**–खुशाल डाराडूर झोंपणें; ताणून देणें.

घोड़िया– स्त्री. १. खुंटी. २. तुळईखालचा घोडा. ३. लहान घोडी. ४. छोटी घडवंची; घोडी. ५. खुंटी.

घोर– वि. १ भयंकर. २. दाट; गाढ. ३. खोल. ४. वाईट. ५. पुष्कळ; अतोनात. ६ कठिण; टणक.

घोरमारी– स्त्री. महामारी; प्लेग, कॉलरा इ० सारखा रोग.

घोरा*–पु. १. खुंटा. २. घोडा.

घोरिला*–पु. १. मातीचा घोडा (खेळणें). २. घोड्याचें तोंड असलेला खुंटा.

घोरी– स्त्री. अघोरी (एक पंथ).

घोल–पु. १. द्रावण; 'सोल्यूशन'. २. मिश्रण. ३. ताक; लस्सी.

घोलक– वि. द्रावक; विद्रावक. –पु. विद्रावक पदार्थ; 'सॉल्व्हंट'.

घोलना– क्रि. स. घोळणें; मिसळणें; एकजीव करणें. **मु० घोलकर पी जाना**– १. पारंगत होणें. २. कोळून पिणें.

घोलुवा+– *वि.* मिश्रण केलेला. –*पु.* एकत्र मिसळलेलें औषध वगैरे.

घोष–*पु.* १. घोषणा. २. अफवा. ३. गवळ्यांचें गाव. ४.* गोशाळा; गोठा. **–विक्रय**–*पु.* लिलांव; 'ऑक्शन'.

घोषणा– *स्त्री.* १. घोषणा; दवंडी. २. गर्जना. ३. जाहीरनामा; 'प्रोक्लमेशन'.

घोसी–*पु.* १. गवळी. २. मुसलमान गवळी.

घौद–*पु.* घड; घोंस (फळांचा).

घौदा+– *वि.* घायाळ.

घौहा+–*पु.* डागळलेलें फळ.

घ्राण–*पु.* १. गंध; वास. २. नाक.

च

च– देवनागरी वर्णमालेच्या चवर्गांतील पहिला वर्ण.

चंक*– *वि.* संपूर्ण; पुरा.–*पु.* पिकाच्या कापणीनंतरचा एक उत्सव.

चंग– *पु.* [*फा.*] १. एक प्रकारचें डफासारखें वाद्य. २. गंजिफाच्या खेळांतील एक डाव; रंग. ३. सतारीचा एक सूर. –*स्त्री.* मोठा पतंग; वावडी. **मु०–उमहना; –चढ़ना**– जोर होणें.–**पर चढ़ना**– १. एखाद्याला स्तुतीनें चढविणें. २. आपल्या अनुकूल बनविणें.

चंग– *वि.* १. निरोगी. २. चतुर. ३. सुंदर. [ताणणें; आवळणें.

चंगना–* *क्रि.स.* ओढणें;

चंगा– *वि.* १. निरोगी; धडधाकट. २. छान; सुंदर. ३. निर्मळ; शुद्ध. ४. चांगला. [तावडी.

चंगु–* *पु.* १. पंजा. २. पकड;

चंगुल– *पु.* १. पंजा (मांजर, पक्षी इ० चा) २. पकड; काबू. **मु०– में फँसना**– पकडींत, तावडींत सांपडणें.

चँगेर–री– *स्त्री.* १. करंडी. २. फुलांची परडी व टोपली. ३. पखाल. ४. टोपलीचा पाळणा.

चंच– *पु.* १. टोपली. २. पांच अंगुळांचें एक माप. – *स्त्री.** चोंच.

चंचरीक– *पु.* भुंगा; भ्रमर. [–*स्त्री.* **चंचरी**].

चंचल– *वि.* १. चंचल; अस्थिर. २. चळवळ्या. ३. कामुक. ४. नखरेल. [वीज.

चंचला– *स्त्री.* १. लक्ष्मी. २.

चंचा– *स्त्री.* वेत इ० ची टोपली, चटई.–**पुरुष**–*पु.* १. बुजगावणें. २. तुच्छ व्यक्ति.

चंचु– *पु.* १. एरंडाचें झाड. २. हरिण. ३. एक पावसाळी भाजी. – *स्त्री.* चोंच.

चंचुर– *वि.* दक्ष; निपुण; प्रवीण.

चँचोरना+– *क्रि. स.* चोखणें.

चंट*– *वि.* १. धूर्त; कावेबाज. २. हुशार; चलाख.

चंड– *वि.* १. उग्र; प्रखर. २. बलवान्. ३. कठिण; विकट. ४. रागीट; चिडचिडा. [तीक्ष्णता.

चंडता*– *स्त्री.* प्रबलता; उग्रता;

चंडाई*– *स्त्री.* १. घाई; त्वरा; जलदी. २. जबरदस्ती.

चंडाल– *पु.* चांडाळ; डोंब.– *वि.* क्रूर. **मु०–चौकडी**– चांडाळ–चौकडी; बदमाष लोक.

चंडावल*– *पु.* १. पिछाडीचें सैन्य. २. वीर योद्धा. ३. पहारेकरी.

चंडू–*पु.* अफूपासून तयार केलेला एक मादक पदार्थ.–**खाना**– *पु.* चंडू, चरस वगैरे सेवन करण्याचा अड्डा. –**बाज़**– *पु.* चंडू पिणारा. **मु०–खाने की गप**– १. थाप; खोटी गोष्ट. २. नशेंतील बरळणें.

चंडूल– *पु.* १. चंडोलपक्षी. २. कुरूप व्यक्ति.

चंडोल– *पु.* १. एक प्रकारची पालखी; डोली. २. मातीचें एक खेळणें.

चंद– *पु.* १. चंद्र. २. कापूर. ३. पृथ्वीराजाचा दरबारी कवि.

चंद– *वि.* [*फा.*] थोडें; कांहीं. –**रोज़ा**–*वि.* थोडया दिवसांचा; तात्पुरता.

चंदक–*पु.* १. चंद्र. २. चांदणें. ३. एक लहान मासळी. ४ चंद्रकोर (दागिना).

चंदन– *पु.* १. चंदनाचें झाड. २. चंदनाचें खोड. ३. चंदनाचा लेप; उटी. –**हार**– *पु.* चंद्रहार.

चंदना*– *पु.* १ चंद्र. २. चांदणें.

चँदनौता– *पु.* जरीकाम केलेला परकर.

चँदराना+– *क्रि. स.* १. रमविणें; मनोरंजन करणें. २. अज्ञानी असल्याचें भासविणें. [टकल्या.

चँदला– *वि.* टक्कल पडलेला;

चँदवा– *पु.* १. चांदवा. २. एक प्रकारचा लहान मंडप व छत. ३. गोल चकती. ३. मोर पिसावरील डोळा. ५. टोपीचा वरील गोल भाग.

चंदाँ– *अव्य.* [*फा.*] १. एवढा; इतका. २. पुष्कळ. ३. मुळींच.

चंदा– *पु.* १. वर्गणी; पट्टी. २. दान; देणगी. ३. चंद्र.–**मामूँ**– *पु.* चंदामामा.

चंदावल–*पु.* [*फा.*] सैन्याच्या

पिछाडीचें रक्षण करणारे सैनिक; सैन्याची पिछाडी. **–दस्ता–** पु. पिछाडीचें सैन्य.

चँदिया– *स्त्री.* १. टाळू; कवटी. २. दामटी; लहान पोळी; चांदकी. ३.* चांदणें. **मु०–खुजाना–** १. डोक्याला खाज सुटणें. २. मार खाण्यासारखें काम करणें.

चँदोवा–पु. लहान शामियाना.

चंद्र–पु. १. चांद; चंद्र. २. कापूर. ३. अर्ध अनुनासिकाचें चिह्न; चंद्र-बिंदु.**–भस्म***–पु. कापूर.**–वधूटी***–*स्त्री.* मखमली किडा. **–हास–**पु. १. रावणाच्या तलवारीचें नांव. २. तलवार; खड्ग.

चंद्रमा–पु. चंद्र. [होणें.

चंद्रा–*स्त्री.* मरतांना डोळे पांढरे

चंद्रिका– *स्त्री.* १. चांदणें. २. मोराच्या पिसाऱ्यावरील डोळा. ३. मोठा वेलदोडा. ४ जुई; चमेली. ५. बिंदी. [पिवळसर.

चंपई–*वि.* चांफ्याच्या रंगाचा;

चंपत–*वि.* गडप झालेला; पसार झालेला; निसटलेला; पळालेला. **मु०–होना–**पसार होणें.

चँपना–*क्रि. अ.* १. ओझ्याखालीं दबणें; चेपलें जाणें. २. व्याकुळ होणें.–*क्रि. स.* चेपणें; दाबणें; चुरणें.

चंपा–पु. १. चांफा. २. एक प्रकारचें गोड केळें. ३. रेशमाचा किडा.

चंपू–पु. गद्यपद्यमय काव्य.

चंबल–पु. १. भीक मागण्याचें भांडें. २. चिलमीचें फडकें. ३. पाण्याचा पूर.–*स्त्री.* चंबळ नदी.

चँवर–पु. १. चवरी. २. झालर. ३. घोडा इ० च्या डोक्यावर लावावयाचा तुरा.**–ढार–**पु. चवरी ढाळणारा.

चँवरी– *स्त्री.* १. चवरी. २. तिबेटमधील एक प्रकारची गाय; नीलगाय; ३. घोड्याच्या केसांची चवरी. हिनें घोडयाच्या अंगावरील माश्या उडवितात.

च–*अव्य.* आणि; व.–पु. १. चंद्र. २. शिव. ३. दुर्जन; चोर.–*वि.* १. बीजरहित. २. नीच; वाईट.

चउर*–पु. चवरी. [बाजार.

चउहट्ट+*–पु. चौक; चौरस्ता;

चक–पु. १. चकवा; चक्रवाक (पक्षी). २. एक प्रकारचें खेळणें; चक्री. ३. चाक. ४. जमिनीचा तुकडा. ५. खेडें. ६. विपुलता. ७. अधिकार.–*वि.* भरपूर; पुष्कळ. **मु०– जमना–**बस्तान बसणें.

चकई– *स्त्री.* १. चक्रवाक पक्ष्याची मादी; चकवी. २. चक्री; चक्र (खेळणें).

चकचकाना–*क्रि.अ.* १. थेंब थेंब बाहेर येणें. २. ओलें चिंब होणें; भिजणें.

चकचाना*–*क्रि. अ.* दिपणें.

चकचाल+–पु. चक्र; फेरा; चक्राकार भ्रमण.

चकचाव*–पु. दीप्ति.

चकचून–र*–*वि.* १. बारीक दळलेलें. २. चक्काचूर. [चौंध '.

चकचोड़ा–पु. पा० ' चका

चकचोही*–*वि. स्त्री.* लाघवी बोलणें; तोंडावर गोड बोलणें.

चकचौंध– *स्त्री.* डोळे दिपणें; थक्क होणें.

चकचौंधना–*क्रि. अ.* अतिशय प्रकाशामुळें डोळे दिपणें; अंधेरी येणें.

चकचौंह*– *स्त्री.* चकचकाट.

चकचौंहाँ*–*वि.* सुंदर; दीप्तिमान; झगझगीत.

चकडोर– *स्त्री.* चक्रीला (खेळणें) गुंडाळलेला दोरा.

चकती– *स्त्री.* १. ठिगळ. २. चकती; कापडाची किंवा चमड्याची पट्टी.

चकत्ता–पु. १ चकंदळ; नायट्याचा डाग किंवा चट्टा. २. दांतानें चावल्याचा व्रण; खूण. ३. गांध; फोड (खाजविल्यामुळें झालेला).

चकना*–*क्रि. अ.* १. चकित होणें; विस्मित होणें. २. साशंक होणें.

चकनाचूर–*वि.* चक्काचूर.

चकपकाना–*क्रि. अ.* कावरें बावरें होणें; स्तिमित होणें; चकित होणें.

चकफेरी– *स्त्री.* प्रदक्षिणा; फेरी.

चकबंदी– *स्त्री.* जमिनीच्या चतुःसीमा ठरविणें; मोठमोठे जमिनीचे तुकडे पाडणें; घुरे पाडणें; लहान तुकडे जोडणें. [चकमक.

चक़मक़–पु. [तु.] गारगोटी;

चकमा–पु. १. हूल; झुकांडी; फसवणूक. २. नुकसान; तोटा; हानि. [चकमक.

चक़माक़–पु. [तु.] गारगोटी;

चकर*–पु. १. चक्रवाक. २. चक्र; फेरा.

चकरबा–पु. १. अनवस्था प्रसंग; पेंच. २. घोंटाळा; भानगड. ३. चक्र; फेरा.

चकरा*–पु. पाण्यांतील भोंवरा. –*वि.* रुंद; विस्तृत.

चकराना–*क्रि. अ.* १. डोकें फिरणें; चक्कर येणें; घेरी येणें. २. बुचकळ्यांत पडणें. ३. घाबरणें.

चकरी– *स्त्री.* १. चक्री; फिरकी. २. जातें.–*वि.* १. अस्थिर; चंचल. २. रुंद.

चकला–*पु.* १. पोळपाट. २. जातें. ३. प्रदेश; भाग. ४. वेश्यांची गल्ली.–*वि.* रुंद.–(**ले**)**दार**– *पु.* एखाद्या प्रदेशाचा सरकारी अधिकारी किंवा कर वसूल करणारा; जमाबंदी अधिकारी.

चकलाना–*क्रि. स.* १. झाड उपटून दुसऱ्या ठिकाणी लावणें; दुसऱ्या जागीं लावण्यासाठीं माती सकट झाड उपटणें. २. रुंद करणें.

चकली– *स्त्री.* १. कप्पी; चाक. २. लहान सहाण.–*वि.* रुंद.

चकल्लस–*स्त्री.* १. भांडण-तंटा; भानगड. २. मित्रांची थट्टामस्करी.

चकवँड़–*पु.* टाकळा; तरोटा.

चकवा–*पु.* चक्रवाक (पक्षी). [–*स्त्री.* **चकवी**].–*वि.* विरही; उपासक.

चकहा*–*पु.* चाक; चक्र.

चका*–*पु.* १. चाक. २. चकवा (पक्षी).–*वि.* चकित.

चकाचक–*वि.* रसभरित; रसाळ. –*अव्य.* चापून; दाबून; भरपूर. –*स्त्री.* सपासप; तलवार वगैरेच्या आघातांचा आवाज.

चकाचौंध–*स्त्री.* १. डोळे दिपणें; तिरिमिरी. २. आश्चर्य; थक्क होणें.

चकाना*–*क्रि. अ.* १. आश्चर्य-चकित होणें. २. चक्कर येणें. ३. भ्रमिष्ट होणें; साशंक होणें.

चकाबू; चकाबूह–*पु.* चक्रव्यूह. **मु० – में पड़ना, फँसना**– चक्रव्यूहांत अडकणें.

चकित–*वि.* थक्क; आश्चर्य-चकित; विस्मित. –**वंत***–*वि.* १. आश्चर्ययुक्त; विस्मयकारक. २. चकित; विस्मित.

चकुला*–*पु.* पक्ष्याचें पिलूं.

चकोटना–चिमटा घेणें.

चकोतरा–*पु.* ईडलिंबू; साखर-लिंबू. [**चकोरी**]

चकोर–*पु.* चातक पक्षी. [–*स्त्री.*

चकौंड़⁺–*पु.* टाकळा; तरोटा.

चक्क–*पु.* १. कष्ट; त्रास. २ चकवा पक्षी. ३.* कुंभाराचें चाक.

चक्कर–*पु.* १. चाक; गोल वस्तु. २. फेरा; चक्र; वर्तुळ. ३. परिभ्रमण. ४. गोंधळ; घोंटाळा. ५. घेरी. ६. पाण्यांतील भोंवरा. **मु०– काटना**–१. चकरा मारणें; फेऱ्या घालणें. २. भटकणें.–**में आना**–१. चक्रांत अडकणें. २. चकित होणें. [सार्वभौम राजा.

चक्कवई*–*वि. पु.* चक्रवर्ती;

चक्कवा–*पु.* चक्रवाक; चकवा.

चक्का–*पु.* १. चाक. २. चाकाच्या आकाराची गोल वस्तु. ३. गोटा; दगड. ४. घट्ट गोळा.

चक्की– *स्त्री.* १. जातें. २. गुडघ्याची वाटी. **मु०–पीसना**–१. दळणें. २. कष्टाचें काम करणें.

चक्कू–*पु.* [*तु.*] चाकू.

चक्खी⁺– *स्त्री.* स्वादिष्ट व खमंग पदार्थ (भेळ, भजी वगैरे).

चक्र–*पु.* १. चाक (गाडीचें, कुंभाराचें इ०). २. वर्तुळ. ३. तळहातावरील चक्र. ४. चक्रवाक पक्षी. ५. एक गोल अस्त्र. ६. चक्र; 'साय-कल'. –**धर**–*पु.* १. विष्णु; कृष्ण. २. जादूगार. ३. ग्रामप्रमुख. –**पाणि**–*पु.* विष्णु. –**यान**–*पु.* वाहन; 'विहीकल'. –**लेखित्र**–*पु.* 'सायक्लोस्टाइल मशीन'. –**वर्ती**–*वि. पु.* सम्राट्; सार्वभौम. –**वात**–*पु.* सोसाट्याचा वारा; वावटळ; वादळ. –**वाल**–*पु.* १. एक पक्षी. २. अन्तरिक्ष. ३. पुराणांत वर्णिलेला एक पर्वत. –**वृद्धि ब्याज**–*पु.* चक्रवाढ व्याज.

चक्राट–*पु.* १. गारुडी. २. सापाचें विष उतरविणारा मांत्रिक. ३. धूर्त माणूस.

चक्रानुक्रमसे– *अव्य.* पाळी-पाळीनें; 'इनरोटेशन'.

चख*–*पु.* १. डोळा. २. दृष्टि.

चख– *स्त्री.* [*फा.*] १. झगडा; भांडण. २. आरडाओरड; गिल्ला. *वि.*–१. वाईट; खराब. [२. दुष्ट. –**चख**–बोलाचाली; तंटा.

चखना–*क्रि. स.* चाखणें; चव घेणें; स्वाद घेणें.

चखपु(पू)तरी*–*स्त्री.* १. डोळ्यांतील बाहुली. २. अत्यंत प्रिय व्यक्ति.

चखाचखी – *स्त्री.* [*फा.*] १. वैमनस्य; वैर; वेबनाव. २. भांडण; तंटा. ३. दमदाटी.

चखाना–*क्रि. स.* चाखावयास देणें; खाऊं घालणें. **मु०– मजा चखाना**–अद्दल घडविणें.

चखिया–*वि.* तक्रार करणारा; भांडखोर.

चखु*– *पु.* चक्षु; डोळा.

चखोड़ा–*पु.* १. तीट (दृष्ट लागूं नये म्हणून लावलेलें). २. गालबोट.

चखौती⁺– *स्त्री.* झणझणीत, चमचमीत जेवण; मसालेदार पदार्थ खाणें. [हुशार.

चगड़–*वि.* चलाख; धूर्त;

चग़ताई– *पु.* [*फा.*] मोगल वंश; या वंशाचा मूळ पुरुष; बाबर, अकबर वगैरे मुगल बादशाह.

चगलाना–*क्रि. स.* चघळणें; चावणें.

चघड़⁺– *वि.* लुच्चा. –**पन**– *पु.* १. लुच्चेपणा. २. चघळपणा.

चचा–*पु.* चुलता; काका. –**ज़ाद** –*वि.* चुलत. **मु० – बनाना** – १. चांगला सूड घेणें. २. मूर्ख बनविणें.

चचिया+–*वि.* चुलत्याच्या बरोबरीचा; चुलत. **–ससुर–**चुलत सासरा.

चचींड़ा–*पु.* पडवळ.

चची– *स्त्री.* काकी; चुलती.

चचुलाई+– *स्त्री.* पडवळ.

चचेरा–*वि.* चुलत्यापासून जन्मलेला; चुलत.

चचोड़ना– *क्रि. स.* चोखणें; दांतांनीं दाबून चोखणें; चघळणें; चुंफणें.

चच्चर*– *पु.* एक गीत. हें होळीच्या प्रसंगी गायिलें जातें.

चट– *अव्य.* चटकन्; झटदिशीं; ताबडतोब. –*वि.* चट्ट; चाटूनपुसून खाल्लेला. **मु० –कर जाना–** खाऊन मट्ट करणें; गिळंकृत करणें.

चट*– *पु.* १. डाग; चिन्ह. २. जखमेची खूण. ३. + तरट.

चटक– *स्त्री.* कांति; चमक; दीप्ति; सौंदर्य. –*वि.* चमकदार; सुंदर. **–दार–** *वि.* १. चमकदार; कांतियुक्त. २. स्वादिष्ट; रुचकर. ३. भडक रंगाचा. **–मटक–** *स्त्री.* थाटमाट; नटणें-मुरडणें; नट्टापट्टा.

चटक–*पु.* चिमणा.

चटक– *स्त्री.* वेग; गति; चपळाई. –*अव्य.* झटपट; वेगानें.

चटकना– *क्रि. अ.* १. तडकणें; उलणें; तिडतिडणें. २. उमलणें. ३. खटका उडणें. ४. चिडणें. ५. विसरणें. –*पु.* थप्पड; चपराक.

चटकनी – *स्त्री.* बोलट (दाराचा); खिट्टी.

चटकाना– *क्रि. स.* १. चटचट असा आवाज करणें. २. चिडविणें. ३. बोटें मोडणें. ४. वेगळें करणें; पृथक् करणें. **मु० जूतियाँ चटकाना–** १. जोडे झिजविणें; वणवण करणें; दारोदार हिंडणें. २. वाहाणांचा चटपट आवाज करीत चालणें.

चटकारा– *वि.* १. भडक; चकचकीत. २. चंचल; चपल. ३. स्वादिष्ट; रुचकर.

चटकाली– *स्त्री.* पक्ष्यांची रांग; पक्ष्यांचा समूह.

चटकाहट– *स्त्री.* १. तडकणें; तडतडण्याचा आवाज. २. उमलणें; कळी उमलण्याचा आआज.

चटकीला– *वि.* १. चमकदार; भडक. २. खमंग; चमचमीत. ३. मजेदार. [कना.'

चटखना– *क्रि. अ.* पा० 'चट-

चटखारा– *पु.* मिटकी; स्वादिष्ट वस्तु खातांना होणारा आवाज. –(**रे**)**दार**–*वि.* चटकदार; खमंग. **मु० –(रे) भरना–** मिटक्या मारीत खाणें; ओंठ चाटणें.

चटचटाना– *क्रि. अ.* तडतडणें; तडकणें; फुटणें.

चटचटिया– *वि.* गडबड्या; उतावळा.

चटनी– *स्त्री.* चटणी; तिखट. **मु ०–करना–** १. चटणी उडविणें; खाऊन टाकणें. २. खूप बारीक वांटणें.

चटपट–*अव्य.* झटपट; ताबडतोब. [खमंग; रुचकर.

चटपटा– *वि.* चुरचुरीत;

चटपटाना*– *क्रि. अ.* १. तडफडणें; तळमळणें. २. घाई करणें. [चतुर; लटपट्या.

चटपटिया– *वि.* १. चपळ. २.

चटपटी– *स्त्री.* १. आतुरता; घाई; उत्कंठा. २. चुटपुट.

चटशाला; **चटसार***–*स्त्री.* १. लहान मुलांची शाळा. २. रंगभूमि.

चटाई– *स्त्री.* १. चटई; अंथरी. २. चाटविण्याचें काम.

चटाक-ख– *पु.* १. लांकूड मोडण्याचा आवाज; बोड मोडण्याचा आवाज. २. डाग; चट्टा. **–पटाक-ख–** *अव्य.* झटपट.

चटाका-खा– *पु.* कडाका; कडाडण्याचा किंवा मोडण्याचा आवाज.

चटाना– *क्रि. स.* १. चाटविणें; भरविणें. २. लांच देणें. ३. धार लावणें.

चटापटी– *स्त्री.* १. घाई. २. सांसर्गिक रोगानें माणसें पटापट मरणें. [प्राशन-संस्कार.

चटावन– *पु.* उष्टावण; अन्न-

चटियल– *वि.* ओसाड; वैराण (मैदान); खडकाळ (माळरान).

चटिहाट+– *वि.* जड; मूर्ख.

चटी– *स्त्री.* १. पाठशाळा. २. ध्यान; विचार. ३. एक प्रकारचें पादत्राण; 'स्लिपर'.

चटुल– *वि.* १. चपल, चंचल; तरतरीत. २. सुंदर; मनोहर.

चटोर-रा– *वि.* १. लालचावलेला; चटावलेला (खाण्यासंबंधी). २. स्वादलोलुप. **– पन**–*पु.* चांगले पदार्थ खाण्याची चट; स्वादलोलुपता.

चट्टान– *स्त्री.* खडक.

चट्टा-बट्टा– *पु.* १. मुलांचीं लांकडी खेळणीं. ३. जादुगाराच्या पोतडींतील गोटे, गोळचा इ. **मु० एकही थैली के चट्टेबट्टे–** एकाच माळेचे मणी. **चट्टेबट्टे लड़ाना–** लावालावी करणें.

चट्टी– *स्त्री.* १. मुक्कामाची जागा; यात्रेकरूंची उतरण्याची जागा. २. नुकसान; हानि. ३. जोडा; चप्पल; 'स्लिपर'.

चट्टू– *वि.* चटावलेला; लाल-

चावलेला. –पु. १. मुलांचें लांकडी चोखणें. २. दगडी, मोठा खल.

चड्डा-ड्डा– पु. १. मांडीचा वरील सांधा. २. विदूषक.

चड्डी– स्त्री. लंगोट; जांधिया.

चड्ढी– स्त्री. कुरघोडीचा खेळ. **मु०–गाँठना**– पाठीवर बसणें; कुरघोडी करणें. **–देना**– पराभूत होऊन पाठीवर बसूं देणें.

चढ़ना– क्रि. अ. १. चढणें; स्वार होणें; वर जाणें. २. अधिक होणें; चढणें (पाणी, भाव, स्वर, आवाज इ.). ३. चढाई करणें. ४. तंबोरा, सतार इ. ची तार चढणें; ताणणें. ५. नोंद होणें; लिहिलें जाणें ६. कर्ज होणें. [चढविणें.

चढ़वाना– क्रि.स. चढवून घेणें;

चढ़ाई– स्त्री. १. चढणें. २. चढण. ३. हल्ला; आक्रमण.

चढ़ा-उतरी– स्त्री. चढउतार करणें. [चढाओढ; स्पर्धा.

चढ़ा-ऊपरी; चढ़ाचढ़ी– स्त्री.

चढ़ाना– क्रि. स. १. चढविणें; वर नेणें. २. अर्पण करणें; वाहणें. ३. लिहिणें; नोंद करणें. ४. चढवून ठेवणें.

चढ़ाव–पु. १. वाढ; वृद्धि. २. चढण. ३. प्रवाहाच्या उलट दिशेनें जाणें. **–उतार**–पु. चढ-उतार; उंच सखल जागा.

चढ़ावा–पु. १. विवाहसमयीं वरपक्षाकडून वधूला घालावयास दिला जाणारा दागिना. २. देवाला अर्पण केलेली वस्तु (नैवेद्य). ३. उतारा. ४. उत्तेजन. **मु०–बढावा देना**– उत्साह वाढविणें; उत्तेजन देणें.

चढ़ोत्री+– स्त्री. मूर्ति किंवा पोथी यांच्यापुढें ठेवण्यांत येणारी दक्षिणा; बिदागी. [जोडा.

चढ़ौवाँ–पु. चढाव; उंच टाचेचा

चतुरंग–पु. १. बुद्धिबळ. २. सैन्याचे चार भाग (हत्ती, घोडेस्वार; रथी व पायदळ). –वि. चार अंगांचें. [धूर्त; चपळ.

चतुर– वि. हुशार; प्रवीण;

चतुर(रा)ई– स्त्री. १. चातुर्य; हुशारी. २. धूर्तपणा; चलाखी. **मु० –घोलना;–तौलना**–चलाखी करणें; लुच्चेगिरी करणें.

चतुरादिवेश्म–पु. 'कार्सेरुलस.'

चतुरानन–पु. ब्रह्मदेव.

चतुरास– स्त्री. चारी बाजू; चतुःसीमा. [चौऱ्यांयशी लक्ष योनी.

चतुरासी– वि. चौऱ्यांयशी;

चतुर्भुज–पु. चौभुज; 'क्वाड्रिलॅटरल.'

चतुर्मास–पु. चातुर्मास (पावसाळ्यांतील चार महिने).

चतुष्कोण–पु. चौकोन; 'क्वाड्रॅंगल.'

चत्वर–पु. १. चौरस्ता; चव्हाटा. २. चौथरा; चौकोनी स्थान.

चदरा+–पु. [फा. 'चादर'] १. चादर. २. उपरणें; ओढणी.

चदिर– पु. १. कापूर. २. चंद्र.

चद्दर– स्त्री. [फा.] १. चादर. २. नदीच्या प्रवाहावरील पाण्याची पातळी (धारेजवळील); सपाट व स्थिर असा जलपृष्ठाचा भाग. ३. पत्रा.

चनकना+– क्रि. अ. १. उमलणें; फुलणें. २. रुष्ट होणें.

चनखना+– क्रि. अ. चिडणें; रागावणें.

चना–पु. चणा; हरभरा. **मु० नाकों चने चबवाना**–सतावणें; हैराण करणें; नाकीं नऊ आणणें.

चनाब–पु. स्त्री. चिनाब नदी; चंद्रभागा.

चनार–पु. चिनार वृक्ष.

चपकन– स्त्री. १. एक प्रकारचा लांब अंगरखा. २ कोयंडा.

चपकना– क्रि. अ. १. चिकटणें. २. लागून असणें; जुळलेलें असणें.

चपक़लश; चपकुलिस– स्त्री. [तु.] १. तलवारींची लढाई. २. दंगा; भांडण. ३. गर्दी. ४. जागेची टंचाई. ५. अडचण.

चपटना+– क्रि. अ. १. टक्कर होणें. २. चिकटणें.

चपटा– वि. चपटा; बसलेला; दबलेला; सपाट.

चपटी– स्त्री. १. टाळी. २. चिमटी; चिमटा. ३. योनि; योनीवरील चपटा भाग. **मु०–खेलना; –लड़ाना**– योनीवर योनि घासणें; स्त्रियांचा समसंभोग.

चपड़चपड़– स्त्री. मचमच; कुत्रें, मांजर इ. चा खातांना होणारा जिभेचा आवाज.

चपड़ा–पु. १. लाखेचा तुकडा; स्वच्छ केलेली लाख. २. लाल रंगाचा किडा.

चपत– स्त्री. १. चापट; चपराक; थप्पड. २. हानि; नुकसान; चाट. [मारणें; थप्पड मारणें.

चपतियाना+– क्रि. अ. तोंडांत

चपना– क्रि. अ. १. चेपलें जाणें; दबणें. २. शरमणें; लज्जित होणें.

चपनी– स्त्री. १. पणती. २. वाटी. ३. संन्याशाचा कमंडलु. ४. झांकण. ५. गुडघ्याची वाटी.

चपरगट्टू– वि. १. दुर्दैवी; अभागी. २. गुंतलेला; गुंतागुंत झालेला.

चपरना+ –क्रि. स. १. चोपडणें. २. भेंटणें. ३. मळणें; तिंबणें.

चपरना*–क्रि. अ. घाई करणें;

झटकन् एखादें काम करणें.

चपरा–*अव्य.* झटपट; तावडतोब. –पु. पा० 'चपड़ा'.

चपरावना*–*क्रि. स.* बहकाविणें; नादीं लावणें.

चपरास–*स्त्री.* [*फा.*] शिपायाचा पट्टा (बिल्ल्यासह); बिल्ला. [पट्टेवाला.

चपरासी–*पु.* [*फा.*] शिपाई;

चपरि*–*अव्य.* १. चपळाईनें. २. चटदिशीं.

चपल– *वि.* १. चपळ. २. क्षणिक. ३. उतावळा. ४. चलाख.

चपला– *वि. स्त्री.* चपल, चंचल (स्त्री).–*स्त्री.* १. वीज. २. लक्ष्मी. ३. छिनाल बाई. ४. जीभ.

चपली+– *स्त्री.* चप्पल; वाहाण

चपाक+–*अव्य.* चटपट; तावडतोब.

चपाना–*क्रि. स.* १. चेपून घेणें; रगडून घेणें. २. लाजविणें.

चपेट– *स्त्री.* १. धपाटा; थप्पड. २. संकट; आपत्ति; दडपण. ३. पकड; ताबा.

चपेटना–*क्रि. स.* १. पकडून दाबणें. २. दटावणें; धमकाविणें. ३. जबरदस्तीनें पळविणें; पळवून लावणें.

चपेटा*–*पु.* १. पा० 'चपेट'. २+. लाकडी किंवा लाखेचा सहा पैलूंचा एक तुकडा. हा उडवून मुली खेळतात.

चपेरना*–*क्रि. स.* चेपणें; दाबणें.

चप्पड़–*पु.* लाकडाची साल; चीप; ढलपा; छिलका.

चप्पन+–*पु.* तसराळें. [तण.

चप्पल–*स्त्री. पु.* चप्पल; पाय-

चप्पा–*पु.* १. चार अंगुळें जमीन. २. जमिनीचा लहानसा तुकडा. ३. चतुर्थांश. ४. थोडा भाग. **–चप्पा–** *वि.* एक–एक इंच (जागा).–*अव्य.* सर्वत्र.

चप्पी–*स्त्री.* अंग चेपणें; चंपी.

चप्पू–*पु.* एक प्रकारचें वल्हें.

चफाल+– *स्त्री.* दलदलीनें वेष्टिलेलें बेट. [*वि.* भित्रा.

चबक+– *स्त्री.* कळ, ठुसठुस.–

चबकना+–*क्रि. अ.* ठुसठुसणें.

चबाइ–ई; चबाउ–ऊ+–*वि. पु.* चुगलखोर; चहाडखोर.

चबाइन– *स्त्री.* निंदा; बदनामी.

चबाना–*क्रि. स.* चादणें; चावून खाणें; चघळणें. **मु०–चबा-चबाकर बातें करना**–१. अडखळत बोलणें. २. कांहीं गोष्टी लपवीत बोलणें. [वरील बसण्याची जागा.

चबारा+–*पु.* दुसऱ्या मजल्या-

चबाव*–*पु.* लोकनिंदा; बदनामी.

चबूतरा–*पु.* चबुतरा; ओटा.

चबे(बै)ना–*पु.* चावून खाण्याचा पदार्थ; भाजलेलें धान्य (पोहे, हरभरे इ.).

चबे(बै)नी– *स्त्री.* फराळाचे किंवा न्याहारीचे पदार्थ; तळलेली डाळ, मिठाई वगैरे. [खाणारा.

चब्बू–ब्भू+–*वि.* अधाशी; खूप

चब्भो+–*पु.* (दुसऱ्यामुळें मिळालेली) डुब्बी.

चब्य–ब्या– *स्त्री.* गजपिंपळी.

चभड़-चभड़– *स्त्री.* मचमच (खातांना होणारा तोंडाचा आवाज). [घालणें; भरविणें.

चभाना–*क्रि. स.* जेवावयास

चभोक(र)ना–*क्रि. स.* १. खूप चोपडणें; फांसणें. २. बुचकळून काढणें (तेलांत तुपांत); बुडवून काढणें.

चमक– *स्त्री.* प्रकाश; शोभा; चमक.–**दमक**– *स्त्री.* १. लखलखाट. २. शोभा; दीप्ति ३. थाटमाट; नट्टापट्टा.

चमकना–*क्रि. अ.* १ चमकणें; प्रकाशणें; लखलखणें; २. भरभराट होणें. ३. दचकणें. ४. लचक भरणें; चमक भरणें.

चमकाना–*क्रि. स.* १. चकचकीत करणें; उजळा देणें. २. दचकाविणें; भिवविणें. ३. खिजविणें. [शाचा झोत.

चमकारा–*पु.* प्रकाश; प्रका-

चमकीला–*वि.* १. भडक; चकचकीत. २. भपकेदार; चमकदार. [करणें; चमक.

चमकौवल– *स्त्री.* चकचकीत

चमक्को– *स्त्री.* भपकेबाज स्त्री; कुलटा; जहांबाज स्त्री.

चमगा(गी)दड़–*पु.* वटवाघुळ.

चमचम– *स्त्री.* एक प्रकारची बंगाली बर्फी; मिठाई.

चमचमाना–*क्रि. अ.* चमचमणें; चकचकीत असणें.–*क्रि. स.* प्रकाशमान करणें. [२. चिमटा.

चमचा–*पु.* [*फा.*] १. चमचा.

चमचिया; चमची–*स्त्री.* लहान चमचा; पळी (आचमन करण्याची).

चमजूई+– *स्त्री.* १. गोचीड. २. पाठ न सोडणारी वस्तु.

चमटना+–*क्रि. अ.* चिकटणें; मागें लागणें.

चमड़ा–*पु.* १. चामडें; कातडें. २. त्वचा. **मु०– उधेड़ना; –खींचना**– १. कातडें सोलणें. २. फोडून काढणें; खूप चोप देणें. [साल.

चमड़ी– *स्त्री.* १. कातडें. २.

चमत्कार–*पु.* १. आश्चर्य. २. विस्मय. ३. विलक्षणता.

चमन–*पु.* [*फा*] १. बगीचा; बाग. २. रमणीय स्थान.

चमर– *पु.* १. चवरी. २. वनगाय.

चमरख–*पु.* चरख्याच्या सळईला लावलेला कातडी तुकडा (चकती).

चमरशिखा– *स्त्री.* घोड्याच्या कपाळावरील केसांचा झुबका.

चमरौट–*पु.* चांभाराला मिळणारें बलुतें.

चमरौटी– *स्त्री.* चांभारवाडा.

चमरौधा–*पु.* चामड्यानें शिवलेला ओबडधोबड देशी जोडा.

चमला–*पु.*; **चमली**–*स्त्री.* भिक्षापात्र.

चमसी– *स्त्री.* लहान चमचा.

चमाचम–*वि.* चकचकीत.–*अव्य.* चमकदारपणें. [**चमारिन**]

चमार–*पु.* चांभार. [– *स्त्री.*

चमरी– *स्त्री.* १. चांभारीण. २. चांभारचें काम.

चमू– *स्त्री.* १. सैन्य; फौज. २. ७२९ हत्ती, ७२९ रथ, २१८७ घोडेस्वार, आणि ३६४५ पायदळ सैनिक असलेला सैन्याचा एक भाग. ३. कफन; प्रेतवस्त्र. ४. कबर.

चमेलिया– *वि.* १. पिवळसर पांढऱ्या रंगाचा; चमेलीच्या रंगाचा. २. चमेलीच्या सुवासानें युक्त.

चमोटा– *पु.* वस्तऱ्याला धार लावण्याचा कातड्याचा मोठा तुकडा. [कोरडा. २. वेत; छडी.

चमोटी– *स्त्री.* १. चाबूक;

चमौआ–वा– *पु.* जुनापुराणा जोडा; पा० ' चमरौधा '.

चम्मच– *पु.* [*फा.*] १. चमचा. २. डाव; पळी.

चय– *पु.* १. राशि; एकत्र जमाव; संग्रह; समूह. २. गड; किल्ला. ३. चौहद्द. ४. पाया. ५. चौथरा. ६. उंच आसन.

चयन– *पु.* १. संग्रह; संचय. २. निवड. ३. क्रमवार ठेवणें; रचणें.

चयनक– *पु.* निवडण्याकरितां केलेली व्यक्तींची यादी; ' पॅनेल '.

चयनिका– *स्त्री.* निवडक कवितांचा किंवा कथांचा संग्रह.

चर– *पु.* १. दूत; जासूद. २. हेर; गुप्तचर. ३. प्रवासी; मुशाफिर. –– *वि.* १. चल; अस्थिर. २. सजीव. –**विभाग**– *पु.* गुप्तचरविभाग; ' इंटेलिजन्स ब्यूरो. '

चरई$^{+}$– *स्त्री.* जनावरांसाठीं बांधलेला पाणवठा; कुंडी.

चरक– *पु.* १. पा० ' चर '. २. आयुर्वेदाचे एक मुख्य आचार्य व त्यांचा ग्रंथ, ' चरकसंहिता '.

चरकटा– *पु.* १. गवत किंवा चारा कापून आणणारा माणूस. २. कमी प्रतीचा किंवा तुच्छ माणूस.

चरकना– *क्रि. अ.* मोडणें; फुटणें; तडा जाणें.

चरका– *पु.* [*फा.*] १. जखम. २. कपट; फसवणूक. ३. चरका; चटका; डाग.

चरख– *पु.* [*फा.*] १. चरक; चाक. २. चरखा. ३. कुंभाराचें चाक. ४. आकाश. ५. गोफण. ६. कालचक्र. [रहाट. २. चरक.

चरखा– *पु.* [*फा.*] १. चरखा;

चरखी– *स्त्री.* [*फा.*] १. चाकासारखी फिरणारी वस्तु. २. लहान चरखा. ३. पाणी काढण्याची कप्पी.

चरचना– *क्रि. स.* १. लेप लावणें; चर्चिणें; उटी लावणें. २. ओळखणें; ताडणें. ३. पूजा करणें.

चरचराना– *क्रि. अ.* १. चरचरणें; झणझणणें; वेदना होणें. २. कडाड् असा आवाज होऊन मोडणें किंवा जळणें.

चरचारी; चरचेला– *वि. पु.* १. चर्चा करणारा; बडबड करणारा. २. निंदा करणारा.

चरचैत– *वि.* १. चर्चा करणारा. २. कीर्तिमान्.

चरजना$^{+}$–*क्रि. अ. स.* १. वहकाविणें. २. अंदाज करणें.

चरण– *पु.* १. पाय; पाऊल. २. वड्या लोकांचा सहवास. ३. श्लोकाचा चरण. ४. एक चतुर्थांश.

चरन*– *पु.* चरण; पाय.

चरना– *क्रि. स.* चरणें.

चरना*– *क्रि. अ.* हिंडणें; फिरणें.

चरनि*– *स्त्री.* चाल; ढंग.

चरनी– *स्त्री.* १. गुरें चारण्याची जागा; कुरण; गायरान. २. गुरांना वैरण घालण्याची पाटी. ३. वैरण; चारा. [२. उचल्या; चोर.

चरपट– *पु.* १. धपाटा; थप्पड.

चरपरा– *वि.* तिखट; झणझणीत; चमचमीत.

चरपराना– *क्रि. अ.* फोड अगर जखम फाटणें; दुखणें.

चरपराहट–*स्त्री.* १. तिखटपणा; झणझणीतपणा. २. द्वेष; मत्सर. ३. जखमेची आग; तिडीक; जळजळ. [जिवावर मौज मारणें.

चरपौती$^{+}$– *स्त्री.* दुसऱ्याच्या

चरफराना*– *क्रि. अ.* तडफडणें; तळमळणें; चडफडणें.

चरब– *वि.* [*फा.*] १. चिकण. २. स्थूल; जाड. ३. चपळ. ४. तिखट.

चरबन– *पु.* पा० ' चबैना '.

चरबाँ(बा)क– *वि.* धूर्त; चलाख; कावेबाज.

चरबा– *पु.* [*फा.*] नक्कल; प्रतिकृति; प्रतिलिपि.

चरबी– *स्त्री.* चरवी; मेद. **मु०–चढ़ना**– १. लठ्ठ होणें. २. उन्मत्त होणें. (**आँखोंमें**)– **छाना**– मदांध होणें; उन्मत्त होणें. [पराकाष्ठेचा.

चरम– *वि.* अंतिम; शेवटचा;

चरमर– *पु.* जोडयाचा किंवा इतर वस्तूचा कर्कर्र असा आवाज.

चरमराना– *क्रि. अ.* कर्कर्र असा आवाज होणें.

चरमोत्पादन– *पु.* कमाल उत्पादन; 'पीक प्रॉडक्शन'. [२. निर्भय.

चरवाँक+– *वि.* १. चतुर; धूर्त.

चरवाई– *स्त्री.* १. गुरें चारण्याची मजुरी. २. गुरें चारण्याचें काम.

चरवाना– *क्रि. स.* चारणें; चारविणें; चारण्याचें काम दुसऱ्याकडून करवून घेणें.

चरवाहा–*पु.* गुराखी.

चरवाही– *स्त्री.* पा० 'चरवाई'.

चरवैया+–*पु.* गुरें चारणारा; गुराखी. [मादक पदार्थ; चरस.

चरस–*पु.* १. मोट. २. एक

चरसा–*पु.* १. बैल, गाय, म्हैस वगैरे जनावरांचें कातडें. २. मोट; पखाल. ३. जमिनीचें एक माप; २१०० हात.

चरसिया; चरसी–*पु.* १. मोट हांकणारा; २. चरस पिणारा.

चराई– *स्त्री.* गुरें चारण्याचें काम, त्याचा कर किंवा त्याची मजुरी.

चराऊ–*पु.* कुरण; गायरान.

चराग़–*पु.* [*फा.*] दिवा.

चराग़ाँ; चराग़ान –*पु.* [*फा.*] दीपोत्सव; दिव्यांची रोषणाई.

चराग़ाह–*पु.* [*फा.*] गायरान; कुरण.

चरान-व–*पु.* कुरण; गायरान.

चराना–*क्रि.स.* १. चारणें. २. गप्पागोष्टींत गुंतविणें; फसविण.

चराव*– *स्त्री.* बडबड; बकवा.

चरावर*– *स्त्री.* निरर्थक बडबड.

चरिंद-दा–*पु.* [*फा.*] चरणारा प्राणी; पशु. [शील.

चरित–*पु.* आचरण; चरित्र;

चरितार्थ–*वि.* १. कृतार्थ; कृतकृत्य. २. तंतोतंत लागू पडणारा.

चरित्तर–*पु.* १. चरित्र. २. शील.

चरित्र-चित्रण–*पु.* व्यक्तिचित्रण; स्वभावरेखन.

चरित्रपंजी– *स्त्री.* वागणुकीची नोंद–वही; 'कॅरेक्टरबुक'.

चरी– *स्त्री.* १ कुरण; गायरान. २. हिरवा चारा (कडबा).

चरु–*पु.* १. यज्ञाकरितां शिजविलेलें अन्न किंवा त्याचें भांडें. २. कुरण. ३. यज्ञ.

चरुआ+–*पु.* १. रुंद तोंडाचें मातीचें भांडें. २. बाळंतिणीसाठीं पाणी तापविण्याचें भांडें.

चरेरा–*वि.* १. चिरक्या आवाजाचा; कर्कश. २. खडबडीत; खरखरीत; चरचरीत.

चरैया+–*पु.* १. चरणारा. २. चारणारा; गुराखी.

चरैला+–*पु.* एका वेळीं चार भांडीं ठेवतां येतील अशी चूल; चौमुखी चूल. [(लाकूड).

चरैला*– *वि.स्त्री.* फोडलेलें

चरोतर–*पु.* एखाद्याच्या निर्वाहासाठीं आजीवन दिलेली जमीन.

चर्ख़–*पु.* [*फा*] १. फिरणारें चक्र; चाक. २. आकाश. ३. 'लेथ'. ४. चरखा. [रहाट.

चर्ख़ा–*पु.* [*फा.*] १. चरखा. २.

चर्ख़ी– *स्त्री.* पा० 'चरख़ी'.

चर्चक–*पु.* चर्चा करणारा; आवृत्ति करणारा.

चर्चा– *स्त्री.* १. वादविवाद; विवेचन. २. पाठ; आवृत्ति. ३. अफवा.

चर्ब–*वि.* [*फा.*] १. गुळगुळीत. २. स्थूल. ३. चपळ.–**ज़बान**–*वि.*– खुशामत्या; गोडबोल्या.

चर्म-*पु.* १. कातडें; चामडें. २. ढाल. –**प्रसाधक**– *वि.* मृत पशूंच्या कातडयांत भुसा भरणारा; 'टॅक्सिडरमिस्ट'.–**शोधन**–*पु.* कातडें कमावणें; 'टॅनिंग'. –**शोधनालय**–*पु.* कातडीं कमावण्याचा कारखाना; 'टॅनरी'.

चर्मल–*वि.* चिवट; कणखर; 'रफ.' [चिवटपणा.

चर्मलता– *स्त्री.* कणखरपणा;

चर्मोदक–*पु.* लस; लसिका; 'लिंफ'.

चर्राना–*क्रि.अ.* १. चुरचुरणें. २. अतिशय इच्छा होणें; चळ येणें. ३. रुक्षपणामुळें तडतडणें; फाटणें. **मु०– शौक चर्राना**–प्रबळ इच्छा होणें. [गोष्ट; चटका.

चर्री– *स्त्री.* मर्मी लागणारी

चलकना+–*क्रि.अ.* चमकणें.

चलचलातू–*वि.* १. कामचलाऊ. २ चंचल.[प्रस्थान; यात्रा. २. मृत्यु.

चलचलाव–*पु.* १. प्रवास;

चलचित्र दर्शी–*पु.* सिनेमाचें यंत्र; 'बैऑस्कोप'.

चलचूक*– *स्त्री.* कपट; फसवणूक; लबाडी.

चलता–*वि.* १. चालू; प्रचलित. २. तरतरीत; हुशार. ३. कार्यक्षम. –**खाता**–*पु.* चालू खातें; 'करंट अकाउंट'.–**पुर्ज़ा**–लटपटचा; धूर्त; धडपडचा. **मु०–करना**–१. दूर सारणें; पळवून लावणें. २. निरोप देणें.–**बनना**;–**होना**–निघून जाणें; चालतें होणें.

चलती– *स्त्री.* १. चलती; प्रगति.

२. आदर; सन्मान ३. जोर; प्रभाव. –*वि.* चालू. ['चलता'.

चलतू+– *वि.* चालू; पा०

चलदल–*पु.* पिंपळाचें झाड किंवा पान.

चलन–*पु.* १. चाल; गति. २. रीतिरिवाज; पद्धत. ३. चलन; व्यवहारांत येणारी गोष्ट.–**कलन**– *पु.* ज्योतिषांतील दिनमान काढण्याचें गणित.–**सार**–*वि.* १. चालू; प्रचलित. २. टिकाऊ.

चलना–*क्रि. अ.* १. चालणें; गमन करणें; एका ठिकाणाहून दुसरीकडे जाणें. २. निर्वाह होणें. ३. प्रवाहयुक्त होणें; वाहणें. ४. वाढणें; भरभराट होणें. ५. प्रभावी किंवा परिणामकारक होणें. ६. आरंभ होणें. ७. चालू असणें. ८. टिकणें. ९. लागू होणें. मु०– **चल निकलना**– उत्तम प्रकारें चालणें; जम बसणें. **पेट चलना**– १. जुलाब होणें. २. निर्वाह होणें. –**चल बसना**–मृत्यु होणें. **अपने चलते**– १. आपल्या जीवनभर; स्वतः असेपर्यंत. २. यथाशक्ति.

चलनिका – *स्त्री.* परकर. २. नक्षीदार कांठ; रेशमी झालर.

चलनिक्षेप–*पु.* चालू ठेव; 'करंट डिपॉझिट'.

चलनी– *स्त्री.* चाळणी.

चलबाँक+– *वि. पु.* वेगानें चालणारा. [चालावयास लावणें.

चलवाना–*क्रि. स.* चालविणें;

चलविचल– *वि.* १. अस्थिर. २. अस्ताव्यस्त; अव्यवस्थित.

चलविधरा+ –*वि.* १. अडेलतट्टू. २. संधिसाधू. [मत्ता.

चल संपत्ति– *स्त्री.* जंगम माल-

चलाऊ–*वि.* १. टिकाऊ. मजबूत. २. तात्पुरता; कामचलाऊ.

चलाक*–*वि.* १. चलाख; चतुर. २. लुच्चा. ३. चंचल.

चलाका*– *स्त्री.* वीज.

चलाचल*– *स्त्री.* गति; चाल. –*वि.* चंचल; चपल.

चलाचली– *स्त्री.* १. निघण्याची घाई; गडबड. २. अनेक मंडळींच्या निघण्याची तयारी किंवा वेळ.–*वि.* –निघावयास तयार झालेला.

चलान– *स्त्री.* १. गिरफदारी; अटक. २. मालाची रवानगी. ३. मालाचें बीजक. ४. आलेला किंवा धाडलेला माल. ५. रवानगी. ६. अटकेचा हुकूम; 'वॉरंट'. पा० 'चालान'.

चलाना–*क्रि. स.* १. चालविणें; जावयास लावणें; चालना किंवा गति देणें. २. मारणें (नेम, बंदूक). ३. उपयोगांत किंवा व्यवहारांत आणणें.

चलापन*–*पु.* चंचलता.

चलार्थ–*पु.* चलन; 'करन्सी'. –**पत्र**–*पु.* चलनपत्र; 'करन्सी नोट'.

चलाव+ –*पु.* १. प्रस्थान; रवानगी. २. पा० 'गौना'.

चलावा–*पु.* १. रीति, चाल. २. आचरण. ३. द्विरागमन; 'गौना'. ४. उतारा; रोगाच्या शमनार्थ दिला जाणारा बळि.

चलित्र–*पु.* आगगाडीचें एंजिन; 'लोकोमोटिव्ह'.

चलौना–*पु.* १. दूध वगैरे ढवळण्याचा डाव. २. चरख्याचा हातवा. [टकळी.

चल्ली+– *स्त्री.* सूत काढण्याची

चवन्नी – *स्त्री.* पावली; चार आणे. [बाजूंनीं वाहणारा वारा.

चवा*– *स्त्री.* एकदम चोहों-

चवाई*–*पु.* १. निंदक; बदनामी करणारा. २. चुगलखोर; चहाडखोर. ['चवाव'.

चवाड* – *पु.* पा० 'चवाई'.

चवाव – *पु.* १. लोकापवाद; अफवा. २. निंदा; बदनामी. ३. चहाडी; चहाडखोरी.

चश्म– *स्त्री.* [*फा.*] डोळा; नेत्र. –**क**– *स्त्री.* १. चश्मा. २. डोळ्यांनीं खूण करणें. ३. भांडण-तंटा. ४. लहान डोळा.–**दीद**–*वि.* डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहिलेलें; खरें; प्रत्यक्षदर्शी (साक्षीदार).–**नुमाई**– *स्त्री.* डोळे वटारणें; धमकी; तंबी.– **पोशी**– *स्त्री.* दुसऱ्याच्या दोषांकडे दुर्लक्ष किंवा डोळेझांक करणें.– (**श्मे**) **बद**– *स्त्री.* वाईट नजर; दृष्ट. – ०**दूर** – इडापिडा टळो; पापी नजर न लागो.

चश्मा–१. चाळिशी; उपनेत्र; चष्मा. २. पाण्याचा झरा; स्रोत.

चष*–*पु.* चक्षु; डोळा.–**चोल***– *पु.* डोळ्याची पापणी.

चषक–*पु.* १. मद्याचा पेला; प्याला. २. मध.

चसक+– *स्त्री.* १. पीडा; वेदना. २. अरुंद किनार.–*पु.** पा० 'चषक'.

चसकना+–*क्रि. अ.* ठणकणें; वेदना होणें.

चसका–*पु.* १. चटक; आवड; आस्वाद; गोडी. २. नाद; संवय; व्यसन. [२. मरणें.

चसना–*क्रि. अ.* १. चिकटणें.

चस्पाँ–*वि.* [*फा.*] १. चिकटविलेला; डकविलेला; २. चपखल; लागू पडणारा.

चह–*पु.* १. नावेचा धक्का. २. नदीवरील पिंपाचा पूल.

चहक– *स्त्री.* चिवचिव; किलकिलाट; किलबिल.

चहकना – *क्रि. अ.* किलबिल करणें; आनंदानें कलरव करणें.–

क्रि. स. भडकविणें.

चहका+–पु. १. जळतें लांकूड; कोलीत. २. विटांची फरशी. २. चिखल. [चिंवचिंवणें.

चहकारना+ – अ. क्रि.

चहचहा– पु. १. किलबिल; किलकिलाट. २. विनोद; थट्टा. –वि. आनंदित व उत्साहित करणारा; ताजा.

चहचहाना – क्रि. अ. चिवचिंवणें; किलबिल करणें.

चहचारा*– पु. हालचाल; गडबड. [चिरडणें.

चहनना+– क्रि. स. तुडविणें;

चहबच्चा – पु. [फा.] १. पाण्याचा हौद; घाण पाण्याचा खड्डा. २. धान्य साठविण्याचें तळघर. ३. पैसा पुरून ठेवण्याचा खड्डा.

चहर* – स्त्री. १. आनंदोत्सव; आनंदीआनंद. २. आरडाओरड; कल्लोळ. [होणें; प्रसन्न होणें.

चहरना – क्रि. अ. आनंदित

चहल – स्त्री. आनंद; उल्हास; उत्साह. **–पहल**– स्त्री. १. आनंद उल्हास; उत्साह. २. धामधूम; गडबड.

चहल*– स्त्री. चिखल; गाळ.

चहलकदमी – स्त्री. [फा.] सहल; शतपावली.

चहला*– पु. चिखल; गाळ.

चहार – वि. [फा.] चार. **–दीवारी**– स्त्री. आवाराची भिंत. (चोंहों बाजूंची); तट. **–शम्बा–पु.** बुधवार.

चहारुम – वि. [फा.] १. चौथा. २. एक चतुर्थांश. –पु. चतुर्थांश भाग; चौथाई. [चारी.

चहुँ–हूँ–* वि. चार (संख्या);

चहुँटना* – क्रि. स. आघात, जखम करणें.

चहेटना* – क्रि. स. १. पिळणें. २. दाबणें.

चहेता – वि. आवडता; लाडका. – पु. प्रेमपात्र.

चहोरना– क्रि. अ. १. एका जागेवरून उपटून दुसरीकडे लावणें (रोप). २. सांभाळणें; देखरेख करणें.

चाँइयाँ– वि. १. धूर्त; ठग; कपटी; बिलंदर. २. उचल्या.

चाँईं– वि. पा० 'चाँइयाँ'. – स्त्री. डोक्याचा एक रोग; चाई.

चाँक – पु. धान्याच्या राशीवर रेघा ओढण्याची काठी; धान्याच्या राशीवर केलें जाणारें चिह्न.

चाँकना – क्रि. स. खळ्यांतील धान्याच्या राशीभोंवतीं रेघ ओढणें व त्यावर खुणा करणें.

चाँचर–रि– स्त्री. १. वसंत ऋतूंत गायिला जाणारा एक राग किंवा गाणें. २. पडीत जमीन.

चाँचु*– पु. चोंच.

चाँटा – पु. चपराक; थप्पड.

चाँटी– स्त्री. १. तबल्याच्या कडेची कातडी शिवण; चाटी. २*. मुंगी.

चाँड़ – स्त्री. १. गरज. २. प्रबळ इच्छा. ३. दाब ४. टेकू; आधार. –वि. १. प्रबळ; बलवान्. २. उग्र. ३. तृप्त; संतुष्ट.

चाँड़ना – क्रि. स. १. खोदणें; खणणें. २. उपटणें; उध्वस्त करणें.

चांडाल–पु. १. चांडाळ; अस्पृश्य. २. दुष्ट.

चाँडिला* – वि. १. प्रबळ; बलवान्. २. खोडकर; खटचाळ. ३. अधिक; पुष्कळ.

चाँद – पु. १. चंद्र. २. चंद्रकोरीच्या आकाराचा एक दागिना. – स्त्री. डोकें; टक्कल पडलेलें डोकें. **–तारा**– पु. १. एक प्रकारची झिरझिरीत मलमल. हिच्यावर टिकल्या असतात. २. मोठा पतंग. **– मारी** – स्त्री. भिंतीवर निशाण किंवा खूण करून बंदुकीनें नेम मारण्याचा अभ्यास. **मु०– का टुकड़ा**– अत्यंत सुंदर व्यक्ति.

चाँदनी – स्त्री. १. चांदणें. २. मोठी पांढरी चादर. ३. चांदवा; छत.

चाँदला+ – वि. बांकदार; वक्र.

चाँदी – स्त्री. १. चांदी. २. आर्थिक लाभ. **मु०– कटना** – खूप पैसा मिळणें. **–का जूता** – लांच. **–होना**– खूपसंपत्ति मिळणें.

चांद्रायण–पु. वद्य पक्षांत रोज एकेक घांस कमीकमी करून शुक्ल पक्षांत एकेक घांस वाढविण्याचें प्रायश्चित्तात्मक एक व्रत.

चाँप – स्त्री. १. चाप; दाब. २. बंदुकीचा घोडा.

चाँपना – क्रि. स. १. दाबणें; पकडींत चेपून धरणें. २. बळकावणें; दाबून ठेवणें. [बकवा; बडबड.

चाँयचाँय; **चाँवचाँव**+– स्त्री.

चांसलर – पु. [इं.] कुलपति; 'चान्सलर'. [रुचि.

चाउ–ऊ*–पु. आवड; गोडी;

चाक – पु. १. कुंभाराचें चाक. २. चक्र.

चाक – पु. [फा.] तडा; फट. –वि.–फाटलेला; विरलेला. **मु०– –करना**– फाडणें.

चाक़ – वि. [तु.] १. दृढ; मजबूत. २. धट्टाकट्टा.

चाकचक–वि. चारीहि बाजूंनीं मजबूत; सुरक्षित.

चाकच(चि)क्य– स्त्री. १. चमक; शोभा; सौंदर्य; २. थाटमाट; भपका.

चाकना–क्रि.स. मर्यादा ठर-

विण्याकरितां भोंवतालीं वर्तुळाकार रेघ काढणें (विशेषतः खळ्याभोंवतीं) व त्यावर खुणा करणें; चिन्ह, खूण करणें.

चाकर–*पु.* [*फा.*] नोकर; सेवक. [–*स्त्री.* **चाकर(रा)नी**]

चाकरी–*स्त्री.* [*फा.*] नोकरी; सेवा. [सुरी.

चाकू–*पु.* [*फा.*] चाकू; लहान

चाक्षुष–*वि.* १. डोळ्यांसंबंधींचा. २. प्रत्यक्ष पाहिलेला. –घटना प्रत्यक्ष पाहिलेला **गवाह**–*पु.*साक्षीदार; 'आय विट्नेस.'

चाचर-रि*– *स्त्री.* शिमग्याच्या उत्सवांतील नाचरंग, गाणें. [मुद्रा.

चाचरी–*स्त्री.* योगांतील एक

चाचा–*पु.* काका; चुलता.

चाची–*स्त्री.* काकी; चुलती.

चाट–*स्त्री.* **१.** चट; चटक; गोडी; लालसा. २. नाद; खोड; व्यसन. ३. खमंग पदार्थ (भेळ, बटाटेवडा इ.). [२. खाणें.

चाटना–*क्रि. स.* १. चाटणें.

चाटु–*पु.* १. गोडगोड गोष्टी. २.खुशामत; हांजीहांजी. **–कार**–*पु.* हांजीहांजी करणारा; खुशामत्या. **–कारी**– *स्त्री.* खोटी स्तुति; खुशामत. **–पट**–पा० 'चाटुकार'.

चाड़*– *स्त्री.* १. प्रबळ इच्छा. २. प्रीति; आवड; स्वार्थ. –*वि.* १. उग्र; उद्धट. २. श्रेष्ठ. ३. संतुष्ट. [कर.

चाडिला–*वि.* खटचाळ; खोड-

चाड़ी+– *स्त्री.* चुगली; चहाडी.

चाढ़ा*–*पु.* प्रियकर; प्रेमी. –*वि.* आसक्त.

चातक–*पु.* चातक; पपीहा. केवळ ढगांतून पडणारें पाणी पिऊन राहाणारा एक कविकल्पित पक्षी.

चातुरी– *स्त्री.* १. चातुर्य. २. धूर्तपणा.

चादर– *स्त्री.* [*फा.*] १. पलंगपोस; चादर. २. पांघरण्याचें वस्त्र; पासोडी. ३. धबधब्याचें पाणी पडत असतांना पाण्याच्या पातळीचा दिसणारा समपृष्ठभाग. ४. एखाद्या धातूचा चौकोनी पत्रा. ५. थडग्यावर वाहिलीं जाणारीं फुलें. हीं चादरीच्या आकारांत गुंफलेलीं असतात. **मु० – उतारना** – बेअब्रू करणें.–**ओढ़ाना; –डालना**–विधवेशीं लग्न करणें. **–देखकर पाँव फैलाना**–आपली ऐपत पाहून खर्च करणें; अंथरूण पाहून पाय पसरणें.

चादरा–*पु.* [*फा.*] पासोडी; पुरुषांची चादर.

चान*–*पु.* चंद्र. [अचानक.

चानक+–*अव्य.* एकाएकीं;

चानन*–*पु.* चंदन.

चाप–*पु.* १. धनुष्य; इंद्रधनुष्य. २. वर्तुळाच्या परिघाचा भाग; वृत्तांश; 'आर्क'. –*स्त्री.* १. धक्का. दाब; २. पायांचा आवाज; चाहूल. **–कर्ण**–*पु.* ज्या; 'कॉर्ड.'

चापट-ड़-र+– *स्त्री.*कोंडा; तूस; धान्याचा भुसा.–*वि.* चपटा; सपाट.

चापना–*क्रि. स.* दाबणें.

चापलूस–*वि.* [*फा.*] खुशामत करणारा; खुशामत्या.

चापलूसी–*स्त्री.* खुशामत; खोटी स्तुति.

चाब(भ)ना–*क्रि. स.* १. चर्वण करणें; चावणें. २. खूप खाणें; चावणें. [किल्ली.

चाबी-भी–*स्त्री.* चावी;

चाबुक–*पु.* [*फा.*] चाबूक; हंटर. –*वि.* चपळ. **–दस्त**–*वि.* दक्ष; शिल्पकुशल. **–दस्ती**–*स्त्री.* कुशलता; चपळता.

चाम–*पु.* कातडें; चामडें. **मु०–के दाम चलाना**–अन्याय करणें; चामड्याचीं नाणीं चालविणें.

चामीकर–*पु.* सोनें; सुवर्ण. –*वि.* सोनेरी.

चाय–*स्त्री.* [*चिनी*] चहा. –*पु.* पा० 'चाव'. **–दान**–*पु.*; **–दानी**–*स्त्री.* चहादाणी; किटली. **–पानी**–*स्त्री.* चहापाणी; न्याहारी.

चायक*–*पु.* इच्छुक; चाहणारा.

चार–*वि.* १. चार. २. कांहीं; थोडे.–*पु.* चाराची संख्या.**–आईना**–*पु.* एक प्रकारचें चिलखत.**–ख़ाना**–*पु.* चौकटींचें कापड. **–दीवारी**–*स्त्री.* आवार; तट. **–पाई**–*स्त्री.* बाज; खाट. **–यारी**–*पु.स्त्री.* १. चार मित्रमंडळी; चौकडी. २. सुन्नी संप्रदाय; मुसलमानांचे पहिले चार खलिफा. ३. कलमा अथवा मुहम्मद साहेब व त्यांचे चार सहकारी यांचीं नांवें खोदललेलें चांदीचें चौकोनी नाणें. हें ताईत म्हणून गळ्यांत बांधतात. **–सौ बीस**–*पु.* फौजदारी कायद्याचें एक कलम. फसवाफसवी वगैरे गुन्हे करणाऱ्यास या कलमान्वयें शिक्षा दिली जाते. –*वि.* फसव्या; लबाड. **–सौ बीसी**–*स्त्री.* फसवाफसवी; बनवाबनवी. – **(रों) ओर**–*अव्य.* सर्वत्र; चोहोंकडे. **मु०–आँखें होना**–दृष्टादृष्ट होणें. **–कदम**–थोडेंसें अंतर.**–चाँद लगना**–कळस चढणें; शोभा वाढणें. **–दिनकी चाँदनी**–थोडे दिवस टिकणारें सुख; क्षणिक गोष्ट.

चार–*पु.* हेर; गुप्तचर. **–कर्म**–*पु.*; **–व्यवस्था**–*स्त्री.* हेरगिरी; 'ॲस्पिऑनेज'.

चार–'चारा' (उपाय) चें संक्षिप्त रूप. **–नाचार**–*अव्य.* नाईलाजानें; लाचार होऊन;

निरुपायास्तव.

चारजामा–पु. [*फा.*] जीन; खोगीर.

चारण– पु. १. भाट; स्तुति-पाठक. २. हेर. [–*स्त्री.* **चारणी**].

चारना*–*क्रि. स.* चारणें.

चारा–पु. चारा; गवत.

चारा–पु. [*फा.*] १. उपाय; इलाज. २. अधिकार; ताबा.–**गर**–*वि.* १. उपचार करणारा; वैद्य. २. सहाय्यक.– **जोई**– *स्त्री.* १. प्रयत्न. २. युक्ति; उपाय. ३. धांवपळ. –**साज़**–वि. पा. 'चारागर'.

चारु–*वि.* सुंदर; मनोहर.

चाल– *स्त्री.* १. चाल; गति. २. चालण्याची ढब. ३. वागणूक; वर्तणूक. ४. रीति–रिवाज; प्रथा. ५. युक्ति; क्लृप्ति. ६. बुद्धिबळा-च्या खेळांत मोहऱ्यानें केलेली खेळी. ७. हालचाल; खळबळ. ८. घडण; बनावट. ९. कावा; फसव-णूक; डाव. १०. तऱ्हा; पद्धत. –पु. छप्पर; गवताचें आच्छादन. –*स्त्री.* [मराठी] चाळ; इमारत.–**चलन**–**पु.** वर्तन; वागणूक; आचरण.–**ढाल**–*स्त्री.* १. आचरण; वागणूक. २. तऱ्हा; पद्धत; चाल.–**बाज़**–*वि.* धूर्त; वस्ताद; कावेबाज. **बाज़ी**–*स्त्री.* फसवेगिरी; कावेबाजपणा. **मु०** –**चलना**–डाव टाकणें; फसवि-ण्याचा उपाय योजणें.

चालक–पु. १. चालविणार. २. वाहक; 'कंडक्टर'. [क्टिव्हिटी.'

चालकता–*स्त्री.* वाहकत्व; 'कंड-

चालन–पु. १. कोंडा; चाळ; चाळल्यानंतर चाळणींत उरणारा पदार्थ. २. चाळण. ३. संचालन; चालविणें; वाहन; 'कंडक्शन'.

चालना*– *क्रि. अ.* १. हलविणें; डोलविणें; २. चाळणें; ३. नेणें. –*क्रि. स.* १. चालणें. २. लग्नानंतर वधूचें प्रथम सासरीं आगमन.

चालनी– *स्त्री.* चाळण; चाळणी.

चालाक–*वि.* [*फा.*] १. चतुर; दक्ष; चलाख. २. धूर्त; लबाड.

चालाकी– *स्त्री.* [*फा.*] १. हुशारी; चलाखी; चाणाक्षपणा. २. धूर्तपणा; लुच्चेगिरी.

चालान– पु. १. पाठविलेल्या मालाची यादी; चलन; माल धाडणें. २. आरोपीस न्यायाधीशासमोर उभें करणें.

चालिया; **चाली**–*वि.* १. कपटी; धूर्त; कावेबाज; बेरकी. २. खोड-कर; उपद्रवी.

चालीस–*वि.* चाळीस.

चालीसा–पु. १. चाळीस वस्तूंचा संग्रह; २. चाळीस दिवस. ३. चाळीस श्लोकांचें काव्य, स्तोत्र. (उदा० हनूमान चालीसा).

चाव–पु. १. आवड; गोडी; रुचि. २. प्रेम; प्रीति. ३. उत्कंठा. ४. लाड; कौतुक. ५.* निंदा; बदनामी. [३. $\frac{1}{2}$ रत्ती (वजन).

चावल–पु. १. तांदूळ. २. भात.

चाशनी– *स्त्री.* [*फा.*] १ साख-रेचा अगर गुळाचा पाक. २. खाद्य पदार्थाचा नमुना. ३. स्वाद; मजा.

चाष–पु. १. नीळकंठ पक्षी. २.* डोळा. ३ शेती.

चास–पु. १. शेती. २. नांगरणी.

चासा+ – पु. १. नांगर चालविणारा. २. शेतकरी.

चाह– *स्त्री.* १. इच्छा; अभि-लाषा; आवड. २. प्रेम; प्रीति; ३. आदर; वाहवा; चाहा. ४. आवश्यकता; गरज; मागणी. ५.* बातमी; खबर. ६. रहस्य; मर्म. [लाषा. २. प्रेम.

चाहत–* *स्त्री.* १. इच्छा; अभि-

चाहना– *क्रि. स.* १. इच्छा करणें; चाहणें. २. आवडणें; प्रेम करणें. ३. मागणें; याचना करणें. ४.* आशेनें बघणें. [पेक्षां; अधिक.

चाहि*–*अव्य.* पेक्षां; – च्या

चाहिए–ये–*अव्य.* हवें; पाहिजे.

चाही–*वि. स्त्री.* आवडती; लाडकी. [असल्यास; किंवा.

चाहे–*अव्य.* वाटल्यास; इच्छा

चिऑं–पु. चिंचोका.

चिउँटा–पु. मुंगळा.

चिउँटिया– **रेंगान**+– *स्त्री.* मुंगीच्या पावलानें जाणें; अगदीं हळूहळू चालणें.

चिउँटी– *स्त्री.* मुंगी. **मु० –के पर निकलना**–मृत्यु ओढवून घेण्या-सारखें कृत्य करणें; मरण्याचीं लक्षणें दिसूं लागणें.

चिंगना–पु. कोंबडीचें पिलूं.

चिंघाड़– *स्त्री.* १. आरोळी; गर्जना (जनावरांची). २. चीत्कार (हत्तीचा).

चिंघाड़ना– *क्रि. अ.* आरोळी ठोकणें; गर्जणें (श्वापदांचें); चीत्कार करणें (हत्तीचें).

चिंचिनी–* *स्त्री.* १. चिंचेचें झाड. २. चिंच.

चिंज–जा*–पु. पुत्र; मुलगा. [–*स्त्री.* **चिंजी** *].

चिंतना–* *क्रि. स.* १. ध्यान करणें; स्मरण करणें. २. विचार करणें; चिंतणें.

चिंतवन*–पु. चिंतन.

चिंता– *स्त्री.* १ चिंता; काळजी. २. चिंतन; विचार.

चिंदी– *स्त्री.* बारीक तुकडा; चिंधी. **मु०–की बिंदी निकालना**; **हिंदी की चिंदी निकालना**–विना-कारण कीस काढणें; क्षुद्र चूक काढणें.

चिउँटा–टी–पा० 'चिउँटा–टी.'

चिउड़ा–रा*–*पु.* पोहे.

चिक–*स्त्री.* [*तु.*] १. बांबूच्या बारीक कामटयांचा पडदा. २. चिकाचा पडदा.

चिक–*स्त्री.* कळ; कमरेंत भरलेली उसण किंवा चमक (एका बाजूवर ताण पडल्यानें होणारी).

चिकट–*वि.* १. चिकट. २. घाण. ३. चिपचिपीत; बुळबुळीत.

चिकटना–*क्रि. अ.* चिपचिपीत होणें; मळकट होणें.

चिकन–*पु.* [*फा.*] चिकनचें कापड; नक्षीदार सुती कापड.

चिकना–*वि.* १. गुळगुळीत; तुळतुळीत. २. ओशट; तेलकट; चिकट. ३. सफाईदार; सुंदर. ४. निसरडें. ५. लाघवी; लाडीगोडी लावणारा. **मु०–घड़ा**–ज्याच्यावर बोलण्याचा कांहीं परिणाम होत नाहीं असा; निर्लज्ज.

चिकनाई; चिकनाहट–*स्त्री.*; **चिकनापन**–*पु.* १. स्निग्धपणा; गुळगुळीतपणा. २. चिकणपणा.

चिकनाना–*क्रि. स.* १. स्निग्ध पदार्थ चोपडणें; चोपडें करणें. २. गुळगुळीत करणें. ३. व्यवस्थित करणें. [णारा; अलबेला; रंगेल.

चिकनिया–*वि.* छानछोकी कर-

चिकनी–*वि.स्त्री.* पा० 'चिकना'. **–चुपड़ी बातें**– *स्त्री.* गोड-गोड गोष्टी; कृत्रिम, मधुर भाषण. **–डली; –सुपारी**– *स्त्री.* चिकणी सुपारी.

चिकरना–*क्रि. अ.* किंचाळणें; ओरडणें. [दांची आरोळी; गर्जना.

चिकार*–*पु.* चीत्कार; श्वाप-

चिकारना*–*क्रि. अ.* चीत्कार करणें; ची ची करणें; आरोळी ठोकणें.

चिकारा–*पु.* १. सारंगीसारखें एक वाद्य. २. हरिणाच्या जातीचा एक प्राणी.

चिकित्सा–*स्त्री.* १. औषधोपचार; निदान; उपाय; इलाज. २. वैद्यकीचा धंदा.

चिकित्सक–*पु.* वैद्य; औषधोपचार करणारा; डॉक्टर.

चिकित्सालय–*पु.* रुग्णालय; इस्पितळ.

चिकुटी*–*स्त्री.* चिमटा; चिमटी.

चिकुर–*पु.* १. डोक्याचे केस. २. पर्वत. ३. सरपटणारे प्राणी ४. खार. ५. चिचुंद्री.

चिकोटी–*स्त्री.* पा० 'चुटकी'.

चिक्क–*वि.* चपटया नाकाचा; फेंदरा.–*स्त्री.* बकरी; शेळी.–*पु.* घूस.

चिक्कट–*पु.* किटण; तेलाची चिकटी; मळ. –*वि.* मळकट; किटलेलें; मलिन; घाणेरडें.

चिक्कण–न–*वि.* चिकण; गुळगुळीत.–*पु.* सुपारी. [करणें.

चिक्करना–*क्रि. अ.* चीत्कार

चिक्का–*स्त्री.* १. सुपारी. २. उंदीर (मादी).

चिक्की+–*स्त्री.* कुजलेली सुपारी.

चिखुरन+–*स्त्री.* शेत नांगरल्यावर निघालेलें गवत, पाला पाचोळा.

चिखुरा*–*पु.* खार (नर).

चिखुरी*–*स्त्री.* खार (मादी).

चिचड़ा–*पु.* १. आघाडा. २. गोचीड.

चिचड़ी–*स्त्री.* गोचीड; चाचड.

चिचान*–*पु.* बहिरी ससाणा.

चिचाना; चिचावना–*क्रि. अ.* १. ओरडणें. २. माकडाचें ओरडणें.

चिचिंगा–ड–डा–*पु.* पडवळ; टरकाकडी. [कोकलणें.

चिचियाना*–*क्रि.अ.* ओरडणें;

चिचुकना–*क्रि. अ.* वाळणें; रोडावणें. ['चचोड़ना'.

चिचोड़(र)ना+–*क्रि. स.* पा०

चिजारा–*पु.* [*फा.*] कारागीर; गवंडी.

चिट–*स्त्री* १. कागदाचा किंवा कपडयाचा तुकडा; चिंधी; कपटा. २. चिठ्ठी **–नवीस**– *पु.* कारकून; लेखक.

चिटकना–*क्रि. अ.* १. तिडतिडणें; तडतड शब्द होणें. २. चिडणें.

चिटकनी–*स्त्री.* खिटी; बोलट.

चिटकाना–*क्रि. स.* १. कडकड शब्द करणें; ताडकन् मोडणें. २. चिडविणें; खिजविणें.

चिट्टा–*वि.* पांढरा; धवल. [**गोराचिट्टा** = गोरापान]. – *पु.* +हरभऱ्याच्या झाडावर चढविणें; फुगविणें.

चिट्ठा–*पु.* १. खातेवही; हिशेबाची वही. २. ताळेबंद. ३. गोषवारा; जमाखर्चाची यादी. **मु०–कच्चा चिट्ठा**–सविस्तर वृत्तांत (कांहीं एक न लपवितां); बित्तंबातमी; बिंग.

चिट्ठी–*स्त्री.* १. पत्र; चिट्ठी. २. आज्ञापत्र. ३. सोडत; 'लॉटरी.' **–पत्री**– *स्त्री.* १. पत्र. २. पत्रव्यवहार. **–रसाँ**– *पु.* पत्रें वांटणारा; 'पोस्टमन.' **मु०– डालना**– १. चिठ्ठया टाकणें. २. लॉटरी काढणें.

चिड़चिड़ा–*वि.* चिडखोर; त्रासिक; चिडचिडया.

चिड़चिड़ाना–*क्रि. अ.* १. उलणें. २ तिडतिडणें. ३. तडकणें. ४. चिडणें; रागावणें.

चिड़वा–*पु.* पोहे.

चिड़ा–*पु.* चिमणा; नरपक्षी.

चिड़िया–*स्त्री.* १. चिमणी;

पक्षी. २. किलवर (पत्त्यांतील). –खाना; –घर– पु. प्राणिसंग्रहालय; अजबखाना. मु०–उड़ जाना–सावज निसटणें. –का दूध– अप्राप्य वस्तु; असंभव गोष्ट.

चिड़ी– स्त्री. पा०'चिडिया'. –मार–पु. पारधी.

चिढ़– स्त्री. १. चीड; चिरड; अप्रसन्नता. २. तिटकारा; तिरस्कार.

चिढ़ना–क्रि. अ. १. चिडणें; कावणें; रागावणें; नाखुष होणें. द्वेष करणें; मनांत अढी धरणें.

चिढ़ाना–क्रि. स. १. चिडविणें; खिजविणें. २. उपहास करणें; वेडावणें.

चित–पु. १. मन; चित्त. २. दृष्टि; कटाक्ष. –चहा*–वि. मनोनुकूल; आवडता. –चीता; –चेता– वि. मनाजोगता; इच्छित. –चोर– पु. वि. मनमोहक; मनोहर.

चित–वि. उताणा; पाठ जमिनीला लागलेला; चीत. –पट–पु. कुस्ती; निकाली कुस्ती. मु०–पट करना–निर्णय करणे; निकाल लावणें.

चितकबरा–वि. कबरा; रंगीबेरंगी; ठिपकेदार;

चितरना*– क्रि. स. चित्र काढणें (विशेषतः भिंतीवर); वेलबुट्टी काढणें.

चितला–वि. ठिपक्याठिपक्यांचा; चितकबरा (जनावर).

चितवन– स्त्री. नजर; दृष्टि; कटाक्ष.

चितवना*– क्रि. स. पाहाणें; अवलोकन करणें. [कटाक्ष.

चितवनि*– स्त्री. नजर; दृष्टि;

चितवाना*– क्रि. स. दाखविणें; लक्ष वेधणें.

चिताना– क्रि. स. १. सावध करणें २. आठवण करून देणें; जागें करणें.

चितारना– क्रि. स. आठवण करणें; लक्षांत आणणें.

चितावनी– स्त्री. चेतावणी; सूचना; इशारा.

चिति– स्त्री. १. संग्रह. २. चिता. ३. विटांचें बांधकाम. [२. मन.

चितु*– पु. १. चित्त; लक्ष.

चितेरा–पु. चित्रकार.

चितेरिन; **चितेरी**– स्त्री. स्त्री चित्रकार. [दृष्टि; नजर.

चितौन–नि–* स्त्री. कटाक्ष;

चित्– स्त्री. १. चैतन्य; ज्ञान. २. आत्मा; ब्रह्म. –स्वरूप–पु. परमात्मा.

चित्त–पु. मन; अंतःकरण.– विकृति– स्त्री. मानसिक विकृति; 'अनसाउंडनेस ऑफ माइंड'. मु०– चढ़ना; –पर चढ़ना–१. अत्यंत आवडणें; मनांत ठसणें. २. ध्यास लागणें. –से उतरना– १. अप्रिय होणें; वीट येणें. २. आठवण न राहाणें; विसरणें.

चित्तरसारी–* स्त्री. चित्रशाळा.

चित्ती– स्त्री. १. ठिपका; बिंदु. २. जुगार खेळण्याची चपटी कवडी.

चितौर– पु. चितोड शहर.

चित्र–पु. चित्र; तसबीर.–कारी स्त्री. चित्रकला.–मद–पु. प्रियकराचें चित्र पाहून नायिकेनें विरह–भावना व्यक्त करणें.–शाला– स्त्री. १ चित्रशाळा; 'पिक्चर गॅलरी'. २. चित्रगृह; 'स्टूडिओ'. –सारी –स्त्री. १. चित्रांनीं सुशोभित महाल. २. रंगमहाल. ['अलबम'.

चित्राधार–पु. चित्रसंग्रहपुस्तक;

चित्राल–पु. चित्रळ प्रदेश. (काश्मीर व पाकिस्तानच्या दरम्यान). [कपडा; लक्तर.

चिथड़ा–पु. चिंधी; फाटका

चिथाड़ना–क्रि. स. १. चिंध्या करणें; फाडणें. २ अपमान करणें. ३. खंडित करणें. [चुण.

चिनक– स्त्री. जळजळ; चुण-

चिनगारी; **चिनगी**– स्त्री. ठिणगी. मु० आँखोंसे चिनगारी छूटना –क्रोधानें डोळे लाल होणें.– –छोड़ना; –डालना–भांडण लावणें.

चिनचिनाना–क्रि. स. १. ओरडणें. २. उसासा सोडणें

चिनना*–क्रि.स. विटांनीं अथवा दगडांनीं भिंत बांधणें; चिणणें; रचणें.

चिनाना*– क्रि. स. भिंत बांधविणें; चिणविणें; रचविणें.

चिनाब; **चिनार**– पा० 'चनाब'; 'चनार'.

चिनिया– वि. १. साखरेसारखा पांढरा सफेत. २. गोड. –केला– पु. लहान जातीचें एक गोड केळें.– बदाम– पु. शेंगदाणा; भुईमूग.

चिनौती+– स्त्री. आह्वान.

चिन्हाना+– क्रि. स. ओळख पटविणें; परिचय करून देणें; दाखविणें.

चिन्हानी+– स्त्री. १. खूण; चिन्ह. २. स्मृतिचिन्ह; स्मारक.

चिन्हारी*– स्त्री. ओळख; खूण.

चिपकना–क्रि. अ. चिकटणें; लिपटणें; डकविलें जाणें.

चिपकाना– क्रि. स. चिकटविणें; डकविणें.

चिपचिपा– वि. चिकट; चिकचिकीत; बुळबुळीत.

चिपचिपाना– क्रि. अ. चिकट होणें; चिकचिकणें; बुळबुळीत होणें.

चिपटना– *क्रि. अ.* पा० 'चिमटना'.

चिपटा– *वि.* चपटा; बसकट; चेपटलेला. [टाना.'

चिपटाना– *क्रि. स.* पा० 'चिम-

चिपड़ा⁺– *वि.* ज्याच्या डोळ्यांत खूप चिपाडें (मळ) भरलेलीं आहेत असा. [शेणी.

चिपड़ी–री– *स्त्री.* गोवरी;

चिपिट⁺– *वि.* चपटा; चपटया नाकाचा.

चिप्पड़– *पु.* १. पातळ, सपाट तुकडा (लांकूड, कागद, दगड इ. चा). २. लांकडाची साल; चीप; ढलपा. ३. तासून निघालेला लाकडाचा भुसा.

चिप्पी– *स्त्री.* १. चीप; पातळ, सपाट, लहान तुकडा; ढलपा. २. कागदाचा कपटा. [चुळबुळ्या.

चिबिल्ला⁺–*वि.* चपल; चंचल;

चिबु; चिबुक– *पु.* हनुवटी.

चिमटना– *क्रि. अ.* १. चिकटणें. २. बिलगणें; कवटाळणें. ३. घट्ट धरणें; आवळणें.

चिमटा– *पु.* चिमटा (निखारा वगैरे काढण्याचा).

चिमटाना– *क्रि. स.* १. चिकटविणें; गळयांत घालणें. २. भिडविणें; अगदीं जवळ आणणें.

चिमटी– *स्त्री.* १. लहान चिमटा. २. चिमटा (कोचणें); चिमूट.

चिमड़ा– *वि.* चिवट; चामट. **–पन**– *पु.* चिवटपणा; 'टेनॅसिटी.'

चिमनी– *स्त्री.* [इं] धुराडें; चिमणी.

चिरंटी– *स्त्री.* १. तरुणी. २. २. लग्नाचें वय झालें असूनहि पित्याच्या घरीं राहाणारी मुलगी.

चिर– *वि.* सदैव टिकणारा; दीर्घकालीन. **– जीवी**– *वि.* १. चिरंजीव; अमर. २. दीर्घायुषी. **–मान्य; –सम्मानित**– *वि.* पुष्कळ वर्षांपासून मान्यता पावलेला; 'टाइम ऑनर्ड'.

चिरकना–*क्रि. अ.* पिळकणें; थोडें थोडें पातळ शौचाला होणें.

चिरकीं; चिरकीन–*वि.* [*फा.*] गलिच्छ; घाणेरडा; विष्ठेनें बरबटलेला. [कपडा; चिरगूट.

चिरकुट–*पु.* लक्तर; फाटका

चिरचना*–*क्रि. अ.* क्रुद्ध होणें; चरफडणें.

चिरचिटा–*पु.* आघाडा.

चिरना–*क्रि. अ.* १. चिरणें; कापलें जाणें; फाटणें. २. चीर पडणें. [गुंज.

चिरम-मि; चिरमिटी*– *स्त्री.*

चिरवाई; चिराई– *स्त्री.* चिरण्याची किंवा कापण्याची मजुरी किंवा काम. [कापविणें.

चिरवाना–*क्रि. स.* चिरविणें;

चिराँदा–*वि.* १. कातडें, केंस, मांस वगैरे जळण्यानें सुटणारी घाण. २. बदनामी.

चिराग़–*पु.* १. दीप; दिवा. २. पुत्र. **–गुल**–*पु.* पा० 'अंधाकुप्प.' 'ब्लॅक आउट.' **–जले**– *अव्य.* दिवे लागणीच्या वेळीं; संध्याकाळीं. **–दान**–*पु.* दिवा ठेवण्याचा आधार; ठाणवई. **मु०– तले अँधेरा**– दिव्याखालीं अंधार.– **बढ़ जाना**– दिवा विझणें. **– सहरी होना**–मरणोन्मुख होणें.

चिराग़ी–*स्त्री.* [*फा.*] १. दिवाबत्तीचा खर्च. २. थडग्यावरील दिव्याखालीं ठेवावयाची देणगीची रक्कम.

चिराना–*क्रि. स.* चिरवून घेणें; कापवून घेणें.–*क्रि. अ.* चिरणें; कापणें.

चिरायँध– *स्त्री.* चामडें, केस इ. जळल्याची घाण.

चिरायता–*पु.* काडेचिराईत.

चिरारी– *स्त्री.* पा० 'चिरौंजी'.

चिरि–*पु.* पोपट. **– हार** – *पु.* पक्षी मारणारा; पारधी.

चिरिआ–या; चिरी; चिरैया*– *स्त्री.* चिमणी; पक्षी. ['क्लेफ्ट'.

चिरित– *स्त्री.* भेग; चीर; फट;

चिरौंजी– *स्त्री.* चारोळी.

चिरौरी–*क्रि.* विनवणी; अनुनय; गयावया करणें.

चिलक– *क्रि.* १. चकाकी; चमक; झळक; तेज; कांति; २. तिडीक; ठणका; ठुसठुस.

चिलकना–*क्रि. अ.* १. लखलख करणें; चमचम करणें. २. ठणकणें; ठसठसणें; राहून राहून कळ उठणें.

चिलगोज़ा–*पु.* [*फा.*] एक प्रकारचा सुका मेवा; चीड किंवा सनोबर या झाडाचें बीच्या आकाराचें फळ.

चिलचिल– *स्त्री.* अभ्रक.

चिलचिलाता–*वि.* कडक; रखरखीत (ऊन्ह).

चिलचिलाना– *क्रि. अ.* राहून राहून चकाकणें.

चिलड़ा⁺– *पु.* तव्यावर तूप लावून भाजलेली पोळी.

चिलता– *स्त्री.* [*फा.*] एक प्रकारचें कवच.

चिलबिला–ल्ला–*वि.* चुळवळ करणारा; चळवळया; चंचल; खोडकर.

चिलम– *स्त्री.* [*फा.*] चिलिम; चिलीम.–**ची**⁺– *पु.* चिलीम ओढणारा.

चिलमची–*स्त्री.* [*तु.*] हात धुणें. गुळणा करणें इ. साठीं असलेलें रुंद

तोंडाचें भांडें; तस्त. [पडदा.

चिलमन– स्त्री. [फा.] चिकाचा

चिल्लड़– र–पु. ऊं; लीख.

चिल्लपों–स्त्री. आरडाओरड; ओरडा; गोंगाट.

चिल्लवाँस–पु. किरकिर (लहान मूल आजारी पडल्यानंतर करतें ती).

चिल्ला–पु. उडदाच्या किंवा मुगाच्या पिठाची तुपांत तळलेली रोटी; वडा.

चिल्ला– पु. [फा.] चाळीस दिवसांचा अवधि; चाळीस दिवसांचें व्रत. **मु०–(ल्ले)का जाड़ा**– कडाक्याची थंडी. (पौषांतील १५ व माघांतील १५ दिवस ही थंडी असते).

चिल्लाना– क्रि. अ. ओरडणें; आरडाओरड करणें.

चिल्लाहट– स्त्री. आरडाओरड.

चिल्लिका– स्त्री. १. भुवयांच्यामधील जागा; भुंवई. २. रातकिडा.

चिल्ली– स्त्री. १. रातकिडा. २. २. डांस; चिलट. ३. वीज.

चिल्ही*– स्त्री. घार.

चिहुँकना– क्रि. अ. दचकणें; चकित होणें.

चिहुँटना–क्रि.स. चिमटा घेणें; **–मु० चित्त चिहुँटना**– मनाला बोचणें; लागणें. [कोरा.

चिहुँटी*– स्त्री. चिमटा; चिम-

चिहुर– पु. डोक्याचे केस.

चिहुरार– पु. केशराशि.

चिह्नांकन– पु. विरामचिह्नें देणें; 'पंक्चुएशन'.

चिह्नांकित– वि. मापाच्या खुणा असलेलें; 'ग्रॅज्युएटेड'.

चीं– स्त्री. [फा.] १. चेहऱ्यावरील सुरकुती किंवा आठी २. चिवचिव. **–चपड़**– स्त्री. प्रत्युत्तर; तोंड वर करणें. **–चीं**– स्त्री. चिवचिव; किलबिल. **मु०–ब–जबीं होना**– कपाळाला आठ्या घालणें; नाराज होणें.– **बोलना**– पराभव मान्य करणें; हरणें.

चींटा–पु. मुंगळा.

चींटी– स्त्री. मुंगी.

चींथना+– क्रि. स. १. फाडणें; तुकडे–तुकडे करणें. २. ओरखडणें.

चीक– स्त्री. आरोळी; किंचाळी.

चीकट– तेलाचें किटण; गाळ.– वि. मलिन; घाणेरडा; तेलकट; बुळबुळीत.

चीकना– क्रि. अ. किंचाळणें; ओरडणें –वि.* पा० 'चिकना'.

चीख– स्त्री. आरोळी; किंचाळी. **–पुकार**– स्त्री. १. आरडाओरडा; विलाप. २. गाऱ्हाणें.

चीखना–क्रि. स. चाखणें; स्वाद घेणें. [किंचाळणें.

चीख़ना–क्रि. अ. ओरडणें;

चीज़– स्त्री. [फा.] १. वस्तु; पदार्थ. २. दागिना. ३. पद; चीज (गाणें). ४. विलक्षण वस्तु. ५. महत्त्वाची वस्तु.

चीठ*– स्त्री. चिखल; घाण.

चीठा*–पु. खातें; जमाखर्चाची वही. [वृक्ष.

चीड़–पु. देवदारासारखा एक

चीत*–पु. १. चित्त; मन. २. चित्रा नक्षत्र.

चीतना*–क्रि. स. १. विचार करणें. २. आठवण करणें. ३. चित्र काढणें.

चीतल–पु. १. चितळ; हरिणाची एक जात. २. ठिपकेदार अजगर. [नेसलेला.

चीतांबर*–पु. विचित्र वस्त्र

चीता–पु. १. चित्ता. २. चित्रक. ३. एक वनस्पति.

चीता–वि. विचार केलेला; इच्छिलेला. [आवाज.

चीत्कार–पु. आरोळी; कर्कश

चीथड़ा–पु. चिंधी; फटकूर.

चीथना–क्रि. स. १. फाडणें; चिंध्या करणें; तुकडे-तुकडे करणें. २. ओरखडणें; ओरबडणें.

चीनांशुक–पु. चीनहून येणारें रेशमी कापड; रेशमी कापड.

चीना*–पु. १. चिनी कापूर. २. चिह्न. ३. चिनी माणूस.–वि. चिनी.

चीनिया–वि. चिनी; चीनचा. **–बादाम**–पु. भुईमुगाची शेंग; भुईमूग.

चीनी– स्त्री. शुभ्र साखर. –वि. चिनी; चीनचा.–पु. चीनचा रहिवासी. **–कपूर**–पु. एक प्रकारचा कापूर.**–मिट्टी**– स्त्री. चिनी माती.

चीन्ह–न्हा*–पु. चिह्न; खूण.

चीन्हना+–क्रि. स. ओळखणें.

चीप+– स्त्री. १. मातीचें ढेकूळ. २. एक प्राणी. [चिपाड.

चीपड़–पु. डोळ्यांतील घाण;

चीमड़–ड़ा–र–वि. चिवट; चामट; टिकाऊ.**–पन**–पु. चिवटपणा; टिकाऊपणा. [बीं.

चीयाँ–पु. चिंचोका; चिंचेचें

चीर–पु. १. कापड; वस्त्र. २. वृक्षाची साल. ३. गायीचा सड. ४. चिंधी; चिरगुट. **–चरम***–पु. १. मृगचर्म; हरिणाचें कातडें. २. व्याघ्रांबर.

चीर– स्त्री. फाटणें, फाडणें, चिरणें वगैरेची क्रिया.**–घर**–पु. १. प्रेतालय; 'मॉर्ट्युअरी'. २. वैद्यकीय तपासणीसाठीं प्रेतांची चिरफाड करण्याचें स्थान.**–फाड़**– स्त्री. १. कापाकापी; चीरफाड. २. शस्त्रचिकित्सा; शल्यक्रिया.

चीरना–*क्रि. स.* १ फाडणें; चिरणें. २. गर्दींतून किंवा पाण्यांतून मार्ग काढणें.

चीरा–*पु.* १. जखमेंतील चिरा किंवा कांप; चीर. २. फेटे बनविण्याच्या कामीं ज्याचा उपयोग होतो तें रंगीत कापड. ३. सीमा किंवा हद्दीवरील दगड. **मु०–लगाना–** फोड चिरणें; ऑपरेशन करणें.

चीर्ण–*वि.* १. फाटलेला; फाडलेला. २. संपादित.

चील– *स्त्री.* घार (पक्षी).

चीलड़–र–*पु.* ऊंसारखा एक लहान पांढरा किडा; लीख.

चीला–*पु.* घारग्यासारखें एक पक्वान्न; घावन.

चीवर–*पु.* १. संन्याशाचें वस्त्र. २. कापड; कपडा.

चुंगल–*पु.* पंजा (विशेषतः हिंस्र पशूचा); पसा; पा० 'चंगुल.'

चुंगी– *स्त्री.* [*फा.*] १. शहरांत येणाऱ्या मालावरील कर; जकात. २. पसाभर वस्तु. **–घर**–*पु.* जकातनाकें. [पाजणें; चोखावयास लावणें

चुंघाना–*क्रि. स.* चोखून

चुंटा–डा–*पु. स्त्री.* १. लहान विहीर; आड. २. विहिरीजवळील हौद.

चुंडित*–*वि.* शेंडी असणारा.

चुंदरी– *स्त्री.* चुनडी; बुट्टीदार लुगडें.

चुंदी– *स्त्री.* १. शेंडी. २. कुंटीण.

चुंधलाना+–*क्रि. अ.* डोळे दिपणें.

चुंधा–*वि.* पिचक्या किंवा बारीक डोळ्यांचा; दृष्टि अधू असलेला.

चुंधियाना–*क्रि.अ.* डोळे दिपणें.

चुंबक–*पु.* १. चुंबन घेणारा; कामुक. २. उडत-उडत वाचणारा. ३. लोहचुंबक.**–पत्थर–** *पु.* लोहचुंबक.

चुंबना*– *क्रि. स.* चुंबणें; चुंबन घेणें. [काढणें.

चुँहटना*– *क्रि. स.* चिमटा

चुअना–* *क्रि. अ.* टपकणें; ठिबकणें.

चुआई– *स्त्री.* गळती; गाळण्याचें काम किंवा मजुरी.

चुआक+– *पु.* एखाद्या भांड्यातून पाणी पडावयाचें भोक.

चुआन+– *स्त्री.* १ पाण्याचा पाट. २ खड्डा.

चुआना– *क्रि. स.* थेंब थेंब गाळणें; टपकविणें; पाझरविणें.

चुकंदर– *पु.* [*फा.*] बीट; एक कंद. यापासून साखर तयार करतात.

चुक*– *वि.* किंचित्. **–पु.** लिंबाच्या रसापासून बनविलेला एक आंबट पदार्थ.

चुकचुकाना– *क्रि. अ.* १ पाझरणें; झिरपणें; स्रावणें. २ घामाघूम होणें; घाम फुटणें.

चुकता– *वि.* **पु.** देऊन टाकलेलें; फेडलेलें (कर्ज वगैरे); बेबाक.

चुकना– *क्रि. अ.* १ संपणें; समाप्त होणें (काम, गोष्ट). २ बेबाक होणें; चुकतें होणें. ३ ठरणें; निश्चित होणें. ४ चुकणें; चूक होणें. ५ हुकणें; व्यर्थ जाणें.

चुकाना–*क्रि. स.* चुकतें करणें; फेडणें (देणें); भागविणें.

चुक्कड़– *पु.* पाणी पिण्याचें मातीचें भांडें; मातीचा पेला.

चुक्कार– *पु.* चीत्कार; गर्जना; सिंहनाद.

चुक्की– *स्त्री.* लबाडी; धूर्तता.

चुक्ती– *स्त्री.* १. निरूपण; नियम. २. निष्पत्ति.

चुखाना+– *क्रि. स.* १. गायीला पान्हा फुटावा म्हणून अगोदर वासराला पाजणें. २. चाखविणें.

चुग़द– *पु.* [*फा.*] घुबड. *–वि.* मूर्ख; बेअकली.

चुगना– *क्रि. स.* टिपणें; धान्याचा एक एक दाणा वेंचून खाणें (पक्ष्यांचें).

चुग़ल– *पु.* पा० 'चुग़ुल'.

चुगला– *वि. पु.* चहाडखोर.

चुग़ली– *स्त्री.* [*तु.*] चहाडी; कुचाळी; पाठीमागें केलेली निंदा. **मु०–खाना–** चहाडी करणें; पाठीमागें कुचाळकी करणें.

चुगा– पु. पक्ष्यांचा चारा; चिमणचारा; पक्ष्यांना टिपण्यासाठीं टाकलेला पदार्थ.

चुगाई– *स्त्री.* पक्ष्यांचें दाणे टिपणें; पक्ष्यांना दाणे टाकणें.

चुगाना– *क्रि. स.* पक्ष्यांना दाणा घालणें; खावयास घालणें.

चुग़ुल– *वि. पु.* [*तु.*] चहाडी करणारा; पाठीमागें निंदा करणारा. **–ख़ोर** *–वि.* चहाडखोर. **–ख़ोरी–** *स्त्री.* चहाडखोरपणा.

चुचकारना– *क्रि. स.* चुचकारणें. [क्रिया किंवा भाव.

चुचकारी– *स्त्री.* चुचकारण्याची

चुचके–पुचके– *वि.* खप्पड, बसलेले (गाल).

चुचाना– *क्रि. अ.* गळणें; ठिबकणें; झिरपणें.

चुचुआना– *क्रि. अ.* गळणें; स्रवणें; थेंबथेंब पडणें.

चुचुक– पु. स्तनाचें अग्र; बोंडी.

चुचुकना+– *क्रि. अ.* सुकून सुरकुत्या पडणें.

चुटकना– *क्रि. स.* **१.** चाबूक मारणें. २. चिमटीनें तोडणें; खुडणें.

चुटकी– *स्त्री.* १ चिमूट; चिमटी. २ चुटकी. ३ चिमटा. ४ अडकवण;

'क्लिप'. – **बजाते अथवा चुटकियों में**– *अव्य.* झटपट; चुटकी सरशीं.– **भर**–*वि.* चिमूटभर; एवढेंसें. **मु०– भरना**– १ चिमटा घेणें. २ मनाला लागेल असें बोलणें. – **लेना** – चिमटा घेणें; कोपरखळी देणें.

चुटकुला– *पु.* चुटका; विनोदी गोष्ट. **मु० –छोड़ना–** विनोदी गोष्ट सांगणें; फुसकुली मारणें.

चुटला+– *पु.* १. स्त्रियांची वेणी. २. वेणीवर घालावयाचा एक दागिना.

चुटाना+– *क्रि. अ.* जखम होणें.

चुटिया– *स्त्री.* शेंडी; शिखा.

चुटियाना; चुटीलना+ –*क्रि. स.* जखमी करणें.

चुटीला; चुटैल–*वि.* १जखमी; घायाळ. २ घायाळ करणारा. ३ सर्वोत्कृष्ट.

चुड़िहारा– *पु.* कासार; बांगड्या बनविणारा, विकणारा; घालणारा. [–*स्त्री.* **चुड़िहारिन**]

चुड़ैल–*स्त्री.* १ डाकीण; हडळ. २. कुरूप स्त्री. ३. क्रूर स्त्री.

चुथैअ(व)ल– *स्त्री.* चुथडा.

चुदवाना– *क्रि. स.* संभोग, मैथुन करविणें. (याचा वापर अकर्मक क्रियापदासारखा होतो).

चुनचुना– *वि.* चुणचुणणारें; चरचरणारें; चुरचुरणारें.

चुनचुनाना– *क्रि. अ.* चुणचुणणें; चरचरणें; चुरचुरणें.

चुनचुनी – *स्त्री.* चुणचुण; चुरचुर.

चुनट–त–न– *स्त्री.* चुणी; सुरकुती; निरी; दुमड; वळी.

चुनना–*क्रि. स.* १. वेचणें; निवडणें. २. व्यवस्थेशीर रीतीनें लावणें; सजविणें. ३. रचणें (भिंत, इमारत इ.). ४. टिपणें (दाणे). **मु०– दीवारमें चुनना** – भिंतीत चिणणें; ठार मारणें.

चुनरी– *स्त्री.* १. चुनडी; ठिपक्या ठिपक्यांचें एक प्रकारचें लाल लुगडें. २. एक प्रकारचें रत्न.

चुनवाना; चुनाना–*क्रि. स.* वेंचविणें; दुसऱ्याकडून् निवडून घेणें; पसंत करविणें.

चुनाँचे–*अव्य.* [*फा.*] १. जसें; उदाहरणार्थ. २. याकरितां; म्हणून.

चुनाई– *स्त्री.* १. निवड. २. निवडण्याची किंवा वेंचण्याची मजुरी. ३. भिंतीचें बांधकाम.

चुनाव–*पु.* १. निवड; निवडण्याचें काम. २. निवडणूक.–**क्षेत्र**– *पु.* मतदारसंघ.

चुनावट– *स्त्री.* पा० 'चुनट'.

चुनिंदा–*वि.* १. निवडक; वेंचक. २. उत्तम; उत्कृष्ट.

चुनौटी – *स्त्री.* चुन्याची डवी; चुनाळें. [उत्तेजन; प्रोत्साहन.

चुनौती– *स्त्री.* १. आह्वान. २.

चुन्नट–त–*स्त्री.* पा० 'चुनट'.

चुन्नी– *स्त्री.* १. हिऱ्याचा किंवा माणकाचा बारीक कण; हिरकणी. २. चूण; चूरकणी. ३. लांकडाची भुशी.

चुप–*वि.*; *अव्य.* गप्प; स्तब्ध; चूप.–**चाप**–*अव्य.* गुपचुप; हळूच; निमूटपणें.–**चुप** – *अव्य.* गप्प; गुपचुप. [चुप.

चुपका–*वि.* निमूट; गप्प;

चुपकाना; चुपाना+– *क्रि. अ.* बोलूं न देणें; गप्प करणें.

चुपकी– *स्त्री.* मौन; स्तब्धता.

चुपड़ना+–*क्रि. स.* १. चोपडणें; माखणें; लेपणें. २. गोड गोड बोलणें. ३. लपविणें.

चुपड़ी–*वि. स्त्री.* १. तेलानें किंवा तुपानें माखलेली (वस्तु). २. गोड बोलणें; मधुर भाषण. –*स्त्री.* तूप लावलेली चपाती.

चुप्पा–*वि.* घुम्या; मुखस्तंभ.

चुप्पी– *स्त्री.* मौन; गुपचुप बसणें. **मु०–साधना** – मूग गिळून स्वस्थ बसणें.

चुब(भ)लाना–*क्रि. स.* चघळणें; तोंडांत घोळविणें.

चुभकना–*क्रि. अ.* गटंगळी खाणें; डुंबणें.

चुभकी– *स्त्री.* डुबकी; गटंगळी.

चुभना–*क्रि. अ.* १. टोंचणें; बोंचणें. २. घुसणें; शिरणें (सुई, कांटा). ३. सलणें; जांचणें; जाचक होणें. [घुसविणें; खुपसणें.

चुभाना–*क्रि. स.* टोंचणें;

चुभीला*–*वि.* १. टोंचणारा; बोचक. २. आकर्षित करणारा; मोहक.

चुभोना–*क्रि. स.* पा० 'चुभाना'.

चुमकारना–*क्रि. स.* ओठानें चूं चूं असा शब्द करून गोंजारणें; आंजारणें–गोंजारणें; चुचकारणें.

चुम्मा–*पु.* चुंबन; मुका.

चुर–*पु.* १. गुंफा; गुहा. २. वाळलेलें पान चुरगळल्याचा किंवा कागद फाटल्याचा आवाज.–*वि.** पुष्कळ; अधिक.

चुरकन–*पु.* चुरा; भुसा; चूर.

चुरकना+–*क्रि. अ.* १. फुटणें; बांगडी वाढणें; तडकणें. २. चीं चीं आवाज करणें; चिवचिवणें; चकचक करणें.

चुरकूट–स–*वि.* चक्काचूर; तुकडे–तुकडे झालेला.

चुरग(गा)ना–*क्रि. अ.* १. चिरचिरणें; ओरडणें. २. चक्काचूर होणें.

चुरचुराना–*क्रि. अ.* १. चुर चुर शब्द होणें; २. तुकडे–तुकडे होणें; मोडणें.

चुरना+–*क्रि. अ.* १. खदखदणें; शिजणें २. सल्लामसलत होणें.

चुरमुर–पु. कुरकुर असा आवाज (कडक पदार्थ मोडतांना होणारा).

चुरमुराना–*क्रि. अ.* कर्रकर्र असा आवाज होत मोडणें; तुटणें, फुटणें.–*क्रि. स.* कडकडून मोडणें, तोडणें, फोडणें.

चुरवाना–*क्रि. स.* १. चोरी करविणें. २. स्वयंपाक करविणें.

चुरा*–पु. चुरा; चूर्ण.

चुराना–*क्रि. स.* १. चोरणें. २. लपविणें. ३. कामांत कसूर करणें; अंग चोरणें. **मु०– चित्त चुराना**–मोहून टाकणें. **आँखें चुराना**–तोंड लपविणें.

चुराना–*क्रि. स.* शिजविणें.

चुरी+– *स्त्री.* १. बांगडी. २. लहान विहीर; आड.

चुरुट –पु. चिरूट; सिगार.

चुरू*–*पु.* ओंजळ; पसा.

चुल– *स्त्री.* खाज; कंड; चळ.

चुलचुलाना–*क्रि. अ.* १. खाज; कंड सुटणें. २. चुळबुळ करणें (मुलांचें).

चुलचुली– *स्त्री.* खाज; कंड.

चुलबुला–*वि.* १. चुळबुळ करणारा; चंचल. २. खोडकर. **–पन**– *पु.* १. खोडकरपणा; खेळकरपणा. २. चुळबुळ; चंचलता.

चुलबुलाना–*क्रि. अ.* १. चुळबुळ करणें. २. अधीर होणें.

चुलबुलाहट– *स्त्री.* चुळबुळ; अधीरता; चंचलता.

चुलहाई–*वि.* कामातुर; लंपट; व्यभिचारी.

चुलाना–*क्रि. स.* १. थेंब थेंब गाळणें; टपकविणें. २. दारू गाळणें.

चुलु (लू)क–*पु.* १. पसा; अर्धी ओंजळ. २. दलदल. [खोडकर.

चुल्ला–ल्ली+–*वि.* खटचाळ;

चुल्लू–*पु.* पसा; अर्धी ओंजळ. **–भर**–*वि.* पसाभर; थोडासा. **मु०– भर पानी में डूब मरना**– लज्जित होणें; शरमेनें अर्धमेलें होणें.

चुल्हौना*–*पु.* चुलाण; चूल.

चुवना*–*क्रि. अ.* झिरपणें. –*क्रि. स.* ठिबकविणें; गाळणें.

चुवाना*–*क्रि. स.* थेंब थेंब गाळणें. [२. झुरका.

चुसकी– *स्त्री.* १, घोंट; घुटका.

चुसना–*क्रि. अ.* १. चोखलें जाणें. २. शोषलें जाणें.

चुसनी– *स्त्री.* १. चोखणी; चोखणें. २. लहान मुलांना दूध पाजावयाची बाटली. [चोखविणें.

चुसवाना; चुसाना–*क्रि. स.*

चुस्त–*वि.* [*फा.*] १. घट्ट; आवळ; तंग. २. चपळ; तरतरीत; चलाख. ३. दृढ; मजबूत; कट्टर.

चुस्ती– *स्त्री.* [*फा.*] चलाखी; तरतरीतपणा; चपळाई.

चुहचुहा; चुहचुहाता–*वि.* १. चिंवचिंव अशा आवाजाचा. २. मधुर; रसाळ.

चुहचुहाना–*क्रि. अ.* १. पक्ष्यांचें किलबिलणें; चिंवचिंवणें. २ ठिबकणें.

चुहचुही– *स्त्री.* १. मधुर आवाजाचा एक लहान काळा पक्षी. २. पाकोळी. [दाबणें; चिरडणें.

चुहटना*–*क्रि. स.* तुडविणें;

चुहल– *स्त्री.* विनोद; थट्टा; मस्करी. – **बाज़**–*वि.* थट्टेखोर; वात्रट.–**बाज़ी**– *स्त्री.* मस्करी; वात्रटपणा.

चुहिया– *स्त्री.* १. उंदरी; उंदराची मादी. २. लहान उंदीर.

चुहुँटी– *स्त्री.* चुटकी; चिमटा.

चूँ–*अव्य.* [*फा.*] १. कां; कशासाठीं. २. समान; तुल्य ३. जर. –**कि**– *अव्य.* यासाठीं कीं; कारण कीं. **मु०–व चरा करना**– हुज्जत घालणें; विरोध करणें.

चूँ–*पु.* चिंवचिंव.–**चूँ**–*पु.* १. चिंवचिंव. २. चूं चूं असा आवाज निघणारें खेळणें. **मु०–चूँ का मुरब्बा** –मेसळ; विजोड वस्तूंचा संग्रह. **–तक न करना**–हूं कीं चूं न करणें; ब्र देखील न काढणें.

चूँटना+–*क्रि. अ.* मुंगीप्रमाणें डसणें, चिकटणें.

चूक– *स्त्री.* चूक; अपराध.–*पु.* १. लिंबाचा वाळविलेला आंबट रस. २. चुका (भाजी). – *वि.* अत्यंत आंबट.

चूकना– *क्रि. अ.* १. चुकणें; चूक करणें. २. संधि घालविणें.

चूका–*पु.* आंबट चुका (भाजी).

चूची– *स्त्री.*; **चूचु(चू)क**– *पु.* स्तन; स्तनाग्र; बोंडी.

चूज़ा– *पु.* [*फा.*] १. कोंबडीचें पिलूं. २. पक्ष्याचें पिलूं.

चूडांत– *पु.* पराकाष्ठा; शेवटची मर्यादा.– *अव्य.* बहुत; अधिक. – *वि.* पराकाष्ठेचा.

चूडा–*स्त्री.* १. शेंडी. २. शिखर. ३. तुरा. – *पु.*–लग्नचुडा.–**करण**– *पु.* जावळ अथवा शेंडी ठेवण्याचा संस्कार. – **पाश** – *पु.* केसांचा आंबाडा.–**मणि**– *पु.* डोकींत घालावयाचा एक दागिना. – *वि.* सर्वश्रेष्ठ; अग्रगण्य.

चूड़ा–*पु.* पोहे.

चूड़ी– *स्त्री*. १. बांगडी; कांकण. २. ध्वनिमुद्रिका; 'रेकॉर्ड'. ३. चुणी. –**दार**– *वि*. चुण्या असलेला; गोल घेरे असलेला; चुणीदार.–**०पाजामा**–तंग व गोल घेरे असलेली, चुणीदार विजार. **मु० चूड़ियाँ ठंढी करना, तोड़ना**–स्त्री विधवा झाल्यानंतर तिच्या बांगड्या वाढविणें. [द्रिय.

चूत– *स्त्री*. योनि; स्त्रीचें जननें-

चूतड़– *पु*. कुल्ला; ढुंगण; नितंब.

चूतिया– *वि*. मूर्ख; उपटसुंभ.

चून– *पु*. पीठ; भुगा; चूर्ण.

चूनर–री– *स्त्री*. पा० 'चुनरी.'

चूना– *क्रि. अ*. १. थेंब थेंब गळणें; झिरपणें. २* गर्भपात होणें. [चुन्याची डबी; चुनाळें.

चूना–चुना. – **दानी** – *स्त्री*.

चूनी– *स्त्री*. १. चूण (जनावरांना घालण्याची); भुसा. २. कण्या. [लेली पोळी.

चूपड़ी–री–*– *स्त्री*. तूप लाव-

चूमना–*क्रि. स*. मुका घेणें; चुंबणें.

चूमा–*पु*. चुंबन; मुका.–**चाटी** –*स्त्री*. चुंबन-आलिंगन; लाडीगोडी. [धुंद.

चूर–*वि*. १. तल्लीन; गुंग. २.

चूर–*पु*. चुरा; चूर्ण. **मु०–चूर करना**–तुकडे तुकडे करणें; भुगा करणें; नष्ट करणें.

चूरन–*पु*. चूर्ण; भुकटी.

चूरना*–*क्रि. स*. १. तुकडे तुकडे करणें. २. भुगा करणें. ३. तोडफोड करणें.

चूरमा–*पु*. चुरमा; पोळी किंवा भाकरी कुस्करून त्यांत तूपसाखर घालून केलेला खाद्य पदार्थ.

चूरमूर–*पु*. जोंधळ्याचे किंवा बाजरीचे सड; खुंट.

चूरा–*पु*. चूर्ण; भुगा.

चूर्ण–*पु*. भुकटी; 'पावडर.'

चूर्णन–*पु*. भुकटी करणें.

चूल–*पु*. १. शिखा; शेंडी. २. केस.– *स्त्री*. कुसूं; सांधा करण्यासाठीं लाकडाचा निमुळता केलेला भाग.

चूल्हा–*पु*. चूल; शेगडी. **मु०–न्यौतना**–घरच्या सर्व मंडळींना जेवावयास बोलावणें.–(ल्हे) **में जाय**–चुलींत जावो; मसणांत जावो.

चूषित्र–*पु*. द्रव किंवा वायु खेंचून घेणारें यंत्र; 'अॅस्पिरेटर.'

चूसना–*क्रि. स*. १. चुंफणें; चोखणें; शोषून घेणें. २. शोषण करणें.

चूहड़ा–र–रा–*पु*. भंगी; मेहेतर; डोंब.

चूहा–*पु*. उंदीर.–**दंती**– *स्त्री*. मनगटी.–**दान**–*पु*.; –(हे)**दानी**–*स्त्री*. उंदराचा सांपळा.

चें– *स्त्री*. चिवचिव. –**चें**– *स्त्री*. १. चिवचिवणें. २. बडबड. –**पें**– *स्त्री*. १. लहान मुलांचा कलकलाट. २. हळूं आवाजांत विरोध करणें. ३. व्यर्थ बडबड करणें.

चेंचु(टु)आ–*पु*. पक्ष्याचें पिलूं.

चेचक– *स्त्री*. [*फा*.] देवी (रोग).–**रू**–*वि*. तोंडावर देवीचे वण असलेला.

चेजारा–**पु*. गवंडी.

चेटक–*पु*. १. सेवक; नोकर. २. दूत. ३. थाटमाट. ४. जादूगिरी; चेटूक.

चेटका– *स्त्री*. १. चिता. २. स्मशान. ३. जादू; मंत्र.

चेटकी–*पु*. १. चेटूक करणारा; जादूगार. २. कुतहूल दाखविणारा; चमत्कार दाखविणारा.– *स्त्री*. चेटकीण. [दासी.

चेटिका–की–या; चेटी– *स्त्री*.

चेटुआ–वा–*पु*. चिमणीचें पिलूं.

चेटुई–वी+– *स्त्री*. दासी.

चेत–*पु*. १. चेतना; सावधानता; जागृति. २. स्मरण; आठवण.

चेतक–*पु*. १. सावध करणारा. २. प्रतोद; 'व्हिप.'

चेतक*–*वि*. जादूचा.

चेतना– *स्त्री*. चेतना; शुद्धि; शुद्धीवर असणें. [जागें होणें.

चेतना–*क्रि. अ*. सावध होणें.

चेताना–*क्रि. स*. सावध करणें; इशारा देणें. [इशारा; पूर्वसूचना.

चेतावनी– *स्त्री*. चेतावणी;

चेतिका*– *स्त्री*. चिता.

चेप–*पु*. लस; दाट रस.

चेर*–*पु*. दास; सेवक.

चेरा*–*पु*. १. सेवक. २. चेला; शिष्य. [शागिर्दी; शिष्यत्व.

चेराई*– *स्त्री*. १. दास्य. २.

चेरि–री*– *स्त्री*. १. नोकरी; सेवा. २. दासी.

चेला–*पु*. १. शिष्य. २. शागिर्द.

चेलिन; चेली– *स्त्री*. शिष्या; विद्यार्थिनी.

चेष्टा–*स्त्री*. १. प्रयत्न; उद्योग; धडपड; हालचाल. २. अंगविक्षेप. ३. कामना; इच्छा.

चेहरा–*पु*. [*फा*.] १. चेहरा; तोंड. २. मुखवटा. ३. पुढचा भाग. **मु०–उतरना**–तोंड उतरणें.– **लिखाना; –होना**–सैन्यांत दाखल होणें.

चै*–*पु*. समूह; ढीग; बांध.

चैत–*पु*. चैत्र महिना.

चैती–*वि*. चैत्रांत होणारें.– *स्त्री*. १. चैत्र महिन्यांत येणारें

(रब्बीचें) पीक. २. चैत्रांत गायिला जाणारा विशिष्ट संगीत-प्रकार.

चैन–*पु.* शांतता; आराम; सुख. **मु०–उड़ाना**–चैन करणें.–**की नींद सोना**–निश्चित मनानें राहाणें. –**की बंसी बजाना**–चैन करणें.

चैयाँ*–*स्त्री.* हात; भुजा; बाही.

चैल–*पु.* वस्त्र; कापड; पोशाख.

चैला–*पु.* १. फोडलेलें लांकूड; ढलपी. २. जळण.

चोंगा–*पु.* नळकांडें; पोकळ नळी (वस्तु वगैरे ठेवण्यासाठीं कागद, टिन इ. ची).

चोंच–*स्त्री.* चोंच; तोंड.

चोंच–*वि.* १. आगाऊ; शिष्ट. २. धूर्त; चलाख.

चोंचला–*पु.* चोचला; नखरा.

चोंचाल–*वि.* चवचाल; चंचल; उल्लू; नखरेबाज.

चोंचोंका मुरब्बा–*पु.* भेसळ; गडबड; गोंधळ; चुथडा.

चोंटना*–*क्रि. स.* ओरबाडणें; ओरखडणें.

चोंड़ा–*पु.* १. लहान विहीर; आड. २.+ बुचडा; झिंज्या.

चोंथ–*पु.* शेणाचा पोहटा; पोह.

चोंथना+–*क्रि. स.* १. बचका भरून घेणें; २. खुडणें; तोडणें.

चोंधर–*वि.* १. फार बारीक डोळे असलेला; मिचमच्या डोळ्यांचा. २. मूर्ख. [द्रव्य.

चोआ–वा–*पु.* एक सुगंधित

चोकर–*पु.* कोंडा; भुसा.

चोख– **स्त्री.* चपळता; वेग; झपाटा. – वि. पा० 'चोखा'.

चोखा–*वि.* १. चोख; प्रामाणिक; खरा. २. उत्तम; श्रेष्ठ. ३. स्वच्छ; निर्मळ; शुद्ध. ४. धारदार. ५. चतुर. –**पु.** तिखटमीठ लावलेले बटाटे; भाजी; वांग्याचें भरीत.

चोग़ा–*पु.* [*तु.*] पोकळ; पायघोळ अंगरखा; लांब झगा; 'गाउन'.

चोगा–*पु.* पक्ष्यांचा चारा; टिपून खाण्याची वस्तु. [नखरा.

चोचला–*पु.* १. हावभाव. २.

चोज–*पु.* १. व्याजोक्ति; उपहासगर्भित विनोद. २. सुभाषित.

चोट–*स्त्री.* १. आघात; प्रहार; टोला. २. घाव; जखम. **मु०–आना**–जखम होणें. –**खाना**– घायाळ, जखमी होणें.

चोटना–पोटना*–*क्रि. स.* १. समजूत काढणें. २. फूस लावणें; भुरळ पाडणें. [येणारी).

चोटा–*पु.* मळी (काकवीवर

चोटी–*स्त्री.* १. शेंडी. २. वेणी. ३. शिखर. **मु० –का**– सर्वोत्तम; सर्वोत्कृष्ट. –**का पसीना एड़ीतक बहाना**– खूप परिश्रम करणें; घाम गाळणें. –**दबना**; –**हाथमें होना**– शेंडी दुसऱ्याच्या हातीं जाणें; तावडींत सांपडणें.

चोटी–पोटी– **वि.* गोड गोड (बोलणें); भूलथाप.

चोट्टा–*पु.* चोर; चोरटा.

चोदना–*क्रि. स.* मैथुन, संभोग करणें. –*स्त्री.* प्रेरणा; प्रवर्तन.

चोदू–*पु.* संभोग करणारा.

चोप–* *पु.* १. इच्छा; मनीषा. २. आवड; रुचि; हौस. ३. उत्साह. ४. आंब्याचा, कैरीचा चीक.

चोपना–**क्रि. अ.* मोहित होणें; आसक्त होणें.

चोपी*–*वि.* १. इच्छुक. २. उत्साही. –*स्त्री.*+ कैरीचा चीक.

चोब–*स्त्री.* [*फा.*] १. तंबूचा खांब. २. नगारा वाजविण्याची कामटी. ३. सोनें किंवा चांदीचा मुलामा दिलेला दंडा. ४. सोटा; दंड.– **दार**–*पु.* चोपदार; दंडधारी.

चोबा–*पु.* [*फा.*] १. साखर-भात. २. दंडा; लाठी.

चोबी–*वि.* [*फा.*] लाकडी; लाकडाचा. –*स्त्री.* आडवी तुळई.

चोभा–*पु.* डोळे किंवा दुसरें एखादें दुखणारें अंग शेकण्यासाठीं वापरली जाणारी औषधांची पुरचुंडी.

चोर–*पु.* १. चोर; बेइमानी व्यक्ति. २. मनांतील वाईट वासना. –*वि.* लपलेलें; गुप्त. –**कट**–**पु.** चोर; उचल्या. –**ख़ाना**–*पु.* चोरकप्पा. –**थन**–*वि. स्त्री.* धारेच्या वेळीं दूध चोरून ठेवणारी गाय, म्हैस वगैरे.–**बाज़ार**–*पु.* चोरीच्या मालाची खरेदीविक्री करण्याचें ठिकाण.–**मिहीचनी***–*स्त्री.* आंधळी कोशिंबीर; लपंडाव.

चोरी–*स्त्री.* चोरी. –**चोरी**; –**से**–अव्य. लपून छपून; चोरून.

चोल–*पु.* १. अंगरखा. २. वल्कल. ३. कवच. ४. एक लता (हिच्यापासून लाल रंग निघतो). –*स्त्री.* चोळी. –**खंड**–*पु.* चोळीचा खण. –**रंग**–*पु.* पक्का लाल रंग.

चोलना*–*पु.* १. कफनी. २ शरीर.

चोला–*पु.* १. पायघोळ अंगरखा; साधूंची पायघोळ कफनी. २. अंग; शरीर. **मु० – छोड़ना**– प्राणत्याग करणें. –**बदलना**–देहांतर करणें; पुनर्जन्म घेणें.

चोली–*स्त्री.* चोळी. **मु०–दामनका साथ**– घनिष्ठ मैत्री.

चोष्य–*वि.* चोखण्यास योग्य. –*पु.* चोखून खाण्याचा पदार्थ.

चौंक–*स्त्री.* दचकणें.

चौंकना– *क्रि. अ.* १. दचकणें; विचकणें. २. भडकणें; उधळणें.

चौंकाना–*क्रि. स.* दचकविणें; दिपविणें.

चौंतीस–*वि.* चौतीस; ३४.

चौंध– *स्त्री.* लखलखाटामुळें डोळे दिपणें. [लकाकणें.

चौंधना–*क्रि. अ.* चमकणें;

चौंधियाना–*क्रि. अ.* दिपणें; प्रकाशानें डोळे दिपणें.

चौंप– *स्त्री.* इच्छा; सुरसुरी.

चौंर–*पु.* १. चवरी. २. झालर. ३. तुरा. **–गाय**– *स्त्री.* नीलगाय.

चौंरा–*पु.* पेव; धान्य सांठवून ठेवण्याचा खळगा.

चौंराना*–*क्रि. स.* १. चवरी ढाळणें. २. केर काढणें.

चौंरी– *स्त्री.* १. चवरी. २. पांढऱ्या शेपटीची गाय. ३. वेणीचा आगवळ.

चौंसठ*–*वि.* चौसष्ट; ६४.

चौ–*वि.* चार (समासांत व्यवहृत).**–आई**– *स्त्री.* १. चहूंकडून येणारी हवा, वारें. २. अफवा. **–कड़ी**– *स्त्री.* १. चौखूर धांवणें (हरिणाचें). २. लांब उडी. ३. चार माणसांचा समूह; चौकडी. (मु०– **भूल जाना**–अत्यंत घाबरणें; कांहीं न सुचणें.)**–कन्ना**– *वि.* चोहोंकडे लक्ष ठेवणारा; सावध; जागा; जागरूक. **–कस**– *वि.* १. सावध; जागरूक. २. ठीक; बरोबर. **–कसी**– *स्त्री.* सावधगिरी; हुशारी; खबरदारी. **–कोर**–*वि.* चौकोनी.**–खंड**–*पु.* १. चार मजली घर. २. चार चौकी वाडा. **–खट**– *पु.* चौकट; उंबरठा. **–खटा**–*पु.* चौकट; 'फ्रेम'.**–खाना**+–*पु.* चौकड्याचें कापड. **–चँद***–*पु.* क्रीडा; खेळ. **–खूँट** **–पु.** चारी दिशा; भूमंडळ. *–अव्य.* चोहोंकडे; सर्वत्र. **–खूंटा** *–वि.* चौकोनी. **–गिर्द**–*अव्य.* चोहोंकडे; चोहोंबाजूंस. **–गुना**– *वि.* चौपट; चार पदरी.**–गोशिया**– *स्त्री.* चार टोकांचें टोपडें.–*वि.* चतुष्कोणी. **–घड़ा**– *पु.* चार कप्पे असलेला विड्याचा डबा; पानाचा डबा. **–डोल***–*पु.* १. पालखी. २. एक वाद्य; चौघडा. **–तनी**– *स्त्री.* चार बंदांचें टोपडें. **–दस**– *स्त्री.* चतुर्दशी.**–दह**–*वि.* चौदा.**–दांत***–*पु.* दोन हत्तींची टक्कर.**–दानिया**; **–दानी**– *स्त्री.* चार मोती असलेला कानांत घालावयाचा एक दागिना; चौकडा; चार मोत्यांची भिकबाळी. **–धारी***– *स्त्री.* रंगीत चौकड्यांचें कापड.**–पई**– *स्त्री.* चौदा मत्रांचा एक छंद; चौपाई. **–पत**– *स्त्री.* कापडाच्या एकदम केलेल्या चार घड्या; चौपदरी घडी.**–पहल-ला-लू** *–वि.* चौपदरी. **–पाई**– *स्त्री.* प्रत्येकीं १६ मात्रांच्या चार चरणांचा एक छंद. **–पाया**–*पु.* चतुष्पाद प्राणी (गाय, म्हैस इ.); जनावर. **–पाल**–*पु.* १. वरून छप्पर असलेली, पण चोंहों बाजूंनीं खुली अशी बसण्याची जागा. २. बैठक. ३. ओसरी. ४. दालन. ५. चावडी. ६. पालखी. **–बंदी**– *स्त्री.* चार बंदांचा घट्ट व आखूड अंगरखा. **–बगला**–*पु.* १. बाराबंदी. २. अंगरख्याचा बगलेंतील भाग. **–बगली**– *स्त्री.* पा० 'चौबंदी'. **–बारा**–*पु.* शेवटच्या मजल्यावरील बसण्याची मोकळी जागा; चोहों बाजूंस खिडक्या किंवा दारें असलेली छतदार गच्ची; रस्त्याच्या बाजूकडील माडीचा सज्जा.**–बारा**–*अव्य.* चौथ्यांदा. **–बीस**–*वि.* चोवीस; २४. **–बोला**–*पु.* १.८+७ किंवा १६+१४ मात्रांचा एक छंद. २. वडवड; वटवट. **–मंजिला**–*वि.* चारमजली. **–मासा**–*पु.* १. चातुर्मास. २. वर्षाऋतूसंबंधीं कविता. **–मासिया**; **–मासी**–*वि.* १. चातुर्मासांत होणारा. २. पावसाळ्यांत गायिलें जाणारें गाणें. **–मुख**–*अव्य.* चोहोंकडे; सर्वत्र.– **–मुखा**–*वि.* १. चार बाजूंचा २.चार तोंडांचा. **–मुखी**–*वि.* सर्वतोगामी; सर्वांगीण.**–मुहानी**– *स्त्री.* चौरस्ता; चौक. **–रंग**–*पु.* १. तलवारीचा एक हात. २. खेळ.–*वि.*तलवारीच्या वारानें कापला गेलेला.**–रंगा**–*वि.* चार रंगांचा. **–रस**–*वि.* १. चौरस; चौपदरी. २. सपाट.**–रसी** –*स्त्री.* सपाट करण्याचें एक हत्यार; पटाशी. **–रस्ता**–*पु.* चौक. **–राहा**–*पु.* चौक; चौरस्ता. **–लड़ा** *–वि.* चौपदरी; चार सरांचा (हार वगैरे). **–सर**–*पु.* १. चौपड; सोंगट्यांचा खेळ. २. सोंगट्यांचा पट. ३. चार पदरांचा, लडींचा हार.**–हटा–ट्टा**–*पु.* १. चौक; चौरस्ता. २.चोहोंकडून दुकानें असलेला चौक. ३. बाजार. **–हद्दी**– *स्त्री.* चारी बाजूंची हद्द; चतुःसीमा.

चौआ–*पु.* १. चार अंगुळांचें माप; हाताचीं चार बोटें. २. पत्त्यांतील चव्व्या. ३. चतुष्पाद जनावर.

चौआना*–*क्रि. अ.* चकित होणें. –*क्रि. स.*+ हाताच्या चार बोटांवर गुंडाळणें (जनेऊ चौआना).

चौक–*पु.* १. चौकोनी आंगण; चौक. २. रांगोळी घातलेली जागा. ३. चारांचा समूह. **मु०–पूरना**– रांगोळी घालणें.

चौका–*पु.* घरांतील स्वयंपाकाची किंवा जेवण्याची जागा. २. जमि-

नीचा चौकोनी तुकडा. ३. चौक. ४. पोळपाट; पाटा. ५. दगडी चौरंग. ६. पुढचे चार दांत. ७. पत्त्यांतील चव्व्या. **–बरतन**–*पु.* स्वयंपाकघर सारविण्याचें व भांडी घांसण्याचें काम. **मु० –लगाना**–स्वयंपाकघर सारवणें; पोतेरें घालणें.

चौकी–*स्त्री.* १. नाकें; चौकी. २. चौरंग. ३. पडाव; मुक्कामाची जागा. ४. पहारा. ५. लहान पोळपाट. ६. देवाला किंवा पिराला अर्पण केलेल्या वस्तू. ७. गळ्यांत घालण्याची पेटी. **–दार**–*वि.* पहारेकरी.

चौगान–*पु.* [*फा.*] १. एक प्रकारचा चेंडूचा खेळ; पोलो. २. पोलोचें मैदान. ३. नगारा वाजविण्याच्या कामटचा.

चौघड़–*पु.* दाढ; हिरडी.

चौचंद*–*पु.* बदनामी; निन्दा; कलंक.

चौचँदहाई–*वि. स्त्री.* इतरांची निंदा करणारी; चवचाल.

चौचीर–*वि.* चिंधड्या उडालेला.

चौड़ा–*वि.* रुंद. **–ई**–*स्त्री.* रुंदी. **–चकला**–*वि.* विस्तृत; लांबरुंद.

चौड़ान–*स्त्री.* रुंदी.

चौतरा*–*पु.* चबुतरा; ओटा.

चौथ–*स्त्री.* १. चतुर्थी. २. चौथा हिस्सा; चतुर्थांश. **–पन**–*पु.* म्हातारपण.

चौथा–*वि.* चवथा; चौथा.–*पु.* अंत्यक्रिया करणाऱ्याला किंवा मृत व्यक्तीच्या विधवा पत्नीला पैसे, कपडे वगैरे देण्याचा विधि. **–पन**–*पु.* वार्धक्य; म्हातारपण.

चौथाई–*स्त्री.* चौथाई; एक चतुर्थांश.

चौथी–*स्त्री.* १. मांडवपरतणें. २. लग्नाच्या चौथ्या दिवशीं वधूवरांचीं कंकणें सोडण्याचा विधि ३. जमीनदाराला उत्पन्नाच्या एक चतुर्थांश खंड देण्याचा नियम.

चौधरानी–*स्त्री.* चौधरीची पत्नी.

चौधरी–*पु.* एखाद्या समाजाचा किंवा ज्ञातीचा प्रमुख, पुढारी; पोलीस पाटील.

चौपट–*वि.* नष्ट; नाश झालेला.

चौपटा–*वि.* नाश करणारा.

चौपड़–*स्त्री.* सोंगटयांचा खेळ.

चौपत(ता)ना; चौपरतना–*क्रि. स.* घड्या घालणें.

चौबा–बे–*पु.* चतुर्वेदी ब्राह्मण; ब्राह्मणांतील एक पोटजात.

चौबाइन–*स्त्री.* चौबे जातीच्या ब्राह्मणाची स्त्री.

चौभड़–*पु.* दाढ.

चौरा–*पु.* १. चबुतरा. २. समाधिस्थानाचा चबुतरा; वेदी ३. घरांतील दालन; सोपा. ४. चवळीची शेंग.

चौराई–*स्त्री.* चवळीची पालेभाजी.

चौरानबे–वे–*वि.* चौऱ्याण्णव; ९४.

चौरासी–*वि.* चौऱ्यांशी; ८४. –*पु.* १. चौऱ्यांशी लक्ष योनी. २. घुंगुरमाळा.

चौरी–*स्त्री.* लहान चबुतरा.

चौरेठा–*पु.* ओल्या तांदुळाची पिठी; पाणी घालून वांटलेले तांदूळ.

चौर्य–*पु.* १. चोरी. २. लपवाछपवी. **–रत**–*पु.* गुप्त मैथुन.

चौर्योन्माद–*पु.* चोरी करण्याची वृत्ति; 'क्लेप्टोमेनिया.'

चौल–*पु.* मुंडण; जावळ. [भाजी.

चौलाई–*स्त्री.* चवळीची पाले-

चौवन–*वि.* चोपन्न; ५४.

चौवा–*पु.* चारी बोटांभोंवतीं गुंडाळला जाणारा दोरा; चार अंगुळें. [४४.

चौवालीस–*वि.* चव्वेचाळीस;

चौहत्तर–*वि.* चौऱ्याहत्तर. ७४.

चौहरा–*वि.* चार पदरी; चौघडीचा; चौपदरी.

चौहान–*पु.* क्षत्रियांची एक शाखा; चव्हाण.

च्यवन–*पु.* गळती; टपकणें; 'लीकेज.' **–छूट**–*स्त्री.*; **–मोक**–*पु.* एखादा पदार्थ गळून गेल्यामुळें दिली जाणारी सूट.

च्युत–*वि.* १. गळलेला. २. भ्रष्ट; स्थानभ्रष्ट. ['चींटी.'

च्यूँटा; च्यूँटी–पा० 'चींटा';

छ

छ– देवनागरी वर्णमालेच्या चवर्गांतील दुसरा वर्ण.

छंग*–*पु.* १. उत्संग; मांडी; कूस. २. छाती.

छंगा–गू–*वि.* सहा बोटें असलेला.

छँगुनि(लि)या; छँगुली*–*स्त्री.* करंगळी.

छँटना–*क्रि. अ.* १. अलग होणें; दूर होणें. २. निवडलें जाणें. ३. साफ होणें; स्वच्छ धुतलें जाणें. ४. अशक्त होणें. **मु० छँटा हुआ**– १. निवडलेला. २. धूर्त; कावेबाज.

छँटनी–*स्त्री.* १. कपात. २. निवड; वेगळें करणें.

छँटवाना; छँटाना–*क्रि. स.* १. निवड करून घेणें. २. कापविणें; तोडून घेणें. ३. सोलविणें.

छँटाई–*स्त्री.*; **छँटाव**–*पु.* कापणें,

निवडणें, धुणें. इ. काम व त्याची मजुरी.

–छँड़ना*–*क्रि. स.* १. टाकणें; सोडणें. २. कांडणें; कुटणें. ३. निवडणें. [घेणें; काढून घेणें.

छँड़ाना*–*क्रि. स.* हिसकावून

छंद–*पु.* १. छंद. २. अभिलाषा; इच्छा. ३. नाद; बंधन. ४. कपट; फसवणूक. ५. युक्ति; उपाय. ६. मनगटावरील एक दागिना. **–बंद**– *पु.* कपट; कावेबाजपणा; युक्ति–प्रयुक्ति.

छः–*वि.* सहा; ६.

छई–*वि.* क्षयी; क्षय होणारा किंवा झालेला. –*पु.* चंद्र. –*स्त्री.* क्षयरोग.

छक*–*स्त्री.* १. तृप्ति. २. लालसा. ३. मादक पदार्थाची गुंगी; कैफ; नशा.

छकड़ा–*पु.* मालाची वाहतूक करणारी बैलगाडी; छकडा.

छकड़ी– *स्त्री.* १. सहांचा समूह; गट. २. सहा भोयांनीं उचलावयाची पालखी. ३. सहा घोड्यांची गाडी.

छकना–*क्रि. अ.* १. तृप्त होणें; संतुष्ट होणें (खाऊन, पिऊन). २. दारू पिऊन तर्र होणें. ३. चकित होणें; फसणें; चकणें. ४. त्रासणें.

छकाछक–*वि.* १. तृप्त; संतुष्ट. २. भरलेला; परिपूर्ण. ३. कैफ चढलेला.

छकाना–*क्रि. स.* १. खावयास प्यावयास देऊन तृप्त करणें; पोटभर खाऊं घालणें. २. मद्य पाजवून नशा चढविणें; कैफ आणणें. ३. चकविणें; आश्चर्यचकित करणें. ४. त्रास देणें.

छक्का–*पु.* १. छक्का (पत्त्याच्या खेळांतील). २. सहांचा समूह किंवा सहा भागांची वस्तु. ३. द्यूतांतील एक डाव. **–पंजा**– छक्के पंजे; डावपेंच; फसवणूक. **मु०– छूटना**– १. धीर सुटणें. २. बुद्धि ताळ्यावर न राहाणें. **–(क्के) छुड़ाना**– धीर खचविणें; नाकीं नऊ आणणें; हैराण करणें.

छगड़ा*–*पु.* बोकड; बकरा.

छगन– ना–*वि.* छबकडा; सोनुला; बाब्या; लहान मुलांस लाडानें म्हणावयाचा शब्द. –*पु.* लहान मूल; आवडतें मूल. **–मगन**– *पु.* लहान मुलें-बाळें; हंसरी मुलें.

छगल–*पु.* बकरा.

छगुनी– *स्त्री.* करंगळी.

छछिआ–या– *स्त्री.* ताक ठेवण्याचें, पिण्याचें किंवा मापण्याचें एक भांडें.

छछूंदर–*पु.* १. चिचुंद्री. २. एक प्रकारचा ताईत. ३. फटाक्याचा एक प्रकार (चिचुंद्री).

छछेरू+–*पु.* तुपाची बेरी.

छजना–*क्रि. अ.* १. खुलून दिसणें; शोभणें; उठावदार दिसणें. २. योग्य असणें; साजेसें असणें.

छज्जा–*पु.* १. सज्जा; गॅलरी. २. छताचा भिंतीच्या पुढें आलेला भाग.

छटंकी– *स्त्री.* छटाकाचें वजन. –*वि.* १. लहान. २. अचपळ (मूल). ३. छटाकभर.

छटकना–*क्रि. अ.* १. निसटणें; सटकणें. २. दूर दूर राहाणें. ३. उडी घेणें. ४. तावडींतून सुटणें.

छटकाना–*क्रि. स.* १. निसटूं देणें; सटकूं देणें. २. हिसडा देऊन पकडींतून सोडविणें. ३. ओढून काढणें (पकडींत किंवा दाबाखालीं असलेल्या वस्तूस).

छटपट–*वि.* चपळ; चंचल. –*स्त्री.* तडफड.

छटपटाना–*क्रि. अ.* १. तडफडणें; हातपाय झाडणें. २. तळमळ होणें; बेचैन होणें.

छटपटी– *स्त्री.* १. तळमळ; बेचैनी; तडफड. २. तीव्र उत्कंठा.

छटाँक– *स्त्री.* छटाक (वजन).

छटा– *स्त्री.* १. प्रकाश; दीप्ति. २. सौंदर्य; शोभा. ३. वीज.

छटा; छटैल–*वि.* १. निवडक. २. धूर्त; बनेल. ३. पक्का.

छठ– *स्त्री.* १. षष्ठी (तिथि). २. + कार्तिक शुक्ल षष्ठीला केलें जाणारें एक व्रत.

छठवाँ; छठाँ–ठा–*वि.* सहावा. **मु० छठे छमासे**– सटीं-सहामासीं; कधीं-कधीं.

छठी– *स्त्री.* जन्मानंतर सहाव्या दिवशीं होणारी पूजा किंवा संस्कार; सटवी–पूजा; सहावी. **मु०–का दूध याद आना**– हैराण होणें; घाबरगुंडी उडणें; ब्रह्मांड आठवणें.

छड़– *स्त्री.* १. सळई; गज; आंकडा. २. लांब व पातळ काठी.

छड़ना+– *क्रि. स.* १. धान्य सडणें; कांडणें. २. *त्यागणें; सोडणें.

छड़ा–*पु.* पायांत घालावयाचा एक चांदीचा दागिना; वाळा. –*वि.* एकटा; एकाकी; सडा.

छड़िया–*पु.* पहारेकरी; हातांत छडी घेऊन उभा असलेला.

छड़ी– *स्त्री.* १. छडी; काठी. २. चोबदाराच्या हातांतील चांदी-सोन्याची काठी. ३. पिराच्या थडग्यावर वाहावयाची पताका. **–दार**–*पु.* पहारेकरी. *वि.* १.

उभ्या रेघांचें (कापड). २. छडी घेतलेला. **–बरदार–पु.** चोबदार; पहारेकरी.

छड़ीला–+ *वि.* एकटा; सडा.

छत– *स्त्री.* १. छत; चांदवा. २. गच्ची.**–गीर–पु.; गीरी–** *स्त्री.* छत; चांदवा; 'सेलिंग'. [तानाहि.

छत*–*अव्य.* असून देखील; अस-

छत*–*पु.* क्षत; घाव; जखम.

छतना*– *पु.* १. इरलें; पानांची छत्री. २. मधमाशांचें पोळें.

छतनार–रा – *वि.* छताप्रमाणें खूप पसरलेला; सांवली देणारा (वृक्ष).

छतरी– *स्त्री.* १.छत्री. २. मंडप. ३. समाधीवरील मंडप. कबूतरांसाठीं बांधलेला बांबूंचा ताटवा.

छतिया*–*स्त्री.* छाती; वक्षस्थळ.

छतियाना– *क्रि. स.* १. छातीशीं धरणें; आलिंगन देणें; कवटाळणें. २. बंदूक उडवते वेळीं मूठ (कुंदा) छातीस लावणें. [वृक्ष; सातवण.

छतिवन – *पु.* सप्तपर्णी; एक

छतीसा– *वि.* १. चतुर; शहाणा. २. धूर्त; कावेबाज. [*–स्त्री.* **छतीसी**]. *–पु.* न्हावी. [छत्री

छतौना– *पु.*१. छत्री. २. कुत्र्याची

छत्ता– *पु.* १. छत्री २. मधमाशांचें किंवा गांधिलमाशांचें पोळें. ३. छत्रीसारखी दूरवर पसरलेली वस्तु. ४. कमळाचें बीं. ५. छत्रसाल.

छत्तीस – *वि.* छत्तीस**–मु०–कारिश्ता–**छत्तीसाचा आकडा; वैर.

छत्तीसा– *पु.* न्हावी.*–वि.* धूर्त; कपटी.

छत्र– *पु.* १. छत्री. २. राजछत्र. ३. कुत्र्याची छत्री. **–च्छाया; –छाया –** *स्त्री.* कृपाछत्र; संरक्षण. **–बंधु–** *पु.* १. हीन कुळांत जन्मलेला क्षत्रिय. २. क्षत्रियाचा मित्र.

छत्र(त्रा)क – *पु.* १. कुत्र्याची छत्री; अळंबें. २. छत्री. ३. पोळें.

छत्री– *वि.* छत्रयुक्त; छत्री घेतलेला.*–पु.* १. न्हावी. २. क्षत्रिय. ३* पा० 'खत्री'.

छद; छदन– *पु.* आवरण; खोळ.

छदाम – *पु.* छदाम; पैशाचा चौथा हिस्सा.

छद्दर*–*पु.* खटयाळ मूल.

छद्म– *पु.* कपट; फसवणूक; लपवाछपवी.**–नाम–** *पु.* १. टोपणनांव. २. खोटें नांव; 'स्यूडोनिम'. **–युद्ध –** *पु.* लुटुपुटीची लढाई; दिखाऊ युद्ध; 'शॅम फाइट'.

छद्मा(ला)वरण – *पु.* तोफा, जहाजें वगैरे रंगवून किंवा त्यांच्यावर झाडाच्या फांद्या टाकून शत्रूला फसविणें; 'कॅमुफ्लाझ'.

छद्मी– *वि.* कृत्रिम वेश धारण करणारा; कपटी; फसव्या.

छन*–*पु.* १. एक क्षण. २. छनछन असा आवाज; झंकार.

छनक– *पु.* १. छनछन असा आवाज होणें. २. सटकणें; पसार होणें; दचकून पळणें.*–अव्य.* क्षणभर.**–मनक–** *स्त्री.* १. दागिन्यांचा आवाज. २. शृंगार. ३. दागिने घालून मिरवणारी स्त्री.

छनकना– *क्रि. अ.* छनछन करणें; झंकार होणें.

छनकाना– *क्रि. स.* १. सावध करणें; जागे करणें. २ छनछन आवाज करणें. ३. तापलेल्या तव्यावर किंवा भांड्यावर पाणी टाकून आवाज काढणें.

छनछनाना– *क्रि. अ.* १. छनछन आवाज होणें. २. उकळत्या तेलांत पाणी पडल्यामुळें तडतड आवाज निघणें. ३. झंकार होणें.*–क्रि. स.* छनछन आवाज करणें.

छनदा*–*स्त्री.* १. रात्र. २. वीज.

छनन-मनन+ *–पु.* उकळत्या तेलातुपांत पाण्याचा थेंब पडल्याचा आवाज.

छनना – *क्रि. अ.* १. गाळलें किंवा चाळलें जाणें. २. छिद्रें पडणें; चाळणी होणें. ३. चौकशी होणें. ४. कढईंतून तळलेला पदार्थ बाहेर काढला जाणें; तळून निघणें. ५. अंमल चढणें. ६. लागणें; जखम होणें. *– पु.* गाळणें. **– मु० गहरी छनना–** गाढ मैत्री असणें.

छनाका– *पु.* नाण्यांचा (विशेषत: रुपयांचा) आवाज; झंकार.

छनाना– *क्रि. स.* १. गाळवून किंवा चाळवून घेणें. २. भांग वगैरे पाजविणें. [भंगुर.

छनिक* *– वि.* क्षणिक; क्षण-

छन्न– *पु.* तापलेल्या पदार्थावर पाणी पडल्यानें होणारा आवाज.*–वि.* लपविलेला; झांकलेला.**–मति–** *वि.* जडबुद्धि; मूर्ख.

छन्ना–– *पु.* गाळणें; गाळण्याचें फडकें.**–पत्र–** *पु.*तेल वगैरे गाळण्याचा टीपकागदासारखा कागद; 'फिल्टर पेपर'.

छन्य– *पु.* गाळून खालीं आलेला पदार्थ; 'फिल्ट्रेट'.

छप– *स्त्री.* एखादी वस्तु पाण्यांत एकदम पडल्याचा आवाज; धप्. *–अव्य.* सप् सप् (पाऊस पडण्याचा आवाज).

छपका– *पु.* १. डोक्यावर घालण्याचा एक अलंकार. २. पाण्यांत हातपाय मारण्याची क्रिया. ३. पाण्याचा सपका; पाण्यांत हातपाय मारणें.

छपद– *पु.* भ्रमर; भुंगा.

छपन*–संहार; नाश.

छपना– *क्रि. अ.* १. छापलें जाणें.

२. चिन्हांकित होणें. ३. देवी टोंचल्या जाणें.

छपर – 'छप्पर'चें समासांतील रूप.–**ख(खा)ट** – *स्त्री.* मच्छरदाणी असलेला पलंग; मच्छरदाणी लावण्याची सोय असलेला पलंग. –**बंद**–*वि.* १. शाकारणी करणारा माणूस. २. चांगल्या कुळांतील.

छपर-छपर*–*वि.* ओलाचिंब; भिजलेला.

छपरी*– *स्त्री.* झोपडी; मठी.

छपवाना– *क्रि. स.* छापवून घेणें.

छपवैया+–*पु.* छापणारा; मुद्रक.

छपा– *वि.* छापलेला; मुद्रित. *स्त्री.** १. रात्र. २. हळद.

छपाई– १. छापण्याचें काम; मुद्रण. २. छापण्याची मजुरी.

छपाका–*पु.* सपाका; पाणी वगैरे तरल पदार्थावर दुसरी एखादी वस्तु सपकन पडल्यानें होणारा आवाज.

छपाना– *क्रि. स.* १. छापवून घेणें. २. देवी काढून घेणें.

छप्पन– *वि.* छप्पन्न; ५६.

छप्पय–*पु.* सहा चरणांचा एक छंद (षट्पदी).

छप्पर–*पु.*–छप्पर; छत. –**बंद**– छप्पर शाकारणारा. **मु०–पर रखना** –सोडून देणें; चर्चा न करणें.–**फाड़कर देना** – अकल्पितपणें देणें. (दान, देणगी); घरबसल्या देणें.

छब–*स्त्री. पा०* 'छबि.' –**तख़्ती** – *स्त्री.* शरीराची सुंदर घडण; सौष्ठव. [टोपली; हारा.

छबड़ा+–*पु.* रुंद तोंडाची

छबना– *क्रि. अ.* सुंदर, सौष्ठवयुक्त असणें.

छबि– *स्त्री.* १. शोभा; सौंदर्य; रूप. २. कांति. ३. 'फोटो.'

छबीला– *वि.* देखणा; सुंदर.

छब्बीस– *वि.* सव्वीस; २६.

छब्बीसी– *स्त्री.* फळांचा शेंकडा (हा १३० फळांचा असतो).

छमंड– *पु.* पोरका; अनाथ (मूल).

छम; छमछम– *स्त्री.* नूपुर, पैंजण, घुंगरू वगैरेंचा किंवा पाऊस पडण्याचा आवाज.

छमक– *स्त्री.* थाटमाट; नखरा.

छमकना– *क्रि. अ.* १. दागिन्यांचा आवाज होणें. २. घुंगुर बांधून नाचणें. ३. नखरा करणें.

छमछमाना– *क्रि. अ.* छमछम आवाज करीत चालणें; छमछम आवाज करणें. [क्षमा.

छमना*– *क्रि. स.* क्षमा करणें.

छमा; छमाई*–*वि.* माफी;

छमाछम– *स्त्री. पा०* 'छम'; 'छनक–मनक'.

छमासी– *स्त्री.* षाण्मासिक श्राद्ध.

छमाही– *वि.* सहामाही.

छमुख– *पु.* षडानन; कार्तिकेय.

छय*– *पु.* क्षय; नाश.

छर*– *पु.* कपट; फसवणूक.

छरछर– *पु.* १. छमछम (छडी मारल्याचा आवाज). २. छरे किंवा खडे पडल्याचा आवाज; सट्सट्; थाड् थाड्.

छरछराना–*क्रि. अ.* चुरचुरणें; आग होणें.

छरना–*क्रि. अ.* गळणें; टपकणें; झरणें; झिरपणें.–*क्रि. स.* १. फसविणें. २. मोहून टाकणें.

छरभार*–*पु.* १. कामाची जबाबदारी किंवा बोजा. २. मानगड; बखेडा.

छरहरा–*वि.* १. अत्यंत चपळ. २. एकेरी अंगाचा; सडपातळ.

छरा*–*पु.* १ वाळा. २ लड. ३. नाडी. (विजारीची.) ४. दोर.

छरिंदा+–*वि.* एकटा; सडा.

छरी*– *स्त्री.* छडी. –*वि.* धूर्त; कपटी.

छरीदा–*वि.* एकटा; सडा.

छरीला–*पु.* दगडफूल.

छर्द–र्दि– *स्त्री.* वांती; उलटी.

जाँझ–झा+–*पु.* १. वळवाचा पाऊस; वळीव; सोसाटयाचा वारा येऊन पडणारा पाऊस. २. झंझावात; वावटळ.

जाँत–ता–*पु.* जातें.

जांब*; जांबव–*पु.* जांभूळ.

जांबील–*पु.* गुडघ्याची वाटी.

जाँवत*–*अव्य.* १. यावत्; जितकें. २. संपूर्ण. ३. जेव्हांपर्यंत.

जाँवर*–*पु.* गमन; जाणें.

जा*–*सर्व.* १. जो. २. ज्या (विभक्तिप्रत्यय लागतांना होणारें रूप. जाको–जिसको).

जा– *स्त्री.* [*फा.*] स्थान; जागा; ठिकाण. –*वि.* उचित; योग्य.–**ज़रूर**–शौचकूप; संडास.–**नमाज़**– *स्त्री.* ज्याच्यावर बसून नमाज पढतात तें आसन, कापड. –**नशीन**–*वि.* वारसदार; उत्तराधिकारी. –**ब–जा**–*अव्य.* जागजागीं; जागोजाग; जेथेंतेथें.–**बेजा** –*वि.* योग्यायोग्य; बरेंवाईट.–*अव्य.* योग्यायोग्य ठिकाणीं; प्रसंग असो कीं नसो.

जाई– *स्त्री.* १. कन्या. २. चमेली; जाई.

जाकड़–*पु.* जांगड; दुकानांतून पसंतीसाठीं मोघम आणलेला माल.

जाके*–*सर्व.* ज्याचा.–*अव्य.* जाऊन.

जाकैं*–*सर्व.* ज्याचें.

जाको*–*सर्व.* ज्याला.

जाग*–*पु.* यज्ञ; याग.

जाग*– *स्त्री.* जागा; ठिकाण.

जाग– *स्त्री.* जागरण; जागें होणें.

जागता–*वि.* १. जागा; जागणारा; जागृत. २. प्रत्यक्ष; साक्षात्.

जागना–*क्रि. अ.* १. जागें होणें; झोपेंतून उठणें. २. जाग्रण करणें; जागें राहाणें. ३. सावध होणें. ४. उदयास येणें; नावारूपास येणें. ५. प्रज्वलित होणें.

जागबलिक*–*पु.* याज्ञवल्क्य.

जागरू+–*पु.* भुसा.

जागा*– *स्त्री.* जागा; स्थान. –*पु.* रात्रभर जागून केलेलें भजनकीर्तन; जागरण.

जागीर– *स्त्री.* [*फा.*] १. जहागीर. २. न्हावी, कुंभार वगैरे लोकांना त्यांच्या कामाबद्दल शेतसारा न घेतां कसण्यास दिलेली जमीन; इनाम जमीन. –**दार**–*पु.* १. जहागीरदार. २. श्रीमंत; सरदार. [श्रीमंती; जहागीर.

जागीरी*– *स्त्री.* जहागीरदारी;

जागुड–*पु.* केशर.

जाग्रत–*वि.* जागृत; जागणारा; सावध. [मागणारा.

जाचक*–*पु.* याचक; भिकारी;

जाचना*–*क्रि. स.* याचना करणें; भीक मागणें.

जाजरा*–*वि.* जर्जर; जीर्ण; मोडका–तोडका.

जाजरी+–*पु.* पारधी.

जाज़िम– *स्त्री.* [*फा.*] जाजम; गालिचा; सतरंजीवर अंथरण्याची छापील चादर. [भाषा.

जाटू– *स्त्री.* जाट लोकांची

जाठ– *पु.* तेलघाणींतील फिरणारा उंच ओंडका.

जाड़ा– *पु.* १. थंडी; गारठा. २. हिंवाळा; शीतकाल.

जात– *वि.* उत्पन्न; जन्मलेला. *पु.* १. जन्म. २. प्राणी. –**कर्म**– *पु.*; –**क्रिया**– *स्त्री.* मूल जन्मल्यानंतर केला जाणारा एक संस्कार; हिंदूंच्या सोळा संस्कारांपैकीं चौथा. –**रूप**– *वि.* सुंदर. –*पु.* १. शोभा. २. सोनें. ३. चांदी. –*स्त्री.* जाति; जात. –**पाँत**– *स्त्री.* जातपात; आप्तस्वकीय.

ज़ात– *स्त्री.* [*अ.*] १. शरीर; देह. २. जात. ३. स्वरूप; वस्तुतत्त्व.

जातना*– *स्त्री.* १. यातना; कष्ट. २. यम–यातना.

जातसपति*– *पु.* वरुण.

जाति– *स्त्री.* १. जात; जमात. २. जन्म. ३. राष्ट्र. –**मान्**– *वि.* कुलीन. –**शास्त्र**– *पु.* मानवजातिशास्त्र; 'एथ्नॉलॉजी'. –**स्मर**– *वि.* ज्याला आपल्या पूर्वजन्माचें स्मरण आहे असा.

ज़ाती– *वि.* [*अ.*] १. वैयक्तिक; व्यक्तिगत. २. आपला; स्वतःचा; खासगी.

जातीय– *वि.* १. राष्ट्रीय. २. जाती संबंधींचा.

जातीयता– *स्त्री.* १. राष्ट्रीयता. २. आपल्या जातीचा अभिमान.

जातुज– *पु.* डोहाळे.

जातुधान– *पु.* राक्षस; असुर.

जाते*– *अव्य.* ज्यामुळें; ज्यायोगें.

जात्यंध– *वि.* जन्मांध.

जात्रा– *स्त्री.* यात्रा.

जात्री– *पु.* यात्री; यात्रेकरू.

जाथका*– *स्त्री.* ढीग; रास.

जादव*– *पु.* यादव. –**पति**– *पु.* कृष्ण.

जादू– *पु.* [*फा.*] जादू–टोणा; नजरबंदी. –**गर**– *पु.* जादूगार. –**गरी**– *स्त्री.* जादूगिरी. **मु०–चलना**– जादूचा प्रभाव पडणें; प्रभावित होणें. –**वह है जो सिरपर चढ़कर बोले**– विरोधी व्यक्तींनाहि जो मान्य करावा लागेल तोच उपाय उत्कृष्ट होय.

जान– *पु. स्त्री.* १. अनुमान; अंदाज. २. ज्ञान; माहिती.–**कार**– *वि.* १. माहितगार; तज्ज्ञ. २. चतुर; कुशल. –**कारी**– *स्त्री.* माहिती; ज्ञान. –**पना**–*पु.*; –**पनी**– *स्त्री.* चातुर्य; जाणतेपणा; बुद्धिमत्ता. –**पहचान**– *स्त्री.* ओळख; परिचय. –**मनि**–*पु. वि.* ज्ञानी पुरुष; ज्ञानिराज.

जान– *स्त्री.* [*फा.*] १. प्राण; जीव; जीवन. २. बळ; सामर्थ्य. ३. सार; सत्त्व; दम. ४. शोभा; रस. –**जोखिम**; –**जोखों**– *स्त्री.* जीव संकटांत पडणें. –*अव्य.* जीव संकटांत घालून. –**दार**–*वि.* सजीव;

जिवंत. **–निसार–** *वि.* प्राण देणारा; स्वामिभक्त. **–फ़िशानी–** *स्त्री.* जिवापाड परिश्रम. **–बख़्शी–** *स्त्री.* प्राणदान. **–ब–लब–***वि.* मरणोन्मुख. **–बाज–***वि.* प्राणांवर उदार होणारा; शूर–वीर; साहसी.**–लेवा–** *वि.* जीव घेणारा; जानी दुष्मन. **–व माल–** *पु.* प्राण व धन.**–वर** *पु.* प्राणी; पशु.**–(ने) मन–***वि.* हे प्रिये, प्रियकरा. **मु०–आँखों में आ जाना–** आसन्न –मरण होणें. **–आना–** १. शोभा येणें. २. जिवंत होणें. **– का गाहक; –का लागू–** जीव घेणारा; जानी दुष्मन. **–के लाले पड़ना–** जिवावर बेतणें; जगणें कठिण होणें. **–खपाना–** खूप तसदी घेणें; खूप कष्ट करणें. **–खाना–** त्रास देणें; हैराण करणें; डोकें उठविणें. **–छुड़ाना–** सुटका करून घेणें; स्वतःला सोडवून घेणें. **–देना–** १. जीव टाकणें; तळमळणें. २. मरणें. **–निकलना–** भयंकर कष्ट होणें. **–निसार करना–** दुसऱ्यासाठीं बलिदान करणें. **–पर आ बनना–** जीव धोक्यांत येणें. **–पर खेलना–** जीव धोक्यांत घालणें; जिवावर उदार होऊन शौर्य करणें. **–बची लाखों पाये–** शिर सलामत, पगडी पचास. **–में जान आना–** जिवांत जीव येणें. **–लड़ाना–** जिवापाड प्रयत्न करणें. **–सूखना–** भीतीनें बोबडी वळणें; सुन्न होणें. **–से जाना–** मरणें. **–से हाथ धोना–** प्राण घालवून बसणें; मरणें. **–हथेलीपर लेना–** तळहातावर शिर घेणें.

जाननहार*– *वि. पु.* जाणणारा.

जानना– *क्रि. स.* १. जाणणें; समजावून घेणें. २. ओळखणें; माहिती असणें. **मु०– जान पड़ना–** वाटणें; दिसणें. **जान बूझकर–** जाणून बुजून; मुद्दाम. **जाने अनजाने–** कळत न कळत; मुद्दाम किंवा सहजासहजीं.

जानपद– *पु.* १. जन; लोक. २. प्रदेश. –वि. जनपदाशीं संबंधित. **–सैन्य–***पु.* लोकसेना; 'मिलीशिया'.

जानहुँ[+]**–** *अव्य.* जणूं; समजा; गृहीत धरा. [प्रियतमा.

जानाँ– *पु. स्त्री.* [*फा.*] प्रेमपात्र;

जाना– *क्रि. अ.* १. जाणें. २. अलग होणें. ३. नुकसान होणें. ४. हरवणें; गमावणें. ५. गुजरणें; येऊन ठेपणें. ६. नष्ट होणें; मरणें. ७. विश्वास ठेवणें. **मु०– जा धमकना–** अकस्मात् जाऊन ठेपणें. **जाने देना–** सोडून देणें; माफ करणें.

जानि– *स्त्री.* भार्या; पत्नी.

जानिब– *स्त्री.* [*अ.*] दिशा; बाजू. **–दार–***वि.* पक्षपाती; तरफदार. **–दारी–** *स्त्री.* पक्षपात; तरफदारी.

जानी–*वि.* [*फा.*] प्राणांशीं संबंध असणारा. *वि. स्त्री.* प्राणप्रिया; प्रियतमा. **–दुश्मन–पु.** हाडवैरी. **–दोस्त–पु.** जीवश्च कंठश्च मित्र.

जानु– *पु.* गुडघा. *–अव्य.** जणूं. **–पाणि–नि***– *अव्य.* रांगत (हात व गुडघे टेकत चालणें).

ज़ानू–पु. [*फा.*] १. मांडी; जांघ. २. गुडघा. **मु०– दो ज़ानू बैठना–** गुडघे टेकणें. **–तह करना–** अदबीनें गुडघे टेकून बसणें.

जानो[+]**–** *अव्य.* जणूं; जसें.

जाप– *पु.* १. जप. २.* जपमाळ.

जापक– *पु.* जप करणारा.

जापर*– *सर्व.* ज्याच्यावर.

जापा– *पु.* सूतिकागृह; बाळंतिणीची खोली.

जापान– *पु.* जपान (देश).

जापानी– *वि.* जपानशीं संबंधित. –पु. जपानचा रहिवासी. *–स्त्री.* जपानी भाषा.

जाफ़त– *स्त्री.* [*अ.*] मेजवानी.

ज़ाफ़रान– *पु.* [*अ.*] केशर.

ज़ाफ़रानी–*वि.* [*अ.*] केशरी.

जाफ़री–*स्त्री.* [*अ.*] १. कामटयांचा तट्टया. २. झेंडूचें फूल.

जाबर[+]**–***वि.* वृद्ध; म्हातारा.

जाबा–पु. बैल इ०च्या तोंडाला घालण्यांत येणारी जाळी; मुसकें.

ज़ाबिता; ज़ाब्ता–पु. [*अ.*] नियम; कायदा. **– दीवानी** – *पु.*– दिवाणी कायदा. **– फ़ौजदारी–***पु.*– फौजदारी कायदा.

जाबिर–*वि.* [*अ.*] अत्याचारी; जुलुमी. [जांभूळ.

जाम–पु. १. याम; प्रहर. २.

जाम – *पु.* [*फा.*] १. पेला; चषक. २. मद्याचा प्याला. **–(मे) जम;–जमशेद; –जहाँनुमा–***पु.* इराणचा बादशाह जमशेद याच्याजवळ असलेला एक जादूचा पेला. यांत भविष्यांतील व जगांत अन्यत्र घडणाऱ्या घटना दिसत असत.

जामगी – *स्त्री.* [*फा.*] बंदूक किंवा तोफ डागण्याचा पलिता; बंदुकीचा तोडा.

जामदानी– *स्त्री.* [*फा.*] १. बुट्टीदार कापड. २. कपडे ठेवण्याची पेटी. [जांभूळ.

जामन – *पु.* १. विरजण २.

जामा–पु. [*फा.*] कपडा; पोशाख. **मु०– जामे से बाहर होना–**अत्यंत क्रुद्ध होणें.

जामा–*वि.* [*अ.*] १. जमा कर-

णारा. २. सर्व; एकूण. **–मसजिद–** शहरांतील मोठी व मुख्य मशीद.

जामाता–पु. १. जांवई २. पति.

जामिक*–पु. १. पहारेकरी. २. मंत्री.

जामिन–पु.[अ.] दुसऱ्यास जामीन राहाणारा.**–दार**–पु. जामीन राहणारा.

जामिनी– *स्त्री*. रात्र.

जामी– *स्त्री*. १. रक्षक. २. बहीण. ३. मुलगी. ४*. जमीन.**–पु.** पिता.

जामुन–पु. जांभूळ.

जामुनी–*वि*. जांभळचा रंगाचा.

जासें*–*अव्य*. १. ज्यांत २. तर; यासाठीं कीं.

जाय– *स्त्री*. [*फा.*] जागा; स्थान. –*अ.** निरर्थक; व्यर्थ.**–पनाह–** *स्त्री*. आश्रयस्थान.

जायक़ा–पु. [*अ.*] चव; स्वाद.

जायक़ेदार–*वि*. स्वादिष्ट; चवदार; चविष्ट. [कुंडली.

जायचा–पु. [*फा.*] जन्मपत्रिका;

जायज़ – *वि*. [*अ.*] उचित; योग्य; विहित.

जायज़ा–पु. [*अ.*] १. तपासणी; सिंहावलोकन. २. हजेरी.

जायद–*वि*. [*अ.*] १. जास्त; अधिक. २. अतिरिक्त; फालतू; जास्तीचा.

जायदाद–*वि*. [*फा.*] जमीनजुमला; मालमत्ता; संपत्ति.

जायनमाज़– *स्त्री*. [*फा.*] नमाज पढतांना जमिनीवर अंथरावयाची लहानशी सतरंजी.

ज़ायल–*वि*. [*अ.*] नष्ट; लुप्त.

जायांग – पु. 'गायनेसियम'– **आधारिक**–*वि*. 'गायनो बेसिक'. **–दंड**–पु. 'गायनो फोर'.

जाया– *स्त्री*. धर्म-पत्नी.**–***वि*. उत्पन्न केलेला.

ज़ाया–*वि*. [*अ.*] नष्ट; वांया.

जायु–पु. १. औषध. २. वैद्य. –*वि*. जेता; जिंकणारा.

जाये*–**यो**–*वि*. पु.मुलगा; पुत्र.

जार–पु. उपपति; यार.**–कर्म–** पु. व्यभिचार.

ज़ार–पु. [*फा.*] जागा; स्थान. **सब्ज़ाज़ार**–पु. हिरवें–गार मैदान.– *वि*. – अत्यंत अधिक. **मु०–ज़ार रोना** – खूप रडणें. **– व – क़तार–** सतत; निरंतर.

जारक–*वि*. १. क्षय करणारा. २. पाचन वाढविणारा. **– ज़ीवी–** *वि*. 'एरोबिक'. **–श्वसन–पु.** 'एरोबिक रेसपिरेशन'.

जारत– *स्त्री*. पा० 'ज़ियारत'.

ज़ार–पु. [*इं*] रशियाचा बादशाह; झार. **– शाही**– *स्त्री*. रशियाच्या झार बादशहाची राजवट.

जारी–*वि*. [*अ.*] १. प्रवाहयुक्त. २. प्रचलित; चालू.–*पु.** १. रानबोर. २. स्त्रियांचें एक गाणें. –*स्त्री*.* व्यभिचार; जारकर्म.– *वि*. जळालेली, सताविलेली स्त्री.

जारोब– *स्त्री*. [*फा.*] केरसुणी; झाडू.

जाल–पु. १. मासे किंवा पक्षी धरण्याचें जाळें. २. पाश; जाळें. ३. कोळ्याचें जाळें. ४. फसविण्याची युक्ति **– जीवी** – पु. मासे धरणारा कोळी.**–दार**–*वि*.–जाळीदार.

जाल–पु. [*अ.*] १. कपट; फसवेगिरी. २. फसविण्यासाठीं केलेली कागदपत्रांची नक्कल.**–साज** –पु. ठग; फसव्या.**–साज़ी**–*स्त्री*. १. लबाडी; फसवेगिरी. २. खोटे कागद अगर नाणीं बनविणें.

जाला–पु. १. कोळ्याचें जाळें. २. डोळ्यांतील सारा. ३. जाळें. ४. रांजण (पाणी भरून ठेवण्याचा).

जालिक–पु. १. जाळें विणणारा. २. जाळ्यानें पारध करणारा; कोळी; पारधी. ३. जादूगार; माकडाचा खेळ करून दाखविणारा. ४. कोळी (प्राणी).

जालिका*–*स्त्री*. १. समूह. २. जाळी. ३. बायका तोंडावर घालतात ती जाळी. [करणारा; क्रूर.

ज़ालिम–*वि*. [*अ.*] जुलूम

ज़ालिमाना–*वि*. [*अ.*] जुलुमी; अत्याचारपूर्ण.

जालिया–*वि*. कपटी; धोकेबाज; दगाबाज; फसव्या; ठग. –पु. कोळी (जात).

जाली– *स्त्री*. १. जाळी. २. कशीदा. ३. जाळीदार कापड. ४. आंब्यांतील केसर; रेशा.

जाली–*वि*. [*अ.*] बनावटी; खोटा; नकली.

जावक–पु. आळता.

ज़ाविदाँ–*अव्य*. [*फा.*] **सदैव;** हमेशा.–*वि*. सदैव टिकणारा; अविनाशी. [कोना.

ज़ाविया–पु. [*अ.*] कोण;

ज़ावेद–*वि*. [*फा.*] स्थायी; अविनश्वर.

जासु*–सर्व. ज्याचा.

जासूस–पु. [*अ.*] जासूद; हेर; गुप्त पोलिस.

जासूसी– *स्त्री*. हेरगिरी; हेराचें काम.–*वि*. गुप्त पोलिसी; 'डिटेक्टिव्ह.' [ज्याच्याकडून.

जासौं*–सर्व. ज्यामुळें;

जाह–पु. [*अ.*] १. श्रेष्ठ पद; किताब. २. प्रतिष्ठा; गौरव.**–व जलाल; –व हशम**–पु. वैभव; थाट.

जाहक–पु. १. बिछाना; खाट. २. जळू.

जाहि*–सर्व. ज्याला.

जाहिद–*पु.* [*अ.*] उपासक; धर्मनिष्ठ; कर्मठ व्यक्ति; सनातनी.

ज़ाहिर–*वि.* [*अ.*] १. जाहीर; प्रकट. २. माहीत असलेला.–*पु.* बाह्य रूप.–**दार**–*वि.* दिखाऊ; बनावटी.–**दारी**–*स्त्री.* दिखाऊ-पणा; भपका.–**परस्त**–*वि.* बाह्य गोष्टींना महत्त्व देणारा; भौति-कता-पूजक.

ज़ाहिरा–*अव्य.* [*अ.*] १. प्रत्यक्ष; उघड. २. वरवर पाहतां; सकृत्‌दर्शनीं. [दिसणारा; बाह्य.

ज़ाहिरी–*वि.* [*अ.*] वरून

जाहिल–*वि.* [*अ.*] १. मूर्ख; अज्ञानी. २. अशिक्षित.

जाही–*स्त्री.* १. जाईसारखें एक सुगंधी फूल. २. एक प्रकारची आतषबाजी.

ज़िंद–*पु.* [*अ.* '*जिन्न*'] भूत; वेताळ.–*पु.* [*फा.*] पारसी धर्म-ग्रंथ; 'अवेस्ता;' 'झिंदावेस्ता'.

जिंद*–*स्त्री.* जीवन; आयुष्य.

ज़िंदगानी; **ज़िंदगी**–*स्त्री.* [*फा.*] १. आयुष्य; जीवन. २. वय; उमर. [शाळा.

ज़िंदाँ–*पु.* [*फा.*] तुरुंग; बंदि-

ज़िंदा–*वि.* [*फा.*] जिवंत; सजीव; प्रफुल्ल.–**जावेद**–*वि.* अमर.–**दिल**–*वि.*–१. आनंदी; प्रसन्न. २. विनोदी.–**दिली**–*स्त्री.* रसिकता; विनोदी वृत्ति.–**बाद**–*अव्य.* अमर होवो.–**बाश**–*अव्य.* चिरंजीव हो. [खाऊं घालणें.

जिंवाना+–*क्रि. स.* जेवविणें;

जिंस–*स्त्री.* [*अ.*] १. प्रकार; तऱ्हा. २. वस्तु; जिन्नस. ३. सामान; सामग्री. ४. धान्य. ५. लिंग.–**वार**–*पु.* पेरणीचें नोंदणीबुक (यांत तलाठी शेतांतील धान्यांची नावें लिहितो).–*वि.*–जिन्नसवार; क्रमवार.

जिआना*–*क्रि. स.* १. जिवंत करणें; जगविणें; वांचविणें. २. पाळणें.

जिउ*–*पु.* जीव; प्राण.–**लेवा**–*वि.* जीव घेणारा; प्राणघातक; त्रासदायक.

जिउकिया–*पु.* जंगली व डोंगरी वस्तू (कस्तुरी, शिलाजित वगैरे) आणून विकणारा; धनगर.

जिउतिया–*स्त्री.* १. आश्विन वद्य अष्टमीला पुत्रवती स्त्रिया करतात तें व्रत; जीवत्पुत्रिका व्रत; जिवतीचें व्रत. २. या व्रतामध्यें धारण केला जाणारा लाल पिवळचा सुतांचा गंडा.

जिऊ*–*पु.* जीव.

ज़िक्र–*पु.* [*अ.*] १. उल्लेख; चर्चा. २. ईशस्मरण.

जिगर–*पु.* [*फा.*] १. हृदय; काळीज; यकृत्. २. मन; चित्त. ३. हिम्मत.–**ख़राश**–*वि.* अत्यंत दुःखदायक. –**बंद**–*पु.* पुत्र.–**सोज़**–*वि.* हृदय जाळणारा; हृदयद्रावक.

जिगरा–*पु.* [*फा.*] साहस; हिम्मत.

जिगरी–*वि.* [*फा.*] १. घनिष्ठ; जीवश्च कंठश्च. २. अंतःकरणां-तील, हृदयापासूनची (गोष्ट).

जिगीषा–*स्त्री.* १. जय मिळ-विण्याची इच्छा. २. उद्यम; प्रयत्न.

जिगीषु–*वि.* जयाची अभिलाषा बाळगणारा.

ज़िच–*स्त्री.* [*फा.*] १. नाइ-लाज; असाह्यता; पेंचप्रसंग; अडवणूक; 'डेडलॉक.' २. बुद्धि-बळाच्या खेळांतील पेंचप्रसंग.

जिजिया–*स्त्री.* थोरली बहीण; अक्का.

जिज़िया–*पु.* [*अ.*] मुसलमान राज्यकर्ते आपल्या मुस्लिमेतर प्रजे-कडून घेत असलेला कर; जिझिया.

जिजीविषा–*स्त्री.* जगण्याची इच्छा. [बाळगणारा; ज्ञानार्थी.

जिज्ञासु–*वि.* जाणण्याची इच्छा

जिठाई+–*स्त्री.* मोठेपणा.

जिठानी–*स्त्री.* वडील जाऊ.

जिठैरा+–*वि.* लाडका मुलगा.

जित*–*पु.* विजय. –*वि.* जिंक-लेला; पराभूत. –*अव्य.** जिकडे.

जितक+–*वि. अव्य.* जितका; जितक्या प्रमाणांत.

जितना–*वि.* जितका. –*अव्य.* ज्या प्रमाणांत; जितकें.

जितवना*–*क्रि. स.* १. उघड करणें; प्रकट करणें; सांगणें. २. जिंकून देणें.

जितवाना; **जिताना**–*क्रि. स.* जिंकविणें; यशस्वी करणें.

जिते*–*अ.* जितके.

जितै*–*अव्य.* जेथें; जिकडे.

जितो*–*वि.* जितका.

जित्वर; **जित्वा**–*वि.* जिंक-णारा; विजयी.

ज़िद–*स्त्री.* [*अ.*] १. हट्ट; दुराग्रह. २. वैर; शत्रुत्व. –*वि.* उलटा. –*पु.* विपरीत गुणधर्मवाली वस्तु. [करणें.

जिदियाना*–*क्रि. अ.* हट्ट

जिद्दी–*वि.* हट्टी; दुराग्रही.

जिधर–*अव्य.* जिकडे; जेथें. –**तिधर**-*अव्य.* जिकडे-तिकडे; सर्वत्र.

जिन–*सर्व.* ['जिस'चें अनेक०] १. जे. २. ज्यांनीं. ३. ज्यांचा. –*पु.* १. बुद्ध. २. जैन तीर्थंकर. –*वि.* १. रोगद्वेषांवर विजय मिळ-विणारा. २. अत्यंत बृहद्. –**सद्म**–*पु.* १. जैनमंदिर. २. विहार.

जिन–**न्न**–*पु.* [*अ.*] १. भूत. २. भयंकर माणूस; हट्टी व्यक्ति.

मु०– का साया–भूतबाधा होणें. **–चढ़ना; –सवार होना**– १. झपाटलें जाणें. २. रागानें बेभान होणें.

जिनकौ*–*सर्व.* ज्यांचा.

जिना–*पु.* [*अ.*] परस्त्रीगमन; परपुरुषगमन; व्यभिचार. **–कार**–*वि.* व्यभिचारी. **–कारी**– *स्त्री.* व्यभिचार. **–बिज्जब्र; –बिलजब्र**–*पु.* बलात्कार; जबरी संभोग.

जिनि*–*अव्य.* नको; नाहीं; न (निषेधात्मक).

जिनिस– *स्त्री.* पा० ' जिन्स '.

जिन्नात–*पु.* [*अ.* 'जिन'चें अनेक०] भुतें-खेतें.

जिन्स–*स्त्री.* [*अ.*] १. जिन्नस; वस्तु; सामान–सुमान. २. धान्य. ३. लिंग. ४. प्रकार; जाति. ५. अंकगणित. **–वार**–*पु.* पा० ' जिसवार '.

जिन्सी–*वि.* [*अ.*] लैंगिक.

जिन्ह*– *सर्व.* [' जिस'चें अनेक०] जे; ज्यांना; ज्यांचा.

जिबरील–*पु.* [*अ.*] एक देवदूत; जिब्राईल; ' गॅब्रिएल. '

जिबह–*पु.* [*अ.*] गळा कापणें; गळा कापून ठार मारणें. [जिह्वा.

जिब्भा–ब्हा* – *स्त्री.* जीभ;

जिब्रील–*पु.* [*अ.*] १. देवदूत. २. गॅब्रिएल; जिब्राईल.

जिभला–*वि.* खादाड; चटोर; जिव्हालोलुप. [मैथुन.

जिमाअ–*पु.* [*अ.*] स्त्रीसंभोग;

जिमाना–*क्रि. स.* खाऊं घालणें; जेवावयास घालणें. [प्रकारें.

जिमि*–*अव्य.* जसें; ज्या

जिम्मा–*पु.* [*अ.*] १. जिम्मा; हमी; जबाबदारी. २. देखरेख. **–दार; –(म्मे)दार; –वार**–*पु.* जबाबदार; उत्तरदायी. **–(म्मे) दारी; –वारी**– *स्त्री.* जबाबदारी; उत्तरदायित्व.

जिम्मे–*अव्य.* [*अ.*] जबाबदारीवर; अवलंबून. –*पु.* कर्जाची रक्कम.

जिय*–*पु.* जीव; चित्त; मन; हृदय. **–बधा**–*पु.* मांग; खुनी; वध करणारा.

जियन*–*पु.* जीवन.

जियरा*–*पु.* १. हृदय. २. जीव; प्राण.

ज़ियाँ; ज़ियान–*पु.* [*फा.*] १. हानि; नुकसान. २. तोटा. **–कार**–*वि.* हानि, नुकसान करणारा.

ज़ियादत–ती– *स्त्री.* [*अ.*] १. अधिकता. २. जुलूम; जबरदस्ती. ३. फाजीलपणा.

ज़ियादा–*वि.* [*अ.*] १. जादा; जास्तीचें; अधिक. २. फाजील; अतिरिक्त. **–तर**–*वि.* अधिकतर.

जियाना*–*क्रि. स.* १. जगविणें. २. पाळणें; पालन करणें.

ज़ियाफ़त– *स्त्री.* [*अ.*] १. मेजवानी. २. पाहुणचार; आतिथ्य.

ज़ियारत– *स्त्री.* [*अ.*] तीर्थयात्रा; साधुसंतांच्या दर्शनाला जाणें.

जियारती–*वि.* [*अ.*] १. यात्रेकरू. २. दर्शनार्थी.

ज़ियारी*– *स्त्री.* १. जीवन; आयुष्य. २. उपजीविका.

जिरगा–*पु.* [*तु.*] १. गट; टोळी. २. झुंड. ३. जमात. ४. पठाणांची पंचायत.

जिरह– *स्त्री.* [*अ.* ' जर्ह '] १. हुज्जत; तक्रार. २. उलट तपासणी. ३. घाव; जखम.

ज़िरह– *स्त्री.* [*फा.*] कवच; चिलखत. **–पोश**–*वि.* कवचधारी.

ज़िरही–*वि.* [*फा.*] चिलखत घातलेला; कवचधारी.

ज़िराअ(य)त– *स्त्री.* [*अ.*] शेती; शेतकी. **–पेशा**–*वि.* शेतकरी.

जिराफ़ा–*पु.* [*अ.*] जिराफ (पशु).

जिला– *स्त्री.* [*अ.*] चकाकी; पॉलिश. **–कार; –साज़**–*पु.* १. पॉलिश करणारा. २. धार लावणारा. **मु०–देना**–घांसून चकचकीत करणें; पॉलिश करणें.

ज़िला–*पु.* [*अ.*] १. जिल्हा. २. पाश्वभूमि. **–अदालत**– *स्त्री.* जिल्हाधिकाऱ्याची कचेरी; ' कलेक्टर–कचेरी '. **–अफ़सर**–*पु.* जिल्हाधिकारी; ' कलेक्टर '.**–दार; –(ले)दार**–*पु.* जमीनदाराचा खंड वसूल करणारा अधिकारी. **–पालिका**– *स्त्री.* जिल्हाबोर्ड; ' डिस्ट्रक्ट बोर्ड '.

ज़िलाधीश–*पु.* जिल्हाधिकारी; 'कलेक्टर'; 'जिल्हा मॅजिस्ट्रेट'.

जिलाना–*क्रि. स.* १. जिवंत करणें; वांचविणें. २. जीवदान देणें. ३. रक्षण करणें; पालन-पोषण करणें.

जिलाह–हा*–*पु.* [*अ.*] अत्याचारी; जुल्म करणारा.

जिल्द– *स्त्री.* [*अ.*] १. चामडी; त्वचा. २. कातडें. ३. पुष्टिपत्र; पुस्तकाचा पुठ्ठा; बांधणी; ' बाइंडिंग'. ४. पुस्तकाची प्रत; खंड. **–बंद; –साज़**–*पु.* पुस्तकांची बांधणी करणारा; ' बुकबाइंडर'. **–बंदी; –साज़ी**– *स्त्री.* पुस्तकांची बांधणी; ' बुकबाइंडिंग '.

ज़िल्लत– *स्त्री.* [*अ.*] १. अनादर; अपमान. २. दुर्दशा; दुर्गति. **मु०–उठाना या पाना**–लज्जित, अपमानित होणें.

जिवड़ा*–*पु.* हृदय.

जिवाँना[+]–*क्रि. स.* जेवूं घालणें.

जिवाना*–*क्रि. स.* पा०

'जिलाना'. [णारा.-पु. विष्णु.

जिष्णु-*वि.* विजयी; जिंक-

जिस- *सर्व.* 'जो'चें विभक्ति-प्रत्यय लागण्यापूर्वी बनणारें रूप (उदा० जिसको, जिसने).

जिसिम+-*पु.* पा० 'जिस्म'.

जिस्ता-*पु.* १. जस्त. २. दस्ता.

जिस्म-*पु.* [*अ.*] १. शरीर; देह. २. भरीव वस्तु. [शारीरिक.

जिस्मानी; -जिस्मी- *वि.* [*अ.*]

जिह*- *स्त्री.* ज्या; धनुष्याची दोरी. -*सर्व.* जो.

जिहन-*पु.* [*अ.*] बुद्धि; अक्कल. **-दार**-*वि.* समजूतदार; हुशार. **मु०-खुलना**-बुद्धीचा विकास होणें. **-नशीन होना**-लक्षांत येणें; ठसणें. **-लड़ाना**-डोकें चाल-विणें; खूप विचार करणें.

जिहाद-*पु.* [*अ.*] धर्मयुद्ध; मुसलमानांचें काफिरांशीं होणारें युद्ध.

जिहान-*पु.* १. गमन. २ प्राप्ति.

जिहालत- *स्त्री.* पा० 'जहालत'.

जिहासा- *स्त्री.* त्याग करण्याची इच्छा. [जिला.

जिंहि-हि*-*सर्व.* ज्याला;

जिह्म-*वि.* १. वांकडा; बांक-दार. २. कुटिल; दुष्ट. ३. खिन्न.

जिह्वा- *स्त्री.* जीभ.

जींगन*-*पु.* काजवा.

जी-*पु.* १. मन; चित्त; हृदय. २. जीव; प्राण. ३. प्रकृति; तब्येत. ४. शक्ति; धैर्य. ५. निश्चय; संकल्प. -*अव्य.* १. नांवाच्या शेवटीं जोडला जाणारा आदरसूचक शब्द. २. होय; होकारार्थी वापरला जाणारा शब्द **-हुजूरी**- *स्त्री.* खुशामत. **मु० -(किसीपर) आना**-मन जडणें; प्रेम बसणें.**-उचटना; -उड़ जाना**-मन उडणें; मन विटणें. **-करना**-इच्छा होणें.**-का बुख़ार निकालना**-मनांतील राग, घृणा इ० व्यक्त करणें. **--को रोग लगना**-चिंता लागून राहाणें. **-खट्टा होना**-विरक्त होणें; मन उडून जाणें; विटणें. **-खोलकर**-मनमुराद; मनमोकळे-पणानें; यथेष्ट. **-चाहना**-इच्छा होणें. **-चाहे**-१. यथेच्छ. २. इच्छा असेल तर. **-चुराना**-अंगचोरपणा करणें; कामचुकारपणा करणें. **-छोटा करना**-१. निरुत्साही, उदास होणें. २. मन संकुचित करणें. **-छोड़ना**-धीर सोडणें. **-जलना**-अंतःकरणांत अत्यंत दुःख, संताप होणें. **-टँगा रहना अथवा होना**-चिंतित असणें; काळजी लागून राहाणें. **-ठंडा होना**-मन शांत, तृप्त होणें. **-तरसना**-एखाद्या गोष्टीसाठीं मन बेचैन होणें; अत्य-धिक इच्छा होणें.**-धकधक करना**-हृदय धडकणें. **-निढाल होना**-१. मन थकून जाणें. २. उद्विग्न होणें; मन ठिकाणावर नसणें. **--पक जाना**-१. विटणें. २. असह्य होणें. **-पर आ बनना**-जिवावर बेतणें. **-पर खेलना**-जिवावर उदार होणें. **-बैठ जाना**-खिन्न, उदास, निराश होणें. **-भर आना**-हृदय दुःखानें भरून येणें. **-भरकर**-यथेच्छ; मनमुराद. **-भरना**-तृप्त होणें; संतुष्ट होणें. **-भारी होना**- १. उद्विग्न होणें. २. आळसावणें. **-मतलाना**-ओकारी येणें; मळ-मळणें. **-में आना**-१. इच्छा होणें. २. मनांत येणें. **-में बैठना**-हृदया-वर अंकित होणें. **-लगना**-मन लागणें. **-से जाना**-मरून जाणें; जिवानिशीं जाणें.

जी-*वि.* [*अ.*] असणारा; बाळगणारा; धनी. **-फहम**; **-शऊर**- *वि.* समंजस; हुशार; बुद्धिवान्.

जीअ-उ*-*पु.* जीव; प्राण.

जीअन*-*पु.* जीवन.

ज़ीक़ाद-*पु.* [*अ.*] हिजरी सनाचा अकरावा महिना.

जीग़ा-*पु.* [*फा.*] शिरपेच; तुरा; कलगी.

जीजा-*पु.* मेहुणा (वडील बहिणीचा नवरा). [अक्का.

जीजी- *स्त्री.* वडील बहीण;

ज़ीट- *स्त्री.* मिजास; शेखी; फुशारकी.

जीत- *स्त्री.* १. जय. २. फायदा.

जीतना-*क्रि. स.* जिंकणें; विजय मिळविणें.

जीता-*वि.* १. जिवंत. २. जिंक-लेला. ३. वजनांत किंवा मापांत किंचित् अधिक. **-जागता**-*वि.* सतेज; सशक्त; प्रत्यक्ष. **-लहू**-*पु.* ताजें रक्त. **-लोहा**-*पु.* लोहचुंबक. **मु०-जीती मक्खी निगलना**-जाणून-बुजून एखादी वाईट गोष्ट करणें. **जीते जी**-जिवांत जीव असेपर्यंत; जन्मभर. **-मर जाना**-जिवंत असून मरणें; निरानंद, निरुत्साही होणें. **जीते मरते**-कसेंबसें; मोठ्या मुष्किलीनें. **जीते रहो**-जिवंत राहा; चिरंजीव भव (आशीर्वाद).

जीन*-*वि.* १. वृद्ध. २. जुना.

ज़ीन-*पु.* [*फा.*] खोगीर; पलाण. **-पोश**-*पु.* खोगिरावर घालण्याचें कापड. **-सवारी**- *स्त्री.* खोगीर घालून घोड्यावर बसणें.

ज़ीनत- *स्त्री.* [*फा.*] शोभा; सजावट; शृंगार. **-महल**-*वि.* महालाची शोभा. **मु०-बख़शना**-शोभा आणणें; शोभा वाढविणें.

जीना-*क्रि. अ.* १. जगणें; जिवंत राहाणें. २. आनंदी, प्रसन्न

होणें. **मु० जी उठना**–१. जिवंत होणें. २. हिरवेंगार होणें.

ज़ीना–पु. [*फा.*] १. जिना; शिडी. २. पायरी.

जीभ– *स्त्री*. १. जीभ. २. जीभ. (बुनकणीला असलेला चामडयाचा तुकडा). ३. लेखणीचें टोंक. **मु०–** **–चलना**–नानाप्रकारचे स्वाद घेण्याची इच्छा होणें. **–हिलाना–** बोलणें; तोंड उघडणें.

जीभा[+]**–पु.** १. जिभेसारखी एखादी वस्तु. २. गुरांच्या जिभेचा एक रोग. ३. बैलांच्या डोळयाचा एक रोग.

जीभी– *स्त्री*. १. जीभ घासण्याचें एक साधन; 'टंगक्लीनर'. २. पडजीभ.

जीमना–*क्रि. स.* जेवणें.

जीय*–पु. जीव.

जीयति*– *स्त्री*. जीवन; आयुष्य.

जीर–पु. १. फुलाचा केसर. २. जिरें. ३*. कवच.–*वि.** जीर्ण; जर्जर.

जीरण–***न**–*वि*. जीर्ण.

जीरना*–*क्रि. अ.* १. जीर्ण होणें. २. कोमजणें. ३. फाटणें. ४. नष्ट होणें.

ज़ीरा–पु. [*फा.*] १. जिरें. २. फुलाचा केसर.

जील– *स्त्री*. १. मंद स्वर; हलका आवाज. २. डग्गा.

जीला*–*वि*. पातळ; झिरझिरीत; बारीक.

जीव–पु. १. प्राण. २. प्राणी. ३. जीवन. **–जगत्**–पु. प्राणिसृष्टि. **–द्रव्य**–पु. जीवनरस; 'प्रोटोप्लाझम्'. **–विज्ञान**–पु. प्राणिशास्त्र; 'झूलॉजी'. [बहादुरी.

जीवट–पु. धाडस; हिंमत;

जीवन–पु. १. जगणें; जीवन. २. आयुष्य. ३. पाणी. ४. प्राणी. **–क्रम**–पु. राहाणी; जीवनयात्रा. **–चरित–त्र**–पु. चरित्र; जीवनवृत्तांत. **–चर्या**– *स्त्री*. राहाण्याची पद्धत. **–तत्त्व**–पु. जीवनसत्त्व; 'व्हिटॅमिन'. **–यापन**–पु. आयुष्य घालविणें; निर्वाह करणें. **–यापन-व्यय**–पु. राहाणीचा खर्च; 'कॉस्ट ऑफ लिव्हिंग'. **–रक्षक नौका–** *स्त्री*. प्राणरक्षक होडी; 'लाइफ बोट'. **–रक्षक पेटी**– *स्त्री*. प्राणरक्षक पट्टा; 'लाइफ बेल्ट'. **–स्तर**–पु. जीवनमान; 'स्टँडर्ड ऑफ लिव्हिंग'. [जीवन कंठणारा.

जीवनी– *स्त्री*. चरित्र. *–वि.*–

जीवन्मृत–*वि*. १. जिवंत असून मेल्यासारखा राहाणारा; निवृत्त. २. दुःखी; अपेशी.

जीवरा*–पु. जीव; प्राण.

जीवरि*– *स्त्री*. जीवन धारण करण्याची शक्ति. [असलेली स्त्री.

जीवसू*–*वि. स्त्री*. संतति जिवंत

जीवा–पु. ज्या; चापकर्ण; 'कॉर्ड'. [प्राणिमात्र.

जीवा-जून*–पु. जीवजंतु;

जीवाणु–पु. सूक्ष्म जंतु; 'बेसिलस,' 'बॅक्टीरिया'. **–नाशक–** *वि*. जंतुघ्न; 'अँटी बायोटिक'. **–विज्ञान**–पु.सूक्ष्म जंतुशास्त्र; 'बॅक्टीरिऑलॉजी'. **–विद्**–पु. सूक्ष्मजंतुशास्त्रवेत्ता; 'बॅक्टीरिऑलॉजिस्ट'.

जीवावशेष–पु. वनस्पतिपाषाण; प्राणिपाषाण; 'फॉसिल'.

जीविका– *स्त्री*. पोटापाण्याचा उद्योग; उदर भरणाचें, पोषणाचें साधन; वृत्ति. [जीवधारी.

जीवी–*वि*. जगणारा. –पु.

ज़ीस्त– *स्त्री*. [*फा.*] जीवन; अस्तित्व.

जीह–हा–हि–ही*– *स्त्री*. जीभ.

जुंबिश– *स्त्री*. [*फा.*] गति; हालचाल.

जु*–*सर्व* : जो. *–अव्य*. १. जर; जरी. २. आदरार्थी शब्द; जी.

जुआँ–पु. *स्त्री*. लीख; ऊं.

जुआ–पु. १. जूं; जोखड. २. जात्याचा खुंटा. ३. जुगार; द्यूत. **–ख़ाना**–पु. जुगाराचा अड्डा. **–चोर**–पु. जिंकल्यानंतर पळून जाणारा जुगारी. २ ठग; फसव्या. **–चोरी**– *स्त्री*. फसवेगिरी.

जुआड़ी–पु. जुगार खेळणारा; जुगारी.

जुआर– *स्त्री*. १. ज्वारी. २. भरती (समुद्राची). –पु.* जुगारी.

जुआरी–पु. जुगारी.

ज़ुकाम–पु. [*अ.*] पडसें; सर्दी.

जुग*–पु. १. युग. २. जोडी; युग्म. ३. पिढी. **मु०–जुग जियो**– दीर्घायुषी हो. (आशीर्वाद). **–टूटना**; **–फूटना**–१. सोंगटयांची जोडी फुटणें. २. ऐक्य न राहाणें; फूट पडणें.

जुगजुगाना–*क्रि. अ.* १. लुकलकणें. २. उन्नति होणें; वर येणें.

जुग(गु)त– *स्त्री*. १. उपाय; युक्ति. २. व्यवहारचातुर्य; हातचलाखी. [चतुर.

जुगती–*वि*. डोकेंबाज; हुशार;

जुगनी– *स्त्री*. १. काजवा. २*. हारांतील रत्न.

जुगनू–पु. १. काजवा. २. गळयांत एक दागिना.

जुगराफ़िया–पु. [*अ.*] भूगोल.

जुगल–पु. जोडी; जोडा; युगल.

जुगवना–*क्रि. स.* १. एकत्र करणें; साठविणें. २. काळजीपूर्वक ठेवणें.

जुगादरी[+]–*वि.* अत्यंत प्राचीन; जुनाट. [वना.'

जुगाना[+]–*क्रि. स.* पा० ' जुग-

जुगालना–*क्रि. अ.* रवंथ करणें.

जुगाली–*स्त्री.* १रवंथ.२. चर्वित-चर्वण.

जुगुत-ति*–*स्त्री.* उपाय; युक्ति.

जुगुप्सा–*स्त्री.* घृणा; किळस; बीभत्स रसाचा स्थायीभाव.[दिल्ली.

जुग्गिनी*–*स्त्री.* योगिनीपुरी;

जुज़–*पु.* [*अ.*] १. फरमा; 'फॉर्म' (छपाई) .२.भाग; हिस्सा. –*अव्य.* शिवाय; अतिरिक्त; विना.–**दान** –*पु.* शाळकरी मुलांचें दप्तर; पुस्तकांची पिशवी.–**बंदी**–*स्त्री.* पुस्तकाच्या फरम्यांची बांधणी, शिवण.

जुज़वी–*वि.* [*अ.*] थोडा; किंचित्; कांहींसा; आंशिक; जुजबी.

जुज्झ*–*पु.* लढाई; युद्ध.

जुझवाना–*क्रि. स.* युद्ध करण्यास उत्तेजन देणें; लढविणें.

जुझाऊ–*वि.* युद्धविषयक; लढाईचा.[प्रेरित करणें, प्रोत्साहन देणें.

जुझाना–*क्रि. स.* लढण्यास

जुझार–*वि.* लडाऊ; वीर; झुंजार.–*पु.* युद्ध. [२. गट; टोळी.

जुट–*स्त्री.* १. जोडी; युग्म.

जुटना–*क्रि. अ.* १. सांधलें जाणें; संयुक्त होणें; संबद्ध होणें. २. गुंतणें; गुंडाळलें जाणें. ३. संघटित होणें. ४. कामाला लागणें. ५. संभोग करणें. [असलेला.

जुटली–*वि.* केसाच्या लांब जटा

जुटाना–*क्रि. स.* १. सांधणें; जोडणें. २.एकत्र करणें; जमविणें; संघटन करणें.

जुट्टी–*स्त्री.* १. लहान पेंढी; जुडी (गवत वगैरेची). २. सुरणाचा कोंब.

जुठार(ल)ना–*क्रि. स.* अर्धवट खाऊन टाकणें; उष्टें करणें.

जुठिहारा–*पु.* उष्टें, खरकटें खाणारा.

जुड़ना–*क्रि. अ.* १. जुटणें; संयुक्त होणें. २. संबद्ध होणें. ३. संभोग करणें. ४. एकत्रित होणें; संघटित होणें. ५. प्राप्त होणें.

जुड़नार–*पु.* पक्के जोड; ' फिक्स्चर फिटिंग्ज. '

जुड़पित्ती–*स्त्री.* १. अंगाला पित्तामुळें खाज सुटून गांधी उठण्याचा आजार. २. नायटा; त्वचेचा एक रोग.

जुड़वाँ–*वि.* जुळें.–*पु.* जुळीं मुलें.

जुड़वाना[+]–*क्रि. स.* १. तृप्त करणें. २. थंड करणें. ३. जोडविणें.

जुड़ाई–*स्त्री.* गवंडीकाम किंवा त्याची मजुरी.

जुड़ाना–*क्रि. अ.* १. थंड होणें; गार होणें. २. संतुष्ट होणें; प्रसन्न होणें.–*क्रि. स.*–१. गार करणें. २. संतुष्ट करणें.

जुतना–*क्रि. अ.* १. जुंपलें जाणें (गाडी, नांगर). २. कामास जुंपणें किंवा लागणें.

जुतवाना–*क्रि. स.* दुसऱ्याकडून जुंपून घेणें; जुंपण्याचें काम करविणें.

जुताई–*स्त्री.* १. जुंपणी; नांगरण्याचें काम; मळणी. २. जुंपण्याची मजुरी.

जुताना–*क्रि. स.* १. जमीन नांगरून घेणें. २. जोखड ठेवणें. ३. जुंपून घेणें.

जुतिऔ(यौ)अ(व)ल–*स्त्री.* जोडाजोडी; मारामारी (जोड्यांनीं केलेली).

जुतियाना–*क्रि. स.* १.जोड्यानें मारणें. २. अपमान करणें.

जुत्थ*–*पु.* झुंड; समूह; जथा.

जुदा–*वि.* [*फा.*] वेगळें; पृथक्; अलग.–**ई**–*स्त्री.* वियोग; विरह.–**गाना**–*अव्य.* वेगवेगळें; विभक्तपणें.

जुद्ध*–*पु.* युद्ध.

जुनून–*पु.* [*फा.*] उन्माद; वेड.

जुनूब–*पु.* [*अ.*] दक्षिण (दिशा). [जानवें.

जुन्नार–*पु.* [*अ.*] यज्ञोपवीत;

जुन्हरी[+]–*स्त्री.* ज्वारी; जोंधळा.

जुन्हाई–*स्त्री.* चांदणें.

जुन्हैया*–*स्त्री.* चांदणें.–*पु.* चंद्र.

जुपना[+]–*क्रि. अ.* विझणें (दिवा).

जुपै*–*अव्य.* जर.

जुफ़्त–*पु.* [*फा.*] १. जोडी; युग्म. २. समसंख्या.

जुबराज*–*पु.* युवराज.

जुबान–*स्त्री.* [*फा.*] पा० 'ज़बान'. [तोंडी. पा०'ज़बानी'.

जुबानी–*वि.* [*फा.*] मौखिक;

जुमला–*पु.* [*अ.*] १. पूर्ण वाक्य. २. एकूण बेरीज. –*वि.*–एकूण. **फ़िलजुमला**–*अव्य.* तात्पर्य हें कीं. [जनता; लोक.

जुमहूर–*पु.* [*अ.*] जनसमुदाय;

जुमहूरी–*वि.* [*अ.*] लोकसत्ताक. –**सल्तनत**–*स्त्री.* लोकशाही.

जुमा–*पु.* [*अ.*] शुक्रवार. –**मस्जिद**–*स्त्री.* शुक्रवारीं दुपारीं जेथें सामुदायिक नमाज पढला जातो ती मशीद. [गुरुवार.

जुमेरात–*स्त्री.* [*अ.* + *हिं.*]

जुम्बिश–*स्त्री.* [*फा.*] १. गति; हालचाल. २. कंप.

जुम्मा–*पु.* पा० 'जुमा'.

जुर*––ज्वर; ताप. –**झरी***–*स्त्री.* १. कणकण; ताप येण्यापूर्वीची कसकस; कसर. २. थंडी.

जुरअत– *स्त्री.* [*अ.*] १. साहस; बहादुरी; हिंमत. २. धृष्टता.

जुरना*–*क्रि. अ.* १. जोडलें जाणें; संयुक्त होणें. २. भिडणें; टक्कर होणें.

जुरमाना–*पु.* [*फा.*] दंडाची शिक्षा; दंड. [२. मृत्यु.

जुरा*– *स्त्री.* १. म्हातारपण.

जुराना*–*क्रि. अ.* थंड, तृप्त होणें. –*क्रि. स.* एकत्र करणें.

जुराफ़ा–*पु.* [*अ.*] जिराफ.

जुर्म–*पु.* [*अ.*] गुन्हा; अपराध. **–ख़फ़ीफ़**– *पु.* लहान, सामान्य गुन्हा. **–शदीद**–*पु.* मोठा, भयंकर अपराध. [शिक्षा; दंड.

जुर्माना–*पु.* [*फा.*] दंडाची

जुर्रत– *स्त्री.* पा० 'जुरअत'.

जुर्रा–*पु.* [*फा.*] ससाणा (नर).

जुर्राब– *स्त्री.* [*तु.*] पायमोजा.

जुल–*पु.* कपट; फसवणूक; झुकांडी; **–बाज़**–*वि.* फसव्या; कपटी; धूर्त.

जुलना–*क्रि. अ.* जुळणें; भेटणें (फक्त 'मिलना' या क्रियापदासह वापरलें जातें.)

जुलाई+–*वि.* हीन; तुच्छ.

जुलाई– *स्त्री.* [*इं*] जुलै महिना.

जुला(ल्ला)ब–*पु.* [*अ.*] रेचक; जुलाब. [(पाणी).

जुलाल–*वि.* [*अ.*] शुद्ध, स्वच्छ

जुलाहा–*पु.* [*फा.*] विणकर; कोष्टी; साळी.

जुलूस–*पु.* [*अ.*] १. मिरवणूक; स्वारी. २. राज्यारोहण.

जुल्फ़– *स्त्री.* [*फा.*] डोक्याचे लांबसडक केस (पाठीवर रुळणारे); केसाची बट; झुलूप.

ज़ुल्म–*पु.* [*अ.*] जुलूम; अत्याचार; अन्याय. **–रसीदा**–*वि.* अत्याचारपीडित. **मु०–ढाना**– अत्याचार करणें. [अंधार.

ज़ुल्मत– *स्त्री.* [*अ.*] काळोख;

ज़ुल्मात– *स्त्री.* [*अ.* जुल्मत'चें अनेक०] १. अंधार. २. जेथें अमृत असतें अशी अंधारी जागा. **बह्रे ज़ुल्मात–पु.** अटलांटिक महासागर.

जुल्लाब–*पु.* जुलाब; रेचक.

जुवराज*–*पु.* युवराज.

जुवाँ+– *स्त्री.* ऊं.

जुवा–*पु.* पा० 'जुआ'.

जुवार– *स्त्री.*; **जुवारी**–*पु.* पा० 'जुआर'; 'जुआरी'.

जुसाँदा+–*पु.* काढा.

जुस्तजू– *स्त्री.* [*फा.*] शोध; तपास; हुडकून काढण्याची धडपड.

जुहाना*–*क्रि. स.* १. एकत्र करणें; सांठविणें. २. जोडणें. –*क्रि. अ.* जमा होणें. [रामराम.

जुहार– *स्त्री.* जोहार (नमन);

जुहारना– *क्रि. स.* १. अभिवादन, नमस्कार करणें. २. मदतीची याचना करणें. [झाड.

जुही– *स्त्री.* जुईचें फूल अथवा

ज़ुहूर–*पु.* [*अ.*] प्रकट होणें; अभिव्यक्ति.

जूँ– *स्त्री.* ऊं. **मु०– कानों पर जूँ न रेंगना**–डोकें ताळचावर न येणें; शुद्धीवर नसणें; पर्वा नसणें.

जूँ–*अव्य.* पा० 'जों'.

जूँठन–*पु.* पा० 'जूठन'. [पदार्थ.

जूँठा–*वि.* उष्टा.–*पु.* उष्टा

जूँमुँहा+–*वि.* छद्मी; बनेल; कावेबाज.

जू*–*अव्य.* ब्रज, बुंदेलखंड आणि राजस्थान या प्रदेशांत वापरला जाणारा आदरार्थी शब्द; जी.

जूआ–*पु.* १. जूं (बैलाच्या मानेवरील); जोखड. २. जात्याचा खुंटा. ३. जुगार. **–ख़ाना**–जुगार खेळण्याची जागा; जुगाराचा अड्डा. **–बाज़**– जुगारी.

जूजू–*पु.* बागुलबोवा; भोकाडी.

जूझ*– *स्त्री. पु.* लढाई; युद्ध.

जूझना*–*क्रि.अ.* १. लढणें; झुंजणें. २. लढून मरणें.

जूट–*पु.* १. केसांची बट; अंबाडा. २. ताग; तरट.

जूटना*–*क्रि.स.* जोडणें; एकत्र करणें. –*क्रि.अ.* १. जोडलें जाणें; अडकणें. २. कामास सुरुवात करणें.

जूठन– *स्त्री.* उष्टें; खरकटें.

जूठा–*वि.* उष्टा; उच्छिष्ट; खरकटा.–*पु.* उष्टें; खरकटें. **मु०– (ठे) हाथसे कुत्ता न मारना**– अत्यंत कंजूष असणें; दुसऱ्याच्या उपयोगीं न पडणें.

जूड़*–*वि.* १. थंडगार. २. प्रसन्न.

जूड़ा–*पु.* १. अंबाडा; बुचडा. २. शेंडीची गांठ. ३. चुंबळ.

जूड़ी– *स्त्री.* थंडीताप; हिंवताप.

जूता–*पु.* जोडा; पादत्राण. **–ख़ोर**– *स्त्री.* निर्लज्ज; बेशरम. **मु०–उठाना**– १. खुशामत करणें. २. जोडा मारण्यास तयार होणें. **–गाँठना**– १. जोडे दुरुस्त करणें. २. हलकी सेवा करणें. **–चलना**– जोडयांची मारामारी होणें. **–चाटना**–खुशामत करणें. **–(तों) दाल बँटना**–आपसांत मारामारी होणें.– **(तों)से बात करना**–जोडे मारणें.

जूती– *स्त्री.* बायकांचा जोडा; चप्पल. **–पैज़ार**– *स्त्री.* १. जोडाजोडी (जोडयानें केलेली मारामारी). २. भांडण. **मु०– जूतियाँ चटखाते फिरना**–रिकामटेकडें भटकणें; उंडगेपणा करणें. **जूतियाँ बगल में दबाना**–हळूंच सटकणें.

जूथ*–*पु.* झुंड; समूह. [जुई.

जूथ (थि) का– *स्त्री.* यूथिका;

जूद–*वि.* [*फा.*] द्रुत; वेगवान्. –*अव्य.* झटकन्.–**फ़हम**–*वि.* ज्याला चटकन् एखादी गोष्ट समजते असा; तीक्ष्णबुद्धि. [२. गवत.

जून–*पु.* १. समय; काळ; वेळ.

जूना–*पु.* १. गवतापासून तयार केलेला दोरखंड. २. मांडी घांसण्यासाठीं वापरावयाची नारळाची शेंडी; काथ्या.

जूप–*पु.* द्यूत; जुगार.

जूपी*–*पु.* बलिपशु; यूपाला बांधलेला पशु. [जमणें.

जूमना*–*क्रि.अ.* एकत्र होणें;

जूर*–*पु.* संचय; ढीग.

जूरना*–*क्रि.स.* १. जोडणें. २. जमा करणें. –*क्रि.अ.* गोळा होणें.

जूरा*–*पु.* पा० 'जूडा'.

जूरी–*स्त्री.* पेंढी. [पंच.

जूरी–*पु.* [*इं.*] न्यायालयांतील

जूस–*पु.* १. वरणाचें पाणी (पेजेप्रमाणें रोग्यास पाजतात); रस्सा. २. समसंख्या.–**ताक**–*पु.* १. मुलांचा एक खेळ. २. जुगाराचा एक प्रकार.

जूसी–*स्त्री.* उंसाचा रस आटवितांना निघणारी मळी.

जूह*–*पु.* झुंड; समूह.

जूही–*स्त्री.* १. जुई (झाड व फूल). २. वाटाणा इ. वर पडणारी कीड.

जृंभ–*पु.* जांभई; आळस.

जेंगरा[+]–*पु.* दैंठ.

जेंद–*पु.* [*फा.*] पारशी लोकांचा धर्मग्रंथ; अवेस्ता.

जेंवन–*पु.* जेवण; भोजन.

जेंवना–*क्रि.स.* जेवणें; खाणें. –*पु.* जेवण. [जेवणावळ.

जेंवनार–*स्त्री.* जेवणाची पंगत;

जेंवरि–री–*स्त्री.* दोरखंड.

जे; जेइ–उ–ऊ*–*सर्व.* जो; जी; जें.

जेटी–*स्त्री.* [*इं.*] धक्का; बंदर.

जेठ–*पु.* १. ज्येष्ठ महिना. २. वडील दीर. –*वि.*–थोरला; वयानें मोठा.

जेठा–*वि.* वडील; मोठा. [पणा.

जेठाई–*स्त्री.* वडीलकी; मोठे-

जेठानी–*स्त्री.* थोरली जाऊ.

जेठी–*वि.* ज्येष्ठांत होणारा; ज्येष्ठासंबंधींचा.

जेठीमधु–*पु.* ज्येष्ठमध.

जेठुआ[+]–*वि.* ज्येष्ठ मासासंबंधींचा. [मुलगा.

जेठौत–ता–*पु.* वडील दिराचा

जेत(ति)क*–*वि.* *अव्य.* जितकें; जेवढें; ज्या प्रकारें.

जेता–ते–तो*–*वि.* जितका. –*अव्य.*–ज्या प्रकारें

जेता–*वि.* जिंकणारा; विजयी.

जेब–*पु. स्त्री.* [*अ.*] खिसा. –**कट; –कतरा**–*पु.* खिसेकापू. –**खर्च**–*पु.* किरकोळ खर्चाकरितां मिळालेले पैसे; 'पॉकेट-मनी'. –**घड़ी**–*स्त्री.* खिशांतील घड्याळ.

ज़ेब–*स्त्री.* [*फा.*] शोभा; सुंदरता. –**दार**–*वि.* सुंदर; शोभणारा. **मु०–देना**–शोभणें.

ज़ेबरा–*पु.* [*इं.*] झेब्रा (पशु).

ज़ेबा–*वि.* शोभणारा; सुंदर.

ज़ेबाइश; ज़ेबाई–*स्त्री.* [*फा.*] शोभा; सजावट. [अगदीं लहान.

जेबी–*वि.* [*फा.*] खिशांत ठेवण्याजोगा;

जेर–*स्त्री.* १. वार; जार (गर्भाभोंवतालचें वेष्टण). २. गर्भाशय.

ज़ेर–*अव्य.* [*फा.*] खालीं. –*पु.* अरबी-फारसी लिपींतील इकारदर्शक चिह्न. –**अंदाज़**–*पु.* हुक्का ठेवावयाचें कापड. –**जामा**–*पु.* घोड्याच्या पाठीवरील खोगीराखालचें कापड. –**तजवीज़**–*वि.* विचाराधीन; अनिर्णीत. –**दस्त**–*वि.* १. अंतर्गत; अधीन. २. पराजित. –**पेच**–*पु.* पगडीच्या आंतील लहान पगडी. –**बंद**–*पु.* घोड्याच्या पुढल्या पायांतून घेऊन तंगांतून काढून वर म्होरकीच्या कडीस बांधावयाचा चामडी पट्टा. –**बार**–*वि.* खर्चाच्या किंवा कर्जाच्या ओझ्याखालीं दबलेला; त्रस्त; हैराण.–**व ज़बर**–*पु.* कालपरिवर्तन. –*अव्य.* वरखालीं. –*वि.* उलटसुलट; अस्ताव्यस्त. –**साया**–*अव्य.* आश्रयाखालीं. –**हिरासत**–*वि.* गिरफ्दार केलेला; पकडलेला. –**हुकूमत**–*वि.* अधीन; शासनाधीन. –**(रे)ख़ाक**–*अव्य.* थडग्यांत. –*वि.* थडग्यांतील. **मु०–करना**–१. पराभूत करणें. २. हैराण करणें.

जेरना*–*क्रि. स.* त्रास देणें; हैराण करणें.

जेल–*पु.* [*इं.*] तुरुंग; कारागृह. –**ख़ाना**–*पु.* तुरुंग; कारागार. **मु० –काटना**–तुरुंगाची शिक्षा भोगणें.

जेवनार–*स्त्री.* १. पंगत; जेवणावळ. २. भोजन; मेजवानी.

ज़ेवर–*पु.* [*फा.*] दागिना; आभूषण.

जेवरा[+]–*पु.* १. दोरी. २. कापणी संपल्यावर न्हावी, चांभार इ. कांना दिलें जाणारें धान्य; बलुतें.

जेवरी*–*स्त्री.* दोरी.

ज़ेह–*स्त्री.* [*फा.*] १. धनुष्याची दोरी. २. भिंतीच्या तळांतील जाड गिलावा. –*अव्य.* शाबास !

जेहड़[+]–*स्त्री.* एकावर एक रचून ठेवलेल्या घागरी; उतरंड.

ज़ेहन–*पु.* [*अ.*] धारणाशक्ति;

बुद्धि. **मु०–खुलना**–बुद्धि तीक्ष्ण होणें. **–नशीन होना**–लक्षांत येणें; पाठ होणें. **–लड़ाना**–खूप विचार करणें. [तोरडचा; नूपुर.

जेहर–*पु.*; **जेहरि–री**– *स्त्री.*

जेहल+– *स्त्री.* १. जेल; तुरुंग. २. हट्ट. **–खाना**–*पु.* तुरुंग; कारागृह.

जेहि*– *सर्व.* ज्याला.

जैं*–*अव्य.* नको; नाहीं; न (नकारार्थक). [जितके.

जै*– *स्त्री.* जय; विजय. *–वि.*+

जैतून–*पु.* [*अ.*] ऑलिव्ह (झाड व फळ). [यायी; जैन.

जैनी–*पु.* जैन धर्माचा अनु-

जैनु*–*पु.* जेवण; आहार.

जैयद–*वि.* [*अ.*] १. अत्यंत मोठा; श्रेष्ठ. २. बळकट. ३. सुपीक. ४. उत्तम.

जैल–*पु.* [*अ.*]१. खालचा भाग. २. प्रदेश; इलाखा. *–अव्य.* खाली. **–दार**–*पु.* महालकरी; तहसील-दार; मामलेदार.

जैव–*वि.* जीवांसंबंधींचा; प्राण्यांसंबंधींचा.

जैस*–*वि.* जसा.

जैसा–*वि.* १. जसा; ज्या प्रकारचा. २. जितका; जेवढ्या प्रमाणांत. *–अव्य.*–जसें; ज्या प्रकारें. **मु०– (से) को तैसा**– जशास तसें. [**–जैसे**-*अव्य.* जसजसें.

जैसे–*अव्य.* ज्या प्रकारें; जसें.

जों–*अव्य.* जसें; ज्या प्रकारें. **–तों**– *अव्य.* जों जों; तों तों.

जोंक– *स्त्री.* जळू.

जोंकी– *स्त्री.* १. पाण्याबरोबर जळू पोटात गेल्यामुळें जनावरांच्या पोटांत होणारी आग. २. जळू.

जोंधरी– *स्त्री.* १. जोंधळा; ज्वारी. २. बाजरी (कांहीं ठिकाणीं). ३. बारीक दाण्यांचा मक्का.

जो– *सर्व.* जो. *–अव्य.* यदि; जर. **–पै***– *अव्य.* जर; जरी.

जोअना*– *क्रि. स.* १. वाट पाहाणें. २ पाहाणें; शोधणें; हुड-कून काढणें; अवलोकन करणें.

जोइ*– स्त्री. पत्नी; भार्या. *–सर्व.* संबंधवाचक जो. *–अव्य.* पाहून; विचार करून. [कोणीहि.

जोउ–ऊ*– *सर्व.* जो कोणी;

जोख– *स्त्री.* वजन.

जोखता–* *स्त्री.* योषिता; स्त्री.

जोखना–*क्रि. स.* १. जोखणें; तोलणें; वजन करणें. २. तपासणें.

जोखम– *स्त्री.* पा० ' जोखिम '.

जोखा–*पु.* हिशेब. [योषिता.

जोखिता*– *स्त्री.* स्त्री;

जोखिम– *स्त्री.* १. अरिष्ट; आपत्ति. २. जोखीम; धोका. **मु०– उठाना; –लेना**–धोका पत्करणें.

जोखुआ– वा+– *पु.* वजन करणारा.

जोखों–खौं– *स्त्री.* जोखिम; धोका. *–अव्य.* धोक्यांत घालून.

जोग–*पु.* १. योग; शुभ काळ. २. चित्तवृतींचा निरोध. *–अव्य.* ला; च्या जवळ. *–वि.* उपयोगी; योग्य; समर्थ; **–जुगुति**– *स्त्री.* १. योग-क्रिया २. युक्ति. [ढोंगी.

जोगड़ा–*पु.* गोसावडा; पाखंडी;

जोगता*– *स्त्री.* योग्यता.

जोगन–*स्त्री.* योगीण; जोगीण; योगिनी.

जोगवना–*क्रि. स.* १. जतन करणें; राखणें. २. संचय करणें. ३. दुर्लक्ष करणें. ४. आदर करणें.

जोगानल–*पु.* योगशक्तीनें उत्पन्न झालेला अग्नि.

जोगिंद; जोगिंदर*–*पु.* योगि-श्रेष्ठ; योगींद्र.

जोगिन– *स्त्री.* १. योगिनी; जोगीण. २. योग्याची पत्नी.

जोगिया–*पु.* १. योगी. २. एक राग (संगीत).

जोगी–*पु.* योगी; गोसावी.

जोगीड़ा– *पु.* १. योगी. २. वसंत ऋतूंत गायिलें जाणारें एक प्रकारचें गाणें. ३. हें गाणें गाणारे लोक.

जोगोटा*–*वि.* योगी.

जोग्य*–*वि.* योग्य.

जोट*–*पु.* १. जोडी; युग्म. २. साथी; जोडीदार.*–वि.*– बरो-बरीचा; समान. [जोडा.

जोटा*– *पु.* जोडी; युग्म;

जोटिंग–*पु.* १. महादेव. २. उग्र तप करणारा.

जोड़–*पु.* १. जोड; गांठ. २. बेरीज. ३. ठिगळ. ४. जोडीदार; बरोबरीचा. ५. बरोबरी; समा-नता. ६. मेळ; मिलाफ. ७. सांधा. ८. बंधन. **–तोड़**–*पु.* डावपेंच; क्लृप्ति. **मु०–का**– तोडीचा; बरो-बरीचा. **–बदना**– दोन पहिल-वानांची कुस्ती ठरणें. **–मिलना**– १. बरोबरी होणें. २. तोडीचें असणें.

जोड़न+– *स्त्री.* विरजण.

जोड़ना–*क्रि. स.* १. जोडणें; जुळविणें. २. बेरीज करणें. ३. एकत्र करणें. ४. पद्य रचणें.

जोड़वाँ–*वि. पु.* जुळें.

जोड़वाई– *स्त्री.* जोडून घेण्याचें, रचण्याचें काम किंवा मजुरी.

जोड़वाना–*क्रि. स.* जोडवून घेणें; जुळवून घेणें; बांधून घेणें.

जोड़ा–*पु.* १. जोडी; जोडा; युग्म. २. संपूर्ण पोषाख; लग्नांत वधूसाठीं पाठविले जाणारे कपडे.–**जामा**–*पु.* सबंध पोशाख. **मु०–खाना**

–फळणें; पशुपक्ष्यांचें मैथुन होणें.

जोड़ाई– *स्त्री*. जोडण्याचें, रचण्याचें काम अथवा मजुरी.

जोड़ी– *स्त्री*. १. जोडी; जोडी; संच. २. एका वेळीं फिरविण्याचे दोन मुद्‌गल.

जोत– *स्त्री*. १. जोतें; बैल जुंपतांना गळचांत जूं अडकविण्याचा पट्टा. २. नांगरट; नांगरणी. ३. एक शेतकरी कसत असलेली जमीन. **-दार**–*पु.* शेतकरी; कसण्यासाठीं जमीन मिळविणारें कूळ.

जोत–ति–ती*–*स्त्री*. १. ज्योत. २. तुपाचा दिवा.

जोत(ति)खी*–*पु.* ज्योतिषी.

जोतना– *क्रि.स.* १. जुंपणें. २. कामास लावणें. ३. नांगरणें.

जोतनी+– *स्त्री*. जुंपलेल्या जनावराच्या मानेभोंवतालची दोरी.

जोता–*पु.* १. जोतें; जुंपलेल्या जनावराच्या गळचांतील दोरी. २. शेतकरी. [किंवा मजुरी.

जोताई– *स्त्री*. नांगरण्याचें काम.

जोतिक– खी – सी* – *पु.* ज्योतिषी.

जोतिस*–*पु.* ज्योतिष; भविष्य.

जोध–धा*–*पु.* योद्धा.

जोधन+–*पु.* लढाई; युद्ध.

जोन–नि*– *स्त्री*. योनि.

जोन्ह; जोन्हाई*– *स्त्री*. १. चांदणें. २. चंद्र.

जोन्हरी–+ *स्त्री*. १. बारीक दाण्याची ज्वारी. २. मका.

जोपै*– *अव्य*. यद्यपि; जरी.

जोफ़–*पु.* [*अ.*] १. म्हातारपण. २. अशक्तपणा; कमजोरी.

जोबन–*पु.* यौवन; तारुण्य. २. तारुण्याचें सौंदर्य, उभारी. ३. पुष्ट स्तन.–*वि.** तरुण. **मु०–पर आना**– यौवन बहरणें.

जोम–*पु.* [*अ.*] १. जोम; उत्साह. २. आवेश; प्रबलता. ३. अभिमान. ४. समूह. [*सर्व.*–जो.

जोय*– *स्त्री*. पत्नी; बायको.–

जोयना*– *क्रि. स.* १. दिवा लावणें; पेटविणें. २. पाहाणें.

जोयसी*–*पु.* ज्योतिषी.

जोया–*वि.* [*फा.*] शोधणारा; पाहाणारा.

ज़ोर–*पु.* [*फा.*] १. जोर; बळ; शक्ति. २. उत्कर्ष; वाढ. ३. अधिकार; ताबा. ४. आवेश. ५. वेग; गति. ६. आश्रय; आधार. **–आज़माई**– *स्त्री*. बलपरीक्षा; ताकत अजमावणें. **– ज़ुल्म**– *पु.* अन्याय; अत्याचार – **शोर** – धूमधडाका; धामधूम. **मु०– मारना**–खूप जोर करणें; प्रयत्नांची पराकाष्ठा करणें.

जोरन; जोरना–* पा० 'जोडन'; 'जोड़ना.'

जोराजोरी– *स्त्री*. जुलूम; अन्याय –*अव्य.* बळजबरीनें; बलपूर्वक.

ज़ोरावर–*वि.* [*फा.*] बलवान्; सामर्थ्यवान्. [२. जबर्दस्ती.

जोरी*– *स्त्री*. १. जोडी; युग्म.

जोरू– *स्त्री*. पत्नी; बायको. **–जाँता**–*पु.* घरदार; बायकामुलें.

जोल*–*पु.* समूह; कळप.

जोलाऊ+– *स्त्री*. बारावा भाग.

जोलाहा+–*पु.* पा० 'जुलाहा'.

जोली*– *स्त्री*. १. जोडी; बरोबरीची व्यक्ति. २. झोळी; पिशवी. ३. गांठ (दोऱ्याची).

जोवन–**पु.* यौवन; तारुण्य.

जोवना–* *क्रि. स.* १. पाहाणें; टक लावणें. २. शोध करणें. ३. वाट पाहाणें.

जोश–*पु.* [*फा.*] १. आवेश; उत्साह; जोम. २. मनोवेग; मनाची अस्वस्थता. **– व ख़रोश** – *पु.* उत्साह; आवेश. **मु०–खाना**–उकळणें. **–देना**–उकळविणें; उकळणें. **–मारना**–१. उकळणें. २. उसळणें.

जोशन–*पु.* [*फा.*] १. बाजूबंद. २. चिलखत; कवच.

जोशाँदा–*पु.* [*फा.*] काढा.

जोशीला–*क्रि.* [*फा.*] आवेशयुक्त; जोमदार; भावनाप्रधान.

जोष–*पु.* १. प्रेम; प्रीति. २. सुख; आराम. ३. मौन.– *स्त्री*.* वजन; जोखणें. [स्त्री; नारी.

जोष–षा; जोषिता*– *स्त्री*.

जोह; जोहन*– *स्त्री*. १. शोध; तपास. २. प्रतीक्षा; वाट पाहाणें.

जोहड़+–*पु.* डबकें; आपोआप तयार झालेलें तळें.

जोहना*–*क्रि. स.* १. पाहाणें. २. हुडकणें; तपास करणें. ३. वाट पाहाणें.

जोहार– *स्त्री*. प्रणाम; रामराम; जोहार.–*पु.* पा० 'जौहर.'

जोहारना– *क्रि.अ.* लवून नमस्कार करणें; मुजरा करणें.

जौं*– *अव्य*. १. जर. २. ज्या प्रकारें; जसें. [रागावणें.

जौंकना–+*क्रि. स.* दटावणें;

जौंधैया*– *स्त्री*. चांदणें; ज्योत्स्ना.

जौंरा-भौंरा–*पु.* खजिन्याचें तळघर.

जौंरे*– *अव्य*. जवळपास.

जौ–*पु.* जव; यव; 'बार्ली;' 'ओट.'–*अव्य.** १ जर. २.जेव्हां.– **पै***–*अव्य*. १. जर. २. जरी.**–लगि**; **–लहि***–*अव्य*. जों पर्यंत; ज्याप्रमाणें. [२. फौज.

जौक–ख– *पु.* [*तु.*] १. कळप.

ज़ौक–*पु.*[*अ.*] १. स्वाद; मजा; आनंद. २. रसिकता. ३. षोक.

जौजा– *स्त्री*. [*अ.*] बायको; पत्नी.

जौतुक–पु. १. हुंडा. २. आहेर.
जौन*–*सर्व.* जो; जे.
जौन*–पु. यवन.
जौबन*–पु. तारुण्य; यौवन.
जौरा+–पु. १. पा० 'जेवरा'. २. मोठा जाड दोरखंड.
जौलाय+–वि. बारा; १२.
जौहर–पु. जोहार; सती जाणें.
जौहर–पु. [*अ.*] १ जवाहीर; रत्न. २ तत्त्व; सार.
जौहरी–पु. १ जवाहिऱ्या; जडजवाहीर विकणारा. २ रत्न-पारखी.
ज्ञात–*वि.* माहीत असलेलें. **–यौवना**–*स्त्री.* आपल्या यौवनाची जाणीव असलेली मुग्धा नायिका. **–वृत्त**+–*वि.* जाणूनबुजून केलेलें.
ज्ञाप–पु. स्मरणपत्र; 'मेमो'.
ज्ञापक–*वि.* १. सूचक. २. बातमी देणारा; 'इन्फॉर्मर'.
ज्ञापन–पु. १. दाखविण्याचें काम. २. स्मरणपत्र; स्मरणनोंद; निवेदन; 'मेमोरँडम'.
ज्ञापिका–*स्त्री.* निवेदन-पत्रिका; 'मेमोरँडम'. [सूचित.
ज्ञापित–*वि.* दाखविलेला;
ज्या–*स्त्री.* १. धनुष्याची दोरी. २. जीवा; ज्या; वर्तुळाच्या परिघांतील दोन बिंदूंना सांधणारी सरळ रेषा. **–मिति**–*स्त्री.* भूमिति; रेखागणित.
ज्यादती–*स्त्री.* [*अ.*] १ अधिकता. २ अत्याचार; जबरदस्ती; जुलूम. [अधिक; पुष्कळ; जास्ती.
ज्यादह; ज्यादा–*वि.* [*अ.*]
ज्यान*–पु. नुकसान; तोटा; हानि. [२ आदरातिथ्य.
ज्याफ़त–*स्त्री.* [*अ.*] १ मेजवानी.
ज्यारा*–*वि.* जगविणारा; वांचविणारा.
ज्यूँ*–*अव्य.* जसें; ज्याप्रकारें.
ज्यों–*अव्य.* जसें; ज्याप्रमाणें. **–का त्यों**–*अव्य.* जशाचा तसा. **–ज्यों**–*अव्य.* जस-जसें; ज्या क्रमानें. **– त्यों करके –** *अव्य.* मोठ्या कष्टानें; अनिच्छेनें; कसेंबसें.
ज्योत्स्ना–*स्त्री.* १. चांदणें. २. चांदणी रात्र.
ज्योनार; ज्यौनार–*स्त्री.* १ जेवणावळ; मेजवानी. २ स्वयंपाक.
ज्यौं*–*अव्य.* जर.
ज्यौ*–पु. प्राण; जीव.
ज्वर–पु. ताप. **–मापी**–पु. तापमापक; 'थर्मामीटर'.
ज्वलंत–*वि.* १. जळत असलेला; जळजळीत. २. प्रकाशमान्; अत्यंत स्पष्ट; धडधडीत; ठळक.
ज्वलन–पु. जळणें; पेट घेणें. **–शील**–*वि.* त्वरित पेट घेणारें; स्फोटक; 'कंबस्टिबल'; 'इनफ्लेमेबल'. [स्टिबल.'
ज्वल्य–*वि.* जळण्यासखें; 'कंब-
ज्वार–*स्त्री.* ज्वारी; जोंधळा. **–पु.** भरती (समुद्राला येणारी). **–भाटा**–पु.. भरती–ओहोटी.
ज्वालक–पु. वातीचें घर; 'बर्नर'
ज्वाला–*स्त्री.* ज्वाळा. **–मुखी**–पु. १. ज्वालामुखी पर्वत. २. अग्नि; 'लाव्हा'.

झ

झ– देवनागरी वर्णमालेच्या च वर्गांतील चौथा वर्ण.
झंकना– *क्रि. अ.* १. पश्चात्ताप करणें. २. शोक करणें; रडगाणें गाणें. [त्कार.
झंकार– *स्त्री.* झंकार; झण-
झँकियाँ+– *स्त्री.* १. झरोका; जाळीदार खिडकी. २. निमिषार्धांत दिसणारें दृश्य; ओझरतें दर्शन.
झंकृत– *वि.* झंकारयुक्त; झंकार करीत असलेला. [झुळूक. २. धक्का.
झँकोर–रा+– पु. १. वाऱ्याची
झँकोर(ल)ना–+ *क्रि. अ.* धक्का देणें; खळबळ उडविणें.
झंखड़–पु. १. कांटेरी झाड किंवा झुडूप. २. पानें झडलेलें झाड. ३. निरुपयोगी, टाकाऊ वस्तूंचा समूह.
झंखना– *क्रि. अ.* पा० 'झंकना'.
झंखाड़–पु. १. कांटेरी झुडुपें. २. पानें झडलेलें झाड. ३. टाकाऊ वस्तूंचा समूह [अंगरखा.
झँगा–पु. झगा; लहान मुलांचा
झँगुआ+– पु. एक दागिना.
झंझट–पु. *स्त्री.* भानगड; तंटाबखेडा; विनाकारण त्रास; पंचाईत; कटकट.
झंझर–पु. पाण्याचा खुजा.
झँझरा– *वि* बारीक भोकें असलेलें; झिरझिरीत.
झंझरी– *स्त्री.* १ जाळी; जाळीदार वस्तु. २. जाळीची खिडकी. ३. चाळण.
झंझा–पु. १. झंझावात; वादळ; वावटळ. २. सोसाट्याचा वारा व पाऊस. –*वि.* भयंकर; प्रबळ.
झंझार*–पु. अग्निज्वाळा; जाळ.
झंझी– *स्त्री.* फुटकी कवडी.
झँझोड़ना– *क्रि. स.* हिसके मारणें; हिसडे देणें. [मूळचे केस.
झंड*– पु. जावळ; मुलाचे
झंडा– पु. झेंडा; ध्वज. **मु०–**

खड़ा करना– झेंडा उभारणें. –गाड़ना– कब्जा करणें; ताबा मिळविणें.

झंडी– स्त्री. लहान झेंडा; पताका.

झँडूला– वि. १. दाट पालवीचें (झाड). २. केसाळ. ३. जावळ न काढलेलें (मूल).

झंप– पु. लांब उडी; उंच उडी.

झँपकना– क्रि. अ. १ डुलकी येणें. २ झेंप टाकणें. ३. भयभीत होणें. ४ पंख्यानें वारा घेणें. ५ लाजणें.

झँपकी– स्त्री. डुलकी.

झँपना– क्रि. अ. १ झांकलें जाणें. २ झेंप, झांप टाकणें; उडी मारणें. ३ लाजणें. ४ पा० 'झपना'.

झँपरी– स्त्री. पालखीवरील पडदा. [डोली.

झंपाक– पु. माकड.

झंपान– पु. डोंगरी मुलुखांतील

झंपित– वि. आच्छादित; झांकलेलें. [लहान पेटारा.

झँपोला– पु. लहानशी टोपली;

झँवराना– क्रि. अ. १. काळें पडणें. २. अग्नि मंदावणें. ३. कोमेजणें. ४. वज्रीनें घासलें जाणें.

झँवा– पु. पा० 'झाँवाँ.

झँवाना– क्रि. अ. १. काळवंडणें. २. कोमेजणें. ३ विझूं लागणें. ४ कमी होणें. –क्रि. स. १. काळें करणें. २. आग विझविणें. ३. वज्रीनें घासणें.

झँसना– क्रि. स. १ ठगविणें; लुबाडणें. २ डोक्याला किंवा टाळूला तेल इ. चोळणें.

झईं– स्त्री. १ सांवली; पडछाया. २ प्रतिबिंब. ३ झळक; प्रकाश.

झउआ–वा– पु. टोपली; करंडी.

झक– स्त्री. १. विक्षिप्तपणा; तऱ्हेवाईकपणा. २. बडबड. ३. मासा. –वि. चकचकीत; चमकदार. –केतु– पु. कामदेव; मदन.

झकझक– स्त्री. १ हुज्जत. २ वटवट; बडबड.

झकझका– वि. चकचकीत; लखलखीत; झगझगीत.

झकझकाहट– स्त्री. चकाकी; चकचकाट; लखलखाट.

झकझोर–रा– पु. झटका; हिसडा; हिसका.

झकझोरना– क्रि. स. जोरांत हलविणें; झटका देणें; हिसडा देणें.

झकड़ी– स्त्री. धार काढण्याचें भांडें; चरवी.

झकना– क्रि. अ. १ बडबडणें; रागावून बोलणें. २ भांडणें.

झकाझक– वि. चकचकीत; सफाईदार. [झोका घेणें.

झकुराना*– क्रि. अ. झुलणें;

झकोर– पु. पा० 'झकोरा'.

झकोरना– क्रि. अ. वाऱ्याचा झोत येणें.

झकोरा– पु. १. वाऱ्याचा झोत. २. झुळूक. ३. वाऱ्यानें डोलणें (झाडें).

झक्कड़– पु. झंझावात; सोसाटयाचा वारा; तुफान वावटळ.– वि. विक्षिप्त; विलक्षण.

झक्की – वि. १. विक्षिप्त; तऱ्हेवाईक. २. वाचाळ; तोंडाळ.

झख– स्त्री. १. पश्चात्ताप. २. दुःखी होणें; कुढणें. ३. लहान मासा. **मु०–मारना–** १. झक मारणें; आपलें नुकसान करून घेणें. २. नाइलाज होणें.

झगड़ना– क्रि. अ. भांडणें.

झगड़ा– पु. भांडण; तंटा. **मु०–पालना–**१. भांडणतंटा करणें. २. कटकट ओढवून घेणें. **–मोल लेना–**भांडण ओढवून घेणें; विकतचें श्राद्ध घेणें. [भांडखोर.

झगड़ालू– वि. भांडकुदळ;

झगरी– स्त्री. १. भांडण; झगडा. २. भांडखोर स्त्री.

झगला; झगा– पु. झबलें; झगा.

झज्ज(ज्झ)र– स्त्री. पु. खुजा; पाण्याचा माठ.

झझक– स्त्री. भीतीनें किंवा गांगरून थबकणें; बिचकणें; घाबरणें; संकोच; बिथरणें.

झझकन*– स्त्री. १. संकोच. २. बिथरणें; बुजणें.

झझकना– क्रि. अ. १. बिथरणें; बुजणें; घाबरून थबकणें. २. गांगरणें; गोंधळून जाणें. ३. रागावणें; त्रागा करणें. ४. सावध होणें.

झझकाना+– क्रि. स. भय किंवा भीति दाखवून थबकविणें किंवा थोपविणें.

झझकारना क्रि. स. १. दटावणें; दरडावणें. २. तुच्छ लेखणें.

झट– अव्य. झटदिशीं; लवकर; लागलींच; झटकन्. **–पट–** अव्य. झटकन्; लगेच.

झटकना – क्रि.स. १. झाडणें; झटकणें. २. हिसडा देणें. ३. लुबाडून घेणें.

झटकारना– क्रि. स. १. झाडणें; झटकणें. २. हिसडा देणें; लुबाडून घेणें. [चट; लौकर.

झटाका+– अव्य. झटकन्; चट-

झटास*– स्त्री. जलतुषार.

झटिका– स्त्री. १. जुईचें फूल. २. झाडी. ३ एक औषधी गवत.

झटिति– अव्य. १. चटपट; झटपट. २. विचार न करितां.

झड़– स्त्री. पा० 'झड़ी'.

झड़क्का+– पु. झडप; टक्कर.

झड़झड़ाना– १. झटकणें; हल-

विणें.–क्रि. स. २. दटावणें; रागावणें.

झड़न– स्त्री. १. झड; झडून पडणारी वस्तु. २. खरवड. ३. वरची प्राप्ति.

झड़ना–क्रि. अ. १. झडणें; गळून पडणें. २. वाजणें. [झुंज.

झड़प– स्त्री. झडप; उडी;

झड़पना– क्रि. अ. झडप घालणें, झुंजणें, भांडणें.–क्रि. स. हिसकावून घेणें. [झोंबा-झोंबी.

झड़पा–झड़पी– स्त्री. झोंबी;

झड़बेरी– स्त्री. जंगली बोरें; बारीक बोर. [झाडून घेणें.

झड़वाना– क्रि. स. झाडविणें;

झड़ाझड़– अव्य. सतत; सारखें.

झड़ी – स्त्री. १. झड; पावसाचा सतत वर्षाव; संतत धार. २. झोड; सरबत्ती.

झनक – स्त्री. १. झंकार; झणझण आवाज. २. पाय आपटीत चालणें.

झनकना– क्रि. अ. १. झनझन, ठणठण आवाज होणें. २. रागानें हातपाय आपटणें. ३. पा० 'झुँझलाना'.

झनकार– स्त्री. पा० 'झंकार'

झनझनाना– क्रि. अ. झणझण आवाज होणें.

झनिया*–वि. १. झिरझिरीत; पातळ. २. विरळ; जाळीदार. ३. किडकिडीत; अशक्त.

झन्नाना – क्रि. अ. झणझण आवाज होणें.

झन्नाहट– स्त्री. झणत्कार; झणझण आवाज. [तोब; त्वरेनें.

झप – अव्य. झटदिशीं; ताबड-

झपक– स्त्री. १. पापण्यांची उघडझांप. २. पापणी लवण्यास लागणारा वेळ; निमिष. ३, डुलकी; किंचित् झोप.

झपकना– क्रि. अ. १. पापणी लवणें. २. डुलकी घेणें.

झपकाना– क्रि. स. वारंवार पापण्या लवविणें.

झपकी– स्त्री. १. डुलकी. २. गुंगी; झापड. ३. फसवणूक.

झपकौहा*– वि. डोळ्यांत झोप भरलेला; तंद्रींत असलेला. [भांडण.

झपट– स्त्री. झटापट; झडप;

झपटना–क्रि. अ. एखाद्यावर तुटून पडणें.–क्रि. स. हिसकावून घेणें.

झपट्टा–पु. १. झेंप; झडप. २. आक्रमण. **मु०–मारना**– तुटून पडणें; झडप घालणें.

झपना–क्रि. अ. पापण्या मिटणें; बंद होणें; डुलकी घेणें.

झपसना[+]–क्रि. अ. फोंफावणें (झाड); पसरणें; फैलावणें.

झपाका–पु. झपाटा; शीघ्रता. –अव्य. झटपट.

झपाटा–पु. झडप; आक्रमण.

झपाव[+]–पु. गवत कापण्याचें अवजार. [मिटलेला. ३. लज्जित.

झपित–वि. १. झांकलेला. २.

झपेटना–क्रि. स. झडप घालणें.

झप्पड़–र–पु. थप्पड.

झबरा; झबरीला–वि. १. झिपऱ्या असलेला (कुत्रा); लांब केस असलेला; केसाळ. २. विस्कटलेले (केस) [असलेला.

झबरैरा–ला*– वि. झिपऱ्या

झबा–पु. पा० 'झब्बा.'

झबार–रि*– स्त्री. तंटाबखेडा; कटकट. [भडकणें; दचकणें.

झबूकना*–क्रि. अ. बुजणें;

झब्बा–पु. जरीचा गोंडा; गुच्छ; झुपका; गोटा; जुडगा.

झमक– स्त्री. १. चमक; तेज; लकाकी. २. उजेड; प्रकाश. ३. नखरेबाज चाल.

झमकना–क्रि. अ. १. चमचमणें; चकचकणें. २. पायांतील दागिन्यांचा आवाज करीत नखऱ्यांत चालणें. ३. दाणदाण पाय आपटीत येणें-जाणें.

झमकाना–क्रि. स. १. चकाकविणें. २. नखरा करणें. ३. आवाज करणें. [(मेघ).

झमकारा– वि. गडगडणारा

झमकीला– वि. १. चंचल. २. चमकदार.

झमझम– स्त्री. घुंगरूंचा किंवा जोरानें पाऊस पडल्याचा आवाज; छमछम. [लवणें.

झमना*–क्रि. अ. वांकणें;

झमाका–पु. १. दागिन्यांचा ध्वनि. २. पाऊस पडतांना होणारा आवाज. ३. नखरा.

झमाझम–अव्य. १. झमझम आवाज करीत. २. चमकत; चकाकत.

झमाट[+]–पु. पा० 'झुरमुट'.

झमाना–क्रि. स. व्याप्त होणें; पसरणें; घेरणें.

झमारना–क्रि. स. १. जमीन उतरती करणें. २. पाण्यानें भरून टाकणें.

झमूरा[+]–वि. पा० 'झबरा'.

झमेला–पु. १. भानगड; बखेडा; कटकट. २.* गर्दी.

झमेलिया–वि. भानगड करणारा; भांडखोर; उपद्व्यापी.

झर–पु. झरा.–स्त्री.* १. पावसाची झड. २. दाह; झळ.

झरक*– स्त्री. पा० 'झलक'.

झरकना[+]–क्रि. अ. झळकणें. –क्रि. स. झिडकारणें; दटावणें.

झरझराना–*क्रि. स.* झरझर शब्द करणें.–*क्रि. अ.* झरझर शब्द करीत खालीं पडणें, वाहाणें.

झरना–*पु.* १. झरा. २. धबधबा. –*क्रि. अ.* १. झिरपणें; खालीं पडणें. (पाणी, धबधबा इ.); गळणें. २. वाजणें. ३. झड लागणें. –**कलम**– *स्त्री.* झरणी; 'फाउंटन पेन'.

झरपना*–*क्रि. अ.* १. झोडपणें (पावसाचें). २. झडप घालणें; तुटून पडणें.

झरपेटा+–पा० 'झपट्टा'.

झरबी+– *स्त्री.* मासा. [बेरी'.

झरबेर–री+– *स्त्री.* पा० 'झड-

झरसना–*क्रि. अ.* १. होरपळून जाणें. २. कोमेजणें; सुकणें.

झरहरना+– *क्रि. अ.* झरझर शब्द होणें. [झिरीत.

झरहरा*–*वि.* जाळीदार; झिर-

झरहराना–*क्रि. अ.* टपटप आवाज करीत पानें खालीं पडणें.

झराझर–*अव्य.* १. एकसारखें; लागोपाठ. २. वेगानें; भरभर.

झराहर*–*पु.* ज्वालाधर; सूर्य.

झरी– *स्त्री.* १. पावसाची सर; झड. २. झरा. ३.+ कर; भाडें.

झरोखा–*पु.* झरोका; गवाक्ष; लहान खिडकी. [देवता. २. वेश्या.

झर्झरा– *स्त्री.* १. तारा नांवाची

झलक– *स्त्री.* १. ओझरतें दर्शन; चुणूक; चमक. २. आभास.– **दार**– *वि.* चमकदार.

झलकना–*क्रि. अ.* १. चमकणें; लखलखणें. २. आभास होणें.

झलकनि*– *स्त्री.* पा० 'झलक'.

झलका–*पु.* फोड (भाजण्यामुळें किंवा चालण्यामुळें वगैरे आलेला).

झलकाना–*क्रि. स.* चमकविणें; दर्शविणें.

झलझल – *स्त्री.* चमक; चकचकाट.–*अव्य.* स्पष्टपणें.

झलझलाना–*क्रि. अ.* चमकणें.

झलझलाहट– *स्त्री.* चकचकाट; चकाकी.

झलना–*क्रि. स.* पंखा वगैरे हालविणें; पंख्यानें वारा घालणें.–*क्रि. अ.* हालणें; डोलणें.

झल-मल–*पु.* लुकलुक; अंधुक प्रकाश.–*वि.* लुकलुकणारा.

झलमला–*वि.* चमकणारा; चकाकणारा.–*पु.* लामणदिवा. **मु०–दिखाना**–आउक्षण करणें; ओवाळणें. [प्रकाश येणें; लुकलुकणें

झलमलाना–*क्रि. अ.* मंद-मंद

झलराना*–*क्रि. अ.* वाढणें; पसरणें.

झलवाना–*क्रि. स.* पंखा चालविणें (दुसऱ्याकडुन); पंख्यानें वारा घालावयास लावणें.

झलहाया+–*पु.* ईर्ष्यालु; मत्सरी.

झला–*पु.* १. किरकोळ पाऊस. २. झालर. ३. पंखा. ४. समूह.–*स्त्री.* १. ऊन्ह. २. चमक.

झलाझल – *वि.* लखलखीत. –*अव्य.* चमकत.

झलाबोर–*पु.* कलाबतूनें भरलेला लुगडयाचा पदर.–*वि.* चमकणारा.

झल्ल – *पु.* १. एक वर्णसंकर जात; विदूषक. २. ज्वाला.

झल्लक–*पु.* झांझ. [मारणें.

झल्लना+–*क्रि. अ.* फुशारकी

झल्लरी– *स्त्री.* १. झांझ. २. घाम. ३. कुरळे केस.

झल्ला – *पु.* १. हारा; मोठी टोपली. २. वर्षाव.–*वि.* घट्ट नसलेला; विरळ; पातळ.

झल्लाना–*क्रि. अ.* चिडणें; रागावणें; त्रागा करणें.

झल्लाहट – *स्त्री.* १. त्रासिकपणा; त्रागा. २. क्रोध.

झष–*पु.* लहान मासा. [विणें.

झसना–*क्रि. स.* लुवाडणें; ठक-

झहन(ना)ना – *क्रि. अ.* १. चकित होणें. २. रोमांच उभे राहाणें. ३. झणझण आवाज होणें.

झहर(रा)ना+–*क्रि. अ.* १. झरझर आवाज होणें (पावसाच्या झडीचा आवाज). २. गळून पडणें. ३. चिडणें; त्रागा करणें.

झाँईं– *स्त्री.* १. छाया; पडछाया. २. सावली. ३. अंधार. ४. झांक. ५. धोका. ६. प्रतिध्वनि. ७. भोंवळ; ग्लानि. ८. रक्त-दोषामुळें पडणारा डाग. **मु०–बताना**–फसविणें.

झाँक – *स्त्री.* डोकावून पाहावयाची क्रिया. [हळूच पाहाणें.

झाँकना–*क्रि. अ.* डोकावणें;

झाँकर–*पु.* १. झुडुप. २. लाकडाचें लहान जीर्ण दार.

झाँकी– *स्त्री.* १. ओझरतें दर्शन; दृष्टिक्षेपांत दिसणारें दृश्य. २. झाकी; आरास; सजावट. ३. झरोका.

झाँखना– पा० 'झाँकना'.

झाँगला–*वि.* सैल; ढिला (अंगरखा). [ळपणा; दुष्टता.

झाँझ– *स्त्री.* १. झांज. २. खटचा-

झाँझन– *स्त्री.* वाळा (पायांतील दागिना); पैंजण; तोरडया; चाळ.

झाँझरी – *स्त्री.* १. झांझ. २. पैंजण; वाळा.

झाँझा–*पु.* १. पिकावर पडणारा एक किडा. २. तूप-साखरेंत मिसळलेली भांग. ३. शेव तळण्याचा झारा. ४. झांझ. ५. कटकट.

झाँझिया–*पु.* झांझ वाजविणारा.

झाँट-टि– *स्त्री.* शष्प; शेट; झाट.

झाँटा+–*पु.* तंटा; बखेडा.

झाँप – *स्त्री*. १. झांकण. २. झापड; पडदा; आडोसा. ३. बांबूची टोपली.

झाँपना–*क्रि. स*. झांकणें; पांघरूण घालणें. –*क्रि. अ*. शरमणें; लाजणें.

झाँपी+ – *स्त्री*. १. झांकण्याची टोपली. २. झोंप; पेंग. [काळा.

झाँमरा–*वि*. घाणेरडा; मळका;

झाँवँ-झाँवँ– *स्त्री*.वडवड; तक्रार.

झाँवना*– *क्रि. स*. हातपाय घासून धुणें; वज्रीनें घासणें.

झाँवर–*वि*. १. काळसर. २. कोमजलेला. ३. मलिन. ४. सुस्त. –*स्त्री*. उताराची जमीन.

झाँवाँ–*पु*. पाय घासण्याचें विटकर, दगड; वज्री. [विणें.

झाँसना–*क्रि.स*. लुबाडणें; ठक-

झाँसा–*पु*. फसवणूक; झुकांडी.–**पट्टी**– *स्त्री*. १. विश्वासघात. २. दमबाजी.

झा–*पु*. मैथिली किंवा गुजराती ब्राह्मणांतील एक पदवी, आडनांव.

झाऊ–*पु*. रेताड जमिनींत उगवणारें एक प्रकारचें सुरूच्या जातीचें झुडूप.

झाग–*पु*. फेंस.

झाड़–*पु*. १. झुडुप; कांटेरी झाड. २. झाडाच्या आकाराचा कांचेचा दिवा; झुंबर. –**झंखाड़**–*पु*. १. झाडेंझुडुपें. २. निरुपयोगी वस्तू. –**दार**–*वि*. १. दाट पालवीचें. २. कांटेरी.–**फ़ानूस**–*पु*. हंडया, झुंबरें वगैरे.

झाड़न–*स्त्री*. १. केरकचरा. २. झटकणी. ३. झाडणी.

झाड़ना–*क्रि.स*.१. झाडणें; झटकणें. २. खरडपट्टी काढणें; झाडणें. ३. भूतपिशाच काढून टाकणें.

झाड़फूंक–*स्त्री*. मांत्रिकाचा उपचार; मंत्रतंत्र. [साफसूफ.

झाड़बुहार– *स्त्री*. झाडझूड;

झाड़ा– *स्त्री*. १. झडती; तपासणी. २. शौच. ३. शौचकूप. **मु०** –**फिरना**–शौचास जाणें.

झाड़ी– *स्त्री*. १. कांटेरी झाडी; झुडुपें. २. जंगल.

झाड़ू–*पु.स्त्री*. केरसुणी; झाडणी. –**कश**; –**बरदार**–*पु*. १. झाडू मारणारा; झाडूवाला. २. भंगी. **मु०**–**फिरना**–सर्व नष्ट होणें.–**मारना**–ठोकर मारणें; अपमान करणें.–**लगाना**–केर काढणें.

झापड़–*पु*. थप्पड; चपराक.

झाबर–*पु*. १. दलदल. २. टोपली; हारा.

झाबा–*पु*. १. करंडी; टोपली; हारा. २. चाळणीसारखी वापरली जाणारी कातडयाची गोल थाळी.

झाम*–*पु*. १. गुच्छ; गोटा. २. फसवणूक. ३. दमदाटी. ४. माती उकरण्याचें एक यंत्र. ५. आमटी–भाजी वाढण्याचें एक भांडें.

झामक–*पु*. एक प्रकारचा घासून गुळगुळीत करण्याचा दगड; वज्री; विटकरीचा तुकडा; 'प्यूमिस.'

झामर; **झामा**–*पु*. १. धार लावण्याचा दगड. २. पायांत घालण्याचा एक दागिना.

झायँझायँ–*स्त्री*. सूं सूं; झण झण (आवाज); वाऱ्याची सळसळ. **मु०** –**करना**–शुकशुकाट होणें; भीति वाटणें.

झार–रि–री– *स्त्री*. १. दाह; आग. २. आंच; झळ. **पु*.–पा० 'झाड़.' –*वि*. संपूर्ण; सबंध.

झारखंड–*पु*. छोटा नागपूर; छत्तीसगड.

झारना+–*क्रि.स*. १. केंस विंचरणें. २. निवडणें. ३. झाडणें.

झारहीं*–*अव्य*. करपल्यामुळें; भाजल्यामुळें. [गडू. २. झाडी.

झारी*–*स्त्री*. १. झारी; तोटीचा

झाल–*पु*. झांज.–*स्त्री*.१. तिखटपणा; झणझणीतपणा. २. संभोगाची इच्छा. ३. पावसाची संततधार.

झालना–*क्रि.स*.१.डाग लावणें; झाळणें. २. थंड करण्यासाठीं बर्फांत ठेवणें. [वाढणें. २. फुलणें.

झालरना*–*क्रि.अ*. १. पसरणें;

झालरा+–*पु*. १. चांदीचा हार. २. रुंद तोंडाची विहीर.

झाला*–*पु*. १. वडवड; बकवास. २. राजपुतांतील एक भेद.

झावँझावँ–*स्त्री*. १. झन् झन् असा आवाज. २. बडबड; वटवट. ३. हुज्जत.

झावर–*पु*. पाणथळ जमीन.

झिंगर*–*पु*. रातकिडा.

झिंगवा–*पु*. एक लहान मासा; झिंगा.

झिंगारना*–*क्रि.अ*. किरकिरणें.

झिंझिया–*स्त्री*. अनेक छिद्र असलेली घागर (हिच्यांत जळता दिवा ठेवून ती फिरविली जाते).

झिंझी–*स्त्री*. १. रातकिडा. २. पापुद्रा.

झिझक–*स्त्री*.संकोच; बुजरेपणा.

झिझकना–*क्रि.अ*. १. कांकूं करणें; संकोच करणें. २. चिडणें; त्रागा करणें. ३. भीतीमुळें थबकणें. ४. सावध होणें. [रणें; दटावणें.

झिझकारना–*क्रि. स*. झिडका-

झिझोड़ना–*क्रि. स*. ओढाताण करणें; हिसडणें. [देणें.

झिटकारना+–*क्रि.स*. धक्का

झिड़कना–*क्रि.स*. १. झिडकारणें. २. धमकावणें.

झिड़की– *स्त्री*. १. झिडकार; तिरस्कार; अपमान.२. धाकदपटशा.

झिड़झिड़ाना+–*क्रि.अ.* तोंडास येईल तें बोलणें.

झिपना–*क्रि. अ.* १. शरमणें; लाजणें. २. बंद होणें; मिटणें.

झिपाना–*क्रि.स.* लाजविणें.

झिरझिरा– *वि.* झिरझिरीत; बारीक.

झिरी-री–*स्त्री.* १. पाण्याचा प्रवाह थांबविण्यासाठीं तयार केलेला खळगा. २. पा० 'झरी'. ३. रातकिडा.

झिलँग-गा–*पु.* झोळ पडलेली खाट; जुनाट बाजलें.

झिलना–*क्रि.अ.* १. शिरणें; घुसणें. २. तृप्त होणें. ३. तल्लीन होणें. ४. झेललें जाणें.

झिलम– *स्त्री.* लोखंडी शिरटोप; शिरस्त्राण.

झिलमिल–*स्त्री.* १. अंधुक प्रकाश; लुकलुकणें. २. कवच. ३. एक पातळ कापड. –*वि.* लुकलुकणारा; अंधुक.

झिलमिला–*वि.* १. विरळ; झिरझिरीत. २. चमकणारा. ३. अस्पष्ट. [लुकणें; मिणमिणणें.

झिलमिलाना–*क्रि. अ.* लुक-

झिलमिली– *स्त्री.* १. झिरझिरीत पडदा. २. चिकाचा पडदा. २. एक प्रकारची जाळी.

झिल्लड़– *वि.* झिरझिरीत; जाळीदार; विरळ.

झिल्ली– *स्त्री.* १. विरविरीत पातळ पडदा. २. पापुद्रा. ३. अंग घासल्यानंतर निघणारा मळ.

झिल्ली– *स्त्री.* १. घुरघुरा किडा; रातकिडा. २. सूर्य प्रकाश. ३. दिव्याची वात.

झींक-का–*पु.* दळतांना जात्यांत घालावयाचा घांस; मूठ.

झींक(ख)ना–*क्रि.अ.* १. दुःखी होणें.; पश्चात्ताप करणें; पस्तावणें. २. रडगाणें गाणें.

झींगट+–*पु.* नावाडी. [मासा.

झींगा–*पु.* एक प्रकारचा लहान

झींगुर–*पु.* घुरघुरा किडा; रातकिडा. [कुढणें.

झींटना+–*क्रि. अ.* रागावणें;

झींसी– *स्त्री.* पावसाचे बारीक तुषार; भुरभुर.

झीना–*वि.* पातळ; झिरझिरीत; विरविरीत; विरळ.

झीम– *स्त्री.* डुलकी.

झील– *स्त्री.* नैसर्गिक सरोवर; मोठा तलाव.

झीलर–*पु.* लहान सरोवर; तळें.

झीवर–*पु.* कोळी; धीवर; नावाडी.

झुँझलाना– *क्रि. अ.* चिडणें; खिजणें; कावणें.

झुँझलाहट– *स्त्री.* त्रागा; चीड.

झुंड–*पु.* झुंड; समूह; कळप.

झुकना– *क्रि. अ.* १. वांकणें; लवणें; झुकणें. २.* चिडणें; रागावणें. [टेचा अंधुक प्रकाश.

झुकमुक-ख–*पु.* झुंझुरकें; पहां–

झुकराना*–*क्रि. अ.* धक्का बसणें; झोका खाणें.

झुकवाना–*क्रि. स.* झुकविणें; वांकविणें (दुसऱ्याकडून).

झुकाना–*क्रि. स.* वाकविणें; लवविणें; झुकविणें. ['झुकमुख'.

झुकामुकी-खी– *स्त्री.* पा०

झुकाव–*पु.* १. बांक; उतार. कल; प्रवृत्ति.

झुटपुटा–*पु.* झुंझुरकें (पहांटें व सायंकाळीं); पहांटेचा अंधुक प्रकाश; संधिप्रकाश. [लाना'.

झुटलाना–*क्रि. स.* पा० 'झुठ-

झुटुंग–*वि.* केंस वाढलेला; जटाधारी. २. खवीस; झोटिंग.

झुठलाना–*क्रि. स.* १. खोटें ठरविणें; खोटें पाडणें. २. खोटेंनाटें सांगून फसविणें. [पणा.

झुठाई– *स्त्री.* खोटेपणा; असत्य-

झुठाना–*क्रि. स.* खोटें ठरविणें.

झुनक–*पु.* झुणझुण आवाज; घुंगरांचा आवाज.

झुनझुना–*पु.* खुळखुळा.

झुनझुनाना–*क्रि. अ.* झुणझुण आवाज होणें.

झुनझुनियाँ– *स्त्री.* १. रुणझुण करणारा पायांत घालावयाचा एक दागिना. २. बेडी. ३. सोनामुखीचें झाड. [मुंग्या येणें.

झुनझुनी– *स्त्री.* हातापायांना

झुपझुपी; झुबझुबी+– *स्त्री.* कानांत घालण्याचा एक झुबकेदार दागिना.

झुमका–*पु.* डूल (कानांतील दागिना); 'इयररिंग'.

झुमना–*क्रि. अ.* झोक जाणें.

झुरकुट–*वि.* १. काडीपैलवान; मरतुकडा. २. शुष्क; सुकलेला.

झुरकुटिया–*वि.* किडकिडीत. –*पु.* लोखंड. [तापाची थंडी.

झुरझुरी– *स्त्री.* हुडहुडी; हिंव-

झुरना*–*क्रि. अ.* १. वाळणें; कोरडें पडणें. २. झुरणें; दुःखानें क्षीण होणें.

झुरमुट–*पु.* १. झाडझुडुप; झुडुपांची जाळी. २. झुंड; समूह.

झुरवाना–*क्रि. स.* झुरविणें.

झुरसना*–*क्रि. अ.* १. भाजणें; होरपळून निघणें. २. उन्हानें काळें पडणें.

झुरावन+– *स्त्री.* वाळल्यावर निघून जाणारा अंश; वस्तु वाळल्यानें तिच्या वजनांत होणारी घट.

झुर्री– *स्त्री.* सुरकुती; सळ.

झुलना–*पु.* १. झोपाळा. २. सैल अंगरखा.

झुलनी– *स्त्री.* नथेंतील मोत्यांचा झुपका.

झुलसना–*क्रि. अ.* १. करपणें; होरपळणें. २. कोळपणें; उन्हानें वाळून जाणें. [विणें.

झुलसवाना–*क्रि. स.* होरपळ-

झुलसाना–*क्रि. स.* भाजणें; जाळणें; करपविणें.

झुलाना–*क्रि. स.* १.झोका देणें; हलविणें; झुलविणें. २. ताटकळत ठेवणें. [लादलें जाणें.

झुहिर(रा)ना*–*क्रि. अ.*

झूँक*–*पु.* वाऱ्याचा झोत.

झूँझल– *स्त्री.* धुसफुस; त्रागा.

झूँटा–*पु.* झिज्या; केसांचा बुचडा.–*वि.* खोटा; खोटें.

झूखना*–*क्रि. अ.* दुःखी होणें.

झूझना–*क्रि. अ.* झुंझणें.

झूठ–*वि.* असत्य; मिथ्या; खोटें.–*पु.* खोटें; असत्य.–**मूठ** –*अव्य.* खोटेंनाटें; निष्कारण. –**सच**–*पु.* खऱ्याखोटयाचें मिश्रण. **मु०–का दफ़्तर**–सर्वस्वीं खोटया-नाटया गोष्टी.–**का पुतला**–अत्यंत खोटारडा.–**सच जोड़ना, लगाना**–तिखटमीठ लावून सांगणें; खोटया तक्रारी करणें.

झूठा–*वि.* १. खोटा; लबाड; खोटें बोलणारा. २. कृत्रिम; नकली. **मु०–(ठे)का मुँह काला**–खोटें बोलणाऱ्याची सर्वत्र नाचक्की होते.

झूमक–का–*पु.* १. होळीच्या सणांत स्त्रियांचें घेर धरून झुलत-झुलत नाचतांना गावयाचें गाणें. २. कर्णफूल. ३. साडीच्या पदराला कपाळावर येईल अशा रीतीनें लावलेला मोत्यांचा गुच्छ.–**साड़ी–री**–*स्त्री.* झूमक असलेली साडी अगर ओढणी (हिच्या डोक्यावरून येणाऱ्या पदराच्या भागावर जरीची वेलबुट्टी अगर तत्सम काम केलेलें असतें). [उपद्व्याप.

झूमड़झामड़–*पु.* खोटेंनाटें;

झूमना–*क्रि. स.* १. झुलणें; डुलणें; आंदोलणें. २. हालत-डुलत चालणें; झोकें खाणें.

झूमर–*पु.* १. डोकींत घालाव-याचा एक दागिना. २. डूल. ३. होळींतील एक नृत्य-गीत.

झूर–रा⁺–*वि.* १. वाळलेला; शुष्क. २. रिकामा; रिता. ३. उष्टा.–*पु.* अवर्षण. [वाळणें.

झूरना*–*क्रि. अ.* सुकणें;

झूरै–*अव्य.* व्यर्थ; निरर्थक.

झूल– *स्त्री.* १. घोडा, हत्ती इ० च्या अंगावरील, पाठीवरील वस्त्र, आच्छादन; झूल. २. सैल आणि बेढब शिवलेलें कापड. ३.* झोपाळा; पाळणा.

झूलन–*पु.* १. श्रावणांत हिंदो-ळचावर बसून गाणीं म्हणण्याचा उत्सव. २. झोका; हिंदोळा.

झूलना–*क्रि. अ.* झोंका घेणें; आंदोलणें.–*पु.* १. झोंका; झोपाळा. २. पाळणा.

झूला– *स्त्री.* १. झोका; झोला; हिंदोळा. २. झोपाळा; पाळणा. ३. ग्रामीण बायकांचा बिनबाह्यांचा सदरा. [लाजणें; शरमणें.

झेंपना–*क्रि. अ.* खजील होणें;

झेंपू–*पु.* लाजाळू; लाजरा; शरमिंदा.

झेपना–*क्रि. अ.* पा० 'झेंपना'.

झेर*– *स्त्री.* १. विलंब. २. तंटा-बखेडा.

झेलना–*क्रि. स.* १. स्वतःवर ओढून घेणें; सहन करणें. २. हट-विणें; ढकलणें. ३. पोहतांना पाणी कापणें. ४.* मान्य करणें.

झोंक– *स्त्री.* १. कल; प्रवृत्ति. २. झपाटा; जोर; वेग; झोका. ३. थाटमाट. ४. धामधूम. **मु०–मारना**–वजन करतांना दांडी मारणें.

झोंकना–*क्रि. स.* १. झुगारणें; ढकलणें. २. विस्तवांत फेंकणें.

झोंकवाना–*क्रि. स.* फेंकविणें.

झोंका–*पु.* १. झोंका; हेलकावा. २. हिसडा; झटका. ३. झोक; थाटमाट.

झोंकाई– *स्त्री.* झुगारणें. २. फेंकणें. ३. चुलाणांत जळण घाल-ण्याचें काम अथवा त्याची मजुरी.

झोंझ⁺–*पु.* १. घरटें. २. गिधाड वगैरे पक्ष्यांच्या गळयाची पोळी.

झोंझल– *स्त्री.* चीड; त्रागा; राग.

झोंटा–*पु.* १. आंबाडा. २. वेणी. ३. झिज्या.–**झोंटी**– *स्त्री.* बायकांचें एकमेकीच्या झिज्या उपटून भांडणें.

झोंपड़ा–*पु.* झोंपडें; झोंपडी; कच्चें घर.

झोंपडी– *स्त्री.* झोपडी.

झोंपा–*पु.* गुच्छ; गोटा.

झोंटिंग–*वि.* १. केसाळ; झिपऱ्या असलेला. २. झिज्या अस-लेला; जटाधारी.–*पु.* भूत, वेताळ वगैरे.

झोड–*पु.* सुपारीचें झाड.

झोरना*– *क्रि. स.* १. गदगदां हलविणें. २. झोडणें; भरपूर खाणें.

झोरि–री*– १.झोळी. २.पोट.

झोरे*–*अव्य.* निकट; जवळ; समीप.

झोल–*पु.* १. भाजीचा रसा. २. झोळ; पदर; घोळ. ३. चूक-भूल. ४. कोळयाचें जाळें.–**दार**–*वि.* १. झोळ असलेला. २. रसदार.

झोला–*पु.* झोळी; पिशवी.

झोली– स्त्री. १. झोळी; थैली. २. गवत भरण्याची जाळी. ३. राख. मु० – **बुझाना**– १. राख विझविणें. २. एखादी गोष्ट करण्याची वेळ निघून गेल्यानंतर ती करणें. [ऐदीपणा.

झोलौ[+]– पु. कामचुकारपणा;

झौंर– पु. १. गुच्छ; गोटा. २. झुंड; समूह.

झौंरना*– क्रि. अ. दुमदुमणें. –क्रि. स. १. वळकावून बसणें. २. झडप घालून पकडणें.

झौंसना[+]– क्रि. अ. भाजणें; जळणें; करपणें.–क्रि. स. जाळणें; होरपळविणें.

झौंसियत[+]– स्त्री. अग्नीच्या ज्वाळा.

झौड़-र– पु. १. तंटा; भांडण; हुज्जत. २. पळापळी.

झौरना*– क्रि. स. १. झटका देऊन हालविणें. २. झडप घालून दावणें.

झौरे*– अव्य. समीप; जवळ.

झौवा– पु. टोपली; पेटारा.

झौहाना– क्रि. अ. गुरकावणें; रागावणें.

ट

ट–देवनागरी वर्णमालेच्या टवर्गांतील पहिला वर्ण.

टंक–पु. १. धातूचें नाणें. २. शिक्का. ३. चार माशाचें वजन. ४. छिन्नी. ५. टांकणखार. ६. खिळा (छपाईचा); ' टाईप '.–**लेखन**–पु. ' टाइपिंग '.–**शाला**– स्त्री. टांकसाळ; ' मिंट '.

टंकक–पु. चांदीचें नाणें.–**पति**–टांकसाळीवरील मुख्य अधिकारी.–**शाला**– स्त्री. टांकसाळ.

टंकण–पु. १. धातूंचीं नाणीं पाडणें; ' कॉइनेज '. २. टांकणखार.

टँकना–क्रि. अ. १. टांके घातले जाणें. २. नोंद केली जाणें. टांचण केलें जाणें ३. टाकी लावली जाणें. ४. शिवलें जाणें; बटन इ० लावलें जाणें.

टँकवाना–क्रि. स. १. टांके घालून घेणें. २. टाकी लावून घेणें.

टँकाना–क्रि. स. १. आठवणीसाठीं लिहवून ठेवणें २. टांके घालून घेणें. ३. शिवून घेणें.

टंकाना–क्रि. स. नाण्याची तपासणी करणें. [त्कार; झंकार.

टंकार– स्त्री. धनुष्याचा टण-

टंकारना–क्रि. स. धनुष्याची दोरी ओढून आवाज करणें.

टंकी– स्त्री. टांकी; पाणी सांठविण्याचें पीप.

टंकोर–पु. टणत्कार.

टंकोरना–क्रि. स. पा० ' टंकारना '.

टँको(कौ)री– स्त्री. सोनें वजन करण्याचा लहान तराजू; लहान तागडी. [कुऱ्हाड. ३. कुदळ.

टंग–पु. १. टांग; तंगडी. २.

टँगड़ी– स्त्री. टांग; तंगडी.

टँगना क्रि. अ. १. टांगलें जाणें; लोंबकळणें; लटकणें. २. फांसावर लटकणें.–पु. कपडे टांगण्याची दांडी, दोरी; अलगनी; खुंटाळें.

टँगरी– स्त्री. पा० ' टँगड़ी '.

टंगारी– स्त्री कुऱ्हाड.

टंच–वि. १. तयार; घष्टपुष्ट. २. कृपण; कंजूष; ३. बनेल; कठोरहृदय.

टंटघंट–पु. १. पूजेचें अवडंबर; ढोंग; फापटपसारा. २. काठकबाड; केरकचरा. ३ जेवणाचा व्याप, पसारा. [उपद्रव; दंगा.

टंटा–पु. १. तंटा; झगडा. २.

टंडैल–पु. मजुरांचा मुकादम; तांडेल.

टँसहा[+]–पु. लंगडा बैल.–वि. लंगडा.

टई*– स्त्री. युक्ति; उपाय.

टक– स्त्री. १. टक. २. लाकूडकोळसा तोलण्याचा चौकोनी कांटा, तराजू.–**टका***–पु. टक लावून पाहणें; स्थिर व एकाग्र दृष्टि. मु०–**बँधना**–टक लागणें. –**लगाना**–टक लावणें.

टकटकी – स्त्री. टक; स्थिर नजर. मु०–**बाँधना**;–**लगाना**–टक लावून पाहाणें; स्थिर नरजरेनें बघणें.

टकटोना; **टकटोर(ल)ना**–क्रि. स. १. चांचपडणें; हातानें धुंडाळणें. २. हुडकणें; शोधणें.

टकटोहना[+]–क्रि. स. चांचपडणें; शोधत राहाणें.

टकराना–क्रि. अ. १. टक्कर होणें; आदळणें; आपटणें. २. दारोदार हिंडणें.–क्रि. स. १. आदळणें; आपटणें. २. लढविणें; झुंजविणें. [पाडण्याचा कारखाना.

टकसाल– स्त्री. टांकसाळ; नाणीं

टकसाली–वि. १. चालू; प्रचलित; प्रमाणित; चोख. २. टांकसाळीचा. ३. व्यवहारांतील.–**बोली**– स्त्री. शिष्ट, प्रमाणित भाषा.

टका–पु. १. ढबू पैसा. २. पैसा. ३. धन; द्रव्य; रुपया. **मु०–भर**–किंचित्; थोडासा.–**सा जबाब देना**–साफ नकार देणें; रोख ठोक उत्तर देणें.–**सा मुँह लेकर रह जाना**–शरमणें; लज्जित होणें; चिमणीएवढें तोंड करणें.

टकानी+– *स्त्री.* बैलगाडीचें जोखड.

टकासी– *स्त्री.* १. रुपयामागें दोन पैसे हा व्याजाचा दर. २. दर माणशी दोन पैसे या हिशेबानें बसविलेला कर किंवा पट्टी.

टकुआ–*पु.* १. टकळी; त्राक. २. लहान तराजूची दोरी. [छिन्नी.

टकुली– *स्त्री.* दगड फोडण्याची

टकूचना+–*क्रि. स.* १. नफा मिळविणें. २. गिळंकृत करणें.

टकैत–*वि.* धनी; श्रीमंत; पैसेवाला.

टकोर– *स्त्री.* १. जखम; आघात; प्रहार (सौम्य प्रमाणांतील). २. चपराक. ३. नगाऱ्याचा आवाज. ४. टणत्कार. ५. शेक.

टकोरना–*क्रि. स.* १. हलका आघात करणें. २. शेकणें. ३. वाजविणें.

टक्कर– *स्त्री.* १. टक्कर; ठोकर. २. तुलना; तोड. ३. हानि. **मु०–का**–तोडीचा; बरोबरीचा.–**मारना**–त्रासणें; हैराण होणें.

टखना–*पु.* पायाचा घोटा.

टग*– *स्त्री.* टक.

टगड़ी– *स्त्री.* तंगडी; पाय.

टगर–*पु.* १. विलास; क्रीडा. २. टांकणखार. ३. टेकाड; ढीग.–*वि.* तिरळा.

टघर(रा)ना+–*क्रि. अ.* १. तूप इ० वितळणें. २. पाझरणें; द्रवणें. २. दया उत्पन्न होणें.

टचना+–*क्रि. अ.* ज्वाळा निघणें; आग भडकणें.

टचनी– *स्त्री.* भांड्यावर नक्षी कोरण्याची सुई.

टटका–*वि.* ताजा; नवीन; नुकताच तयार झालेला.–**ई**– *स्त्री.* ताजेपणा.

टटरी+– *स्त्री.* बांबूच्या कामटयांचा सांगाडा; चौकट. [विसंगत.

टटल-बटल*–*वि.* असंबद्ध,

टटाना+–*क्रि. अ.* सुकणें; वाळून आंखडणें.

टटिया– *स्त्री.* पा० 'टटरी'.

टटियाना–*क्रि. अ.* १. पा० 'टटाना'. २. चहूंकडे पडदा सोडणें.

टटीबा*–*पु.* कप्पी; चाक.

टटुआ–*पु.* लहान घोडें; तट्टू.

टटोलना–*क्रि. स.* १. चांचपडणें. २. शोधणें; हुडकणें. ३. ठाव घेणें (अंतःकरणाचा); ताडणें (अंतःकरण); अंतःकरणाचा भाव जाणणें. ४. पारख करणें.

टट्टनी– *स्त्री.* पाल (प्राणी).

टट्टर–*पु.* ताटवा; तट्टी; तट्टचा.

टट्टा–*पु.* १. कामटयांचा पडदा. २. लांबरुंद फळी.

टट्टी– *स्त्री.* १. तट्टचा. २. पडदा. ३. पायखाना; शौचकूप. ४. शौच. **मु०–की आड़ (ओट) से शिकार खेलना**–लपून छपून डाव करणें; फसविणें.–**में छेद करना**–उघडपणें कुकर्म करणें; निर्लज्ज बनणें. **धोखे की टट्टी**–फसविणारी, फसवी गोष्ट.

टट्टू–*पु.* तट्टू; लहान घोडा. **मु० भाड़े (किराये) का टट्टू**–पैसे घेऊन काम करणारा; भाडोत्री माणूस.

टठिया– *स्त्री.* लहानसें ताट.

टन– *स्त्री.* ठण; घंटा इ० चा आवाज.–**टन**– *स्त्री.* ठणठण; घणघण. **मु०–हो जाना**–झटकन् मरून जाणें.

टनकना–*क्रि. अ.* १. उन्हानें डोकें ठणकणें. २. ठणठण आवाज होणें.

टनटनाना–*क्रि. अ.* १. ठणठण आवाज होणें. २. राहून राहून डोकें दुखणें.

टनमन–*पु.* जादूटोणा.

टनमना–*वि.* धडधाकट; निरोगी; आजारांतून बरा झालेला; सतेज; प्रसन्न.

टनमनाना+–*क्रि. अ.* आजारांतून बरें होणें; धडधाकट होणें.

टनाका–*पु.* घणघण किंवा ठणठण असा आवाज.–*वि.* कडक ऊन्ह.

टनाटन– *स्त्री.* सतत होणारा टणटण असा आवाज.–*वि.* दृढ; ठणठणीत; व्यवस्थित; धष्टपुष्ट.–*अव्य.* ठणठण असा आवाज करीत.

टप– *स्त्री.* पाण्याचा थेंब किंवा फळ पडल्यानंतर होणारा 'टप्' असा आवाज. २. टप; तट्टचा (गाडीवरील आच्छादन).–**से**–*अव्य.* झटकन्. –*पु.* [इं.] टाकी; टब.

टपक– *स्त्री.* १. टपकण्याची, ठिबकण्याची, पडण्याची क्रिया. २. थांबून थांबून होणारी पीडा; वेदना; कळ.

टपकना–*क्रि. अ.* १. ठिबकणें; थेंब थेंब गळणें; टपकणें (द्रव पदार्थ). २. गळणें; खालीं पडणें (फळ). ३. ठणकणें (वेदना). ४. झळकणें. **मु०– टपक पड़ना**–१. अकस्मात् येऊन उभें राहाणें. २. अचानक पडणें.

टपका–*पु.* १. गळून पडलेली बस्तु. २. पिकून पडलेलें फळ. ३. ठणका.

टपकाटपकी–*स्त्री.* १. पावसाची लहानशी सर; पाऊस पडणें; बुर-बुर. २. एकामागून एक फळें पडणें. ३. सांथीच्या रोगानें रोज माणसें पटापट मरणें.–*वि.* एखादा.

टपकाना–*क्रि. स.* १. थेंब थेंब गाळणें. २. अर्क काढणें.

टपना–*क्रि. स.* १. जेवणासाठीं ताटकळत बसणें; उपाशीं राहाणें. २. तिष्ठत बसणें; खोळंबणें.

टपरा–*पु.* १. छप्पर. २. झोपडी.

टपरिया+–*स्त्री.* झोपडी.

टपाटप–*अव्य.* १. थेंब-थेंब; टपटप आवाज करीत. २. झटपट; ताबड़तोब.

टपाना–*क्रि. स.* जेवणासाठीं ताटकळत बसविणें; निष्कारण आशा लावणें.

टप्पर+–*पु.* १. छप्पर. २. सज्जा.

टप्पा–*पु.* १. चेंडूसारख्या उंच उडणाऱ्या वस्तूचा जमिनीवर आघात; टप्पा. २. उडी. ३. कापलेलें अंतर. ४. दोन टेकड्यांमधील मैदान. ५. संगीताचा एक प्रकार.

टब्बर+–*पु.* १. कुटुंब. २. कूळ.

टमकी–*स्त्री.* १. टिमकी; हलगी. २. लहान नगारा.

टमटम–*स्त्री.* [इं.] एक प्रकारची घोडागाडी; 'व्हिक्टोरिया'.

टमटी–*स्त्री.* एक प्रकारचें भांडें.

टमाटर–*पु.* [इं.] बेलवांगें; 'टोमॅटो'.

टर–*स्त्री.* १. कर्णकटु शब्द. २. असभ्य वचन; बकवास; वटवट. ३. बेडकाचा आवाज ४. घमेंड. **मु०–टर करना; –टर लगाना–** १. वटवट करणें. २. फाजीलपणानें बोलणें.

टरकना–*क्रि. अ.* १. निसटणें; सरकणें. २. बाजूला होणें; निघून जाणें.

टरकाना–*क्रि. स.* १. निसटण्यास प्रवृत्त करणें. २. धुडकावून लावणें. ३. टाळणें; घालवून देणें; हुसकावून देणें.

टरकी–*पु.* [तु.] १. कोंबड्यांची एक जात. याच्या गळ्याखालीं मांसाची लाल पोळी असते. २. तुर्कस्तान. [सामान्य.

टरकुल+–*वि.* खराब; अत्यंत

टरटराना–*क्रि. अ.* १. बडबडणें किंवा वटवट करणें. २. उद्दामपणें बोलणें.

टरना*–*क्रि. अ.* पा० 'टलना'.

टर्रटर्र– *स्त्री.* डरॉंव डरॉंव; बेडकाचा आवाज.

टर्रा–*वि.* उर्मट; उद्दाम; उद्धट. **–पन–** *पु.* उर्मटपणा; बोलण्यांतील उद्दामपणा.

टर्राना–*क्रि. अ.* उर्मटपणानें उत्तर देणें; कडवटपणें बोलणें.

टलना–*क्रि. वि.* १. निसटणें; निघून जाणें; सटकणें. २. नाहींसें होणें; न राहाणें. ३. टळून जाणें. ४. आज्ञेचें उल्लंघन करणें. ५. लांबणीवर टाकणें. **मु० अपनी बातसे टलना**–प्रतिज्ञा पूर्ण न करणें; दिलेला शब्द मोडणें. [मळीत.

टलमल–*वि.* हलणारा; डळ-

टलहा+–*वि.* पा० 'टरकुल'.

टलाट(म)ली*– *स्त्री.* टाळाटाळ; कांहीं तरी सबबी सांगणें.

टला–ल्ला–*पु.* १. धक्का. २. असत्य, निरर्थक काम. ३. जोडयाचें ठिगळ. ४. भोंक.

टल्लेनवीसी– *स्त्री.* १. रिकामटेकडें भटकणें. २. टाळाटाळी; थापेबाजी; बहाणा.

टवाई*– *स्त्री.* व्यर्थ भटकणें; निष्प्रयोजन हिंडणें.

टस– *स्त्री.* जड वस्तु सरकवितांना होणारा 'खस्' असा आवाज; कापड फाडतांना होणारा 'टर्' असा आवाज. **मु०–से मस न होना**–अचल राहाणें; कांहीं परिणाम न होणें.

टसक– *स्त्री.* ठणका; राहून राहून होणारी पीडा; वेदना.

टसकना–*क्रि. अ.* १. निसटणें; बाजूला सरणें. २. ठणकणें; ठसठसणें.

टसकाना–*क्रि. स.* १. हटविणें; सरकविणें. २. निसटूं देणें; निसटण्यास प्रवृत्त करणें. [(कापड).

टसना+–*क्रि. अ.* फाटणें

टसर–*पु.* तागाचें रेशीम; एक प्रकारचें कडक व जाड रेशमी कापड.

टसुआ*– *पु.* आंसू; अश्रु.

टहक+– *स्त्री.* कळ; वेदना.

टहकना–*क्रि. अ.* कळ येणें.

टहटहा+–*वि.* ताजा; नवा; कोरा करकरीत. [डहाळी.

टहना–*पु.* झाडाची मोठी फांदी;

टहनी– *स्त्री.* डहाळी; शाखा; फांदी.

टहल– *स्त्री.* १. सेवा; चाकरी. २. शुश्रूषा.**–टई; –टकोर–** १. सेवाशुश्रूषा. २. नोकरी; चाकरी.

टहलना–*क्रि. अ.* १. हिंडणें; फिरणें. २. सावकाश चालणें; फिरावयास जाणें; हवा खाणें. **मु० टहल जाना**–हळूंच निसटणें; सटकणें.

टहलनी– *स्त्री.* १. दासी; मोलकरीण. २. दिव्याची वात सरकविण्याची काडी.

टहलाना–*क्रि. स.* फिरावयास नेणें; सावकाश चालविणें.

टहलुआ–वा; टहलू–*पु.* १. नोकर; सेवक. २. भटक्या. ३. ओढाळ जनावर.

टही[+]– *स्त्री.* डावपेंच.

टहुआटारी[+]– *स्त्री.* चहाडी.

टहूका–*पु.* १. कोडें. २. चुटका.

टहोका–*पु.* हातानें किंवा पायानें मारलेला धक्का; हिसडा; कोपरखळी. **मु०–खाना**–धक्का खाणें. **–देना**–धक्का मारणें.

टाँक–*स्त्री.* १. तीन किंवा चार माशांचें वजन. २. अटकळ; अदमास. ३. लिखाण; ४. लेखणीचें टोंक; टांक. ५. भाग. ६. तपासणी.

टाँकना–*क्रि. स.* १. शिवणें; टांका घालणें; जोडणें. २. टाकीचे घाव घालणें; टाकी लावणें. ३. टिपणें; लिहिणें. ४. लुबाडणें. ५. चट्ट करणें.

टाँका–*पु.* १. शिवण. २. ठिगळ. ३. टाका. ४. टाकी लावण्याची छन्नी. ५. पाण्याची टाकी किंवा हौद. ६. पाण्याचें पीप.

टाँकाटूट[+]–*वि.* अगदीं बरोबर वजन केलेलें.

टाँकी– *स्त्री.* १. टाकी; छिन्नी (हत्यार). २. टाकीनें घडलेलें चिन्ह. ३. टाकें; हौद.

टाँग– *स्त्री.* पाय; टांग. **मु० –अड़ाना**–विनाकारण व्यत्यय आणणें.**–तलेसे निकलना**–पराभव मान्य करणें.**–पसारकर सोना**–१. खुशाल ताणून देणें; डाराडूर झोंपणें. २. आरामांत जीवन घालविणें.

टाँगन–*पु.* तट्टू.

टाँगना–*क्रि. स.* १. टांगणें; लटकावणें. २. फांसावर चढविणें.

टाँगा–*पु.* १. मोठी कुऱ्हाड. २. टांगा (गाडी).

टाँगानोचन[+]– *स्त्री.* हिसकाहिसकी; ओढाताण.

टाँच– *स्त्री.* १. अडथळा; मोडता; मोडती. २. टांका (शिवण). ३. ठिगळ. ४. काटछाट.

टाँचना–*क्रि. स.* १. टांके घालणें. २. कापणें; काटछाट करणें.

टाँची– *स्त्री.* १. कसा (कमरेला बांधण्याची पैशाची थैली). २. कर्णकटु गोष्ट.

टाँट; टाँटर[+]–*पु.* कपाळ; टक्कल पडलेलें डोकें.

टाँठ–ठा*–*वि.* १. कठिण; कडक; टणक. २. दृढ; मजबूत; धट्टाकट्टा.

टाँड़–*स्त्री.* १. सामान ठेवण्याची लाकडी फळी. २. शेताची राखण करण्यासाठीं घातलेला लहानसा मांडव; मचाण.–*पु.* १. समूह. २. घरांची रांग. ३. विटीदांडूंतील दांडू.

टाँड़ा–*पु.* १. तांडा; काफला. २. लमाण. ३. कुटुंब; परिवार. ४. बैलांवर लादलेल्या व्यापारी वस्तू; अशा जिनसा लादलेल्या बैलांचा तांडा.

टाँयटाँय–*स्त्री.* बडबड; वटवट; **मु०–फिस्**–काम थोडें पण बडबड फार; ओंफस.

टाँस– *स्त्री.* शिरा आखडणें व [दुखणें.

टाट–*पु.* १. तरट. २. जाडजूड कापड. **मु०–उलटना**–दिवाळें निघणें.**–में पाटकी बखिया**–तरटाला रेशमाचें ठिगळ; बुड्ढी घोडी लाल लगाम.

टाटक[+]–*वि.* पा. 'टहटहा'.

टाटर–*पु.* १. हाडांचा सांपळा. २. कवटी.

टाटिका*– *स्त्री.* तट्टया; पटदा.

टाठी[+]– *स्त्री.* ताट; थाळी.

टान– *स्त्री.* १. ताण; तणावा. २. सतार वाजविण्याची एक पद्धत.

टानना–*क्रि. स.* ताणणें; खेंचून [धरणें.

टाप– *स्त्री.* १. कोंबडी ठेवण्याचा कामटयांचा पेटारा. २. घोडयांची टाप. ३. मासे पकडण्याचें कोळयांचें जाळें. (टोपलीच्या आकाराचें). ४. बाजेच्या खुराचा खालचा भाग.

टापड़[+]–*पु.* माळरान; नापीक जमीन.

टापना–*क्रि. अ.* १. आशाळभूतपणें पाहात राहाणें; २. हैराण होणें. ३. वणवण फिरणें.–*क्रि. स.*[+] उडी मारणें; ओलांडणें.

टापर[+]–*पु.* १. पांघरावयाची चादर. २. तट्टावर बसणें.

टापा–*पु.* १. निर्जन व ओसाड मैदान. २. झांकण घालावयाचें टोपलें. **मु०– देना–** ओलांडणें; उडी मारणें.

टापा*–*पु.* टिळा; गंध.

टापू–*पु.* १. बेट; द्वीप. २. प्रदेश; टापू.

टाबर[+]–*पु.* १. लहान मूल; मुलगा. २ कुटुंब; कूळ.

टामन; टामनि–नी–*पु.* जादू; टोणा; तोडगा.

टार–*पु.* १. घोडा. २. भडवा; वेश्यांचा दलाल. ३* एक प्रकारचा नांगर.

टारना[+]–*क्रि. स.* पा० 'टालना'.

टाल– *स्त्री.* १. गवताची रास; ढीग. २. लांकूडफाटयाची वखार. ३. टाळाटाळी. **– टूल; – मटाल;**

–मटू(टो)ल–*स्त्री.* टाळाटाळी.

टालना–*क्रि. स.* १. टाळणें; दूर करणें; बाजूला सारणें. २. नाहींसें करणें; राहूं न देणें; ३. स्थगित करणें; पुढें ढकलणें. ४. वेळ दवडणें. ५. हुसकून लावणें.

टाली–*स्त्री.* जनावरांच्या गळ्यांतील घाट.

टिंड–डा–*पु.* एक फळभाजी.

टिंडी+*स्त्री.* नांगराचा दांडा; जात्याचा खुंटा.

टिकट–*पु.* [इं.] १. प्रवेशपत्र; तिकीट. २. कर; जकात.–**घर**–*पु.* जेथून तिकिटें विकण्यांत येतात तें ठिकाण; 'बुकिंग ऑफिस'. –**चेकर**–*पु.* तिकिटें तपासणारा.

टिकटिकाना+–*क्रि. अ.* १. टिकटिक आवाज होणें. २. घोडा इ० पाळीव जनावराला चालण्यासाठीं उत्तेजन देणें; तोंडानें चक् चक् असा आवाज काढणें.

टिकठी–*स्त्री.* १. तिकटी; घोडी. २. तिवई. ३. तिरडी. ४. फांशीची फळी; फांशी देण्याचें तिकाटणें.

टिकड़ा–*पु.* १. चकती; चपटा व गोल तुकडा. २. मोठी बाटी; रोट.

टिकना–*क्रि. अ.* १. टिकणें; स्थिर राहाणें. २. विरघळलेल्या पदार्थाचें तळाशीं बसणें. ३. टिकाव धरून राहाणें; उतरणें; थोडा वेळ मुक्काम करणें.

टिकली–*स्त्री.* १. टिकली; तीट. २. चांदणी. ३. लहान वडी.

टिकस–*पु.* [इं.] कर; जकात; 'टॅक्स'.

टिकसार+–*वि.* टिकाऊ.

टिकाऊ–*वि.* १. टिकणारा; मजबूत. २. कांहीं दिवस राहाणारा.

टिकान–व–*स्त्री.* १. थांबण्याची क्रिया. २. पडाव; मुक्कामाचें ठिकाण.

टिकाना–*क्रि. स.* १. उतरावयास जागा देणें; ठेवणें; उतरविणें. २. टिकविणें. [पडाव; मुक्काम.

टिकाव–*पु.* १. स्थिरता. २.

टिकिया–*स्त्री.* १. वडी; चकती; गोल लहान तुकडा. २. टिकली (कपाळावर लावतात ती). ३. बाटी; गाकर. ४. हुक्क्यांत घालावयाची तंबाखू; चिमणीवर ठेवावयाची कोळशाची गोल चकती.

टिकुरा+–*पु.* टेकडी; मातीचा ढीग.

टिकुरी–*स्त्री.* टकळी; चाती.

टिकुला+–*पु.* पा० 'टिकोरा'.

टिकुली–*स्त्री.* १. टिकली; बिंदी. २. टकळी; चाती.

टिकैत–*पु.* १. राजाचा वारसदार; युवराज. २. सरदार; अधिकारी.

टिकोरा–ला+–*पु.* १. कोवळी कैरी. २. पाडास आलेली कैरी.

टिक्कड़–*पु.* १. मोठी वडी. २. जाड रोटी; लाटी; बाटी

टिक्की–*स्त्री.* १. पा० 'टिकिया'. २. पत्त्यांतील ठिपका.

टिघलना–*क्रि. अ.* वितळणें; पातळ होणें.

टिचन–*वि.* [इं.] १. हजर; तयार. २. तत्पर; उद्युक्त.

टिटकारना–*क्रि. स.* जनावरांना हांकलतांना 'टिक टिक' (चक्-चक्) असा आवाज काढणें.

टिटिह–हा–*पु.*; **टिटिहरी**–*स्त्री.* टिटवी.

टिटिहारोर–*पु.* १. गडबड–गोंधळ; आरडा–ओरडा. २. पक्ष्यांचा चिवचिवाट. ३. रडणें-भेकणें.

टिड्डा–*पु.*; **टिड्डी**–*स्त्री.* टोळ. –**दल**–*पु.* टोळधाड.

टिढ़बिंगा; टिढ़बिड़ंगा–*वि.* वांकडातिकडा; वेडावांकडा.

टिपका*–*पु.* थेंब; बिंदु.

टिपटाप–*वि.* व्यवस्थित; टापटिपीनें राहाणारा.

टिपवाना–*क्रि. स.* १. दावविणें; प्रहार करविणें. २. लिहवून घेणें. [टोप.

टिपारा*–*पु.* मुकुट; किरीट;

टिपुर–*पु.* पाखंड; ढोंग.

टिप्पणी–नी–*स्त्री.* संक्षिप्त टीका; टिप्पण. [कुंडली.

टिप्पन–*पु.* जन्मटिपण; जन्म-

टिप्पस+–*स्त्री.* उपाय; युक्ति; क्लृप्ति. [डीचें टोंक.

टिबरी–*स्त्री.*; **टिब्बा**–*पु.* टेक-

टिमकी–*स्त्री* १. लहान भांडें. २. लहान मुलाचें पोट.

टिमटिमाना–*क्रि. अ.* १. मिणमिणणें; मंद जळणें; अंधुक प्रकाश देणें. २. धुगधुगी असणें; मरावयास टेकणें. [नट्टापट्टा.

टिमाक–*स्त्री.* साज शृंगार;

टिमिला+–*पु.* पोरगें.

टिम्मा+–*वि.* ठेंगू.

टिरफिस–*स्त्री.* उद्धटपणा; उद्दामपणा; विरोध.

टिलवा–*पु.* १. गांठाळ लाकूड. २. ठेंगू. ३. खुशामत्या.

टिहुकना+–*क्रि. अ.* १. रुसणें. २. दचकणें. ३. चमकणें.

टिहुनी+–*स्त्री.* १. पायाचा घोटा. २. हाताचा कोपरा. ३. गुडघा.

टींडी*–*स्त्री.* १. नांगराची मूठ. २. जात्याचा खुंटा. ३. टोळ.

टीकठ+–*पु.* पाठीचा कणा.

टीकरा–*पु.* उंचवटा; टेकाड.

टीका–*पु.* १. टिळा; मुद्रा; गंध (आपल्या संप्रदायानुसार). २. वाङ्‌निश्चय. ३. राज्याभिषेक. ४. ठिपका; डाग; चिन्ह. ५. देवी काढणें. ६. टीका; आलोचना; व्याख्या.–**टिप्पणी**– *स्त्री.* १. टीका; दोष–दर्शन. २. खुलासा. **मु०–काढ़ना**–१. जावळ किंवा मुंज याप्रसंगीं मुलाला कुंकुमतिलक लावून द्रव्य, भेट वगैरे देणें. २. भांगांत शेंदूर घालून घेणें.–**लगाना**–१. टिळा लावणें. २. इंजेक्शन देणें; देवी काढणें. [पत्रा; टिन.

टीन–*पु.* [इं.] लोखंडाचा

टीप– *स्त्री.* १. दाब; दडपण. २. उंच तान (गाण्याची). ३. नोंद; टिपण. ४. आंगठ्याचा ठसा. ५. जन्मटिपण.–**टाप**– *स्त्री.* सजावट; थाटमाट. [पा० 'घट्‌ठा'.

टीपन *पु.*+–जन्मकुंडली.– *स्त्री.*

टीपना–*क्रि. स.* १. दाबणें. २. हळू हळू ठोकणें. ३. लिहिणें; टिपणें. ४. तारस्वरांत गाणें.

टीबा–*पु.* उंचवटा; टेकडी.

टीमटाम– *स्त्री.* १. डामडौल; थाटमाट. २. टापटीप.

टीला–*पु.* १. टेकडी. २. मातीचा मोठा उंच ढीग. ३. उंचवटा.

टीस– *स्त्री.* ठणका; ठसठस.

टीसना–*क्रि. अ.* ठणकणें; थांबून थांबून वेदना होणें; ठणका लागणें.

टुंग+–*पु.* डोंगराचें गोल शिखर.

टुंगना–*क्रि. स.* १. कुरतडून खाणें; झाडाचे शेंडे खाणें. २. संकोचामुळें हळू हळू खाणें.

टुंच–*वि.* क्षुद्र; तुच्छ. **मु०–भिड़ाना; –लड़ाना**–१. कमी भांडवलावर व्यापार करणें. २. थोडया पैशावर जुगार खेळणें.

टुंटा-डा–*वि.* १. थोटें. २. फांद्या नसलेलें; मुंडें. ३. लुळा. [२. दंड.

टुंडी– *स्त्री.* १. नाभि; बेंबी.

टुइयाँ+–*वि.* ठेंगू.

टुक–*वि.* अल्प; थोडें.–*अव्य.* किंचित्; जरा.

टुकड़–'टुकड़ा'चें समासांतील रूप.–**खोर**–*वि.* भीक मागून खाणारा; आश्रित.–**गदा**–*पु.* भिकारी.–*वि.* १. क्षुद्र. २. दरिद्री. –**तोड़**–*वि.* परावलंबी; आश्रित.–*पु.* आश्रित व्यक्ति.

टुकड़ा–*पु.* १. तुकडा. २. उष्टें. **मु०–तोड़ना**–दुसऱ्यानें दिलेल्या अन्नावर जगणें.–**माँगना**–भीक मागणें. –**सा जवाब देना**–साफ सांगून टाकणें; नकार देणें.

टुकड़ी– *स्त्री.* १. लहान तुकडा. २. टोळी; झुंड. ३. सैन्याची तुकडी; 'कंपनी.'

टुकुर-टुकुर–*अव्य.* टकमकां; टक लावून. [नीच; दुष्ट.

टुच्चा–*वि.* तुच्छ; क्षुद्र;

टुटपुँजिया–*वि.* तुटपुंजा; ज्याच्याजवळ विद्या, पैसा इ० फार थोडें आहे असा.

टुटरूँ–*पु.* पारवा (पक्षी).-**टूँ**–*स्त्री.* पारव्याचा आवाज.–*वि.* १. एकटा. २. किडकिडीत. –*अव्य.* रुटुखुटु.

टुनगा–*पु.*; **टुनगी**–*स्त्री.* कोवळया डहाळीचा शेंडा; डिकशी.

टुनहाया–*वि. पु.* जादूटोणा करणारा; मांत्रिक. [–*स्त्री.* **टुन(नि) हाई**]. [देंठ.

टुन्ना–*पु.* फुलाचा किंवा फळाचा

टुर्रा–*पु.* तुकडा; धान्याचा कण; दाणा. [मुसमुसणें.

टुसकना+–*क्रि. अ.* रडणें;

टूंक+–*पु.* तुकडा.

टूँड़–*पु.* १. गहूं, मका वगैरेच्या कणसांचा अग्रभाग. २. डांस वगैरे कीटकांची सोंड.

टूँडी– १. लांब टोंक; गाजर, मुळा इ०चें टोंक. २. बेंबी.

टूक*– *पु.* तुकडा; भाग. **मु० दो टूक जबाब देना**–साफ सांगून टाकणें; नकार देणें.

टूट*– *वि.* तुटलेला; खंडित.–*स्त्री.* चूक.–**दार** – *वि.* घडीचें; 'फोल्डिंग'.

टूटना–*क्रि. अ.* १. तुटणें. २. फुटणें. ३. सांधा निखळणें. ४. रोडावणें. ५. गति खुंटणें.; व्यत्यय येणें. ६.* संतुष्ट होणें. **मु० टूट पड़ना**– १. अकस्मात् येणें. २. तुटून पडणें.

टूटा–*वि.* १. तुटलेला; खंडित. २. अशक्त; दुबळा. –**फूटा**–*वि.* मोडका-तोडका; मामुली; सामान्य.

टूठनि*– संतोष; समाधान.

टूम– *स्त्री.* १. दागिना. २. सुंदर स्त्री. ३. श्रीमंत स्त्री. ४. धूर्त माणूस. ५. धक्का. ६. टोमणा –**टाम**– *स्त्री.* दागदागिने; थाटमाट.

टूसा+–*पु.* **१**. टोंकदार कळी; बोंड. २. तुकडा. ३. एक फूल.

टूसी+– *स्त्री.* कळी; बोंड.

टें– *स्त्री.* पोपटाचें बोलणें.–**टें**–*स्त्री.* १. निरर्थक बडबड; वटवट. २. पोपटाचा शब्द. **मु०– बोलना**–तडकाफडकीं मरून जाणें.

टेंचन+–*पु.* खांब; टेकू.

टेंट– *स्त्री.* १. कनवट; कडोसरी. २. कापसाचें बोंड.

टेंटर+– *पु.* डोळयांत वाढलेली खुपरी (रोग).

टेंटी– *स्त्री.* पानें नसलेलें कांटेदार झुडूप; पा० 'करील'. –*वि.* भांडखोर; हुज्जत घालणारा.

टेंटुआ–वा–*पु.* गळा; नरडें.

टेक– *स्त्री.* १. टेकण; टेकू. २. आश्रय; आधार. ३. दृढ निश्चय; टक. ४. हट्ट दुराग्रह. ५. सराव; संवय. ६ निश्चय; प्रतिज्ञा. ७. गाण्याचें पालुपद. **मु॰–निबाहना**– संकल्प पूर्ण करणें.–**पकड़ना**–आग्रह धरणें; हट्ट करणें.

टेकन–*पु.* टेकू; आधार.

टेकना– *क्रि. स.* १. टेकणें. २. लवंडणें; विसांवा घेणें. ३. आधार घेणें; धरणें. [टेकाड.

टेकरा– *पु.* लहान टेकडी; ऊंच

टेकरी– *स्त्री.* टेकडी; ढीग.

टेकला*– *स्त्री.* नाद; छंद; वेड.

टेकान– *स्त्री.* १. टेकू; टेकण. २. ओझेवाले आपलें ओझें ज्यावर टेकवितात तो चबुतरा.

टेकाना–*क्रि. स.* आधार देणें; उचलून घेण्यास मदत करणें.

टेकी–*वि. पु.* १. दृढनिश्चयी माणूस; टेकीचा माणूस. २. हट्टी, दुराग्रही माणूस.

टेकुआ–*पु.* १. चरख्याची चाती; तकली. २. टेकू; टेकण.

टेकुरी– *स्त्री.* १. टकळी; चाती. २. दोर वळण्याचें चाक. ३. आरी (चांभाराचें टोंचण्याचें हत्यार).

टेढ़बिड़ंगा–*वि.* वांकडा-तिकडा.

टेढ़ा–*वि.* १. वांकडा; तिरपा. २. कठिण; दुष्कर. ३. उर्मट; उद्दाम. **–ई**– *स्त्री.* वांकडेपणा. **–पन**–*पु.* वक्रता; वांकडेपणा. **–मेढ़ा**–*वि.* वांकडा; वांकडा तिकडा. **मु॰ टेढ़ी खीर**–दुष्कर, कठिण काम.

टेढ़े–*अव्य.* तिरकसपणानें; वांकडे-तिकडे. **मु॰– जाना**–घमेंड करणें.

टेना–*क्रि. स.* १. धार लावणें; पाजळणें. २. मिशीला पीळ देणें.

टेनी[+]– *स्त्री.* करंगळी. **मु॰–मारना**– वजन करतांना करंगळीनें दांडी दाबणें; माल कमी देणें; फसविणें.

टेम– *स्त्री.* दिव्याची ज्योत.

टेर– *स्त्री.* १. धांवा; आर्त स्वरानें मारलेली हांक. २. तान; उंच स्वर.

टेरना–*क्रि. स.* १. आर्त स्वरानें हांक मारणें; धांवा करणें. २. उंच स्वरांत गाणें.

टेव– *स्त्री.* संवय; सराव; व्यसन. **मु॰– पड़ना**– संवय लागणें.

टेवकी[+]– *स्त्री.* शीड.

टेवना[+]–*क्रि. स.* १. पा॰ ‘टेना’. २. मिशांना पीळ भरणें.

टेसू– *पु.* १. पळसाचें फूल. २. होळीचा उत्सव. ३. मुलांचा एक खेळ. [‘टॅंक’.

टैंक–*पु.* [इं.] चिलखती गाडी;

टैकनौलॉजी– *स्त्री.* [इं.] औद्योगिक कलांविषयक शास्त्र; तंत्रज्ञान; ‘टेक्नॉलॉजी’.

टैक्स–*पु.* [इं.] कर; महसूल.

टैना[+]–*पु.* शेतांतील बुजगावणें.

टोंक–का[+]–*पु.* टोंक; किनारा.

टोंचना–*क्रि. स.* १. टोचणें; भोसकणें. २. गोंदणें.–*पु.* टोमणा.

टोंटा–*पु.* तोटी; नळ. [–*स्त्री.* **टोंटी**]. [चोंचीचा पोपट.

टोइयाँ[+]– *स्त्री.* पिवळ्या

टोक– *स्त्री.* अडवणूक; चौकशी; अडथळा.

टोकना–*क्रि. स.* हटकणें; अडविणें.–*पु.* १. हंडा. २. मोठी टोपली; हारा.

टोकनी– *स्त्री.* १. लहान टोपली. २. लहान घागर (कळशी). ३. पातेलें.

टोकरा–*पु.* मोठी टोपली; हारा.

टोकरी– *स्त्री.* टोपली.

टोकवा[+]–*पु.* खोडकर मुलगा.

टोकारा[+]–*पु.* इशाऱ्याचा शब्द.

टोटका–*पु.* तोडगा; मंत्रतंत्र; चेटूक. [णारी बाई; चेटकीण.

टोटकेहाई– *स्त्री.* मंत्रतंत्र कर-

टोटा–*पु.* १. तोटा; हानि. २. तुकडा. ३. काडतूस. [बेंबी.

टोडी– *स्त्री.* १. तोडी राग. २.

टोनहा; टोनहाया–*पु.* जादूटोणा करणारा माणूस; मांत्रिक. [चेटुक.

टोना–*पु.* जादूटोणा; मंत्रतंत्र;

टोप–पा–*पु.* शिरस्त्राण; टोप; मोठी टोपी; ‘हॅट’. [टोपी.

टोपी– *स्त्री.* १. टोपी. २. कान-

टोभ[+]–*पु.* शिवण; टांका.

टोया[+]–*पु.* खळगा.

टोर[+]– *स्त्री.* कटचार.

टोल– *स्त्री.* १. संस्कृत पाठशाळा. २. टोळी; झुंड.–*पु.* [इं.] प्रवाशांकडून घेतला जाणारा एक कर; जकात.

टोला–*पु.* १. पेठ; मोहल्ला; गंज; वस्तीचा एक मोठा भाग. २. दगड किंवा विटेचा तुकडा.

टोली– *स्त्री.* १. टोळी; झुंड; २. पेठ; विभाग; वस्तीचा लहान भाग.

टोह– *स्त्री.* १. तपास; चौकशी; शोध. २. देखरेख. **मु॰–लगाना; –लेना**–शोध लावणें; तपास करणें.

टोहक विमान–*पु.* टेहेळणी करणारें विमान; टेहेळें विमान; ‘रिकानेसेन्स प्लेन’.

टोहना–*क्रि. स.* १. धुंडाळणें; शोधणें. २. चांचपडणें. [धुंडणें.

टोहाटाई– *स्त्री.* शोध; तपास;

टोहिया–*वि. पु.* १. शोधणारा; तपास करणारा. २. गुप्तचर.

टौर[+]–*पु.* डावपेंच.

टौरना[+]–*क्रि. स.* १. पारखणें. २. धुंडाळणें.

ट्रेन– *स्त्री.* [इं.] आगगाडी.

ठ

ठ– देवनागरी वर्णमालेच्या ट वर्गांतील दुसरा वर्ण.

ठंठ– *वि.* पानें नसलेला; बोडका; वठलेला (वृक्ष).

ठंठार– *वि.* रिकामा; रिक्त.

ठंड; ठंडक– *स्त्री.* १. थंडी; गारवा; गारठा. २. हिंवाळा.

ठंडा– *वि.* १. थंड; गार. २. विझलेला. ३. श्रीहीन. पा० 'ठंढा'.

ठंडी लड़ाई– *स्त्री.* शीतयुद्ध; 'कोल्ड वॉर'. [थंडी.

ठंढ– *स्त्री.* गारवा; गारठा;

ठंढक– *स्त्री.* १. गारवा; गारठा; थंडी. २. संतोष; तृप्ति.

ठंढा– *वि.* १. थंड; थंडगार. २. शांत; गंभीर. ३. विझलेला. ४. आवेश किंवा जोम नसलेला; उदासीन. ठंढे ठंढे–*अव्य.* १. मुकाटयानें. २. आनंदानें; हंसत खेळत. ३. थंड वेळीं; कडक ऊन्ह पडण्यापूर्वी. **मु०–करना**– राग शांत करणें. **–होना**–मरणें. **ठंढी आग**–हिम; दंव. **ठंढी साँस**–निःश्वास (दुःखाचा); उसासा.

ठंढाई– *स्त्री.* गुलाबाच्या पाकळ्या, खरबुजाच्या बिया इ० वस्तू घालून बनविलेलें थंड पेय.

ठक– *स्त्री.* दोन वस्तूंचा एकमेकांवर आपटण्याचा आवाज. –*वि.* थक्क; आश्चर्यचकित. **–ठक** –*स्त्री.* १. कटकट. २. ठकठक आवाज. ३. तंटा; झगडा; भानगड. **मु० –हो जाना**– थक्क होणें; चकित होणें. [वर्णे. २. टकटक करणें.

ठकठकाना– *क्रि. स.* १. ठोठा-

ठकठकिया– *वि.* भांडखोर; भांडकुदळ. [आर्जव.

ठकुरसुहाती– *स्त्री.* खुशामत;

ठकुराइन– *स्त्री.* १. मालकीण. २. ठाकुराची पत्नी; क्षत्रिय स्त्री. ३. राणी. ४. न्हाव्याची बायको.

ठकुराई–– *स्त्री.* १. मोठेपणा; प्रौढी; टेंभा. २. ठाकुरांची जहागीर.

ठकुरानी– *स्त्री.* १. मालकीण. २. जमीनदार, ठाकुर सरदार इ० ची बायको. ३. क्षत्रिय पत्नी.

ठकोरी– *स्त्री.* आधार घेण्याची विशेष प्रकारची काठी.

ठग– *पु.* ठक; कपटी; धूर्त; लबाड (माणूस). **–पना**– *पु.* फसवेगिरी; धूर्तपणा. **–मूरी**– *स्त्री.* बेशुद्ध करणारी एक वनस्पति. (ठग, लुच्चे लोक ही वापरीत असत). **–विद्या**–*स्त्री.* फसवेगिरी.

ठगना–*क्रि. स.* फसविणें; ठकविणें. –*क्रि. अ.**– १. फसणें; चकणें; फसविलें जाणें. २. थक्क होणें.

ठगनी– *स्त्री.* १. फसविणारी स्त्री. २. कुंटीण. ३. ठकाची बायको.

ठगवाना–*क्रि. स.* दुसऱ्याकडून फसविणें.

ठगिन-नी– *स्त्री.* १. फसविणारी स्त्री. २. ठकाची (बायको).

ठगिया$^+$–*पु.* ठक.

ठगी– *स्त्री.* १. फसवेगिरी; धूर्तपणा. २. ठकाचा पेशा.

ठगोरी*– *स्त्री.* जादूटोणा; जादूगिरी.

ठट–*पु.* १. वस्तूंचा किंवा लोकांचा एकाच ठिकाणीं जमलेला थवा; गर्दी. २. रचना; सजावट; बनावट.

ठटकना–*क्रि. अ.* १. थबकणें; अडणें. २. नटणें; थाटमाट करणें.

ठटकीला–*वि.* सजलेला; नटलेला.

ठटना–*क्रि. स.* १. ठरविणें; निश्चित करणें. २. तयार करणें. ३. आरंभ करणें.–*क्रि. अ.* १. अडणें; दृढ निश्चयानें उभें राहाणें. २. सुसज्जित होणें.

ठटनि*– *स्त्री.* १. रचना; बनावट. २. तयारी.

ठटरी– *स्त्री.* १. सांगाडा; हाडांचा सापळा. २. तिरडी. **मु० –होना**– अत्यंत कृश होणें.

ठटवारी*– *स्त्री.* पा० 'टट्टी'.

ठट्ट–*पु.* पा० 'ठट'.

ठट्टा–*पु.* थट्टा; विनोद. **मु०–मारना**; **–लगाना**– खदखदून हंसणें.

ठठ–*पु.* पा० 'ठट'.

ठठई*– *स्त्री.* थट्टामस्करी; विनोद. ['ठिठकना'.

ठठकना–*क्रि. अ.* पा०

ठठना$^+$–*क्रि. अ.* घुसणें; शरीरांत शिरून मोडणें (कांटा इ०).

ठठरी– *स्त्री.* १. हाडांचा सांपळा. २. गवत, चारा इ० बांधण्याचें जाळें. ३. तिरडी. ४. सांचा; सांगाडा.

ठठाना–*क्रि. स.* मारणें; चोप देणें.–*क्रि. अ.* खदखदून हंसणें; जोरानें खिदळणें.

ठठेरा–*पु.* धातूचीं भांडीं बनविणारा; तांबट; कासार. **मु०–(रे)की बिल्ली**– १. धीट, उद्धट, बेमुर्वत व्यक्ति. २. जिच्यावर कशाचाहि परिणाम होत नाहीं अशी व्यक्ति. [किंवा त्याचें काम.

ठठेरी– *स्त्री.* तांबटाची बायको

ठठोल–*वि.* थट्टेखोर; विनोदी. –*पु.* थट्टा; विनोद.

ठठोली– स्त्री. थट्टामस्करी; विनोद; चेष्टा.

ठड़कना+–क्रि. अ. थांबणें.

ठड़ा–ढ़ा+– वि. उभा; सरळसोट. [उखळी.

ठड़ि(ढ़ि)या; **ठडुई**– स्त्री.

ठड्डा+–पु. १. पाठीचा कणा. २. पतंगाला लावलेली उभी काडी.

ठनकना–क्रि. अ. १. ठणकणें; दुखणें. २. ठणठण वाजणें. ३. शंका उत्पन्न होणें.

ठनगन–पु. १. मंगल प्रसंगीं नातेवाईक व आश्रित यांचेकडून मोठा आहेर मिळण्याबद्दल अडून बसणें. २. अकारण हट्ट; जिद्द.

ठन-ठन– स्त्री. ठणठण असा आवाज.**–गोपाल**–पु. १. दरिद्री; कंगाल; गरीब. २. पोकळ, दिखाऊ, निःसत्त्व वस्तु. ३. ठणठणपाळ.

ठनना–क्रि. अ. १. ठरणें; निश्चित किंवा पक्कें होणें. २. तत्परतेनें कामाला सुरुवात करणें. ३. मनाचा निश्चय होणें. ४. उद्युक्त असणें; तयार होणें.

ठप–वि. बंद; अचानक थांबलेलें; ओंफस. [आघात.

ठपका*–पु. धक्का; ठोकर;

ठप्पा–पु. १. वेलबुट्टीचा कापडावर छापण्याचा ठसा; शिक्का; छाप. २. ठशानें काढलेली वेलबुट्टी.

ठभोली– स्त्री. पा० 'ठठोली'.

ठमक– स्त्री. ठुमकत चालणें; नखऱ्याची चाल; चालतांना तोऱ्यांत थांबणें.

ठमकना–क्रि. अ. १. ठुमकत, मुरडत चालणें. २. दचकून थांबणें.

ठयना*–क्रि. स. १. स्थापन करणें; बसविणें. २. ठाम निश्चयानें आरंभ करणें. ३. ठरविणें.–क्रि. अ. १. स्थिर होणें; जमणें; बसणें. २. ठरणें.

ठरना–क्रि. अ. १. थिजणें; थंडगार पडणें. २. कुडकुडणें.

ठरमरुआ; **ठरुआ**–वि. गारांच्या माऱ्यानें नष्ट झालेलें (पीक).

ठर्रा+–पु. १. मोहाची दारू; शिंदी; ताडी. २. जाड धागा; दोरखंड. ३. चोळीचे बंद. ४. बेडौल मोती.

ठवन–नि*– स्त्री. १. बसण्याची किंवा उभें राहण्याची ढब; बैठक; आसन. २. मुद्रा.

ठस–वि. १. भरीव. २. दाट विणीचें; घट्ट (कापड). ३. बद; बद्दा (रुपया). ४. आळशी. ५. कंजूष. ६. निरर्थक. ७. हट्टी; कडक.

ठसक– स्त्री. १. अभिमान; गर्व. २. ताठा; टेंभा; तोरा; नखरा. [लेला; भरगच्च.

ठसाठस–अव्य. ठांसून भर-

ठस्सा+–पु. १. ऐट; तोरा; नखरा; ठसका. २. नक्षीकामाचें एक अवजार.

ठहना; **ठहनाना***–क्रि. अ. १. घोड्याचें खिंकाळणें. २. घंटा घणघणणें. ३. सजणें. ४. कामांत गढून जाणें.

ठहर*–पु. १. स्थान; जागा. २. स्वयंपाकघर; सारवलेली जागा.–क्रि. अ. थांब.

ठहरना–क्रि. अ. १. थांबणें. २. (एखाद्याच्या घरीं) उतरणें; मुक्काम करणें; राहाणें. ३. टिकाव धरणें; स्थिर राहाणें. ४. वाट पाहाणें. ५. निश्चित होणें; पक्के होणें; ठरणें. ६. धीर धरणें.

ठहराई– स्त्री. ठेवून घेण्याची, ठरविण्याची क्रिया किंवा मोबदला.

ठहराऊ–वि. १. टिकाऊ. २. राहाणारा; उतरणारा.

ठहरान–पु. १. निश्चितता; स्थैर्य. २. ठराव; निर्धार.

ठहराना–क्रि. अ. १. थांबविणें; अडविणें; आडकाठी करणें. २. उतरून घेणें; जागा देणें. ३. ठरविणें; निश्चित करणें.

ठहरानी– स्त्री. हुंडा, करणी इ० विषयीं केलेला करार; ठराव.

ठहराव–पु. १. निश्चय; ठराव; करार. २. स्थिरता; थांबणें.

ठहरौनी– स्त्री. पा० 'ठहरानी'.

ठहाका–पु. खो खो करून हसणें; जोराचें हास्य. **मु०–मारना**;**–लगाना**–खदखदून हंसणें.

ठहियाँ– स्त्री. स्थान; जागा.

ठाँ; **ठाँई–ऊँ***– स्त्री. १. ठाव; स्थान; जागा; ठिकाण. २. ठो; बंदुकीचा आवाज.–अव्य. १. जवळ; निकट. २. विषयीं; बाबतींत.

ठाँठ–वि. १. शुष्क; नीरस. २. दूध नसलेली; खाटी; भाकड (गाय किंवा म्हैस).

ठाँय– स्त्री. १. बंदुकीचा ठो-ठो आवाज. २. झगडा; तंटाबखेडा. –पु. १. स्थान; जागा. २. संधि.

ठाँव–पु. १. स्थान; जागा. २. संधि; मोका.

ठाँसना–क्रि. स. ठासणें; खच्चून भरणें. [ठिकाण.

ठाँह–पु. स्थान; जागा;

ठाकुर–पु. १. देवदेवता. २. श्रीकृष्ण. ३. क्षत्रियांची पदवी. ४. मालक; स्वामी.**–द्वारा**–पु. १. देवस्थान; देवालय. २. पुरीचें जगन्नाथमंदिर.**–बाडी**– स्त्री. देवालय; मंदिर.**–सेवा**– स्त्री. देवपूजा; पूजाअर्चा

ठाट–पु. १. तट्टचा. २. चौकट. ३. सांचा; आराखडा. ४. थाटमाट;

शृंगार; सजावट. ५. दिमाख; दिखाऊपणा. ६. हाडांचा सांगाडा. ७. तऱ्हा; ऐट.–**बाट–पु.** थाटमाट; सजावट; पोकळ डौल; दिमाख. **मु०–बदलना–** १. वेश बदलणें. २. प्रौढी मिरविणें.–**मारना**–चैन करणें.

ठाटना*–*क्रि. स.* १. थाटणें; रचणें; बनविणें; निर्माण करणें. २. दृढ संकल्प करणें.

ठाटर–पु. १. तरट. २. थाटमाट. ३. अस्थिपंजर; हाडांचा सांगाडा. ४. कबुतरांचें खुराडें, अड्डा.

ठाठ–पु. पा० 'ठाट'.

ठाढ़–ढ़ा*–*वि.* १. उभा राहिलेला. २. सबंध; पूर्ण. ३. उत्पन्न झालेला. **मु०–(ढ़ा) देना**–१. उतरविणें; मुक्काम करविणें. २. ठिय्या देणें.

ठादर*–*पु.* झगडा; तंटा.

ठान– *स्त्री.* १. ठाम निश्चय; संकल्प. २. कार्यारंभ. ३. अंगविक्षेप; नखरा.

ठानना–*क्रि.स.* १. ठाम निश्चय करणें; ठरविणें. २. सुरू करणें.

ठाना*–*क्रि. स.* १. दृढ संकल्प करणें; निश्चय करणें. २. निश्चयपूर्वक कामाला आरंभ करणें. ३. खरें करून दाखविणें.

ठाम*–*पु.* १. स्थान; जागा; ठिकाण. २. मुद्रा; अंगविक्षेप.

ठायँ– *पा०* 'ठाँयँ'; 'ठाँव'.

ठार–पु. १. कडाक्याची थंडी. २. हिमवर्षाव; दंव.

ठाल⁺– *स्त्री.* सवड; फुरसत; रिकामटेकडेपणा.

ठाला–पु. १. बेकारी; उद्योगधंदा नसणें; २. रिकामटेकडेपणा; फुरसत. –*वि.*–बेकार; काम-धंदा नसलेला; निरुद्योगी; रिकामटेकडा. [टेकडा.– *स्त्री.* धीर.

ठाली–*वि.* बेकार; रिकाम-

ठावँ–पु. *पा०* 'ठाँव'.

ठावना*–*क्रि. स. पा०* 'ठाना'.

ठाह– *स्त्री.* संगीतांतील विलंबित गति; ठाय.

ठाहर–रू–*पु. १. ठिकाण; जागा. २. घर; निवासस्थान.

ठिंगना–*वि.* ठेंगणा; खुजा; गिड्डा. [बंदोबस्त.

ठिकठैन–ना*–पु. व्यवस्था;

ठिकरा⁺–*पु. पा०* 'ठीकरा'.

ठिकरौर–*वि.* खापरीचे तुकडे असलेली (जमीन).

ठिकाना–पु. १.ठिकाणा; स्थान. २. ठावठिकाणा; पत्ता. ३. निवासस्थान; घर. ४. मर्यादा; सीमा. ५. व्यवस्था; बंदोबस्त. ६. स्थैर्य; निश्चितता. **मु०–लगना** – आश्रयस्थान किंवा नोकरी इ. मिळणें. **–(ने) की बात**–शहाणपणाची, योग्य गोष्ट.–**(ने) लगाना–** १. मारून टाकणें. २. निकाल लावणें.

ठिठकना–*क्रि. अ.* १.थबकणें; एकाएकीं थांबणें. २. आश्चर्यचकित होणें; थक्क होणें. ३.स्तब्ध राहाणें.

ठिठ(ठु)रना–*क्रि. अ.* थंडीनें काकडणें; कुडकुडणें.

ठिनकना–*क्रि. अ.* लहान मुलांचें थांबून थांबून रडणें; खोटें रडणें. [स्थान.

ठिया⁺–*पु.* वन्य पशूंचें निवास-

ठिर– *स्त्री.* कडाक्याची थंडी; दंव.

ठिरना–*क्रि. अ.* १. कडाक्याची थंडी पडणें. २. कुडकुडणें; काकडणें. [खदून हंसणें.

ठिलठिलाना⁺–*क्रि. अ.* खद-

ठिलाठिल*–*अव्य.* रेटारेटीनें; धक्काबुक्की करीत. [लहान घागर.

ठिलिया–*स्त्री.* मातीची कळशी;

ठिलुआ–*वि.* १. सुस्त; आळशी. २. निरुपयोगी; कुचकामी. ३. बेकार; निरुद्योगी; रिकमटेकडा.

ठिहारी*–*स्त्री.* निश्चय; ठराव; करार. –*वि.*– नक्की; पक्की (गोष्ट).

ठीक–*वि.* १. बरोबर; अचूक; नीट. २. योग्य; उपयुक्त. ३. शुद्ध. ४. संपूर्ण. –*अव्य.* १. सरळ. २. योग्य प्रकारें. ३. हुबेहूब. **–ठीक–** *वि.* व्यवस्थित; नीट.

ठीकड़ा–रा–पु. १. मातीच्या भांड्याचा लहान तुकडा; खापर. २. भिक्षापात्र. ३. फुटलेलें भांडें. ४. तुच्छ वस्तु; रुपया–पैसा.

ठीक ी– *स्त्री.* १. बारीक तुकडा; ठिकरी. २. तुच्छ वस्तु.

ठीका–पु. मक्ता; ठेका.**–(के) दार–पु.** मक्तेदार; कंत्राटदार.

ठीठी–*स्त्री.* १ खुदुखुदु हंसण्याचा आवाज. २. वाह्यातपणें, फिदीफिदी हंसणें. [जबरदस्तीनें पाठविणें.

ठीलना*–*क्रि. स.* ढकलणें;

ठीवन*–पु. थुंकी; खाकरा; बेडका.

ठीहा–पु. ठिय्या; जमिनींत पुरलेला लाकडाचा ठोकळा. २. बसण्याकरितां तयार केलेली उंच जागा. ३. वेदी. ४. गादी.

ठुंठ–पु. १. वठलेलें, वाळलेलें झाड. २. थोटा माणूस.

ठुकना–*क्रि. स.* बेदम मार खाणें; चोप बसणें.

ठुकराना–*क्रि. स.* १. ठोकर मारणें; लाथाडणें. २. क्षुद्र लेखणें. ३. धुडकावून लावणें.

ठुकवाना–*क्रि. स.* मार देवविणें; चोप देवविणें.

ठुड्डी–*स्त्री.* हनुवटी. **मु०–पकड़ना**–खुशामत करणें.

ठुनकना–*क्रि. अ.* १. थबकणें. २. स्फुंदणें; मुसमुसणें. –*क्रि. स.* हळूहळू ठोकणें.

ठुमक–*वि.* नखऱ्याची (चाल). –**ठुमक**–*अव्य.* नखऱ्यांत; तोऱ्यांत.

ठुमकना–*क्रि. अ.* १. उडचा मारीत चालणें (लहान मुलांचें). २. पायांना घुंगरू बांधून ठुमकत ठुमकत चालणें; नखऱ्यानें चालणें.

ठुमकी–*स्त्री.* १. हिसका; झटका पतंग उडवितांना दिला जाणारा). २. लहान पुरी. –*वि. स्त्री.* ठेंगणी; बुटकी.

ठुमरी–*स्त्री.* संगीतांतील एक प्रकार.

ठुरिआ(या)ना–*क्रि. स.* कांकडणें; कुडकुडणें.

ठुर्री–*स्त्री.* गणंग; माजल्यानंतर ज्याची लाही बनत नाहीं असा दाणा.

ठुसना–*क्रि. अ.* ठांसलें जाणें.

ठूँग–*स्त्री.* १. चंचुप्रहार; चोंच मारणें. २. बोट वांकवून त्यानें आघात करणें.

ठूँठ-ठा–*वि.* १. वठलेलें; फांद्या व पानें नसलेलें (झाड). २. थोटा (मनुष्य); लुळापांगळा.

ठूँठिया[+]–*वि.* १. लुळा. २. २. नपुंसक. [रेचे सड, खुंट.

ठूँठी–*स्त्री.* ज्वारी, बाजरी वगै-

ठूँ(ठू)सना–*क्रि. स.* १. ठांसून भरणें; खच्चून भरणें. २. चापून खाणें; आकंठ खाणें. ३. खुपसणें. ४. कोंबणें.

ठेंगा–*पु.* १. आंगठा. २. सोटा; बडगा. **मु०–दिखाना**–१. नकार देणें. २. निराश करणें. [लोढणें.

ठेंगुर[+]–*पु.* गुराच्या गळचांतील

ठेंठी–*स्त्री.* १. कापसाचा बोळा (कानांतील). २. कानांतील मळ. ३. बूच.

ठेंपी[+]–*स्त्री.* बूच; बोळा.

ठेक–*पु.* १. आधार; टेकू. २. पाचर.

ठेका–*पु.* १. ठेका (तवल्याचा). २. डग्गा. ३. अड्डा. ४. टेकू; टेकण. ५. पा० 'ठीका'.

ठेकाना*–*पु.* ठिकाण; मुक्कामाची जागा.

ठेगना*–*क्रि. स.* १. टेकणें; आधार घेणें. २. मनाई करणें; अनुमति न देणें.

ठेठ–*वि.* १. अगदीं; केवळ. २. अस्सल; शुद्ध; थेट. ३. असाहित्यिक; बोलण्यांतील (भाषा).–*स्त्री.* ग्रामीण भाषा; बोलण्यांतील भाषा.

ठेप[+]–*पु.* दिवा.

ठेपी–*स्त्री.* बाटलीचें बूच.

ठेलना–*क्रि. स.* ढकलणें; धक्का देणें; रेटणें. [–*अव्य.* दाटीवाटीनें.

ठेलमठेल–*स्त्री.* गर्दी; रेटारेटी.

ठेला–*पु.* १. सामान वाहून नेण्याची हमालाची हातगाडी; खटारा. २. धक्का; टक्कर.–**ठेल–***स्त्री.* गर्दी; खेंचाखेंची.

ठेस–*स्त्री.* १. मार; आघात. २. धक्का; ठेंच.

ठैन–याँ–**स्त्री.* स्थान; ठिकाण. –*अव्य.* जवळ; निकट.

ठोंक–*स्त्री.* १. आघात. २. चोपणी; जमीन सपाट करण्याचें काम.

ठोंकना–*क्रि. स.* १. ठोकणें; चोपणें. २. मारणें. ३. गाडणें. ४. प्रेमानें थोपटणें. **मु०–बजाना**–नीट पारखून घेणें.

ठोंग–*स्त्री.* पा० 'ठूँग'.

ठोंग(च)ना–*क्रि. स.* १. चोंचीनें प्रहार करणें; चोंच मारणें. २. बोटाच्या मधल्या अगर शेवटच्या हाडानें आघात करणें.

ठोंगा–*पु.* दुकानदार ग्राहकांना जिच्यांतून माल देतो ती कागदाची पिशवी.

ठो[+]–*अव्य.* संख्यावाचक शब्दाबरोबर येणारा, विशेष अर्थ नसलेला शब्द (एक ठो = एक).

ठोकर–*स्त्री.* १. ठेंच. २. ठोकर; लाथ. **मु०–खाते फिरना**–१. निरर्थक पायपीट करणें. २. ठोकर खाणें; अयशस्वी होणें.–**(रों) पर पड़ा रहना**–अपमान सहन करून राहाणें.

ठोट–*वि.* १. मूर्ख; गावंढळ. २. सारहीन; निरर्थक.

ठोठ[+]–*वि.* १. थोटा; मुंडा. २. वेगळ्या प्रकारचा.

ठोठरा*–*वि.* १. तोंडाचें बोळकें झालेला. २. पोकळ; रिकामा.

ठोठी–*स्त्री.* १. टरफल. २. अफूचें बोंड.

ठोड़ी-ढ़ी–*स्त्री.* हनुवटी.

ठोप[+]–*पु.* थेंब; बिंदु.

ठोर–ल–*पु.* १. पाकांतील पुरी. २.* चोंच. [बूत; बळकट.

ठोस–*वि.* १. भरीव. २. मज-

ठोली–*स्त्री.* थट्टा; मस्करी.

ठोसा–*पु.* पा० 'ठेंगा'.

ठोहना*–*क्रि. स.* शोधणें; तपास काढणें.

ठौर–*पु.* ठिकाण; जागा. **मु०–ठिकाना**–राहाण्याचें स्थान; पत्ता. जागा.–**कुठौर**–वाईट जागा.–**न आना**–जवळ न येणें.–**रखना**–ठार मारणें. –**रहना**–१. जागच्या जागीं पडून राहाणें. २. मरणें.

ड

ड–देवनागरी वर्णमालेच्या टवर्गांतील तिसरा वर्ण.

डंक–पु. १. नांगी; दंश; डंख. २.* डंका. **मु०–मारना**–नांगी मारणें; दंश करणें.

डंकना*–क्रि. अ. १. भयंकर आवाज काढणें. २. तोफेचें गडगडणें.

डंका–पु. १. नगारा; डांगोरा; डंका. २. ढोलकें. **मु० डंके की चोट कहना**–जाहीरपणें सांगणें; दवंडी पिटून सांगणें; निधडेपणानें सर्वांच्या समोर सांगणें. [नांगी, डंख मारणें.

डँकिआ (या)ना+–क्रि. स.

डंकिनी–स्त्री. डाकीण; हडळ.

डंकी+–स्त्री. १. कुस्तींतील एक पेंच. २. एक कसरत. –वि. दंशवाला; मनांत दंश ठेवणारा.

डँकीला+–वि. नांगी मारणारा; दंश असलेला.

डँकौरी+–स्त्री. गांधीलमाशी.

डंगर–पु. पशु; गुरेंढोरें. –वि. १. हडकुळा. २. जडबुद्धि; मूर्ख.

डँगरा+–पु. टरबूज; कलिंगड.

डँगरी–स्त्री. १. लांब काकडी; वाळूक. २ हडळ; डाकीण.

डँटैया*–पु. दटावणारा; धमकावणारा.

डंठल–पु. १. डहाळी. २. फळ, फूल इ० चा देठ. ३. धान्याचें ताट.

डंड–पु. १. सोटा; दंडा. २. दंड (हाताचा). ३. व्यायामाचा एक प्रकार; जोर. ४. शिक्षा (दंड). **–पेल**–पु. पहिलवान; कसरत करणारा. **मु०–पेलना**–जोर काढणें.

डंडना*–क्रि. स. दंड देणें; शिक्षा करणें. [कुंपण; आवाराची भिंत.

डँड़वारा–पु.; **डँड़वारी**–स्त्री.

डंडा–पु. १. दंडुका; सोटा. २. आवार; कुंपण. **–बेड़ी**–स्त्री. लांब सळचा असलेली बेडी; दंडाबेडी. **मु०–बजाते फिरना** –वणवण भटकणें.

डँडा–पु. बाहु.

डँड़िया–स्त्री. १. पट्टे पट्टे असलेलें लुगडें; दंडिया; बांड. २. गव्हाची ओंबी.–पु. कर वसूल करणारा.

डंडी–स्त्री. १. छडी. २. दस्ता; मूठ. ३. तराजूची दांडी. ४. फुलाचा, फळाचा दांडा किंवा देठ. ५. दंडी (संन्याश्यांचा एक प्रकार). ६. छत्रीचा दांडा. **–मार**–वि. वजनांत फसविणारा. –पु. दुकानदार. **मु० –मारना**–वजनांत फसविणें; कमी देणें.

डंडूल*–पु. वावटळ; वादळ.

डँडोरना–क्रि. स. धुंडाळणें; हुडकणें.

डंडौत*–पु. दंडवत; प्रणाम.

डंफना–क्रि. अ. जोरानें ओरडणें किंवा रडणें.

डंबर–पु. १. थोतांड; पाखंड. २. एक प्रकारचा चांदवा. ३. विस्तार.; ४. व्यवस्था. ५. सौंदर्य. –वि. प्रसिद्ध.

डँवरुआ–पु. संधिवात.

डँवाँडोल–वि. डळमळीत; विचलित; गोंघळलेला.

डंस–पु. १. मोठा डांस. २. विषारी किडयांनीं डंख मारलेली जागा.

डँसना–क्रि. स. पा० 'डसना.'

डक–पु. [इं. 'डॉक'] १. एक प्रकारचें चिवट, मजबूत व घट्ट विणीचें कापड. २. गोदी; 'डॉक.'

डकइत–पु. पा० 'डकैत'.

डकरना–क्रि. अ. १. ढेकर देणें. २. खाऊन तृप्त होणें.

डकराना–क्रि. अ. डरकाळी फोडणें; गरजणें. [गप्प राहाणें.

डकार–पु. ढेकर. **मु०–न लेना**–

डकारना–क्रि. अ. १. ढेकर देणें; खाऊन तृप्त होणें. २. परद्रव्याचा अपहार करणें. ३. डरकाळी फोडणें. [डेखोर.

डकैत–पु. डाकू; लुटारू; दरव-

डकैती–स्त्री. दरवडा; डाका.

डकौत; डकौतिया+–पु. ज्योतिष्याचें सोंग करणारा; कुडमुड्या ज्योतिषी.

डग–पु. चालतांना दोन पावलांत असणारें अंतर; पाऊल; कदम. **मु०–भरना**–पुढें पाऊल टाकणें. **–मारना**–लांब लांब पावलें टाकणें.

तवाज़ा– स्त्री. [अ.] १. मानसन्मान; आदरसत्कार. २. आतिथ्य; आगतस्वागत.

तवाना–वि. [फा.] बलवान्; सामर्थ्यवान्.

तवाना–क्रि. स. १. तापविणें; गरम करविणें. २. डाक लावणें; झाळणें; तोंड बंद करविणें.

तवायफ़ स्त्री. [अ. 'तायफ़ा'चें अनेक०] कलावंतीण; रंडी; वेश्या.

तवारा–पु. दाह; उष्णता.

तवारीख़ स्त्री. [अ.] इतिहास.

तवालत– स्त्री. [अ.] १. लांबी; विस्तार. २. विपुलता. ३. भानगड.

तवेला–पु. [अ.] तबेला.

तवील– वि. [अ.] लांब. **तूलतवील**–वि. –लांबलचक; कंटाळवाणें.

तशख़ीस–स्त्री. [अ.] १. रोगाचें निदान किंवा चिकित्सा. २. ठराव; निश्चय. ३. कर निश्चित करण्याची क्रिया. ४. नेमणूक.

तशद्दुद–पु. [अ.] १. हिंसा. २. सक्ती; बळजबरी. ३. कठोरता. **अदमे तशद्दुद**–पु. अहिंसा.

तशफ़्फ़ी– स्त्री. [अ.] १. समाधान; संतोष २. सांत्वन. ३. रोगमुक्ति.

तशरीफ़– स्त्री. [अ.] १. प्रतिष्ठा; मान. २. मोठेपणा. **मु० –रखना**– १. बसणें; विराजमान होणें. २. विद्यमान असणें; हजर असणें. –**लाना**–येणें; आगमन करणें. –**ले जाना**–निघून जाणें.

तशरीह– स्त्री. [अ.] १. भाष्य; टीका; टिप्पणी. २. शरीरशास्त्र.

तशवीश– स्त्री. [अ.] १. चिंता; काळजी; विवंचना. २. त्रास; जिकीर. –**नाक**–वि. चिंताजनक. [परात.

तश्त–पु. [फा.] मोठें तबक;

तश्तरी– स्त्री. [फा.] लहाशी थाळी; ताटली; तबक.

तस*–वि. तसा. –अव्य. तसें; त्याप्रमाणें. [समाधान; सांत्वन.

तसकीन– स्त्री. [अ.] संतोष;

तसदीक़– स्त्री. [अ.] १. खरेपणा. २. सत्यपरीक्षा; सत्यनिर्णय. ३. समर्थन; साक्ष (सत्यता पटविण्यासाठीं); पाठपुरावा.

तसदीह– स्त्री. [अ.] १. तसदी; दुःख. २. कपाळदुखी.

तसद्दुक़–पु. [अ.] १. समर्पण. २. दानधर्म.

तसनीफ़– *स्त्री.* [*अ.*] ग्रंथरचना; लिखाण.

तस्फ़ि(फ़ी)या– *पु.* [*अ.*] १. निर्णय; निवाडा. २. तडजोड.

तसबी; तसबीह– *स्त्री.* [*अ.*] १. स्मरणी; जपमाळ. २. ईशस्तवन.

तसमा– *पु.* [*फा.*] चामडयाचा पट्टा.

तसला– *पु.* [*फा.*] तसराळें.

तसलीम– *स्त्री.* [*अ.*] १. नमस्कार. २. स्वीकार; कबुली; मान्यता. ३. हमी घेणें.

तसल्ली– *स्त्री.* [*अ.*] १. समाधान; सांत्वन. २. धीर. [तसवीर.

तसवीर– *स्त्री.* [*अ.*] चित्र;

तसव्वुर; तसौवुर– *पु.* [*अ.*] १. लक्ष. २. कल्पना. ३. विचार; तर्क.

तसौव्वुफ़– *पु.* [*अ.*] १. वैराग्य. २. सूफी भक्तिमार्ग; सूफी लोकांचा दार्शनिक सिद्धांत. [ठिकाणीं.

तहँ; तहँवाँ*–*अव्य.* तेथें; त्या

तह– *स्त्री.* [*फा.*] १. तळ. २. घडी. **–खाना–** *पु.* तळघर. **–पेंच–** *पु.* १. आधी बांधतात तें पागोटयाचें टोंक. २. फेटयाच्या अगर पागोटयाच्या आंतील टोपी. **–पोशी–** *स्त्री.* साडीच्या आंत नेसण्याचा लेहेंगा; परकर. **–बंद; –मत–द–** *स्त्री.* लुंगी; कमरेभोंवतीं गुंडाळण्याचा पंचा. **मु० –की बात–** गुप्त गोष्ट. **–तक पहुँचना–** खरेंखुरें मर्म समजून घेणें. **–(हे) दिलसे–** अंतःकरणापासून; मनःपूर्वक.

तहक़ीक़– *स्त्री.* [*अ.*] १. चौकशी; तपास. २. ताडून किंवा पारखून पाहाणें (खरें किंवा खोटें). *–वि.* १. नक्की; निश्चित. २. पारखून घेतलेलें.

तहक़ीक़ात– *स्त्री.* [*अ.* 'तहक़ीक़' चें अनेक०] तपास; शोध; चौकशी. [वेअब्रू.

तहक़ीर– *स्त्री.* [*अ.*] अपमान;

तहज़ीब– *स्त्री.* [*अ.*] १. सभ्यपणा; शिष्टाचार. २. संस्कृति. **–याफ़्ता–** *वि.* सुसंस्कृत; सभ्य.

तहत– *पु.* [*अ.*] तावा; अधिकार; पराधीनता. *–अव्य.* खालीं. *–वि.* हाताखालचा; अधीन.

तहम्मुल– *पु.* [*अ.*] सहनशीलता. [खिचडी; मटारभात.

तहरी– *स्त्री.* एक प्रकारची

तहरीक– *स्त्री.* [*अ.*] १. चळवळ; आंदोलन. २. ठराव. ३. गति; देणें; चालना देणें. ४. फूस देणें.

तहरीर– *स्त्री.* [*अ.*] १. लिहिण्याची मोड; लपेटा. २. लेखनशैली. ३. लेखी पुरावा.

तहरीरी– *वि.* [*अ.*] लेखी.

तहलका– *पु.* [*अ.*] १. धुमाकूळ; खळबळ. २. नाश. २. मृत्यु.

तहलील– *स्त्री.* [*अ.*] पाचन; शोषण.

तहवाँ*–*अव्य.* तेथें.

तहवील– *स्त्री.* [*अ.*] १. अनामत ठेव. २. खजिना. ३. रोकड जमा. ४. हवालीं करणें. ५. बदलणें. **–दार–** *पु.* १. खजीनदार; कोषाध्यक्ष. २. ठेव ठेवून घेणारा.

तहसनहस– *वि.* उध्वस्त; नष्ट.

तहसीन– *वि.* [*अ.*] वाहवा; तारीफ; स्तुति.

तहसील– *स्त्री.* [*अ.*] १. तालुका. २. सारा. ३. सारावसुली. **–दार–** *पु.* मामलेदार.

तहाँ– *अव्य.* तेथें.

तहाना– *क्रि.स.* घडी करणें; गुंडाळणें. [भीति.

तहाशा– *पु.* [*अ.*] १. पर्वा. २.

तहिआ(या)ना– *क्रि.स.* घडी घालणें.

तहिवाँ*–*अव्य.* तेव्हां; त्यावेळीं.

तहीं*–*अव्य.* तेथेंच.

तहैया– *पु.* [*अ.*] १. तयारी; तत्परता. २. निर्धार; संकल्प.

ताँई*–*अव्य.* १. पावेतों; पर्यंत. २. जवळपास. ३. कोणाविषयीं. ४. साठीं.

ताँगा– *पु.* टांगा; घोडागाडी.

ताँत; ताँतड़ी+– *स्त्री.* १. तांत. २. सूत; दोरा; धागा.

ताँता– *पु.* रीघ; रांग. **मु०–बँधना; –लगना–** रीघ लागणें.

ताँतिया– *वि.* अगदी फाटक्या अंगाचा; मरतुकडा.

ताँती– *स्त्री.* ओळ; पंक्ति; संतति. *–पु.* विणकर; कोष्टी.

ताँबा– *पु.* तांबें (धातु).

ताँबिया; ताँबी+– *स्त्री.* तांब्याचें भांडें. [२. क्रोधाविष्ट होणें.

ताँबरना– *क्रि. अ.* १. तापणें.

ताँसना*–*क्रि. स.* १. धमकाविणें; दरडाविणें. २. त्रास देणें.

ता– *अव्य.* [*फा.*] पर्यंत.

ता*– *सर्व.* तो; त्या (चा, ला इ०).

ताईं*–*अव्य.* १ पर्यंत. २ नजीक; जवळ. ३ समक्ष; प्रति. ४. करितां.

ताई– *स्त्री.* १. वडील चुलती. (संबोधन-शब्द). २. उथळ कढई. ३. कणकण; ताप.

ताईद– *स्त्री.* [*अ.*] १. पुष्टि; अनुमोदन; समर्थन. पक्षपात; तरफदारी. *–पु.* वकिलाचा कारकून.

ताउ*–*पु.* १. ताव; राग; संताप. २. उष्णता.

ताऊ– *पु.* वडील चुलता.

ताऊन– *पु.* [*अ.*] प्लेग.

ताऊस– *पु.* [*अ.*] मोर. **तख्ते-ताऊस–** *पु.* मयूर सिंहासन.

ताक़–पु. [अ.] कोनाडा. –वि. विषम; अद्वितीय. मु०–**पर रखना, धरना**–उपयोगांत न आणणें; टाकून देणें.

ताक– स्त्री. १. टक; दृष्टि. २. प्रतीक्षा. ३. डोकावून पाहाणें. –**झाँक** –स्त्री. १. डोकावणें; २. चोरून पाहाणें. मु०–**में रहना; –लगाना**– टपून बसणें.

ताक़त– स्त्री. [अ.] ताकद; सामर्थ्य; बल. –**वर**–वि. सशक्त; बलवान्; समर्थ.

ताकना–क्रि.स. १. टक लावणें; पाहाणें. २. ताडणें; ओळखणें.

ताकि–अव्य. [फा.] यासाठीं; यामुळें कीं.

ताकि*–अव्य. पाहून.

ताकीद– स्त्री. [अ.] ताकीद; बजावणें.

ताके–कें–सर्व. त्याचें.

ताको–कौं–सर्व. त्याला.

ताख–खा–पु. कोनाडा; देवळी; गोखला. [उशीर.

ताख़ीर– स्त्री. [अ.] विलंब;

तागना–क्रि. स. १. धावदोरा घालणें. २. जहाज नांगरणें.

तागा–पु. धागा; दोरा.

ताछना[+]–क्रि. अ. आघात करण्यासाठीं वाजूनें येणें.

ताज–पु. [अ.] १. मुकुट; तुरा. –**दार**–वि. पु. मुकुटधारी; राजा. –**पोशी**– स्त्री. राज्यारोहण.

ताज़गी–स्त्री. [फा.] ताजेपणा; नवीनता; नावीन्य. [चाबूक.

ताजन–ना*–पु. [फा.] कोरडा;

ताज़ा–वि. [फा.] ताजें. मु० **मोटा ताज़ा**–धष्टपुष्ट; लठ्ठ.

ताज़िया–पु. [फा.] ताबूत; डोला. मु०–**ठंढा होना**–१. ताबुताचें विसर्जन होणें. २. मरणें.

ताज़ियाना–पु. [फा.] चाबूक; हंटर.

ताजिर–पु. [अ.] व्यापारी.

ताज़ीम– स्त्री. [अ.] १. आदर; मान; सन्मान. २. लवून मुजरा करण्याची एक पद्धत. [शिक्षा

ताज़ीर– स्त्री. [अ.] दंड;

ताज़ीरात–पु. [अ. 'तअजीर'चें अनेक०] १. गुन्हेगाराला शिक्षा देणें. २. 'पीनल कोड.' –**हिंद**– स्त्री. 'इंडियन पीनल कोड'.

ताज़ीरी–वि. [अ.] दंडात्मक; 'प्यूनिटिव्ह'.

ताज्जुब–पु. [अ.] 'आश्चर्य.'

ताड़का– स्त्री. त्राटिका.

ताडना– स्त्री. १. प्रहार; मार; २. दटावणी; धमकी. ३. शिक्षा. ४. क्लेश.

ताड़ना– क्रि. स. १. मारून हाकलणें. २. ताडणें; अटकळ करणें; अनुमान करणें. ३. दटावणें.

ताड़ी –स्त्री. ताडी; दारू. –**खाना**–पु. दारूचा गुत्ता.

तात– पु. १. पिता २. गुरु. ३. पुत्र. ४. भाऊ. [गरम; उष्ण.

ताता*– वि. तप्त; तापलेला;

तातार– पु. [फा.] तार्तर (देश व रहिवासी). [देशाचा रहिवासी.

तातारी– पु. [फा.] तार्तर

ताती*–वि. तप्त; उष्ण.

तातील– स्त्री. [अ.] सुट्टी.

ताते*– अव्य. त्यामुळें.

तादाद– स्त्री. [अ.] १. संख्या. २. अंकमोजणी.

तान– स्त्री. १. ताण. २. गाण्याची तान; आलाप.

तानना– क्रि. स. ताणणें; पसरणें. मु० **तानकर सोना**–ताणून देणें; निश्चितपणें झोंपणें.

ताना– पु. [अ.] टोमणा; व्याजोक्ति. मु० –**कसना**; –**मारना** टोमणा मारणें.

ताना– पु. १. ताणा; विणीचा उभा धागा. २. माग (सतरंजी, गालिचा इ० चा). –**बाना**– पु. विणीचे उभे-आडवे धागे.

तानाशाह– पु. सर्वाधिकारी; हुकूमशहा; 'डिक्टेटर'.

तानाशाही– स्त्री. हुकूमशाही; 'डिक्टेटरशिप'.

ताप– पु. उष्णता; 'हीट'. –**क्रम**– पु. तपमान; 'टेंपरेचर'. –**तरंग**– स्त्री. 'हीट वेव्ह'. –**तिल्ली**– स्त्री. पांथरी; प्लीहा. –**नियंत्रण** – पु. 'एयर कंडिशनिंग.' –**नियंत्रित** –वि. वातानुकूलित; 'एयर कंडिशंड'. –**मानयंत्र**– पु. 'थर्मामीटर.' –**लेखी** –मु० ताप-लेखक; 'थर्मोग्राफ.' –**विकिरण**–पु. 'रॅडियेशन.'

तापक– पु. उष्णता निर्माण करणारें यंत्र; 'हीटर.'

तापती– स्त्री. तापी नदी.

तापना– क्रि. अ. तापणें; गरम होणें; शेकोटीजवळ बसणें.-क्रि. स. तापविणें.

तापल[+]– पु. क्रोध; राग.

ताफ़्ता– पु. [फा.] एक प्रकारचें चमकदार रेशमी कापड.

ताब– स्त्री. [फा.] १. उष्णता; ताप. २. चमक; प्रकाश. ३. सहन-शक्ति. ४. संयम; धैर्य. ५. सामर्थ्य; शक्ति. मु०–**लाना** –सहन करणें.

ताबड़तोड़– अव्य. सतत; एक-सारखें.

ताबा– वि. [अ.] १. अधीन. २. ताब्यांतील.

ताबीर– स्त्री. [अ.] १. फल. २ स्वप्नाचें शुभाशुभ फल.

ताबूत– पु. [अ.] १ प्रेत वाहून

न्यावयाची पेटी; शवपेटिका. २. ताबूत; डोला.

ताबे– *वि.* अधीन; ताब्यांतील. **–दार**–*वि.* अधीन; ताबेदार. – *पु.* नोकर.

ताम–*पु.* १. अस्वथता; बेचैनी. २. दुःख; क्लेश. ३. दोष; विकार. ४. क्रोध; रोष; राग. ५. अंधार. –*वि.* १. अस्वस्थ; व्याकुल. २. दुःखी. ३. भयानक.

तामजा(दा)न; तामझाम– *पु.* एक प्रकारची खुली पालखी.

तामस– *पु.* १. सर्प. २. खल; दुष्ट. ३. घुबड. ४. क्रोध; राग. ५. अंधार. ६. अज्ञान; मोह. –*वि.* तामसी.

तामसी– *वि. स्त्री.* तामसी, रागीट (स्त्री). – *स्त्री.* महाकाली.

तामियाँ+– *वि.* तांब्यासारखा; तांबडा; लाल.

तामीर– *स्त्री.* [*अ.*] १. निर्मिति; स्थापत्य. घर-बांधणी. २. इमारत.

तामीरी–*वि.* [*अ.*] रचनात्मक; विधायक. [बजावणी.

तामील– *स्त्री.* [*अ.*] अंमल-

तामें– *सर्व.* त्यांत, त्यामध्यें.

ताम्मुल– *पु.* [*अ.*] १. मनन; विचार. २. बुचकळा; गोंधळ. ३. अनिश्चितता. [ऊन करणें.

तायना*– *क्रि. स.* तापविणें;

तायफ़ा– *पु.* [*अ.*] १. वेश्या. २. वेश्यांचा ताफा; साजिंदे. ३. यात्रेकरूंचा तांडा; ताफा.

तायर– *पु.* [*अ.*] १. उडणारा. २. पक्षी.

ताया– *पु.* वडील चुलता; बापाचा थोरला भाऊ.

तार– *पु.* १. धातूची तार. २. तारेनें धाडली जाणारी बातमी; 'टेलिग्राफ'. ३. सूत्र. ४. अखंड-क्रम. ५. युक्ति; उपाय. **–कमानी**–*स्त्री.* रत्न कापण्याचें धनुकलीसारखें एक अवजार. **–कश**– *पु.* धातूची तार ओढणारा, बनविणारा. **–घर**–*पु.* तार-ऑफिस. **–घाट**– *पु.* मतलब साधण्याची कृति; योजना. **–तार**– *वि.* चिंध्या केलेला.**–तोड़**–*पु.* जरीची बेलबुट्टी काढणें.**–बर्क़ी**–*स्त्री. पु.* टेलिग्राफची तार. **–लेखी**–*पु.* 'टेलीप्रिंटर'. **मु०–तार करना** –चिंध्या उडविणें; उलगडून टाकणें; विस्कळित करणें. **–बँधना** –सतत चालू असणें.

तारक– *पु.* १. नक्षत्र; तारा. २. डोळ्यांतील बाहुली. –*वि.* तारणारा; पैलतीरीं नेणारा. **–चिह्न**– *पु.* फुली; चौफुलीची खूण; 'अॅस्टेरिस्क.'

तारकोल–*पु.* डांबर.

तारतम्य–*पु.* १. सामंजस्य. २. तुलना. ३. निवडीचा क्रम; 'ऑर्डर ऑफ प्रेफरन्स.' [मुक्ति देणें.

तारना–*क्रि. स.* उद्धार करणें;

तारपीन–*पु.* [*इं.*] 'टर्पेंटाईन'.

तारांकित–*वि.* फुलीची खूण असलेला; 'स्टार्ड'. **–प्रश्न–पु.** विधिमंडळांमध्यें प्रश्नोत्तराच्या वेळीं तोंडी उत्तर मिळण्याच्या दृष्टीनें विचारला गेलेला प्रश्न.

तारा–*पु.* १. नक्षत्र; तारा. २. डोळचातील बाहुली. **मु०–(रे) गिनना**–काळजी किंवा दुःख करीत रात्र घालविणें; झोंप न येणें.**–(रे) तोड़ लाना**–महाकठिण कार्य करणें. **–(रे) दिखाई देना**–डोळ्यांसमोर काजवे चमकणें. **–(रों) की छाँह**–भल्या पहाटे.

तारा*–*पु.* कुलूप; टाळें.

ताराज–*पु.* [*फा.*] १. लूटमार. २. विध्वंस; नाश.

तारी*– *स्त्री.* १. टाळी. २. किल्ली; चावी.

तारी–*वि.* [*अ.*] १. प्रकट. २. पसरलेला; व्यापलेला.

तारीक–*वि.* [*फा.*] १. अंधकारयुक्त; काळोखानें भरलेला. २. काळा.

तारीकी– *स्त्री.* १. काळोख; अंधार. २. शाई; काळेपणा.

तारीख़–*स्त्री.* [*फा.*] १. तारीख; दिनांक; तिथि. २. इतिहास.

तारीफ़– *स्त्री.* [*अ.*] १. वर्णन. २. लक्षण; व्याख्या. ३. प्रशंसा; स्तुति. ४. वैशिष्टच; गुण. ५. ओळख; परिचय. **मु०–करना**–परिचय करून देणें. **–के पुल बाँधना**–अत्यंत प्रशंसा करणें.

ताल–*पु.* १. तळहात. २. टाळी. ३. ताल (गाणें). ४. तलाव.**–मेल** –*पु.* १. ताल व स्वर यांचा मिलाफ. २. मैत्री; मेळ; ताळमेळ. ३. उपयुक्त संधि.

ताला–*पु.* कुलुप. **–कुंजी**– *स्त्री.* कडीकुलुप; कुलुप-किल्ली. **–बंदी**–*स्त्री.* टाळेबंदी; 'लॉक आउट'.

तालाब–*पु.* तळें; तलाव; सरोवर. [अस्वस्थता.

तालाबेली*– *स्त्री.* व्याकुळता;

तालिका– *स्त्री.* १. किल्ली. २. सूची; यादी; अनुक्रमणिका.

तालिब– *वि.* [*अ.*] १. शोधक. २. इच्छुक. ३. शिष्य. **–इल्म–पु.** विद्यार्थी. [२. किल्ली.

ताली– *स्त्री.* १. टाळी; थाप.

तालीम– *स्त्री.* [*अ.*] १. शिक्षण. २. अभ्यास. **–याफ़्ता**–*वि.* सुशिक्षित.

तालू–*पु.* टाळू. **मु०–चटकना**–तहानेनें घशाला कोरड पडणें.

तालेवर–*वि.* [*अ.*] १. श्रीमंत; संपन्न. २. भाग्यवान्.

ताल्लुक़–*पु.* [*अ.*] संबंध.

ताल्लुक़ा–*पु.* [*अ.*] तालुका. **–दार**–*पु.* तालुकेदार; मोठा जमीनदार. [अनेक०] संबंध.

ताल्लुक़ात–*पु.* [*अ.*] 'ताल्लुक'चें

ताव–*पु.* १. आंच; उष्णता. २. आवेश; राग. ३. कागदाचा ताव. **मु०–आना**–उकळी येणें. **–देना**–१. ऊन करणें. २. ताव देणें (मिशीवर). **–पर**–योग्य वेळीं.

तावना*–*क्रि. स.* १. तापविणें. २. जाळणें. ३. संतप्त, दुःखी करणें.

तावर-रा-री*–*स्त्री.* १. ताप. २. मूर्च्छा. ३. डोकें गरगरणें.

तावरो*–*पु.* १. ताप; दाह; उष्णता. २. ऊन्ह. ३. भोंवळ.

तावान–*पु.* [*फा.*] १. दंड. २. नुकसानभरपाई.

तावीज़–*पु.* [*अ.*] ताईत.

ताश–*पु.* [*अ.*] पत्ता; पत्त्यांचा खेळ.

तासीर–*स्त्री.* [*अ.*] १. परिणाम; प्रभाव. २. गुणधर्म.

तासु*–*सर्व.* त्याचा.

तासुको*–*सर्व.* त्याला.

तासू–तासों*–*सर्व.* त्याच्याशीं.

तासो–सौं*– *सर्व.* त्याला; त्याच्याकडून.

तास्सुब–*पु.* पा० 'तअस्सुब'.

ताह*– सर्व. त्याचा.

ताहम– *अव्य.* [*फा.*] तरी; तरीदेखील; तथापि.

ताहि*– सर्व. त्याला.

ताहीं*– *अव्य.* १. पावेतों; पर्यंत. २. समीप; जवळ.

ताहू*– *सर्व.* त्याला देखील; त्यांत देखील.

तिंतिड–*पु.* १. चिंच; चिंचेचें झाड. २. चिंचेची चटणी. [त्या.

ति*–*स्त्री.* तिर्री. – *सर्व.* ते;

तिआ*–*स्त्री.* १. स्त्री; बायको. २. तिर्री. (पत्त्यांतील)

तिआ(या)ह–*पु.* तिसरें लग्न. –*वि.* ज्याचें तिसरें लग्न होणार आहे असा विधुर.

तिकड़म–*पु.* लटपट; गुप्त युक्ति; चलाखी. [चलाख.

तिकड़मी–*वि.* लटपटया;

तिकोन*–*वि.* [त्रिकोणी.

तिकोना; तिको नियाा–*वि.* तीन कोन असलेला; त्रिकोणी.

तिक्का–*पु.* [*फा.*] मांसाचा लहानसा तुकडा; खांडोळें. **–बोटी**–*स्त्री.* तुकडे–तुकडे; खांडोळीं.

तिक्की–*स्त्री.* तिर्री (पत्त्यांतील).

तिक्खा+–*वि.* तिरपा; तिरकस.

तिखाई–*स्त्री.* १. तिखटपणा. २. तीक्ष्णता.

तिखारना+–*क्रि. स.* नक्की करून घेणें; विचारणें. [त्रिकोणी.

तिखूंटा–*वि.* त्रिकोणात्मक;

तिगलिया+–*पु.* तीन रस्ते किंवा गल्ल्या जेथें मिळतात तें स्थान.

तिगुना–*वि.* तिप्पट; तिहेरी.

तिजया+–*पु.* तिसरें लग्न करणारा.

तिजरा–*पु.* दर तिसरे दिवशीं येणारा ताप; एक दिवसा आड येणारा ताप. [वाणिज्य.

तिजारत–*स्त्री.* [*अ.*] व्यापार;

तिड़ी–*स्त्री.* तिर्री. **–बिड़ी**–*वि.* विस्कटलेला; अस्ताव्यस्त. **मु०–करना**–लंपास करणें; पळविणें.

तित*–*अव्य.* तेथें; तिकडे.

तितना*–*वि.* तितका. **–अव्य.** तितक्या प्रमाणांत.

तितर–बितर–*वि.* अस्ताव्यस्त; अव्यवस्थित; विस्कटलेला.

तितली–*स्त्री.* १. फुलपांखरूं. २. नखरेल स्त्री.

तितलौआ–*पु.*; **तितलौकी**–*स्त्री.* कडू भोपळा. [मजली.

तितल्ला–*वि.* तिमजली; तीन

तितिंबा; तितिम्मा–*पु.* [*अ.*] १. पुस्तकाचें परिशिष्ट. २. ढोंग.

तिते; तितेक; तितो*–*वि.* तितकें.

तितै*–*अव्य.* त्याच ठिकाणीं.

तिथित–*वि.* दिनांकित; तारीख टाकलेलें; 'डेटेड'.

तिथिपत्र–*पु.* पंचांग.

तिथिसंक्रामी–*वि.* योग्य मुदतींत हजर न राहिलेला, केलेला; 'डिफॉल्टर'. [लेली खोली.

तिदरी–*स्त्री.* तीन दारें अस-

तिधर+–*अव्य.* तिकडे; तेथें.

तिन*–सर्व. ('तिस' चें अनेक.) १. त्यांनीं. २. तो. ३. ते; त्या (सामान्यरूप).

तिनउर*–*पु.* तृणसमूह; गवताचा ढीग. [चडफडणें; रुसणें.

तिनकना–*क्रि. अ.* चिडणें;

तिनका*–*पु.* वाळलेल्या गवताची काडी; काडी. **–तोर*** **पु.** १. नातें तोडणें. २. गट्टी फू.

तिनगना–*क्रि. अ.* पा० 'तिनकना'. [काडी.

तिनु(नू)का*–*पु.* गवताची

तिन्ह*–*सर्व.* ['तिस' चें अनेक०] ते; त्या (सामान्य रूप).

तिन्हें*–*सर्व.* त्यांना. [तिहेरी.

तिपल्ला–*वि.* तीन पदरी;

तिपाई–*स्त्री.* तीन पायांची घडवंची; तिवई.

तिपाड़*–*पु.* तीन तुकडे जोडून तयार केलेलें वस्त्र. –*वि.* तीन पदरी.

तिबारा–*अव्य.* तिसऱ्यांदा. –*पु.*

तीन दारें असलेली खोली.

तिबासी–*वि.* तीन दिवसांचें शिळें. [हकीमी.

तिब्ब–*स्त्री.* [*अ.*] वैद्यक;

तिब्बत–*पु.* तिबेट (देश).

तिब्बती–*वि.* तिबेटी. –*पु.* तिबेटचा रहिवासी. –*स्त्री.* तिबेटी भाषा.

तिब्बिया–*वि.* [*अ.*] वैद्यकीय. **–कालेज**–*पु.* युनानी वैद्यकाचें शिक्षण देणारें महाविद्यालय.

तिमंज़िला–*वि.* तीन मजली.

तिमाना+–*क्रि. स.* भिजविणें; ओलें चिंब करणें.

तिमिंगिल–*पु.* समुद्रांतील व्हेल माशाला गिळंकृत करूं शकणारा एक प्रचंड मासा.

तिमि–*अव्य.* तसें; तशा प्रकारें. –*पु.* व्हेल मासा.

तिमित–*वि.* १. निश्चल; स्थिर. २. आर्द्र; भिजलेला.

तिमिर–*पु.* अंधार; काळोख.

तिमुहानी–*स्त्री.* १. तीन रस्ते जेथून फुटतात किंवा जेथें मिळतात ती जागा. २. तीन नद्यांचा संगम.

तिय-या*–*स्त्री.* १. स्त्री. २. पत्नी. [एक वस्त्र.

तियला–*पु.* स्त्रियांचें वापरण्याचें

तिरंगा–*वि.* तिरंगी; तीन रंगी.

तिरकना–*क्रि. अ.* तडा जाणें; फाटणें.

तिरखा*– तृष्णा; तहान.

तिरछा–*वि.* तिरपा; वांकडा. **–पन**–*पु.* वक्रता; वांकडेपणा.

तिरछाना–*क्रि. अ.* तिरपें होणें; *क्रि. स.* तिरपें करणें.

तिरछौंहाँ–*वि.* किंचित् वांकडा; तिरकस; तिरपा. [थेंब गळणें.

तिरतिराना+–*क्रि. अ.* थेंब

तिरना–*क्रि. अ.* १. तरंगणें. २. तरणें; पोहणें. ३. तरून जाणें.

तिरनी*–*स्त्री.* १. नेफा. २. निरी. ३. लेहेंग्याची नाडी.

तिरपट+–*वि.* तिरका; एका बाजूला झुकलेला.

तिरपटा+–*वि.* तिरळा.

तिरपन–*वि.* त्रेपन्न; ५३.

तिरपाई–*स्त्री.* तिवई.

तिरपाल–*पु.* १. छपराखालीं घालावयाच्या बोरूच्या पेंढ्या. २. ताडपत्री; 'कॅन्व्हास'.

तिरमिरा–*पु.* डोळ्यांना अंधुक दिसण्याचा रोग.

तिरमिराना–*क्रि. अ.* पापण्या मिटणें; डोळे दिपणें.

तिरलोक–*पु.* त्रिलोक.

तिरसठ–*वि.* त्रेसष्ट; ६३.

तिरानबे–*पु.* त्र्याणव; ९३.

तिराना–*क्रि. स.* १. तरंगविणें; तरविणें. २. उद्धार करणें.

तिरासी–*वि.* त्र्याऐंशी; ८३.

तिराहा–*पु.* तिठा; तीन रस्ते जेथें मिळतात ती जागा.

तिरिया*–*स्त्री.* स्त्री. **–चरित्तर**–*पु.* स्त्रीचरित्र; पुरुषाला फसवि– ण्याची स्त्रीची चलाखी.

तिरीछा*–*वि.* तिरपा; वांकडा.

तिरेंदा–*पु.* १. समुद्रांत धोक्याची सूचना देण्याकरिता टाकून ठेवलेलें तरंगतें पीप. २. गळावरील लहान लाकूड. ३. पैलतीराला वाहून नेणारें लाकूड किंवा तशीच एखादी दुसरी वस्तु. [आडवा.

तिर्यक्–*वि.* तिरपा; वांकडा;

तिर्यग्योनि–*स्त्री.* पशुपक्ष्यांचा जन्म.

तिर्यग्रेखा–*स्त्री.* दोन किंवा अधिक रेखांना छेदून जाणारी रेषा; 'ट्रान्सव्हर्सल.' [हिंदी शिपाई.

तिलंगा–*पु.* इंग्रजी सैन्यांतील

तिलंगाना–*पु.* तेलंगण; आंध्र- प्रदेश.

तिलंगी–*स्त्री.* पतंग; वावडी. –*पु.* तेलंगणाचा रहिवासी.

तिल–*पु.* तीळ (धान्य, शरीरावरील डाग इ०). **–कुट**–*पु.* तिळाची वडी; तिळगूळ. **–चट्टा**–*पु.* झुरळ. **–दानी**–*स्त्री.* शिंप्याची सुईदोरा ठेवण्याची पिशवी. **मु०–का ताड़ करना**–राईचा पर्वत करणें. **–की ओट पहाड़**– लहान गोष्टींत खूप मोठा अर्थ असणें. **–तिल**–थोडें थोडें. **–धरनेकी जगह न होना**– अत्यंत गर्दी होणें. **–भर**– थोडाहि; किंचित्हि.

तिलक–*पु.* १. गंध; टिळा. २. लग्नांतील एक विधि; सीमांत- पूजन; वधूपक्षाकडील मंडळी वराला कुंकुमतिलक लावून कांहीं द्रव्य इ० देतात तो विधि. **–हरू; –हार**–*पु.* वरपूजा करणारा.

तिलकना–+ *क्रि. अ.* जमीन उलणें; जमिनीला भेगा पडणें.

तिलछना–*क्रि. अ.* तळमळणें; व्याकुळ होणें. [दागिना.

तिलड़ी–+ *स्त्री.* तिपेडी (एक

तिलमिल; तिलमिलाहट; तिलमिली–*स्त्री.* १. कळवळणें; तळमळ; बेचैनी. २. डोळे दिपणें.

तिलमिलाना–*क्रि. अ.* कळ- वळून जाणें; अस्वस्थ होणें.

तिलवा–*पु.* तिळाचा लाडू.

तिलस्म–*पु.* पा० 'तिलिस्म'.

तिलहन–*पु.* गळिताचें धान्य.

तिला–*पु.* [*फा.*] नपुंसकत्व नष्ट करणारें व कामवर्द्धक असें एक तेल.

तिलिस्म–*पु.* [*अ.*] जादू; अद्भुत चमत्कार; इंद्रजाल.

तिलिस्माती; तिलिस्मी–*वि.*

[अ.] जादूचा; जादूसंबंधींचा.

तिलोरी– स्त्री. १. तिळवडी; तीळ मिसळून बनविलेली उडदाची किंवा मुगाची वडी. २. एक प्रकारची मैना.

तिलौंछना– क्रि. स. तेल लावणें; तेल लावून बुळबुळीत करणें. [बुळीत.

तिलौछा– वि. तेलकट; बुळ-

तिलौरी– स्त्री. १. तीळ मिसळून बनविलेली उडदाची किंवा मुगाची वडी. २. एक प्रकारची मैना.

तिल्ली– स्त्री. पांथरी; प्लीहा.

तिशना– पु. टोमणा. –स्त्री.* तृष्णा. [लेला; तृषित.

तिश्ना– वि. [फा.] तहान-

तिष्षन*– वि. तीक्ष्ण. [प्रेम.

तिस– स्त्री. तृष्णा; लालसा;

तिस*–सर्व. 'ता' चें सामान्यरूप; पा० 'उस'. –**पर**–अव्य. १. त्यानंतर. २. तरीहि; तथापि.

तिसना–* स्त्री. तृष्णा; तहान.

तिसरायत– स्त्री. परकेपणा; त्रयस्थपणा.

तिसरैत– पु. १. तिऱ्हाईत; परका. २. तटस्थ; मध्यस्थ. ३. तिसऱ्या भागाचा मालक.

तिहत्तर– वि. त्र्याहत्तर; ७३

तिहरा–वि. तिहेरी; तीन पदरी.

तिहराना– क्रि. स. १. तिसऱ्यांदा करणें. २. तिहेरी, तिपदरी करणें.

तिहवार– पु. पा० 'त्योहार'.

तिहाई– स्त्री. तिसरा हिस्सा; एक तृतीयांश. [तुझा.

तिहार–रा–रो* सर्व. तुमचा;

तिहाव–+ पु. १. राग. २. झगडा.– वि. एक तृतीयांश.

तिहि*– सर्व. त्याला.

तिहूँ–* वि. तिघेहि; तीन्ही.

तिहैया– पु. १. तिसरा भाग. २. तिय्या; तबल्याची थाप.

ती*– क्रि. अ. होती. –स्त्री. स्त्री; पत्नी.

तीख*– वि. पा० 'तीखा'.

तीखन*– वि. तीक्ष्ण.

तीखा– वि १. तिखट; झणझणीत. २. तीव्र; प्रखर. ३. तीक्ष्ण. ४. चोख; उत्तम.–**पन**– तिखटपणा; तीक्ष्णपणा.

तीछन*– वि. तीक्ष्ण.

तीज– स्त्री. १. तृतीया. २. हरतालिका व्रत; भाद्रपद शुद्ध ३.

तीजा– वि. तिसरा. –पु. मृत्यूनंतरचा तिसरा दिवस; या दिवशीं होणारें श्राद्ध (मुसल०).

तीत*–वि. १. उग्र २. तिखट; झणझणीत.

तीतर–पु. तित्तर; कवडा; होला. [दार. २. ओला.

तीता–वि. १. तिखट; चटक-

तीन–वि. तीन. **मु०–तेरह करना**–वांटून टाकणें; उधळून टाकणें. – **पाँच करना**–हुज्जत घालणें; टाळाटाळी करणें. **न तीनमें न तेरहमें**–न अध्यांत न मध्यांत.

तीमार–पु. [फा.] सेवाशुश्रूषा; रक्षण.–**दार**–वि. रोग्याची शुश्रूषा करणारा; परिचारक.–**दारी**– स्त्री. १. शुश्रूषा. २. सहानुभूति.

तीमी*– स्त्री. स्त्री.

तीय-या*– स्त्री. स्त्री; बाई.

तीरंदाज–पु. [फा.] तिरंदाज; धनुष्य चालविणारा; धनुर्धर.

तीर–पु. [फा.] बाण.

तीर–पु. तीर; कांठ.

तीरथ*–पु. तीर्थ. [सळई.

तीली– स्त्री. काडी; छड;

तीवई*– स्त्री. स्त्री; बाई.

तीसर*–वि. तिसरा.

तीसरा–वि. १. तिसरा. २. त्रयस्थ; परका.–**पहर**–पु. दुपार व संध्याकाळ यांमधील काळ; अपराह्ण. [जवस.

तीसी– स्त्री. अळशी (धान्य);

तीहा–पु. १. आश्वासन; समाधान. २. एक तृतीयांश

तुंग–वि. १. उंच; उन्नत. २. उग्र. ३. प्रमुख.

तुंगतामापी–पु. उंची मोजणारें यंत्र; 'अल्टीमीटर'.

तुंगी– स्त्री. १. रात्र. २. रानतुळस. ३. हळद.

तुंड–पु. १. तोंड; सोंड. २. चोंच. ३. जबडा. ४. तलवारीचें टोंक. ५. महादेव.

तुंद–वि. [फा.] उग्र; प्रचंड; तीव्र; बेफाम; वेगवान्.

तुंद–पु. १. पोट; ढेरी. २. बेंबी.

तुंदिल–वि. ढेरपोटचा; तोंदिल.

तुंब–बा–पु. स्त्री. १. कडू भोपळा (पोहण्याचा). २. कमंडलू (भोपळयाचा). ३. दुधाची चरवी.

तुअ*–सर्व. तुमचा; तुझा.

तुअना*–क्रि. अ. १. गळणें; ठिबकणें. २. गर्भपात होणें.

तुअर– स्त्री. तूर.

तुई*–सर्व. तूंच.

तुक– स्त्री. १. यमक; अंत्यानुप्रास. २. मेळ; सामंजस्य.–**बंदी**– स्त्री. १. यमक-जुळवणी. २. भिकार कविता. **मु०–बैठाना**–१. यमक जोडणें. २. मेळ घालणें. [नाचें).

तुकमा–पु. [फा.] काजें (बट-

तुकांत–पु. यमक; अंत्यानुप्रास.

तुकार–पु. अरे-तुरे करणें.

तुकारना–क्रि. स. एकवचनीं संबोधणें; अरे तुरे म्हणून अपमान करणें.

तुक्कड़–*वि. पु.* यमक्या कवि; सामान्य कवि.

तुक्का–*पु.* [*फा.*] पातें (शल्य) नसलेला बाण; बोथट बाण.

तुख़्म–*पु.* [*अ.*] १. बीज. २. अंडें. ३. वीर्य. **मु०–तासीर सोहबत असर**–बियाण्यांत त्याचा प्रभाव असतो आणि संगतीचा परिणाम अवश्य होतो.

तुजनूं*–*सर्व.* तुला.

तुजी–*स्त्री.* कमान; धनुष्य.

तुज़ुक–*पु.* [*तु.*] १. वैभव. २. आत्मचरित्र.

तुझ–*सर्व.* 'तू' चें कांहीं विभक्तिप्रत्यय लागण्यापूर्वीचें सामान्य रूप.

तुझे–*सर्व.* तुला.

तुट*–*वि.* १. थोडें. २. लेशमात्र; यत्किंचित्.–*पु.* तुकडा.

तुट्ठना*–*क्रि. अ.* संतुष्ट होणें; प्रसन्न होणें. [तोडवून घेणें.

तुड़वाना–*क्रि. स.* तोडविणें;

तुड़ाई–*स्त्री.* तोडविण्याचें, मोडण्याचें काम किंवा त्याची मजुरी.

तुड़ाना–*क्रि. स.* १. मोडण्याचें किंवा तोडण्याचें काम करविणें. २. संबंध तोडणें. ३. पैशाची मोड करणें. ४. किंमत कमी करविणें.

तुतलाना–*क्रि. अ.* तोतरें बोलणें; बोलतांना अडखळणें.

तुतली–*वि. स्त्री.* तोतरें बोलणारी.

तुत्थ–*पु.* मोरचूद.

तुदन–*पु.* व्यथा; कष्ट; दुःख.

तुनक–*वि.* [*फा.*] १. दुर्बल. २. कोमल. ३. हलका. **–मिज़ाज**–*वि.* चिडखोर; रागीट.

तुनुक–*वि.* पा० 'तुनक'.

तुपक–*स्त्री.* [*तु.*] १. लहान तोफ. २. बंदूक.

तुफ़ैल–*पु.* [*अ.*] साधन; मार्ग (द्वारा). **–से**–*अव्य.* १. च्या द्वारें. २. च्या कृपेनें.

तुभना*–*क्रि. अ.* १. निःस्तब्ध होणें. २. थकणें. [तुम्ही; तूं.

तुम–*सर्व.* ['तू'चें अनेक०]

तुमड़ी–*स्त्री.* १. वाळलेला कडू भोपळा. २. भोपळयाचें भिक्षापात्र; तुंबडी. ३. भोपळयाचें तुणतुणें; भोपळयाची पुंगी. [पिंजणें.

तुमाना–*क्रि. स.* कापूस पिंज-

तुमुल–*पु.* १. लढाईची दंगल. २. लढाईची गडबड; कोलाहल. –*वि.* घनघोर; भयंकर.

तुम्ह*–*सर्व.* तुम्ही; तुम्हांला; पा० 'तुम'. [तुमचा; तुझा.

तुम्हरा*; **तुम्हार–रा** *स.*

तुम्हीं–*सर्व.* [तुम + ही] तुम्हीच; तूंच.

तुम्हें–*सर्व.* तुम्हांला; तुला.

तुरंज–*पु.* १. ईडलिंबू. २. कशिदा.–**बीन**–*स्त्री.* लिंबाचें सरबत.

तुरंत–*अव्य.* ताबडतोब; लगेच.

तुरई–*स्त्री.* दोडकें. [मुसलमान.

तुरक–*पु.* [*फा.*] तुर्क;

तुरकाना–*वि.* [*फा.*] तुर्कासारखा. –*पु.* १. तुर्कस्तान. २. तुर्क लोकांची वस्ती.

तुरकानी–*स्त्री.* [*फा.*] १. तुर्की बायकांचें एक सैल वस्त्र. २. तुर्की स्त्री.

तुरकी–*वि.* [*तु.*] तुर्क देशाचा. **–स्त्री.** १. तुर्की भाषा. २+खडी बोली; हिंदी.

तुरत–*अव्य.* शीघ्र; झटपट; लगेच. **–पत्र–पु.** तांतडीचें पत्र; 'एक्स्प्रेस लेटर'. **–वितरण–पु.** तांतडीचा बटावडा; 'एक्स्प्रेस डिलिव्हरी'.

तुरपना–*क्रि. स.* तुरपणें; वस्त्राचें शेवट आंत दुमडून शिवणें; धांवता दोरा घालणें.

तुरय*–*पु.* घोडा.

तुरसीला*–*वि.* १. आंबट. २. कठोर; तिखट.

तुरही–*स्त्री.* तुतारी.

तुरा*–*स्त्री.* त्वरा; घाई.**–ई**–*स्त्री.* १. घाई. २. उतावीळपणा.

तुराइ–य*–*अव्य.* आतुरतेनें.

तुराई*–*स्त्री.* बिछाना; गादी. –*अव्य.* त्वरित.

तुरावती*–*वि. स्त्री.* वेगवान्; जलद चालणारी; ऐटींत चालणारी.

तुरिया*–*स्त्री.* १. विणकरांचें एक अवजार. २. वासरूं मेलेली गाय किंवा म्हैस. ३. एक चतुर्थांश भाग. ४. तुरीयावस्था.

तुरुक–*पु.* तुर्क; मुसलमान.

तुरुप–*पु.* पत्त्यांतील हुकूम; 'ट्रंप'.

तुरैया*–*स्त्री.* दोडकें.

तुर्रा–*पु.* [*अ.*] १. केसांचा झुपका; गोंडा. २. तुरा. –*वि*–अद्भुत; नवलाईचा, **मु०–यह कि**–इतकें असूनसुद्धां.

तुर्श–*वि.* [*फा.*] १. आंबट. २. रुक्ष; कठोर. **–रू**–*वि.* रागीट; तापट. [क्रोध; राग.

तुर्शी–*स्त्री.* १. आंबटपणा. २.

तुलना–*स्त्री.* बरोबरी; तुलना.–*क्रि. अ.* जोखलें जाणें; तोलणें. **मु० तुल जाना**– हट्टास पेटणें; इरेस पडणें.

तुलवाई–*स्त्री.* १. तोलण्याचें काम किंवा मजुरी. २. गाडीला ओंगण घालणें.

तुलवाना–*क्रि. स.* १. जोखविणें; वजन करविणें. २. ओंगण घालविणें.

तुलसी– *स्त्री.* तुळस.

तुला–*स्त्री.* १. वजन; माप. २. तुलना; समानता. ३. तराजू.

तुलाई– *स्त्री.* १. रजई २. पा० 'तुलवाई'.

तुलाना–*क्रि. स.* पा० 'तुलवाना' –*क्रि. अ.** १. येऊन ठेपणें. २. बरोबर होणें.

तुली– *स्त्री.* १. विणकरांचा कुंचला. २. पा० 'तूलिका'.

तुल्यांक–*वि.* तुल्य; बरोबरीचा; 'ईक्विव्हॅलंट'.

तुव*– *सर्व.* तुमचा; तुझा.

तुवर–*पु.* १. तुरीची डाळ. २. तुरट रस.

तुष–*पु.* भुसा; टरफल.

तुषार–*पु.* १. तुषार. २. दंव. ३. बर्फ. ['अपीज़मेंट'.

तुष्टीकरण–*पु.* मनधरणी;

तुस–*पु.* कोंडा.

तुसाड़ाँ*–*सर्व.* तुझा; तुमचा.

तुहमत– *स्त्री.* [*फा.*] आळ; तोहमत; खोटी बदनामी.

तुहिं*–सर्व. तुम्हांला; तुला.

तुहिन–*पु.* १. दंव; बर्फ. २. धुकें. ३. चांदणें. ४. गारवा.

तूँबड़ा; तूंबा–*पु.* १. सुकलेला मोठा कडू भोपळा. २. तुंबडी.

तू–सर्व. तूं (अनादर किंवा घनिष्ठता–सूचक). **मु०–तड़ाक**–अनादर–सूचक शब्द बोलणें; फटदिशीं बोलणें; **– मैं तू मैं करना**–भांडण करणें; एकेरीवर येणें.

तूअ*–सर्व. तुमचा.

तूख*–*पु.* १. गवताची काडी; मूस. २. दांतकोरणें. [संतुष्ट होणें.

तूठना*–*क्रि. अ.* तृप्त होणें;

तूणीर–*पु.* बाणाचा भाता. [फळ.

तूत–*पु.* [*फा*] तुतीचें झाड व

तूतिया–*पु.* मोरचूद.

तूती– *स्त्री.* [*फा.*] १. पोपटाचें पिलूं; पोपट. २. पिपाणी. **मु०–बोलना**–१. बोलबाला होणें. २. जम बसणें. **(नक्कार खाने में)–की आवाज़**–मोठ्यांसमोर लहानांचा आवाज कसा ऐकूं येणार?

तूदा–*पु.* [*फा.*] १. मातीचा ढीग. २. उंचवटा; बांध; वरळी. ३. नेमबाजीचा अभ्यास करण्याचा मातीचा ढिगारा.

तूफाँ; तूफ़ान–*पु.* [*अ.*] १. वावटळ. २. वादळ; तुफान. ३. आपत्ति; संकट. ४. तंटाबखेडा. ५. आळा. **मु०–उठाना या खड़ा करना**–गोंधळ माजविणें. [स्क्वॉड'.

तूफानी दस्ता–*पु.* 'फ्लाइंग

तूम–*पु.* पिंजलेला कापूस.

तूमतड़ाक– *स्त्री.* थाटमाट; डामडौल.

तूमड़ी– *स्त्री.* गारुडयाची पुंगी.

तूमना–*क्रि. स.* १. कापूस पिंजणें; कापूस विरळ करणें. २. शिव्या देणें. ३. नाकीं नऊ आणणें.

तूमा–*पु.* पा० 'तूंबा'.**–पलटी; –फेरी**–याची वस्तु त्याला देणें; अदलाबदली.

तूमार–*पु.* [*अ.*] पाल्हाळ; लांबड लावणें; चऱ्हाट वळणें.

तूर–*पु.* [*फा.*] सीरियांतील एक पर्वत. या ठिकाणीं हजरत मूसा (मोझेस) यांना ईश्वरी प्रकाश दिसला होता.

तूरान–*पु.* [*फा.*] तार्तर देश.

तूर्ण–*अव्य.* लौकर; तावडतोब. –*वि.* वेगवान.

तूल–*पु.* [*अ.*] १. लांबी. २. विस्तार. **–तवील**–*वि.* लांबलचक; कंटाळवाणा. **–तूफ़ान**–*पु.* दंगाधोपा; आरडाओरडा. **मु०–पकड़ना**–वाढत जाणें; उग्र रूप धारण करणें.

तूलिका; तूली– *स्त्री.* कुंचा; 'ब्रश'. [स्तब्धता; मौन.

तूष्णी–*वि.* गप्प; मूक. –*स्त्री.**

तूस–सा–*पु.* भुसा; कोंडा.

तृखा*– *स्त्री.* तृषा; तहान.

तृण–न–*पु.* गवत; काडी.

तें*–*प्रत्य.* १. शीं; द्वारा. (तृतीया). २. पासून (पंचमी).

तेंतालीस–*वि.* त्रेचाळीस; ४३.

तेंदुआ–*पु.* चित्ता. [ते लोक.

ते*–*अव्य.* पासून. –सर्व; ते;

तेइ*– *सर्व.* तेच.

तेईस–*वि.* तवीस; २३.

तेऊ*–*सर्व.* ते; सर्वच्या सर्व; तेहि. [तलवार.

तेग़– *स्त्री.* [*अ.*] खड्ग; मोठी

तेग़ा–*पु.* खंजीर; तलवार.

तेज़–*वि.* [*फा.*[१. तीक्ष्ण. २. चपल; जोरानें धांवणारा; 'फास्ट'. ३. तिखट; झणझणीत. ४. महाग. ५. चलाख. ६. बुद्धिमान्. –*अव्य.* वेगानें; भरभर. **–मिज़ाज**–*वि.* तापट; रागीट.

तेज–*पु.* १. प्रभा; दीप्ति. २. तीक्ष्णता. ३. पराक्रम. **–मापी**–*पु.* तेजमापक; 'बोलोमीटर'.

तेजसी*–*वि.* तेजस्वी.

तेजस्वी–*वि.* प्रतापी; तेज असलेला. ['ॲसिड'.

तेज़ाब–*पु.* [*फा.*] तेजाब;

तेज़ी–*स्त्री.* [*फा.*] १. तीक्ष्णता. २. घाई; जलदी. ३. तेजी; महागाई.

तेतना*–*वि.* तितका.

तेता; तेतिक; तेतो*–*वि.* तितका; तितकाच.

तेरस– *स्त्री.* त्रयोदशी.

तेरह–*वि.* तेरा; १३.

तेरहीं– *स्त्री.* तेरावा (श्राद्धाचा).

तेरा– *सर्व.* तुझा. [– *स्त्री.* **तेरी**].

मु० तेरी-सी–तुझ्या हिताची; तुझ्या मनासारखें. [तिसरें वर्ष.

तेरुस*–पु. विगत किंवा आगामी

तेरे*–प्रत्य. पा० 'से'.

तेरो*– सर्व. तुझा.

तेल–पु. १. तेल; रोगण. २. लग्नांतील वधूवरांना तेल-हळद लावण्याचा विधि. मु०–चढ़ना–वधूवरांना तेल लावलें जाणें; हळदी लागणें.

तेलहन–पु. गळिताचें धान्य.

तेलहा+–वि. तेलाचा; तैल; तेलकट. [स्त्री.

तेलिन– स्त्री. तेलीण; तेल्याची

तेलिया– वि. तेलासारखा तुळ-तुळीत, गुळगुळीत व चकचकीत.–मसान–पु. कृपण माणूस.

तेली–पु. तेली. मु०–का बैल–सदा काम करीत राहाणारा.

तेवर–पु. रागीट नजर; क्रुद्ध दृष्टि. मु०–चढ़ना;–बदलना–क्रुद्ध होणें; डोळे वटारणें.

तेवरी– स्त्री. पा० 'त्योरी'.

तेवहार–पु. पा० 'त्योहार'.

तेह–हा*–पु. १. राग; क्रोध. २. अहंकार; गर्व.

तेहरा–वि. १. तिहेरी. २. तिप्पट. ३. तिसऱ्यांदा केलेला.

तेहवार–पु. सण; पर्व; उत्सव.

तेहि–ही*– सर्व. त्याला.–वि. १. रागीट. २. घमेंडखोर.

तेहेदार; तेहेबाज़–वि. १. रागीट. २. अभिमानी. ३. शेखी मिरवणारा. [–सर्व. तूं.

तैं*– प्रत्य. पासून; नें; द्वारा.

तैंडा*– सर्व. तुझा.

तैंतालीस–वि. त्रेचाळीस; ४३.

तै*–अव्य. तितका; तितके.

तै–वि. पा० 'तय'.

तैनात–वि. [अ.] नियुक्त; नेमलेला. [नियुक्ति.

तैनाती– स्त्री. [अ.] नेमणूक;

तैयार–वि. [अ.] १. तयार. २. धष्टपुष्ट.

तैयारी– स्त्री. [अ.] १. तयारी. २. पुष्टता; कुशलता.

तैयो–वो*–अव्य. १. तरीहि. २. तेव्हां; त्यावेळीं. [तरंगणें.

तैरना–क्रि. अ. १. पोहणें. २.

तैराक–वि. पटाईत पोहणारा; –पु. जलतरणपटु.

तैल–पु. १. तिळाचें तेल. २. तेल. –वि. तेलाचें.–चित्र–पु. तैलचित्र; 'ऑइलपेंट.' –पोत–पु. तेलाचें जहाज; 'ऑइल टँकर'.–वाहक पोत–पु. तेलवाहू जहाज. 'टँकर.'

तैश–पु. [अ.] राग; संताप; त्वेष. मु०–में आना–अत्यंत क्रुद्ध होणें.

तैसा–से–वि. पा० 'वैसा-से'.

तों*–अव्य. १. तेव्हां; त्या वेळीं. २. तसें; त्या प्रकारें.

तोंद– स्त्री. ढेरी; पोट सुटणें.

तोंदल–वि. ढेरपोटचा.

तो–अव्य. तर; तेव्हां; तशा स्थितींत. –क्रि. अ.* होता.–सर्व.* – 'तू'चें विभक्ति-प्रत्यय लागण्यापूर्वीं बनणारें रूप. [उदा० तोर = तुझा].

तोइ*–पु. पाणी.

तोख*–पु. संतोष.

तोखना*–क्रि.स. तृप्त करणें; संतुष्ट करणें; प्रसन्न करणें.–क्रि. अ.–तृप्त होणें.

तोटका–पु. तोडगा; जादूटोणा.

तोड़–पु. १. तोडण्याची क्रिया. २. नदीचा जोराचा प्रवाह. ३. युक्ति; तोड.

तोड़ना–क्रि. स. १. तोडणें; मोडणें; फोडणें. २. रद्द करणें. ३. फूट पाडणें.

तोड़वाना–क्रि. स. तोडविणें.

तोड़ा–पु. १. हजार रुपये मावूं शकतील अशी पैशाची थैली. २. हातांत किंवा पायांत घालावयाचा दागिना. ३. पलिता; मशाल.–(ड़े) दार बंदूक– स्त्री. जळता पलिता लावून उडविण्याची बंदूक.

तोड़ाई– स्त्री. तोडण्याचें काम किंवा मजुरी.

तोतई–वि. पोपटी रंगाचा.

तोतला–वि. बोबडा; तोतरा.

तोता–पु. [फा.] १. पोपट. २. बंदुकीचा घोडा. –चश्म–पु. बेमुर्वत; निर्लज्ज.–परी–पु. एक प्रकारचा मोठा व लांबट आंबा; तोतापुरी. मु०–(ते) की तरह आँख फेरना–जुने संबंध विसरणें; बेमुर्वत, निर्लज्ज बनणें.

तोन*–पु. धनुष्याचा भाता.

तोप– स्त्री. [तु.] तोफ.–ची–पु. गोलंदाज. [लपविणें.

तोपना*–क्रि. स. झांकणें;

तोफ़गी– स्त्री. [फा.] १. खुबी; विशेषता; वैशिष्टय. २. चांगले-पणा.

तोबड़ा–पु. तोबरा; घोड्याला दाणा देण्याची कातडी किंवा तर-टाची पिशवी.

तोबा–पु. [अ.] एखादें दुष्कृत्य पुन: न करण्याची प्रतिज्ञा किंवा शपथ; पश्चात्ताप. मु०–तिल्ला मचाना–आरडा-ओरडा करणें.

तोम–पु. समूह; ढीग; रास.

तोमर–पु. १. भाला. २. बारा मात्रांचें एक वृत्त.

तोय–पु. पाणी. –डिंब–भ–पु. गार (पावसाची).

तोर–रा–वि. तुझा.

तोरई– स्त्री. दोडकें; घोसाळें.

तोरा*–*स्त्री.* १. वेळ. २. शीघ्रता. –*सर्व.* तुझा.–*पु.* तुरा.

तोलना*–*क्रि. स.* १. ओंगण घालणें. २. वजन करणें. ३. उचलणें; सांभाळणें.

तोला–*पु.* तोळा; बारा मासे.

तोशक–*स्त्री.* [*फा.*] लहान गादी. **–खाना**–*पु.* कपडालत्ता ठेवण्याची खोली.

तोशदान–*पु.* [*फा.*] १. फराळाचा डबा. २. काडतुसांची चामड्याची पिशवी.

तोशा–*पु.* [*फा.*] फराळ; प्रवासास जातांना बरोबर घेतलेले फराळाचे पदार्थ; शिदोरी. **–खाना** –*पु.* राजांचें वस्त्रागार.

तोष-स*–*पु.* तृप्ति; संतोष.

तोहफ़ा–*पु.* [*अ.*] १. बक्षीस. २. भेट; नजराणा; देणगी.

तोहमत–*स्त्री.* [*अ.*] खोटा आरोप; आळ.

तोहर-रा–* *सर्व.* १. तुम्ही. २. तुमचा; तुझा; तुम्हांला; तुला.

तोहि-हे*–*सर्व.* तुला; तुम्हांला.

तौंस*–*स्त्री.* भयंकर तहान; उकाडा; काहिली.

तौंसना*–*क्रि. अ.* होरपळणें; भाजून निघणें. [उष्मा.

तौंसा–*पु.* भयंकर उष्णता;

तौंसियत–*स्त्री.* विस्तवाची आंच.

तौ*–*अव्य.* १. तर. २. तेव्हां. –*क्रि. अ.* होता. **–लगि**–तोंपर्यंत.

तौक़–*पु.* [*अ.*] १. कंठी; हंसळी; गळ्यांतील एक दागिना. २ गुलामीचें निदर्शक गळ्यांतील कडें.

तौन+–*सर्व.* तो.

तौनी–*स्त्री.* लहान हलका तवा.

तौफ़ीक़–*स्त्री.* [*अ.*] १. ईश्वराची कृपा. २. श्रद्धा; भक्ति. ३. सामर्थ्य; शक्ति.

तौबा–*स्त्री.* पा० 'तोबा'.

तौर–*पु.* [*अ.*] वर्तन; वागणूक. २. दशा; स्थिति. ३. तऱ्हा; पद्धत. **–तरीक़-क़ा**– *पु.* चालचलन; वर्तन; ढंग.

तौरी(रे)त–*पु.* [*हिब्रू*] १. यहुद्यांचा धर्मग्रंथ. २. जुना करार; 'ओल्ड टेस्टॅमेंट'. [तराजू.

तौल–*स्त्री.* वजन; माप. –*पु.*

तौलना–*क्रि. स.* १. तोलणें; वजन करणें. २. ओंगण घालणें.

तौलिया–*स्त्री. पु.* [*इं.*] पंचा; 'टॉवेल.' [बेइज्जती; अप्रतिष्ठा.

तौहीन–*स्त्री.* [*अ.*] अपमान;

त्याग–*पु.* त्याग; सोडणें; उत्सर्ग. **–पत्र**–*पु.* राजीनामा. [करणें.

त्यागना–*क्रि. स.* सोडणें; त्याग

त्यूँ+; **त्यों**–*अव्य.* १. तेव्हांच; तत्काल. २. त्याप्रमाणें; तसें.

त्योरी–*स्त्री.* १. कपाळाची आंठी. २. दृष्टि; नजर. **मु०–चढ़ना या बदलना; –में बल पड़ना** –कपाळाला आंठी पडणें.**–चढ़ाना; –बदलना**– १. रागानें कपाळाला आंठ्या घालणें. २. रागानें डोळे वटारणें. [उत्सव.

त्यो(त्यौ)हार–*पु.* सण; पर्व;

त्यौहारी–*स्त्री.* सणाची बक्षिसी; पोस्त.

त्यौराना–*क्रि. अ.* चक्कर येणें.

त्रपा–*स्त्री.* लज्जा; शरम.

त्रसना*–*क्रि. अ.* भीतीनें थरथर कांपणें; घाबरणें.

त्राण-न–*पु.* रक्षण; रक्षण करण्याचें साधन.

त्राहि–*अव्य.* रक्षण करा; वांचवा. **मु०–मचना**– हाहाकार उडणें; त्राहि त्राहि होणें.

त्रि–*वि.* तीन. **–कालज्ञ**–*वि.* भूत, वर्तमान व भविष्य या तीन्ही काळांतील गोष्टी जाणणारा. **–कोणमिति**–*स्त्री.* रेखागणित; ज्यामिति.**–चक्रयान**–*पु.* तीन चाकी सायकल; 'ट्रायसिकल'. **–दश-स**– –*पु.* १. देवादिक. २. जीव.**–दिव**– *पु.* स्वर्ग; आकाश. **–पथगामिनी**– *स्त्री.* गंगानदी. **–बली; –वलिका; वली**– *स्त्री.* पोटाला पडणाऱ्या तीन वळयांचा समुदाय (स्त्री–सौंदर्य वाढविणारा). **–भंग**–*वि.* तीन ठिकाणीं वांकडा. *पु.*–तीन ठिकाणीं अंग वांकडे करून उभे राहाणें. **–विध**–*वि.* तीन प्रकारचें.

त्रिखा*–*स्त्री.* तहान; तृषा.

त्रिज्या–*स्त्री.* वृत्ताचा अर्धा व्यास; 'रेडियस'.

त्रिय-या*–*स्त्री.* स्त्री.–(**या**) **चरित्र**–*पु.* पुरुषाला फसविण्याचें स्त्रीचें चातुर्य.

त्रिसना*–*स्त्री.* तृष्णा.

त्रुटि–*स्त्री.* १. उणीव; कमतरता. २. चूक.

त्रोटक–*पु.* १. एक शृंगारप्रधान नाटक. २. एक विषारी किडा. ३. एक राग. ४. एक छंद.

त्रोण –*पु.* बाणांचा भाता; तूणीर.

त्वदीय–*वि.* तुझा; तुमचा.

त्वरण–*पु.* १. वेगानें करणें. २. गतिवृद्धि; वेगाची वाढ; 'एक्सेलरेशन'.

त्वरा–*स्त्री.* घाई; जलदी. **–लिपि**–*स्त्री.* शीघ्रलिपि; 'शॉर्टहँड'.

थ

थ– देवनागरी वर्णमालेच्या त-वर्गांतील दुसरा वर्ण.

थंब–भ–भा*–पु. १. स्तंभ; खांब. २. आधार; टेकू.

थंभन–पु. १. थांबविणें; अडविणें. २. स्तंभन करविणारें औषध.

थँभना*–क्रि. स. थांबणें; अडणें. [स्तंभित. २. अचल; स्थिर.

थंभित*–वि. १. थांबलेला;

थकना–क्रि. अ. १. थकणें; दमणें. २. कंटाळणें. ३. वार्धक्यानें थकणें.

थकान– स्त्री. थकवा; शैथिल्य.

थकाना–क्रि. स. १. थकविणें. २. पराभूत करणें. [लेला; दमलेला.

थकामाँदा–वि. थकलेला-भाग-

थकाव(ह)ट– स्त्री. १. थकवा; श्रांति. २. शैथिल्य. [चकित; मुग्ध.

थकित–वि. १. थकलेला. २.

थकौंहाँ*-वि. कांहींसा थकलेला; भागलेला; श्रांत. [द्रव; गोळा.

थक्का–पु. गोठलेलें, पातळ

थगित*–वि. स्थगित; तहकूब.

थड़ा+–पु. चौथरा; चबुतरा.

थणुसुत*–पु. शंकराचा मुलगा–गणपति किंवा कार्तिकेय.

थति*– स्त्री. १. ठेव. २. धन; मुद्दल. –**हार**–पु. ठेवीदार.

थत्ती-स्त्री. थप्पी; रास; ढीग.

थन–पु. चतुष्पादाचें स्तन; थान.

थनी– स्त्री. अजागलस्तन; शेळीच्या गळ्याखालचे थान.

थनेला–पु. स्त्रियांच्या स्तनांवर होणारा फोड.

थनैत–पु. १. गांवचा पुढारी. २. जमीनदाराचा खंड वसूल करणारा गुमास्ता. [गोंजारणें.

थपकना–क्रि. स. थोपटणें;

थपकी– स्त्री. थापटी; प्रेमानें थोपटणें; हलकेच मारलेली थाप.

थपड़ी– स्त्री. टाळी. **मु०** –**पीटना**– १. टाळी वाजविणें. २. उपहास करणें.

थपथपाना–क्रि. स. थोपटणें.

थपथपी– स्त्री. हलकेंच मारलेली थाप; थापटी.

थपन*–पु. स्थापना. –**हार**–वि. पु. पुनः स्थापना करणारा; प्रतिष्ठापक.

थपना*– क्रि. अ. स्थापित होणें. –क्रि. स. १. स्थापना करणें. २. बसविणें; ठोकणें. [करणें.

थपाना*–क्रि. स. स्थापित

थपुआ–पु. चपटें कौल.

थपेड़ना–क्रि. स. १. थप्पड मारणें. २. आघात करणें.

थपेड़ा–पु. १. थप्पड. २. प्रहार; आघात; धक्का.

थप्पड़–पु. थप्पड; चापटी. **मु०–कसना; –जमाना; –लगाना**– थोबाडींत मारणें.

थम*–पु. खांब; खुंट (केळीचा).

थमकारी*–वि. १. संयमी. २. थोपवून धरणारा.

थमना–क्रि. अ. १. थांबणें; थबकणें. २. धीर धरणें. ३. बंद होणें; चालू नसणें.

थमाना–क्रि. स. १. स्वाधीन करणें; हातांत देणें. २. ठेवणें.

थर–पु. १. स्थळ; जमीन. २. राजस्थानाच्या उत्तरेकडील एक वाळवंट.–स्त्री. १. थर; घडी. २. वाघाची गुहा. [कांपणें; थरथरणें.

थरकना–क्रि. अ. थरथर

थरकाना+–क्रि. स. भयभीत करणें.

थरथराना–क्रि. अ. भीतीनें थरथरणें, कांपणें.

थरथराहट– स्त्री. कंप; थरकांप.

थरना+–क्रि. स. १. आघात करणें. २. फसविणें.

थरमामीटर–पु. [इं.] तापमान-दर्शक यंत्र; 'थर्मामीटर'.

थरसना*–क्रि. अ. घाबरणें; थरारणें. [कांपणें.

थरहराना–क्रि. अ. थरथर

थरिया+– स्त्री. ताट; थाळी.

थरी– स्त्री.* हिंस्र पशूची गुहा.

थर्मस–पु. [इं.] 'थर्मास'.

थर्राना–क्रि. अ. थरथरणें; थरकांप उडणें.

थल–पु. १. स्थळ; जागा; ठिकाण. २. कोरडी जमीन. ३. वाळवंट; रेताड जमीन.–**बेड़ा**–पु. १. नावेचा, जहाचा धक्का. २. पत्ता; ठावठिकाणा; थांग.

थलकना–क्रि. अ. १. लठ्ठपणामुळें चालतांना शरीराचें मांस हलणें; थुलथुलणें. २. थरथरणें.

थलथल–वि. वातानें अंग सुटलेला; थुलथुलीत. ['थलकना'.

थलथलाना–क्रि. अ. पा०

थलिया– स्त्री. थाळी; ताट.

थली– स्त्री. १. स्थान; ठिकाण. २. तळ. ३. बैठक. ४. वाळवंट.

थवई–पु. गवंडी. [दबणें.

थसकना–क्रि. अ. खचणें;

थहना*–क्रि. स. ठाव घेणें.

थहराना–क्रि. स. थरथर कांपणें.

थहाना–क्रि. स. १. थांग लावणें. २. एखाद्याच्या विद्वत्तेविषयीं किंवा योग्यतेविषयीं अंदाज करणें.

थहारना+–*क्रि. स.* पाण्यांत पोहतां पोहतां थांबणें.

थाँग–*स्त्री.* १. चोर किंवा डाकूचें गुप्त स्थान. २. थांग; शोध.

थाँगी–*पु.* १. चोरीचा माल विकत घेणारा. २. चोरांचा पुढारी. ३. चोरांना चोरीची माहिती करून देणारा. ४. गुप्त हेर.

थाँवरा*-**ला**–*पु.* आळें.

था–*क्रि. अ.* होता. (है चे पुल्लिंगी एकवचनी भूतकाळाचें रूप). [–*स्त्री.* १. जागा. २. बैठक.

थाई*–*वि.* स्थायी; कायमचा.

थाक–*पु.* १. गांवाची सीमा. २. रास.–*स्त्री.* थकवा.

थाकि*–*स्त्री.* थकवा.

थाट–*पु.* १. जनकराग; अनेक रागांचा आधारभूत राग. २. सांगाडा; रचना; घडण. ३. थाटमाट. [२. ठेव.

थाति–*स्त्री.* १. स्थिरता; स्थैर्य.

थाती–*स्त्री.* १. ठेव; अनामत. २. वेळीं उपयोगीं पडावी म्हणून राखून ठेवलेली वस्तु. ३. स्थैर्य.

थान–*पु.* १. स्थान; ठिकाण. २. राहाण्याची जागा; निवासस्थान. ३. देवस्थान. ४. तबेला. ५. कपडयाचें ठाण. ६. संख्या.

थानक–*पु.* १. स्थान. २. नगर. ३. आळें. ४. फेस.

थाना–*पु.* १. ठाणें; पोलिस–चौकी. २. निवासस्थान.

थानेदार–*पु.* फौजदार; पोलिस-चौकीवरील अधिकारी.

थानैत–*पु.* एखाद्या स्थानाचा अधिपति किंवा देवता.

थाप–*स्त्री.* १. थाप (तबल्याची). २. थप्पड. ३. हाताचा ठसा. ४. प्रतिष्ठा; मर्यादा. ५. प्रमाण. ६. शपथ. [पना.

थापन–*पु.* स्थापना; प्रतिष्ठा-

थापना–*क्रि. स.* १. स्थापणें; बसविणें.–*स्त्री.* स्थापना.

थापा–*पु.* १. हाताच्या पंजाचा छाप; ठसा. २. शेतांत धान्याच्या राशीवर मातीनें किंवा शेणानें केलेली खूण. ३. ढीग; रास.

थापिया; **थापी**–*स्त्री.* गवंडयाचें एक हत्यार; थापी.

थामना–*क्रि. स.* १. थांबविणें; अडविणें. २. थोपवून धरणें; धरून ठेवणें. ३. सहायता करणें; मदत करणें. ४. सांभाळणें. ५. जबाबदारी घेणें. [थाळी.

थार–रा–ल–*पु.* मोठी परात;

थाला–*पु.* १. आळें. २. फोडाची सूज.

थाली–*स्त्री.* ताट; थाळी; परात. **मु०–का बैंगन**–पगडी बदलणारा; चंचल.

थावर*–*वि.* स्थावर.

थावरा-ला*–*पु.* आळें.

थाह–*स्त्री.* १. तळ; खोली. २. थांग; पत्ता. ३. सीमा; अंत. **मु०–लेना**–अंदाज घेणें.

थाहना–*क्रि.स.* अंदाज पाहाणें; ठाव घेणें; थांग पाहाणें.

थाहरा*–*वि.* उथळ.

थिगली–*स्त्री.* ठिगळ.

थिति*–*स्त्री.* १. स्थिति; दशा. २. स्थिरता; शांति.

थिर*–*वि.* १. स्थिर; अचल. २. शांत. ३. स्थायी; टिकाऊ.

थिरक–*पु.* नृत्यांतील पदविक्षेप; पदविन्यास.

थिरकना–*क्रि. अ.* नाचणें; नाचतांना हावभाव करणें; मागें-पुढें डोलणें.

थिरना–*क्रि. स.* १. तरंगरहित होणें; शांत व संथ होणें (पाण्याचा प्रवाह). २. निवळणें. ३. तळाशीं जमणें.

थिराना–*क्रि. अ.* स्थिर होणें. –*क्रि. स.* स्थिर होऊं देणें.

थीगली–*स्त्री.* ठिगळ.

थीता–*पु.*; **थीती**–*स्त्री.* १. स्थैर्य. २. शांति; धैर्य.

थुकवाना; **थुकाना**–*क्रि. स.* १. थुंकविणें. २. मनांतलें काढून घेणें. ३. निंदा अगर तिरस्कार करविणें.

थुक्का फजीहत–*स्त्री.* १. छी थू; फजिती. २. भांडण; झगडा.

थुड़ी–*स्त्री.* छी थू; धिक्कार. **मु०–थुड़ी करना**–छी थू करणें.

थुतकारना–*क्रि. स.* थू थू करणें; अत्यंत तिटकारा दर्शविणें.

थुथराई*–*स्त्री.* उणें पडणें; कमी असणें. [उणें पडणें.

थुथराना*–*क्रि. अ.* थोडें होणें;

थुन्नी–*स्त्री.* खांब; टेकू.

थुरना–*क्रि. स.* १. कुटणें. २. पिटणें.

थुरहथा*–*वि.* १. लहान हाताचा. २. मितव्ययी; कंजूष.

थुलमा–*पु.* वरून केंस चिकटविलेली एक प्रकारची जाड घोंगडी.

थुली–*स्त्री.* रवा.

थूक–*पु.* थुंकी. **मु०–लगाना**–अपमानित करणें. **थूकों सत्तू सानना**–दांत कोरून पोट भरणें.

थूकना–*क्रि. अ.* १. थुंकणें. २. धिक्कारणें; निंदा करणें. **मु० किसीपर थूकना**–तुच्छ समजणें; दोष देणें. **थूक कर चाटना**– १. त्यक्त वस्तु ग्रहण करणें. २. कबूल करून नाकारणें. **थूक देना**–१. निंदा करणें. २. सोडून देणें.

थूथन–ना–*पु.*; **थूथनी**–*स्त्री.*

लांवट तोंड (उंट इ० चें); थोवाड.

थूथरा–*पु.* १. नागाचा फणा. २. लांब तोंड. [आधार; टेकू.

थून–नी–*स्त्री.* १. खांब. २.

थूमा+–*पु.* लाकडाचा अनघड खांब; टेकू.

थूरना*–*क्रि. स.* १. कुटणें; तुडविणें. २. मारणें. ३. कोंबणें. ४. अधाशाप्रमाणें खाणें. [२. बेढब.

थूल–ला*–*वि.* १. स्थूल; जाड.

थूली–*स्त्री.* रवा.

थूवा–*पु.* १. टेकडी. २. मातीचा ढीग.–*स्त्री.* घृणा अगर तिरस्कार-सूचक. शब्द.

थूहड़–र–*पु.* शेराचें झाड.

थूहीं–*स्त्री.* पा० 'थूवा'.

थेंथर+–*वि.* १. चकित. २. हैराण. ३. निर्लज्ज.

थेईथेई–*स्त्री.* थयथय (नाचणें); नृत्याचा एक ढंग व ताल.

थेगली*–*स्त्री.* १. ठिगळ. २. गोधडी.

थेथर–*वि.* थकलेला; शांत.

थेबा–*पु.* १. रत्न. २. कोंदण.

थैला–*पु.* १. पिशवी; थैली. २. खिसा.

थैली–*स्त्री.* १. पिशवी. २. कसा.–**दार**–*पु.* १. खजिन्यांत रुपयांची ने–आण करणारा माणूस. २. नगदी कारकून; 'कॅशिअर'. –**बरदारी**–*स्त्री.* थैली पोंचविण्याचें काम.

थोक–*पु.* १. ढीग; रास. २. समूह. ३. ठोक विक्री.–**फ़रोश**–*पु.* ठोक व्यापारी. **मु०–करना**–एकत्र करणें.

थोड़ा–*वि.* थोडा; अल्प; कमी.–*अव्य.* अल्प प्रमाणांत. –**बहुत**–*वि. अव्य.* थोडेंफार; थोडें-बहुत.– (ड़े) **ही** – *अव्य.* मुळींच नाहीं; थोडाच.

थोती–*स्त्री.* जनावराच्या तोंडाचा पुढील भाग.

थोथा–*वि.* १. पोकळ; रिकामा. २. तथ्य नसलेला. ३. बोथट. ४. कुचकामाचा. **मु०–चना बाजे घना**–उथळ पाण्याला खळखळाट फार.

थोपड़ी; थोपी+–*स्त्री.* थप्पड; चपराक.

थोपना–*क्रि. स.* १. थापणें; लिंपणें. २. गळ्यांत घालणें; माथीं मारणें.

थोबड़ा–*पु.* पा० 'तोबड़ा'. 'थूथन'.

थोर–रा+–*वि.* १. थोडा. २. लहान.–*पु.* १. गाभा. २. निवडुंग.

थोरिक*–*वि.* थोडा; अल्प.

थ्यावस+–*पु.* १. स्थैर्य. २. स्वस्थता.

द

द–देवनागरी वर्णमालेच्या तवर्गांतील तिसरा वर्ण.

दंग–*वि.* [*फा.*] थक्क; विस्मित. **मु०–रह जाना**–थक्क होणें.

दंगई–*वि.* १. दंगाधोपा करणारा; दंगेखोर. २. उपद्व्यापी; उपद्रवी. ३. प्रचंड; भयंकर.

दंगल–*पु.* [*फा.*] १. कुस्तीचा आखाडा. २. कुस्त्यांचा फड, मैदान. ३. समूह; जमाव. ४. मोठी गादी. ५. चढाओढ. **मु०–मारना** – कुस्ती मारणें, जिंकणें.

दंगवारा–*पु.* शेतकऱ्यांनीं, नांगर बैल इ० देऊन परस्परांशीं सहकार्य करणें. [अद्‌भुत.

दंगह*–*वि.* चकित करणारा;

दंगा–*पु.* १. झगडा; उपद्रव; मारामारी; दंगाधोपा. २. गोंगाट. –**ई**–*पु.* दंगेखोर.

दंगैत–*वि. पु.* दंगेखोर.

दंड–*पु.* १. दंड; सोटा. २. दंड; जोर (व्यायाम). ३. साष्टांग नमस्कार; दंडवत. ४. दंड; शिक्षा. ५. तुळई; 'बीम'.–**कर**–*पु.* दंडात्मक कर; 'प्यूनिटिव्ह' टॅक्स'. –**चक्र**–*पु.* सैन्याचा एक विभाग.–**चक्री**–*स्त्री.* 'रँक अँड फिन्यन'.–**न्यायालय**–*पु.* फौजदारी कोर्ट; 'क्रिमिनल कोर्ट'.–**विज्ञान**–*पु.* दंडशास्त्र; दंडनीति; 'पीनॉलॉजी.' [शास्ता.

दंडक–*पु.* १. दंडा; काठी. २.

दंडन–*पु.* दंड देणें; शिक्षा; निग्रह.

दंडना*–*क्रि. स.* शिक्षा देणें; दंड करणें.

दंडनीय–*वि.* शिक्षेस पात्र.

दंडवत्–*पु. स्त्री.* साष्टांग प्रणाम.

दंडात्मक–*वि.* शिक्षा म्हणून बसविलेला; 'प्यूनिटिव्ह'.–**कर**–*पु.* शिक्षा म्हणून बसविलेला कर; 'प्यूनिटिव्ह टॅक्स'.

दंडादेश–*पु.* शिक्षा; 'सेंटेन्स'.

दंडादेशित–*वि.* शिक्षा झालेला. 'सेंटेन्सड.'

दंडाधिकारी–*पु.* फौजदारी न्यायाधीश; न्यायाधिकारी; 'मॅजिस्ट्रेट'.

दंडायमान–*वि.* काठीसारखा सरळ, ताठ उभा असलेला.

दंडित–*वि.* शिक्षा झालेला.

दंडोपबंध–*पु.* कायद्यानें ठरविलेला दंड किंवा शिक्षा; 'सँक्शन'.

दंडौत+–*स्त्री.* साष्टांग नमस्कार.

दंड्य–*वि.* शिक्षेस पात्र. **–षड्यंत्र**–*पु.* फौजदारी स्वरूपाचा कट; 'क्रिमिनल कॉन्स्पिरसी'.

दंत–*पु.* दांत. **–चिकित्सक**–*पु.* दंतवैद्य; दांतांचा डॉक्टर; 'डेंटिस्ट'.**–चिकित्सा**–*स्त्री.* दंतवैद्यकी; 'डेंटिस्ट्री'.

दंतिचक्र–*पु.* दांते असलेलें चाक; 'गिअर'.

दँतिया–*स्त्री.* लहान दांत.

दंतुर–*वि.* १. दंताळचा. २. दांते असलेला; 'डेंटेड'. ३. कुरूप; बेढब. ४. उंचसखल; ओबडधोबड. [दातरा; दंताळचा.

दँतुला–*वि.* मोठ्या दांतांचा;

दंतोद्भेदकाल–*पु.* मुलांचे दांत येण्याचा काळ; 'टीथिंग पीरियड.

दंतोष्ठ्य–*वि.* दांत व ओठ यांच्या साह्यानें उच्चारित होणारा वर्ण (उदा० व).

दंत्य–*वि.* ज्याचें उच्चारण-स्थान दांत हें आहे असा (उदा० 'त'वर्ग).

दंद–*दा–*पु.* १. द्वंद; तंटा; झगडा. २. ताल देण्याचें एक वाद्य. –*स्त्री.* उष्णता.

दंदाँ; दंदान–*पु.* [*फा.*] दांत. **–शिकन**–*वि.* १. सडेतोड (उत्तर). २. दांत पाडणारा. **–साज़**–*पु.* दांत बनविणारा.

दंदाना–*पु.* [*फा.*] दांते; दांत्यांची ओळ; फणी, करवत इ० चे दाते .**–(ने)दार**–*वि.* दांतेदार; दांते असलेला. [उकाडा होणें.

दंदाना+–*क्रि. अ.* उकडणें;

दंदारू–*पु.* फोड; भाजून आलेला फोड. [दायक.

दंदी*–*वि.* मांडखोर; त्रास-

दंपा–*स्त्री.* वीज. [खोर.

दंभी–*वि.* १. ढोंगी. २. घमेंड-

दँवरी–*स्त्री.* धान्याची मळणी.

दंस–*पु.* दंश; डंख. [हीन.

दइमारा*–*वि.* दुर्दैवी; भाग्य-

दई*–*पु.* १. ईश्वर. २. दैव; प्रारब्ध. **– जार –** *वि.* दुर्दैवी. २. अशुभ; वाईट. **– मारा –** *वि.* दैवी आपत्तींत सांपडलेला; दुर्दैवी. **मु०–का घाला**–दुर्दैवी; कमनशिबी.

दकन–*पु.* दक्खन; दक्षिण भारत.

दकनी–*वि.* दक्षिणेकडील. –*स्त्री.* उर्दूचें दक्षिण भारतांत प्रचलित असलेलें मूळ रूप.

दकियानूसी– *वि.* [*अ.*] १. अत्यंत प्राचीन. २. सनातनी; बुरसटलेला.

दक़ीक़ा–*पु.* [*अ.*] १. सूक्ष्म वस्तु. २. युक्ति; उपाय. ३. क्षण.

दक्खिन–*पु.* १. दक्षिण (दिशा). २. दक्षिणेकडील प्रदेश.

दक्खिनी–*वि.* दक्षिणेकडील. –*स्त्री.* १. दक्षिणेंत प्रचलित असलेली उर्दू भाषा.

दक्षता-अर्गल–*पु.* नोकरीमध्यें कार्यक्षमतेवर अवलंबून असलेला अडसर; 'एफीशियन्सी बार'.

दक्षिण–*पु.* दक्षिण दिशा.–*वि.* १. उजवा. २. अनुकूल. **–पवन**–*पु.* वसंत ऋतूंतील उन्मादक वारा; दक्षिणेकडून, मलयगिरीवरून येणारा सुगंधी वारा.

दक्षिणावर्त–*वि.* डावीकडून उजवीकडे जाणारा; 'क्लॉकवाइज़'. –*पु.* ज्यांत हवा जाण्याचा मार्ग उजवीकडे आहे असा शंख.

दख़मा–*पु.* [फा. 'दख़्मः'] पारसी लोक आपल्यांतील मृत व्यक्तींचीं प्रेतें पक्ष्यांना खाण्यासाठीं जेथें ठेवून येतात तें विहिरीच्या आकाराचें स्मशान–स्थान.

दख़ल–*पु.* [*अ.*] १. अधिकार; ताबा. २. हस्तक्षेप; ढवळाढवळ. ३. प्रवेश; शिरकाव. **–अंदाज़**–*वि.* हस्तक्षेप, ढवळाढवळ करणारा. **–अंदाजी**– *स्त्री.* हस्तक्षेप; ढवळाढवळ. **–दिहानी**– *स्त्री.* ताबा देणें. **–याबी**– *स्त्री.* अधिकार किंवा ताबा मिळवणें. **मु०–देना**– हस्तक्षेप करणें; अडथळा आणणें.

दखिनहरा+–*पु.* दक्षिणेकडून येणारा वारा.

दख़ील–*वि.* [*अ.*] ताबा ठेवणारा; कब्जेदार. **–कार**–*पु.* बारा वर्षांच्या वहिवाटीचा हक्क सांगणारें, कायम कूळ. [डंका.

दगड़–*पु.* नगारा; युद्धाचा

दगड़ना+–*अ. क्रि.* सत्य गोष्टीबद्दल अविश्वास दाखविणें.

दग़दग़ा–*पु.* [*अ.*] १. भय; भीति. २. संशय; शंका; धुगधुग. ३. एक कंदील.

दग़दग़ाना–*क्रि. अ.* चकाकणें.

दग़दग़ाहट–*स्त्री.* चमकणें; चकाकणें; झगझगाट.

दगदगी–*स्त्री.* भीति.

दगधना*–*क्रि. अ.* १. जळणें. २. पीडित होणें. –*क्रि. स.* १. जाळणें. २. दुःख देणें.

दगना–*क्रि. अ.* १. सुटणें (बंदूक, तोफ इ०). २. करपणें; जळून जाणें. ३. डागळलें जाणें; डाग पडणें. ४. प्रसिद्ध, प्रख्यात होणें. –*क्रि. स.* पा० 'दागना'.

दगर–रा*–*पु.* १. उशीर; विलंब. २. रस्ता.

दगरी+–*स्त्री.* बिन सायीचें दही.

दग़ल–*पु.*]*अ.*] १. दगा;

कपट; धोका. २. बहाणा.**–फ़सल–पु.** कपट; फसवणूक; दगा-फटका.

दगला–पु. लांब अंगरखा; डगला.

दगहा–*वि.* प्रेताला अग्नि देणारा व क्रियाकर्म करणारा. *–वि.* १. जळका. २. डाग पडलेला. ३. डाग दिलेला; चरका दिलेला.

दग़ा– *स्त्री.* [*अ.*] १. कपट; धोका. २. फसवणूक.**–दार; –बाज़–** *वि.* दगलबाज; कपटी. **–बाज़ी–** *–स्त्री.* दगलबाजी; कपट.

दगाती*–*वि.* दगाबाज.

दग़ैल–*वि.* १. डागळलेला. २. दोष असलेला. ३. दगाबाज.

दचकना–*क्रि. अ.* १. ठेंच किंवा धक्का लागणें. २. दबणें. ३. हिसका बसणें.*–क्रि. स.* १. धक्का देणें. २. दाबणें.

दचका–पु. धक्का; हेलकावा.

दचना*–*क्रि. अ.* खालीं येणें; पडणें. [पार्वती.

दच्छ–पु. दक्ष.**–कुमारी*–स्त्री.**

दच्छिन*–*वि. पु.* दक्षिण.

दच्छिनता*– *स्त्री.* आपल्या सर्व नायिकांवर समान प्रेम करण्याचा गुण.

दज्जाल–पु. [*अ.*] १. एकाक्ष; तिरळा. २. दगाबाज माणूस.

दझ्झना*–*क्रि. अ.* जळणें; दग्ध होणें. [दाढीवाला.

दढ़ियल–*वि.* दाढी राखणारा;

दतवन; दतुअ(व)न; दतौन– *स्त्री.* १. दातवण (बाभूळ, लिंब इ० चें). २. तोंड धुणें.

दत्त–*वि.* दिलेला.**–चित्त**–*वि.* एखाद्या कामांत पूर्ण लक्ष घालणारा; रमून गेलेला; एकाग्र.

दत्त; दत्तक–पु. दान; दत्तक.

दत्तकग्रहण–पु. दत्तक घेणें; 'अॅडॉप्शन'. [विधि.

दत्तविधान–दत्तक घेण्याचें कार्य,

दत्ति– *स्त्री.* १. दान. २. वाङ्‌निश्चय.

ददरा–पु. गाळावयाचें वस्त्र.

ददिया ससुर–पु. आजे सासरा; सासऱ्याचा बाप.

ददिहाल–पु. १. कूळ; वंश. २. पित्याच्या पित्याचें घर.

ददोरा–पु. गांध; गांठ; टेंगूळ.

दध–पु. १. दही. २. वस्त्र; कपडा.*–वि.* देणारा.

दधि–पु. १. दही. २. घर. ३. वस्त्र. ४.* समुद्र. **–काँदो–पु.** गोकुळ अष्टमीच्या दिवशीं दह्यांत हळद मिसळून एकमेकांच्या अंगावर फेंकतात, तो उत्सव.**–चार–पु.** दही घुसळण्याची रवी. **–सार–पु.** लोणी. **–सुत–पु.** १. कमळ. २. चंद्र. ३. मोती. ४. विष. ५. लोणी.**–स्वेद–पु.** ताक; मठ्ठा.

दनदनाना–*क्रि. अ. स.* १. दणाणून सोडणें. २. आनंदित होणें.

दनादन–*अव्य.* १. दणादण आवाज करीत. २. आनंदानें. ३. सतत.

दनुज–पु. दानव; दैत्य.

दपट–*स्त्री.* धमकावणी; दटावणी. [दरडावणें.

दपटना–*क्रि. अ.* दटावणें;

दपु–पु. दर्प; अहंकार; घमेंड.

दपेट–*स्त्री.* १. दटावणें; दरडावणें. २. रपेट; दौड.

दप्प*–*पु.* दर्प; घमेंड.

दफ़्ती– *स्त्री.* [*अ.*] पुठ्ठा (पुस्तकांचा); पुष्टिपत्र.

दफ़न–पु. [*अ.*] १. प्रेत पुरण्याचा विधि. २. गाडणें.

दफ़नाना–*क्रि. स.* [*अ.*] १. पुरणें; गाडणें. २. प्रेताला मूठ–माती देणें.

दफ़ा– *स्त्री.* [*अ.*] १. वेळ; खेप. २. कायद्याचें कलम. *–वि.* दूर केलेला; तिरस्कृत. **–दार–पु.** नाईक; फौजदार. **मु०–लगाना–** कायद्याच्या कलमाखालीं खटला भरणें.

दफ़ीना–पु. [*अ.*] पुरलेलें धन.

दफ़्तर–पु. [*फा.*] १. कचेरी; कार्यालय. २. सविस्तर वृत्तांत. ३. वही; दप्तर. 'रजिस्टर'; **–शाही–** *स्त्री.* नोकरशाही; 'ब्यूरॉक्रसी'.

दफ़्तरी–पु. [*अ.*] 'बुकबाइंडर.'**–खाना–पु.** बुकबाइंडिंगचा विभाग.

दफ़्ती– *स्त्री.* [*फा.*] पुठ्ठा.

दबंग–*वि.* प्रभावशाली; रुबाबदार; कुणापुढेंहि न दबणारा.

दब*– *स्त्री.* १. दाब; दबाव. २. रुबाब.

दबक– *स्त्री.* १. अंग चोरणें. २. धातूची तार काढणें. **–गर–पु.** १. धातूची तार काढणारा. २. कातडयाचे बुधले बनविणारा. ३. ढाल बनविणारा.

दबकना–*क्रि. अ.* १. भीतीमुळें लपणें. २. अंग चोरणें. *–क्रि. स.* १. दरडावणें. २. ठोकून चपटें करणें.

दबका–पु. धातूची तार.

दबकाना–*क्रि. स.* १. लपविणें. २. दटावणें.

दबकैया–पु. जरीची तार तयार करण्यासाठीं सोनें, रुपें ठोकून पत्रा तयार करणारा.

दबदबा– पु. [*अ.*] १. दाब; दबाव; भीति. २. रुबाब; प्रताप; प्रभाव.

दबना–*क्रि. अ.* १. दबणें; चेपलें जाणें. २. टिकाव न धरणें; हटणें. ३. लाचार होणें. ४. फिक्के

पडणें. ५. वजन पडल्यामुळें नम्र होणें; लाजणें; संकोच करणें.

दबसट+–पु. दाब; दडपण.

दबा–*वि.* दबलेला; वांकलेला. **मु०– (बी) ज़बानसे कहना**–भीत-भीत अस्पष्ट शब्दांत सांगणें; स्पष्ट न बोलणें. **–(बे)पाँव**–हलक्या पावलांनीं; हळूंच.

दबाना–*क्रि. स.* १. दाबणें; चेपणें. २. मागें हटविणें. ३. दडपण घालणें; दाब आणणें. ४. बळकावणें. ५. असहाय्य करून सोडणें. ६. पुरणें; गाडणें. ७. दमन करणें. ८. बळकावणें.

दबाव–पु. दाब; दडपण; वजन.

नीम–*वि.* [*फा.*] अर्धा.**–आस्तीन** **–*स्त्री.*** अर्ध्या बाहीचा सदरा; कोपरी; 'हाफशर्ट'; **–रज़ा**; **–राज़ी**– *वि.* कांहींसा संतुष्ट; अर्ध-संतुष्ट.**– शब**– *स्त्री.* मध्यरात्र. **–हकीम**–*पु.* अर्धवट ज्ञान असलेला वैद्य. **मु०– हकीम ख़तरे जान** – अर्धवट ज्ञान धोक्याचें असतें.

नीमन+–*वि.* चांगला; निरोगी; उत्कृष्ट. ['अंडरवेअर'.

नीमा–*पु.* [*फा.*] आंतलें वस्त्र;

नीमस्तीन– *स्त्री.* [*फा.*] अर्ध्या बाह्यांचा अंगरखा; कोपरी.

नीयत– *स्त्री.* [*अ.*] १. इरादा; इच्छा. २. उद्देश्य; हेतु. **मु०–डिगना; –बद होना; –बदल जाना; –बिगड़ना; –(में) फ़रक़ आना**– मनांत काळेंबेरें येणें; बेइमानी सुचणें.**–बाँधना**–संकल्प करणें; निश्चय करणें.

नीर–*पु.* पाणी; तीर्थ.

नीरज–*पु.* १. कमळ. २. मोती.

नीरद–*पु.* ढग.–*वि.* दांत नसलेला.

नीरव–*वि.* शांत; आवाजरहित.

नीरना*–*क्रि.स.* विखुरणें.

नीराजन–*पु.* निरांजन; आरती.

नीराज्यिक भूमि– *स्त्री.* दोन राज्यांमधील कोणाच्याहि ताब्यांत नसलेली पडिक जमीन; 'नोमॅन्स लँड'.

नीरे*–*अव्य.* जवळ; निकट.

नीरोग–*वि.* निरोगी.

नील–*वि.* निळा.–*पु.* १. निळा रंग. २. नीळ.**–गिरि**–*पु.* निलगिरी पर्वत. **–हरित**–*वि.* 'ग्लोकस.'

नीलम–*पु.* इंद्रनीलमणि; नीलकांतमणि.

नीला–*वि.* निळा.**–थोथा**–*पु.* मोरचूद. **मु०–पीला होना**–रागानें लाल होणें.

नीलाम–*पु.* [*पोर्तु.*] लिलांव. **मु०–पर चढ़ना**–लिलांव होणें.

नीलोफ़र–*पु.* [*फा.*] नीलकमल.

नीवँ–व– *स्त्री.* १. पाया (घराच्या इमारतीचा). २. मूळ आधार. ३. स्थापना.**मु०–डालना**– पाया घालणें; स्थापन करणें; **–पड़ना**–पाया घातला जाणें; सुरुवात होणें.

नीवी– *स्त्री.* १. कडोसरी; लुगडयाची कमरेवरील गांठ; केळ. २. नाडी. ३. मुद्दल.

नीहार–*पु.* धुकें; तुषार.

नीहारिका– *स्त्री.* आकाशांत रात्रीच्या वेळीं पांढुरकी दिसणारी प्रकाशाची रेखा; आकाशगंगा; तारामंडळ; धूम्रमय नक्षत्रसमूह; 'नेब्यूला'.

नुक़्ता–*पु.* [*अ.*] १. बिंदु; टिंब; अनुस्वार. २. डाग.**–ए नज़र**–*पु.* दृष्टिबिंदु; दृष्टिकोण.

नुकता–*पु.* [*अ.*] सूक्ष्म, मुद्याची गोष्ट; मर्म; रहस्य. **–चीं**–*वि.* दोष काढणारा; छिद्रान्वेषी. **–चीनी**–*स्त्री.* टीका; छिद्रान्वेषण. **–दाँ**– *स्त्री.* १. मर्मज्ञ. २. हुशार; बुद्धिमान्. [(मिठाई).

नुकती– *स्त्री.* [*फा.*] मोतीचूर

नुकना*–*क्रि.अ.* लपणें.

नुक़रा–*पु.* [*अ.*] १. चांदी. २. घोडयाचा पांढरा रंग. –*वि.* १. चांदीचा. २. पांढऱ्या रंगाचा (घोडा).

नुक़सान–*पु.* [*अ.*] नुकसान; हानि; तोटा.**–देह**–*वि.* हानिकारक. **मु०–पहुँचाना**– हानि करणें.

नुकाना*–*क्रि. स.* लपविणें.

नुकीला–*वि.* अणकुचीदार; टोंकदार.

नुक्कड़–*पु.* १. टोंक; अग्र. २. शेंवट. ३. कोंपरा; वळण.

नुक्ता–*पु.* पा० 'नुकता'.

नुक्का–*पु.* टोंक. **–टोपी**– *स्त्री.* लखनऊमध्यें प्रचलित असलेली पातळ, घडीची टोपी.

नुक़्स–*पु.* [*अ.*] १. दोष; कसर; त्रुटि. २. उणीव; अपूर्णता.

नुचना–*क्रि. अ.* उपटलें जाणें; ओरखडलें जाणें.

नुचवाना–*क्रि. स.* उपटून काढविणें; ओरबडून काढणें.

नुतफ़ा–*पु.* [*अ.*] वीर्य; शुक्र.

नुनना–*क्रि. स.* तयार पीक

कापणें.

नुनाई*– *स्त्री.* लावण्य; सौंदर्य.

नुनेरा–*पु.* मीठ बनविणारा.

नुमा–*वि.* [*फा.*] १. दिसणारा. २. दाखविणारा. ३. समान; सदृश्य. [निश्चित्व.

नुमाइंदगी– *स्त्री.* [*फा.*] प्रति-

नुमाइंदा–*पु.* [*फा.*] प्रतिनिधि.

नुमाइश– *स्त्री.* [*फा.*] १. दिखाऊपणा; थाटमाट; डामडौल. २. प्रदर्शन. [बेगडी.

नुमाइशी–*वि.* [*फा.*] दिखाऊ;

नुमाई– *स्त्री.* [*फा.*] प्रदर्शन; देखावा.

नुमायंदा–*पु.* [*फा.*] प्रतिनिधि.

नुमायाँ–*वि.* [*फा.*] स्पष्ट झालेला; प्रकट; उघड.

नुसखा–*पु.* [*अ.*] १. वैद्याचें किंवा डॉक्टराचें प्रिस्क्रिप्शन. २. लिहिलेला कागद; नवकल.

नूतनीकरण–*पु.* नवीनीकरण; 'रिनोव्हेशन'. [थोडेसें.

नून+–*वि.* कमी; अपुरें;

नून–*पु.* मीठ.–**तेल**–*पु.* मीठ-मिरची; संसाराच्या गरजेच्या वस्तू. [असलेला.

नूना+–*वि.* कमी; उणीव

नूनी+– *स्त्री.* लहान मुलांचें लिंगेंद्रिय; नुन्नी; मिरची.

नूपुर–*पु.* पैंजण; धागऱ्यांचा वाळा; तोरडचा.

नूर–*पु.* [*अ.*] १. तेज; ज्योति; प्रकाश. २. शोभा; सौंदर्य. –**चश्म**–*पु.* लाडका पुत्र. –**बाफ़**–*पु.* विणकर. ['नोहा'.

नूह–*पु.* [*अ.*] एक पैगंबर;

नृतत्ववेत्ता–*पु.* मानववंश-शास्त्रज्ञ.

नृवंश विज्ञान–*पु.* मानव वंश शास्त्र; 'अँन्थ्रॉपॉलॉजी'.

नृत्त–*पु.* ज्यांत केवळ अंग-विक्षेप केले जातात असें नृत्य.

नेउतना+–*क्रि.* *स.* पा० 'न्योतना'. [किंचित्.

नेक–*वि.* *अव्य.* थोडा;

नेक–*वि.* [*फा.*] १. चांगला; भला. २. शिष्ट; सज्जन. ३. प्रामाणिक. –**अंदेश**–*वि.* हितैषी. –**ख्वाह**–*वि.* शुभचिंतक; स्वामि-भक्त. –**चलन**–*वि.* सद्वर्तनी; सदाचारी. –**ज़ात**–*वि.* उत्तम जातीचा; खानदानी. –**नाम**–*वि.* चांगली कीर्ति असलेला; सुप्रसिद्ध. –**नीयत**–*वि.* सद्विचारी; प्रामाणिक; दुसऱ्याचें भलें इच्छिणारा. –**बख़्त**–*वि.* भाग्यशाली. [गळोटी.

नेकटाई– *स्त्री.* [*इं.*] नेकटाय;

नेकी– *स्त्री.* [*फा.*] १. भलाई; चांगुलपणा. २. प्रामाणिकपणा. **मु०–और पूछ-पूछ** ? –एखाद्याचें कल्याण करावयाचें असेल तर त्यांत काय विचारावयाचें ?

नेकु*–*वि.* थोडा; किंचित्.

नेग–*पु.* संभावना; अहेर. –**चार**; –**जोग**–*पु.* १. लग्नप्रसंगीं नातलगांना व आश्रितांना अहेर करण्याची रीत. २. कुळाचार.

नेगटी*– *पु.* अहेर देणारा किंवा संभावना करणारा.

नेगी–*पु.* अहेर घेणारा.

नेज़ा–*पु.* [*फा*] १. भाला; बरची. २. निशाण; झेंडा. –**बरदार**–*पु.* भाला किंवा झेंडा घेऊन चालणारा.

नेजाल*–*पु.* भाला.

नेटा–*पु.* १. शेंबूड. २. मेकूड.

नेठना+–*क्रि.* *अ.* १. नष्ट करणें. २. नाकबूल करणें.

नेड़े+–*अव्य.* निकट; समीप; जवळ.

नेत–*पु.* १. निर्धारण; बेत; निश्चय; संकल्प. २. व्यवस्था. ३. ताक घुसळण्याची दोरी.

नेतक+– *स्त्री.* ओढणी.

नेता–*पु.* पुढारी.

नेती– *स्त्री.* घुसळखांबाची दोरी.

नेत्र–*पु.* १. डोळा. २. घुसळण्याची दोरी. ३. नाडी.–**विज्ञान**–*पु.* दृक्शास्त्र; प्रकाशशास्त्र; 'ऑप्टिक्स'.

नेनुआ–वा–*पु.* घोसाळें; दोडकें.

नेपथ्य–*पु.* वेषभूषा; शृंगारगृह; नाटकाच्या पडद्याच्या मागील भाग.

नेफ़ा–*पु.* [*फा.*] पायजम्यांतील नाडी घालण्याची पोकळी; नाडपट्टी.

नेब–व*–*पु.* १. साहायक; मदतनीस. २. मंत्री; चिटणीस.

नेबुआ; नेबू+–*पु.* लिंबू; निंबू.

नेम+–*पु.* १. समय. २. खंड. ३. भिंत. ४. कपट. ५. आधार. ६. खड्डा.

नेम–*पु.* १. नियम. २. अटळ गोष्ट. ३. पद्धति. ४. धार्मिक व्रतादि.–**धरम**–*पु.* पूजा–पाठ; व्रत-उपवास.

नेमत– *स्त्री.* [*अ.*] १. ईश्वरी देणगी. २. धन; संपत्ति. ३. स्वादिष्ट भोजन. ४. सुख.

नेमि– *स्त्री.* परिघ; विहिरीच्या भोंवतालची भिंत. [जवळ.

नेरा–रे–रैं–*अव्य.* निकट;

नेवग*–*पु.* संभावना; अहेर.

नेवछावर+– *स्त्री.* पा० 'निछावर'.

नेवज*–*पु.* नैवेद्य. [देणें.

नेवतना*–*क्रि.* *स.* निमंत्रण

नेवता*–*पु.* १. आमंत्रण; बोलावणें. २. जेवणावळ.

नेवर–*पु.* १. वाळे; घुंगुर; नूपुर. २. मुंगूस.–*स्त्री.* जखम; घोडयाच्या पायाची जखम.

नेवला–पु. मुंगूस.

नेवा–पु. १. रीत; प्रथा. २. म्हण. –वि. १. तुल्य; समान. २. गप्प. [निवारण करणें.

नेवारना*–क्रि. स. निवारणें;

नेसुक*–वि. अव्य. थोडा; किंचित्.

नेस्त–वि. [फा.] अस्तित्वहीन; नसलेला. **–नाबूद**–नष्टभ्रष्ट; नेस्त-नावूत.

नेस्ती– स्त्री. [फा.] १. नसणें; अस्तित्वाचा अभाव. २. विनाश.

नेह; नेहरा*–पु. स्नेह; प्रेम.–वि. स्निग्ध.

नेही*–वि. स्नेही; प्रेमी.

नैंकु; –नैंमुक*–अव्य.वि. थोडा. किंचित्; जरा.

नै– स्त्री. १. नदी. २. नीति. ३. आचार-विचार.

नैऋत*–पु. १. नैर्ऋत्य; दक्षिण-पश्चिम दिशा; २. राक्षस.

नैक–कु$^+$–वि. १. चांगला; भला; प्रामाणिक. २. थोडा; अल्प. –अव्य. थोडेंसें; किंचित्.

नैचा–पु. [फा.] १. एकत्र बांधलेल्या हुक्क्याच्या दोन नळचा. २. मरतुकडा माणूस.

नैची– स्त्री मोट ओढतांना बैलांना मागें-पुढें येण्या-जाण्यासाठीं असलेली उतरती जमीन.

नैन*–पु. नयन; डोळा.**–सुख**–पु. एक प्रकारचें तलम सुती कापड.

नैना*–नेत्र; डोळा. –क्रि. अ. लवणें; झुकणें.

नैनी*– स्त्री. लोणी.

नैनू*–पु. १. लोणी. २. एक प्रकारचें सुती कापड. [नौका.

नैया*– स्त्री. नाव; होडी;

नैयायिक–पु. न्यायशास्त्रज्ञ.

नैरंग–पु. [फा.] १. कपट. २. जादूटोणा. ३. चमत्कारिक गोष्ट. ४. चित्राची रूपरेषा; आराखडा.

नैरंतर्य–पु. सातत्य.

नैर*–पु. नगर; देश.

नैराश्यवाद–पु. निराशावाद; 'पेसीमिझम्'.

नैसा*–वि. १. कुरूप; वाईट. २. अनिष्ट. [जरा; किंचित्.

नैसि (सु) क*–वि. अव्य. थोडा;

नैहर–पु. माहेर.

नोअना*–क्रि. स. गाईच्या पायाला दोरी बांधणें.

नोआ$^+$–पु. धार काढतांना गायीच्या किंवा म्हशीच्या मागील दोन्ही पायांना बांधण्याची दोरी.

नोइनी; नोई– स्त्री. पा० 'नोआ'.

नोक– स्त्री. [फा.] टोंक; अग्र; अणकुची.**–झोंक**– स्त्री. १. थाटमाट; डामडौल. २. थट्टा-मस्करी; उपरोध; उपहास.**–दार**–वि. अणकुचीदार; निमुळता; टोंकदार.**–पलक**– स्त्री. चेहरेपट्टी.

नोकना*–क्रि. अ. लुब्ध होणें; मोहित होणें; आकृष्ट होणें.

नोखा*–वि. १. नवखा; अनोळखी. २. अद्‌भुत; अपूर्व.

नोच– स्त्री. ओरखडा; बोचकारा.**–खसोट**– स्त्री. हिसका-हिसकी; ओढाताण; जबरदस्तीनें हिसकावणें.

नोचना–क्रि. स. १. उपटणें. २. ओरखडणें.; बोचकारणें. ३. हिसकावून घेणें.

नोचू–वि. १. हिसका–हिसकी करणारा. २. भीक मागून त्रास देणारा.

नोट–पु. [इं.] १. कागदी नोट (चलन). २. टिप्पण.

नोदन–पु. १. प्रेरणा. २. खंडन. ३. गुराख्याची काठी. मु०**–करना**–पुढें ढकलणें; 'प्रॉपेल'.

नोन$^+$–पु. मीठ.

नोनचा–पु. १. लोणचें. २. अंबोशी. ३. खार जमीन.

नोनछी– क्रि. खारट माती; खार जमीन.

नोना–पु. १. लोणा. २. खारी माती. ३. सिताफळ. –वि. १. खारट. २. सुंदर.

नोनिया$^+$–पु. लोणारी; मीठ बनविणारा, विकणारा.

नोनी– स्त्री. १. खारी माती. २. एक खारट भाजी.–वि. स्त्री. सुंदर. [सुंदर.

नोर–ल*–वि. १. नवीन. २.

नौ– स्त्री. नाव; नौका; जहाज. **–तरण; –परिवहन**– पु. नौकानयन; जल-वाहतूक; 'नॅव्हिगेशन.'**–तरणीय**–वि. जलवाहतुकीस योग्य; 'नॅविगेबल'. **–तल**–पु. गलबताचा कणा; नियरण; 'कील'. – **परिवहन विषयक**–वि. नौकानयनासंबंधींचा; 'नॉटिकल'. **–प्रभार**– पु. जहाजाची माल नेण्याची शक्ति; टनी वजन; 'टनेज'. **–बलाध्यक्ष**–पु. दर्यासारंग; 'ॲडमिरल'.**–विज्ञान**–नौकानयनशास्त्र; 'नॉटिकल सायन्स.'**–शक्ति**– स्त्री. नाविक शक्ति; आरमार.**–सेना**– स्त्री. आरमार.**–०पति**–पु. आरमाराचा सेनापति; दर्यासारंग.

नौ–वि. नऊ; ९.**–दसी**– स्त्री. जमीनदाराकडून नऊ रुपये कर्जाऊ घेऊन सालअखेर दहा रुपये परत देण्याची प्रथा.**–रतन**–पु. नवरत्न. **–लखा***–वि. नऊ लाख किंमतीचा; बहुमोल.**–सत***–पु. सोळा शृंगार. मु०**–दो ग्यारह होना**–

पसार होणें; पळून जाणें.

नौ+–नवीन.–**तोड़**–*वि*. प्रथमच नांगरलेलें (शेत).–**बढ़**; –**बढ़िया**; –**बढुआ**–*वि*. नुक्ताच उदयास आलेला; वाईट स्थितींतून वर आलेला. –**सिख**; –**सिखिया**; –**सिखुआ** –*वि*. नवशिक्या; ज्यानें नुकतेंच शिकून घेतलें आहे असा. –**हँड़**; –**हड़**–*पु*. मातीचें नवें मडकें –*वि*. दुसऱ्या जातीच्या माणसानें पाण्यांत शिजविलेलें अन्न न खाणारा.

नौ–*वि*. [*फा*.] नवीन; ताजा. –**आबाद**–*वि*. नुकताच वसलेला.–**आबादी**– *स्त्री*. वसाहत.–**खेज़**–*वि*. नवयुवक; नवजवान. –**जवान**–*वि*. *पु*. तरुण.–**जवानी**– *स्त्री*. तारुण्य.–**निहाल**–*पु*. १. कोंवळें रोप. २. तरुण; नवयुवक. –**मुस्लिम**–*वि*. नुकताच मुसलमान झालेला.–**रोज़** –*पु*. पारशांचा वर्षारंभाचा दिवस.

नौआ+–*पु*. न्हावी; न्हावगंड.

नौकर–*पु*. [*फा*.] नोकर; चाकर.–**शाही**– *स्त्री*. नोकरशाही; 'ब्यूरॉक्रसी'.

नौकराना–*पु*. [*फा*.] १. नोकराचें वेतन. २. नोकर–खर्च.

नौकरानी– *स्त्री*. मोलकरीण.

नौकरी– *वि*. [*फा*.] नोकरी. –**पेशा**–*वि*. नोकरपेशा; नोकरीवर उदरनिर्वाह करणारा. [धिकरण.'

नौकाधिकरण–*पु*. पा० 'नाव-

नौज–*अव्य*. १. इश्वर न करो; असें न होवो. २. माझं अडलंय खेटर (बा.).

नौजा*– *स्त्री*. [*फा*.] १. बदाम. २. चिलगोजा (एक सुका मेवा).

नौतन*–*वि*. नवीन; नवा.

नौतम*–*वि*. १. अगदीं नवीन. २. ताजा. ['न्योता'.

नौता*–*वि*. नवीन. –*पु*. पा०

नौतारी+–*पु*. निमंत्रित व्यक्ति.

नौध+–*पु*. नवीन रोपटें.

नौधा*–*वि*. नवविधा (भक्ति). –*पु*. १. नवीन रोप. २. नवी बाग.

नौना–*क्रि*. *अ*. नमणें; लवणें. – *वि*.* सुंदर.

नौबत– *स्त्री*. [*फा*.] १. प्रसंग; पाळी. २. स्थिति; दशा; दुर्दशा. ३. नगारा; चौघडा. **मु०**–**आना**– पाळी येणें.

नौबती–*पु*. [*फा*.] १. नौबत वाजविणारा. २. पहारेकरी. ३. मोठा तंबू; शामियाना

नौमी– *स्त्री*. नवमी (तिथि).

नौरंग*–*पु*. [*फा*.] १. औरंगजेब. २. नवा रंग. ३. एक पक्षी.

नौरंगी+– *स्त्री*. नारिंग; संत्रें.

नौलासी–*वि*. मऊ; कोमल.

नौशा–*पु*. [*फा*.] नवरदेव; नवरा. [– *स्त्री*. **नौशी**] [निया'.

नौसादर–*पु*. नवसागर; 'अमो-

नौसाली+–मऊ; गुळगुळीत.

न्यस्त–*वि*. १. ठेवलेला. २. टाकलेला (स्वाधीन केलेला). –*पु*. अनामत म्हणून ठेवलेली रक्कम; ठेव.

न्याइ–उ+–*पु*. न्याय.

न्यागमन–*पु*. सोंपविणें; एकाच्या हातांतून दुसऱ्याच्या हातांत जाणें. 'डीव्हॉल्यूशन'.

न्याति–ती*– *स्त्री*. ज्ञाति; जात.

न्याय–*पु*. १. न्याय. २. निवाडा; निकाल. –**ज्ञ**–*पु*. न्यायशास्त्रज्ञ; 'जूरिस्ट'.–**पालिका**– *स्त्री*. न्यायव्यवस्था; 'जूडिशियरी'. –**पीठ**–*पु*. न्यायधिशाचें आसन; 'बेंच'.–**मूर्ति** –*पु*. न्यायमूर्ति; 'जस्टिस'.–**वादी**– *पु*. सरकारतर्फेचा मुख्य वकील; 'ॲटर्नी'. –**विभ्रंश**–*पु*. न्याय मार्ग–भ्रष्ट होणें; योग्य न्याय न मिळणें; 'मिसकॅरेज ऑफ जस्टिस'. –**शास्त्र**–*पु*. न्याय किंवा कायद्यासंबंधींचें शास्त्र; 'जूरिसप्रूडन्स'. –**शुल्क**–*पु*. 'कोर्ट फी'. –**सभ्य**–*पु*. पंच; न्यायमंडळाचा सभासद; 'ज्यूरी'.

न्यायाधिकरण–*पु*. न्यायमंडळ; 'ट्रायब्यूनल'. ['जस्टिस'.

न्यायाधिपति–*पु*. न्यायमूर्ति;

न्यायिक निर्णय–*पु*.न्यायालयाचा निवाडा; निकाल; 'ॲडजुडिकेशन'.

न्यायिक आधिकारी–*पु*. न्यायविभागाचा मुख्य अधिकारी 'जुडीशल अथॉरिटी'.

न्यायिक मुद्रांक–*पु*. कोर्टाचा स्टँप; 'जुडीशल स्टांप'.

न्यारा–*वि*. १. दूरचा; जवळ नसलेला. २. वेगळा; दुसरा; निराळा. ३. अद्‌भुत; विचित्र; अपूर्व.

न्यारिया–*पु*. झारेकरी; सोनाराच्या राखेंतून सोनें काढणारा.

न्यारे–*अव्य*. अलग; दूर.

न्याव*–*पु*. १. न्याय. २. उचित गोष्ट. ३. नियम.

न्यास–*पु*. १. स्थापना. २. समर्पण; त्याग. ३. ठेव; अनामत. ४. संन्यास. ५. विश्वस्त निधि; 'ट्रस्ट'. –**धारी**–*पु*. १. विश्वस्त; 'ट्रस्टी'. २. ठेवीदार; ठेव ठेवणारा.

न्यासिता– *स्त्री*. विश्वस्तता; 'ट्रस्टीशिप'.

न्यासी–*पु*. १. संन्यासी. २. विश्वस्त; 'ट्रस्टी'. –*वि*. त्यागी.

न्यून–*वि*. १. थोडा; कमी. २. निकृष्ट; विकृत; हीन. ३. लघु; 'ॲक्यूट'. –**कोण**–*पु*. लघुकोण; 'ॲक्यूट अँगल'. –**कोण त्रिभुज**–*पु*. लघुकोण त्रिकोण; 'ॲक्यूट अँगलड ट्रायंगल'. –**तम**–*वि*. कमींत कमी;

किमान; 'मिनिमम'. –पोषण–पु. कुपोषण; अल्पपोषण; उपासमार; 'मालन्यूट्रीशन'. –वयस्क– वि. अज्ञान; अल्पवयी; 'मायनर'.

न्यूनता–स्त्री. १. उणीव. २. सदोषता. –बोधक–वि. लघु; अल्पार्थवाचक; 'डिम्यूनिटिव्ह'.

न्यूनन–पु. संक्षेप; 'ॲब्रिजमेंट'

न्यूनाधिक–वि. कमीजास्त.

न्यूनीकरण–पु. कमी करणें; 'ॲबेटमेंट'.

न्यूनोन्नत क्षेत्र–पु. अल्पविकसित भाग; 'अंडर डेव्हलप्ड एरिया'.

न्योछावर–स्त्री. अर्पण; बलिदान; ओवाळून टाकणें.

न्योतना–क्रि. स. १. आंमत्रण देणें. २. जेवावयास बोलावणें.

न्योतनी–स्त्री. लग्नप्रसंगीं होणारी मेजवानी; जेवणावळ.

न्योतहरी–पु. निमंत्रित व्यक्ति.

न्योता–पु. १. निमंत्रण. २. जेवणाचें आमंत्रण.

न्रप–*पु. नृप; राजा.

न्हान–*पु. स्नान.

न्हाना–क्रि. स. स्नान करणें; आंघोळ करणें.

प

प–देवनागरी वर्णमालेच्या पवर्गांतील पहिला वर्ग.

पंक–पु. १. चिखल. २. पाप. ३. लेप. –ज–पु. कमळ.

पंकिल–वि. चिखलानें भरलेला.

पंक्ति–स्त्री. १. ओळ. २ पंगत. –च्युत–वि. खालच्या पातळीवर आणला गेलेला; पदभ्रष्ट; 'डिग्रेडेड.

पंख–पु. पंख; पर; पीस. मु०–जमना–पळून जाणें, वाईट मार्गाला लागणें, मरणें इ० चीं लक्षणें दिसूं लागणें. –परेवा बना डालना–पराचा कावळा करणें.

पँखड़ी–स्त्री. फुलाची पाकळी.

पखा–पु. पंखा. –कुली–पु. पंखा हालविणारा नोकर. –पोश– पु. पंख्याची खोळ. मु० –करना–पंख्यानें वारा घालणें. [पंखा.

पंखी–पु. पक्षी. –स्त्री.लहान

पँखुडी–री–*स्त्री. फुलाची पाकळी.

पँखेरू+–पु. पक्षी.

पगगा*–वि. १. पांगळा; लंगडा. २. निरुपयोगी.

पंगत–ति–स्त्री. १. ओळ. २. जेवणाची पंगत; जेवणावळ.

पंच–पु. १. पांच (संख्या). २. समाज; समुदाय. ३. लोक. ४. पंच; निवाडा देणारा; मध्यस्थ; लवाद; 'आर्बिट्रेटर'. –कोण–वि. पंचकोनी. –गौड–पु. उत्तर भारतांतील पांच प्रकारचे ब्राह्मण: सारस्वत, कान्यकुब्ज, गौड, मैथिल व औत्कल (उत्कल). –द्रविड–पु. दक्षिण भारतांतील पांच प्रकारचे ब्राह्मण: महाराष्ट्र, तैलंग, कर्णाट, गुर्जर व द्रविड. –नद–पु. पंजाब. –नामा–पु. १. वादी व प्रतिवादी यांनीं आपल्या दाव्याच्या बाबतींत पंचांना निर्णय करण्यासंबंधीं दिलेलें अधिकारपत्र. २. पंचांनी दिलेलें निकालपत्र. –निर्णय; –फैसला–पु. लवादाचा निवाडा; निर्णय; 'आर्बिट्रेशन'. –भुज–पु. पंचभुज; 'पेंटॅगॉन'. –मकार–पु. वामाचारांतील पांच गोष्टी: मद्य, मांस, मत्स्य, मुद्रा व मैथुन. –हज़ारी–पु. पांचहजार सैनिकांचा नायक. मु०– परमेश्वर– पंचांचें सांगणें ईश्वरी आदेशासमान आहे.

पँच–'पाँच'चें समासांतील रूप. –मेल–वि. नानाप्रकारच्या वस्तूंची मेसळ. –रंग–गा–वि. पंचरंगी; रंगीबेरंगी. –लड़ा–वि. पांचपदरी. –लडी–री– स्त्री. पांच पदरी माळ. –वाँसा–पु. गर्भाच्या पांचव्या महिन्यांत केलें जाणारें एक धार्मिक कृत्य, संस्कार.

पंचत्व–पु. मृत्यु; मरण.

पंचमांगी–पु. पंचमस्तंभी; फितूर; 'फिफ्थकॉलमिस्ट'.

पंचाट–पु. निवाडा; निर्णय; 'अवॉर्ड'.

पंचानन–पु. १. शंकर. २. सिंह.

पंचानबे–वि. पंचाण्णव; ९५.

पंचायत–स्त्री. १. पंचायत. २. गप्पाष्टक. [झाडाचा चीक.

पंछा–पु. १. जखमेची लस. २.

पंछी–पु. पक्षी.

पंज–वि. [फा.] पांच. –अंगुश्त –पु. हातांचीं पांच बोटें. –तन–पु. मुसलमानांचे पांच श्रेष्ठ पुरुष: हजरत मुहम्मद, अली, फातिमा आणि त्यांचे दोन पुत्र, इमाम हसन व इमाम हुसैन. –रोज़ा–पु. पांच दिवसांचा; क्षणिक. –शंबा–पु. गुरुवार. –साला–वि. पांचवर्षांचा; पंचवार्षिक. –हज़ारी पांच हजार सैनिकांवरील अधिकारी. [सापळा.

पंजर–पु. १. पिंजरा. २. हाडांचा

पंजा–पु. [फा.] १ हातांचा पंजा. २. पांचाचा गट. ३. पंजा (पत्त्यांतील). मु० छक्कापंजा–

डावपेंच. **–लड़ाना**; **–लेना–** एकमेकांच्या पंजांत पंजा अडकवून दुसऱ्याला मागें रेटण्याचा प्रयत्न करणें.

पंजारा–*पु.* पिंजारी.

पंजी–*स्त्री.* नोंदणीपुस्तक; 'रजिस्टर'–**बद्ध**–*वि.* नोंदविलेलें; 'रजिस्टर्ड'. ['रजिस्ट्रार.'

पंजीयक–*पु.* नोंदणी अधिकारी;

पंजीयन–*पु.* नोंदणी; 'रजिस्ट्रेशन'.

पँजीरी–*स्त्री.* कणीक, साखर, सुंठ, धणे, इ० मिसळून केलेली खिरापत.

पंजुम–*वि.* [फा.] पांचवा.

पँजेरा–*पु.* तांबट; भांडीं तयार करणारा, झाळणारा.

पँड़वा–*पु.* रेडकूं.

पंडा–*पु.* पुजारी; पंड्या. [–*स्त्री.* **पंडाइन**]

पंडाल–*पु.* सभेच्या अधिवेशनासाठी तयार केलेला मंडप.

पंडित–*पु.* १. विद्वान् ब्राह्मण. २. भट. –*वि.* विद्वान्; कुशल.

पंडिताइन–+*स्त्री.* १. पंडिताची पत्नी २. पंडिता. [पांडित्य.

पंडिताई–*स्त्री.* विद्वत्ता;

पंडिताऊ–*वि.* १. पंडितासारखें. २. विद्वत्ताप्रचुर.

पंडितानी–*स्त्री.* १. पंडिताची पत्नी; भटीण. २. विदुषी.

पंडुक–*पु.* पारवा.

पँतीजना–*क्रि. स.* पिंजणें.

पँतीजी–*स्त्री.* धनुकली; पिंजण.

पंथकी*–*पु.* पथिक; प्रवासी.

पंथान*–*पु.* रस्ता; मार्ग.

पंथिक; * **पंथी**– *पु.* प्रवासी; यात्रेकरू. [उपदेश. २. सल्ला.

पंद–*स्त्री.* [*फा.*] १. शिकवण;

पंद्रह–*वि.* पंधरा; १५.

पंदार–*वि.* *पु.* उपदेशक; सल्लागार.

पंपाल*– *वि.* पापी.

पँवरना–*क्रि. अ.* १. पोहणें. २. ठाव घेणें; पत्ता काढणें. [देवडी.

पँवरि*–*स्त्री.* दरवाजा; फाटक;

पँवरिया–*पु.* १. पहारेकरी; चौकीदार. २. मंगलप्रसंगीं मंगलगीतें म्हणणारा. [२. *खडाव.

पँवरी–*स्त्री.* १. देवडी; फाटक.

पँवाड़ा–रा–*पु.* १. पाल्हाळ; चऱ्हाट. २. पोवाडा. [रची मशाल.

पंशा (सा) खा–*स्त्री.* एक प्रका-

पँसरहट्टा–*पु.* किराणा मालाची बाजारपेठ.

पंसारी–*पु.* १. किराणा मालाचा व्यापारी. २. गंधी; काष्ठौषधें व सुगंधी पदार्थ विकणारा.

पंसासार*–*पु.* फांशांचा खळ.

पँसुरी–ली–*स्त्री.* फासळी.

पंसेरी–*स्त्री.* पासरी; पांच शेरी माप, वजन.

पइता–*पु.* एक छंद.

पइसना*–*क्रि. अ.* शिरणें; प्रवेश करणें.

पइसार*–*स्त्री.* प्रवेश. [पायरी.

पउँरि*–*स्त्री.* १. देवडी. २.

पऊँरी*–*स्त्री.* खडावा.

पउला+–*पु.* खुंटीच्या जागीं दोरी असलेला खडाव.

पकड़–*स्त्री.* १. धरणें; पकडणें. २. पक्कड. ३. चूक काढणें. **–धकड़**–*स्त्री.* धरपकड. **मु०–में आना**–तावडींत सांपडणें.

पकड़ना–*क्रि. स.* १. पकडणें; धरणें. २. कैद करणें. ३. थांबविणें.

पकड़वाना–*क्रि. स.* पकडविणें; पकडून देणें. [देणें. २. पकडून देणें.

पकड़ाना–*क्रि. स.* १. हातांत

पकना–*क्रि. स.* १. पिकणें. २. शिजणें. ['पकड़ना'.

पकरना*–*क्रि. स.* पा०

पकवान–*पु.* पक्वान्न.

पकवाना–*क्रि. स.* १. पिकविणें; पिकवून घेणें. २. शिजवून घेणें.

पकाई–*स्त्री.* १. पिकविण्याची, शिजविण्याची मजुरी. २. पिकविण्याचें, शिजविण्याचें काम.

पकाना–*क्रि. स.* १. पिकविणें. २. शिजविणें.

पकाव–*पु.* १. पिकणें. २. शिजणें. ३. पू.

पकावन*–*पु.* पक्वान्न. [वडा

पकौड़ा–*पु.* १. भजें २. मोठा

पकौड़ी–*स्त्री.* वडा; भजें.

पक्का–*वि.* १. पिकलेला; तयार झालेला. २. पूर्ण; पक्का. ३. निपुण; तज्ज्ञ. ४. दृढ; मजबूत; टिकाऊ. ५. स्थिर; निश्चल. ६. संवय असलेला; रुळलेला. ७. प्रौढ. ८. शिजलेला. **–खाना**–*पु.*; **–पक्की रसोई**–*स्त्री.* तुपांतून तळलेले, पाण्यांत न शिजविलेले, खाद्य पदार्थ. **–पानी**–*पु.* गव्हाळी रंग. **–बंदोबस्त** –*पु.* कायमधाऱ्याची पद्धति; 'पर्मनंटसेटलमेंट'.

पक्खर*–*स्त्री.* लढाईच्या प्रसंगीं हत्ती किंवा घोडे यांच्या अंगावर घालावयाची लोखंडी झूल. –*वि.* १. पक्का; दृढ. २. प्रखर; प्रचंड.

पक्ष–*पु.* १. पक्ष; बाजू. २. पंख. **–घात**–*पु.* अर्धांगवायु. **–पात**–*पु.* तरफदारी.**–पोषण**–*पु.* वकिली; तरफदारी; 'ॲडव्होकसी'. –*वि.* फूट पाडणारा. **–सार**–*पु.* वकिलानें केलेलें मुद्यांचें टांचण; 'ब्रीफ'.

पक्षक–*पु.* १. खिडकी. २. चोरदरवाजा. ३. 'एला'.

पक्ष्म–*पु.* १. पंख; पीस. २.

फुलांतील केसर. ३. पापणीचा केस; 'सिलिआ'. [२. गारुडी.

पखंडी*– *वि. पु.* १. पाखंडी.

पख– *पु.* पक्ष; पंधरवडा.

पख– *स्त्री.* [*फा*] १. विष्ठा; मल. २. आरडाओरड. ३. असभ्य भाषण; दुर्वचन. ४. अडचण; प्रतिबंध. ५. अट; शर्त. **मु०– लगाना** – १. अट घालणें. २. अडथळा आणणें. **–निकालना–** दोष काढणें.

पखड़ी–*स्त्री.* पाकळी; पुष्पदल.

पखरवाना; पखराना– *क्रि. स.* धुवून घेणें; धुवावयास लावणें.

पखरैत–*पु.* झूल घातलेला बैल, हत्ती अथवा घोडा.

पखरौटा+–*पु.* वर्ख लावलेला पानाचा विडा.

पखवाड़ा–रा–*पु.* पंधरवडा.

पखान*–*पु.* पाषाण; दगड.

पखाना*–*पु.* १. कथा; उपाख्यान; २. म्हण. ३. शौचकूप; संडास. ४. विष्ठा, मैला.

पखारना–*क्रि. स.* पाण्यानें धुणें; धुवून स्वच्छ करणें.

पखाली–*पु.* भिस्ती; पखालीनें पाणी वाहणारा.

पखावज–*पु.* पखवाज; मृदंग.

पखावजी–*पु.* पखवाज वाजविणारा.

पखिया–*पु.* उपद्रव देणारा; भांडणें करणारा. *–वि.* निरर्थक.

पखी; पखीरी*– *पु.* पक्षी.

पखुड़ी–री+– *स्त्री.* फुलाची पाकळी. [कूस.

पखुरा–वा–*पु.* बखोटा; बगल;

पखेरू–*पु.* पांखरूं; पक्षी.

पखौआ*–**टा**–*पु.* पंख; पीस.

पखौड़ा–रा–*पु.* पा० 'पखुरा'.

पख़्तून–*पु.* [*फा.*] पश्तो भाषा बोलणारा; पठाण.

पख़्तूनिस्तान–*पु.* [*फा.*] पश्तो भाषा बोलणाऱ्यांचें राज्य, प्रदेश.

पग–*पु.* १. पाय. २. दोन पावलांमधील अंतर; पाऊल. **–डंडी–** *स्त्री.* पाऊलवाट; पायवाट. **–तरी**+ *–स्त्री.* पादत्राण; चप्पल. **–दासी–** *स्त्री.* १. जोडा; वहाण. २. खडाव.

पगड़ी– *स्त्री.* १. डोकीला बांधावयाचा रुमाल, साफा; पगडी. २. पागडी. **मु०–उछालना; –उतारना** बेइज्जती, बदनामी, अपमान करणें. **–बदलना–** मैत्री करणें. **–रखना–** मान ठेवणें. (**किसीके आगे या पैरोंपर**)**–रखना–**दयेची याचना करणें. [पहाटें.

पगड़ै*– *अव्य.* सकाळीं;

पगना–*क्रि. अ.* १. आंतून बाहेरून पाकानें भरणें; पाकवलें जाणें. २. प्रेमांत रंगून जाणें. ३. मुरणें; भरून जाणें. ४. निमग्न, लिप्त होणें.

पगनियाँ– *स्त्री.* चप्पल; वहाण.

पगला–*पु.* वेडा; अडाणी.

पगली–*वि. स्त्री.* वेडी.*–स्त्री.* धोक्याची घंटा; 'अलार्म'.

पगहा+–*पु.* दावें; दोर. [दोर.

पगहिआँ+; **पगही**– *स्त्री.* दावें;

पगा*–*पु.* १. उपरणें. २. पगडी.

पगा*–*वि.* तल्लीन; अनुरक्त.

पगाना– *क्रि. स.* १. पाकविणें. २. ओलेंचिंब करविणें. ३. अनुरक्त, प्रेममग्न करणें.

पगार–*पु.* १. गिलावा; गारा; चिखल. २. नदीचा उतार. ३+. पगार; वेतन.

पगारना*–*क्रि. स.* पसरविणें.

पगाह– *स्त्री.* [*फा.*] पहांट; ब्राह्म मुहूर्त.

पगिया*– *स्त्री.* पगडी.

पगुराना–*क्रि. अ.* रवंथ करणें. *–क्रि. स.* पचविणें; गिळंकृत करणें.

पघा–*पु.* दावें; दोर.

पच– 'पांच' शब्दाचें समासांतील रूप. **–कल्यान**–*पु.* पंचकल्याणी घोडा (ज्याचे चार पाय व डोकें पांढरें असून बाकी अंग तांबडें किंवा काळें असतें असा घोडा). **–कल्यानी**+–*वि.* धूर्त; लबाड; लंपट. **–खना**–*वि.* पांच भागांचा; पांचखणी. **–गुना**–*वि.* पांचपट. **–मेल**– *वि.* ज्यांत पांच प्रकारच्या वस्तूंची मिसळ आहे असा. *–पु.* अनेक वस्तूंचें मिश्रण; भेसळ. **–रंगा**–*वि.* पंचरंगी; रंगीबेरंगी. **–लड़ी**– *स्त्री.* पांच पदरी माला; एक दागिना. **–लोना**–*पु.* पांच प्रकारच्या मिठांनीं युक्त असलेला पदार्थ. **–हरा**–*वि.* १. पांच थर, पदर असलेला. २. पांच वेळां केलेला; पांचपट.

पचक–*पु.* शिजविणारा; आचारी.

पचकना– *क्रि. अ.* पिचणें; दबणें. [गट.

पचखा+– *पु.* पंचक; पांचांचा

पचड़ा–*पु.* १. बखेडा; लचांड; व्याप. २. लावणी; पांच चरणांचीं कडवीं असलेली कविता.

पचना– *क्रि. अ.* १. पचणें. २. दुसऱ्याचें धन किंवा वस्तु आपली होणें; पचनीं पडणें. ३. अतिशय थकणें. ४. झिजणें. ५. त्रासणें. **मु० पच मरना**– जीव तोडून काम करणें.

पचपन–*वि.* पंचावन्न; ५५.

पचहत्तर–*वि.* पंचाहत्तर; ७५.

पचाना–*क्रि. स.* १. पचविणें. २. दुसऱ्याचें धन किंवा वस्तु लुबाडणें. ३. शिजविणें. ४. दडपून, दाबून टाकणें.

पचारना*–*क्रि. स.* १. आव्हान

देणें. २. मोठ्यानें ओरडणें.

पचास–*वि.* पन्नास; ५०.

पचासा–*पु.* १. एकाच तऱ्हेच्या पन्नास वस्तूंचा समूह. २. पन्नाशी. ३. अर्धशतक. ४. संकटाच्या वेळीं सर्व शिपायांना चौकीवर बोलावण्यासाठीं वाजणारी घंटा.

पचीस–*वि.* पंचवीस; २५.

पचीसी–*स्त्री.* १. एकाच तऱ्हेच्या पंचवीस वस्तूंचा समूह; पावशतक. २. पंचविशी (आयुष्य). ३. सोंगट्यांचा खेळ.

पचोतर–*वि.* पांच अधिक. **–सो; –सौ**–*पु.* एकशें पांचाचा गट. –*वि.* एकशें पांच.

पचोतरा–*पु.* वरपक्षाकडून वधूपक्षाच्या भटजीला दिली जाणारी एक रक्कम; सीमांत (श्रीमंत) पूजनाच्या वेळीं वराला मिळणाऱ्या रकमेपैकीं शेंकडा पांच रुपये.

पचौर; –ली⁺–*पु.* गांवचा पुढारी; सरपंच.

पच्चड़–र–*पु.* पाचर. **मु० –मारना**–अडथळा आणणें.

पच्ची–*स्त्री.* जडावाचें काम. **–कारी**–*स्त्री.* जडावाचें काम. **मु० (किसीमें)–हो जाना**– एकजीव होणें. [पंधरवडा.

पच्छ*–*पु.* १. पंख. २. पक्ष;

पच्छिम–*पु.* पश्चिम दिशा.

पच्छी*–*पु.* १. पक्षी. २. पक्ष घेणारा.

पछड़ना–*क्रि. अ.* १. चीत होणें. २. मागें पडणें, राहाणें; रेंगाळणें.

पछताना–*क्रि. अ.* पश्चात्ताप करणें; पस्तावणें. [पस्तावा.

पछतावा–*पु.* पश्चात्ताप;

पछना–*क्रि. अ.* १. गोंदलें जाणें. २. थोडेसें चिरलें जाणें; कापणें.

पछना–*पु.* गोंदण्याचें किंवा चिरण्याचें शस्त्र, अवजार.

पछर(ल)ना*–*पु.* मागें वळणें; हटणें; माघार घेणें.

पछवाँ; पछहिया–*वि.* पचिमेकडील; पश्चिमेचा.– *स्त्री.* पश्चिमेचें वारें. [पश्चिम दिशा.

पछाँह–*पु.* पश्चिमेकडील प्रदेश;

पछाँहिया; पछाँही–*वि.* पश्चिमेकडील.

पछाड़–*स्त्री.* १. आपटी; हापटी. २. बेशुद्धी; मूर्च्छा. **मु० –खाना**–शोकानें मूर्च्छित होऊन उताणें पडणें. [चीत करणें.

पछाड़ना–*क्रि. स.* आपटणें;

पछानना*–*क्रि. स.* ओळखणें.

पछाहँ–*पु.* पा० 'पछाँह'.

पछिआ(या)ना–*क्रि. स.* १. मागोमाग जाणें. २. पाठलाग करणें.

पछिताना; पछितानि; पछिताव–पा० 'पछताना'; 'पछतावा'.

पछि(छु)वाँ–*वि.* पश्चिमेकडील. – *स्त्री.* पश्चिमेचा वारा.

पछीत–*स्त्री.* १. परसूं. २. घराची मागील भिंत.

पछोड़(र)ना⁺–*क्रि. स.* पाखडणें; सुपांत घालून साफ करणें.

पज़मुर्दा–*वि.* [*फा.*] कोमेजलेला. [पेटणें.

पजरना*–*क्रि. अ.* जळणें;

पजामा⁺–*पु.* पायजमा; विजार.

पजारना–*क्रि. स.* जाळणें; पेटविणें. [ण्याची भट्टी; आवा.

पजावा–*पु.* [*फा.*] विटा भाज-

पज्ज–*पु.* शूद्र.

पटंबर*–*पु.* रेशमी कापड.

पट–*पु.* १. वस्त्र; कापड. २. पडदा. ३. चित्र; चित्रपट. ४. पापणी. ५. दार. ६. फळी. ७. छत. –*वि.* पालथा. –*अव्य.* झटकन्; ताबडतोब. **–परा**⁺–*पु.* पठार. **–रोल***–*पु.* रेशमी वस्त्र. **मु०–उघड़ना; –खुलना**–मंदिराचें दार उघडणें. **–लेना**–कुस्तींत पट काढणें.

पटकन*–*स्त्री. पु.* १. आपटी; हापटी. २. थप्पड. ३. छडी; काठी.

पटकना–*क्रि. स.* आदळणें; आपटणें; पाडणें; चीत करणें. –*क्रि. अ.** त्रस्त होणें.

पटकनिया; पटकनी⁺– *स्त्री.* आपटी; हापटी.

पटड़ा⁺–*पु.* पेळू बनविण्याचा पाट; लांकडाचा तक्ता; फळी. [*–स्त्री.* **पटड़ी**]

पटतर*–*पु.* १. बरोबरी; साम्य. २. उपमा. –*वि.* चौरस; सपाट. [साम्य दाखविणें.

पटरतना*–*क्रि. स.* उपमा देणें;

पटतारना–*क्रि. स.* १. जमीन सपाट करणें. २. *तलवार उगारणें.

पटना–*क्रि. अ.* १. जमीन सपाट होणें. २. पाटणी होणें; कडीपाट होणें. ३. आपसांत पटणें; जमणें. ४. कर्ज फिटणें.

पटनी–*स्त्री.* १. कायम भाडेपट्यानें घेतलेली जमीन. २. तळमजल्यावरील खोली. ३. भिंतीला लावलेली फळी.

पटपटाना–*क्रि. अ.* १. भूक, तहान, थंडी इ० मुळें त्रासणें, तडफडणें. २. शोक करणें; दुःख करणें. –*क्रि. स.* 'पटपट' आवाज करीत बडविणें किंवा वाजविणें.

पटपर–*वि.* सपाट; समतल; चौरस.–*पु.* १. मळीची जमीन. २. उजाड स्थान. ३. सपाट मैदान.

पटबीजना*–*पु.* काजवा.

पटमंडप–*पु.* तंबू; राहुटी; डेरा.

पटम*–*पु.* कपट; फसवाफसवी.

पटरा–*पु.* १. लांकडाची लांबरुंद फळी; तक्ता. २. कुळव. ३. परटाचा

प्राट. **मु०– कर देना**–जमीनदोस्त करणें; उध्वस्त करणें; मारून किंवा कापून खालीं पाडणें.–**फेरना**–१. कुळवानें जमीन सपाट करणें. २. उध्वस्त करणें.

पटरानी– *स्त्री.* पट्टराणी.

पटरी– *स्त्री.* १. लांकडाची पातळ व लांब फळी; तक्ती. २. मुलें जिच्यावर अक्षरें गिरवितात ती फळी; पाटी. ३. जरीची फीत किंवा कांठ. ४. एक प्रकारची बांगडी. ५. सडकेच्या बाजूची पायवाट; 'फूटपाथ'. ६. बगीच्यांतील फूलझाडांच्या आजूबाजूचा लहान रस्ता. ७. आगगाडीचा रूळ. **मु०– –जमाना**–मेळ बसविणें; जम बसविणें.–**बैठना**– १. मेळ बसणें. २. मनें जमणें.

पटल–*पु.* १. छप्पर; छत. २. आवरण; पडदा. ३. डोळ्याची पापणी. ४. मेज; 'टेबल'. –*पु.* फळी; 'बोर्ड'.

पटवा–*पु.* १. पटवेकरी. २. एक प्रकारचा तलम ताग; पाटोळी–ळें.

पटवाना–*क्रि. स.* १. जमीन सपाट करवून घेणें. २. छत बनवून घेणें.

पटवारगिरी– *स्त्री.* कुलकर्ण्याचें किंवा तलाठ्याचें काम किंवा हुद्दा.

पटवारी–*पु.* कुलकर्णी; तलाठी.

पटवारी*– *स्त्री.* कपडे चढविणारी दासी.

पटवास–*पु.* तंबू; शिबिर.

पटसन–*पु.* १. तागाचें झाड; ज्यूट. २. तागाचे धागे, दोरे.

पटहार–*पु.* पटवेकरी.

पटा–*पु.* १.पट्टा; दांडपट्टा. २. थप्पड.

पटाई– *स्त्री.* जमीन सपाट करण्याचें काम किंवा त्याची मजुरी.

पटाका–*पु.* १. आपटबार; फटाका. २. थप्पड.

पटाना–*क्रि. स.* १. जमीन सपाट करविणें. २. पाटणी किंवा छत बनविणें. ३. कर्ज फेडणें. ४. भाव ठरविणें. ५.+ शिपडणें.

पटाव–*पु.* १. सपाट किंवा सारखें करण्याचें काम. २. सपाट किंवा सारखी जागा. ३. पाटणी.

पटिया– *स्त्री.* १. पाटी (लिहिण्याची). २. दगडाचा चौकोनी तुकडा. ३. बाजेचें लांकूड. ४. शेताची पट्टी. ५. लहान कुळव.

पटी*– *स्त्री.* १. कापडाची लांब पट्टी. २. पटका; कंबरबंद. ३. नाटकाचा पडदा.

पटीर–*पु.* १. एक प्रकारचें चंदन. २. खैराचें झाड. ३. वटवृक्ष.

पटीलना–*क्रि. स.* १. एखाद्याला समजूत घालून आपल्या बाजूचें करून घेणें. २. कमविणें. ३. ठकविणें. ४. सफलतापूर्वक एखादें काम संपविणें. ५. बडविणें.

पटुआ–*पु.* ताग; तागाचें कापड.

पटुका–१. कमरेला बांधावयाचें उपरणें. २. शेला. ३. चादर. ४. पटका.

पटुली– *स्त्री.* लहान झोपाळा.

पटेबाज–*पु.* १. दांडपट्टा खेळणारा; पट्टा चालविण्यांत निपुण. २. धूर्त.

पटेर– लव्हाळा.

पटेल–*पु.* पाटील; गांवचा सरपंच, पुढारी.

पटेला–*पु.* १. बसण्याकरितां मधला भाग सारखा केलेली अशी मोठी वहातुकीची नाव २. कुळव. ३. चांदीचा गोठ.

पटैत–*पु.* पा० 'पटेबाज'.

पटोर– एक प्रकारचें रेशमी कापड.

पटोरी– *स्त्री.* १. रेशमी साडी. २. रेशीमकांठी धोतर.

पटोल–*पु.* १. तोंडल्यासारखें भाजीचें फळ; पडवळ. २. एक प्रकारचें रेशमी कापड.

पट्ट–*पु.* १. वस्त्र; रेशमी वस्त्र; रेशीम. २. ढाल. ३. पट्टी; 'बँड'. ४. पट्टा. ५. लेख; करार. ६. राजसिंहासन. ७. उपरणें.–**कीट पालन**–*पु.* रेशमाचे किडे पाळणें; 'सेरीकल्चर'.–**विलेख**–*पु.* भाडेपट्ट्याचा करार; 'लीजडीड'.

पट्टा–*पु.* १. पट्टा; जमिनीच्या मालकीचें अधिकार-पत्र. २. पाट. ३. बिल्ला. ४. दांडपट्टा. ५. पट्टी; पट्टा; 'बेल्टिंग'. ['प्लेट'.

पट्टिका– *स्त्री.* पट्टी; पत्रा;

पट्टित–*वि.* मढविलेला; मुलामा दिलेला; 'प्लेटेड'.

पट्टी–*स्त्री.* १. लांकडी पट्टी; फळी; फूटपट्टी. २. उपदेश; सल्ला. ३. वस्त्राची किनार; कांठ. ४. लांकडाचा वासा. ५. लिहिण्याची पाटी. ६. फूस. ७. कापडाची चिंधी. ८. कागदाचें चिटोरें. ९. संपत्तीचा हिस्सा; पाती. १०. भांग पाडल्यानंतर होणारे केसाचें दोन भाग. ११. वर्गणी; पट्टी. –**दार**–*पु.* पातीदार; भागीदार. –**दारी**– *स्त्री.* १. पाती; भागीदारी. २. जिचें वाटप होऊं शकत नाहीं अशी जमीन. **मु०– जमाना**–भांग पाडून केस चोपून बसविणें.–**पढ़ाना** – फुसलावणें; बहकाविणें.

पट्टू–*पु.* एक प्रकारचें लोकरीचें जाड कापड; काश्मिरी पट्टू.

पट्ठा–*पु.* १. पहिलवान; जवान; तरुण माणूस. २. कुस्ती खेळणारा. ३. लांब, जाड पान. ४.

स्नायु. ५. शरीरांतील जाड शीर. मु० –चढ़ना– शीर आंखडणें. –(ठों) में घुसना–घनिष्ठ मैत्री करणें.

पठन–पु. वाचन; 'रीडिंग'.

पठनीय–वि. वाचनीय. [मुलगा.

पठनेटा–पु. [पश्तो] पठाणाचा

पठवना*–क्रि. स. पाठविणें; धाडणें. [पाठविणें.

पठवाना*–क्रि. स. दुसऱ्याकडून

पठान–पु. [पश्तो] पठाण; अफगाण; काबुली. [धाडणें.

पठाना*–क्रि. स. पाठविणें;

पठानी– स्त्री. १. पठाणाची पत्नी; पठाण जातीची स्त्री. २. पठाणाचा स्वभाव. –वि. पठाणासंबंधींचा.

पठार–पु. उंचावरील सपाट मैदान; पठार; 'प्लेटो'.

पठावन+–पु. दूत; निरोप्या.

पठावनि-नी– स्त्री. रवानगी; बोळवण; पाठवणी.

पठित–वि. वाचलेलें; शिकलेलें.

पठिया– स्त्री. तरुणबांड व धष्टपुष्ट स्त्री.

पड़छत्ती-त्ती–स्त्री. १. पावसाच्या पाण्यापासून भिंतीचें रक्षण करण्यासाठी लावलेला तट्टचा अथवा झडप. २. वळचण; छप्पर. ३. माळा (सामान ठेवण्याचा).

पड़ता– पु. १. वस्तूची मूळ किंमत. २. दर.

पड़ताल– स्त्री. १. सूक्ष्म निरीक्षण; तपासणी. २. पडताळा. ३. पिकाची पाहाणी (तलाठी किंवा कुळकर्णी यांजकडून होणारी). –**चौकी**–स्त्री. तपास-नाकें; नियंत्रणचौकी; 'चेक पोस्ट'.

पड़तालना–क्रि.स. १. तपासणें. २. पडताळून पाहणें.

पड़ती–स्त्री. पडीत जमीन. मु०–**उठाना**–पडीत जमीन नांगरून लागवडीस आणणें. –**छोडना**–जमीन पाडून ठेवणें; जमीन न नांगरतां मोकळी ठेवणें.

पड़ना–क्रि.अ. १. पडणें; कोसळणें. २.येऊन ठेपणें. ३. पसरलें जाणें. ४. दाखल होणें. ५. हस्तक्षेप करणें. ६. विश्रांति घेणें; आराम करणें. ७. लग्न होणें. ८. पहुडणें; लवंडणें. मु० **क्या पड़ी है**–काय संबंध ? काय त्याचें ?

पड़पड़ाना–क्रि. अ. झणझणणें.

पड़पोता–पु. पणतू; प्रपौत्र.

पड़वा+– स्त्री. पाडवा; प्रतिपदा. –पु. म्हशीचें रेडकूं; रेडा.

पड़वाना–क्रि. स. पाडविणें.

पड़वी+– स्त्री. वैशाख किंवा ज्येष्ठ महिन्यांत लावला जाणारा, एका जातीचा ऊंस.

पड़ा–पु. म्हशीचें रेडकूं; रेडा.

पड़ाव–१. मुक्काम; तळ. २. मुक्कामाची जागा.

पड़िया– स्त्री. पारडी; रेडी.

पड़िवा+– स्त्री.पाडवा; प्रतिपदा.

पड़ोस–पु. शेजार. **पासपड़ोस**–पु. शेजार-पाजार. मु०–**करना**–शेजारीं राहाणें.

पडो(ड़ौ)सी–पु. शेजारी.

पढ़ंत– स्त्री. १. अभ्यास; सतत वाचन. २. जादू. [णारा.

पढ़ंता–वि. पु. अभ्यासू; वाच-

पढ़त– स्त्री. वाचन; 'रीडिंग'.

पढ़ना–क्रि. स. १. वाचणें. २. शिकणें. ३. उच्चार करणें; म्हणणें. ४. घोकणें. ५. जादू करणें. मु०–**लिखना**–शिकणें; पुस्तकी शिक्षण घेणें.

पढ़वाना–क्रि. स. दुसऱ्याकडून वाचून घेणें. २. शिक्षण देवविणें.

पढ़वैया+–पु. १. वाचणारा; शिकणारा. २. शिकविणारा.

पढ़ाई– स्त्री. १. विद्याभ्यास; अध्ययन. २. अध्यापन; शिक्षण. ३. शिक्षणशुल्क; 'फी' ४. शिकविण्याची पद्धत; कला.

पढ़ाना–क्रि. स. १. शिकविणें. २. बोलावयास शिकविणें (पक्ष्याला). ३. समजाविणें.

पढालिखा–वि. सुशिक्षित; शिकलेला.

पढ़ैया+–पु. १. शिकणारा; वाचणारा. २. शिकविणारा.

पण–पु.; **पणक्रिया**– स्त्री. पैज; जुगार; 'बेटिंग'.

पणन–पु. १. खरेदीविक्री; व्यापर; 'ट्रॅफिक'. २. पैज; जुगार.

पण्य–पु. विक्रीची वस्तु; माल. –**क्षेत्र**–पु.; –**भूमि**– स्त्री. बाजार; 'मार्केट'. –**वाहक नौका**– स्त्री. मालवाहू जहाज; 'कार्गो बोट'.

पण्यांगना– स्त्री. वेश्या.

पतंग–पु. १. पक्षी. २. पतंग (दिव्यावर उडणारा). ३. सूर्य. –स्त्री. पतंग; वावडी. –**बाज़**–पु. पतंग उडविण्याचा षोकीन. मु० –**बढ़ाना**–पतंग वर चढविणें.

पतंगा–पु. १. पतंग (किडा). २. दिव्याची काजळी. ३. ठिणगी.

पतंगी*–वि. स्त्री. रंगीबेरंगी.

पत– स्त्री. लाज; प्रतिष्ठा; इज्जत; पत. –**पानी**– पु. १. प्रतिष्ठा; मान. २. अब्रू; लज्जा. मु०– **उतारना**– बेअब्रू, अपमान करणें.–**रखना**–पत, इज्जत, लाज राखणें.

पतझड़-र– स्त्री. शिशिर ऋतु; झाडांचीं पानें झडण्याचा काळ; पानगळ ऋतु.

पतर*–*वि.* दुर्बल; कृश. *पु.* पान; पर्ण.

पतरा+–*वि.* पा० 'पतला'. –*पु.* पंचांग. [पहारेकरी; गस्ती.

पतरौल–*पु.* [इं. 'पेट्रोल']

पतला–*वि.* १. पातळ. २. किडकिडीत; सडपातळ. ३. अशक्त; कमजोर. –**पन**–*पु.* १. पातळपणा. २. किडकिडीतपणा. **मु० –पडना**– दुर्दशा होणें. –**हाल**–वाईट स्थिति; दुर्दशा. ['पँट.'

पतलून–*पु.* [इं.] पाटलोण;

पतलो+– *स्त्री.* छप्पर बनविण्यास लागणारें गवत; घायपात.

पतवार–री– *स्त्री.* सुकाणूं.

पता–*पु.* [*फा.*] १. पत्ता; ठिकाण. २. शोध; तपास. ३. जाणीव; माहिती. ४. रहस्य.–**(ते) को; –की बात**– *स्त्री.* महत्त्वाचा मुद्दा; रहस्य; मख्खी; गोम. [ढीग.

पताई– *स्त्री.* झडलेल्या पानांचा

पताका– *स्त्री.* १. झेंडा; निशाण. २. प्रतीक.–**शीर्षक–*पु.*** वृत्तपत्राच्या पहिल्या पानावरील या टोंकापासून त्या टोंकापर्यंत पसरलेला मथळा; 'बॅनर हेडलाइन'. **मु०– उड़ाना; – खड़ी करना; फहराना; बाँधना**– १. विजयी होणें. २. दहशत बसविणें.–**गिरना**– पराजय होणें.

पताकित–*वि.* पताकांनीं सुसज्जित; 'फ्लॅग्ड'. [जंगल.

पतार*–*पु.* १. पाताळ. २. दाट

पतावर–*पु.* पालापाचोळा.

पतिंग–गा–*पु.* पतंग (किडा).

पति–*पु.* १. नवरा. २. स्वामी. –*स्त्री.* पत. –**देवता; –देवा**– *स्त्री.* पतिव्रता स्त्री. [टाकणें, ठेवणें.

पतिआना+–*क्रि. स.* विश्वास

पतिआर*–*पु.* विश्वास.– *वि.* विश्वसनीय. [ठेवणें.

पतियाना*–*क्रि. स.* विश्वास

पतियार+–विश्वास; भरंवसा. –*वि.* विश्वसनीय.

पतिलीन*–*वि.* प्रतिष्ठाहीन.

पतीज(न)ना*–*क्रि. स.* विश्वास ठेवणें; खरें मानणें.

पतीर*– *स्त्री.* पंक्ति; ओळ; रांग.]चटई.

पतीरी+– *स्त्री.* एक प्रकारची

पतीला–*पु.* पातेलें. –*वि.*+पा० 'पतला'.

पतीली– *स्त्री.* १. पितळेचा किंवा तांब्याचा गुंड, तपेलें. २. पातेलें. [तपेलें.

पतुकी*– *स्त्री.* १. मडकें २.

पतुरिया+–*स्त्री.* वेश्या; रखेली.

पतुली+– *स्त्री.* पाटली (दागिना).

पतुही+– *स्त्री.* कोंवळी शेंग.

पतोखा–*पु.* १. पानांचा द्रोण. २. पानांची छत्री. ३. एक बगळा.

पतोह+–**हू**–*स्त्री.* सून; पुत्रवधू.

पत्तन– *पु.* शहर. –**पति**– *पु.* बंदर–प्रमुख; 'हार्बरमास्टर'.

पत्तल *स्त्री.* १. पत्रावळ. २. एका माणसास पुरेल एवढें अन्न. ३. पानांत वाढलेलें अन्न. **मु० एक पत्तलमें–के खानेवाले**–एकमेकांत रोटीबेटी व्यवहार करणारे. –**पड़ना**–पानें मांडलीं जाणें.–**परसना**– पानांत अन्न वाढणें. **जिसमें खाना उसीमें छेद करना**– खाल्ल्या घरचे वासे मोजणें.

पत्ता– *पु.* १. पान; पर्ण. २. जाड कागदाचा गोल किंवा चौकोनी तुकडा; खेळण्याचा पत्ता. **मु०– खड़कना**– चाहूल लागणें; धोका वाटणें.–**न हिलना**–वारा पडणें.

पत्ती– *स्त्री.* १. लहान पान. २. पाती; हिस्सा. ३. पाकळी. ४. भांग. ५. 'ब्लेड'.–**दार**– *पु.* पातीदार; भागीदार.

पत्थर– *पु.* १. दगड. २. गार (पावसाची). ३. खडा.–**फूल**– *पु.* दगडफूल.–**बाज़ी**–*स्त्री.* दगडफेक. **मु०–की लकीर**–वज्रलेप; दगडावरची रेघ.–**का कलेजा**–कठोर हृदय.–**चटाना**–धार लावणें. –**तले हाथ आना या दबना**–मोठ्या संकटांत सांपडणें. –**पर दूब जमना**– अशक्य गोष्ट होणें. [भरंवसा.

पत्यानि*– *स्त्री.* विश्वास;

पत्र– *पु.* १. पान; पर्ण. २. वर्तमानपत्र. ३. पत्र; चिठ्ठी.–**कंद**– *पु.* 'बल् बिल'. –**कार**– *पु.* संपादक; वृत्तपत्रकार. –**कारिता; –कारी**–*स्त्री.* वृत्तपत्रकाराचा पेशा, व्यवसाय. –**चलार्थ**–*पु.* कागदी चलन; 'पेपर–करन्सी'. –**चाप**–*पु.* 'पेपरवेट'. –**पाल**– *पु.* पोस्ट मास्तर; 'पोस्ट मास्टर'. –**पुष्प**– *पु.* फूल ना फुलाची पाकळी; सामान्य भेट. –**पेटिका**– *स्त्री.* पत्राची पेटी; 'लेटरबॉक्स'. –**भारक**– *पु.* 'पेपरवेट'. –**वाह** *पु.* पत्रें नेणारा नोकर; 'प्यून'. – **०पंजिका; – ०पंजी**– *स्त्री.* पत्रांची नोंद असलेली वही; 'प्यून बुक'. –**वाहक**– *पु.* १. पोस्टमन. २. बाण. ३. पक्षी. –**वितरक**– *पु.* पत्रें वांटणारा; 'पोस्टमन.'–**वियोजक**– *पु.* पत्रांची विल्हे करणारा; 'सॉर्टर'. –**सूचना विभाग** –*पु.* वृत्तपत्रांना माहिती व बातम्या पुरविणारा सरकारी विभाग; 'प्रेस इन्फर्मेशन ब्यूरो'. [पत्र.

पत्रक–*पु.* १. पान. २. तमाल-

पत्रा–*पु.* १. पंचांग. २. बेगड.

पत्राचार–*पु.* पत्रव्यवहार;

'कॉरस्पाँडन्स'.

पत्रालय–पु. 'पोस्ट ऑफिस'.

पत्रालयिक आदेश–पु. 'पोस्टल ऑर्डर'.

पत्रालयित–*वि.* पोस्टाच्या पेटींत टाकलेलें किंवा पाठविलेलें; 'पोस्टेड'.

पत्रालयीय प्रमाणपत्र–पु. पत्र इ० पोस्टांत टाकल्याचें प्रमाणपत्र; 'पोस्टल सर्टिफिकेट'.

पत्रालाप–पु. वाटाघाटी; 'निगोशियेशन'.

पत्रावलि-ली– *स्त्री.* १. पत्रांचा संग्रह. २. पानांची ओळ.

पत्रिका– *स्त्री.* १. पत्र; चिठ्ठी. २. नियतकालिक.

पत्री– *स्त्री.* चिठ्ठी; पत्र.

पथ–पु. १. मार्ग; रस्ता. २.+ पथ्य.–**कर**–पु. दस्तुरी; जकात; 'टोल'. –**दर्शक; –प्रदर्शक**–पु. मार्गदर्शक.

पथराना–*क्रि. अ.* १. सुकून कठिण होणें. २. शिळें होणें. ३. निर्जीव होणें.

पथरी– *स्त्री.* १. दगडी; दगडाची वाटी. २. मूतखडा. ३. गारगोटी. ४. धारेचा दगड.

पथरीला–*वि.* खडकाळ.

पथरौटा–पु.; **पथरौटी**– *स्त्री.* दगडी; दगडाची वाटी.

पथिक; पथी–पु. पांथस्थ; वाटसरू.

पथु*–पु. मार्ग; रस्ता.

पथेरा–पु. विटा, कौलें इ० बनविणारा; कुंभार.

पद–पु. १. पाय. २. स्थान; पद; दर्जा. ३. अट; शर्त. ४. शब्द; पारिभाषिक शब्द; 'टर्म'. ५. काम; व्यवसाय. ६. वस्तु; चीज. ७. कवितेचा चरण.–**कारणात्; पदेन**–*अव्य.* पदसिद्ध; 'एक्स ऑफीशियो'.–**त्राण**–पु. पादत्राण; जोडा; वाहाण. –**धारण–सुरक्षा**– *स्त्री.* एखाद्या जागेवर कायम राहाण्यासंबंधींची खात्री; 'सिक्यूरिटी ऑफ टेन्यूर'. –**नाम**–पु. अधिकार-पद; हुद्दा; 'डेसिग्नेशन'. –**बाधा; –रोक; –रोध**–पु. यष्टिचित; 'एल्. बी. डब्लू.' 'लेग बिफोर विकेट.'–**मुक्त**–*वि.* आपली नोकरी सोडून अन्यत्र जाणारा; निवृत्त; 'आउट गोइंग'. –**मोचन**–पु. मोकळीक; सुटका; 'रिलीफ'. –**व्याख्या**– *स्त्री.* वाक्यांतील शब्दांचें व्याकरण सांगणें; चालवून दाखविणें; 'पार्सिंग'. –**शिक्षार्थी**–*वि.* पु. शिकाऊ उमेदवार; 'अॅप्रेंटिस'. –**संज्ञा**– *स्त्री.* हुद्दा; 'डेसिग्नेशन'. –**सूचक चिह्न**–पु. सन्मानचिह्नें; 'इन्सिग्निआ.' –**स्थ**–*वि.* १. एखाद्या मोठ्या हुद्यावर असणारा. २. पायीं चालणारा.

पदवीदान–समारोह–पु. पदवीदान–समारंभ.

पदाति; पदातिक; पदाती–*वि.* १. पायीं चालणारा. २. पायदळ. –पु. १. पायदळाचा शिपाई, सैनिक. २. पदयात्री.

पदाधिकारी–पु. अधिकाराच्या, हुद्याच्या जागेवर असणारा.

पदाना–*क्रि. स.* १. पदविणें (खेळांत); हैराण करणें. २. पादविणें.

पदानुशासन–पु. व्याकरण.

पदारथ*–पु. पदार्थ.

पदार्थ–पु. वस्तु; पदार्थ; 'मॅटर'. –**विज्ञान**–पु. भौतिकशास्त्र; पदार्थविज्ञानशास्त्र; 'फिजिक्स'. [काळ; 'टेन्यूर'.

पदावधि– *स्त्री.* कारकीर्दीचा

पदावनति– *स्त्री.* अपकर्ष; खालच्या पायरीवर आणणें; 'डिग्रेडेशन'.

पदावली– *स्त्री.* १. पदें, भजनें इ० चा संग्रह. २. शब्दांची रचना.

पदावास–पु. अधिकृत निवास; सरकारी निवास; 'ऑफिशियल रेसिडेंस'.

पदासीन–*वि.* हुद्यावर असलेला.

पदिक–*वि.* पायीं चालणारा. *–पु. १. पायदळ शिपाई. २. गळ्यांतील ताईत.–**रेखा**– *स्त्री.* पायंडा; चाकोरी; 'पेडल्लाइन'.

पदी*–पु. पायदळ शिपाई; प्यादा.

पदुम*–पु. कमळ.

पदेन–*वि.* पदसिद्ध; 'एक्स ऑफिशियो.'

पदोड़ा–*वि.* १. फार पादणारा; पादरा. २. भ्याड.

पदोन्नति– *स्त्री.* बढती; पदवृद्धि; 'प्रमोशन'. [अब्ज.

पद्म–पु. कमळ.–*वि.* एक हजार

पधराना–*क्रि. स.* आदरपूर्वक आणणें; आदरसत्कार करणें.

पधारना–*क्रि. अ.* पदार्पण करणें; आगमन होणें.–*क्रि. स.* आदरसत्कार करणें; सन्मानानें बसविणें.

पन–पु. १. पण; प्रतिज्ञा. २.* बाजार. ३. 'पानी', 'पान' व 'पाँच' या शब्दांचें समासांतील विकृत रूप.–**कपड़ा**–पु. जखमेवर बांधावयाची कापडाची ओली पट्टी. –**कुट्टी**– *स्त्री.* तांबूल कुटण्याचा लहान खलबत्ता.–**घट**–पु. पाणी भरण्याची जागा; नदीचा घाट; पाणवठा.–**चक्की**– *स्त्री.* पाणचक्की. –**डब्बा**–पु. पानाचा डबा.–**डुब्बा**–पु. १. पाणबुड्या. २. पाणबुड्या

पक्षी.–**डुब्बी**– *स्त्री.* पाणबुडी; 'सब-मरीन.'–**बट्टा**–*पु.* पानाचे विडे ठेवण्याची डबी.–**बिजली–शक्ति**–*स्त्री.* जलविद्युत्‌शक्ति; 'हायड्रो इलेक्ट्रिक पॉवर.'–**भरा**–*पु.* पाणी भरण्याचें काम करणारा; पाणक्या. –**वाड़ी**–*पु.* तांबोळी.–*स्त्री.* पान मळा.–**वार***; –**वारा**–*पु.* १. पत्रावळ. २. एका माणसास पुरेल इतकें अन्न.–**वारी**– *स्त्री.* पा० 'पनवाडी'. –**सल्ला**; *–**साल–ला**–*स्त्री.* १. पाणपोई. २. पाण्याची खोली मोजण्याचें यंत्र. –**सुइया**– *स्त्री.* छोटी नाव.–**सेरी**– *स्त्री.* **पा०** 'पंसेरी'.–**हरा**; –**हारा**–*पु.* पाणी भरणारा नोकर; पाणक्या.

पनच–*स्त्री.* प्रत्यंचा; धनुष्याची दोरी.

पनपना–*क्रि. अ.* १. टवटवीत, वृद्धिगत होणें. २. प्रकृति पुन्हां सुधारणें.

पनस–*पु.* फणस.

पनहा–*पु.* १. पन्हा (कापड इ० चा). २. रहस्य. ३. चोरीचा माग काढणारा अथवा त्याबद्दल दिला जाणारा मोबदला.

पनही*–*स्त्री.* जोडा; पादत्राण; चप्पल. [चिंचेचें).

पना–*पु.* पन्हें (कैरीचें किंवा

पनाती–*पु.* पणतू. [–*स्त्री.* **पनातिन**]

पनारा–ला–*पु.* १. मोरी. २. पन्हाळें ३. नाला; प्रवाह.

पनाह–*स्त्री.* १. शरण; रक्षण. २. रक्षण किंवा आश्रय मिळण्याचें स्थान; आश्रयस्थान.

पनियाना+–*क्रि. स.* पाण्यानें ओलेंचिंब करणें.–*क्रि. अ.* पाण्यानें थबथबणें.

पनिहा–*वि.* १. पाण्यांत राहाणारा. २. पाण्यांत मिसळलेला. ३. पाण्यासंबंधींचा.–*पु.* हेर; गुप्तचर.

पनिहारिन; **पनिहारी**– *स्त्री.* पाणी भरणारी, आणणारी.

पनी–*पु.* प्रण, प्रतिज्ञा करणारा. –*स्त्री.*+ पा० 'पन्नी'.

पनीर–*पु.* [*फा.*] १. दूध फुटून निघणारा चोथा; आमीक्षा. २. चक्का.–**जल**–दह्याची निवळी; 'वे'.

पनीरी+– *स्त्री.* १. आळें (फुलझाडें ज्यांत लावतात तें). २. दुसरीकडे लावण्यासाठीं तयार केलेलें रोपटें; रोप; कलम. [असलेला.

पनीला–*वि.* पाणचट; पाणी

पनुआँ–*वि.* फिका; नीरस; पाणचट.–*पु.* गुळाची कढई धुवून काढलेलें पाणी. हें सरबताप्रमाणें पितात. [खळ लावलेलें कापड.

पनैला–*पु.* १. मेणकापड. २.

पनौटी– *स्त्री.* पानाचा डबा; वांबूचें पानदान.

पन्नग–*पु.* साप.

पन्ना–*पु.* १. पाच; पाचू; रत्नाचा एक प्रकार. २. वर्ख. ३. पान; पृष्ठ.

पन्नी– *स्त्री.* बेगड; सोन्याचांदीचें पाणी दिलेला कागद. –**साज**–*पु.* बेगड तयार करणारा.

पपड़ा–*पु.* १. ढलपा. २. पापुद्रा.

पपड़ि(रि)या–*वि.* खपल्या–पडलेला; पापुद्रा सुटलेला.–**कत्था** –*पु.* पांढरा कात.

पपड़ियाना–*क्रि. अ.* १. सुकणें. २. पापुद्रा सुटणें; पोपडा येणें.

पपड़ी–*स्त्री.* १. पोपडा; पापुद्रा, २. खपली. ३. एक प्रकारची मिठाई (पापडी).

पपिहरा; **पपिहा**+–*पु.* चातक.

पपीता–*पु.* पोपई; पपई.

पपीहरा+; **पपीहा**–*पु.* चातक.

पपैया+–*पु.* १. शिटी; पिपाणी; आंब्याच्या रोपट्याच्या मुळाशीं असलेली कोय घासून बनविलेली पिपाणी. २. चातक.

पपोटा–*पु.* पापणी.

पपोरना*–*क्रि. स.* दंड फुगवून त्यांची पुष्टता पाहाणें; बेटकुळी काढणें. [तोंड हलविणें.

पपोलना–*क्रि. स.* दांत नसलेलें

पबना*–*क्रि. स.* प्राप्त करणें; मिळविणें.

पब्लिक–*स्त्री.* [इं.] जनता; लोक.–*वि.* जाहीर; सार्वजनिक.

पय–*पु.* १. पाणी. २. दूध. ३.* पद; –चरण.–**द***–*पु.* मेघ; ढग.–**धि**; –**निधि**–*पु.* समुद्र.

पयस्विनी–*स्त्री.* १. दूध देणारी गाय. २. बकरी. ३. नदी.

पयादा–*वि.* पायीं चालणारा.–*पु.* प्यादा; पायदळांतील सैनिक.

पयान–*पु.* प्रयाण; प्रस्थान.

पयाम–*पु.* [*फा.*] संदेश.–**बर**–संदेशवाहक; प्रेषित; पैगंबर.

पयार*–**ल**–*पु.* पेंढा; भातेण; कडबा.–**मु० गाहना अथवा झाड़ना** –निरर्थक, फुकट मेहनत करणें. –**तापना**–निरर्थक, निष्फळ काम करणें.

पयोज–*पु.* कमळ.

पयोधर–*पु.* १. ढग. २. स्तन.

परंच–*अव्य.* १. तसेंच. २. परंतु; तरीहि. ['प्रोव्हाइझो.'

परंतुक–*पु.* संकेत; शर्त; अट;

पर–*अव्य.* १. पण; परंतु. २. पश्चात्; नंतर. ३. वर.–*पु.* १. शत्रु. २. अपरिचित व्यक्ति. –*वि.* १. अन्य; दुसरा. २. परका. ३. भिन्न ४. श्रेष्ठ. ५. नंतरचा. –**काजी**.–

वि. परोपकारी. **–क्रामण**–*पु.* सर्व अधिकारांसह दुसऱ्याला हस्तांतरित करणें; 'निगोशिएशन.' **–क्राम्य–** *वि.* वेचन करून देतां येण्यासारखा; बेचनीय; 'निगोशिएबल'. **–गाछा**–*पु.* बांडगूळ.–**जन**–*पु.* १. परकीय माणूस. २.* परिवार. ३.*सेवक; नोकर.–**देश–स**–*पु.* परदेश.–**पक्षग्राही**–*वि.* आपला पक्ष सोडून दुसऱ्या पक्षांत जाणारा; पगडी वदलणारा; 'टर्न कोट'.– **परागण**–*पु.* 'क्रॉस पॉलिनेशन.' – **पार**–*पु.* पैलतीर.–**बस**–*वि.* पर वश; पराधीन.–**बसताई***–*स्त्री.* परवशता; परा-धीनता; पारतंत्र्य. **–मुखापेक्षिता**–*स्त्री.* दुसऱ्यावर अवलंबून राहाणें.–**मुखापेक्षी**–*वि.* दुसऱ्यावर अवलंबून राहाणारा.– **लोक**–*पु.* १. स्वर्ग. २. दुसरा लोक किंवा जन्म. (**मु० –बनना**–मृत्यूनंतर सद्‌गति मिळणें. **–बिगड़ना**–मृत्यू नंतर सद्‌गति न मिळणें. **–सिधारना** –मरण पावणें.) **–वर्ती**–*वि.* नंतरचा; मागला. **–वश**; **–वश्य**–*वि.* पराधीन; परतंत्र. **–साल**–*अव्य.* गुदस्ता किंवा पुढील वर्षी; गतवर्षी.

पर–*पु.* [*फा.*] पंख. **–कटा**–*वि.* पंख कापला गेलेला. **मु०–जमना–** १. पंख उगवणें. २. खोडी सुचणें. **–न मारना**–जातां न येणें.

परई+–*स्त्री.* १. मातीचा परळ. २. मातीचा दिवा; मोठी पणती.

परकना*–*क्रि अ.* १. मिळून जाणें; परिचित होणें. २. चट लागणें; सोकावणें. [चटक लावणें.

परकाना+–*क्रि.स.* सोकविणें;

परकार–*पु.* [*फा.*] कंपास; 'डिव्हायडर्स'.[२. उंबरा; उंबरठा.

परकाला–*पु.* १. जिना; शिडी.

परकाला–*पु.* [*फा.*] १. तुकडा; खंड. २. ठिणगी. ३. कांचेचा तुकडा. **मु० आफ़तका परकाला–** भयंकर मनुष्य.

परकास*– *पु.* प्रकाश.

परकासना*– *क्रि.स.* १ प्रकाशित करणें; प्रकाश देणें. २. प्रकट करणें.–*क्रि. अ.* प्रकाशणें.

परकिति; परकीति–ती*–*स्त्री.* १. निसर्ग २. प्रकृति; तद्येत.

परकीया–*स्त्री.* जारिणी; गुप्तपणें परपुरुषावर प्रेम करणारी नायिका.

परकोटा–*पु.* १. किल्ल्याचा कोट. २. आवाराची भिंत; तट. ३. बांध.

परख–*स्त्री.* परीक्षा; पारख. **–नली**–*स्त्री.* कसनळी; 'टेस्ट-ट्यूब'.

परखचा–*पु.* तुकडा; खंड. **मु०– (चे) उड़ाना**– चिंधड्या उडविणें.

परखना–*क्रि. स.* १. पारखणें; परीक्षा करणें. २. प्रतीक्षा करणें; वाट पाहाणें. [पारख करणारा.

परखवैया; परखैया–*पु.* पारखी;

परखाई–*स्त्री.* पारखण्याचें काम किंवा त्याची मजुरी.

परखाना–*क्रि. स.* १. पारख करविणें. २. सोंपविणें.

परखी–*स्त्री.* धान्याच्या पोत्यांत खुपसून नमुन्यासाठीं धान्य काढण्याचें एक लोखंडी टोंकदार अवजार.

परग*–*पु.* पाऊल; कदम.

परगट*–*वि* प्रकट; व्यक्त.

परगटना–*क्रि. अ.* प्रकट होणें. –*क्रि. स.* प्रकट, व्यक्त करणें.

परगना–*पु.* [*फा.*] परगणा; जिल्ह्याचा एक भाग. **–दार; –हाकिम; परगनाधीश**–*पु.* परगण्यावरील अधिकारी.

परगसना*–*क्रि. स.* प्रकाशणें; प्रकट होणें.

परगहनी–*स्त्री.* पा० 'परघनी'.

परगाढ*–*वि.* प्रगाढ; गहन.

परगास*–*पु.* प्रकाश.

परगासना*–*क्रि. अ.* प्रकाशित होणें.–*क्रि. स.* प्रकाशित करणें.

परघनी–*स्त्री.* सोनें किंवा चांदी ओतण्याचा सांचा; नळी.

परचइ*–*स्त्री.* परिचय; ओळख.

परचत*–*स्त्री.* परचय; ओळख. –*वि.* ओळखीचा; परिचित.

परचना–*क्रि. अ.* १. अधिक परिचय होणें; माणसाळणें. २. चटक लागणें; सोकावणें.

परचा–*पु.* [*फा.*] १. कागदाचा तुकडा. २. प्रश्नपत्र; 'पेपर'. ३. चिठ्ठी; पत्र. ४. परिचय. [**–स्त्री. परची**]. **मु० –देना**–पूर्ण परिचय देणें.–**माँगना**– १. पुरावा देण्यास सांगणें. २. देवाला सामर्थ्य दाखविण्याची प्रार्थना करणें.

परचाना–*क्रि. स.* १. सोकावून ठेवणें; माणसाळविणें. २. अतिपरिचय ठेवणें; स्नेहसंबंध जोडणें. ३.* पेटविणें.

परचार*–*पु.* प्रचार.

परचून–*पु.* शिधा (डाळ, तांदूळ, पीठ इ०); किराणा माल.

परचूनी–*पु.* वाणी (डाळ, तांदूळ इ० विकणारा); किराणा मालाचा दुकानदार.

परचे-चै+–*पु.* परिचय; ओळख.

परछत्ती–*स्त्री.* पोटमाळा; माळा (सामान ठेवण्याचा). २. गवताचें छप्पर.

परछन–*स्त्री.* लग्नाकरितां वधूगृहाच्या दारांत आल्यावर नवऱ्यामुलास स्त्रिया दहीअक्षता लावून आणि मुसळ व वरवंटा त्याच्या

तोंडासमोर फिरवून ओवाळतात तो विधि.

परछना–*क्रि.स.* नवऱ्या मुलाला दारावर ओवाळणें.

परछा –*पु.* १. तेल–घाणीच्या बैलाच्या डोळ्यांना झापड बांधण्याचें कापड. २. मोठें पातेलें; कढई. ३. गर्दी कमी झाल्यामुळें पडणारी पोकळी.

परछाईं–*स्त्री.* छाया; पडछाया; प्रतिबिंब.

परछी+–*स्त्री.* दुधाचें किंवा दह्याचें मडकें.

परजरना*–*क्रि. अ.* १. जळणें. २. रागावणें; कुढणें. ३. द्वेष करणें.

परजा–*स्त्री.* १. प्रजा; जनता; रयत. २. कूळ.

परजाता–*पु.* पारिजातक; प्राजक्त.

परजाय*–१. पर्याय; प्रकार. २. क्रम; परंपरा. ३. प्रसंग; ओघ.

परजौटा–*पु.* १. वार्षिक भाडेपट्ट्यानें घर बांधण्याची किंवा जमीन देण्या-घेण्याची रीत. २. घर बांधण्यासाठीं दिलेल्या जमिनीचें भुईभाडें.

परत–*स्त्री.* १. थर; लेप. २. घडी. ३. पापुद्रा.

परतच्छ–छ*–*वि. अव्य.* प्रत्यक्ष.

परतल–*पु.* गोणी. [' पड़ताल '.

परतार–ल–*स्त्री.* पा०

परतिग्या–ज्ञा*–*स्त्री.* प्रतिज्ञा; पण.

परती–*स्त्री.* १. पडीत जमीन. २. धान्य वारवण्याचा, पाखडण्याचा पत्रा. ३. ' पॅड '.

परतीत*–*स्त्री.* १. प्रतीति. २. विश्वास. ३. प्रसन्नता.

परतोख*–*पु.* उदाहरण; प्रत्यक्ष प्रमाण.

परतौ–*पु.* [*फा.*] १. किरण. २. प्रतिबिंब.

परथन+–*पु.* पिठी; पोळी लाटतांना उपयोगांत आणावयाचें पीठ.

परदच्छि (छि) ना– *स्त्री.* प्रदक्षिणा.

परदा–*पु.* [*फा.*] १. पडदा. २. आडोसा. ३. पडद्याची पद्धत. ४. आडोशाची भिंत. ५. घुंघट. ६. थर. **–दरी**–*स्त्री.* दोष जाहीर करणें; रहस्य प्रकट करणें. **–दार**–*वि.* पडद्याआड राहाणारा; लपणारा. **–नशीन**–*वि.* पडदानशीन; पडद्यांत असलेली (स्त्री). **–पोशी**–*स्त्री.* एखाद्याचें रहस्य किंवा दोष उघडकीस न आणणें; दोषाची सारवासारव. **मु० –उठाना या खोलना**–दोष उघड करणें. **–डालना**–पांघरूण घालणें; लपविणें. **–फ़ाश करना**–बिंग फोडणें. **–फ़ाश होना**–बिंग फुटणें.

परदाख़्त–*स्त्री.* [*फा.*] १. पालनपोषण. २. साह्य. ३. दुरुस्ती.

परदाज़–*पु.* [*फा.*] १. सजावट. २. चित्रांच्या भोंवतींची नक्षी. ३. दुरुस्ती. *–वि.* करणारा (समासांत).

परदादा–*पु.* पणजोबा (वडिलांचे आजोबा); प्रपितामह. [*–स्त्री.* **परदादी**]

परनाना–*पु.* आईचे आजोबा; पणजोबा. [*–स्त्री.* **परनानी**]

परनाम*–*पु.* प्रणाम; नमस्कार.

परनाला–*पु.* १. मोरी; गटार. २. पन्हळ.

परनाली–*स्त्री.* १. लहान मोरी; नाली. २. घोड्याच्या पाठीवरील पन्हळ.

परपंच*–*पु.* १. प्रपंच; संसार. २. विस्तार. ३. ढोंग; कपाट.

परपंचक; परपंची*–*वि.* १. भानगड; कलह उत्पन्न करणारा. २. धूर्त; फसव्या.

परपट–*पु.* सपाट जमीन.

परपराना–*क्रि. अ.* चुणचुणणें; आग होणें; भाजणें.

परपोता–*पु.* पणतू; प्रपौत्र.

परब–*पु.* पर्व. *–स्त्री.* एखाद्या रत्नाचा लहान तुकडा.

परबत*–*पु.* पर्वत; डोंगर.

परबल*–*वि.* प्रबळ. *–पु.*+ परवल (एक भाजी); पडवळ.

परबाल*–*पु.* पडकेस; पापणीवर उगवलेला अनावश्यक केस; याच्यामुळें फार वेदना होतात.

परबीन*–*वि.* प्रवीण.

परबेस*–*पु.* प्रवेश.

परबोध*–*पु.* १. प्रबोध; जागृति. २. शिकवण; उपदेश. ३. सांत्वन.

परबोधना*–*क्रि. स.* १. जागें करणें. २. उपदेश करणें ३. सांत्वन करणें.

परभा*–*स्त्री.* प्रभा.

परभाइ*–*पु.* प्रभाव.

परभात*–*पु.* प्रभात; पहांट.

परभाती*–*स्त्री.* भूपाळी.

परभाव*–*पु.* प्रभाव; वजन.

परम–*वि.* १. सर्वांत मोठा, उच्च, उत्कृष्ट. २. श्रेष्ठ. ३. अत्यधिक. ४. आद्य. **–गति**–*स्त्री.* मोक्ष; मुक्ति. **–तत्त्व**–*पु.* ब्रह्म. **–न्यायालय**–*पु.* सर्वोच्च न्यायालय; 'सुप्रीम कोर्ट'. **–श्रेष्ठ**–*वि.* महामहिम; 'हिजएक्सलन्सी'. **–सत्ता**–*स्त्री.* अनियंत्रित सत्ता; 'अॅबसोल्यूट पॉवर'. **–हंस**–*पु.* १. संन्यासी; योगी. २. परमात्मा; परमेश्वर.

परमा*–*स्त्री.* शोभा; कांति; सौंदर्य. *–पु.*+ प्रमेह (रोग).

परमाणु–*पु.* अणु; परमाणु; 'अॅटम'. **–बम**–*पु.* अणुबाँब; 'अॅटम बाँब'. **–वाद**–*पु.* सृष्टीची उत्पत्ति परमाणूंपासून झालेली आहे, असें मत, सिद्धांत.

परमाधिकार–*पु.* १. सर्वोच्च अधिकार; 'सुप्रीमसी'. २. विशिष्टाधिकार; 'प्रेरोगेटिव्ह'.

परमान*– *पु.* १. प्रमाण; दाखला. २. खरी गोष्ट. ३. अवधि. ४. सीमा; हद्द.

परमारथ*–*पु.* परमार्थ; मोक्ष.

परमावश्यक सेवाएँ– *स्त्री.* अपरिहार्य, अनिवार्य नोकऱ्या; 'इसेंशल सर्व्हिसेस'.

परमेस(सु)र* –*पु.* परमेश्वर.

परमेसरी* – *स्त्री.* परमेश्वरी; दुर्गा.

परयंक*–*पु.* पलंग.

परलउ–य–यै*– *स्त्री.* प्रलय.

परला–*वि.* पलीकडचा; दुसऱ्या बाजूचा. **मु०–(ले) दर्जेका,–सिरेका** –अत्यंत; पराकाष्ठेचा.

परवर+–*पु.* परवल; तोंडल्यासारखी एक फळभाजी.

परवर–*वि.* [*फा.*] पालन-पोषण करणारा.–**दिगार**–*पु.* १. ईश्वर; अल्ला. २. पालक; पालनकर्ता.

परवरिश–*स्त्री.* [*फा.*] पालन-पोषण; कृपा.

परवल–*पु.* १. तोंडल्यासारखी एक फळभाजी. २. खुणेचा शब्द.

परवा* – *स्त्री.* प्रतिपदा. – *पु.* मातीचा परळ.

परवा; **परवाह**– *स्त्री.* [*फा.*] १. पर्वा; काळजी. २. लक्ष; नजर. ३. आश्रय.

परवाज़–*स्त्री.* [*फा.*] १. उडणें; उड्डाण करणें. २. गर्व; घमेंड.–*वि.* १. उडणारा. २. घमेंडखोर.

पुड़िया–*स्त्री.* १. पुडी. २. पुडींत बांधलेलें एका वेळचें औषध.

पुण्य–*वि.* पवित्र; शुद्ध. –*पु.* पुण्य.–**श्लोक**–*वि.* शुद्ध, पावन चरित्राचा. –*पु.* विष्णु; युधिष्ठिर; नल.

पुतना–*क्रि. अ.* चोपडलें जाणें.

पुतरा*–*पु.* बाहुला.

पुतरि; पुतरिका–या; पुतरी*–*स्त्री.* पा० 'पुतली'.

पुतला–*पु.* १. बाहुला. २. प्रतिमा; पुतळा (खेळांतील). **मु० (किसीका) –बांधना**–एखाद्याची बदनामी करणें.

पुतली–*स्त्री.* १. बाहुली. २. डोळ्यांतील बाहुली. ३. कापड विणण्याचा माग.–**घर**–*पु.* कापडाची गिरणी. **मु०–फिर जाना**–डोळे फिरणें (मरण समयीं).

पुताई–*स्त्री.* लिंपण्याचें, रंग देण्याचें काम किंवा मजुरी.

पुतारा–*पु.* पोतेरें.

पुत्त*–*पु.* पुत्र; मुलगा.

पुत्तारी*–*पु.* पुत्र; मुलगा.

पुत्ति*–*स्त्री.* कन्या; मुलगी.

पुत्रवधू–*स्त्री.* सून.

पुन+–*पु.* पुण्य.

पुनः–'पुनर्' चें समासांतील रूप.–**पुनः**–*अव्य.* वारंवार.–**प्रेषण-केंद्र**–*पु.* बेपत्ता पत्रघर; 'डेड-लेटर ऑफिस'. –**श्रवण**–*पु.* फेर सुनावणी; 'रीहिअरिंग'.

पुनर्भू–*स्त्री.* पुनर्विवाह केलेली विधवा स्त्री.

पुनरधिनियम–*पु.* पुनः कायदा करणें; 'री इनॅक्टमेंट'.

पुनरस्त्रीकरण–*पु.* पुनः शस्त्रीकरण करणें; 'रीआर्मामेंट'.

पुनरावृत्त–*वि.* पुनरावृत्ति केलेला; 'रिपीटेड'.

पुनरावेदन–*पु.* न्यायासाठीं फेर विनंती; 'अपील' ['रिव्हिजन'.

पुनरीक्षण–*क्रि.* फेरतपासणी;

पुनरीक्षित–*वि.* फेरतपासणी केलेला; 'रिव्हाइज्ड'.

पुनरुज्जीवन–*पु.* पुनर्जीवन; 'रिव्हाइव्हल'. ['रिनेसाँ'.

पुनरुत्थान–*पु.* पुनरुज्जीवन;

पुनरेकीरण–*पु.* पुनः एक करणें; 'रीयुनियन'.

पुनर्–*अव्य.* पुनः; दुसऱ्यांदा. –**जागरण**–*पु.* पुनरुज्जीवन; 'रिनेसाँ'. –**नियुक्ति**–*स्त्री.* फेर नेमणूक; 'री इंस्टेटमेंट'.–**न्याय-प्रार्थना**–*स्त्री.* 'अपील.' –**न्याय-प्रार्थी**–*पु.* अपील करणारा; 'अपीलंट'.–**मुद्रित**–*वि.* पुनः छापलेलें; 'रीप्रिंटेड'. –**मूल्यन**–*पु.* मूल्याची फेर आंखणी; 'रीव्हॅल्युएशन'.–**युक्त कोण**–*पु.* 'रिफ्लेक्स अँगल'

—वास—पु. पुनर्वसाहत; 'रीहॅबिलिटेशन'. —विचारन्यायाधिकरण—पु. न्यायालयीन निवाड्यांचा फेरविचार करणारें न्यायमंडळ; 'अपेलेटट्रिब्यूनल'. —विचारन्यायालय—पु. अपील कोर्ट; 'कोर्ट ऑफ अपील'. —विचारप्रार्थी—पु. अपील करणारा; 'अपेलंट'. —विधायन—पु. एखादा कायदा किंवा नियम पुनः बनविणें; 'री इनॅक्टमेंट'.—विलोकन—पु. पुनरावलोकन; फेरविचार; 'रिव्हयू'. —हिमायन—पु. 'रीगेलेशन'.

पुनश्च—*अव्य.* १. पुनः. २. ताजा कलम (पत्रांतील).

पुनि*—*अव्य.* फिरून; पुनः. **—पुनि**—*अव्य.* वारंवार; पुनःपुनः.

पुनी*—*पु.* पुण्यात्मा.—*स्त्री.* पूर्णिमा; पौर्णिमा.—*अव्य.* पुन्हां.

पुनीत—*वि.* पवित्र; शुद्ध.

पुन्न*—*पु.* पुण्य.

पुन्यसिलोक*—*वि.* पुण्यश्लोक.

पुमंग—*पु.* 'अँड्रोशिअम'.

पुरःस्थापन—*पु.*; **पुरःस्थापना**—*स्त्री.* पुढें मांडणें, ठेवणें; 'इंट्रॉडक्शन'.

पुर—*वि.* [*फा.*] पूर्ण; भरलेला. **—अमन**—*वि.* शांततापूर्ण.**—असर**—*वि.* प्रभावपूर्ण; परिणामकारक. **—जोर; —जोश**—*वि.* आवेशपूर्ण; जोरदार. [घर. ३. नक्षत्र. ४. देह.

पुर—*पु.* १. नगर; शहर. २.

पुर+—*पु.* मोट. **—वट**—*पु.* मोट.

पुरइन*—*स्त्री.* १. कमळाचें पान २. कमळ.

पुरखा—*पु.* १. पूर्वज. २. कुटुंबांतील मोठा पुरुष. **मु० पुरखे तर जाना**—पूर्वजांना उत्तम गति प्राप्त होणें.

पुरचक+—*स्त्री.* १. चुचकारणें. २. उत्साह. ३. प्रेरणा. ४. समर्थन.

पुरज़ा—*पु.* [*फा.*] १. चिठ्ठी. २. तुकडा; कात्रण. ३. अवयव; अंग. **मु० चलता पुरज़ा**—तरतरीत माणूस; चलाख; लवाड.

पुरट*—*पु.* सुवर्ण; सोनें.

पुरब(बि—बु)ला*—*वि.* १. पूर्वीचा; जुना. २. पूर्वजन्मींचा.

पुरबिया—*वि.* पूर्वेकडील देशांत किंवा प्रांतांत राहणारा; पौर्वात्य. **—पु.** पुरभैया. [वारा.

पुरवइया+—*स्त्री.* पूर्वेकडील

पुरवना*—*क्रि. स.* १. पूर्ण करणें; शेवटास नेणें. २. भरणें.

पुरवा—*पु.* १. मातीचें लहान भांडें. २. लहान गांव; खेडें; वाडी. **—स्त्री.** पूर्वे कडून येणारें वारें. **—वि.*** पूर्ण करणारा.

पुरवाई; पुरवैया—*स्त्री.* पूर्वेकडून येणारें वारें.

पुरसाँ—*वि.* [*फा.*] विचारपूस करणारा. [किंवा खोलीचें माप).

पुरसा—*पु.* एक पुरुष (उंचीचें

पुरसा—*पु.* [*फा.*] दारावर जाणें (मृताच्या नातलगांच्या सांत्वनार्थ).

पुरसिश—*स्त्री.* [*फा.*] विचारपूस. [विचारणा.

पुरसी—*स्त्री.* [*फा.*] पूसतपास;

पुरस्कार—*पु.* १. इनाम; बक्षीस. २. आदर; सन्मान. ३. स्वीकार.

पुरा—*अव्य.* पूर्वी; प्राचीन काळीं. **—पु.** गांव; वस्ती.**—काल**—*पु.*; **पुराणता**—*स्त्री. पु.* प्राचीन काळ; 'अँटिक्विटी'.**—तत्त्व**—*पु.* पुराणवस्तुशास्त्र; 'आर्किऑलॉजी.'**—लिपि**—*स्त्री.* प्राचीन कालीन लिपि. **—वेत्ता**—*पु.* पुराणवस्तुशास्त्रज्ञ; 'आर्किऑलॉजिस्ट'.**—लेख**—*पु.* दफ्तरखाना; 'आर्काइव्हज'.**—पाल**—*पु.* दफ्तरदार; 'आर्काइव्हिस्ट'.**—विद्**—*पु.* पुराणवस्तुसंशोधक; 'अँटिक्वेरिअन'. **—विद्या**—*स्त्री.* पुराणवस्तुशास्त्र; 'आर्किऑलॉजी'. **—वृत्त**—*पु.* प्राचीन इतिहास. **—वि.** प्राचीन.

पुरातन—*वि.* प्राचीन; जुना. **—पु.** विष्णु; पुराण-पुरुष. **—प्रेमी**—*वि.* सनातनी.

पुराना—*वि.* १. प्राचीन. २. जुना; जीर्ण. **मु०—खुर्रांट**—१. म्हातारा. २. पुष्कळ पावसाळे पाहिलेला; अनुभवी. **—घाघ**—पक्का धूर्त.

पुराना—*क्रि. स.* १. पूर्ण करविणें. २. पूजा करविणें. ३. अनुसरण करणें.

पुरारि—*पु.* शंकर.

पुरावशेष—*पु.* प्राचीन अवशेष; प्राचीन काळच्या वस्तू; 'अँटिक्विटीज'.

पुरुख*—*पु.* पुरुष.

पुरुखा*—*पु.* पूर्वज.

पुरुषारथ*—*पु.* पुरुषार्थ.

पुरुहूत—*पु.* इंद्र.

पुरोहित—*पु.* यज्ञ वगैरे करविणारा; भटजी; भिक्षुक.**—तंत्र**—*पु.* भिक्षुकशाही; धर्मप्रधान शासनव्यवस्था; धर्माधिकाऱ्यांची सत्ता; 'हायरार्की'.

पुरोहिताई—*स्त्री.* भिक्षुकी.

पुरोहितानी—*स्त्री.* भटजीची बायको; भटीण.

पुरोहिती—*स्त्री.* भिक्षुकी.

पुर्ज़ा—*पु.* पा० 'पुरज़ा'.

पुर्तगाल—*पु.* [पोर्तु.] पोर्तुगाल.

पुर्तगाली—*वि.* [पोर्तु.] पोर्तुगाल संबंधींचा. **—पु.** पोर्तुगालचा रहिवासी. **—स्त्री.** पोर्तुगीज भाषा.

पुल—*पु.* [*फा.*] पूल; सेतु. **मु०—बाँधना**—अतिशयोक्ति करणें; वर्षाव करणें.

पुलक—*पु.* १. रोमांच; शिर-

शिरी २. एक रत्न.

पुलकना*–*क्रि. अ.* पुलकित, रोमांचित होणें; शिरशिरणें.

पुलकाई*– *स्त्री.* प्रफुल्लता; आनंद; शिरशिरी. [आनंदित.

पुलकित–*वि.* रोमांचित;

पुलटिस–*स्त्री.* [इं.] पोटीस.

पुलपुला–*वि.* बिलबिलीत; मऊ. [कुसकरणें. २. दाबून चोखणें.

पुलपुलाना–*क्रि. स.* १. दाबणें;

पुलाव–*पु.* [फा.] पुलावा; मांस घालून केलेला मसाल्याचा भात; फोडणीचा, मसाल्याचा भात.

पुलिंदा–*पु.* मेंडोळें; बंडल; गठ्ठा. [२. नदींतील वाळवंट.

पुलिन–*पु.* १. तट; किनारा.

पुलिया+– *स्त्री.* १. पडकी झोंपडी. २. खिडार.

पुलि(ली)स– *स्त्री.* [इं.] पोलिस. **–कारवाई** *स्त्री.* 'पोलिस ॲक्शन'. **–मैन**–*पु.* पोलिसचा शिपाई.

पुश्त– *स्त्री.* [फा.] १. पाठ; पृष्ठभाग. २. पिढी. **–दर पुश्त**– *अव्य.* वंशपरंपरेनें.**–नामा**–*पु.* वंशावळ. **–पनाह**–*पु.* पाठीराखा; सहाय्यक.**–हा पुश्त**–*अव्य.* कित्येक पिढ्यांपर्यंत; पिढ्यानुपिढ्या.

पुश्तक– *स्त्री.* [फा.] घोड्याची लाथ; दुगाणी.

पुश्ता–*पु.* [फा.] १ बंधारा; बांध. २. पुठ्ठा. ३. भिंतीच्या मजबुतीसाठीं तिला खेटून बांधण्यांत येणारा बांध.

पुश्ती– *स्त्री.* [फा.] १. टेकण; टेकू; आधार. २. पुष्टिपत्र. ३. तक्क्या. [वंशपरंपरागत.

पुश्तैनी–*वि.* [फा.] पिढीजात;

पुष्कल–*वि.* १. श्रेष्ठ. २. भरपूर; पुष्कळ. ३. पुरेसें.

पुष्टई–*स्त्री.* पौष्टिक, शक्तिवर्धक औषध.

पुष्टि– *स्त्री.* १. पोषण; वृद्धि. २. समर्थन; दुजोरा. **–कर;–कारक**–*वि.* पौष्टिक.

पुष्टीकरण–*पु.* १. कायम करणें; पक्कें करणें. 'कन्फर्मेशन'; २. समर्थन; 'रॅटिफिकेशन'.

पुष्प–*पु.* १. फूल. २. डोळ्याचा एक रोग. **–दल विन्यास**–*पु.* निकलिका विन्यास; 'एस्टिव्हेशन'. **–धनुर्धर; धन्वा**–*पु.* मदन; कामदेव.

पुष्पित–*वि.* १. विकसित; उमललेला. २. ज्याला फुलें आलीं आहेत असा.

पुसाना*–*क्रि. अ.* १. शोभणें; योग्य दिसणें. २. परवडणें.

पुस्तक– *स्त्री.* पुस्तक; पोथी. **–डाक**–पु. 'बुकपोस्ट'.

पुस्तकाकार–*वि.* पुस्तकाच्या आकाराचा. ['लायब्रेरियन'.

पुस्तकाध्यक्ष–*पु.* ग्रंथपाल;

पुस्तकालय–*पु.* ग्रंथालय.

पुस्ती–*स्त्री.* हातानें लिहिलेली पोथी. [तलाव.

पुह (हु) कर*–*पु.* पुष्करिणी;

पुह(हु) प*–पु. फूल; पुष्प.

पुहवै*–पु. प्रभु; स्वामी.

पहुमी-वी*– *स्त्री.* पृथ्वी.

पुहुरेनु*–*पु.* पुष्प-पराग.

पूँछ– *स्त्री.* १. शेपूट. २. नेहमीं बरोबर राहाणारी व्यक्ति. ३. पा० 'पूछ'. [पुसणें.

पूँछना– *क्रि. स.* विचारणें;

पूँजी– *स्त्री.* १. भांडवल 'कॅपिटल'. २. संचित धन; संपत्ति. ३ धन; पैसा. **–गत व्यय**–*पु.* भांडवली खर्च; 'कॅपिटल एक्स्पेंडिचर'. **–दार; –पति**–*पु.*– भांडवलदार.**–वाद**–पु. भांडवलशाही; 'कॅपिटॅलिझम.' **–वादी**–*पु.* भांडवलवाला; 'कॅपिटॅलिस्ट'.

पूँठ–ठि*– *स्त्री.* पाठ. [पुरी.

पूआ– *पु.* मालपुवा; पाकवलेली

पूगना*– *क्रि. अ.* पूर्ण होणें.

पूच–*वि.* [फा.] १. रिकामा; रिक्त. २. व्यर्थ; फाजील. ३. तुच्छ. ४. नीच; हलकट

पूछ– *स्त्री.* १. विचारपूस. २. आदर; मान. ३. शोध; तपास. **–गछ; –ताछ; –पाछ**– *स्त्री.* विचारपूस; पूसतपास.

पूछना– *क्रि. स.* १. विचारणें; प्रश्न करणें. २. शोध करणें; तपास काढणें. ३. समाचार घेणें. ४. आदर किंवा सन्मान करणें. ५. जाब विचारणें.

पूछरी*– *स्त्री.* शेपूट.

पूजना– *क्रि. स.* १. पूजा, आराधना करणें २. आदरसत्कार करणें. ३. लांच देणें.–*क्रि. अ.* १. पूर्ण होणें; भरणें २. समाप्त होणें.

पूजनीय–*वि.* पूज्य; आदरणीय.

पूजा– *स्त्री.* १. पूजा; आराधना. २. लांचलुचपत. **–पाठ**–*पु.* पूजा-अर्चा.

पूड़ी– *स्त्री.* १. पुरी. २. तबला मृदंग इ० च्या तोंडावर मढविलेलें कातडें; पुडी. [पवित्र; शुद्ध.

पूत–*पु.* पुत्र; मुलगा. *–वि.*

पूतड़ा–*पु.* लहान मुलाचें लहान अंथरूण. **मु०–(ड़ों)के अमीर**– खानदानी श्रीमंत.

पूतना–*स्त्री.* पूतना (श्रीकृष्णाला मारण्यासाठीं कंसानें पाठविलेली राक्षसीण); राक्षसीण.

पूति– *स्त्री.* १. पवित्रता; शुद्धता. २. दुर्गंधि.**–गंधी**–*वि.* खंवट; वाशेरा; 'रॅनसिड'. [गड्डा.

पूती– *स्त्री.* गड्डा; लसणाचा

पून*–*पु.* पुण्य. –*वि.* १. पूर्ण. २. नष्ट.

पूनी–*स्त्री.* पेळू. [पौर्णिमा.

पूनो–न्यो*– *स्त्री.* पूर्णिमा;

पूयन–*पु.* पू; पू होणें; ' प्यूट्री-फिकेशन '.

पूर–*पु.* १. पूर्णत्व. २. भरण; भरावयाचा पदार्थ (पुरण इ०). ३. प्रवाह. –*वि.** पूर्ण; भरलेला.

पूरक–*वि.* पूर्ण करणारा.

पूरन*– *वि.* पूर्ण.–*पु.* उकडून वांटलेले वाटाणे, हरभऱ्याची डाळ इ०.–**परब***–*पु.*पूर्णिमा.–**पूरी**–*स्त्री.* मसाला भरलेली पुरी; पुरणपोळी. –**मासी**+– *स्त्री.* पौर्णिमा.

पूरना+– *क्रि.* *स.* १. पूर्ण करणें; भरणें. २. रांगोळी काढणें. –*क्रि.* अ. व्याप्त होणें; भरणें.

पूरब–*पु.* पूर्व (दिशा).–*अव्य.** पूर्वी; आधीं.

पूरबला*–*वि.* १. प्राचीन; जुना. २. पूर्वजन्मींचा.

पूरबिया+– *पु.* पूर्वेकडील देशाचा, प्रांताचा रहिवासी. २. पुरभैया.–*वि.* पूर्वेकडील.

पूरबी–*वि.* पूर्वेकडील; पौर्वात्य. – *स्त्री.*पूर्वी (राग).

पूरा– *वि.* १. पूर्ण; भरलेला. २. संपूर्ण; समस्त; सगळा. **मु०– उतरना**– योग्य प्रकारें साजरा होणें.–**पड़ना**–१. मावणें. २. पुरें पडणें. **गाँठका पूरा**–श्रीमंत. **बातका पूरा**–दृढनिश्चयी; पक्का; मजबूत.

पूरानीत भूमि– *स्त्री.* पा० ' जलोढ भूमि '.

पूरी– *स्त्री.* १. पुरी. २. मृदंग, ढोल वगैरेवर बसविलेला कातड्याचा तुकडा; पुडी.

पूर्ण–*वि.* भरलेला; पूर्ण.– **काम** –*वि.* ज्याच्या इच्छा पूर्ण झाल्या आहेत असा; संतुष्ट. –**कालिक**–*वि.* पूर्ण वेळ काम करणारा; 'फुल-टाइमर '. –**दूध**–*पु.* निर्भेळ दूध; ' होलमिल्क '.–**मासी**–*स्त्री.*पौर्णिमा.

पूर्णतया–*अव्य.* पूर्णपणें.

पूर्णाधिकार प्राप्त दूत–*पु.* स्वतःचा विवेक वापरण्याचा अधिकार असलेला राजदूत; ' मिनिस्टर प्लेनी–पोटेंशिअरी '.

पूर्णाधिवेशन–*पु.* सर्व सभासदांचें अधिवेशन; ' प्लीनरी सेशन '.

पूर्णिमा; **पूर्णमासी**– *स्त्री.* पौर्णिमा.

पूर्त–*वि.* १. पूर्ण केलेला. २. व्याप्त. –*पु.* विहिरी, तळीं, मंदिरें इ० बांधण्याचें धार्मिक कृत्य. –**विभाग**–*पु.* सार्वजनिक बांधकाम खातें; ' पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट '. –**संस्था**– *स्त्री.* धर्मादायसंस्था; धर्मार्थ कामें करणारी संस्था; ' चॅरिटेबिल इन्स्टिटयूशन '.

पूर्ति– *स्त्री.* १. पूर्ण करण्याची क्रिया. २. पुरस्कार. ३. पुरवठा; ' सप्लाय '.

पूर्त्यधिकारी–*पु.* पुरवठा अधिकारी; ' सप्लाय ऑफिसर '.

पूर्व–*पु.* १. पूर्वदिशा. २. पूर्वज. – *वि.* १. पूर्वेचा. २. पूर्वीचा; आधींचा; प्राचीन.– *अव्य.* पूर्वी; आधीं.-**कालिक क्रिया**–*स्त्री.* ऊन प्रत्ययांत धातुसाधित अव्यय (करके = करून). –**क्रयका अधिकार**–*पु.* संपत्ति खरीदण्याचा पहिला अधिकार; ' राइट ऑफ प्रीअँप्शन '. –**ज**–*पु.* पूर्वपुरुष; पूर्वज.–**ता**;– –**वर्तिता**; –**स्थानीयता**–*स्त्री.* अग्र-स्थान; प्राधान्य; ' प्रिसीडन्स '. –**तिथित**–*वि.* आधींची, पूर्वीची तारीख असलेला (करार इ०); 'ॲंटीडेटेड'.–**धारणा**–*स्त्री.* पूर्वग्रह; ' प्रेजूडिस '. –**धारणान्वित**; –**धारणायुक्त**–*वि.* पूर्वग्रहदूषित; ' प्रेजूडिस्ड '.–**पद**–*वि.* पूर्वगामी; ' अँटिसीडेंट '. –**प्लावनिक**–*वि.* महापुराच्या, प्रलयाच्या पूर्वीचें; ' अँटी डाइलूव्हियल '. –**सम्मोदन**–*पु.* आधीं घेतलेली मंजुरी; 'प्रीव्हियस सँक्शन. –**स्थितिस्थापन**–*पु.* स्थितिस्थापकत्वामुळें पूर्वस्थितीला येणें; ' रेस्टिटयूशन '.

पूर्ववत्–*अव्य.* पूर्वीप्रमाणें.– **करण**–*पु.* पूर्वीची स्थिति आणणें; ' रेस्टोरेशन '. [कडील.

पूर्वाई*–*वि.* पूर्व दिशेचा; पूर्वे-

पूर्वाधिकारी–*पु.* पूर्वाचा अधिकारी; ' प्रेडिसेसर '.

पूर्वानुमान–*पु.* भाकीत; अगाऊ अंदाज; ' फोरकास्ट '.

पूर्वानुमित निष्कर्ष–*पु.* पूर्वी केलेला अंदाज किंवा काढलेला निष्कर्ष; ' फोरगॉन कॉन्क्लूजन '.

पूर्वानुमोदन–*पु.* पूर्वसंमति.

पूर्वापराधी–*पु.* सराईत गुन्हेगार; 'हिस्ट्रीशीटर'. ['रिहर्सल'.

पूर्वाभिनय–*पु.* रंगीत तालीम;

पूर्वावधानता–*स्त्री.* सावधगिरी; ' प्रिकॉशन '.

पूर्वोदाहरण-*पु.*पूर्वीचा दाखला; शिरस्ता; ' प्रिसीडंट '.

पूर्वोपाय–*पु.* सावधगिरी; आधींपासून घेतलेली काळजी; ' प्रिकॉशन '.

पूर्वोत्तर–*वि.* ईशान्येचा; ईशान्येकडील.

पूला–*पु.* पेंढी.

पूस–*पु.* पौष महिना.

पृथक्–*अव्य.* स्वतंत्रपणें; अलगपणें.–*वि.* वेगळा; अलग.

पृथक्तावादी नीति–*स्त्री.* अलिप्ततावाद; ' आइसॉलेशनिझम '.

पृथग्वासन नीति– *स्त्री.* इतरांपासून वेगळें ठेवण्याचें धोरण; 'ॲपारथाइड पॉलिसी'.

पृष्ठ–*पु.* १. पाठ; मागील भाग. २. वरचा भाग. ३. पुस्तकाचें पान. **–पोषक**–*वि.* पाठीराखा; मददगार. **–भूमि**– *स्त्री.* पार्श्वभूमि. **–रक्षक युद्ध**– *पु.* मागें हटणाऱ्या सैन्याच्या पिछाडीचें संरक्षण करण्यासाठीं केलें जाणारें युद्ध; 'रियरगार्ड ॲक्शन'.**–लग्न**–*वि.* १. अनुयायी. २. पृष्ठबद्ध; 'डॉर्सिफिक्स्ड'.**–शीर्षक**–*पु.* पा० 'पताकाशीर्षक'. **–सज्ज**– *स्त्री.* वृत्तपत्राचें पान सजविणें; 'मेकअप'.

पृष्ठांकन – *पु.* नामांतर; स्वाक्षरी; बेचन; 'एन्डॉर्समेंट'.

पृष्ठांकित – *वि.* नामांतरित; हस्तांतरित; 'एंडॉर्स्ड'.

पृष्ठिका– *स्त्री.* पार्श्वभूमि.

पें –*स्त्री.* रडण्याचा, बाजा वाजविण्याचा वगैरे आवाज.

पेंग– *स्त्री.* झोका.**– मु० मारना** –झोपाळ्यावर झोका घेणें.

पेंच–*पु.* पा० 'पेच'.

पेंडुकी+– *स्त्री.* १. पारवा. २. सोनाराची फुंकणी.

पेंदा– *पु.* बूड; तळभाग.

पेंदी– *स्त्री.* १. बूड; तळ. २. गाजर किंवा मुळा यांचा बुडखा. **मु० (बिना) – का लोटा** – बिनबुडाचा; सारखी पगडी बदलणारा; ठाम मतें किंवा सिद्धांत नसणारा.

पेंशन – *स्त्री.* [इं.] पेन्शन; निवृत्तिवेतन.**–याफ़्ता** – *वि.* ज्याला निवृत्तिवेतन मिळत आहे असा.

पेउश-स-सी+– *स्त्री.* १. गायीम्हशीचा चीक. २. खरवस.

पेखक*–*पु.* प्रेक्षक; पाहाणारा.

पेखना*–*क्रि. स.* १. पाहाणें; अवलोकन करणें. २. पारख करणें.

पेच–*पु.* [*फा.*] १. पेंच; फिरकी. २. डावपेंच ३. कोडें; कूट प्रश्न. ४. विवंचना. ५. यंत्र. ६. कुस्तीचा डाव. ७. स्क्रू. ८. युक्ति; उपाय. ९. शिरपेंच; तुरा. **– कश**–*पु.* १. स्क्रूड्रायव्हर; २. बूच काढण्याचा स्क्रू.**–दार**–*वि.* फिरकीचा; पेंचदार. **– व ताब; – (चो) ताब**– *पु.* १. अढी; राग; द्वेष. २. अस्वस्थता.**–वान**–*पु.* १. हुक्क्याची लांब नळी. २. मोठा हुक्का.

पेचक –*स्त्री.* [*फा.*] सुताची गुंडी; रीळ.

पेचिश– *स्त्री.* [*फा.*] मुरडा; आंव झाल्यामुळें पोटांत उठणारी कळ. [लता; गुंतागुंत.

पेचीदगी–*स्त्री.* [*फा.*] जटि-

पेचीदा–ला–*वि.* [*फा.*] १. पेंचदार. २. बिकट; कठिण; गुंतागुंतीचा; अवघड. [(पुस्तकाचें).

पेज–*पु.* [इं.] पृष्ठ; पान

पेट–*पु.* १. पोट. २. गर्भ. ३. मन. ४. एखाद्या पोकळ वस्तूचा आंतील भाग.**–चोट्टी**–*स्त्री.* गरोदर असूनहि बाह्यतः तशी न दिसणारी स्त्री. **–नटा**–*पु.* पोटासाठीं नाचणारा.**–पोंछना**–*पु.* शेंडेफळ; शेवटचें मूल.–**पोसुवा**+–*पु.* फक्त आपल्या पोटाची काळजी करणारा; पोटार्थी.**–वाली** –*वि. स्त्री.* गरोदर. **मु०– काटना**– पोटाला चिमटा घेणें.**–का पानी न पचना**–गुप्त गोष्ट पोटांत न राहाणें. **–का हलका**–हलक्या मनाचा.**–की बात**–रहस्य.**–गिरना**–गर्भपात होणें. **–गिराना**–गर्भपात करणें.**–चलना**– जुलाब होणें.**–जलना**–अतिशय भूक लागणें.**–पालना**–कसाबसा जीवननिर्वाह करणें.**–फूलना**–एखादी गोष्ट जाणण्या–सांगण्यासाठीं अतिशय उत्सुक होणें. २. पोट फुगणें. **–मारकर मर जाना**–आत्महत्या करणें. **–में चूहे कूदना**–पोटांत कावळे ओरडणें; भयंकर भूक लागणें. **–में डालना**–गिळंकृत करणें. **–में दाढी होना**–लहानपणापासून चतुर असणें. **–रहना**–गरोदर असणें.

पेटक–*पु.* १. पेटारा. २. ढीग; समूह.

पेटा–*पु.* १. एखाद्या वस्तूचा तळ, आंतील भाग. २. नदीचें पात्र. ३. हिशेबाच्या वहींतील तपशिलाचा भाग.

पेटागि*– *स्त्री.* जठराग्नि; भूक.

पेटार्थी–र्थू– *वि.* पोटभरू; पोटार्थी.

पेटी– *स्त्री.* १. कमरपट्टा. २. धोपटी. ३. पट्टा; 'बेल्ट'. ४. दोंद. ५. लहान पेटी.

पेटू–*वि.* अधाशी.

पेठा–*पु.* १. कोहळा. २. कोहळ्याची वडी (मिठाई).

पेड़–*पु.* झाड; वृक्ष.

पेड़ा–*पु.* १. पेढा. २. मळलेल्या कणकीची गोळी; लाटी.

पेड़ी– *स्त्री.* १. झाडाचें खोड. २. धड; शरीर.

पेड़ू–*पु.* १.ओटीपोट. २.गर्भाशय.

पेन्हाना+–*क्रि. अ.* पान्हवणें; पान्हा फुटणें.

पेम*–*पु.* प्रेम; प्रीति.

पेरना–*क्रि. स.* १. चरकांत घालून पिळणें; तेल, रस काढणें; गाळणें. २. सतावणें; त्रास देणें. ३. एखाद्या कामाला वेळ लावणें.

पेरना*–*क्रि. स.* १. प्रेरणा देणें. २. पाठविणें.

पेलना–*क्रि. स.* १. प्रवृत्त करणें. २. अंगावर सोडणें. ३. आंत दाबणें;

घुसडणें. ४ धक्का देणे; ढकलणें. ५. जबरदस्ती करणें. **मु० डंड पेलना**–व्यायामासाठीं जोर काढणें.

पेवस–सी+ *स्त्री.* पा०'पेउसी'.

पेश–*अव्य.* [*फा.*] १.पुढें; समोर. २.आधीं; पूर्वीं. –*पु.* १. पुढचा भाग, बाजू. २. फारसींतील उकाराचें चिन्ह. **–कदमी**– *स्त्री.* १. पुढाकार; नेतृत्व. २. आक्रमण.– **कब्ज**– *स्त्री.* कटयार.–**कश**– *स्त्री.* १. नजराणा. २. सूचना; 'प्रपोझल'.– **कार**–*पु.* शिरस्तेदार; न्यायाधीशापुढें कागद ठेवणारा कारकून; मुतालिक. **–खेमा**–*पु.* १. सैन्याचें सामान; सरंजाम. २. सैन्याची आघाडी. **–गी**– *स्त्री.* उचल; तसलमात; कांही कामासाठीं अगाऊ दिलेली रक्कम. **–गोई**–*स्त्री.* भविष्यकथन; भाकीत. **–तर**–*अव्य.* पूर्वीं; अगोदर. **–बंदी**– *स्त्री.* पूर्वतयारी; अगोदर केलेला बंदोबस्त किंवा बचावाची युक्ति; दूरदर्शीपणा. **–राज**–*पु.* १. विगारी; दगड वाहाणारा मजूर. २. गवंडी. **–रौ**–*पु.* अग्रगामी; मार्गदर्शक. **मु०–आना**–१. पुढें येणें. २. व्यवहार करणें; वागणें.**–करना**– पुढें करणें; समोर आणणें. २. नजराणा देणें; भेट देणें. **–चलना; जाना**– अधिकार चालणें.**–पाना**– मात करणें.

पेशवा–*पु.* [*फा.*] १. पुढारी. २. पेशवा. **–ई**–*स्त्री.* १. पुढारीपणा. २. सामोरें जाणें. ३. पेशव्यांचा किताब. ४. पेशव्यांचा शासनकाल.

पेशवाज़– *स्त्री.* [*फा.*] कलावंतिणीचा झगा, घागरा.

पेशा–*पु.* [*फा.*] धंदा; व्यवसाय. **–वर**–*पु.* व्यापारी. *वि.* व्यावसायिक; धंदेवाईक. **मु०–कमाना, करना**–वेश्यावृत्ति करणें.

पेशानी– *स्त्री.* [*फा.*] १ कपाळ. २ भाग्य; नशीब. **मु०–पर बल आना, पड़ना**–कपाळाला आंठ्या पडणें.

पेशाब–*पु.* [*फा.*] मूत्र; लघवी. **–ख़ाना; –घर**–*पु.* मुतारी.

पेशि– *स्त्री.* १ वज्र. २ म्यान. ३ गर्भाची वार. ४ अंडें.

पेशी– *स्त्री.* [*फा.*] १.खटल्याची सुनावणी. २. पुढें मांडणें; ठेवणें.

पेशीनगोई–*स्त्री.* [*फा.*] भाकीत सांगणें; भविष्यकथन.

पेश्तर–*अव्य.* [*फा.*] पूर्वीं अगोदर; प्रथम. ['पेशावर'.

पेशोवर–*वि.* [*फा.*] पा०

पेषण–*पु.* पीठ; चूर्ण; 'पल्व्हरायझेशन'.

पैंछर*–*अव्य.* मागोमाग.

पैंजनिया+; **पैंजनी**–*स्त्री.* १. पैंजण. २. पायांतील पोकळ वाळा.

पैंठ– *स्त्री.* १. बाजारपेठ. २. दुकान. ३. बाजाराचा दिवस. ४. दुसऱ्यांदा पाठविलेली हुंडी.

पैंड़ा– *पु.* १. मार्ग; रस्ता. २. तबेला. ३. प्रणाली; पद्धत. **मु० पैंड़े पड़ना**– हात धुवून पाठीमागें लागणें. [फासा; डाव.

पैंत*– *स्त्री.* १. पैज; शर्यत. २.

पैंतरा– *पु.* पवित्रा; 'पोझ'.– **(रे)बाज़ी**– *स्त्री.* डावपेंच. [४५.

पैंतालीस – *वि.* पंचेचाळीस;

पैंती– *स्त्री.* पवित्रक; पावित्र्याच्या दृष्टीनें बोटांत घातली जाणारी तांबें इ० ची अंगठी.

पैंतीस– *वि.* पस्तीस; ३५.

पैंयाँ*– *स्त्री.* पाय; चरण.

पैंसठ– *वि.* पासष्ट; ६५.

पै*– *अव्य.* १. पण; परंतु. २. अवश्य; जरूर, ३. नंतर. **(जो पै**– *अव्य.* जर. **तो पै**– *अव्य.* तर मग; अशा स्थितींत). ४. जवळ; समीप –*प्रत्य.* १. तृतीयेचा प्रत्यय. २. वर; वरतीं. – *स्त्री.* दोष; उणीव. [चित्र.

पैकर–*पु.* [*फा.*] १ शरीर. २.

पैकरमा*– *स्त्री.* प्रदक्षिणा.

पैकार–*पु.* [*फा.*] लहान व्यापारी; किरकोळ मालाचा व्यापारी. [शौचकूप.

पैख़ाना–*पु.* [*फा.*] संडास;

पैग़ंबर–*पु.* [*फा.*] प्रेषित; ईश्वराचा संदेश पोंचविणारा.

पैग*–*पु.* पाऊल.

पैग़ाम–*पु.* [*फा.*] संदेश; निरोप. **–बर**–*पु.* १. निरोप्या. २. पैगंबर.

पैज*– *स्त्री.* पण; पैज; शर्यत.

पैजनिया;+ **पैजनी**– *स्त्री.* पायांतील पोकळ वाळा.

पैजामा–*पु.* [*फा.*] विजार.

पैज़ार– *स्त्री.* [*फा.*] जोडा; पादत्राण. **जूती पैज़ार**– *स्त्री.* जोडाजोडी; जोड्यानें केलेली मारामारी.

पैठ– *स्त्री.* प्रवेश; शिरकाव.

पैठना–*क्रि. अ.* शिरणें; प्रवेश करणें. [प्रवेश करविणें.

पैठाना–*क्रि. अ.* घेऊन जाणें;

पैठार*–*पु.* १ प्रवेश. २ फाटक; प्रवेशद्वार.

पैड़ी– *स्त्री.* १. पायरी; वर चढतांना पाय ठेवण्यासाठीं केलेली पायरी. २. मोटेचा रस्ता; धाव. ३. थारोळें.

पैतरा–*पु.* १. पवित्रा; उभें राहाण्याची विशिष्ट स्थिति. २. पावलाचें चिह्न. **–(रे)बाज़ी**–*स्त्री.* चलाखी; डाव. **मु०– बदलना**– पवित्रा बदलणें. [कडील बाजू.

पैताना–*पु.* पायथें; पाया-

पैत्रिक–*पु.* १. कु प्रमुखा-

संबंधींचा; मूळ पुरुषासंबंधींचा; 'पेट्रिआर्कल'. २. पिढीजात; वंशपरंपरागत; आनुवंशिक; 'हेरिडेटरी'. [१. क्रमवार २. लागोपाठ.

पै–दर–पै– *अव्य.* [*फा.*]

पैदल–*वि.* [*फा.*] पायीं चालणारा. –*पु.* १. पायदळांतील शिपाई. २ प्यादें. –*अव्य.* पायीं; चालत.

पैदा–*वि.* [*फा.*] १. उत्पन्न झालेला. २. प्राप्त; मिळालेला; मिळविलेला. **–वार** *स्त्री.* पीक; शेतांतील उत्पन्न; उत्पादन. **मु०** **–होना**–उद्भवणें; उत्पन्न होणें.

पैदाइश– *स्त्री.* [*फा.*] जन्म उपज; उत्पत्ति.

पैदाइशी–*वि.* १ जन्मतः; जन्मसिद्ध; जन्मापासूनचा. २. स्वाभाविक.

पैना–*वि.* तीक्ष्ण धारेचा. –*पु.* बैल हांकण्याची लहान काठी.

पैनाना–*क्रि. स.* धार लावणें; तीक्ष्ण करणें. [माप.

पैमाइश– *स्त्री.* [*फा.*] मोजणी;

पैमाना–*पु.* [*फा.*] माप; मापण्याचें साधन.

पैमाल*–*वि.* [*फा.*] पददलित; पायाखालीं चिरडलेला.

पैयाँ*– *स्त्री.* पाय; पाऊल.

पैया*–*पु.* १. निःसत्त्व धान्य. २. हीनदीन व्यक्ति.

पैर–*पु.* १. पाय. २. पाऊल. ३. पदचिह्न. ४. खळें; कापणीनंतर शेतांत धान्य रचून ठेवतात ती जागा. **मु०**साठीं पा० 'पाँव'.

पैरना–*क्रि. अ.* पोहणें.

पैरवी– *स्त्री.* [*फा.*] १. कोर्टांत खटल्याची मांडणी; काम चालविणें; समर्थन. २. अनुगमन; मागोमाग जाणें. ३. शिफारस.**–कार**; **पैरोकार**–*पु.* खटल्याची मांडणी करणारा; बाजू मांडणारा; काम चालविणारा वकील.

पैरा–*पु.* १. पायगुण. २. पायांत घालण्याचें कडें. ३. तात्पुरता जिना; खोबण. ४. ठेवलेलें पाऊल; आगमन. [*इं.*] परिच्छेद; 'पॅरिग्राफ'. [कला.

पैराई– *स्त्री.* पोहणें; पोहण्याची

पैराक–*पु.* पोहणारा.

पैराव–*पु.* डोह; अथांग पाणी; पोहून पलीकडे जातां येण्यासारखें नदींतील स्थान.

पैराहन–*पु.* [*फा.*] १. पैरण; लांब सदरा. २. ९ बटनांचा लांब कोट.

पैरो–*पु.* [*फा.*] अनुयायी; शिष्य.**–कार**–*पु.* पा० 'पैरवीकार'.

पैवंद–*पु.* [*फा.*] १. ठिगळ. २. लिखाणाची पुरवणी. ३. झाडाचें कलम.

पैवंदी–*वि.* [*फा.*] १. कलम लावून तयार झालेला; कलमी. २. जारज; अकुलीन.–*पु.* सप्ताळू; एक प्रकारचें फळ.

पैवस्त–*वि.* [*फा.*] व्यापणारा; मिळून गेलेला; व्याप्त.

पैवस्ता–*वि.* [*फा.*] १. जोडला गेलेला; संबद्ध. २. कायमचा.

पैशाचिक–*वि.* पिशाचासंबंधींचा; भुताचा; भयंकर; राक्षसी.

पैसंगी*– *स्त्री.* भविष्यवाणी.

पैसरा–*पु.* १. बखेडा; झंझट. २. प्रयत्न.

पैसा–*पु.* १. पैसा. २. संपत्ति. –(**से**)**वाला**– वि. पु. १. श्रीमंत. २. सराफ. [मार्ग.

पैसार+– प्रवेश; घुसण्याचा

पैसेंजर–*पु.* [*इं.*] उतारू. **–गाड़ी**; **–ट्रेन**– *स्त्री.* उतारूंची वाहतूक करणारी रेल्वेची गाडी.

पोंकना+–*क्रि. स.* १. जुलाब होणें. २. अत्यंत भयभीत होणें; घाबरणें. –*पु.* जनावरांना हगवण लागते तो रोग. [मोठें फुलपाखरू.

पोंका–*पु.* १. पाकोळी. २.

पोंगा–*पु.* १. बांबूची नळी. २. टिनचें नळकांडें (कागदपत्र ठेवण्याचें).**–पंथी**– *स्त्री.* १. मूर्खतापूर्ण कार्य. २. ढोंग.– *वि.* १. मूर्ख; बावळट. २. ढोंगी.

पोंछन–*पु.* एखादी वस्तु पुसल्यानंतर निघणारा भाग.

पोंछना–*क्रि. स.* १. पुसणें; कोरडें करणें. २. झटकणें; साफ करणें.

पोंछना–*पु.*; **पोंछनी**– *स्त्री.* १. पुसावयाचें फडकें. २. अंग पुसण्याचा टॉवेल; रुमाल; हात पुसणें.

पोआ–*पु.* सापाचें पिलूं.

पोई– *स्त्री.* एक पावसाळी पालेभाजी. [करणें.

पोखना*–*क्रि. स.* पालनपोषण

पोखर–रा–*पु.* तळें; लहान तलाव. [क्षुद्र. २. अशक्त; क्षीण.

पोच–*वि.* [*फा.*] १. तुच्छ;

पोची–* *स्त्री.* नीचता; हलकटपणा.

पोट– *स्त्री.* १. गाठोडें; मोटकुळी; 'पार्सल'. २. रास; ढीग.

पोटना*–*क्रि. स.* १. गोळा करणें; जमा करणें. २. वश करणें; भुरळ पाडणें.

पोटली– *स्त्री.* पुरचुंडी; गाठोडें.

पोटा–*पु.* १. पोटाची पिशवी; कोथळा. २. पापणी. ३. पेरें. ४. पंख न फुटलेलें पक्ष्याचें पिलूं. ५. शेंबूड.

पोढ़ा–*पु.* १. धष्टपुष्ट; दृढ; मजबूत. २. कठिण; कठोर. **मु० जी– करना–** मन दगडासारखें

घट्ट करणें.

पोढ़ाई– *स्त्री*. दृढता; सामर्थ्य.

पोढ़ाना+–*क्रि. स.* दृढ, मजबूत, पुष्ट होणें. –*क्रि. स.* दृढ, पुष्ट बनविणें.

पोत–*पु.* १. पक्ष्याचें अगर गुराचें पिलूं. २ रोपटें. ३. नाव; जहाज. ४. पोत; वीण (कापडाची). ५. घराचा पाया. ६. प्रवृत्ति; स्वभाव. –*स्त्री*. कांचमणि. **–घाट**–*पु.* जहाजांचा धक्का; 'पीर'. **–ध्वज**–जहाजावरचा परिचायक ध्वज; 'एनसाइन'. **–निर्माण उद्योग**–*पु.* जहाजें बांधण्याचा व्यवसाय; 'शिपबिल्डिंग इंडस्ट्री'. **–संतरण**–*पु.* नवीन जहाज पाण्यात सोडणें; जलावतरण; 'लाँचिंग ए शिप'.

पोत–*पु.* [*फा.*] जमिनीचा महसूल.– **दार** –*पु.*– ज्याच्याजवळ जमीन महसूल ठेवला जातो असा खजिनदार.

पोतड़ा–*पु.* दुपटें; लहान मुलांच्या ढुंगणाखालीं घालावयाचें कापड. **मु०–(ड़ों)के अमीर या रईस**–खानदानी श्रीमंत.

पोतना–*क्रि. स.* १. लिंपणें; सारवणें. २. चोपडणें; माखणें. –*पु.* पोतेरें.

पोता–*पु.* १. नातू; मुलाचा मुलगा. २. अंडकोष; वृषण. ३. जमिनीचा महसूल. ४. पोतेरें. ५. रंग देण्याचा कुंचा.

पोताधिरोध–*पु.* जहाजांवरील निर्बंध: 'एंबार्गो'.

पोताई–*स्त्री*. पा० 'पुताई'.

पोतिया–*पु.* १. चंची. २. पंचा.

पोती–*स्त्री*. १. नात; मुलाची मुलगी. २. भांडें जळूं नये म्हणून त्याच्या बुडाला लावली जाणारी माती.

पोथा–*पु.* १. मोठी पोथी (उपरोधात्मक). २. कागदाचा मोठा गठ्ठा; भारूड.

पोथी–*स्त्री*. पोथी; पुस्तक.

पोदना–*पु.* बुटका, गिड्डा माणूस.

पोना–*क्रि. स.* १. थापटणें किंवा बनविणें (भाकरी). २. गुंफणें; ओवणें.

पोपतंत्र–*पु.* [*इं.*] १. पोपची सत्ता; 'पॅपसी'. २. पोपशाही; 'पोपर्की'.

पोपला–*वि.* १.बोथरा; तोंडाचें बोळकें झालेला. २. चेंपलेला; चिपटा झालेला.

पोपलाना–*क्रि. अ.* तोंडाचें बोळकें होणें; दांत पडून बोथरें होणें

पोपली– *स्त्री*. पुंगी; पिंगाणी; आंब्याची कोय घासून बनविलेली पिपाणी. [वृक्षाचें रोप. ३. मूल.

पोया–*पु.* १. सापाचें पिलूं. २.

पोर– *स्त्री*. १. पेरें; कांडें. २. जोड; सांधा; दोन पेऱ्यांतील सांधा. ३. पाठीचा कणा.

पोल– *स्त्री*. १. पोकळी; अवकाश. २.पोकळपणा. **मु०–खुलना**–रहस्य फुटणें; वेंड फुटणें.

पोल–*पु.* १. फाटक; प्रवेशद्वार. २. अंगण.

पोला–*वि.* १. पोकळ. २. निःसत्त्व; कुचकामाचा.–*पु.*+पोळा (सण).

पोश–*पु.* [*फा.*] १. परिधान करण्याची वस्तु; कपडा. २. झांकणारा; परिधान करणारा [कपडे.

पोशाक– *स्त्री*. [*फा.*] पोषाख;

पोशिश– *स्त्री*. [*फा.*] पोषाख; पेहराव. [रहस्य.

पोशीदगी– *स्त्री*. [*फा.*] गौप्य;

पोशीदा–*वि*. [*फा.*] गुप्त; लपलेला. ['व्हिटॅमिन'.

पोषक तत्त्व–*पु.* जीवनसत्त्व;

पोषण–*पु* पोसणें; वाढविणें.

पोषिका– *स्त्री*. अन्ननलिका; 'एलिमेंटरी कॅनॉल'.

पोसना–*क्रि. स.* १. पोसणें; पालन करणें. २. झांकणें; लपविणें

पोस्त– *स्त्री*. [*फा.*] १. कातडें. २. टरफल. ३. अफूचें झाड.

पोस्ता–*पु.* [*फा.*] अफूचें झाड. **–(स्ते)का दाना**–*पु.* खसखस.

पोस्ती–*पु.* [*फा.*] १. अफूचें फळ वांटून नशा करणारा माणूस; अफूबाज. २. आळशी मनुष्य. ३. तळाशीं जड असणारी व खालीं पडतांच उठणारी बाहुली. [कोट.

पोस्तीन–*पु.* [*फा.*] फरदार

पोहना–*क्रि. स.* १. ओंवणें; गुंफणें. २. टोंचणें; भोंक पाडणें. ३. लिंपणें. ४. खुपसणें; ठोसणें. ५. वांटणें; घोटणें.

पौंडपावना–*पु.* पौंडांतील गंगाजळी; 'स्टर्लिंग बॅलन्सेस'.

पौंड़ा–ढ़ा–*पु.* जाड ऊंस; पुंड्या ऊंस.

पौ–*स्त्री*. सकाळचा प्रकाश; किरण; ज्योति. **मु०–फटना**–दिवस उगवणें; उजाडणें.

पौ– *स्त्री*. पाणपोई.

पौ– *स्त्री*. दान (सोंगट्यांचें). **मु०–बारह होना**–१. अनुकूल डाव पडणें. २. फायदाच फायदा होणें; चंगळ होणें.

पौआ–*पु.* १. पावशेर. २. पावशेराचें भांडें.

पौढ़ना–*क्रि. अ.* १. निजणें; पहुडणें; आडवें होणें. २. डोलणें; झोंके घेणें

पौढ़ाना–*क्रि. स.* १. निजविणें;

थोपटणें. २. झोंका देणें.

पौतिक–*वि.* पू झालेला; सडलेला; 'सेप्टिक'.

पौद– *स्त्री.* रोप; रोपटें. मु० **नयी पौद**–नवी पिढी.

पौदा–धा–*पु.* १. रोप; रोपटें. २. कोंवळें झाड; क्षुप.

पौन–*पु.* १. पवन; वारा. २. प्राण; जीव. ३. भूतप्रेत. –*वि.* पाऊण; तीन चतुर्थांश भाग.

पौना–*पु.* १. पाऊणकीचा पाढा. २. पळी; झारा.

पौनी– *स्त्री.* वलुतेदार; लग्नकार्यांत इनाम घेणारे न्हावी, धोबी इ.

पौर– *स्त्री.* १. देवडी. २. दार. ३. पायरी. ४. खडावा; पादुका. –*वि.* शहरी.

पौरा+–*पु.* १. आगमन. २. पाऊल. ३. पायगुण. [खडावा.

पौरि–री– *स्त्री.* १. देवडी. २.

पौरुष–*पु.* १. पुरुषत्व; पुरुषार्थ. २. सामर्थ्य; पराक्रम.

पौला+–*पु.* खुंटीच्या ऐवजीं दोरी असलेल्या खडावा.

पौली– *स्त्री.* पा० 'पौरी'.

पौवा–*पु.* पा० 'पौआ'.

पौष्टिक–*वि.* पुष्टिकारक; सामर्थ्यकारी; वलवर्धक.

पौसरा–ला–*पु.* पाणपोई.

पौहारी–*पु.* दुग्धाहारी.

प्याऊ–*पु.* पाणपोई.

प्याज़–*पु.* *स्त्री.* [*फा.*] कांदा.

प्याज़ी–*वि.* [*फा.*] फिकट गुलाबी (रंग).

प्यादा–*पु.* [*फा.*] १. पायदळांतील शिपाई. २. दूत. ३. प्यादें.

प्यार–*पु.* प्रेम; स्नेह.

प्यारा–*वि.* प्रिय; आवडता.

प्याला–*पु.* [*फा.*] पेला.

प्यास– *स्त्री.* १. पिपासा; तहान. २. तीव्र इच्छा; कामना.

प्यासा–*वि.* तहानलेला.

प्यो*–*पु.* पति; भर्ता; स्वामी.

प्योसर–*पु.* १. गायीचा किंवा म्हशीचा चीक. २. खरवस.

प्योसार*–*पु.* माहेर.

प्यौर*–*पु.* प्रियतम; पति.

प्रकटना*–*क्रि. अ.* प्रकट होणें.

प्रकथन–*पु.* प्रतिज्ञापूर्वक केलेलें विधान; 'अॅव्हमेंट'.–**करना**–*क्रि. स.* प्रतिज्ञेनें सांगणें; घोषित करणें; 'अॅव्हर'.

प्रकांड–*वि.* मोठा; विस्तृत.

प्रकाश–*पु.* प्रकाश; उजेड. –**पीठ**–*पु.* 'बेंच ऑप्टिकल'. –**प्रक्षेपक**–*पु.* प्रकाशझोत; 'सर्चलाइट'. –**स्तंभ**–*पु.* दीपस्तंभ; 'लाइट हाउस'.

प्रकाशनाधिकार–*पु.* प्रकाशनाचे हक्क; 'कॉपी राइट'.

प्रकाश्य–*वि.* प्रकट; उघड.

प्रकासना*–*क्रि. वि.* प्रकाशमान् होणें; प्रकाशित होणें.

प्रकीर्ण–*वि.* १. विस्तृत; पसरलेला; विखुरलेला. २. फुटकळ. –**लेखा**–*पु.* संकीर्ण खातें; किरकोळ खातें; 'मिसेलेनियस अकाउंट'.

प्रकृति– *स्त्री.* १. निसर्ग. २. स्वभाव. –**स्थ**–*वि.* विकाररहित; शांत. [२. प्रकोप.

प्रकोप–*पु.* १. कंप; हुडहुडी.

प्रकोष्ठ–*पु.* १. मोठें अंगण. २. दालन. ३. मूख्य दरवाज्याजवळची खोली. ४. हाताचें मनगट. ५. कायदेमंडळांतील सभासद जेथें वसतात व गप्पागोष्टी करतात असें कायदेमंडळाच्या वाहेरचें स्थान; 'लॉबी'. –**वार्ता**– *स्त्री.* अशा ठिकाणीं होणारें बोलणें; 'लॉबी-टॉक'. [२. प्रक्रिया; 'प्रोसेस'.

प्रक्रम–*पु.* १. टप्पा; 'स्टेज'.

प्रक्रिया–*स्त्री.* प्रक्रिया; 'प्रोसेस'.

प्रक्षालनगृह–*पु.* मोरी; 'लॅव्हेटरी'.

प्रक्षिप्त–*वि.* फेंकलेलें; 'प्रॉजेक्टेड'. [पक; 'प्रोजेक्टर'.

प्रक्षेपी–*पु.* प्रकाशकिरणप्रक्षे-

प्रख्यापन–*पु.* प्रसिद्धीकरण; 'प्रॉमल्गेशन'.

प्रख्यापित–*वि.* जाहीर केलेला; प्रसिद्ध केलेला 'प्रोमल्गेटेड'.

प्रगट–*वि.* प्रकट; जाहीर; व्यक्त. –*अव्य.* जाहीरपणें.

प्रगटना*–*क्रि. अ.* प्रकट होणें; जन्म, अवतार घेणें.

प्रगति– *स्त्री.* प्रगति; पुढें जाणें. –**रोध**–*पु.* प्रगतींतील अडथळा; 'सेटबॅक'. –**वाद**–*पु.* पुरोगामित्व; 'प्रोग्रेसिव्हिझम्'. –**शील**–*वि.* पुरोगामी. [प्रज्वलित करणें.

प्रगासना*–*क्रि. स.* प्रकाशित,

प्रगुणता अर्गल–*पु.* 'एफीशियन्सी बार'. ['अनाउन्सर'.

प्रघोषक–*पु.* घोषणा करणारा;

प्रचार– *पु.* प्रचार; प्रसार. –**कार्य**–*पु.* प्रचार; 'प्रॉपगँडा'.

प्रचुर–*वि.* पुष्कळ; अधिक; खूप.

प्रछेद*–*पु.* घाम.

प्रजंत*–*अव्य.* पर्यंत.

प्रजनक–*पु.* पूर्वज; 'प्रॉजेनिटर'.

प्रजनन–*पु.* प्रजोत्पत्ति; 'ब्रीडिंग'. –**केंद्र**–*पु.* प्रजोत्पत्तिकेंद्र; 'ब्रीडिंग-स्टेशन'.

प्रजरना*–*क्रि. अ.* खूप जळणें.

प्रजा–*स्त्री.* १. संतति. २. प्रजा; जनता.–**क्षोभ**–*पु.* राजसत्तेविरुद्ध माजलेला प्रजेंतील क्षोभ; बंडाची भावना; 'इनसर्जन्सी'.–**तंत्र**– *स्त्री.*

लोकसत्ता; लोकशाही. **–तंत्रवाद**–*पु.* लोकशाही.

प्रजातिगत भेदभाव–वांशिक भेदभाव; 'रेशियल डिस्क्रिमिनेशन'.

प्रजातिसंहार–*पु.* वंशनिःपात; वंशच्छेद; 'जेनोसाइड'.

प्रज्ञापक–*पु.* भित्तिपत्रक; 'पोस्टर'. [मेशन'.

प्रज्ञापन–*पु.* पूर्वसूचना; 'इंटि-

प्रज्वलन–*पु.* जळणें; आग लागणें; पेटणें; 'इग्निशन'.

प्रज्वलनांक–*पु.* ज्वलनबिंदु; 'इग्निशन टेंपरेचर'.

प्रण–*पु.* पण; प्रतिज्ञा.

प्रणयन–*पु.* १. घेऊन जाणें. २. लिहिणें; रचना.

प्रणाम–*पु.* नमस्कार.

प्रणाली–*स्त्री.* १. परंपरा; प्रथा. २. रीत; पद्धत.

प्रणिधि–*पु.* हेर; 'सीक्रेट एजंट'.

प्रणोदित–*वि.* प्रेरित; प्रेरणा देण्यांत आलेला.

प्रतग्याँ*– *स्त्री.* प्रतिज्ञा.

प्रतखि*– *वि.* प्रत्यक्ष.

प्रताप–*पु.* १. तेज. २. ऐश्वर्य. ३. पराक्रम.

प्रतारणा– *स्त्री.* फसवणूक.

प्रतिकर–*पु.* नुकसानभरपाई; 'कॉम्पेन्सेशन'. ['रिकॉइल'.

प्रतिकुंचन–*पु.* उलट; माघार;

प्रतिक्रिया– *स्त्री.* प्रतिक्रिया; 'रिॲक्शन'. **–वादी**–*पु.* प्रतिगामी; 'रिॲक्शनरी'.

प्रतिक्रियात्मक सहयोग–*पु.* प्रतियोगी सहकारिता: 'रिस्पॉन्सिव्ह को-ऑपरेशन'.

प्रतिक्षेपक–*पु.* प्रकाशपरावर्तक; 'रिफ्लेक्टर'. [मेंट'.

प्रतिग्रहण–*पु.* जप्ती; 'ॲटॅच-

प्रतिग्राहक–*पु.* वादग्रस्त मालमत्तेची व्यवस्था पाहाणारा अधिकारी; 'रिसीव्हर'.

प्रतिग्या*– *स्त्री.* प्रतिज्ञा.

प्रतिच्छाया– *स्त्री.* प्रतिबिंब.

प्रतिच्छेद–*पु.* १. विरोध. २. छेदन; छेद; 'इंटरसेक्शन'.

प्रतिज्ञाती–*पु.* वचन घेणारा; 'प्रॉमिसी'.

प्रतिज्ञान–*पु.* सत्याला स्मरून करावयाची प्रतिज्ञा; 'ॲफर्मेशन'.

प्रतिज्ञापत्र–*पु.* शिक्कामोर्तब केलेला करारनामा; 'कव्हिनंट' **–मुद्रा**– *स्त्री.* वचनपत्र; 'प्रॉमिसरी नोट'.

प्रतिदान–*पु.* १. दानाची परत फेड. २.मोबदला. ३.देवाण घेवाण.

प्रतिद्वंद्वी–*पु.* विरोधी; शत्रु.–*वि.* प्रतिपक्षी. [होणें; 'इकोइंग'.

प्रतिध्वनन–*पु.* प्रतिध्वनि उत्पन्न

प्रतिनिधि–*पु.* १. मुखत्यार; प्रतिनिधि. २. जामीन. **–पत्र**–*पु.* मुखत्यारपत्र; 'पॉवर ऑफ ॲटर्नी'.

प्रतिनिनाद–*पु.* प्रतिध्वनि; परावर्तन; 'रिव्हर्बरेशन'.

प्रतिनियुक्त–*वि.* प्रतिनिधि म्हणून पाठविलेला; नेमलेला; 'डेप्यूटेड'.

प्रतियुक्ति– *स्त्री.* नेमणूक; तात्पुरती नियुक्ति; 'डेप्युटेशन'.

प्रतिपत्रक–*पु.* दप्तरीं ठेवलेला चेक, पावती वगैरेचा दुसरा भाग; स्थळप्रत; 'काउंटर फॉइल'.

प्रतिपत्री–*पु.* दुसऱ्याबद्दल मत देण्याचें अधिकारपत्र; मुखत्यारामार्फत दिलेलें मत; प्रतिनिधित्व; 'प्रॉक्सी'.

प्रतिपदबिक्रीकर–*पु.* बहुमुखी विक्रीकर; 'मल्टिपल सेल्स टॅक्स'.

प्रतिपरिषद्विपत्र–*पु.* उलटचा हुंडचा; 'रिव्हर्स काउन्सिल बिल'.

प्रतिपरीक्षण–*पु.* उलट तपासणी; 'क्रॉस एक्झामिनेशन'.

प्रतिपर्ण–*पु.* पा० प्रतिपत्रक.

प्रतिपार– ल*– *पु.* १. प्रतिपाळ; पालन-पोषण. २. पालनपोषण करणारा.

प्रतिपारना*–*क्रि.स.* प्रतिपाळ; पालन-पोषण; सांभाळ करणें.

प्रतिपालक अधिकरण–*पु.* अज्ञानपालक खातें; 'कोर्ट ऑफ वॉर्ड्स'.

प्रतिपालित–*वि.* पाळलेला; बाळगलेला. [बदला; 'रिप्राइझल'.

प्रतिपीडन–*पु.* परत फेड; सूड;

प्रतिपुरुष–*पु.* पा० 'प्रतिपत्री'. **–पत्र**–*पु.* अधिकारपत्र; 'प्रॉक्सी'.

प्रतिप्रेषण करना–*क्रि. स.* अभिप्राय, माहिती इ० साठीं पाठविणें; 'रिफर'.

प्रतिफलक–*पु.* प्रकाशपरावर्तक; 'रिफ्लेक्टर'.

प्रतिबंध–*पु.* १. मनाई हुकूम; 'एम्बार्गो'. २. बंधन; अट; 'प्रोव्हाइझो'.

प्रतिबाधित–*वि.* प्रतिबंधित; आधींच अडथळा आणलेला; 'प्रिक्लूडेड'.

प्रतिबिंबवाद–*पु.* जीव हें ईश्वराचें प्रतिबिंब आहे असें मानणारा सिद्धांत; गूढवाद.

प्रतिभाव्य–*वि.* जामीन घेऊन सोडण्याजोगा; 'बेलेबल'.

प्रतिभू–*पु.* जामीन; 'शुअर्टी'.

प्रतिभूति– *स्त्री.* १. जामीन; 'बेल'. २. जातमुचलका; तारण; 'सिक्युरिटी'. ३. खात्री; हमी; 'गॅरंटी'. [भाव्य'.

प्रतिभूमोच्य–*वि.* पा० 'प्रति-

प्रतिमान–*पु.* १. प्रतिमा; प्रतिबिंब. २. मापदंड; मानदंड;

'स्टँडर्ड'. [२. विरोध.

प्रतियोगिता–*स्त्री.* १. चढाओढ.

प्रतियोगी–*पु.* १. विरोधी; शत्रु. २. हिस्सेदार.

प्रतिरक्षा–*स्त्री.* संरक्षण; बचाव; 'डिफेन्स'. **–व्यय**–*पु.* संरक्षण खर्च. [मेन'.

प्रतिरूप–*पु.* नमुना; 'स्पेसि-

प्रतिलब्धि–*स्त्री.* वसुली; 'रिकव्हरी'. ['कॉपी'.

प्रतिलिपि–*स्त्री.* नक्कल;

प्रतिलिपिक–*पु.* नकलाकार; प्रतिलिपि करणारा; 'कॉपीइस्ट'.

प्रतिलिपित–*पु.* नक्कल केलेलें; 'कॉपीड'. [लिपिक'.

प्रतिलेखक–*पु.* पा० 'प्रति-

प्रतिलेखन–*पु.* नक्कल करणें; उतारा घेणें; 'ट्रान्स्क्रिप्शन'.

प्रतिलोम–*वि.* उलटा; उफराटा; व्यस्त; 'इन्व्हर्स'. **–विवाह**–*पु.* उच्च वर्णीय वधू व कनिष्ठ वर्णीय वर यांचा विवाह.

प्रतिलोमीकरण–*पु.* विपर्यास; व्युत्क्रम; 'इन्व्हर्शन'.

प्रतिवर्ती–*वि.* मृत्यूनंतर वारसाला मिळणारा; 'रिव्हर्शनरी'. –अधिलाभांश–*पु.* 'रिव्हर्शनरी बोनस'.

प्रतिवाद–*पु.* १. खंडन; विरोध. २. वादविवाद. ३. लढत; स्पर्धा; 'काँटेस्ट'. ['रिपोर्ट'.

प्रतिवेदन–*पु.* अहवाल;

प्रतिव्यक्ति कर–*पु.* दर डोई कर; 'कॅपिटेशन टॅक्स'.

प्रतिशत–दर शेकडा; 'परसेंट'.

प्रतिशतता–*स्त्री.* शेंकडेवारी; 'पर्सेंटेज'.

प्रतिशोध–*पु.* सूड; बदला.

प्रतिश्रुतिपत्र–*पु.* पा० 'प्रतिज्ञापत्र'.

प्रतिषेध–*पु.* १. निषेध; मनाई. २. खंडन. ३. किल्ल्याचें फाटक. **–लेख**–*पु.* वरिष्ठ न्यायालयाचा मनाई हुकूम. 'रिट ऑफ प्रोहिबिशन'.

प्रतिषेधाधिकार–*पु.* नकाराधिकार; 'पॉवर ऑफ व्हीटो'.

प्रतिष्ठान–*पु.* १. आधार; स्थान. २. संस्था; संघटना. **–पत्र**–*पु.* संस्थेचें उद्देशपत्रक; 'मेमोरँडम ऑफ असोसियेशन'.

प्रतिसंहरण–*पु.* रद्द करणें; 'रिव्होकेशन'.

प्रतिसचिव–*पु.* उपसचिव; 'डेप्युटी सेक्रेटरी'.

प्रतिसरकार–*स्त्री.* प्रति सरकार; 'पॅरलल गव्हर्नमेंट'. ['सिमेट्री'.

प्रतिसाम्य–*पु.* प्रमाणबद्धता;

प्रतिसारण–*पु.* १. दूर सारणें. २. जखमेवर मलमपट्टी करणें; 'ड्रेस'; 'ड्रेसिंग'.

प्रतिसारित–*वि.* मलमपट्टी केलेला; 'ड्रेस्ड'.

प्रतिस्थापन–*पु.* ऐवजी, बदलीं ठेवणें; 'सब्स्टिटयूशन'.

प्रतिस्थापित–*वि.* बदली; 'सब्स्टिटयूट'.

प्रतिहस्ताक्षरित–*वि.* बरोबर असल्याबद्दल दुसऱ्यानें सही केलेला; 'काउंटरसाइंड'.

प्रतिहस्तापन–*पु.* बदली मनुष्य; 'सब्स्टिटयूशन'.

प्रतिहारी–*स्त्री.* द्वारपालाचें काम करणारी स्त्री.

प्रतीक–*पु.* चिह्न; प्रतिमा; –प्रतिरूप. –*वि.* प्रतिकूल; उलटा. **–न्यूनन**–*पु.* लाक्षणिक कपात; 'टोकन कट'. **–वाद**–*पु.* संकेतवाद; 'सिंबॉलिझम'.

प्रतीक्षागृह; प्रतीक्षालय–*पु.* वाट पाहात थांबण्याची जागा; 'वेटिंगरूम'.

प्रतीत–*वि.* ज्ञात; माहीत; प्रसिद्ध. **–मु०– होना**– वाटणें; कल्पना होणें.

प्रतीप–*वि.* विरोधी; प्रतिकूल; 'रिपग्नंट'. **–गामी**–*वि.* प्रतिगामी; विरुद्ध जाणारा; 'रिट्रॉग्रेसिव्ह'. [ग्नन्स'.

प्रतीपता–*स्त्री.* विरोध; 'रिप-

प्रतोद–*पु.* १. चाबूक. २. एखादें काम करण्यास भाग पाडणें.

प्रतोली–*स्त्री.* १. रुंद सडक. २. बोळ; गल्ली.

प्रत्यंकन–*पु.* पारदर्शक कागदावरून कोरून नक्कल काढणें; 'ट्रेसिंग'.

प्रत्यंचा–*स्त्री.* धनुष्याची दोरी किंवा तांत. [स्पष्ट.

प्रत्यक्ष–*वि.* दृष्टीसमोरचा;

प्रत्यय–*पु.* पत; सचोटी; 'क्रेडिट'. **–पत्र**–*पु.* मलावणपत्र; 'लेटर ऑफ क्रेडिट'.

प्रत्यर्पण–*पु.* १. परदेशस्थ आरोपीला तद्देशीय अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करणें; 'एक्सट्रॅडिशन'. २. घेतलेली रक्कम परत करणें; 'रिफंड'.

प्रत्याख्यान–*पु.* त्याग; अनंगीकार; 'रिनन्सिएशन'.

प्रत्यानयन–*पु.* परत करणें; 'रेस्टिटयूशन'. ['गॅरंटी'.

प्रत्याभूति–*स्त्री.* खात्री; हमी;

प्रत्याय–*स्त्री.* १. सरकारी कर; 'टॅक्स'. २. मोबदला; लाभ; 'रिटर्न'.

प्रत्यायुक्त; प्रत्यायोजित–*वि.* प्रतिनिधि म्हणून धाडलेला; प्रतिनिधित्व दिलेला; 'डेलिगेटेड'.

प्रत्यायोजन–*पु.* प्रतिनिधित्व

देणें; सोंपविणें; 'अॅक्ट ऑफ डेलिगेटिंग.' ['काउंटर चार्ज.'

प्रत्यारोप–*पु.* उलट आरोप;

प्रत्यावर्तक–*वि.* १. वैकल्पिक; 'आल्टरनेटिव्ह्'. २. दोन गोष्टींतून एकीची निवड करणारा; 'आल्टर नेटर'.

प्रत्यावेदन–*पु.* जबाब; प्रत्युत्तर; 'काउंटर स्टेटमेंट'.

प्रत्याशा– *स्त्री.* आशा. **–में**–*अव्य.* अपेक्षेनें; गृहीत धरून; 'इन अॅन्टिसिपेशन'.

प्रत्याशित– *वि.* अपेक्षित; अनुमानित; 'अॅन्टिसिपेटेड'. **–उत्तराधिकारी**–*पु.* अपेक्षित वारस; 'एयर एक्सपेक्टन्स'.

प्रत्यास्थ–*वि.* स्थितिस्थापक; 'इलॅस्टिक'.

प्रत्यास्थता– *स्त्री.* स्थितिस्थापकत्व; 'इलॅस्टिसिटी'.

प्रत्याहरण; **–प्रत्याहार**–*पु.* परत घेणें; माघार; 'विथड्रॉवल'

प्रत्याह्वयन–*पु.* अधिकाऱ्यास परत बोलावणें. 'रिकॉल'.

प्रत्युत–*अव्य.* उलट; इतकेंच नव्हे तर.

प्रत्युत्तर–*पु.* १. प्रत्युत्तर; 'रिजॉइंडर'. २. प्रतिवादीच्या म्हणण्यास वादीचा जबाब; 'रेप्लिकेशन'.

प्रत्युत्पन्न–*वि.* पुनः किंवा तत्काल उत्पन्न झालेला. **–मति**–*वि.* हजरजबाबी.

प्रथम–*वि.* १. पहिला. २. श्रेष्ठ. **–***अव्य.* आधीं. **–दृष्टित**; –*अव्य.* प्रथमदृष्टचा; सकृद्दर्शनीं; 'प्राइमा फेसी'. **–दृष्टिसिद्ध**–*वि.* प्रथमदर्शनीं सिद्ध वाटणारा; 'प्राइमाफेसी'.

प्रथमक–*वि.* प्राथमिक; 'प्रायमरी'.

प्रथमाक्रमण–*पु.* आक्रमणाचा आरंभ; 'अॅग्रेशन'. **–कर्ता**; **–कारी**–*पु.* प्रथम हल्ला करणारा; आक्रमक; 'अॅग्रेसर'.

प्रथमोपचार–*पु.* प्रथमोपचार; 'फर्स्ट एड'.

प्रदत्त अंश-पूँजी–*स्त्री.* वसूल भाग मांडवल; 'पेड अप शेयर कॅपिटल'.

प्रदर्शक–*पु.* १. दाखविणारा. २. गुरु. ३. निदर्शक; 'डेमॉन्स्ट्रेटर'.

प्रदर्शन–*पु.* निदर्शन; करून दाखविणें; 'डेमॉन्स्ट्रेशन'.

प्रदर्शनी– *स्त्री.* प्रदर्शन; 'एक्झिबिशन'.

प्रदर्शिका– *स्त्री.* मार्गदर्शक पुस्तक; 'गाइड'.

प्रदान–*पु.* देणें; दान; भेट.

प्रदीप्ति– *स्त्री.* रोषणाई; 'इल्युमिनेशन'.

प्रद्रावक–*पु.* वितळविणारें यंत्र; 'स्मेल्टर'.

प्रद्रावण–*पु.* गाळणें; वितळविणें; 'स्मेल्टिंग'.

प्रधान–*वि.* मुख्य; प्रमुख. **–क्रिया**–*स्त्री.* मूलभूत, मुख्य-क्रिया; 'फंडामेंटल ऑपरेशन'. **–नक्शानवीस**–*पु.* मुख्य नकाशा काढणारा; 'हेड ड्राफ्ट्समन'.– **सैन्यावास व्यवस्थापक**–*पु.* मुख्य रसद-व्यवस्थापक; 'क्वार्टर मास्टर जनरल'. [प्रामुख्य.

प्रधानता– *स्त्री.* प्राधान्य;

प्रधानाचार्य–*पु.* प्राचार्य; 'प्रिन्सिपल'.

प्रधार–*पु.* फवारा; 'जेट'.

प्रन*–*पु.* प्रण; प्रतिज्ञा.

प्रनत*–*वि.* प्रणत; नम्र; दीन,

प्रपंच–*पु.* १. ढोंग; अवडंबर; जंजाल. २. विस्तार. ३. जग; सृष्टि. ४. संसार.

प्रपंजी– *स्त्री.* खातेंवही; खतावणी; 'लेजर'.**–पृष्ठ**–*पु.* खातें-पान; खातेउतारा; 'लेजर फोलिओ'. ['फॉर्म'.

प्रपत्र–*पु.* अर्जाचा नमुना;

प्रपन्न–*पु.* पाल्य; 'वॉर्ड'.

प्रपलायी–*पु.* पळपुटचा; फरारी; 'अॅबस्कॉंडर'.

प्रपात–*पु.* १. डोंगराचा कडा. २. लहान धबधबा; 'कास्केड'.

प्रपितामह–*पु.* पणजोबा.

प्रबंध–*पु.* १. निबंध; लेख. २. उपाय; योजना; व्यवस्था. **–अभिकर्ता**–*पु.* व्यवस्थापक मंडळ; 'मॅनेजिंग एजंट्स' **–कर्ता**–*वि. पु.* व्यवस्थापक. **–कारिणी**–*वि. स्त्री.* कार्यकारिणी सभा. **–काव्य**–*पु.* खंडकाव्य. **–संपादक**–*पु.* कार्यकारी-संपादक; 'मॅनेजिंग एडिटर'. **–समिति**–*स्त्री.* व्यवस्थापक समिति; 'मॅनेजिंग कमिटी'.

प्रबल–*वि.* प्रबळ; जोरदार.

प्रबोधना*– *क्रि. स.* १. झोपेंतून जागें करणें. २. सचेत, सावध करणें. ३. शिकविणें; समजाविणें.

प्रभंजन–*पु.* १. वादळ; वावटळ. २. नाश. ३. विध्वंस.

प्रभागाध्यक्ष–*पु.* विद्यापीठांतील एखाद्या शाखेचा मुख्याधिकारी; 'डीन'.

प्रभामंडल–*पु.* तेजोवलय.

प्रभार–*पु.* कार्यभार; जिम्मा; जबाबदारी; 'चार्ज'.

प्रभारी–*वि.* जबाबदारी सोंपविलेला; जिम्मा घेतलेला; 'इनचार्ज'.**–राजदूत**–*पु.* अस्थायी राजदूत; लहान देशांतील राजदूत; 'शार्जदफेयर'.**–सदस्य**–*पु.* जबाब-

दारी टाकलेला सभासद; 'मेंबर-इनचार्ज'. ['इफेक्टिव्ह'.

प्रभावी–वि. प्रभावकारक;

प्रभुता–स्त्री. वर्चस्व; 'अॅसेंडन्सी'. ['सॉव्हरेनटी'.

प्रभुसत्ता–स्त्री. सार्वभौमत्व;

प्रभूत–वि. १. उत्पन्न; उद्‌भूत. २. पुष्कळ; भरपूर. ['कंपनी'.

प्रमंडल–पु. मंडळ; मंडळी;

प्रमत्त–वि. वेडा; मत्त; उन्मत्त.

प्रमस्तिष्क–पु. मेंदूचा पुढील मोठा भाग; 'सेरेब्रम'.

प्रमाण–पु. १. पुरावा. २. प्रमाण. –पत्र–पु. सनद; दाखला; 'सर्टिफिकेट'.

प्रमाणक–पु. पावती; 'व्हाउचर'.

प्रमाणन–पु. प्रमाणपत्र देणें; 'सर्टिफिकेशन'.

प्रमाणित–वि. १. शाबित; सिद्ध; खरा; विश्वसनीय. २. सर्वमान्य; रूढ; 'अॅक्रेडिटेड'.

प्रमाणीकरण–पु. शाबीत करणें; 'ऑथेंटिकेशन'. ['क्वांटम'.

प्रमात्रा–स्त्री. प्रमाण;

प्रमाद–पु. चूक; अपराध; गफलत. [मानणें. २. सिद्ध करणें.

प्रमानना*–क्रि. स. १. प्रमाण

प्रमाप–स्त्री. प्रमाण; दर्जा; पातळी; 'स्टँडर्ड'.

प्रमापी–पु. ठराविक माप; प्रमाण; 'गेज'.

प्रमित–वि. थोडें; अल्प.

प्रमुख–पु. अध्यक्ष; 'स्पीकर'. –सभा–स्त्री. 'सीनेट'.

प्रमेय–पु. प्रमेय; 'थिअरम'.

प्रमोद–पु. १. आनंद. २. मनोरंजन; करमणूक.–कर–पु. करमणूक कर; 'एंटरटेनमेंट टॅक्स'. –गोष्ठी–स्त्री. उद्यानोपहार; वनभोजन; 'पिकनिक पार्टी'.

प्रमोधना*–क्रि. स. समजाविणें. [२. एक प्रकारचें आसन.

प्रयंक*–पु. १. पर्यंक; पलंग.

प्रयंत*–अव्य. पर्यंत.

प्रयत्नशील–वि. प्रयत्न करणारा; धडपडणारा.

प्रयास–पु. प्रयत्न; धडपड.

प्रयुक्त–पु. १. वापरलेला; कामीं लावलेला. २. समावेश केलेला; सामील; सम्मिलित.

प्रयोग–पु. १. उपयोग; वापर. २. प्रयोग; 'एक्सपेरिमेंट'.–पत्र–पु. तिकिट; 'टिकेट'.–०कार्यालय –पु. तिकीट-घर; 'बुकिंग ऑफिस'. –वाद–पु. 'एक्सपेरिमेंटॅलिझम्'. –शाला–स्त्री. प्रयोगशाळा; 'लॅबोरेटरी'.

प्रयोजन–पु. १. हेतु; उद्देश. २. अर्थ; आशय; तात्पर्य. [उगवणें.

प्ररोहण–पु. १. आरोहण. २.

प्रलंबन–पु. आधार. [अंत.

प्रलय–पु. प्रळय; विनाश;

प्रलाभी–वि. लाभ देणारें (पद, नोकरी इ०); 'लूक्रेटिव्ह'.

प्रलेख–पु. दस्तऐवज; 'डॉक्युमेंट'.

प्रलेखीय चित्र–अनुबोधपट; माहितीपट; 'डॉक्युमेंटरी फिलम'.

प्रलेप–पु. लेप; पोटीस; मलम.

प्रलोभन–पु. लालूच दाखविणें; प्रलोभन; 'अॅल्यूरमेंट'.

प्रवंचना–स्त्री. फसवणूक.

प्रवक्ता–पु. १. उत्तम वक्ता. २. उत्तम प्रवचनकार. ३. प्रवक्ता; 'स्पोक्समन'.

प्रवणता–स्त्री. १. प्रवृत्ति. २. चढ-उतार; 'ग्रेडिअंट'.

प्रवर–वि. सर्वांत मुख्य; श्रेष्ठ. –समिति–स्त्री. चिकित्सा समिति; 'सिलेक्ट कमिटी'.

प्रवर्ग–पु. वर्ग; जात; 'कॅटॅगरी'.

प्रवर्तन–पु. १. अमलांत आणणें; चालू करणें; 'ऑपरेशन'. २. वाढ; प्रगति; 'प्रमोशन'. ३. अंमलबजावणी; 'एन्फोर्समेंट'.

प्रवसन–पु. १. स्थलांतर, देशांतर करणें; 'मायग्रेशन'. २. मरण. ['रीडर'.

प्रवाचक–पु. प्राध्यापक;

प्रवास–पु. १. परदेशवास; परदेशांत राहाणें. २. परदेशी जाणें.

प्रवासी–वि. परदेशांत राहाणारा. [२. वाहिलेला.

प्रवाहित–वि. १. वाहाणारा.

प्रविधि–स्त्री. तंत्र; 'टेकनिक'.

प्रविलंब करना–क्रि. स. शिक्षेची अंमलबजावणी तहकूब करणें. 'रीप्रीव्ह'.

प्रविष्ट रोगी–पु. इस्पितळांत राहून औषधोपचार करून घेणारा रोगी; 'इनडोअर पेशंट'.

प्रविष्टि–स्त्री. नोंद; 'एंट्री'.

प्रवीर–वि. शूर; योद्धा.

प्रवेग–पु. जोर; आवेग; 'टेंपो'; 'व्हेलॉसिटी'.

प्रवेश–पु. प्रवेश; शिरकाव. –पत्र–पु. तिकीट; 'टिकेट'. –रोधन–पु. निरोधन; 'पिकेटिंग'.

प्रवेशिका–स्त्री. प्रवेशपत्र; दाखला.

प्रव्रजन–पु. १. संन्यास घेणें. २. स्थलांतर, देशांतर करणें; 'मायग्रेशन'. [विदेश-गमन.

प्रव्रज्या–स्त्री. १. संन्यास. २.

प्रशंस*–स्त्री. प्रशंसा.

प्रशंसक–पु. खुशामत करणारा; स्तुतिपाठक. ['अॅप्लॉज'.

प्रशंसाघोष–पु. प्रशंसोद्‌गार;

प्रशस्त–वि. लांब-रुंद; ऐसपैस.

प्रशस्ति–*स्त्री*. १. शिफारस. २. स्तुति; प्रशंसा. **–पाठ–** यशोगान; गुणगान. [डहाळी.

प्रशाखा–*स्त्री*. लहान फांदी;

प्रशासक–*पु*. व्यवस्थापक; 'अॅडमिनिस्ट्रेटर'.

प्रशासन–*पु*. शासन; व्यवस्था; 'अॅडमिनिस्ट्रेशन'. **–पत्र**–*पु*. वहिवाट चालविण्याची सनद; 'लेटर ऑफ अॅडमिनिस्ट्रेशन'.

प्रशासनीय कृत्य–*पु*. शासकीय कार्य; कारभारविषयक सरकारी कामें; 'अॅडमिनिस्ट्रेटिव्ह फंक्शन्स'

प्रशिक्षक–*पु*. शिक्षक; 'इन्स्ट्रक्टर'.

प्रशिक्षण–*पु*. प्रशिक्षण; 'ट्रेनिंग'. **–महाविद्यालय**–*पु*. 'ट्रेनिंग कॉलेज'. **–विद्यालय**–*पु*. 'नॉर्मल स्कूल'. **–शिबिर**–*पु*. 'ट्रेनिंग कॅंप'.

प्रशिक्षणार्थी–*पु*. प्रशिक्षण घेणारा; 'ट्रेनी'. [लेला; 'ट्रेंड'.

प्रशिक्षित–*वि*. प्रशिक्षण घेत-

प्रशीतक–*पु*. शीतमंजुषा; 'रिफ्रिजरेटर'.

प्रशीतन–*पु*. शीतोपचार क्रिया; शीत करणें; 'रिफ्रिजरेशन'.

प्रशुल्क–*पु*. आयात-निर्यात-कर; जकात; 'टॅरिफ'. **–मंडल**–*पु*. 'टॅरिफ बोर्ड'.

प्रश्नावली–*स्त्री*. अभ्यासासाठी दिलेले प्रश्न; 'एक्झाम्पल्स्'; 'एक्झरसाइज'. **–पत्रक**–*पु*. प्रश्नावली; 'क्वेश्चनेयर'.

प्रश्नोत्तरी–*स्त्री*. प्रश्नोत्तरें; 'कॅटेकिझम'.

प्रसंग–*पु*. १. संबंध; मेळ; मिलाफ. २. संदर्भ; संगति. ३. विषय; गोष्ट. ४. योग्य वेळ; संधि. ५. कारण; हेतु. ६. प्रकरण; विषयानुक्रम. ७. अर्थविस्तार. ८. समागम; संभोग. ['हार्मोनियस'.

प्रसंवादी–*वि*. सुसंगत; संवादी;

प्रसंविदा–*पु*. करारनामा; 'कव्हिनंट'.

प्रसन्न–*वि*. आनंदित; खुष.

प्रसन्नता–*स्त्री*. आनंद; खुषी.

प्रसर–*पु*. १. प्रसार; वाढणें; पसरणें. २. प्रक्रिया; 'प्रोसेस'.

प्रसव–*पु*. १. प्रसूति; बाळंतपण. २. अपत्य. **–शाला**–*स्त्री*. प्रसूतिगृह; 'मॅटर्निटी होम'.

प्रसवावकाश–*पु*. बाळंतपणाची रजा; 'मॅटर्निटी लीव्ह'.

प्रसाद–*पु*. १. प्रसाद. २. कृपा; दया. **–पर्यंत**–*अव्य*. इच्छा असेल तोंपर्यंत. 'ड्यूरिंग दि प्लेझर ऑफ'.

प्रसादन–*पु*. एखाद्या व्यक्तीस अनुकूल करून घेणें; खुष करणें; 'प्रोपिशियेशन'.

प्रसादी–*स्त्री*. प्रसाद.

प्रसाधन–*पु*. सौंदर्यप्रसाधन; 'टॉयलेट'. **–द्रव्य**–*पु*.; **–सामग्री**–*स्त्री*. सौंदर्यप्रसाधनें; 'टॉयलेट'.

प्रसारण–*पु*. ध्वनिक्षेपण; 'ब्रॉडकास्टिंग'.

प्रसारित–*वि*. १. पसरविलेला. २. ध्वनिक्षेपित. 'ब्रॉडकास्ट'.

प्रसाविका–*स्त्री*. दाई; 'मिडवाइफ'.

प्रसूति–*स्त्री*. १. बाळंतपण. २ बाळंतीण. **–गृह**; **–भवन**–*पु*. बाळंतपणाची, बाळंतिणीची खोली. **–कल्याण कार्य**–*पु*. मातृकल्याणकार्य; 'मॅटर्निटी वेलफेयर वर्क'.

प्रसूत्यवकाश–*पु*. पा० 'प्रसवावकाश'. [*–वि*. उत्पन्न; जन्मलेलें.

प्रसून–*पु*. १. फूल. २. फळ.

प्रसेक–*पु*. सिंचन; सडा.

प्रसेद–*पु*. घाम; स्वेद.

प्रस्तर–*पु*. १. दगड; शिळा. २. थर. **–मुद्रण**–*पु*. शिळा-मुद्रण; 'लिथोग्राफ'. **–युग**–*पु*. पाषाणयुग; 'स्टोन एज'.

प्रस्तार–*पु*. १. प्रसार; फैलाव. २. अंथरूण. ३. स्थानविनिमय; 'परम्युटेशन'.

प्रस्ताव–*पु*. १. ठराव. २. प्रस्तावना. ३. संधि; प्रसंग. **–विवादनियंत्रण**– *पु*. चर्चाबंदी; 'गिलोटिन ए मोशन.'

प्रस्तावना–*स्त्री*. १. आरंभ; प्राक्कथन. २. प्रास्ताविक; 'प्रीअँबल'.

प्रस्तुत–*वि*. १. हजर; उपस्थित. २. सांगितलेला; उक्त. ३. तयार; सिद्ध.

प्रस्तुतांगगृहनिर्माणशाला–*स्त्री*. तयार घरांचा कारखाना; 'प्रीफॅब्रिकेटेड हाउस फॅक्टरी'.

प्रस्थान–*पु*. गमन; यात्रा; रवानगी.

प्रस्थापक–*पु*. सूचक; 'प्रपोझर'.

प्रस्थापना–*स्त्री*. सूचना; ठराव; 'प्रपोझल'.

प्रस्थापित करना–*क्रि. स*. सुचविणें; ठराव मांडणें; 'टु प्रपोज'.

प्रस्फोट–*पु*. 'बॉंब'.

प्रस्वीकृत–*वि*. अधिकृतपणें मंजूर झालेला; 'रेकग्नाइझ्ड'.

प्रस्वीकृति–*स्त्री*. अधिकृत मान्यता; 'रेकग्निशन'.

प्रस्वेद–*पु*. घाम.

प्रस्वेदन–*पु*. शेक; शेकून घाम आणणें; 'फोमेंटेशन'.

प्रहरी–*पु*. १. पहारेकरी. २. घडचाळजी.

प्रहार–*पु*. आघात; मारा; कायद्याविरुद्ध केलेला हल्ला; 'बॅटरी'.

प्रांजल–*वि*. सरळ; समान.

प्रांतीय स्वराज्य–*पु.* प्रांतिक स्वायत्तता; 'प्रॉव्हिन्शियल ऑटॉनॉमी'.

प्राकृतिक–*वि*. नैसर्गिक; स्वाभाविक. **–चिकित्सा**– *स्त्री*. निसर्गोपचार.

प्राक्कलन–*पु*. १. अंदाज; अदमास; 'एस्टिमेट'. २. अंदाज करणें; 'एस्टिमेशन'.

प्राग्विभाजन भुगतान –*पु*. फाळणीपूर्वीचीं देणीं; 'प्रीपार्टिशन पेमेंट्स'.

प्राची– *स्त्री*. पूर्व (दिशा).

प्राचीर–*पु*. तट; नगराच्या किंवा किल्ल्याच्या भोंवतींची भिंत. [फास्ट'.

प्रातराश–*पु*. न्याहारी; 'ब्रेक-

प्रातिभाव्य–*पु*. जामिनकी. **–ऋण**–*पु*. जामिनावर दिलेलें कर्ज.

प्राथमिकता– *स्त्री*. अग्रहक्क; प्राधान्य; 'प्रायॉरिटी'. **–सूची**– *स्त्री*. अग्रहक्क सूची; 'प्रायॉरिटी लिस्ट'.

प्रादेशिक सेना– *स्त्री*. प्रादेशिक सैन्य; 'टेरिटोरियल आर्मी'.

प्राधिकरण–*पु*. प्रतिनिधित्व, अधिकार देणें. 'ऑथॉरायझेशन'.

प्राधिकार–*पु*. अधिकार; हक्क 'ऑथॉरिटी'.

प्राधिकारिवर्ग–*पु*. अधिकारीवर्ग; 'ऑथॉरिटीज'.

प्राधिकारी–*पु*. अधिकारी; 'ऑथॉरिटी'.

प्राधिकृत–*वि*. अधिकृत; 'ऑथॉराइज्ड'. **–अभिकर्ता**–अधिकृत प्रतिनिधि; 'ऑथॉराइज्ड एजंट' **–पूंजी**– *स्त्री*. अधिकृत भांडवल; 'ऑथॉराइज्ड कॅपिटल'.

प्राध्यापक–*पु*. महाविद्यालयांतील अध्यापक; 'लेक्चरर'; 'प्रोफेसर'.

प्रान*–*पु*. प्राण.

प्रानी*–*पु*. प्राणी.

प्रानुमतिपत्र–*पु*. परवाना; 'परमिट'. ['पेयी'.

प्रापक–*पु*. धनी; पैसे घेणारा;

प्राप्ताधिकार–*पु*. विशेष अधिकार, सवलत; 'प्रिव्हिलेज'.

प्राप्तानुज्ञ–*वि*. ज्याला परवानगी मिळाली आहे असा; 'लायसेन्स्ड'.

प्राप्ति–*स्त्री*. १. मिळणें. २. पोंच. **–और दाति**– *स्त्री*. पावती आणि बटवडा; 'रिसीट अॅन्ड डिलिव्हरी'. **–कर्ता**–*पु*. घेणारा; प्राप्त करणारा 'रिसीपियंट'.

प्राप्य–*पु*. देय; येणें; 'ड्यू'

प्राप्यक–*पु*. 'बिल'. ['अॅटर्नी'.

प्राभिकर्ता–*पु*. मुखत्यार;

प्राभियोक्ता–*पु*. फिर्यादी; 'प्रॉसिक्यूटर'. **–पक्ष**–*पु*. वादी; 'प्रॉसिक्यूशन'. (**राजकीय प्राभियोक्ता**–*पु*. सरकारी वकील; 'गव्हर्नमेंट प्रॉसिक्यूटर').

प्राभियोजन–*पु*. खटला भरणें; 'प्रॉसिक्यूशन' ['डिव्हिजनल'.

प्रामंडलिक–*वि*. विभागीय;

प्रामाणिक–*वि*. १. शास्त्रसिद्ध; प्रमाणित. २. साधारण; 'नॉर्मल'.

प्रायद्वीप–*पु*. द्वीपकल्प; 'पेनिन्शुला'.

प्रारूप–*पु*. मसुदा; खर्डा; 'ड्राफ्ट'. **–कार**–*पु*. मसुदा तयार करणारा; 'ड्राफ्ट्समन'.

प्रार्थना– *स्त्री*. १. विनंती. २. प्रार्थना. **–पत्र**–*पु*. अर्ज.

प्रार्थितपूंजी– *स्त्री*. खपलेलें भांडवल; 'सब्स्क्राइब्ड कॅपिटल'.

प्रार्थी–*वि*. प्रार्थना करणारा; निवेदन करणारा; अर्जदार.

प्रालेख–*पु*. पा० 'प्रारूप'.

प्रावस्था– *स्त्री*. विकासाची अवस्था; 'फेझ'.

प्राविधिक–*वि*. तांत्रिक; 'टेकनिकल'. **–आपत्ति**– *स्त्री*. तांत्रिक हरकत; 'टेक्निकल ऑब्जेक्शन'.

प्राविधिज्ञ–*पु*. तंत्रज्ञ; 'टेक्नीशियन.'

प्रावेदन–*पु*. ठराव; 'मोशन'.

प्राश्निक–*पु*. प्रश्न विचारणारा; प्रश्नपत्रिका काढणारा; 'पेपर सेटर'.

प्रासविक विज्ञान–*पु*. प्रसूतिशास्त्र.

प्रिथिमी*– *स्त्री*. पृथ्वी; धरती.

प्रियतम–*पु*. पति; स्वामी.–*वि*. आवडता; प्रिय. [प्रीति.

प्रीत–*वि*. प्रीतियुक्त. – *स्त्री*.

प्रीतम–*पु*. प्रियतम; प्रियकर.

प्रीति– *स्त्री*. १. प्रेम. २. आनंद. ३. कृपा. **–पात्र**–*वि पु*. प्रिय; प्रेमभाजन. **–पेय**–*पु*. 'टोस्ट'. **–भोज**–*पु*. मेजवानी. **–विवाह**–*पु*. प्रेमविवाह. **–सम्मेलन**–*पु*. स्नेहसम्मेलन; 'सोशल गॅदरिंग'.

प्रेक्षा– *स्त्री*. १. पाहाणें. २. दृश्य. ३. अभिनय, नाटक इ० **–गृह**–*पु*. नाटचगृह; 'थिएटर'.

प्रेत–*वि*. मेलेला; मृत. –*पु*. मृतात्मा; पिशाच.

प्रेमल–*वि*. प्रेमळ.

प्रेमी–*पु*. प्रेम करणारा; प्रियकर.

प्रेरक–*वि*. प्रेरणा देणारा; पाठविणारा.

प्रेरण–*पु*. 'इन्डक्शन'.

प्रेषक–*पु*. पाठविणारा.

प्रेषण–*पु*. पाठविणें; 'डिस्पॅच'. **–कर्मी**–*पु*. बारनिशी कारकून; 'डिस्पॅचर'. **–पुस्तक**–– *स्त्री*. जावक वही; 'डिस्पॅच बुक'.

प्रेषणादेशपत्र–पु. 'ऑर्डर फॉर्म'.
प्रेषिती–पु. ज्याच्या नांवें एखादी वस्तु पाठविण्यांत आली आहे असा; 'अॅड्रेसी'. ['ट्रान्समिटर'.
प्रेषित्र–पु. प्रक्षेपक; ध्वनिक्षेपक;
प्रेष्यवस्तु आलेखन–पु. 'बुकिंग'.
प्रैतिहासिक–*वि*. प्रागैतिहासिक; 'प्रीहिस्टॉरिक'.

प्रोक्ति– *स्त्री*. उद्धरण; 'कोटेशन'.
प्रोत–*वि*. १. खूप मिसळलेला; २. लपलेला. ['सायटेशन'.
प्रोद्धरण–पु. अवतरण; उद्धरण;
प्रोषित–*वि*. परदेशीं गेलेला. **–पतिका; –प्रेयसी; –भर्तृका**– *स्त्री*. जिचा पति परदेशीं गेला आहे अशी स्त्री.

प्रौद्योगिक शिक्षा– *स्त्री*. तांत्रिक शिक्षण; 'टेक्निकल एज्युकेशन'.
प्लवन–पु. तरंगणें; 'फ्लोटेशन'.
प्लावनिक–*वि*. महापुरासंबंधींचा; 'डायलूव्हियल'.
प्लेटफार्म–पु. [इं.] फलाट; 'प्लॅटफॉर्म'.

फ

फ– देवनागरी वर्णमालेच्या पवर्गांतील दुसरा वर्ण. [तुकडा.
फंक*– *स्त्री*. फांक; कापलेला
फंका*–पु. १. फक्की. २. फांक; तुकडा. **मु०–मारना** – फक्क्या मारून खाणें; फाकणें.
फंकी– *स्त्री*. १. फांकण्याचें औषध. २. फक्की.
फंग*–पु. १. फांस; बंधन. २. प्रेम. ३. अधीनता.
फंद*–पु. १. बंधन. २. फांस; जाळें. ३. कपट. ४. दुःख. –*वि*. जाळें पसरणारा माणूस; पारधी.
फं(फं)दना*–*क्रि*. *अ*. फशीं पडणें; जाळचांत अडकणें.–*क्रि.स*. ओलांडणें; उडी मारणें; उल्लंघणें.
फंदा–पु. सरकफांस; जाळें; पाश. **मु०–लगाना**–जाळें पसरणें; फसविणें.–**(दे) में आना या पड़ना**–जाळचांत अडकणें.
फंदाना–*क्रि*. *स*. जाळचांत अडकविणें; फसविणें; गुंतविणें.
फंफाना–*क्रि*. *अ*. १. चांचरणें; अडखळणें. २. उतूं जाणें.
फँसना– *क्रि*. *अ*. अडकणें; गुंतणें; जाळचांत सांपडणें.
फँसाना– *क्रि*. *स*. अडकविणें; जाळचांत पकडणें; फसविणें.
फँसाव–वा–पु. अडकणें; अडकविण्याची गोष्ट. [णारा; ठग.
फँसिहारा*–पु. जाळचांत पकड-
फ़क़– *वि*. [*अ*.] १. पांढरा; स्वच्छ. २. फटफटीत; फिकट; विटलेला (रंग). **मु० (रंग)– हो जाना अथवा पड़ जाना**–घाबरणें; भीतीमुळें चेहरा फटफटीत पडणें.
फ़क़त–*अव्य*. [*अ*.] फक्त; केवळ; मात्र.–*वि*. एकटा.
फ़क़ीर– पु. [*अ*] १. फकीर; साधु; भिक्षुक. २. भिकारी.
फ़क़ीराना–*वि*. [*अ*.] फकिरांसारखा; संन्यस्त. –पु. फकिरांच्या उदरनिर्वाहासाठीं दान दिलेली जमीन.
फ़क़ीरी– *स्त्री*. [*अ*.] १. निरिच्छता. २. निर्धनता; गरिबी.
फ़क़ीह–पु. [*अ*.] इस्लामी धर्मशास्त्राचा पंडित.
फक्कड़–*वि*. १. मस्त; बेपर्वा. २. दरिद्री. ३. उच्छृंखल; स्वैराचारी.–पु. शिवीगाळी.
फक्किका– *स्त्री*. १. कूट प्रश्न; कोडें. २. फसवेगिरी. ३. पूर्वपक्ष.
फ़क्र–पु. [*अ*.] १. दैन्य; दारिद्र्य. २. साधुत्व; फकिरी. ३. अल्पसंतोषीपणा; अधिक हांव नसणें.
फ़ख़र; फ़ख़्र–पु. [*अ*.] १. गौरव; अभिमान; गर्व. २. अभिमानास्पद गोष्ट.
फगुआ–पु. १. होळी; शिमगा. २. फाल्गुन महिन्यांतील लोकांचा उल्हास. ३. फाल्गुन महिन्यांत गायिलें जाणारें अश्लील गीत. ४. होळीची भेट, बक्षीस. **मु०–खेलना अथवा मनाना**–होळीच्या उत्सवांत रंग व गुलाल उधळणें.
फगुनाहट– *स्त्री*. १. फाल्गुनांत वाहणारा सोसाटचाचा वारा. २. फाल्गुनांतील पाऊस; वळीव.
फ़जर– *स्त्री*. [*अ*.] सकाळ; पहांट.
फ़ज़ल–पु. [*अ*.] १. कृपा; दया; अनुग्रह. २. आधिक्य; वैपुल्य.
फ़ज़ा– *स्त्री*. पा० 'फ़िज़ा'
फ़ज़ीता–पु.; **फ़ज़ीती**– *स्त्री*. पा० 'फ़ज़ीहत'.
फ़ज़ीलत– *स्त्री*. [*अ*.] १. श्रेष्ठत्व; मोठेपणा. २. चांगुलपणा; सद्वर्तन. **मु०–की पगड़ी बाँधना**–विद्वत्ता किंवा श्रेष्ठता संपादन करणें.
फ़ज़ीहत–ती– *स्त्री*. [*अ*.] १. फजिती; बदनामी. २. दुर्दशा.
फ़ज़ूल– *वि*. [*अ*.] १. व्यर्थ; कुचकामाचा; निरर्थक. २. जरुरीपेक्षां अधिक; अतिरिक्त; फाजील.

–ख़र्च–*वि*. उधळचा; अपव्ययी.

फ़ज़्ल–*पु*. [*अ*.] १. अनुग्रह; कृपा. २. विद्या ३. महत्ता.

फट– *स्त्री*. मोडण्याचा, तुटण्याचा आवाज. **–से**–*अव्य*. पटकन्; तात्काळ. [झटकन्; तावडतोब.

फटक*–*पु*. स्फटिक. –*अव्य*.

फटकन– *स्त्री*. धान्य पाखडल्यावर बाहेर पडतो तो भुसा, कोंडा.

फटकना– *क्रि. स*. १. आपटणें; झटकणें. २. हातपाय आपटणें. ३. धान्य पाखडणें. –*क्रि. अ*. १. जाणें; पोहोंचणें. २. अलग होणें; दूर होणें. ३. तडफडणें; हातपाय आपटणें. ४. श्रम करणें.

फटकरी⁺– *स्त्री*. तुरटी.

फटकार– *स्त्री*. धिक्कार; झिडकार; धुडकावणी.

फटकारना– *क्रि. स*. १. धिक्कारणें. २. दरडावणें; फटकारणें. ३. कपडे जोरानें आपटून धुणें. ४. झिडकारणें. ५. झटका देऊन मोकळें सोडणें. ६. फटफट असा आवाज काढणें.

फटना– *क्रि*. अ. १. फाटणें. २. दुभंगणें. ३. पृथक्, वेगळें होणें. ४. नासणें (दूध इ०).

फटफटाना– *क्रि. स*. १. व्यर्थ बडबड करणें. २. हातपाय आपटणें.

फटफटि(टै)या– *स्त्री*. फटफटी; 'मोटर सायकल'.

फटा–*पु*. भेग; फट. –*स्त्री*. सापाचा फणा.

फटा–*वि*. फाटलेला; जीर्ण; फाटका. **–पुराना**–फाटका–तुटका. **–(टे)हाल**–*वि*. दरिद्री; अकिंचन.

फटाटोप–*पु*. सापाचें फणा उभारणें. [संगमरवरी दगड.

फटिक–*पु*. १. स्फटिक. २.

फटीचर⁺–*वि*. १. फाटके व घाणेरडे कपडे घातलेला; कुरूप. २. फडतूस.

फट्टा–ट्ठा–*पु*. १. भेग; चीर; फट. २. चिरलेल्या वांबूचा लांब तुकडा.

फड़–*पु. स्त्री*. १. जुगारांत लावलेला डाव. २. जुगाराचा अड्डा. ३. पक्ष; दल. ४. दुकानांतील खरेदीविक्रीची जागा. **–बाज़**–*पु*. १. जुगार खेळणारा. २. दुसऱ्यांना जुगार खेळावयास लावणारा.

फड़क; फड़कन– *स्त्री*. फडफड; स्पंदन; स्फुरण.

फड़कना–*क्रि. अ*. १. फडकणें; फडफडणें; उडणें. २. स्फुरणें; फुरफुरणें. **मु० फड़क उठना**–अत्यंत आनंदित होणें.

फड़काना–*क्रि. अ*. १. फडकविणें; हलविणें. २. उत्सुकता उत्पन्न करणें.

फड़फड़ाना–*क्रि. अ*. १. फडफडणें. २. उत्सुक होणें. ३. तळमळणें. –*क्रि. स*. फडफडविणें; फडफड असा आवाज काढणें.

फड़िया–*पु*. किरकोळ माल विकणारा वाणी.

फड़ी– *स्त्री*. विटा, दगड इ० चा एक वार रुंद, एक वार उंच व तीस वार लांब ढीग.

फ़तवा–*पु*. [*अ*.] मुसलमानी धर्मशास्त्राप्रमाणें एखाद्या कृत्याबद्दल मौलवीनें दिलेला निर्णय; धर्माज्ञा.

फ़तह– *स्त्री*. [*अ*.] १. विजय. २. सफलता; यश. **–नामा**–*पु*. विजयपत्र. **–याब**–*वि*. विजयी; यशस्वी. [पतंग (किडा).

फतिंगा–*पु*. उडणारा कीटक;

फ़तील–ला–*पु*. [*अ*.] १. दिव्याची वात. २. बंदूक किंवा तोफ डागण्याचा पलिता. **–सोज़**–*पु*. दिवा ठेवण्याचें पात्र; ठाणवई; शामदान.

फ़तूर–*पु*. पा० 'फ़ुतूर'.

फ़तूह– *स्त्री*. [*अ*.] १. विजय. २. लढाई किंवा लूट यांमध्यें मिळालेलें धन; लुटीचा माल.

फ़तूही– *स्त्री*. [*अ*.] बिनबाह्यांचा सदरा; लांब बंडी.

फ़ते; फ़तेह*– *स्त्री*. [*अ*.] विजय; जय.

फदकना–*क्रि. अ*. १. फदफद आवाज करणें. २. टुण टुण उड्या मारणें.

फदफदाना–*क्रि. अ*. १. अंगावर खूप फोड उठणें. २. झाडाला खूप फांद्या फुटणें. [फणा.

फन–*पु*. सापाची उगारलेली

फ़न–*पु*. [*अ*.] १. हुन्नर; कला; हस्तकौशल्य. २. गुण; वैशिष्टय. ३. विद्या. [**हर फ़न मौला**–*वि*. प्रत्येक कार्यांत निपुण; हरहुन्नरी.]

फ़ना– *स्त्री*. [*अ*.] १. नायनाट; निःपात. २. मृत्यु. –*वि*. नष्ट; मृत. **–फ़िल्ला**–*वि*. ईश्वरांत लीन.

फनिंग–द; फनि–नी* –*पु*. फणींद्र; नाग.

फनूस*–*पु*. पा० 'फानूस'.

फन्नी– *स्त्री*. पाचर.

फ़न्नी–*पु*. [*अ*.] कलात्मक; कलाविषयक. [स्फुंदून रडणें.

फफकना–*क्रि. अ*. स्फुंदून

फफूंद– *स्त्री*. बुरशी. **–विज्ञान**–*पु*. अळंबें, बुरशी इ० संबंधींचें शास्त्र; 'मायकॉलॉजी'.

फफूंदी*– *स्त्री*. १. निरी; गोंडा; नाडी. २. बुरशी.

फफोला–*पु*. भाजल्यामुळें किंवा घर्षणामुळें येणारा फोड. **मु० दिल के फफोले फोड़ना**–क्रोध प्रकट

करणें; राग काढणें.

फबती–*स्त्री.* १. उपहास. २. समयानुकूल विधान ३. टोमणा. मु०–उड़ाना, कसना–टिंगल करणें; टोमणा मारणें. [सौंदर्य.

फबन–*स्त्री.* शोभा; कांति;

फबना–*क्रि. अ.* १. शोभणें. २. खुलणें. [करणें; सजविणें.

फबाना–*क्रि. स.* शोभिवंत

फबि*–*स्त्री.* शोभा; सौंदर्य.

फबीला–*वि.* सुंदर; शोभायमान.

फर–*पु.* १. सामना; समोरासमोर येणें. २. कुस्तींतील डावपेंच. ३. युद्धक्षेत्र; सामन्याची जागा. ४. बिछाना. ५. फळ. –*पु.* 'फ़र्क़'.

फरक*–*स्त्री.* फडफड. [पा०

फरकना*–*क्रि. अ.* १. फडफडणें. २. उचंबळून येणें.

फरका–*पु.* १. गवताचें छप्पर. २. दारावरील झडप.

फरकाना*–*क्रि. स.* १. फडकविणें. २. हलविणें; वेगळें करणें.

फ़रग़ाना–*पु.* [*तु.*] तुर्कस्तानांतील उझबक नांवाच्या लोकशाही राज्यांतील एक प्रांत. हें बाबराचें वडिलार्जित राज्य होतें.

फरचा–*वि.* उष्टें नसलेलें; शुद्ध; स्वच्छ.

फरज़ंद–*पु.* [*फा.*] १. चिरंजीव; पुत्र. २. संतति.

फ़रज़–*स्त्री.* [*अ.*] भेग; फट –*पु.* पा० 'फ़र्ज़'.

फ़रज़ीं–*पु.* [*फा.*] वजीर. (बुद्धिबळांतील). **मु०–बनना**–प्याद्याचा वजीर बनणें.

फ़रज़ी–*वि.* [*अ.*] काल्पनिक.

फ़रद–*स्त्री.* [*अ.*] यादी; सूची.–*वि.* अनुपम. [दिवस.

फ़रदा–*पु.* [*फा.*] उद्यांचा

फरना*–*क्रि. अ.* फळ येणें.

फरफंद–*पु.* [*फा.*] १. डावपेंच; फसवेगिरी. २. नखरा; हावभाव.

फ़रफ़र–*स्त्री.* [*फा.*] घाई; जलदी. –*अव्य.* लौकर; घाईनें; भरभर. **मु०–उड़ाना**–*स्त्री.* भरभर वाचणें.

फरमा–*पु.* [*इं.*] १. छापलेला फॉर्म. २. जोडा बनविण्याचा लाकडी सांचा.

फ़रमाइश–*स्त्री.* [*फा.*] आज्ञा; मागणी; सूचना; 'ऑर्डर'.

फ़रमाइशी–*वि.* [*फा.*] मुद्दाम सांगून तयार करविलेला; आर्डर देऊन बनविलेला; उत्कृष्ट.

फ़रमान–*पु.* आज्ञा; फर्मान; हुकूम; 'ऑर्डिनन्स'. –**बरदार**–*वि.* आज्ञाधारक; सेवक; कह्यांत असलेला.–**रवा**–*पु.* १. शासक; राजा. २. फर्मान काढणारा.

फ़रमाना–*क्रि. स.* [*फा.*] १. आज्ञा देणें; हुकूम करणें. २. म्हणणें; सांगणें (आदरार्थी).

फ़रयाद–*स्त्री.* पा० 'फरियाद'.

फरवरी–*पु.* [*इं.*] फेब्रुवारी महिना.

फरवी–*स्त्री.* चुरमुरे; लाह्या.

फ़रश–*पु.* [*अ.*] १. बैठक; बिछाईत. २. सपाट जमीन. २. फरशी.

फ़रशी–*स्त्री.* [*फा.*] गुडगुडी; हुक्का.–**जूता**–*पु.* घरांत घालावयाच्या वाहाणा.–**पंखा**–*पु.* छताला लावलेला पंखा. –**सलाम**–जमिनीपर्यंत वांकून केलेला सलाम.

फरसा–*पु.* १. खोरें; फावडें; २. फरशी; कुऱ्हाड; परशु.

फ़रसूदा–*वि.* [*फा.*] झिजलेला; जीर्ण; विटला; जुनाट.

फ़रहंग–*पु.* [*फा.*] १. शब्दकोश. २. टीका; व्याख्या. ३. किल्ली.

फ़रहत–*स्त्री.* [*अ.*] प्रसन्नता; प्रफुल्लता; खुषी.

फरहद–*पु.* देवदार. [फडकणें.

फरहरना*–*क्रि. अ.* फडफडणें;

फरहरा–*पु.* पताका; झेंडा.–*वि.* १. वेगवेगळा. २. शुद्ध. ३. आनंदित.

फ़रहाद–*पु.* [*फा.*] शीरीन नामक राजकन्येवर प्रेम करणारा इराणचा एक प्रसिद्ध शिल्पकार.

फराक*–*वि.* पा० 'फ़राख़'.

फ़राख़–*पु.* [*फा.*] लांबरुंद जागा; मैदान–*वि.* विस्तृत; लांबरुंद.–**दिल**–*वि.* विशाल अंतःकरणाचा; उदार.

फ़राग़त–*स्त्री.* [*अ.*] १. मुक्तता; सुटका; मोकळीक. २. निश्चिती; स्वस्थता. ३. मलत्याग. **मु०–जाना**–शौचाला जाणें.

फ़राज़–*वि.* [*फा.*] उंच; उच्च.

फ़रामोश–*वि.* [*फा.*] विसरलेला; विस्मृत. **मु०–करना**–विसरणें.

फ़रामोशी–*स्त्री.* [*फा.*] विस्मरण; चूक-भूल. [२. फैलाव.

फरार*–*पु.* १. फलाहार; फराळ.

फ़रार–*वि.* [*अ.*] पळालेला; फरारी.–*पु.* पळ.

फ़रासीस–*पु.* [*फा.*] १. फ्रान्स देश. २. फरेंच माणूस.

फ़रासीसी–*पु.* फ्रान्स देशाचा रहिवासी.–*स्त्री.* फ्रेंच भाषा.–*वि.* फ्रान्सचा. [केलेला; जमविलेला.

फ़राहम–*वि.* [*फा.*] गोळा, जमा

फरियाद–*स्त्री.* [*फा.*] १. तक्रार; गाऱ्हाणें. २. मदतीकरितां हांक. ३. फिर्याद. ४. विनंती; प्रार्थना.

फ़रियादी–*वि.* [*फा.*] १. तक्रार करणारा; फिर्याद करणारा, मदतीकरितां प्रार्थना करणारा.–*पु.* फिर्यादी; वादी.

फरियाना+–*क्रि. स.* १. निवडणें; नीट करणें (धान्य). २. निकाल करणें; निवाडा देणें. –*क्रि. अ.* १. ठरणें. २. वेगळें होणें. ३. स्वच्छ होणें.

फ़रिश्ता–*पु.* [*फ़ा.*] देवदूत.

फरी – *स्त्री.* १. लहान ढाल (फरिगदग्यांतील). २. गाडीचा आंस. ३. नांगराचा फाळ.

फ़रीक़–*पु.* [*अ.*] १. वादी किंवा प्रतिवादी पक्ष; मिडू; २. प्रतिपक्षी; विरोधी. ३. विवेकी; विचारी. ४.समूह; झुंड. –**औवल**–*पु.* वादी. –**सानी**–प्रतिवादी. –**सालिस**–*पु.* खटल्यांतील तिसरा पक्ष; मध्यस्थ.

फ़रीक़ैन–*पु.* [*अ.*] वादी व प्रतिवादी; दोन्ही पक्षांचे लोक.

फ़रीज़ा–*पु.* [*अ.*] अनिवार्य ईश्वरी आज्ञा; अटळ कर्तव्य (नमाज, रोज़ा, हज इ०).

फरुही+– *स्त्री.* १. लहान खोरें, फावडें. २. चुरमुरे.

फ़रेफ़्ता–*वि.* [*फ़ा.*] १. आसक्त; मोहित. २. फसणारा; फसवणूक झालेला.

फ़रेब–*पु.* [*फ़ा.*] १. कपट; लबाडी; फसवणूक. २. धूर्तता.

फरेबी–*वि.* कपटी; अप्रामाणिक; लुच्चा. [विक्रय.

फ़रोख़्त– *स्त्री.* [*फ़ा.*] विक्री;

फ़रोख़्ता–*पु.* [*फ़ा.*] विकलेला.

फ़रोग़–*पु.* [*फ़ा.*] १. ज्योति; प्रकाश; आभा; क्रांति. २. उत्कर्ष; उन्नति. ३. ख्याति.

फ़रोगुज़ाश्त– *स्त्री.* [*फ़ा.*] १. उपेक्षा; दुर्लक्ष. २. टाळाटाळ. ३. चूक. [करणारा.

फ़रोश–*पु.*[*फ़ा.*] विक्रेता; विक्री

फ़रोशी–*स्त्री.*[*फ़ा.*]विक्री; विक्रय.

फ़र्क़– *पु.* [*अ.*] फरक; भेद; अंतर. [पुत्र.

फ़र्ज़ंद– *पु.* [*फ़ा.*] मुलगा;

फ़र्ज– *स्त्री.* [*अ.*] भेग; फट.

फ़र्ज़– *पु.* [*अ.*] कर्तव्य. –*वि.* गृहीत; मानलेलें. **मु०–अदा करना**– कर्तव्यपालन करणें. –**करना**– गृहीत धरणें; मानणें.

फ़र्ज़ी– *वि.* [*अ.*] १. कल्पित; काल्पनिक. २. नाममात्र. ३. बनावटी; नकली.

फ़र्द– *स्त्री.* [*अ.*] १. धोतराचें किंवा कागदाचें एक पान; ताव; बंद. २. पदर. ३. यादी; सूची. –*वि.* एकटा; एकाकी. –*पु.* १. व्यक्ति; एकटा माणूस. २. गंजीफ्याचें पान. –**जुर्म**–*स्त्री.* गुन्ह्याची यादी. –**हिसाब**–*स्त्री.* हिशेबाचें टिप्पण.

फ़र्दन–फ़र्दन –*अव्य.* [*अ.*] वेगवेगळें; प्रत्येक व्यक्तीकडून.

फ़र्र–*पु.* [*अ.*] झगझगाट; थाटमाट; रुबाब.

फ़र्राटा–*पु.* १. वेग. २. चपलता. **मु०–भरना; –मारना**– वेगानें धांवणें; भर्रकन् जाणें.

फ़र्राश– *पु.* [*अ.*] १. फरास; बैठक साफ करणारा व बिछायती घालणारा नोकर. २. झाडझूड करणारा नोकर. ३. तंबू ठोकणारा. –**ख़ाना**–*पु.* तंबू, बिछायती इ० सामान ठेवावयाची खोली.

फ़र्श– *पु.* [*अ.*] १. बिछायत. २. फरशी; गच्ची. **मु०–से अर्श तक** –जमिनीपासून आभाळापर्यंत.

फ़र्शी–*वि. स्त्री.* पा. 'फ़रशी'.

फलंक*–*पु.* १. उडी. २. आकाश.

फल–*पु.* १. फळ. २. परिणाम; निकाल. ३. गुण; प्रभाव. ४ नांगराचा फाळ. –**तंतु**–*पु.* 'कार्पोफोर'. –**दान**–*पु.* साखरपुड्याचा विधि; वाङ्निश्चय. –**परिरक्षण**–*पु.* फलसंरक्षण; रासायनिक साधनांनीं फळें टिकवून ठेवणें; 'प्रिझर्व्हेशन ऑफ फ्रूट्स'. –**शाक**–*पु.* फळभाजी. **मु०– पाना**–१. परिणाम भोगावयास लागणें. २. चांगलें फळ मिळणें.

फलक–*पु.* १. फळा. २. चादर. ३. पान; पृष्ठ. ४ तळ-हात.

फ़लक–*पु.* [*अ.*] १. आकाश. २. स्वर्ग.

फलकना– *क्रि. अ.* १. फडकणें; फडफडणें. २. डचमळणें.

फलका–*पु.* भाजल्यामुळें आलेला फोड.

फ़लकी–*वि.* [*अ.*] आकाशीय; आकाशांतील. [णामस्वरूप.

फलतः–*अव्य.* यासाठीं; परि-

फलदा+–*पु.* टपोरें जांभूळ.

फलन–*पु.* १. फळ धरणें; फळणें. २. कार्य; 'फंक्शन'.

फलना–*क्रि. अ.* १. फळ धरणें; फळणें. २. मुलें होणें. ३. अंगावर फोड उठणें. **मु०–फूलना**– भाग्य फळफळणें; मुलेंबाळें होणें; सुखसंपत्ति लाभणें. [दर्शनशास्त्र.

फ़लसफ़ा–*पु.* [*अ.*] तत्त्वज्ञान;

फ़लसफ़ी–*पु.* [*अ.*] तत्त्वज्ञ; दार्शनिक. [अमका.

फ़लाँ–*वि.* [*अ.*] फलाणा;

फलाँग*– *स्त्री.* १. उडी. २. मल्लखांबावरील एक कसरत.

फलाँगना*–*क्रि. अ.* उडी मारणें; ओलांडणें. [वेत्ता प्लेटो.

फ़लातूँ+–*पु.* [*यू.*] ग्रीक तत्त्व-

फलाना–*वि.* फलाणा; अमुक.

फलार+–*पु.* फराळ; फलाहार.

फलाले(लै)न–*पु.* [*इं.*] लोकरीचें कापड; 'फलॅनेल'.

फलित–*वि.* १. संपन्न; परिपूर्ण. २ पिकलेला. **–ज्योतिष–पु.** फलज्योतिष.

फली– *स्त्री.* शेंग.

फ़लीता–*पु.* [*अ.*] पलिता.

फल्हार+–*पु.* फलाहार; फराळ.

फ़व्वारा–*पु.* [*अ.*] कारंजें; फवारा.

फसकड़ा+–*पु.* फतकल. **मु०–मारना**–फतकल मारून बसणें.

फसकना+–*क्रि. अ.* १.फाटणें; टरकणें. २. रुतणें; घुसणें.

फ़सल– *स्त्री.* [*अ.*] १. ऋतु; मोसम. २. हंगाम. ३. धान्य; पीक.

फ़सली–*वि.* [*अ.*] हंगामी; मोसमांतील.**–सन्**; **–साल–पु.** अकबरानें हिंदुस्थानांत सुरू केलेला एक शक. हा मुख्यतः जमीन, पिकें, महसूल, खंड इ० चा हिशेब ठेवण्यासाठीं वापरला जातो.

फ़साद–*पु.* [*अ.*] १. बिघाड; विकार. २. दंगा; तंटा; बखेडा; भांडण. ३. उपद्रव; गडबड.

फ़सादी– *वि.* [*अ.*] उपद्रवी; भांडखोर. [कहाणी; गोष्ट.

फ़साना–*पु.* [*फा.*] कथा;

फ़साहत– *स्त्री.* [*अ.*] १. विषयाचें सुंदर वर्णन. २. वक्तृत्वशक्ति. ३. प्रसादगुण.

फ़सील–*स्त्री.* [*अ.*] शहराभोंवतालचा कोट, तट.

फ़सीह–*वि.*[*अ.*] १. वक्तृत्वशक्ति असलेला (वक्ता). २. अस्खलित; प्रसादयुक्त.

फ़सूँ–*पु.*[*अ.*] जादूटोणा; मंत्र. **–गर**–*वि.* १. मांत्रिक. २.जादूगार.

फ़स्द– *स्त्री.* [*अ.*] दूषित रक्त काढून टाकण्यासाठीं रक्तवाहिनी कापण्याची क्रिया. **मु०– खोलना**; **–लेना**–शिरेंतील दूषित रक्त काढून टाकणें; शीर कापणें.

फ़स्ल– *स्त्री.* [*अ.*] १. शेतांतील उत्पादन; पीक. २. मोसम; ३. पुस्तकांतील परिच्छेद; **–(स्ले) गुल**–*स्त्री.* फुलांचा मोसम; वसंत ऋतु.**–बहार**– *स्त्री.* वसंत ऋतु.

फ़हम– *स्त्री.*[*अ.*] १. ज्ञान. २. ग्रहणशक्ति; धारणाशक्ति. ३. बुद्धि ४. समजूत.

फ़हमाइश–*स्त्री.* [*अ.*]–१.समजावणें; शिकविणें. २. इशारा देणें. [फडणें.

फहरना–*क्रि.अ.* फडकणें; फड-

फहराना–*क्रि. स.* फडकविणें.

फ़हश–*वि.* [*अ.*] अश्लील; गलिच्छ. [तुकडा.

फाँक– *स्त्री.* [*अ.*] फाक; फोड;

फाँकना–*क्रि. स.* फांकणें; फक्की मारून खाणें. **मु० धूल फाँकना**–विपत्ति भोगणें.

फाँका–*पु.* १. फक्की. २. फोड. ३. उडणारा टोळ; 'लोकस्ट हॉपर'. [गुंडाळलेला भाग.

फाँड़ा+–धोतराचा कमरेभोंवतीं

फाँद– *स्त्री.* १. उडी. २. फांस; जाळें.

फाँदना–*क्रि. अ.* उडी मारणें. कुदणें.–*क्रि. स.* १. ओलांडणें. २.* जाळ्यांत अडकविणें.

फाँफट*–*पु.* केरकचरा.

फाँफी–*स्त्री.* १. पापुद्रा.२. साय.

फाँस– *स्त्री.* १. पाश; बंधन. २. जाळें.

फाँसना–*क्रि. स.* १. जाळ्यांत अडकविणें. २. फशीं पाडणें; फसवून आपली हुकमत चालविणें.

फाँसी– *स्त्री.* १. फांशी. २. जाळें; फांस. **मु०–चढ़ना**–फांशीं जाणें.**–चढ़ाना**; **–देना**– फांशीं देणें.

फ़ाइल–*पु.* [*अ.*] १. कर्म करणारा. २. क्रियापदाचा कर्ता (व्या.)

फ़ाक़ा–*पु.* [*अ.*] १. उपास; लंघन. २. उपासमार.**–कश**–*वि.* १. निर्धन; कंगाल. २. उपासमार होत असलेला; अर्धपोटी. **–कशी**– *स्त्री.* उपासमार; उपवास **–मस्त**; **–(के) मस्त**– *वि.* उपाशी असून देखील बेपर्वा असणारा; गरिबींतहि निश्चित राहाणारा.

फ़ाख़्तई–*वि.* [*अ.*] तांबूस; खाकी; पारव्याच्या रंगाचा.

फ़ाख़ता; **फ़ाख़्ता**– *स्त्री.* [*अ.*] पारवा; होला. **मु०–उड़ जाना**–घाबरगुंडी वळणें.

फाग–*पु.* १. होळीचा सण; शिमगा. २. होळीचें गीत.

फाग(गु)न–*पु.* फाल्गुन महिना.

फ़ाज़िल–*वि.* [*अ.*] १.विद्वान्; पंडित. २. जरुरीपेक्षां अधिक; फाजील.

फाटक–*पु.* १. मोठा दरवाजा; फाटक. २. कोंडवाडा. **–दार–पु.** कोंडवाड्याचा व्यवस्थापक.

फाटका–*पु.* सट्टा. **–(के) बाज़–***पु.* सट्टेबाज.

फाड़ना–*क्रि.स.* १. फाडणें. २. कापणें. ३. नासविणें (दूध).

फाड़ खाऊ–*वि.* १. फाडून खाणारा. २. बुजून उधळलेला.

फ़ातिहा– *स्त्री. पु.* [*अ.*] १. आरंभ; कुराणाचा पहिला अध्याय. २. मृत व्यक्तीच्या सद्गतीसाठी केली जाणारी प्रार्थना. (इस्लाम). **–ख़्वानी**–*स्त्री.* फातिहा म्हणण्याचा विधि. **मु० –पढ़ना**–निराश होणें. [णारा; नश्वर.

फ़ानी–*वि.* [*अ.*] नाश पाव-

फ़ानूस–*पु.* [*फा.*] १. दिव्याची कांच. २. हंडी; कंदील; ज्यांत मेणबत्ती पेटवून ठेवतात तो कांचेचा

पेला.–(से)ख़याल– *पु.* एक प्रकारचा कागदी कंदील. यांतील कागदी हत्ती-घोडे वाऱ्यानें फिरतात व त्यांची छाया कंदिलावर पडते. [झालेली म्हातारी.

फाफा– *स्त्री.* तोंडाचें बोळकें

फाबना*– *क्रि. अ.* शोभणें; सुंदर दिसणें.

फ़ायदा–*पु.* [*अ.*] नफा; लाभ. –(**दे**)**मंद**–*वि.* फायदेशीर; लाभदायक; गुणकारी.

फाया–*पु.* पा० 'फाहा'.

फ़ारख़ती– *स्त्री.* [*अ.* 'फारिग़-ख़ती] कर्जमुक्त झाल्याची पावती; ऋणविमोचनपत्र. [चिरणें.

फारना*–*क्रि. स.* फाडणें;

फ़ारस–*पु.* [*अ.*] इराण देश.

फ़ारसी– *स्त्री.* [*फा.*] फारसी भाषा.–*वि.*इराणी. **मु०–बघारना**– वेळीं-अवेळीं आपली विद्वत्ता दाखविण्यासाठीं फारसी बोलणें.

फ़ारिग़्–*वि.* [*अ.*] काम करून मोकळा झालेला; मुक्त; स्वतंत्र; निवृत्त. –**ख़ती**– *स्त्री.* कर्ज फिटल्याची पावती. **मु०–होना**– १. निवृत्त होणें. २. शौचाला जाणें.

फाल– *स्त्री.* १. नांगराचा फाळ. २. ढलपा. ३. कातरलेली सुपारी. ४. पाऊल; एक पावलाचें अंतर.

फ़ाल– *स्त्री.* [*अ.*] शकुनविद्या; ज्योतिष.

फालतू– *वि.* १. निरर्थक; निरुपयोगी. २. जरुरीपेक्षां अधिक; फाजील. [तांबडया रंगाचा.

फ़ालसई– *वि.* [*फा.*] निळसर

फ़ालसा– *पु.* [*फा.*] पिंपरीच्या फळासारखें एक आंबट फळ. याचें उन्हाळ्यांत सरबत करतात.

फ़ालिज–*पु.* [*अ*] पक्षाघात; अर्धांगवायु. **मु०–गिरना; –मारना**– अर्धांगवायूचा झटका येणें; पक्षाघात होणें. [रची शेवयांची खीर.

फ़ालूदा– *पु.* [*फा.*] एक प्रका-

फ़ालेज़– *स्त्री.* [*फा.*] १. कलिंगडाचें, काकडीचें शेत २. उपवन; बाग; वाटिका.

फावड़ा– *पु.* फावडें; खोरें. **मु०–बजाना**– खणून पाडणें; जमीनदोस्त करणें.

फ़ाश– *वि.* [*फा.*] स्पष्ट; प्रकट; उघड झालेला. **मु० परदा–करना**– बिंग फोडणें. [लांबी.

फ़ासला– *पु.* [*अ.*] अंतर;

फ़ासिज्म–[*इं.*] *पु.* हुकूमशाही; झोटिंगशाही; 'फॅसिझम'.

फ़ासिद– *वि.* [*अ.*] १. भांडखोर. २. चिडलेला. ३. दुष्ट; पाजी. ४. दूषित; बिघडलेलें.

फ़ासिल– *वि.* [*अ.*] विभक्त करणारा. [लांबी.

फ़ासिला– *पु.* [*अ.*] अंतर;

फाहा– *पु.* १. फाया; औषध, अत्तर किंवा तेल इ० चा बोळा. २. मलमपट्टी.

फ़ाहिशा– *स्त्री.* [*अ.*] छिनाल, कुलटा, वाईट आचरणाची स्त्री.

फिंकवाना– *क्रि. स.* दुसऱ्याकडून फेंकविणें.

फ़िकर– *स्त्री.* पा० 'फ़िक्र'.

फ़िक़रा– *पु.* [*अ.*] १. वाक्य. २. व्यंग; व्याजोक्ति. ३. थाप. –(**रे**)**बाज़**– *वि.* १. थापेबाज; धोखेबाज. २. व्यंगी; उपरोधिक बोलणारा.

फ़िक़ाह– *पु.* [*अ.*] इस्लामी धर्मशास्त्र; धार्मिक कायदा.

फिकैत– *पु.* फरीगदगा, पट्टा, बोथाटी इ० खेळणारा.

फ़िक्र– *स्त्री.* [*अ.*] १. चिंता; काळजी. २. लक्ष; ध्यान; चिंतन. ३. उपाय; युक्ति. –**मंद**– *वि.* चिंताग्रस्त; काळजींत असलेला.

फ़िगार– *वि.* [*फा.*] घायाळ; जखमी.

फिचकुर+– *पु.* मूर्च्छा आली असतां तोंडातून येणारा फेस.

फ़िज़ा– *स्त्री.* [*अ.*] १. मोकळें मैदान. २. वातावरण. ३. शोभा.

फ़िज़ूल– *वि.* [*फा.*] निरर्थक; अनावश्यक.–*अव्य.* व्यर्थ.–**ख़र्च**–*वि.* उधळ्या.–**ख़र्ची**–*स्त्री.* उधळपट्टी.

फिटकरी–*स्त्री.* तुरटी; 'अॅलम'.

फिटकार– *स्त्री.* १. झिडकार; तिरस्कार. २. शिव्याशाप.

फिटकिरी– *स्त्री.* तुरटी.

फिटकी– *स्त्री.* १. खडी; चिटाच्या कापडावरील ठिपका. २. तुरटी. ['व्हिक्टोरिया'.

फिटन– *स्त्री.* [*इं.*] बग्गी; चार चाकांची खुली गाडी;

फिट्टा– *वि.* १. अपमानित; धिक्कारलेला; तिरस्कृत. २. हिरमुसलेला; खजील.

फ़ितना– *पु.* [*अ.*] १. भांडणतंटा. २. दंगा. ३. पाप. –**अंदाज़**; –**परदाज़**– *वि.* भांडखोर; कलागती लावणारा.

फ़ितर– *पु.* [*अ.*] दिवसभर उपवास करून संध्याकाळीं उपवास (रोजा) सोडणें.

फ़ितरत– *स्त्री.* [*अ.*] १. स्वभाव. २. हुशारी; बुद्धिमत्ता. ३. धूर्तपणा. ४. निसर्ग; सृष्टि.

फ़ितरतन्– *अव्य.* [*अ.*] स्वभावतः; नैसर्गिकरीत्या.

फ़ितरती– *वि.* [*अ.*] १. स्वाभाविक. २. नैसर्गिक. ३. खटयाळ; लुच्चा.

फ़ितरी– *वि* [*अ.*] १. स्वाभा-

विक. २. नैसर्गिक. ३. जन्मजात; जन्मसिद्ध.

फ़ितूर– *पु.* [*अ.*] १. विकार; बिघाड. २. तंटा; बखेडा; उपद्रव.

फ़िदवी– *वि.* [*अ.*] १. नम्र; सेवक २. स्वामिभक्त; आज्ञाधारक.

फ़िदा– *वि.* [*अ.*] १. आसक्त; अनुरक्त. २. एखाद्यासाठीं प्राण देण्यास तयार असलेला.

फ़िदाई– *वि.* [*अ.*] फिदा झालेला; मोहित झालेला.– *पु.* इस्माईलिया पंथाचा अनुयायी.

फ़िरंग– *पु.* [*फा.*] १. फ्रान्स देश. २. गोऱ्यांचा देश; युरोप. ३. गरमी (रोग).–**रोग**–*पु.* संभोगजन्य रोग; गरमी, परमा इ०; 'व्हिनीरिअल डिसीझ'.

फ़िरंगिस्तान–*पु.* [*फा.*] युरोप.

फ़िरंगी– *पु.* [*फा.*] युरोपियन; गोरा. –*स्त्री.* विलायती तलवार.

फिरंट– *वि.* फितूर झालेला; उलटलेला.

फिर– *अव्य.* १. नंतर; मग; पुन्हां; फिरून एकदां. २. पुढें केव्हांतरी; भविष्यकाळीं. ३. त्या वेळीं; तेव्हा, ४. शिवाय. –**फिर**– *अव्य.* वारंवार; फिरूनफिरून. –**भी**–*अव्य.* तरीहि; तरीदेखील.

फ़िरऔन–*पु.* [*अ.*] ईजिप्तच्या प्राचीन बादशाहांची पदवी. –वि घमेंडखोर.

फ़िरक़ा–*पु.* [*अ.*] १. जमात. २. टोळी; गट. ३. पंथ; संप्रदाय. –**बंदी**– *स्त्री.* गटबाजी. —**वाराना**– *वि.* जातीय; सांप्रदायिक.

फिरकी– *स्त्री.* १. भिंगरी; फिरकी. २. सुताचें रीळ.

फिरता–*पु.* परत करणें; अस्वीकार. –*वि.* स्वीकार न करितां परत पाठविलेला. [स्वर्ग. ३. उद्यान.

फ़िरदौस–*पु.* [*अ.*] १. बाग. २.

फिरना–*क्रि.अ.* १. इकडेतिकडे फिरणें; हिंडणें. २. फिरावयास जाणें. ३. परतणें. ४. वळणें. ५. उलटें किंवा विपरीत होणें. ६. वांकडें होणें. ७. वचनभ्रष्ट होणें; एकदां कबूल केलेलें नंतर नाकबूल करणें.–*क्रि.स.* शौच करणें. **मु० जी फिरना** – विरक्त होणें. **सिर फिरना**–डोकें फिरणें; बुद्धि भ्रष्ट होणें.

फ़िरनी–*स्त्री.* [*फा.*] वांटलेल्या तांदुळाची खीर.

फ़िराक़–*पु.* [*अ.*] १. वियोग; विरह. २. चिंता; काळजी. ३. शोध. ४. विचार.

फ़िराक़िया–*वि.* [*अ.*] वियोगात्मक; विरहात्मक. –**नज़्म**–*स्त्री.* विरहगीत.

फ़िराग–*पु.* [*अ.*] १. मुक्ति; सुटका.२. सवड; फुरसत. ३ आनंद; खुषी. ४. संतोष. ५. अधिकता.

फिराना–*क्रि. स.* २. एकीकडून दुसरीकडे चालविणें; फिरविणें. २. परतविणें. ३. वळविणें. ४ शौच करविणें

फ़िरार–*पु.* [*अ.*] पलायन.

फ़िरारी–*वि.* [*अ.*] पळून गेलेला; फरारी.

फ़िरासत– *स्त्री.* [*अ.*] बुद्धिमत्ता; समजूतदारपणा.

फ़िरिश्ता–*पु.* [फा.] देवदूत.

फ़िलजुमला–*अव्य.* [*अ.*] १. तात्पर्य; थोडक्यांत. २ असेंच. ३. कांहींसें; थोडें बहुत.

फ़िलफ़ौर–*अव्य.* [*अ.*] १. ताबडतोब. २. देवाप्रीत्यर्थ.

फ़िलहक़ीक़त–*अव्य.* [*अ.*] वस्तुतः; खरोखरीं.

फ़िलहाल–*अव्य.* [*अ.*] यावेळीं; सध्यां.

फिल्ली+– *स्त्री.* पिंडरी; पोटरी.

फ़िश–*अव्य.* [*फा.*] शिः; छिः

फिस–*वि.* निःसार; कांहीं नाहीं **मु० टायँ टायँ फिस**–ओंफस.

फिसड्डी–*वि.* कामांत नेहमीं मागें पडणारा; निरुपयोगी.

फिसलन– *स्त्री.* १. घसरडें; निसरडें. २. चूक; प्रमाद.

फिसलना–*क्रि. अ.* १. घसरणें; निसरणें. २. प्रवृत्त होणें; वळणें (वाइटाकडे). [यादी.

फ़िहरिस्त– *स्त्री.* [*फा.*] सूची;

फींचना+–*क्रि. स.* कपडा चुबकणें.

फ़ी–*अव्य.* [*अ.*] मध्यें; पैकीं; प्रत्येकी –**कस**–*अव्य.* दर माणशीं. –**सदी**; –**सैकड़े**–*अव्य.* दर शेंकडा.

फीका–*वि.* १. नीरस; बेचव. २. फिक्कट; मळलेला. ३. निस्तेज; निष्प्रभावी. ['लादर'.

फीण–*पु.* साबणाचा फेस;

फ़ीता–*पु.* [*पोर्तु.*] १. कपडचाची पट्टी; फीत. २. बुटाचा बंद. ३. नाडी; 'रिबन'. [२. भाग्यवान्.

फ़ीरोज़–*वि.* [*फा.*] १. विजयी.

फ़ीरोज़ा–*पु.* [*फा.*] नीलमणि; नीळ (रत्न).

फ़ीरोज़ी–*वि.* [*फा.*] हिरवी झांक असलेला निळा; निळसर हिरवा. –*स्त्री.* १. विजय; यश. २. भाग्योदय.

फ़ील–*पु.* [*फा.*] हत्ती.–**ख़ाना**– –*पु.* गजशाळा. –**पा**–*पु.* हत्तीरोग; पायसुजण्याचा रोग. –**पाया**–*पु.* मोठा खांब; स्तंभ. –**बान**; –**वान**– *पु.* माहूत.

फ़ीली– *स्त्री.* पिंडरी; पोटरी.

फ़ीस– *स्त्री.* [*इं.*] शुल्क; 'फी'.

फ़ीसागोरस–*पु.* [*अ.*] ग्रीक तत्त्वज्ञ व शास्त्रज्ञ पायथ्यागोरस.

फुँकना–*क्रि. अ.* १. फुंकलें जाणें. २. जळणें; राख होणें. ३. नष्ट होणें. [लोहाराचा भाता.

फुँकनी– *स्त्री.* १ फुंकणी. २

फुँकरना–*क्रि. अ.* १. फूं फूं करणें. २. फूत्कार सोडणें; फुसकारणें.

फुँकवाना; फुँकाना–*क्रि. स.* फुंकविणें; फुंकण्याचें, जाळण्याचें काम दुसऱ्याकडून करविणें.

फुंकार–*पु.* फूत्कार.

फुँकारना–*क्रि. अ.* फुसफुसणें; फूत्कार करणें.

फुँदकी–*स्त्री.* १. गांठ. २. बिंदी.

फुँदना–*पु.* गोंडा.

फुँदिया– *स्त्री.* गोंडा. [फोड.

फुंसी– *स्त्री.* पुटकुळी; लहानसा

फुआ– *स्त्री.* आत्या.

फुआरा⁺–*पु.* कारंजें.

फुकना–*पु.* १. फुगा. २. मोठी फुंकणी. ३. मूत्राशय.–*क्रि. अ.* पा० 'फुँकना'.

फुकनी– *स्त्री.* फुंकणी.

फुचड़ा–*पु.* दशी; सतरंजी इ० चें विणाईच्या बाहेर आलेलें सूत.

फ़ुज़ला–*पु.* [*अ.*] उरलेला भाग; गाळ; चोथा.

फ़ुज़ूल–*वि.* [*फा.*] अनावश्यक; निरर्थक; व्यर्थ; फाजील.–**खर्च**–*वि.* उधळ्या.–**ख़र्ची**– *स्त्री.* उधळपट्टी.

फुट–*वि.* १. एकटा; एकाकी. २. विजोड. ४. अलग; वेगळा. –**मत**–*पु.* मतभेद. [माप; फूट.

फ़ुट–*पु.* [*इं.*] बारा इंचांचे

फुटक–*पु.* फोड.

फुटकर–ल–*वि.* १. एकटा. २. वेगळा. ३. थोडाथोडा. ४. फुटकळ; किरकोळ.–*पु.* मोड; खुर्दा. –**निधि**–*स्त्री.* आकस्मिकता–निधि; 'कंटिंजन्सी फंड'.

फुटका–*पु.* १. फोड. २. लाही.

फुटकी– *स्त्री.* १. बारीक गांठ. २. दाट वस्तूचा ठिपका, शितोडा.

फुट(टे)हरा– *पु.* फुटाणा.

फुट्टैल–*वि.* १. कळपांतून वेगळें पडलेलें (जनावर); जोडीदार नसलेला. २. दुर्दैवी; फुटक्या नशिबाचा. [पुळी.

फुड़िया– *स्त्री.* लहान फोड;

फ़ुतूर– *पु.* [*अ.*] १. विकार; बिघाड. २. नुकसान; हानि. ३. बाधा; विघ्न. ४. उपद्रव. ५. घटना. ६. कमजोरी.

फ़ुतूरिया; फ़ुतूरी– *वि.* [*अ.*] उपद्रवी; विघ्नसंतोषी.

फुदकना– *क्रि. अ.* १. टुणटुण उडी मारणें; कुदणें. २. नाचणें. बागडणें.

फुदकी– *स्त्री.* लहान चिमणी.

फुनगी– *स्त्री.* १. कोंवळा शेंडा; बारीक डहाळी. २. अंकुर; कोंब.

फुप्फुस–प्रदाह–*पु.* 'न्यूमोनिया' (आजार).

फुफँदी– *स्त्री.* १. साडीची, विजारीची किंवा लेहेंग्याची नाडी. २. लुगडयाची कमरेंतील गांठ.

फुफकाना*; **फुफकारना**–*क्रि. अ.* फूत्कार टाकणें; फुसफुसणें.

फुफकार–*पु.* फूत्कार; फुसफुस.

फुफी–फू*– *स्त्री.* आत्या. [इ०).

फुफेरा–*वि.* आते (भाऊ, बहीण

फुर*– *वि.* सत्य; खरें.–*स्त्री.* फडफड; उडतांना होणारा पंखांचा आवाज. – **से**–*अव्य.* भुर्रकन.

फ़ुरकत– *स्त्री.* [*अ.*] वियोग; विरह. [पणा.

फुरती– *स्त्री.* चपलता; जलदपणा.

फुरतीला–*वि.* १. चपळ; वेगवान्. २. चलाख.

फुरना*– *क्रि. अ.* १. स्फुरणें; उद्भवणें. २. खरें ठरणें.

फुरफुराना– *क्रि. अ.* पंख फडफडणें; उतरतांना पंखांचा आवाज होणें. –*क्रि. स.* पंखांचा आवाज करणें. [पंखांचा आवाज.

फुरफुरी– *स्त्री.* फडफड;

फ़ुरसत– *स्त्री.* [*अ.*] १. सवड; वेळ. २. निवृत्ति. ३. आराम.

फुरहरी– *स्त्री.* १. कांपरें; कंप; रोमांच. २. फडफड. ३. अत्तराचा किंवा औषधाचा बोळा; फाया. **मु०–लेना**–थरथरणें.

फुराना– *क्रि. अ.* खरें होणें. –*क्रि. स.* खरें करणें; सिद्ध करणें.

फुरेरी– *स्त्री.* १. काडीच्या टोंकाला कापूस गुंडाळून बनविलेला बोळा. २. थरथर; थरथराट; कांपणें; रोमांच. **मु० लेना**– १. रोमांचित होणें; थरथरणें. २. सावध होणें.

फुल– 'फूल' चें समासांतील रूप. –**कारी**– *स्त्री.* कशिदा; वेलवुट्टीचें काम.–**झड़ी**– १. फुलबाजी. २. फुसकुली. ३. लावालावी करणारी स्त्री. –**वर**–*पु.* रेशमी वेलबुट्टीदार कापड. –**वाई***–**डी**–**री**– *स्त्री.* १. बागबगीचा; उद्यान. २. कागदाची बाग (वरातीच्या वेळीं बरोबर नेली जाणारी). –**वार**– *वि.* प्रसन्न; प्रफुल्लित. –**हारा**–*पु.* माळी.

फुलका–*पु.* १. लहान पातळ चपाती. २.* फोड.–[*स्त्री.* **फुलकी**.]

फुलाना– *क्रि. स.* १. फुगविणें. २. पुलकित किंवा आनंदित करणें. ३ फुलांनीं सजविणें. ४. हरभऱ्याच्या झाडावर चढविणें. **मु० मुँह**

फुलाना–रुसणें; तोंड फुगविणें.

फुलाव–पु.; **फुलावट**–स्त्री. १. सूज. २. फुगवटा; वाढ.

फुलावा–पु. वेणीला बांधण्याची गोंडेदार दोरी; गोंडा.

फुलिंग–गा–पु. ठिणगी; स्फुल्लिंग.

फुलिया– स्त्री. १. खिळा; चूक. २. कानांतील लवंग; चमकी.

फुलेरा–पु. फुलांनीं शृंगारलेली छत्री.

फुलेल–पु. सुगंधी तेल.

फुलेली– स्त्री. सुगंधी तेलाची बाटली, भांडें. [तोरण.

फुलेहरा*–पु. सुती किंवा रेशमी

फुलौरा–पु. मोठें भजें; बोंड.

फुलौरी– स्त्री. बेसनवडी.

फुल्ल–वि. उमललेलें; प्रफुल्ल; प्रसन्न.–पु. फूल.

फुल्ली– स्त्री. १. डोळ्यांतील फूल. २. चमकी; मोरणी.

फुस– स्त्री. अत्यंत हळू काढलेला, अस्पष्ट आवाज. **–फुस**– स्त्री. अस्पष्ट आवाजांत बोलणें; कानगोष्ट.

फुसकी– स्त्री. फुसकुली.

फुसफुसा–वि. १. भुसभुशीत. २. ठिसूळ; पोंचट; फुसका.

फुसफुसाना–क्रि. स. हलक्या किंवा दबलेल्या आवाजांत बोलणें.

फुसलाना–क्रि. स. १. फूस लावणें; भुरळ पाडणें. २. बहकावणें. [जादूगार.

फ़ुसूँ–पु. [फा.] जादू.**–गर**–पु.

फुहार– स्त्री. १. तुषार; थेंब. २. पावसाची झिमझिम.

फुहारा–पु. कारंजें; फवारा.

फुही– स्त्री. पा० 'फुहार'.

फूंक– स्त्री. १. फुंकर. २. श्वास. ३. झुरका. **झाड़फूंक**– स्त्री. मंत्रतंत्राचा उपचार. **मु०–निकल जाना**–प्राण निघून जाणें; मरणें.

फूंकना–क्रि. स. १. फुंकणें. २. फुंकर मारणें. ३. तोंडानें वाजविणें (सनई, शंख इ०). ४. आग लावणें; जाळून टाकणें. ५. उधळपट्टी करणें ६. मंत्र घालणें.

फूंका– पु. १. फुंकर. २. जास्त दूध काढण्यासाठीं गायीच्या जननेंद्रियांत घालतात ती फुंकणी. ३. फोड. ४. जळजळ उत्पन्न करणारें औषध भरलेली नळी. गायीच्या स्तनांना लावून व तींत फुंकून सारें दूध काढून घेण्याची पद्धत.

फूंद– स्त्री.; **फूंदा***–पु. १. गोंडा. २. नाडी.

फूआ–पु. आत्याचा नवरा.

फूई– स्त्री. तुषार; बेंब. **मु० –फूई ताल भरता है**–थेंबें थेंबें तळें साचें.

फूट– स्त्री. दुही; वैमनस्य; फाटाफूट; मतभेद.–पु. एक प्रकारची मोठी काकडी; फूट. **मु०–डालना**–फूट पाडणें.

फूटना–क्रि. अ. १. फुटणें. २. अलग होणें; तुटणें. ३. अंकुर, शाखा फुटणें. ४. फुटून निघणें. ५. उमलणें; विकसणें. ६. तोंडांतून शब्द बाहेर निघणें. ७. सांधे दुखणें. ८. प्रतिपक्षाला जाऊन मिळणें. **मु० फूट फूट कर रोना**–ओक्साबोक्शीं रडणें.

फूटा–पु. १. शेतांत तुटून पडलेल्या ओंब्या. २. सांध्यांतील ठणका.–**(टी) कौड़ी**– स्त्री. फुटकी कवडी; निरुपयोगी वस्तु. **मु०–(टी) आँखों न देख सकना**–न पाहवणें; जळफळणें. **–आँखों न भाना**– मुळींच न आवडणें.

फूफा–पु. आत्याचा नवरा.

फूफी–फू– स्त्री. आत्या.

फूल–पु. १. पुष्प; फूल. २. वातीचा जळलेला भाग. ३. स्त्रियांचें रज; गर्भाशय. ४. मृताच्या अस्थी. ५. वेलबुट्टी. ६. कोडाचा चट्टा. ७. कांसें. ८. मुसलमानांतील मृत्यूनंतर तिसऱ्या किंवा पाचव्या दिवशींची फातिहा.– स्त्री.* १. उत्साह; उमंग. २. आनंद; प्रसन्नता.–**कारी**– स्त्री. वेलबुट्टी काढणें; कशिदा.–**गोभी**– स्त्री. फुलवर; फूलकोबी; 'फ्लॉवर'.–**दान**–पु. पुष्पगुच्छ ठेवण्याचें पात्र; 'फ्लॉवरपॉट'. **–वाली**– स्त्री. माळीण. **मु०–उतारना, लोढ़ना**–फुलें वेंचणें. **–चुनना** फुलें खुडणें. **–झड़ना**–तोंडांतून मधुर शब्द निघणें.**–सूँघ कर जीना, रहना**–अत्यंत थोडें खाऊन राहाणें. **–(लों) की चादर**–फुलें गुंफून त्यांना चादरीचा आकार देणें. पिरांच्या कबरींवर ही चादर वाहिली जाते. **–(लों) की छड़ी**–फुलांचे हार गुंडाळलेली काठी. [वाहाण.

फूलड़िया[+]– स्त्री. चप्पल;

फूलना–क्रि. अ. १. फुलणें; विकसणें. २. गर्वानें फुगणें. ३. सुजणें. ४. लठ्ठ, स्थूल होणें. ५. आनंदित उल्हसित होणें. ६. रुसणें; रागावणें. **मु० फूलकर कुप्पा हो जाना**–आनंदानें किंवा गर्वानें फुगून जाणें. **–फलना**–१. प्रगति होणें. २. सुखी होणें (शुभचिंतन). **फूले अंग न समाना**–अत्यंत आनंदित होणें.

फूली–स्त्री. मोतींबिंदु; डोळ्यांतील फूल.

फूस–पु. वाळलेलें गवत.

फूहड़–वि. १. मूर्ख; अडाणी; अजागळ. २. बेढब.– स्त्री. अजागळ स्त्री. **–पन**–पु. अडाणीपणा;

मूर्खता.

फ़ूही– *स्त्री.* पा० 'फुहार'.

फेंकना–*क्रि. स.* १. फेकणें; आपटणें; पाडणें. २. टाकणें; विसरणें. ३. अव्यवस्थित खर्च करणें. ४. वर उडविणें ५. घोडा वेगानें पळविणें. ['फेकरना'.

फेंकरना*–*क्रि. अ.* पा०

फेंट– *स्त्री.* १. वेढा; घेर. २. धोतराचा कमरेभोंवतीं गुंडाळलेला सोगा. ३. लहान पागोटें. **मु०–कसना अथवा बाँधना**–कमर कसणें, बांधणें.

फेंटना–*क्रि. स.* १. फेणणें; घोटणें. २. उगाळणें. ३. पिसणें (पत्ते).

फेंटा–*पु.* १. कमरेचा घेरा. २. कमरेला बांधावयाचें कापड; पटका; कमरेला गुंडाळलेला धोतराचा भाग. ३. लहान पागोटें; फेटा.

फेकरना*–*क्रि. अ.* १. ओक्साबोक्शीं रडणें; मोकाड पसरणें. २. कोल्हेकुई करणें. ३. बोडखें असणें.

फेण–न–*पु.* फेंस; बुडबुडे.

फेनिल–*वि.* फेंसाचा; फेंस असलेला; फसफसणारा; 'एअरेटेड'.

फेनी–*स्त्री.* फेणी (एक मिठाई).

फेफड़ा– *पु.* फुप्फुस.

फेफड़ी–री– *स्त्री.* ओंठ सुकल्यामुळें येणारा पापुद्रा.

फेर– *पु.* १. फेरा; चक्कर; परिवर्तन. २. उलथापालथ. ३. गोंधळ; बुचकळा; भ्रम; संशय. ४. अंतर; फरक. ५. भानगड; बखेडा. ६. हेलपाटा. ७. तोटा. ८. युक्ति; उपाय. *–अव्य.** १. पुन्हां. २. कडे. **–पलटा**– *पु.* पा० 'गौना'.– **फार**–*पु.* फेरबदल. **मु०–खाना**– भटकणें; लांबच्या रस्त्यानें येणें; फेरा पडणें.– **में पड़ना**– अडचणींत, कटकटींत अडकणें.

फेरना– *क्रि. स.* १. फिरविणें. २. परत करणें. ३. फिरविणें (माळेचे मणी). ४. वांकविणें. **मु०पानी फेरना**– नष्ट करणें.

फेरवट– *स्त्री.* १. चक्कर. २. पेंच. ३. शाकारणी.

फेरवा– *पु.* सोन्याचें वळें; सल्ला; वेढें.

फेरा–*पु.* १. गुंडाळा; फेरा; वेढा. २. प्रदक्षिणा. ३. सप्तपदी. ४. हेलपाटा. **मु०–देना**– भिकाऱ्याला कांहीं न देतां परतवून लावणें.

फेरि*– *अव्य.* पुन:

फेरी– *स्त्री.* १. फेरा; चक्कर; फेरी. २. सप्तपदी. **–वाला**–*पु.* दारोदार जाऊन विक्री करणारा.

फेरौरी+– *स्त्री.* शाकारणी.

फ़ेल–*पु.* [*अ.*] १. कार्य; कर्म. २. दुष्कर्म. ३. क्रियापद. **–मुतअद्दी**– *पु.* सकर्मक क्रियापद. **–लाज़िम**– *पु.* अकर्मक क्रियापद.

फेल– *वि.* [*इं.*] अनुत्तीर्ण; नापास. [यादी.

फ़ेहरिस्त– *स्त्री.* [*अ.*] सूची;

फैंसी–*वि.* [*इं.*] छानछोकीचा; 'फॅशनेबल'.

फैकनैत+– *पु.* डाव; पेंच.

फ़ैज़– *पु.* [*अ.*] १. परोपकार. २. लाभ; फायदा; कल्याण. ३. कृपा; दया. **– (ज़े)– आम**– *पु.* लोककल्याण. [उदार; थोर.

फ़ैयाज़– *वि.* [*अ.*] दाता;

फ़ैयाज़ी– *स्त्री.* १. दातृत्व. २. उदारपणा.

फैलना–*क्रि.* [*अ.*] १. पसरणें. २. स्थूल होणें. ३. वाढणें. ४. विखुरणें. ५. महशूर होणें; प्रसिद्धि पावणें. ६. आग्रह धरणें.

फ़ैलसूफ़– *पु.* [*यू.*] १. विद्वान्. २. धूर्त; लबाड. ३. अपव्ययी; उधळ्या.

फ़ैलसूफ़ी– *स्त्री.* [*यू.*] १. तत्त्वज्ञान. २. धूर्तता. ३. उधळेपणा.

फैलाना–*क्रि. स.* १. पसरविणें; विस्तृत करणें. २. वाढविणें. ३. विखुरणें. ४. प्रचलित करणें. ५. प्रसिद्ध करणें. ६. गणितांतील सर्व प्रक्रिया करून दाखविणें. [प्रसार.

फैलाव– *पु.* विस्तार; प्रचार;

फ़ैसल– *पु.* [*अ.*] १. निर्णय करणारा; न्यायाधीश. २. निर्णय; निकाल. [निकाल (कोर्टाचा).

फ़ैसला– *पु.* [*अ.*] निर्णय;

फैसिस्ट– *वि.* [*इं.*] हुकूमशाहीवर विश्वास असणारा; 'फॅसिस्ट'.

फोंक– *पु.* बाणाची मागची बाजू (येथें पंख लावतात.) [नळकांडें.

फोंका– *पु.* लांब व पोकळ

फोंफी–+ *स्त्री.* नळकांडें; फुंकणी.

फोक– १. सांका; गाळ. २. नीरस, बेचव पदार्थ. ३. चोथा; भुसा.

फोकट–*वि.* १. फुकट; मोफत. २. नि:सार; व्यर्थ.**–का**–*वि.* फुकटांतील. **–में**– फुकटांत.

फोकला–* *पु.* साल; फोलपट.

फोटा–*पु.* टिळा; बिंदी.

फोड़ना– *क्रि. स.* १. फोडणें; तोडणें. २. फूट पाडणें; तोडणें. ३. दुसऱ्या पक्षांतून आपल्या पक्षांत आणणें. ४. गुपित फोडणें.

फोड़ा– *पु.* फोड; व्रण.

फोड़िया– *स्त्री.* लहान फोड; पुटकुळी.

फ़ोता– *पु.* [*फ़ा.*] १. पिशवी; थैली. २. अंडकोष. ३. शेतसारा. **–(ते) दार**–*पु.* खजीनदार; कोषाध्यक्ष; पोतदार. **मु०–भरना** शेत-

सारा देणें.

फोरना–* *क्रि.स.* पा० 'फोड़ना'.

फ़ौआरा– *पु.* [*अ.*] फवारा; कारंजें.

फ़ौक़– *वि.* [*अ.*] उच्च; श्रेष्ठ.– *पु.* श्रेष्ठता. *अव्य.*– वर. मु०–**ले जाना**– वरचढ ठरणें.

फ़ौक़ियत– *स्त्री.* [*अ.*] श्रेष्ठता; वरचढपणा; मोठेपणा.

फ़ौज– *स्त्री.* [*अ.*] फौज; सैन्य. **–कशी**- *स्त्री.* सेनेचें आक्रमण; चढाई. **–दार**–*पु.* १. सेनानायक. २. कोतवाल.–**दारी**– *स्त्री.* १. फौजदाराचें पद. २. मारामारी. –०**अदालत**– *स्त्री.* फौजदारी न्यायालय.

फ़ौजी– *वि.* [*अ.*] सैन्यविषयक; फौजेसंबंधींचा.–*पु.* सैनिक.

फ़ौत– *स्त्री.* [*अ.*] १. नाश; नष्ट होणें. २. मृत्यु.– *वि.* मृत; मेलेला.

फ़ौती– *स्त्री.* [*अ.*] मृत्यूची सूचना. –*वि.* मृत्यूसंबंधींचा. **–नामा, रजिस्टर**– *पु.* मृत व्यक्तींची माहिती असलेली वही.

फ़ौरन्– *अव्य.* [*अ.*] झटपट; लगेच; तावडतोब.

फ़ौरी–*वि.* [*अ.*] निकडीचा; तावडतोबीचा; तात्कालिक.

फ़ौलाद–*पु.* [*फ़ा.*] पोलाद.

फौवारा–*पु.* पा० 'फौआरा'.

फ्रांसीसी–*वि.* [फ्रेंच] फ्रान्सचा. –*पु.* फ्रान्सचा रहिवासी. –*स्त्री.* फ्रेंच भाषा.

ब

ब – देवनागरी वर्णमालेच्या प वर्गांतील तिसरा वर्ण.

बंक*–*वि.* १. वांकडा; तिरपा; वक्र. २. पुरुषार्थी. ३. कठिण; वांका; दुर्गम. **–नाल**–*स्त्री.* सोनाराची वांकडी नळी.

बंक–*पु.* [*इं.*] बँक.

बंकट*–*वि.* वांकडातिकडा.

बंका*–*वि.* १. पा० 'बंक'. २. उत्तम; उत्कृष्ट. [पणा.

बंकाई– *स्त्री.* वक्रता; वांकडे-

बंकिम–*वि.* वक्र; वांकडा.

बंकुर*–*वि.* पा० 'बंक'.

बंग–*पु.* १. वंग; बंगाल प्रदेश. २. एक औषध.

बँगला–*वि.* बंगालचा; बंगालसंबंधींचा. **–***स्त्री.* बंगाली भाषा. –*पु.* १. बंगला. २. सर्वांत वरच्या मजल्यावरील हवेशीर खोली. ३. विडयाचें बंगाली पान.

बँगली+– *स्त्री.* १. बिलवर; बांगडी. २. विडयाच्या पानांची एक जात.

बंगा+–*वि.* १. वांकडा. २. उद्धट; उपद्रवकारक. ३. अडाणी.

बंचक–*पु.* धूर्त; ठग.

बंचकता; बंचकताई*– *स्त्री.* धूर्तता; फसवेगिरी.

बंचना*–*क्रि. स.* फसविणें, ठकविणें. –*स्त्री.* वंचना; फसवणूक.

बँचवाना-*क्रि. स.* वाचवून घेणें. [धरणें; इच्छिणें.

बंछना*–*क्रि. स.* अभिलाषा

बंजर–*वि.* ओसाड; नापीक; माळरान.

बंजारा–*पु.* वंजारी; लमाण.

बंझा+– *स्त्री.* वंध्या; वांझ.

बंटन–*पु.* वांटणी; वांटप; 'अॅलॉटमेंट'.

बँटना–*क्रि. अ.* १. विभागलें जाणें; हिस्से पडणें. २. वांटणी होणें; वांटलें जाणें.

बँटवाना–*क्रि. स.* दुसऱ्याकडून वांटणी करविणें. [वांटप.

बँटवारा–*पु.* बटवडा; वांटणी;

बंटा–*पु.* १. वाटोळा लहान डबा. २. मोठा लोटा; घागर.

बँटाई– *स्त्री.* १. वांटणी; विभागणी; वटवडा. २. बटाई; पिकांतील वांटणी.

बंटाढा (धा) र–*वि.* नष्ट; सत्यानाश (कर देना).

बँटाना–*क्रि. स.* १. वांटणी करविणें. २. आपला भाग वेगळा करून घेणें. ३. सामील होणें; हातभार लावणें.

बँड़ेर–रा– *पु.*; **बँडेरी**– *स्त्री.* तुळई; लग; आढें (कौलाराचें).

बंद–*पु.* १. बांध; धरण. २. कैद; बंधन. ३. गांठ. ४. शरीराचा सांधा. ५. कपडयाचा बंद. ६. पांच-सहा पंक्तींचा उर्दू काव्याचा भाग; कडवें. ७. कागदाचा ताव. –*वि.* १. बंद झालेला; थांबलेला. २. बांधलेला. ३. बांधणारा (नालबंद). **–गोभी**–*स्त्री.* कोबीचा गड्डा. **–साल**–*स्त्री.* बंदिशाळा; तुरुंग. मु०–**बंद ढीले कर देना**– दमविणें; दमछाक करणें.

बंदगी– *स्त्री.* [*फ़ा.*] १. नमस्कार; प्रणाम. २. सेवा. ३. भक्तिपूर्वक ईश्वराची वंदना.

बंदनवार–*पु.* तोरण.

बंदना–*क्रि. स.* नमस्कार करणें. – *स्त्री.* १. वंदना; प्रणाम. २. स्तुति.

बंदनीमाल– *स्त्री.* गळयापासून पायांपर्यंत लोंबणारी माळ.

बंदर–*पु.* माकड; वानर. **–घुड़की; –भबकी**–*स्त्री.* पोकळ दम; हुलकावणी; खोटी धमकी.

बंदर–*पु.* [*फा.*] बंदर. **–गाह**–*स्त्री. पु.* बंदर; बंदराचें शहर; 'सी पोर्ट'. [डीण; वानरी.

बँदरिया; बँदरी–*स्त्री.* माक-

बंदा–*पु.* [*फा.*] सेवक; दास. **–निवाज़**–*वि.* सेवकावर कृपा करणारा. **–परवर**–*वि.* सेवकाचें पालन करणारा.

बंदि–*स्त्री* बंधन; कैद. –*पु.* कैदी. **–कोष्ठ** *पु.* पोलीसकोठडी; 'लॉक-अप्'. **–प्रत्यक्षीकरण**–*पु.* कैद्याला न्यायाधीशाच्या समोर हजर करणें. 'हेबियस कॉर्पस'.

बंदिश–*स्त्री.* [*फा.*] १. गांठ. २. उपाय; योजना. ३. मांडणी; व्यवस्था. ४. षड्यंत्र. ५. दोषारोप. ६. शब्दयोजना; काव्यरचना.

बंदी–*पु.* १. भाट; चारण. २. कैदी.

बंदी–*स्त्री.* [*फा.*] १. बांधणें. २. कैद करणें. ३. कैद. ४. बंद राहाणें; बंदी. **–ख़ाना**–*पु.* तुरुंग; कच्च्या कैदेंत ठेवण्याची जागा; 'पोलिसकस्टडी'; 'लॉकअप'. **–छोर***–*पु.* बंधमुक्त करणारा. **–वान***–*पु.* कैदी.

बंदूक़–*स्त्री.* [*अ.*] बंदूक. **–ची**–*पु.* बंदूकवाला शिपाई. **मु०–दागना**– बंदूक उडविणें.

बंदोबस्त–*पु.* [फा.] १.व्यवस्था २. शेतजमिनीची मोजणी; 'सेटलमेंट'. २. शेत खंडानें देणें.

बंध–*पु.* १. बांध; धरण. २. बंधन. ३. अगवळ. ४. सांखळी; बेडी. ५. गांठ. ६. करारनामा; दस्तऐवज; 'बॉंड'. **–छुड़ाई**–*स्त्री.* लग्नांतील एक विधि. लग्न झाल्यानंतर तोरणाच्या पानाची गांठ वर सोडवितो व त्याबद्दल अहेर किंवा बक्षीस मागतो. **–पत्र**–*पु.* रोखा; 'बॉंड'.

बंधक–*पु.* १. गहाण ठेवलेली वस्तु; ठेव; 'मॉर्टगेज'. २. बंधन. ३. वायदा. **–कर्ता**–*पु.* गहाण ठेवणारा; ऋणको; 'मॉर्टगेजर'. **–गृहीता**–*पु.* गहाण ठेवून घेणारा सावकार; 'मॉर्टगेजी'.

बँधना–*क्रि. अ.* १. बांधलें जाणें. २. कैद होणें. ३. शब्दानें, वचनानें बांधलें जाणें. ४. क्रमबद्ध होणें; चालू होणें. ५. दुरुस्त होणें. ६. प्रेमपाशांत सांपडणें किंवा मुग्ध होणें. –*पु.** बंधन; बांधण्याचें साधन (दोरा इ०.) [घेणें.

बंधवाना–*क्रि. स.* बांधवून

बंधान–*पु.* १. देवघेवीचा व्यवहार; परिपाठ. २. बंधारा; बांध.

बँधाना–*क्रि. स.* १. धारण करविणें. २. बांधविणें.

बँधिया–*स्त्री.* लहान बांध.

बंधी–*पु.* १. बंदी. २. प्रतिबंध. –*वि.* बांधणारा.

बंधी–*स्त्री.* उकाडा; रतीब.

बंधु–*पु.* १. मित्र. २. भाऊ; नातेवाईक.

बंधुआ–वा–*पु.* कैदी; बंदी.

बंधुता–*स्त्री.* मैत्री; संबंध; आप्तभाव; 'अॅफिनिटी'.

बंधुर–*पु.* १. मुकुट. २. दुपारी (फूल). –*वि.* १. वांकलेला; वक्र. २. चढउताराचा; उंचसखल. ३. सुंदर. [फुलझाड).

बंधूक–प*–*पु.* दुपारी (एक

बंधेज–*पु.* १. रतीब; उकाडा; बंधी. २. प्रतिबंध; आळ; विरोध. ३. तह; करार; 'पॅक्ट'.

बंध्या–*वि. स्त्री.* वंध्या; वांझ. **–सुत**–*पु.* असंभव गोष्ट.

बंपुलिस–*स्त्री.* [*अनु.* 'बं'+इं. 'प्लेस'.] नगरपालिकेचा सार्वजनिक संडास.

बंब–*स्त्री.* १. रणभेरी; रणनाद. २. नगारा; डंका. ३*. अहंकार.

बंबा–*पु.* १. नळ; पाइप. २. स्रोत; प्रवाह.

बँबाना–*क्रि. अ.* हंबरणें; जनावरांचें ओरडणें.

बंबू–*पु.* चंडू (अफू) ओढण्याची बांबूची नळी.

बंस–*पु.* १. वंश. २. बांबू. ३. बांसरी. **–कार**–*पु.* बांसरी; मुरली.

बँसवाड़ी–*स्त्री.* बांबूचीं घरें असलेली वाडी.

बंसी–*स्त्री.* १. बांसरी; मुरली. २. मासे धरण्याचा गळ. **–धर**–*पु.* श्रीकृष्ण. **–वट**–*पु.* वृंदावनांतील एक वटवृक्ष. या वडाखाली श्रीकृष्ण बांसरी वाजवीत असे.

बँसोड़–र–*पु.* बांबूच्या कामटयांच्या टोपल्या वगैरे बनविणारा; बुरुड.

बँहगी–*स्त्री.* कावड.

ब–*अव्य.* [*फा.*] बरोबर; शीं; नें; साठीं. **–ख़ुद**–*अव्य.* स्वतः होऊन; आपण स्वतः. **–ख़ूबी**–*अव्य.* उत्तम प्रकारें; खुबीनें.

बउर–**पु.* आंब्याचा मोहोर.

बउरा–**वि.* बावरलेला; गोंधळलेला.

बउराना–*क्रि. अ.* १. बावरणें; गोंधळणें. २. वेड लागणें.

बक–*पु.* १. बगळा. २. बकासुर. ३. ठग; ढोंगी. **–मौन**–*पु.* बकध्यान. –*वि.* कावेबाज.

बक–*स्त्री.* बडबड; वटवट. –*पु.*+ बोल; वाक्य; वाणी. **–झक; –बक**–

स्त्री. १. बडबड; वटवट. २. भांडण; बोलाचाली. –वाद; –वास– स्त्री. बडबड; वटवट. –वादी; –वासी– वि. बडबड्या.

बकचा–पु. गाठोडें.

बकतर–पु. [फा.] चिलखत; कवच. –पोश–वि. चिलखत घातलेला. –बंद गाड़ी– स्त्री. चिलखती गाडी.

बकता*–वि. वक्ता.

बकना–क्रि. स. बडबड करणें; उच्चारणें (शिव्या). –क्रि. अ. बडबडणें.

बक़र–पु. [फा.] १. गाय; बैल. २. कुराणांतील एक अध्याय. –ईद– स्त्री. मुसलमानांचा एक सण; बकरीद.

बकरना–क्रि. स. १. पुटपुटणें. २. आपला दोष, चूक, अपराध मान्य करणें.

बकरबकर–अव्य. टकमकां; आश्चर्यचकित होऊन.

बकरम–पु. [इं.] कॉलर इ० मध्यें घातलें जाणारें एक प्रकारचें जाड व कडक कापड.

बकरा–पु. बोकड; बकरा. मु०–(रे) की माँ कबतक खैर मनायेगी– दोषी, अपराधी, कुठवर वांचूं शकणार ?

बकरी– स्त्री. शेळी.

बक़रीद–स्त्री. पा० 'बक़रईद'.

बकलस–पु. [इं.] बक्कल; 'बकलस'. [२. फळाचें टरफल.

बकला–पु. १. वृक्षाची साल.

बकस–पु. [इं.] १. पेटी. २. डबा.

बकसना*–क्रि. स. १. प्रदान करणें. २. क्षमा करणें.

बकसाना*–क्रि. स. क्षमा किंवा माफी करविणें.

बकसीस*– स्त्री. बक्षीस; इनाम; पारितोषिक.

बकसुआ–वा–पु. [इं.] बक्कल.

बक़ा– स्त्री. [अ.] बाकी राहाणें; उरणें; जीवित राहाणें.

बकाना*–क्रि.स. १. बडबड करण्यास प्रवृत्त करणें. २. पाठ करविणें. [जात; महानिंब.

बकायन–पु. कडू लिंबाची एक

बक़ाया–वि. [अ.] १. अवशिष्ट; शिल्लक. २. बाकी (थकलेली). –पु. बाकी; शिल्लक.

बकावल–पु. [तु.] मुख्य आचारी; स्वयंपाकी; सरकारी स्वयंपाक–घरावरील अधिकारी.

बक़ीया– वि. [अ.] उरलेला; अवशिष्ट. [संकोच पावणें.

बकुचना*– क्रि.अ. आकसणें;

बकुचा–पु. १. गाठोडें; पिशवी; पोटली. २. ढीग; गुच्छ. ३. जोडलेला हात. ४. बकुळीचें फूल.

बकुची– स्त्री. लहान गाठोडें. मु०–बाँधना; –मारना–शरीराची मुटकुळी बांधणें. [विणें.

बकुराना*–क्रि.अ. कबूल कर-

बकुला+–पु. बगळा.

बकेन–ना+– स्त्री. पारठी (विऊन पांच-सहा महिने झालेली) गाय किंवा म्हैस. [चालणें.

बकैयाँ–पु. रांगणें; गुडघ्यांवर

बकोट– स्त्री. ओरखडा; बोचकारा. [बोचकारणें.

बकोटना–क्रि.स. ओरखडणें;

बकोटा–पु. बचक; बचकण; बचका.

बक्कल–पु. १. टरफल. २. साल.

बक्काल–पु. [अ.] भाजी किंवा धान्य विकणारा. [धान्य.

बक्की+– स्त्री. एक प्रकारचें

बक्की–वि. बडबड्या; वाचाळ.

बक्खर–पु. गुरांचा गोठा.

बक़्र–पु. [अ.] १. बैल. २. गाय –ईद– स्त्री. बकरीद (मुसलमानी सण.) ['बॉक्स'.

बक्स *– पु. [इं.] पेटी;

बखत*–पु. पा० 'वक़्त'; 'बख़्त'.

बखतर–पु. पा० 'बकतर'.

बख़रा–पु. [फा.] भाग; अंश; तुकडा. –बाँट–पु. हिस्सेरशी.

बखरी+– स्त्री. गांवांतील मोठें घर; वाडा; जमीनदाराचा वाडा.

बखरैत–पु. हिस्सेदार.

बख़सीस+– स्त्री. पा० 'बख़्शिश'.

बखान–पु. १. वर्णन; कथन २. वाखाणणी; प्रशंसा.

बखानना–क्रि.स. वर्णन करणें; प्रशंसा करणें. [वखार.

बखार–पु. धान्याचें कोठार;

बख़िया–पु. [फा.] टीप (शिवण); बारीक व मजबूत शिलाईचा एक प्रकार. मु०–उधेड़ना– १. शिवण उसवणें; विस्कटून टाकणें. २. बिंग फोडणें.

बखियाना–क्रि.स. टीप घालणें; मजबूत शिलाई करणें.

बखीर+– स्त्री. साखरभात.

बख़ील–वि. [अ.] कृपण; कंजूष. [पणा; कृपणता.

बख़ीली– स्त्री. [अ.] कंजूष-

बख़ूबी–अव्य. [फा.] १. खुबीनें; चांगल्या तऱ्हेनें; योग्य प्रकारें. २. पूर्ण रूपानें.

बखे़ड़ा–पु. १. तंटा; बखेडा. २. पेंच. ३. अवडंवर. [कुदळ.

बखे़ड़िया–वि. तंटेखोर; भांड-

बखेरना–क्रि. स. विखुरणें; फैलावणें; विस्कटणें.

बख़ैर; बख़ैरियत–अव्य. [फा.] सुखरूप; उत्तम प्रमारें. [नशीब.

बख़्त–पु. [फा.] भाग्य;

बख़्तावर–वि. [फा.] भाग्य-

वान्; भाग्यशाली. [भाग्य.

बख़्तावरी–*स्त्री.* [*फा.*] सुदैव;

बख़्शना–*क्रि. स.* १. क्षमा करणें; माफ करणें. २. दान करणें. ३. सोडणें (व्रत, उपवास इ.).

बख़्शवाना; बख़्शाना–*क्रि. स.* क्षमा करविणें; देवविणें.

बख़्शिश– *स्त्री.* [*फा.*] १. दान; देणगी. २. बक्षीस; इनाम. **–नामा**–*पु.* बक्षीसपत्र.

बख़्शी–*पु.* [*फा.*] १. पगार वांटणारा अधिकारी. २. कोंड-वाड्यावरील कारकून.

बगई[+]–*स्त्री.* १. गोमाशी. २. एक प्रकारचें गवत. [चौखूर.

बगछु (ट्)ट–*अव्य.* बेलगाम;

बगड़ी*–*स्त्री.* बगीचा; बाग.

बगना*– *क्रि. स.* १. हिंडणें-फिरणें. २. धांवणें; पळणें.

बगमेल–*पु.* १. बरोबरी; स्पर्धा; जोडी. २. शिस्तबद्धपणें हल्ला करणें.

बगर*–*पु.* १. राजवाडा. २. वाडा. ३. गोठा. ४[+] गुरांचा कळप.

बगरना*–*क्रि. अ.* विखुरणें; पसरणें. [फैलावणें; पसरविणें.

बगराना*–*क्रि. स.* विखुरणें;

बग़ल– *स्त्री.* [*फा.*] १. बगल; कांख. २. शेजार. ३. बाजू. **–बंदी**–*स्त्री.* बाराबंदी. **मु०–गरम करना**–कुशींत झोंपणें. (स्त्रीनें पुरुषाच्या). **–गीर होना**–आलिंगन देणें. **–में**–जवळच. **–में दबाना** अथवा **धरना**–काबूत ठेवणें. **–(लें) झाँकना**–निरुत्तर होणें, कसेंतरी निसटण्याचा प्रयत्न करणें. **–(लें) बजाना**–१. आनंदोत्सव करणें. २. कांखेंत हात घालून आवाज काढणें.

बगला–*पु.* बगळा. **मु०–भगत**–*पु.* ढोंगी; कपटी.

बगलियाना–*क्रि. अ.* बगल देऊन जाणें; दूर सरणें. *–क्रि. स.* १. दूर करणें. २. बगलेंत दाबून धरणें; ताब्यांत घेणें.

बग़ली–*वि.* [*फा.*] बाजूचा. *–स्त्री.* १. शिंप्याची सुई, दोरा, कात्री वगैरे ठेवण्याची पिशवी. २. बगलेच्या ठिकाणीं लावण्याचा कापडाचा तुकडा. **मु०–घूँसा**–*पु.* आडून केलेला वार; कपटानें किंवा फसवून केलेला वार. [तिरकस.

बगलौंहा*– *वि.* तिरपा;

बगसना*–*क्रि. स.* १. देऊन टाकणें; देणें. २. क्षमा करणें.

बगा*–*पु.* [*फा.*] अंगरखा.

बगाना–*क्रि. स.* फिरविणें; फिरवून आणणें. *–क्रि. अ.* पळणें; धांवणें. [बांधण्याची जागा; गोठा.

बगार[+]–*पु.* गव्हाण; गायी

बगारना–*क्रि. स.* फैलावणें; विखुरणें. [राजद्रोह. २. दंगा; उपद्रव.

बग़ावत– *स्त्री.* [*अ.*] १. बंड;

बगिया*– *स्त्री.* बगीचा; बाग.

बग़ीचा–*पु.* [*फा.*] लहान बाग; वाटिका.

बगुला–*पु.* बगळा. **–भगत**–*वि.* ढोंगी; पाखंडी. [वातचक्र.

बगूला–*पु.* [*फा.*] वावटळ;

बगेरी– *स्त्री.* १. टिटवी. २. भरद्वाज (पक्षी). [खेरीज.

बग़ैर–*अव्य.* [*अ.*] शिवाय;

बग्गी; बग्घी– *स्त्री.* [*इं.*] बगी; चार चाकांची घोडा-गाडी; 'व्हिक्टोरिया.'

बघंबर–*पु.* व्याघ्रचर्म.

बघ– 'बाघ' चें समासांतील रूप.– **छाला**–*पु.* वाघाचें कातडें. **–नखा; –नहाँ**–*पु.*; **–नहियाँ**–*स्त्री.* १. वाघनख. २. मुलांचा एक दागिना.

बघना*–*पु.* वाघनखें असलेला एक दागिना.

बघार–*पु.* फोडणी.

बघारना–*क्रि. स.* १. फोडणी देणें. २. बढाई मारणें.

बघेल-ला–*पु.* १. राजपुतांची एक जात. २. वाघाचा बच्चा.

बघेलखंड–*पु.* मध्यभारतांतील एक प्रदेश. (यांत रीवाँ, मैहर इ० संस्थानें होतीं).

बघेलखंडी; बघेली–*स्त्री.* मध्य-भारतांत प्रचलित असलेली हिंदीची एक प्रादेशिक बोली. [वेखंड.

बच*–*पु.* १. वचन; बोल. २.

बचका*– *पु.* बटाटा, दुध्या भोपळा इ० चा बेसनांत कालवून तळलेला तुकडा; काप; चकती.

बचकाना–*वि.* १. मुलांच्या लायक; मुलांच्या मापाचा; लहान. २. पोरकट. ३. ओबडधोबड. [*–स्त्री.* **बचकानी**].

बचत – ती– *स्त्री.* १. बचत; बाकी; शिल्लक. २. नफा; लाभ. ३. रक्षण; सुटका. **–बैंक**– *स्त्री.* संचय-ठेव-बँक; 'सेव्हिंग्ज बँक'.

बचन–*पु.* वचन; वाणी.

बचना–*क्रि. अ.* १. कष्ट किंवा विपत्तीपासून वांचणें. २. अलिप्त राहाणें (वाईट गोष्टीपासून). ३. दूर किंवा अलग राहाणें. ४. उरणें.

बचपन–*पु.* बालपण; लहानपण.

बचपना–*पु.* पोरकटपणा.

बचवैया*–*पु.* संरक्षक; वांच-विणारा. [२. बच्चंजी; बेटचा!

बचा*–*पु.* १. बालक; मुलगा.

बचाना–*क्रि. स.* १. वांचविणें; रक्षण करणें. २. खर्च होऊं न देणें. ३. लपविणें. ४. दूर ठेवणें. ५. परि-णाम होऊं न देणें; अलिप्त ठेवणें.

बचाव–*पु.* १. वांचणें; वांच-

विणें; संरक्षण. २. खटल्यांतील बचाव.

बच्चा–पु. १. कोणत्याहि प्राण्याचा नुकताच जन्मलेला बच्चा; अर्भक. २. बालक; मुलगा. –*वि.* अजाण. **–दान**–पु.; **–दानी**– *स्त्री.* गर्भाशय. **–मु० –देना**– विणें. **–(च्चों)का खेल**– पोरखेळ; सहज होणारें काम.

बच्ची– *स्त्री.* १. 'बच्चा' चें *स्त्री०*. २. मुलगी. ३. पैंजणांतील घुंगरू.

बच्छ; बच्छरू*–पु. १. वासरूं. २. बालक; मुलगा. ३. छाती; वक्ष. [प्रेमळ.

बच्छल*–*वि.* वात्सल्यपूर्ण;

बच्छस*–पु. वक्षस्थल; छाती.

बच्छा; बछड़ा–पु. गोऱ्हा.

बछरा–वा*–पु. १. वासरूं; गोऱ्हा. २. शिंगरूं.

बछिया–*स्त्री.* कालवड; वासरी. **मु०– का ताऊ**– बैलोबा; नंदी-बैल; मूर्ख.

बछेड़ा–पु. शिंगरूं.

बजंत्री–पु. वाजंत्री; वाद्य वाजविणारा. ['बजेट'.

बजट–पु. [इं.] अंदाजपत्रक;

बजड़ा–पु. मोठी नाव

बजना–*क्रि. अ.* १. वाजणें; आवाज होणें. २. हत्यार चालणें; गाजणें (तलवार). ३. हट्ट करणें. ४. प्रसिद्धी पावणें. ५. हट्ट करणें.

बजनियाँ–हाँ+–पु. वाजंत्री; वाद्यें वाजविणारा.

बजनी–नू+–*वि.* वाजणारा.

बजबजाना+–*क्रि. अ.* बुज-बुजणें; सडलेल्या पाण्यांत बुडबुडे उठणें.

बजमारा*–*वि.* वज्राहत; वज्रा-मुळें मारला गेलेला (बायकांचा तळतळाट व्यक्त करणारा शब्द).

बजर*–पु. वज्र. **–बट्टू**–पु. दृष्टमणि. हें एका झाडाच्या फळां-तील काळें बीं असतें. लहान मुलांच्या गळयांत यांची माळ करून घालतात. [बाजरी.

बजरा–पु. १. मोठी नौका. २.

बज़रिया–*अव्य.* [*फा.*] मार्गानें; द्वारें.

बजरी–*स्त्री.* १. बारीक खडी; मुरूम. २. लहान कंगोरा. ३. बाजरी.

बजवाना–*क्रि. स.* वाजवावयास लावणें. [विणारा.

बजवैया–पु. वादक; वाद्यें वाज-

बजा–*वि.* [*फा.*] उचित; ठीक. **मु०–लाना**– पूर्ण करणें; पालन करणें. [वज्राग्नि.

बजागि*– *स्त्री.* विद्युत्;

बजाज़, बज़्ज़ाज़– पु. [*अ.*] कापडाचा व्यापारी.

बज़ाज़ा–पु. [*अ.*] कापडबाजार.

बज़ाज़ी– *स्त्री.* [*अ.*] कापडाचा व्यापार.

बजाना–*क्रि. स.* १. वाजविणें; आवाज काढणें. २. एखादी वस्तु मारणें. **मु० ठोंकना बजाना**–तावून सुलाखून पाहाणें. **बजाकर**–जाहीर पणें; उघडउघड. [बद्दल.

बजाय–*अव्य.* [*फा.*] ऐवजीं;

बजार; बजारू– *पा०* 'बाज़ार' 'बाज़ारू'.

बजिन्स; बजिन्सहू–*अव्य.* [*फा.*] १. जशाचा तसा; हुबेहूब. २. एकूण.

बजुज़–*अव्य.* [*फा.*] शिवाय; व्यतिरिक्त. [२. मैफल.

बज़्म– *स्त्री.* [*फा.*] १. सभा.

बझना*–*क्रि. अ.* १. अडकणें; रुतणें; फसणें. २. हट्ट करणें.

बझाना*–*क्रि. स.* अडकविणें; फसविणें.

बझाव–पु. फसवणूक; अडकणें.

बट–पु. १. एक पक्वान्न. २. लहान वरवंटा. ३. वजन; माप. ४. वड. **–** *स्त्री.* दोऱ्याचा पीळ.

बट–पु. वाट; रस्ता. **–परा; –पार; –मार**–पु. वाटमाऱ्या; डाकू; लुटारू. **–पारी; –मारी**– *स्त्री.* वाट-मारी. **–वार**–पु. १. पहारेकरी. २. जकातदार.

बटई– *स्त्री.* बटेर (होला) पक्षी.

बटखरा–पु. वजन; माप (शेर, अच्छेर इ०).

बटन– *स्त्री.* १. वीण. २. पीळ.

बटन–पु. [इं.] बटन; गुंडी.

बटना–पु. १. उटणें. २. दोरी वळण्याचें अवजार. **मु०–खोलना**– लग्नांतील रंग खेळण्याचा विधि.

बटना–*क्रि. स.* सूत; दोरी इ. वळणें. –*क्रि. अ.* १. वांटलें किंवा पिसलें जाणें. २. संपणें.

बटला–पु. १. मोठा गुंड; चरवी. २. पातेलें.

बटली; बटलोई– *स्त्री.* १. तपेली; लहान गुंड. २. पातेलें.

बटवारा–पु. वांटणी; बटवडा.

बटा*–पु. १. गोल वस्तु. २. चेंडू. ३. गोटा; दगड. ४. प्रवासी; पथिक. ५. अपूर्णांक ($\frac{3}{5}$ तीन बटा पाँच = तीन पंचमांश).

बटाई– *स्त्री.* १. वांटणी; वांटा. २. ऐनजिनसी सारा; भागीदारी; अर्धेल.

बटाऊ*–पु. प्रवासी; पथिक. **मु०–होना**– चालू लागणें.

बटाक*–*वि.* उंच; उंचाडचा.

बटाली+– *स्त्री.* पटाशी.

बटिया– *स्त्री.* १. लहान वर-वंटा. २. लहान गोटा. ३.* वाट; रस्ता. ४.+ *पा०* 'बँटाई'.

बटी– *स्त्री.* १. गोळी. २. वडी;

चकती. ३.* उपवन; बाग.

बटुआ–वा–*पु.* १. बटवा; चंची. २. मोठा गुंड; मोठें तपेलें.

बटेर–*स्त्री.* लावा; होला (पक्षी).

बटोर–*पु.* १. जमाव; घोळका. २. वस्तूंचा ढीग; समूह.

बटोरन–*स्त्री.* झाडल्यानंतर गोळा होणारा केरकचरा.

बटोरना–*क्रि. स.* १. गोळा करणें; एकत्र करणें. २. निवडून घेणें; जमा करणें.

बटोही–*पु.* प्रवासी; यात्रेकरू.

बट्टा–*पु.* १. तोटा; नुकसान. २. दलाली. ३. नाण्यांत किंवा दागिन्यांत असलेली खोट. **–खाता–***पु.* बुडीत खातें. **मु०–लगना–**कलंक लागणें.

बट्टा–*पु.* १. वरवंटा. २. लहान वाटोळा डबा. –*वि.* सपाट व गुळगुळीत.

बट्टी–*स्त्री.* १. वत्ता; वरवंटा. २. वडी. ३. गुळाची भेली.

बड़–*पु.* वड. **–बट्टा–***पु.* वडाचें फळ.

बड़–'बडा'चें समासांतील रूप. **–दुमा–***पु.* लांब शेपटीचा हत्ती. **–पेटा–***वि.* ढेरपोटचा. **–बेरी–***स्त्री.* १. बारीक बोर. २. खूप विलंब, उशीर. **–बोल–ला–***वि.* बाताडचा; गप्पीदास; बढाईखोर. **–भाग–गी–***वि.* भाग्यशाली. **–मुँहा** –*वि.* १. मोठचा, लांबट तोंडाचा. २. बढाईखोर; थापाडचा.

बड़–*स्त्री.* १. वडबड. २.बढाई. **मु०–मारना–**बढाई मारणें.

बड़प्पन–*पु.* मोठेपणा.

बड़बड़ाना–*क्रि. अ.* १. वडबड करणें. २. बढाई मारणें.

बड़बड़िया–*वि.* बडबडचा; बढाईखोर. [**–स्त्री. बड़री**].

बड़रा*–*वि.* मोठा; बडा.

बड़वार*–*वि.* मोठा; बडा.

बड़वारी*–*स्त्री.* १. प्रशंसा; बडिवार. २. बढाई. ३. मोठेपणा; महत्त्व. [फळ.

बडहर–ल–*पु.* एक आंबट-गोड

बड़हार–*वि.* वधूपक्षाकडील लग्नाची जेवणावळ; व्याहीभोजन.

बड़ा–*वि.* १. मोठा; विशाल. २. दीर्घ. ३. श्रेष्ठ. –*पु.* वडीलधारें माणूस; गुरुजन. **–दिन–***पु.* नाताळ; ख्रिसमस. **–बाबू–***पु.* 'हेडक्लार्क'. **–बोल–***पु.* बढाई; घमेंड.

बड़ाई–*स्त्री.* १. मोठेपणा. २. विपुलता. ३. प्रशंसा; स्तुति. **मु०–देना–**आदर करणें. **–मारना–**शेखी मिरवणें.

बड़ी–*स्त्री.* १. वडी. २. सांडगा. –*वि.* 'बडा'चें *स्त्री.* **–बात–***स्त्री.* मोठें, अवघड काम. **–बी–***स्त्री.* आजीबाई. **–माता–***स्त्री.* देवी (आजार). **मु०–बड़ी बातें करना–**बढाई मारणें.

बड़े–*वि.* 'बडा'चें अनेक०. **–अब्बा–***पु.* सासरा. **–लाट–***पु.* 'व्हाइसराय'; 'गव्हर्नर जनरल.' **मु०–बरतन की खुरचन–**श्रीमंत; मोठचा माणसाचें उच्छिष्ट. **–बाप का बेटा–**श्रीमंत व प्रतिष्ठित घराण्यांतील व्यक्ति. **–बोल का सिर नीचा–**गर्वाचें घर खालीं.

बड़ेरा*–पा० 'बडा'; 'बँडेर'.

बड़ौना*–*पु.* स्तुति.

बड्डु*–*वि.* मोठा; बडा.

बढ़ई–*पु.* सुतार. **–गिरी–***स्त्री.* सुतारी.

बढ़ती–*स्त्री.* वाढ; वृद्धि; उन्नति. **मु०–का पहरा–**उत्कर्षकाळ.

बढ़ना–*क्रि. अ.* १. वाढणें; विस्तार होणें. २. मापांत अगर वजनांत अधिक होणें. ३. भरभराट; उन्नति होणें. ४. दुकान बंद होणें. ५. दिवा, विस्तव विझणें. **मु० बढ़कर चलना–**घमेंड करणें. **बढ़-बढ़कर बोलना–**१. बढाया मारणें. २. फाजीलपणानें बोलणें; आगाऊपणा करणें.

बढ़नी–*स्त्री.* १. केरसुणी. २. आगाऊ दिलें जाणारें धान्य किंवा पैसे.

बढ़ाना–*क्रि. स.* १. वाढविणें; पसरविणें. २. पुढें चालू करणें. ३. स्वस्त विकणें. ४. दुकान इ० बंद करणें. ५. दिवा मालवणें. –*क्रि. अ.** संपणें; समाप्त होणें.

बढ़ाव–*पु.* वाढ; वृद्धि; विस्तार.

बढ़ावा–*पु.* प्रोत्साहन; उत्तेजन.

बढ़िया–*वि.* उत्तम; उत्कृष्ट. –*स्त्री.** पूर; महापूर. [सुतार.

बढ़ैया+–*वि.* वाढविणारा. –*पु.*

बढ़ोतरी–*क्रि.* १. बढती; वृद्धि. २. प्रगति; उन्नति. ३. वाढ.

बतंगड़–*पु.* मोठी गोष्ट. **मु० बातका बतंगड़ करना–**राईचा पर्वत करणें.

बत– 'बात'चे समासांतील रूप. **–कही***–*स्त्री.* १. संभाषण; वार्तालाप. २. वादविवाद. **–चल–***वि.* बडबडचा; वाचाळ. **–बढ़ाव–***पु.* बखेडा माजणें; भांडण. **–रस–***पु.* गप्पा गोष्टींतील मजा; खुमारी.

बतख़–*स्त्री.* [*फा.*] बदक.

बतराना*–*क्रि. अ.* संभाषण करणें; बोलणें. –*क्रि. स.* सांगणें.

बतरौहाँ*–*वि.* १. बोलूं इच्छिणारा. २. गप्पा गोष्टी करणारा; बोलका.

बतलाना; बताना–*क्रि. स.* १.

सांगणें. २. सांगविणें; समजाविणें; व्यक्त करणें. ३. दाखविणें; दृष्टोत्पत्तीस आणणें.

बताशा–सा–*पु.* १. बत्तासा. २. एक प्रकारचें दारूकाम; दारूगोळा.

बतास*–*स्त्री.* १. वायु; वारा. २. संधिवात.

बतिया– *स्त्री. पु.* १. कोंवळें फळ. २. गोष्ट; बोलणें.

बतियाना+–*क्रि. अ.* बोलणें. २. झाडाला फळ लागणें.

बतियार*–*स्त्री.* संभाषण; गोष्टी; बातचीत.

बतीसा–*पु.* १. बत्तीस औषधें व सुकीं फळें घालून तयार केलेला पौष्टिक लाडू. हा लाडू बाळंतिणीला खाऊं घालतात. २. बत्तिशी. ३. दांतानें चावल्याचा वण.

बतीसी– *क्रि.* १. बत्तिशी; बत्तीस दांत. २. बत्तीस वस्तूंचा समुदाय. **मु०–खिलना**–खदखदून हंसणें. **–दिखाना**– दांत दाखविणें; विचकणें. **–बजना**– अधिक थंडीमुळें दांत वाजणें.

बतौर–*अव्य.* [*अ.*] १.तऱ्हेनें; प्रकारें; रीतसर. २. समान; सदृश. ३. म्हणून.

बतौरी–*स्त्री.* १. आवाळू. २. गांधी; केसतूड; फोड.

बत्ती–*स्त्री.* १. वात. २. मेणबत्ती. ३. दिवा. ४. मशाल. ५. कामटी (छपराकरितां). **मु०–देना**– डागणें (तोफ इ०).

बत्तीस–*वि.* बत्तीस; ३२.

बत्तीसा; **बत्तीसी**– पा० 'बतीसा'; 'बतीसी'.

बथान+–*पु.* गोठा.

बथुआ–वा–*पु.* चाकवत; घोळ (भाजी).

बद–*वि.* उपडा; पालथा. –*स्त्री.* १. वाघणा; बद (रोग). २.बदला. **–में**–*अव्य.* ऐवजीं; बदली.

बद–*वि.* [*फा.*] १. वाईट; खराब. २. दुष्ट. ३. खोटा. ४. अशुभ. **–अंदेश**–*वि.* अनिष्ट इच्छिणारा; हितशत्रु. **–अखलाक**–*वि.* असभ्य; अशिष्ट. **–अमनी**– *स्त्री.* अशांति; अंदाधुंदी. **–अमली**– *स्त्री.* अनागोंदी कारभार; अंदाधुंदी. **–कार**–*वि.* १. व्यभिचारी. २. दुराचारी; कुकर्मी. **–कारी**– *स्त्री.* दुराचार; व्यभिचार. **–किरदार**–*वि.* दुश्चरित; चरित्रहीन. **–क़िस्मत**–*वि.* दुर्दैवी; अभागी. **–ख़्वाह**–*वि.* वाईट चिंतणारा; हितशत्रु. **–गुमान**–*वि.* ज्याच्या मनांत दुसऱ्याविषयीं गैरसमज किंवा संशय उत्पन्न झाला आहे असा; संशयग्रस्त. **–गुमानी**–*स्त्री.* १. गैरसमज. २. दुराग्रह. **–गोई**– *स्त्री.* निंदा; कुचाळकी. **–चलन**–*वि.* दुराचारी; व्यभिचारी. **–ज़बान**–*वि.* ज्याच्या तोंडातून शिव्या निघतात असा; कटुभाषी; असभ्य; फटकळ. **–ज़ात**–*वि.* १. पाजी; नीच; दुष्ट. २. हलक्या कुळांत जन्मलेला; अकुलीन. **–तमीज़**–*वि.* असभ्य; असंस्कृत; अशिष्ट; उद्धट. **–तर**–*वि.* अधिक वाईट. **–तरीन**–*वि.* अत्यंत वाईट; सर्वांत अधिक खराब. **–दयानत**–*वि.* बेइमानी; अप्रामाणिक. **–दिमाग़**–*वि.* घमेंडखोर; चिडखोर. **–दुआ**–*स्त्री.* शाप. **–नज़र**–*वि.* वाईट नजरेचा. – *स्त्री.* वाईट नजर **–नसीब**–*वि.* दुर्दैवी; कमनशिबी. **–नसीबी**– *स्त्री.* दुर्दैव; दुर्भाग्य. **–नाम**–*वि.* ज्याची अपकीर्ति झाली आहे असा; कुप्रसिद्ध; कलंकित. **–नामी**– *स्त्री.* अपकीर्ति. **–०का टीका**–*पु.* लांछन; कलंक. **–नीयत**–*वि.* वाईट हेतु बाळगणारा; स्वामिद्रोही; हरामखोर; बेइमान **–नुमा**–*वि.* कुरूप. **–परहेज़ी**– *स्त्री.* कुपथ्य. **–फ़ेल**–*वि.* बदफैली; व्यभिचारी. **–बख़्त**–*वि.* दुर्दैवी. **–बख़्ती**– *स्त्री.* दुर्दैव; दुर्भाग्य. **–बू**–*स्त्री.* घाण; दुर्गंध. **–०दार**–*वि.* दुर्गंधयुक्त. **–मज़गी**– १. कटुता; बेबनाव; परस्पर विरोध. २. विरस. **–मज़ा**–*वि.* चांगला स्वाद नसलेला; बेचव. **–मस्त**–*वि.* १. झिंगलेला. २. कामुक. **–माश**–*वि.* १. दुराचारी. २. लुच्चा; लफंगा. ३. खटचाळ. **–माशी**– *स्त्री.* १.बदफैलीपणा; दुराचार. २. खटचाळपणा. **–मिज़ाज**–चार. २. खटळपणा. **–मिज़ाज**–*वि.* तुसडचा; चिडखोर. **–रंग**–*वि.* १. वाईट रंगाचा. २. निराळचा रंगाचा. ३. विटलेला. –*पु.* १. बेरंग २. दुसऱ्या रंगाचा पत्ता; सोंगटी. **–राह**; **–रौंह***–*वि.* कुमार्गी; दुराचारी. **–शकल**; **–शक्ल**–*वि.* कुरुप. **–शगून**–*वि.* अपशकुनी अशुभ. **–सलीक़ा**–*वि.* असभ्य; अशिष्ट. **–सलूकी**– *स्त्री.* असभ्य वागणूक. **–सीरत**–*वि.* वाईट स्वभावाचा; दुष्ट. **–सूरत**–*वि.* कुरूप. **–सूरती**– *स्त्री.* कुरूपता. **–हज़मी**– *स्त्री.* अपचन. **–हवास**–*वि.* १. बेशुद्ध. २.अस्वस्थ; उद्विग्न; व्याकुळ. ३. घाबरगुंडी उडालेला. **हाल**–*वि.* दुर्दशाग्रस्त.

बदन*–*पु.* तोंड; वदन.

बदन–*पु.* [*अ.*] शरीर; देह. **मु०–टूटना**–अंग मोडून येणें.**–दुहरा होना**–कंबरेंत वांकणें. **–सूखकर काँटा होना**–वाळून जाणें; कृश होणें.

बदना–*क्रि. स.* १. सांगणें. २

स्वीकारणें; ऐकणें. ३. निश्चित करणें; ठरविणें. ४. पैज मारणें. मु० बदकर–सांगून सवरून; हट-वादीपणानें.

बदर–*पु.* १. बोराचें झाड व बोर. २. कापूस; सरकी.

बदर–*अव्य.* [*फा.*] बाहेर; दरवाजाच्या बाहेर. (**शहर बदर करना**– शहरांतून हद्दपार करणें.) **–नवीस**– *पु.* हिशेबांतील चुका काढणारा. **मु०–निकालना**– हिशेबांतील चुका काढणें.

बदरा–*पु.*; **बदराई; बदरिया; बदरी***– *स्त्री.* मेघ; ढग.

बदल–*पु.* [*अ.*] फेरफार; फरक; बदल.

बदलना–*क्रि. अ.* १. बदलणें. २. ऐवजीं येणें किंवा जाणें. ३. बदली होणें. ४. दिलेल्या वचनापासून ढळणें.

बदलना; बदलवाना–*क्रि. स.* १. बदलविणें; पालटून घेणें. २.अदलाबदली करणें.

बदला–*पु.* [*अ.*] १. सूड. २. परस्पर व्यवहार. ३. ऐवजीं दिलेली किंवा घेतलेली वस्तु; मोबदला. ४. परिणाम; फळ. **मु०–चुकाना; लेना**– सूड उगवणें.**–(ले) में**– ऐवजीं; बदली.

बदलाई– *स्त्री.* १. बदलण्याची क्रिया. २. बदल्यांत घेतली किंवा दिली जाणारी वस्तु. ३. अदलाबदल करतांना वरून द्यावी लागणारी रक्कम.

बदली– *स्त्री.* १. मेघांचा समूह; भरून आलेले ढग. २. बदली. [मोबदल्यांत.

बदले–*अव्य.* [*अ.*] ऐवजीं;

बदलौवल$^{+}$– *स्त्री.* अदलाबदल.

बदस्त–*अव्य.* [*फा.*] (च्या) हातून; मार्फत; द्वारें.

बदस्तूर–*अव्य.* [*फा.*] जशाचा तसा; नियमानुसार; नेहमींप्रमाणें.

बदा–*वि.* भाग्यलिखित; नशिबांत लिहिलेलें. **–पु.** नियति; दैव. **मु०–होना**– नशिबांत लिहिलेलें असणें.

बदान– *स्त्री.* पैज; पण.

बदाबदी– *स्त्री.* १. दोन पक्षांतील तेढ; चढाओढ; स्पर्धा. २. **–अव्य.** १. चढाओढीनें. २. पैज लावून.

बदि*– *स्त्री.* बदला; मोबदला. *–अव्य.* ऐवजीं.

बदी– *स्त्री.* वद्यपक्ष; कृष्णपक्ष.

बदी– *स्त्री.* [*फा.*] १. अपकार; अनहित; वाईटपणा; दुर्जनता. २. निंदा.

बदेस*–*पु.* विदेश; परदेश.

बदौलत–*अव्य.* [*फा.*] मुळें; द्वारा.

बद्दू$^{+}$–*वि.* [*अ.*] १. वाईट; दोषास्पद. २. बदनाम; बद्दू.

बद्ध–*वि.* बांधलेला; अडकलेला.**–परिकर**–*वि.* तयार; कंबर कसलेला.**–मूल**–*वि.* दृढमूल.

बद्धी– *स्त्री.* १. बांधण्याचें साधन; दोरी. २. गळ्यांतील एक दागिना; चार पदरी हार.

बध– *पु.* वध; हत्या.

बधना–*पु.* तोटीदार भांडें; झारी; चंबू.–*क्रि. स.** वध करणें. हत्या करणें.

बधाई– *स्त्री.* १. अभिनंदन. २. मंगल प्रसंगाचें गाणें–बजावणें. ३. शुभ प्रसंगीं दिली जाणारी भेट. **मु०–बजना**–पुत्रजन्मासारख्या शुभ प्रसंगीं सनई इ० मंगल वाद्यें वाजणें.

बधाया*; **बधावना–रा***; **बधावा**–*पु.* १. नजराणा; अहेर. २. अभिनंदन; शुभेच्छा.

बधिक–*पु.* १. कसाई; खाटीक. २. फांशी देणारा मांग. ३. व्याध; फांसेपारधी.

बधिया–*पु.* खच्ची केलेला बैल किंवा इतर जनावर. **मु०–बैठना**– १. चालणारा बैल मध्येंच बसणें. २. तोटा होणें. [करणें.

बधियाना$^{+}$–*क्रि. स.* खच्ची

बधू– *स्त्री.* सून.

बधूटी– *स्त्री.* १. सून. २. भाग्यवती स्त्री. ३. नवी सून.

बन–*पु.* १. वन; जंगल. २. पाणी. ३. कपाशीचें झाड. ४. समूह. ५.* घर.**–कंडा**–*पु.* रानशेणी.**–कटा**–*वि.* जंगली (लाकूड). **–ज;–जात**–*वि. पु.* १. कमळ. २. मोती. ३. वनांतील वस्तु.**–धातु**– *स्त्री.* काव; गेरू; रंगीत माती.**–बाहन**–*पु.* नौका.**–बिलाव**–*पु.* रानमांजर.**–मानुस**–*पु.* १. पुच्छविहीन वानर (गोरिला, चिंपाझी, ओरँग-उटांग इ०). २. जंगली माणूस.**–माली**–*पु.* वनमाळी; श्रीकृष्ण. **–रखा**–*पु.* १. वनरक्षक; जंगलाची रखवाली करणारा. २. पारधी.**–रांव***–*पु.* १. मोठें अरण्य. २. मोठा वृक्ष. **–रुह**–*पु.* १. कमळ. २. जंगलांतील झाड. **–स्थली**– *स्त्री.* जंगल. [गार.

बनउर$^{+}$–*पु.* १. सरकी. २.

बनक*– *स्त्री.* १. सजावट. २. वेष. ३. बनावट. ४. मैत्री.

बनजना*–*क्रि. स.* व्यापार करणें.

बनजारा–*पु.* १. वंजारी. २. बैलांवर धान्य लादून विक्रीसाठीं नेणारा. ३. व्यापारी. [*–स्त्री.* **बनजारन ; बनजारी**]. [व्यापारी.

बनजी*– *स्त्री.* व्यापार. **–पु.**

बनत– *स्त्री*. १. रचना; बनावट. २. मेळ; अनुकूलता.

बनना–*क्रि. अ.* १. बनणें; तयार होणें; रचलें जाणें. २. वसूल होणें; मिळणें. ३. शक्य असणें. ४. मूर्ख ठरणें; बनलें जाणें. ५. निभणें; पटणें. ६. संधि मिळणें ७. नटणें; थाटमाट करणें. ८. यशस्वी होणें; तडीस जाणें. ९. मोठेपणाचा आव आणणें. **मु० बन पड़ना**–शक्य होणें; निभणें. **बना रहना**–१. जिवंत राहाणें; अस्तित्व टिकणें.

बननि*– *स्त्री*. १. रचना; बनावट; सजावट. २. शृंगार.

बनफ़शा–*पु.* [*फा.*] कामपुष्प (औषधी वनस्पति).

बनरा–*पु.* १. वर; नवरा मुलगा. २. विवाहप्रसंगींचें एक गीत. ३.* वानर. [नववधू. २. वानरी.

बनरी*– *स्त्री*. १. नवरी मुलगी;

बनवाना–*क्रि. स.* दुसऱ्याकडून बनवून, तयार करवून घेणें.

बनवारी–*पु.* वनमाळी; श्रीकृष्ण.

बनवैय्या[+]–*पु.* बनविणारा.

बना–*पु.* नवरा मुलगा.

बनाना–*क्रि. स.* १. बनविणें; तयार करणें. २. कमावणें; मिळविणें. ३. दुरुस्ती करणें. ४. थट्टा करणें; बनविणें; फसविणें. **मु० बनाये रखना**–जिवंत कायम ठेवणें.

बनाम–*अव्य.* [*फा.*] १. नांवानें. २. विरुद्ध.

बनाय*–*अव्य.* १. उत्तम प्रकारें. २ अगदीं. ३. फार.

बनाव–*पु.* १. बनावट; रचना. २. सजावट. ३. युक्ति; उपाय. **–सिंगार**–*पु.* शृंगार; सजावट; थाटमाट.

बनावट– *स्त्री*. १. घडण; रचना. २. अवडंबर. ३. प्रदर्शन; देखावा. [दिखावटी.

बनावटी–*वि.* कृत्रिम; नकली;

बनावनहार–रा*–*पु.* १. बनविणारा; रचयिता. २. सुधारणारा.

बनासप(पा)ती*– *स्त्री*. १. भाजीपाला, गवत इ०. २. वनस्पति. ३. कृत्रिम तूप (डालडा इ०).

बनि*–*वि.* संपूर्ण; एकंदर.– *स्त्री*. धान्याच्या रूपानें दिली जाणारी दैनिक मजुरी. **–हार**–*पु.* धान्यरूपानें मजुरी घेऊन काम करणारा मजूर.

बनिज–*पु.* १. वाणिज्य; व्यापार. २. विक्रीची वस्तु; किराणामाल. **–व्यापार**–*पु.* व्यापारधंदा.

बनिजना*–*क्रि. स.* १. व्यापार करणें २. विकत घेणें.

बनिता– *स्त्री*. वनिता; स्त्री; पत्नी; भार्या.

बनिया–*पु.* व्यापारी; वाणी.

बनियाइन– *स्त्री*. वाण्याची स्त्री.

बनियाइन– *स्त्री*. [*इं.*] बंडी; बनियन. [तुलनेनें.

बनिस्बत–*अव्य.* [*फा.*] पेक्षां;

बनी– *स्त्री*. १. पा० 'बनि'. २. वनस्थली. ३.* वधू; नवरी. **–***पु.** वाणी. [बायको.

बनीनी[+]– *स्त्री*. वाण्याची

बनीर*–*पु.* वेत.

बनेठी– *स्त्री*. बोथाटी.

बनैला–*वि.* जंगली; वन्य.

बनौटी–*वि.* कापशी; कापसाच्या फुलासारखा. [साची).

बनौरी[+]– *स्त्री*. गार (पाव-

बन्ना[+]–*पु.* नवरा; वर. [– *स्त्री*. **बन्नी**].

बप्तिस्मा–*पु.* [*इं.*] ख्रिस्ती धर्माची दीक्षा देणें; बाप्तिस्मा.

बपना*–*क्रि. स.* बी पेरणें. –*पु.* पेरणी.

बपमार–*पु.* बापाला ठार मारणारा; विश्वासघातकी.

बपुरा*–*वि.* बापडा; बिचारा.

बपौती– *स्त्री*. पैतृक, वडिलार्जित संपत्ति; वारसा; 'हेरिटेज'.

बप्पा[+]–*पु.* बाबा; पिता; बाप (संबोधन).

बफारा–*पु.* वाफारा देणें.

बबर–*पु.* [*फा.*] १. विशिष्ट जातीचा वाघ. २. सिंह.

बबुआ[+]–*पु.* १. लहान मुलगा किंवा जावई यांना प्रेमानें हांक मारण्याचें संबोधन; बाबू. २. जमीनदार; श्रीमंत.

बबूर[+]**–ल**–*पु.* बाभळ; बाभळीचें झाड.

बबूला–*पु.* १. वावटळ. २. बुडबुडा. पा० 'बगूला'.

बभूत[+]– *स्त्री*. विभूती; भस्म.

बम–*पु.* [*इं.*] बाँब–गोळा. **–कांड**–*पु.* बाँबचा स्फोट किंवा वर्षाव. **–गोला**–*पु.* बाँबचा गोळा. **–बाज़**–*वि.* बाँबचा वर्षाव करणारें (विमान). **–बाज़ी–री**– *स्त्री*. बाँबचा वर्षाव. **–वर्षक; –वर्षी**–*पु.* बाँबफेकी विमान; 'बाँबर'.

बम–*पु.* शिवोपासकांचा 'बम बम' असा शब्द. **मु०–बोलना अथवा बोल जाना**–१. कफल्लक होणें. २. शिल्लक कांहीं न उरणें; खलास होणें.

बम–*पु.* टांगा किंवा बगी इ० ची घोडा जुंपण्याची दांडी; धुरा.

बमकना–*क्रि. अ.* १. मिजास करणें; शेखी मिरविणें. २. रागावणें; संतापणें.

बमचख– *स्त्री*. बाचाबाची; तंटा; आरडाओरडा.

बमना*–*क्रि. स.* ओकणें.

बमपुलिस– *स्त्री.* पा०'बंपुलिस'.

बमीठा–*पु.* वारूळ.

ब-मूजिब– *अव्य.* [*फा.*] अनुसार; प्रमाणें.

बमेक*–*पु.* विवेक.

बह्मनी– *स्त्री.* १. पालीसारखा जळवेच्या आकाराचा एक जाड किडा. २. रांजणवाणी. ३. लाल रंगाची जमीन. ['लेफ्ट हँडर'.

बयँहत्था–*वि.* डावखुरा;

बय– *स्त्री.* विणकऱ्यांचें एक अवजार; फणी.

बयन*–*पु.* वचन; वाणी.

बयना*–*क्रि. स.* १. वर्णन करणें; सांगणें. २. पेरणें. –*क्रि. अ.* १. वाहाणें. २. लागणें. –*पु.* वाण; आप्तेष्टांकडे पाठवावयाचें पक्वान्न किंवा भेट.

बयस*– *स्त्री.* वय.–**वाला***–*वि.* वयस्क; तरुण. –**सिरोमनि***–*पु.* तारुण्य; यौवन.

बयसु*–*पु.* वैश्य.

बयाँ–*पु.* पा० 'बयान'.

बया–*पु.* सुतारपक्षी. २. मापाडी.

बयान–*पु.* [*अ.*] १. कथन; कैफियत; जबानी. २. खबर; विवरण; वृत्तांत. **मु०–से बाहर**– अवर्णनीय.

बयाना–*पु.* विसार; एखाद्या कामासाठीं आगाऊ दिलेला पैसा; बयाणा.

बयाबान–*पु.* [*फा.*] १. जंगल. २. वाळवंट. ३. निर्जन स्थान; ओसाड जागा.

बयार–रि*– *स्त्री.* शीतळ व मंद वारा; वाऱ्याची झुळूक.

बयाला*–*पु.* १. खिडकी. २. गोळीबार करण्यासाठीं तटांत ठेवलेलें छिद्र

बयालि(ली)स–*वि.* बेचाळीस; ४२.

बयासी–*वि.* ब्याऐंशी; ८२.

बरंडा–*पु.* [*इं.*] ओसरी; 'व्हरांडा'.

बर–*पु.* १. वर; नवरा मुलगा. २. आशीर्वाद; वर. –**काज***–*पु.* लग्न. –**नेत**– *स्त्री.* लग्नांतील एक विधि.

बर*–*पु.* बल; शक्ति. –**जोर**– *वि.* १. प्रबळ; जबरदस्त. २. अत्याचारी. –**जोरी**– *स्त्री.* जबरदस्ती; बळजबरी. –*अव्य.* जबरदस्तीनें.

बर*–*पु.* वड; वटवृक्ष.

बर–*पु.* रेषा; रेघ.

बर*–*अव्य.* इतकेंच नव्हे तर.

बर–*अव्य.* [*फा.*] १. वर; वरती. २. बाहेर. –*वि.* १. श्रेष्ठ. २. पूर्ण. ३. घेऊन जाणारा; नेणारा. –**अक्स**–*अव्य.* उलट; विरुद्ध. –**क़रार**–*वि.* १. उपस्थित; हजर. २. स्थिर; कायम.–**ख़ास**; *–**ख़ास्त**; –**ख़्वास्त**–*वि.* १. संपलेला; विसर्जन केलेला. २. बडतर्फ; नोकरीवरून दूर केलेला.–**ख़ास्तगी**– *स्त्री.* १. समाप्ति. २. बडतर्फी. –**ख़िलाफ़**–*वि. अव्य.* उलटा; प्रतिकूल; विरुद्ध. –**खुरदार**–*वि.* १. सफळ.२.भाग्यवान्.–*पु.* मुलगा; पुत्र. –**ज़बान**–*वि.* तोंडपाठ; मुखोद्‌गत; तठस्थ. –**जस्ता**–*वि.* योग्य; उपयुक्त. –**तर**–*वि.* अधिक उत्तम; श्रेष्ठ. –**तरफ़**–*वि.* १. वेगळा; बाजूचा. २. बडतर्फ; नोकरीवरून कमी केलेला. –*अव्य.* एका बाजूला; दूर; बडतर्फ. –**तरफ़ी**– *स्त्री.* बडतर्फी.–**दार**–*वि.* वाहाणारा; धारण करणारा; उचलणारा. –**दाश्त**– *स्त्री.* १. सहनशीलता. २. जांगड माल आणणें. ३. गुरांची देखरेख. –**पा**–*वि.* उपस्थित; उठलेला. [**मु०– होना**–उद्‌भवणें; माजणें]. –**बाद**–*वि.* नष्ट; उध्वस्त. –**बादी**– *स्त्री.* नाश. –**मला**–*अव्य.* समोर; तोंडावर; उघड उघड. –**महल**–*अव्य.* ऐन प्रसंगीं; योग्य वेळीं. –**वक़्त**–*अव्य.* वेळेवर. –**हक़**– *वि.* योग्य; सच्चा. **मु०–आना**– पूर्ण, सफळ होणें. –**लाना**–पूर्ण सफळ करणें. –**सरे इक्तिदार**–*अव्य. वि.* सत्तेवर; सत्ताधिष्ठित; अधिकारारूढ. [पानांचा व्यापारी.

बरई–*पु.* तांबोळी; विडचाच्या

बरकंदाज़–*पु.* [*अ.* + *फा.*] लाठीबंद शिपाई. २. बंदूकधारी सैनिक. ३. चौकीदार.

बरकत– *स्त्री.* [*अ.*] १. विपुलता. २. लाभ; फायदा. ३. अंत; समाप्ति. ४. धन. ५. कृपा. ६. एक (संख्या). **मु०–देना**–वाढविणें; वृद्धि करणें.

बरकती–*वि.* लाभदायक.

बरकना*–*क्रि. अ.* १. टळणें; न घडणें. २. वांचणें; बाजूला राहाणें.

बरकाना*–*क्रि. स.* १. निवारणकरणें; बाजूला सारणें. २. वांचविणें.

बरख*–*पु.* वर्ष.

बरखना*–*क्रि. अ.* पाऊस पडणें; वृष्टि होणें. –*क्रि. स.* वर्षाव करणें.

बरखा*– *स्त्री.* १. वृष्टि; पाऊस. २. पावसाळा.

बरगद–*पु.* वड; वडाचें झाड.

बरछा–*पु.* भाला.

बरछी– *स्त्री.* १. बर्ची; संगीन. २. लहान भाला.

बरछैत*–*पु.* भाला फेंकण्यांत

पटाईत; माला फेंकणारा.

बरजना*–*क्रि. अ.* मनाई करणें; अडविणें.

बरजनि*– *स्त्री.* १. मनाई. २. अडचण. ३. आडकाठी; अडथळा.

बरजौबति*– *स्त्री.* सुंदर तरुण स्त्री.

बरत–*पु.* १. व्रत. २. संकल्प. – *स्त्री.* डोंबाऱ्याची कसरतीची दोरी किंवा तार. [आचरण.

बरतन–*पु.* १. मांडें. २.+ वर्तन;

बरतना–*क्रि. अ.* व्यवहार ठेवणें; वागणें. –*क्रि. स.* वापरणें; उपयोगांत आणणें, कामांत आणणें.

बरतनी–*स्त्री.* वर्तनी; शब्दाचा वर्णक्रम; शुद्धलेखन; ' स्पेलिंग '.

बरताना–*क्रि. स.* वांटणें; विभागणी करणें. –*पु.* वापरलेले, जुने कपडे. [वागणूक.

बरताव–*पु.* वर्तन; व्यवहार;

बरती*–*वि.* व्रती; व्रतवैकल्य करणारा.–*स्त्री.* पा० ' बत्ती '.

बरदा–*पु.* [तु.] गुलाम; युद्धकैदी. –**फ़रोश**–*पु.* गुलामांचा व्यापार करणारा. –**फ़रोशी**– *स्त्री.* गुलामांचा व्यापार.

बरदा (धा) ना–*क्रि. अ.* फळणें; गाभण होणें. –*क्रि. स.* फळविणें (गाय म्हैस इ०). [शाळा.

बरदौर+– *स्त्री.* गोठा; गो-

बरध–धा+–*पु.* बैल.

बरन*–*पु.* १. वर्ण; अक्षर. २. जात. ३. रंग. –*अव्य.* एवढेंच नव्हे तर; इतकेंच काय पण.

बरनन*–*पु.* वर्णन. [करणें.

बरनना*– *क्रि. स.* वर्णन

बरना*–*क्रि. स.* १. वरणें; ग्रहण करणें; लग्न करणें. २. एखाद्या कामाकरितां कोणाची तरी निवड करणें. ३. दान करणें.– *क्रि. अ.* जळणें.

बरफ़– *स्त्री.* [*फा.*] हिम; बर्फ.

बरफ़ानी–*वि.* [*फा*]. बर्फाचा; बर्फानें झांकलेला.

बरफ़ी *स्त्री.* बर्फी (मिठाई).

बरफ़ीला–*वि.* [*फा.*] बर्फाळ; हिमयुक्त.

बरबंड*–*वि.* १. प्रबळ; बलवान्. २. प्रतापशाली. ३. उद्धट. ४. प्रखर. [बलपूर्वक.

बरबट*–*अव्य.* जबर्दस्तीनें;

बरबराना+–*क्रि. अ.* पा० ' बड़बड़ाना '.

बरबस–*अव्य.* १. जबरदस्तीनें; बलपूर्वक. २. व्यर्थ; निरर्थक ३. नाइलाजानें.

बरम*–*पु.* कवच.

बरमा–*पु.* १. गिरमिट; लांकडाला छेद पाडण्याचें हत्यार २. ब्रह्मदेश.

बरमी–*पु.* ब्रह्मदेशचा निवासी. – *स्त्री.* ब्रह्मदेशची भाषा.–*वि.* ब्रह्मदेशचा; ब्रह्मदेशासंबंधींचा.

बरराना–*क्रि. अ.* झोंपेंत बरळणें; बडबडणें. [प्लीहा.

बरवट– *स्त्री.* पानथरी (रोग);

बरवा; बरवै–*पु.* १. १९ मात्रांचा छंद (काव्य). २. ध्रुव. ३. मासे पकडण्याचा गळ.

बरस–*पु.* वर्ष; साल. –**गांठ**– *स्त्री.* वाढदिवस. **मु०–दिन का दिन; –बरसका दिन**– वर्षाचा दिवस; आनंदाचा सण; वर्षांतून एकदां येणारा सण.

बरसना–*क्रि. अ.* १. पाऊस पडणें; वृष्टि होणें. २. वर्षाव होणें; भडिमार होणें. ३. झळकणें; प्रकट होणें. **मु० बरस पड़ना**–रागानें तोंड सोडणें; भडिमार करणें.

बरसाइत– *स्त्री.* १. वट सावित्रीचें व्रत. २.* पावसाळा. ३. पा० ' बरसायत '.

बरसाइन+–*वि. स्त्री.* दरसाल विणारी (गाय, म्हैस इ०); वर्सवणी.

बरसात– *स्त्री.* पावसाळा.

बरसाती–*वि.* पावसाळी; पावसाळ्यासंबंधींचा.–*पु.* १. पावसाळी कोट; ' रेनकोट '. २. पावसाळ्यांत झोपतां येईल अशी गच्चीवरील हवेशीर खोली. ३. ' पोर्च '. **मु०–मेंढक**-अल्पजीवी परंतु जास्त बडबड करणारा.

बरसाना–*क्रि. स.* १. पाऊस पाडणें; वृष्टि करणें. २. वर्षाव करणें; भडिमार करणें. ३. खूप मिळविणें. –*पु.* गोकुळा जवळचें एक गांव. हें राधेचें जन्मस्थान होतें.

बरसायत– *स्त्री.* १. ज्येष्ठ महिन्याची अमावास्या; शुभ मुहूर्त. २. पा० ' बरसाइत. '

बरसी– *स्त्री.* वर्षश्राद्ध; पुण्यतिथि. [वृष्टि करणारा.

बरसौहां*– *वि.* वर्षणारा. २.

बरहना–*वि.* [*फा.*] नग्न; विवस्त्र.

बरहम–*वि.* [*फा.*] १. पेंचांत सांपडलेला; विवंचनेंत पडलेला; उद्विग्न. २. रागावलेला. ३. विखुरलेला; विस्कटलेला.

बरहा–*पु.* १. शेतांत पाणी देण्यासाठीं केलेला पाट. २. दगड किंवा जाड वस्तु उचलण्याचा जाड दोरखंड.–*पु.* +१. मोर. २. कोंबडा. ३. मोराचा पिसारा.

बरही– *स्त्री.* १. बाळंतिणीचें बाराव्या दिवशीचें स्नान; बारसें. २. लांडोर; मोर. ३. जाड दोरी. ४. जळाऊ लाकडाची मोळी. –**पीड़***–*पु.* मोरपंखांचा मुकुट.

बरहौं*–*पु.* जन्मानंतरचा बारावा दिवस; बारसें.

बरांडा–*पु.* ओसरी; 'व्हरांडा.'

बरांडी– *स्त्री.* [इं.] 'ब्रँडी' (दारू). [३.* वटवृक्ष.'

बरा–*पु.* १. वडा. २. बाहुभूषण.

बराई*–*स्त्री.* पा० 'बड़ाई.'

बराक–*पु.* १. शंकर. २- युद्ध; लढाई. –*वि.* १. नीच; अधम. २. शोचनीय. ३. बापडा; गरीब.

बरात– *स्त्री.* १. वऱ्हाड. २. वरात. **मु०– करना** – वरातींत सामील होणें.

बराती–*वि. पु.* वऱ्हाडी; लग्नासाठीं वरपक्षाकडून जाणारे लोक.

बराना–*क्रि. स.* १. प्रसंग असतांना सुद्धां कोणतीहि गोष्ट न सांगणें; अंग चोरणें. २. जाणून बुजून वेगळें काढणें. ३. रक्षण करणें; सांभाळणें. ४. संयम करणें; वांचविणें. ५. निवड करणें. ६*– जाळणें.–*क्रि. अ.** जळणें.

बराबर–*वि.* [*फा.*] १. समान; तुल्य; बरोबरीचा. २. सपाट.–*अव्य.* सतत; सारखा; वारंवार. **–का**–*वि.* १. बरोबरीचा. २. समोरचा.–**बराबर**–*अव्य.* समसमान; ओळींत. **मु०–करना–**१. सपाट करणें. २. खलास करणें. –**(पर) छूटना**–कुस्ती इ० बरोबरीनें सुटणें.

बराबरी– *स्त्री.* [*फा.*] १. बरोबरी; समानता; तुलना. २. सामना; प्रतिस्पर्धा.

बरामद–*वि. पु.* [*फा.*] १. प्रकट झालेला. २. हरविलेला किंवा चोरीला गेलेला माल परत मिळविणें. ३. निर्यात; रवानगी. – *स्त्री.* मळीची जमीन. **मु०–करना–**लपविलेली वस्तु बाहेर काढणें (चोरीचा माल इ०).

बरामदा–*पु.* [*फा.*] १. 'व्हरांडा'. २. पडवी; ओसरी.

बराय–*अव्य.* [*फा.*] करितां; साठीं. **–नाम**–*अव्य.* नांवापुरतें; नाममात्र.

बरायन*–*पु.* १. लग्नामध्यें वराच्या हातांत घातलें जाणारें लोखंडी कडें. २. लग्नांतील कलश.

बरार–*पु.* १. एक जंगली जनावर. २. वऱ्हाड (प्रांत).–*पु.* [*फा.*] कर. –*वि.* घेऊन जाणारा; आणणारा; पूर्ण करणारा.

बराव–*पु.* १. दूर राहाणें; बचावणें; संयम. २. पथ्य.

बरावुर्द– *स्त्री.* [*फा.*] १. पगारपत्रक. २. अंदाजपत्रक. ३. बेरीज; गोषवारा.

बरास–*पु.* भीमसेनी कापूर.

बराह–*अव्य.* [*फा.*] १. द्वारा; कडून. २. प्रमाणें; तऱ्हेनें.

बराह–*पु.* वराह; डुक्कर.

बरिआई*– *स्त्री.* जबरदस्ती; बळजबरी. –*अव्य.* बळजबरीनें.

बरिआर*–*वि.* बलवान्.

बरिच्छा– *स्त्री.* लग्न ठरविणें; नक्की करणें; वाङ्निश्चय.

बरिया*– बलवान्; बलिष्ठ. – *स्त्री.* गोळी; वटिका.

बरिषा*– *स्त्री.* वृष्टि; पाऊस.

बरी–*वि.* [*अ.*] मुक्त; सुटलेला.

बरी– *स्त्री.* १. वडी. २. भाजलेली चुनखडी; कळी. **–का चूना**–*पु.* कळीचा चुना.

बरीद–*पु.* [*अ.*] जासूद.

बरीस*–*पु.* पा० 'वरस'.

बरु*–*अव्य.* १. भलेहि; खुशाल; बिनहरकत; एक वेळ; हवेंतर. २. किंबहुना.

बरुआ–वा+–*पु.* १. मुंजा मुलगा. २. मुंज. ३. मोळ; मुंज (गवत). –*वि.* खटचाळ.

बरुक*–*अव्य.* पा० 'बरु'.

बरुनी–*स्त्री.* पापणीचे केंस.

बरेंड़ा–*पु.* १. आडें. २. कौलाराचा उंच भाग. ३. छपराची कैंची.

बरे*–*अव्य.* १. बलपूर्वक. २. मोठ्या आवाजानें. ३. बदलीं; ऐवजीं.

बरेखी–षी– *स्त्री.* लग्न ठरविणें; वाङ्निश्चय; वर–वधू–परीक्षा. २. वायकांच्या दंडांतील एक दागिना; वांकी.

बरेच्छा– *स्त्री.* १. वर परीक्षा किंवा वधूपरीक्षा. २. विवाहनिश्चिति. ३. लग्नांतील देण्याघेण्याचा ठराव.

बरेज–जा–*पु.* पानमळा.

बरेठ–ठा–*पु.* धोबी; परीट.

बरेठन– *स्त्री.* परटीण.

बरेता–*पु.* वाखाचा मोठा दोर.

बरै+–*पु.* तांबोळी; पानवाला.

बरैन–नि+– *स्त्री.* तांबोळीण; पानपट्टीच्या दुकानावर बसणारी बाई.

बरोक–*पु.* १. लग्न नक्की करतांना वधूपक्षाकडून वरपक्षाला दिली जाणारी रक्कम; (बर (वर) + रोक). २. हुंडा; करणी. –*अव्य.* बळजबरीनें; जुलुमानें.

बरो(रौ)ठा–*पु.* १. देवडी. २. बैठक; दिवाणखाना. **मु०–(ठे)का चार**–द्वार-पूजा.

बरोरु–*वि. स्त्री.* सुंदरी.

बरोह– *स्त्री.* वडाची पारंबी.

बरौंछी– *स्त्री.* ज्यानें सोनार दागिने साफ करतो तो डुकराच्या केंसांचा कुंचला.

बरौनी– *स्त्री.* १. डोळ्यांच्या पापण्यांचे केंस. २.+ पाणी भर-

णारी बाई; मोलकरीण.

बर्क़–पु. [अ.] वीज; विद्युत्. –*वि.* चपल; चलाख.

बर्क़ी–वि. [अ.] विजेचा; 'इलेक्ट्रिकल.'

बर्ग–पु. [फा.] १. झाडाचें पान. २. लढाईचें सामान; युद्ध-सामग्री. [श्रेष्ठ.

बर्ज*–अव्य. १. वर्ज्य. २. वर्य;

बर्जना*–क्रि. स. मनाई, आडकाठी करणें; वर्ज्य करणें.

बर्तन–पु. भांडें.

बर्ताव–पु. पा० 'बरताव.'

बर्फ़–स्त्री. [फा.] हिम; बर्फ. **–की नदी–** स्त्री. हिमनदी; 'ग्लेशियर'. [प्रदेश.

बर्फ़िस्तान–पु. [फा.] हिम-

बर्फ़ी–स्त्री. [फा.] बर्फी.

बर्फ़ीला–वि. [फा.] बर्फाळ; बर्फ असलेला; हिमयुक्त.

बर्बर–पु. १. असभ्य, जंगली मनुष्य. २. कुरळे केंस. –*वि.* १. रानटी; असभ्य. २. उद्धट; उच्छृंखल. ३. कुरळे.

बर्मा–पु. [इं.] ब्रह्मदेश.

बर्र–पु. [अ.] १. कोरडी जमीन; भूमि. २. अरण्य; वन. **बर्रे आज़म; बर्रे सग़ीर–**पु. मोठा भूप्रदेश; खंड (आशिया, युरोप इ०).

बर्र+–पु. गांधिलमाशी.

बर्राक–वि. [अ.] १. चमकणारा. २. शुद्ध पांढरा. ३. धूर्त. ४. अत्यंत वेगवान्.

बर्राना–क्रि. अ. १. झोपेंत बडबडणें; बरळणें. २. अद्वातद्वा बोलणें; बडबडणें. [कुंभारीण.

बर्रै–पु. १. गांधिल माशी. २.

बर्स–पु. [अ.] कोड; कुष्ठ रोग.

बलंद–वि. [फा.] १. उंच २. श्रेष्ठ.

बलंदी–स्त्री. [फा.] १. उंची; उच्चता. २. अभिमान; गर्व.

बल–पु. १. शक्ति; सामर्थ्य; जोर; 'फोर्स'. २. कर्तबगारी. ३. आसरा; भरंवसा. ४. आश्रय; आधार. ५. सैन्य; फौज. ६. बाजू. **–दाऊ*; –देव–**पु. श्रीकृष्णाचा भाऊ; बलराम. **–परीक्षण–**पु. ताकत अजमावणें; 'शो डाउन'. **–बीर*–**पु. १. कृष्ण. २. मारुती. **–बूता–**पु. सामर्थ्य; जोर. **–भद्र–**पु. १. बलवान् पुरुष. २. बलराम. **–साम्य–**पु. सत्तेचा समतोल; 'बॅलन्स ऑफ पॉवर'.

बल–पु. १. पीळ; मुरड. २. लपेट; फेरा. ३. नागमोडी वळण. ४. पैलू. ५. नुकसान; तोटा. **–मु० –खाना–**१. पीळ पडणें. २. लचकणें. **–पड़ना–**१. अंतर पडणें; फरक होणें. २. नुकसान होणें.

बलकट–वि. आगाऊ; अनामत; 'ॲडव्हान्स'.

बलकना–क्रि. अ. १. उकळी फुटणें. २. जोमांत असणें.

बलकनि*– स्त्री. प्रवाह; उल्हास; आवेश.

बलकल*–पु. वल्कल.

बलकाना–क्रि. स. १. उकळणें. २. उत्तेजन देणें. [कफ.

बलग़म–पु. [अ.] श्लेष्मा;

बलटुट; बलतोड़–पु. केस्तूड; केस तुटल्यामुळें होणारा फोड.

बलद–पु. बैल. –*वि.* शक्तिदायक.

बलना–क्रि. अ. पेटणें; जळणें.

बलबलाना–क्रि. अ. उंटाचें ओरडणें. २. बडबडणें; वटवट करणें.

बलबलाहट–स्त्री. १. उंटाचें ओरडणें. २. खोटा अहंकार.

बलभी–स्त्री. सर्वांत वरच्या मजल्यावरील खोली; गच्चीवरील खोली.

बलम–मा*–पु. प्रियकर.

बलमीक–पु. वारूळ.

बलवा–पु. १. दंगा; हुल्लड. २. बंड; राजद्रोह.

बलवाई–वि. पु. १. दंगेखोर; २. बंडखोर; राजद्रोही.

बला–स्त्री. [अ.] १. संकट; आपत्ति. २. दुःख; कष्ट. ३. भूतप्रेताची बाधा. ४. रोग; व्याधि. **मु०–का–**अत्यंत; घोर; बेहद्द. **(मरी)–जाने–**१. मला गरज नाहीं. २. माझं अडलंय खेटर. **(मेरी)–से–**मला पर्वा नाहीं. **बलायें लेना–**दृष्ट काढणें; दुसऱ्याचें संकट आपल्यावर घेणें; इडापिडा टळावी म्हणून डोक्यावर बोटें मोडणें.

बलाइ–स्त्री. पा० 'बला'.

बलाका–स्त्री. १. बगळ्यांची ओळ. २. प्रिया. ३. कामुक स्त्री.

बलात्–अव्य. बळजबरीनें; दुराग्रहपूर्वक; जबरदस्तीनें. **–सत्तापहरण–**पु. 'कूडेटा'; पा० 'शासनिक विपर्यय'.

बलादवतरण–पु. इंजिनाच्या बिघाडामुळे विमानाला नाइलाजानें अकस्मात् खाली उतरावें लागणें; 'फोर्स्ड लँडिंग'.

बलादवतरित–वि. इंजिनांतील बिघाडामुळें खालीं उतरावें लागलेलें (विमान); 'फोर्स्ड लँडेड'.

बलाद् ग्रहण–पु. बळजबरीनें पैसे घेणें; 'एक्झॅक्शन'.

बलाधिकरण–पु. लष्कराचा वापर; सैन्याचें कार्य, हालचाल.

बलाधिकृत–*पु.* सैन्याचा सर्वोच्च अधिकारी; 'मार्शल'.

बलाध्यक्ष–*पु.* सेनापति.

बलाबल–*पु.* सामर्थ्य व दुर्बलता; जोर व दुबळेपणा.

बलाय–*स्त्री.* पा० 'बला'.

बलि–*स्त्री.* १. बळी. २. कर; महसूल. ३. नैवेद्य. **मु०–चढ़ाना**–बळी देणें; ठार करणें. **–बलि जाना**–स्वतःला ओंवाळून टाकणें.

बलिकनीति–*स्त्री.* सत्तेचें राजकारण; 'पॉवर पॉलिटिक्स'.

बलिया*–*वि.* बळकट; बलवान्.

बलिष्ठ–*वि.* बलवान्; सामर्थ्यवान्.

बलिष्ठातिजीवन–*पु.* योग्यतमातिजीवन; बळी तो कान पिळी; 'सर्व्हायव्हल ऑफ दि फिटेस्ट'.

बलिहारना*–*क्रि. स.* अर्पण करणें; बळी देणें.

बलिहारी–*स्त्री.* आत्मार्पण; त्याग. **मु०–जाना**–आत्मार्पण करणें. **–लेना**–प्रेम व्यक्त करणें; अलाबला घेणें.

बली–*वि.* बलवान्.–*पु.* १. रेडा. २. सांड. [मिसळलेला.

बलुआ–वा–*वि.* रेताड; रेती

बलूला–*पु.* पाण्याचा बुडबुडा.

बलैया–*स्त्री.* १. आपत्ति. २. कुरवंडी. **मु०–लेना**–कुरवाळणें; 'इडपिडा टळो' करणें.

बक्कि–*अव्य.* [*फा.*] १. किंबहुना; इतकेंच नव्हे तर. २. उलट.

बल्लभी*–*स्त्री.* छत; छप्पर.

बल्लम–*पु.* १. सोटा; दंडा. २. भालदार–चोपदाराच्या हातांतील दंड; राजदंड. ३. भाला. ४. वासा. **–बर्दार**–*पु.* भालदार; चोपदार.

बल्लमटेर–*पु.* [*इं.*] स्वयंसेवक; 'व्हॉलंटियर'.

बल्लरि–री–*स्त्री.* वेली; लता.

बल्ला–*पु.* १. लांकडाचा ओंडका; खोड. २. लठ्ठ सोटा. ३. वल्हें. ४ 'बॅट' (क्रिकेट).

बल्ली–*स्त्री.* १. वेली. २. छतासाठीं वापरावयाचा वासा.

बल्लेबाज़–*पु.* फलंदाज; 'बॅट्समन'. ['बॅट्समनशिप'; 'बॅटिंग.'

बल्लेबाज़ी–*स्त्री.* फलंदाजी;

बवंडर–*पु.* १. वावटळ. २. तुफान. [विखुरणें; पसरणें.

बवना*–*क्रि. स.* १. पेरणें. २.

बवाल–*पु.* पा० 'बवाल'.

बवासीर–*स्त्री.* [*अ.*] मूळव्याध.

बशर–*पु.* [*अ.*] मनुष्य.

बशर्ते कि–*अव्य.* [*अ. + फा.*] अट ही कीं; असें झालें तर.

बसंत–*पु. स्त्री.* वसंत (ऋतु).

बसंती–*वि.* १. वसंत ऋतूचा. २. फिकट पिवळ्या रंगाचा.–*पु.* १. फिकट पिवळा रंग. २. पिवळें कापड.

बस–*पु.* १. वश; आंवाका; ताबा; अधिकार. २. उपाय; इलाज. **–का**–ताब्यांतील; आंवाक्यांतील.

बस*–*वि.* सुवासित.

बस–*अव्य.* [*फा.*] पुरे; एवढेंच; पुष्कळ; बस्स. **मु०–करो**–पुरें कर; थांब.

बसना–*क्रि. अ.* १. वसणें. २. वस्ती करणें; राहाणें; वसाहत करणें. ३.* बसणें. ४. भरभराटीस येणें. ५. मुक्काम करणें. **मु० मनमें बसना**–आठवणींत राहाणें; मनात ठसणें, घोळणें.

बसना–*क्रि. अ.* सुगंधित होणें.

बसना–*पु.* १. बस्ता; दप्तर. २. पिशवी. ३. पैशाची थैली. ४.+ भांडें.

बसनि*–*स्त्री.* निवास; मुक्काम.

बसनी+–*स्त्री.* कसा; कमरेला बांधण्याची पैशाची पिशवी.

बसर–*स्त्री. पु.* [*फा.*] निर्वाह; गुजारा. **–औक़ात**–*स्त्री.* जीवननिर्वाह. [सुगंधित.

बसवार*–*पु.* फोडणी. –*वि.*

बसवास+–*पु.* १. विऱ्हाड; मुक्काम; निवास. २. राहाण्याची सोय, पद्धत.

बसह*–*पु.* बैल. [धित.

बसौंधा*–*वि.* वासाचा; सुगं-

बसा–*स्त्री.* १. वसा; चरबी; मेद. २.* गांधिलमाशी.

बसाना–*क्रि. स.* १. वस्तीकरितां जागा देणें. २. वसाहत करविणें; वसविणें. ३.* बसविणें. –*क्रि. अ.* १. वसाहत करणें. २. वास, दुर्गंध येणें.

बसिआ (या)ना+–*क्रि. अ.* शिळें होणें; वास येणें.

बसिऔ(यौ)रा–*पु.* १. शिळा सप्तमी (या दिवशीं स्त्रिया फक्त शिळेंच अन्न खातात). २. शिळावळ. –*वि.* शिळें. [२. राहाणी.

बसोक(ग)त–*स्त्री.* १. वस्ती.

बसीठ–*पु.* जासूद; संदेशवाहक; निरोप्या. [शिष्टाई.

बसीठी–*स्त्री.* निरोप्याचें काम;

बसीला–*वि.* १. वासाचा. २. दुर्गंधयुक्त. [(सुताराचें एकहत्यार).

बसूला–*पु.* तासणी; वाकस

बसूली–*स्त्री.* तासणी; विटा तासण्याचें गवंड्याचें अवजार.

बसेरा–*पु.* १. वसतिस्थान; मुक्काम; प्रवासी लोकांची रात्रीं वस्ती करण्याची जागा. २. पक्ष्यांचें घरटें. –*वि.* वस्ती करणारा. **मु०–करना**–रात्रीं मुक्काम करणें.

बसेरी; **बसैया***– *वि. पु.* निवास करणारा.

बसोबास*–*पु.* निवासस्थान.

बसौंधी– *स्त्री.* सुगंधित व मलई-दार बासुंदी; रबडी.

बस्त– *स्त्री.* वस्तु. **चीजबस्त**– *स्त्री.* चीजवस्तु.

बस्ता– *पु.* [*फा.*] दप्तर बांधण्याचें फडकें; दप्तर.–*वि.* बांधलेला; घडी केलेला. **मु०–बाँधना**– कागदपत्रें गोळा करणें; दप्तर गुंडाळून घरीं जाण्याची तयारी करणें. [वस्ती; निवास.

बस्ती– *स्त्री.* वस्ती; लोक-

बस्साना– *क्रि. अ.* दुर्गंध, घाण सुटणें.

बहँगी– *स्त्री.* कावड.

बहक– *स्त्री.* बहकणें; भकणें; बडबड; वटवट.

बहकना– *क्रि. अ.* १. चुकीच्या मार्गाला जाणें; वाट चुकणें; पथभ्रष्ट होणें. २. वहकणें; नादीं लागणें; ३. नशेंत चूर होणें. ४. चुकणें; फसणें. **मु० बहकी–बहकी बातें करना**–बरळणें; झिंगलेल्या माणसासारखें बोलणें.

बहकाना– *क्रि. स.* भडकविणें; बहकाविणें; फुसलावणें; पथभ्रष्ट करणें. [भडकविणें.

बहकावा–*पु.* फूस; फसवणूक;

बहत्तर–*वि.* बहात्तर; ७२.

बहन– *स्त्री.* बहीण. –*पु.** वारा वाहाणें; झुळूक.

बहना– *क्रि. अ.* १. वाहाणें. २. गळणें. ३. वाहवणें; बहकणें. **मु० बहती गंगा में हाथ धोना**– वाहत्या गंगेंत हात धुवून घेणें; सर्वजण ज्या गोष्टीचा फायदा घेतात तिचा आपणहि फायदा घेणें.

बहना– *स्त्री.* बहीण; हे भगिनी (संबोधन).–**पा**–*पु.* बहिणीचें नातें.

बहनु*– *पु.* वाहन; स्वारी.

बहनेली– *स्त्री.* बहीण मानलेली स्त्री; मानलेली बहीण. [नवरा.

बहनोई– *पु.* मेहुणा; बहिणीचा

बहबूदी– *स्त्री.* [*फा.*] १. कल्याण; उपकार. २. शुभ कार्य.

बहम– *अव्य.* [*फा.*] १. बरोबर. २. आपसांत. ३. परस्पर. **मु० –पहुँचना**– प्राप्त होणें. –**पहुँचाना** पुरविणें; पुरवठा करणें. –*पु.** पा० ' वहम '.

बहर–*पु.* [*अ.*] समुद्र; महासागर.–*स्त्री.* छंद. [साठीं.

बहर– *अव्य.* [*फा.*] करितां;

बहरना*– *क्रि. अ.* व्यतीत होणें; निघून जाणें.

बहरहाल–*अव्य.* [*फा.*] कोठल्याहि स्थितींत; होईल तसें.

बहरा–*पु.* [*फा.*] १. भाग; हिस्सा. २. भाग्य; नशीब.

बहरा–*वि.* बहिरा. **मु०–पत्थर** –अत्यंत, ठार बहिरा.

बहराना–*क्रि. स.* मन रंजविणें; दुःख विसरून जाण्यासाठीं एखादी गोष्ट सांगणें. –*क्रि. अ.** बहिरें होणें.

बहरियाना+ –*क्रि. स.* बाहेर काढणें; वेगळें करणें.

बहरी–*वि.*[*अ.*] समुद्री; सागरी.

बहरी– *स्त्री.* बहिरी ससाणा.

बहल– *स्त्री.* टप (स्वारी) असलेली, माणसांनीं बसावयाची बैलगाडी.–**ख़ाना**–*पु.* गाडीतळ.

बहलना–*क्रि. अ.* रमणें; मनरंजन होणें.

बहलाना–*क्रि. स.* १. रमविणें; मनरंजन करणें. २. फूस लावणें; फसविणें.

बहलाव–*पु.* मनोरंजन.

बहली – *स्त्री.* बैलगाडी; पा० ' वहल '.

बहस–*स्त्री.* [*अ.*] १. वादविवाद. २. युक्तिवाद; तर्क. ३. हुज्जत; झगडा.–**मुबाहिसा**–*पु.* वादविवाद; शास्त्रार्थ. [निर्भय.

बहादुर–*वि.* [*फा.*]शूर; वीर;

बहादुराना – *वि.* [*फा.*] वीरासारखा; वीरोचित.–*अव्य.*शौर्यानें; वीरतापूर्वक. [वीरता.

बहादुरी– *स्त्री.* [*फा.*] शौर्य;

बहाना–*पु.* [*फा.*] १. स्वार्थ साधण्यासाठीं खोटें बोलणें. २. निमित्त; कारण; सबब ३. वहाणा; मिष.

बहाना–*क्रि. स.* १. वाहविणें; प्रवाहांत सोडणें. २. ओतणें; ढाळणें. ३. अपव्यय करणें. [मिषानें.

बहाने–*अव्य.* [*फा.*] निमित्तानें;

बहानेबाज़ी–*स्त्री.* [*फा.*[सबबी सांगणें; बहाणा करणें.

बहार– *स्त्री.* [*फा.*] १. वसंत ऋतु. २. मौज; आनंद. ३. जवानी; यौवन. ४. रमणीयता. ५. प्रफुल्लता; भर; बहर. **मु०–पर आना** –१. बहरास येणें. २. यौवन मुसमुसणें.

बहाल–*वि.* [*फा.*] १. कायम; स्थिर; जशाचा तसा. २. प्रसन्न; खुश. ३. चांगल्या स्थितींतला.– –*अव्य.* पूर्ववत्; पूर्वीप्रमाणें; पूर्वीच्या जागीं.

बहाली– *स्त्री.* [*फा.*] १. पुनर्नियुक्ति; पूर्वीच्या जागीं नेमणूक होणें. २. बहाणा; फसवणूक.

बहाव–*पु.* १. प्रवाह; धार. २. वाहातें पाणी.

बहिःस्पर्शी – *वि.* वरवरचें; दिखाऊ; ' सुपरफीशियल '.

बहिःक्रम*–*पु.* वय.

बहिन– *स्त्री*. बहीण.

बहियाँ*– *स्त्री*. बाही; बाहु; हात.

बहिरत*–*अव्य*. बाहेर.

बहिरारंभ–*पु*. 'एक्झार्क'.

बहिर्गत–*वि*. बाद; 'आउट'.

बहिर्गमन-द्वार–*पु*. (थिएटरांतून) बाहेर जाण्याचा रस्ता; 'एक्झिट'.

बहिर्वासीरोगी–*पु*. बाह्य रुग्ण; 'आउटडोअर पेशंट'.

बहिश्त–*पु*. [*फा.*] स्वर्ग.

बहिश्ती–*पु*. [*फा.*] स्वर्गांत राहाणारा.–*वि*. स्वर्गीय.

बहिष्करण – *पु*. नांव काढून टाकणें; हाकलून लावणें; 'रस्टिकेशन'.

बहिष्कार–*पु*. टाकणें; सोडणें. **मु०–करना**–बहिष्कार घालणें.

बहिष्कोण–बाह्यकोन; 'एस्क्टीरियर अँगल'.

बही– *स्त्री*. हिशेबाची वही.– **–खाता**–*पु*. १. हिशेबाच्या वह्या. २. वहीखाता. **मु०–पर चढ़ना** या **टँकना**–खात्यावर लिहिलें जाणें.

बहीर*– *स्त्री*. १. गर्दी; जमाव. २. बाजारबुणगे. ३. सैन्याचें सामानसुमान.

बहीर*–*अव्य*. बाहेर.

बहु–*वि*. अनेक; पुष्कळ.–**गुण**–*वि*. १. अनेक तारा किंवा सुतें असलेला. २. अनेक प्रकारचा; नानाविध; 'मल्टिपल'. –**गुना**–*पु*. बोघणें; पातेलें. –**धंधी**–*वि*. एकाच वेळीं अनेक व्यवसायांत गुंतलेला.–**पतित्व**–*पु*. एकाच वेळीं अनेक पतींची पत्नी बनून राहणें; 'पॉलिअँड्री'.–**पदी**– *वि*. बहुपद; अनेक पदें असणारा; 'मल्टिनॉमियल'.–०**विक्रीकर**–*पु*. पा० 'प्रतिपद बिक्री कर.' – **भाषाज्ञ** – *पु*. अनेक भाषा जाणणारा; 'पॉलिग्लॉट'. – **भुज** – *पु*. अनेक कोण किंवा बाजू असलेली आकृति; 'पॉलिगॉन'.–**मुख**–*वि*. अष्टपैलू; बहुमुखी; 'व्हर्सटाइल' (बहुमुखी प्रतिभा = व्हर्सटाइल जीनियस). –**युग्म**–*वि*. 'ॲक्टिनोमॉर्फिक.' –**रूपदर्शक**; –**रूपदर्शी**–*पु*. अनेक प्रतिबिंबें दाखविणारी नळी; चारुदर्शक यंत्र; 'कॅलिडोस्कोप.'–**रूपिया**–*पु*. बहुरूपी; अनेक रूपें, सोंगें घेणारा.–**वर्ध्यक्ष**–*वि*. 'साइमोज.'–**विद्य**–*वि*. बहुमुखी; अष्टपैलू; 'व्हर्सटाइल.'

बहुत–*वि*. १. पुष्कळ; अधिक. २. पुरेसें; भरपूर. **मु०–अच्छा**–छान; बरें आहे. –**करके**–बहुधा; अधिकतर. –**कुछ**–पुष्कळ; बराचसा. –**खूब**–फार छान ! वाहवा !

बहुतक*–*वि*. पुष्कळ.

बहुतात; बहुतायत– *स्त्री*. विपुलता; अधिकता.

बहुतेरा–*वि*. अधिक; पुष्कळ. –*अव्य*. अनेक प्रकारें; खूप.

बहुतेरे–*वि*. पुष्कळ; अनेक.

बहुधा–*अव्य*. १. अनेक प्रकारें. २. बहुतेक; बहुधा. [पुनः भेटणें.

बहुरना*–*क्रि. अ*. परत येणें;

बहुरि*–*अव्य*. पुनः; यानंतर.

बहुरिया–*स्त्री*. नववधू; नवरी; नवी सून.

बहुरी+– *स्त्री*. १. भाजलेला गहूं किंवा जव. २. चणेमुरमुरे.

बहुला– *स्त्री*. १. वेलदोडा. २. चंद्राची बारावी कला. –**चौथ**–*स्त्री*. भाद्रपद (श्रावण) वद्य चतुर्थी. (धान्यफराळाची).

बहूँटा–*पु*. बाजूबंद; वांकी.

बहू– *स्त्री*. १. सून. २. पत्नी. ३. वधू; नवरी मुलगी.

बहेड़ा–रा–*पु*. बेहडा (औषधीवनस्पति).

बहेतू–*वि. पु*. भटक्या; उनाड.

बहेरी*– *स्त्री*. बहाणा; मिष.

बहेलिया–*पु*. पारधी; व्याध; शिकारी. [गमनः

बहोर*–*पु*. परतविणें; पुनरा-

बहोरना*–*क्रि. स*. १. परतून लावणें. २. परत देणें.

बहोरि*–*अव्य*. पुन्हां; वारंवार.

बह्र– *स्त्री*. [*अ.*] छंद; वृत्त. –*पु*. महासमुद्र.

बाँ–*पु*. १. हम्मा; हंबरण्याचा आवाज. २*. पा० 'बार'.

बाँएँ–*अव्य*. डावीकडे.

बाँक–*पु*. १. वांकडेपणा; वक्रता; वांकण. २. वांकडी सुरी. ३. पिळून रस काढण्याचें यंत्र. –*वि*. १. वांकडा. २. तिरपा. –*स्त्री*.; *पु*. १. बाजूबंद. २. पायांत घालावयाचें चांदीचें कडें. ३. बांगडी. ४. धनुष्य. ५. सुरी.

बाँकड़ा+–*वि*. वीर; साहसी.

बाँकड़ी– *स्त्री*. साडीला लावावयाचा सोनेरी-रुपेरी कांठ; फीत.

बाँकना*–*क्रि. स*. वांकविणें. –*क्रि. अ*. वांकणें.

बाँकपन–ना–*पु*. १. वक्रता; वांकडेपणा. २. नखरा; नटवेपणा. ३. शोभा; सौंदर्य.

बाँका–*वि*. १. वांकडा. २. बहादुर. ३. नखरेल; नटवा; षोकीन; फांकडा.

बाँकुर–रा*–*वि*. १. वांकडा; मोडलेला. २. कुशल; चतुर. ३. तीक्ष्ण. ४. वीर; साहसी.

बाँग–*स्त्री*. [*फा.*] १. आरोळी; ओरड. २. नमाज पढण्यासाठीं मुल्लाचें मोठ्यानें ओरडून निमंत्रण देणें. ३. कोंवडयाचें आरवणें.

–(गे)दरा–*पु.* तांडचाची कूच करण्याची घंटा.

बाँगड़ू– *स्त्री.* बांगड प्रदेशाची (पंजाबच्या हिसार, रोहतक व करनाल जिल्ह्यांची) भाषा. –*वि.*+ मूर्ख; अडाणी; गांवढळ.

बाँगर–*पु.* उंचावर असलेली जमीन; पुराच्या पाण्यांत न बुडणारी जमीन. [फांस.

बाँगुर–*पु.* पक्षी धरण्याचें जाळें;

बाँचना–*क्रि. स.* १. वाचणें; वाचन करणें. २. वांचविणें. ३. निवड करणें. ४. शिल्लक राहाणें; उरणें.

बाँछना*–*क्रि. स.* १. इच्छिणें; अभिलाषा करणें. २. निवडणें.

बाँछित*–*वि.* इच्छिलेलें; वांछित. [करणारा.

बाँछी*–*वि.* इच्छुक; इच्छा

बाँझ– *स्त्री.* वांझ; वंध्या.

बाँट– *स्त्री.* वांटणी; वांटा. –**बूट**– *स्त्री.* वांटणी; हिस्से; तुकडे.

बाँटना–*क्रि स.* १. वांटणें; विभागणें. २*. घोटणें; वांटणें.

बाँटा–*पु.* हिस्सा; भाग; वांटा. –**चौदस**– *स्त्री.* आश्विन शुद्ध चतुर्दशी.

बाँड़ा–*वि.* १. शेंपूट तुटलेला पशु. २. एकटा; असहाय्य.

बाँड़ी– *स्त्री.* १. रंगीत छडी; लाठी. २. शेपूट तुटलेली गाय किंवा इतर पशूंची मादी. –**बाज़**–*वि. पु.* १. लाठीबहाद्दर. २. त्रास देणारा.

बाँदर*–*पु.* वानर; माकड.

बाँदा–*पु.* बांडगूळ.

बाँदी– *स्त्री.* दासी; मोलकरीण.

बाँदू*–*पु.* कैदी; बंदी.

बाँध– *पु.* धरण; बांध.

बाँधना– *क्रि. स.* १. बांधणें. २. निश्चित करणें; ठरविणें. ३. गुंडाळणें; लपेटणें. ४. जोडणें. ५. गद्य किंवा पद्य रचणें. [पशुशाला.

बाँधनी पौरि*– *स्त्री.* गोठा;

बाँधनू– *पु.* १. ठरविलेली गोष्ट किंवा विचार; मनसुबा; योजना. २. मनोराज्य. ३. खोटा आरोप; आळ. ४. कापड रंगविण्यासाठी जागजागीं बांधणें. **मु० –बाँधना–** १. मनसुबा रचणें. २. मनोराज्य करणें. ३. आळ घेणें.

बांधव– *पु.* बंधु; मित्र; नातेवाईक **मु०बंधु–बांधव**–*पु.* इष्टमित्र.

बाँधिल*– *वि.* बांधलेला; बद्ध.

बाँबी–मी– *स्त्री.* १. मुंग्यांचें, वाळवीचें वारूळ. २. सापाचें बीळ; वारूळ.

बाँभन*–*पु.* ब्राह्मण.

बाँया– *वि.* पा. 'बायाँ'.

बाँस– *पु.* १. बांबू; वेळू. २. सव्वा तीन गजांचें माप. ३. पाठीचा कणा. –**फोड़ा**–*पु.* बुरूड. –**बराबर**– *वि.* खूप उंच. **मु०– पर चढ़ना**– वदनामी होणें. – **पर चढ़ाना**– १. वदनामी करणें. २. एखाद्यास हरभऱ्याच्या झाडावर चढविणें. –(**सों**) **उछलना**– आनंदानें उडचा मारणें. [वांसरी. २. कसा.

बाँसरी–ली– *स्त्री.* १. मुरली;

बाँसा– *पु.* १. नाकाचें हाड. २. पाठीचा कणा. **मु०– फिर जाना**– नाकाचें हाड वाकडें होणें (हें मृत्यु जवळ आल्याचें लक्षण समजलें जातें). [बांसरी.

बाँसुरी–ली– *स्त्री.* मुरली;

बाँह– *स्त्री.* १. हात; बाहु; भुजा. २. भरोसा; आसरा. ३. एक प्रकारचा व्यायाम. ४. बाही. **मु०–गहना अथवा पकड़ना– १.** साहाय्य करणें; आधार देणें; २. विवाह करणें. –**टूटना**– निराधार होणें.– **देना**– आधार देणें. [वेळ.

बा*– *पु.* १. पाणी. २. पाळी;

बा–*अव्य.* [*फा.*] १. सह; बरोबर. २. प्रत्यक्ष; समक्ष. –**अदब**– *वि.* विनम्र.–*अव्य.*नम्रतेनें.–**असर**– *वि.* प्रभावशाली.– **इख़्तियार**– *वि.* अधिकार असणारा; अधिकारी. –**कमाल**– *वि.* १. निपुण; हुशार; प्रवीण. २. अद्‌भुत सामर्थ्य असलेला. –**क़ायदा**–*अव्य.* नियमबद्धपणें; व्यवस्थितपणें; विधिपूर्वक; नियमितपणें; बरोबर. –*वि.* नियमित. –**ज़ाप्ता–ब्ता**–*अव्य.* कायदेशीर रीत्या; नियमानुसार. –*वि.* कायदेशीर; नियमयुक्त. –**मज़ा**–*वि.* मजेदार; स्वादिष्ट. –**मज़ाक**–*वि.* रसिक; विनोदी. –**मुरौवत**–*वि.* सुशील; मुर्वतखोर. –**वजूद**– *अव्य.* असूनहि; तरीहि; जरी. –**वफ़ा**–*वि.* निष्ठावान्; प्रामाणिक. –**शऊर**–*वि.* सुसंस्कृत; सभ्य; शिष्टाचारसंपन्न. –**सलीक़ा**– –*वि.* पद्धतशीर काम करणारा, वागणारा. –**हम**–*अव्य.* १. आपसांत; परस्पर. २. साथ; सहित; एकत्रित. –**हमी**–*वि.* आपसांतील.

बाइबिल– *स्त्री.* [*इं.*] बायबल; ख्रिस्ती धर्मग्रंथ.

बाइस–*पु.* [*अ.*] १. कारण; सबब. २. संस्थापक. –*वि.* पा० 'बाईस'.

बाई– *स्त्री.* त्रिदोषांपैकीं वात दोष; वायु. **मु०–का दख़ल;–की झोंक**–वातप्रकोप; सन्निपात. –**चढ़ना**–१. सन्निपात होणें. २. शेफारणें. –**पचना**–घमेंड जिरणें.

बाई– *स्त्री.* १. कुलीन स्त्री. २. वेश्या. –**जी**– *स्त्री.* वेश्या; कलावंतीण.

बाईस–*वि.* बावीस; २२.

बाईसी–*स्त्री.* बाविसांचा गट.

बाउ*–*पु.* वायु; पाद. [मुका.

बाउर*–*वि.* १. वेडा; मूर्ख. २.

बाक़र–*पु.* [*अ.*] १. महा पंडित; जाडा विद्वान्. २. धनाढ्य माणूस. [साल.

बाकल–*पु.* वल्कल; झाडाची

बाकला–*पु.* [*अ.*] १. घेवडा. २. एक प्रकारचा मोठा वाटाणा; मटार. [पेटी; पेटारा.

बाकस+–*पु.* [इं. 'बॉक्स'].

बाक़ी–*स्त्री.* [*अ.*] १. शिल्लक. २. वजाबाकी. –*वि.* १. शिल्लक; अवशिष्ट; उरलेला. २. सदैव राहाणारा. –*अव्य.* पण; परंतु. –*स्त्री.** एक धान्य.

बाकुल*–*पु.* वल्कल.

बाग़–*पु.* [*अ.*] १. बाग; उपवन; बगीचा. २. मळा. **–बाग़–** –*वि.* अत्यंत आनंदित; खुष. **–बान**–*पु.* माळी. **–बानी**–*पु.* माळ्याचें काम.

बाग–*स्त्री.* लगाम. **–डोर**–*स्त्री.* लगाम; लगामाची दोरी. **मु०– –मोड़ना**–वळविणें; घेऊन जाणें.

बागना*–*क्रि. अ.* १. चालणें, वागणें; फिरणें. २. बोलणें.

बागर–*पु.* १. पुराच्या वेळीं हि नदीचें पाणी जिथवर पोंचत नाहीं अशी नदीकांठची जमीन. २. जाळें; फंदा; दोरी. ३. वाळवंट.

बाग़ान–*पु.* [*फा.* 'बाग़'चें अनेक०] मळे (चहाचे, निळीचे इ०).

बागा*–*पु.* १. एक प्रकारचा जुना अंगरखा. २. वराचा मानाचा पोषाख. [राजद्रोही.

बाग़ी–*पु.* [*अ.*] बंडखोर;

बाग़ीचा–*पु.* [*फा.*] लहान बाग; बगीचा.

बागुर*–*पु.* जाळें; फांस; फंदा.

बागेसरी+–*स्त्री.* १. वागेश्री (संगीत). २. वागीश्वरी.

बाघंबर–*पु.* १. व्याघ्रांबर. २. एक प्रकारची घोंगडी.

बाघ–*पु.* वाघ. [–*स्त्री.* **बाघिन**].

बाघी–*स्त्री.* जांघेंतील अवधणा, गांठ, गळू.

बाच*–*वि.* वाच्य; वर्णनीय.

बाचा*–*स्त्री.* वाचा; वाणी; वचन. **–बंध**–*वि.* प्रतिज्ञाबद्ध.

बाछ–*पु.* –निवड. –*स्त्री.* दोन्ही ओंठ जेथें एकमेकांना जोडले जातात तो तोंडाचा भाग; तोंड. **मु०–(छें) खिलना**–खुष होणें; आनंदानें फुलणें.

बाछना–*क्रि. स.* निवडणें; वेगळें करणें. [२. मुलगा; वत्स.

बाछा+–*पु.* १ वासरूं; गोऱ्हा.

बाज़ *पु.* [*फा.*] शिकारी पक्षी; बहिरी ससाणा. [विना.

बाज*– घोडा.–*अव्य.* शिवाय;

बाज़– *वि.* [*अ.*] १. कोणी-कोणी. २. कांहीं. ३. केव्हां-केव्हां. ४. वंचित; रहित. –*अव्य.* पुनः. **मु०– आना** १. परत येणें. २. दूर राहाणें. ३. वंचित होणें.**–करना अथवा रखना**–मना करणें; दूर ठेवणें.

बाजना– *क्रि. अ.* १. वाजणें. २. झगडणें; तंटा करणें; लढणें. ३. प्रसिद्ध होणें; बोलबाला होणें. ४. लागणें; दुखावणें. ५. पोहोंचणें.

बाजरा– *पु.* बाजरी (धान्य).

बाजा–*पु.* वाद्य.**–गाजा**– *पु.* १. गाजावाजा. २. अनेक प्रकारचीं वाद्यें.

बाज़ार– *पु.* [*फा.*] पेठ; बाजार. **मु०–गर्म होना**–चलती असणें; खूप कामकाज चालणें. **–में आग लगना**–वस्तूंचे भाव भरमसाट वाढणें.

बाज़ारी–रू–*वि.* १. बाजारी; सामान्य. २. अशिष्ट. **–औरत**–*स्त्री.* वेश्या. **–गप**–*स्त्री.* अविश्वसनीय गोष्ट.

बाज़िंदगी– *स्त्री.* [*फा.*] १. खेळ; मौज. २. धूर्तपणा; चलाखी.

बाज़िंदा– *पु.* [*फा.*] खेळाडू. –*वि.* धूर्त; फसव्या.

बाजि*– *पु.* १. घोडा. २. बाण. ३. पक्षी. –*वि.* गतिशील; चालणारा.

बाज़ी– *स्त्री.* [*फा.*] १. पैज; शर्त. ३. खेळी; खेळाची पाळी. ४. जादू; चलाखी. **–गर**–*पु.* १. जादूगार. २. डोंबारी.**–चा**–*पु.* १. खेळ. २. खेळखंडोबा; पोरखेळ; चेष्टा. **मु०–आना**–पत्त्यांच्या खेळांत चांगला डाव येणें. **–बदना**–पैज लावणें. **–मारना; –ले जाना**–१. पैज जिंकणें. २. अग्रेसर होणें; चढाओढीत वरचढ ठरणें.

बाजी– *स्त्री.* थोरली बहीण; अक्का.–*पु.* १. घोडा. २.* वाजंत्री.

बाजु*– *अव्य.* शिवाय; विना.

बाज़ू–*पु.*[*फा.*] १. हात; बाहु. २. बाजूबंद. ३. बाजू. ४. पंख.**–बंद**–*पु.* बाजूबंद; भुजबंद; **मु०–तोलना**– पक्ष्यानें उडण्यासाठीं पंख सांवरणें; उडण्याची तयारी करणें.

बाझ*– *अव्य.* शिवाय; विना.

बाझना*

कणें; गुंतणें. २. हट्ट करणें.

बाट– *पु.* १. वरवंटा. २. वजन (शेर, अच्छेर इ०).

बाट– *स्त्री.* १. मार्ग; रस्ता; वाट. २. पीळ. **मु०–जोहना अथव देखना**–वाट पाहाणें.**–पड़ना**–मागें लागणें; त्रास देणें.**–परना**–दरवडा

पडणें. –पारना; –मारना– दरवडा घालणें; रस्त्यांत लुटणें.

बाटना– *क्रि. स.* १. वांटणें; घोटणें; चूर्ण करणें. २.* वळणें; पीळ देणें. [३. गाकर; बाटी.

बाटी– *स्त्री.* १. वाटी. २. गोळी.

बाड़– *स्त्री.* कुंपण; आडोसा.

बाड़ा *पु.* १. आवार २. गोठा. ३.* वाडा. [मोहल्ला; वाडी. ३. घर.

बाड़ी– *स्त्री.* १. बाग. २.

बाढ़– *स्त्री.* १. वाढ; अधिकता. २. पूर; भरती (नदी). ३. सरबत्ती (बंदुकीची, तोफेची). ४. तलवारीची किंवा अन्य शस्त्राची धार. मु०–**दगना**–तोफांची सरबत्ती होणें. –**पर चढ़ाना, रखना**– १. धार लावणें. २. उत्तेजन देणें; भडकावणें. ['बढ़ना'.

बाढ़ना*–*क्रि. अ.* पा०

बाढ़ि*– *स्त्री.* १. पूर. पा० 'बाढ़'. २. वाढ; वृद्धि.

बाढ़ी– *स्त्री.* १. पा० 'बाढ़.' २. व्याजानें दिलेल्या धान्यावरील धान्यरूपानें मिळणारें व्याज.–*पु.** सुतार.

बाढ़ीवान+–*पु.* धार लावणारा.

बात– *स्त्री.* १. गोष्ट; कथन; वचन; म्हणणें; सांगणें. २. चर्चा; प्रसंगानें निघालेली गोष्ट. ३. माहिती; बातमी. ४. वार्तालाप; संभाषण. ५. घटना. ६. तात्पर्य. ७. उपाय.– *पु.* वात (रोग). –**चीत**–*स्त्री.* बोलणें; संभाषण; वार्तालाप. **मु०– आना**–उल्लेख येणें; चर्चा सुरू होणें.–**उठाना**– १. चर्चा चालविणें. २. गोष्ट काढणें. ३. सहन करणें–**उड़ना**– चर्चा होणें.–**उड़ाना**–टाळणें; उडवून लावणें. –**काटना**– १. मध्येंच बोलणें; बोलण्यांत अडथळा आणणें. २. खंडन करणें.–**का धनी**; – **का पूरा** –बोलल्याप्रमाणें वागणारा; शब्दाला जागणारा.– **का बतंगड़ करना, बनाना**–राईचा पर्वत करणें; घोळ घालणें; क्षुल्लक गोष्ट निष्कारण वाढविणें. –**की बातमें**– हां हां म्हणतां; तावडतोब.– **खुलना**–गुपित उघड होणें; बेंड फुटणें. –**गढ़ना**–खोटें बोलणें; बनवून सांगणें.–**चलना, छिड़ना**–चर्चा निघणें. –**जाना**–पत जाणें; विश्वास न राहाणें. –**ठहरना** –लग्न ठरणें.–**न पूछना**–तुच्छ समजणें; पर्वा न करणें. –**पकड़ना**– १. बोलण्यांतील चूक दाखविणें. २. टीका करणें. ३. शब्द धरून बसणें. **पतेकी, मार्केकी बात**– १. मुद्द्याची गोष्ट २. सुंदर कल्पना. –**पर जमना**–दिलेला शब्द कायम ठेवणें.–**पाना**–मर्म समजणें.–**पी जाना**– १. अपमान सहन करणें; मूग गिळून बसणें. २. दुर्लक्ष करणें. –**पूछना**–विचारपूस, कदर करणें.– **फैलना**–गाजावाजा होणें.–**बढ़ना**– प्रकरण विकोपाला जाणें.–**बनना**– १. काम यशस्वी होणें. २. जमणें. ३. पत वाढणें.–**बनाना**–१. बहाणा करणें; थापा मारणें. २. काम सांभाळून घेणें.–**बातमें**– प्रत्येक बाबतींत. –**बिगड़ना**– १. काम बिघडणें २. पत जाणें.–**रखना**– १. दुसऱ्याचें म्हणणें ऐकणें. २. दिलेलें वचन पूर्ण करणें. ३. मान ठेवणें. –**रही**–ठरलें तर! –**लगना**–लागणें. –(**तें) बनाना**–१. बहाणा करणें. २. खुशामत करणें.–(**तों) में आना**– दुसऱ्याचें ऐकून गोत्यांत येणें; फसणें.

बातिन–*पु.* [*अ.*] १. आंतील बाजू. २. अंतःकरण; मन.

बातिनी–*वि.* [अ.] १. आंतला. २. मनाचा; आंतरिक.

बातिल– *वि.* [*अ.*] खोटें; असत्य. [दिवा-बत्ती.

बाती*– *स्त्री.* वात (दिव्याची);

बातुल– *वि.* १. विक्षिप्त २. वेडा. [बडचा.

बातूनिया; बातूनी– *वि.* बड-

बाथ+– *पु.* मांडी; कूस.

बाद– *स्त्री.* [*फा.*] हवा; वारा. –**कश**–*पु.* १. छताला टांगलेला पंखा. २. भाता.–**खोर**–*पु.* केंस गळणें; टक्कल पडणें.–**नुमा**–*पु.* वाऱ्याची दिशा दाखविणारें यंत्र. –**बान**–*पु.* जहाजाचें शीड.–(**दे) बहारी**– *स्त्री.* वसंत ऋतूंतील सुखकर वारा.

बाद–*अव्य.* [*अ.*] १. नंतर; मागाहून. २. शिवाय; व्यतिरिक्त. –*वि.* वेगळा केलेला. –**को**; –**में**– *अव्य.* नंतर.

बाद– *पु.* १. वादविवाद. २. तर्क. ३. पैज; शर्त. ४. दस्तुरी. –*अव्य.* निरर्थक; व्यर्थ. –*वि.* रद्द केलेला; सोडलेला. **मु०–करना**; –**देना**–बाद करणें; सोडून देणें.

बादना*– *क्रि. अ.* १. बकणें. २. हुज्जत घालणें. ३. आह्वान देणें.

बादर*–*पु.* मेघ; ढग.–*वि.* १. आनंदित; प्रसन्न. २. जाड; लठ्ठ.

बादल–*पु.* ढग; मेघ –**मु० –उठना, चढ़ना, घिरना**–आकाश ढगांनीं भरून येणें; आभाळ येणें. –**छँटना, फटना**–आकाश निरभ्र होणें.–**में थिगली लगाना**–आकाशाला ठिगळ लावणें; अशक्य गोष्ट करणें.

बादला– *पु.* चांदी-सोन्याची बारीक तार (जरीच्या, कलाबतूच्या कामासाठीं वापरली जाणारी).

बादशाह–*पु.* [*फा.*] १. सम्राट. २. ईश्वर. [साम्राज्य; राजवट.

बादशाहत– *स्त्री.* [*फा.*]

बादाम–*पु.* [*फा.*] बदाम.

बादामी–*वि.* [*फा.*] १. बदामी रंगाचा. २. बदामाच्या आकाराचा. –*स्त्री.* बदामाच्या आकाराची लहान डबी.

बादि*–*अव्य.* व्यर्थ; निरर्थक.

बादिया पैमा–*पु.* [*फा.*] वायुभारमापक यंत्र.

बादी–*वि.* [*फा.*] १. वातुळ; वातकारक. २. वाताचा.– *स्त्री.* वातविकार.

बादुर*–*पु.* वटवाघूळ.

बाध–*पु.* १. अडथळा; प्रतिबंध. २. त्रास; पीडा. [आणणें; अडविणें.

बाधना*–*क्रि. स.* विघ्न

बाधा– *स्त्री.* १. अडचण; विघ्न. २. त्रास. [झालेला.

बाध्य–*वि.* 'बांधलेला; नाइलाज

बान–*पु.* १. बाण; तीर. २. आतषबाजी. ३. समुद्राची किंवा नदीची मोठी लाट. ४. कांति; चमक.– *स्त्री.* १. वेशभूषा; सजावट. २. संवय. ३. दोरी. ४. मुंजाची दोरी.

बानक*– *स्त्री.* वेष.

बानगी– *स्त्री.* नमुना; वानगी.

बानबे–*वि.* ब्याण्णव; ९२.

बानर–*पु.* वानर; माकड.

बाना–*पु.* १. पोषाख; पेंहराव. २. चाल; रीत. ३. बाणा. ४. एक हत्यार. ५ बुनावट; वीण. ६. कपड्याच्या वीणेंतील आडवा धागा; वाणा. ७. पतंगाचा दोरा (मांजा). –*क्रि. स.* पसरणें; वासणें.

बानि–नी*– *स्त्री.* १. वाणी; वचन. २. महात्मा-वचन. ३. सरस्वती. ४. बाणा; तेज.

बानिक*– *स्त्री.* वेष; पोषाख.

बानिन– *स्त्री.* वाण्याची स्त्री.

बानी–*पु.* बनिया; वाणी.– *स्त्री.* पा० 'बानि'.

बानी–*पु.* [*अ.*] १. बनविणारा; पाया घालणारा; तयार करणारा. २. मुख्य साधन. ३. नेता; प्रधान.

बानैत–*पु.* १. बोथाटी फिरविणारा. २. तिरंदाज. ३ योद्धा.

बाप–*पु.* बाप; पिता. **–दादा**–*पु.* पूर्वज.

बापरना+–*क्रि. स.* वापरणें.

बापा–*पु.* बाप. **–बैर**–*पु.* पिढ्यानुपिढ्यांचें वैर.

बापिका*– *स्त्री.* मोठी विहीर.

बापुरा–*वि.* १. साधारण; तुच्छ. २. गरीब; बापुडा; बिचारा.

बापू+–*पु.* १. बाप. २. बाबा.

बाफ+–*स्त्री.* वाफ.

बाब–*पु.* [*अ.*] १. प्रकरण; परिच्छेद. २. दरवाजा. ३. विषय.

बाबत– *स्त्री.* [*फा.*] १. संबंध. २. विषय.–*अव्य.* संबंधीं; विषयीं; बाबतींत.

बाबरची–*पु.* पा० 'बावरची'.

बाबल*–*पु.* बाबा; पिता.

बाबा–*पु.* [*फा.*] १. आजोबा; म्हातारा माणूस. २. साधु-संन्यासी. ३. बाळ.**–आदम**–*पु.* आदिमानव; पुराणपुरुष. **मु०– आदम निराला है**–सगळेंच वेगळें आहे.

बाबी– *स्त्री.* १. संन्यासिनी; योगिनी. २. लहान मुलांबद्दल प्रेमसूचक शब्द. ['बॅबिलोनिया'.

बाबुल–*पु.* १. बाप; बाबू. २.

बाबू–*पु.* १. मोठा क्षत्रिय जमीनदार; ठाकुर. २ सुशिक्षित पुरुष; कारकून; पांढरपेशा व्यक्ति. **–जी**–*पु.* १. पिता; बाबा. २. साहेब.

बाबूना–*पु.* एक औषधी वनस्पति.

बाम–*वि.* वाम; डावा.–*स्त्री.* १. एक प्रकारची मासळी. २. एक दागिना.

बाम–*पु.* [*फा.*] गच्ची; छत.

बायँ*–*वि.* १. डावा; वाम. २. उलट; विरुद्ध; चुकीचा.**–मु० –देना**–१. टाळणें; सोडून देणें. २. फेरा देणें.

बाय*– *स्त्री.* १. वायु; वातप्रकोप. २. विहीर.

बायकाट–*पु.* [इं.] बहिष्कार.

बायन–*पु.* १. वाण; वायन. २. बयाणा. **मु०–देना**–खोडी काढणें; छेडणें.

बायबिडंग–*पु.* वावडिंग.

बायाँ–*वि.* १. डावा; वाम. २. विरुद्ध; प्रतिकूल; उलटा.–*पु.* डग्गा (डाव्या हातानें वाजवावयाचा तबला). **मु०–(यें) हाथ का काम, खेल**–हातचा मळ; सोपी गोष्ट.

बायें–*अव्य.* १. डावीकडे. २. विरुद्ध; उलट. **मु०–होना**–प्रतिकूल होणें. [पुनःपुनः.

बारंबार–*अव्य.* वारंवार;

बार–*पु.* १. द्वार; दार. २. आश्रयस्थान; ठिकाण. ३. दरबार. ४.* केस. ५.* बालक. ६.* पाणी.

बार–*पु.* [*फा.*] १. ओझें; बोजा. २. कर्जाचें ओझें. ३. फळें; भार; बहर. ४. दरबार. ५. प्रवेश; पोहोंच.**–आवर**–*वि.* फळदार; फळांनीं लवलेला.**–गह**; **गाह**– *स्त्री.* १. बादशहाचा डेरा; तंबू. २. दरबार.**–गीर**–*वि.* ओझें वाहाणारा. –*पु.* १. ओझेंवाहू जनावर. २. घोड्याला चारापाणी देणारा. **–दान**; **–दाना**–*पु.* १. पोतें; थैला. २. सैन्याच्या खाण्यापिण्याची सामग्री; रसद.**–बर्दार**–*पु.* हमाल;

मजूर.–**बर्दारी–** *स्त्री.* १. हमाली, मजुरी. २. हमालाचें काम.

बार– *स्त्री.* १. वेळ; समय. २. उशीर; विलंब. ३. वेळ; खेप. **–बार–** *अव्य.* वारंवार; पुनःपुनः.

बारजा– *पु.* दारावरील माडी; रस्त्याच्या बाजूकडील सज्जा.

बारता*– *स्त्री.* वार्ता; बातमी.

बारना– *क्रि. स.* १. निवारण करणें. २. मनाई करणें. ३. पेटविणें; लावणें (दिवा). ४. ओवाळून टाकणें. [नायकीण.

बारबधू*– *स्त्री.* वेश्या;

बारह– *वि.* बारा; १२.–**खड़ी–** *स्त्री.* बाराखडी.–**दरी–** *स्त्री.* मोकळी हवेशीर बैठक; चोहों बाजूंस मिळून बारा किंवा अधिक दारें असलेली खोली, दिवाणखाना.–**बाना–नी–** *वि.* १. दैदीप्यमान. २. खरें (सोनें); असली. ३. निर्दोष ४. पूर्ण.–**मासा–** *पु.* १. वर्षाच्या बारा महिन्यांतील नैसर्गिक वैशिष्टयांचें वर्णन असलेलें गीत. २. विरहगीत.–**मासी–** *वि.* १. बारा महिने फुलणारें. २. बारा महिने होणारें.–*पु.* सदाफुली.– **–वफ़ात–** *स्त्री.* महंमद पैगंबरांच्या मृत्यूची तिथि; महंमदद्वादशी; रबीउल अव्वलची **१२** तारीख.–**सिंगा–घा–** *पु.* सांबर. **मु०–बाट करना–** १. विस्कटून टाकणें. २. नासाडी, वाताहत करणें.

बारहा– *अव्य.* [*फा.*] वारंवार; नेहमीं; अनेकदां.

बारहीं– *स्त्री.* बारसें.

बारहों–हौं– *पु.* १. बारावा दिवस (मरणानंतरचा). २. जन्मानंतरचा बारावा दिवस.

बारां– *पु.* [*फा.*] मेघ; ढग.

बारा– *वि.* लहानवयाचा; बालक.–*पु.* मुलगा.

बारा– *पु.* [*फा.*] १. वेळ. २. बाब.–**(रे) में–** *अव्य.* विषयीं; बाबतींत.

बारात– *स्त्री.* वरात.

बाराती– *वि. पु.* वऱ्हाडाबरोबर आलेला; वरातींतील व्यक्ति.

बारादरी– *स्त्री.* पा० ‘ बारहदरी ’.

बारानी– *वि.* [*फा.*] कोरडवाहू; जिराईत (जमीन).– *स्त्री.* १. जिराईत जमीन. २. ‘ रेनकोट ’.

बारिक– *स्त्री.* [*इं.*] बराक; ‘ बरॅक ’.–**मास्टर–** *पु.* बराकीवरील अधिकारी.

बारिश– *स्त्री.* [*फा*] १. पाऊस; वृष्टि. २. वर्षाऋतु.

बारिवाह*– *पु.* ढग.

बारी– *स्त्री.* पाळी; खेप. **मु० –बारी से–** पाळीपाळीनें. **–बँधना–** पाळी ठरणें, लागणें.

बारी– *स्त्री.* १. बाग; बगीचा; २. घर; निवास. ३. खिडकी; झरोका. ४. बंदर; किनारा; तट. ५. समास; ‘ मार्जिन ’. ६. अबोध कन्या; बालिका. ७. तरुणी. –*पु.* पत्रावळी; द्रोण इ० विकणारी जात; गुरव.

बारी– *पु.* [*अ.*] ईश्वर.

बारीक– *वि.* [*फा.*] १. बारीक; पातळ. २. लहान; सूक्ष्म. ३. कौशल्यपूर्ण.–**बीन–** *वि.* सूक्ष्मदर्शी; तीक्ष्णबुद्धि.

बारीकी– *स्त्री.* [*फा.*] १. खुबी; मख्खी. २ बारीकपणा. ३. सूक्ष्मपणा.

बारू*– *पु. स्त्री.* रेती; वाळू.

बारूत–द– *स्त्री.* [*तु.*] शोभेची किंवा स्फोटाची दारू. **मु० गोला बारूद–** *पु.* लढाईची सामग्री; दारूगोळा.

बारे– *अव्य.* [*फा.*] १. शेवटीं; अखेरीस. २. परंतु. ३. असो.

बारेमें– *अव्य.* [*फा.*] संबंधीं; विषयीं; बाबतींत.

बारै*– *वि.* बारा; १२.

बाल– *पु.* १. केंस. २. बारीक चीर. ३. बालक; मूल. ४ जनावराचा बच्चा; वासरूं; पिलूं. – *स्त्री.* लोंबी; धान्याचें कणीस. –*वि.*– १. अबोध; अपरिपक्व. अजाण; २. मूर्ख. **–कमानी–** *स्त्री.* घड्याळांतील स्प्रिंग. **–खोरा–** *पु.* केंस गळण्याचा रोग; टक्कल पडणें. **–चंद्र–** *पु.* बीजेची चंद्रकोर. **–चर–** *पु.* बालचर; ‘ बॉयस्काउट ’. **–छड़–** *स्त्री.* जटामांसी (एक औषधी वनस्पति). **–तोड़–** *पु.* केसतोडा; केस्तुड. **–पक्षाघात–** *पु.* ‘ इन्फन्टाइल पॅरॅलिसिस ’. **–बच्चे–** *पु.* मुलेंबाळें; संतति. **–बोध–** *वि.* मुलांना समजेल असें; सोपें. **–भोग–** *पु.* सकाळचा (न्याहारी सारखा) नैवेद्य. **–विहार–** *पु.* बालमंदिर; ‘ किंडर गार्टन ’. **–सफ़ा–** *वि.* केशनाशक (साबण इ०). **मु०–आना**; **–पडना–** तडकणें, चीर पडणें. **–की खाल खींचना–** निरर्थक कीस काढणें; काथ्याकूट करणें.– **खिचड़ी होना–** डोकीचे केस निम्मे शिम्मे पिकून पांढरे होणें.–**धूपमें पकाना–** म्हातारपण येऊनहि अनुभव, ज्ञान आलेलें नसणें. **–बराबर–** अत्यंत बारीक; किंचित्. **–बाँका न होना–** यत्किंचितहि हानि किंवा कष्ट न होणें. **–बाल–** पूर्णपणें; नखशिखांत. **–बाल बचना–** थोडक्यांत बचावणें. (संकटांतून). [अडाणीपणा.

बालकताई*– *स्त्री.* पोरकटपणा;

बालकपन– *पु.* १. लहानपण.

२. पोरकटपणा. [पोहरा.

बालटी–*स्त्री.* [इं] बादली;

बालटू–*पु.* बोलट. [पेटविणें.

बालना–*क्रि. स.* दिवा लावणें;

बालपन–*पु.* बाळपण; लहानपण.

बालम–*पु.* १. पति. २. प्रियकर.

बालमखीरा–*पु.* काकडी; वाळूक.

बाला–*स्त्री.* १. लहान मुलगी. २. तरुण स्त्री. ३. पत्नी; भार्या. ४. स्त्री. –*पु.* कानांत घालावयाचा एक दागिना; कर्णभूषण; मोठी बाळी. –*वि.* १. लहान वयाचा; अल्पवयस्क. २. भोळा. **–जोबन**–*पु.* मुसमुसणारें तारुण्य.

बाला–*वि.* [*फा.*] वरील; वरचा. –*पु.* ठेवण; उंची; आकार. **–ए ताक्**–*वि.* अलग, दूर (ठेवणें). **–ख़ाना**–*पु.* वैठकीची माडी; वरच्या मजल्यावरील खोली; सज्जा. **–नशीन**–*पु.* बसण्याची उंच जागा. –*वि.* सर्वोच्च; सर्वोत्कृष्ट. **–पोश**–*पु.* १. पलंगपोस. २. 'ओव्हरकोट'. **–बाला**– *अव्य.* वरवर; बाहेर.

बालाई–*वि.* [*फा.*] वरचा; वरील. –*स्त्री.* मलई; दुधावरील साय. **–आमदनी**– *स्त्री.* वरची मिळकत; अतिरिक्त प्राप्ति.

बालापन–*पु.* १. लहानपण. २. पोरकटपणा.

बालिग़–*वि.* [*अ.*] प्रौढ; वयांत आलेला; 'अॅडल्ट'. **–मताधिकार**–*पु.* प्रौढ मताधिकार; 'अॅडल्ट सफरेज.'

बालिग़ा– *स्त्री.* [*अ.*] वयांत आलेली मुलगी; युवती. [उशी.

बालिश–*पु.* [*फा.*] तक्क्या;

बालिश्त–*पु.* [*फा.*] वीत (माप).

बालिस*–*वि.* बालिश; पोरकट. –*पु.* मुरुम; खडी.

बालीं; बालीन– *स्त्री.* [*फा.*] उशी; उसें.

बाली– *स्त्री.* १. कानांतील बाळी. २. ओंबी; कणीस.

बालीदगी–*स्त्री.* [फा.] १. वाढ; वृद्धि. २. पूर.

बालू–*पु. स्त्री.* रेती; वाळू. **–दानी**– *स्त्री.* रेतीदाणी; वाळूदाणी. **–साही**– *स्त्री.* एक मिठाई; घीवरासारखें एक पक्वान्न.

बाल्टू–*पु.* [इं.] 'बोल्ट'.

बावन–*पु.* बावन्न; ५२. **मु० –तोले पाव रत्ती**– सोळा आणे; अगदीं बरोबर. [भरवंसा.

बावर–*पु.* [फा] विश्वास;

बावरची–*पु.* [तु.] आचारी; बवर्जी. **–ख़ाना**–*पु.* स्वयंपाकघर.

बावरा–ला–*वि.* १. बावळट; अजागळ. २. वेडा; वेडपट. **–पन**–*पु.* बावळटपणा; वेडेपणा.

बावली– *स्त्री.* पायविहीर; वावडी. –*वि.* वेडी.

बाश–*अव्य.* [फा.] १. तथास्तु. २. राहा. **मु० ख़ुशबाश**–सुखी ऐस.

बाशिंदा–*पु.* [फा.] निवासी; रहिवासी.

बाष्प–*पु.* १. वाफ. २. अश्रु.

बाष्पक तैल–*पु.* हलकें, ईथरीय, उडून जाणारें तेल; 'ईथीरिअल ऑईल'.

बाष्पन–*पु.* बाष्पीकरण; बाष्पीभवन; 'इव्हॅपोरेशन'.

बाष्पित्र–*पु.* 'बॉयलर'.

बास–*पु.* १. निवास; वास. २. निवासस्थान; घर. ३. वस्त्र. –*स्त्री.* १. वास; गंध. २. अग्नि. ३. वासना; इच्छा. **–मती**–*पु.* एक प्रकारचा सुवासिक तांदूळ.

बासठ–*वि.* बासष्ट; ६२.

बासन*–*पु.* १. भांडें. २. वस्त्र.

बासर*–*पु.* दिवस.

बासा–*पु.* १. खानावळ. २. निवासस्थान.

बासी–*वि.* १. राहाणारा; निवासी. २. आधल्या दिवसाचें. ३. कोमेजलेलें. ४. शिळेंपाकें. **–मुँह**–*वि.* ज्यानें सकाळपासून कांहीं खाल्लेलें नाहीं असा. –*अव्य.* अनशापोटीं. **मु० –कढ़ी में उबाल आना**– शिळ्या कढीस ऊत येणें; म्हातारपणीं डोहाळे लागणें. **–बचे न कुत्ता खाय**–चाटून पुसून खाणाऱ्याकडे दुसऱ्याला काय मिळणार?**–भात में ख़ुदा का साझा**– मोठ्या मुष्किलीनें मिळालेल्या भिकार वस्तूंतहि अकस्मात् कोणीतरी भागीदार येणें.

बाहना*–*क्रि. स.* १. वाहून नेणें; ओझें नेणें. २. चालविणें (हत्यार); फेंकणें. ३. गाडी, घोडे हांकणें. ४. वाहाणें (द्रव). ५. नांगरणें. ६. विंचरणें; साफ करणें. ७. फळविणें (गाय इ०).

बाहर–*अव्य.* १. बाहेर. २. वेगळें; दूर; अन्यत्र. ३. –पेक्षां अधिक. –*पु.* १. बाहेरचा भाग. २. परदेश. **–जामी***–*पु.* ईश्वराचें सगुण रूप. **–वाला**–*पु.* भंगी.

बाहरी–*वि.* १. बाहेरील. २. परका. ३. वरपांगी; वरवरचा.

बाहिज*–*वि.* बाहेरील; वरवरचा. –*अव्य.* १. बाहेरून. २. वरून.

बाहिर+– *अव्य.* पा० 'बाहर'.

बाहीं*– *स्त्री.* १. बाहु. २. बाही.

बाहु–*पु.* भुजा; भुज; 'आर्म'.

बाह्य–*वि.* १. बाहेरचा. २. वरचा. ३. परका. ४. बहिष्कृत. **–चोल**–*पु.* बाह्यकवच; 'एक्झाइन'. **–त्वचा**– *स्त्री.* अधिचर्म; 'एपिड-

मिस'. –दलपुंज–पु. पुष्पकोष; 'कॅलिक्स'. –रत; –संभोग– पु. भगाच्या बाहेरील रतिक्रिया. –रोगी–पु. बाह्यरुग्ण; 'आउट डोअर पेशंट'.

बाह्याकारिकी– स्त्री. बाह्य-आकारविज्ञान; 'एक्स्टर्नल मॉर-फॉलॉजी.'

बिंजन*–पु. खाद्य वस्तु; व्यंजन.

बिंद–*पु. १. बिंदु; पाण्याचा थेंब. २. दोन भुवयांमधील जागा. ३. टिकली.

बिंदवीय–*वि.* १. डागाळलेला. २. स्त्रीकेसराग्राचा; 'स्टिग्मॅटिक.'

बिंदा–पु. मोठी बिंदी; टिळा. –*स्त्री.* वृंदा (एक गोपी).

बिंदी– *स्त्री.* १. अनुस्वार; बिंदु; टिंब. २. टिकली.

बिंदु–पु. १. टिंब; बिंदु; 'पॉइंट'. २. अनुस्वाराचें चिह्न. –पथ–पु. रेपामार्ग; 'लोकस'. –वासर–पु. गर्भाधानाचा दिवस.

बिंदुली– *स्त्री.* टिकली.

बिंध–पु. विंध्य पर्वत.

बिंधना–*क्रि. अ.* १. विंधणें; भोंक पडणें. २. फसणें; अडकणें. –*क्रि. स.* भोंक पाडणें.

बिंब–पु. १. प्रतिबिंब. २. सूर्य-चंद्र–मंडळ. ३. तोंडलें. –पुष्प–पु. कर्णिका; बिंबपुष्प; 'डिस्क फ्लॉरेट'.

बिंबाधरोष्ठी–*वि. स्त्री.* तोंड-ल्यासारखे लाल ओंठ असलेली (स्त्री). [व्याधि.

बिआध[+]–पु. व्याध. –*स्त्री.*

बिआना–*क्रि. अ.* विणें (पशूचें).

बिकना–*क्रि. अ.* विकलें जाणें; विक्री होणें. **मु० किसी के हाथ बिकना**–एखाद्याचा सेवक बनणें; भजनीं लागणें.

बिकल–*वि.* व्याकुळ; बेचैन.

बिकलाना*–*क्रि. अ.* व्याकुळ होणें. –*क्रि. स.* व्याकुळ करणें.

बिकवाना–*क्रि. स.* विकविणें; विकवून घेणें.

बिकसना–*क्रि. अ.* १. विकसणें फुलणें. २. प्रफुल्लित होणें.

बिकसाना–*क्रि. स.* १. विकस-विणें; फुलविणें. २. प्रसन्न करणें.

बिकाऊ–*वि.* विकाऊ; विक्रीचा.

बिकाना*–*क्रि. अ.* विकलें जाणें. –*क्रि. स.* विकत घेणें.

बिकानी*–*वि. स्त्री.* विकली जाणारी, गेलेली.

बिकार*–पु. १. विकार. २. रोग; पीडा. ३. दोष. ४. दुष्कृत्य. ५. दुर्वासना. –*वि.* विकृत.

बिकारी– *स्त्री.* मण, शेर, रुपये, आणे इ० दर्शविणारी आडवी रेघ; अळें.

बिक्ख*–पु. विष.

बिक्री– *स्त्री.* १. विक्री. २. विकून मिळणारें धन.

बिखम*–*वि.* १. विषम; उंच-सखल; ओबडधोबड. २. बिकट.

बिखय*–*अव्य.* विषयीं; संबंधीं.

बिखरना–*क्रि. अ.* विखुरणें; पसरणें.

बिख(खे)राना–*क्रि. स.* विखु-रणें; विखुरविणें; पसरणें; पसर विणें.

बिगड़ना–*क्रि. अ.* १. बिघडणें; खराब होणें. २. रागावणें; संता-पणें. ३. वाईट मार्गाला लागणें.

बिगड़ेदिल–*वि.* १. भांडखोर. २. कुमार्गी. [२. हट्टी; दुराग्रही.

बिगड़ैल–*वि.* १.तापट; संतापी.

बिगर*–*अव्य.* पा० 'बग़ैर'.

बिगरना*–*क्रि. अ.* पा० 'बिग-ड़ना'.

बिगराइ(य)ल; **बिगरैल**–*वि.* पा० 'बिगड़ैल'.

बिगसना*–*क्रि. अ.* १. विक-सणें; उमलणें; फुलणें. २. फाटणें; फुटणें; विस्कटणें; विखुरणें.

बिगहा–[+]पु. बिघा (जमिनीचें माप).

बिगाड़–र–पु. १. बिघाड; दोष; खराबी. २. वैमनस्य; झगडा.

बिगाड़ना–*क्रि. स.* १. बिघ-डविणें; खराब करणें. २. हानि, तोटा करणें. ३. पथभ्रष्ट करणें; बहकाविणें. ४. शीलभ्रष्ट करणें. ५. नष्ट करणें.

बिगार*–पु. पा० 'बिगाड़'. –*स्त्री.*[+]पा० 'बेगार'.

बिगारी*– *स्त्री.* [*फा.*] १. वेठ; मजुरी न देतां घेतलेलें काम. २. निष्काळजीपणानें केलेले काम.

बिगास*–पु. विकास.

बिगिर*– *अव्य.* विना; शिवाय.

बिगुन*–*वि.* १. गुणरहित; निर्गुण. २. ठोंब्या; मूर्ख.

बिगुर*–*वि.* ज्यानें गुरूकडून दीक्षा घेतलेली नाहीं असा.

बिगुरच(चि)न*–*स्त्री.* १. बुच-कळा; विवंचना. २. अडचण.

बिगुरदा*–पु. एक प्रकारचें प्राचीन हत्यार.

बिगूचन*–*स्त्री.* अडचण; मान-सिक गोंधळ; किंकर्तव्यता.

बिगूचना*–*क्रि. अ.* १. दडपलें जाणें. २. गोंधळून जाणें. –*क्रि. स.* दाबणें.

बिगोना*–*क्रि. स.* १. नाश करणें; बिघडविणें. २. लपविणें. ३. त्रास देणें. ४. भुलविणें. ५. कंठणें; घालविणें.

बिग्यान*–पु. विज्ञान; शास्त्र.

बिच; बिचमों*–*अव्य.* मध्यें;

आंत. [बुजणें.–*वि.* बुजरा.

बिचकना–*क्रि.अ.* बिचकणें;

बिचकन्ना–*वि.* १. सावध; सतर्क. २. बुजरा; भित्रा.

बिचकाना–*क्रि.अ.* १. चिडविणें; वेंगाडणें. २. तोंड वेडेंवांकडें करणें (वेचव पदार्थामुळें).

बिचरना–*क्रि.अ.* १. फिरणें; सहल करणें. २. यात्रा, प्रवास करणें.

बिचलना–*क्रि.अ.* १. विचलित होणें; हटणें. २. हिम्मत खचणें.

बिचला–*वि.* मवला.

बिचलाना–*क्रि.स.* १. विचलित करणें. २. अव्यवस्थित करणें.

बिचवई–*पु.* मध्यस्थ.–*स्त्री.* मध्यस्थी.

बिचवान–नी*– *पु.* मध्यस्थ; सलोखा घडवून आणण्याचा प्रयत्न करणारा.

बिचहुत*–*पु.* १. संदेह; द्विविधा मनःस्थिति. २. अंतर.

बिचार–*पु.* विचार.–**मान***– *वि.* विचारवान्; विचारणीय.

बिचारना–*क्रि.अ.* १. विचार करणें; मनांत योजणें. २. विचारणें.

बिचारी–*वि.* विचारी; समजूतदार.

बिचाल*–*पु.* १. विचलित, अलग करणें. २. फरक; अंतर.

बिचेत*–*वि.* मूर्छित; बेशुद्ध.

बिचौहाँ*; **बिचौनिया**–*वि.* *पु.* मधला; मध्यस्थ.

बिच्छी+– *स्त्री.* पा० 'बिच्छू'.

बिच्छू–*पु.* १. विंचू. २. एक प्रकारचें विषारी गवत.

बिछना–*क्रि.अ.* पसरलें, अंथरलें जाणें. [सरकणें; डगमगणें.

बिछलना–*क्रि.अ.* घसरणें;

बिछवाना–*क्रि.स.* पसरवून घेणें; अंथरविणें.

बिछाना–*क्रि.स.* १. पसरविणें; फैलाविणें (बिछाईत); अंथरणें. २. मारून लोळवणें.

बिछायत*– *स्त्री.* अंथरण्याची वस्तु; अंथरूण; बिछाईत.

बिछिया– *स्त्री.* पायाच्या बोटांतील एक दागिना; विरोली.

बिछुआ–वा–*पु.* १. बिचवा (शस्त्र). २. जोडवें. ३. करगोटा.

बिछुड़ (र) न*–*स्त्री.* वियोग; विरह.

बिछुड़(र)ना–*क्रि. अ.* १. वेगळें होणें; अलग होणें. २. वियोग किंवा विरह होणें.

बिछुरंता*–*पु.* वियोगी; विरही.

बिछोड़ा–य–ह–पु. वियोग; विरह. [विरही.

बिछोही–*वि.*वियुक्त; वियोगी;

बिछौना–*पु.* बिछाना; अंथरूण.

बिजन*–*पु.* १. एकांत. २. व्यजन; पंखा.–*वि.*एकटा; एकाकी.

बिज़न–*पु.* [*फा.*] सरसहा कत्तल.–*क्रि.* मार; ठार मार. **मु०–बोलना**– १. कत्तलीचा हुकूम देणें. २. हल्ला चढविणें.

बिजनखुरी– *स्त्री.* 'ड्यू क्लॉ'.

बिजना*–*पु.* पंखा. [विजया.

बिजया+– *स्त्री.* १. भांग. २.

बिजली–*स्त्री.* १. वीज; विद्युत्. २. गळ्यांतला किंवा कानांतला एक दागिना. –*वि.* १. चंचल; चपळ. २. चमकदार. **मु०–गिरना**– वज्रपात होणें.

बिजहन–*वि.* ज्याचें बीज नष्ट झालें आहे असा; हतवीर्य.

बिजाती–*वि.* विजातीय; परजातीचा. [अज्ञानी.

बिजान+–*पु.* अज्ञान.–*वि.*

बिजायठ–*पु.* बाजूबंद; वांकी.

बिजुरी–ली– *स्त्री.* पा० 'विजली'.

बिजूका–खा–*पु.* पक्ष्यांना हुसकून लावण्याकरितां शेतांत टांगून ठेवतात तें मडकें; बुजगावणें.

बिजै*– *स्त्री.* विजय; जय.

बिजोग*–*पु.* वियोग.

बिजोना*–*क्रि. स.* नीट निरखून पाहाणें.

बिजोरा–*वि.* दुबळा; अशक्त.

बिजौरा–*पु.* महाळुंग (फळ).

बिजौरी– *स्त्री.* कोहळयाच्या बियांची पिठांतील वडी.

बिज्जु*– *स्त्री.* वीज; बिजली.

बिज्जुल–*पु.* साल; टरफल. –*स्त्री.* पा० 'बिजली'.

बिज्जू–*पु.* ऊद; रानमांजर.

बिझुकना*–*क्रि. अ.* १. भडकणें; चेतणें. २. भिणें; भयभीत होणें. ३. वांकणें; वांकडें होणें.

बिझुकाना–*क्रि. स.* भिववणें.

बिट–*पु.* १. विदूषक. २. वेश्यागामी.–*स्त्री.* पा० 'बीट'. [फांदी.

बिटप–*पु.* १. वृक्ष. २. नवीन

बिटरना*–*क्रि. अ.* गढूळ, घाण होणें. [घाण करणें.

बिटारना*–*क्रि.* *स.* गढूळ,

बिटालना–*क्रि. स.* पसरविणें; फैलावणें. [बेटी.

बिटिया+–*स्त्री.* लहान मुलगी;

बिटौरा*–*पु.* गोवऱ्यांचा ढीग.

बिठलाना; बिठाना; बिठालना– *क्रि. स.* बसविणें.

बिड–*पु.* १. पा० 'बीट'. २. वैश्य. ३. एक प्रकारचें मीठ.

बिड़ई– *स्त्री.* चुंबळ.

बिड़र–*वि.* १. विस्कटलेला; विखुरलेला. २. बेडर; निर्भय.

बिडरना*–*क्रि. अ.* १. अस्ताव्यस्त होणें; विस्कळित होणें. २. बुजणें; घाबरणें; बिचकणें.

३. नष्ट होणें.

बिडराना*–क्रि.स. १.विस्कटून टाकणें; उधळून टाकणें. २. पळविणें.

बिड़वना*–क्रि. स. तोडणें; खुडणें.

बिडारना–क्रि. स. १. पळवून लावणें; दाणादाण करणें. २. बुजविणें.

बिडौजा–पु. इंद्र.

बिढतो –पु. नफा; फायदा.

बिढ़वना; बिढ़ाना*– क्रि. स. १. कमाविणें; मिळविणें. २. संचय करणें; जमविणें.

बित*–पु. १. धन; द्रव्य. २. सामर्थ्य. ३. उंची; ठेवण.

बितताना*–क्रि. अ. व्याकुळ होणें; विव्हळणें.–क्रि. स. दुःख देणें; सतावणें. [व्यतीत होणें; जाणें.

बितना*–पु. वीत. –क्रि. अ.

बितरना*–क्रि. स. वांटणें; वितरण करणें. ['बिताना'.

बितवना*– क्रि. स. पा०.

बिताना–क्रि. स. १. समय व्यतीत करणें. २. घालविणें.–क्रि. अ.* पा०'बीतना'. [पत; सामर्थ्य.

बित्त–पु.१. वित्त; धनदौलत. २.

बित्ता–पु. एक वीत (माप).

बिथकना–क्रि. अ. १. थकणें. २. आश्चर्यचकित होणें. ३. मोहून जाणें. [२. उमलणें.

बिथरना*–क्रि. अ.१. विखुरणें.

बिथा*–स्त्री. व्यथा; दुःख.

बिथित*–वि. व्यथित.

बिदकना*–क्रि. अ. १. फाटणें; चिरलें जाणें. २. घायाळ होणें; जखमी होणें. ३. बुजणें.

बिदकाना*–क्रि. स. १. फाडणें. २. कापणें; चिरणें. ३. जखमी करणें. ४. वेडावणें; तोंड वेडें-वांकडें करणें.

बिदर–पु. १. विदर्भ देश. २. तांबें व जस्त यांच्या मिश्रणानें बनणारी एक उपधातु. या उपधातू-वर चांदीच्या पत्र्यानें नक्षी काढतात. **–साज़** –पु. बिदरवर नक्षीचें काम करणारा कारागीर.

बिदरन*– स्त्री. फट; छेद; भेग.

बिदहना+–क्रि. स. दाट उगव-लेलें धान्य दूर-दूर लावणें.

बिदा–स्त्री. [अ.] १. निरोप; रजा. २. प्रस्थान. ३. सासरीं पाठविणें. [निरोप. २. बिदागी.

बिदाई–स्त्री. [अ.]१. रवानगी;

बिदारना*–क्रि. स. १.फाटणें; चिरणें. २. नष्ट करणें.

बिदुराना*–क्रि. अ. गालांतल्या गालांत हसणें; स्मित करणें.

बिदुरानि–नी*– स्त्री. हास्य; स्मित. [शिवाय.

बिदून–अव्य. [फा.] खेरीज;

बिदूख(ष)ना*–क्रि. अ. दोष लावणें; दूषण देणें. [२. परप्रांत.

बिदेस–पु. १. विदेश; परदेश.

बिदेसी*–वि. विदेशी; परदेशी; परप्रांतीय; परका.

बिदोख*–पु. वैमनस्य; वैर.

बिदोरना*–क्रि. स. १. चाल-विणें; हलविणें. २. पसरणें.

बिद्दत– स्त्री. [अ. 'बिद्‌अत'] १. बिघाड; दोष. २. त्रास; दुःख. ३. आपत्ति; संकट. ४. जुलूम; अत्याचार. ५. दुर्दशा. ६. नवीन गोष्ट; धर्मांत घातलेली नव्या गोष्टीची भर.

बिद्रुम*–पु. पोवळें; प्रवाळ.

बिधँसना*–क्रि. स. विध्वंस करणें.

बिध– स्त्री. १. प्रकार; तऱ्हा. २. जमाखर्च. मु०**–मिलाना**–जमा-खर्चाचा मेळ घालणें; ताळा पाहाणें.

बिधना–पु. ब्रह्मदेव; विधाता. –क्रि. अ. विंधणें; छेदलें जाणें; भोंक पडणें.–क्रि. स.* अडकविणें.

बिधान–पु. पा० 'विधान'.

बिधाना*–क्रि. अ. टोंचलें जाणें. क्रि. स. टोंचणें.

बिधि–स्त्री. पु. पा० 'विधि'.

बिधिना*–पु. ब्रह्मा.

बिधुर–वि. १. विधुर. २. भ्यालेला. ३. दुःखी; व्याकुळ.

बिन*–अव्य. शिवाय; विना; वांचून. [करणारा.

बिनई*–वि. १. नम्र. २. विनंती

बिनउ*– स्त्री. विनंती; प्रार्थना.

बिनठना*–क्रि. अ. १. नष्ट होणें. २. बिघडणें. [अर्ज; निवेदन.

बिनति–ती*– स्त्री. विनंती;

बिनन– स्त्री. निवड; वेंचणी.

बिनना– क्रि. स. १. निवडणें. वेंचणें.

बिनय– स्त्री. पा० 'विनय.'

बिनय(व)ना*– क्रि. स. विनविणें; प्रार्थना करणें.

बिनश(स)ना*– क्रि.अ. नष्ट होणें.– क्रि. स. नष्ट करणें.

बिनसाना*–क्रि. स. बिघडवून टाकणें; नष्ट करणें. [विना.

बिना–अव्य. शिवाय; वांचून;

बिना– स्त्री. [अ.] १. पाया; मूळ. २. कारण. [२. विणकाम.

बिनाई– स्त्री. १. निवड; वेंचणी.

बिनानी*–वि. अज्ञानी; अजाण. –स्त्री. विचार.

बिनावट+– स्त्री. वीण. [करणें.

बिनासना+–क्रि. स. नाश

बिनाह*–पु. विनाश.

बिनि–नु*–अव्य. विना; शिवाय; वांचून. [चमत्कारिक

बिनूठा*–वि. विलक्षण;

बिनै*– स्त्री. विनंती; प्रार्थना.

बिनौला–पु. सरकी; कपाशीचें बी. [विरोधी. २. शत्रु; वैरी.

बिपच्छी*–पु. १. प्रतिपक्षाचा;

बिपत–ता–द–दा*– स्त्री. विपत्ति; संकट.

बिपर*–पु. विप्र; ब्राह्मण.

बिफर*–वि. विफल; निष्फल; व्यर्थ.

बिफरना*–क्रि. अ. १. बंड करणें. २. नाराज होणें; रागावणें; भडकणें. ३. बुजणें.

बिबछना*–क्रि. अ. १. विरोधी बनणें. २. गुंतणें; अडकणें.

बिबरन*–वि. १. रंग उडालेला. २. निस्तेज; ज्याच्या चेहऱ्याची कांति नाहींशी झाली आहे असा. –पु. विवरण; टीका; व्याख्या.

बिबस*–वि. विवश; लाचार; परतंत्र. –अव्य. निरुपायानें; नाइलाजानें.

बिबहार*–पु. व्यवहार; वर्तन.

बिबाई*– स्त्री. तळपायास भेगा पडणें; तळपायाची भेग. मु०– **–फटना**–पाय फुटणें; फाटणें; तळपायाला भेगा पडणें.

बिबाक*–वि. पा० 'बेबाक.'

बिबि*– वि. दोन.

बिभचार*–पु. व्यभिचार.

बिभाना*–क्रि. अ. चमकणें; शोभणें.

बिभावरी*– स्त्री. सनक्षत्र रात्र.

बिभिनाना*– क्रि. स. वेगळें, अलग करणें. [षिका'.

बिभीषिका– स्त्री. पा. 'विभी-

बिभु*– पु. परमेश्वर; स्वामी. –वि. सर्वव्यापक.

बिभौ*– पु. ऐश्वर्य; प्राचुर्य.

बिमन*–वि. १. दुःखी. २. उदास; विमनस्क. –अव्य. विमनस्कपणें.

बिमाता– स्त्री. सावत्र आई; विमाता. [अनादर.

बिमान– पु. १. विमान. २.

बिमानी*– वि. मानरहित.

बिमोट–टा–पु. वारूळ.

बिमोहना*– क्रि. स. मोहून टाकणें; –क्रि. अ. मुग्ध, मोहित होणें. [–पु. बीज.

बिय*–वि. १. दोन. २. दुसरा.

बियत–पु. १. आकाश. २*. एकांत स्थान. [बीं.

बिया*–वि. दुसरा. –पु.+ बीज;

बियाज+–पु. १. व्याज. २. मिष; बहाणा. [दिलेला (पैसा).

बियाजू+–वि. कर्जाऊ; व्याजानें

बियाड़+–पु. भाताचीं रोपें तयार करण्याचें शेत.

बियाध–धा*–पु. पारधी.

बियाधि*– स्त्री. व्याधि; पीडा.

बियाना+क्रि.– अ. स. पा० 'व्याना'.

बियापना*– क्रि. स. व्यापणें.

बियाबान–पु. [फा.] १. ओसाड जागा. २. जंगल. ३. वाळवंट. [रात्रीचें जेवण; फराळ.

बियारी– स्त्री.; **बियालू***–पु.

बियाह+–पु. विवाह; लग्न.

बियाहता+–वि. विवाहित.

बियाहना*– क्रि. स. विवाह करणें. [लेला.

बिरंग–वि. १. बहुरंगी. २. विट-

बिरंज–पु. [फा.] भात; तांदूळ. [अ.] पितळ.

बिरंजन–वि. पांढरें स्वच्छ करणारे; 'ब्लीचिंग'. [व्यापारी.

बिरंजारी–पु. [फा.] धान्याचा

बिरंजी– स्त्री. लहान खिळा; चूक. –वि. [अ.] पितळेचा.

बिरकत*–वि. विरक्त.

बिरख(ष)भ*–पु. वृषभ; बैल.

बिरचना*–क्रि. स. रचणें; बनविणें. –क्रि. अ. मन उडणें.

बिर(रि)छ*–पु. वृक्ष.

बिरछिक*–पु. वृश्चिक; विंचू.

बिरझना*–क्रि. अ. १. झगडणें; भांडणें. २. रागावणें.

बिरझाना*–क्रि. अ. १. क्रुद्ध होणें. २. आग्रह धरणें. ३. गडबड करणें. [वर्णन.

बिरतं(तां)त*–पु. वृत्तांत;

बिरता–पु. सामर्थ्य; शक्ति.

बिरताना+–क्रि. स. वांटणें; विभाजन, वितरण करणें.

बिरथा*–अव्य. वृथा; व्यर्थ. –वि. निरर्थक. [ब्रीद.

बिरद–पु. १. नांव; कीर्ति. २.

बिरदैत–पु. अतिरथी; विख्यात योद्धा.–वि. विख्यात; प्रसिद्ध.

बिर(रि)ध*–वि. वृद्ध.

बिरधाई– स्त्री.; **बिरधापन**–पु.–म्हातारपण; वृद्धत्व.

बिरबिराना+क्रि. अ. कुरकुरणें

बिरमना*–क्रि. अ. १. थांबणें. २. आराम करणें. ३. उशीर लावणें. ४. प्रेमांत अडकणें.

बिरमाना*– क्रि.स. १. थांबविणें. २. मोहून टाकणें.

बिरला–वि. विरळा; एखादाच.

बिरले–वि. (अनेक०) फार थोडे; मोजके.

बिरवा*–पु. १. वृक्ष; झाड. २. रोप. [–अनेक० **बिरवान**].

बिरह–पु. विरह.

बिरहा–पु. १. गवळी लोकांचें एक लोकगीत. २. विरह.

बिरहाना*–क्रि.अ. विरहपीडा अनुभविणें.

बिरही–वि. विरही.

बिराग–पु. वैराग्य; विरक्ति; उदासीनता.

बिरागना*–*क्रि. अ.* विरक्त होणें. [विराजणें. २. बसणें.

बिराजना–*क्रि.अ.* १. शोभणें;

बिरादर–*पु.* [*फा.*] १. भाऊ. २. भाऊबंद. [–अनेक० **बिरादरान**].

बिरादराना–*वि.* [*फा.*] भावांसारखा; भ्रातृयोग्य.

बिरादरी– *स्त्री.* [*फा.*] १. भाऊबंद; आप्तेष्ट. २. जात; ' कम्यूनिटी '. मु०–**से ख़ारिज या बाहर होना**–जातिबहिष्कृत होणें.

बिरान–ना*–*वि.* [*फा.*] १. परका. २. अपरिचित. ३. दुसऱ्याचा.

बिराना+–*क्रि.स.* वेडावणें; चिडविणें. [२. खेप; पाळी; वेळ.

बिरियाँ– *स्त्री.* १. वेळ; समय.

बिरी*– *स्त्री.* १. विडा. २. विडी. ३. गाठोडें. ४. मिश्री.

बिरुझ (झा) ना *–*क्रि.अ.* १. रागावणें; संतापणें. २. झगडणें.

बिरुद–*पु.* १. प्रशंसा. २. ब्रीद; प्रतिज्ञा. (अनेक०); पदकें.

बिरुदावली– *स्त्री.* प्रशंसा

बिरुदैत–*वि.* विख्यात; प्रसिद्ध.

बिरुधाई*– *स्त्री.* म्हातारपण; वृद्धत्व.

बिरोग+–*पु.* दुःख; चिंता.

बिरोजा–*पु.* गंधाबिरोजा; राळ. सुरूच्या झाडाचा चीक.

बिलंद*–*वि.* पा. ' बुलंद '.

बिलंब*–*पु.* विलंब; उशीर.

बिल–*पु.* १. बीळ; विवर. २. मुयार. ३. गुहा; गुंफा.

बिल–*अव्य.* [*अ.*] शीं; सह; साठीं; द्वारें. **–कुल**– *अव्य.* १. संपूर्ण; एकंदर. २. सुरुवातीपासून शेवटपर्यंत. ३. अगदीं; बिलकुल. **–फ़र्ज़**–*अव्य.* समजा; गृहीत धरा. **–वास्ता**–*वि.* अप्रत्यक्ष; ' इनडायरेक्ट '.

बिलखना–*क्रि.अ.* १. दुःखी होणें. २. विलाप, आक्रोश करणें. ३. संकोच पावणें; आक्रसणें.

बिलग–*वि.* विलग; वेगळा. –*पु.* १. वेगळेपणा. २. दुःख.

बिलगाना–*क्रि.अ.* वेगळें होणें. –*क्रि.स.* १. वेगळें करणें. २. निवडणें. [वेगळेपणा.

बिलगाव–*पु.* विभक्तपणा;

बिलच्छन–*वि.* विलक्षण; अद्भुत; अपूर्व. [जाणणें.

बिलछना*– *क्रि.अ.* ताडणें;

बिलटना*–*क्रि.अ.* उलटणें; उपडें होणें. –*क्रि. स.* चढविणें; बनविणें.

बिलटी– *स्त्री.* [*इं.*] पार्सल पाठविल्याची रेल्वेरसीद; बीजक; ' इनव्हॉइस '.

बिलनी– *स्त्री.* १. रांजणवाडी (डोळ्यावरील फोड). २. कांतीण. ३. भ्रमरी; कुंभारीण (किडा).

बिलपना+–*क्रि. अ.* विलाप करणें. [या वेळीं.

बिलफ़ेल–*अव्य.* [*अ.*] सध्यां;

बिलबिलाना–*क्रि.अ.* १. वळवळणें (किड्यांचें). २. आक्रोश करणें.

बिलम*–*पु* उशीर; विलंब.

बिलमना*– *क्रि.अ.* १. उशीर करणें. २. थांबणें. ३. प्रेमबद्ध होणें.

बिलमाना–*क्रि.स.* १. प्रेमामुळें एखाद्यास जाऊं न देणें; अडविणें; उशीर करणें. २. प्रेमांत गुंतविणें.

बिललाना*– *क्रि.अ.* विलाप करणें. [२. अशिष्ट.

बिलल्ला–*वि.* १. उडाणटप्पू.

बिलवाना+– *क्रि.स.* १. हरविणें; घालविणें. २. नष्ट करणें. ३. लपविणें.

बिलसना*–*क्रि. अ.* शोभणें. –*क्रि. अ.* उपभोग घेणें; वापरणें.

बिलसाना*–*क्रि. स.* १. उपभोग घेणें. २. उपभोग घ्यावयास लावणें. [पानांचा करंडा.

बिलहरा–*पु.*; **बिलहरी**– *स्त्री.*

बिला–*अव्य* [*अ.*] विना; खेरीज.–**तकल्लुफ़**–*अव्य.* निःसंकोचपणें. –**नाग़ा**–*अव्य.* दररोज; न चुकतां.–**वजह**–*अव्य.* निष्कारण.– –**वास्ता**–*अव्य.* सरळ; प्रत्यक्ष; ' डायरेक्ट'.– **शक**; –**शुबहा**; –**शुभा**–*अव्य.* बेलाशक; नक्की.

बिलाई– *स्त्री.* १. मांजरी. २. गळ (पोहरा काढण्याचा). ३. दाराची खिटी.

बिलाना–*क्रि. अ.* १. नाश पावणें. २. अदृश्य होणें. [करणें.

बिलापना*–*क्रि. अ.* विलाप

बिलायत– *स्त्री.* [*अ.*] विलायत; परदेश.–*वि.** पुष्कळ; अधिक.

बिलारी+– *स्त्री.* मांजरी.

बिलाल–व–*पु.* बोका; रानमांजर. [घेणें.

बिलासना*–*क्रि. स.* उपभोग

बिलिया+– *स्त्री.* वाटी.

बिलैया+– *स्त्री.* १. मांजर. २. किसणी. ३. दाराची खिटी.

बिलोकना*–*क्रि. स.* पाहाणें; अवलोकन करणें. [कटाक्ष.

बिलोकनि*– *स्त्री.* दृष्टि;

बिलोड़ना–*क्रि. स.* १. घुसळणें (दूध, दहीं इ.). २. अस्ताव्यस्त करणें; विस्कटणें. [कुरूप.

बिलोन*– *वि.* १. अळणी. २.

बिलोना–*क्रि. स.* १. घुसळणें. २. मिसळणें; ढवळणें. ३. ओतणें.

बिलोल–*वि.* चंचल; सुंदर.

बिलोलना*–*क्रि. अ.* हलणें; विचलित होणें.

बिलोवना–*क्रि. स.* पॉ० 'बिलोना'.

बिलौटा–*पु.* मांजरीचें पिलूं.

बिल्ला–*पु.* १. बोका. २. बिल्ला; पट्टा.

बिल्ली–*स्त्री.* १. मांजर; मांजरी. २. दाराची खिटी. **मु०–का रास्ता काटना**–मांजर आडवें जाणें.**–को छीछड़ोंके ख्वाब**–माणसाचा जसा स्वभाव असेल तसे विचार त्याच्या मनांत घोळत असतात; मनीं असे तें स्वप्नीं दिसे.

बिल्लौर–*पु.* १. स्फटिक; रॉक क्रिस्टल'. २. बिलोरी आरसा. ३. स्वच्छ कांच.

बिल्लौरी–*वि.* बिलोरी; स्फटिकासारखा.

बिवरा+–*पु.* पा० 'ब्योरा'.

बिवराना–*क्रि. स.* केसांचा गुंता सोडविणें; गुंतवळ काढणें.

बिवाई–*स्त्री.* तळपायाला पडलेली भेग; पाय फुटणें. **मु०–फटना**–पाय फुटणें, फाटणें. [वासना.

बिष(षि)या*–*स्त्री.* विषय-

बिसंच*–*पु.* १. वस्तूंची निगा न ठेवणें; निष्काळजीपणा. २. कार्यनाश. ३. भय. ४. उधळेपणा; अपव्यय. [परमेश्वर.

बिसंभर*–*पु.* विश्वंभर;

बिस*–*पु.* विष.

बिसख(खो)परा; बिसखापर–*पु.* १. घोरपडीसारखा एक विषारी प्राणी. २. एक वनौषधि. [पांढरा.

बिसद–*–*वि.* विशद; स्वच्छ;

बिसन*–*पु.* १. व्यसन; पतन. २. दुर्भाग्य. [दुर्दैवी.

बिसनी*–*वि.* १. व्यसनी.

बिसमउ–य–व*–*पु.* १. वस्मय; आश्चर्य. २. गर्व. ३. विषाद. [जखमी.

बिसमिल–*वि.* [*फा.*] घायाळ;

बिसमिल्ला–*पु.* [*अ.*] ईश्वराच्या नांवानें (प्रत्येक कार्यारंभीं मुसलमान लोक याचा उच्चार करितात). [२. विषय.

बिसयक*–*पु.* १. प्रदेश; राज्य.

बिसरना–*क्रि. स.* विसरणें.

बिसरात*–*पु.* खेचर.

बिसराना–*क्रि. स.* विसरणें; विसर पाडणें.

बिसरामी*–*वि.* विश्राम देणारा; सुखदायक.

बिसवार–*पु.* धोपटी.

बिसवासी*–*वि.* १. विश्वास ठेवण्यास पात्र; विश्वासू. २. विश्वास ठेवण्यास अपात्र; अविश्वासू.

बिससना*–*क्रि. स.* विश्वास ठेवणें. २. वध करणें; मारणें. ३. शरीराचे तुकडे तुकडे करणें.

बिसहना+–*क्रि. स.* विकत घेणें. –*पु.* खरेदी.

बिसाइँध–*स्त्री.* दुर्गंध; घाण.

बिसाख*– विशाखा (नक्षत्र).

बिसात–*स्त्री.* [*अ.*] १. अंथरण्याची वस्तु (चटई, सतरंजी इ०). २. बुद्धिबळाचा किंवा सोंगट्यांचा कागदी अथवा कापडी पट. ३. सामर्थ्य; दर्जा. ४. जमा; दौलत; द्रव्य. ५. शक्ति; बिशात; ताकत. ६. मांडवल. **–बाना–पु.** किरकोळ माल; 'स्टेशनरी'. **मु०–उलटना**–उलथापालथ होणें.

बिसाती–*पु.* [*अ.*] किरकोळ माल विकणारा दुकानदार; 'स्टेशनरी–मर्चंट'.

बिसाना*–*क्रि. अ.* १. पा० 'बसाना'. २.+ विषाचा प्रभाव पडणें.

बिसायँध–*स्त्री.* दुर्गंध; घाण. –*वि.* दुर्गंधयुक्त; सडलेला.

बिसारना–*क्रि. स.* विसरणें; आठवण न ठेवणें.

बिसारा–री–*वि.* विषारी.

बिसास*–*पु.* १. विश्वास. २. विश्वासघात.

बिसासिन–*वि. स्त्री.* अविश्वासू; दगाबाज; कपटी.

बिसासी*–*वि.* विश्वासघातकी; अविश्वासू; दगाबाज; कपटी.

बिसाहना+–*क्रि. स.* खरेदी करणें; विकत घेणें.–*पु.* विकत घेतलेली वस्तु; सामान

बिसाहनी+–*स्त्री.* सौदा; खरेदी केलेली वस्तु.

बिसिख*–*पु.* बाण. [साप.

बिसियर*–*वि.* विषारी.–*पु.*

बिसूरना–*क्रि. अ.* १. खेद, दुःख, काळजी करणें. २. मुसमुसून रडणें.–*स्त्री.* चिंता; काळजी.

बिसेख*–*वि.* विशेष.

बिसेखना*–*क्रि. अ.* १. विस्तारपूर्वक वर्णन करणें. २. निर्णय करणें. ३. प्रतीत होणें; वाटणें.

बिसेन–*पु.* क्षत्रियांची एक शाखा.

बिसेसर*–*पु.* विश्वेश्वर.

बिस्कुट–*पु.* [*इं.*] 'बिस्किट'.

बिस्तर–*पु* बिछाना; अंथरूण.

बिस्तरना*–*क्रि. स.* विस्तार करणें; फैलावणें.–*क्रि. अ.* फैलणें; पसरणें.

बिस्तरा–*पु.* अंथरूण; बिछाना.

बिस्तुइया–*स्त्री.* पाल (प्राणी).

बिस्मिल्ला; बिस्मिल्लाह–*स्त्री.* [*अ.*] 'देवाच्या नांवानें' (श्री गणेशा) असें म्हणून मुसलमान लोक प्रत्येक शुभ कार्याला प्रारंभ

करतात त्यावरून. प्रारंभ; विद्यारंभ. मु०–करना–आरंभ करणें. –ही गलत होना– सुरुवातच चुकीची होणें; 'प्रथमग्रासे मक्षिकापातः'.

बिस्वा–पु. बिघ्याचा विसावा भाग. मु० उन्नीस बिस्वा–जवळ जवळ; नव्याण्णव टक्के. बीस-बिस्वा–पूर्णपणें; निःसंशय; शंभर नंबरी; शंभर टक्के.

बिस्वास*– पु. विश्वास. –सँघाती–*वि. पु. विश्वासघाती.

बिहंग*– पु. विहंग; पक्षी.

बिहडना*– क्रि. स. १. तुकडे तुकडे करणें. २. नष्ट करणें; मारून टाकणें. [स्मित करणें.

बिहँसना*– क्रि. अ. हंसणें;

बिहँसाना*– क्रि. अ. १. मंदस्मित करणें. २. प्रफुल्लित होणें. ३. फुलणें; खिलणें (फूल).–क्रि. स. हंसविणें; खुष करणें.

बिहग– पु. विहग; पक्षी.

बिहद*–द्द– वि. [फा.] बेहद्द; अपरिमित.

बिहबल*– वि. विह्वल; व्याकुळ; अस्वस्थ; बेचैन.

बिहरना*– क्रि. अ. १. सहल, विहार करणें; फिरावयास जाणें. २ फाटणें; विदीर्ण होणें.

बिहारना*– क्रि. अ. फाटणें. –क्रि. स. फाडणें.

बिहरी+– स्त्री. वर्गणी; पट्टी.

बिहान– पु. प्रभात; सकाळ. २.अंत.–अव्य. उद्यां.

बिहाना*– क्रि. स. सोडणें; त्यागणें.–क्रि. अ. व्यतीत होणें; जाणें. [करणें; क्रीडा करणें; खेळणें.

बिहारना*– क्रि. अ. विहार

बिहाल– वि. [फा.] अस्वस्थ; बेचैन. २. हलाखीच्या स्थितींत असलेला.

बिहित*– पु. स्वर्ग.

बिहिश्त–पु. [फा.] स्वर्ग.

बिहिश्ती– वि पु. [फा.] १. स्वर्गांत राहाणारा; स्वर्गीय. २. भिस्ती; पाणी भरणारा.

बिही– स्त्री. [फा.] पेरूसारखें एक फळ किंवा त्याचें झाड; जांब; नाशपाती; पेरू. –दाना–पु. एक औषधी बीज; मोंगली बेदाणा.

बिही– स्त्री. [फा.] हित; भलाई. –ख़्वाह– हितचिंतक; हितैषी. [रहित; विना.

बिही(हू)न+– वि. विहीन;

बिहु(हो)रना*– क्रि. स. सोडणें; त्यागणें; टाकणें.–क्रि. अ. वियोग होणें; दूर होणें.

बींड़ा–पु. १. भात्याणाचें (पिंजराचें) बनविलेलें गोल आसन. २. चुंबळ. ३. मोळी; पेंढी.

बींधना–क्रि. स. छेद करणें; वेध करणें; भोक पाडणें.–क्रि. अ. १. अडकणें. २. छेद होणें.

बी– स्त्री. पा० 'बीबी.'

बीख*–पु. १. पाऊल. २. विष.

बीग*–पु. लांडगा.

बीघा–पु. बिघा; बीस बिस्वे किंवा ३०२५ चौरस वार जमीन.

बीच–पु. १. मध्यभाग; मधील अंतर. २. फरक. ३. संधि; अवकाश.–अव्य. मध्यें; आंत.–ब(बि)चाव–पु. मध्यस्थी. –वाला–पु. मध्यस्थ. मु०– करना–भांडण सोडविणें; मध्यस्थी करणें. –पड़ना–अंतर पडणें. –पारना–भेद करणें. –बीचमें–अधून मधून. –में कूदना–हस्तक्षेप करणें.–में पड़ना–मध्यस्थ होणें. –सकता–मध्यंतर; 'इंटरव्हल.'

बीच–चि–*– स्त्री. लाट; तरंग.

बीचु*–पु. १. संधि; अवसर २. अंतर; फरक.

बीचोबीच–अव्य. मधोमध.

बीछना*–क्रि. स. निवडणें; वेंचणें.

बीछी– स्त्री.; **बीछू**–पु.* विंचू.

बीज–पु. १. बीं; बीज. २. शुक्र. ३. कथावस्तूचें मूळ. ४. मंत्राचा मूळ भाग.–*स्त्री. वीज.–केंद्र–पु. केंद्रभाग; गर; केंद्रनाभि; 'न्यूक्लिअस'. –खाद– स्त्री. शेतकऱ्यांना बियाणें व खतें यांसाठीं दिली जाणारी तगाई. –गणित–पु. बीजगणित; 'आल्जिब्रा.' –चोल–पु. 'कॅरंकल'. –द्रव्य–पु. मूलतत्त्व. –पत्र–पु. 'कॉटिलेडन'. –पूर–पु. ईडलिंबू. –बंद–पु. चिकण्याचें बीं.

बीजक–पु. १. यादी. २. मालाची किंमत, माहिती वगैरेची यादी. ३. कबीरदासांचा एक पद्यसंग्रह. ४. ईडलिंबू. ५. बीं. ६. बीजक; बीजकपट्टी; 'इन्व्हॉइस'.

बीजन*–ना–पु. पंखा.

बीजा–वि. दुसरा.–पु. बीज; बीं. [गर.

बीजी– स्त्री. १. कोय. २. गीर;

बीजु*– स्त्री. बीज.

बीजोपर; **बीजोपराक्ष**–पु. उपरि बीजपत्र; 'एपिकोटिल'.

बीझ–झा*–वि. निर्जन; सुनें; जनशून्य. [गुंतणें.

बीझना*– क्रि. अ. अडकणें;

बीट– स्त्री. पक्ष्यांची विष्ठा.

बीड़– स्त्री. रुपयांची चळत.

बीड़ा–पु. विडा; तांबूल. मु० –उठाना–विडा उचलणें; निश्चय करणें. –डालना; –रखना–आव्हान देणें; एखादें अवघड कार्य करण्यासाठीं पैजेचा विडा समोर ठेवणें.

–देना–नाच-गाणें करणाऱ्यांना निमंत्रणाची सुपारी म्हणून कांहीं पैसे आधीं देणें.

बीड़ी– *स्त्री.* १. विडी. २. लहान विडा. ३. दांत घांसण्याची मिश्री; दांतवण.

बीतना–*क्रि. अ.* १. व्यतीत होणें. निघून जाणें; गुजरणें. २. दुःख कोसळणें. ३. घडणें.

बीतनि*– *स्त्री.* क्षणभंगुरता.

बीता–*वि.* व्यतीत झालेला; गेलेला. –*पु.** वीत.

बीती– *स्त्री.* १. एखाद्यावर गुदरलेली घटना. २. वृत्तांत; घडलेली गोष्ट. [सडक.

बीथि–थी– *स्त्री.* वीथि; मार्ग;

बीथित+–*वि.* व्यथित; दुःखी.

बीधना–*क्रि. अ. स.* पा० ' बिंधना'; ' बींधना. '

बीन– *स्त्री.* वीणा; बीन. **–कार** –*पु.* बीन वाजविणारा; वीणावादक.

बीनना– *क्रि. स.* १. वेंचणें. २. निवडणें.

बीनवना*–*क्रि. स.* विनविणें.

बीफै+–*पु.* गुरुवार.

बीबी– *स्त्री.* [*फा.*] १. पत्नी; बायको. २. मोठ्या घरची स्त्री. ३. पत्नी व लहान नणंद यांचें आदरार्थक संबोधन.

बीभत्स–*वि.* १. किळसवाणें; घृणास्पद. २. पापी; दुष्ट.

बीम–*पु.* [*फा.*] १. भय; धोका. २. जोखीम. **–व हरास**–*पु.* भीति व धोका.

बीमा–*पु.* [*फा.*] १. विमा; ' इन्शुअरन्स '. २. विमा उतरविलेलें पत्र किंवा पार्सल वगैरे. –**कृत**–*वि.* विमा उतरविलेलें; ' ॲश्युअर्ड '. **–दार**–*पु.* विमेदार; विमा उतरविणारा. **–पत्रक**–*पु.* विम्याची पॉलिसी; ' इन्शुअरन्स पॉलिसी '.

बीमार–*वि.* [*फा.*] रोगी; आजारी. **–दार**–*वि.* रोग्याची सेवा शुश्रूषा करणारा. **–दारी**– *स्त्री.* रोग्याची सेवाशुश्रूषा.

बीमारी– *स्त्री.* [*फा.*] १. आजार; रोग. २. वाईट संवय. ३. भानगड; बखेडा. [*वि.* दुसरा.

बीय–या*– *पु.* बीं; बीज.–

बीर–*पु.* १. वीर पुरुष. २. भाऊ. –*वि.* शूर; बहादुर; वीर. –*स्त्री.**–१. सखी. २. मनगटावरील एक दागिना. ३. कुरण. ४. गुरें चारण्याबद्दलचा कर.

बीरज*–*पु.* वीर्य; शक्ति.

बीरन*–*पु.* भाऊ.

बीरबहूटी– *स्त्री.* एक लाल पावसाळी किडा; मखमली किडा; कुंकवाचा किडा; इंद्रगोप.

बीरा*–*पु.* १. विडा. २. देवाच्या प्रसादाचीं फुलें, फळें इ.

बीरी*– *स्त्री.* १. विडा. २. मिश्री. ३. कानांतील एक दागिना. ४. चिरूट. [जमीन.

बील–*वि.* पोकळ. –*पु.* सखल

बीवी–*स्त्री.* [*फा.*] पा० 'बीबी'.

बीस–*वि.* १. वीस; २०. २. उत्तम; श्रेष्ठ. **–बिस्वे**–*अव्य.* १. नक्की. २. बहुतकरून.

बीसी– *स्त्री.* १. विसाचा गट. २. दोन दशकें. ३. जमिनीचें एक माप.

बीह*–*वि.* वीस; २०.

बीहड़–*वि.* १. उंच-सखल; खडबडीत. २. बिकट; अवघड. ३. अलग. ४. निर्जन; निर्मनुष्य.

बुंद–*स्त्री. पु.* १. थेंब. २. वीर्य.

बुँदकी– *स्त्री.* १. टिकली. २. लहान ठिपका; डाग. **–दार**–*वि.* ठिपकेदार.

बुंदा–*पु.* १. कानांत घालावयाचा दागिना (बुलक, डूल, लोलक इ०). २. कपाळावर लावण्याची टिकली. [(पक्वान्न).

बुँदिया– *स्त्री.* १. थेंब. २. बुंदी

बुंदेलखंडी– *स्त्री.* बुंदेलखंडांत (मध्यप्रदेशाच्या पन्ना, छतरपुर. इ० भागांत) बोलली जाणारी एक भाषा. –*वि.* बुंदेलखंडाचा. –*पु.* बुंदेलखंडाचा रहिवासी.

बुंदेला–*पु.* बुंदेलखंडांत राहाणाऱ्या एका राजपूत जातींतील पुरुष.

बुँदौरी*–*स्त्री.* बुंदी (पक्वान्न).

बुआ– *स्त्री.* १. आत्या. २. वडील बहीण.

बुक–*स्त्री.* कलप केलेलें एक प्रकारचें कडक व पातळ कापड. –*पु.* हास्य. [गाठोडें.

बुक़चा–*पु.* [*तु.*] कपड्याचें

बुक़ची–*स्त्री.* [*फा.*] १ पोटळी; पुरचुंडी. २. सुई, दोरा वगैरे ठेवण्याची शिंप्याची पिशवी.

बुकनी– *स्त्री.* पूड; भुकटी.

बुकुना*–*पु.* १. भुकटी; बुकणी. २. पाचक चूर्ण.

बुक्कन–*पु.* भुंकणें. [बुकणी.

बुक्का–*पु.* अभ्रकाची पूड;

बुक्की– *स्त्री.* १. हृदय; काळीज. २. उपरणें.

बुख़ार–*पु.* [*अ.*] १. ज्वर; ताप. २. वाफ. ३. शोक, क्रोध इत्यादींचा आवेग.

बुख़ारा–*पु.* [*तु.*] रशियन तुर्कस्थानचा एक प्रदेश व त्याची राजधानी.

बुख़ारी–*वि.* [*तु.*] बुखाऱ्याचा रहिवासी. –*स्त्री.* भिंतींतील शेगडी.

बुग़चा–*पु.* [*तु.*] कपड्यांचें गाठोडें.

बुग़दा–पु. [*फा.*] कसायाची सुरी.

बुज़्–*स्त्री*. [*फा.*] शेळी; बकरी. –**दिल**–*वि*. भित्रा; भेकड. –**दिली**–*स्त्री*. भित्रेपणा; भ्याडपणा.

बुजना+–पु. विटाळशीचें फडकें.

बुजहरा+–पु. पाणी तापविण्याचें भांडें; बंब.

बुज़ुर्ग–*वि*. [*फा.*] १. वडील; वृद्ध. २. श्रेष्ठ. –**पु.** १. गुरुजन; वडील माणूस. २. पूर्वज. ३. संत; महात्मा. –**वार**– *वि*. श्रेष्ठ; वडीलधारें. [मोठेपणा.

बुज़ुर्गी– *स्त्री*. [*फा.*] वडीलकी;

बुझना–*क्रि*. *अ*. १. विझणें. २. मंदावणें. ३. थंड पडणें. ४. शांत होणें. ५. शमणें. ६. उदास होणें. [काम किंवा त्याची मजुरी.

बुझाई– *स्त्री*. विझविण्याचें

बुझाना–*क्रि*. *स*. १. विझविणें. २. शमविणें; शांत करणें. ३. समजाविणें. –*क्रि*. *अ*. *– शांत होणें.

बुझौवल– *स्त्री*. कोडें; उखाणा.

बुड़की*– *स्त्री*. बुडी.

बुड़ना*–*क्रि*. *अ*. बुडणें.

बुड़बुड़ाना–*क्रि*. *अ*. पुटपुटणें; कुरकुरणें. [**बुड्ढी**].

बुड्ढा–*वि*. म्हाराता. [–*स्त्री*.

बुढ़भस– *स्त्री*. म्हातारचळ; म्हातारपणांतील कामवासना.

बुढ़ाई– *स्त्री*. म्हातारपण.

बुढ़ाना–*क्रि*. *अ*. म्हातारपण येणें; वृद्ध होणें.

बुढ़ापा–पु. म्हातारपण.

बुढ़िया– *स्त्री*. म्हातारी बाई. –**पुराण**–पु. निरर्थक गोष्ट. [पण.

बढ़ौती– *स्त्री*. वृद्धत्व; म्हातार-

बुत–पु. [*फा.*] १. मूर्ति; प्रतिमा. २. प्रेमिका; प्रेयसी. ३. घुम्या. ४. मूर्ख. –*वि*. मूर्तीप्रमाणें जड, निश्चेष्ट. –**कदा**; –**ख़ाना**–पु. १. मंदिर. २. प्रेमिकेचें निवासस्थान. –**तराश**–पु. मूर्तिकार. –**परस्त**–पु. मूर्तिपूजक. –**परस्ती**–*स्त्री*. मूर्तिपूजा. –**शिकन**–*वि*. मूर्तिभंजक. [होणें.

बुतना–*क्रि*. *अ*. विझणें; शांत

बुताना–*क्रि*. *स*. विझविणें; शांत करणें.

बुताम–पु. बटन.

बुत्ता–पु. १. फसवणूक; लबाडी. २. बहाणा; ढोंग; आव.

बुदबुद–**दा**–पु. बुडबुडा.

बुद्दू–*वि*. मूर्ख; बावळट.

बुद्धिजीवी वर्ग–पु. पांढरपेशा; 'इंटेलिजन्शिया'.

बुद्धिमत्ता; **बुद्धिमानी**– *स्त्री*. शहाणपणा; चातुर्य.

बुद्धू–*वि*. मूर्ख; बावळट.

बुधि*– *स्त्री*. बुद्धि.

बुन–*स्त्री*. [*फा.*] १. कॉफीचें बीं; बुंद. २. झाडाचें मूळ ३. झाड.

बुनकर–पु. विणकर; कोष्टी.

बुनना–*क्रि*. *स*. विणणें.

बुनवाना–*क्रि*. *स*. विणवून घेणें. [विणण्याची मजुरी.

बुनाई– *स्त्री*. १. विणकाम २.

बुनावट– *स्त्री*. वीण.

बुनियाद– *स्त्री*. [*फा.*] १. पाया; मूळ. २. आरंभ; आधार. ३. अस्सलपणा; वास्तविकपणा; **मु०– डालना**; –**रखना** –पाया घालणें.

बुनियादी–*वि*. [*फा.*] मूलभूत; आधाररूप; 'बेसिक'. –**तालीम** –*स्त्री*. मूलोद्योग शिक्षण; 'बेसिक एज्युकेशन'.

बुबुकना–*क्रि*. *अ*. ओक्साबोक्सी रडणें; हंबरडा फोडणें.

बुबुकारी– आक्रोश; हंबरडा.

बुरकना–*क्रि*. *स*. भुरभुरणें; हलक्या हातानें थोडी थोडी पसरणें (पूड वगैरे).

बुरक़ा–पु. [*अ.*] बुरखा.

बुरा–*वि*. वाईट; निकृष्ट. –**भला**–पु. १. हानिलाभ; बरें-वाईट. २. शिवीगाळ. –**हाल**–पु. दुर्दशा; विनाश. **मु०**–**चाहना**– वाईट चिंतणें, इच्छिणें. –**मानना**– १ वाईट मानणें; रागावणें. २. द्वेष करणें. –**लगना**– न आवडणें; राग येणें.

बुराई– *स्त्री*. १. वाईटपणा. २. दोष; दुर्गुण. ३. निंदा ४. अनिष्ट.

बुरादा– पु. [*फा.*] १. लांकडाचा भुसा. २. चूर्ण; चुरा.

बुरी–*वि*. *स्त्री*. 'बुरा' चें *स्त्री*. – **ख़बर**– *स्त्री*. मृत्यूची बातमी. –**गत**–*स्त्री*. दुर्दशा. –**तरह**–*अव्य*. फार; जोरानें; भयंकरपणें. –**नज़र**; –**निगाह**– *स्त्री*. वाईट नजर. **मु०– तरह पेश आना**– असभ्यपणें वागणें.

बुरुड–पु. बुरुड; टोपल्या चटया इ० बनविणारी एक जात.

बुरुश–पु.[*इं.*] कुंचला; कुंची; 'ब्रश'.

बुर्क़ा–पु. पा० 'बुरक़ा'.

बुर्ज–पु. [*अ.*] १. बुरूज. २. घुमट. ३. रास. –**तोप**– *स्त्री*. फिरत्या बुरुजावरील तोफ; 'टरेरगन'.

बुर्जी– *स्त्री*. [*अ.*] लहान बुरूज.

बुर्जुआ–पु. [फ्रेंच] श्रीमंत मध्यम वर्ग.–*वि*. या वर्गाशीं संबंधित; 'बूर्ज्वा'.

बुर्द– *स्त्री*. [*फा.*] १. वरची

मिळकत; नफा. २. पैज. ३. बुर्जी (बुद्धिबळांतील). –**बार**–*वि.* ओझें उचलणारा; सहनशील.

बुर्दाफ़रोश–*पु.* [*फा.*] बायकांना पळवून नेऊन विकणारा; 'किड-नॅपर'.

बुलंद–*वि.* [*फा.*] १. उंच. २. श्रेष्ठ. –**इक़बाल**–*वि.* भाग्यवान्. –**परवाज़**–*वि.* १. उंच उडणारा. २. उच्च विचारांचा. –**पाया;** –**मरतबा**–*वि.* उच्चपदस्थ; प्रतिष्ठित. [उच्चता. २. उत्कर्ष.

बुलंदी– *स्त्री.* [*फा.*] १. उंची;

बुलबुल– *स्त्री.* [*अ.*] बुलबुल (पक्षी); काळी मैना.

बुलबुला–*पु.* १. बुडबुडा. २. क्षणभंगुर वस्तु.

बुलवाना–*क्रि. स.* १. बोलावून घेणें; बोलावणें. २. बोलावयास लावणें.

बुलाक़– *स्त्री.* [तु] १. नाकाचें हाड. २. नाकांतील चमकी (दागिना); लहान नथ. [जात.

बुलाकी–*पु.* घोड्याची एक

बुलाना–*क्रि. स.* १. बोलाविणें. २. हांक मारणें. ३. बोलावयास लावणें.

बुलावा–*पु.* निमंत्रण; बोलावणें.

बुलेटिन–*पु.* [*इं.*] पत्रक.

बुल्लना*–*क्रि. स.* बोलणें; सांगणें.

बुल्ला*–*पु.* बुडबुडा.

बुवा– *स्त्री.* पा० 'बुआ'.

बुहारना–*क्रि. स.* झाडणें; केर काढणें.

बुहारी– *स्त्री.* झाडू; केरसुणी.

बूंद– *स्त्री.* थेंब; बिंदु. **मु०**– **गिरना अथवा पड़ना**–झिमझिम पाऊस पडणें.

बूंदा–*पु.* मोठी टिकली.

बूंदाबांदी– *स्त्री.* पावसाची बुरबुर, भुरभुर; शितोडे येणें.

बूंदी– *स्त्री.* १. बुंदी (पक्वान्न). २. पावसाचे थेंब.

बू– *स्त्री.* [फा.] १. वास; गंध. २. दुर्गंध; घाण. –**बास**– *स्त्री.* १. गंध; वास. २. पत्ता; ठावठिकाणा.

बूआ– *स्त्री.* १. आत्या. २. मोठी बहीण.

बूकना–*क्रि. स.* १. पूड करणें. २. बोलण्यांत उसणी ऐट आणणें.

बूचड़–*पु.* [*इं.*] कसाई; खाटीक. –**खाना**–*पु.* कसाईखाना; कत्तलखाना. [२. विद्रूप. ३. बुच्चा.

बूचा–*वि.* १. कान कापलेला.

बूजना*–*क्रि. स.* फसविणें.

बूज़(ज़ी)ना–*पु.* [*फा.*] वानर; माकड. [समज; ज्ञान. २. कोडें.

बूझ– *स्त्री.* १. अक्कल; बुद्धि;

बूझना–*क्रि. स.* १. जाणणें; ओळखणें; समजणें. २* विचारणें.

बूट–*पु.* १. डहाळा (हरभऱ्याचा). २. हरभऱ्याचा दाणा; घाटा.

बूटनि*– *स्त्री.* पा० 'बीरबहूटी'.

बूटा–*पु.* १. रोपटें. २. वेलबुट्टी. २. लहान फुलझाड.

बूटी– *स्त्री.* १. वनस्पति. २. वेलबुट्टी; नक्षी. ३. भांग. ४. पत्त्यावरील ठिपका. [२. लीन होणें.

बूड़ना*–*क्रि. अ.* १. बुडणें.

बूड़ा–*पु.* १. पाण्यांत बुडून मेल्यानंतर पिशाच झालेला. २. पूर; अतिवृष्टीमुळें पाणी सांचणें.

बूढ़ा–*वि. पु.* म्हातारा; बुढ्ढा. –**पोंग**–*वि.* मूर्ख म्हातारा; थेरडा. –**फूंस**–*वि.* जख्ख म्हातारा. **मु०**– **(ढ़े) तोतेको पढ़ाना**–शिक्षणाचें वय उलटल्यानंतर शिकविण्याचा प्रयत्न करणें.

बूढ़ी–*वि. स्त्री.* म्हातारी. –**ईद**– *स्त्री.* रमजान महिन्याचे संपूर्ण ३० दिवस झाल्यानंतर येणारी ईद. –**डड्ढो**– *स्त्री.* जख्ख म्हातारी.

बूता–*पु.* कुवत; शक्ति; सामर्थ्य.

बूदोबाश– *स्त्री.* [*फा.*] राहाणी–करणी; निवास. [पूड.

बूरा–*पु.* १. पिठीसाखर. २.

बृच्छ*–*पु.* वृक्ष.

बृहती– *स्त्री.* १. मोठी वीणा. २. रिंगणी; रानवांगें. ३. उपरणें.

बृहत्–*वि.* मोठा; विशाल; शक्तिशाली. –**कोण**–*पु.* 'रिफ्लेक्स अँगल'.

बृहत्तर–*वि.* अधिक मोठा.

बृहदन–*पु.* विस्तार होणें, करणें; मोठें करणें; 'एनलार्जमेंट'.

बृहस्पति– *पु.* गुरु ग्रह; 'ज्युपिटर'.

बेंग*–*पु.* बेडूक.

बेंच– *स्त्री.* [*इं.*] १. बाक. २ न्यायासन; न्यायालय.

बेंट-ठ+– *स्त्री.* १. लांकडी मूठ. २. दस्ता.

बेंड़– *स्त्री.* टेकू; आधार.

बेंड़ा*–*वि.* आडवा; तिरपा; वांकडा.

बेंड़ी– *स्त्री.* शेताला पाणी देण्यासाठीं पाणी वर काढण्याची दुरडी किंवा टोपली; ओकती. [छडी.

बेंत–*पु.* १. वेत. २. वेताची

बेंदा–*पु.* टिळा. २. टिकली. ३. बिंदी.

बेंवड़ा–*पु.* अडसर; अडणा.

बे–*अव्य.* लहानांसाठीं संबोधन; अरे.

बे– *अव्य.* [*फा.*] विना; खेरीज; निषेधसूचक, नकारदर्शक उपसर्ग. –**अक़ल;** –**अक़्ल**–*वि.* बेअकली; मूर्ख; निबुद्ध. –**अदब**–*वि.* अशिष्ट; असभ्य; बेअदबी; मोठ्या

माणसांचा मान न ठेवणारा; उद्धट. **–अदबी**–*स्त्री*. असभ्यता; अमर्यादा.–**आब**–*वि*. १. निस्तेज. २. तुच्छ.–**आबरू**–*वि*. अपमानित. २. अप्रतिष्ठित.–**आबरूई**–*स्त्री*.बेअब्रू; बेइज्जत.–**इज्जत**–*वि*. १. अपमानित. २. अप्रतिष्ठित.–**इज्जती**–*स्त्री*. अपमान; अप्रतिष्ठा.–**इन्तहा**–*वि*. अमर्याद.–**इन्साफ़ी**–*स्त्री*. अन्याय. –**ईमान**–*वि*. १. अधर्मी; नास्तिक. २. अप्रामाणिक; बेइमान; नमकहराम.–**ईमानी**–*स्त्री*. १. अधार्मिकता. २. बेइमानी; अप्रामाणिकता. –**उज्र**–*वि*. *अव्य*. आक्षेपरहित; बिनहरकत.–**क़दर**;–**क़द्र**–*वि*. मान नसलेला; अप्रतिष्ठित. –**क़रार**–*वि*. बेचैन; अस्वस्थ. –**क़रारी**–*स्त्री*. बेचैनी; अस्वस्थता. –**कल***–*वि*. विकल; अस्वस्थ; बेचैन. –**कली**–*स्त्री*. व्याकुळता; बेचैनी; अस्वस्थता. –**कस**–*वि*. असहाय्य; दीन; निराश्रित; अनाथ. –**कसी**–*स्त्री*. दीनता; असहाय्यता. –**क़सूर**–निरपराध; निर्दोष.–**कहा**–*वि*. दुसऱ्याचें न ऐकणारा; उद्धट; उच्छृंखल.–**क़ाबू**–*वि*. १. नाइलाज झालेला. २. ताब्यांत नसलेला. –**काम**–*वि*. १.निरुपयोगी; कुचकामाचा.२.निरुद्योगी; बेकार.–**क़ायदा**–*वि*. नियमविरुद्ध; अनियमित. –**कार**–*वि*. १. काम नसलेला. २. निरर्थक; व्यर्थ. ३. निष्फळ.–*अव्य*. निरुपयोगी; व्यर्थ. –**कारी**–*स्त्री*. बेकारी; निरु द्योगीपणा.–**खटके**–*अव्य*.निःसंकोचपणें; बेधडक; बेलाशक.–**ख़बर**–*वि*. १. बेफिकीर; निष्काळजी. २. भानावर नसलेला; बेहोष; बेशुद्ध. ३. अजाणता; नेणता. –**ख़ुदी**–*स्त्री*. १. आत्मविस्मृति. २. धुंदी; मस्ती; बेशुद्धि.–**ख़ौफ़**–*वि*. निर्भय.–**गरज़**–*वि*. १. तमा न बाळगणारा; बेफिकीर. २. निःस्वार्थी.–**गाना**–*वि*. १. परका; अपरिचित. २. दुसऱ्याचा; परक्याचा.–**गुन**–*वि*. १. गुणरहित; निर्गुण. २. दोरी नसलेली (नाव). –**गुनाह**–*वि*. निरपराध; निर्दोष. –**गुमान**–*अव्य*. बेशक; निःसंदेह. –**घर-रा**–*वि*. गृहहीन; घरदार नसलेला. –**चारगी**–*स्त्री*. दीनता; विवशता; असहाय्यता. –**चारा**–*वि*. बिचारा; दीन; असहाय्य.–**चिराग़**–*वि*. जेथें दिवा जळत नाहीं असा. २. बेचिराख; उध्वस्त. –**चूं व चरा**–*अव्य*.निमूटपणें; तक्रार न करितां. –**चैन**–*वि*. अस्वस्थ.–**चैनी**–*स्त्री*. व्याकुळता.–**जड़**–*वि*. निराधार; विनबुडाचा; पाया नसलेला.–**ज़बान**–*वि*. १. मुका; बोलतां न येणारा. २. दीन; दुबळा. –**जा**–*वि*. १. अस्थानीं, अवेळीं झालेला. २. अनुचित; अयोग्य.–**जान**–*वि*. १. निर्जीव; मृतवत्. २. कोमेजलेला. ३. दुबळा; अशक्त. –**ज़ाबता**;–**ज़ाब्ता**–*वि*. बेकायदा; नियमाविरुद्ध. –**ज़ार**–*वि*. १. नाराज; दुःखी. २. विटलेला; कंटाळलेला; बेजार.–**ज़ारी**–*स्त्री*. १. दुःख; उद्विग्नता. २. वीट.–**जोड़**–*वि*. जोड नसलेला; अद्वितीय; अत्युकृष्ट.–**ठिकाने**–*वि*. १. स्थानभ्रष्ट. २. व्यर्थ; निरर्थक. –*अव्य*. अस्थानीं.–**डौल** *वि*. कुरूप. –**ढंग-गा**–*वि*. १. अशिष्ट; चालरीत न जाणणारा. २. बेडौल; बेढब. ३. कुरूप.–**ढब**–*वि*. १. बेडौल; विजोड. २. कुरूप.–**तकल्लुफ़**–*वि*. १. मनमोकळा; स्पष्टवक्ता; निसंकोची.२. अशिष्ट.३.घनिष्ठ.–*अव्य*. निसंकोचपणें; बेधडक.–**तकल्लुफ़ी**–*स्त्री*. निःसंकोचपणा; घनिष्ठता. –**तमीज़**–*वि*. असभ्य; अशिष्ट; उद्धट; अव्यवहारी. –**तरतीब**–*वि*. क्रमरहित; अव्यवस्थित.–**तरह**–*अव्य*. १. अनुचितपणें; गैरवाजवी.२. असाधारणरीत्या; अत्यंत.–*वि*. पुष्कळ; अधिक.–**तरीक़ा**–*वि*. अनुचित; नियमाविरुद्ध. –**तरीक़े**–*अव्य*. अनुचितपणें.–**तहाशा**–*अव्य*. १. अधिक वेगानें; भरधांव. २. गर्भगळित होऊन. ३. अविचारानें. –**ताब**–*वि*. १. दुर्बल; अशक्त. २. व्याकुळ; विव्हळ; बेचैन. ३. अधीर. –**ताबी**–*स्त्री*. १. बेचैनी; अस्वस्थता. २. अधीरता. –**तार**–*वि*. बिनतारी.–०**का तार**–*पु*. बिनतारी संदेश; 'वायरलेस'. –**तुका**–*वि*. १. विजोड; विसंगत. २ बेढब; बेडौल. ३ निर्यमक. –**तुकी**–*वि*. *स्त्री*. असंबद्ध (गोष्ट). (**मु०**–०**हाँकना**–असंबद्ध बरळणें). –**दख़ल**–*वि*. ताबा किंवा अधिकार नसलेला; अधिकारच्युत; काढून टाकलेला.–**दख़ली**–*स्त्री*. १. संपत्तीवरील मालकी हक्क नसणें किंवा नाहींसा होणें. २ कुळांना जमिनीवरून हुसकून लावणें; काढून टाकणें. –**दम**–*वि*. १ मृतवत्; मरणोन्मुख. २ जर्जर. ३ मृत; मेलेला –**दर्द**–*वि*. निर्दय; कठोर. –**दर्दी**–*स्त्री*. निर्दयता; निष्ठुरता. –**दाग़**–*वि*. १ न डागळलेला; स्वच्छ. २ निर्दोषी; निरापराधी; निष्कलंक. –**दाद**–*स्त्री*. जुलूम; अन्याय. –**दाना**–**पु**. १. बिन बियांचें उत्तम काबुली डाळिंब. २ दारूहळद. –*वि*. मूर्ख; बेवकूफ. –**दाम**–*वि*. फुकटचा मोफत. (**मु०**–**का ग़ुलाम**–फुकटचा नोकर; आज्ञाधारक). –**दिल**–*वि*. खिन्न; उदास. –**दीन**–

वि. धर्मभ्रष्ट; धर्मलंड. **–धड़क–** *अव्य.* निर्भयपणें; बेधडक. **–नंग–** *वि.* निर्लज्ज. **–नज़ीर–** *वि.* बेजोड; अनुपम. **–नमूना; –बेनिमून*–** *वि.* अनुपम; अद्वितीय. **–नसीब–** *वि.* अभागी; दुर्दैवी. **–नामोनिशान–** *वि.* बेपत्ता; ठावठिकाणा नसलेला. **–नियाज़–** *वि.* निरिच्छ; बेपर्वा. **–नूर–** *वि.* १. ज्योतिरहित; निःस्तेज. २. दृष्टिरहित (डोळा). **–पता चिट्‌ठी-घर–** *पु.* पा० 'लापता चिट्‌ठीघर'; 'डेड लेटर ऑफिस'. **–पनाह–** *वि.* निराधार; निराश्रित. **–परद; -पर्द–** *वि.* १ आवरण नसलेला; उघडा. २. नग्न. **–परदगी; –पर्दगी–** *स्त्री.* १. उघडें होणें. २. बुरखा न घेणें. ३. बेअब्रू. **–परदा; –पर्दा–** *वि.* १. आवरण, पडदा, बुरखा नसलेला (चेहरा). २. खुला; उघडा. **–परवा; -परवाह–** *वि.* निष्काळजी; बेपर्वा. **–परवाई; –परवाही–** *स्त्री.* निष्काळजीपणा; बेपर्वाई. **–पाइ*–** *वि.* भांबावलेला; घाबरलेला. **–पीर–** *वि.* निर्दय; निष्ठुर. २. गुरु नसलेला. **–पेंदी–** *वि.* बिनबुडाचा. (**मु०–०का लोटा–** हलक्या कानाचा; घटकेंत विचार बदलणारा) **–फ़ायदा–** *वि.* निरर्थक. **-फ़िक्र–क्रा–** *वि.* बेफिकीर; निष्काळजी. **–फ़िक्री–** *स्त्री* निश्चिंतता. **–बस –** *वि.* १ विवश; नाइलाज झालेला; लाचार. २ पराधीन. **–बसी–** *स्त्री.* विवशता; लाचारी; नाइलाज. **–बहरा–** *वि.* १. दुर्दैवी. २. ज्याला कांहीं येत नाहीं असा. **–बहा–** *वि.* अमूल्य; मौल्यवान्. **–बाक़–** *वि.* फेडलेलें (ऋण); चुकतें केलेलें; निःशेष. **–बाक–** *वि.* निर्भय; धीट. **–बाक़ी–** *स्त्री.* ऋण फेडलें जाणें; बाकी न राहाणें. **–बाकी–** *स्त्री.* निर्भयता; धीटपणा. **–बाल व पर–** *वि.* असहाय्य. **–बुनियाद–** *वि.* बिनबुडाचा काल्पनिक. **–भाव–** *वि.* अगणित; बेहिशेब. (**मु० –०की पड़ना**–खूप मार बसणें). **–मज़ा–** *वि.* बेचव. **–मतलब–** *अव्य.* निष्कारण; निरर्थक. **–मानी–** *वि.* निरर्थक; व्यर्थ. **–मालूम–** *वि.* अज्ञात. **–मुनासिब–** *वि.* अनुचित; अयोग्य. **–मुरौवत–** *वि.* असभ्य; अशिष्ट; निर्लज्ज. **–मेल–** *वि.* विजोड; असंबद्ध. **–मौक़ा–** *अव्य.* अयोग्य वेळी; भलत्या वेळीं. **–** *वि.* अवेळींचा; अनुचित; अयोग्य. **–मौक़े–** *अव्य.* अयोग्य वेळीं; भलत्या वेळीं. **–मौत–** *अव्य.* मरण न येतां. **–रंग–** *वि.* विरस झालेला; रसभंग झालेला. **–रहम–** *वि.* निष्ठुर; निर्दयी. **–रहमी–** *स्त्री.* निर्दयता; निष्ठुरता. **–रिया–** *वि.* निष्कपट; सरळ. **–रुख़–** १ बेमुर्वतखोर; प्रसंगीं उपयोगीं न पडणारा. २ नाखुष; रागावलेला. ३ प्रतिकूल. **–रुख़ी–** *स्त्री.* उपेक्षा; प्रतिकूलता. **–रोक–टोक–** *वि.* निर्विघ्न; अडथळा नसलेला. **–** *अव्य.* निर्विघ्नपणें; निर्धास्तपणें. **–रोज़गार–** *वि.* बेकार. **–रोज़गारी–** *स्त्री.* बेकारी. **–रौनक–** *वि.* निष्प्रभ; उदास. **–लगाम–** *वि.* स्वैर; अनिर्बंध; उद्धट. **–लाग–** *वि.* साफ; सडेतोड. **–** *अव्य.* बिलकुल; अगदीं. **–लुत्फ़–** *वि.* बेचव; नीरस. **–लौस–** *वि.* स्पष्टवक्ता; निष्पक्ष; सडेतोड. **–वक़अत; –वक़त–** *वि.* तुच्छ; नगण्य. **–वक़ूफ़–** *वि.* मूर्ख; नालायक. **–वक़ूफ़ी–** *स्त्री.* मूर्खता; नालायकी. **–वक़्त–** *अव्य.* अवेळीं. **–वफ़ा–** *वि.* १ कृतघ्न. २ बेमुर्वतखोर. **–वफ़ाई–** *स्त्री.* कृतघ्नता. **–शऊर–** *वि.* मूर्ख; असभ्य; अडाणी. **–शक–** *अव्य.* निःसंदेह निःसंशय; अर्थात्. **–शरम; –शर्म–** *वि.* निर्लज्ज; बेशरम. **–शर्मी–** *स्त्री.* निर्लज्जपणा. **–शुमार–** *वि.* बेसुमार; अमर्याद. **–सतर–** *वि.* नग्न; नंगा. **–सबब –** *अव्य.* निष्कारण; अकारण. **–सबरा; –सब्र–** *वि.* १ अधीर; उतावीळ. २. असंतुष्ट. **–सबरी; –सब्री–** *स्त्री.* अधीरता; उतावीळपणा. **–सबात–** *वि.* नश्वर; क्षणभंगुर. **–सबाती–** *स्त्री.* क्षणभंगुरता; नश्वरता. **–समझ–** *स्त्री.* निर्बुद्ध; मूर्ख; अडाणी. **–समझी–** *स्त्री.* मूर्खता; अडाणीपणा. **–सरा–** *वि.* निराश्रित. **–सरोसामान–** *वि.* निर्धन; ज्याच्याजवळ कांहीं सामग्री नाहीं असा. **–सलीक़ा–** *वि.* असभ्य; अशिष्ट. **–सहारा–** *वि.* निराधार; निराश्रित. **–साख़्ता–** *वि.* स्वाभाविक; अकृत्रिम; उत्स्फूर्त. **–सिल-सिले–** *अव्य.* अव्यवस्थितपणें; क्रमविरहित. **–सुध–** *वि.* बेशुद्ध; ताळ्यावर नसलेला. **–सुरा–** *वि.* बेसुर. **–सूद–** *वि.* व्यर्थ; निरर्थक. **–सोचे समझे–** *अव्य.* विचार न करितां; अचानक. **–हंगम–** *वि.* बेडौल. **–हंगाम–** *वि.* अवेळींचा. **–हक़ीक़त–** *वि.* तुच्छ; उपेक्षणीय. **–हद–** *वि.* बेसुमार; अपरिमित; बेहद्द. **–हया–** *वि.* निर्लज्ज; बेशरम. **–हयाई–** *स्त्री.* निर्लज्जता. **–हवास–** *वि.* १ बेशुद्ध. २ उद्विग्न. ३ वेडा. **–हाल–** *वि.* १ हलाखीच्या स्थितीस पोंचलेला. २ व्याकुळ; बेचैन. **–हिचक–** *अव्य.* निःसंकोचपणें; न डगमगतां. **–हिजाब–** *वि.* १. पडदा किंवा बुरखा नसलेला. २ निर्लज्ज. **–हिम्मत–** *वि.* भ्याड. **–हिस–** *वि.* गतिहीन; सुन्न. **–हिसाब–** *वि.* बेहद्द; अपरिमित. **–हुनरा–** *वि.* मूर्ख; अशिक्षित; अडाणी.

–हुरमती– स्त्री. बेइज्जती; बेअब्रू. –हूदगी–स्त्री. असभ्यता; अशिष्टता. –हूदा–वि. असभ्य; अशिष्ट. –०गो– वि. असभ्यपणें बोलणारा. –०पन–पु. अशिष्टता. –हैफ़*– वि. १ बेशुद्ध. २ बेफिकीर; निश्चिंत. –होश–वि. बेशुद्ध. –होशी– स्त्री. बेशुद्धि; मूर्च्छितावस्था. मु० – पर की उड़ाना–थापा मारणें.

बेख स्त्री. [फा.] १. मूळ. २. पाया. –**कुन**–वि. मूळ उपटणारा; नायनाट करणारा. [प्रवाह.

बेग*–पु. १. वेग; शीघ्रता. २.

बेग–पु. [तु] अमीर; सरदार.

बेग–पु. [इं] पेटी; 'बॅग'.

बेगम– स्त्री. [तु] १. राणी. २. उच्च कुळांतील स्त्री. ३. पत्न्यांतील राणी. [अनेक० **बेगमात**]

बेगर–वि. वेगळा; निराळा.

बेगार– स्त्री. [फा.] बिगार; वेठ. मु० –**टालना**–चालढकल करणें; कसेंतरी काम करणें.

बेगारी– स्त्री. पा० 'बेगार'.

बगि*–अव्य. लवकर; शीघ्र; झटपट.

बेचना–क्रि. स. विकणें. मु० **बेच खाना**–१. गमावणें; हरवणें. २. उधळणें. [विकविणें.

बेचवाना; बेचाना–क्रि. स.

बेची– स्त्री. विक्री.

बेचू–पु. विकणारा; विक्रेता.

बेजू–पु. मुंगसासारखा एक जंगली पशु. याच्या केसांचा ब्रश बनवितात.

बेझड़–पु. १. जव, हरभरा, वाटाणा इ० चें एकत्रित पीक. २. सातू.

बेझना*–क्रि. स. १. विंधणें; नेम मारणें. २. खिळा ठोंकणें.

बेझरा–पु. पा० 'बेझड़'.

बेझा*–पु. लक्ष्य, निशाण; वेव.

बेटकी–ली*– स्त्री. मुलगी; कन्या.

बेटला–वा*–पु. मुलगा; पुत्र.

बेटा–पु. मुलगा; पुत्र. –**बेटी**– स्त्री. मुलें-बाळें. मु० –**बनाना**–दत्तक घेणें.

बेटी– स्त्री. मुलगी; कन्या. –**वाला**–पु. वधूपिता. –**व्यवहार**–पु. विवाहसंबंध. मु० –**देना**–एखाद्याला मुलगी देणें (लग्न करून). –**लेना**–एखाद्याच्या मुलीशीं लग्न करणें.

बेठ– स्त्री. मूठ; दस्ता.

बेठन–पु. वेष्टनाचें वस्त्र; दप्तराचें कापड; आसन.

बेड़–पु. कुंपण.

बेड़ा–पु. १. तराफा; जहाजांचा किंवा नावांचा तांडा; आरमार. २. नाव. –वि. कठिण; मुश्किल. मु०–**डूबना**–नष्ट होणें. –**पार करना अथवा लगाना** –संकटांतून पार पाडणें. –**पार होना**– संकटांतून सुखरूप पार पडणें. [कोल्हाटीण.

बेड़िन–नी– स्त्री. कलावंतीण;

बेड़ी– स्त्री. १. बेडी; शृंखला. २. बंधन. –वि. स्त्री. कठिण.

बेढ़–पु. १. नाश. २. घेरण्याचें काम. ३. मोड; अंकुर.

बेढ़ई– स्त्री. कचोरी; साटोरी.

बेढ़ना–क्रि. स. १. कुंपण घालणें. २. गुरें वळणें [२. परसूं; आवार.

बेढ़ा–पु. १. हातांतील कडें.

बेतना*–क्रि. अ. माहीत होणें; कळणें. [नदी; वेत्रवती.

बेतवा– स्त्री. बुंदेलखंडांतील एक

बेताल–पु. १. भाट. २. वेताळ. ३. द्वारपाल; पहारेकरी.

बेद–पु. वेद.

बेद–पु. [फा.] वेताचें झाड; वेत. –**बाफ़**–पु. वेताच्या खुर्च्या इ० बनविणारा. –**मजनूँ**–पु. ज्याच्या फांद्या खालीं वांकलेल्या असतात अशा प्रकारचा एक वेत. –**मुश्क**–पु. वेताची एक जात. याच्या फुलांचा अर्क औषधांत वापरतात.

बेदमाल– स्त्री. अवजारांना धार लावण्याचा दगड. [जागा; जागरूक.

बेदार–वि. [फा.] जागृत;

बेदारी– स्त्री. [फा] जागृति; जागृकता. [पाडलेलें भोंक.

बेध–पु. छेद; मोती. इ० मध्यें

बेधक–वि. छेदणारा; भोंक पाडणारा; 'बोअरर'. [पाडणें.

बेधना–क्रि. स. टोंचणें; भोंक

बेधिया–पु. अंकुश.

बेन*– पु. १. वेणु. २. पुंगी.

बेनट–स्त्री. [इं.] संगीन; 'बायोनेट'.

बेना⁺–पु. १. बांबूच्या कामटयांचा, वाळयाचा पंखा. २. बांबू.

बेनी– स्त्री. १. वेणी. २. त्रिवेणी. ३. दाराची खिटी.

बेनु–पु. वेणु; बांसरी.

बेपार⁺–पु. व्यापार.

बेपारी⁺–पु. व्यापारी.

बेमारी⁺– स्त्री. आजार.

बेयरा–पु. [इं] १. बबरची; हॉटेलांतील नोकर; खानसामा. २. पट्टेवाला.

बेर–पु. १. बोर किंवा बोरीचें झाड. २. समय. ३. शरीर. – स्त्री.* १. वेळ; खेप. २. उशीर; विलंब. –**जरी** स्त्री. भुईबोर; जंगली बारीक बोर. –**बेर***–अव्य. वारंवार.

बेरा⁺– स्त्री. १. वेळ; समय. २. खेप. –पु. १. पा० 'बेड़ा'. २. पा० 'बेयरा'.

बेरिआ–याँ⁺– स्त्री. वेळ; समय.

बेरी– स्त्री. १. पा० 'बेड़ी'.

२.* नौका. ३. बोर. –*पु.* खत्री लोकांची एक पोट जात. [बेलफळ.

बेल–*पु.* १. बेलाचें झाड. २.

बेल– *स्त्री.* १. वेल; लता. २. संतान; वंश. ३. भिंतीवर अगर कपड्यावर काढलेलीं फुलें; वेल-बुट्टी. ४. वल्हें. –**बूटा**–*पु.* वेलबुट्टी. **मु० –बढ़ना–** वंशविस्तार होणें. **–मँढ़े चढ़ना**–काम तडीस जाणें.

बेल–*पु.* [*फा.*] १. फावडें; कुदळ; सडक मोजतांना चुन्याची ओढलेली रेघ. **–चा**–*पु.* १. लहान कुदळ. २. लांब, चपटें खुरपें, खोरें. **–दार**–*पु.* १. कुदळ व खोरें यांनीं काम करणारा मजूर. २. मजुरां-वरील मुकादम.

बेलड़ी–री*– *स्त्री.* वेल; लता.

बेलन–*पु.* १. सडक किंवा जागा सपाट करण्याचा दगडी किंवा लोखंडी रूळ; 'रोलर'. २. यंत्रां-तील रोलर. ३. पिंजाऱ्याचें लाटणें. ४. गुऱ्हाळाचा ओंडका. ५. लाटणें. ६. रूळ; 'सिलिंडर'.

बेलना–*पु.* लाटणें. –*क्रि.स.*– १. लाटणें (पोळी इ०). २. नष्ट करणें. **मु० पापड़ बेलना**– १.कार्य-नाश करणें. २.आपत्ति सहन करणें. ३. निरर्थक काम करणें.

बेलनाकार–*वि.* रुळाच्या आका-राचा; 'सिलिंड्रिकल'. [चैन करणें.

बेलसना*–*क्रि. अ.* विलास,

बेलहरा+–*पु.* पानें ठेवण्याचा बांबूच्या कामटयांचा डबा.

बेला–*पु.* १. मोगरा; मोतिया. २. वाडगा. ३. सारंगीसारखें एक वाद्य. *स्त्री.* – १. समय; वेळ. २. भरती. ३. वेळा; समुद्र व जमीन यांच्यामधील सीमा.

बेलि– *स्त्री.* वेली; वेल; लता.

बेली–*पु.* सहचर; साथीदार.

– *स्त्री.* वेल; लता.

बेवपार*–*पु.* व्यापार.

बेवपारी*–*पु.* व्यापारी.

बेवरा*–*पु.* विवरण; तपशील. –(**रे**)**वार**–*अव्य.* तपशीलवार; विस्तृत.

बेवहरना*–*क्रि. स.* १. व्यवहार करणें; वागणें. २. सावकारी करणें.

बेवहरिया*–*पु.* १. सावकार. २. सावकाराचा कारकून; मुनीम.

बेवहार*–*पु.* व्यवहार.

बेवा– *स्त्री.* [*फा.*] विधवा.

बेवान*–*पु.* १. विमान. २. तिरडी.

बेश–*वि.* [*फा.*] १. अधिक; ज्यादा. २. श्रेष्ठ; सुंदर. **–क़ीमत–ती**; **–बहा**–*वि.* मौल्यवान्; बहुमूल्य.

बेशी– *स्त्री.* [*फा.*] १. अधि-कता; वृद्धि. २. नफा.–*वि.* जास्त.

बेसंदर*–*पु.* अग्नि; वैश्वानर.

बेस–*पु.* वेश. –*वि.** पा०'बेश'.

बेसन–*पु.* १. हरभऱ्याच्या डाळीचें पीठ. २. झुणका; पिठलें.

बेसनी– *स्त्री.* डाळीच्या पिठाची रोटी किंवा पुरी.

बेसर–*पु.* १. खेचर. २. गाढव. ३. एक अंत्यज जाति. – *स्त्री.* नथ.

बेसवा+– *स्त्री.* वेश्या.

बेसहना*– *क्रि. स.* विकत घेणें; खरेदी करणें.

बेसा*–*स्त्री.* वेश्या.

बेसारा*–*वि.* १. बसविणारा. २. स्थापणारा; ठेवणारा; संभाळ-णारा.

बेसाहना*–*क्रि. अ.* १. विकत घेणें; खरेदी करणें. २. ओढवून घेणें (विरोध, संकट इ०).

बेसाहनी*– *स्त्री.* मालाची खरेदी; सौदा.

बेसाहा*–*पु.* विकत घेतलेली वस्तु; सौदा.

बेस्वा*– *स्त्री.* वेश्या.

बेह*–*पु.* छिद्र; भोंक.

बेह–*वि.* [*फा.*] उत्तम. **–तर**–*वि.* अधिक चांगलें. –*अव्य.* बेह-त्तर; ठीक आहे. **–तरी**– *स्त्री.* भलाई; कल्याण. **–तरीन**–*वि.* सर्वोत्कृष्ट. **–बूद–दी**– *स्त्री.* हित; कल्याण.

बेहड़+–*वि.* पा० 'बीहड़'.

बेहना+–*पु.* कोष्टी; विणकर.

बेहर–*वि.* १. अचल; स्थावर. २. अलग; पृथक्.

बेहर(रा)ना+–*क्रि.* *अ.* फाटणें; विदीर्ण होणें. ['बेयरा'.

बेहरा*–*वि.* पा० १. 'बेहर'. २.

बेहरी+– *स्त्री.* १. निधि; पोस्त; वर्गणी. २. जमीनदारीचा एक भाग.

बेहला–*पु.* [*इं.*] व्हायोलिन (एक वाद्य); बेला. [विना; शिवाय.

बेहून*–*वि.* विहीन. –*अव्य.*

बैंक–*पु.* [*इं.*] पेढी; 'बँक'.

बैंगन–*पु.* वांगें.

बैंग(ज)नी–*वि.* लाल निळ्या रंगाचा; बैंगणी. – *स्त्री.* डाळीचें पीठ लावून वांग्याची फोड तेलांत तळल्यानंतर बनणारा खाद्यपदार्थ.

बैंड़ा*–*पु.* आडें (घराचें).

बै*– *स्त्री.* हातमागाची फणी. –*पु. स्त्री.** वय.

बै– *स्त्री.* [*अ.*] शेत इ० ची विक्री.–**नामा**–*पु.* विक्रीखत. [ऋषि.

बैखा(षा)नस* –*पु.* तपस्वी;

बैगन–*पु.* वांगें.

बैजंती; बैजयंती– *स्त्री.* वैज-यंती; काळी तुळस. [अंडकोष.

बैज़ा–*पु.* [*अ.*] १. अंडें. २.

बैट–*पु.* [*इं.*] फळी; 'बॅट'.

बैटरी– *स्त्री.* [*इं.*] १. तोफ-

खाना. २. 'बॅटरी'.

बैठक– *स्त्री.* १. बैठक; उठाबशी. २. बसण्याची जागा. ३. आसन. ४. आधार. ५. अधिवेशन. **–बाज़्**–*वि.* १. धूर्त. २. खटचाळ.

बैठका–*पु.* बैठकीची जागा; दिवाणखाना.

बैठकी– *स्त्री.* १. बैठक (व्यायामाचा प्रकार). २. 'टेबल लॅंप'.

बैठन*– *स्त्री.* १. आसन; बसकर. २. बसण्याची तऱ्हा; बैठक.

बैठना–*क्रि. अ.* १. बसणें. २. जम बसणें. ३. पिचणें. ४. व्यवस्था बिघडणें. ५. खर्च होणें. ६. बेकार होणें; रिकामें राहाणें. ७. बरोबर नम लागणें; अचूक लागणें. **बैठा ठाला**–*वि.* रिकामटेकडा; बेकार. **बैठा भात**–*पु.* पाणी व तांदूळ एकदम चुलीवर ठेवून बनविलेला भात. **मु० बैठी रोटी**–विनश्रमाची मिळकत (पेन्शन इ०). **बैठे बिठाए**– १. अकारण; निरर्थक. २. अचानक. **बैठे बैठे**–१. निष्प्रयोजन. २. अचानक. ३. अकारण.

बैठनी– *स्त्री.* मागामध्यें विणकऱ्याला बसण्यासाठीं केलेली जागा.

बैठवाना–*क्रि. स.* बसविण्याचें, लावण्याचें इ० काम दुसऱ्याकडून करविणें.

बैठाना–*क्रि. स.* १. बसविणें; बसावयास सांगणें. २. संवय लावणें. ३. जम बसविणें. ४. पुरणें; रोप लावणें. ५. बेकार बनविणें.

बैठार(ल)ना*–*क्रि. स.* पा० 'बैठाना'.

बैत– *स्त्री.* [*अ.*] १. कविता. २. छंद; श्लोक. –*पु.* घर; आलय; स्थान.

बैताल–*पु.* १. वेताळ. २. भाट.

बैतुलउलूम–*पु.* [*अ.*] विश्वविद्यालय; विद्यापीठ.

बैतुलखला–*पु.* [*अ.*] शौचकूप; संडास.

बैतुलमाल–*पु.* [*अ.*] १. सार्वजनिक खजिना; राजकोश. २. जप्त केलेला बेवारशी माल.

बैतुलमुकद्दस–*पु.* [*अ.*] जेरूशलेम.

बैतुलहराम; बैतुल्लाह–*पु.* [*अ.*] अल्लाचें घर; मक्केंतील काबा हें मुसलमानांचें पवित्र स्थान.

बैद*–*पु.* वैद्य.

बैदई– *स्त्री.* वैद्यकी. [चिकित्सा.

बैदाई*– *स्त्री.* उपचार;

बैदेही– *स्त्री.* सीता.

बैन*–*पु.* वचन; वाणी.

बैना⁺–*पु.* १. उत्सव किंवा मंगलकार्यानिमित्त इष्टमित्रांना वांटली जाणारी मिठाई; अहेर. २. वाण. –*क्रि. स.** पेरणें.

बैनामा–*पु.* [*अ.*] १. विक्रीपत्र; साठेखत. २. विक्री.

बैपार⁺–*पु.* व्यापार; व्यवसाय.

बैपारी⁺–*पु.* व्यापारी; धंदेवाईक.

बैयर*– *स्त्री.* स्त्री; बाई.

बैयाँ*–*अव्य.* गुडघे टेकून.

बैया*– *स्त्री.* १. मागाची फणी. २⁺. लहान नणंद.

बैरंग–*वि.* [*इं.* 'बेयरिंग'] ज्याचें टपालहंशील दिलेलें नाहीं असें (पत्र, पार्सल इ०); 'नॉट-पेड'. **मु०–लौटना**–काम न होतां, हात हलवीत परत येणें.

बैर–*पु.* १. वैर; शत्रुत्व. २. बोर. ३. पाभर. **मु०–काढ़ना, निकालना या भँजाना**–सूड उगविणें. **–ठानना**–शत्रुत्व करणें. **–बिसाहना अथवा मोल लेना**–निष्कारण वैर पत्करणें. **–लेना**–सूड घेणें.

बैरक्–*पु.* [*तु.*] फौजेचा झेंडा; ध्वज; निशाण.

बैरक– *स्त्री.* [*इं.*] बराक.

बैरख*–*पु.* पा० 'बैरक्'.

बैरन– *स्त्री.* वैरीण; सवत.

बैरा–*पु.* पा० 'बेयरा'.

बैराखी– *स्त्री.* दंडांतील एक दागिना.

बैराग*–*पु.* वैराग्य.

बैरागी–*पु.* वैरागी; वैष्णव साधूंचा एक भेद; गोसावी.

बैराना*–*क्रि. अ.* १. वातानें प्रकृति बिघडणें. २. पा० 'बौराना'.

बैरिस्टर–*पु.* [*इं.*] वकील; 'बॅरिस्टर'. [वैरी.

बैरी–*वि. पु.* शत्रु; दुश्मन;

बैरूनी–*वि.* [*फा.*] १. बाहेरील. २. परकीय.

बैल–*पु.* १. बैल. २. मूर्ख; निर्बुद्ध. **–गाड़ी**– *स्त्री.* बैलांची गाडी.

बैसंत(द)र*– *पु.* अग्नि.

बैस– *स्त्री.* १. वय; आयुष्य. २. तारुण्य. –*पु.* १. वैश्य. २. क्षत्रियांची एक जात. **मु०–चढ़ना**– तारुण्य येणें.

बैसना*–*क्रि. अ.* बसणें.

बैसर– *स्त्री.* मागाची फणी.

बैसवाड़ा–रा–*पु.* अवध (उ. प्र.) चा पश्चिमी भाग.

बैसवाड़ी– *स्त्री.* बैसवाड्यांत बोलली जाणारी भाषा; अवधीचा एक पोटभेद. [गाढव.

बैसाख–*पु.* वैशाख. **–नंदन**–*पु.*

बैसाखी– *स्त्री.* १. कुबडी. २. वैशाखी पौर्णिमा.

बैसिक–*पु.* १. वेश्येवर प्रेम करणारा नायक. २. विषयी.

बैहर*–*वि.* भयंकर. –*स्त्री.* वायु; वारा.

बोंड़ा*–*पु.* स्फोटाच्या दारूला

आग लावण्याची वात, पलिता.

बोआई– *स्त्री.* १. पेरणी. २. पेरण्याची मजुरी.

बोआना–*क्रि. स.* पेरविणें.

बोग़दान–*पु.* [*फा.*] गारुड्याची पिशवी. [लेली दारू.

बोजा– *स्त्री.* तांदुळापासून काढ-

बोझ–*पु.* १. ओझें; भार. २. कामाचा बोजा; जबाबदारी. ३. गाठोडें. **मु०–उठाना**–जबाबदारी घेणें. **–उतरना**–ओझें उतरणें; फुरसत मिळणें. [लादणें.

बोझना–*क्रि. स.* भार टाकणें;

बोझ(झि)ल–*वि.* वजनदार; जड.

बोझा–*पु.* पा० ' बोझ '.

बोझाई– *स्त्री.* ओझें लादण्याची, चढविण्याची क्रिया अथवा मजुरी.

बोटी–*स्त्री.* मांसाचा लहान तुकडा. **मु०–बोटी काटना**–शरीराचे तुकडे तुकडे करणें. **–बोटी फड़कना**–अंग शिवशिवणें; खूप चळवळेपणा असणें.

बोड़ा–*पु.* १. अजगर. २. चवळीची शेंग. [२. अल्प धन.

बोड़ी– *स्त्री.* १. दमडी; कवडी.

बोतल–*पु.* [*इं.*] बाटली.

बोदा–*वि.* १. आळशी; सुस्त. २. मूर्ख; मंद बुद्धीचा. ३. फोफसा; भुसभुशीत.

बोध–*पु.* १. ज्ञान; माहिती. २. सांत्वन. **–गम्य**–*वि.* लक्षांत येण्यासारखें; कळण्यासारखें.

बोना–*क्रि. स.* पेरणें.

बोनी– *स्त्री.* १. पेरणी. २. परणीचा हंगाम.

बोबा*–*पु.* १. स्तन. २. गाठोडें. ३. घरांतील सटरफटर वस्तू.

बोर+– *स्त्री.* बुडविण्याची क्रिया. –पु. एक दागिना.

बोरना–*क्रि. स.* १. बुडविणें; बुचकळणें. २. बदनामी करणें. ३ रंगविणें.

बोरसी+– *स्त्री.* शेगडी.

बोरा–*पु.* पोतें.

बोरिया–*पु.* [*फा.*] १. खजुरीच्या पानाची चटई. २. अंथरूण. **–** *स्त्री.* लहान पोतें. **मु०–बंधना उठाना या समेटना**–गाशा गुंडाळणें; चालू लागणें.**–सम्हालना**–जाण्याची तयारी करणें.

बोरी– *स्त्री.* लहान पोतें.

बोल–*पु.* शब्द; बोलणें.**–चाल**– *स्त्री.* १. संभाषण. २. व्यवहाराची भाषा. ३. कुरापतः**–पट**–*पु.* बोलका चित्रपट; 'टॉकी'. **–बाला**– *पु.* नांव; प्रसिद्धि; गाजावाजा.

बोलता–*वि.* बोलत असलेला; सजीव. –*पु.* प्राण; आत्मा.

बोलती– *स्त्री.* बोलण्याची शक्ति; वाचा. –*वि. स्त्री.* बोलणारी. **मु०–बंद होना**–तोंड बंद होणें; दांतखिळी बसणें.

बोलना–*क्रि. स.* १. सांगणें. कथन करणें. २. निश्चय करणें; ठरविणें. ३. अडविणें; रोखणें; प्रतिरोध करणें. –*क्रि. अ.* १. बोलणें; म्हणणें; भाषण करणें. २. आवाज होणें. **मु० बोल जाना**– राम म्हणणें; मरणें (अशिष्ट).

बोली– *स्त्री.* १. भाषा; बोली. २. टोमणा; छद्मी भाषण. ३. लिलांव बोलणें. **–ठोली**– *स्त्री.* टोमणा.**–दार**–*पु.* लेखी करार न करितां ज्याला शेत कसण्यास दिलें आहे असें कूळ. **मु०–कसना या मारना**–टोमणा मारणें. **–बोलना**– १. टोमणा मारणें. २. लिलांवांत बोलणें.

बोवना–*क्रि. स.* पा० 'बोना'.

बोवाई– *स्त्री.* पेरणी. [करविणें.

बोवाना– *क्रि. स.* पेरणी

बोश–*पु.* [*अ.*] १. वजन; रुबाब; दबदबा. २. हलकट माणूस.

बोसा–*पु.* [*फा.*] चुंबन; मुका.

बोसीदा–*वि.* [*फा.*] जुना; खराब.

बोस्ताँ–*पु.* [*फा.*] बाग.

बोह– *स्त्री.* बुडी.

बोहना+–*क्रि. अ.* पेरणें.

बोहनी+– *स्त्री.* पेरणी.

बोहतान–*पु.* [*अ.*] आळ; मिथ्या आरोप; दूषण. **मु०– जोड़ना**– १. कलंक लावणें. २ आळ घेणें. [जहाज.

बोहित*–**थ**–*पु.* मोठी नाव;

बौंड़*– *स्त्री.* लांब डहाळी; फांदी.

बौंड़ना*–*क्रि. अ.* वेलीप्रमाणें सरसरणें; सरसावणें; पसरणें.

बौंडर*–*पु.* वावटळ.

बौंड़ी– *स्त्री.* १. लहान, कच्चें फळ. २. दमडी.

बौआना+–*क्रि. अ.* १. झोपेंत बरळणें. २. वेड्यासारखें वडबडणें.

बौखल–*वि.* १. रागीट. २. विक्षिप्त; वेडा. ३. चिडखोर.

बौखलाना–*क्रि. अ.* १.रागावून बोलणें; कातावणें; चिडणें. २. रागानें वेडें, बेभान होणें. [फळाट.

बौखलाहट– *स्त्री.* चीड; जळ-

बौछाड़– *स्त्री.* १. वाऱ्याच्या झोतामुळें तिरपे पडणारे थेंब; तुषार; बुरबुर. २. वर्षाव; झोड.

बौड़म–**हा**–*वि.* विक्षिप्त; वेडा.

बौना–*वि.* बुटका; गिड्डा.–*पु.* खुजा, बुटका माणूस; वामनमूर्ति.

बौर–*पु.* मोहोर (आंब्याचा).

बौरई+– *स्त्री.* वेडेपणा.

बौरना– *क्रि. अ.* आंब्याला मोहोर येणें.

बौरहा*; बौरा–*वि.* १. विक्षिप्त; वेडा. २. वावळट; भोळा; अजागळ. [विक्षिप्तपणा.

बौराई– *स्त्री.* वेड; वेडेपणा;

बौराना*–*क्रि. अ.* १. वेड लागणें; विक्षिप्त होणें. २. मनावरचा ताबा जाणें; विवेक सुटणें. –*क्रि. स.* १. एखाद्याला बनविणें; फजीती करणें. २. वेड लावणें.

बौरी*–*वि. स्त्री.* वेडी; खुळी.

बौहर*– *स्त्री.* वधू; सून; नवरी.

ब्यजन–ना–पु. पंखा.

ब्याज–पु. व्याज. –**बट्टा–पु.** नफा-नुकसान. [(पशूचें.)

ब्याना–*क्रि. अ. स.* विणें

ब्यालू*–*पु.* रात्रीचें जेवण.

ब्याह–पु. लग्न; विवाह.

ब्याहता–*वि.* विवाहित; लग्न झालेला. –*पु.* पति.– *स्त्री.* लग्नाची बायको.

ब्याहना–*क्रि. स.* १. लग्न करणें. २. लग्न करून देणें.

ब्योंचना–*क्रि. अ.* मुरगळणें.

ब्योंत– *स्त्री.* १. सोय; व्यवस्था. २. युक्ति; उपाय. ३. कार्यपद्धति. ४. कपडे बेतण्यासाठीं कापड फाडणें; बेतणें.

ब्योंतना–*क्रि. स.* शिवण्यासाठीं कापड बेतणें, कापणें. [धंदा.

ब्योपार–पु. व्यापार; उद्योग-

ब्योपारी–पु. व्यापारी.

ब्योरन*– *स्त्री.* केंस विंचरणें.

ब्योरना*–*क्रि. स.* विंचरणें; गुंता झालेले केंस, दोरे इ० सोडविणें.

ब्योरा–पु. १. तपशील; विवरण. २. वृत्तान्त; खबर.–**(रे) वार**–*अव्य.* तपशीलवार; सविस्तर.

ब्योहर–पु. पैशांची देवाणघेवाण; सावकारी व्यवहार. **मु०– चलना**–सावकारी चालणें, असणें.

ब्योहरा; ब्योहरिया–पु. सावकार; देण्याघेण्याचा व्यवहार करणारा.

ब्यो(ब्यौ)हार–पु. व्यवहार.

ब्रंद*–*पु.* वृंद; समूह.

ब्रज–पु. व्रज; गोकुळ. [करणें.

ब्रजना*–*क्रि. अ.* जाणें; गमन

ब्रह्म–पु. १. ब्रह्मदेव. २. ब्राह्मण.

ब्राह्म–*वि.* १. ब्रह्म किंवा ब्रह्मा अथवा ब्राह्मण यांसंबंधींचा. २. वैदिक. –**मुहूर्त**–चार घटका रात्रीपासून सूर्योदयापूर्वींच्या दोन घटकांपर्यंतचा काळ; पहांट.–**समाज–पु.** केवळ ब्रह्म मानणाऱ्या लोकांचा संप्रदाय; प्रार्थनासमाज.

ब्राह्मणी– *स्त्री.* ब्राह्मणाची पत्नी; ब्राह्मण स्त्री.

ब्राह्मी– *स्त्री.* १. वाणी; सरस्वती; दुर्गा. २. भारताची प्राचीन लिपि.

ब्रिटेन–पु. [इं.] इंग्लंड, वेल्स व स्कॉटलंड यांचें राज्य; 'ब्रिटन'.

ब्रीड–पु.; ब्रीडा– *स्त्री.* लज्जा; लाज.

भ

भ–देवनागरी वर्णमालेच्या **प**-वर्गांतील चौथा वर्ण.

भंकार*–*पु.* १. विकट हास्य. २. घोर, भीषण शब्द. ३. एक राग (संगीत.) ४. भुणभुण; गुणगुण.

भंकारी– *स्त्री.* डांस.

भंग–पु. १. भग्न होणें; तुकडा; खंड. २. कुटिलता; तिरकसपणा. ३. लाट. ४. पराजय. ५. भय. ६. अडचण; बाधा.

भंग– *स्त्री.* भांग. –**घुटना–पु.** भांग घोटण्याचा सोटा.

भंगड़–*वि.* भांगेचें व्यसन असलेला; भंगिष्ट; भंगड.

भंगना*–*क्रि. अ.* १. भंग होणें; तुटणें. २. दबलें जाणें; पराजित होणें.–*क्रि. स.* १ तोडणें. २. दाबणें.

भँगरा–पु.; भँगरैया– *स्त्री.* भृंगराज; माका. [कचरा; केर.

भँगार–पु. भगदाड; खड्डा.–*स्त्री.*

भंगि–गी; भंगिमा– *स्त्री.* १. वक्रता; कुटिलता. २. ढंग; हावभाव; पद्धत. ३. बहाणा. ४. कटाक्ष.

भंगी–*वि.* १. नाश पावणारें. २. भांग बनविणारा, पिणारा; भंगड.–*पु.* भंगी.

भंगुर–*वि.* १. ठिसूळ. २. जास्त दिवस न टिकणारें. ३. कपटी. –*पु.* नदीचें वांकण. [पिणारा.

भँगेड़ी–*वि.* भंगड; भांग

भंजन–पु. भंग करणें; तोडणें; फोडणें; नाश करणें; मोडतोड. –*वि.* १. तोडणारा; फोडणारा. २. त्रास देणारा. –**शील**–*वि.* ठिसूळ; 'ब्रिटल'.–**शीलता**– *स्त्री.* ठिसूळपणा.

भँजना–*क्रि. अ.* १. तुकडे तुकडे होणें; तुटणें. २. मोडणें; खुर्दा होणें (नाण्याचा). ३. वळलें जाणें; पीळ पडणें (दोरी).

भँजाई– *स्त्री.* मोडणावळ; वटाव.

भँजाना+–*क्रि. स.* १ वटविणें; मोड करणें (रुपयाची). २. वळणें (दोरी).

भंटा+–*पु.* वांगें.

भंड–*पु.* मांडें; पात्र. **–फोड**–*पु.* १. मातीचीं भांडीं फोडणें किंवा फुटणें. २. बेंड फुटणें.

भंड–*पु.* १. वावदूक; अश्लील गोष्टी बोलणारा. २. बहुरूपी; नकल्या. *–वि.* १. धूर्त; पाखंडी. २. अश्लील शब्द बोलणारा.

भंडताल–*पु.* नाच-गाण्याचा एक प्रकार. यांत टाळचा वाजवितात.

भंडना–*क्रि. स.* १. हानि पोहोंचविणें; गोत्यांत आणणें; बिघडविणें. २. नष्ट–भ्रष्ट करणें. ३. तोडणे. ४. बदनाम करणें.

भँडरिया–*वि.* लुच्चा; ढोंगी; पाखंडी. *–पु.* पा० ' भड्डर '.

भँड़सार–ल–*स्त्री.* धान्याचें कोठार; गोदाम.

भंडा–*पु.* १. मांडें. २. रहस्य. **–फोड़**–*पु.* गौप्यस्फोट; बेंड फुटणें; नाचक्की. **मु०–फूटना**– गौप्यस्फोट होणें.

भँड़ाना*–*क्रि. स.* १. वस्तूंची मोडतोड करणें. २. धुमाकूळ घालणें. ३. शोधणें.

भंडार–*पु.* भांडार; कोठार.

भंडारा–*पु.* १. स्वयंपाक-घर. २. रमणा. ३. साधूंचें भोजन. ४. पोट.

भंडारी–*पु.* १. भांडारावरील अधिकारी; कोठावळा. २. खजिनदार. ३. स्वयंपाकी. *–स्त्री.* १. लहान खोली. २. खजिना. ३. भिंतींतील लहान कपाट.

भंडैती–*स्त्री.* विदूषकाचें काम; भाटाचें काम.

भंडौआ–*पु.* भाटाचें गीत; तमाशांतील गाणें; चावट विनोदी कविता.

भँभाना–*क्रि. अ.* हंबरणें.

भँभीरी–*स्त्री.* १. लाल रंगाचा पावसाळी किडा. २. भिंगरी; चकती; भिरभिरें.

भंभेरि*–*स्त्री.* भय; भीति.

भँमर–रा–*पु.*+ १. गांधिलमाशी. २. मोठी मधमाशी.

भँवना+–*क्रि. अ.* फिरणें; भटकणें.

भँवर–*पु.* १. भुंगा. २. पाण्यांतील भोवरा. ३. खळगा. **–कली**–*स्त्री.* फिरती कडी; (गुरांच्या गळ्यांतील सांखळीला असलेली;) कळसूत्र. **–जाल**–*पु.* संसारपाश; संसारांतील कटकटी. **–भीख**–*स्त्री.* जोगवा; मधुकरी. [भोंवरा.

भँवरा–*पु.* १. भ्रमर; भुंगा. २.

भँवरी–*स्त्री.* १. पाण्याचा भोंवरा. २. केसांतील भोंवरा. ३. फेरी; खेप (फेरीवाल्याची).

भँवाना–*क्रि. स.* १. फिरविणें; चकरा देणें. २. बुचकळ्यांत पाडणें. [फेंकलें जाणें.

भँसना*–*क्रि. अ.* पाण्यांत

भइया–*पु.* १. भाऊ. २. दादा (संबोधन).

भई+–*क्रि. अ.* झाली. ***–अव्य.*** माई; अरे; अहो; बाबारे.

भउजाई+–*स्त्री.* भावजय.

भकभूर*–*वि.* मूर्ख; अडाणी.

भकस(सा)ना+–*क्रि. अ.* आंबणें; विटणें. (खाद्य पदार्थ).

भकाऊँ–*पु.* बागुलबोवा; बुवा.

भकुआ–वा–*वि.* मूर्ख; मूढ; हतबुद्ध.

भकुआ(वा)ना–*क्रि. अ.* १. घाबरें होणें. २. हतबुद्ध होणें. *–क्रि. स.* १. घाबरविणें. २. बनविणें, थट्टा करणें. [वणें. २. रुसणें.

भकुरना+–*क्रि. अ.* १. रागा-

भकोसना–*क्रि. स.* बकाबक खाणें; बोकणा भरणें; खादाडणें.

भक्ष(ख)ना*–*क्रि. स.* खाणें; भक्षण करणें. [भोजन.

भख*–*पु.* भक्ष्य; आहार;

भगंदर–*पु.* गुदद्वाराजवळील फोड; भगंदर (रोग).

भग–*पु.* १. सूर्य. २. शिव. ३. योनि; गुदा व अंडकोष यांच्या मधील स्थान. **–नासा**–भगोष्ठांवरील संधिस्थानाजवळील एक भाग.

भगत–*वि.* १. भक्त; उपासक. २. शाकाहारी. ३. साधु. ४. पंचाक्षरी; देवऋषी; भूतबाधा उतरविणारा मांत्रिक. **–बछल***–*वि.* भक्तवत्सल.

भगति–ती*–*स्त्री.* भक्ति.

भगतिया–*पु.* गाणें–बजावणें करून पोट भरणारी राजपुतान्यांतील एक जात. *–स्त्री.* १. कोल्हाटीण. २. कलावंतीण.

भगदड़–र–*स्त्री.* पळापळ; घाबरून पळत सुटणें (पड़ना; मचना). [*–पु.* भाचा.

भगना–*क्रि. अ.* पळून जाणें.

भगर–ल–*पु.* १. ढोंग; कपट. २. जादू. [गार.

भगली–*पु.* १. ढोंगी. २. जादू-

भगवाँ–वा–*पु.* १. भगवें वस्त्र. २. भगवा रंग.

भगाड़–*पु.* पावसामुळें जमीन खचून बनणारा खड्डा.

भगाना–*क्रि. स.* १. पळविणें; पळवून नेणें. २. दूर करणें; हिडिसफिडिस करणें.

भगोड़ा–*वि.* १. पळालेला. २. पळपुटचा; भित्रा. [भागाची कड.

भगोष्ठ–*पु.* भगाच्या बाहेरील

भगौहाँ–*वि.* १. पळपुटचा. २. भगवा. [भ्याड.

भग्गुल; भग्गू–*वि.* पळपुटा;

भचक– *स्त्री.* फेंगडेपणा; लंगडेपणा.

भचकना– *क्रि. अ.* १. फेंगडें चालणें; लंगडत चालणें. २. स्तंभित होणें; आश्चर्यचकित होणें.

भच्छ*–*पु.* भक्ष; खाद्य.

भच्छना*– *क्रि. स.* भक्षण करणें; खाणें.

भजना–*क्रि. स.* १. भजणें; भक्ति करणें. २. आश्रय घेणें. ३. ईश्वरनामाचा जप करणें.–*क्रि. अ.** १. पोहोंचणें. २. पळून जाणें.

भजनानंदी ; भजनी–*वि.* भजनें गाणारा.

भट–*पु.* योद्धा; सैनिक; वीर.

भटई–*स्त्री.* भाटगिरी; खुशामत.

भटकटाई; भटकटैया– *स्त्री.* रिंगणी (वनस्पति विशेष); कंटकारी; सांवरी.

भटकना–*क्रि. अ.* १. रस्ता चुकल्यामुळें इकडे तिकडे भटकणें; मार्गच्युत होणें. २. भटकणें; हिंडणें. ३. बुचकळ्यांत पडणें.

भटकाना–*क्रि. स.* १. चुकीचा मार्ग दाखविणें; बहकावणें. २. बुचकळ्यांत पाडणें.

भटकैया*–*पु.* भटक्या.

भटकौहाँ*–*वि. पु.* भटकविणारा; रस्ता चुकविणारा.

भटभटी*– *स्त्री.* पाहात असतांहि न दिसणें.

भटभेड़ा–रा*–*पु.* द्वंद्व; सामना. २. धक्का; ठोकर. ३. टक्कर. ४. अनपेक्षित भेट.

भटा+–*पु.* वांगें.

भटियारा–*पु.* १. धर्मशाळेचा व्यवस्थापक. २. खानावळवाला. [–*स्त्री.* **भटिया(हा)रिन**]. पा० ‘ भठियारा ’.

भटू*– *स्त्री.* १. सखी; मैत्रीण. २. स्त्रियांकरितां संबोधन; गडे.

भट्ठा–*पु.* १. मोठी भट्टी. चुलाण. २. विटांची किंवा कौलांची भट्टी; आवा.

भट्ठी– *स्त्री.* १. मोठी चूल; भट्टी. २. दारू तयार करण्याची जागा.

भठ*–*वि.* भ्रष्ट.

भठा–*पु.* भट्टी; आवा.

भठियारखाना–*पु.* १. गांवठी खाणावळ. २. जेथें खूप गोंधळ चालू आहे अशी जागा; मासळीबाजार. ३. असभ्य लोकांचा अड्डा.

भठियार(रि)न; भठियारी– *स्त्री.* १. खाणावळवाल्याची बायको; खाणावळ चालविणारी बाई. २. भांडकुदळ, जहांबाज बाई.

भठियारपन–*पु.* १. धर्मशाळेच्या व्यवस्थेचें काम. २. खाणावळीचा धंदा. ३. शिवराळपणा; असभ्यपणा.

भठियारा–*पु.* धर्मशाळेंत प्रवाशांच्या राहाण्या-जेवण्याची व्यवस्था करणारा.

भठिहारिन– *स्त्री.* पा० ‘ भठियारिन ’.

भडंबा+–*पु.* अवडंबर; ढोंग.

भड़क–*स्त्री.* १. दिखाऊपणा. २. भडकदारपणा. ३. वहकणें; ताबा सुटणें. **–दार**–*वि.* १. भडकदार. २. रुबाबदार; चमकदार.

भड़कना–*क्रि. अ.* १. पेटणें; भडकणें. २. बुजणें (पशु). ३. रागावणें.

भड़काना–*क्रि. स.* १. प्रज्वलित करणें; पेटविणें. २. फूस देणें; भडकविणें. ३. बुजविणें; भयभीत करणें (जनावरांना). [कदार.

भड़कीला–*वि.* भडकदार; चम-

भड़कैल–*वि.* १. भडकणारा; तापट. २. बुजरा.

भड़भड़– *स्त्री.* १. ढोल इ० चा जोराचा आवाज. २. फाजील बडबड.

भड़भड़ाना–*क्रि. अ.* १. भडभड असा शब्द करणें. २. भडभडून येणें.

भड़भड़िया–*वि.* बडबड्या; फुशारकी मारणारा.

भड़भाँड़–*पु.* १. करडई. २. कांटेधोत्रा.– *वि.* सत्यानाश करणारा.

भड़भूँजा– *पु.* भडभुंजा; भुजारी; चुरमुरे इ० भाजणारा.

भड़वा–*पु.* पा० ‘ भडुआ ’.

भड़हर–*पु.* भांडें.

भड़ास– *स्त्री.* १. मनांतील मळमळ. २. द्वेष; तिरस्कार; राग. (निकालना).

भड़िहा–*पु.* चोर.

भड़िहाई–*अव्य.* १. लपून छपून. २. चोरटेपणानें.– *स्त्री.* चोरी.

भड़ुआ–*पु.* वेश्येचा दलाल; भडवा.

भड्डा; भड्डुर–*पु.* १. ज्योतिष सांगणारा भटजी. २. भटुरगा; भट; यात्रेकरूंना देवदर्शन करविणाऱ्या ब्राह्मणांची एक (हलकी) जात. [सांगणें; म्हणणें.

भणना*–*क्रि. अ.* बोलणें;

भणित–*वि.* सांगितलेलें; म्हटलेलें. –*पु.* कथन; वर्णन.

भतवान–*पु.* लग्नांतील एक जेवणावळ.

भतीजा–*पु.* पुतण्या; भावाचा मुलगा. [–*स्त्री.* **भतीजी**].

भत्ता–*पु.* भत्ता; प्रवासखर्च, भोजनखर्च इ० साठीं नोकराला दिली जाणारी रक्कम.

भथु(थो)रना; भथेलना+– *क्रि. स.* चिरडणें.

भदंत–*वि.* पूज्य; सन्मानित; संन्यस्त.–*पु.* बौद्ध भिक्षु.

भदईं–ई–*स्त्री.* भाद्रपद महिन्यांत होणारें पीक. –*वि.* भाद्रपदांतील.

भदाक–*पु.* १. भाग्य; अभ्युदय. २. धपकन् पडण्याचा आवाज.

भदेस; भदेस(सि)ल*–*वि.* भोंगळ; कुरूप; ओंगळ.

भदौरिया–*पु.*१. ग्वाल्हेर राज्यांतील भदावर भागांत राहाणारा. २. क्षत्रियांची एक पोटजात.

भदौंह–हा+–*वि.* भाद्रपदांत येणारा, होणारा (आंबा, पेरू इ०).

भद्दा–*वि.,पु.* १. कुरूप; मद्दड. २. अशिष्ट; अश्लील; असभ्य. **–पन**–*पु.* कुरूपता; असभ्यपणा; अश्लीलता.

भद्र–*वि.* १. सभ्य; सज्जन. २. मंगलकारक. ३.* मुंडन केलेला. –*पु.* मंगल; कल्याण. [माणुसकी.

भद्रता–*स्त्री.* शिष्टता; सभ्यता;

भद्री*–*वि.* भाग्यवान्.

भनक–*स्त्री.* १. अस्पष्ट आवाज; कुणकुण. २. अफवा.

भनकना; भनना– *क्रि. स.* सांगणें; बोलणें.

भनभनाना–*क्रि.अ.* १. भणभण करणें. २. गुणगुणणें.

भनभनाहट– *स्त्री.* भणभण; गुंजारव.

भनित*–*वि. पु.* पा० 'भणित'.

भन्नाना*–*क्रि.अ.* १. फणा काढून अंगावर येणें. २. रागावणें; वसकन अंगावर येणें. ३. डोकें गरगरणें.

भब(भ)का–*पु.* १. अर्क काढतांना उपयोगांत आणलें जाणारें मडकें. २. आसवनयंत्र; अर्क काढण्याचें यंत्र; 'स्टिल'.

भबकी–*स्त्री.* पा० 'भभकी'.

भब्भ(म्भ)ड़– *स्त्री.* दाटी; गर्दी. २. वक्काबुक्की. [उग्र दुर्गंध.

भभक– *स्त्री.* १. भडका २.

भभकना–*क्रि.अ.* १. भडकणें; पेटणें. २. उष्णतेमुळें तडकणें; फुटणें. ३. उकळी फुटणें.

भभकी– *स्त्री.* १. पोकळ दम; दटावणी. २. आव; खोटी दमदाटी.

भभरना*– *क्रि. अ.* १. भयभीत होणें; घाबरणें. २. बुचकळ्यांत पडणें. [भडका.

भभूका–खा*– *पु.* ज्वाला;

भभूत– *स्त्री.* भस्म; अंगारा; राख. **मु०–रमाना**–वैराग्य धारण करणें; साधु होणें. [खाणें.

भभोरना+– *क्रि. स.* फाडून

भया*–*क्रि. अ.* झाला.–*पु.* भाऊ.

भयाना*– *क्रि. अ.* भिणें; घाबरणें. – *क्रि. स.* भिवविणें.

भयावना–*वि.* भयानक; भीतिप्रद; भयंकर.

भयाहू+– *स्त्री.* धाकटी भावजय; धाकट्या भावाची पत्नी.

भय्या– *पु.* भाऊ.

भरंत*–*स्त्री.* १. भ्रांति; भ्रम; संदेह; संशय. २. भरण्याची क्रिया; भराव.

भर– *पु.* १. भार; बोजा; वजन. २. एक अस्पृश्य हिंदू जात. –*वि.* १. एकंदर; संपूर्ण. २. भरण, वहन करणारा.–*अव्य.** कडून; द्वारा; योगानें.–**पाई**– *स्त्री.* १. भरपाई. २. मिळाल्याची, पोंचल्याची पावती. **–पूर–रा**– *वि.* भरपूर; परिपूर्ण; भरलेला.–*अव्य.* पूर्णपणें; उत्तम.**–पेट**–*अव्य.* पोटभर; यथेच्छ. **–सक**–*अव्य.* यथाशक्ति; ऐपतीप्रमाणें; खूप. **मु०–पाना**– १. संपूर्ण येणें वसूल होणें. २. केलेल्या कर्माचें फळ मिळणें. ['भड़कना'; भड़काना'.

भरकना; भरकाना*– पा०

भरत– *पु.* १. कांसें. २. भरताड; भराव. ३. भारद्वाज पक्षी. ४. भरत. [२.* पति.

भरता– *पु.* १. भरीत; रायतें.

भरतार*– *पु.* पति; नवरा.

भरती– *स्त्री.* १. भर. २. प्रवेश; भरती. **मु०–का**–भरताड; साधारण; मामुली; बाजारबुणगा.

भरत्थ*– *पु.* रामाचा धाकटा भाऊ भरत.

भरथरी*– *पु.* 'भर्तृहरि'.

भरना– *क्रि. स.* १. भरणें; घालणें. २ पूर्ण करणें. ३. कर्ज फेडणें; चुकतें करणें. ४. उपरोध, निंदा करणें. ५. भरून जाणें. ६. शरीराला लावणें; लेपणें. ७. निभावणें. ८. तक्रार करणें.–*क्रि. अ.* शरीर धष्टपुष्ट होणें. २. जखम भरून येणें.

भरना+– *पु.* लांच.

भरनि*– *स्त्री.* पोषाख; पेहराव; वेशभूषा.

भरनी– *स्त्री.* १. मागाचा धोटा, धोटें. २. भरणी नक्षत्र.

भरभराना–*क्रि. अ.* १. फुगणें; फुलणें; सुजणें. २. रोमांचित होणें. ३. घाबरणें. [लढाई.

भरभेंटा*–*पु.* टक्कर; सामना;

भरम*– *पु.* १. भ्रम; घोटाळा. २. रहस्य. ३. प्रतिष्ठा; पत. **मु०–गँवाना**– भ्रम दूर करणें; रहस्य प्रकट करणें.

भरमना*– *क्रि. अ.* १. भ्रमण करणें; फिरणें. २, दारोदार हिंडणें; भटकणें. ३. संशयांत पडणें. –*स्त्री.* १. चूक; भूल. २. बुच-

कळा; भ्रम; भ्रांति.

भरमाना– *क्रि. स.* १. भुलविणें; फूस लावणें; बहकाविणें. २. दारोदार हिंडविणें; भडकविणें. ३. धोक्यांत पाडणें; फसविणें. –*क्रि. अ.** १. मार्ग चुकणें. २. चकित होणें. ३. भुलणें.

भरमार– *स्त्री.* भडिमार; अधिकता; विपुलता; बाहुल्य.

भरमीला– *वि.* १. संशयी. २. भ्रमिष्ट. [धडाम् करून आपटणें.

भरराना– *क्रि. अ.* कोसळणें;

भराई– *स्त्री.* भरण्याची क्रिया किंवा मजुरी. [भरवून घेणें.

भरवाना– *क्रि. स.* भरविणें;

भरसन*–ना– *स्त्री.* निर्भर्त्सना; निंदा. [चुलाण.

भरसाईं– *स्त्री.* भट्टी; आवा;

भरहर(रा)ना– *क्रि. अ.* पा० 'भहराना'.

भरांति*– *स्त्री.* भ्रांति; भ्रम.

भरा– *वि.* १. भरलेला. २. संपन्न. ३. परिपुष्ट. ४ क्रुद्ध.–**पूरा**– *वि.* संपन्न; धनधान्य व मुलेंबाळें भरपूर असलेला.–**भरा**–*वि.* १. भरपूर माणसें असलेला. २. गुबगुपीत; लठ्ठ. **मु०–(री)जवानी**– ऐन तारुण्याचा बहर.

भराई- *स्त्री.* भरण्याची क्रिया किंवा मजुरी.

भराव– *पु.* १. भरतकाम (कशिद्यांतील). २. भरती.

भरित– *वि.* १. भरलेला; पूर्ण. २. हिरवा.

भरी– *स्त्री.* भार (दहा मासे किंवा एक रुपया भाराचें वजन).

भरुआना+– *क्रि. अ.* जड होणें; भारावणें.

भरुहाना*– *क्रि. अ.* घमेंड करणें. –*क्रि. स.* १. भडकविणें. २. फुसलावणें.

भरेठ– *पु.* दरवाजावर भिंतीचें ओझें पेलण्यासाठीं लावलेलें लाकूड; 'लिंटल'.

भरैत+–*पु.* भाडेकरू.

भरैया–*पु.* १. भरणारा. २. भरण-पोषण करणारा; पालक.

भरोसा–*पु.* १. भरंवसा; विश्वास. २. आशा; उमेद. ३. साहाय्य; अवलंब.–**मु०–(से)का**– विश्वसनीय.

भरोसी+–*वि.* १. विश्वास ठेवणारा. २. आश्रित.

भर्ती– *स्त्री.* पा० 'भरती'.

भर्त्सन–*पु.*–**भर्त्सना**– *स्त्री.* १. निंदा; निर्भर्त्सना. २. दटावणी.

भर्म*–*पु.* १. भ्रम. २. पोषण. ३. मजुरी.

भर्मन*–*पु.* भ्रमण.

भर्राना–*क्रि. अ.* कोसळणें; कडाड आवाज करीत पडणें.

भल*–*वि.* पा० 'भला'.

भलपति*–*पु.* भालाईत.

भलमनस(सा)त; भलमनसः–हत; भलमनसी– *स्त्री.* भलेपणा; चांगुलपणा; सज्जनता; माणुसकी.

भला–*वि.* चांगला; भला. २. उत्तम; पहिल्या प्रतीचा.–*पु.* कल्याण; कुशल; उपकार; हित. –*अव्य.* बरें; अस्तु; असो; असें कधीं झालेंय काय ?–**ई**–*स्त्री.* चांगुलपणा; उपकार. –**चंगा**–*वि.* निरोगी; धष्टपुष्ट; धट्टाकट्टा. –**मान(नु)स**–*पु.* १. भला चांगला माणूस. २. दुष्ट माणूस. – **(ले) मानुसोंका समझौता**–*पु.* सज्जनांमधील अनौपचारिक करार; 'जंटलमेन्स ॲग्रीमेंट'.

भले–*अव्य.* १. चांगल्या तऱ्हेनें २. भले शाबास. उत्तम; वाहवा; छान. –**ही**–*अव्य.* असेना का ! कांहीं हरकत, पर्वा नाहीं.

भलेरा*– *वि.* पा० 'भला'.

भल्लूक–*पु.* अस्वल.

भवंग–गा; भवंगम*–साप.

भवँना*– *क्रि. अ.* चक्राकार फिरणें.

भवँर–*पु.* पा० 'भँवर'.

भव–*पु.* १. उत्पत्ति; जन्म. २. मेघ; ढग. ३. कुशल. ४. जगत्. ५. संसार. ६.* भय. –*वि.* शुभ.– –**सागर;–सिंधु**–*पु.* संसाररूपी समुद्र.

भवदनुगत–*वि.* आपला आज्ञाधारक; 'युवर्स ओबीडिएंटली'.

भवदनुरत–*वि.* आपला स्नेहाभिलाषी; 'युवर्स सिन्सियर्ली'.

भवदीय– सर्व. आपला. [– *स्त्री.* **भवदीया**]

भवन–*पु.* १. घर. २. महाल. ३. मंदिर. ४. जग. ५. जन्म; उत्पत्ति. ६. अधिष्ठान. ७. जन्मकुंडली. –**निर्माणविज्ञान**–*पु.* इमारतशास्त्र; 'आर्किटेक्चर'.

भवना*– *क्रि. अ.* १. फिरणें. २. वांकणें; वळणें.

भवनापचरण–*पु.* बेकायदेशीरपणें एखाद्याच्या घरांत घुसणें; 'हाउस–ट्रेसपास'. [गृहिणी.

भवनी*– *स्त्री.* भार्या; स्त्री;

भवन्निष्ठ–*स.* आपला विश्वासू 'युवर्स फेथफुली'.

भवाँ*–*पु.* फेरा. [घुमविणें.

भवाँना*– *क्रि. स.* फिरविणें;

भवितव्य–*वि.* होणारें; अटळ.

भवितव्यता– *स्त्री.* भवितव्य; अटळ गोष्ट; भाग्य.

भविष*–*पु.* भविष्य. [आगामी.

भविष्यत्–*पु.* भविष्यकाळ.–*वि.*

भविष्य–निधि– *स्त्री.* तरतूद–

निधि; 'प्रॉव्हिडंट फंड'.

भवीला*– *वि.* १. भावपूर्ण; भाविक. २. वांकडा; तिरपा. ३. थाटाचा; रुबाबदार. [आहार.

भष*–*पु.* भक्ष्य; भोजन;

भषना*–*क्रि. स.* खाणें; जेवणें. [दुर्गंध.

भस*–*पु.* १. भस्म; राख. २.

भसकना*– *क्रि. अ.* १. पडणें. २. बकाबका खाणें; वोकणा भरणें.

भसना+–*क्रि. अ.* १. तरंगणें. २. बुडणें. ३. खचणें; घुसणें.

भसभसा–*वि.* पोकळ; थुलथुलीत.

भसमा–*पु.* १. पीठ; कणीक (साधूंचा शब्द). २. पा० 'वसमा'.

भसान+–*पु.* विसर्जन (मूर्तीचें).

भसाना+–*क्रि. स.* १. तरंगविणें. २. बुडविणें; विसर्जित करणें.

भसि(सीं)ड–*पु.* कमळाचा देंठ.

भसुंड*–*पु.* हत्ती.

भसुर–*पु.* थोरला दीर.

भस्त्रा– *स्त्री.* १. माता. २. पखाल. ३. प्राणायामाचा एक प्रकार.

भस्म–*पु.* १. भस्म; राख. २. चितेची राख.–**सात्**–*वि.* नष्ट; राखरांगोळी झालेला.

भस्मी–*स्त्री.* चितेची राख.

भस्मीभूत–*वि.* भस्मसात्; जळून खाक झालेला; नष्ट.

भस्सी– *स्त्री.* चुना, कोळसा इ० चा चुरा.

भहराना–*क्रि. अ.* १. अकस्मात् मोडून पडणें. २. कोसळणें.

भाँऊँ*–*पु.* भाव; हेतु.

भाँग– *स्त्री.* भांगेचीं पानें किंवा तीं पानें वांटून तयार केलेलें पेय. **मु० – खा जाना** – नशेंतल्याप्रमाणें वरळणें.–**छानना**–भांग पिणें. **(घरमें भूँजी) – न होना**–अत्यंत दरिद्री असणें.

भाँज– *स्त्री.* १. नाण्याची मोड; मोड करण्याबद्दल दिला जाणारा बट्टा. २. घडी. ३. वळण.

भाँजना–*क्रि. स.* १. घडी घालणें. २. जोडी फिरविणें (व्यायामाचा प्रकार). ३. मोडणें; मोड करणें.

भांजा–*पु.* भाचा. [–*स्त्री.* **भांजी**]

भाँजी– *स्त्री.* १. कामांत व्यत्यय आणणें. २. राग आणणारी गोष्ट. ३. चहाडी. **मु०–मारना**–विघ्न, अडचण आणणें.

भाँटा+–*पु.* वांगें.

भांड–*पु.* १. भांडें. २. तेला–तुपाचा बुधला. ३. दुकानांतील माल, सामान.–**शाला**– *स्त्री.* भांडार.

भाँड़–*पु.* १. भाट; खुषमस्कऱ्या; विदूषक. २. निर्लज्ज व्यक्ति. ३.* उपद्रव; दंगा.–**भगतिये**–*पु.* नाचगाण्याचा पेशा करणारे लोक; कोल्हाटी.

भांडन–*पु.* भांडण.

भाँड़ना–*क्रि. स.* १. एखाद्याची बदनामी करणें. २. नाश करणें. –*क्रि. अ.** दारोदार भटकणें.

भाँड़ा–*पु.* भांडें. **मु०–(ड़े) भरना**–१. द्रव्य सांठविणें २. एखाद्याला खूप देणें. ३. पश्चात्ताप करणें. ४. जोराने रडणें.–**(ड़े) में जी देना**–एखाद्यावर प्रेम जडणें.

भांडारपाल–*पु.* कोठीवाला; कोठावळा; 'स्टोअरकीपर'.

भांडारिक; भांडारी–*पु.* विक्रीसाठीं सांठा करणारा; कोठीवाला; 'स्टॉकिस्ट'.

भाँत– *स्त्री.* पा० 'भाँति'.

भाँति– *स्त्री.* १. प्रकार; तऱ्हा. २. पद्धत; रीत. ३. रंग. –*अव्य.* प्रमाणें; प्रकारें.–**भाँति के**–*वि.* १. हरतऱ्हेचे. २. रंगीबेरंगी.

भाँपना–*क्रि. स.* १. ताडणें; ओळखणें. २. पाहाणें.

भाँयँ–भाँयँ–*पु.* किर्र शब्द; नि:स्तब्धतेंत होणारा आवाज.

भाँरी; भाँवर–रि–री*– *स्त्री.* १. सप्तपदी; विवाह. २. प्रदक्षिणा. **मु०–भरना**–१. प्रदक्षिणा घालणें. २. सप्तपदी करणें. [२. घुसळणें.

भाँवना+–*क्रि. स.* १. फिरविणें.

भाँस+– *स्त्री.* गळ्यांतील आवाज; स्वर; शब्द.

भा– *स्त्री.* १. कांति; तेज. २. शोभा. ३. किरण. ४. वीज.–*अव्य.** अथवा; हवें असल्यास.–*क्रि. अ.** झाला.

भाइ*–*पु.* १. प्रेम; स्नेह. २. स्वभाव. ३. विचार.– *स्त्री.* रीत; प्रकार; वर्तणूक.

भाइप*–*पु.* १. भ्रातृत्व; स्नेहसंबंध. २. आप्तसंबंध.

भाई–*पु.* १. भाऊ. २. नातेवाईक.–**चारा**–*पु.* स्नेहसंबंध; मैत्री.–**दूज**– *स्त्री.* भाऊबीज.–**बंद**–*पु.* भाऊबंद; जातवाले.–**बिरादर**–*पु.* जातभाई; भाऊबंद.–**भतीजावाद**–*पु.* स्वजनपक्षपात; वशिलेबाजी; 'नीपॉटिझम्'.

भाउ*–*पु.* १. चित्तवृत्ति. २. भाव; भावना. ३. प्रेम; स्नेह.

भाऊ*–*पु.* १. प्रेम; स्नेह. २. भावना. ३. स्वभाव. ४. स्थिति; अवस्था. ५.+ भाऊ. [कल्पनेप्रमाणें.

भाएँ*–*अव्य.* समजुतीप्रमाणें;

भाकसी– *स्त्री.* भट्टी; चुलाण.

भाख*–*पु.* भाषण; बोलणें.

भाखना* – *क्रि. स.* कथन करणें; बोलणें; सांगणें.

भाखा*– *स्त्री.* भाषा; बोली.

भाग–*पु.* १. हिस्सा; अंश. २. भाग्य; नशीब. ३. भागाकार. ४. वांटणी.–**धान**–*पु.* खजिना.–**धेय**–*पु.* १. भाग्य. २. राजाला द्यावयाचा कर. ३. हिश्शाचा हक्कदार; वांटेकरी.–**फल**–*पु.* भागाकार. –**भरा**; –**वंत**; –**वान्**–*वि.* भाग्यवंत; नशीबवान. **मु०–खुलना; –जागना**–नशीब उघडणें; भाग्योदय होणें.–**फूटना**–वाईट दिवस येणें.

भागड़; भागदौड़– *स्त्री.* धांवपळ; पळापळी.

भागना–*क्रि. अ.* १. धांवणें; पळणें. २. दूर जाणें. ३. जीव बचावणें. **मु० सिरपर पैर रखकर भागना**–जीव घेऊन पळत सुटणें.

भागनेय–*पु.* भाचा.

भागाभाग– *स्त्री.* पळापळी.

भागिता– *स्त्री.* भागीदारी; भागी; 'पार्टनरशिप'.

भागी–*पु.* हिस्सेदार.

भागू+ –*वि.* पळपुटा.

भाग्यदा– *स्त्री.* सोडत; 'लॉटरी'.

भाग्यपत्रक–*पु.* **ओली–सुकी;** चिठ्ठ्या टाकून निवड करणें; 'लॉट'.

भाजन–*पु.* १. भागणें; भागाकार. २. पात्र; भांडें. ३. योग्य अधिकारी. ४. आधार.–*वि.* भाग घेणारा; सामील होणारा.

भाजना*–*क्रि. अ.* पळणें; पळून जाणें.

भाजी– *स्त्री.* भाजी. २. पेज. –*वि.* भाग घेणारा; संबद्ध. –*पु.* १. सेवक; नोकर. २. भिडू.

भाज्य–*पु.* भाज्य; भागावयाची संख्या.

भाट– *स्त्री.* नदीचें पात्र. –*पु.* १. भाट; चारण. २. खुशामत्या. ३. भाडें.

भाटक–*पु.* घरभाडें; जमीनभाडें; 'रेंट'. –**राशि**– *स्त्री.* भाड्याचें उत्पन्न; 'रेंटल'.

भाटा–*पु.* १. उतार; पाण्याचा ओसर. २. समुद्राची आहोटी. ३. माळरान; खडकाळ जमीन.

भाटयौ*–*पु.* यशोगान; भाटाचें काम; स्तुतिपाठ.

भाठ– *स्त्री.* नदीच्या पाण्यांतून वाहून येणारा गाळ; गाळाची माती.

भाठी– *स्त्री.* १. भट्टी. २. ओहोटी.

भाड़–*पु.* भडभुंजाची भट्टी. **मु० –झोंकना**–तुच्छ, निरर्थक काम करणें.–**में जाय**–मसणांत जावो; चुलींत जावो. –**में झोंकना अथवा डालना**–नाश करणें; सोडून देणें.

भाड़ा–*पु.* भाडें. **मु०–(ड़े)का टट्टू**–१. भाड्याचा बैल; मजुरीवर वाटेल तें काम करणारा; भाडोत्री नोकर. २. क्षणिक; तात्पुरता. ३. निकामी; निरुपयोगी.

भाड़ैत+–*वि.* भाड्यानें काम करणारा.

भाण–*पु.* विनोदी रूपक (दृश्य-[काव्य); एकांकी नाटक.

भात–*पु.* १. भात. २. प्रकाश. ३. प्रभात. ४. लग्नांतील एक विधि; वरपित्यानें वधूपित्याच्या घरीं जाऊन जेवण करणें. –*वि.* १. चमकदार. २. प्रकट होणारा.

भाथा–*पु.* १. भाता (बाणांचा). २. भाता (शेगडीचा).

भाथी–*स्त्री.* भट्टी पेटविण्याचा लहान भाता.

भादों–*पु.* भाद्रपद महिना.

भान–*पु.* १. जाणीव; ज्ञान; आभास; प्रतीति. २. प्रकाश. ३. दीप्ति; चमक.

भानजा–*पु.* भाचा.

भानजी– *स्त्री.* भाची.

भानना*–*क्रि. स.* १. तोडणें; भंग करणें. २. नष्ट करणें.

भानमती– *स्त्री.* जादूगारीण. **मु० – का पिटारा** – गारुड्याची पोतडी.

भाना–*क्रि. अ.* १. बरें वाटणें; आवडणें. २. शोभणें. ३. माहीत होणें. –*क्रि. स.** चमकविणें; झिलई करणें.

भानु–*पु.* १. सूर्य. २. राजा; स्वामी. ३. विष्णु. ४. शिव. –**जा; –सुता**– *स्त्री.* यमुना नदी.

भाप-फ– *स्त्री.* वाफ.

भाब(भ)र–*पु.* १. डोंगराच्या पायथ्याचें जंगल. २. एक प्रकारचें गवत. [रंगाचा.

भाभरा*–*वि.* तांबडा; लाल

भाभी– *स्त्री.* १. वहिनी; थोरली भावजय. २.+ मरीआई. **मु०–आना**–वाईट दशा किंवा रोगाची सांथ येणें.

भाम–*पु.* १. दीप्ति. २. क्रोध. ३. मेहुणा; बहिणीचा नवरा. – *स्त्री.** सुंदर स्त्री.

भामा– *स्त्री.* १. स्त्री; रागीट स्त्री. २. सत्यभामा.

भाय*–*पु.* १. भाऊ. २. भावना. ३. परिणाम. ४. प्रकार. ५. भाव.

भाया*–*वि.* प्रिय; आवडता.

भारंगी– *स्त्री.* एक औषधी वनस्पति.

भार–*पु.* १. ओझें; बोजा. २. सांभाळ; रक्षण. ३. जबाबदारी. ४. पा० 'भाड़'. –*वि.* कष्टप्रद. –**ग्रस्त संपदा**– *स्त्री.* कर्जाखालीं असलेली मिळकत; 'इन्कंबर्ड एस्टेट' –**भूत**–*वि.* कष्टप्रद.

–मुक्त करना–जबाबदारींतून मोकळें करणें; 'रिलीव्ह'. **–वाह; –वाहक**–*पु.* ओझें वाहणारा; हमाल. **–हानि**– *स्त्री.* घसारा; वजन कमी होणें; 'लॉस ऑफ वेट'. **मु० –उठाना**– जबाबदारी शिरावर घेणें. **–उतरना**–कर्तव्याच्या ऋणांतून मुक्त होणें. [२. महाभारत.

भारत–*पु.* १. भारत; हिंदुस्थान.

भारती– *स्त्री.* १. भाषा; वाणी. २. सरस्वती.

भारतीयीकरण–*पु.* १. भारतीय बनविणें. २. एखाद्या संस्थेंत किंवा कारखान्यांत भारतीयांचें प्राबल्य प्रस्थापित करणें.

भारा+–*पु.* १. भाडें. २. ओझें. –*वि.* १. भारी; अधिक. २. असह्य. [दबलेला.

भाराक्रांत–*स्त्री.* ओझ्याखालीं

भारिक–*वि.* १. भारी. २. सुजलेला. –*पु.* हमाल; 'पोर्टर'.

भारी– *वि.* १. भारी; जड; वजनदार. २ मूल्यवान्; महाग. ३. कठिण. ४. पचण्यास जड. ५. अधिक. ६. प्रबळ. **–भरकम**–*वि.* भरभक्कम; जाडजूड. [भाला.

भाल– *पु.* १. भाळ; २. कपाळ.

भालना– *क्रि. स.* १. नीट पाहाणें; निरीक्षण करणें. २. तपासणें.

भाला– *पु.* भाला. **–बरदार**–*पु.* भाला चालविणारा; भालाईत.

भालि*–**ली**– *स्त्री.* १. बरची; भाल्याचें टोंक, पातें. २. कांटा; शूल.

भालु–लू; भालूक– *पु.* अस्वल.

भावंता*– *पु.* १. प्रियकर. २. भवितव्य. –वि. आवडता.

भाव– *पु.* १. अस्तित्व. २. भावना. ३. दर. ४. हावभाव. **–गति** – *स्त्री.* इच्छा; मनोभाव. **–गम्य**– *वि.* मनानें जाणतां येईल असें. **–ताव**– *पु.* भाव; दराची घासाघीस. **–भंगी**– *स्त्री.* हावभाव; चेहऱ्यावरील भाव. **–संधि**– *स्त्री.* मनांत एका वेळीं अनेक भाव उत्पन्न झाल्याची स्थिति.

भावइ*– *अव्य.* वाटल्यास; इच्छा असल्यास; हवें तर.

भावक– *वि.* भावपूर्ण.–*अव्य.** किंचित्; थोडेंसें.–*पु.* १. भाविक. २. भक्त; प्रेमी.

भावज– *स्त्री.* थोरली भावजय; वहिनी. [डता. –*पु.* प्रियकर.

भावता*– *वि.* प्रिय; आव-

भावन*– *वि.* प्रिय; आवडता. –*पु.* १. चिंतन; कल्पना. २. भक्तिभावना.

भावना*–*क्रि. अ.* पा० 'भाना'.

भावनि*– *स्त्री.* मनांत आलेली गोष्ट.

भावली*– *स्त्री.* जमीनमालक व कूळ यांच्यांतील शेताच्या पिकाची वांटणी; खंड. [२.* मर्मज्ञ.

भाविक– *वि.* १. भावनाप्रधान.

भावी– *स्त्री.* १. होणारी गोष्ट; भवितव्य; भविष्य काळ. २ भाग्य.

भावुक– *वि.* १ भावनाप्रधान. २ भाविक. ३. सहृदय; प्रेमळ.

भावै*– *अव्य.* वाटल्यास; हवें तर.

भाषण–*पु.* १. बोलणें. २. व्याख्यान. **–प्रतियोगिता**– *स्त्री.* वक्तृत्वाची चढाओढ.

भाषना*– *क्रि. अ.* १. भाषण करणें; बोलणें. २. भोजन करणें; खाणें. [तर.

भाषांतर– *पु.* अनुवाद; भाषां-

भाषा– *स्त्री.* भाषा; बोली. **–तत्त्व–विज्ञान**; –*पु.* भाषाशास्त्र. **–भाषी**–*वि.* भाषक; भाषिक.

भाषिक–*वि.* भाषेसंबंधींचा; भाषाविषयक. [णारा.

भाषी–*वि.* बोलणारा; सांग-

भास–*पु.* १. दीप्ति; प्रकाश. २. किरण. ३. इच्छा. ४. कल्पना.

भास–सा*– *स्त्री.* भाषा.

भासना*– *क्रि. अ.* १. भासणें; वाटणें. २. प्रकाशमान होणें. ३. माहीत होणें; समजणें. ४. नजरेस येणें. ५. रुतणें.

भिंगाना; भिंजा(जो)ना+; **भिंजोवना***– *क्रि. स.* भिजविणें; ओलें करणें.

भिंडी– *स्त्री.* भेंडी.

भिक्षु; भिक्षुक– *पु.* १. भिकारी. २. बौद्ध संन्यासी. ३ भिक्षुक.

भिखमंगा– *पु.* भिकारी. [रीण.

भिखारिणी–न–नी–*स्त्री.* भिका-

भिखारी–*पु.* भिकारी. –*वि.* दरिद्री; कंगाल.

भिगा(गो)–ना– *क्रि. स.* भिजविणें; ओलें करणें. [मिटणें.

भिचना*– *क्रि. अ.* बंद होणें;

भिच्छा*–*स्त्री.* भिक्षा.

भिच्छु*–*पु.* भिक्षु; भिक्षुक.

भिजवाना– *क्रि. स.* १. पाठविणें; धाडणें; पाठवावयास लावणें. २. भिजविणें. [भिजविणें.

भिजा(जो)ना*– *क्रि. स.*

भिज्ञ– *वि.* तज्ज्ञ.

भिटनी– *स्त्री.* स्तनाचा अग्रभाग; बोंडी. [युद्ध.

भिड़ंत– *स्त्री.* टक्कर; चकमक;

भिड़– *स्त्री.* गांधिलमाशी.

भिड़ना– *क्रि. अ.* १. टक्कर होणें. २. लढणें; झगडणें. ३. चिकटणें; लागून असणें.

भितल्ला– *पु.* अस्तर. –*वि.*

आंतला; आंतील.

भितल्ली–*स्त्री.* जात्याची खालची तळी.

भिताना*–*क्रि. अ.* घावरणें; भिणें.–*क्रि. स.* भिवविणें.

भित्ति–*स्त्री.* १. भिंत. २. भीति. ३. पाया. ४. पार्श्वभूमि; अधिष्ठान. ५. चित्राधार.–**चित्र**–*पु.* भिंतीवर काढलेलें चित्र.–**पत्रक**–*पु.* भिंतीवर चिकटविण्याची जाहिरात; 'प्लॅकार्ड'; 'पोस्टर'.

भिथारना+–*क्रि. स.* १. चिरडणें. २. भरडणें.

भिद*–*पु.* भेद; अंतर; फरक.

भिदना–*क्रि. अ.* १. टोंचणें; बोंचणें. २. घायाळ होणें. ३. शिरणें; घुसणें. [वज्र.

भिदि–दु; भिदि(दु)र–*पु.*

भिनकना; भिनभिनाना–*क्रि. अ.* १. भणभणणें; घोंघावणें. २. अत्यंत गलिच्छ होणें. ३. किळस येणें.

भिन-भिन–*स्त्री.* गुणगुण; माशी इ० च्या पंखांचा आवाज.

भिन(नु)सार–*पु.* प्रभात; सकाळ; पहांट.

भिनहीं+–*अव्य.* पहांटे.

भिन्न–*वि.* १. अन्य; वेगळा; दुसरा. २. अलग; पृथक्. ३. माजास आलेला; मस्त (हत्ती). –*पु.* अपूर्णांक. [चक्कर येणें.

भिन्नाना–*क्रि. अ.* फिरणें;

भियना*–*क्रि. अ.* भिणें.

भिरना*–*क्रि. अ.* पा० 'भिड़ना'. [भोंवरा.

भिंरिग*–*पु.* भृंग; भ्रमर;

भिलनी–*स्त्री.* भिल्लीण.

भिलावाँ–*पु.* भिलावा; बिब्बा.

भिलौंजा-जी–*स्त्री.* बिब्ब्याचें बीं; बिब्बा; बिबोटी.

भिश्त*–*पु.* [*फा.* 'बिहिश्त'] स्वर्ग.

भिश्ती–*पु.* पखाली; भिस्ती.

भिषक्–*पु.* १. वैद्य. २. उपचार. –**पाश**–*पु.* वैदू. [भिजणें.

भींगना–*क्रि. अ.* ओलें होणें;

भींचना*–*क्रि. स.* १. ओढणें. २. आवळणें; दाबणें. ३. बंद करणें; मिटणें. ४. चावणें.

भींजना–*क्रि. अ.* १. भिजणें. २. आनंदित होणें. ३. स्नेह जोडणें. ४. स्नान करणें. ५. सामावणें. ६. सद्‌गदित होणें.

भींट–*पु.* पा० 'भीटा'. –*स्त्री.*+ भिंत.

भी–*अव्य.* १. देखील; हि; सुद्धां. २. अवश्य; जरूर. ३. अधिक; जादा. ४. पर्यंत.–*स्त्री.* भय; भीति.

भीउँ*–*पु.* भीम. [याचना.

भीक-ख–*स्त्री.* भिक्षा; भीक;

भीखन*–*वि.* भीषण; भयानक.

भीखम*–*पु.* भीष्म.

भीग(ज)ना–*क्रि. अ.* भिजणें; ओलें, आर्द्र होणें.

भीगा–*वि.* भिजलेला; आर्द्र. **मु०–(गी)बिल्ली**–भीतीनें किंवा स्वार्थानें अत्यंत नम्र, दीन बनलेला; घाबरगुंडी उडालेला. –**(गी) रात**–उत्तर रात्र; मध्यरात्रीनंतरची रात्र. ही अधिक थंड असते.

भीजना*– *क्रि. अ.* १. भिजणें. २. वाढणें.

भीजा*–*वि.* १ सरस. २. सुखी.

भीटा–*पु.* १. उंचवटा; ढीग. २. पानमळ्याकरितां उंच केलेली जमीन.

भीड़*–*स्त्री.* गर्दी; दाटी. –**भड़क्का**–*पु.*; –**भाड़**–*स्त्री.* गर्दी; दाटी. **मु०–छँटना**–गर्दी कमी होणें. –**लगना**–गर्दी जमणें. [२. चोळणें.

भीड़ना*–*क्रि. स.* १. लावणें.

भीड़ा*–*वि.* संकुचित; तंग.

भीत–*वि.* भ्यालेला.–*पु.* भय; भीति.–*स्त्री.* १. भिंत. २. छत. **मु०–में दौड़ना**–आकाशाला गवसणी घालणें; अशक्य गोष्ट करण्याचा प्रयत्न करणें.

भीतर–*अव्य.* आंत –*पु.* १. अंतःकरण. २. अंतःपुर. **मु०–बाहर करना, देखना**–सर्व काम, वरकाम करणें; देखरेख करणें.

भीतरी–*वि.* १. आंतील. २. गुप्त; अप्रकट. ३. मनांतील.

भीति–*स्त्री.* १. भय; भीति. २. थरकांप.

भीती*–*स्त्री.* १. भिंत. २. भय.

भीन*–*पु.* पहांट; सकाळ.

भीनना–*क्रि. अ.* १. भिजणें. २. भिनणें. ३. मुरणें. [आर्द्र.

भीना–*वि.* भिजलेला; ओला;

भीनी–*वि. स्त्री.* १. आर्द्र. २. मधुर; मंद (सुगंध).

भीम–*वि.* १. भयंकर. २. अवाढव्य. –*पु.* भीम. –**काय**–*वि.* अवाढव्य शरीराचा. –**तिथि**–*स्त्री.* माघ शुक्ल एकादशी.–**द्वादशी**–*स्त्री.* माघ शुक्ल द्वादशी.–**सेन**–*पु.* भीम; अर्जुनाचा मोठा भाऊ. –**सेनी एकादशी**–*स्त्री.* ज्येष्ठ शुक्ल एकादशी; निर्जळी एकादशी. –**सेनी कपूर**–*पु.* एक प्रकारचा उत्तम कापूर.

भीर*–*स्त्री.* १. गर्दी. २. दुःख; कष्ट. ३. संकट; आपत्ति. –*वि.* १. भयभीत; भ्यालेला. २. भित्रा; भ्याड. [घावरणें.

भीरना*–*क्रि. अ.* भिणें;

भीरु–*वि.* भित्रा; भिणारा.

भीरुता; भीरुताई*–*स्त्री.* भित्रेपणा; भ्याडपणा.

भीरू–*वि. स्त्री.* भित्री (स्त्री).

भीरे–*अव्य.* जवळ; समीप; निकट.

भील–*पु.* भिल्ल.

भीलनी– *स्त्री.* भिल्लीण.

भीष*– *स्त्री.* पा० 'भीख'.

भीषज*–*पु.* वैद्य.

भीषण–*वि.* १. भयंकर; भयानक. २. दुष्ट. [कर; भीषण.

भीषम*–*पु.* भीष्म.– *वि.* भयं-

भुँइ*– *स्त्री.* भुई; जमीन.–**हरा**–*पु.* तळघर. [२. जाळणें.

भुंजना*–*क्रि. स.* १. भाजणें.

भुँजना+– *क्रि. अ.* भाजलें जाणें; पोळणें; होरपळणें.

भुँड़ली–*स्त्री.* कुसरूड; सुरवंट.

भुंडा–*वि.* १. शिंग नसलेला (बैल इ०); शिखर नसलेला (पर्वत, देऊळ इ०). २.* दुष्ट; नीच.

भुअंग; भुअंगम*–*पु.* भुजंग; सर्प. [घर. २ जग; लोक.

भुअन*– *पु.* १. भवन; मोठें

भुआ– *पु.* पा० 'भूआ'.

भुआर–ल*– *पु.* राजा.

भुइँ*– *स्त्री.* भूमि; भुई. –**कंप; –चाल; –डोल**–*पु.* भूकंप. –**धरा**– *पु.* तळघर. – **फोर**–*पु.* कुत्र्याची छत्री; अळंबें.– **हरा**–**पु.* तळघर.– **हार**+–*पु.* पा०'भूमिहार'.

भुक्खड– *पु.* १. भुकेलेला; बुभुक्षित. २. अधाशी. ३. दरिद्री; गरीब.

भुक्त– *वि.* १. खाल्लेलें. २. भोगलेलें.– **भोगी** – *वि.* (त्रास, दुःख) भोगलेला; अनुभवी.

भुक्ति– *स्त्री.* १. भोजन; आहार. २. लौकिक; सुख. ३. अधिकार.

भुखमरा– *वि.* १. भुकेकंगाल; उपासमार झालेला. २. अधाशी.

भुखमरी– *स्त्री.* उपासमार; दुष्काळ.

भुखाना+– *क्रि. अ.* भूक लागणें.

भुखालू*– *वि.* भुकेलेला; उपाशी.

भुगतना– *क्रि. स.* भोगणें; सहन करणें.– *क्रि. अ.* पुरें होणें; निघून जाणें.

भुगतान– *पु.* १. परतफेड. २. भरपाई. ३. निकाल; निवाडा. ४. गिऱ्हाइकाला माल देणें; 'डिलिव्हरी'. –**तुला**– *स्त्री.* आंतरराष्ट्रीय देण्या-घेण्याचा समतोल; 'बॅलन्स ऑफ पेमेंट्स'.

भुगताना– *क्रि. स.* १. परतफेड करणें. २. भोगावयास लावणें. ३. व्यतीत करणें; घालविणें; संपविणें. ४. पोंचविणें.

भुगुति*– *स्त्री.* पा० 'भुक्ति'.

भुग्गा–*वि.* १. भोळा. २. मूर्ख; अडाणी. [बेअकली; निर्बुद्ध.

भुच्च; भुच्चड़– *वि.* मूर्ख;

भुजंग–*पु.* साप; नाग. –**लता** *स्त्री.* विड्याच्या पानाची वेल.

भुज–*पु.* १. बाहु. २. हात. –**पाश**–*पु.* गळ्यांत हात घालणें; मिठी मारणें. –**बंद**–*पु.* बाजूबंद. –**बल**–*पु.* बाहुबल; शारीरिक सामर्थ्य.–**बाथ**–*पु.* १. कूस; उत्संग; मांडी. २. आलिंगन. –**बीहा***–*पु.* वीस हातांचा रावण. –**मूल**–*पु.* खांदा.

भुजवा+–*पु.* भडभुंजा.

भुजांक–*पु.* परस्परछेदक दोन कर्णांपैकीं उभा कर्ण; कोटिभुज; 'ॲब्सिसा'.

भुजा– *स्त्री.* १. हात. २. बाहु; दंड. मु०–**उठाकर कहना; –उठाना; –टेकना**– प्रतिज्ञा करणें. [कुकरी.

भुजाली– *स्त्री.* बरची; कटयार;

भुजिया–*पु.* १ . पोहे. २. तेलांत, तुपांत परतलेली कोरडी भाजी.

भुजे(जौ)ना+– *पु.* १. भाजलेलें धान्य; चणे, मुरमुरे इ०. २. भाजण्याची मजुरी.

भुट्टा–*पु.* कणीस.

भुतनी+– *स्त्री.* हडळ.

भुनगा–*पु.* १. भुंगा. २. पतंग (किडा); बागुरडा; घुंगुरटें. ३. तुच्छ प्राणी.

भुनना–*क्रि. अ.* १. भाजलें जाणें; शेकलें जाणें. २. रुपये इ० ची मोड होणें. [किर; कटकट.

भुनभुन– *स्त्री.* भुणभुण; किर-

भुनभुनाना–*क्रि. अ.* १. पुटपुटणें. २. कुढणें. ३. किरकिरणें.

भुनवाई; भुनाई– *स्त्री.* १. भाजणावळ. २. बट्टा.

भुनाना–*क्रि. स.* १. मोड करविणें. २. भाजविणें.

भुवि*– *स्त्री.* भूमि; जमीन.

भुमिया–*पु.* पा० 'भूमिया'.

भुरकना–*क्रि. अ.* १. सुकून भुरकट, ठिसूळ होणें. २. विसरणें. –*क्रि. स.* शिंपडणें; विखुरणें.

भुरका+–*पु.* १. चूर्ण; चुरा. २. मातीची दौत.

भुरकाना+–*क्रि. स.* १. भुरभुरणें. २. विखुरणें; टाकणें. ३.* भुलविणें; फूस लावणें.

भुरकुस–*पु.* भुसकट; चुरा. **मु०–निकलना**–१. कंबरडें मोडणें. २. चुराडा होणें.

भुरता–*पु.* १. भरीत; रायतें. २. कोचा पडलेली वस्तु. **मु० –करना, बनाना**–कणीक तिंबणें; खूप बदडणें.

भुरभुरा–*वि.* फुसका; भुसभुशीत; ठिसूळ; भुरभुरीत.

भुरवना*–*क्रि. स.* भुलविणें; फसविणें.

भुराई*– *स्त्री.* भोळेपणा.

भुर्रा–*वि.* काळाकुट्ट. +*पु.* विशिष्ट प्रकारची साखर. [भोळा.

भुलक्कड़–*वि.* विसराळू; विसर-

भुलना+–*वि.* विसराळू.

भुलसना–*क्रि. अ. स.* करपणें; पोळणें; भाजणें.

भुलाना–*क्रि. स.* १. विसर-विणें; विसर पाडणें. २. भुलविणें. –*क्रि. अ.* १. भुलणें. २. विसरणें.

भुलावा–*पु.* १. गुंगारा; फसव-णूक. २. थाप. [साप.

भुवंग; भुवंगम*–*पु.* भुजंग;

भुव*– *स्त्री.* भूमि.–**पाल; भुवाल***–*पु.* भूपाल; राजा.

भुवन–*पु.* १. जग. २. लोक (तीन).

भुवा–*पु.* १. शेवरीचा किंवा रुईचा कापूस. २. कापूस.

भुवार-ल*–*पु.* भूपाल; राजा.

भुशुंडि–*पु.* पा० 'काकभुशुंडि'.

भुस–*पु.* भुसा; भूस; तूस.

भुसना*–*क्रि. अ.* भुंकणें.

भुसी*– *स्त्री.* भुसकट; तूस.

भुसुंडी*–*पु.* पा० 'काकभुशुंडी'.

भुसौरा–*पु.* भुसा ठेवण्याची जागा, खोली.

भूँकना–*क्रि. अ.* १. भुंकणें. २. निरर्थक बडबड करणें.

भूँजना+–*क्रि. स.* १. भाजणें; शिजविणें. २. त्रास देणें. ३. भोगणें.

भूँजा–*पु.* १. भडभुंजा. २. लाह्या, फुटाणे इ०.

भूँसना*–*क्रि. अ.* भुंकणें.

भू– *स्त्री.* भूमि. –**कंप**–*पु.* धरणीकंप; भूकंप.–**मापक (सूचक) यंत्र**; ०–**लेखी**–*पु.* भूकंपाची नोंद करणारें, जोर व स्थळ दर्शविणारें यंत्र; 'साइझ्मोमीटर'; 'साइझ्मोग्राफ'. –०**विज्ञान**–*पु.* भूकंप विद्या (शास्त्र) 'साइझ्मोलॉजी.' –**कर्ण**–*पु.* पृथ्वीचा व्यास. –**कर्मी**–*पु.* विमान तळावरचे कर्मचारी; 'ग्राउंडस्टाफ'. –**गणित**–*पु.* भू-विद्या; भूमापनशास्त्र; 'जीऑडिसी'. –**चाल**–*पु.* भूकंप.–**छाया**–*स्त्री.* सूर्यग्रहणाच्या किंवा चंद्रग्रह-णाच्या वेळीं त्यांच्या बिंबावर पडणारी सावली; 'अंब्रा'.–**डोल**–*पु.* भूकंप. –**तत्त्वविज्ञान**–*पु.* भू-गर्भशास्त्र. –**तल**–*पु.* पृथ्वी; जग. –**दृश्य**–*पु.* सृष्टीचा देखावा; 'लँडस्केप'. –**देव**–*पु.* ब्राह्मण. –**धर**–*पु.* १. पर्वत; डोंगर. २. शेषनाग. ३. विष्णु. ४. राजा. –**परिमाप**–*स्त्री.* जमिनीचीं मोजणी; 'लँड सर्व्हे'. –**मंडल**–*पु.* पृथ्वी; पृथ्वीचा गोल; 'ग्लोब'. –**मध्य रेखा**– *स्त्री.* विषुववृत्त; 'इक्वेटर'. –**मापन**–*पु.* जमिनीची मोजणी; पैमाशी; 'सर्व्हे'.–**राजनीति**– *स्त्री.* 'जिओपॉलिटिक्स'. –**संसर्गी**–*वि.* अधोभुज; 'जिओफायलस'. –**स्वामी**–*पु.* जमीनमालक; जमी-नदार.

भूआ–*पु.* कापूस; कापसा-सारखा रेशेदार पदार्थ.–*वि.* पांढरा.

भूई– *स्त्री.* कापसासारखा मऊ लहान तुकडा; कापसाचा लहान गोळा, पेळू.

भूक– *स्त्री.* पा० 'भूख'.

भूकना–*क्रि. अ.* भुंकणें.

भूख– *स्त्री.* १. भूक; क्षुधा. २. आवश्यकता; जरुरी. ३. इच्छा; लालसा. –**हड़ताल**– *स्त्री.* अन्न-सत्याग्रह. **मु० – (खों) मरना**– उपासमार होणें; उपाशी राहाणें.

भूखण-न*–*पु.* भूषण.

भूखना*–*क्रि. स.* सजविणें; शृंगारणें. –*क्रि. अ.* + उपवास करणें.

भूखा–*वि. पु.* १. उपाशी; भुकेलेला. २. गरजू. ३. गरीब; दरिद्री. –**नंगा**–*वि.* अन्नवस्त्र मिळत नसलेला; कंगाल.

भूटिया–*वि.* भूतानचा. –*पु.* भूतानचा रहिवासी; भूतानी. –**बादाम**–*पु.* १. अलूबुखारा. २. भुईमूग.

भूत–*पु.* १. भूत. २. प्राणी. ३. पंचतत्त्व. –*वि.* गेलेला; झालेला; अतीत. –**खाना**–*पु.* घाणेरडें घर. –**ग्रस्त**–*वि.* भुतानें झपाटलेला. –**नाथ**–*पु.* शिव; शंकर. –**पूर्व**–*वि.* माजी; यापूर्वीचा. **मु०–का पक-वान; –की मिठाई**–दृष्टिभ्रम; ताव-डतोब नष्ट होणारें द्रव्य.– **चढ़ना; –सवार होना**–१. रागानें बेभान होणें. २. एखादें काम करण्याचा ध्यास लागणें.

भूतनी– *स्त्री.* हडळ.

भूताविष्ट–*वि.* भूतानें झपाट-लेला.

भूति– *स्त्री.* १. वैभव. २. राख. ३. उत्पत्ति. ४. वृद्धि; अधिकता.

भून*–*पु.* भ्रूण; गर्भ.

भूनना–*क्रि. स.* १. भाजणें. २. तळणें. ३. सतावणें.

भूभल; भूभुर-रि– *स्त्री.* गरम रेती, राख; फुफाटा.

भूमि– *स्त्री.* १.जमीन २. पृथ्वी. ३. स्थान; देश. ४. भूमिका. –**अवाप्ति अधिनियम**–*पु.* जमीन ताब्यांत घेण्याचा कायदा; 'लँड ॲक्विझिशन ॲक्ट'. –**नाग**–*पु.* गांडूळ. –**विज्ञान**–*पु.* भूस्तरशास्त्र. –**संरक्षण**–*पु.* भूरक्षण; 'सॉइल कॉन्झर्व्हेशन'. –**हस्तांतर अधि-नियम**–*पु.* भूमिहस्तांतरण कायदा; 'लँड एलिएनेशन ॲक्ट'. –**हार**–

पु. बिहार-मध्यप्रदेशांत राहाणारी एक हिंदु जमात. हे लोक स्वतःला ब्राह्मण म्हणवितात.

भूमिका– *स्त्री*. १. प्रस्तावना. २. पार्श्वभूमि. ३. भूमिका. **मु०–**

–बाँधना–एखादी गोष्ट सरळ व थोडक्यांत न सांगतां उगीच इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलणें.

भूमिया–*पु*. १. जमीनदार. २. ग्रामदेवता.

भूयः–*अव्य*. १. पुनः २. सामान्यतः. ३. अधिक; आणखी.

भूयिष्ठ–*वि*. अत्यधिक.

भूयोभूयः–*अव्य*. पुनः पुनः; वारंवार. [–*वि*. पुष्कळ; अधिक.

भूर*–*पु*.रेती; वाळू.–*स्त्री*. चूक.-

भूरा–*पु*. १. भुरा; करडा रंग. २. कच्ची साखर; गुळी साखर. –*वि*. मळकट रंगाचा; खाकी.

भूरि–*वि. अव्य*. १. पुष्कळ; खूप. २. प्रायः.

भूल– *स्त्री*. १. विस्मरण. २. चूक; कसूर. ३. अपराध. ४. अशुद्धि.-**चूक**-*स्त्री*. चूकभूल. (**मु–० लेनी देनी** – चूकभूल द्यावी–घ्यावी). –**भुलैया**– *स्त्री*. चक्रव्यूह.

भूलना–*क्रि. स*. १. विसरणें. २. चूक करणें. ३. हरविणें; गमविणें. –*क्रि. अ*. विस्मरण होणें. २. चूक होणें. ३. गर्विष्ठ होणें. ४. हरवणें. **मु० भूला भटका**– वाट चुकलेला; चुकून आलेला. **भूले भटके**–क्वचित्; कधीं-मधीं.

भूवा–पा० ' भूआ '.

भूषण–*पु*. १. दागिना. २. हिंदीचे प्रसिद्ध महाकवि.

भूषना–*क्रि. स*. भूषविणें; सजविणें. [कार. २. सजावट.

भूषा– *स्त्री*. १. दागिना; अलं-

भूषाचार–*पु*. कपडयांचा ढंग; ' फॅशन '.

भूसन*–*पु*. भूषण; दागिना.

भूसना*–*क्रि. अ*. भुंकणें.

भूसा–*पु*. गहूं, जव इ० च्या वाळलेल्या काडयांचा कापून बनविलेला बारीक चारा; भुसा; भूस. [२. भूस; भुसकट.

भूसी– *स्त्री*. १. तूस; कोंडा.

भृंग–*पु*. १. भोंवरा; भ्रमर. २. एक प्रकारचा किडा; 'बीटल्'. [–*स्त्री*. **भृंगी**].

भृकुटि–टी– *स्त्री*. भिवई; भुंवई.

भृति– *स्त्री*. १.घेऊन जाणें; नेणें. २. वेतन; मजुरी. ३. भोजन. **–भोगी**–*वि*. भाडोत्री; ' मर्सीनरी '.

भेंट– *स्त्री*. १. भेट; मुलाखत. २. भेट; नजराणा. **मु०–करना–** देणें; [अर्पण करणें.२.आलिंगन देणें.

भेंटना*–*क्रि. स*. १. भेटणें.

भेंड़–*स्त्री*. पा० ' भेड़ '.

भेंना; भेंवना*–*क्रि. स*. भिजविणें; ओलें करणें.

भेइ-उ*–*पु*. १. रहस्य. २. भेद.

भेक–*पु*. बेडूक.

भेख–*पु*. वेष.

भेखज*–*पु*. औषध. [करणें.

भेजना–*क्रि.स*.पाठविणें; रवाना

भेजवाना–*क्रि. स*. रवाना करविणें.

भेजा-*पु*. मेंदू; मगज. **मु०– खाना**; –**पकाना**–बडबड करून डोकें उठविणें. [भोळा, बावळट माणूस.

भेड-ड़ – *स्त्री*. १. मेंढी. २.

भेड़ा–*पु*. मेंढा.

भेड़िया–*पु*. लांडगा.

भेड़िया धसान–*पु*. अंधानुकरण; गतानुगतिकत्व.

भेंडी– *स्त्री*. मेंढी.

भेद–*पु*. १. भेद; अंतर; फरक. २. रहस्य; मर्म. ३. प्रकार.**–नीति–** *स्त्री*. फाटाफूट पाडण्याचें धोरण.

भेदड़ी+– *स्त्री*. बासुंदी.

भेदिया; भेदी; भेदू*–*पु*. १. हेर; गुप्तचर. २. रहस्य जाणणारा. ३. घरभेद्या.

भेर – *पु*.; **भेरी** – *स्त्री*. नगारा; दुंदुभी. [णारा.

भेरीकार–*पु*. नगारा वाजवि-

भेला*–*पु*. १. भेट. २. टक्कर. ३. साप. [भेली; लहान ढेप. २. गूळ.

भेली– *स्त्री*. १. गुळाचा खडा;

भेव*–*पु*. १. रहस्य; गौप्य; मर्म. २. पाळी.

भेवना*–*क्रि. स*. भिजविणें.

भेष–*पु*. वेष.

भेषज–*पु*. औषध.**–रसायन**–*पु*. औषधीरसायन; ' फार्मास्युटिकल केमिस्ट्री '. [' फार्मास्यूटिकल '.

भेषजीय–*वि*. औषधिक्रियेचा;

भेषना*–*क्रि. स*. १. सोंग घेणें; वेषांतर करणें. २. कपडे घालणें.

भेस–*पु*. १. वेष. २. बाह्यरूप.

भेसना*–*क्रि. स*. पोषाख करणें; कपडे घालणें.

भैंस– *स्त्री*. म्हैस.

भैंसा–*पु*. रेडा.

भैंसौरी+– *स्त्री*. म्हशीचें कातडें.

भै*–*पु*. भय.

भैक्ष–*पु*. भीक. [झालेला.

भैचक–वक*–*वि*. चकित; थक्क

भैजन*–*वि*. भयावह.

भैन-ना-नी+– *स्त्री*. बहीण.

भैयस+ – संपत्तींतील भावाचा हिस्सा. [**–दूज**– *स्त्री*. भाऊबीज.

भैया–*पु*. भाऊ.–*अव्य*. बाबारे.

भैरव – *वि*. भयंकर. **–*पु*.** १. शंकर.२.भयानक रस.३. भैरव राग.

भैरवी– *स्त्री*. १. दुर्गा; चामुंडा. २. एक रागिणी.

भैरू-रों-रो*–*पु*. भैरव; शंकर.

भैवाद+–पु. भ्रातृत्व; नातें.

भैषजिक विद्यालय – पु. वैद्यक-महाविद्यालय; 'मेडिकल कॉलेज'.

भोंकना–क्रि. स. भोसकणें; खुपसणें. –क्रि. अ. भुंकणें.

भोंड़ा–वि. १. कुरूप; बेढब; बेडौल. २. असभ्य. ३. मूर्ख. –**पन**–पु. १. कुरूपता. २. असभ्यपणा.

भोंत(थ)रा–ला+–वि. बोथट; धार नसलेला.

भोंदू–वि. मूर्ख; बेअक्कल.

भोंपा–पू–पु. कर्णा; तुतारी; भोंगा; 'हॉर्न'.

भोई+–पु. भोई; कोळी; पालखी वाहाणारा.

भोक्ता–वि. १. भोजन करणारा. २. उपभोग घेणारा.–पु. १. पति. २. राजा.

भोग–पु. १सुखदुःखाचा अनुभव; भोग. २. दुःख; कष्ट. ३. नैवेद्य. ४. भोजन. –**बंधक**–पु. भोगवटा; व्याजाच्या ऐवजीं गहाण ठेवलेल्या वस्तूचा वापर करण्याचा अधिकार असलेला गहाणाचा व्यवहार.

भोगना–क्रि. अ. १. भोगणें; सहन करणें. २. उपभोग घेणें. ३. संभोग करणें.

महफ़िल– *स्त्री.* [*अ.*] १ मैफल; जलसा; गाण्याची बैठक. २. उत्सव. ३. सभा. **मु०–जमना**– बैठकीला रंग चढणें.

महफ़ूज़– *स्त्री.* [*अ.*] राखून ठेवलेला; निगा ठेवलेला; सुरक्षित.

महबूब–*पु.* [*अ.*] प्रियकर. –*वि.* प्रिय; आवडता.

महबूबा–*वि.* *स्त्री.* [*अ.*] प्रेयसी; प्रेमिका.

महमंत*–*वि.* मदोन्मत्त.

महमह–*अव्य.* दरवळत; सुगंधयुक्त.

महमहा–*वि.* सुगंधित.

महमहाना– *क्रि. अ.* सुवास येणें; दरवळणें.

महमा*– *स्त्री.* महिमा.

महमिल–*पु.* [अ.] उंटाच्या पाठीवरील पडदा असलेला हौदा.

महमेज़– *स्त्री.* [अ.] घोडेस्वारांच्या बुटांना तळव्याशीं लावलेला एक प्रकारचा खिळा. यानें ते घोड्याला टांच मारतात.

महर–*पु.* १. जमीनदाराकरितां

आदरसूचक शब्द (व्रजभाषा). २. पुढारी.–*वि.* सुगंधित.

महर– पु. [*अ.*] लग्नाच्या वेळीं मुसलमान वरानें वधूला द्यावयाचा हुंडा. **मु०–बख्शवाना**– पतीनें पत्नीकडून हुंडा माफ करवून घेणें.–**बांधना**–हुंडयाची रक्कम ठरविणें.

महरम–पु. [*अ.*] १. जीवश्च कंठश्च मित्र. २. जनानखान्यांत जाण्याची परवानगी असलेला विशिष्ट नातलग. ३. स्नेही. ४. ज्याच्याशीं लग्न-संबंध होऊं शकत नाहीं असा जवळचा नातलग. ५. गौप्य, रहस्य जाणणारा. –*स्त्री.* चोळी; काचोळी; चोळीचा स्तनांवरील भाग.

महरा–पु. १. पाणक्या. २. भोई; पालखी वाहणारा; घरगडी. ३. सरदार; पुढारी. –*वि.* मोठा; प्रमुख. [नंदांचें राहाण्याचें ठिकाण.

महराना–पु. १. भोईवाडा. २.

महराब– *स्त्री* [*अ.*] महिरप.

महरि– *स्त्री.* १. स्त्रियांसाठीं वापरला जाणारा आदरसूचक शब्द (व्रज); कुलीन स्त्री. २. यशोदा. ३. गृहस्वामिनी. ४. मालकीण.

महरी– *स्त्री.* १. भोईण; कुळंबीण; मोलकरीण. २. गवळण (पक्षी).

महरूम–*वि.* [*अ.*] १. वंचित; वर्जित; निषिद्ध. २. दुर्दैवी.

महरूमी– *स्त्री.* [*अ.*] अपयश; दुर्दैवी; वंचित राहाणें.

महरेटा–पु. श्रीकृष्ण.

महरेटी– *स्त्री.* राधा.

महल– पु. [*अ.*] १. महाल. राजवाडा; प्रासाद. २. मोठा दिवाणखाना. ३. प्रसंग; संधि; मोका. ४. पत्नी; बेगम.–**सरा**–पु. जनानखाना; अंतःपुर.–(**ले**) **खास**–पु. पट्टराणी.

महल्ला–पु. [*अ.*] मोहल्ला; आळी; गल्ली; पेठ. –(**ल्ले**) **दार**–पु. आळीचा पुढारी.

महशर–पु. [*अ.*] १. मुसलमानी धर्मानुसार जगाचा अंतिम न्यायनिवाडयाचा दिवस; प्रळय. २. भयंकर दंगल. **मु०–बरपा करना** –खूप चळवळ करणें; आकाशपाताळ एक करणें.

महसूल–पु. [*अ.*] १. महसूल; शेतसारा. २. भाडें. ३. हंशील.

महसूस–*वि.* [*अ.*] १. ज्ञात; अनुभवास आलेला. २. प्रकट. **मु०– करना**–अनुभव करणें. –**होना**– प्रतीत होणें.

महाँ*– *अव्य.* मध्यें.

महा– ' महत् ' (मोठा) शब्दाचें समासांतील रूप.–**कंद**–पु. लसूण. –**कल्प**–पु. ब्रह्मदेवाच्या आयुष्याचा कालावधि. –**गणनाध्यक्ष**– पु. ' अकाउंटंट जनरल '. –**जन**–पु. १. श्रीमंत; धनी. २. वाणी. ३. साधु. ४. भला माणूस. ५. सावकार; पेढीचा मालक; 'बँकर'.–**जनी**– *स्त्री.* १. सावकारी. २. सावकारी वह्या लिहिण्याची विशिष्ट लिपि; मुडिया (मोडी) लिपि. –**द्वीप**–पु. मोठें बेट; खंड; ' काँटिनंट '. –**नद**–पु. मोठी नदी. –**न्यायवादी**–पु. ' अॅटर्नी जनरल '. –**पत्रपाल**–पु. ' पोस्ट मास्टर जनरल '. –**पथ**–पु. १. राजमार्ग २. मृत्यु. –**पात्र**–पु. अंत्यविधि चालविणारा किंवा त्यानिमित्त दान घेणारा ब्राह्मण; कारटा.–**प्रज्वलन**– पु. आगीचा डोंब; ' कॉन्फ्लेग्रेशन'. –**प्राभिकर्ता**–पु. ' अॅटर्नी जनरल'. –**बलाधिकृत**–पु. सरसेनानी; ' फील्डमार्शल '. –**ब्राह्मण**–पु. पा० ' महापात्र '. –**मना**–*वि.* उच्च अंतःकरणाचा; उदारहृदय. –**महिम**–*वि.* राज्यपाल इ० साठीं सन्मानार्थ प्रयुक्त शब्द; महाराज; नामदार; ' हिज एक्सलन्सी '. –**मात्र**–पु. १. माहूत. २. मुख्य चालक; महामंत्री. –*वि.* १. मोठा. २. सुंदर.–**मान्य**–*वि.* अत्यंत माननीय; ' हिज् मॅजेस्टी '. –**मारी**– *स्त्री.* पटकी; रोगाची सांथ. –**यात्रा** –*स्त्री.* मृत्यु. –**यान**– पु. बौद्ध धर्माच्या तीन मुख्य संप्रदायांपैकीं एक.–**युद्धपोत**– पु. मोठें लढाऊ जहाज; ' कॅपिटल शिप '. –**राज**– पु. १. महाराज; मोठा राजा. २. महाशय. –**लेखापाल**– पु. ' अकाउंटंट जनरल '. –**वाणिज्यदूत**– पु. सरकारचा अन्य देशांतील व्यापारी प्रतिनिधि; ' काउंसल जनरल '. —**सभाई**– *वि.* पु. हिंदू महासभेचा अनुयायी.–**सागर**– पु. मोठा सागर. [किंवा मजुरी.

महाई⁺– *स्त्री.* घुसळण्याचें काम

महात्मा– पु. महात्मा; श्रेष्ठ पुरुष.

महाधिकारपत्र–पु. 'मॅग्नाचार्टा'.

महाधिवक्ता– पु. मंत्रिमंडळाला कायद्याचा सल्ला देणारा, प्रमुख सरकारी वकील; ' अॅडव्होकेट जनरल '. [मनाचा पुरुष.

महानुभाव– पु. महाशय; उच्च

महान्– *वि.* मोठा; श्रेठ.

महाबत– पु. [*अ.*] भय; भीति.

महाभिनिष्क्रमण– पु. मृत्यु.

महाभियोग– पु. सार्वजनिक न्यायासनासमोरील चौकशी; ' इंपीचमेंट '. [पंतप्रधान.

महामात्य– पु. प्रधान मंत्री;

महाय*– *वि.* फार; पुष्कळ; अधिक. [नैपुण्य. २. सराव.

महारत– *स्त्री.* [*अ.*] कौशल्य;

महाल– *पु.* [*अ.*] १. पेठ; गंज. २. भाग; हिस्सा. ३. गांवांचा गट; महाल.

महावट– *स्त्री.* पौष-माघांत, हिंवाळ्यांत पडणारा पाऊस.

महावत– *पु.* माहूत.

महावर– *पु.* सवाष्ण स्त्रिया पायांना लावतात तो लाखेचा लाल रंग; अळिता. [रंगाची गोळी.

महावरी– *पु.* अळित्याची, लाल

महाशय–*पु.* महाराज; महाशय.

महिं*– *अव्य.* मध्यें.

महि–*स्त्री.* १. पृथ्वी. २. महिमा. **–देव**– *पु.* ब्राह्मण.**–पाल**–*पु.* राजा. **–सुता**–*स्त्री.* सीता.**–सुर**-*पु.* ब्राह्मण.

महिका– *स्त्री.* १. दंव. २. कर्ज.

महिमा– *स्त्री.* १. महिमा; मोठेपणा. २. महत्त्व; प्रभाव.

महियाँ*– *अव्य.* आंत; मध्यें.

महियाउर*– *पु.* पा० ' महेरा '.

महिला– *स्त्री.* सभ्य, घरंदाज स्त्री.**–दीर्घा**–*स्त्री.* ' लेडीज़ गॅलरी '.

महिष– *पु.* १. रेडा. २. महिषासुर. [राणी.

महिषी– *स्त्री.* १. म्हैस. २. पट्ट-

महिषेश– *पु.* महिषासुर.

मही– *स्त्री.* १. धरती; भूमि; माती. २. गाय. ३. ताक; मट्ठा. **–प**; **–पाल**–*पु.* राजा. **–सुर**– *पु.* ब्राह्मण.

महीन– *वि.* १. बारीक. २. पातळ; तलम. ३. मंद. ४. कोमल.

महीना– *पु.* १. महिना. २. मासिक पगार; वेतन. ३. मासिक धर्म (स्त्रियांचा). **मु०–(ने) से होना**–विटाळशी होणें, असणें.

महीर– *स्त्री.* तुपाची बेरी.

महुँ*– *अव्य.* आंत; मध्यें.

महुँ (हु)अर–*पु.* १. पुंगी. २. जादुगाराचा मंत्र.

महुआ– *पु.* मोहाचें झाड (याच्या फुलांची दारू करतात).

महुर*– *वि.* मधुर.

महुलिया[+]– *पु.* पा० ' महुवा '. –*स्त्री.* मोहाची दारू.

महुवा– *पु.* मोहाचें झाड किंवा त्याचीं फुलें (यांची दारू करतात).

महूख*– *पु.* १. मोहाचें झाड. २. ज्येष्ठमध.

महूरत*– *पु.* मुहूर्त.

महेर– *पु.* *स्त्री.* १. झगडा; भांडण. २. अडचण.

महेरा– *पु.* ताकांत मीठ किंवा साखर घालून त्यांत शिजविलेला भात; खुदखुदा भात; रावणभात.

महेरी– *स्त्री.* १. सोजी (ताकांतली). २. उकडलेली ज्वारी. –*वि.* अडथळा आणणारा.

महेस*– *पु.* महेश; शंकर.

महोगनी– *पु.* [*इं.*] शिसवीसारखें एक मजबूत लांकूड.

महोच्छव*– *पु.* महोत्सव.

महोदय– *पु.* १. महाशय. २. आधिपत्य. ३. स्वर्ग; मोक्ष; महद्भाग्य. [२. दगा.

महोला– *पु.* [*अ.*] १. बहाणा.

महोसा[+]– *पु.* १. लसूण. २. तीळ.

माँ–*स्त्री.* माता; आई.–*अव्य.** मध्यें.**–जाई**– *स्त्री.* सख्खी बहीण. **–जाया**– *पु.* सख्खा भाऊ. **–बाप**– *पु.* आईबाप.

माँख*– *पु.* पा० ' माख '.

माँखना*– *क्रि. अ.* रागावणें; संतापणें.

माँखी*– *स्त्री.* माशी.

माँग– *स्त्री.* भांग (केसांचा). **–चोटी**– *स्त्री.* वेणी-फणी.**–टीका** –*पु.* बिंदी. **मु०– उजड़ना**– विधवा होणें. **–पट्टी करना**–वेणी-फणी करणें.

माँग– *स्त्री.* मागणी; याचना. **मु०–जाँचकर**; **–ताँगकर**– इकडून-तिकडून आणून. [भिकारी.

माँगन*–*पु.* १. मागणी. २.

माँगना– *क्रि. स.* १. मागणें २. इच्छिणें. ३. भीक मागणें; याचना करणें.

मांगल्य– *पु.* मंगल द्रव्य.

माँचना*–*क्रि. अ.* पसरणें; प्रसिद्ध होणें.

माँजना–*क्रि. स.* १. घासणें. २. माँजा (पतंगाच्या दोरीला लावावयाचा) लावणें. ३. घासून चमकदार बनविणें. ४. अभ्यास, सराव करणें. [अंतर; फरक.

माँझ*–*अव्य.* आंत; मध्यें.–*पु.*

माँझा–*पु.* १. पतंगाचा मांजा. २. पगडीचा तुरा किंवा दागिना. ३. लग्नांत वधूवरांना नेसवितात तीं पिवळीं वस्त्रें. ४. नदींत पडलेलें बेट, वाळवंट; रेताड. **मु०–ढीला होना**–अशक्तपणा वाटणें.**– बैठना**– लग्नापूर्वी दोन-तीन दिवस वधूवरांनीं पिवळे कपडे नेसून बसणें; हळदी लागणें.

माँझी–*पु.* १. नावाडी. २. खलाशी. ३. मध्यस्थ (भांडण तोडणारा).

माँट–*पु.* माठ; मडकें.

माँठ–*पु.* १. माठ; मडकें. २. निळीचें पाणी तयार करण्याचें भांडें. ३. हौद.

माँड़–*पु.* १. भाताची पेज; खळ. २. ब्रह्मांड. ३. एक प्रकारचें मारवाडी गीत.

माँड़ना–*क्रि. स.* १. मर्दन करणें; चोळणें. २. लिंपणें. ३.

रचणें; सजविणें. ४. कणसांतून दाणे काढणें. ५. माजविणें; गडबड करणें. ६. तिंवणें. ७. सुरू करणें. ८. पसरविणें. [किनार.

मांड़नी–*स्त्री.* कांठ; गोट;

मांडलिक राज्य–*पु.* खंडणी देणारें राज्य; 'ट्रिब्यूटरी स्टेट'.

माँड़ा–*पु.* १. लग्नमंडप. २. परोठा. ३. मांडा (पक्वान्न). ४. मोतीबिंदु.

माँड़ी–*स्त्री.* भाताची पेज; खळ.

माँड़ौ–ड्यो*–*पु.* १. पाहुणे उतरण्याची जागा. २. लग्नमंडप; मांडव. ३. देवप्रतिष्ठेची जागा.

माँत*–*वि.* १. मातलेला; उन्मत्त. २. पराभूत. ३. बेचव.

माँतना*–*क्रि. अ.* १. उन्मत्त होणें. २. वेड लागणें.

माँता–*वि.* १. मदोन्मत्त. २. वेडा. ३. झिंगलेला.

माँद–*स्त्री.* गुहा; गुंफा.–*वि.* १. निस्तेज; उदास. २. तुलनेंत हलका; कमी प्रतीचा. ३. पराजित; पराभूत. **मु०–पड़ना**–मंद, फिकें पडणें; निस्तेज होणें.

माँदगी–*स्त्री.* [*फा.*] १. रोग; आजार. २. थकवा.

माँदा–*वि.* [*फा.*] १. थकलेला; भागलेला. २. उरलासुरला. ३. आजारी.

माँपना–*क्रि. अ.* झिंगणें; नशेंत चूर होणें.

माँयँ+–*स्त्री.* मातृकापूजनासाठीं बनविलें जाणारें एक पक्वान्न. –*अव्य.* मध्यें; आंत.

मांस–*पु.* मांस.

मांसाहारी–*वि.* मांस खाणारा.

माँसु*–*पु.* १. मांस. २. महिना.

माँह-हिं-हीं–*अव्य.* आंत; मध्यें.

मा–*स्त्री.* १. माता; आई. २. लक्ष्मी. –*अव्य.* नको; नाहीं.

मा–*सर्व.* [*अ.*] काय; कोण; जो. **–सिवा**–*अव्य.* याशिवाय; याखेरीज.

माइँ-ई–*स्त्री.* १. लग्नांत केलें जाणारें मालपुव्यासारखें एक पक्वान्न. २. मामी. ३. कुलस्वामिनी.

माइका+–*पु.* माहेर.

माई–*स्त्री.* १. आई; माता. २. वृद्ध, आदरणीय स्त्री. **मु०–का लाल**–उदार पुरुष; शूर वीर.

माक़ूल–*वि.* [*अ.*] १. उचित; योग्य. २. लायक. ३. उत्तम; उत्कृष्ट. ४. प्रतिपक्षाची गोष्ट कबूल करणारा; पराभूत.

माक़ूलि(ली)यत–*स्त्री.* [*अ.*] १. औचित्य; समजूतदारपणा. २. माणुसकी.

माख*–*पु.* १. अप्रसन्नता; नाखुषी. २. घमेंड. ३. पस्तावा. ४. दोष झांकणें.

माखन-*पु.* लोणी. **–चोर**-*पु.* कृष्ण.

माखना–*क्रि. अ.* रागावणें; नाराज होणें. [सोनामुखी.

माखी*–*स्त्री.* १. माशी. २.

माच*–*पु.* माचा; मचाण.

माचना*–*क्रि. अ.* १. माजणें; गडबड होणें. २. चालू होणें.

माचल*–*वि.* हट्टी; स्वच्छंदी.

माचा+–*पु.* मोठें खाटलें; माचा; पलंग.

माचिस–*स्त्री.* [*इं.*] आगपेटी.

माची+–*स्त्री.* १. लहान खाटलें. २. बैल गाडींतील गाडीवानाची बसण्याची जागा.

माछ*–*पु.* मासा; मासळी.

माछर*–*पु.* मच्छर; डांस.

माजरा–*पु.* [*अ.*] १. घटना; गोष्ट. २. स्थिति; खबर. ३. भानगड. [माननीय.

माजिद–*वि.* [*अ.*] प्रतिष्ठित;

माज़ी–*वि.* [*अ.*] माजी; भूतपूर्व.

माजून–*स्त्री.* [*अ.*] १. साखरेच्या पाकांत शिजविलेलें औषध; अवलेह. २. भांगेच्या वड्या; माजूम. ३. मिश्रण; भेसळ.

माजूफल–*पु.* मायफळ.

माज़ूर–*वि.* [*अ.*] १. असमर्थ. २. कुचकामाचा; निरुपयोगी.

माट–*पु.* १. दह्याचें मडकें. २. रंग तयार करण्याचें मडकें. ३. मोठें मडकें. [मुंगळा.

माटा–*पु.* चांचड; तांबडा

माटी*–*स्त्री.* १. माती. २. पृथ्वी. ३. धूळ; रज. ४. शरीर; देह. ५. शव; प्रेत.

माठ–*पु.* १. पाकांतील पुरी. २. माठ; मडकें.

माड़ना–*क्रि. अ.* माजविणें; गडबड करणें.–*क्रि. स.* १. भूषविणें; धारण करणें. २. आदर करणें. ३. चुरगळणें. ४. फिरविणें.

माढ़ा–*पु.* दुसऱ्या मजल्यावरील बैठक.

माढ़ी*–*स्त्री.* मठ; आश्रम.

माणिक–क्य–*पु.* लाल; माणिक.

मात–*वि.* [*अ.*] पराभूत; पराजित.–*स्त्री.* पराभव; मात.

मातदिल–*वि.* [*अ.*] १. शांत. २. समजूतदार. [सास पात्र.

मातबर–*वि.* [*अ.*] विश्वा-

मातबरी–*स्त्री.* [*अ.*] विश्वासूपणा; विश्वसनीयता.

मातम–*पु.* [*अ.*] मृत्युशोक; कोणी मेलें असतां धाय मोकलून रडणें.**–दार**–*वि.* शोक करणारा; सुतकांतील.**–पुरसी**–*स्त्री.* १. दारावर जाणें. २. मृताच्या आप्तांना भेटून समवेदना प्रकट करणें. **मु०**

–मनाना–शोक, विलाप करणें.

मातमी–*वि.* [*अ.*] शोकसूचक. **–लिबास–*पु.*** शोकसूचक काळा किंवा निळा पोषाख.

मातहत–*वि.* [*अ.*] अधीन; हाताखालचा.–*पु.* हाताखालचा अधिकारी किंवा नोकर.

मातहती–*स्त्री.* [*अ.*] अधीनता.

माता–*स्त्री.* १. माता; आई. २. देवी (रोग). [लेला; वेडा; उन्मत्त.

माता–*वि.* माजलेला; मात-

मातु*–*स्त्री.* आई; माता.

मातृ–' माता ' शब्दाचें समासांतील रूप.**–कल्याणगृह–*पु.*** माता–कल्याणकेंद्र; ' मॅटर्निटी वेल्फेअर सेंटर '.**–श्री–*स्त्री.*** मातोश्री; माताजी.**–सत्तात्मक–*वि.*** मातृसत्ताक; ' मॅट्रिआर्कल '.

मातृक कुटुंब–*पु.* मातृसत्ताक कुटुंब; ' मॅट्रिआर्कल फॅमिली '.

मात्र–*अव्य.* केवळ; फक्त.

मात्रक–*पु.* ठराविक प्रमाण; घटक; ' यूनिट '.

मात्रा–*स्त्री.* परिणाम; प्रमाण; मात्रा; ' क्वांटिटी '.

मात्रिक–*वि.* १. मात्रांसंबंधींचा. २. मातेसंबंधींचा. ३. एकंचा; एक मानाचा; ' यूनिटरी '.**–समाज –*पु.*** मातृसत्ताक समाज; ' मॅट्रिआर्कल सोसायटी '.

माथ*–*पु.* डोकें.

माथा–*पु.* १. शिर; डोकें. २. वस्तूचा वरचा भाग.**–पच्ची–*स्त्री.*** डोकेंफोड. **मु०–कूटना**–डोकें आपटून घेणें.**–टेकना**–प्रणाम करणें. **–ठनकना**–१. एखाद्या अनिष्ट गोष्टीची चाहूल लागणें. २. डोकें उठणें.**–मारना**–डोकेंफोड करणें.

माथुर–*वि.* मथुरेचा.–*पु.* १. चतुर्वेदी ब्राह्मण; चौबे. २. कायस्थांची एक पोटजात.

माथे–*अव्य.* १. शिरावर. २. भरंवशावर. **मु०–चढ़ाना**–शिरोधार्य मानणें.**–मढ़ना**–१. गळीं बांधणें. २. माथ्यावर खापर फोडणें.

मादक द्रव्य विभाग–*पु.* आबकारी खातें; 'एक्साइज डिपार्टमेंट'.

मादर–*स्त्री.* [*फा.*] आई. **–जाद**–*वि.* १. जन्मतः; उपजत. २. सहोदर; सख्खा.**–० नंगा**–*वि.* संपूर्ण नग्न.

मादरी–*वि.* [*फा.*] १. मातेचा. २. जन्मसिद्ध.**–ज़बान–*स्त्री.*** मातृभाषा. [प्राणी.

मादा–[*फा.*] मादी;–*स्त्री.*

माद्दा–*पु.* [*अ.*] १. मूलतत्त्व; वस्तूचा मूळ घटक. २. जड पदार्थ. ३. शब्दाचें मूळ रूप; धातु. ४, तथ्य. ५ योग्यता. ६ पू.

माद्दी–*वि.* [*अ.*] मौतिक; जड. [सारखी.

माधुकरी–*वि. स्त्री.* भ्रमरा-

माधुरई–ता*–*स्त्री.* माधुर्य.

माधैया*; माधो–धौ*–*पु.* माधव. [सरी; ' ॲव्हरेज '.

माध्य–*वि.* मधला–*पु.* सरा-

माध्यम–*वि.* मधला.–*पु.* माध्यम; साधन; वाहन; ' मीडियम '.

माध्यमिक–*वि.* मधला.–*पु.* बौद्धधर्माचा एक संप्रदाय.**–शिक्षा –*स्त्री.*** माध्यमिक शिक्षण; ' सेकंडरी एज्युकेशन '. [माधवी लता.

माध्वी–*स्त्री.* १. मदिरा. २.

मान–*पु.* १. आदर; सन्मान. २. अभिमान. ३. रुसवा. ४. प्रमाण; मानदंड. ५. वजन. **–चित्र–*पु.*** १. रूपरेषा; आराखडा. २. नकाशा. **–दंड–*पु.*** मोजण्याचा गज; प्रमाण. **–देय–*पु.*** मानधन; 'ऑनरेरियम्.' **–धन**–*वि.* मान, प्रतिष्ठा हेंच ज्याचें धन आहे असा. –*पु.* मानाची वस्तु; ' ऑनरेरियम '. **–पत्र–*पु.*** मानपत्र. **–मंदिर–*पु.*** १. वेधशाळा. २. कोषागार. **–मनौती–** *स्त्री.* १. मनधरणी; विनवणी. २. नवस. **–हानि–** *स्त्री.* अपमान; अब्रूनुकसानी. **मु० –रखना**–मान ठेवणें

मानक–*पु.* दर्जा; प्रत; पातळी; ' स्टँडर्ड '.

मानता–*स्त्री.* नवस.

मानना–*क्रि. स.* १. स्वीकारणें; मान्य करणें; मंजूर करणें. २. मान देणें; आदर करणें. ३. श्रद्धा किंवा विश्वास ठेवणें. ४. नवस करणें. ५. लक्षांत घेणें; समजावून घेणें. ६. प्रमाणभूत मानणें. ७. पारंगत समजणें. –*क्रि. अ.* मानणें; गृहीत धरणें.

माननीय–*वि.* १. पूज्य; वंद्य. २. सन्मान्य; श्रेष्ठ. ३. आमदार (विधिमंडळ).

मानव–*पु.* मनुष्य; माणूस. **–पणन; –व्यापार–*पु.*** माणसांची खरेदी–विक्री; ' ट्रॅफिक इन ह्यूमन बीइंग्ज. ' **–विज्ञान–*पु.*** नृवंशशास्त्र.

मानवी–*स्त्री.* स्त्री; नारी.–*वि.* मानवाचा; मनुष्यविषयक.

मानवीय–मानवी; मनुष्यासंबंधींचा.

मानस–*पु.* १. मन. २. मानस सरोवर. ३. कामदेव. ४. मनुष्य. ५. रामचरितमानस; तुलसीरामायण. –*वि.* मनापासून उत्पन्न झालेला; काल्पनिक. [–*स्त्री.* **मानसी**].**–पुत्र–*पु.*** (ब्रह्मदेवाच्या) केवळ संकल्पानें उत्पन्न झालेला पुत्र. **–शास्त्री–*पु.*** मानसशास्त्रज्ञ.

मानसी–*स्त्री.* एक विद्यादेवी.

मानहुँ*–*अव्य*. १. समजा; कल्पना करा. २. जणूं.

माना*–*क्रि. स*. मोजणें; मापणें. –*क्रि. अ*. मावणें; सामावणें.

मानिंद–*वि*. [*फा.*] समान; तुल्य; सदृश; सारखें.

मानिक–*पु*. माणिक. –**चंदी**–*स्त्री*. एक प्रकारची लहान व स्वादिष्ट सुपारी. –**रेत**– *स्त्री*. दागिने साफ करण्याचा माणकाचा चुरा.

मानिटर–*पु*. [*इं.*] वर्गप्रमुख.

मानिनी–*वि. स्त्री*. १. स्वाभिमानी; गर्विष्ठ. २. नाखुष. ३. रुष्ट (नायिका).

मानी–*पु*. अनेक० [*अ.*] १. अर्थ. २. अभिप्राय; हेतु.

मानी–*वि*. स्वाभिमानी. २. रुसलेला; रागावलेला. ३. मानणारा; समजणारा (पंतिडमानी = स्वतःला मोठा पंडित समजणारा).

मानुख*–*पु*. मनुष्य.

मानुष–*वि*. मानवी.–*पु*. मनुष्य.

मानुषी–*वि*. मानवी.–*स्त्री*. स्त्री.

मानुस*–*पु*. माणूस.

मानूस–*वि*. [*अ.*] स्नेही; माणसाळलेला; लळा लागलेला.

माने–*पु*. अनेक० [*अ.*] पा० 'मानी'. [जणूं काय]

मानों–नो–नौं*–*अव्य*. जणूं;

मान्य–*वि*. १. माननीय; पूज्य; आदरणीय. २. कायदेशीर; योग्य; बंधनकारक; 'व्हॅलिड'.

मान्यता–*स्त्री*. १. मोठेपणा; मान. २. स्वीकृति.

माप–*स्त्री*. १. परिमाण; मोजमाप; 'मेझर'; 'मेझरमेंट.' २. वजन. –**चित्र**–*पु*. योजना; 'प्लॅन'. [मापणें.

मापना–*क्रि. स*. मोजणें;

मापनी–*स्त्री*. मोजण्या-मापण्याचें उपकरण; 'स्केल'.

माफ़–*वि*. [*अ.* 'मुआफ़'] क्षमा केलेला; माफ.

माफ़कत–*स्त्री*. [*अ.* 'मुआफ़िक़त'] १. अनुकूलता. २. मैत्री.

माफ़िक़–*वि*. [*अ.*] १. अनुसार; प्रमाणें; अनुकूल. २. योग्य.

माफ़ी–*स्त्री*. [*अ.*] १. क्षमा; माफी. २. जमीनमहसूल माफ असलेली जमीन. –**दार**–*पु*. जमीनमहसूल माफ असलेला जमीनमालक.

मामलत–*स्त्री*. [*अ.* 'मुआमिलत'] झगडा; भानगड; बाब. –**दार**–*पु*. मामलेदार.

माम(मि)ला–*पु*. [*अ.*] १. धंदा; व्यवसाय. २. परस्परव्यवहार. ३. भानगड; बाब. ४. भांडण; तंटा. ५. मुकदमा; खटला. **मु०–पटाना**–व्यवहार, सौदा पुरा करणें.

मामा–*स्त्री* [*फा.*] १. आई. २. स्वयंपाकीण बाई. ३. म्हातारी बाई. ४. मोलकरीण. –**गिरी**–*स्त्री* स्वयंपाकाचा धंदा; आचाऱ्याचें काम.

मामा–मूं–*पु*. मामा.

मामी–*स्त्री*. मामाची बायको. २. आपली चूक कबूल न करणें. ३. कबुली; समर्थन. **मु० –पीना** –१. कबूल करून नाकारणें. २. आपल्या चुकीकडे दुर्लक्ष करणें. –**भरना**–समर्थन करणें; पाठिंबा देणें. [परिपूर्ण.

मामूर–*वि*. [*अ.*] भरलेलें;

मामूल–*पु*. [*अ.*] १. पद्धत; रीत; रिवाज. २. नेहमींची गोष्ट. ३. ज्याच्यावर नजरबंदीचा प्रयोग करण्यांत आला आहे असा. **मु०–**से **होना**–विटाळशी होणें, असणें (मुसल०). [सामान्य; किरकोळ.

मामूली–*वि*. [*अ.*] मामुली;

मायँ*–*अव्य*. मध्यें.

मायका–*पु*. माहेर.

मायन*–*पु*. लग्नांतील मातृकापूजनाचा दिवस अथवा त्या दिवशींचें कृत्य; व्याहीभोजन.

मायल–*वि*. [*अ.*] १. झुकलेला; प्रवृत्त. २. मिश्रित; छटा असलेला.

माया–*स्त्री*. १. कपट; इंद्रजाल; जादू. २. धन; संपत्ति. ३. भ्रम. ४. प्रकृति. ५. ईश्वरी शक्ति; करणी. ६. माता. ७. ममता.

मायिक–*वि*. मायावी; कपटी. –*पु*. जादूगार. [नाउमेद.

मायूस–*वि*. [*अ.*] निराश;

मायूसी–*स्त्री*. [*अ.*] निराशा; नाउमेदी.

मार–*स्त्री*. १. मारण्याची क्रिया; आघात. २. लढाई. ३. मारा. –*पु*. १. मृत्यु. २. कामदेव. ३. बहकवणारी शक्ति. –**काट**–*स्त्री*. १. मारामारी. २. लढाई; युद्ध. –**धाड़;**–**पीट**– *स्त्री*. मारामारी. २. लढाई.

मार–*पु*. [*फा.*] साप. –**गीर**–*पु*. गारुडी. –**पेच**–*पु*. धूर्तपणा; फसवाफसवी.

मारका–*पु*. [*अ.*] १. रणांगण; युद्धक्षेत्र. २. महत्त्वाची घटना. –*पु*. [*इं.*] चिह्न; खूण; छाप. –*वि*. छाप असलेला. **मु०–(के)का–** १. महत्त्वाचा; मुद्याचा. २. अवघड; भारी. –**सर करना**–युद्धांत जय मिळविणें.

मारकीन–*पु*. [*इं.*] एक प्रकारचें कोरें व जाड कापड; मांजरपाट.

मारग*–*पु*. १. मार्ग. २. धर्म-

पंथ. मु०–मारना–वाटमारी करणें.

मारगन*–*पु.* १. वाण. २. याचक. ३. शोध. ४. प्रेम.

मारतौल–*पु.* एक प्रकारचा मोठा हतोडा.

मारना–*क्रि. स.* १. मारणें; चोपणें. २. वध करणें; हत्या करणें; ठार मारणें. ३. सतावणें; त्रास देणें. ४. चीत करणें; जिंकणें ५. हत्यार चालविणें. ६. दाबून ठेवणें; संयम करणें. ७. नाश करणें.

मारफ़त–*स्त्री.* [*अ.*] १. माध्यम. २. अध्यात्मज्ञान .–*अव्य.* मार्फत; द्वारें.

मारव*–*पु.* मालव देश.

मारा–*वि.* १. ठार मारलेला. २. गांजलेला. –*स्त्री.** माला. **मु०–मारा फिरना**–वाईट स्थितींत वणवण हिंडणें. [संहारक.

मारात्मक–*वि.* प्राण–घातक;

मारामार–*अव्य.* घाईनें; लवकर.– *स्त्री.* १. रेलचेल. २. धांवपळ. ३. मारामारी.

मारी–*स्त्री.* पटकी; महामारी.

मारु*–*स्त्री.* मार.

मारुत–*पु.* वारा; पवन.

मारू–*पु.* १. डंका. २. वीरश्रीयुक्त गाणें, राग. –*वि.* १. मारणारा. २. वीरश्री निर्माण करणारा. **–बाजा**–*पु.* रणवाद्य.

मारूफ़–*वि.* [*अ.*] प्रसिद्ध; प्रख्यात.

मारे–*अव्य.* मुळें; कारणानें.

मार्ग–*पु.* रस्ता; वाट. २. मार्गशीर्ष. **–रक्षक**–*पु.* पहारेकरी; 'एस्कॉर्ट'.

मार्जक–*वि.* मार्जन कारणारा; धुणारा. –*पु.* धूम्रशोधक यंत्र; 'स्क्रबर'. [लेलें.

मार्जित–*वि.* शुद्ध केलेलें; धुत-

मार्मिक–*वि.* प्रभावशाली; मार्मिक; मर्मज्ञ.

माल–*पु.* [*अ.*] १. सामान; माल; सामग्री. २. धनदौलत. ३. महसूल. –*वि.* चरख्याची माळ. **–अवेक्षक**–*पु.* माल–निरीक्षक; 'गुड्स सुपरव्हायजर'. **–खाना**–*पु.* गोदाम; माल सांठविण्याचें स्थान. **–गुज़ार**–*पु.* जमीनदार; सरकारला सारा गोळा करून देणारा.– **–गुज़ारी**-*स्त्री.* जमीनदार सरकाला जो कर देतो तो; धारा; सारा. – **गोदाम**–*पु.* मालधक्का; मालगुदाम. **–घर**–*पु.* 'गुड्स ऑफिस'. **–ज़ामिन**–*पु.* रोख जामीन देणारा. **–टाल**–*पु.* माल-मत्ता; रुपये-पैसे. **–दार**–*वि.* धनिक; श्रीमंत. **–पुआ**; **–पूवा**–*पु.* पाकांतील पुरीसारखें पक्वान्न. **–बाबू**–*पु.* 'गुड्स-क्लार्क.' **–मंत्री**–*पु.* महसूलमंत्री; 'रेव्हेन्यू मिनिस्टर'. **–मता–त्ता**–*पु.* संपत्ति; धनदौलत. **–विभाग**–*पु.* जमाबंदी; महसूल खातें. **मु०–उड़ाना**–चंगळ करणें; गोडधोड खाणें. **–मारना**–दुसऱ्याचें द्रव्य गडप करणें.

मालकँगनी–*स्त्री.* करडकांगुणी.

मालखंभ–*पु.* मल्लखांब.

मालदह–*पु.* १. पूर्व बिहारमधील एक शहर. २. या शहराच्या आसपासच्या प्रदेशांत होणारा एक प्रसिद्ध कलमी आंबा. [माळीण.

मालन; **मालनिया**– *स्त्री.*

माला–*स्त्री.* माळ; माळा. **–कार**–*पु.* माळी. **मु०–फेरना**–जप करणें.

मालामाल–*वि.* [*फा.*] १. धनधान्यानें भरलेला; समृद्ध; संपन्न. २. भरपूर.

मालिक–*पु.* [*अ.*] १. ईश्वर. २. स्वामी; मालक. ३. पति.**–अराज़ी** –*पु.* जमिनीचा मालक; जमीनदार

मालिकाना–*पु.* [*फा.*] मालकी; स्वामित्व. –*वि.* मालकासारखा.

मालिकी–*स्त्री.* [फा.] १. मालकी; स्वामित्व. २. मिळकत; संपत्ति.

मालियत–*स्त्री.* [*अ.*] १. किंमत; मूल्य. २. संपत्ति. ३. मूल्यवान् वस्तु. [मालिश.

मालिश–*स्त्री.* [*फा.*] चोळणें;

माली–*पु.* माळी. –*वि.* [*अ.*] आर्थिक.

मालीदा–*वि.* [*फा.*] मळलेला; तिंबलेला.–*पु.* १. चुरमा; मलीदा. २. एक प्रकारचें लोकरीचें कापड.

मालूम–*वि.* [*अ.*] ज्ञात; माहीत; ठाऊक; माहितीचा; प्रकट; प्रसिद्ध.

मालोपमा–*स्त्री.* उपमा अलंकाराचा एक प्रकार. यांत एका उपमेयाचीं अनेक उपमानें असतात.

मावली–*पु.* पा० 'मवाली'.

मावस*–*स्त्री.* अमावस्या.

मावा–*पु.* १. खवा. २. सत्त्व. ३. पेज.

माश–*पु.* [फा.] उडीद. **मु०–मारना**–मूठ मारणें; जादू करणें.

माशा–*पु.* मासा (आठ गुंजांचें वजन). **मु०– तोला होना**–तोळा-मासा होणें; अस्थिर होणें.

माशाअल्लाह–वा० [*अ.*] १. ईश्वर वाईट नजरेपासून रक्षण करो. २. वाहवा; छान.

माशी–*वि.* उडदाच्या रंगाचा. –*पु.* काळसर हिरवा रंग.

माशूक़–*वि. पु.* [*अ.*] १. प्रेमपात्र. २. प्रियकर. ३. सुंदर; मोहक.

माशूक़ा–*स्त्री.* [*अ.*] प्रेयसी; प्रेमिका. [सारखा; मोहक.

माशूक़ाना–*वि.* [*अ.*] प्रेमीजनां-

माशूक़ी– *स्त्री.* [*अ.*] १. प्रेमपात्र बनणें; प्रेम करणें. २. हावभाव.

माष–*पु.* १. उडीद. २. चामखीळ.–*वि.* महामूर्ख.

मासी– *स्त्री.* मावशी.

मासुरी– *स्त्री.* दाढी.

मासूम–*वि.* [*अ.*] १. निरपराध. २. निष्पाप; २. निरागस. ३. साळसूद.

मास्टर– *पु.* [*इं.*] १. मालक. २. शिक्षक; अध्यापक; मास्तर.

माहँ*–*अव्य.* मध्यें.

माह*–*पु.* माघ महिना.

माह–*पु.* [*फ़ा.*] १. महिना. २. चंद्र.–**ताब**–*पु.* १. चंद्र. २. चांदणें. –**ताबी**– *स्त्री.* १. एक प्रकारची शोभेची दारू. २. चांदण्याचा आनंद लुटतां यावा म्हणून बांधलेला चबुतरा.–**नामा**–*पु.* मासिक. –**रुख़**;–**रू**–*वि.* चंद्रमुखी. –**वार** –*वि.* मासिक. *अव्य.* दर महिन्यास. –**वारी**–*स्त्री.* मासिक वेतन; पगार.

माहाना–*वि.* [फ़ा.] दरमहाचा; मासिक. –अव्य. दरमहा.

माहिं–हीं*–*अव्य.* मध्यें; आंत (सप्तमीचा प्रत्यय).

माहिर–*वि.* [*अ.*] तज्ज्ञ; निपुण.

माहिला*–*पु.* १. नावाडी. २. कोळी.

माही– *स्त्री.* [*फ़ा.*] मासळी; मासा. –**गीर**–*पु.* मासे पकडणारा; कोळी. –**पुश्त**–*वि.* मध्यें उंच व बाजूंना उतरता असलेला.–**मरातिब**–*पु.* राजाच्या स्वारीपुढें चालणारे सात झेंडे. यांवर मासा, ग्रह, इ० चीं चिह्नें असतात.

माहीयत– *स्त्री.* [*अ.*] १. तत्त्व. २. वास्तविकता; तथ्य.

माहुर+–*पु.* विष.

माहेश्वरी– *स्त्री.* १. दुर्गा. २. वैश्यांची एक पोटजात; मारवाडी.

मिंगनी+– *स्त्री.* लेंडी (पशूची).

मिंड़ाई– *स्त्री.* १. कुस्करण्याची दावण्याची, रगडण्याची क्रिया किंवा मजुरी. २. चिटाचें कापड चटकदार बनविण्याची क्रिया.

मिंत*–*पु.* मित्र.

मिंबर–*पु.* [*अ.*] मशिदींतील उंच चबुतरा (याच्यावर बसून इमाम, मुल्ला वगैरे उपदेश करतात).

मिआद– *स्त्री.* पा० ' मीआद '.

मिआन*–*पु.* मेणा; पालखी.

मिक़दार– *स्त्री.* [*अ.*] प्रमाण; मात्रा.

मिग*–*पु.* मृग; हरिण.

मिचकाना–*क्रि. स.* डोळे मिचकाविणें; पापण्या लववणें. [होणें.

मिचना–*क्रि. अ.* डोळे बंद

मिचराना–*क्रि. अ.* अरुचीनें कंटाळत, रेंगाळत जेवणें.

मिचलाना–*क्रि. अ.* मळमळणें; ओकारी येणें.

मिचु*– *स्त्री.* मृत्यु.

मिछा*– *वि.* मिथ्या.

मिज़राब*– *स्त्री.* [*अ.*] सतार वाजविण्याची तारेची आंगठी.

मिज़ाज–*पु.* [*अ.*] १. स्वभाव. २. प्रकृति; तब्येत. ३. घमेंड. ४. गुणधर्म. –**दार**;–**वाला**– *वि.* घमेंडखोर; गर्विष्ठ; मिजासखोर. **मु०–आली; –मुबारक; –शरीफ़**– कसें काय ? ठीक आहे ना ? –**न मिलना**– गर्व करणें. –**पाना**– स्वभाव ओळखणें. –**पूछना**–क्षेमकुशल विचारणें. –**होना**–गर्व होणें.

मिटना– *क्रि. अ.* १. पुसलें जाणें. २. नष्ट होणें. ३. मिटणें.

मिटाना– *क्रि. स.* १. मिटविणें. २. पुसणें. ३. नष्ट करणें. ४. खराब, रद्द करणें.

मिटिया– *स्त्री.* मडकें. –*वि.* मातट; मातीचा; मातीच्या रंगाचा. –**फूस**– *वि.* दुर्बळ; मरतुकडा. –**महल**–*पु.* झोंपडी.

मिटियाना– *क्रि. स.* माती लावून घासणें.

मिट्टी– *स्त्री.* १. माती. २. जमीन; भुई. ३. धूळ. ४. राख; भस्म. ५ शरीर. ६. शव; प्रेत. ७. शरीराचा बांधा. –**का तेल** –*पु.* रॉकेल; घासलेट. **मु० –उठना**–प्रेत उचललें जाणें. –**करना** –नष्ट करणें; खराब करणें. –**का पुतला**–माणसाचें शरीर. –**के मोल**– मातीमोलानें; अत्यंत स्वस्त. –**ख़राब होना**– १. अंत्येष्टि क्रिया योग्य प्रकारें न होणें. २. धूळधाण होणें. –**डालना**– दोष झांकणें. –**देना**–माती देणें; मृत शरीर गाडणें; पुरणें. –**पलीद करना**– दुर्दशा करणें; धूळधाण करणें. –**में मिलना**– नष्ट होणें.

मिट्ठू–*पु.* पोपट. –*वि.* गोड–बोल्या. **मु०–अपने मुँह मियाँ मिट्ठू बनना**–स्वतःच्या तोंडानें स्वतःची तारीफ करणें.

मिठ– 'मीठा' चें समासांतील रूप. –**बोला**–*वि.* १. गोडबोल्या. २. वरपांगीं गोड बोलणारा.–**लोना** –*वि.* अळणी; कमी मीठ असलेला (पदार्थ).

मिठाई– *स्त्री.* मिठाई; पक्वान्न.

मिठास– *स्त्री.* गोडी; माधुरी; माधुर्य.

मिड़ना*– *क्रि. अ.* चिकटणें.

मिड़ाई– *स्त्री.* १. मळणी. २. मळणीची मजुरी. ३. रंग धुलाईची क्रिया.

मिताई*– *स्त्री.* मित्रता; मैत्री.

मिती– *स्त्री.* १. तीथि. २. हुंडी इ० भरण्याची तारीख. **–काटा**–*पु.* कटमिती; व्याजाची एक पद्धत. **मु०–काटना**– व्याज कापणें. **–पूजना** –हुंडीची मुदत भरणें.

मितोपभोगयोजना– *स्त्री.* काटकसरीची योजना; 'ऑस्टेरिटी स्कीम'.

मित्त*–*पु.* मित्र.

मित्र–*पु.* १. दोस्त; मित्र. २. सूर्य. **–राष्ट्र**–*पु.*; **–शक्ति**–*स्त्री.* मित्रराष्ट्र; 'ॲलाइड पॉवर'.

मिथ्या– *वि.* खोटें; असत्य. **–नाम**–*पु.* चुकीचें नांव; 'मिसनोमर'. **–वादी**; **–भाषी**–*पु.* खोटें बोलणारा.

मिथ्यारोपण–*पु.* बदनामी; आळ; 'व्हिलिफिकेशन'.

मिन– *प्रत्य.* [*अ.*] नें; पासून; वर; चा. **–जानिब**–*अव्य.* च्या बाजूनें; कडून. **–जुमला**–*अव्य.* सर्वांपैकीं; एकूणांपैकीं.;

मिनकना[+]– *क्रि. अ.* मीतमीत किंवा हळू बोलणें.

मिनकार–*पु.* [*अ.*] १. पक्ष्याची चोंच. २. गिरमिट. [६० सेकंद.

मिनट–*पु.* [*इं.*] मिनिट;

मिनती[+]–*स्त्री.* विनंती; प्रार्थना.

मिन–मिन–*अव्य.* नाकांतून आवाज काढीत. – *स्त्री.* नाकांतील, गेंगाणा आवाज.

मिनहा–*पु.* [*अ.*] कपात; घट. –*वि.* मजुरी काढून घेतलेली (रक्कम); कपात केलेली. **–ई**–*स्त्री.* कपात.

मिन्नत– *स्त्री.* [*अ.*] विनंती; विनवणी; मनधरणी. **–गुज़ार**–*वि.* कृतज्ञ. **मु०–उठाना**–कृतज्ञ होणें.

मिमियाना– *क्रि. अ.* बें-बें करणें; शेळीचें ओरडणें.

मियाँ– *पु.* [*फा.*] १. सरदार; मालक; स्वामी. २. पति. ३. महाशय (मुसलमानाकरितां). ४. मुसलमान. ५. म्हातारा. **–मिट्ठू**–*वि.* १. गोडबोल्या. २. मठ्ठ. –*पु.* १. लहान मूल. २. पोपट. **मु०–की जूती मियाँ के सर**– ज्याचे दांत त्याच्याच घशांत घालणें. **(अपने मुँह)–मिट्ठू बनना**–पा० 'मिट्ठू'. **–मिट्ठू बनाना**–पोपटपंची करावयास लावणें.

मियाद– *स्त्री.* पा० 'मीआद'.

मियान–*पु.* [*फा.*] १. मधला भाग. २. म्यान; खोळ. **–दारी** – *स्त्री.* दलाली.

मियाना– *वि.* [*फा.*] मध्यम आकाराचा; मधला. –*पु.* १. मेणा; पालखी. २. हारांतील मधला मोठा मोती. **–क़द**–*वि.* मध्यम आकाराचा.

मियानी– *स्त्री.* [*फा.*] विजारीचा मधला भाग. –*वि.* मधला.

मिरग*–*पु.* मृग; हरिण.

मिरगी– *स्त्री.* अपस्मार रोग; फेंफरें. [२. लाल तिखट.

मिरच–चा–*पु.* १. लाल मिरची.

मिरज़ई–*स्त्री.* [*फा.*] १. कमरेपर्यंतचा, बंद असलेला अंगरखा. २. बंडी.

मिरज़ा–*पु.* [*फा.*] १. राजपुत्र; सरदाराचा मुलगा. २. मोगलांची पदवी.

मिर्च– *स्त्री.* १. काळें मिरें. २. लाल मिरची; तिखटाची पूड. **मु०–(चें) लगना**– नाकाला मिरच्या झोंबणें; असह्य होणें.

मिल– *स्त्री.* [*इं.*] गिरणी. **–मज़दूर**– *पु.* गिरणी-कामगार. **–महाल**–*पु.* गिरणगांव; गिरणी कामगारांची वस्ती.

मिलकियत– *स्त्री.* [*अ.*] संपत्ति; मिळकत.

मिलता–जुलता–*वि.* मिळताजुळता; जवळजवळ सारखा.

मिलन–*पु.* १. भेट; मिलाफ; मीलन. २. मिसळ; मिश्रण.

मिलनसार–*वि.* १. मनमिळाऊ. २. सुशील; सुस्वभावी.

मिलना–*क्रि. स.* १. मिळणें; प्राप्त होणें. २. मिसळणें; सम्मिलित होणें; पदार्थ एकजीव होणें. ३. जुळणें. ४. समसमान असणें. ५. भेटणें. ६. सलोखा होणें. ७. आलिंगन देणें. **मु० मिलजुलकर**–मिळून मिसळून. **– जुलना** – भेटणें; मिसळणें; मिळून मिसळून असणें.

मिलनी– *स्त्री.* लग्नामध्यें वधूपक्षांतील मंडळींनीं वर पक्षांतील मंडळींना आलिंगन देऊन भेटण्याची व त्यांना पैसे देण्याची रीत.

मिलवाना–*क्रि. स.* भेटविणें; भेटावयास लावणें; मीलन घडवून आणणें.

मिलाई– *स्त्री.* १. भेटविणें. २. भेट. ३. पा० 'मिलनी'. ४. मिसळणें.

मिलाजुला–*वि.* १. मिश्रित; भेसळ. २. मिसळलेला; लागलेला; सारखा.

मिलान–*पु.* १. तुलना. २. तपासणी. ३. पडताळून पाहाणें. ४. मेळ; संबंध जोडणें. **–केंद्र**–*पु.* मुख्य दूरवाणी ('टेलिफोन') कार्यालय; 'टेलिफोन एक्स्चेंज'.

मिलाना–*क्रि. स.* १. मिसळणें; एकत्र करणें. २. जोडणें; चिकटविणें; जुळविणें. ३. तुलना करणें. ४. तपासणें. ५. परिचय किंवा भेट करविणें. ६. सलोखा घडविणें. ७. फितविणें; सामील करून घेणें.

८. सूर मिळविणें. [मिलाफ; मैत्री.

मिलाप–१. भेट; मुलाखत. २.

मिलावट– *स्त्री*. भेसळ; मिसळ; मिश्रण.

मिलौना+–*क्रि. स*. १. धार काढणें. २. पा० 'मिलानी'. –*पु*. भेट; मिलाफ; मीलन. [' मिलनी'.

मिलौनी– *स्त्री*. भेसळ. २. पा०

मिल्क–*स्त्री*. [*अ.*] १. जमिनीची मालकी; जमीनदारी. २. माफीची जमीन. ३. मालकी.

मिल्कि (ल्की) यत– *स्त्री*. [*अ.*] १. जमिनीचा मालकी हक्क. २. मालमत्ता; जहागीर; मिळकत; 'इस्टेट.'

मिल्लत– *स्त्री*. [*अ.*] १. धर्म. २. संप्रदाय; पंथ.

मिल्ली–वि. [*अ.*] जातीय; सांप्रदायिक; पंथ, धर्म, इ० संबंधींचा.

मिशन–*पु*. [*इं.*] ध्येय; जीवितकार्य; 'मिशन'.

मिश्र–*वि*. मिसळलेला; संयुक्त. –*पु*. १. ब्राह्मणांच्या एका पोटजातींतील आडनांव. २. पा० 'मिस्र'. –*पु*. रास; रक्कम; 'अमाउंट'. –**धातु**–*स्त्री*. भेसळ; हिणकस धातु; 'अॅलॉय'.

मिश्री– *स्त्री*. पा० 'मिस्री'.

मिस–*पु*. [*फा.*] तांबें.

मिस–*पु*. मिष; बहाणा. –**हा*** –*वि*. फसव्या; बहाणा करणारा.

मिस– *स्त्री*. [*इं.*] कुमारी; अविवाहित स्त्री.

मिसकीन–*वि*. [*अ.*] १. गरीब; निर्धन. २. दीन; दुबळा.

मिसर–*पु*. पा० 'मिस्र'.

मिसरा– *पु*. [*अ.*] उर्दू किंवा फारसी कवितेचा एक चरण.

मिसरी– *स्त्री*. पा० 'मिस्री'.

मिसल– *स्त्री*. पा० 'मिसिल'.

मिसाल– *स्त्री*. [*अ.*] दृष्टांत; उपमा. २. उदाहरण; नमुना. ३. म्हण.

मिसाली–*वि*. [*अ.*] दृष्टांतरूप.

मिसिल– *स्त्री*. [*अ.*] १. खटला, दावा इ०चे कागदपत्र; 'फाईल'. २. क्रमानें लावलेले छापील फॉर्म.

मिस्कीन–*वि*. [*अ.*] १. कंगाल; गरीब; उपाशी. २. दीन; असहाय्य.

मिस्कीनी– *स्त्री*. [*अ.*] दारिद्र्य; दीनता.

मिस्कोट–*पु*. १. जेवण; जेवणावळ. २. एका टेबलावर किंवा पंक्तींत बसून जेवणारे. ३. खलबत.

मिस्टर–*पु*. [*इं.*] १. श्रीयुत; महाशय; पति.

मिस्तरी–*पु*. [*इं.*] हस्तकुशल कारागीर (सुतार वगैरे); मिस्त्री. –**खाना**–*पु*. सुतार, लोहार इ० चें दुकान, किंवा 'वर्कशॉप'.

मिस्र–*पु*. [*अ.*] ईजिप्त देश.

मिस्री–*वि*. ईजिप्तचा; ईजिप्तविषयक. –*पु*. मिसर (ईजिप्त) देशाचा निवासी; ईजिप्शियन. –*स्त्री*. १. मिसर देशाची भाषा. २. खडीसाखर. **मु०–की डली**–अत्यंत गोड वस्तु. [तुल्य; सदृश

मिस्ल–*वि*. [*अ.*] समान;

मिस्सा–*पु*. अनेक डाळी मिसळून त्यांचें केलेलें पीठ. भाजणी; मेतकूट.

मिस्सी– *स्त्री*. [*फा.*] मिश्री (दांतवण); काळें दंतमंजन. –**काजल**–*पु*. नट्टापट्टा. –**दान**–*पु*.; –**दानी**– *स्त्री*. मिश्री ठेवण्याची डबी.

मिहँदी; **मिहनत**; **मिहराब** इ०– पा० 'मेहँदी'; 'मेहनत'; 'मेहराब' इ०.

मिहानी*– *स्त्री*. रवी.

मिहिर–*पु*. १. सूर्य. २. चंद्र. ३. ढग. ४. वायु. ५. वराहमिहिर. –*वि*. म्हातारा. [गीर; गर.

मींगी– *स्त्री*. बीच्या आंतील

मींजना–*क्रि. अ*. १. चुरगाळणें; कुस्करणें. २. चोळणें.

मींड– *स्त्री*. संगीतांत एका स्वरावरून दुसऱ्या स्वरावर सफाईनें जाणें; नाजुक ढंगानें उत्पन्न केलेली स्वराची वक्रता; मेंड. [कुस्करणें.

मींडना*– *क्रि. स*. दाबणें;

मीआद– *स्त्री* [*अ.*] अवधि; मुदत. **मु०–गुज़रना**–मुदत टळणें. –**बोलना**–कैदेची शिक्षा सुनावणें.

मीआदी–*वि*. [*अ.*] १. मुदतीचा. २. शिक्षा झालेला. –**बुख़ार** –*पु*. मुदतीचा ताप; 'टॉयफाइड'.

मीच*– *स्त्री*. मृत्यु.

मीचना–*क्रि. स*. (डोळे) बंद करणें, मिटणें. [कुस्करणें.

मीजना+–*क्रि. स*. मळणें;

मीज़ान– *स्त्री*. [*अ.*] १. बेरीज. २. तराजू. ३. तूळ रास. –(**ने**) **कुल** –*पु*. एकूण बेरीज; 'ग्रँड टोटल'. **मु०** –**मिलना**– जमाखर्चाची तोंडमिळवणी होणें.

मीठा–*वि*. १. गोड. २. स्वादिष्ट; रुचकर. ३. मंद; हळू. ४. हिजडा. –*पु*. १. गोडी. २. गूळ, साखर इ० गोड वस्तु. ३. मिठाई. –**आलू**– –*पु*. रताळें. –**चावल**–*पु*. साखरभात. –**ज़हर** *पु*. बचनाग; सोमल. –**तेल**–*पु*. गोडें तेल (तिळाचें). –**नीबू**– *पु*. पपनस; महाळुंग. –**पानी**–*पु*. 'लेमोनेड'; 'लेमन'. –**बरस**– *पु*. स्त्रीचें अठरावें वर्ष (स्त्रिया हें वर्ष अशुभ मानतात). –**मीठा**– *वि*. किंचित्; थोडासा (ठणका).

मीठी–*वि. स्त्री.* गोड; प्रिय; मधुर. –**छुरी**–*वि.* विश्वासघातकी; गोड बोलून घात करणारा. –**नींद**-*स्त्री.* सुखाची, गाढ झोंप. –**मार**–*स्त्री.* मुका मार.

मीड़–*स्त्री.* एका स्वरावरून दुसऱ्या स्वरावर जाण्याचा एक सुंदर ढंग (संगीत).

मीड़की*–*स्त्री.* बेडकी.

मीत+–*पु.* मित्र.

मीन–*पु.* १. मासा. २. मीन राशि. **मु० –मेष–ख करना**–टाळाटाळ करणें; सबबी सांगणें. –**मेख निकालना**– दोष काढणें; खुसपट काढणें. –**मेख होना**–गोंधळ असणें.

मीना–*पु.* [*फा.*] १. नील मणी. २. रंगीत नक्षी काम. ३. दारूचा पेला. ४. मध. –**कार**–*पु.* सोन्या-चांदीवर नक्षीकाम करणारा. –**कारी**– *स्त्री.* सोन्या-चांदीवरील रंगीत नक्षीकाम. –**बाज़ार**–*पु.* १. जवाहिऱ्यांची पेठ. २. सुंदर वस्तूंची पेठ. ३. जेथें विक्रीचें काम स्त्रियाच करतात असा बाजार.

मीनार– *स्त्री.* [*अ.* ' मनार '] १. मनोरा. २. स्तंभ.

मीयाद– *स्त्री* पा० ' मीआद '.

मीर–*पु.* [*फा.*] १. नेता; पुढारी; सरदार. २. धार्मिक आचार्य. ३. सय्यदांची पदवी. ४. चढाओढींत पहिला येणारा. ५. पत्त्यांतील राजा. –**अरब**–*पु.* अरबस्तानचा नेता; मुहम्मद पैगंबर. –**अर्ज़**–*पु.* बादशाहापुढें लोकांचे अर्ज ठेवणारा. –**आतिश**–*पु.* तोफखान्यावरील मुख्य अधिकारी. –**काफ़िला**; –**कारवाँ**–*पु.* तांड्याचा सरदार. –**फ़र्श**–*पु.* १. पेपरवेट. २. बैठकीची सतरंजी नीट ठेवण्याकरितां चारी कोपऱ्यांवर ठेवण्यांत येणारे दगड. –**बख़्शी**–*पु.* पगार वांटणारा अधिकारी; ' पेमास्टर जनरल '. –**भुचड़ी**–*पु.* एक काल्पनिक वीर. हा आपला मूळ पुरुष आहे असें हिजडे मानतात व त्याला भजतात. –**मजलिस**–*पु.* अध्यक्ष; सभापति. –**मुंशी**–*पु.* १. मुख्य कारकून; ' हेडक्लार्क '. २. शिरस्तेदार; ३. मुख्य सचिव.

मीरास– *स्त्री.* [*अ.*] वडिलार्जित संपत्ति; मिरासदारी; वारसा.

मीरासी–*पु.* [*अ.*] गाण्या-बजावण्याचा धंदा करणारी एक मुसलमान जाति; कलावंत. [–*स्त्री.* **मीरास(सि)न**]. [येणारा मुलगा.

मीरी–*पु.* खेळ इ०त पहिला

मील–*पु.* [*इं.*] मैल. **मु०–के पत्थर**– अंतर किंवा प्रगति दर्शविणाऱ्या खुणा. [२. आकुंचित.

मीलित–*वि.* १. बंद केलेला.

मुँगरा–*पु.* १. लांकडी हातोडा; २. मुदगल; करेला.

मुँगरी– *स्त्री.* लहान मोगरा; ठोकणी; मेखसू. [डाळीचा वडा.

मुँगौरी– *स्त्री.* मूगवडी; मुगाच्या

मुंचित*–*वि.* मुक्त; खुला.

मुंड–*पु.* १. डोकें; मुंडकें. २. मुंडन केलेलें किंवा धडावेगळें केलेलें डोकें. –**क**–*पु.* 'कॅपिटुलम'. –**कर**–*पु.* दरडोई कर; 'पोलटॅक्स'.

मुँडचिरा–*पु.* १. डोकीला किंवा अंगावर जखमा करून घेऊन भिक्षा मागणारे फकीर. २. हुज्जत घालणारा.

मुँड़ना–*क्रि. अ.* १. मुंडण होणें. २. लुटलें जाणें. ३. फसणें. –*क्रि. स.* मुंडण करणें.

मुंडा–*वि.* १. टक्कल असलेला. २. हजामत केलेला. ३. बिन शिंगाचा. –*पु.* १. एक प्रकारचा जोडा. २. एक आदिवासी जाति. –*स्त्री.* १. एक मोडीसारखी लिपि. २. मुंडा लोकांची भाषा.

मुँड़ाई– *स्त्री.* १. हजामत. २. हजामतीची मजुरी. [मुंडासें.

मुँडासा–*पु.* कोशा; रुमाल;

मुँड़िया*–*पु.* संन्यासी; मुंडन केलेला साधु. –*स्त्री.* पा०'मुडिया.'

मुंडी–*स्त्री.* मुंडन केलेली सोंवळी बाई; विधवा.

मुँड़ेर–रा–*पु.* १.वरवंडी (लहान भिंत); छपराच्या वर आलेला भिंतीचा भाग; गच्चीची भिंत; ' पॅरॅपिट वॉल '. २. शेताचा बांध.

मुँड़ेरी– *स्त्री.* लहान वरवंडी.

मुंतक़िल–*वि.* [*अ.*] स्थानांतरित; हस्तांतरित.

मुंतख़ब–*वि* [*अ.*] १ निवड केलेला; निवडून आलेला. २ निवडक; सुंदर.

मुंतज़िम–*वि.* [*अ.*] १. व्यवस्थापक; बंदोबस्त ठेवणारा. २. काटकसरी.

मुंतज़िर–*वि.* [*अ.*] प्रतीक्षा करणारा; वाट पाहाणारा.

मुंतशिर–*वि.* [*अ.*] १. विखुरलेला; विस्कटलेला. २. दुर्दशाग्रस्त. ३. उद्विग्न.

मुँदना–*क्रि. अ.* १. बंद होणें; मिटणें. २. लपणें; गुप्त होणें; बुजणें (छिद्र, खळगा इ०).

मुंदरज–*वि. अ.* १. नमूद केलेला; लिहिलेला. २. अंतर्गत; सम्मिलित.

मुँदरा–*पु.* १. योग्याच्या कानांतील कुंडल. २. कानांतील एक दागिना. [सल्ला.

मुँदरिया; मुँदरी–*स्त्री.* आंगठी;

मुंशी–*पु.* [*अ.*] १. लेखक;

कारकून. २. उर्दू–फारसी शिकविणारा शिक्षक.

मुंस+–*पु.* पति; दादला.

मुंसरिम– *पु.* [*अ.*] १. व्यवस्थापक. २. कोर्ट, कलेक्टर कचेरी इ० ठिकाणीं असलेला मुख्य अधिकारी; 'हेडक्लार्क'; 'अॅडमिनिस्ट्रेटर'.

मुंसिफ़– *पु.* [*अ.*] १. मुन्सफ. २. न्याय करणारा; न्यायाधीश.

मुंसिफ़ाना– *वि.* [*अ.*] न्यायोचित; न्याययुक्त; न्याय्य.

मुंसिफ़ी– *स्त्री.* १. मुन्सफी. २. मुन्सफ कचेरी. ३. न्यायशीलता.

मुँह––*पु.* १. तोंड; मुख. २. चेहरा. ३. वस्तूचा वरील भाग. ४ भोंक; छेद. ५. सामर्थ्य; हिम्मत. – *अव्य.* कडे; दिशेला.– **अँधियारे**; **–अँधेरे**; **–उजाले** **–***अव्य.* भल्या पहांटे. **–अखरी–**** *वि.* तोंडपाठ. – **काला** – *पु.* बेइज्जती; बदनामी. **–चुप्पा**– *वि.* अबोल. बेइज्जती; बदनामी. **–छुट** – *वि.* फटकळ. **–ज़ोर**– *वि.* १. तोंडाळ; मुजोर. २. फटकळ. ३. उच्छृंखल; उद्धट. **–ज़ोरी**– *स्त्री.* मुजोरी; भांडकुदळपणा. **–झौंसा**– *वि.* जळतोंडचा (शिवी). **–तोड़**– *वि.* सडेतोड; ठणठणीत; निरुत्तर करणारा. **–दिखाई**– *स्त्री.* १. लग्नाच्या वेळीं सासूनें वधूचें तोंड पाहाण्याचा विधि; सुनमुख. २. सुनमुखाच्या वेळीं दिलेलें धन, दागिना इ.– **देखा**–*वि.* तोंडदेखला; वरवरचा.– **धराई**– *स्त्री.* लांच. **–नाल**– *स्त्री.* हुक्क्याची नळी.**–फट**–*वि.* फटकळ; तोंडाळ.**–बोला**– *वि.* १. मानलेला (भाऊ इ०). २. तोंड देखलें; खोटेंनाटें. [–*स्त्री.* **मुँहबोली**]. **–भराई** –*स्त्री.* लांचलुचपत. **–माँगा** –*वि.* मागितलें असेल तितकें; यथेच्छ. – **लगा**–*वि.* लाडावलेला; चढवून ठेवलेला; उद्धट. **मु०–आना** –तोंड येणें; तोंडांत फोड येणें. **–इतना-सा निकल आना**– चेहरा कृश होणें; तोंड उतरणें. – **उजला होना**– बेइज्जतीपासून बचावणें. **–उठा कर कहना**– विचार न करितां तोंडाला येईल तें बोलणें. **–उतरना**– तोंड उतरणें; उदास, दुःखी होणें.– **करना**– १. फोड फुटणें. २. तोंड पाडणें.– **काला करना**– १. तोंड काळें करणें. २. कलंकित होणें, करणें; दुष्कर्म करणें. – **की खाना**– १. तोंडघशीं पडणें; थप्पड बसणें. २. अपमानित, बदनाम होणें. – **की या मुँहसे बात छीनना**– एका व्यक्तीला जें बोलावयाचें असेल तें आधींच दुसऱ्या व्यक्तीनें बोलून टाकणें. –**के कौए उड़ जाना**– १. घाबरगुंडी उडणें. २. खिन्न होणें. – **के बल गिरना**– तोंडघशीं पडणें. – **खिल जाना**– कळी खुलणें; खुष होणें– **चढ़ाना**– डोक्यावर बसविणें; लाडावून ठेवणें.– **चलाना**– १. खाणें. २. बडबड करणें. **–चिढ़ाना** -वेडावणें; चिडविणें; नक्कल करणें.**–चुराना**; – **छि(छु)पाना**– तोंड लपविणें; शरमिंदा होणें. – **जुठारना या जूठा करना**– नाममात्र खाणें. **–त(ता)कना**– १. आशाळभूतपणें पाहाणें. २. थक्क होऊन पाहाणें. **–थुथाना**– १. गाल फुगविणें. २. राग किंवा खिन्नता व्यक्त करणें. – **पड़ना**– हिम्मत, धैर्य होणें. – **पर लाना**– बोलणें; सांगणें. **–पर हवाइयाँ उड़ना**– तोंड उतरणें; घाबरगुंडी वळणें. – **पेट चलना**– वांत्या जुलाब होणें. – **फुलाना**– रुसणें; रागावणें. **–फेर लेना**– १. पाठ फिरविणें. २. नाराज होणें. **–बनाना**–तोंड वेडें-वाकडें करणें; रागावणें – **भरना** – १. लांच देणें. २. तोंड बंद करणें. **–मारना**– १. थोडेसें चरणें. २. चावणें. – **मीठा करना**– १. तोंड गोड करणें. २. लांच, इनाम इ० देणें. – **मीठा होना**– १. एखाद्याकडून कांहीं मिळणें. २. सोयरीक ठरणें. – **में ख़ून लगना**– चटक लागणें. **–में ज़बान रखना या होना**– बोलतां येणें; बोलण्याची हिम्मत असणें. – **में पानी भर आना**– तोंडाला पाणी सुटणें; लोभ सुटणें. – **में लगाम न होना**–जिभेला हाड नसणें.– **मोड़ना**– १. तोंड, पाठ फिरविणें. २. नाकारणें. **-लगना** – हुज्जत घालणें.– **लगाना** चढवून ठेवणें; लाडावून ठेवणें. – **लटकाना** – गाल फुगविणें; तोंडावरून खिन्नता, रोष इ० व्यक्त करणें. **(अपना–सा)** – **लेकर रह जाना** – इवलेंसें तोंड करून बसणें; लज्जित होऊन गप्प राहाणें. – **से फूल झड़ना** – गोड बोलणें; उत्तम व्याख्यान देणें. **–ही मुँह में** – तोंडांतल्या तोंडांत; हळूच.

मुँहाचही*– *स्त्री.* १. बोलचाल. २. प्रणयी स्त्रीपुरुषांनीं एकमेकांच्या तोंडाकडे पाहात राहाणें.

मुँहामुँह–*अव्य.* कांठोकांठ.

मुँहासा–*पु.* तारुण्यपीटिका; मुरुम.

मुअज़्ज़म–*वि.* [*अ.*] १. पूज्य; अत्यंत आदरणीय. २. प्रतिष्ठित (व्यक्ति). [प्रतिष्ठित.

मुअज़्ज़िज़–*वि.* [*अ.*] अब्रूदार;

मुअज़्ज़िन–*पु.* [*अ.*] नमाजाच्या वेळीं मशिदींतून लोकांना प्रार्थने-

साठीं बोलावणारा; बांग देणारा.

मुअत्तल–*वि.* [*अ.*] १. थोड्या मुदतीपुरता कामावरून दूर केलेला; सस्पेंड केलेला. २. निरुपयोगी झालेला.

मुअन्नस–*पु.* [*अ.*] स्त्रीलिंग.

मुअम्मा–*पु.* [*अ.*] कोडें; रहस्य. [श्रेष्ठ; प्रतिष्ठित.

मुअल्ला–*वि.* [*अ.*] उच्च;

मुअल्लिम–*वि.* [*अ.*] शिक्षण देणारा; शिक्षक. [प्रभावशाली.

मुअस्सिर–*वि.*[*अ.*] गुणकारक;

मुआ–*वि.* १. मृत; मेलेला. २. निर्लज्ज; मेला (वा०).–**बादल** –*पु.* स्पंज. –[*स्त्री.* **मुई**].

मुआइना–*पु.* [*अ.*] तपासणी; निरीक्षण.

मुआफ़–*वि.* [*अ.*] माफी मिळालेला; क्षमा केलेला; माफ.

मुआफ़िक़–*वि.*[*अ.*] १. समान; सदृश. २. अनुकूल; अनुसार.

मुआफ़िक़त– *स्त्री.* [*अ.*] अनुकूलता; मेळ.

मुआफ़ी– *स्त्री.* [*अ.*] माफी.

मुआमला–*पु.* पा० 'मामला'.

मुआयना–*पु.* [*अ.*] तपासणी; निरीक्षण.

मुआवज़ा–*पु.* [*अ.*] १. नुकसानभरपाईची रक्कम. २. मोबदला.

मुआह(हि)दा–*पु.* [*अ.*] करारनामा; करार.

मुकतई*– *स्त्री.* मुक्ति; मोक्ष.

मुकता*–*पु.* मोती –*वि.*+ पुष्कळ. [मोत्यांची माळ.

मुकतालि*– *स्त्री.* मुक्तावली;

मुक़दमा–*पु.* [*अ.*] खटला; दावा.–(**से**)**बाज़**–*पु.* कज्जेदलाल; मुकदमेबाज; कोर्टकचेरीची आवड असलेला.

मुक़द्दम–*वि.* [*अ.*] १. पहिला; उच्च; श्रेष्ठ. २. अवश्य कर्तव्य. –*पु.* गांवचा पुढारी; मुकादम.

मुक़द्दमा–*पु.* [*अ.*] १. खटला; दावा. २. प्रस्तावना. ३. आरंभ.

मुक़द्दर–*वि.* [*अ.*] १. मळकट; घाणेरडा. २. असंतुष्ट. –*पु.* नशीब; भाग्य.

मुक़द्दस–*वि.* [*अ.*] पवित्र.

मुकना*–*क्रि.* *अ.* १. मुक्ति मिळणें; सुटका होणें. २. संपणें. –*पु.* १. बिन दातांचा हत्ती. २. बिनमिश्यांचा पुरुष.

मुकम्मल–*वि.* [*अ.*] संपूर्ण; अखंड. [करणारा.

मुकम्मिल–*वि.* [*अ.*] पूर्ण

मुकरना–*क्रि.* *अ.* [*अ.*] बोलल्याप्रमाणें न वागणें; दिलेलें वचन मोडणें.

मुकरनी; मुकरी– *स्त्री.* आधीं सांगितलेल्या गोष्टींचें शेवटच्या चरणांत खंडन असलेली उखाण्यासारखी कविता.

मुकर्रम–*वि.* [*अ.*] आदरणीय; पूज्य. [–*स्त्री.* **मुकर्रमा**].

मुकर्रमी–*अव्य.* [*अ.* 'मुकर्रम'चें संबोधन–रूप] हे मान्यवर, महाशय.

मुक़र्रर–*वि.* [*अ.*] १. ठरविलेला; निश्चित केलेला. २. नेमणूक झालेला; मुक्रर. –*अव्य.* अवश्य; निश्चित.

मुकर्रर–*वि.* [*अ.*] पुनः सांगितलेला; द्विरुक्त. – *अव्य.* पुन्हां; फिरून. [वक्ता.

मुक़र्रिर–*वि.* [*अ.*] बोलणारा;

मुकलाना–* *क्रि.* *स.* उघडणें; उघडें करणें.

मुकलावा–*पु.* १. वधूचा वरगृहप्रवेश; नववधूनें नांदावयास जाणें. २. ऋतुशांति.

मुक़व्वी–*वि.* [*अ.*] पौष्टिक.

मुक़ाब(बि)ला–*पु.* [*अ.*] १. तोड; सामना; बरोबरी. २. तुलना. ३. लढाई; भांडण. ४. टक्कर.

मुक़ाबिल–*अव्य.* [*अ.*] समोर; प्रत्यक्ष. –*वि.* प्रतिस्पर्धी; बरोबरी करणारा.

मुक़ाम–*पु.* [*अ.*] १. मुक्काम. २. मुक्कामाची जागा. ३. अवसर; वेळ. ४. घर. ५. साधकाची अवस्थानभूमि; भूमिका.

मुक़ामी–*वि.* [*अ.*] स्थानिक; स्थानीय; 'लोकल'.

मुकियाना+–*क्रि.* *स.* १. अंग रगडण्यासाठीं हळूहळू बुक्क्या मारणें; बुकलणें. २. हलकेच ठोसे लगावणें; मारणें.

मुकुट–*पु.* मुकुट; किरीट.

मुकुत*–*वि.* मुक्त. –*पु.* मोती.

मुकुताहल*–*पु.* मोती.

मुकुर–*पु.* १. आरसा. २. कळी. ३. बकुळ. ४. कुंभाराचें दांडकें.

मुकुल–*पु.* १. कळी; किंचित् उमललेली कळी. २. शरीर. ३. आत्मा. [बंदी.

मुक़ैयद–*वि.*[*अ.*] कैद केलेला;

मुक्का–*पु.* बुक्का; ठोसा. –(**क्के**)**बाज़ी**–*स्त्री.* १. ठोसाठोशी. २. 'बॉक्सिग'.

मुक्की– *स्त्री.* १. बुक्की; मुष्टियुद्ध. २. अंग चेपण्यासाठीं हळूहळू बुक्क्या मारणें.

मुक्त–*वि.* सुटलेला; बंधनरहित. –**कोशिका निर्माण**–*पु.* मुक्त पेशी-निर्मिति; 'फ्री सेल फॉर्मेशन'. –**वाणिज्य**; –**व्यापार**–*पु.* खुला व्यापार; 'फ्री ट्रेड'. –० **नीति**– *स्त्री.* खुल्या व्यापाराचें धोरण; 'फ्री ट्रेड पॉलिसी'.

मुक्तक–*पु.* १. मोती. २. स्फुट कविता. ३. निर्यमक छंद. –**काव्य**–*पु.* स्फुट काव्य.

मुक्ता– *स्त्री.* १. मोती; मोत्यें. २. वेश्या. –**हल***–*पु.* मुक्ताफळ; मोती.

मुक्ति– *स्त्री.* १. मोक्ष. २. सुटका; 'ॲक्विटल'. –**फ़ौज**–*स्त्री.* पा० 'मुक्तिसेना'. –**युद्ध**–*पु.* मुक्तिसंग्राम; 'वॉर ऑफ लिबरेशन'. –**सेना**– *स्त्री.* मुक्तिसैन्य; 'साल्व्हेशन आर्मी'.

मुख–*पु.* १. तोंड. २. दार; दरवाजा. –**पत्र**–*पु.* मुखपत्र; 'ऑर्गन'. –**पात्र**–*पु.* प्रवक्ता; 'स्पोक्समन'. –**बंध**; –**बंधन**–*पु.* पुस्तकाची प्रस्तावना. –**बंधनी**–*स्त्री.* मुसकी; मुस्कें. –**रोधक (मुखावरोधक) अधिनियम**–*पु.* भाषण-बंदीचा कायदा; 'गॅगिंग ॲक्ट'. –**रोधन**–*पु.* भाषणबंदी; 'गॅगिंग'.

मुखच्छद–*पु.* मुखवटा; 'मास्क'.

मुखड़ा–*पु.* चेहरा; तोंड.

मुख़तार–*पु.* [*अ.*] १. प्रतिनिधि; मुखत्यार. २. वकिली करणारा वकिलापेक्षां खालचा एक वर्ग. –**कुल**–*पु.* कुलमुखत्यार; सर्वाधिकारी. –**नामा**–*पु.* मुखत्यारपत्र; अधिकारपत्र.

मुख़तारी–*स्त्री.* [*अ.*] मुखत्यारी.

मुखनी+– *स्त्री.* मुख्य स्त्री किंवा कार्यकर्त्री.

मुख़बिर–*पु.* [*अ.*] १. हेर; गुप्तचर. २. माफीचा साक्षीदार.

मुख़बिरी– *स्त्री.* हेरगिरी.

मुख़म्मस–*वि.* [*अ.*] पंचकोनी. –*पु.* पांच चरणांची कविता.

मुखर–*वि.* १. अप्रिय बोलणारा. २. मर्मभेदी बोलणारा. ३. बडबड्या. [मान; प्रतिध्वनित.

मुखरित–*वि.* ध्वनित; शब्दाय-

मुखाकृति– *स्त्री.* चेहरा.

मुख़ातिब–*पु.* उद्देशून बोलणारा; संबोधणारा. –*अव्य.* उद्देशून; संबोधून.

मुखापेक्षी–*वि.* दुसऱ्याच्या तोंडाकडे आशाळभूतपणें पाहाणारा; पराश्रित.

मुख़ालिफ़–*पु.* [*अ.*] विरोधक; आक्षेपक. –*वि.* विपरीत; उलटा.

मुख़ालिफ़त– *स्त्री.* [*अ.*] विरोध; शत्रुत्व.

मुखिया–*पु.* १. पुढारी; मुख्य व्यक्ति. २. गांवचा पाटील.

मुख़िल–*वि* [*अ.*] अडथळा, विघ्न आणणारा.

मुख़्तलिफ़– *वि.* [*अ.*] १. वेगळा; निरनिराळा. २. अन्य; दुसरा.

मुख़्तसर– *वि.* [*अ.*] १. थोडक्यांत सांगितलेलें; संक्षिप्त. २. लहान.

मुख़्तार– *पु.* पा० 'मुख़तार'.

मुख्य– *वि.* प्रमुख; मुख्य; श्रेष्ठ.–*पु.* पुढारी. –**निर्वाचन आयुक्त**–*पु.* मुख्य निवडणूक अधिकारी; 'चीफ इलेक्शन-कमिशनर'. –**न्यायाधिपति**–*पु.* सर न्यायाधीश; 'चीफ जस्टिस'. –**न्यायाधीश**–*पु.* 'चीफ जज'.–**मंत्री**–*पु.* मुख्य मंत्री; 'चीफ मिनिस्टर'.

मुख्यालय– *पु.* मुख्य ठिकाण; ठाणें; 'हेडक्वार्टर'.

मुख्याधिष्ठाता– *पु.* 'रेक्टर'.

मुगदर– *पु.* जोडी; (व्यायामाची); मुगदल; करेला.

मुग़ल– *पु.* [*फा.*] मोगल.

मुग़लानी– *स्त्री.* [*फा.*] १. मोगल स्त्री. २. अंत:पुरांतील दासी. ३. शिवणकाम करणारी बाई.

मुग़लि(ली)या– *वि.* [*फा.*] मोगलांचा. –**ख़ानदान**– *पु.* भारतांतील मोगल राजवंश.

मुग़ालता– *पु.* [*अ.*] फसवणूक; दगा; भ्रम.

मुग्घम– *वि.* मोघम; अस्पष्ट.

मुग्ध– *वि.* १. मोहित; माळलेला. २. सुंदर. ३. मूढ; मूर्ख. ४. भोळा.

मुग्धा– *स्त्री.* तारुण्यांत पदार्पण केलेली सरळ स्वभावाची नायिका.

मुचलका– *पु.* [*तु.*] एखादी गोष्ट न करण्याचें व न्यायालयांत वेळेवर हजर राहाण्याचें प्रतिज्ञापत्र; हमीपत्र; जामीनपत्र.

मुछंदर–*पु.* १. मिशाळ. २. कुरूप. ३. मूर्ख.

मुछाकड़ा; **मुछाड़िया**; **मुछियल**; **मुछैल**;–*वि.* मिशाळ; भरदार मिशा असलेला.

मुज़क्कर– *पु.* [*अ.*] १. पुल्लिंग. २. नर; पुरुष.

मुज़क्किर–*पु.* [*अ.*] ईश्वराचें नामस्मरण करणारा. ['रिफॉर्मर'.

मुजद्दिद– *पु.* [*अ.*] सुधारक;

मुजनूँ*– सर्व. मला. [विजयी.

मुज़फ़्फ़र–*वि.* [*अ.*] विजेता;

मुज़बज़ब– *वि.* [*अ.*] १. अनिश्चित; संदिग्ध. २. गोंधळलेला; घोटाळ्यांत पडलेला.

मुजमिल–*वि.* [*अ.*] संक्षिप्त; थोडक्यांत सांगितलेलें.

मुज़रा– *पु.* [*अ.*] १. नमस्कार; अभिवादन. २. नायकिणीचें बैठकीचें गाणें. ३. चालू केलेला कायदा. ४. कपात.–*वि.* १. जारी केलेला. २. हिशेबांत धरलेला.

मुजरिम–*वि.* [*अ.*]अपराधी; गुन्हेगार.

मुजर्रद–*वि.* [*अ.*] १. एकटा; एकाकी. २. अविवाहित. ३. विरक्त.

मुजर्रब– *वि.* [*अ.*] १. अनुभव घेतलेला. २. अचूक; रामबाण.

मुजल्लद– *वि.* [*अ.*] बांधणी (बाइंडिंग) केलेलें; 'बाउंड'.

मुजव्वज़-ज़ा– *वि.* [*अ.*] नियोजित; प्रस्तावित.

मुजस्सम– *वि.* [*अ.*] शरीरधारी; मूर्तिमंत. [प्रतिमा.

मुजस्समा– *पु.* [*अ.*] मूर्ति;

मुज़ायक़ा– *पु.* [*अ.*] हरकत; बिघाड; पर्वा.

मुजाविर–*पु.* [*अ.*] १. पुजारी; बडवा (मुसलमान); मशिदींत राहून झाडलोट करणारा; मुजावर. २. शेजारी.

मुजाहिद– *पु.* [*अ.*] जिहाद (धर्मयुद्ध) करणारा.

मुज़िर– *वि.* [*अ.*] १. हानिकारक. २. वाईट.

मुज्तहिद– *पु.* [*अ.*] १. परिश्रम, प्रयत्न करणारा. २. धार्मिक बाबतींत योग्य निर्णय देणारा. ३. शीआ पंथाचा आचार्य. [रूप.

मुझ–*वि.* सर्व. 'मैं'चें सामान्य-

मुटका– *पु.* मुकटा (सोंवळें).

मुटाई– *स्त्री.* १. स्थूलपणा. २. घमेंड. **मु०–चढ़ना**–घमेंड वाढणें.

मुटाना– *क्रि. अ.* १. लठ्ठ होणें; फुगणें; स्थूल होणें. २. घमेंड करणें.

मुटापा–*पु.* लठ्ठपणा.

मुटासा– *वि.* श्रीमंतीमुळें घमेंडखोर बनलेला. [ओझेवाला.

मुटिया– *पु.* हमाल; मजूर;

मुट्ठा– *पु.* १. कवळी; पेंढी; जुडी. २. कागदाचें भेंडोळें. ३. जुडगा. ४. मूठ (हत्यार इ०).

मुट्ठी– *स्त्री.* १. मूठ. २. मूठभर वस्तु. **मु०–गरम करना**–लांच देणें. **–भर**–मूठभर; थोडेसें. **–में**–मुठींत; अधीन. [सामना.

मुठभेड़– *स्त्री.* टक्कर; लढाई;

मुठिका*–*स्त्री.* १. मूठ. २. ठोसा.

मुठिया– *स्त्री.* १. हत्याराची मूठ. २. पिंजऱ्याचें छोटें दांडकें.

मुड़कना– *क्रि. अ.* वळणें; लवणें; लचकणें.

मुड़ना– *क्रि. अ.* १. मोडणें. २. वांकणें. ३. लचकणें. ४. टोंक वांकणें. ५. वळणें; फिरणें. ६. परतणें. ७. पालटणें.

मुडवरिया⁺– *स्त्री.* उसें.

मुड़वाना–*क्रि. स.* १. वळविणें. २. हजामत करविणें. ३. गटविणें; फसविणें. [वरवंडी. २. उसें.

मुड़वारी⁺– *स्त्री.* १. कठडा;

मुड़हर⁺–*पु.* डोक्यावरील पदर.

मुड़ाना–*क्रि. स.* हजामत करविणें.

मुड़िया–*स्त्री.* मोडी लिपि; व्यापारी, सावकार इ० लोक हिशेबासाठीं वापरतात ती लिपि.

मुतअद्दिद–*वि.* [*अ.*] १. मोजकें. २. अनेक; पुष्कळ.

मुतअद्दी–*वि.* [*स्त्री.*] १. मर्यादेचें अतिक्रमण करणारा. २. भांडण लावून देणारा. ३. सांसर्गिक (रोग). ४. सकर्मक (क्रि.).

मुतअल्लिक़–*वि.* [*अ.*] १. संबंधींचा २. जोडलेला; संबद्ध. –*अव्य.* संबंधीं; विषयीं.

मुतअस्सिब–*वि.* [*अ.*] कट्टर; जातीयवादी; धार्मिक पक्षपात करणारा. [खांब. २. कठडा.

मुतक्का–*पु.* १. कठडयाचा

मुतना–*वि.* मुत्रा. [बाज.

मुतफ़न्नी–*वि.* [*अ.*] धूर्त; कावे-

मुतफ़र्रिक़–*वि.* [*अ.*] निराळें; फुटकळ; विविध.

मुतबन्ना–*वि.* [*अ.*] दत्तक घेतलेला. –*पु.* दत्तक पुत्र.

मुतबर्रिक–*वि.* [*अ.*] पवित्र.

मुतरादिफ़–*वि.* [*अ.*] समानार्थक.

मुतलक़–*अव्य.* [*अ.*] मुळींच; थोडासुद्धां; यत्किंचित्‌हि.–*वि.* १. केवळ; सामान्य; नुसता. २. अनिर्बंध; निरंकुश; स्वतंत्र.

मुतलाशी⁺–*वि.* शोधणारा.

मुतवज्ज(ज्जि)ह–*वि.* [*अ.*] ध्यान, लक्ष देणारा.

मुतवल्ली–*पु.* [*अ.*] मशीद किंवा मुस्लिम धर्मादाय संपत्ति यांची व्यवस्था पाहाणारा; संरक्षक.

मुतवाज़ी–*वि.* [*अ.*] गुप्त; लपलेला. [सतत.

मुतवातिर–*वि.* [*अ.*] निरंतर;

मुतसद्दी–*पु.* [*अ.*] १. कारकून. २. व्यवस्थापक. ३. लेखक. ४. दिवाण.

मुतसिरी– *स्त्री.* मोत्यांचा कंठा.

मुतहर्रिक–*वि.* [*अ.*] हालचाल करणारा; गतिशील.

मुताबिक़–*वि.* [*अ.*] १. सदृश; अनुरूप. २. अनुकूल.–*अव्य.* अनुसार; प्रमाणें.

मुतालबा–*पु.* [*अ.*] १. मागणी. २. हिशेबाची बाकी; येणें.

मुताल्लिक़–*वि.* पा० 'मुतअल्लिक़'. [लाडू.

मुतिलाडू*–*पु.* मोतीचुराचा

मुतेहरा⁺–*पु.* मोत्यांची पोची; मनगटी. [एकमत.

मुत्तफ़िक़–*वि.* [*अ.*] सहमत;

मुत्तला–*वि.* [*अ.*] ज्याला सूचना दिलेली आहे असा; सूचित; सावध.

मुत्तसिल–*वि.* [*अ.*] १. निकट

असलेला. २. संबद्ध.

मुत्तहिद–*वि.* [*अ.*] ऐक्य असलेला; संयुक्त. [एकत्रित.

मुत्तहिदा–*वि.* [*अ.*] संयुक्त;

मुदगर–*पु.* जोडी; मुदगल. (व्यायाम).

मुदब्बिर–*वि.* [*अ.*] युक्ति करणारा; बुद्धिमान्. –*पु.* राज्याची व्यवस्था करणारा; मंत्री.

मुदर्रिस–*पु.* [*अ.*] शिक्षक.

मुदा*–*अव्य.* १. परंतु. २. तात्पर्य हें कीं. –*स्त्री.* हर्ष; आनंद.

मुदाखलत–*स्त्री.* [*अ.*] हस्तक्षेप; अडवणूक. **–बेजा**–*स्त्री.* दुसऱ्याच्या जागेंत त्याच्या परवानगीशिवाय घुसणें.

मुदाम–*अव्य.* [*अ.*] १. सदासर्वदा; नेहमीं. २. एकसारखा; लागोपाठ.

मुद्दआ–*पु.* [*अ.*] उद्देश; अभिप्राय; इच्छा. –*वि.* इच्छिलेलें; ज्याबद्दल दावा करण्यांत आलेला आहे असें.

मुद्दई–*पु.* [*अ.*] १. वादी; दावा करणारा. २.+ शत्रु.

मुद्दत–*स्त्री.* [*अ.*] १. मुदत; अवधि. २. दीर्घ कालावधि.

मुद्दालेह–*पु.* [*अ.*] प्रतिवादी.

मुद्धा–*पु.* पायाचा घोटा.

मुद्धी–*स्त्री.* सुरगांठ.

मुद्र–*पु.* छपाईचा खिळा; 'टाइप'. **–लिख**–*पु.* 'टाइप रायटर'. **–लेखक**–*पु.* टंक लेखक; 'टायपिस्ट'. **–लेखनयंत्र**–*पु.* टंकलेखनयंत्र; 'टाइप रायटर'.

मुद्रण–*पु.* छापणें; छपाई. **–स्वातंत्र्य**–*पु.* छपाईचें स्वातंत्र्य; 'फ्रीडम ऑफ प्रेस'. ['प्रेस'.

मुद्रणालय–*पु.* छापखाना;

मुद्रांकित–*वि.* मोहरबंद; 'सील्ड'.

मुद्रा–*स्त्री.* १. नाणें; चलन. २. शिक्का; मोहर. ३. नांव कोरलेली अंगठी. ४. मुखमुद्रा. ५. 'टाइप'. **–तत्त्व**–*पु.* जुन्या नाण्यांवरून प्राचीन इतिहास जाणण्याचें शास्त्र. **–बाहुल्य**; **–विस्तार**–चलन वाढ; 'इन्फ्लेशन'. **–यंत्र**–*पु.* मुद्रणयंत्र; छापण्याचें यंत्र; 'प्रेस'.– **विज्ञान**–*पु.* नाणेंशास्त्र; चलना संबंधीचें शास्त्र; 'न्यूमिस मॅटिक्स'. – **विस्फीति** – *स्त्री.*; – **संकोच** – *पु.* नाण्याचें, चलनाचें अवमूल्यन; 'डिफ्लेशन'. **–स्फीति**–*स्त्री.* चलन वाढ; 'इन्फ्लेशन'. **–रोधक**–*वि.* चलनवाढ –विरोधक; 'अँटी इन्फ्लेशनरी'.

मुद्रिका–*स्त्री.* १. शिक्का; मोहर. २. नांव कोरलेली अंगठी.

मुधा–*अव्य.* व्यर्थ. –*वि.* १. व्यर्थ; निरर्थक. २. असत्य; खोटें. –*पु.* खोटी गोष्ट. [–*पु.* नास्तिक.

मुनकिर–*वि.* न मानणारा.

मुनक्का–*पु.* [*अ.*] मनुका.

मुनगा–*पु.* शेवगा.

मुनहसिर–*वि.* [*अ.*] अवलंबित; आधारलेला; आश्रित.

मुनादी–*स्त्री.* [*अ.*] दवंडी; डांगोरा; घोषणा. –*पु.* दवंडी पिटणारा; पुकारणारा. [नफा.

मुनाफ़ा–*पु.* [*अ.*] फायदा;

मुनासिब–*वि.* [*अ.*] उचित; योग्य. [बुद्धदेव.

मुनिंद*–*पु.* मुनींद्र; मुनिश्रेष्ठ;

मुनियाँ–*स्त्री.* लाल नांवाच्या पक्ष्याची मादी.

मुनीब–म–*पु.* [*अ.*] १. मुनीम; हिशेब लिहिणारा कारकून. २. मदतनीस; सहाय्यक.

मुन्ना–न्नूँ–*पु.* मुलगा; बाळ; बाबू (लहान मुलांना लाडानें संबोधण्याचा शब्द). ['मुंसिफ़'.

मुन्शी; **मुन्सिफ़**–*पु.*पा० 'मुंशी';

मुफ़लिस–*वि.* [*अ.*] गरीब; निर्धन. [दारिद्र्य.

मुफ़लिसी–*स्त्री.* [*अ.*] गरीबी;

मुफ़सिद–*वि.* भांडखोर; तंटाबखेडा करणारा; उपद्रवी.

मुफ़स्सल–*वि.* [*अ.*] तपशीलवार; क्रमवार; विस्तृत. **–अव्य.** तपशीलवार. –*पु.* शहराबाहेरील भाग; उपनगर.

मुफ़स्सिर–*वि.*[*अ.*] तपशीलवार सांगणारा; व्याख्याकार.

मुफ़स्सिल–*वि.* पा० 'मुफ़स्सल'.

मुफ़ीद–*वि.* लाभदायक; फायदेशीर.

मुफ़्त–*वि.* [*अ.*] मोफत; फुकट; विनामूल्य. **–खोर–रा**–*वि.* फुकटचा; ऐतखाऊ. **मु० –में–१.** फुकट. २. निष्कारण; निरर्थक.

मुफ़्ती–*पु.* [*अ.*] फतवा देणारा; मुसलमानी धर्मशास्त्री.

मुबद्दल–*वि.* [*अ.*] बदल केलेला.

मुबल(लि)ग़–*वि.* [*अ.*] १. एकूण. २. थोडा. ३. सच्चा; पारखलेला. –*पु.* १. प्रमाण. २. रक्कम. ३. रुपयांची संख्या.

मुबस्सिर–*पु.* [*अ.*] समीक्षण करणारा; समीक्षक.

मुबह(हि)म–*वि.* [*अ.*] संदिग्ध; अस्पष्ट; द्व्यर्थी.

मुबादला–*पु.* [*अ.*] परिवर्तन; मोबदला; अदलाबदल. [होवो कीं.

मुबादा–*अव्य.* [*फा.*] असें न

मुबारक–*वि.* [*अ.*] १. शुभ; मंगलप्रद. २. फलदायी; लखलाभ. **–बाद**–*स्त्री. पु.* अभिनंदन; शुभकामना. **–बादी**–*स्त्री.* १. अभि-

नंदन; धन्यवाद. २. अभिनंदन-गीत. [अभिनंदन.

मुबारकी– *स्त्री.* [*अ.*] आभार;

मुबालग़ा–*पु.* [*अ.*] अतिशयोक्ति. [चर्चा.

मुबाहसा–*पु.* [*अ.*] वादविवाद;

मुब्तदी–*पु.* [*अ.*] १. आरंभ करणारा. २. नवशिक्या विद्यार्थी.

मुब्तला–*वि.* [*अ.*] अडकलेला; गुंतलेला.

मुमकिन–*वि.* [*अ.*] शक्य; संभव; संभाव्य. [सन्माननीय.

मुमताज–*वि.* [*अ.*] प्रतिष्ठित;

मुमलकत– *स्त्री.* [*अ.*] राज्य; सत्ता; शासन.

मुमानिअ(य)त– *स्त्री.* [*अ.*] मनाई; बंदी.

मुमूर्षा– *स्त्री.* मरण्याची इच्छा.

मुमूर्षु–*वि.* १. मरणासन्न. २. मरूं इच्छणारा.

मुयस्सर–*वि.* [*अ.*] उपलब्ध; सहज मिळणारा; प्राप्त.

मुरंडा–दा–*पु.* भाजलेले गहूं व गूळ यांचा लाडू; गुडदाणी.

मुरई+– *स्त्री.* १. मुळा. २. मुळी.

मुरक– *स्त्री.* मुरगळा.

मुरकना–*क्रि. अ.* १. मुरगळणें. २. परत येणें. ३.* नष्ट होणें.

मुरकाना–*क्रि.स.* १.मुरगळणें; पिळणें. २. मोडणें. ३. परत करणें. ४. नाश करणें.

मुरकी– *स्त्री.* १. कानांतील लहान डूल. २. कानाचें पाळें.

मुरखाई*– *स्त्री.* मूर्खपणा.

मुरग़ा–*पु.* [*फा.*] कोंबडा. **मु० –बनाना**– कोंबडयासारखें बसावयास लावणें (एक प्रकारची शारीरिक शिक्षा).

मुरग़ाबी– *स्त्री.* [*फा.*] रानकोंबडा; पाणकोंबडा.

मुरग़ी– *स्त्री.* [*फा.* मुर्ग़] कोंबडी. **मु०–बिठाना**–अंडीं उबविण्यासाठीं कोंबडीला अंड्यावर बसविणें.

मुरचंग–*पु.* मोरचंग (वाद्य).

मुरचा–*पु.* [*फा.*] गंज; किटण.

मुरछल–*पु.* मोरचल; मोराच्या पिसांचा जुंबडा. [उदास होणें.

मुरझाना–*क्रि. अ.* कोमेजणें;

मुरत्तब–*वि. अ.* रचलेला; संग्रहित; संपादित; क्रमानें लावलेला.

मुरत्तिब–*वि. पु.* [*अ.*] क्रमानें लावणारा; संग्राहक; संपादक.

मुरदा–*पु.* [*फा.*] प्रेत; शव. –*वि.* १. मेलेला; मृत. २. त्राण नसलेला. ३. कोमेजलेला. **–ख़ोर**; **–ख्वार**–*वि.* मृत-मांस खाणारा. **–दिल**–*वि.* निरुत्साही.**–बादल**–*पु.* स्पंज.

मुरदार–*वि.* [*फा.*] १. मेलेला; मृत. २. मृतवत्; त्राण नसलेला. ३. अपवित्र. ४. मुर्दाड (बा०).–*पु.* प्रेत; शव. [पळणें.

मुरना*–*क्रि.अ.* फिरणें; हटणें;

मुरब्बा–*पु.* [*अ.*] १. मुरंबा; पाकविलेलीं फळें. २. चतुष्कोण; चौकोनी.–*वि.* चौरस; वर्ग.

मुरब्बी–*पु.* [*अ.*] १. पालक. २. संरक्षक; सहाय्यक.

मुरमुरा–*पु.* चुरमुरा; लाही; मक्याच्या लाह्या. **मु०–(रों)का थैला**–लठ्ठ, फोफसा माणूस.

मुरमुराना–*क्रि. अ.* कर्रकर्र शब्द होणें; एखादी कडक वस्तु मोडल्याचा आवाज.

मुरलिया*; **मुरली**– *स्त्री.* बांसरी; मुरली. [२. मोर.

मुरवा+–*पु.* १. पायाचा घोटा;

मुरवी*– *स्त्री.* धनुष्याची दोरी.

मुरव्वत– *स्त्री.* पा० 'मुरौवत'.

मुरशिद–*पु.* [*अ.*] १. गुरु; मार्गदर्शक. २. शिष्ट; मोठा. ३. हुशार माणूस.

मुरसिल–*पु.* [*अ.*] १. पत्रलेखक. २. धाडणारा; प्रेषक.

मुरस्सा–*वि.* [*अ.*] जडविलेला; जडित. –*पु.* अलंकारिक भाषा.

मुरहा–*वि.* १. मूळ नक्षत्रावर जन्मलेला (मुलगा). २. अनाथ. ३. उपद्रवी; उनाड.

मुराड़ा*–*पु.* जळतें लाकूड.

मुराद– *स्त्री.* [*अ.*] अभिलाषा; इच्छा; कामना. **मु०– पाना; –बर आना**–मनोरथ पूर्ण होणें.

मुरादिफ़–*वि.* [*अ.*] समानार्थक.

मुरादी–*वि.* [*अ.*] १. अभिलाषा बाळगणारा. २. अनुकूल. ३. लाक्षणिक.

मुराना*–*क्रि. स.* १. चघळणें. २. पा० 'मोड़ना'.

मुरार–*पु.* १. कमळाचा कांदा किंवा देठ. २.* मुरारि; कृष्ण.

मुरासा*–*पु.* १. कर्णफूल २. मुंडासें.

मुरीद–*पु.* [*अ.*] शिष्य; चेला.

मुरुआ*–*पु.* पा० 'मुरवा'.

मुरुकना*–*क्रि. अ.* मुरगळणें; वांकणें; मोडणें.

मुरुख*–*वि.* मूर्ख [होणें.

मुरुछना*–*क्रि. अ.* मूर्च्छित

मुरुझना*–*क्रि. अ.* कोमेजणें.

मुरे(रै)ठा–*पु.* साफा; फेटा; मुंडासें. ['मरोड़ना'.

मुरेरना*–*क्रि. स.* पा०

मुरौवज–जा–*वि.* [*अ.*] प्रचलित; चालू; जारी.

मुरौवत– *स्त्री.* [*अ.*] १. मुर्वत; भीड. २. सौजन्य; माणुसकी. ३. शील.

मुर्की– *स्त्री.* मागच्या व पुढच्या स्वरांना स्पर्श करून एखादा स्वर

गळयांतून काढणें (संगीत); लहान तान.

मुर्ग़–पु. [फा.] १. पक्षी. २. कोंबडा. **–बाज़**–पु. कोंबडयांची झुंज लावणारा. **–मुसल्लम**–पु. सबंध शिजविलेला कोंबडा.

मुर्ग़ाबी– स्त्री. [फा.] पाण-कोंबडा.

मुर्ग़ी– स्त्री. [फा.] कोंबडी.

मुर्दनी– स्त्री. [फा.] १. प्रेत-कळा. २. प्रेतयात्रा.

मुर्चा–पु. [फा.] गंज; किटण.

मुर्दा–पु. पा० 'मुरदा'.

मुर्रा–पु. १. पोटांत होणारा मुरडा. २. मुरडशेंग. ३+ लाही; चुरमुरा.

मुर्री– स्त्री. १. चिंधीची वात. २. दोऱ्यांना पीळ देऊन गांठ मारण्याची विशिष्ट पद्धति. ३. पीळ. ४. कनवटी. **–दार**–वि. १. पीळदार. २. गांठी असलेला.

मुर्शिद–पु. पा० 'मुरशिद'.

मुलक*–पु. पा० 'मुल्क'.

मुलकट– स्त्री. चोळीचा स्तनां-वर येणारा भाग.

मुलकना*–क्रि. अ. १. स्मित करणें. २. पुलकित होणें.

मुलकित*–वि. पुलकित; प्रसन्न.

मुलकी–वि. [अ.] १. शासन व्यवस्थेसंबंधींचा. २. स्वदेशी.

मुलज़िम–वि. [अ.] आरोपी.

मुलतवी–वि. [अ.] तहकूब.

मुलमची–पु. [अ.] मुलामा देणारा.

मुलम्मा–पु. [अ.] १. कल्हई; मुलामा. २. बनावटपणा; दिखाऊ-पणा. **–गर**; **–साज़**–पु. मुलामा, कल्हई करणारा.

मुलहा*–वि. पा० 'मुरहा'.

मुलहिद–वि. [अ.] धर्मभ्रष्ट; काफिर. [मुल्ला.

मुलाँ–पु. [अ.] मौलवी;

मुलाक़ात– स्त्री. [अ.] १. भेट; मुलाखत. २. मिलाफ; मैत्री; सलोखा.

मुलाक़ाती–पु. [अ.] १. ओळ-खीचा; परिचित. २. भेंटीस आलेला. [कर्मचारी.

मुलाज़िम–पु. [अ.] नोकर;

मुलाज़िमत– स्त्री. [अ.] नोकरी.

मुलायम–वि. [अ.] १. मऊ; मृदु. २. नाजुक. ३. पचण्यास हलकें.

मुलायमत; **मुलायमियत**; **मुलायमी**– स्त्री. [अ.] मऊपणा; मृदुता; कोमलता.

मुलाहज़ा–पु. [अ.] १. निरी-क्षण; देखरेख. २. भीड; मुरवत.

मुलेठी– स्त्री. ज्येष्ठमध.

मुल्क–पु. [अ.] १. देश; मुलूख. २. प्रांत. ३. जग. **–गीरी**– स्त्री. मुलुखगिरी; राज्यविस्तार.

मुल्की–वि. [अ.] १. देशी. २. स्थानीय. ३. असैनिक; 'सिव्हिल'. **–लाट**–पु. 'गव्हर्नर जनरल'.

मुल्तवी–वि. [अ.] स्थगित; तहकूब.

मुवक्किल–पु. [अ.] १. अशील; पक्षकार. २. प्रत्येक कामासाठीं नेमलेला विशिष्ट देवदूत.

मुवज्जह–वि. [अ.] तर्क-संगत; उचित.

मुवज़्ज़िन–पु. पा० 'मुअज़्ज़िन'.

मुवना*–क्रि. अ. मरणें.

मुवर्रिख़–पु. [अ.] इतिहासकार.

मुवल्लिद–पु. [अ.] उत्पन्न करणारा; जनक. [संपादक.

मुवल्लिफ़–पु. [अ.] संग्राहक;

मुवस्सिर–वि. [अ.] परिणाम-कारक; प्रभावशाली.

मुवाज़ी–वि. [अ.] तुल्य; सममूल्य.–अव्य. सुमारें; अंदाजें.

मुवाफ़िक़–वि. [अ.] १. अनु-कूल. २. तुल्य; सदृश. ३. योग्य; उचित.–अव्य. अनुसार.

मुशर्रफ़–वि. [अ.] १. प्रति-ष्ठित; सन्मान्य. २. मानमरातब मिळालेला; उच्च; श्रेष्ठ.

मुशाबहत– स्त्री. [अ.] रूप-सादृश्य; साम्य. [सम्मेलन.

मुशायरा–पु. [अ.] कवि-

मुशाहरा–पु. [अ.] मासिक वेतन; पगार.

मुश्क– स्त्री. [फा.] कस्तुरी. **–दाना**–पु. एका झाडाचें औषधी बीं.**–बार**–वि. अत्यंत सुगंधित. **–बिलाव**–पु. जव्हारी मांजर.**–बेद** –पु. ईजिप्तमध्यें होणारा एक प्रकारचा औषधी वेत.

मुश्क– स्त्री. दंड (हाताचा). **मु०–(श्कें) कसना या बाँधना** –मुसक्या बांधणें; दंडाला दोऱ्या बांधणें.

मुश्किल–वि. [अ.] कठिण; दुष्कर.– स्त्री. १. मुष्कील; क्लिष्टता; काठिण्य. २. अडचण; आपत्ति.**–कुशा**–वि. अडचण, संकट दूर करणारा.**–पसंद**–वि. लेखनांत क्लिष्टता प्रिय असणारा. **मु० –आसान होना**–संकट दूर होणें.

मुश्कीं–वि. [फा.] १. कस्तुरी रंगाचा; काळा. २. कस्तुरी मिसळलेला.

मुश्की–वि. [फा.] कस्तुरीच्या रंगाचा; काळा.–पु. काळा घोडा.

मुश्त–पु. [फा.] १. मूठ. २. मुक्का; बुक्की. ३. हप्ता.–वि. मूठभर; थोडासा. **एक मुश्त**–अव्य. एका रकमेनें; एका हप्त्यांत.

–पर–पु. मूठभर पंख; मृत पक्षी.

मुश्तइल–वि. [अ.] भडकविणारा. [संशयित; संदिग्ध.

मुश्तबहा; मुश्तबा–वि. [अ.]

मुश्तमिल–वि. [अ.] सामील; मिसळलेला; संयुक्त.

मुश्तरका–वि. [अ.] समाईक; संयुक्त.–**खानदान**–पु. संयुक्त कुटुंब; एकत्र कुटुंब.

मुश्ताक़–वि. [अ.] षोक, अभिलाषा किंवा इच्छा बाळगणारा.

मुषना–क्रि. अ. १. चोरीस जाणें. २. फसणें.

मुषुर*– स्त्री. गुंजन.

मुष्टि– स्त्री. १. मूठ. २. ठोसा. ३. दुष्काळ. –वि. मूक; मौन. –**द्वंद्व**–पु. मुष्टियुद्ध; 'बॉक्सिंग'. –**मेय**–वि. मूठभर; थोडेंसें.–**युद्ध**–पु. ठोसेबाजी; 'बॉक्सिंग'.–**योग**–पु. जडीबुट्टी; सोपें व स्वस्त औषध.

मुसंड–डा+–पु. १. धष्टपुष्ट; शरीर कमावलेला माणूस. २. गुंड.

मुसकनि; मुसकनिया*– स्त्री. मंद स्मित; हंसू.

मुसकराना–क्रि. अ. स्मित करणें; गालांतल्या गालांत हसणें.

मुसकराहट–स्त्री स्मित; हास्य.

मुसका–पु. मुसकी; मुस्कें.

मुसकान– नि*– स्त्री. स्मित; हास्य.

मुसकाना; मुसकि(कु)राना–क्रि. अ. मंद स्मित करणें; खुदकन हंसणें. [– स्त्री. स्मित; हंसू.

मुसकि(कु)राहट; मुसक्यान* मुसक्याना*–क्रि. अ. स्मित करणें.

मुसटी– स्त्री. उंदरी.

मुसद्दस–पु. [अ.] १. षट्कोण. २. षट्पदी; सहा चरणांची कविता.

मुसना–क्रि. अ. चोरीस जाणें. –क्रि. स. चोरणें.–पु. उंदीर.

मुसन्नफ़ा–वि. [अ.] लिहिलेलें; रचलेलें.

मुसन्ना-पु. [अ.] १. मूळ लिखाणाची खरी नक्कल; 'ट्रू कॉपी'. २. दुसरी प्रत. ३. पावतीचा अर्धा भाग. (देणाऱ्याजवळ राहाणारा).

मुसन्निफ़–पु. [अ.] लेखक; ग्रंथकार. [– स्त्री. **मुसन्निफ़ा**].

मुसमुंद–ध*–वि. उध्वस्त. –पु. विनाश.

मुसम्मन–वि. [अ.] अष्टकोणी; अष्टपैलू.–पु. अष्टकोण. –**बुर्ज**–पु. दिल्ली, आगरा येथील लाल किल्ल्यांतील अष्टकोणी बुरुज.

मुसम्मात– स्त्री. वि. [अ.] नांवाची; नामक (स्त्री).– स्त्री. श्रीमती; बाई; स्त्री.

मुसरिया; मुसरी– स्त्री. १. उंदरी. २. दंडांतील गोटी, बेटकुळी.

मुसर्रत– स्त्री. [अ.] हर्ष; खुषी.

मुसल–पु. मुसळ. –वि.* मूर्ख. –**धार**–अव्य. पा० 'मुसलाधार'.

मुसलमान–पु. [अ.] इस्लाम धर्माचा अनुयायी; मुहम्मदी.

मुसलमानियत– स्त्री. [अ.] मुस्लिमत्व; मुसलमानी धर्म.

मुसलमानी–वि. [अ.] मुसलमानासंबंधींचा. – स्त्री. १. इस्लाम. २. सुंता. ३. मुसलमान स्त्री.

मुसलमीन–पु. अनेक० [अ.] मुसलमान लोक.

मुसलाधार–वि. मुसळधार (पाऊस).–अव्य. खूप जोरांत. **मु०** –**मेह बरसना**–मुसळधार पाऊस पडणें.

मुसलिम–पु. [अ.] मुसलमान.

मुसलेह–वि. पु. [अ.] १. सुधारक. २. रक्तशोधक.

मुसल्लम–मा–वि. [फा.] १. शाबूत; सबंध; अखंडित. २. मान्य केलेला; निर्विवाद.

मुसल्लस–वि. [अ.] त्रिकोणी. –पु. त्रिकोण.

मुसल्ला–पु. [अ.] १. नमाज पढण्याची चटई किंवा सतरंजी. २. नमाज पढण्याची जागा; ईदगाह. ३.* मुसलमान (तुच्छतादर्शक).

मुसव्विर–पु. [अ.] चित्रकार.

मुसव्विरी– स्त्री. [अ.] चित्रकला; नक्षी.

मुसहर–पु. १. वैदू. २. द्रोणपत्रावळी तयार करणारी एक आदिवासी जात. [औषध; रेचक.

मुसहिल–वि. [अ.] जुलाबाचे

मुसाफ़िर–पु. [अ.] प्रवासी. –**खाना**–पु. धर्मशाळा; मुशाफरखाना; 'वेटिंगरूम'.–**गाड़ी**–स्त्री. 'पॅसेंजर ट्रेन'. [सफर.

मुसाफ़िरी– स्त्री. [अ.] प्रवास;

मुसाह(हि)ब–पु. [अ.] १. श्रीमंत किंवा राजे लोकांजवळ सदैव राहाणारा. २. दरबारी.

मुसीबत–स्त्री. [अ.] १. संकट; आफत; विपत्ति. २. कष्ट; दुःख. –**ज़दा;–का मारना**–वि. विपद्ग्रस्त; दुर्दैवी.

मुसुक; मुसुकाना; मुसुकुराहट; मुस्कराना; मुस्कराहट; मुस्क्यान– –पा० 'मुश्क' 'मुसकरना'; 'मुसकराहट'; 'मुसकान'.

मुस्टंडा–वि. गलेलठ्ठ; तगडा. २. गुंड.

मुस्तअफ़ी–वि. [अ.] १. राजीनामा देणारा. २. माफी मागणारा.

मुस्तक़बिल–पु. [अ.] १. भविष्यकाळ. २. भवितव्य.

मुस्तक़िल–वि. [अ.] १. कायमचा. २. मजबूत; दृढ. –**जगह**–

स्त्री. कायमची नोकरी. **–मिज़ाज–** *वि.* स्थिरचित्त. [ऋजु.

मुस्तक़ीम *वि.* [*अ.*] सरळ;

मुस्तग़ीस–*पु.* [*अ.*] खटला भरणारा; फिर्यादी; वादी.

मुस्तनद–*वि.*[*अ.*] प्रमाणित; विश्‍वसनीय.

मुस्तफ़ा–*वि.* [*अ.*] १. श्रेष्ठ; निवडक; २. स्वच्छ. –*पु.* महम्मद पैगंबर. [घेणारा; लाभान्वित.

मुस्तफ़ीद–*वि.* [*अ.*] फायदा

मुस्तस्ना–*वि.* [*अ.*] १. वेगळा केलेला. २. अपवादभूत.

मुस्तहक़– *वि.* [*अ.*] हक्क असणारा; हक्कदार; अधिकारी.

मुस्तैद–*वि.* [*अ.*] १. तत्पर; सिद्ध; तयार. २. हुशार; तरतरीत.

मुस्तैदी–*स्त्री.* [*अ.*] १. तत्परता; तयारी. २. चुणचुणीतपणा; हुशारी.

मुस्लिम–*पु.* [*अ.*] मुसलमान.

मुहकम–*वि.* [*अ.*] मजबूत; टिकाऊ. [खातें.

मुहकमा–*पु.* [*अ.*] विभाग;

मुहज़्ज़ब–*वि.* [*अ.*] शिष्ट; सभ्य.

मुहतमिम–*पु.* [*अ.*] व्यवस्थापक. **–बंदोबस्त–***पु.* बंदोबस्ताच्या कामावरील मुख्य अधिकारी; ' सेटलमेंट ऑफिसर '.

मुहतर(रि)म–*वि.*[*अ.*]आदरणीय; पूज्य. [–*स्त्री.* **मुहतरमा**]

मुहताज–*वि.* [*अ.*]१. गरीब; दरिद्री. २. गरजू. **–ख़ाना–***पु.* अनाथालय. [दारिद्र्य.

मुहताजी– *स्त्री.* [*अ.*] गरीबी;

मुहनाल–*स्त्री.* धातूची तोटी.

मुहब्बत– *स्त्री.* [*अ.*] १. प्रेम; प्रीति. २. मैत्री. **–आमेज़–***वि.* प्रेमळ; प्रेमपूर्ण. **–नामा–** *पु.* प्रेमपत्र.

मुहम्मद–*वि.* [*अ.*] ज्याची स्तुति करण्यांत आली आहे असा; अतिप्रशंसित. –*पु.* मुहंमद पैगंबर.

मुहम्मदी–*पु.* [*अ.*] मुसलमान.

मुहय्या–*वि.* पा० ' मुहैया '.

मुहर– *स्त्री.* [*फ़ा.*] मुद्रा; मोहर; शिक्का; ' सील '. **मु०–लगाना** १. पक्कें करणें. २. प्रमाणपत्र देणें.

मुहरा– *पु.* १. पुढचा भाग. २. निशाण; लक्ष्य. ३. घोड्याच्या तोंडावरील साज. ४. तोंडाचा भाग. ५. सैन्याची आघाडी. **मु०–लेना–** सामना करणें.

मुहरा– *पु.* [*फ़ा.*] १. मोहरें (बुद्धिबळांतील). २. कागद. इ० घोटण्याचा दगड. ३. मणि.

मुहर्रम– *पु.* [*अ.*] मोहरम.–*वि.* निषिद्ध. **मु०–की पैदाइश–** रडतोंड्या; नेहमीं खिन्न राहाणारा.

मुहर्रमी– *वि.* [*अ.*] १. मोहरमसंबंधीं. २. उदास. ३. एकलकोंडा. ४. दुःखी. [लेखक; लिहिणारा.

मुहर्रिर– *पु.* [*अ.*] कारकून;

मुहर्रिरी– *स्त्री.* [*अ.*] कारकुनी.

मुहलत– *स्त्री.* [*अ.*] सवड; फुरसत. [आळी; पेठ.

मुहल्ला– *पु.* [*अ.*] मोहल्ला;

मुहसिन– *पु.* [*अ.*] उपकारकर्ता; सहाय्यक.

मुहसि(स्सि)ल– *वि.* [*अ.*] कराची वसुली करणारा.–*पु.* १. मामलेदार. २. शिपाई; प्यादा.

मुहाना– *पु.* १. मुख (नदीचें). २. खाडी.

मुहाफ़ा– *पु.* [*अ.*] पालखी; मेणा (विशेषतः स्त्रियांकरितां).

मुहाफ़िज़–*पु.* [*अ.*] संरक्षक; रक्षणकर्ता. **–ख़ाना–***पु.* कचेरींतील महत्त्वाचें कागदपत्र (रेकॉर्ड) ठेवण्याची खोली; दप्तरखाना. **–दफ़्तर–** *पु.* दप्तरखान्यावरील अधिकारी. ' रेकॉर्डकीपर '.

मुहार+**–** *पु.* दार; दरवाज़ा.

मुहार–*स्त्री.* [*अ.*] उंटाची वेसण.

मुहाल– *वि.* [*अ.*] अवघड; अशक्य.

मुहाला+**–***पु.* हत्तीच्या दांतांना शोभेसाठीं बसविलें जाणारें पितळेचें वळें.

मुहावरा– *पु.* [*अ.*] १. वाक्प्रचार. २. संवय; अभ्यास; सराव. [चोहोंबाजूंनीं घेरणें.

मुहासरा– *पु.* [*अ.*] वेढा;

मुहासिब– *पु.* [*अ.*] हिशेब करणारा, तपासणारा.

मुहासिल– *पु.* [*अ.*] १. मालगुजारी; मिळकत; उत्पन्न. २. नफा; लाभ. [साठीं.

मुहिं*– *सर्व.* मला; माझ्या-

मुहिब्ब– *वि. पु.* [*अ.*] १. प्रेम करणारा. २. मित्र. –(ब्बे) **वतन–** *पु.* देशभक्त; देशप्रेमी.

मुहिम– *स्त्री.* [*अ.*] १. कठिण काम. २. लढाई; मोहीम. ३. हल्ला; आक्रमण. **मु०–सर करना–** १. अवघड काम करणें. २. लढाई जिंकणें.

मुहैया– *वि.* [*अ.*] १. तयार; उपस्थित. २. उपलब्ध. **मु०–करना** –पुरविणें; पुरवठा करणें.

मूंग– *स्त्री. पु.* मूग. [मुगाची शेंग.

मूंगफली– *स्त्री.* भुईमूग; भुई-

मूंगा–*पु.* प्रवाळ; पोंवळें.

मूंगिया– *वि.* मुगाच्या रंगाचा; हिरवा.

मूंछ– *स्त्री.* मिशी. **मु०–उखाड़ना–**गर्वहरण करणें. **–का बाल–** लाडका. – (छें) **नीची होना–**

फजिती होणें.– (छों)पर **ताव देना**–मिशीवर ताव देणें; घमेंडींत मिश्यांवरून हात फिरविणें; मिश्यांना पीळ देणें; बढाई मारणें.

मूँछी+– *स्त्री*. एक प्रकारची बेसनाची कढी.

मूँज– *स्त्री*. मुंज (गवत).

मूँड़+– *पु*. १. डोकें. २. कपाळ. **मु०–मुँड़ाना**– संन्यास घेणें.

मूँडन–*पु*. मुंडन-संस्कार.

मूँड़ना– *क्रि. स.* १. मुंडन करणें. २. फसविणें. ३. चेला बनविणें.

मूँड़ी– *स्त्री*. डोकें; मुंडी.

मूँदड़ी–री*– *स्त्री*. अंगठी; मुद्रिका. [झांकणें; आच्छादणें.

मूँदना– *क्रि. स.* मिटणें;

मू– पु. [फा.] केस.–**ए मुबारक** –पु. मुहम्मद पैगंबरांचा पवित्र केस; हजरत बाल.

मूकना*– *क्रि. स.* १. टाकणें; त्याग करणें. २. सोडणें; बंधमुक्त करणें.

मूखना*– *क्रि. स.* चोरणें.

मूचना*– *क्रि. स.* सोडणें.

मूछ– *स्त्री*. मिशी. [दुष्ट

मूज़ी– *पु*. [*अ.*] त्रास देणारा;

मूठ– *स्त्री*. मूठ; दस्ता. **मु०–मारना**– १. मूठ मारणें; जादू करणें. २. हस्तमैथुन करणें.

मूड़; मूड़ना– पा० 'मूँड़'; 'मूँड़ना'.

मूढ– *वि*. १. मूर्ख. २. गोंधळलेला; घोटाळलेला. **–गर्भ**– *पु*. वाखा; गर्भपात; मृत किंवा नासलेला गर्भ.

मूढता– *स्त्री*. मूर्खता; अज्ञान.

मूतना– *क्रि. अ.* लघ्वी करणें; मुतणें.

मूर*– पु. १. जड; मूळ. २. जडीबुट्टी. ३. मूलधन; मुद्दल.

मूरख*–*वि* मूर्ख.

मूरखताई*– *स्त्री*. मूर्खता.

मूरचा–*पु*. [*फा.*] १. खंदक. २. मान्याची जागा. ३. गंज; जंग. ४. पा० 'मोरचा'.

मूरत– *स्त्री*. मूर्ति.

मूरि–री*– *स्त्री*. १. मूळ. २. मुळी; जडीबुट्टी.

मूर्च्छित–*वि*. १. बेशुद्ध. २. संस्कार केलेलें (सोनें, लोखंड इ०). ३. व्याप्त (स्वर, सुगंध इ०).

मूर्द्धन्य; मूर्धन्य–*वि*. १. श्रेष्ठ; सर्वोच्च. २. मूर्धन्य (स्वर).

मूल–*पु*. मूळ; उगम; पाया; 'रूट'. **–क**–*वि* मूलभूत; 'रॅडिकल'. **–धन**–*पु*. मुद्दल; 'कॅपिटल'. **– पाठ**–*पु*. मूळ मजकूर; 'टेक्स्ट'. **–स्रोत**–*पु*. उगम.

मूलाधार–*पु*. नाभि व शिश्न यांच्या मध्यें असलेलें एक चक्र.

मूली– *स्त्री*. मुळा. **मु०–गाजर समझना**–तुच्छ समजणें.

मूल्य–*पु*. १. किंमत; 'प्राइस'. २. महत्त्व. **– तल; –स्तर** *पु*. किंमतीची पातळी; 'लेव्हल ऑफ प्राइसेस'. **– न; – निरूपण** – *पु*. मूल्य निश्चित करणें; मूल्यमापन; 'व्हॅल्युएशन'.**–नियंत्रण**–*पु*. मूल्यनियंत्रण; 'प्राइस कंट्रोल'. **–सूचनांक**–*पु*. किमतीचा निर्देशांक; 'इंडेक्स नंबर.' **– ह्रासकोष** – *पु*. घसारा निधि; 'डिप्रीशिएशन फंड.'

मूल्यांकन–*पु*. मूल्यमापन; 'व्हॅल्युएशन'.

मूल्यादेय वस्तुएँ– *स्त्री*. व्ही. पी. नें पाठविलेल्या वस्तू; 'व्हॅल्यू पेयेबल आर्टिकल्स'.

मूल्याधिरोह–*पु*. किमतवाढ; भाववाढ; 'ॲप्रीशिएशन'.

मूल्यानुपाती कर (शुल्क)–*पु*. एखाद्या वस्तूवर तिच्या किंमतीच्या प्रमाणांत बसणारा कर; 'ॲड-व्हॅलोरिम ड्यूटी.'

मूल्यानुसार–*अव्य*. मूल्याप्रमाणें; यथामूल्य; 'ॲडव्हॅलोरेम'.

मूल्यापकर्ष–*पु*. मंदी; 'डिप्रीशिएशन'.

मूल्यावपात–*पु*. एकदम आलेली स्वस्ताई; मंदीची लाट; 'स्लंप'.

मूल्योत्कर्ष–*पु*. भाववाढ; किंमतवाढ; 'ॲप्रीशिएशन.'

मूष–*पु*. १. उंदीर. २. मूस. **–पाश**–*पु*. उंदराचा सांपळा.

मूस–*पु*. उंदीर. **–दानी**– *स्त्री*. उंदराचा सांपळा; पिंजरा.

मूसना–*क्रि. स.* चोरणें.

मूसर*–*पु*. मुसळ.

मूसल–*पु*. मुसळ. **– चंद्र**–*पु*. गुंड; दांडगट. **–धार; मूसलाधार** –*अव्य*. मुसळधार.

मूसली– *स्त्री*. १. लहान मुसळ. २. एक औषधी वनस्पति.

मूसा–*पु*. [हिब्रू] मोझेस (यहुदी प्रेषित, धर्मसंस्थापक). **–ई**–*पु*. यहुदी.

मूसा–*पु*. उंदीर. [संगीतज्ञ.

मूसीक़ार–*वि*. [*अ.*] गवई;

मूसीक़ी– *स्त्री*. [*अ.*] संगीतविद्या; गायन; संगीत.

मृग–*पु*. १. पशु. २. हरिण. ३. शिकारी प्राणी. **–छाला**–*पु*. हरिणाचें कातडें. **–छौना**–*पु*. हरिणाचें पाडस. **–जल**–*पु*. मृगजळ.**–दाव**–*पु*.– १. शिकारी प्राण्यांनीं भरलेलें अरण्य. २. सारनाथ. **–शिर–पु.; –शिरा**–*स्त्री*. मृगशीर्ष (नक्षत्र).

मृगी– *स्त्री*. १. हरिणी. २. फेफरें (रोग).

मृणालिनी– *स्त्री*. १. कमळाचा

वेल. २. कमलिनी. ३. कमलसमूह.

मृत–*वि.* मेलेला.–**लेखा**–*पु.* बंद पडलेलें खातें; 'डेड अकाउंट'.

मृतक–*पु.* शव; मेलेला जीव; मृत.

मृत्यु– *स्त्री.* मरण. –**दंड**–*पु.* फांशीची शिक्षा. –**पत्र**;–**लेख**–*पु.* मृत्युपत्र; 'टेस्टॅमेंट'; 'विल'.

मृदु–*वि.* १. मऊ. २. दयाळु.

मृदूकरण–*पु.* मऊ, नरम बनविणें; शमन; 'मिटिगेशन'.

मृषा–*अव्य.* १. खोटेपणानें. २. व्यर्थ. –*वि.* असत्य; खोटेंनाटें.

में–*अव्य.* आंत; मध्यें. (सप्तमीचा प्रत्यय)–*स्त्री.* शेळीचें ओरडणें; बेंबें. [इ०ची).

मेंगनी– *स्त्री.* लेंडी (शेळी

मेंड़–*पु. स्त्री.* १. शेताचा किंवा पाटाचा बांध. २* प्रतिष्ठा.

मेंड(ढ)क–*पु.* पा० 'मेढक' [–*स्त्री.* **मेंड़की**].

मेंह–*पु.* १. पाऊस. २. ढग.

मेंहदी– *स्त्री.* मेंदी.

मेख़– *स्त्री.* [*फा.*] १. खुंटा; मेख. २. खुंटी. **मु० – ठोंकना**– १. हातापायांत खिळे ठोकण्याची शिक्षा देणें. २. पराभूत करणें. –**मारना**–अडथळा आणणें.

मेखला– *स्त्री.* करगोटा; कडदोरा; कमरपट्टा.

मेघ–*पु.* ढग. –**जीवन**–*पु.* चातक.–**डंबर**–*पु.* ढगांचा गडगडाट. –**वाई***– *स्त्री.* मेघांचा समुदाय.

मेज़– *स्त्री.* [*फा.*] टेबल. –**पोश**–*पु.* 'टेबलक्लॉथ'. –**बान**–*पु.* आतिथ्य करणारा; यजमान.

मेट–*पु.* [*इं.*] मजुरांच्यावरील जमादार; मुकादम.

मेटक; मेटनहार*–*वि. पु.* १. नष्ट करणारा. २. पुसून टाकणारा.

मेटना*–*क्रि. स.* पा० 'मिटाना'.

मेटिया+– *स्त्री.* मोगा; मोघा (मातीचा मोठा लोटा).

मेड़–*पु. स्त्री.* बांध; कुंपण.

मेढक–*पु.* बेडूक.

मेढकी– *स्त्री.* बेडकी. –**मु० को जुकाम होना**– सामान्य माणसानें मोठ्या माणसांची बरोबरी करण्याची इच्छा बाळगणें.

मेढ़ा–*पु.* मेंढा; एडका.–**सिंगी**– *स्त्री.* भेडसिंग (औषधि).

मेढी– *स्त्री.* तीन पेडांची वेणी.

मेथी– *स्त्री.* मेथी; मेथीची भाजी. [वडी.

मेथौरी– *स्त्री.* मेथीच्या भाजीची

मेदा–*पु.* [*अ.*] पक्वाशय; पोट.

मेधावी–*वि.* बुद्धिमान्; पंडित.

मेम– *स्त्री.* [*इं.*] १. मड्डम. २. पत्त्यांतील राणी. –**साहबा**– *स्त्री.* प्रतिष्ठित युरोपियन स्त्री.

मेमना–*पु.* १. कोंकरूं. २.* घोड्याची एक जात.

मेमार–*पु.* [*अ.*] १. गवंडी. २. निर्माता.

मेर*–*पु.* पा० 'मेल'.

मेरवन+– *स्त्री.* १. मिश्रण; मेळवण. २. विरजण.

मेराज– *स्त्री.* [*अ.*] १. शिडी. २. एक इस्लामी सण.

मेरुदंड–*पु.* १. पाठीचा कणा. २. दोन ध्रुवांना जोडणारी काल्पनिक सरळ रेषा.

मेल–*पु.* १. भेट; मिलाफ. २. सलोखा. ३. संगत. ४. साम्य; मेळ; जोड; बरोबरी. ५. मिश्रण. ६. तऱ्हा; प्रकार. –**जोल**; –**मिलाप**– मैत्री; दोस्ती. **मु० –खाना, बैठना, मिलना**– मेळ बसणें; जमणें.

मेल–*पु. स्त्री.* [*इं.*] १. टपालगाडी; आगगाडी. २. टपाल.

मेलना*–*क्रि. स.* १. मिसळणें; घालणें. २. फेंकणें; ढकलणें. –*क्रि. अ.* मिळणें. [२. जत्रा.

मेला– *पु.* १. मेळावा; समुदाय.

मेव– *पु.* जुन्या राजपुतान्याच्या मेवात प्रदेशांतील एक मुसलमान जमात; मेयो.

मेवा– *पु.* [*फा.*] १. फळ. २. सुकें फळ; सुका मेवा. –**फ़रोश**–*पु.* मेवा विकणारा.

मेवासा*– *पु.* १. किल्ला; गड. २. आश्रयस्थान.

मेहँदी– *स्त्री.* १. मेंदी. २. लग्नांतील एक विधि (मुसल०). **मु०–रचाना**–हाता-पायांना मेंदी लावणें.

मेह– *पु.* १. मेघ. २. पाऊस.

मेहतर– *पु.* [*फा.*] १. भंगी. २. चित्रालच्या नबाबाची पदवी.–*वि.* अधिक मोठा; श्रेष्ठतर.

मेहतरानी– *स्त्री.* भंगीण.

मेहनत– *स्त्री.* श्रम; मेहनत.–**कश**–*वि.* श्रम करणारा.

मेहनताना–*पु.* [*अ.* + *फा.*] पारिश्रमिक; श्रमाचा मोबदला; मेहेनताणा. [करणारा.

मेहनती– *वि.* [*अ.*] परिश्रम

मेहमान– *पु.* [*फा.*] पाहुणा. –**दारी**; **मेहमानी**– *स्त्री.* आतिथ्य; पाहुणचार.

मेहर– *स्त्री.* [*फा.*] दया; कृपा.–**बान**–*वि.* दयाळु; कृपावंत. –**बानी**–*स्त्री.* दया; कृपा.

मेहरवा*– *पु.* मेघ; ढग.

मेहरा–*पु.* १. हिजडा; नपुंसक. २. खत्री लोकांतील एक आडनांव. ३.* मेघ; पाऊस. [कमान.

मेहराब– *स्त्री.* [*अ.*] महिरप;

मेहरारू+; **मेहरी**–*स्त्री.* १. स्त्री.

२. पत्नी.

मैं–*सर्व*. मी.–**नूं***– सर्व. मला.

मैं*–*अव्य*. आंत.

मैंडा*–*सर्व*. माझा.

मैं–*अव्य*. [*अ.*] सह; बरोबर.

मैं– *स्त्री. अव्य.* पा० ' मय. '

मैका–*पु.* माहेर.

मैगल*–*पु.* मस्तावलेला हत्ती. –*वि.* मस्तावलेला; माजास आलेला. [अल '.

मैथुनिक–*वि.* लैंगिक; ' सेक्सु-

मैदा–*पु.* [*फा.*] सपीठ.

मैदान–*पु.* [*फा.*] १. मैदान; सपाट जमीन. २. क्रीडांगण. ३. रणक्षेत्र. –(**ने**)**जंग**–*पु.* रणक्षेत्र; रणमैदान. **मु० करना**–लढाई करणें. –**जीतना**; –**मारना**– युद्धांत जय मिळविणें; विजयी होणें.–**में आना**–समोर येणें. –**साफ़ होना**– शत्रूंचा नाश होणें; कांहीं आड-काठी न राहाणें. –**हाथ रहना**– लढाई जिंकणें.

मैदानी–*वि.* [*फा.*] १. सपाट. २. मैदानांत उपयोगी पडणारा. – *स्त्री.* अंगणांत लावलेला किंवा पुरलेला कंदील.

मैन*–*पु.* १. कामदेव; मदन. २. मेण. –**फल**–*पु.* मेणफळ.

मैनसिल–*पु.* मनशीळ (तांबूस रंगाचा एक औषधी धातु).

मैमंत*–*वि.* मदोन्मत्त; गर्विष्ठ.

मैमा+– *स्त्री.* सावत्र आई.

मैयत– *स्त्री.* [*अ.*] १. मृत्यु? मरण. २. शव; प्रेत. ३. प्रेतयात्रा.

मैया– *स्त्री.* माता; आई.

मैरा+–*पु.* शेताची राखण करण्यासाठीं बांधलेलें मचाण.

मैल–*पु.* १. मळ; घाण. २. दोष; विकार. ३. एखाद्या विषयींचा राग-द्वेष. –**खोरा**–*वि.* मळकट रंगाचा; मळखाऊ. –*पु.* वरचे कपडे मळूं नयेत म्हणून आंत वापरावयाचा कपडा.

मैला–*वि.* मळकट. –*पु.* १. कचरा. २. विष्ठा. – **कुचैला**–*वि.* १. घाणेरडा. २. मळकट कपडे घालणारा. [मनाचा कल.

मैलान–*पु.* [*अ.*] प्रवृत्ति;

मैहर*–*पु.* माहेर. २. मठ्ठा; फोडणीचें ताक. [*सर्व.* माझा.

मों*– *प्रत्य.* आंत; मध्यें.–

मोंगरा–*पु.* १. मोगरी; लांकडी हातोडा. २. मोगरा (फूल).

मोंगरी– *स्त्री.* मोगरी; लांकडी हातोडा.

मोंछ– *स्त्री.* मिशी.

मोंढ़ा–*पु.* १. वेत, बांबू इ० चें तिवईच्या किंवा डमरूच्या आकाराचें गोल आसन. २. खांदा.

मो*– *सर्व.* माझा.

मोक–*पु.* भत्ता; ' अलाउन्स '.

मोकना*– *क्रि. स.* सोडणें; फेंकणें. [स्वतंत्र; मोकळा.

मोकल–ला*–*वि.* स्वच्छंदी;

मोख*–*पु.* मोक्ष.

मोखा–*पु.* १. झरोका; खिडकी. २. कोनाडा. [अथवा वेल.

मोगरा–*पु.* मोगऱ्याचें फूल

मोच– *स्त्री.* मुरगळा; शीर चमकणें; नस उतरणें. (आना).

मोचना*–*क्रि. स.* १. सांडणें; ढाळणें (अश्रू). २. सोडविणें. –*पु.* १. नाकांतील केस उपटण्याचा चिमटा. २. लोहाराचें एक हत्यार.

मोची–*पु.* चांभार; जोडे शिवणारा.

मोच्छ*–*पु.* मोक्ष.

मोछ+– *स्त्री.* मिशी.

मोज़ा–*पु.* [*फा.*] पायमोजा.

मोजिज़ा– *पु.* [*अ.*] चमत्कार; करामत.

मोट– *स्त्री.* १. गाठोडें; गठडी. २. मोट (पाणी काढण्याची).– *वि.* पा० ' मोटा '.

मोटरी– *स्त्री.* लहान गाठोडें.

मोटा–*वि.* १. लठ्ठ; फुगलेला; स्थूल. २. घट्ट; जाड; दाट. ३. कमी प्रतीचा; हलका. ४. भरड. ५. मोठ्या आकाराचा; ढोबळ. –**असामी**–*पु.* बडें प्रस्थ; श्रीमंत माणूस. –**झोटा**–*वि.* जाडें-भरडें; हलक्या प्रतीचें. – (**टी**) **अक़ल, बुद्धि, समझ**– *स्त्री.* मंद बुद्धि; मठ्ठपणा. – (**टी**) **बात** – *स्त्री.* धडधडीत दिसणारी स्पष्ट गोष्ट. –(**टे**)**तौर पर**–*अव्य.* सामान्यतः; स्थूलपणें. **मु०–खाना – पहनना**– स्वस्त व हलक्या प्रतीचें अन्नवस्त्र वापरणें.

मोटाई– *स्त्री.* १. स्थूलपणा; लठ्ठपणा. २. धनाचा किंवा शक्तीचा गर्व; घमेंड. ३. कुरापत; भांडखोरी. **मु०–चढ़ना**–घमेंडखोर होणें.

मोटाना–*क्रि. अ.* १. लठ्ठ होणें; फुगणें. २. घमेंड करणें. ३. श्रीमंत होणें. [गर्व; घमेंड.

मोटापा–*पु.* १. लठ्ठपणा. २.

मोटिया–*पु.* १. हमाल; ओझें वाहणारा. २. जाडें-भरडें कापड.

मोठ–*पु.* मटकी; मठ; मुगासारखें एक भरड धान्य.

मोड़–*पु.* १. रस्त्याचें वळण. २. वांकण; मोडणी. –**तोड़**–*पु.* फिरवाफिरव.

मोड़ना–*क्रि. स.* १. वळविणें; फिरविणें. २. घडी करणें; मोडणें. ३. बोथट करणें. **मु० मुँह मोड़ना**– विमुख होणें.

मोतदिल–*वि.* [*अ.*] १. मध्यम मार्गी; उदारमतवादी. २. सम-

शीतोष्ण.

मोतबर–*वि.* [*अ.*] विश्वसनीय; विश्वासू.

मोताद–*स्त्री* [*अ.*] मात्रा; प्रमाण. –वि. व्यसनी; संवय असलेला.

मोतिया–*पु.* मोगरा.– *वि.* मोत्यासारखा. **–बिंद**– *पु.* मोतीबिंदु (नेत्ररोग).

मोती–*पु.* मोत्यें; मोती. **–चूर**–*पु.* मोतीचुराचा लाडू. **–झिरा**–*पु.* कांजिण्या; बारीक फोड असलेली देवी (रोग). **–बेल***–*स्त्री.* मोगरा. **–सिरी***– *स्त्री.* मोत्यांची माळ. **मु०– उगलना**–तोंडून मधुर शब्द बाहेर पडणें. **–गरजना**– मोती पिचणें; तडकणें. **–ठंढा होना**– मोती फुटणें किंवा त्याची चमक जाणें. **–पिरोना**– १. मोत्यांची माळ बनविणें. २. सुंदर अक्षर काढणें. ३. मधुर बोलणें. **–रोलना**– परिश्रमाशिवाय पैसा मिळविणें. **–(तियों)से माँग भरना**–भांगांत मोती गुंफणें. **–से मुँह भरना**– आनंदाची बातमी किंवा चांगली गोष्ट ऐकल्यानंतर खुष होऊन भरपूर बक्षिसी देणें.

मोथरा*–*वि.* बोथट.

मोथा–*पु.* नागरमोथा.

मोदक–*पु.* लाडू; मिठाई.

मोदना*–*क्रि. अ.* १. आनंदित होणें. २. दरवळणें.

मोदी–*पु.* किराणा व भुसार माल विकणारा; वाणी. **–ख़ाना**–*पु.* धान्याचें कोठार.

मोधू–*वि.* मठ्ठ; मूर्ख.

मोन–ना⁺–*पु.* पेटारा.

मोना*–*क्रि. स.* भिजविणें.

मोम–*पु.* [*फा.*] मेण. **–जामा**–*पु.* मेणकापड. **–दिल**–*वि.* दयाळु अंतःकरणाचा. **–बत्ती**– *स्त्री.* मेणबत्ती. **मु०– की मरियम**– अत्यंत नाजुक स्त्री.

मोमिन–*पु.* [*अ.*] १. धर्मनिष्ठ मुसलमान. २. मुसलमान विणकर.

मोमिया– *स्त्री.* [*फा.*] रासायनिक द्रव्य लावून ठेवलेलें प्रेत; 'ममी'. [शिलाजीत.

मोमियाई– *स्त्री.* [*फा.*] नकली

मोमी–*वि.* मेणासारखें; मेणाचें. **–छींट**– *स्त्री.* एक अत्यंत तलम चीट.

मोय*– *सर्व.* माझा.

मोयन–*पु.* मोहन (पदार्थांत घालावयाचें).

मोर–*पु.* मोर. –*सर्व.** माझा. **–चंदा**–*पु.*; **–चंद्रिका**– *स्त्री.* मोरपिसावरील डोळा. **–छल**–*पु.* मोराच्या पिसांची चंवरी; मोरच(चे)ल. **–छली**–*पु.* १. मोरचल हलविणारा; चवरी ढाळणारा. २. बकुळीचें झाड. **–पंखा; –पखा***–*पु.* मोराचें पीस. **–पंखी**–*स्त्री.* मोरासारखी आकृति एका टोंकाला असणारी नाव; मोरपिसाच्या आकाराची नाव. *पु.* मोराच्या पिसासारखा रंग.–*वि.* मोरपिसाच्या रंगाचा. **–मुकुट**–*पु.* मोरपिसाचा मुकुट.

मोरचा– *पु.* [*फा.*] १. खंदक; खाई. २. माऱ्याची जागा. **–बंदी**–*स्त्री.* युद्धाची तयारी. **मु० –जीतना अथवा मारना**– माऱ्याची जागा काबीज करणें. **–बाँधना**– युद्धाची तयारी करणें. **–लेना**– १. युद्ध करणें; सामना करणें. २. युद्ध जिंकणें.

मोरचा–*पु.* [*फा.*] १. गंज; जंग; कीट (लोखंडावरील). २. आरशावरील मळ; किरण.

मोरन–*पु.* १. कोशिंबीर. २. शिकरण; श्रीखंड. ३⁺ विरजण.

मोरना*–*क्रि. स.* १. लोणी काढणें. २. पा० 'मोड़ना'.

मोरनी– *स्त्री.* १. लांडोर. २. नथींतील लोलक.

मोरवा*–*पु.* मोर.

मोराना*–*क्रि. स.* १. फिरविणें. २. दगडी घाणींत उंसाची कांडीं घालणें. [२. लांडोर.

मोरी– *स्त्री.* १. पन्हाळी; मोरी.

मोल–*पु.* मूल्य; किंमत. **–तोल**; **–भाव**–*पु.* भाव ठरविणें; किंमतीसंबंधीं बोलणें करणें. **मु०– लेना**– १. विकत घेणें. २. गुलाम बनविणें.

मोष–*पु.* १. चोरी; लूट; चोरीचा माल. २. चोर. ३.* मोक्ष.

मोहड़ा⁺–*पु.* १. भांड्याचें तोंड. २. दर्शनी भाग. ३. पा० 'मोहरा'.

मोहतरिम–*वि.* [*अ.*] पूज्य; आदरणीय. [आदरणीय स्त्री.

मोहतरिमा– *स्त्री.* [*अ.*]

मोहताज–*वि.* [*अ.*] १. गरीब; कंगाल. २. इच्छुक.

मोहनभोग–*पु.* १. शिरा. २. एका जातीचा आंबा.

मोहब्बत– *स्त्री.* पा० 'मुहब्बत'.

मोहर–*स्त्री.* [*फा.*] १. शिक्का; मोहर; छाप. २. मोहोर (नाणें). **मु०–लगाना**–शिक्कामोर्तब करणें.

मोहरा– *पु.* १. भांड्याचें तोंड. २. वस्तूचा वरचा किंवा पुढला भाग. ३. सैन्याची पुढील राग. ४. चोळीचा बंद. ५. माऱ्याची जागा.

मोहरा–*पु.* [*फा.*] बुद्धिबळांतील मोहरें. **मु०–लेना**–सामना करणें.

मोहरी– *स्त्री.* १. विजारीचा तळघेर. २. भांड्याचें लहान तोंड. ३.⁺ मोह(हो)रकी; म्होरकी.

मोहर्रिर– *पु.* [*अ.*] कारकून.

मोहलत– *स्त्री.* [*अ.*] १. सुटी;

सवड; फुरसत. २. अवधि; मुदत.

मोहलिक– *वि.* [*अ.*] घातक; प्राणघातक. [पोळें. २. दार.

मोहार–*पु.* १. मधमाश्यांचें

मोहिं–हि*– *सर्व.* मला.

मोहित– *वि.* १. लुब्ध; आसक्त. २. भ्रमित. [बसणारी.

मौंगी*– *वि. स्त्री.* मुकी; गप्प

मौंजीबंधन– *पु.* मुंज.

मौंड़ा*– *पु.* पोरगा; छोकरा.

मौक़ा– *पु.* [*अ.*] १. संधि; योग्य वेळ; मोका. २. घटनास्थळ. ३. जागा; स्थल.

मौक़ूफ़–*वि.* [*अ.*] १. बडतर्फ; नोकरीवरून काढून टाकलेला. २. रद्द केलेला. ३. अवलंबून राहाणारा. ४. थांबविलेला.

मौक़ूफ़ी– *स्त्री.* [*अ.*] बडतर्फी.

मौखिक– *वि.* तोंडी.–**परीक्षा**– *स्त्री.* तोंडी परीक्षा; 'व्हायव्हा व्होसी'.

मौज– *स्त्री.* [*अ.*] १. पाण्याची लाट; लहर. २. मौज; मनाचा उत्साह. **मु०–उड़ाना; –मारना**– चैन करणें.

मौज़ा– *पु.* [*अ.*] १. जागा. २. शेत. ३. गांव.

मौजी– *वि.* १. मजा मारणारा. २. आनंदी; प्रसन्नचित्त. ३. स्वच्छंदी. [योग्य.

मौज़ूँ– *वि.* [*अ.*] उचित;

मौजूद– *वि.* [*फा.*] १. विद्यमान. २. उपस्थित; हजर. ३. तयार.

मौजूदगी– *स्त्री.* [*अ.*] उपस्थिति; हजिरी.

मौजूदा– *वि.* [*अ.*] सध्यांचा; चालू; विद्यमान.

मौड़ा*– *पु.* मुलगा; पोरगा.

मौत– *स्त्री.* [*अ.*] १ मरण; मृत्यु. २. मृत्युवेळ. ३. आत्यंतिक क्लेश; आपत्ति. **मु०–आना**–संकट, मृत्यु येणें. **–का सिरपर खेलना**– मृत्यु जवळ असणें; प्राण संकटांत असणें. **–के घाट उतारना**–ठार मारणें.**–माँगना**–दुःखांना कंटाळून मरण यावें अशी इच्छा करणें.

मौताद– *स्त्री.* पा० 'मोताद'.

मौद्रिक– *वि.* नाणकीय; 'मॉनेटरी'.

मौन– *वि.* मूक; गप्प.–*पु.* मूकता; मौन. **मु०–धारण करना; –साधना**– गप्प बसणें; न बोलणें.

मौर– *पु.* १. मोहोर; मंजिरी. २. लग्नांत घालावयाचा मुकुट; मुंडावळचा.–*वि.* शिरोमणि; श्रेष्ठ.

मौरना– *क्रि.* [*अ.*] मोहरणें; बहर येणें.

मौरसिरी*– *स्त्री.* पा० 'मौलसिरी'.

मौरूसी– *वि.* [*अ.*] वडिलोपार्जित; पैतृक; वंशपरंपरागत; 'हेरेडेटरी'.**–काश्तकार**–*पु.* कायम कूळ; वंशपरंपरा जमीन कसण्याचा हक्क असलेलें कूळ.

मौर्वी– *स्त्री.* धनुष्याची दोरी.

मौलवी– *स्त्री.* [*अ.*] १. इस्लामी पंडित. २. अरबी-फारसीचा ज्ञाता, शिक्षक.

मौलसिरी– *स्त्री.* बकुळीचें झाड, फूल.

मौला– *पु.* [*अ.*] १. मालक. २. परमेश्वर. **–दौला**–*वि.* १. भोळा. २. दानशूर.

मौलिक– *वि.* १. मूळचें; स्वतंत्र; नवीन. २. अकुलीन.

मौलूद– *वि.* [*अ.*] जन्मलेला. –*पु.* १. जन्मतिथि. २. पुत्र. **–शरीफ़**–*पु.* मुहम्मद पैगंबरांच्या जन्माचा उत्सव; मुहम्मद-जन्मकथा.

मौसम– *पु.* पा० 'मौसिम'.

मौसा– *पु.* मावशीचा पति; मावसा.

मौसिम– *पु.* [*अ.*] १. ऋतु; मोसम; हंगाम. २. योग्य वेळ. **–शास्त्र**– *पु.* हवामानशास्त्र; 'मीटिअरॉलॉजी'

मौसी– *स्त्री.* मावशी.

मौसूफ़– *वि.* [*अ.*] १. वर्णिलेला; उल्लेखिलेला. २. प्रशंसित.

मौसूम– *वि.* [*अ.*] नांवाचा; नामक. [वसूल; प्राप्त.

मौसूल–*वि.* [*अ.*] मिळालेला;

मौसेरा– *वि.* मावस (भाऊ, बहिण इ०).

म्याँ– *पु.* पा० 'मियाँ'.

म्याऊँ; म्याव– *स्त्री.* मांजराचें ओरडणें. **मु०–की ठोर**–१. मांजराचें तोंड. २. भयस्थान; अवघड जागा. [चें म्यान. २.* शरीर.

म्यान– *पु.* [*फा.*] १. तलवारी-

म्याना*– *क्रि. स.* म्यानांत ठेवणें. –*वि.* मध्यम; मधला. –*पु.* मेणा; पालखी.

म्युनिसिपलिटी– *स्त्री.* [*इं.*] नगरपालिका.

म्योंड़ी– *स्त्री.* निर्गुंडी; निगडी (वन०).

म्रियमाण– *वि.* मरावयास टेकलेला; मृतप्राय.

म्रग–ग्ग*– *पु.* मृग; हरिण.

म्लान– *वि.* १. मळलेला; मलिन. २. कोमेजलेला; उदास.

म्लेच्छ– *पु.* संस्कृत भाषा न बोलणारा; अनार्य; परदेशी.–*वि.* पापी; नीच.

म्हाने*– *सर्व.* मला.

म्हारा*–*सर्व.* १. आमचा. २. माझा.

य

य– देवनागरी वर्णमालेंतील सव्वीसावा व्यंजन-वर्ण.

यंत–ता–*पु.* १. संचालक. २. शासक. ३. सारथि.

यंत्र–*पु.* यंत्र; 'मशीन'. **–चातुर्य**–*पु.* यंत्र चालविण्याचें कसब; तंत्र; 'टेक्निक'. **–जात**–*पु.* यंत्रें; यंत्रणा. 'मशीनरी'. **–तोप**–*स्त्री.* 'मशीनगन'.**–पुत्रक**–*पु.* यांत्रिक पुतळा; 'रोबॉट'. **–मंत्र**–*पु.* जादूटोणा; मंत्रतंत्र. **–विद्**–*पु.* यंत्रविद्याविशारद; 'एंजीनियर'. **–विद्या**–*स्त्री.*; **–शास्त्र**–*पु.* यंत्रविद्या; 'एंजीनियरिंग'. **–सज्ज, सज्जित सेना**–*स्त्री.* यंत्रसज्ज सैन्य; 'मेकॅनाइज्ड आर्मी'. **–समुच्चय**–*पु.* यंत्रसमूह; 'प्लांट'. ['मेकॅनिक'.

यंत्रक; यंत्रज्ञ–*पु.* तंत्रज्ञ; यंत्रज्ञ;

यंत्रणा–*स्त्री.* १. क्लेश; कष्ट. वेदना; पीडा. ३. छळ.

यंत्री–*पु.* तंत्रज्ञ; कारागीर; 'मेकॅनिक'.

यक–*वि.* [*फा.*] एक; एकटा. **–क़लम**–*अव्य.* पूर्णपणें. **–जा**–*वि.* एकत्र; मिसळलेलें. **–जाई**–*वि.* एकत्र मिळालेलें; एकंदर.**–तरफ़ा**–*वि.* एकतर्फी. **–ब–यक; –बारगी**–*अव्य.* एकाएकीं; अचानक.**–मुश्त**–*अव्य.* एकाच वेळीं; एक हातीं; एक मुठीं (रक्कम इ०ची फेड). एका रकमेनें.**–लौता**–*वि.* एकुलता. **–सर**–*वि.* १. एकटा. २. एकंदर. **–साँ**–*वि.* सारखा; समान.**–सानियत; –सानी**–*स्त्री.* सदृशता; सादृश्य. **–सू**–*वि.* एकाग्र. **मु०–जान, दो कालिब**– अभिन्नहृदय मित्र. **–न शुद दो शुद**– दुष्काळांत तेरावा महिना. **यके बाद दीगरे**– एकामागून एक. [अनुपम.

यकता–*वि.* [*फा.*] अद्वितीय;

यकायक–*अव्य.* [*फा.*] एकाएकीं; एकदम; अचानक.

यक़ीन–*पु.* [*अ.*] दृढ विश्वास; खात्री; भरंवसा. **मु०–जानना**– खात्री बाळगणें; विश्वास ठेवणें. **–लाना**–विश्वास ठेवणें; मानणें.

यक़ीनन्–*प्रत्य.* [*अ.*] निश्चितपणें; खात्रीपूर्वक; खरोखरींच.

यक़ीनी–*वि.* [ ] निश्चित; ठराविक; खात्रीचा.

यक्ष्मा–*पु.* क्षयरोग.

यख़–*पु.* [*फा.*] गोठून घट्ट झालेलें बर्फ; हिम. [रस्सा.

यख़नी–*स्त्री.* [*फा.*] मांसाचा

यगानगत; यगानगी–*स्त्री.* [*फा.*] १. समीपता; जवळीक. २. सहकार्य. ३. एकमत. ४. अद्वितीयत्व.

यगाना–*वि.* [*फा.*] १. नात्याचा; आप्तेष्ट. २. निरुपम; अद्वितीय.

यग्य*–*पु.* यज्ञ.

यच्छ*–*पु.* यक्ष.

यजमान–*पु.* १. यज्ञ करणारा; ब्राह्मणांना दान देणारा. २. घरमालक; पाहुण्यांचें स्वागत करणारा.

यजमानी–*स्त्री.* १. यजमानांची वस्ती. २. यजमानपण. ३. पौरोहित्य.

यज्ञोपवीत– *पु.* जानवें. **–संस्कार**– *पु.* मुंज; उपनयन.

यतन–*पु.* प्रयत्न करणें.

यतीम–*पु.* [*अ.*] आई–बाप नसलेला; अनाथ; पोरका. **–ख़ाना**–*पु.* अनाथालय.

यत्रतत्र–*अव्य.* सर्वत्र; चोहींकडे.

यथा–*अव्य.* जसें. **–क्रम**–*अव्य.* क्रमानें. **–तथ; तथ्य**–*वि.* १. हूबेहूब; जशाचा तसा. २. निश्चित; असंदिग्ध; 'प्रिसाइस'. **–मति**–*अव्य.* बुद्धीप्रमाणें. **–यथ**–*अव्य.* योग्य प्रकारें. **–वत्**–*वि.* जशाचा तसा. **–विधि**–*अव्य.* विधिपूर्वक; ठरविल्याप्रमाणें; नियमाप्रमाणें. **–शीघ्र**–*अव्य.* शक्य तितक्या लौकर. **–स्थिति**–*अव्य.* जैसे थे; जशी थिति असेल त्या प्रमाणें; 'अॅज दि केस मे बी'. **–समझौता**–*पु.* जैसे थे करार; 'स्टँडस्टिल अॅग्रीमेंट'.

यथारथ*–*वि.* पा० 'यथार्थ'.

यथार्थ–*वि.* १. उचित; २. खरें; बिनचूक; निश्चित; 'अॅक्युरेट'. **–ता**–*स्त्री.* बिनचूकपणा; 'अॅक्युरसी'.**–वाद**–*पु.* वास्तववाद; 'रियॅलिझम'. **–वादी**–*वि.* वास्तववादी; 'रियॅलिस्ट'.

यथेष्ट–*वि.* पूर्ण; भरपूर; पुरेसें.

यद–*पु.* [*अ.*] हात.

यदपि*–*अव्य.* जरी.

यदा–कदा–*अव्य.* कधींकधीं; अधूनमधून.

यदि–*अव्य.* जर. **–चेत्**–*अव्य.* यद्यपि: जरी.

यद्यपि–*अव्य.* जरी.

यननूँ*–*सर्व.* यांना.

यम–*पु* [*फा.*] नदी; महानदी.

यम–*पु.* १. यमराज; मृत्यूचा देव. २. जुळें. ३. संयम. **–ज**–*वि.* आवळेंजावळें; **–पु.** जुळीं मुलें; जुळें; 'ट्विन'. **–द्वितीया**–*स्त्री.* भाऊबीज.**–धार**–*पु.* दुधारी तलवार. **–नाह***–*पु.* यमराज; धर्मराज. **–पुर**–*पु*; **–पुरी**–*स्त्री.* १. यमलोक. नरक.

यमन–*पु.* १. बंधन. २. शासन.
यमन–*पु.* [*अ.*] अरबस्तानांतील एक प्रदेश. ['ट्विन '.
यमल–*वि. पु.* जुळें; जोडी;
यरक़ान–*पु.* [*अ.*] १. पंडुरोग. २. कावीळ. [हल्ला.
यलग़ार[+]– *स्त्री.* [*तु.*] चढाई;
यव–*पु.* १. जव; वार्ली (धान्य). २. एका जवा एवढें वजन. **–क्षार–** *पु.* यवखार; पालाशकर्बित; 'पर्लअॅश '; ' नायट्रेट ऑफ पोटॅश '. **–द्वीप**–*पु.* जावाबेट. [पडदा.
यवनिका– *स्त्री.* नाटकाचा
यवानी– *स्त्री.* ओंवा.
यव्य–*पु.* १. सातूचें शेत. २. सातूचें वाळलेलें सत्त्व; ' माल्ट '.
यश–*पु.* कीर्ति; ख्याति. **मु०–गाना**– १. प्रशंसा करणें २. कृतज्ञ होणें. **–मानना**–आभार मानणें; कृतज्ञ होणें.
यशद–*पु.* जस्त; ' झिंक '.
यशब–*पु.* [*अ.*] गोमेद; विजेपासून वांचविणारा व रोग दूर करणारा एक हिरवा खडा.
यशस्वी; यशी–*वि.* विख्यात.
यशुमति*– *स्त्री.* यशोदा.
यशोगाथा– *स्त्री.*; **यशोगान**–*पु.* प्रशंसा; स्तुति; गौरवकथा.
यष्टि– *स्त्री.* दांडी; यष्टि; ' विकेट '. **–त्रय**–*पु.* क्रिकेटमधील तीन दांड्या; ' विकेट्स '.**–रक्षक**–*पु.* यष्टिरक्षक; ' विकेटकीपर '.
यह–*सर्व.* हा; ही; हें.
यहाँ–*अव्य.* येथें; या ठिकाणीं.
यहि*–*सर्व.* 'यह' चें विभक्ति–प्रत्यय लागण्यापूर्वीचें जुनें हिंदी रूप.
यहीं–*अव्य.* [यहाँ+ही]येथेंच.
यही–*सर्व.* [यह+ही] हाच; हीच; हेंच.
यहूदी–*वि.* [हिब्रू] यहुदी; ज्यू.

याँ[+]–*अव्य.* येथें.
यांत्रिक–*पु.* यंत्रज्ञ; यंत्रें बनविणारा; ' मशीनिस्ट '. –*वि.* यंत्रविषयक; ' मेकॅनिकल '.
या–*सर्व.* व्रजभाषेंत विभक्तिप्रत्यय लागण्यापूर्वी होणारें 'यह' चें रूप; ह्या.
या–*अव्य.* [*फा.*] १. अथवा; किंवा. २. हे; अहो; अरे. **–अली; –इलाही; –रब**–*अव्य.* हे ईश्वरा.
याक़ूत–*पु.* [*अ.*] लाल (रत्न).
याचक–*पु.* १. मागणारा. २. भिकारी. [मागणें.
याचना–*क्रि. स.* मागणें. –*स्त्री.*
याचिका– *स्त्री.* अर्ज; आवेदनपत्र; ' पिटिशन '. **–दाता**–*पु.* अर्ज करणारा; ' पिटिशनर '.
यातायात–*पु.* ये–जा; दळणवळण; वाहतूक; रहदारी; ' ट्रॅफिक '.
यातें*–*अव्य.* यामुळें.
यात्रा– *स्त्री.* १. प्रवास. २. यात्रा. ३. प्रयाण. ४. बंगालमध्यें प्रचलित असलेलें एक प्रकारचें लोक नाटच. ['ट्रॅव्हलिंग अलाउन्स '.
यात्राधिदेय–*पु.* प्रवासभत्ता;
यात्रावाल–*पु.* तीर्थोपाध्याय; पंड्या. [प्रवास करणारा; प्रवासी.
यात्रिक; यात्री–*पु.* यात्रा किंवा
यात्री-बंधु–*पु.* रेल्वेंतील प्रवाश्यांचा मार्गदर्शक; ' पॅसेंजर गाइड '.
याद– *स्त्री.* [*फा.*] १. स्मरण; आठवण. २. स्मरणशक्ति. **–गार**–*स्त्री.* स्मृतिचिन्ह; स्मारक. **–दाश्त**–*स्त्री.* १. स्मरणशक्ति; स्मृति. २. आठवणीसाठीं वहींत केलेली नोंद. **मु०–करना**–१. तोंडपाठ करणें. २. आठवण काढणें.**–किया है**–बोलावलें आहे. **–फ़रमाना**–बोलावणें.

यानांतरण–*पु.* एका जहाजांतून दुसऱ्या जहाजांत माल किंवा प्रवाश्यांना चढविणें; ' ट्रांशिपमेंट '.
यानाधिदेय–*पु.* वाहनभत्ता; ' कन्व्हेयन्स अलाउन्स '. [म्हणजे.
यानी–ने–*अव्य.* [*अ.*] अर्थात्;
यापन–*पु.* चालविणें; घालविणें; व्यतीत करणें. [उत्पन्न; आय.
याफ़्त– *स्त्री.* [*फा.*] मिळकत;
याफ़्ता–*वि.* [*फा.*] मिळालेला; प्राप्त केलेला [सनदयाफ़्ता=सनद मिळालेला].
याब–*प्रत्य.* [*फा.*] मिळविणारा [फ़तहयाब=जय मिळविणारा].
याबू–*पु.* [*फा.*] तट्टू.
याम–*पु.* १. प्रहर. २. काळ; समय. ३. नियंत्रण.– *स्त्री.** रात्र.
यासना[+]–*पु.* अंजन; सुरमा; काजळ.
यामि–मी– *स्त्री.* १. रात्र. २. कुलवधू; धर्मपत्नी. ३. बहीण.
यामिका–नी– *स्त्री.* रात्र.
याम्योत्तररेखा– *स्त्री.* मध्याह्न रेषा; रेखावृत्त.
यायावर–*वि.* [भटक्या; फिरस्ता.–*पु.* संन्यासी; परिव्राजक.
यार–*पु.* [*फा.*] १. मदतनीस; सहाय्यक. २. मित्र. ३. जार. ४. प्रियकर.
यारा–*पु.* [*फा.*] सामर्थ्य.
याराना–*पु.* [*फा.*] १. मैत्री; दोस्ती. २. स्त्रीपुरुषांचें अनुचित प्रेम.–*वि.* मित्राप्रमाणें.
यारी– *स्त्री.* [*फा.*] १. मैत्री. २. पुरुषाचा अनुचित प्रेमसंबंध.
याल– *स्त्री.* [*तु.*] आयाळ.
यावर–*वि.* [*फा.*] मित्र; मदतनीस. [नैराश्य.
यास– *स्त्री.* [*अ.*] निराशा;
यासम (मी) न–*पु.* [*फा.*] चमेली.

यासीन– *स्त्री*. [*अ.*] चांगली गति प्राप्त होण्यासाठीं मृत्युसमयीं म्हणावयास सांगतात तो कुराणांतील अध्याय.

यासु*–सर्व. १. ज्याचा. २. ज्याला.

याहि–ही*–*सर्व*. याला.

यीशु–*पु*. येशु ख्रिस्त.

युक्त–*वि*. १. जोडलेलें. २. उचित.–**दली**–*वि*. ' गॅमोपॅटलस '. –**बाह्यदली**–*वि*. ' गॅमोसेपॅलस '.

युक्ताक्षर–*पु*. जोडाक्षर.

युक्ति– *स्त्री*. १. उपाय. २. कौशल्य; चातुर्य. ३. तर्क. ४. पद्धत; प्रकार. ५. नवीन कल्पना; ' डिव्हाइस '.–**मूलक**–*वि*. तर्कयुक्त; तर्कसंगत; ' रॅशनल '. –**युक्त**; –**संगत**–*वि*. तर्कसंगत; प्रमाणित.

युक्त्याभास–*पु*. वितंडवाद; हेत्वाभासाची तर्कपद्धति; ' सोफिस्ट्री '.

युग–*पु*. १. जोडी. २. बारा वर्षांचा काळ. ३. खूप मोठा कालावधि.–**पत्**–*अव्य*. एकाच वेळीं; बरोबरच; एकदम.–**ल**–*पु*. जोडी; जोडा.–**संधि**– *स्त्री*. संक्रमणकाल; संक्रमणावस्था.

युगति*– *स्त्री*. युक्ति.

युग्म–*पु*. जोडी; जोडा.–**भुजी** –*वि*. दुभागलेलें; 'डायकॉटॉमस'. –**वेश्म**–*पु*. ' क्रीमोकार्प '.

युग्मक–*पु*. १. जोडी; 'डबलस'. २. ' गॅमीट '.

युग्मन–*पु*. दोन वस्तू एकत्र जोडणें; एकत्रीकरण; 'कपलिंग'; ' काँजुगेशन '.

युद्ध–*पु*. युद्ध; लढाई.–**परिषद्** –*स्त्री*. युद्धमंडळ; 'वॉर कौन्सिल'. –**पोत**–*पु*. युद्ध-नौका; ' वॉरशिप '.–**बंदी**–*पु*. युद्धकैदी.–**रत**; –**लिप्त**–*वि*. युद्धांत सामील झालेला; ' बेलिजरंट '.–**विराम**; –**स्थगन**–*पु*. युद्धतहकुबी; युद्धबंदी; ' सीझफायर '.

युद्धापराधी–*पु*. युद्धविषयक गुन्हेगार; ' वॉर क्रिमिनल '.

युद्धोत्तेजक–*पु*. युद्धखोर; ' वॉर मॉंगर '. [' आर्मामेंट्स '.

युद्धोपकरण–*पु*. शस्त्रास्त्रें;

युम्न–*पु*. [*अ.*] १. सुदैव. २. सफलता.

युवक–*पु*. तरुण; जवान.

युवति–ती– *स्त्री*. तरुण स्त्री; तरुणी. [पद.–*पु*. युवराज.

युवराई*–**जी**– *स्त्री*. युवराजाचें

युवराज–*पु*. राज्याचा वारस असलेला राजाचा मोठा मुलगा; राजपुत्र.

युवा; **युवान**–*वि*. तरुण.

युवावस्था– *स्त्री*. तारुण्य.

यूँ–*अव्य*. असें; अशा तऱ्हेनें.

यूज़–*पु*. [*फा.*] १. चित्ता. २. शोध; जिज्ञासा.–*वि*. [*तु*] शेंकडा.

यूथ–*पु*. १. समूह; समुदाय. २. सैन्य.

यूथिका; **यूथी**– *स्त्री*. जुई (फूल व झाड).

यूनान–*पु*. [*अ.*] ग्रीस देश.

यूनानी–*वि*.[*अ.*]ग्रीस देशाचा; ग्रीक. – *स्त्री*. ग्रीक भाषा. –*पु*. ग्रीस निवासी.

यूरप–*पु*. [*इं.*] युरोप.

यूह*–*पु*. समूह; झुंड; यूथ.

ये–*सर्व*. हे; हे सर्व.

येई*–*सर्व*. हाच.

येऊ*–*सर्व*. हाहि.

येतो*–*वि*. इतका.

येहू*–*अव्य*. हाहि.

यों–*अव्य*. असें; अशा तऱ्हेनें. –**ही**–*अव्य*. १. असेंच; या प्रमाणेंच. २. सहज; उगीच.

योक्त्र–*पु*. १. दोरी; काढणी. २. दोरी बांधण्याचें अवजार; जोडणीचा सरंजाम; ' गीअर '.

योग–*पु*. १. संयोग; मेळ. २. योगायोग. ३. सहकार. ४. सहवास. ५. प्रेम. ६. बेरीज. –**दान**–*पु*. सहकार्य. **मु०–निकालना**– बेरीज करणें.

योजित्र–*पु*. जादा पुरवठा; टप्प्याचे घोडे किंवा माणसें; ' रिले '.

योजी–*वि*. जोडणारा; ' कनेक्टिव्ह '.

योषा; **योषिता**– *स्त्री*. स्त्री; नारी.

यौ+–*सर्व*. पा० ' यह '.

यौगिक–*पु*. दोन किंवा अधिक तत्त्वांपासून बनलेला पदार्थ; 'कंपाउंड '. –*वि*. जोड–(शब्द इ०).

यौत(तु)क–*पु*. हुंडा; लग्नांत वराला किंवा वधूला मिळणारा अहेर.

यौन–*वि*. लैंगिक; वैषयिक. –**रोग**–*पु*. गरमी; उपदंश (रोग). ' व्हिनिअरिअल डिसीझ '.

यौम–*पु*. [*अ.*] दिवस. –(**मे**) **आज़ादी**–*पु*. स्वातंत्र्यदिन.

यौमिया–*पु*.[*अ.*] एका दिवसाचें वेतन.

यौवन–*पु*. तारुण्य.

यौवराज्याभिषेक–*पु*. राजपुत्राचा राज्याभिषेक.

र

र–देवनागरी वर्णमालेंतील सत्ताविसावें व्यंजन.

रंग–*पु.* [*सं.*] १. जस्त; कथील. २. नाटयशाला; रंगमंच; रंगभूमि. ३. नृत्य; क्रीडा. ४. रणभूमि. ५. रंग; वर्ण. **–कणक**–*पु.* 'क्रोमोप्लास्ट'. **–कार**–*पु.* रंगारी. **–बिरंग–गा**–*वि.* १. रंगीबेरंगी. २. विविध प्रकारचा. **–भवन**–*पु.* रंगमहाल; विलास–विहाराचें स्थान. **–बाति***–*स्त्री.* सुगंधित द्रव्याची वात किंवा दिवा. **–भूमि**–*स्त्री.* नाटकगृह. **–मंच**–*पु.* १. मंच. २. रंगभूमि; 'स्टेज'. **–महल**–*पु.* पा० 'रंगभवन'. **–रस; –रसिया**–*पु.* विलासी; रंगेल पुरुष. **–राज**–*पु.* श्रीकृष्ण. **–राता**–*वि.* प्रेमरसांत बुडालेला, तल्लीन. **–राग**–*पु.* १. रागरंग. २. विलास. **–रावा**–*वि.* रंगलेला; प्रसन्न. **–शाला**–*स्त्री.* १. नाटयशाळा. २. चित्रनिर्माणगृह; 'स्टूडियो'. मु०**–मचना**–रणधुमाळी माजणें. **–मचाना**– १. धुमाकूळ घालणें. २. जोराचें युद्ध करणें.

रंग–*पु.* [*फा.*] १. रंग; वर्ण. २. नाच, गाणें इ०. ३. तारुण्य. ४. शोभा; सौंदर्य. ५. वजन; प्रभाव. ६. आनंद; उत्सव. ७. मनाची लहर. ८. दशा; स्थिति. ९. चाल; रीत. **–ढंग**–*पु.* चालचलणूक; आचरण. **–रली; –रेली**–*स्त्री.* क्रीडा; विहार; मौज; विलास. **–साज**–*पु.* रंगारी; रंग तयार करणारा. मु०**–आना**– १. रंग चढणें. २. मजा येणें. **–उड़ना; –उतरना**– १. रंग उडून जाणें; विटणें; फिकें पडणें. २. तोंड उतरणें. **–काछना***– १. ग्रहण करणें. २. डाव करणें. **–खेलना**–रंग उडविणें. **–चढ़ना**– १. मजा येणें; धुंदी चढणें. २. प्रभाव पडणें. **–चूना; –टपकना**– तारुण्य मुसमुसणें. **–जमना**– १. रंग, मजा येणें. २. छाप पडणें. **–जमाना**–छाप पाडणें. २. धाक बसविणें. **–दिखाना**–मजा दाखविणें; छाप पाडणें. **–निखरना**–रंग खुलणें; स्वच्छ व चमकदार होणें. **–पकड़ना; –पर आना**– १. बहरास येणें. २. शोभा वाढणें. **–फ़क़ हो जाना; –फीका पड़ना**– पा० 'रंग उड़ना'. **–बदलना**– स्थिति बदलणें. **–बरसना**– शोभा वृद्धिगत होणें. **–बिगड़ना**– १. वाईट स्थिति येणें. २. प्रभाव कमी, नष्ट होणें. **–में भंग होना**– आनंदावर विरजण पडणें. **–में रँगना**– तल्लीन, तन्मय होणें. **–रचाना**– आनंदोत्सव करणें. **–रलना**– क्रीडा, विलास करणें. **–लाना**– प्रभाव दाखविणें.

रंगत–*स्त्री.* १. मजा; मौज. २. स्थिति; अवस्था. ३. रागरंग; आनंद.

रंगतरा–*पु.* नारिंग; संत्रें.

रँगना–*क्रि. स.* १. रंगविणें. २. प्रेमांत गुंतविणें. ३. अनुकूल करणें. *–क्रि. अ.* आसक्त होणें.

रंगरूट–*पु.* [*इं.*] १. नवीन भर्ती केलेला शिपाई; 'रिक्रूट'. २. नवशिक्या.

रँगरेज़–*पु.* [*फा.*] रंगारी.

रँगवाना–*क्रि. स.* रंगवून घेणें.

रँगवाई–*स्त्री.* पा० 'रँगाई'.

रँगा–*वि.* रंगलेला. मु०**–सियार**– वरून सज्जन दिसणारा बनेल माणूस; ढोंगी.

रँगाई–*स्त्री.* रंग देण्याचें काम किंवा मजुरी.

रँगाना–*क्रि. स.* रंगवून घेणें.

रँगारंग–*वि.* [*फा.*] चित्रविचित्र; विविध.

रंगीं–गी–*वि.* १. आनंदी; विनोदी. २. रंगाचा. ३. अनुरक्त.

रंगीन–*वि.* [*फा.*] १. रंगीत; रंगदार. २. विलासप्रिय.

रंगीनी–*स्त्री.* १. शृंगार; विलास. २. विलासीपणा; रंगेलपणा. [रसिक.

रँगीला–*वि.* [*फा.*] रंगेल;

रंच; रंचक–*वि.* थोडें; अल्प.

रंज–*पु.* [*फा.*] १. दुःख; त्रास; खेद. २. शोक. ३. विषाद; पश्चात्ताप.

रंजक–*पु.* रंगारी. *–वि.* रंजविणारा; हांसविणारा; मनोरंजक.

रंजक–*स्त्री.* [*फा.*] १. तोंडयाच्या बंदुकीची दारू. २. एखाद्याला चिडविण्यासाठीं सांगितलेली गोष्ट; चुटका.

रंजन–*पु.* १. मनोरंजन. २. रंगविण्याची क्रिया. ३. लाल चंदन. **–कारी साहित्य**–*पु.* ललित साहित्य; 'लाइट लिटरेचर'.

रंजना*–*क्रि. स.* १. प्रसन्न करणें. २. भजणें; स्मरण करणें. ३. रंगविणें. [लेलें. २. आनंदित.

रंजित–*वि.* १. रंगलेलें; रंगवि-

रंजिश; रंजीदगी–*स्त्री.* [*फा.*] १. दुःख; खेद. २. नाराजी; बेबनाव. ३. शत्रुता; वैर.

रंजीदा–*वि.* [*फा.*] १. दुःखी; कष्टी; खिन्न. २. नाराज; अप्रसन्न.

रंटनजन किरण–*स्त्री.* क्ष–किरण; 'एक्स रे'.

रँड़ापा–*पु.* वैधव्य.

रंडी– *स्त्री.* कलावंतीण; रखेली; वेश्या. –**बाज़**– *पु.* वेश्यागामी; बाहेरख्याली. –**बाज़ी**– *स्त्री.* वेश्यागमन. **सु०**–**रखना**– रखेली, बाई ठेवणें.

रँडुआ–वा–*पु.* विधुर.

रँड़ोरा[+]–*पु.* विधुर.

रँड़ोरी[+]– *स्त्री.* विधवा.

रंति– *स्त्री.* १. क्रीडा. २. विराम.

रंद–*पु.* १. झरोका. २. बंदूक किंवा तोफ सोडण्यासाठीं किल्लचाच्या भिंतींत केलेलें छिद्र.

रँदना–*क्रि. स.* रंधणें; रंधा मारणें; गुळगुळीत करणें.

रंदा–*पु.* रंधा.

रंधक–*पु.* १. स्वयंपाकी; आचारी. २. नष्ट करणारा.

रंधन–*पु.* १. स्वयंपाक. २. नष्ट करणें.

रंभ–*पु.* १. वेळू. २. एक प्रकारचा बाण. ३. कठिण शब्द. ४. गर्जना. [–*पु.* पहार.

रंभा– *स्त्री.* एका अप्सरेचें नांव.

रँभाना–*क्रि. अ.* हंबरणें.

रअय्यत– *स्त्री.* [*अ.*] १. रयत; प्रजा. २. कूळ; शेतकरी. ३. नोकर; चाकर. ४. भाडें न देतां घरांत राहाणारा भाडेकरू. –**दारी**– *स्त्री.* सत्ता; राज्य; शासन. –**वारी**–*वि.* रयतवारी (पद्धत). –*स्त्री.* कुळानें मालगुजाराऐवजीं सरळ सरकारला सारा देण्याची पद्धत. [किंचितृहि.

रइकौ*–*अव्य.* थोडेंहि;

रइनि*– *स्त्री.* रजनी; रात्र.

रई– *स्त्री.* १. घुसळण्याची रवी. २. भरडा. ३. रवा. ४. पीठ.–*वि. स्त्री.* १. अनुरक्त. २. संयुक्त.

रईस–*पु.* [*अ.*] १. श्रीमंत; धनिक. २. प्रांताधिकारी. ३. जमीनदार. –**ज़ादा**–*पु.* धनिकपुत्र.

रईसी– *स्त्री.* [*अ.*] श्रीमंती.

रउताई*– *स्त्री.* स्वामित्व; मालकी.

रउरे*–*सर्व.* आपण; महाराज; महाशय (आदरसूचक शब्द).

रकछ[+]–*पु.* पानांचीं भजीं.

रकत*–*पु.* रक्त. –*वि.* लाल.

रकतांक*–*पु.* १. पोंवळें. २. केशर. ३. रक्तचंदन.

रक़बा–*पु.* [*अ.*] क्षेत्रफळ.

रक़म– *स्त्री.* [*अ.*] १. लिहिण्याची क्रिया अथवा भाव. २. छाप; मोहोर. ३. धन; संपत्ति. ४. दागिना. ५. चलाख; धूर्त. ६. प्रकार. ७. रक्कम.

रकाब– *स्त्री.* [*अ.*] १. रिकीब. २. मोठी बशी.–**दार**–*पु.* १. मोतद्दार. २. स्वयंपाकी. ३. हलवाई.

रक़ाबत– *स्त्री.* [*अ.*] चढाओढ; प्रतिद्वंद्विता; एका प्रेयसीच्या अनेक प्रियकरांमधील स्पर्धा.

रकाबी– *स्त्री.* १. तबक. २. बशी; ताटली. –**चेहरा**–*पु.* १. रुंद चेहरा. २. गोल चेहरा.

रक़ीब–*पु.* [*अ.*] दुसरा प्रियकर; प्रतिद्वंद्वी; प्रतिस्पर्धी.

रक्त–*पु.* १. रक्त. २. लाल रंग. ३. रक्तचंदन. –**क्षेपण**–*पु.* एकाच्या शरीरांतील रक्त काढून तें दुसऱ्यास देणें; 'ब्लड ट्रान्सफ्यूजन'. –**चाप**–*पु.* रक्तदाब; 'ब्लड प्रेशर'. –**दान बँक**–*पु.* रक्तपेढी; 'ब्लड बँक'.

रक्तांबु – *पु.* रक्ताचा पातळ पारदर्शी भाग; 'सीरम'.

रक्तार्श–*पु.* रक्ती मूळव्याध.

रक्षक–*वि. पु.* रक्षण करणारा; पहारा देणारा. –**पोत**–*पु.* संरक्षक जहाज; 'एस्कर्ट व्हेसल'.

रक्षना*– *क्रि. स.* १. रक्षण करणें. २. सांभाळणें.

रक्षा– *स्त्री.* १. संरक्षण; बचाव. २. भूतबाधेपासून बचावण्यासाठीं मुलांच्या गळचांत बांधतात तो गंडा. ३. राख; भस्म. –**दल**–*पु.* गृहरक्षक दल; 'होमगार्ड'. –**बंधन**–*पु.* नारळी पौर्णिमा; राखी पौर्णिमा. –**मंगल**–*पु.* भूतबाधेपासून रक्षण व्हावें म्हणून केलें जाणारें अनुष्ठान किंवा धार्मिक क्रिया.

रक्षित–*वि.* राखीव; रक्षण केलेलें. –**स्थान**–*पु.* राखून ठेवलेली जागा; 'रिझर्व्हड सीट'.

रक़्स– *पु.* [*अ.*] नृत्य; नाच.

रक़्से ताऊस–*पु.* मयूर–नृत्य.

रख–खा *स्त्री.* राखीव कुरण, जंगल.

रखना–*क्रि. स.* १. ठेवणें. २. सांभाळणें; रक्षण करणें. ३. वायां जाऊं न देणें. ४. सोंपविणें. ५. गहाण ठेवणें.

रखनी– *स्त्री.* रखेली; उपपत्नी.

रखरखाव–*पु.* सांभाळ; रक्षण; 'अपकीप'; 'मेन्टेनन्स'.

रखला–*पु.* पा० 'रहँकला'.

रखवाई– *स्त्री.* १. राखण. २. राखण करण्याची मजुरी.

रखवाना–*क्रि. स.* ठेववून घेणें.

रखवार–रा*– *पु.* पा० 'रखवाला'.

रखवारी[+]–*स्त्री.* पा० 'रखवाली'.

रखवाला–*पु.* संभाळणारा; राखण करणारा; चौकीदार; पहारेकरी.

रखवाली– *स्त्री.* राखण; रक्षण.

रखाई– *स्त्री.* १. राखण; रखवाली. २. राखण करण्याची मजुरी.

रखाना–*क्रि. स.* १. ठेववून घेणें. २. सांभाळणें.

रखार[+]–*पु.* कुळव; वखर.

रखिया*–*पु.* रक्षक; राखणदार. –*स्त्री.* १. राखी. २. राख.

रखियाना–*क्रि. स.* १. राख लावून घासणें. २. राखेंत ठेवणें.

रखेड़िया–*पु.* ढोंगी साधु; गोसावडा.

रखेल–ली– *स्त्री.* रखेली.

रखैया–*पु.* रक्षण करणारा; राखणारा. [बाई.

रखैल– *स्त्री.* रखेली; ठेवलेली

रखौत; रखौना–*पु.* राखीव कुरण.

रख़्त–*पु.* [*फा.*] १. सामान. २. पोशाख. ३. जोडयाचें कातडें. ४. थाटमाट.

रग– *स्त्री.* [*फा.*] १. शीर; नस. २. नाडी. ३. पानाची शीर. ४. रेषा; रेशा. ५. वाईट संवय; खोड.–**दार**–*वि.* १. रेशेदार. २. वाईट संवयीचा.–**पट्ठा**–*पु.* शरीरांतील शिरा व स्नायु; विविध अवयव.–**रेशा**–*पु.* १. पानांच्या शिरा. २. शरीराचे अवयव. ३. अंडीं–पिल्लीं; बारीकसारीक गोष्टी. **मु०–उतरना**–१. वाट सरकणें. २. हड्डी नरम होणें ३. राग उतरणें.–**खुलना**–शिरेंतून खूप रक्त वाहाणें.–**दबना**–१. भिणें. २. कह्यांत, ताब्यांत असणें. –**पहिचानना**–नाडी, रहस्य जाणणें.–**फड़कना**–१. शीर उडणें. २. अनिष्टाची शंका येणें.–**रग फड़कना**–आवेशांत येणें; उत्साहित, पुलकित होणें.–**रगमें**–नसानसांत. –**रेशेमें पड़ा होना**–अंगवळणीं पडलेलें असणें.–(**गों**) **में खून दौड़ना** –रक्त सळसळणें.

रगड़– *स्त्री.* १. घर्षण; घर्षणानें उत्पन्न झालेली खूण. २. खरचटणें, रगडणें, चेपणें इ० क्रिया. ३. अत्यंत मेहनत. ४. हुज्जत. **मु० –खाना**–धक्के खाणें.–**देना**–१. वांटणें; पिसणें. २. त्रास देणें.

रगड़ना–*क्रि. स.* १. घासणें; घर्षण करणें. २. वांटणें. ३. रगडणें; चेपणें. ४. भरडणें ५. त्रास देणें. ६. खूप श्रम करणें. ७. संभोग करणें.–*क्रि. अ.* १. खितपत पडणें; विकास न करणें. २. खूप श्रम करणें.

रगड़ा–*पु.* १. घर्षण. २. सतत चालणारें भांडण. ३. अत्यंत परिश्रम.–**झगड़ा**–*पु.* भांडण–तंटा. **मु० –देना**–घासणें; वांटणें. [करणारा.

रगड़ी–*वि.* भांडखोर; कटकट

रगद*–*पु.* रक्त. [' रगेदना '.

रगदना–*क्रि. स.* पा०

रग़बत– *स्त्री.* [*अ.*] १. प्रवृत्ति; रुचि. २. इच्छा. **मु०–आना** –प्रवृत्ति होणें.

रगमगा*–*वि.* रंगलेला; रंगीत.

रगवाना*–*क्रि. स.* गप्प बसविणें; शांत करणें (मुलांना).

रगाना+–*क्रि. अ.* चूप होणें; गप्प राहाणें. –*क्रि. स.* चूप, शांत करणें.

रगेदना–*क्रि. स.* पिटाळून लावणें; पळावयास लावणें; पाठलाग करणें.

रघुराइ–य*–*पु.* रामचंद्र.

रचक–*पु.* १. रचना करणारा; रचणारा. २. घटक; ' कॉन्स्टिट्युअंट '.

रचना–*क्रि. स.* १. रचणें; बनविणें. २. सजविणें. ३. रंगविणें. –*क्रि. अ.* १. अनुरक्त होणें. २. रंगणें. –*स्त्री.* १. कृति; निर्मिति. २. रचनाकौशल्य. ३. लेख, कविता इ०.

रचयिता–*वि.* रचणारा; कर्ता; करणारा.–*पु.* ग्रंथकार.

रचवाना; रचाना–*क्रि. स.* १. रचविणें; बनविणें. २. मेंदी लावून घेणें.

रचिप(र)चि*–*अव्य.* १. अत्यंत मेहनतीनें. २. मोठ्या कौशल्यानें.

रची+–*वि.* थोडा; जरा.

रच्छस*–*पु.* राक्षस.

रज–*पु.* १. आर्तव; ऋतु. २. पाणी. ३. पाप. ४. पुष्पपराग. ५* चादी. ६.* धोबी. ७.* राजत्व; महत्त्व. – *स्त्री.* १. धूळ. २. रात्र. ३. प्रकाश.

रच्छा*– *स्त्री.* पा० ' रक्षा '.

रजक–*पु.* धोबी; परीट.

रजत–*पु.* १. चांदी. २. रुपें. ३. रक्त. ४. सोनें. –*वि.* १. पांढरें; शुभ्र. २. लाल. –**जयंती**– *स्त्री.* रजतजयंती; ' सिल्व्हर ज्युबिली '. –**पट**–*पु.* रुपेरी पडदा; ' सिल्व्हरस्क्रीन '. –**मय**–*वि.* रजतात्मक; रजतोत्पादक; ' आर्जंटिफेरस '.

रजधानी*– *स्त्री.* १. राजधानी. २. राज्य. [राळ.

रजन– *स्त्री.* [इं. ' रेझिन ']

रजना*–*क्रि. अ.* रंगणें; मग्न होणें.– *क्रि. स.* रंगविणें. न. श.

रजनी– *स्त्री.* १. रात्र; निशा. २. हळद.–**गंधा**–*स्त्री.* रातराणी –**मुख**– *पु.* संध्याकाळ.

रजब–*पु.* [*अ.*] अरबी वर्षाचा सातवा महिना.

रजबहा–*पु.* नदींतून किंवा कालव्यांतून निघालेला मोठा नळ; ' मेन पाइप '.

रजवाड़ा–*पु.* १. राज्य. २. देशी संस्थान. ३. राजा.

रजवार*–*पु.* राजद्वार. २.

राजाचा दरबार.

रज़ा– *स्त्री*. [*अ*.] १. इच्छा; मर्जी. २. सुट्टी. ३. अनुमति. ४. स्वीकृति.–**कार**– *पु*. स्वयंसेवक.–**मंद**– *वि*. मान्य करणारा; राजी; कबूल असलेला.–**मंदी**– *स्त्री*. राजीखुशी; मान्यता; कबुली.

रज़ाअत– *स्त्री*. [*अ*.] तान्हेंपण; मुलाची दूध पिण्याची अवस्था; मुलाला अंगावर पाजणें.

रजाइ–ई–* *स्त्री*. १. राजत्व; राजा असणें. २. राजाज्ञा.

रजाइ(य)स*– *स्त्री*. १. राजाज्ञा; हुकूम. २. अनुमति.

रज़ाई– *स्त्री*. [*अ*.] १. लेप; रजई.–*वि*. दूधभाऊ.

रजाय; रजायस–सु*– *स्त्री*. १. आज्ञा; हुकूम. २. मर्जी.

रजिस्ट्री– *स्त्री*. [*इं*.] नोंदणी; 'रजिस्टर'. –**शुदा**–*वि*. नोंदलेलें; 'रजिस्टर्ड'.

रज़ील–*वि*. [*अ*.] नीच; हलक्या जातीचा.

रजोविरति– *स्त्री*. रजोनिवृत्ति; स्त्रीचा विटाळ कायमचा बंद होणें; 'मेनोपॉज'.

रज़्ज़ाक–*पु*. [*अ*.] १. धनी; पालन पोषण करणारा. २. ईश्वर. –*वि*. पोटाला देणारा.

रज्जु–*स्त्री*. १. दोरी. २. लगाम.

रज़्म– *स्त्री*. [*अ*.] युद्ध; लढाई.

रज़्मिया–*वि*. [*अ*.] युद्धविषयक; वीररसपूर्ण.

रट– *स्त्री*. १. घोकंपट्टी; धोशा. २. कावळ्याची कावकाव.

रटना–*क्रि. स*. १. पाठ करणें. २. लक्षांत ठेवणें. ३. घोकंपट्टी करणें. –*स्त्री*. घोकंपट्टी; पाठांतर.

रठ⁺–*वि*. शुष्क; सुकलेला.

रण–*पु*. युद्ध; संग्राम; लढाई. –**खेत***–*पु*. रणक्षेत्र. –**छोड़**–*पु*. कृष्ण (जरासंधाशीं झालेल्या लढाईंत श्रीकृष्ण रणक्षेत्र सोडून द्वारकेला निघून गेल्यावरून हें नांव पडलें).–**नीति**– *स्त्री*. लष्करी डावपेंच; 'स्ट्रॅटेजी'. –**पोत**–*पु*. युद्धनौका; 'वॉरशिप'. –**बंदी**– *स्त्री*. युद्धकैदी; 'कॅप्टिव्ह' –**सिंघा–हा**–*पु*. तुतारी; रणशिंग.

रतजगा–*पु*. १. जागरण. २. भाद्रपद कृष्ण द्वितीयेचा एक सण. या दिवशीं स्त्रिया रात्रभर जागून 'कजली' नांवाचें गाणें गातात.

रतन–*पु*. रत्न. –**जोत**– *स्त्री*. १. एक प्रकारचें रत्न. २. एक औषधी वनस्पति.

रतनागर*–*पु*. रत्नाकर; समुद्र.

रतनार–रा–*वि*. लाससर.

रतनारी–*पु*. एक धान्य. –*स्त्री*. लाली.

रतनालिया*–*वि*. लालसर.

रतवाही⁺– *स्त्री*. रखेली. –*अव्य*. रातोरात.

रताना*–*क्रि. अ*. १. रत होणें. २. आसक्त, कामातुर होणें.

रतायनी– *स्त्री*. वेश्या.

रति–*स्त्री*. १. मदनाची बायको. २. सुंदरी. ३. संभोग. –**नाह***–*पु*. रतिनाथ; कामदेव; मदन. –**बंध**–*पु*. संभोगाचा ढंग; आसन. –**राइ–ई***–*पु*. कामदेव; मदन.

रतिक*– *अव्य*. किंचित्; थोडेसें.

रतिगर⁺–*अव्य*. भल्या पहांटे.

रतिजरोग–*पु*. संभोगजन्य रोग; गरमी; उपदंश; 'व्हेनीरियल डिसीज'.

रतियाना*–*क्रि. अ*. रत होणें; मग्न होणें. –*क्रि. स*. आकर्षिणें.

रतिवंत*–*वि*. सुंदर.

रती*–*स्त्री*. पा० 'रति'; 'रत्ती'. –*अव्य*. थोडें; किंचित्. –**को**–*अव्य*. थोडेंसुद्धा. –**वंत**–*वि*. भाग्यवान्.

रतोपल*–*पु*. १. लाल कमळ. २. काव. ३. लाल दगड.

रतौंधी– *स्त्री*. रातांधळें.

रतौंहाँ*–*वि*. लाल; रक्तानें भरलेला.

रत्त – *स्त्री*. १. गुंज. २*. शोभा. –**भर**–*अव्य*. किंचित्; थोडा; रेंसभर; गुंजभर.

रत्थी– *स्त्री*. तिरडी.

रत्न–*पु*. १. रत्न; मौल्यवान् खडा. २. उत्कृष्ट वस्तु, व्यक्ति. –**कर**–*पु*. कुबेर. –**कार**–*पु*. जवाहिऱ्या. –**गर्भा**–*स्त्री*. पृथ्वी. –**त्रय**–*पु*. सम्यक् दर्शन; सम्यक् ज्ञान, सम्यक् चरित्र (जै०).

रथ्यायान–*पु*. 'ट्रामगाडी'.

रद–*पु*. दांत.–**च्छद**; –**छद***–*पु*. १. ओंठ. २. रतिक्रीडेच्या वेळीं उमटलेला दांतांचा वण. –**दान**–*पु*. दांतांची खूण उमटविणें. –**पट**–*पु*. ओंठ.

रद–*वि*. [*अ*.] १. रद्दी; टाकाऊ. २. हीन; तुच्छ. –**बदल**–*पु*. फेरबदल; परिवर्तन.

रदीफ़–*पु*. [*अ*.] १. पिछाडीचें सैन्य. २. कवितेमध्यें अंत्यानुप्रासानंतर वारंवार येणारा शब्द. –**वार**–*अव्य*. अक्षरक्रमानें.

रद्द–*वि*. [*अ*.] १. रद्द; खोडलेला. २. टाकाऊ. –(**द्दो**)**बदल**–*पु*. बदल; फेरफार.

रद्दा–*पु*. १. एकावर एक रचलेला वस्तूंचा थर. २. रट्टा. –**मु०** –**जमाना**– आरोप करणें.

रद्दी–*वि*. [*अ*.] कुचकामाचा;

टाकाऊ; निरुपयोगी. –स्त्री. निरुपयोगी वस्तु.

रन*–*पु.* रण. –**छोर**–*पु.* कृष्ण; पा० 'रणछोड'. –**बंका**; –**बाँकुरा**–*पु.* शूर; वीर; योद्धा; रणवांका.

रनकना; रनना*–*क्रि.अ.* झंकारणें; रुणझुणणें. [राणीवसा.

रन(नि)वास–*पु.* अंतःपुर;

रनी*–*पु.* वीर; योद्धा; रणी.

रपट–*स्त्री.* [*इं.*] रिपोर्ट; वृत्तान्त.–*स्त्री.*+ १. फेरफटका; रपेट. २. घसरगुंडी. ३. जमिनीचा उतार. ४. संवय; सराव. [चालणें.

रपटना–*क्रि.अ.* घसरणें; घाईनें

रपटाना–*क्रि.स.* १. घसरविणें. २. फेरफ़टका करावयास लावणें.

रपट्टा–*पु.* १. निसरडें. २. घसरणी. ३. रपाटा; धपाटा. ४. धांवपळ.

रफ*–*पु.* सुंदर ढंग.

रफल+–*पु.* १. पांघरण्याचें गरम वस्त्र; शाल. – *स्त्री.* [*इं.*] 'रायफल'.

रफ़ा–*वि.* [*अ.*] १. दूर केलेला. २. निवृत्ति; शांत.–*पु.* १. उंची. २. प्रगति; उन्नति. –**दफ़ा**–*वि.* १. काढून टाकलेला. २. निकाल लावलेला. **मु०–करना**–१. खलास करणें; निकाल लावणें. २. पिडा टाळणें.

रफ़ीअ–*वि.* [*अ.*] उंच; उच्च.

रफ़ीक़–*पु.* [*अ.*] १. मित्र; साथी. २. सहाय्यक.

रफ़ू–*पु.* [*अ.*] कापडाचें छिद्र विणून बुजविणें; तुणणें; रफू करण्याचें काम. –**गर**– *पु.* रफू करणारा. –**चक्कर**–*अव्य.* पळालेला; अदृश्य; नाहींसा झालेला; फरारी झालेला. **मु०–करना**– असंबद्ध गोष्टींची सांगड घालणें; ठिगळ जोडणें. –**चक्कर होना**–पळून जाणें; पसार होणें.

रफ़्त–*स्त्री.* [*फा.*] गमन; रवानगी. –*वि.* भूतकालीन; व्यतीत झालेला. –**व गुज़श्त**–*वि.* जुनाट व कुचकामी झालेला; व्यतीत.

रफ़्तनी–*स्त्री.* [*फा.*] १. जाणें; गमन. २. मालाची निर्यात.

रफ़्तार–*स्त्री.* [*फा.*] वेग; गति; चाल.– **व गुफ़्तार**– *स्त्री.* बोलण्याची व राहाण्याची पद्धत; चालचलन.

रफ़्ता–रफ़्ता–*अव्य.* [*फा.*] सावकाश; हळूहळू; क्रमानें.

रब–*पु.* [*अ.*] १. ईश्वर. २. पालनपोषण करणारा.

रबड़–*पु.* [*इं.*] रबर. – *स्त्री.* १. खूप केलेले श्रम. २. निष्कारण झालेली कटकट; हैराणगत.

रबड़ना–*क्रि.स.* १. ढवळणें. २. फेनणें. ३. फिरविणें.

रबड़ी–*स्त्री.* बासुंदी.

रबदा–*पु.* १. चिखल. २. चालण्याचे श्रम. **मु०–पड़ना**– जोराचा पाऊस पडणें. [खंजरी.

रबाना–*पु.* झांजऱ्यांचा डफ;

रबाब–*पु.* [*अ.*] एक प्रकारची सारंगी.

रबी–*स्त्री.* [*अ.*] १. वसंत ऋतूंत कापलें जाणारें रब्बीचें पीक. २. वसंत ऋतु. –**उल आख़िर या सानी**–*पु.* मुसलमानांचा चौथा महिना. –**उल औवल**–*पु.* मुसलमानांचा तिसरा महिना.

रबीब–*पु.* [*अ.*] १. बायकोच्या पहिल्या नवऱ्याचा मुलगा; सावत्र मुलगा. २. पाळलेला मुलगा.

रब्त–*पु.* [*अ.*] १. अभ्यास; सराव; संवय; राबता. २. घनिष्ठ संबंध. –**ज़ब्त**– मेळ; मिलाफ; घनिष्ठता.

रब्ब–*पु.* [*अ.*] ईश्वर. [झोंका.

रमक–*स्त्री.* १. लाट; तरंग. २.

रमक़–*वि.* [*अ.*] थोडा; किंचित्. –*स्त्री.* १. शेवटचा श्वास. २. नशाचा परिणाम. ३. थोडासा अंश.

रमकना–*क्रि.अ.* १. झोंका घेणें. २. डुलत, झोंकांत चालणें.

रमचेरा+–*पु.* सेवक; चाकर.

रमज़ान–*पु.* [*अ.*] मुसलमानांचा उपवासाचा महिना.

रमज़ानी– *वि.* [*अ.*] १. रमजान सणासंबंधींचा. २. रमजान महिन्यांत जन्मलेला. ३. भुकेला; उपाशी. [प्राचीन देश.

रमठ–*पु.* १. हिंग. २. एक

रमड़ना*–*क्रि.अ.* वर्षाव होणें; पाऊस पडणें. [३. विलास; मैथुन.

रमण–*पु.* १. पति. २. कामदेव.

रमणीक–य–*वि.* सुंदर; मनोहर; रमणीय.

रमता; रमतेराम–*वि.* भटक्या; एके ठिकाणीं स्थिर न राहाणारा.

रमतूला–*पु.* शिंग; रणशिंग (वाद्य).

रमना–*क्रि.अ.* १. रमणें. २. सहल करणें. ३. भोगविलास, रतिक्रीडा करणें. –*पु.* १. कुरण. २. आवार. ३. रमणीय स्थान.

रमनीक–य*–*वि.* रमणीय.

रमल–*पु.* [*अ.*] फांशांवरून वर्तविलें जाणारें भविष्य; फलज्योतिष.

रमाना–*क्रि.स.* १. रमविणें; मोहून टाकणें; भुलविणें. २. अनुकूल करणें. ३. थोपविणें. ४. लावणें; जोडणें.

रमूज़–*स्त्री.* [*अ.* ' रम्ज़'चें

अनेक०] १. नेत्रकटाक्ष; इशारे. २. रहस्यें. ३. कोडें.

रमेना*–*क्रि. अ.* पा० 'रमना'.

रमैती–*स्त्री.* १. कामाच्या बदली काम करण्याची प्रथा. २. अशा प्रकारें काम करण्याचा दिवस.

रमैनी–*स्त्री.* कबीराच्या बीजक नामक ग्रंथाचा एक भाग.

रमैया*–*पु.* राम; ईश्वर.

रम्ज़–*स्त्री.* [*अ.*] १. नेत्र-कटाक्ष; इशारा; खूण. २. रहस्य.

रम्मट–*पु.* रणवाद्य.

रम्माल–*पु.* [*अ.*] रमल विद्या जाणणारा; ज्योतिषी.

रम्हाना–*क्रि. अ.* हंबरणें.

रय–*पु.* १. वेग. २. प्रवाह. ३.* धूळ.

रयन*–*स्त्री.* रात्र.

रयना*–*क्रि. अ.* १. बोलणें. २. रंगणें; रंगानें भिजणें. ३. प्रेम-मग्न होणें. ४. एकरूप होणें.

रयनि*–*स्त्री.* रजनी; रात्र.

रय्यत–*स्त्री.* [*अ.*] रयत; प्रजा. [आवाज; ब्रह्मद्योतक शब्द.

ररंकार*–*पु.* रकाराचा

रर*–*स्त्री.* घोकंपट्टी; घोशा.

ररकना–*क्रि. अ.* सलणें; बोचणें.

ररना*–*क्रि. अ.* १. घोकणें. २. एकच गोष्ट सारखी सांगणें. ३. बोलावणें.

ररिहा*–*वि.* १. वटवट करणारा. २. गयावया करून मागणारा; याचक. –*पु.* घुबडासारखा एक पक्षी; पिंगळा.

ररी–*वि. पु.* १. भांडखोर. २. लतकोडगा; अधम; नीच.

रलना*–*क्रि. अ.* मिसळणें; एकत्र होणें. **मु०–मिलना–** मिसळून जाणें.

रलाना*–*क्रि. स.* मिसळणें; एकत्र करणें.

रली–*स्त्री.* १. क्रीडा; विहार. २. मौज; आनंद. [बुक्की; हल्ला.

रल्ल*–*पु.* १. रेटा. २. धक्का-

रल्लक–*पु.* १. पापणीचे केस. २. लोंकरीचें कापड; घोंगडी.

रव–*पु.* १. शब्द; नाद; गुंजा-रव. २. मोठा आवाज. ३.* रवि; सूर्य.

रवक–*पु.* एरंडाचें झाड.

रवकना–*क्रि. अ.* १. धांवून जाणें. २. उसळणें.

रवताई–*स्त्री.* स्वामित्व; प्रभुत्व; राजेपणा.

रवन*–*पु.* रमण; पति. –*वि.* क्रीडा, विहार करणारा.

रवनि–नी*–*स्त्री.* १. पत्नी; स्त्री. २. रमणी; सुंदर स्त्री.

रवन्ना–*पु.* १. रवाना होण्याचा, बाहेर जाण्याचा परवाना. २. जावक मालाबरोबर असणारें बीजक (रिसीट). ३. घरकाम करणारा गडी.

रवाँ–*वि.* [*अ.*] १. चालू; सुरू झालेला. २. प्रवाही. ३ संवयीचा; सरावाचा. ४. प्रचलित; रूढ. –*पु.* जलद वाचन.

रवाँस–*पु.* चवळीची भाजी.

रवा–*वि.* [*फा.*] १. उचित; योग्य. २. प्रचलित. ३. पूर्ण करणारा. **–दार**–*वि.* १. हितचिंतक. २. संबंध ठेवणारा. **–रवी**–*स्त्री.* घाई; शीघ्रता; धांवपळ.

रवा–*पु.* रवा; कण; दाणा. **–दार**–*वि.* दाणेदार. **–भर**–*अव्य.* कणभर; अत्यंत थोडा.

रवाज–*स्त्री.* [*अ.*] चालरीत; रिवाज; प्रथा.

रवानगी–*स्त्री.* [*फा.*] १. प्रस्थान; प्रयाण. २. पाठवणी.

रवाना–*वि.* [*फा.*] १. निघालेला. २. पाठविलेला.

रवानी–*स्त्री.* [*फा.*] १. प्रवाह. २. वेग. [प्रवाहांत मग्न.

रवानी*–*वि. स्त्री.* आनंद-

रवायत–*स्त्री.* [*अ.*] १. कथा; कथानक. २. प्रथा. ३. म्हण.

रवि–*पु.* १. सूर्य. २. अग्नि. ३. सरदार.

रविश–*स्त्री.* [*फा.*] १. गति; चाल. २. तऱ्हा; पद्धत; वागणूक. ३. बागेंतील पायवाट.

रवैया–*पु.* [*फा.*] १. वागणूक; वर्तणूक. २. चालरीत; पद्धत.

रशना–*स्त्री.* १. कमरपट्टा; करगोटा; 'गर्डल'. २. दोरी. ३. लगाम.

रश्क–*पु.* [*फा.*] १. ईर्ष्या; मत्सर. २. वैर; शत्रुत्व. –(**श्के**) **जहाँ**––*वि.* जगाला हेवा वाटणारा. –(**श्के**)**परी**–*स्त्री.* परम सुंदरी.

रश्मि–*पु.* १. किरण. २. लगाम. **–माली–पु.** १. सूर्य. २. चंद्र.

रस–*पु.* १. रस. २. स्वाद. ३. प्रेम.**–कपूर**–*पु.* रसकापूर (एक औषधी पांढरी धातु).**–कोरा–पु.** रसगुल्ला नांवाची मिठाई.**–खीर** –*स्त्री.* साखरभात.**–गुनी**[+]–*वि.* रसज्ञ; काव्य, संगीत जाणणारा. **–गुल्ला**–*पु.* एक बंगाली मिठाई. **–दार**–*वि.* १. रसाळ. २. रुचकर; स्वादिष्ट.**–भरी**–*स्त्री.* रासबेरी (फळ).**–भीना**–*वि.* १. रसभरित; रसाळ. २. आनंदांत तल्लीन झालेला.**–मसा***–*वि.* १. आनंद-मग्न. २. घामाघूम झालेला; थकलेला. **–राज–य***–*पु.* १. पारा. २. शृंगार रस. **–वाद–पु.** १.

आनंद-प्रेमयुक्त बोलणें; मनोरंजक गप्पा. २. झगडा.

रस–*प्रत्य.* [*फा.*] पोंचणारा; भिडणारा [फ़लकरस=आकाशाला भिडणारा].

रसद– *स्त्री.* [*फा.*] १. शिधा. २. रसद; अन्नपुरवठा. ३. वांटा; हिस्सा. **हिस्सा रसद**–*पु.* १. योग्य वांटा. २. कच्चें धान्य.

रसना– *स्त्री.* १. जीभ. २. दोरी. ३. लगाम.–*क्रि. अ.** १. झिरपणें; गळणें २. आनंदमय होणें. ३. रसास्वाद घेणें. ४. प्रेमांत गुंतणें.

रसम– *स्त्री.* पा० ' रस्म '.

रसम-मि*– *स्त्री.* १. रश्मि; किरण. २. प्रकाश. [होणें.

रसमसाना*–*क्रि. अ.* रसवर्षाव

रसमि*– *स्त्री.* १. रश्मि; किरण. २. प्रकाश.

रस-रस–*अव्य.* हळूहळू.

रसर-री*– *स्त्री.* दोरी; सुतळी.

रसल–*वि.* रसाळ.

रसाँ–*प्रत्य.* [*फा.*] नेणारा; पोंचविणारा (चिट्‌ठीरसाँ =पत्रवाहक). [२. शेवगा.

रसांजन–*पु.* १. एक औषधि.

रसा– *स्त्री.* १. पृथ्वी; जमीन. २. जीभ; रसना.–**तल**–*पु.* पृथ्वीच्या खालील सात लोकांपैकीं सहावा.

रसा–*पु.* रस्सा.

रसाइनी*–*पु.* रसायनशास्त्रज्ञ.

रसाई– *स्त्री.* [*फा.*] पोंच; प्रवेश.

रसाना*–*क्रि. स.* आनंदित करणें.–*क्रि. अ.* आनंद लुटणें.

रसायन–*पु.* १. धातूचें भस्म. २. अमृत. ३. किमया. [विणारा.

रसायनिक–*पु.* रसायनें बन-

रसायनी–*पु.* रसायनशास्त्रज्ञ. – *स्त्री.* वृद्धत्व दूर करणारें औषध; अमृतसंजीवनी.

रसाल–*पु.* १. आंबा. २. ऊंस. ३. गहूं ४. फणस. ५.* कर; महसूल.–*वि.* रसाळ; मधुर; सुंदर.

रसालस*–*पु.* कौतुक; गंमत.

रसावर–ल; रसिआउ(ब)र–ल–*पु.* १. गूळभात; उंसाच्या रसांत शिजविलेला भात. २. लग्नामध्यें गूळभात खातांना म्हटलें जाणारें गाणें.

रसिया–*पु.* १. रसिक; षोकीन. २.+ एक प्रकारचें गीत. हें बुंदेलखंडांत होळीच्या वेळीं गायिलें जातें.

रसीद– *स्त्री.* [*फा.*] पावती; पोंच. **मु०–करना**–देणें; लगावणें.

रसीला–*वि.* १. रसभरित. २. स्वादिष्ट; रुचकर. ३. सुंदर. ४. रसिक. ५. विलासी; चैनी; फांकडा.

रसूम–*पु.* [*अ.* ' रस्म 'चें अनेक०]. १. नियम; कायदा. २. चालीरीती; रिवाज. ३. नजराणा. –**अदालत**–*पु.* न्यायालयीन शुल्क; ' कोर्टफी '; ' स्टांप '.

रसूल–*पु.* [*अ.*] १. ईश्वराचा संदेशवाहक. २. मार्गदर्शक; पैगंबर. [आस्ते; हळूहळू.

रसे-रसे+–*अव्य.* आस्ते

रसोइया–*पु.* आचारी; स्वयंपाकी.

रसोई– *स्त्री.* १. स्वयंपाक; भोजन. २. स्वयंपाकघर.–**खाना; –घर**–*पु.* स्वयंपाकघर.

रसोत*– *स्त्री.* १. रसमयता. २. पा० ' रसांजन '.

रसोन–*पु.* लसूण.

रसोय*– *स्त्री.* पा० ' रसोई '.

रसौं(सौ)त– *स्त्री.* दारूहळदीचा ओढा.

रसौता–*पु.*; **रसौती**– *स्त्री.* धूळपेरणी; पाऊस सुरू होण्या आधींच केलेली पेरणी.

रसौर–*पु.* उंसाच्या रसांत शिजविलेला भात; गूळभात.

रसौली– *स्त्री.* १. रांजणवाडी. २. सांध्याच्या जागीं गांठी होण्याचा रोग. [रस्ता.

रस्ता+–*पु.* [*फा.* मार्ग;

रस्तोगी–*पु.* वैश्यांची एक पोटजात.

रस्म– *स्त्री.* [*अ.*] १. परंपरा; चालरीत; रिवाज; प्रथा. २. मेळ; संबंध. ३. पगार; वेतन. ४. कर; महसूल.

रस्मी–*वि.* [*अ.*] १. प्रथेसंबंधींचा; रूढ; पारंपरिक. २. औपचारिक.

रस्सा–*पु.* १. जाड दोर; नाडा. २. बिघा. ३. पंचाहत्तर हात लांब व पंचाहत्तर हात रुंद असें एक माप.

रस्सी– *स्त्री.* दोरी; रस्सी.–**बाट**–*पु.* दोऱ्या वळणारा.

रहँकला–*पु.* १. एक प्रकारची गाडी; रेकला. २. तोफेची गाडी. ३. गाडीवर लादलेली लहान तोफ.

रहँचटा*–*पु.* १. चटक २. प्रीतीची अभिलाषा.

रहँट–*पु.* विहिरींतून पाणी काढण्याचा रहाट.

रहँटा–*पु.* चरखा. [दित होणें.

रहँसना–*क्रि. अ.* प्रसन्न, आन-

रह*–*पु.* रथ.

रह–' राह 'चें समासांतर्गत रूप. –**जन**–*पु.* डाकू; लुटारू; वाटमाऱ्या.–**जनी**– *स्त्री.* दरोडा; वाटमारी. –**नमा**–*वि.* मार्गदर्शक.–**नुमाई**– *स्त्री.* मार्गदर्शन. –**बर**–*वि.*

मार्गदर्शक.–**बरी** *स्त्री.* मार्गदर्शन.

रहचह*– *स्त्री.* चिवचिव.

रहठा–*पु.* तुरकाठी.

रहठानि*– *स्त्री.* . राहाण्याचें ठिकाण.

रहन–*पु.* [*अ.*] गहाण ठेवणें.

रहन– *स्त्री.* १. राहाणी. २. व्यवहार.–**सहन**– *स्त्री. पु.* राहाणी-करणी; आचरण.

रहना–*क्रि. अ.* १. राहाणें. २. थांबणें. ३. टिकणें. ४. वांचणें. **मु०** रहा–सहा–*वि.* उरलें-सुरलें.

रहनि–नी*– *स्त्री.* १. राहाणी; आचरण. २. निवास; वास्तव्य. ३. प्रेम.

रहम–*पु.* [*अ.*] दया; करुणा.–**दिल**–*वि.* दयाळु.

रहमत– *स्त्री.* [*अ.*] १. कृपा; दया. २. वृष्टि; वर्षाव.

रहमान–*वि.* [*अ.*] अत्यंत दयाळु.-*पु.* ईश्वराचें नांव; परमात्मा.

रहल– *स्त्री.* [*अ.*] १. पोथी ठेवण्याची लाकडी कैंची; घोडी. २. रवानगी. ३. प्रवास. ४. निवास-स्थान.

रहस*–*पु.* आनंद; चैन.–**बधावा**–*पु.* अहेर; लग्नांतील एक रीत; यामध्यें वर नववधूला जानवशाच्या जागीं (वरपक्षाच्या उतरण्याच्या जागीं) घेऊन येतो. वडील मंडळी सुनमुख पाहातात व अहेर देतात.

रहसना*–*क्रि. अ.* प्रसन्न, आनंदित होणें.

रहसि*– *स्त्री.* एकांत; गुप्त-स्थान.

रहस्य–*पु.* १. गुप्त गोष्ट; मर्म. २. थट्टा; मस्करी.–**वाद**–*पु.* गूढ-वाद; साक्षात्कारवाद; 'मिस्टि-सिझम'. –**वादी**–*वि.* गूढवादी; साक्षात्कारवादी; 'मिस्टिक.'

रहा–*वि.* राहिलेला; सुटलेला. –**सहा**–*वि.* उरलासुरलेला.

रहाइश–*स्त्री.* १. स्थिति; राहाणें; निवास. २. वाव.

रहाई*– *स्त्री.* १. राहाणें. २. आराम; चैन. [राहाणें.

रहाना*–*क्रि. अ.* १. असणें. २.

रहावन+– *स्त्री.* गांवांतील गुरांचा अड्डा.

रहिला+–*पु.* हरभरा.

रहीम–*वि.* [*अ.*] दयाळु; कृपाळु.–*पु.* १. ईश्वर. २. एक कवि व साधु. [करणारा.

रहुवा+–*पु.* पोटावारी काम

रहैया+–*पु.* रहिवासी.

राँक*–*वि.* रंक; गरीब.

राँकड़+– *स्त्री.* विशेष सुपीक नसलेली (खडकाळ, उंचसखल) जमीन.

राँकव*–*वि.* रंक; गरीब.

राँग–गा–*पु.* १. कथील. २. शिसें.

राँच*–*वि.* थोडा.–*अव्य.* किंचित्; थोडेंहि.

राँचना*–*क्रि. अ.* १. अनुरक्त होणें; प्रेम करणें. २. तद्रूप होणें; समरस होणें.–*क्रि. स.* तद्रूप करणें. २. रंगविणें. ३. समरस करणें.

राँजना+–*क्रि. अ.* डोळ्यांत काजळ, सुरमा घालणें.–*क्रि. स.* १. रंगविणें. २. भांड्यास डाक-ग देणें; जोडणें.

राँटा+–*पु.* टिटवी.– *स्त्री.* चोरांची सांकेतिक भाषा.

राँड़–*स्त्री.* १. विधवा. २. वेश्या.

राँढ़ना+–*क्रि. स.* आक्रोश, विलाप करणें.

राँध–*वि.* परिपक्व बुद्धीचा. –*अव्य.* जवळ; निकट.–*पु.* शेजार.

राँधना–*क्रि. स.* शिजविणें; स्वयंपाक करणें.

राँपी+– *स्त्री.* चांभाराची रापी.

राँभना–*क्रि. अ.* हंबरणें.

राइ*–*पु.* राव; सरदार; जहागीरदार.

राई– *स्त्री.* १. मोहरी. २. अल्प प्रमाण.–**भर**–*अव्य.* अत्यंत थोडें. **मु०–काई करना**–तुकडे तुकडे करणें; नष्ट करणें.–**नोन उतारना**–दृष्ट काढणें.–**से पर्वत करना; –का पहाड़ बनाना**–राईचा पर्वत करणें; एवढीशी गोष्ट फुगवून सांगणें.

राउ*–*पु.* राव; राजा; नरेश.

राउत+–*पु.* राजवंशीय व्यक्ति; क्षत्रिय; वीर पुरुष.

राउर*–*पु.* अंतःपुर; राऊळ.–*सर्व.* तुमचा; आपला महा-राजांचा.

राउरे*–*सर्व.* पा० 'रौरे'.

राऊल*–*पु.* १. राजकुलांत उत्पन्न झालेला. २. राजा.

राकस*–*पु.* राक्षस.

राकसिन; राकसी*– *स्त्री* राक्षसीण. [पौर्णिमा.

राका– *स्त्री.* पौर्णिमेची रात्र;

राक़िम–*वि.* [*अ.*] लिहिणारा; कारकून.

राख– *स्त्री.* राख; भस्म.–**दानी** – *स्त्री.* रक्षा-पात्र; 'अॅशट्रे'.

राखना*–*क्रि. स.* १. रक्षण करणें. २. राखण करणें; सांभाळणें. ३* कपट करणें; लपवून ठेवणें. ४. अडकविणें. ५. आरोप करणें. ६. ठेवणें.

राग–*पु.* १. प्रेम; प्रीति. २. द्वेष; मत्सर. ३. पीडा; कष्ट. ४. लालसा. ५. संगीतांतील राग.–**रंग**–आमोद-प्रमोद; विलास; नाच-गाणें. **मु० अपना अपना राग अला-पना**–स्वतःचीच टिमकी वाजविणें;

आपलेंच घोडें पुढें दामटणें.

रागनी[+]–*स्त्री.* रागिणी; संगीतांतील लहान राग.

राग़िब–*वि.* [*अ.*] १. इच्छुक. २. गोडी असणारा.

राचना*–*क्रि. स.* १. रचणें. २. सजविणें.–*क्रि. अ.* १. रंगन जाणें; तल्लीन होणें. २. प्रेम करणें; अनुरक्त होणें. ३. शोभणें.

राछ–*पु.* १. फणी (हातमागाची). २. मिरवणूक; वरात. ३. लाकडाची अंतर्साल. **मु० –घुमाना; –फिराना**– वराला पालखींत बसवून हिंडवून आणणें.

राज़– *पु.* [*फा.*] रहस्य; गौप्य.–**दाँ; –दार**–*वि* १. रहस्य जाणणरा; अंतस्थ मित्र. २. मर्मज्ञ.

राज–*पु.* गवंडी.–**गीर**–*पु.* गवंडी; कारागीर.–**गीरी**– *स्त्री.* गवंड्याचें काम.

राज–*पु.* १. राज्य. २. स्वामित्व. ३. शासनकाल. ४. देश. ५. राजा. –**कन्या**– *स्त्री.* राजाची मुलगी.–**कर** –*पु.* १. खंडणी. २. महसूल.–**कोष** –*पु.* सरकारी खजिना.–**कोषीय नीति**– *स्त्री.* सरकारी आर्थिक धोरण; 'फिस्कल पॉलिसी'.–**गद्दी**– *स्त्री.* १. राजसिंहासन. २. राज्याभिषेक.–**गीर**–*पु.* राजगृह.–**चिह्न**– *पु.* राजे लोकांचें पदसूचक (छत्र, चामर इ०) चिह्न; 'इन्सिग्निया'.–**तंत्र**–*पु.* राजेशाही; राज्याचा अधिपति राजा असलेली शासनपद्धति.–**तिलक**–*पु.* राज्याभिषेक.–**दंत**–*पु.* तोंडांतील समोरचे वरचे व खालचे प्रत्येकीं दोन मोठे दांत.–**दया**– *स्त्री.* राजा किंवा राज्यकर्ता यांच्याकडून दाखविली जाणारी दया, क्षमा; 'क्लीमेन्सी'. –**दूत**–*पु.* राजदूत; परराष्ट्रीय वकील; 'ॲम्बॅसेडर'.–**दूतावास**– *पु.* परराष्ट्रीय वकिलात; 'एम्बसी'. –**धानी**– *स्त्री.* देशाचें शासनकेन्द्र; राजाचें निवासनगर.–**नय**–*पु.* राजनीति; मुत्सद्दीपणा; 'डिप्लोमसी'. –**नीति**– *स्त्री.* १. राजकारण. २. सरकारी धोरण. –**नीतिक; –नैतिक**– *वि.* राजकीय.–**पत्रित**–*वि.* 'गॅझेटेड'. –**पद्धति**– *स्त्री.* राज्यनीति; राज्यव्यवस्था; 'पॉलिटी'.–**पाट**–*पु.* राज्य; सत्ता.–**पुरुष**–*पु.* १. राजकर्मचारी. २. मुत्सद्दी; राजकीय पुढारी; 'स्टेट्समन'. –**पूत**– *पु.* रजपूत. –**पूताना**–*पु.* राजपुताना; राजस्थान. –**प्रमुख**–*पु.* संस्थानी संघराज्याचा राज्यपाल. –**प्रेष्य**–*पु.* सरकारी नोकर.–*वि.* सरकारी कामानिमित्त धाडलेला; 'ऑन सर्व्हिस'.–**बाहा**–*पु.* सर्वांत मोठा व मुख्य कालवा.–**भत्ता**– *पु.*; –**वृत्ति**– *स्त्री.* पा० 'राजाधिदेय'.–**भवन**–*पु.* १. राजमहाल; राजवाडा. २. राज्यपालाचें निवास्थान; 'गव्हर्नमेंट हाउस'.–**भाषा**– *स्त्री.* सरकारी कामकाजाची भाषा; 'ऑफीशियल लँग्वेज'.–**मंडल**–*पु.* राज्याच्या सभोंवतालचीं राज्यें. –**महल**–*पु.* राजवाडा; राजमंदिर. –**महिषी**– *स्त्री.* पट्टराणी.–**राज**– *पु.* १. कुबेर. २. चंद्र. ३. सम्राट्. –**सभा**– *स्त्री.* १. दरबार. २. राज्यसभा; 'कौन्सिल ऑफ स्टेट्स'. –**साक्षी**–*पु.* माफीचा साक्षीदार; 'ॲप्रूव्हर'.–**सात्करण**–*पु.* सरकारजमा करणें; 'कॉनफिस्केशन'. –**सारस**–*पु.* मोर.–**स्व**–*पु.* महसूल; सारा; 'रेव्हेन्यू'.–०**न्यायालय**–*पु.* 'रेव्हेन्यू कोर्ट'.–०**मंत्री**–*पु.* महसूल मंत्री; 'रेव्हेन्यू मिनिस्टर'.

राजकीय–*वि.* सरकारी.–**पक्ष**– *पु.* सरकार पक्ष; 'ऑफीशियल पार्टी'. –**प्राभियोक्ता**–*पु.* सरकारी वकील; 'गव्हर्नमेंट प्रॉसिक्यूटर'.

राजत्व–*पु.* राजपद.–**त्याग**–*पु.* राज्यपदत्याग; 'ॲब्डिकेट'.

राजना*–*क्रि. अ.* १. राहाणें; असणें. २. विराजणें; शोभणें.

राजमान–*वि.* विराजमान; बसलेला.

राजसी–*वि.* राजासारखा; बहुमूल्य. –*वि. स्त्री.* रजोगुणमयी.

राजांक–*पु.* राजचिह्न; 'इन्सिग्निया'.

राजाधिदेय–*पु.* संस्थानिकांना दिला जाणारा तनखा; 'प्रिव्ही पर्स'.

राज़िक़–*वि.* [*अ.*] १. उपजीविकेचें साधन देणारा; परमेश्वर.

राजिका–*स्त्री.* १. ओळ. २. श्रेणी. ३. रेखा. ४. मोहरी. ५. घामोळें.

राजिव*–*पु.* कमळ. [२. मोहरी.

राजी– *स्त्री.* १. ओळ; पंक्ति.

राज़ी–*वि.* [*अ.*] सम्मत; तयार; राजी. २. खुष; प्रसन्न. ३. सुखी. ४. निरोगी.–**नामा**–*पु.* तडजोडपत्र; कबुलायत; स्वीकृतिपत्र.

राजीव–*पु.* कमळ.

राज्य–*पु.* १. राज्य; राष्ट्र. २. शासन; सत्ता. –**क्षेत्रातीत अधिकार**– *पु.* एखाद्या राज्यांत परकीयांना त्यांच्या देशाचे अधिकार असणें; 'एक्स्ट्रॉ टेरिटोरियल राइट'. –**तंत्र**–*पु.* राज्यपद्धति. –**परिषद्**– *स्त्री.* राज्यसभा; 'कौन्सिल ऑफ स्टेट्स'. –**पाल**–*पु.* राज्यपाल; 'गव्हर्नर'. –**मंडल**–*पु.* संघराज्य; 'कॉन्फेडरेशन'. –**संघ**–*पु.* राज्यसंघ; 'कॉन्फेडरसी'. –**संचालन परिषद्**– *स्त्री.* राजप्रतिनिधिमंडळ; 'रीजन्सी कौन्सिल'. –**संरक्षक**–*पु.*

प्रतिनिधि म्हणून राज्यकारभार पाहाणारा मनुष्य; 'रीजंट'.

राटुल–पु. लाकूड, लोखंड इ० वजन करण्याचा मोठा तराजू, कांटा.

राठ*–पु. १. राज्य. राजा.

राड़–वि. १. निरुपयोगी. २. हीन; नीच. ३. भ्याड; भित्रा.

राढ़–वि. पा० 'राड'.–स्त्री.+ भांडण; झगडा. –पु. गंगेच्या पश्चिम किनाऱ्यावरील बंगालचा भाग; पश्चिम बंगाल.

रात–स्त्री. रात्र. **–रानी**–स्त्री. रातराणी (फूल व त्याचें झाड).

रातड़ी–री+–स्त्री. रात्र.

रातना*–क्रि. अ. १. अनुरक्त मुग्ध होणें. २. रंगणें; लाल होणें.

राता*–वि. १. रंगलेला; तल्लीन; निमग्न. २. लाल; तांबडा. [**–स्त्री. राती**]. [राक्षस; निशाचर.

राति*– स्त्री. रात्र. **–चर–पु.**

रातिब–पु. [अ.] १. जनावरांचें दैनिक खाद्य. २. रोजचा खुराक.

रातुल–पु. पा० 'राटुल'.–वि. तांबडें.

राध–पु. १. कृपा; अनुग्रह. २. अभ्युदय. ३. सिद्धि. ४. धन. ५. वैशाख. ६.+घाण; मळ.

राधना*–क्रि. स. १. आराधना, पूजा करणें. २. पूर्ण, सिद्ध करणें. ३. काम करून घेणें.

रान–स्त्री. [फा.] मांडी.

राननां+–क्रि. स. स्वीकार, कबूल करणें.

राना*–क्रि. अ. अनुरक्त होणें. –पु. राणा.

राब– स्त्री. काकवी.

राबड़ी–स्त्री. बासुंदी.

राबिता–पु. [अ.] १. संबंध; घनिष्ठता. २. मेळ.

राम–पु. श्रीराम; परशुराम; बलराम. **–कहानी**– स्त्री. रडगाणें; दुःखाची गोष्ट.**–जना–पु.** १. लेकावळा; ज्याच्या पित्याची माहिती नाहीं असा. २. एक वर्णसंकर जाति; कलावंत; या जातींतील स्त्रिया वेश्यावृत्ति करतात. **–जनी**– स्त्री. रामजना जातीची स्त्री; वेश्या. **–तरोई**– स्त्री. भेंडी. **–दाना–पु.** राजगिरा. **–नामी**– स्त्री. १. रामनाम छापलेलें वस्त्र. २. सोन्याचा कंठा. **–फटाका–पु.** रामानंदी संप्रदायाचें गंध (तीन उभ्या रेघा). **–बँटाई**– स्त्री. दोन समान भागांतील वांटणी; अर्धली. **–बाँस–पु.** १. एक प्रकारचा मोठा बांबू. २. घायपात. **–बान–पु.** एक प्रकारचा बोरू.–वि. रामबाण; अचूक.**–रज–पु.** पिवडी (माती).**–रमौवल**– स्त्री. गप्पागोष्टी.**–रस–पु.** १. रामनामरूपी रस. २. मीठ. ३.+ तयार भांग. **–रसरा–पु.** पाल्हाळ; चऱ्हाट. **–राम–पु.** नमस्कार.–स्त्री. भेट; मुलाखत.–अव्य. अरे बापरे! छि:! **–रोला–पु.** निष्कारण आरडाओरडा; गोंधळ. **–लड्डू–पु.** कांदा (साधूंच्या भाषेंत).**–शर–पु.** बोरू; कळक. **मु०–नाम सत्त हो जाना**– मरणें. **–राम करके**–मोठ्या मुष्किलीनें; कसेंबसें.

राम–वि. [फा.] १. सेवक; २. आज्ञाधारक. **मु०–करना**– ताब्यांत ठेवणें.

राय–पु. राव; राजा; सरदार. **–भोग–पु.** १. एक बारीक धान्य. २. दुपारचा नैवेद्य.**–रायान–पु.** राजाधिराज.**–रासि***–स्त्री. राजाचा खजिना.**–साहब–पु.** रावसाहेब.

राय–स्त्री. [फा.] १. मत; अभिप्राय. २. सल्ला; विचार, कल्पना. ३. उपाय.

रायगाँ–वि. [फा.] १. निरर्थक; व्यर्थ. २. नष्ट. –अव्य. निष्कारण. [लित.

रायज–वि. [अ.] रूढ; प्रच-

रायट–पु. [इं.] बंड.

रायता–पु. रायतें; भरीत.

रायसा–पु. एखाद्या वीर पुरुषाचें किंवा सतीचें यशोगान; रासो.

रार–स्त्री. तंटा; झगडा; हुज्जत.

रारि*–स्त्री. पा० 'रार'.

राल–स्त्री. १. राळ. २. लाळ.

रावचाव–पु. १. नाचरंग. २. लाड.

रावटी–स्त्री. राहुटी.

रावत–पु. १. सरदार. २. सामंत; मांडलिक. ३. सेनापति. ४. शूर वीर. [रडविणें.

रावना*–क्रि. स. दुसऱ्याला

रावर–रा–रो*–सर्व. आपला–पु. १. अंतःपुर. २. राजमहाल.

रावल–पु. १. राजा. २. सरदार. ३.* अंतःपुर. [२. पुरवठा.

राशन–पु. [इं] १. शिधा-वांटप.

राशि–स्त्री. १. रास; ढीग. २. रक्कम. ३. प्रमाण; 'क्वांटिटी'.

राष्ट्र–पु. १. राष्ट्र. २. प्रदेश. **–भाषा**–१. राष्ट्रीय भाषा; देशाची सर्वसामान्य भाषा. २. हिन्दी; हिन्दुस्तानी. **–मंडल–पु.** राष्ट्रकुल; 'कॉमनवेल्थ ऑफ नेशन्स'.**–संघ–** –पु. राष्ट्रसंघ; 'लीग ऑफ नेशन्स'.

राष्ट्रीयकरण-पु. राष्ट्रीयीकरण; 'नॅशनॅलायझेशन'. ['नॅशनॅलिटी'.

राष्ट्रीयता–स्त्री. राष्ट्रीयत्व;

रास–पु. नृत्यक्रीडा; रासक्रीडा. **–मंडली**–स्त्री. रास खेळणारी मंडळी. **–विहारी–पु.** कृष्ण.

रास–स्त्री. [फा.] १. रस्ता; सडक. २. राहू (ग्रह). ३. पागा.

रास–स्त्री. [अ.] १. लगाम.

२. गुरांची संख्या दर्शविणारा शब्द (दो रास बैल = दोन बैल). ३. भूशिर. ४. वरचा भाग; शिर. –वि. अनुकूल; योग्य. मु०–आना– १. अनुकूल होणें. २. लाभदायक ठरणें. [प्रकार; एकांकी प्रहसन.

रासक–पु. दृश्य काव्याचा एक

रासायनिक–वि. रासायनिक; 'केमिकल'. –**क्रिया**– स्त्री. रासायनिक प्रक्रिया; 'केमिकल अॅक्शन'.–**नियतांक**–पु. रासायनिक स्थिरांक; 'केमिकल कॉन्स्टंट'.–**परिवर्तन**–पु. रासायनिक बदल; 'केमिकल चेंज'.–**परीक्षक**–पु. रासायनिक परीक्षक; 'केमिकल एक्झॅमिनर'.

रासिख़–वि. [अ.] १. पक्का; दृढ. २. विश्वसनीय; सच्चा.

रासी+–वि. निकृष्ट; खराब. –स्त्री. निकृष्ट प्रतीची दारू.

रासु*–वि. ठीक; सरळ.

रासो–पु. डिंगल भाषेंतील काव्यग्रंथ; राजाचें पद्यमय जीवनचरित्र.

रास्त–वि. [फा.] १. सरळ; सीधा; रास्त. २. ठीक; बरोबर. ३. उचित; योग्य. –**गो**–वि. सत्यवक्ता. –**बाज़**–वि. सच्चा; इमानदार.

रास्ता–पु. [फा.] १. रस्ता; मार्ग. २. प्रथा; चाल. ३. नियम. मु०–**कटना**–चालून होणें; रस्ता संपणें. –**काटना**–रस्त्यांतून आडवें जाणें.–**नापना**; –**पकड़ना**; – **लेना**– चालूं लागणें; चालतें होणें.–**बताना**– १. टाळणें. २. युक्ति काढणें.

रास्ना; **रास्निका**– स्त्री. एक औषधी वनस्पति. सर्प, विंचू यांच्या दंशावर हिचा कांदा ठेंचून बांधतात.

राह– स्त्री. [फा.] १. मार्ग; रस्ता. २. प्रथा; रीतिरिवाज.–**खर्च**–पु. प्रवास–खर्च; वाटखर्च.–**गीर**–पु. मुशाफिर; प्रवासी. –**चलता**–पु. १. वाटसरू; पांथस्थ. २. परका.–**चौरंगी**–स्त्री. चव्हाटा; चौक.–**ज़न**–पु. डाकू; वाटमाऱ्या. –**ज़नी**– स्त्री. वाटमारी.–**दानी**– स्त्री. प्रवासपरवाना; 'पासपोर्ट'.–**दारी** – स्त्री. जकात; रस्त्यावरील कर. –**बर**–पु. मार्गदर्शक. –**रीति**– स्त्री. १. व्यवहार. २. परिचय.–**व–रब्त**– –पु. येणेंजाणें; घरोबा; घनिष्ठ संबंध. –**व–रस्म**– स्त्री. निकट संबंध; व्यवहार. –(हे) **ख़ुदा**– –अव्य. देवाच्या नावानें. मु०–**ताकना**–वाट पाहाणें.–**पड़ना**–धाड, दरोडा पडणें. –**बायन होना**–मार्ग वेगळा होणें. –**लगना**–रस्त्यानें चालूं लागणें.

राहत– स्त्री. [अ.] १. सुख; आराम; चैन. २. दुःखपरिहार; संकटग्रस्तांना केलेलें साहाय्य.

राहना+–क्रि.स. जात्याला टाकी घालणें.

राहि*– स्त्री. राधा.

राहिब–पु. [अ.] ख्रिस्ती वैरागी; विरक्त पुरुष; 'मंक'; 'हर्मिट'. [यात्रेकरू.–स्त्री.* राधा.

राही–पु. [फा.] प्रवासी;

रिंगण–पु.; –**रिंगन***– स्त्री. १. रांगणें; सरपटणें. २. डळमळणें.

रिंगाना*– क्रि.अ. १. रांगणें. २. सरपटणें; वळवळणें.–क्रि. स. १. फिरविणें. २. पळावयास लावणें (मुलांना). ['रिंगाना'.

रिंगावना*– क्रि. स. पा०

रिंद– पु. [फा.] १. नास्तिक; धार्मिक बंधनें न मानणारा. २. स्वच्छंद; स्वैराचारी. –वि. १. लहरी. २. मदोन्मत्त; उडाणटप्पू.

रिआयत– स्त्री. [अ.] १. सवलत; पक्षपात. २. लक्ष. ३. दयापूर्ण व्यवहार. ४. न्यूनता.

रिआयती–वि [अ.] सवलतीचा. –**रुख़सत**– स्त्री. अकरा महिने काम केल्यानंतर मिळणारी एक महिन्याची भरपगारी रजा.

रिआया– स्त्री. [अ.] प्रजा; जनता.

रिकवँछ+– स्त्री. अळूची वडी.

रिकाब; **रिकाबी**– पा० 'रकाब'; 'रकाबी'.

रिकार्ड– पु. [इं.] नोंद; नोंदणी; 'रेकॉर्ड'.

रिक्त–वि. १. रिकामा; शून्य. २. निर्धन. –**स्थान**– पु. रिकामी जागा 'व्हेकन्सी'.

रिक्तता– स्त्री. नोकरी करितां रिकामी जागा; 'व्हेकन्सी'.

रिक्ति– स्त्री. रिकामी जागा; 'व्हेकन्सी'. –**पूरक**– पु. रिकामी जागा भरून काढणारी वस्तु; '-फिलर'.

रिक्थ–पु. वारशानें मिळणारी मिळकत; मालमत्ता; 'एस्टेट'. –**क्रम**–पु. वारसा. –**पत्र**–पु. मृत्युपत्र; 'विल'. [नक्षत्र; तारा.

रिक्ष*–पु. १. अस्वल. २.

रिक्षा– स्त्री. लीख; उवेचें अंडें. –पु. 'रिक्शा'.

रिखभ*–पु. १. ऋषभ देव. २. बैल. ३. रिषभ; रे (संगीत).

रिगाना+– क्रि.स. चिडविणें.

रिच्छ–पु. अस्वल.

रिज़क–पु. [अ.] १. दररोजचें जेवण; आहार. २. आजीविका.

रिज़वान–पु. [अ.] १. स्वर्ग. २. स्वर्गाचा द्वारपाळ. [पाजी.

रिज़ाला–वि. [अ.] नीच;

रिजाली*– स्त्री. निर्लज्जपणा.

रिजु*–वि. ऋजु; सरळ.

रिज्क–पु. पा० 'रिज़क'.

रिझकवार; रिझवार; रिझवैया*–पु. खुष होणारा; एखाद्या गुणावर लुब्ध होणारा.

रिझाना–क्रि. स. १. प्रसन्न, मोहित करणें. २. रिझविणें.

रिझायल*–वि. प्रसन्न, खुष होणारा. [खुष होणें.

रिझाव–पु. प्रसन्न, मोहित,

रिझावना*–क्रि.स. रमविणें; प्रसन्न ठेवणें.

रिझोना*–वि. खुष होणारा.

रिणवास*–पु. अंतःपुर.

रित–तु*–स्त्री. ऋतु. –वंती–वि. स्त्री. ऋतुमती, विटाळशी स्त्री.

रितवना*–क्रि.स. रिकामें करणें. [वि. ऋणको; कर्जदार.

रिन*–पु. ऋण; कर्ज. –बंधी–

रिनिआँ*–याँ; रिनी+– वि. ऋणी; कर्जदार.

रिफ़ार्म–पु. [इं.] सुधारणा.

रिमझिम–स्त्री. झिमझिम (पाऊस). [कथन; मत.

रिमार्क–पु. [इं.] विधान;

रिया–स्त्री. [अ.] १. दिखावटीपणा. २. धोका; दगा; कपट. –कार–वि. दगलबाज; कपटी.

रियाज़–पु. [अ.] १. अभ्यास; मेहनत. २. बाग. मु०–मारना– १. परिश्रम करणें. २. व्यायाम करणें.

रियाज़त–स्त्री. [अ.] १. मेहनत; अभ्यास. २. व्यायाम. ३. मजुरी.

रियाज़ी–स्त्री. [अ.] गणित. –वि.+ १. मेहेनती. २. व्यायाम करणारा. [यत'; 'रिआया'.

रियायत; रिवाया–पा० 'रिआ-

रियासत–स्त्री [अ.] १. राज्य; संस्थान. २. वैभव; एश्वर्य; श्रीमंती.

रिर*–स्त्री. हट्ट; जिद्द.

रिरना+–क्रि. अ. गयावया करणें. [मागणारा.

रिरिहा+–पु. गयावया करून

रिलना*–क्रि. अ. १. प्रवेश करणें; घुसणें; शिरणें. २. मिसळणें; रमणें. [२. साहय्य; मदत.

रिलीफ–पु. [इं.] १. सुटका.

रिवाज–पु. [अ.] चाल; रीत; प्रथा; पद्धत.

रिवायत–स्त्री. [अ.] १. दुसऱ्याकडून ऐकलेली गोष्ट जशीच्या तशी सांगणें. २. मुहम्मद पैगंबरांच्या तोंडून ऐकलेली गोष्ट त्यांच्याच शब्दांत दुसऱ्याला सांगणें.

रिवाल्वर–पु. [इं.] पिस्तुल.

रिश्ता–पु. [फा.] नातें; संबंध. –(श्ते)दार–पु. नातलग. –(श्ते)दारी–स्त्री. नातें.

रिश्वत–स्त्री. [अ.] लांचलुचपत. –खोर–वि. लांचखाऊ. –खोरी–स्त्री. लांच घेणें. [प्रसन्न.

रिष्ट–वि.* १. घष्टपुष्ट. २.

रिष्टि–स्त्री. १. खड्ग. २. अशुभ. ३. खोडी; दांडगाई; 'मिस्चीफ'.

रिस–स्त्री. राग; क्रोध.

रिसना–क्रि. अ. झिरपणें.

रिसवाना+–क्रि. स. पा० 'रिसाना'.

रिसहा*–वि. रागीट; कोपिष्ट.

रिसहाया*–वि. रागावलेला; क्रुद्ध.

रिसाना–क्रि. अ. रागावणें; राग येणें. –क्रि. स. चिडविणें; राग आणणें.

रिसालत–स्त्री. [अ.] १. ईश्वराचा प्रेषित असणें; पैगंबरी. २. परराष्ट्र–वकिली.

रिसालदार–पु. [फा.] १. अश्वसेनेवरील, घोडदळाचा अधिकारी. २. राजकर (महसूल) वसूल करून घेऊन जाणाऱ्यांवरील मुख्य अधिकारी.

रिसाला–पु. [अ.] १. नियतकालिक; मासिक इ०. २. लहान पुस्तक. ३. घोडदळ.

रिसिआ(या)ना*–क्रि. अ. रागावणें; चिडणें. [नाराज.

रिसौंहाँ*–वि. रागावलेला;

रिहन–पु. [अ.] गहाण. –नामा–पु. गहाणखत.

रिहल–स्त्री. [अ.] पोथी ठेवून वाचण्यासाठीं केलेली लाकडी बैठक; घोडी.

रिहलत–स्त्री. [अ.] १. रवानगी; कूच. २. मृत्यु.

रिहा–वि. [फा.] बंधमुक्त; सुटका झालेला. [मुक्ति.

रिहाई+–स्त्री. [फा.] सुटका;

रींधना–क्रि. स. रांधणें; शिजविणें.

री–अव्य. अगे.

रीछ–पु. अस्वल. –पति;–राज–पु. जांबुवंत.

रीझ–स्त्री. प्रसन्नता; मोहित होणें. [मोहित होणें. २. शिजणें.

रीझना–क्रि. अ. १. प्रसन्न,

रीठ*–स्त्री. १. तलवार. २. युद्ध. –वि. वाईट; अशुभ.

रीठा–पु. १. रिठा. २.+ चुन्याची भट्टी. [मेरुदंड.

रीढ़–स्त्री. पाठीचा कणा;

रीतना*–क्रि. अ. रिक्त, रिकामें होणें. [२. पोकळ.

रीता–वि. १. रिता; रिकामा.

रीति–स्त्री. १. रीत; पद्धत; तऱ्हा; 'मेथड'. २. चालरीत; परिपाठ. ३. नियम. –काल–पु.

हिंदी साहित्यांत शृंगार–रसाचें साहित्य लिहिलें गेलें तो सोळाव्या शतकापासून एकोणिसाव्या शतका-पर्यंतचा काळ.

रीस– *स्त्री.* १. क्रोध. २.* ईर्ष्या; हेवा. ३. स्पर्धा; बरोबरी.

रीसना*–*क्रि. अ.* क्रुद्ध होणें; रागावणें.

रुंड–*पु.* शिर नसलेलें धड; कबंध; हातपाय नसलेलें शरीर.

रुँदवाना–*क्रि. स.* चिरडविणें; तुडविणें; दुसऱ्याकडून तुडवून घेणें.

रुँधना–*क्रि. अ.* १. थांबणें. २. अडणें; अडकून पडणें; फसणें. ३. कामांत गुंतणें. ४. घेरलें जाणें.

रु*–*अव्य.* ['अरु' चें संक्षिप्त रूप] आणि.

रुआ*– *पु.* १. रोम; केस. २.+ एक पैसा.

रुआना*– *क्रि. स.* रडविणें.

रुआब+–*पु.* १. रुबाब. २. धाक.

रुआसा–सो*– *वि.* रडवेला; रडकुंडीस आलेला.

रुई– *स्त्री.* १. कापूस. २. कापसाचें बोंड. **मु०– का गाला–** पांढरा शुभ्र व मऊ, गुबगुबीत. **–की तरह धुनना**–खूप बडवून–काढणें.

रुकना– *क्रि. अ.* १. थांबणें; अडकून पडणें. २. अडून राहाणें.

रुकवाना– *क्रि. स.* आडकाठी करविणें; थांबविणें.

रुकाव–*पु.* आडकाठी; अडथळा.

रुकावट– *स्त्री.* अडथळा; अडचण.

रुक़्क़ा– *पु.* [*अ.*] १. चिठ्ठी; पत्र. २. रोखा; कर्जरोखा.

रुक्ख*– *पु.* वृक्ष; झाड.

रुख– *पु.* १. वृक्ष; झाड. २. गवत.–**चढ़वा**– *पु.* १. झाडावर राहाणारें भूत. २. वानर.

रुख़– *पु.* [*फा.*] १. गाल. २. तोंड. ३. कृपादृष्टि. ४. पुढला भाग. ५. हत्ती (बुद्धिबळांतील). –*अव्य.* कडे; समोर.

रुख़सत– *स्त्री.* [*अ.*] १. निरोप; रवानगी; प्रस्थान; पाठवणी. २. आज्ञा; परवानगी. ३. रजा; मोकळीक.

रुख़सताना– *पु.* [*फा*] निरोप देतांना दिलें जाणारें द्रव्य, भेंट.

रुख़सती– *वि.* [*फा.*] निरोप, सुट्टी दिलेला.– *स्त्री.* १. पाठवणी (नववधूची). २. पाठवणीच्या वेळीं दिलें जाणारें द्रव्य.

रुख़सार– *पु.* [*फा.*] गाल; कपोल.

रुखाई– *स्त्री.* १. रुक्षपणा. २. कठोरता. ३. बेमुर्वतपणा.

रुखानी– *स्त्री.* १. पटाशी. २. सांताकसनी; रबिट. ३. पाथरवटांची छिन्नी.

रुखौंहा– *वि.* रुक्ष; शुष्क; नीरस.

रुग्णावकाश; **रुग्णतावकाश**–*पु.* आजारपणाची रजा; 'मेडिकल लीव्ह.'

रुच*– *स्त्री.* रुचि.–**दान**–*वि.* रुचणारा; योग्य.–**रुच***– *अव्य.* मनापासून; मन लावून.

रुचना–*क्रि. अ.* रुचणें; पसंत पडणें.

रुचा– *स्त्री.* १. इच्छा. २. शोभा. ३. प्रकाश

रुचि– *स्त्री.* रुचि; स्वाद; गोडी.–**कर**; –**कारक**–*वि.* रुचकर; रोचक; गोड.

रुचिर–*वि.* सुंदर; मनोरम.

रुचिराई*– *स्त्री.* सौंदर्य; रुचिरता.

रुज–*पु.*; **रुजा**– *स्त्री.* १. भांग. २. वेदना; कष्ट. ३. जखम; घाव.

रुजहान–*पु.* [*अ.*] कल; प्रवृत्ति; वळण; आकर्षण.

रुजी*–*वि.* रोगी; आजारी.

रुजू–*वि.* [*अ.*] कार्यमग्न; तल्लीन; प्रवृत्त.

रुझना*–*क्रि. अ.* १. भरणें (घाव इ०). २. गुंतणें; अडकणें.

रुझान–*पु.* कल; प्रवृत्ति; वळण.

रुठ*–*पु.* राग; क्रोध.

रुठना+–*क्रि. अ.* रुसणें.

रुठाना–*क्रि. स.* नाराज करणें; नाखूष करणें.

रुत*– *स्त्री.* ऋतु; मोसम.–*पु.* किलबिल; कलरव.

रुतबा–*पु.* [*अ.*] १. पदवी; हुद्दा; दर्जा. २. प्रतिष्ठा; मान.

रुदराछ*–*पु.* रुद्राक्ष.

रुनझुन; **रुनुक–झुनुक**– *स्त्री.* रुणझुण; झंकार.

रुनित*–*वि.* रुणझुण आवाज करणारा.

रुपना–*क्रि. अ.* १. रुतणें; अडकणें. २. रोवलें जाणें; लागणें (झाड).

रुपल्ली+– *स्त्री.* रुपडी; रुपया (तुच्छतादर्शक).

रुपहला–*वि.* रुपेरी; चंदेरी.

रुबआ–*वि.* [*अ.*] एकचतुर्थांश.

रुबाई– *स्त्री.* [*अ.*] चार चरणांची उर्दू-फारसी कविता.

रुमंच*–*पु.* रोमांच.

रुमाली–*स्त्री.* [*फा.*] लंगोट; काचा; छाटी.

रुराई*– *स्त्री.* सौंदर्य; शोभा.

रुरुआ–वा–*पु.* मोठ्या जातीचें एक घुबड.

रुलना+–*क्रि. अ.* १. भटकणें. २. दाबून राहाणें; दडपलें जाणें.

रुलाई– *स्त्री.* १. रडें; रडणें. २. रडवेलें होणें; रडण्याची इच्छा. **मु०–आना**– रडूं कोसळणें.

रुलाना–*क्रि. स.* १. रडविणें. २. नष्ट करणें.

रुवा+–*पु.* शेवरीचा कापूस.

रुवाई– *स्त्री*. पा० ' रुलाई '.

रुवासा+–*वि*. रडकुंडीस आलेला. [निंदित.–*पु*.* बदनामी.

रुसवा–*वि*. [*फा*.] बदनाम;

रुसवाई– *स्त्री*. [*फा*.] बदनामी; निंदा.

रुसूख– *पु*. [*अ*.] १. पोहोंच; प्रवेश. २. दृढता; धैर्य. ३. स्नेह. ४. विश्वास.

रुसूम– *पु*. [*अ*.] १. चाल; प्रथा. २. वर्षासन.

रुस्तम– *पु*. [*फा*.] १. इराणांतील एक प्रसिद्ध पहिलवान. २. शूर व्यक्ति; वीर.–**(मे) हिंद**–*पु*. भारतांतील सर्वश्रेष्ठ मल्ल; हिंदकेसरी.–**मु० छिपा रुस्तम**–वरून सामान्य दिसणारा बलिष्ठ माणूस; लहान मूर्ति थोर कीर्ति. [वीरता.

रुस्तमी– *स्त्री*. [*फा*.] शौर्य;

रुहठि*– *स्त्री*. रुसवा; राग; घुस्सा.

रुहिर*– *पु*. रक्त; रुधिर.

रुहेलखंड– *पु*. रोहिलखंड (उत्तर प्रदेशांतील अवध विभागाच्या वायव्येस असलेला प्रदेश); रोहिले पठाणांचा प्रदेश.

रुहेला–*पु*. रोहिला; पठाणांची एक जात.

रूँखड़– *पु*. ' अलख अलख ' असें म्हणून भिक्षा मागणारा.

रूँगटा– *पु*. पा० ' रोंगटा '.

रूँघट+ – *स्त्री*. मळ; घाण.

रूँदना– *क्रि*. *स*. पा० ' रौंदना'.

रूँध– *वि*. अडलेला.

रूँधना– *क्रि*. *स*. अडविणें; घेरणें; बंद करणें.

रू– *पु*. [*फा*.] १. चेहरा; आकृति. २. समोरचा भाग; अग्रभाग ३. गाल. ४. कारण; सबब. ५. तळ; बूड. ६. बहाणा; मिष; टाळाटाळ.–**ए-ज़मीन**–*पु*. पृथ्वीतल; धरातल. –**ए-सुख़न**–*पु*. १. संकेत; इशारा. २. संबोधन.–**दाद** –*स्त्री*. १. हकीकत; घटना. २. अहवाल. ३. कायदेशीर कारवाई; खटल्याचा रागरंग.–**नुमाँ**–*वि*. १. तोंड दाखविणारा. २. जाहीर, प्रकट होणारा.–**पोश**–*वि*. १. गुप्त; लपलेला. २. फरारी. –**बकार**– *पु*. १. सादर करणें. २. कोर्टाचा हुकूम. ३. आज्ञापत्र.–*वि*. १. कामासाठीं तयार. २ येणारा; होणारा.–**बराह**–*वि*. १. सुधारलेला. २. प्रवासास निघालेला. ३. तयार. –**बरू**– *अव्य*. समोर; प्रत्यक्ष; समोरासमोर.–**माल**– *पु*. रुमाल. –**रिआयत**– *स्त्री*. सवलत; पक्षपात. –**शिनास**–*वि*. परिचित; ओळखीचा. –**सियह**; –**स्याह**–*वि*. १. कलंकित तोंडाचा; बदनाम. २. बदचलन; गुन्हेगार. ३. दुर्दैवी.

रूई– *स्त्री*. १. कापूस. २. तंतु. –**दार**–*वि*. कापसाचा; कापूस भरलेला.

रूख–*पु*. वृक्ष; झाड.–*वि*.*रूक्ष.

रूखड़ा+– *पु*. झाड; झुडुप.

रूखा– *वि*. १. रुक्ष; शुष्क. २. बेचव; नीरस. ३. खडबडीत. ४. उदास; विरक्त. –**पन**–*पु*. १. रुक्षता. २. नीरसता. ३. कठोरता. –**सूखा**–ओलें–कोरडें; गरिबीचें जेवण. **मु०– पड़ना**–१. रागावणें. २. निर्लज्ज बनणें; उद्धटपणा करणें. [अडकणें.

रूझना*–*क्रि*. *अ*. गुंतणें;

रूझा– *वि*. १. रोगी; आजारी. २. गुंतलेला.

रूठ; **रूठन**– *स्त्री*. रुसवा; राग.

रूठना– *क्रि*. *अ*. रुसणें; रागावणें.

रूठनी+– *वि*. भांडखोर.

रूड़-ड़ा* *वि*. उत्तम; श्रेष्ठ; सुंदर.

रूढि– *स्त्री*. १. चाल; प्रथा. २. उत्पत्ति. ३ ख्याति. ४. वाढ.

रूद– *पु*. [*फा*.] १. नदी; नाला. २. वाद्याची तार. ३. गीत. ४. आनंद. ५. सुंदर युवक.

रूप– *पु*. १. रूप; सौंदर्य. २. चेहरा. – ३. आकार; ' फॉर्म '.–**भेद**– *पु*. किंचित् बदल; फेरफार; ' मॉडिफिकेशन ' . **मु०–धरना**; –**भरना**–वेश धारण करणें.–**बनाना**; –**रखना**; –**लेना**–रूप धारण करणें.

रूपक– *पु*. १. एक अर्थालंकार. २. दृश्यकाव्य; नाटक; ' फीचर '. ३. सात मात्रांचा एक ताल. ४. मूर्ति. –**कार्यक्रम**–*पु*. आकाशवाणीवर होणारें नाटक इ०चा कार्यक्रम; ' फीचर प्रोग्रॅम '.

रूपसी– *स्त्री*. सुंदरी.

रूपांकक– *पु*. रूपरेखा बनविणारा; ' डिझायनर '.

रुपांकन– *पु*. रूपरेखा बनविणें; ' डिझाइनिंग '.

रूपांतर– *पु*. दुसरें रूप; परिवर्तन; ' ट्रान्स्फॉर्मेशन '.

रूपांतरण–*पु*. रूपांतर, परिवर्तन करणें. होणें; 'ट्रान्सफॉरमेशन'.

रूपा–*पु*. १. रुपें; चांदी. २. पांढरा बैल, घोडा.

रूप्यक–*पु*. रुपया.

रूम*–*पु*. केस; रोम.

रूम–*पु*. [*फा*.] १. तुर्कस्तान. २. रोम. [घटना; कथा; ' रोमान्स'.

रूमान–*पु*. [इं.] अद्‌भुतरम्य

रूमानी–*वि*. [इं.] अद्‌भुतरम्य; ' रोमँटिक '.–*पु*. रुमानियाचा रहिवासी.

रूमाल–*पु*. [*फा*.] १. रुमाल;

हात पुसणें. २. विजारीच्या पायांना जोडणारा चौकोनी तुकडा. **मु०– पर रूमाल भिगोना**–खूप रडणें.

रूमी–*वि.* [*फा.*] १. तुर्की. २. रोमनिवासी.–*पु.* मौलाना जलालुद्दीन रूमी (फारसीचे मोठे कवि व संत).

रूरना*–*क्रि. अ.* १. रडणें. २. आरडाओरड करणें.

रूरा–*वि.* चांगला; उत्तम.

रूलना*–*क्रि.स.* दाबून टाकणें; दावणें.

रूस–*पु.* [*फा.*] रशिया.

रूसना–*क्रि. अ.* रुसणें; रागावणें. [प्रकारचें सुगंधी गवत.

रूसा–*पु.* १. अडूळसा. २. एक

रूसी–*वि.* [*फा.*] रशियासंबंधींचा; 'रशियन'.–*स्त्री.* रशियन भाषा.–*पु.* रशियाचा रहिवासी.

रूह–*स्त्री.* [*अ.*] १. आत्मा; प्राणवायु. २. मन. ३. सत्त्व; सार; तथ्य.–**अफ़ज़ा**–*वि.* मनाला प्रफुल्लित करणारा; प्राणवर्धक. **मु०–क़ब्ज़ ; फ़ना हो जाना**–घाबरगुंडी वळणें.–**डालना, फूंकना**–प्राण घालणें; नवचैतन्य आणणें.

रूहड़–*स्त्री.* जुना, वापरलेला कापूस.

रूहना*–*क्रि. अ.* उसळणें; वाढणें.–*क्रि. स.* घेरणें; वेढणें.

रूहानियात–*स्त्री.* [*अ.+फा.*] अध्यात्मवाद.

रूहानी–*वि.* [*अ.*] आत्म्यासंबंधींचा; आध्यात्मिक.

रेंकना–*क्रि. अ.* १. गाढवाचें ओरडणें. २. भसाडचा आवाजांत गाणें.

रेंगटा–*पु.* गाढवाचें पिलूं.

रेंगना–*क्रि. अ.* १. सरपटणें; चालणें. २. सावकाश चालणें; वळवळणें. [कांटेरी औषधी रोपटें).

रेंगनी–*स्त्री.* रिंगणी (एक

रेंट–*पु.* मेकूड; शेंबूड.

रेंड़–*पु.* एरंडाचें झाड.–*स्त्री.* एरंडाचें बीं. –**खरबूज़ा**; –**मेवा**–*पु.* पपई.

रेंडना⁺–*क्रि. अ.* पोटरीला येणें (धान्य).

रेंड़ी–*स्त्री.* एरंडाचें बीं; एरंडी.

रेंदी–*स्त्री.* काकडी; टरबूज इ०चें कोंवळें फळ. [किरकिर.

रेंरें–*स्त्री.* लहान मुलांची

रे–*अव्य.* अरे; ए.–*पु.* ऋषभाचा स्वर (संगीत).

रेख–*स्त्री.* १. रेघ. २. चिह्न. ३. मिसरूड. **मु०– आना**; –**भीजना**; –**भीनना**–मिसरूड फुटणें.

रेख़ता–*पु.* [*फा.*] अरबी-फारसीमिश्रित हिंदी कविता; गझल; उर्दूचें प्रारंभींचें नांव.

रेखना*–*क्रि. स.* १. रेखाटणें; खूण करणें. २. खरवडणें.

रेखांकन–*पु.* रेखाचित्र बनविणें; चित्रकला; 'ड्रॉइंग'. [टयूड'.

रेखांश–*पु.* रेखांश; 'लाँजि-

रेखा–*स्त्री.* रेघ; रेषा; ओळ; 'लाइन'.–**गणित**–*पु.* भूमिति; 'जॉमेट्री'. –**चित्र**–*पु.* रेखाचित्र; शब्दचित्र; 'स्केच'.–**पत्र**–*पु.* आराखडा; तक्ता; 'चार्ट'.–**बंधनी** –*स्त्री.* कंसदर्शक रेषा; 'व्हिन्क्यूलम'.

रेखित–*वि.* १. रेघ ओढलेला; अंकित; लिखित. २. फाटलेला.–**धनादेश**–*पु.* रेखित चेक; 'क्रॉस्ड चेक.'

रेग–*स्त्री.* [*फा.*] रेती; वाळू.

रेगिस्तान–*पु.* [*फा.*] वाळवंट.

रेचक–*वि.* सारक; ढाळक.–*पु.* प्राणायामांतील एक क्रिया (आंत ओढून घेतलेला श्वास बाहेर सोडणें).–**पंप**–(पाणी) बाहेर खेंचणारा पंप; निर्वात पंप; 'एग्झॉस्ट पंप'.

रेचन–*पु.* १. जुलाब; ढाळ. २. काढून टाकणें; रिकामा करणें; 'एग्झॉस्ट'. [चिल्लर; मोड; खुर्दा.

रेज़गारी⁺; **रेज़गी**–*स्त्री.* [*फा.*]

रेज़ा–*पु.* [*फा.*] १. लहान तुकडा. २. कपडयाचें ठाण. ३. गवंडयाच्या हाताखालचा मजूर.

रेत–*स्त्री.* वाळू; रेती.–*पु.* १. वीर्य. २. पारा.

रेतना–*क्रि. स.* १. कानसणें; कानशीनें घासणें. २. गुळगुळीत करणें. ३. हळूहळू कापणें (गला रेतना = गळा कापणें).

रेतला–**हा**–*वि.* रेताड. [माती.

रेता–१. रेती. २. वाळू असलेली

रेती–*स्त्री.* १. कानस. २. रेताड नदीकांठ; समुद्र किनारा. ३. नदीच्या पात्रांतील वाळवंट.

रेतीला–*वि.* रेताड; वालुकामय.

रेनु*–*पु.* १. धूळ; रेणु. २. रेती. ३. पृथ्वी. ४. कण; अणुरेणु.

रेल–*स्त्री.* १. प्रवाह; लोंढा. २. गर्दी.–**ठेल**; –**पेल**–*स्त्री.* १. भडिमार; रेलचेल; अधिकता. २. दाटी; गर्दी; रेटारेटी; धक्काधक्की.

रेल–*स्त्री.* [*इं.*] १. आगगाडी. २. आगगाडीचे रूळ. –**गाड़ी**–*स्त्री.* आगगाडी.

रेलना–*क्रि. स.* १. ढकलणें. २. दुसऱ्यावर रेलून उभें राहाणें. ३ अधाशीपणानें खाणें. –*क्रि. अ.* भरगच्च असणें.

रेला–*पु.* १. पाण्याचा लोंढा. २. हल्ला; चढाई. ३. धक्का; रेटारेटी. ४. आधिक्य; विपुलता. ५. लहरा (तबला).

रेवंद–*पु.* [*फा.*] रेवाचिनी (एक औषधी वनस्पती).

रेवड़–*पु.* शेळयामेंढयांचा कळप; लेंढार.

रेवड़ी– *स्त्री.* तीळ व गूळ मिसळून केलेली मिठाई; रेवडी.

रेश– *स्त्री.* [*फा.*] मोठी व लांब दाढी. –**सफ़ेद**–*पु.* म्हातारा माणूस.

रेशम–*पु.* [*फा.*] १. रेशीम. २ रेशमी कापड.

रेशा–*पु.* [*फा.*] १. रेशा; फळांतील तंतु; केसर. २. काथ्या. –(**शे**) **दार**–*वि.* तंतुमय; 'फायब्रस'.

रेस्त (स्तो) राँ; रेस्त्राँ–*पु.* [फ्रेंच] उपाहारगृह; हॉटेल.

रेह– *स्त्री.* १. खारी माती. २. रेघ.

रेहन–*पु.* [*फा.*] गहाण ठेवणें. –**दार**–*पु.* गहाण ठेवून घेणारा सावकार. –**नामा**–*पु.* गहाणखत.

रैतुवा–*पु.* रायतें.

रैदास–*पु.* १. रोहिदास साधु. २. चांभार. [राक्षस; निशाचर.

रैन–**नि***– *स्त्री.* रात्र. –**चर**–*पु.*

रैयत– *स्त्री.* [*अ.*] रयत; प्रजा.

रैसा+–*पु.* झगडा; भांडण.

रैहान–*पु.* [*अ.*] १. तुळशीसारखें एक सुगंधित झुडूप. २. कृपा. ३. ईश्वरी देणें.

रोंआँ–*पु.* रोमांच; केंस.

रोंग; रोंगटा–*पु.* रोमांच; कांटा. मु० **रोंगटे खड़े होना**–भीतीमुळें अंगावर कांटा उभा राहाणें.

रोंगटी– *स्त्री.* खेळांत बेइमानी करणें किंवा रागावणें; रडी; रड्डी.

रोंटिया+–*वि. पु.* कपटी; धूर्त; फसव्या.

रोंठा+–*पु.* वाळविलेल्या आंब्याच्या फोडी.

रोंधना+–*क्रि. स.* पायाखालीं तुडविणें.

रोआ–*पु.* रोम; लव; केंस.

रोआब–*पु.* [*अ.*] वचक; रुबाब; ऐट.

रोक– *स्त्री.* १. अडथळा; आडकाठी. २. रोकड; रोख खरेदी. –**टोक**–अडथळा; मनाई. –**थाम**– *स्त्री.* प्रतिबंध; अवरोध.

रोकड़– *स्त्री.* १. नगद; रोख रक्कम; रोकड. २. जमा; भांडवल. –**बही**– *स्त्री.* रोख रकमेचा हिशेब असलेली वही. [दार.

रोकड़िया–*पु.* मुनीम; खजिन-

रोकना–*क्रि. स.* अडविणें; थांबविणें; रोखणें.

रोग–*पु.* रोग; आजार.–**ग्रस्त**–*वि.* आजारी.–**प्रतिबंधनिरोधा**–*पु.* 'क्वारंटीन'. –**राज**–*पु.* क्षयरोग.

रोग़न–*पु.* [*फा.*] १. स्निग्ध पदार्थ; तेल. २. रोगण; 'पॉलिश'; 'वॉर्निश'. –**जोश**–*पु.* १. एक प्रकारचा साबण. २. मसालेदार मांस. –**फ़रोश**–*पु.* तेली. –(**ने**) **जर्द**–*पु.* तूप.

रोग़नी–*वि.* [*फा.*] १. तेल किंवा तूप लावलेलें. २. वॉर्निश केलेलें. –**रोटी**– *स्त्री.* पिठांत तेल–तूप घातलेली, किंवा वरून तूप चोपडलेली चपाती.

रोगी–*वि.* आजारी.–*पु.* रुग्ण. –**वाहक गाडी**– *स्त्री.* परिचारगाडी; 'ॲम्ब्युलन्स कार'.

रोचक–*वि.* १. रुचकर; प्रिय. २. स्वादिष्ट. ३. मनोरंजक.

रोचना– *स्त्री.* १. लाल कमळ. २. रक्तचंदन. ३. वसुदेवाची बायको. ४. टिळा; गंध.

रोज़–*पु.* [*फा.*] दिवस.–*अव्य.* नित्य; दररोज. –**अफ़ज़ूँ**–*वि.* दररोज वाढणारा. –**नामचा**–*अव्य.* दैनंदिनी; रोजनिशी; 'डायरी'. –**नामा**–*पु.* दैनिक (वृत्तपत्र). –**ब–रोज़**–*अव्य.* दररोज; सतत. –**मर्रा**–*अव्य.* नित्य; दररोज.–*पु.* व्यावहारिक बोली, भाषा; वाक्प्रचारयुक्त भाषा.

रोज़गार–*पु.* [*फा.*] पोटापाण्याचा व्यवसाय; व्यापार; धंदा. मु०–**चमकना**–व्यापारांत फायदा होणें.

रोज़गारी–*पु.* [*फा.*] व्यापारी.

रोज़ा–*पु.* [*फा.*] १. उपवास. २. रमजान महिन्यांत मुसलमान लोक पहांटेपासून रात्रीपर्यंत करतात तो उपवास. –**खोर**; –**ख्वार**–*पु.* उपवास न करणारा.– **दार**–*पु.* उपवास करणारा; व्रतस्थ. मु०–**खोलना**– उपवास सोडणें. –**टूटना**–व्रतभंग होणें.

रोज़ाना–*अव्य.* [*फा*] दररोज; नित्य.

रोज़ी– *स्त्री.* [*फा.*] १. उपजीविका; उपजीविकेचें साधन. २. रोजचा जेवणखर्च. ३. मजुरी.

रोज़ीना–*पु.* [*फा*] १. दैनिक मजुरी; रोजी. २. पेन्शन. –*अव्य.* दररोज; नित्य.

रोझ*– *स्त्री. पु.* नीलगाय.

रोट–*पु.* १. जाड भाकरी. २. हत्तीला घालावयाचा रोट.

रोटिहा+–*पु.* पोटावारी काम करणारा गडी.

रोटी– *स्त्री.* १. भाकरी; पोळी. २. स्वयंपाक. ३. जेवण.–**कपड़ा**–*पु.* अन्नवस्त्र. –**दाल**– *स्त्री.* जेवण. मु०–**कमाना**–पोटाला मिळविणें; निर्वाह करणें. –(**टियाँ**) **तोड़ना**–तुकडे मोडणें; लाचारीनें जगणें.

रोड़ा–*पु.* १. गोटा; विटेचा तुकडा; लहान दगड. २. अडथळा.

मु०–अटकाना; –डालना–मार्गांत अडथळा करणें.

रोदा–पु. धनुष्याची दोरी.

रोध–पु. अडथळा; मनाई. –अधिकार–पु. नकाराधिकार; 'व्हेटो'.

रोधना*–क्रि. स. अडविणें; आडकाठी करणें.

रोधनी–स्त्री. पाणी आपोआप बंद करणारी चावी; 'स्टॉप कॉक'.

रोधागार–पु. पोलिसांच्या ताब्यांतील तुरुंग; कच्चा कैदखाना; 'लॉकप'.

रोना–क्रि. अ. १. रडणें. २. चिडणें; तक्रार करणें. ३ पस्तावणें. –पु. रुदन; रडगाणें.–वि. चिडका; रडचा–**धोना**–पु. रडारड; विलाप. **मु०–पीटना**–छाती बडवून विलाप करणें. **रो रोकर**–कसेंबसें; मोठ्या मुष्किलीनें.

रोप–पु. १. लावणें; रोपन; लावणी. २. ठराव. ३. अडथळा.

रोपना–क्रि. स. १. लावणी करणे; रोप लावणें. २. पेरणें. ३. बसविणें; घट्ट करणें.

रोपनी; रोपाई–स्त्री. लावणी; पेरणी.

रोब–पु. [अ.] १. रुबाब; वचक; वजन. २. ऐंट. –**दाब**–पु. तेज; दहशत.–**दार**–वि. रुबाबदार; प्रभावशाली; तेजस्वी. **मु०–में आना** –दरारा बसणें; छाप पडणें.

रोमंथ–पु. रवंथ.

रोम–पु. [इं.] इटलीची राजधानी.

रोम–पु. १. शरीरावरील केंस; लव. २. छिद्र. ३. जल; पाणी. –कूप–पु. कातडीवरील छिद्र. **मु०–रोम में**–साऱ्या शरीरांत; रोमा-रोमांत.

रोमान; रोमानी–पा० 'रूमान; 'रूमानी'.

रोयाँ–पु. रोम; केंस. **मु०–खड़ा होना**–रोमांच उठणें.–**टेढ़ा न होना**–कांहींहि न बिघडणें. –**पसीजना**–दया येणें.

रोया–पु. [अ.] स्वप्न.

रोर–स्त्री. आरडाओरड; दंगल; आक्रोश. –वि. १. वेगवान्. २. दुर्दम्य.

रोरा–पु. १. गांजाचा चुरा. २. पा० 'रोर'.

रोरी+–स्त्री. पा० 'रोली'; 'रोर'. –वि. स्त्री. सुंदर.

रोल*–स्त्री. १. गडबड. २. आवाज. –पु. लोंढा.

रोला–पु. १. गोंगाट; गोंधळ. २. तुंबळ युद्ध. ३. + मोलकरणीचें, भांडी घासणें इ० काम.

रोली–स्त्री. कुंकू; गंधाचा रवा.

रोवनहार*–वि. पु. रडणारा; रडचा.

रोवना–वि. १. चटकन् रडणारा. २. चिडखोर. –क्रि. अ.* रडणें.

रोवनी–धोवनी–स्त्री. शोक; रडवेपणा; आटापिटा.

रोवासा–वि. १. रडकुंडीस आलेला. २. रडचा.

रोशन–वि. [फा.] १. प्रज्वलित; प्रकाशित. २. प्रकट; उघड; प्रसिद्ध. –**चौकी**–स्त्री. सनई; वाजंत्री.–**दान** –पु. गवाक्ष; झरोका.–**दिमाग़**–वि. बुद्धिमान्. –पु. तपकीर.

रोशनाई–स्त्री. [फा.] १. शाई. २. प्रकाश. ३ आरास; रोषणाई.

रोशनी–स्त्री. [फा.] १. उजेड; प्रकाश. २. ज्ञान. ३. दिवा.

रोस*–पु. रोष; राग.

रोहू–स्त्री. पु. एक प्रकारचा मोठा मासा.

रौंद–स्त्री. १. तुडवणें; तुडवा-तुडवी. २. गस्त; 'राउंड'.

रौंदना–क्रि. स. चिरडणें; तुडविणें.

रौंस*–पु. घट्टा; खूण.

रौ–स्त्री. [फा.] १. पाण्याचा प्रवाह, ओढ, लोंढा. २. गति; वेग. ३.* रव; आवाज.

रौज़न–पु. [फा.] १. झरोका. २. छेद; छिद्र; फट. [२. समाधिस्थान.

रौज़ा–पु. [अ.] १. बाग.

रौताइन–स्त्री. सरदारीण.

रौताई–स्त्री. सरदारकी.

रौद+–पु. ऊन्ह.

रौन*–पु. रमण; पति.

रौनक़–स्त्री. [अ.] १. कांति; तेज. २. शोभा. ३. रूप; छटा.

रौनी*–स्त्री. रमणी; सुंदरी.

रौरव–वि. भयंकर. –पु. एक भीषण नरक.

रौरा+–पु. पा० 'रौला'. –सर्व. तुमचा; आपला.

रौराना+–क्रि. अ. आरडा ओरड करणें; बकणें.

रौरे+–सर्व. आदरसूचक संबोधन; आपण.

रौला–पु. धामधूम; गडबड; आरडाओरड.

रौलि+–स्त्री. थप्पड.

रौस–स्त्री. [फा.] १. चाल; गति. २. रीत; पद्धति. ३. बागेंतील पायवाट. ४. 'गॅलरी.'

रौहाल+–स्त्री. घोड्याची एक चाल किंवा जात.

ल

ल–देवनागरी वर्णमालेंतील अठ्ठाविसावें व्यंजन. [लंका.

लंक*–*स्त्री*. १. कंबर; कटि २.

लंकलाट–*पु.* [*इं.*] एक प्रकारचें उंची सुती कापड; लँकेशायरचें कापड; 'लाँगक्लॉथ'.

लंका–*स्त्री*. लंका; सिलोन.–**नायक**; –**पति**–१. रावण. २. बिभीषण.

लंकाधिपति; **लंकेश**; **लंकेश्वर**; **लंकेस**–*पु.* १. रावण. २. बिभीषण.

लंग–*स्त्री*. १.लंगोट. २.कासोटा. –*पु.* [*फा.*] लंगडेपणा.–*वि.* लंगडा.

लंगड़; **लँगड़ा**–*वि.* लंगडा.

लँगड़ाना–*क्रि. अ.* लंगडत चालणें; लंगडणें.

लंगर–*पु.* [*फा.*] १. नांगर (जहाजाचा). २. गळयांतला ओंडका; लोढणें. ३. लोखंडी साखळदंड. ४. पहिलवानी लंगोट. ५. घांवदोरा. ६. गरिबांना नित्य द्यावयाचा शिधा; सदावर्त.–*वि.* भारी; वजनदार. **मु०**–**उठाना**–जहाज रवाना होणें.–**करना**–तंटा बखेडा करणें.–**डालना**–जहाज नांगरणें.–**बाँधना**– १. पैलवानी करणें. २. कुस्तीस तयार होणें. ३. ब्रह्मचर्य धारण करणें.

लंगर–*स्त्री. पु.* धृष्ट किंवा अगाऊ व्यक्ति.–*वि.* खडयाळ; हूड.

लंगर–*पु.* १. लंगडा. २. श्रीकृष्ण.

लँगर(रा)ई–*स्त्री*. १. धृष्टता; मर्यादातिक्रम. २. खटयाळपणा.

लंगूर–*पु.* १. वानर. २. शेंपूट (माकडाचें).–**फल**–*पु.* नारळ.

लंगूल–*पु.* शेपूट; शेपटी.

लँगोट–**टा**–*पु.* लंगोट; लंगोटा. –**बंद**–*वि.* ब्रह्मचारी.**मु०**–**का ढीला**–कामुक; विषयी.–**का सच्चा**–सच्छील; सदाचारी.–**फाड़ डालना**–कुस्ती सोडून देणें.–**बाँधना**–कुस्तीसाठीं तयार होणें.

लँगोटिया यार–*पु.* बालमित्र; लंगोटीमित्र.

लँगोटी–*स्त्री*. लंगोटी; कौपीन. **मु०**–**पर फाग खेलना**–उधळेपणा करणें; शक्तीबाहेर खर्च करणें. –**में मस्त**–गरिबींतहि आनंदी राहाणारा.

लंघना*–*क्रि. स.* उल्लंघन करणें; ओलांडणें; उडी मारणें.

लंठ–*वि.* १. मठ्ठ; मूर्ख. २. असभ्य.

लँडूरा–*वि.* शेंपूट तुटका; लांडा.

लंतरानी–*स्त्री*. [*अ.*] प्रौढी; आत्मप्रशंसा. [कामुक.

लंपट–*वि.* विषयी; व्यभिचारी;

लंब–*पु.* लंब; 'परपेंडीक्यूलर'. –*वि.* १. उंच. २. लांब.–**तड़ंग**–*वि.* लांबटांग्या; ताडासारखा उंच.

लंबर; **लंबरदार**–पा० 'नंबर'; 'नंबरदार'.

लंबा–*वि.* १. लांब. २. दूर. ३. उंच.–**चौडा**–ऐसपैस; घसघशीत. –**सफ़र**–*पु.* दूरचा प्रवास. **मु०**–**करना**–१. आपटणें. २. पाठवून देणें. –**बनना**; –**होना**–१. निघून जाणें. २. पळून जाणें. [पणा. २. दीर्घता.

लंबाई–*स्त्री*. १. लांबी; लांबट-

लंबान–*स्त्री*. लांबी.

लंबाना[+]–*क्रि. स.* ताणणें; लांब करणें. [अनिर्णीत; 'पेंडिंग'.

लंबित–*वि.* लोंबकळणारा;

लंबी–*वि. स्त्री*. लांबडी; उंच. **मु०**–**चौड़ी हाँकना**–फुशारकी मारणें.–**तानना**– १. आरामांत डाराडूर झोंपणें. २. जोरांत पळून जाणें.–**साँस भरना, लेना**–उसासा सोडणें. [(मनुष्य).

लंबू–*वि.* उंच टांग्या; फार उंच

लंबोतरा–*वि.* लांबट.

लंबोदर–*पु.* गणपति.–*वि.* १. ढेरपोटचा. २. खादाड.

लकड़दादा–*पु.* खापर-पणजोबा.

लकड़बग्घा–*पु.* लांडग्यापेक्षां मोठा एक जंगली प्राणी; तरस.

लकड़हारा–*पु.* लाकूडतोडया; मोळीविक्या.

लकड़ा–*पु.* लाकडाचा ओंडका.

लोकना–*क्रि. स.* १. झेलणें. २. वाटेंतच पळवून नेणें.

लोकांतरगमन–*पु.* परलोकगमन.

लोकाट–*पु.* [चिनी] मोठ्या बोराएवढें एक गोड फळ अथवा त्याचें झाड. [फेकणें.

लोकाना–*क्रि. स.* उडविणें;

लोकायत–*पु.* १. इहलोकावरच विश्वास ठेवणारा माणूस; चार्वाकाचा अनुयायी. २. चार्वाकाचें तत्त्वज्ञान.

लोकैषणा–*स्त्री.* १. उत्कर्ष, सम्मान, सुख इ० ची अभिलाषा. २. लोकेषणा; कीर्तीची इच्छा, हांव.

लोकोक्ति–*स्त्री.* १. म्हण. २. एक अलंकार. [विलक्षण.

लोकोत्तर–*वि.* अलौकिक;

लोकोपयोगी सेवा *स्त्री.* लोकहिताचीं कामें; 'पब्लिक युटिलिटी सर्व्हिस'.

लोखड़ी*–*स्त्री.* पा० 'लोमड़ी'.

लोखर–*स्त्री.* १. लोहाराचीं किंवा न्हाव्याचीं उपकरणें (वस्तरा, कात्री वगैरे). २. धोपटी.

लोखरिया⁺–*स्त्री.* तरस.

लोग–*पु.* (अनेक०) लोक; जनता.–**बाग**;–**वाग**–*पु.* सामान्य माणसें; जनता.

लोगाई*–*स्त्री.* पत्नी; स्त्री.

लोच–*स्त्री.* १.मृदुता; कोमलता. २. लुसलुशीतपणा. ३. लचक; लवचीकपणा. ४.* अभिलाषा; इच्छा.

लोगाइत⁺–*पु.* घमेंड. मु०–**बूकना**– प्रौढी मिरविणें.

लोचन–*पु.* डोळा; नेत्र.

लोचना⁺–*क्रि. स.* १. प्रकाश पाडणें. २. आवड उत्पन्न करणें.–*क्रि. अ.* १. इच्छिणें. २. शोभणें.

लोट–*स्त्री.* लोळणें; गडगडणें.–*पु.*⁺ 'नोट'.–**पटा***–*पु.* १. अदलाबदली. २. लग्नांतील वधू-वरांच्या पाटांची अदलाबदल.–**पोट**–*स्त्री.* आराम करणें; लोळणें.–*वि.* हंसून मुरकुंडी वळलेला. मु०–**पोट होना**–हंसून मुरकुंडी वळणें; आनंदातिरेकानें गडबडा लोळणें.

लोटन–*पु.* १. जमिनीवर लोळणारें एक कबुतर. २. रस्त्यांतील खडा. ३. खोल नांगरट करण्याचा नांगर.

लोटना–*क्रि. अ.* १. लोळणें. २. लवंडणें; गडगडणें. ३.कुशीस वळणें. ४. आराम करणें. ५. मुग्ध होणें; मोहून जाणें. **मु० लोट जाना**–१. लवंडणें. २. बेशुद्ध होणें. ३. मरणें.

लोटा–*पु.* लोटा; तांब्या.

लोटिया; **लोटी**–*स्त्री.* गडू; लहान तांब्या.

लोड़ना*–*क्रि. स.* मागणें; इच्छिणें; लागणें; जरुरी भासणें.

लोढ़ना–*क्रि. स.* १. रेचणें; सरकी काढणें; साफ करणें. २.* खुडणें; तोडणें.–*क्रि. अ.** पा० 'लोटना'.

लोढ़ा–*पु.* वरवंटा.–**ढाल**–*वि.* नायनाट केलेला. **मु०**–**डालना**–सपाट करणें.

लोढ़िया–*स्त्री.* लहान वरवंटा.

लोथ–*स्त्री.* प्रेत; मृत शरीर; शव.–**पोथ**–*वि.* थकलेला; गळून गेलेला. मु०–**गिरना**–मारलें जाणें.–**डालना**–मारून टाकणें.

लोथड़ा–*पु.* मांसपिंड; मांसाचा मोठा तुकडा.

लोथा⁺–*पु.* पोतें; थैला.

लोथी⁺–*स्त्री.* १. गांठी असलेली काठी. २. पा० 'लट्ठा'.

लोदी–**धी**–*पु.* पठाणांची एक जात.

लोध–**ध्र**–*पु.* एक वृक्ष. याचीं फुलें लाल किंवा पांढरीं असतात.

लोन–*पु.* १. मीठ; लवण. २. सौंदर्य.–**हरामी***–*वि.* कृतघ्न. **मु०**–**खाना**–मीठ, अन्न खाणें; उपकार घेणें.–**चुकाना**;–**उतारना**–उपकार फेडणें.–**न मानना**–उपकार न मानणें. **जलेपर लोन लगाना**–दुःखावर डागण्या देणें.

लोना–*वि.* १. खारट; खारा; तिखटामिठाचा. २. चमचमीत. ३. सुंदर.–*पु.* खारी माती; लोणा.–*क्रि. स.** पिकाची कापणी करणें.

लोनाई*–*स्त्री.* सुंदरता.

लोनार⁺–*पु.* मीठ तयार करण्याचें, मिळण्याचें ठिकाण.

लोनिया–*पु.* मीठ तयार करणारी एक जात; लोणारी.

लोनी–*स्त्री.* १. एक पालेभाजी. २. हरभऱ्याची आंब. ३. खारी माती.–**पु.* लोणी.

लोपविभ्रम–*पु.* चूकभूल; 'एरर्स अँड ओमिशन्स'.

लोबान–*पु.* [*अ.*] धूप; ऊद.

लोबिया–*पु.* चवळी.

लोभाना*–*क्रि. स.* मोहून टाकणें.–*क्रि. अ.* मोहून जाणें; मोहित होणें.

लोभार⁺–*वि.* १. भुलविणारा; लोभांत पाडणारा. २. मोहून टाकणारा.

लोम–*पु.* अंगावरील केंस; रोम.–**हर्षण**–*वि.* शहारे आणणारें.

लोमड़ी–*स्त्री.* १. कोल्हा २. खोकड.

लोय*–*पु.* लोक; जनता.–*स्त्री.* जाळ; ज्वाळा.–*अव्य.* पर्यंत.

लोय; **लोयन***–*पु.* १. लोचन;

डोळा. २. लावण्य.

लोर*–*वि.* १. चंचल. २. उत्सुक; उत्कंठित.–*पु.* १. कानाचें पाळें. २. कुंडल; डूल.

लोरना*–*क्रि. अ.* १. हलणें; हेलकावणें. २. लोळणें. ३. वांकणें.

लोरी– *स्त्री.* अंगाई गीत.

लोल–*वि.* १. चंचल; अस्थिर. २. उत्सुक.

लोलक–*पु.* १. डूल. २. घंटेचा लोळगा.

लोलना*–*क्रि. अ.* हलणें; हेलकावणें.–*क्रि. स.* हलविणें.

(पक्षी).

लोवा– *स्त्री.* कोल्हा.–*पु.* लावा

लोहँड़ा–*पु.* १. लोखंडाचें भांडें. २. तसराळें; घमेलें. ३. लोखंडी घागर.

लोह–*पु.* १. लोखंड. २. रक्त. –*वि.* लोखंडी.–**सार**–*पु.* १. पोलाद. २. लोखंडी सांखळी.

लोहाँगी– *स्त्री.* टोंकाला लोखंड लावलेली लाठी.

लोहा–*पु.* १. लोखंड. २. इस्त्री. ३. शस्त्र; हत्यार. ४. लोखंडाची वस्तु. ५. लाल बैल. मु०–**करना; –देना**–इस्त्री करणें.–**गहना***– १. युद्ध करणें. २. लढाईसाठीं तयार होणें.–**बजाना**–लढाई होणें. –**मानना**–१. प्रभुत्व मानणें. २. हार खाणें.–**लेना**–लढाई करणें.–(हे)**के चने चबाना**–अत्यंत कष्ट करणें; कठिण कार्य करणें.

लोहाना–*क्रि. अ.* लोखंडी भांड्यांत राहिल्यामुळें एखाद्या वस्तूला लोखंडाचा रंग किंवा स्वाद लागणें.

लोहार–*पु.* लोहार.–**खाना**–*पु.* लोहारकामाची शाळा. मु०–**खाने में सेवइयाँ बेचना**–मूर्खपणाचें कृत्य करणें. [किंवा धंदा.

लोहारी– *स्त्री.* लोहाराचें काम

लोहित–*वि.* १. लाल रंगाचा. २. तांब्याचा.

लोहिया–*पु.* १. लोखंडी वस्तूंचा व्यापार करणारा. २. मारवाडी-वैश्यांची एक जात. ३. लाल रंगाचा बैल.–*वि.* लाल रंगाचा.

लोहू–*पु.* रक्त.–**लोहान**–*वि.* रक्तबंबाळ.

लौं*–*अव्य.* १. पर्यंत. २. समान; तुल्य.

लौंकना–*क्रि. अ.* १. दिसणें. २. चमकणें.

लौंग*–*पु.* १. लवंग. २. नाकांतील चमकी; मोरणी.

लौंगिया मिर्च– *स्त्री.* लवंगी मिरची.

लौंडा–*पु.* छोकरा; पोरगा; देखणा मुलगा.–**पन**–*पु.* पोरकटपणा. –(डे)**बाज़**–*वि. पु.* लहान किंवा तरुण मुलांशीं अनैसर्गिक संबंध ठेवणारा.

लौंड़ी– *स्त्री.* १. पोरगी. २. दासी; मोलकरीण.

लौंद–*पु.* अधिक मास; धोंडा महिना.

लौ– *स्त्री.* १. आवड; गोडी. २. चित्तवृत्ति. ३. आशा. ४. इच्छा. ५. ज्वाळा. ६. ज्योत.

लौआ–वा+–*पु.* दुध्या भोपळा.

लौकना+–*क्रि. अ.* दिसणें.

लौकिक–*वि.* व्यावहारिक; सांसारिक.

लौकी– *स्त्री.* १. दुध्या भोपळा. २. पोहण्याचा झेला; धोडा. ३. दारू गाळण्याची नळी.

लौजोरा–*पु.*+ धातु वितळविण्याचें काम करणारा; झाळकरी.

लौट– *स्त्री.* वळणें; परतणें.–**पौट** – *स्त्री.* १. पाठपोट छपाई. २. उलटापालट.–**फेर**–*पु.* फरबदल; फेरफार.

लौटना–*क्रि. अ.* १. परतणें; माघारीं येणें. २. मागें वळणें. –*क्रि. स.* १. उपडें करणें. २. परतविणें.

लौटाना–*क्रि. स.* १. परत देणें; परत करणें. २. उलटें सुलटें करणें; उपडें करणें.

लौड़ा–*पु.* लिंग; शिश्न.

लौन*–*पु.* लवण; मीठ.

लौना–+*पु.* १. जनावराच्या पुढच्या व मागच्या पायाला बांधण्याची दोरी. २. पिकाची कापणी. ३. जळण. –*वि.** सुंदर; मोहक.

लौवा–*पु.* दुध्या.

लौस–*पु.* [*फा.*] १. डाग. २. भेसळ.

लौह–*वि.* लोखंडी; लोखंडाचें. –*पु.* १. लोखंड. २. हत्यार. –**आवरण; –पट–***पु.*; –**दीवार**– *स्त्री.* लोखंडी पडदा; 'आयर्न कर्टन'.–**कार**–*पु.* लोहार.–**पुरुष**–*पु.* पोलादी पुरुष; कणखर व्यक्ति. –**भांड**–*पु.* लोखंडी माल; 'हार्डवेअर'. –**विहीन**; **लौहेतर**–*वि.* लोह-विरहित; लोखंडाव्यतिरिक्त असलेलें; 'नॉन फेरस'.

लौह– *स्त्री.* [*अ.*] १. लाकडी तक्ता. २. लाकडी पाटी. ३. फळा. ४. पुस्तकाचें मुखपृष्ठ.

ल्यारी–*पु.* लांडगा

ल्यावना*–*क्रि. स.* आणणें.

ल्यौ*– *स्त्री.* पा० 'लौ'.

ल्वारि*– *स्त्री.* पा० 'लू'.

व

व–देवनागरी वर्णमालेंतील एकोणतिसावा वर्ण.

वंक–*वि.* वांकडा; वक्र.–**नार–ल**– *स्त्री.* १. सोनाराची वांकडी नळी अथवा फुंकणी २. सुषुम्ना नाडी.

वंकट–*वि.* १. वांकडातिकडा. २. कपटी. ३. विकट; कठिण.

वंग–*पु.* १. कथील. २. शिसें; जस्त; 'टिन'. ३. बंगाल प्रांत.

वंगीय–*वि.* बंगाली.

वंचक–*वि. पु.* १. फसविणारा; क. २. धूर्त. ३. दुष्ट.

वंचना– *स्त्री.* फसवणूक; ठकबाजी.–*क्रि. स.** फसविणें.

वंचित–*वि.* १. फसलेला. २. पारखा झालेला; रहित; विमुख.

वंट; वंटक–*पु.* हिस्सा; भाग.

वंटन–*पु.* पा० 'आवंटन'.

वंटितांश–*पु.* वांटा; हिस्सा; 'कोटा'. [अविवाहित. ३. ठेंगणा.

वंठ–*वि.* १. पंगु; विकलांग. २.

वंडर–*पु.* १. कंजूष माणूस. २. खोजा; अंत:पुरांतील सेवक.

वंडा–*स्त्री.* कुलटा; व्यभिचारिणी.

वंदन–*पु.* १. स्तुति. २. पूजन. ३. नमस्कार.–**माला**– *स्त्री.* ;–**वार**–*पु.* तोरण. [३. पूजा.

वंदना–*स्त्री.* १. स्तुति. २. प्रणाम.

वंदीजन–*पु.* चारण; भाट.

वंध्यीकरण–*पु.* वांझ किंवा अनुत्पादक बनविणें; खच्ची करणें; 'स्टेरिलायझेशन'.

वंश–*पु.* १. वंश; कुळ. २. बांबू. ३. बांसरी.–**धर**–*पु.* कुळांत जन्मलेला; वंशज.–**वृक्ष**–*पु.* वंशावळ; वंशवक्ष.–**संहारनीति**– *स्त्री.* वंशनि:पाताचें धोरण; 'जेनोसाईड'.

वंशी– *स्त्री.* बांसरी.–**धर**–*पु.* कृष्ण; बांसरी वाजविणारा.–**वट**–*पु.* पा० 'बंसीवट'.

वक–*पु.* बक; बगळा.

वक़अत; वक़त– *स्त्री.* [*अ.*] १. पत; प्रतिष्ठा २. शक्ति; बल. ३. उंची. ४. महत्त्व.

वक़ार–*पु.* [*अ.*] १. श्रेष्ठत्व; मोठेपणा. २. गांभीर्य.

वकालत– *स्त्री.* [*अ.*] वकिली. –**नामा**–*पु.* वकीलपत्र.

वकालतन–*अव्य.* [*अ.*] वकिलाकरवीं.

वकील–*पु.* [*अ.*] १. वकील; विधिज्ञ. २. राजदूत.

वक़ूफ़–*पु.* ज्ञान; समज.–**दार**–*वि* समजदार; जाणकार.

वक़्त–*पु.* [*अ.*] १. वेळ. २. संधि; प्रसंग; अवसर. ३. सवड; फुरसत. ४. संकटाचा, मृत्यूचा क्षण. –**ब वक़्त**–*अव्य.* वेळीं–अवेळीं. **मु०** –**आ जाना**–१. ठरलेली वेळ येणें. २. मृत्यूचा क्षण येणें.–**तंग होना**–काळ प्रतिकूल होणें.–**पर**– १. प्रसंगीं. २. संकटकाळीं.

वक़्तन्–फ़वक़्तन्–*अव्य.* [*अ.*] कधीं कधीं; अधूनमधून.

वक्तव्य–*पु.* १. पत्रक. २. निवेदन; कथन. ३. घोषणा; जाहीरनामा.

वक़्ती–*वि.* [*अ.*] १. तात्कालिक; त्या वेळेपुरता.

वक्तृता *स्त्री.* वक्तृत्व; व्याख्यान. **मु०**–**झाड़ना**–व्याख्यान झोडणें.

वक़्फ़–*पु.* [*अ.*] धर्मार्थ दान केलेली संपत्ति. २. लोकोपकारार्थ दिलेली वस्तु.–**नामा**–*पु.* दानपत्र. **मु०**–**कर देना**–१. ईश्वरार्पण करणें. २. चांगल्या कामीं लावणें.

वक्फ़ा–*पु.* [*अ.*] १. थांबणें; विराम. २. उशीर. ३. थोडा वेळ; किंचित् विलंब.

वक्र–*वि.* १. तिरकें; वांकडें; 'कर्व्ह्'. २. कुटिल; बेइमान.–**बुद्धि**–*वि.* कुटिल बुद्धीचा; नीच; बेइमान.–**रेखा**–*स्त्री.* वांकडी रेघ; 'कर्व्हड लाइन'.

वक्राक्ष–*पु.* १. वाटोळा दांडा; 'शॅफ्ट'. २. यंत्र वाटोळें फिरविण्याकरितां केलेला पेंच. 'क्रॅंक'.

वक्रावर्त–*पु.* 'कॅम्पिलॉट्रोपस'.

वक्ष–*पु.* छाती; ऊर.

वग़ैरह–*अव्य.* [*अ.*] वगैरे; इत्यादि.

वचन–*पु.* १. बोलणें; शब्द. २. वचन.–**पत्र**–*पु.* 'प्रॉमिसरी नोट'. –**बंध**–*पु.* संकेत; वायदा; वचन; 'एंगेजमेंट'.

वच्छ*–*पु.* १. वक्षस्थळ; छाती; ऊर. २. वत्स; मूल.

वज़न–*पु.* [*अ.*] १. भार; वजन. २. महत्त्व; प्रतिष्ठा. ३. कवितेंतील वर्ण किंवा मात्रा यांचें माप.–**दार**–*वि.* १. भारी. २. महत्त्वयुक्त.

वजह– *स्त्री.* [*अ.*] १. कारण. २. पद्धति; रीत. ३. उत्पन्नाची बाब. –*पु.* चेहरा; आकृति.

वज़ा– *स्त्री.* [*अ.*] १. बनावट; रचना. २. सजावट. ३. स्थिति. ४. प्रथा. ५. प्रसवणें; जन्म देणें. –**दार**–*वि.* १. डौलदार; चांगल्या घडणीचा; सुंदर. २. आपल्या तत्त्वाप्रमाणें चालणारा.–**हमल**–*पु.* प्रसूति.

वज़ाअत– *स्त्री.* [*अ.*] अधमता;

नीचता; हलकटपणा.

वज़ारत– *स्त्री.* [*अ.*] १. प्रधानकी. २. मंत्रिपद. ३. मंत्र्याचें कार्यालय; मंत्रालय; 'मिनिस्ट्री'.

वज़ाहत– *स्त्री.* [*अ.*] १. सौंदर्य. २. चेहऱ्यावरील तेज; कांति. [करण; विशदीकरण.

वज़ाहत– *स्त्री.* [*अ.*] स्पष्टी-

वज़ीअ–*वि.* [*अ.*] नीच; हलकट.

वज़ीफ़ा–*पु.* [*अ.*] १. विद्यार्थी, विद्वान्. इ० ना मिळणारी वृत्ति; छात्रवृत्ति. २. निवृत्तिवेतन; 'पेन्शन.' ३. जप; पाठ; नित्यकर्म.–**ख्वार**; –**दार**–*पु.* ज्याला छात्रवृत्ति, निवृत्तिवेतन इ० मिळतें असा मनुष्य.

वज़ीर–*पु.* [*अ.*] १. प्रधानमंत्री; दिवाण; वजीर. २. मंत्री; सचिव.–(**रे**) **आज़म**–*पु.* पंतप्रधान; महामंत्री.–(**रे**) **आला**–*पु.* मुख्य मंत्री.–(**रे**)**ख़ज़ाना**–*पु.* अर्थमंत्री.(**रे**)–**ख़ारिजा**–*पु.* परराष्ट्रमंत्री.–(**रे**) **जंग**–*पु.* युद्धमंत्री. –(**रे**) **तालीम**–*पु.* शिक्षणमंत्री. –(**रे**) **दाख़िला**–*पु.* गृहमंत्री. –(**रे**) **दिफ़ाअ**–*पु.* संरक्षणमंत्री. –(**रे**) **माल**–*पु.* महसूलमंत्री; अर्थमंत्री.–(**रे**) **मेहनत**–*पु.* मजूरमंत्री.–(**रे**)**सेहत**–*पु.* आरोग्यमंत्री. –(**रे**) **हुकूमत**–*पु.* राज्यमंत्री.

वज़ीरी– *स्त्री.* [*अ.*] प्रधानपद; मंत्रिपद.–*पु.* वायव्य सरहद्द प्रांतांतील पठाणांची एक टोळी; या टोळींतील व्यक्ति.

वज़ू–*पु.* [*अ.*] नमाजापूर्वी हातपाय धुण्याची क्रिया.

वजूद–*पु.* [*अ.*] १. अस्तित्व; विद्यमानता; जीवन; २. शरीर. ३. प्रकट होणें. ४. निश्चिति. ५. कार्यसिद्धि. **मु०**–**पाना**; –**में आना** –अस्तित्वांत येणें.

वजूहात– *स्त्री.* [*अ.* 'वजह' चे अनेक०] १. कारणें. २. सावनें.

वज्द–*पु.* [*अ.*] आनंदातिरेक; तल्लीनता; आत्मविस्मृति. **मु०** –**में आना**–आनंदातिरेकानें डोलूं लागणें; तल्लीन होणें.

वज्र–*पु.* १. इंद्राचें शस्त्र. २. वीज. ३. हिरा. ४. भाला.–*वि.* घोर; भीषण; कठोर; दारुण. –**पात**–*पु.* १. वीज कोसळणें. २. भयंकर आपत्ति येणें.–**मूर्ख**–*वि.* महामूर्ख. –**हीरक**–*वि.* अतिशय कठिण; अभेद्य; 'अॅडमँटिन'.

वडिश–*पु.* मासे पकडण्याचा गळ.

वणिक्–*पु.* वाणी; व्यापारी. –**सार्थ**–*पु.* व्यापाऱ्यांचा तांडा, काफिला.

वतन–*पु.* [*अ.*] जन्मभूमि; जन्मस्थान. –**दोस्त**; –**परस्त**–*वि.* देशभक्त. [देशबंधु.

वतनी–*वि.* [*अ.*] स्वदेशी;

वत्स–*पु.* १. गायीचें वासरूं. २. मुलगा; बाळ.

वत्सर–*पु.* वर्ष.

वदंती– *स्त्री.* बोलणें; गोष्ट; कथा; वार्ता. **किंवदंती**– *स्त्री.* अफवा. [कथन; वचन.

वदन–*पु.* १. तोंड; मुख. २.

वद(दा)न्य–*वि.* १. उदार; दानशूर. २. मधुरभाषी.

वदि–दी–*अव्य.* वद्य (पक्ष); कृष्ण पक्षांत.–*पु.* वद्य, कृष्ण पक्ष.

वदुलाना–*क्रि.* *स.* आरोप करणें; शिवीगाळ करणें.

वध–*पु.* खून; हत्या.–**कर्मचारी**; –**कर्माधिकारी**–*पु.* फांशी देणारा; मांग; 'हँगमन'.

वधक–*पु.* १. खुनी. २. हिंसक. ३. व्याध.

वधना*–*क्रि.* *स.* ठार मारणें.

वधालय–*पु.* खाटीकखाना; कत्तलखाना; 'स्लॉटर हाउस'.

वधिक–*पु.* १. वध करणारा. २. मांग. [बायको. ३. सून.

वधू; **वधूटी**–*स्त्री.* १. नवरी. २.

वधूत*–*पु.* दिगंबर; अवधूत.

वधूवंश–*पु.* स्त्रीजाति.

वन–*पु.* अरण्य; जंगल; 'फॉरेस्ट'.–**चर**–*पु.* जंगलांत राहाणारा; वनवासी; जंगली माणूस. –**ज**–*पु.* १. हत्ती. २. कमळ.–*वि.* वनांत उत्पन्न झालेला.–**नाशन**–*पु.* जंगलतोड; 'डीफॉरेस्टेशन'.–**पाल** –*पु.* अरण्यरक्षक; 'रेंजर'.–**रक्षक**; –**संरक्षक**–*पु.* 'कॉन्झर्व्हेटर ऑफ फॉरेस्ट्स'.–**रोपण**–*पु.* जंगल वाढविणें; 'अॅफोरेस्टेशन'.–**वास** –*पु.* वनांत राहाणें. (**मु०**–**देना** –वनवासाला पाठविणें).–**विज्ञान** –*पु.* वनशास्त्र; 'सिल्व्हीकल्चर'.

वनिता– *स्त्री.* १. स्त्री. २. प्रिया. [वाटिका.–*पु.* वानप्रस्थ.

वनी– *स्त्री.* लहान वन;

वफ़ा– *स्त्री.* [*अ.*] १. निष्ठा; कृतज्ञता. २. वायदा पूर्ण करणें; वचनपूर्ति. ३. मुरवत. ४. निभावणें; पूर्ण करणें.–**दार**–*वि.* वचनपूर्ति करणारा; एकनिष्ठ.–**दारी** –*स्त्री.* १. निष्ठा. २. स्वामिभक्ति.

वफ़ात– *स्त्री.* [*अ.*] मृत्यु. **मु०** –**पाना**–मरणें.

वबा– *स्त्री.* [*अ.*] सांथीचा रोग; महामारी.–**ई**–*वि.* सांसर्गिक.

वबाल–*पु.* [*अ.*] १. भार; ओझें. २. संकट; आपत्ति; अभिशाप.

वमन–*पु.* उलटी; ओकारी.

वय:संधि–*स्त्री.* बाल्य व तारुण्य

यांतील मधला काळ.

वयन*–*पु.* वचन.

वयम्– *सर्व.* आम्ही सर्व.

वयस– *स्त्री.* वय.

वयस्क–*वि.* प्रौढ; वयांत आलेला; 'ॲडल्ट'.–**मताधिकार**–*पु.* प्रौढमताधिकार; 'ॲडल्ट सफरेज'. ['ओव्हरएज'.

वयोत्तर–*वि.* अधिक वयाचा;

वरंच–*अव्य.* १. पण; परंतु. २. उलट; इतकेंच नव्हे तर.

वरक़–*पु.* [*अ.*] १. कागदाचा तुकडा; पुस्तकाचें पान. २. सोन्याचांदीचा वर्ख. ३. झाडाचें पान. ४. फुलाची पाकळी.

वरग़लना–*क्रि. स.* १. बहकाविणें; भडकाविणें. २. दिशाभूल करणें. [व्यायाम. २. सराव.

वरज़िश– *स्त्री.* [*फा.*] १.

वरज़िशी–*वि.* [*फा.*] व्यायामासंबंधींचा; व्यायामाचें (शरीर).

वरण–*पु.* १. निवड; 'सिलेक्शन'. २. पूजा; सत्कार. ३ स्वीकार. –**स्वातंत्र्य**–*पु.* निवड करण्याची मोकळीक; 'फ्रीडम ऑफ चॉइस'.

वरद–*वि.* वरदान देणारा.

वरदी– *स्त्री.* [*अ.*] १. गणवेश. २. चौघडा; नौबत.

वरदी–*वि.* [*अ.*] गुलाबी.

वरना–*अव्य.* [*फा.*] १. नाहींतर. २. उलट. [केंच नव्हे तर.

वरन्–*अव्य.* उलट; परंतु; इत-

वरम–*पु.* कवच.

वरम–*पु.* [*अ.*] सूज.

वरसा–*पु.* [*अ.* 'वारिसचें' अनेक०] १. वारस. २. वारसा; पैतृक धन.

वरही*–*पु.* मोर.

वरासत– *स्त्री.* [*अ.*] १. वारसा; उत्तराधिकार. २. वारसाहक्कानें मिळालेली संपत्ति.

वरासतन्–*अव्य.* [*अ.*] वारसा हक्कानें.

वरीक्षा–*स्त्री.* वरपरीक्षा करण्यासाठीं त्याला पाहाणें. ['प्रेफरन्स'.

वरीयता– *स्त्री.* प्राधान्य;

वरु–*अव्य.* पा० 'वरु'.

वरूथिनी– *स्त्री.* १. सैन्य. २. वैशाख वद्य एकादशी.

वरे⁺–*अव्य.* १. तिकडे; पलीकडे; दूर. २. जवळ. ३. साठीं; करितां.

वरेण्य–*वि.* १. मुख्य. २. पूजनीय. ३. ज्याची इच्छा बाळगावी असा; सर्वोत्कृष्ट. –*पु.* १. शंकर. २. भृगूचा एक पुत्र.

वर्ग–*पु.* १. वर्ग; 'क्लास'. २. श्रेणी; दर्जा. ३. चौरस; वर्ग. 'स्क्वेअर'. –**पद**–*पु.* वर्गमूळ. –**पहेली**– *स्त्री.* शब्दकोडें; 'क्रॉसवर्ड पझल'. –**मूल**–*पु.* वर्गमूळ; 'स्क्वेअररूट'.

वर्ग़लाना–*क्रि. स.* बहकाविणें; भलत्या मार्गास नेणें; फूस देणें.

वर्जन–*पु.* १. मनाई. २. त्याग. ३. हिंसा. [थांबविणें.

वर्जना*–*क्रि. स.* मनाई करणें;

वर्जित–*वि.* वर्ज्य; वगळलेलें; 'एक्सेप्टेड'. [सराव.

वर्ज़िश– *स्त्री.* १. व्यायाम. २.

वर्ण–*पु.* १. रंग. २. सौंदर्य. ३. जाति. –**क्रम**– *पु.* वर्णपट; 'स्पेक्ट्रम'. –०**दर्शी**–*पु.* वर्णपटदर्शक; 'स्पेक्ट्रमस्कोप'. –**मापी**–*पु.* वर्णपटमापक; 'स्पेक्ट्रोमीटर'. –०**रेखा**– *स्त्री.* वर्णपटदर्शक-रेखा; 'स्पेक्ट्रल लाइन'. –०**लेखी**–*पु.* वर्णपट आलेख; 'स्पेक्ट्रोग्राफ'. –**पट**– *पु.* पा० 'वर्णक्रम'. –**मापक**–*पु.* वर्णमापक; 'क्रोमोमीटर'. –**विद्वेष**–*पु.* वर्णद्वेष; 'कलर प्रेज्युडिस'. –**विवृति**–*स्त्री.* वर्णविन्यास; 'स्पेलिंग'. –**संकर**–*पु.* दोन भिन्न जातींच्या मिश्रणानें उत्पन्न झालेली व्यक्ति अथवा जाति.

वर्णक–*पु.* १. मुखवटा; नटाचा पोषाख. २. रंग; रोगण; 'पिगमेंट.'

वर्णच्छटा–*स्त्री.* पा० 'वर्णक्रम'; 'स्पेक्ट्रम'.

वर्णन–*पु.* १. वर्णन; सांगणें. २. चित्रण. ३. प्रशंसा.

वर्णांध–*पु.* रंगांतील फरक ओळखतां न येणारा; 'कलर ब्लाइंड'.

वर्णानुक्रमसे–*अव्य.* वर्णानुक्रमें; विल्हेवारीनें; 'अल्फाबेटिकली'.

वर्णित–*वि.* १. वर्णिलेला. २. चित्रित. ३. प्रशंसिलेला.

वर्तन–*पु.* १. वर्तन; वागणूक. २. व्यवसाय. ३. वेतन. ४. वापर. ५. वक्रीभवन; 'रिफ्रॅक्शन'. ६. दलाली; 'कमिशन'. – **अभिकर्ता**–*पु.* दलाल; 'कमिशन एजंट'.

वर्तनांक–*पु.* सूची; निर्देशांक; 'इंडेक्स'. [शुद्धलेखन; 'स्पेलिंग'.

वर्तनी– *स्त्री.* वर्णविन्यास;

वर्तमान–*वि.* हल्लींचा; विद्यमान. –*पु.* १. वृत्तांत. २. वर्तमान काळ.

वर्ति– *स्त्री.* वात; 'विक'. –**ग्रह**–*पु.* ज्वालक; दग्धक; 'बर्नर'.

वर्दी– *स्त्री.* पा० 'वरदी'.

वर्द्धन–*वि.* वर्धक; वाढविणारा. –*पु.* वाढ; वृद्धि. ['ॲम्प्लीफायर'.

वर्धक–*पु.* वाढविणारा; वर्धक;

वर्म–*पु.* १. नाजुक स्थान. २. रक्षणस्थान; कवच.

वर्वर–*वि.* १. असभ्य; जंगली. २. कुरळे. –*पु.* १. असभ्य, जंगली माणूस. २. वर्वर देशाचा रहिवासी; कुरळ्या केसांचा माणूस.

वर्ष–*पु.* १. वर्ष. २. वर्षाव; वृष्टि. –**गाँठ**– *स्त्री.* वाढदिवस. –**बोध**–*पु.* वार्षिक माहिती-पुस्तक; 'ईयर बुक.' [पाऊस; वृष्टि.

वर्षा– *स्त्री.* १. पावसाळा. २.

वलय–*पु.* १. कांकण; बांगडी. २. वर्तुळ; मंडल. ३. रंगण; कडें; चक्र; 'रिंग'. [गोल; 'ॲन्युलर'.

वलयाकार–*वि.* मंडलाकार;

वलवला–*पु.* [*अ.*] १. कल्लोळ; आरडाओरड; २. आवेश; मनोवेग; वळवळ.

वली–*पु.* [*अ.*] १. स्वामी; मालक. २. संरक्षक; शासक; पालक. ३. साधु; फकीर. –**अल्लाह** –*पु.* ईश्वराचा लाडका. –**अहद**–*पु.* युवराज. [[*फा.*] परंतु; पण.

वले; वलेक; वलेकिन–*अव्य.*

वल्द–*पु.* [*अ.*] औरस पुत्र; मुलगा.

वल्दि(ल्दी)यत– *स्त्री.* [*अ.*] आईबापांचें नांवगांव; वंशपरिचय.

वल्मीक–*पु.* वारूळ.

वल्लाह–*अव्य.* [*अ.*] देवाची शपथ; खरोखर.

वश–*पु.* १. इच्छा. २. ताबा; अधिकार. ३. उपाय. ४. वश. ५. शक्ति; सामर्थ्य. –**वर्ती**–*वि.* ताब्यांतील. पा० 'बस'.

वश–*प्रत्य.* [*फा.*] समानतादर्शक प्रत्यय (उदा० परीवश= अप्सरेसारखा).

वशीभूत–*वि.* अधीन; पराधीन.

वसंत–*पु.* १. वसंत ऋतु. २. देवी (रोग). –**पंचमी**– *स्त्री.* माघ शुद्ध पंचमी.

वसअत– *स्त्री.* [*अ.*] १. विस्तार; लांबीरुंदी. २. सामर्थ्य. ३. सामावणी; गुंजाईस.

वसमा–*पु.* [*अ.*] निळीचीं पानें. हीं मेंदींत मिसळून केसांचा कलप तयार करतात. मु०–**करना** –केसांना कलप लावणें.

वसवास–*पु.* [*अ.*] १. संदेह; संशय; भ्रम. २. भीति. ३. टाळाटाळ.

वसवासी–*वि.* [*अ.*] १. डळमळीत विचार असलेला; शंकेखोर. २. संशयांत टाकणारा.

वसह*–*पु.* बैल; वसु.

वसा– *स्त्री.* चरबी, मेद; 'फॅट'. [माध्यम.

वसातत–*स्त्री.* [*अ.*] मध्यस्थी;

वसायल–*पु.* [*अ.* 'वसीला' चें अनेक०] १. मार्ग; साधनें. २. वशिले. ३. संबंध. [व्यापक.

वसीअ–*वि.* [*अ.*] विस्तृत;

वसीक़ा–*पु.* [अ] १. नातलगांना व्याज मिळावें यासाठीं सरकारांत ठेव म्हणून ठेवलेली रक्कम. २. करारपत्र; दस्तऐवज. –**सरकारी**–*पु.* सरकारी कर्जरोखा; 'गव्हर्नमेंट बाँड'.

वसीयत– *स्त्री.* [*अ.*] अंतसमयीं इस्टेटीची केलेली व्यवस्था; मृत्युपत्र. –**नामा**–*पु.* वारसापत्र (कायदेशीर शिक्कामोर्तब झालेलें); मृत्युपत्र.

वसीला–*पु.* [*अ.*] १. मार्ग; माध्यम. २. संबंध. ३. आश्रय; साहाय्य. ४. वशिला.

वसुंधरा; वसुधा– *स्त्री.* भूमि; पृथ्वी.

वसूक़– *पु.* [*अ.*] १. दृढता. २. विश्वास. ३. अध्यव्यवसाय.

वसूल– *वि.* [*अ.*] वसूल; प्राप्त. –*पु.* वसुली; प्राप्ति. १. –**याबी**– *स्त्री.* वसुली.

वसूली– *स्त्री.* [*अ.*] वसुली. –*वि.* वसूल होण्यासारखें; प्राप्तव्य.

वस्त– *पु.* [*अ.*] मधला भाग; मध्य. –*अव्य.* मध्यें; मधोमध.

वस्ती– *वि.* [*अ.*] मधला.

वस्तु– *स्त्री.* १. वस्तु; पदार्थ. २. सत्य. ३. कथानक. –**जगत्**–*पु.* दृश्य जगत्. –**प्रेषणादेश**– *पु.* माल पाठविण्यासाठीं देण्यांत आलेला लेखी आदेश; 'इनडेंट'.

वस्फ़– *पु.* [*अ.*] १. गुण; वैशिष्टय. २. प्रशंसा; स्तुति.

वस्ल– *पु.* [*अ.*] १. दोन वस्तूंचा मेळ; एकीकरण. २. मिलाप; संयोग; मीलन. ३. संभोग.

वस्ली– *स्त्री.* [*अ.*] पुस्तीचा अभ्यास करण्याची जोडपाटी. –*वि.* मीलनाचा; भेटणारा.

वह– सर्व तो; ती; तें.

वहदत– *स्त्री.* [*अ.*] एकत्व; एकेश्वरवाद; अद्वैतवाद. –(**ते**) **वुजूद**–*स्त्री.* सृष्टींतील साऱ्या वस्तू ब्रह्मापासून उत्पन्न झाल्या आहेत (सर्वं खल्विदं ब्रह्म) अशी श्रद्धा (सूफी).

वहदानि(नी)यत– *स्त्री.* [*अ.*] १. एकत्व; अद्वैत. २. अनुपमता.

वहदानी–*वि.* [*अ.*] अद्वैतवादी.

वहन– *पु.* १. वाहणें; घेणें; उचलणें. २. वाहाणें. ३. नाव; जहाज. ४. संनयन; 'कॉनव्हेक्शन'.

वहब– *स्त्री.* [*अ.*] १. देणगी; दान. २. उदारता. ३. ईश्वरी देणगी. [२. भाग्यानें दिलेला.

वहबी– *वि.* [*अ.*] १. दिलेला

वहम– *पु.* [*अ.*] १. वहीम; संशय; अंदेशा. २. गैरसमजूत;

लोकभ्रम. ३. बुचकळा. ४. शंका.

वहशत– *स्त्री.* [*अ.*] १. जंगलीपणा; असभ्यता. २. उद्धटपणा. ३. वेडेपणा. ४. अधीरता; चंचलता. ५. भीति; दहशत. **–अंगेज**– *वि.* भयानक; भीषण. **–ज़दा**–*वि.* १. भयभीत. २. वेडा. **–नाक**– *वि.* भीषण; भयंकर.

वहशियाना–*वि.* [*अ.*] जंगली; रानटी.

वहशी–*वि.* [*अ.*] १. जंगली; रानटी. २. पाळीव नसलेला. ३. असभ्य. [तेथें.

वहाँ– *अव्य.* त्या ठिकाणीं;

वहाबी– *पु.* [*अ.*] एक मुसलमानी संप्रदाय. मौलवी अब्दुल वहाब नजदी हे याचे संस्थापक होते म्हणून वहाबी असें नांव पडलें. या संप्रदायाचे लोक फक्त कुराणाला प्रमाण मानतात. हदीसांना मानीत नाहींत.

वहित्र–*पु.* आगबोट; जहाज.

वहीं–*अव्य.* तेथेंच; त्याच ठिकाणीं.

वही– *सर्व.* तोच. तीच; तेंच.

वही– *स्त्री.* [*अ.*] पैगंबराला मिळणारा ईश्वरी आदेश, संदेश.

वहीद– *स्त्री.* [*अ.*] निरुपम; अद्वितीय.

वहीम[+]– *वि.* १. वहिमी; संशयित. २. शंकेखोर; संशयी.

वहै[*]– सर्व. पा० 'वही'.

वह्नि–*पु.* आग; अग्नि.

वाँ[+]– *अव्य.* पा० 'वहाँ'

वांछनीय–*वि.* इष्ट; इच्छा करण्यास योग्य.

वांछा– *स्त्री.* इच्छा; अभिलाषा.

वांछित– *वि.* इच्छित; इच्छिलेलें; अभीष्ट.

वा–*अव्य.* अथवा.–*सर्व.*[*]'वह' (तो, ती, तें) चें विकृत रूप.

वा– *वि.* [*फा.*] उघडा; उघडलेला.

वाइ[*]– *सर्व.* त्याला; तिला.

वाइज़–*वि. पु.* [*अ.*] १. धर्मोपदेशक. २. शिकवण देणारा.

वाउचर– *पु.* [*इं.*] खर्चाचा तपशील असणारी, पैसे मिळाल्याची पावती; 'व्हाउचर'.

वाक़ई–*वि.* [*अ.*] वास्तविक; खरोखर.–*अव्य.* खरोखरींच.

वाक़फ़ीयत– स्त्री. [*अ.*] १. माहिती; ज्ञान. २. ओळखपाळख.

वाक़या–*पु.* [*अ.*] १. घटना; घडलेली गोष्ट. २. वृत्तांत. ३. समाचार. ४. बातमी. [–अनेक० **वाक़यात**]. **–नवीस**; **–निगार**–*पु.* वृत्तलेखक; बातम्या लिहिणारा.

वाक़ा– *वि.* [*अ.*] १. स्थित; उभा असलेला. २. होणारा; घडणारा. ['वाक़या'; 'वाक़यात'.

वाक़ि(क़े)आ; वाक़िआत– पा०

वाक़िफ़–*वि.* [*अ.*] १. जाणणारा; माहिती असलेला. २. अनुभवी. ३. परिचित.– **कार**–*वि.* वाकबगार; माहितगार; अनुभवी. **–कारी**– *स्त्री.* परिचय; माहिती.

वाक़िफ़ीयत– *स्त्री.* [*अ.*] परिचय; माहिती; अभिज्ञता. [बावची.

वाकुची– *स्त्री.* एक औषधी;

वाक़े; वाक़ेअ–*वि.* [*अ.*] १. असणारा; होणारा. २. वास्तविक. **सु०– होना**–घडणें; होणें.

वाक्–*पु.* १. वाचा; वाणी. २. जीभ. ३. सरस्वती; शारदा.–**पाटव** –*पु.* भाषणपटुता.

वाक्य–*पु.* वाक्य; वचन.

वागुरा– *स्त्री.* हरीण पकडण्याचें जाळें; फांस.

वागुरिक–*पु.* पारधी.

वागुलि[+]–*पु.* विडयाचा डबा.

वाग्जाल– *पु.* शब्द–पांडित्य; बडबड; वटवट; चर्पटपंजरी; 'सर्कमलोक्यूशन'.

वाग्दत्त–*वि.* १. वाणीनें दिलेला; २. देण्याची बोली केलेला; ३. ठरलेला.

वाग्मी–*पु.* १. वाचाळ; बडबडया. २. उत्तम वक्ता; पंडित; 'ओरेटर'.

वाचक–*वि.* सूचक; वाचक. –*पु.* १. वाचणारा. २. बोलणारा; म्हणणारा; सांगणारा.

वाचन–*पु.* वाचन; 'रीडिंग'.

वाचा– *स्त्री.* वाणी; शब्द; वचन. **–पत्र**–*पु.* प्रतिज्ञापत्र. –**बंध**[*]–*वि.* प्रतिज्ञाबद्ध.

वाचाट–ल–*वि.* १. खूप बोलणारा; बडबडया. २. घमेंडखोर.

वाज़–*पु.* [*अ.*] १. उपदेश. २. शिकवण. ३. धार्मिक उपदेश.

वाजह–*वि.* पा० 'वाज़ेह'.

वाजिब–*वि.* [*अ.*] १. उचित; योग्य; ठीक. २. आवश्यक; अनिवार्य; कर्तव्य. –*पु.* १. पगार. २. येणें (ऋण). [–अनेक० **वाजिबात**].

वाजिबी–*वि.* [*अ.*] १. योग्य; वाजवी. २. आवश्यक.

वाजिबुल अदा–*वि.* [*अ.*] जें दिलें पाहिजे असें; देय.

वाज़िह–*वि.* पा० 'वाज़ेह'.

वाज़े; वाज़ेअ–*वि. पु.* [*अ.*] व्यक्त; प्रकट करणारा.

वाज़ेह–*वि.* [*अ.*] १. प्रकट; जाहिर. २. स्पष्ट. ३. विस्तृत; सविस्तर. सु०–**रहे**; **–हो**–कळूं द्या; माहीत असूं द्या.

वाणिज्य–*पु.* व्यापार; 'कॉमर्स'. **–दूत**–*पु.* परदेशांतील व्यापारी प्रतिनिधि; 'कौन्सल'.

वाणिज्यालय–*पु.* बाजार; मोठें दुकान; 'एंपोरियम'.

वाणी– *स्त्री.* १. वाचा, वाणी; २. सरस्वती. [वात (रोग).

वात–*पु.* १. वारा; हवा. २.

वातायन–*पु.* खिडकी; झरोका.

वातावरण–*पु.* १. पृथ्वीच्या सभोंवतालचा वायु. २. वातावरण; स्थिति. [फेंफरें; 'हिस्टीरिया'.

वातोन्माद–*पु.* गर्भाशयोन्माद;

वात्याचक्र–*पु.* वावटळ.

वाद–*पु.* १. वादविवाद; चर्चा. २. झगडा; भांडण.–**पत्र**–*पु.* लेखी तक्रार; फिर्याद 'प्लेट'.–**पद**–*पु.* वादाचा मुद्दा; 'इशू'.–**मूल**–*पु.* दाव्याचें किंवा फिर्यादीचें मूळ कारण; भांडणाचें मूळ; 'कॉज ऑफ ॲक्शन'.–**विषय**–*पु.* वादाचा किंवा चर्चेचा मुद्दा; 'मॅटर फॉर डिस्कशन'; 'सब्जेक्ट मॅटर'.–**व्यय**–*पु.* दाव्याचा खर्च; 'कॉस्ट्स'. –**समाप्ति**– *स्त्री.* दावा निकालांत निघणें; 'ॲबेटमेंट ऑफ सूट'.–**हेतु**–*पु.* वादाचा विषय; दाव्याचा मुद्दा; 'इशू'.

वादक–*पु.* १. बोलणारा; शास्त्रार्थ, चर्चा करणारा. २. वाजविणारा.–**दल**; –**वृंद**–*पु.* वाद्यवृंद; 'ऑर्केस्ट्रा'.

वादा–*पु.*[*अ.*] वायदा; करार; वचन; प्रतिज्ञा. –**खिलाफ़ी**– *स्त्री.* वचनभंग; वायदा मोडणें; दिलेला शब्द न पाळणें. –**फ़रामोश**–*वि.* दिलेलें वचन विसरणारा.–**शिकनी**– *स्त्री.* वचनभंग.

वादित्र–*पु.* बाजा (वाद्य).

वादी–*पु.* १. बोलणारा; वक्ता. २. फिर्याद करणारा; वादी.

वादी– *स्त्री.* [*अ.*] १. घाट (डोंगरांतील). २. डोंगराजवळील उतरती जमीन. ३. वन; जंगल. ४. दरी.

वाद्य–*पु.* वाद्य. –**निर्घोष**–*पु.* वाद्याचा स्वर, आवाज.–**संगीत**–*पु.* वाद्यसंगीत; 'इन्स्ट्रुमेंटल म्यूझिक'. –**स्थान**–*पु.* वादकांची बसण्याची जागा; 'ऑर्केस्ट्रा'.

वाधा– *स्त्री.* १. त्रास; पीडा. २. मनाई; अडथळा.

वानर–*पु.* वानर.

वानस्पतिक खाद– *स्त्री.* शेण, पालापाचोळा इ. च्या मिश्रणानें बनविलेलें खत; 'कंपोस्ट'.

वापस–*वि.* [*फ़ा.*] १. परत आलेला. २. परत झालेला, केलेला. [शेवटचा.

वापसी–*वि.* [*फ़ा.*] अखेरचा;

वापसी– *स्त्री.* [*फ़ा.*] परतणी; परती; परत येणें. –*वि.* परतीचा.

वाबस्तगी– *स्त्री.* [*फ़ा.*] संबंध; संपर्क. [जोडलेला.

वाबस्ता–*वि.* [*फ़ा.*] संबद्ध;

वाम–*वि.* १. डावा. २. विरुद्ध. ३. वाईट; कुटिल.–**पंथी**; –**पक्षी**–*पु.* डाव्या गटाचा अनुयायी; 'लेफ्टिस्ट.'. –**हस्तिक**–*वि.* डावखुरा; 'लेफ्टहॅंडर'.

वाम–*पु.* [*फ़ा.*] कर्ज.

वामा– *स्त्री.* १. स्त्री. २. दुर्गा.

वामावर्त–*वि.* डाव्या बाजूनें, घडयाळांतील कांटयांच्या उलट दिशेनें फिरणारा; 'ॲंटी क्लॉकवाइज.' –*पु.* डावीकडे वळण असलेला शंख. [प्रेमी.

वामिक़–*पु.* [*अ.*] १. मित्र. २.

वाय*– *स्त्री.* वायु; वात. –*सर्व.* त्याला. [अरेरे !

वाय–*अव्य.* [*अ.*] हाय;

वायु– *स्त्री.* १. हवा. २. वारें. ३. श्वास; प्राणवायु. ४. वात (रोग). –**कोण**–*पु.* वायव्य दिशा –**दाबमापी**–*पु.* वायुभारमापक; 'बॅरोमीटर'. –**दाबलेखी**–*पु.* वायुभार-आलेख-यंत्र; 'बॅरोग्राफ'. –**पति**–*पु.* विमानदळांतील एक अधिकारी; 'एअर व्हाइस मार्शल'. –**पथ**; –**मार्ग**–*पु.* विमानमार्ग अंतरिक्षमार्ग; 'एअरवेज'. –**परागित** –*पु.* वातपरागित; 'ऍनिमॉफिलस'. –**भारमापकयंत्र**–*पु.* वायुभारमापक यंत्र; 'बॅरोमीटर'.–**भारलेखी**–*पु.* वायुभारआलेखयंत्र; 'बॅरोग्राफ'. –**मंडल**–*पु.* वातावरण; 'ॲटमॉसफिअर'. –**मापक**–*पु.* वायुमापक यंत्र; 'यूडिओमीटर'. –**यान**–*पु.* विमान; 'एअरशिप'.

वार–*पु.* १. दिवस. २. पाळी. ३. द्वार. ४. उशीर. ५. आघात; आक्रमण; वार. ६. ऐलतीर.–**तिय*** – *स्त्री.* वेश्या. –**पार**–*पु.* १. आरपार. २. नदी वगैरेचीं दोन्ही टोकें. –*अव्य.* या तीरापासून त्या तीरापर्यंत; या टोंकापासून त्या टोंकापर्यंत. [गिरी; 'प्रिकॉशन'.

वारणक–*पु.* खबरदारी; सावध-

वारणिक–*वि.* सावधगिरीचें; खबरदारीचें; 'प्रिकॉशनरी'.

वारणी– *स्त्री.* खटल्याची तहकुबी; 'कॅव्हिॲट'.

वारद*–*पु.* मेघ; ढग.

वारदात– *स्त्री.* [*अ.*] १. घटना. २. मारामारी; दंगा; ३. भीषण घटना; अपघात. ४. भानगड.

वारना–*क्रि. स.* १. स्वतःस ओवाळून टाकणें; कुरवंडी करणें. २. त्याग करणें. –*पु.* कुरवंडी; त्याग. **मु० वारने, वारी जाना**– स्वतःस ओवाळून टाकणें.

वारफेर–*पु.* १. ओवाळून टाकलेली वस्तु; बळी. २. नवरा-

नवरीवरून ओवाळून टाकलेले पैसे.

वारफ़्ता–*वि.* [*फा.*] आत्मविस्मृत; स्वतःला विसरलेला.

वारा–*पु.* १. बचत; काटकसर. २. फायदा. ३. ऐलतीर. –*वि.* १. ओवाळून टाकलेला. २. स्वस्त; निकृष्ट. –**न्यारा**–*पु.* १. निकाल; निर्णय. २. शेवट (तंटाबखेड्याचा). [बनारस.

वाराणसी– *स्त्री.* काशी;

वारि–*पु.* पाणी. – *स्त्री.* १. सरस्वती. २. वाणी. ३. कुरवंडी; ओवाळून टाकणें.

वारित साहित्य–*पु.* आक्षिप्त, बेकायदा वाङ्मय; 'प्रोस्क्राइब्ड लिटरेचर'.

वारिद–*वि.* [*अ.*] येणारा; आलेला. –*पु.* १. अतिथि; पाहुणा. २. पत्रवाहक; दूत.

वारिदात– *स्त्री.* [*अ.* 'वारिद 'चें अनेक०] १. घटना. २. अपघात; दुर्घटना. ३. चोरी, दरवडा इ. गुन्हा.

वारिधि–*पु.* समुद्र; सागर.

वारियाँ – *स्त्री.* १. बळी; कुरवंडी. २. त्याग.

वारिस–*पु.* [*अ.*] वारस; परंपरागत हक्कदार; उत्तराधिकारी.

वारी– *स्त्री.* पा० 'वारना'; 'वारि'. [टाकणें.

वारीफेरी– *स्त्री.* ओवाळून

वारुणी–*स्त्री.* मद्य; दारू.

वार्ता; **वार्त्ता**– *स्त्री.* १. गप्पा; बोलणें; संभाषण; बातचीत. २. बातमी. ३. अफवा. ४. हकीगत. –**कार**–*पु.* वाटाघाटी करणारा; मध्यस्थ; 'निगोशिएटर'. –**वहन मंत्री**–*पु.* टपाल खात्याचा मंत्री; 'मिनिस्टर ऑफ कम्युनिकेशन्स'.

वार्तालाप–*पु.* संभाषण; गप्पागोष्टी.

वार्द्धक्य–*पु.* म्हातारपण; वृद्धत्व.

वार्षिक–*वि.* वार्षिक; 'ॲन्युअल'.–**वित्तविवरण**–*पु.* वर्षातील आर्थिक स्थितीचा अहवाल; 'ॲन्युअल फायनॅन्शियल स्टेटमेंट'.

वार्षिकी– *स्त्री.* वार्षिक अनुदान; सालीना तनखा; 'ॲन्युइटीज'.

वालंटियर–*पु.* [*इं.*] स्वयंसेवक.

वाला–*प्रत्य.* [*फा.*] संबंधसूचक प्रत्यय. (उदा० मकानवाला) –*वि.* उच्च; थोर; श्रेष्ठ.

वालिद–*पु.* [*अ.*] पिता; वडील. –**(दे) माजिद**–*पु.* पूज्य पिता.

वालिदा– *स्त्री.* [*अ.*] माता; आई. [आईबाप.

वालिदैन–*पु.* अनेक० [*अ.*]

वाली–*पु.* [*अ.*] १. मालक. २. शासक; राजा. ३. संरक्षक; साहाय्यक. [नमस्कार; नमस्ते.

वालैकुम अस्सलाम– *स्त्री.* [*अ.*]

वाल्हा*–*पु.* प्रियकर.

वावैला–*पु.* [*अ.*] १. विलाप. २. शोक. ३. आरडाओरड; कोलाहल (मचाना).

वाशुद– *स्त्री.* [*फा.*] प्रफुल्लता.

वाष्प–*पु.* १. वाफ. २. अश्रु. –**तापन**–*पु.* पा० 'प्रस्वेदन'.–**शील** –*वि.* वाफेप्रमाणें लौकर उडून जाणारा; क्षणभंगुर; 'व्होलॅटाइल'.

वाष्पायन–*पु.* बाष्पीकरण; 'व्हेपरायझेशन'.

वाष्पित्र–*पु.* 'बॉयलर'.

वाष्पीकरण–*पु.* बाष्पीभवन; 'इव्हॅपोरेशन'.

वास–*पु.* १. निवास; राहाणें. २. स्थान; घर. ३. सुगंध.–**गृह**–*पु.* अंतःपुर.–**व्यवस्था**– *स्त्री.* राहाण्याउतरण्याची सोय; 'ॲकोमोडेशन'.

वासक–*पु.* १. वस्त्र. २. गंध; वास. ३. शयनागार.–**सज्जा**; –**सज्जिका**– *स्त्री.* शृंगार करून नायकाची प्रतीक्षा करणारी नायिका. ['बासा.'

वासा– *स्त्री.* अडुळसा.–*पु.* पा०

वासिक़–*वि.* [*अ.*] पक्का; दृढ.

वासिल–*वि.* [*अ.*] १. वसूल झालेला. २. मिळालेला. ३. पोहोंचलेला.–**बाक़ी** *स्त्री.* वसूल झालेली व बाकी उरलेली रक्कम; अशा रकमांचा हिशेब.

वासिलात– *स्त्री.* [*अ.*] १. वसुली. २. वसूल झालेल्या रकमांची बेरीज.

वासोख़्त–*पु.* [*फा.*] उर्दू काव्याचा एक प्रकार. याचीं कडवीं सहा चरणांचीं असतात. यांत प्रेयसीच्या वागणुकीबद्दल नाराज होऊन तिचा व तिच्या प्रीतीचा त्याग करण्याचें वर्णन असतें.

वासोख़्ता–*वि.* [*फा.*] पोळलेला; होरपळलेला.

वास्कट– *स्त्री.* *पु.* [*इं.*] बंडी; जाकीट; 'वेस्ट कोट'.

वास्तव–*वि.* वास्तविक; यथार्थ. –**में**–*अव्य.* वस्तुतः; खरोखरीं.

वास्तविक–*वि.* खरें; योग्य; बरोबर.–**आँकड़े**–*पु.* खरे आंकडे; खऱ्या संख्या; 'ॲक्चुअल्स'.

वास्ता–*पु.* [*अ.*] १. संबंध. २. माध्यम. ३. मध्यस्थ. **मु०–देना** –१. मध्यें घालणें. २. धांवा करणें.

वास्तु–*पु.* घर; भवन.–**कर्मकार**; –**कर्मज्ञ**–*पु.* इमारतशास्त्र जाणणारा; 'आर्किटेक्ट'.–**विद्या** –*स्त्री.* शिल्पशास्त्र; 'आर्किटेक्चर'.

वास्ते–*अव्य.* [*अ.*] करितां; साठीं.

वाह–*अव्य.* [*फा.*] वाहवा; शाबास.–**वाही**– *स्त्री.* वाहवा;

स्तुति; प्रशंसा; तारीफ.

वाहक–पु. वाहून नेणारा; वाहक; 'कॅरियर'.–**धनादेश**–पु. शहाजोग चेक; 'बेअरर चेक'.–**नलिका**–स्त्री. जोडणारी नळी; 'जॉइनिंग ट्यूब'.

वाहिद–वि. [अ.] १. एक. २. एकटा. ३. एकवचन.

वाहिनी–स्त्री. १. सैन्य. २. सैन्याचा एक विभाग; 'ब्रिगेड'.–**पति**–पु. सेनानायक; 'ब्रिगेडियर'.

वाहिब–वि. [अ.] १. दाता; देणारा. २. क्षमा करणारा.

वाहियात–वि. [अ. + फा.] १. वाह्यात; व्यर्थ. २. फाजील. ३. वाईट.

वाही–वि. [अ.] १. आळशी; सुस्त. २. कुचकामाचा. ३. मूर्ख. ४. उडाणटप्पू.–**तबाही**–स्त्री. [अ. + फा.] वाह्यात गोष्टी; फाजील गोष्टी.

विंदु–पु. १. विंदु; 'पॉइंट'. २. थेंब. ३. अनुस्वाराचें चिह्न. ४. शून्य.–**पातक**–पु. थेंब टाकावयाची नळी; 'ड्रॉपर'.

विंध*–पु. विंध्याचल.

विकच–वि. उमललेलें; फुललेलें.

विकट–वि. १. भयंकर. २. अवघड. ३. विकृत.

विकरार*–ल–वि. विकाळ; भयानक. [कृति; 'डायगोनल'.

विकर्ण–पु. कर्णरेषा;–वि. कर्णा-

विकल–वि. १. भ्यालेला; व्याकुळ; बेचैन. २. अपूर्ण. ३. खंडित. ४. कलाहीन. ['डेबिट'.

विकलन–पु. नांवें, खर्चीं टाकणें;

विकलांग–वि. थोटा; अंगहीन; अवयव खंडित झालेला. [होणें.

विकलाना*–क्रि. अ. व्याकुळ

विकलीकृत–वि. अक्षम; विकलांग झालेला; 'डिसएबल्ड'.

विकल्प–पु. १. विभिन्नता. २. उपाय. ३. अनिश्चय. ४. पर्याय; 'आल्टरनेटिव्ह'. [फुलणें.

विकसना–क्रि. अ. उमलणें;

विकाल–पु. १. संध्याकाळ. २. अवेळ; अतिकाल.

विकास–पु. १. वाढ; उमलणें; उन्नति. २. उत्क्रांति; 'इव्होल्यूशन'.–**कुंतल**–पु. जननात्मक सर्पिल तंतु; 'जेनेटिक स्पायरल'.

विकिरण–पु. १. किरण-विसर्जन; 'रेडिएशन'. २. पांगापांग; 'डिस्पर्सल'.

विकीर्ण–वि. १. पसरलेला; विखुरलेला. २. किरण-विसर्जक; 'रेडिअंट'.

विकृत–वि. विघडलेलें; खराब.–**टंक**–पु. झिजकें नाणें; 'डिफेस्ड कॉइन'.

विकेंद्रीकरण; विकेंद्रीयकरण–पु. विकेंद्रीकरण; 'डीसेंट्रलायझेशन'.

विक्रय–पु. विक्री.–**धन**–पु. व्यापारी उलाढाल; 'टर्नओव्हर'.–**पंजी**–स्त्री. विक्रीपुस्तक; विक्रीकीर्द; 'सेल्सजर्नल'.–**पत्र**–पु. रोखीची पावती; 'कॅशमेमो'.–**प्रपंजी**–स्त्री. विक्रीवही; विक्रीची खतावणी; 'सेलसलेजर'.–**लेख**–पु. विक्री खत; 'सेलडीड'.

विक्रयिक–पु. विक्रेता; 'सेल्समन'.

विक्रांत–वि. १. साहसी; वीर. २. विजयी.–पु. १. योद्धा. २. सिंह.

विक्षिप्त–वि. १. फेंकलेला; विखुरलेला. २. वेडा. ३. व्यग्र.

विक्षिप्तालय–पु. वेड्यांचें इस्पितळ; 'लुनॅटिक असायलम'.

विक्षोभ–पु. क्षोभ; उद्विग्नता; चांचल्य.

विखंडन–पु. पा० 'उत्सादन'.

विखंडीकरण–पु. तुकडे करणें; 'फ्रॅग्मेंटेशन'.

विख*–पु. विष.

विखान*–पु. शिंग; विषाण.

विखायँध–स्त्री. विषासारखा कडू वास.

विख्यापन–पु. १. प्रसिद्ध करणें. २. घोषणा करणें. ३. व्याख्या करणें. ४. स्वीकार, मान्य करणें.

विगत–वि. गेलेला; मागील.

विगदित–वि. जगजाहीर; पसरलेला.

विगोना*–क्रि. स. लपविणें.

विग्यान–पु. विज्ञान; शास्त्र.

विग्रह–पु. १. फोड; वेगळें करणें. २. रूप; मूर्ति; शरीर ३. कलह; युद्ध.

विघटन–पु. १. विघटन; 'डीसोल्यूशन'. २. पृथक्करण; नाश; 'डीकॉम्पोझिशन'. [अडचण.

विघन*–पु. विघ्न; संकट;

विचरण–पु. भ्रमण; संचार; पर्यटन. [भ्रमण करणें.

विचरना–क्रि. अ. फिरणें;

विचरनि*–स्त्री. विचरण; भ्रमण; संचार.

विचलन–पु. १. भ्रमण. २. अस्थिरता; मार्गच्युति; 'डीव्हिएशन'.

विचलाना*–क्रि. स. विचलित करणें; गोंधळून टाकणें.

विचार–पु. १. विचार. २. न्याय. ३. वादविवाद.–**गोष्ठी**–स्त्री. परिसंवाद; 'सेमिनार'.–**धारा**–स्त्री. विचारसरणी; 'आयडियॉलॉजी'.

विचारक–पु. १. विचारी; विचार करणारा. २. न्याय देणारा; न्यायाधीश; 'जज'.

विचारण–पु. १. विचार करण्याची क्रिया. २. खटला; 'ट्रायल'.

विचारना–*क्रि. स.* १. विचार करणें. २. विचारणें. ३. पत्ता लावणें; शोधणें.

विचित्र–*वि.* १. रंगीबेरंगी. २. विलक्षण.

विचुंबकन–*पु.* चुंबकत्व नाहींसें करणें; 'डीमॅग्नेटाइझ'.

विच्छेद–*पु.* १. भंग; कापून वेगळें करणें. २. वियोग. ३. नाश.

विछलना*–*क्रि. अ.* १. घसरणें. २. स्थानभ्रष्ट होणें. [विरही.

विछोई* – *वि. पु.* वियोगी;

विछोह*–*पु.* वियोग विरह.

विजन–*वि.* निर्जन; एकांत.–*पु.* पंखा.

विजना*–*पु.* पंखा.

विजय–*स्त्री.* जय.–**चिह्न; विजयास्त्र** – *पु.* विजय विय मिळवून देणारें साधन; हुकुमाचें पान; 'ट्रंपकार्ड'.

विजया–*स्त्री.* १. दुर्गा. २. भांग.

विजयोपहार – *पु.* विजयाची ढाल; 'ट्रॉफी'.

विजारत–*स्त्री.* [*अ.*] १. मंत्रिपद. २. मंत्रिमंडळ. [बाळगणारा.

विजिगीषु–*वि.* विजयाची इच्छा

विजेता–*पु.* १. जेता; विजयी. २. शूर; पराक्रमी.

विजै*–*स्त्री.* विजय.

विजोग*–*पु.* वियोग.

विजोर[+]–दुर्बळ; कमजोर.

विज्जुलता*– *स्त्री.* वीज.

विज्ञ – *वि.* १. जाणकार. २. विद्वान्.

विज्ञप्ति–*स्त्री.* १. जाहिरात. २. पूर्वसूचना; निवेदन; विनंती.– ३. सरकारी जाहीर पत्रक; 'कम्यूनिके'. [शास्त्रज्ञ.

विज्ञान – *पु.* शास्त्र.–**वेत्ता**–*पु.*

विज्ञापन–*पु.* १. जाहिरात. २. विनंती.–**दाता**–*पु.* जाहिरातदार; 'अॅडव्हर्टायझर'.–**बाजी**–*स्त्री.* जाहिरातबाजी. [धूर्त; स्वार्थी. ३. वैश्य.

विट–*पु.* १. लंपट; कामुक. २.

विटप–*पु.* १. नवी फांदी. २. झाड. [दुर्दशा.

विडंबना–*स्त्री.* १. विडंबन. २.

विडरना*–*क्रि. अ.* १. फैलणें; विखुरणें. २. पळून जाणें.

विडारना–*क्रि. स.* १. विखुरणें; पसरणें. २. पळविणें. ३. पाठलाग करणें.

विडाल–*पु.* बोका; मांजर.

वितंडा–*स्त्री.* वितंडवाद; झगडा. –**वाद**–*पु.* वितंडवाद.

वितताना* – *क्रि. अ.* अधीर, व्याकुळ होणें.

वितपन्न*–१. व्युत्पन्न; प्रवीण. २. व्याकुळ; घाबरलेला.

वितरण–*पु.* १. वांटप; २. दान. – **गाडी** – *स्त्री.* बटवडा करणारे वाहन; 'डिलिव्हरी व्हॅन'.–**सेवा**–*स्त्री.* बटवड्याचें कार्य; 'डिलिव्हरी सर्व्हिस'.

वितरना*–*क्रि. स.* वांटणें.

वितरेक* – *अव्य.* व्यतिरिक्त; खेरीज.

वितस्ता–*स्त्री.* झेलम नदी.

विताडित–*वि.* ताडन करण्यांत आलेला; बडविण्यांत आलेला.

वितान–*पु.* १. मंडप. २. विस्तार.

वितानना*–*क्रि. स.* १. शामियाना, तंबू इ० ताणणें. २. धनुष्य सज्ज करणें.

वितान्य–*वि.* वाढवितां, ताणतां येणारा; 'एक्स्टेन्सिबल'.

वित्त–*पु.* १. पैसा; संपत्ति. २. अधिकार; सामर्थ्य. ३. अर्थव्यवस्था; 'फायनॅन्स'.–**प्रबंधक**–*पु.* सरकारी प्राप्तीची किंवा धनाची व्यवस्था करणारा अधिकारी; 'फायनॅन्शियर'.–**मंत्री**–*पु.* अर्थमंत्री; 'फायनॅन्स मिनिस्टर'.–**विधेयक**–*पु.* अर्थविधेयक; 'फायनॅन्स बिल'.– –**साधन** – *पु.* सरकारी किंवा संस्थांचीं द्रव्यप्राप्तीचीं साधनें, 'फायनान्सेस'.

वित्तीय–*वि.* आर्थिक.

विथकना*–*क्रि. अ.* १. थकणें; गळून जाणें. २. आश्चर्यानें थक्क होणें. [लेला. २. चकित.

विथकित*–*वि.* थकला भाग-

विथराना; विथारना*–*क्रि. स.* १. पसरणें. २. विखुरणें.

विथा*– *स्त्री.* १. व्यथा. २. दुःख. ३. रोग. [कष्टी.

विथित*–*वि.* व्यथित; दुःखी;

विदग्ध–*पु.* १. चतुर; रसिक; विद्वान्. २. पचलेलें. ३. शिजलेलें. ४. सुंदर.

विदरना*–*क्रि. अ.* १. फाटणें. २. विदीर्ण होणें.–*क्रि. स.* फाडणें.

विदलना*–*क्रि. स.* दलित, नष्ट करणें.

विदा–*स्त्री.* [*अ.* 'विदाअ'] १. पाठवणी; रवानगी. २. प्रस्थान. ३. निरोप; जातांना घेतात ती अनुमति.

विदाई–*स्त्री.* १. प्रस्थान. २. जाण्याची परवानगी; निरोप. ३. बिदागी (धन). ['स्प्लिट'.

विदारण–*पु.* फाडणें; चिरणें;

विदारना*–*क्रि. स.* फाडणें.

विदित–*वि.* ज्ञात; माहीत.

विदुषी–*स्त्री.* पंडित, विद्वान् स्त्री.

विदेश–*पु.* परदेश.

विदेशी–*वि.* परदेशी; परकीय; परका.

विद्ध–*वि.* घायाळ; जखमी.

विद्या-परिषद्–*स्त्री.* विद्वन्मंडळ; पंडितसभा; 'अकादेमी'.

विद्यार्थि–र्थी–*पु.* विद्यार्थी; शिकणारा.

विद्युज्जनित्र–*पु.* वीज निर्माण करणारें यंत्र; 'इलेक्ट्रिक जनरेटर'. ['इलेक्ट्रिफिकेशन'.

विद्युतन–*पु.* विद्युतीकरण;

विद्युत्–*स्त्री.* वीज.–**ग्राहक**–*पु.* 'एरियल'.–**चुंबक**–*पु.* विद्युत्–चुंबक; 'इलेक्ट्रोमॅग्नेट'.–**दर्शी**–*पु.* विद्युत्–दर्शक; 'इलेक्ट्रोस्कोप'. –**प्रेषित्र**–*पु.* विद्युत्-प्रेषक यंत्र; 'इलेक्ट्रिक ट्रान्समिटर'.–**बॅटरी**–*स्त्री.* 'इलेक्ट्रिक बॅटरी'.–**विश्लेषण**–*पु.* विद्युद्विश्लेषण; 'इलेक्ट्रोलिसिस'.

विद्युदणु–*पु.* ऋणविद्युदणु; धनविद्युदणु; 'इलेक्ट्रॉन'; 'प्रोटॉन'.

विद्युद्घात–*पु.* 'इलेक्ट्रोक्यूशन'.

विद्युद्दर्शक यंत्र–*पु.* 'इलेक्ट्रोस्कोप'.

विद्युद्धर–'इलेक्ट्रोफोरस'.

विद्युद्धारक–*पु.* 'लाइटनिंग अरेस्टर'.

विद्युन्मापक; विद्युन्मापी–*पु.* विद्युत्मापक; 'इलेक्ट्रोमीटर'.

विद्युल्लेपन–*पु.* विजेच्या साह्यानें केलेला मुलामा; 'इलेक्ट्रोप्लेटिंग'.

विद्रोह–*पु.* १. बंड २. क्रांति.

विद्रोही–*वि.* १. बंडखोर. २. क्रांतिकारक. ['अकादेमी'.

विद्वत् परिषद्–*स्त्री.* विद्वन्मंडळ;

विधना–*स्त्री.* भवितव्यता; अदृष्ट.–*पु.** १. विधाता. २. ब्रह्मदेव.–*क्रि. स.* १. अडकविणें. २. भोंक पाडणें. ३. मिळविणें.–*क्रि. अ.* १. वेधलें जाणें; भोंक पडणें. २. अडकणें. [–*वि.* उध्वस्त; नष्ट.

विधंस*–*पु.* विध्वंस; नाश.

विधंसना*–*क्रि. स.* उध्वस्त, नष्ट करणें. [नष्ट करणें.

विधाँसना*–*क्रि. स.* उध्वस्त,

विधा–*स्त्री.* १. विभाग. २ प्रकार. [जननी. ३. व्यवस्थापिका.

विधात्री–*स्त्री.* १. निर्मात्री. २.

विधान–*पु.* १. योजना; कार्यक्रम. २. व्यवस्था. ३. प्रणाली. ४. राज्यघटना. ५. रचना; निर्मिति. ६. उपाय; युक्ति. ७. आज्ञा करणें. ८. विवान; कायदेकानू; 'लेजिस्लेशन'.–**परिषद्**–*स्त्री.* विधान-परिषद्; 'लेजिस्लेटिव्ह कौन्सिल'. –**मंडल**–*पु.* कायदेमंडळ; 'लेजिस्लेचर'.–**लेखक**–*पु.* घटनापंडित. –**सभा**–*स्त्री.* विधान-सभा; कायदेमंडळ; 'लेजिस्लेटिव्ह असेंब्ली'.

विधायक–*पु.* १. संस्थापक. २. आमदार; 'लेजिस्लेटर'.–*वि.* १. कार्य करणारा. २. रचनात्मक.

विधायन–*पु.* कायदे करणें; 'लेजिस्लेशन'.

विधायी–*वि.* १. निर्माण करणारा. २. निर्णय देणारा.–*पु.* निर्माता.–**कार्य**–*पु.* कायदे करण्याचें काम; 'लेजिस्लेटिव्ह बिझनेस'.

विधारण–*पु.* १. थांबविणें. २. सांभाळणें. ३. पूर्वग्रह.

विधि–*स्त्री.* १.विधि. २.कायदा; 'लॉ'. ३. रीत; 'मेथड'.–**ग्राह्य मुद्रा**–*स्त्री.* 'लीगल टेंडर मनी'.–**ज्ञ**–*पु.* कायदेपंडित; वकील; 'लॉयर'.–०**परिषद्**–*स्त्री.* 'बार कौन्सिल'.–०**वर्ग**–*पु.* वकीलवर्ग; 'बार'.–**परामर्शी**–*पु.* सरकारचा कायदेविषयक सल्लागार; 'लीगल रिमेम्ब्रन्सर'.–**पालक**–*वि.* कायदा पाळणारा; 'लॉ अबायडिंग'.–**भंग**–*पु.* कायदेभंग; 'ब्रीच ऑफ लॉ'.–**वक्ता**–*पु.*विधिविशारद; 'बॅरिस्टर'. –**वत्**–*अव्य.* नियमानुसार; पद्धतशीरपणें.-**विज्ञान**; –**शास्त्र**–*पु.* कायदेशास्त्र; 'ज्यूरिसप्रूडन्स'.–**सचिव**–*पु.* कायदेविषयक चिटणीस; 'लीगल सेक्रेटरी'.–**स्नातक**–*पु.* कायदा या विषयाचा पदवीधर; 'बॅचलर ऑफ लॉज'. **गतिविधि**–*स्त्री.* हालचाल; कार्य; वागणूक. **मु०**–**बैठना**–१. मेळ बसणें. २. इच्छेप्रमाणें कार्य होणें.

विधि–*पु.* ब्रह्मा; विधाता. –**रानी**; – **वधू**–*स्त्री.* ब्रह्मदेवाची पत्नी; सरस्वती.

विधिक–*वि.* कायदाविषयक; कायदेशीर; 'लीगल'.

विधु–*पु.* चंद्र.–**बैनी***; –**मुखी**–*स्त्री.* चंद्रासारखें मुख असणारी, सुंदर स्त्री.

विधेय–*वि.* १. देण्यासारखें. २. घेण्यासारखें.–*पु.* १. कर्तव्यकर्म. २. आवश्यकता. ['बिल'.

विधेयक–*पु.* कायद्याचा मसुदा;

विध्यनुकूल–*वि.* कायदेशीर; 'व्हॅलिड'. [यझेशन'.

विध्रुवीयण–*पु.* 'डीपोलरा-

विध्वंस–*पु.* १. विनाश. २. वैमनस्य; वैर.

विन[+]–*सर्व.* विभक्ति लागल्यानंतर बनणारें 'वह 'चें अनेक०.ते; त्या; तीं.–*अव्य.** विना; खेरीज.

विनती–*स्त्री.* विनंती; प्रार्थना.

विनय–*स्त्री.* १. विनंती; प्रार्थना. २. शिस्त; शिक्षण. ३. नम्रता.

विनवना*–*क्रि. स.* विनविणें; प्रार्थना, विनंती करणें.

विनष्ट–*वि.* नष्ट; उध्वस्त.

विनसना*–*क्रि. अ.* नष्ट होणें; नाश पावणें. [विना

विना–*अव्य.* खेरीज; शिवाय;

विनिधान–*पु.* वांटणें; 'ॲलोकेशन'.

विनिधित–*वि.* वांटलेलें; दिलेलें; 'अॅलोकेटेड'.

विनिपात–*पु.* १. पतन; अधःपात. २. विनाश.

विनिमय–*पु.* १. अदलाबदल; देवाण-घेवाण. २. देवघेव; 'बार्टर'. **–अधिकोष**–*पु.* 'एक्सचेंज बँक'.

विनियंत्रण–*पु.* नियंत्रण उठविणें; 'डीकंट्रोल'.

विनियम–*पु.* १. नियंत्रण; संयम. २. कायदा; नियम; 'रेग्युलेशन'. ['रेग्युलेटर'.

विनियमक–*वि.* गतिनियंत्रक;

विनियमन–*पु.* नियमित, नियंत्रण करणें; 'रेग्युलेशन'; 'रेग्युलेटिंग'.

विनियोग–*पु.* पा० 'उपयोजन'; 'अॅप्रोप्रियेशन'.**–विधेयक**–*पु.* 'अॅप्रोप्रियेशन बिल'.

विनिर्णय–*पु.* न्यायाधिशानें दिलेला निकाल; 'जजमेंट'

विनिर्देश–*पु.* निश्चितपणें सांगितलेली गोष्ट; निश्चित गोष्टीं-संबंधींचें विवरण; 'स्पेसिफिकेशन'.

विनिश्चय–*पु.* निकाल; निर्णय; 'डिसीजन'.

विनिषिद्ध व्यापार–*पु.* आयात-निर्यातीची बंदी असलेल्या वस्तूंचा व्यापार; 'कंट्राव्हेंड ट्रेड'.

विनीत–*वि.* १. नम्र; विनयी. २. ज्ञानवान्; माहीतगार.

विनु*–*अव्य.* विना; खेरीज.

विनूठा+–*वि.* १. अपूर्व; सुंदर. २. विचित्र.

विनोद–*पु.* १. विनोद; मनोरंजन. २. क्रीडा. ३. गंमत; कुतूहल.

विन्यास–*पु.* १. स्थापना. २. ठेवणें. ३. रीतसर मांडणें; मांडणी. ४. व्यवस्था; 'अॅरेंजमेंट'.

विपंच–*पु.* मध्यस्थ; लवाद; पंच; 'अंपायर'.

विपंची–*स्त्री.* १. वीणा. २. क्रीडा.

विपक्ष–*पु.* १. वीरोधी पक्ष; प्रतिवादी. २. शत्रु.

विपक्षी–*वि.* प्रतिपक्षी; प्रतिवादी–*पु.* शत्रु. ['मेटॅबॉलिझम्'.

विपचन–*पु.* चयापचय-क्रिया;

विपत्ति–*स्त्री.* आपत्ति; संकट. **मु०–मोल लेना**–जाणूनबुजून संकटांत पडणें; विकतचें श्राद्ध घेणें.

विपत्र–*पु.* १. हुंडी. २. 'बिल'.

विपथन–*पु.* योग्य मार्ग सोडणें; नीतिभ्रष्टता; 'अॅबेरेशन'.

विपद्–*स्त्री.* आपत्ति; संकट.

विपन्न–*वि.* १. संकटग्रस्त. २. नष्ट; मृत.

विपरिधान–*पु.* १. परिवर्तन; विनिमय. २. गणवेष; 'युनिफॉर्म'.

विपरीत–*वि.* उलटा; प्रतिकूल.

विपरीततः; विपर्ययसे भी–*अव्य.* उलट; उलटपक्षीं; विपर्ययानें; 'व्हायसि व्हर्सा'.

विपर्यय–*पु.* १. व्यतिक्रम; विपरीतता. २. प्रतिकूलता.

विपर्याय–*पु.* विरुद्धार्थक शब्द; 'अँटोनिम'. [पंडित.

विपश्चित्–*वि.* *पु.* विद्वान्;

विपिन–*पु.* अरण्य; वन. **–विहारी**–*पु.* श्रीकृष्ण. [भरपूर.

विपुल–*वि.* पुष्कळ; मोठा;

विप्रेषक–*पु.* दूरगांवीं पैसे इ० पाठविणारा; 'रेमिटर'

विप्रेषण–*पु.* दूरस्थ व्यक्तीला पैसे इ० पाठविणें; 'रेमिटन्स'.

विप्रतिपत्ति–*स्त्री.* १. विरोध; मतभिन्नता. २. परस्परविरुद्ध असणें.

विप्रलंभ–*पु.* १. फसवणूक. २. नैराश्य. ३. वियोग; विरह. **–शृंगार**–*पु.* नायक-नायिकेच्या विरहाचें वर्णन असलेला शृंगाररस.

विप्रलब्धा–*स्त्री.* संकेतस्थळीं प्रियकर न भेटल्यामुळें दुःखी झालेली नायिका.

विप्लव–*पु.* १. दंगल; गडबड. २. बंड; विद्रोह. ३. अव्यवस्था. ४. फेरफार; अदलाबदल. ५. नदीचा पूर.

विप्लवी–*वि.* १. बंडखोर; क्रांतिकारक. २. क्षणभंगुर.

विफल–*वि.* व्यर्थ; निरर्थक; निष्फळ. [२. संघ.

विफ़ाक़्–*पु.* [*अ.*] १. मैत्री.

विबुध–*पु.* १. पंडित; विद्वान्. २. देव. ३. चंद्र.

विभव–*पु.* १. वैभव; ऐश्वर्य; संपत्ति. २. प्रताप.–*वि.* १. धनी. २. शक्तिशाली. ३. संभवनीय; अव्यक्त; 'पोटेन्शियल'.

विभाँति–*वि.* नानाविध; अनेक प्रकारचे.–*अव्य.* नाना प्रकारें.

विभा–*स्त्री.* १. किरण; प्रकाश. २. शोभा.

विभागाध्यक्ष–*पु.* एखाद्या विभागाचा प्रमुख; 'डिपार्टमेंटल हेड'.

विभाजन–*पु.* १. विभागणी; फाळणी. २. वांटणी; 'अॅलोकेशन'. **–घंटी**–*स्त्री.* कायदेमंडळांतील मत-मोजणीची घंटा.

विभाना; विभारना*–*क्रि. अ.* १. चमकणें; प्रकाशणें. २. शोभणें.

विभावरी–*स्त्री.* १. रात्र. २. ढालगज बाई. ३. कुंटीण; वेश्या.

विभिन्न–*वि.* १. वेगळा; पृथक्. २. अनेकविध. [शंका.

विभीति–*स्त्री.* १. भय. २.

विभीषण–*वि.* १. अत्यंत भयंकर; भीषण. २. देशद्रोही.–*पु.*

रावणाचा धाकटा भाऊ; बिभीषण.

विभीषिका– *स्त्री.* १. दहशत. २. भयंकर घटना.

विभु–*वि.* १. सर्वव्यापक. २. समर्थ; महान्.–*पु.* प्रभु; ईश्वर.

विभूति– *स्त्री.* १. अलौकिक शक्ति. २. ऐश्वर्य. ३. महापुरुष.

विभेंटन*–*पु.* भेट; आलिंगन; गळचाला मिठी मारणें.

विभेदन–*पु.* १. कापणें; फाडणें. २. फूट. ३. पृथक्करण; 'रिझॉल्व्ह'. ['डिसक्रिमिनेशन'.

विभेदीकरण–*पु.* [भेदभाव;

विभ्राट–*पु.* १. भांडण; झगडा. २. आपत्ति.

विमति– *स्त्री.* मतभेद; मतविरोध; नापसंती.–**टिप्पणी**– *स्त्री.* मतभेद व्यक्त करणारें टिपण; 'मिनिट ऑफ डिसेंट'.

विमर्श–*पु.* १. विचार; विवेचन. २. परीक्षण. ३. तर्क; वादविवाद.

विमल–*वि.* निर्मल; स्वच्छ.

विमाता– *स्त्री.* सावत्र आई.

विमान–*पु.* १. विमान. २. तिरडी. ३. अनादर.–**कर्मी**–*पु.* विमानावर काम करणारा; 'एअर क्रू'.–**गृह**;–**घर**–*पु.* विमान ठेवण्याचें घर; 'हँगर'.–**चालन**–*पु.* विमान चालविणें; उड्डाण; 'ॲव्हिएशन'.–**विज्ञान**–*पु.* विमान संचालन शास्त्र; उड्डाण-कला; 'एअरोनॉटिक्स'. –**परिचारिका** –*स्त्री.* हवाई सुंदरी; 'एअर होस्टेस'.–**वाहक पोत**–*पु.* विमानवाहू जहाज; 'एअर क्राफ्ट कॅरियर'.–**वेधी तोप**– *स्त्री.* विमानवेधक तोफ; 'ॲंटी एअरक्रॅफ्ट गन'. –**सेनाधिकारी**–*पु.* हवाईदलाचा अधिकारी; 'विंगकमांडर'.

विमानास्थान–*पु.* विमानतळ; 'एअरबेस'.

विमुक्त–*वि.* १. मुक्त झालेला; मोक्षास गेलेला. २. सुटलेला.

विमुख–*वि.* १. तोंड फिरविलेला; विन्मुख; प्रतिकूल; बेपर्वा. २. अप्रसन्न; उदासीन.

विमुद–*वि.* उदास; खिन्न.

विमुद्रीकरण–*पु.* चलन बंद करणें; 'डीमॉनेटायझेशन'.

विमूढ–*वि.* १. अत्यंत मोहित झालेला. २. बुचकळचांत पडलेला. ३. शुद्धीवर नसलेला; बेशुद्ध. ४. मूर्ख.–**गर्भ**–*पु.* पोटांतच मेलेलें मूल.

विमोचन–*पु.* १. पैसे भरून माल किंवा व्यक्ति सोडविणें. २. कैदेंतून सुटणें; सुटका; 'रिडेम्प्शन'.

विमोह–*पु.* १. मोह. २. बेशुद्धि. ३. आसक्ति. [घर; वारूळ.

विमौट–*पु.* वाळवीनें केलेलें

वियंग*–*पु.* महादेव.

विय*–*वि.* १. दोन. २. दुसरा.

वियो*–*वि.* दुसरा. [विच्छेद.

वियोग–*पु.* १. विरह. २.

विरंचि–*पु.* ब्रह्मदेव.

विरंजन–*पु.* रंग काढून टाकण्याचा गुण किंवा कार्य; 'ब्लीचिंग'.

विरचना*–*क्रि. स.* १. रचणें. २. बनविणें. ३. सजविणें.–*क्रि. अ.* विरक्त, उदासीन होणें.

विरजा–*वि.* १. धूळ नसलेला; स्वच्छ. २. विरक्त.

विरत–*वि.* १. निवृत्त; अनुरक्त नसलेला. २. विमुख.

विरथा+–*वि.* व्यर्थ; वृथा.

विरद–*पु.* कीर्ति; ख्याति.

विरदावली– *स्त्री.* गुणगान; गुणवर्णन. [यशस्वी. ३. कीर्तिमान्.

विरदैत*–*वि.* १. प्रख्यात. २.

विरमना*–*क्रि. अ.* १. रमणें; मन लागणें. २. थांबणें. ३. मोहून जाणें. ४. उशीर लावणें.

विरमाना*–*क्रि. स.* १. उशीर लावणें. २. गुंतविणें; अडकवून ठेवणें. [२. निर्जन. ३. दुर्लभ.

विरल–*वि.* १. विरळ; पातळ.

विरलन–*पु.* विरलीभवन; 'रेअरफॅक्शन'.

विरला–*वि.* विरळा; दुर्लभ.

विरस–*वि.* नीरस; फिका.

विरसा–*पु.* [*अ.*] वारसा; मृत व्यक्तीची मालमत्ता.

विरह–*पु.* विरह; वियोग.

विराजना–*क्रि. अ.* १. शोभणें. २. हजर असणें. ३. वसणें; विराजमान होणें.

विराजमान–*वि.* १. चमकणारें. २. सुशोभित. ३. बसलेला.

विराम–*पु.* १. तहकुबी; 'सीझेशन'. २. थांबणें; 'हॉल्ट'. –**घड़ी**– *स्त्री.* वाटेल तेव्हां चालूबंद होण्यासारखें घडचाळ; 'स्टॉपक्लॉक'.–**संधि**– *स्त्री.* युद्ध तहकुबीचा तह; 'ट्रूस'.

विरासत– *स्त्री.* [*अ.*] १. वारसा; उत्तराधिकार. २. वारसाहक्कानें मिळणारी संपत्ति.–**नामा** –*पु.* वारसापत्र. [गुतणें.

विरुझना*–*क्रि. अ.* अडकणें;

विरूपण–*पु.* कातरून आकार बदलणें; 'शिअर'. [रेचक.

विरेचक–*वि.* जुलाब करणारें;

विरेचन–*पु.* १. जुलाब. २. रेचक औषध.

विरोधना*–*क्रि. स.* १. विरोध करणें. २. वैर करणें; शत्रुत्व धरणें.

विलंब–*पु.* १. उशीर. २. सुस्ती. –**कारी प्रस्ताव**–*पु.* काळकाढू

ठराव; ' डायलेटरी मोशन '. –शुल्क–पु. उशीराबद्दल द्यावी लागणारी फी; 'लेट फी'; 'डिमरेज'.

विलंबित–*वि.* उशीर लावलेला; मंद.–**करना**–*क्रि. स.* तहकूब करणें.

विलखना*–*क्रि. अ.* १. दुःखी होणें. २. ताडणें; ओळखणें.

विलखाना*–*क्रि. स.* १. वैर करणें; शत्रुत्व धरणें. २. त्रास, दुःख देणें.

विलगाना*–*क्रि. अ.* अलग होणें; वेगळें होणें.–*क्रि. स.* वेगळें करणें. [विचित्र.

विलच्छन*–*वि.* विलक्षण;

विलपना*–*क्रि. अ.* विलाप करणें; शोक करणें.

विलम*–*पु.* विलंब; उशीर.

विलमना*–*क्रि. अ.* १. उशीर लावणें. २. थांबणें.

विलमाना*–*क्रि. स.* १. उशीर लावणें. २. थोपवून धरणें.

विलय; विलयन–*पु.* १. विलीनीकरण; 'मर्जर'. २. विरघळणें; ' सोल्यूशन '. ३. लोप; नाश; मृत्यु.

विलसना*–*क्रि.अ.* १. शोभणें. २. विराजणें. ३. आनंदी होणें. ४. क्रीडा, विलास करणें.

विलसित–*वि.* १. शोभित. २. क्रीडाप्रिय; विनोदी.–*पु.* १. अभिव्यक्ति. २. क्रीडा. ['सॉल्व्हंट'.

विलायक–*वि.* विद्रावक;

विलायत–*स्त्री.* [*अ.*] १. परका देश; दुसरा देश. २. दूरचा देश.

विलास–*पु.* चैन; विलास.

विलीक*–*वि.* अनुचित; अयोग्य. [लीन; गुप्त; अदृश्य.

विलीन– *वि.* मिसळलेला;

विलेख–*पु.* दस्तऐवज; ' डीड '.

विलेयता– *स्त्री.* द्रवनशीलता; ' सॉल्यूबिलिटी '. [' सॉल्यूट '.

विलेयशील– *वि.* विद्राव्य;

विलोकना*–*क्रि. स.* पाहाणें.

विलोकित–*वि.* पाहिलेला.

विलोचन–*पु.* डोळा; नजर.

विलोडक– *पु.* हलविणारें, ढवळविणारें द्रव्य; ' स्टरर '.

विलोड़ना–*क्रि. स.* १. घुसळणें. २. क्षुब्ध करणें.

विलोप–*पु.* लोप; नाश.

विलोप; विलोपन– *पु.* १. गाळणें; ' ओमीशन '. २. रद्द करणें; ' कॅन्सलेशन '.

विलोपीकरण–*पु.* लुप्त, रद्द, करणें; ' रिपील '.

विलोम–*वि.* १. विपरीत; प्रतिकूल; विरुद्ध. २. उलटें; ' कॉनव्हर्स '. [सुंदर.

विलोल–*वि.* चंचल; चपल;

विवक्षित–*वि.* १. सांगितलेलें; अभिप्रेत. २. अपेक्षित; ज्याला कांहीं सांगावयाची इच्छा किंवा आवश्यकता आहे असा.

विवदना*–*क्रि. अ.* वादविवाद, भांडण करणें. [छेद.

विवर–*पु.* बीळ; भोंक; छिद्र;

विवरण–*पु.* १. अहवाल. –**पत्रिका**– *स्त्री.* माहितीपत्रक; ' प्रॉस्पेक्टस '.

विवरणिका– *स्त्री.* अहवाल.

विवरणी– *स्त्री.* आंकडेवारी असलेली माहिती; अहवाल; ' रिटर्न '. [मनाई; ' डेबर '.

विवर्जन–*पु.* प्रतिबंध, अटकाव;

विवर्त–*पु.* १. गोल गोल फिरणें. २. समूह. ३. रूपांतर; परिवर्तन.

विवश–*वि.* १. लाचार; नाइलाज झालेला; असहाय. २. पराधीन.

विवाचक–*पु.* निवाडा करणारा; लवाद; ' आर्बिट्रेटर '.

विवाचन–*पु.* मध्यस्थी; लवाद; ' आर्बिट्रेशन '.

विवाद–*पु.* १. वादविवाद. २. भांडणतंटा. ३. मुकदमेबाजी. –**निवारक समिति**– *स्त्री.* तडजोड मंडळ; ' कन्सीलिएशन बोर्ड '.–**मु०–उठाना**–१. वाद सुरू करणें. २. भांडण उकरून काढणें.

विवादांत प्रस्ताव–*पु.* चर्चाबंदीचा ठराव; ' मोशन ऑफ क्लोझर '.

विवादी–*पु.* १. वादविवाद करणारा; भांडखोर. २. खटल्यांतील एक पक्ष. [घटस्फोट.

विवाह–*पु.* लग्न. –**विच्छेद**–*पु.*

विवि*–*वि.* १. दोन. २. दुसरा.

विविक्त–*वि.* १. वियुक्त; वेगळा. २. एकटा. ३. खाजगी; ' प्रायव्हेट '.

विवेकाधिकार–*पु.* योग्यायोग्य ठरविण्याचा अधिकार; ' डिस्क्रीशनरी पॉवर '.

विवेकाधीन–*वि.* (एखाद्याचा) विचार किंवा विवेक यावर अवलंबून असलेलें; ' इन दि डिस्क्रीशन '. [२. स्पष्ट; व्यक्त.

विशद–*वि.* १. निर्मळ; स्वच्छ.

विशाखन–*पु.* फाटे फोडणें; वळण; ' डायव्हर्शन '.

विशारद–*वि.* १. अनुभवी; कुशल. २. विद्वान्.

विशाल–*वि.* १. विस्तृत; मोठा. २. सुंदर. ३. प्रसिद्ध.

विशिख–*पु.* १. बाण. २. भाला.

विशिष्ट–*वि.* १. विशेषतायुक्त; असामान्य. २. सर्वश्रेष्ठ. ३. सुसंस्कृत; खानदानी. –**जनीन मतसंग्रह**–*पु.* ' गॅलप पोल '.

विशिष्टांग– *पु.* वैशिष्ट्यें; 'फीचर्स'.

विशिष्टाधिकार– *पु.* खास अधिकार; 'प्रीरॉगेटिव्ह'.

विशिष्टीकरण– *पु.* विशिष्टीकरण; 'स्पेशलायझेशन'.

विशुद्ध–*वि.* १. शुद्ध. २. खरें; सत्य. ['ॲक्युरसी'.

विशुद्धता– *स्त्री.* विनचूकपणा;

षड्रिपु– *पु.* आत्म्याचे सहा शत्रु; काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर.

षष्ठ– *वि.* सहावा.

षाडव–*पु.* ज्यास सहा स्वर लागतात व एक वर्ज्य असतो असा राग.

षोडश–*वि.* सोळा; सोळावा.

षोडशी *स्त्री* १. सोळा वर्षांची स्त्री; तरुणी. २. श्राद्धविशेष.

ष्ठीवन–*पु.* थुंकी; लाळ.

स

स–देवनागरी वर्णमालेंतील बत्तीसावा व्यंजन-वर्ण.

सँइतना+–*स्त्री.* स. १. जमा, गोळा करणें. २. सुरक्षित ठेवणें. ३. लिपणें; सारवणें.

सँउपना*–*क्रि. स.* सोंपविणें.

संक*–*स्त्री.* १. शंका; भ्रम. २. भय.

संकट–*पु.* १. आपत्ति; विपत्ति; संकट. २. घाटांतील लहान रस्ता. –*वि.* १. संकुचित; लहान; अरुंद. २. धोक्याचा. **–चतुर्थी**– *स्त्री.* माघ वद्य चतुर्थी. **–मोचन**–*वि.* संकट दूर करणारा. –*पु.* काशींतील एक मारुती. **–संकेत**–*पु.* संकट-संदेश; 'एस्. ओ. एस्.'

संकटा– *स्त्री.* १. काशींतील एक प्रसिद्ध देवता. २. आठ योगिनीं-पैकीं एक.

संकटाधिकार–*पु.*आणीबाणीच्या काळांतील अधिकार.

संकटापन्न–*वि.* संकटांत सांपड-लेला. [घेणें. २. भिणें.

संकना*–*क्रि. अ.* १. शंका

संकर–*पु.* १. मिश्रण; भेसळ. २.*शंकर. **–ज; –जात–ति**–*वि.* मिश्र जातींपासून उत्पन्न झालेला. **–घरनी***– *स्त्री.* पार्वती.

सँकरा–*वि.* संकुचित; तंग; अरुंद.–*पु.* दुःख; आपत्ति; संकट. **मु०–(रे) में पड़ना**–संकटांत सांप-डणें. [अनैतिक संबंध असणारा.

संकरी–*वि.* दोगला; मिश्र;

संकरीकरण–*पु.* १. भेसळ करणें; भिन्न जातींचें अनैतिक मिश्रण. २. नऊ प्रकारच्या पापां-पैकीं एक.

संकर्षण–*पु.* १. खेंचून, ओढून बाहेर काढणें. २. बलराम. ३. एक रुद्र.**–विद्या**– *स्त्री.* एका स्त्रीच्या पोटांतून (गर्भाशयांतून) मूल काढून तें दुसऱ्या स्त्रीच्या पोटांत घाल-ण्याची विद्या.

संकल+– *स्त्री.* सांखळी; गुरांना बांधण्याचें सांखळीचें दावें.

संकलन–*पु.* १. एकत्रीकरण. २. बेरीज; 'अॅडिशन'. ३. समाहार; 'समेशन'.

संकलप*–*पु.* संकल्प.

संकलपना*–*क्रि. स.* संकल्प, निश्चय करणें.

संकलित–*वि.* १. निवडलेला. २. संग्रहित, एकत्रित केलेला. –*पु.* बेरीज (ग०).

संकल्प–*पु.* १. इच्छा. २. निश्चय; संकल्प. ३. ठराव; 'रेझो-ल्यूशन'.**–सिद्धि**– *स्त्री.*इच्छाशक्तीनें होणारी उद्देश्यपूर्ति.

संकल्पित–*वि.* १. ज्याचा संकल्प, निश्चय करण्यांत आला आहे असा; ठरविलेला. २. कल्पित.

संकष्ट–*पु.* संकट. [भीति.

संका*– *स्त्री.* १. शंका. २.

सँकाना*–*क्रि. अ.* १. शंकित होणें. २. भिणें.

संकाय–*पु.* विभाग; 'फॅकल्टी'.

संकार–*पु.* १. केर; कचरा. २. +संकेत; खूण. **–कूट**–*पु.* कच-ऱ्याचा ढीग. [इशारा करणें.

संकारना*–*क्रि. स.* संकेत,

संकारी– *स्त्री.* जिचें कौमार्य नुकतेंच भंग पावलें आहे, अशी स्त्री; नवी नवरी.

संकाश–*वि.* १. तुल्य; सदृश; सारखा. २. जजळचा. –*अव्य.* निकट; जवळ.

संकीर* –*वि.* पा० 'संकीर्ण'.

संकीर्ण–*वि.* १. संकुचित; अरुंद. २. तुच्छ; क्षुद्र. ३. मिसळ-लेला; मिश्रित. **–युद्ध**–*पु.* विभिन्न प्रकारच्या शस्त्रास्त्रांनीं लढलें जाणारें युद्ध. [चितपणा.

संकीर्णता– *स्त्री.* क्षुद्रता; संकु-

संकु–*पु.* १. छिद्र. २. *बरची.

सँकुचना–*क्रि. अ.* १. संकोच पावणें; आंखडणें; मिटणें (फूल). २. लज्जित होणें.

सँकुचाना–*क्रि. अ.* १. लाजणें. २. आकसणें; मिटणें. –*क्रि. स.* संकुचित, लज्जित करणें.

संकुल–*वि.* १. परिपूर्ण; दाट. २. प्रचंड. –*पु.* १. जनता; समूह. २. युद्ध. **–युद्ध**–*पु.* सर्व साधनां-निशीं खेळलें जाणारें युद्ध; 'टोटल वॉर'

संकेंद्रण–*पु.* केंद्रित करणें; केंद्रीकरण.

संकेंद्रित–*पु.* केंद्रित; 'कॉन्सें-ट्रेटेड'. **–प्रयास**–*पु.* केंद्रित प्रयत्न; 'कॉन्सेंट्रेटेड एफर्ट'.

संकेत–*पु.* १. इशारा; खूण. २. चिह्न. ३. प्रेमी व प्रेयसी यांची भेटण्याची जागा; संकेत-स्थळ. **–चिन्ह; –रूप**–*पु.* संक्षिप्त रूप; संक्षेप; 'अॅब्रिव्हेशन'.

संकेतक–*पु.* निदर्शक; नकाशा दाखवण्याची छडी; 'पॉइंटर'.

संकेतन–*पु.* १. आपसांतील ठराव. २. स्वरलिपि; अंकन; 'नोटेशन'. ३. संकेतस्थळ.

संकेताक्षर–*पु.* सांकेतिक लिपि; 'सायफर'. [करणें.

सँकेलना+–*क्रि. स.* गोळा, जमा

संकोच–*पु.* १. आकुंचन; मिटणें. २. संकोच; लज्जा. –**रेखा**– *स्त्री.* सुरकुती. ['कॉम्प्रेशन'.

संकोचन–*पु.* दावणें; संपीडन;

सँकोचना–*क्रि. स.* १. संकोच करणें. २. लाजणें. ३. संकुचित करणें; आकसणें; आवळणें.– *क्रि. अ.* संकुचित होणें.

संक्रमण–*पु.* १. गमन. भ्रमण. २. एका राशींतून दुसऱ्या राशींत सूर्याचा प्रवेश; एका परिस्थितींतून दुसऱ्या परिस्थितींत प्रवेश.–**काल**–*पु.* संक्रमण काळ; 'ट्रान्झिशनल पीरियड'. –**नाश**–*वि.* रोगजंतूंचा नाश; 'डिसइन्फेक्शन'.–**नाशक**–*वि.* जंतुनाशक; 'डिसइन्फेक्टंट'.

संक्रमित–*वि.* १. पोंचविलेला. २. परिवर्तित केलेला. –**माल**–*पु.* मार्गस्थ माल; रवाना केलेला परंतु निर्दिष्ट स्थानी न पोंचलेला माल; 'गुड्स इन ट्रान्झिट'.

संक्रांत–*वि.* १. गेलेला. २. प्रविष्ट. –*पु.* पतीकडून मिळालेली संपत्ति. [णारा; 'ट्रान्स्फरर'.

संक्रांता–*पु.* हस्तांतरण कर-

संक्रांति– *स्त्री.* संक्रांत.

संक्रांती–*पु.* ज्याच्याकडे सोंपविण्यांत आलें आहे असा; हस्तांतरी; 'ट्रान्स्फरी'. [इ०).

संक्रामक–*वि.* सांसर्गिक (रोग

संक्षरण–*पु.* गंज लागून झिजत जाणें; 'करोझन'.

संक्षिप्त–*वि.* १. कमी केलेला; संक्षिप्त. २. फेंकलेला. ३. संकुचित. –**लिपि**– *स्त्री.* लघुलिपि; 'शॉर्टहँड'.–**विधिक विचार**–*पु.* एखाद्या खटल्याचा न्यायालयाद्वारें झटपट निकाल लावला जाणें; 'समरी ट्रायल'. ['ॲब्रीव्हेशन'.

संक्षिप्तिका– *स्त्री.* संक्षेप;

संक्षेप–*पु.* १. थोडक्यांत सांगणें; कमी करणें; संक्षेप. २. फेंकणें.

संक्षेपण–*पु.* १. संक्षिप्त करणें; 'ॲब्रिजमेंट'. २. फेंकणें.

संक्षेपतः–*अव्य.* थोडक्यांत.

संखिया–*पु.* सोमल (विष).

संख्या– *स्त्री.* १. गणना. २. अंक; संख्या. ३. नियतकालिकाचा अंक. –**पद**–*पु.* अंक. –**विभाग**–*पु.* आंकडेशास्त्र खातें; 'स्टॅटिस्टिक्स डिपार्टमेंट'.

संख्यात्र–*पु.* गणक; 'काउंटर'.

संग–*पु.* १. संगत; साथ; सहवास. २. मीलन; भेट. ३. विषयवासना; आसक्ति. –*अव्य.* सह; बरोबर. –**साथ**–*पु.* मैत्री; दोस्ती. **मु०– करना**– मैत्री करणें; बरोबर राहणें.–**लग लेना**–मागोमाग जाणें. –**होना**–बरोबर जाणें.

संग–*पु.* [*फा.*] १. दगड. २. वजन; भार. –*वि.* दगडासारखें निष्ठुर. –**अंदाज़**–*पु.* शत्रूवर दगड फेंकण्यासाठीं किल्ल्याच्या तटास ठेवलेली भोंकें. –**ख़ार**–*पु.* शहामृग. –**जराहत**–*पु.* संगजिरें; एक प्रकारचा पांढरा ठिसूळ दगड.–**तराश**–*पु.* पाथरवट. –**दान**–**ना**–*पु.* पक्ष्याचें पोट; कोठा; पक्वाशय. –**दिल**–*वि.* कठोर हृदयाचा; निर्दय. –**दिली**–*स्त्री.* निर्दयता. –**फ़र्श**–*पु.* दगडी फरशी. –**बार**–*वि.* दगड फेंकणारा. –*पु.* खडकाळ जमीन. –**बारान**–*पु.* दगडांचा वर्षाव.–**मरमर**–*पु.* संगमरवर. –**मूसा**–*पु.* संगमरवरासारखा काळा दगड. –**यशब**–*पु.* एक प्रकारचें हिरवें रत्न; 'जेड'.–**रेज़ा**–*पु.* बारीक खडी. –**लाख़**–*पु.* खडकाळ स्थान; जमीन.–*वि.* कठिण; कठोर. –**साज़**–*पु.* शिळा छापखाना दुरुस्त करणारा.–**सार**–*पु.* इस्लामी धर्मशास्त्रानुसार व्यभिचारी व्यक्तीला जमिनीत कमरेपर्यंत पुरून, तिच्या डोकीवर दगडाचा वर्षाव करून तिला ठार मारण्याची दिली जाणारी शिक्षा.–**सुलेमानी**–*पु.* एक प्रकारचा काळा–पांढरा दगड. –(गे) **असवद** –*पु.* मक्केंतील काब्याच्या भिंतींत असलेला काळा दगड.–०**आतिश** –*पु.* गारगोटी.–०**मज़ार**–*पु.* मृत व्यक्तीसंबंधीं मजकूर असलेला थडग्यावरील दगड. –०**राह** –*पु.* रस्त्यांतील दगड; धोंड.

संगठन–*पु.* संघटन; एकीकरण; ऐक्य.

संगठित–*वि.* संघटित.

संगणना– *स्त्री.* गणना; अदमास; 'कॉम्प्यूटेशन'.

संगत–*स्त्री.* १. सहवास; सोबत; संगत. २. मैथुन. ३. गाण्यांतील साथ. –*वि.* सुसंगत; मेळ खाणारा. –**कोण**–*पु.* अनुरूप कोन; 'कॉरस्पाँडिंग अँगल'. **मु० –करना**– गाणाऱ्याची साथ करणें. [नारिंग.

संगतरा–*पु.* [*फा.*] सत्रें;

संगतिया; संगती–*पु.* साथीदार (विशेषतः गाण्या–वजावण्यांतील).

संगम–*पु.* १. संगम; संयोग. २. केंद्र; 'फोकस'. –**बिंदु**–*पु.* केंद्रबिंदु; 'फोकल पॉइंट'.

संगमन–*पु.* १. एकमत; मतैक्य; 'कंकरन्स' २. राजकीय अथवा

सामाजिक सभा, परिषद; 'कॅन्व्हे-न्शन'. [बांबू.

सँगरा–पु. दगड उचलण्याचा

संगराम*–पु. युद्ध.

संगरासिख–पु. तांब्याचा गंज. यापासून कलप बनवितात.

संगलक–पु. प्रज्वालक पदार्थ; 'फ्यूज'. ['फ्यूजन'.

संगलन–पु. मिश्रण; एकीभवन;

सँगाती–पु. मित्र; सहचर.

संगिनी– *स्त्री.* मैत्रीण; जोडी-दारीण; सखी; पत्नी.

संगी–*वि.* बरोबर राहाणारा. –पु. मित्र; साथी.

संगी–*वि.* [*फा.*] दगडी.–**पु.** एक प्रकारचें रेशमी कापड.

संगीन–पु. [*फा.*] बंदुकीच्या शेवटीं जोडतात तें तीक्ष्ण शस्त्र; संगीन; 'बायोनेट'. –*वि.* १. दगडी. २. जाड. ३. टिकाऊ; मज-बूत. ४. विकट; भयंकर; कठिण; गंभीर. –**जुर्म**–पु. गंभीर अपराध; भयंकर गुन्हा. [केलेला; संकलित.

संगृहीत–*वि.* एकत्रित; संग्रह

संगोतरा–पु. संत्रें. [करणें.

संग्रहना*–*क्रि. स.* संग्रह, संचय

संग्रहाध्यक्ष; संग्रहालयाध्यक्ष –पु. संग्रहालयाचा मुख्याधिकारी; 'क्युरेटर'.[करणारा.–पु. सारथि.

संग्रहीता–*वि.* संग्रह, ग्रहण

संगाम–पु. युद्ध; संघर्ष.–**भूमि** – *स्त्री.* रणांगण.

संग्राही–पु. बिनतारेचे संदेश घेण्याचें यंत्र; 'रिसीव्हर'.–*वि.* एकत्र करणारा.

संघ–पु. १. समूह; समुदाय. २. सभा; समिति.– **न्यायालय**–**पु.** संघराज्याचें सर्वोच्च न्यायालय; 'फेडरल कोर्ट'.–**समाजवाद**–**पु.** 'सिंडिकॅलिझम्'.

संघट*–पु. १. संघटन. २. युद्ध; झगडा. ३. समूह; ढीग; रास.

संघटन–पु. १. संयोग; मिलाफ. २. रचना. ३. बनावट. ४. संघटना.

संघट्ट–पु. १. संघर्ष; स्पर्धा. २. आलिंगन. ३. दूतीच्या साह्यानें नायकनायिकांचें घडून येणारें मीलन.

संघती+–पु. साथी; सहकारी.

संघनन–पु. दृढीकरण; दृढी-भवन; 'कॉंडेन्सेशन'.

संघनित–*वि.* गोठवलेलें; 'कंडेन्स्ड'.

संघनित्र–पु. वाफेचें पाणी कर-ण्याचें यंत्र; 'कन्डेन्सर'.

संघर–पु. सांधपट्टी; 'क्लॅंप'.

संघरना*–*क्रि. स.* संहार करणें; नाश करणें; ठार मारणें.

संघर्ष–पु. स्पर्धा; संघर्ष; संग्राम. –**समिति**– *स्त्री.* संग्राम-समिति; 'कमिटी ऑफ ॲक्शन'.

संघात–पु. १. प्रभाव; धक्का; आघात; 'इम्पॅक्ट'. २. समूह. ३. वध; हत्या. ४. संघर्ष. ५. *सह वास; साथ.–*अव्य.* बरोबर; संगें.

संघाती–पु. १. साथी २. मित्र. ३. सखा.

संघानित–*वि.* जोडलेलें; डाक लावलेलें; 'वेल्डेड'.

संघारना–*क्रि. स.* संहार किंवा नाश करणें. [मठ; विहार.

संघाराम–पु. बौद्ध भिक्षूंचा

संघीय–*वि.* संघराज्यासंबंधींचा. –**संविधान**– पु. संघराज्याची घटना; 'फेडरल कॉन्स्टिटयूशन'.

सँघेरा+–पु. दोन गायींचे पाय एकत्र बांधावयाची दोरी.

संघेला+–पु. साथी; मित्र.

संचना–*–*क्रि. स.* जमा, गोळा करणें.

संचय–पु. १. सांठा; संग्रह. २. समुदाय; समूह.

संचायक–पु. संचय करणारें यंत्र; 'ॲक्युम्युलेटर'.

संचार–पु. १. चालणें; गमन; प्रवेश. २. दळणवळण; 'कम्यू-निकेशन'.–**साधन**–पु. दळणवळ-णाचीं साधनें; 'मीन्स ऑफ कम्यूनिकेशन'. [विणें; पसरविणें.

संचारना–*क्रि. स.* संचार कर-

संचारी–पु. १. सुगंधित वायु. २. हवा; वारा.–*वि.* १. साहि-त्यांत मुख्य भावनांची पुष्टि कर-णारे (भाव) २. गतिमान्. ३. सांसर्गिक. ['डायरेक्टर'.

संचालक–पु. संचालक;

संचालन–पु. १. चालविणें. २. नियंत्रण.–**व्यय**–पु. संस्था इ० चालविण्याचा खर्च; 'वर्किंग एक्स्पेन्सेस'.–**समिति**– *स्त्री.* पा० 'कर्णधारसमिति'.

संचित–*वि.* जमा केलेलें; सांठविलेलें; 'ॲक्युम्युलेटेड'. –**कोष**–पु. 'प्रॉव्हिडंट फंड'.

संजम*– पु. संयम.

संजमना*–*क्रि. स.* एकत्र करणें; गोळा करणें.

संजाफ़– *स्त्री.* [*फा.*] १. झालर; किनार. २. गोठ; कांठ (वस्त्राचा).

संजाफ़-फ़ी–पु. [*फा.*] अर्धा हिरवा व अर्धा तांबडचा रंगाचा घोडा.

संजाब–पु. [*फा.*] १. मुंगुसाच्या जातीचा एक प्राणी. याचें कातडें केंसाळ असतें. २. लाल पांढरा घोडा.

संजीदगी– *स्त्री.* [*फा.*] १. गांभीर्य. २. सभ्यपणा. ३. समजदारी; समजूतदारपणा.

संजीदा–*वि.* [*फा.*] १. गंभीर; शांत. २. समजदार; बुद्धिमान्.

संजुक्त+–*वि.* संयुक्त; एकत्रित.

संजुक्ता*– *स्त्री.* पृथ्वीराजाची राणी संयोगिता.

संजुग*–*पु.* युद्ध; संग्राम.

संजुत*–*वि.* संयुक्त; मिसळलेला; सहित.

सँजोइ* – *अव्य.* १. बरोबर; सह. २. गोळा करून; सजवून.

सँजोइल*–*वि.* १. एकत्र गोळा केलेला. २. सजविलेला.

सँजोउ* – *पु.* १. संयोग. २. तयारी. ३. सामग्री.

सँजोग*–*पु.* संयोग; योगायोग.

सँजाना; सँजोवना* – *क्रि. स.* १. सजविणें. २. एकत्र, गोळा करणें. [तयार.

सँजोवल*–*वि.* सुसज्ज; सन्नद्ध;

संझा– *स्त्री.* १. नाम. २. नांव. ३. चेतना; शुद्धि.–**हीन**–*वि.* बेशुद्ध.

सँझला+ – *वि.* १. मधल्यापेक्षा धाकटा (भाऊ). २. संध्याकाळचें.

सँझवाती – *स्त्री.* सांजवात.–*वि.* संध्याकाळचें.

संझा*– *स्त्री.* संध्याकाळ.

सँझिया; संझैया+ – *पु.* संध्याकाळचें, रात्रीचें जेवण.

सँझोखा*–*पु.* संध्याकाळ.

सँझोखैं *–*अव्य.* संध्याकाळीं.

सँठ+–*पु.* १. शठ; लुच्चा. २. मौन. मु०– **मारना**–गप्प राहाणें.

संड–*पु.*१. सांड; पोळ. २. षंढ. –**मुसंड**–*वि.* धट्टाकट्टा; गलेलठ्ठ.

सँड़सा – *पु.* सांडशी; चिमटा. [– *स्त्री.* **सँड़सी**].

संडा–*वि.* धष्टपुष्ट; गलेलठ्ठ.

संडास–*पु.* विहिरीच्या आकाराचा शौचकूप; पेवाचा शेतखाना.

संतति–*स्त्री.* १. निरंतरता. २. मूल-बाळ. – **निरोध** – *पु.* संततिनियमन. [पळलेला. २. दुःखी.

संतप्त–*वि.* १. तापलेला; होर-

संतरण–*पु.* १. तरंगणें; तरंगत, पोहत पलीकडे जाणें. २. जलावतरण; 'लाँचिंग'. – **शील हिमशिला** – *स्त्री.* पाण्यावर तरंगणारा बर्फाचा डोंगर; 'आइसबर्ग'.

संतरा–*वि.* [*पोर्तु.*] १. संत्रें. २. मोसंबें. [द्वारपाल; 'सेंट्री'.

संतरी – *पु.* [इं.] पहारेकरी;

संतान–*पु.स्त्री.* मुलेंबाळें; संतति. –**निग्रह**–*पु.* संतति-प्रतिबंध; संततिनियमन. [कष्ट. ३.मानसिक त्रास.

संताप–१. दाह; ताप. २. दुःख;

संतापना*–*क्रि. स.* कष्ट, दुःख देणें. [दायक.

संतापी–*पु.* दुःख देणारा; कष्ट-

संति–*स्त्री.* १. दान. २. शेवट; अंत; विनाश. [२. द्वारें.

संती–*अव्य.* १. ऐवजीं; बदलीं.

संतुलन – *पु.* तोल; समतोल; 'बॅलन्स'; 'ईक्विलिब्रियम'.

संतुलित–*वि.* समतोल; 'बॅलन्स्ड'. ['सॅच्युरेशन'.

संतृप्ति – *स्त्री.* तुडुंब भरणें;

संतोख*–*पु.* संतोष; समाधान.

संतोखी* – *वि.* समाधानी; संतुष्ट.

सतोषना*–*क्रि.स.* संतोष देणें; संतुष्ट करणें.–*क्रि.अ.* संतुष्ट होणें; समाधान मानणें. [थरथरणारा.

संत्रस्त – घाबरलेला; भीतीनें

संत्रासी – *पु.* १. भय; धडकी; घबराट. २. धोक्याची सूचना; 'अलार्म'.

संथा– *स्त्री.* पाठ; धडा. [सांडशी.

संदंश; संदंशक – *पु.* चिमटा;

संदंशिका – *स्त्री.* १. सांडशी; 'फॉरसेप्स'. २. टोंच मारणें.

संद+–*पु.* १. फट. २. बीळ. ३. दडपण.

संदल–*पु.* [*फा.*] चंदन.

संदली – *वि.* [*फा.*] १. चंदनी रंगाचा. २. चंदनाचा. – *स्त्री.* उंच स्टूल.–*पु.* १. चंदनासारखा पिवळा रंग. २. हत्तीविशेष. ३. घोड्यांचा एक प्रकार.

संदिग्ध–*वि.* १. अस्पष्ट; अनिश्चित. 'अँबीग्युअस'. २. संदेहयुक्त; संशयास्पद.–**जनसूची**–*स्त्री.* पा० 'दुर्वृत्त सूची'.

संदिग्धार्थ – *वि* अस्पष्ट; संदिग्ध; अँबीग्युअस'. – *पु.* वादग्रस्त विषय.

संदूक–*पु.* [*अ.*] १. पेटी; 'ट्रंक'. २. शवपेटिका. –**चा**– *पु.*; –**ची**– *स्त्री.*; –**ड़ी**–*स्त्री.* लहान पेटी.

संदूक़ी–*वि.* [*अ.*] पेटीच्या आकाराचा. –**क़ब्र**–*स्त्री.* पेटीच्या आकाराचें थडगें.

संदूर*– *पु.* शेंदूर.

संदेश–*पु.* १. बातमी; वार्ता. २. आदेश. ३. भेट; उपहार. ४. एक प्रकारची बंगाली मिठाई.

संदेशा–*पु.* संदेश; निरोप.

संदेशी–*पु.* दूत; निरोप्या.

संदेस–सा–*पु.* पा० 'संदेश'.

सँदेसा–*पु.* निरोप; संदेश.

सँदेसी+–*पु.* १. वार्ताहर; बातमी पोहोंचविणारा. २. दूत; निरोप्या.

संदेह–*पु.* संशय; शंका. –**में**– *अव्य.* संशयावरून. –**वाद**–*पु.* संशयवाद; 'स्केप्टिसिझम'. –**वादी**– –*वि.* संशयवादी; 'स्केप्टिक'.

संदेहात्मक–*वि.* संशयास्पद; संदिग्ध.

संधाता–*पु.* १. विष्णु. २. शिव. ३. सांधकाम करणारा; 'वेल्डर'.

संधान–पु. १. निशाण; लक्ष्य. २. शोध. ३. जोड; 'वेल्ड'.

संधानना*–*क्रि. स.* १. नेम धरणें. २. बाण मारणें.

संधाना–पु. लोणचें.

संधारण–पु.; **संधारणा**– *स्त्री.* भरण–पोषण; चरितार्थ.; 'मेन्टेनन्स'.

संधारिणी– *स्त्री.* 'हॅपट्रोन'.

संधि– *स्त्री.* १. संयोग; संबंध. २. तह. ३. तडजोड. ४. सांधा; जोड. ५. भिंतीला पाडलेलें भोंक. ६. संधि; वेळ. ७. रिकामी जागा; अवकाश. ८. संधि (व्या०).–**चोर**– –पु. घर फोडून चोरी करणारा. –**च्छेद**–पु. १. तोडणें. २. तह मोडणारा. (मु०–०**करना**–वेगळें करणें; 'डिस्कनेक्ट').–**भंग**–पु. तहाच्या अटी मोडणें. –**विच्छेद**–पु. तह मोडणें.

संध्या– *स्त्री.* १. संध्याकाळ; संधिकाळ. २. करार. –**राग**–पु. १. सायंकाळची लालिमा. २. शेंदूर. ३. सायंकाळीं गायिला जाणारा राग (शाम कल्याण).

संनाद–पु. स्वरसंयोग; मेळ; 'कॉन्सोनन्स'. [पोझिशन'.

संनिधि–*स्त्री.* सान्निध्य; 'जक्स्ट-

संनियम–पु. सामान्य नियम, कायदा; 'जनरल ॲक्ट'.

संपति*–*स्त्री.* संपत्ति.

संपदा–*स्त्री.* ऐश्वर्य; वैभव; धन-संपत्ति. [मत्ता; 'इस्टेट'.

संपदा–*स्त्री.* मिळकत; माल-

संपन्न–*वि.* १. श्रीमंत. २. भाग्यवान्. ३. पूर्ण केलेला, झालेला. ४. युक्त. **मु०** –**होना**–पार पडणें; साजरा होणें (समारंभ, उत्सव इ०). [सणी; 'स्क्रूटिनी'.

संपरीक्षण–पु. छाननी; तपा-

संपर्क–पु. १. संबंध; संसर्ग. २. मिश्रण. –**पदाधिकारी**–पु. संपर्काधिकारी; 'लियेझाँ ऑफिसर'.

संपा–*स्त्री.* १. वीज. २. एकत्र जमून पान करणें.

संपात–पु. १. मेळ; मिलाफ; संयोग. २. एकाएकीं वरून खालीं पडणें. ३. संयोग; योगायोग; 'कोइन्सिडेन्स'. [करणें.

संपादना*–*क्रि. स.* पूर्ण, दुरुस्त

संपालक–पु. पा० 'अभिरक्षक'.

संपालन–पु. पाठिंबा देणें; 'सपोर्ट'.

संपिंडन–पु. घट्ट करणें; 'सॉलिडिफिकेशन'.

संपीडन–पु. दाबणें; 'कॉम्प्रेशन'.

संपुट–पु. १. वाटीच्या आकाराची वस्तु. २. द्रोण. ३. ओंजळ. ४. धातु वितळविण्याचें मातीचें भांडें. ५. * घुंगरू.

संपुष्टि–*स्त्री.* पुष्टि; बळकटी; समर्थन; 'करॉबोरेशन'.

संपूरण–पु. १. खूप भरणें. २. भरपूर खाऊन घेणें.

संपूर्ण–*वि.* १. सर्वच्या सर्व; पूर्ण. २. समाप्त.

संपूर्णतः; **संपूर्णतया**– *अव्य.* सर्वप्रकारें; पूर्णपणें.

संपृक्त–*वि.* १. मिश्रित; मिसळलेला; संबद्ध. २. पूर्ण; भरलेला.

सँपेरा–पु. गारुडी.

सँपोला–पु. सापाचें पिलूं.

सँपोलिया–पु. साप पकडणारा.

संप्रज्ञात–*वि.* उत्तम प्रकारें जाणलेलें; सविकल्प. –**समाधि**– *स्त्री.* सविकल्प समाधि; जिच्यामध्यें प्रपंचाचें भान राहातें अशी समाधि.

संप्रति – *अव्य* १. सांप्रत; योग्य वेळीं; या वेळीं. २. समोर. ३. योग्य प्रकारें.

संप्रदान–पु. १. देणें. २. दीक्षा, शिक्षण देणें. ३. लग्न करून देणें. ४. दान; वर्गणी. ५. चतुर्थी (व्या०).

संप्रदाय– पु. १. धर्ममत; विशिष्ट मताच्या अनुयायांचा समुदाय; पंथ; जात; प्रणाली; 'कम्यूनिटी'.–**वाद**–पु. जातीयवाद; 'कम्यूनॅलिझम्'. –**वादी**– *वि.* पु. जातीयवादी; 'कम्यूनॅलिस्ट'.

संप्रेषण– पु. १. पाठविणें; धाडणें; 'ट्रान्समिशन'. २. कामावरून काढून टाकणें.

संबंध– पु. १. संबंध; संपर्क; संसर्ग. २ नातें; नातेवाईक. ३. विवाह.

संबंधी– पु. १. नातलग. २. व्याही.– *वि.* संबंधाचा; संबद्ध.

संबद्ध– *वि.* जोडलेला; संबद्ध; युक्त; 'ॲफिलिएटेड'. –**करना**– *क्रि.स.* जोडून घेणें; 'ॲफिलिएट'.

संबद्धीकरण– पु. संबद्धता; जोडून घेणें; 'ॲफिलिएशन'.

संबल– पु. १. शिदोरी; प्रवासांतील फराळाचें सामान. २. पाणी.

संबुक*–पु. शंख; शिंपला.

संबुद्ध– *वि.* पूर्णपणें जागृत; ज्ञानी.

संबुल–पु. [*फा.*] जटामासी नांवाचें सुवासिक गवत. कुरळ्या केसांना याची उपमा देतात.

संभरण–पु. १. पुरवठा. २. पालन; पोषण. –**निधि**– *स्त्री.* 'प्रॉव्हिडंट फंड'. ['सँभलना'.

सँभरना*–*क्रि. अ.* पा०

संभरवै; **संभरेस***–पु. पृथ्वीराज.

सँभलना–*क्रि.अ.* १. सांवरणें; सांभाळणें. २. भानावर येणें.

३. आजारांतून बरें होणें.

सँभला+– पु. वाईट स्थितींतून सुधारलेलें पीक.

संभव–पु. १. जन्म; उत्पत्ति. २. अस्तित्व. ३. होणें; घडणें. ४. शक्यता. –वि. शक्य; शक्य असलेलें. [बहुधा; शक्य आहे.

संभवत:–अव्य. बहुतेक;

संभवना*–क्रि.अ. १. उत्पन्न होणें. २. शक्य असणें.–क्रि. स. उत्पन्न करणें.

संभवनीय–वि. शक्य.

संभार–पु. १. संचय. २. तयारी. ३. संपत्ति. ४. पालनपोषण.

सँभार*–पु. १. थांबविणें; प्रतिबंध. २. देखरेख; सांभाळ.

सँभारना*–क्रि.स. १. स्मरण करणें; आठवणें. २. पा० 'सँभालना'.

सँभाल–पु. १. सांभाळ; रक्षण. २. पालनपोषण; देखरेख.

सँभालना–क्रि. स. १. सांभाळणें; रक्षण करणें. २. पालनपोषण करणें. ३. देखरेख करणें. ४. अडकवून ठेवणें. ५. धरून ठेवणें. ६. निर्वाह करणें. ७. संयम करणें. ८. नीट पाहून घेणें (वस्तु). ९. हातीं देणें; सोंपविणें.

सँभाला–पु. मरणापूर्वीची चेतनावस्था.

संभावन–पु. १. एकत्र करणें. २. आदर–सत्कार. ३. कल्पना; अनुमान; शक्यता. ४. ख्याति.

संभावना– स्त्री. १. शक्यता. २. अनुमान. ३. प्रतिष्ठा.

संभावित–वि. १. कल्पित. २. एकत्र केलेला. ३. संभाव्य. ४. प्रतिष्ठित.

संभाव्य–वि. १. आदरणीय; सन्माननीय. २. शक्य. ३. उपयुक्त; योग्य.

संभु*–पु. शंभु; शंकर.

संभूति– स्त्री. १. जन्म; उत्पत्ति. २. वृद्धि. ३. उपयुक्तता.

संभूय–अव्य. एकत्र मिळून; भागीदारींत.–**समुत्थान**–पु. समाईक धंदा; व्यवसायांतील भागीदारी.

संभृति– स्त्री. १. संग्रह; समूह. २. पोटगी; निर्वाहधन; 'ॲलिमनी'.

संभेद–पु. १. तुटणें; मोडणें. २. भेदनीति; फूट पाडणें. ३. वियोग.

संभ्रांत–वि. १. प्रतिष्ठित; उच्च कुळांतील. २. घाबरलेला.

संमत–वि. सहमत; अनुमत; एकमत असलेला.

संमति– स्त्री. १. मत; अभिप्राय. २. अनुमति; संमति. ३. सल्ला.

संमान–पु. सन्मान; आदर.

संमाननीय–वि. आदरणीय.

संमानना*–क्रि. स. आदरसत्कार करणें.

संमुद्रित–वि. हवाबंद; गच्च बंद केलेलें; 'हर्मेटिकली सील्ड'.

संमेलन–पु. १. जमाव. २. सभा; सम्मेलन. [द्रिय. २. मर्यादित.

संयत–वि. १. संयमी; जितें-

संयुक्त–वि. एकत्रित; समाईक; जोडलेलें; संयुक्त.–**कुटुंब**;–**परिवार**–पु. एकत्र कुटुंब. –**निर्वाचक वर्ग**–पु. संयुक्त मतदारसंघ; 'जॉइंट इलेक्टोरेट'.–**राष्ट्रसंघ**–पु. संयुक्त राष्ट्रसंघ; 'युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशन'.–**लेखा**–पु. जोड खातें; संयुक्त खातें; 'जॉइंट अकाउंट'. –**सरकार**– स्त्री. सर्वपक्षीय सरकार; 'कोॲलिशन गव्हर्नमेंट'.–**स्कंधप्रमंडल**– पु. 'जॉइंट स्टॉक कंपनी'.

संयुग–पु. १. युद्ध. २. संयोग; मिलाफ.

संयोग–पु. १. मिश्रण. २. योगायोग. ३. समागम. ४. संबंध.–**वश**–अव्य. योगायोगानें; सहजगत्या.

संयोजक–वि. जोडणारा.–पु. सभा, बैठक इ०चें निमंत्रण देणारा; व्यवस्था करणारा; निमंत्रक; 'कन्व्हीनर'.

संयोजन–पु. १. योजना; व्यवस्था. २. जोडणें; खालसा करणें; 'ॲनेक्सेशन'. ३. अंतर्भाव; समावेश; 'इन्कॉर्पोरेशन'.–**करना**–क्रि. स. बोलावणें. व्यवस्था करणें; 'टु कन्व्हीन'.

संयोज्यांश–पु. परिशिष्ट; पुरवणी; 'ॲडेन्डम'.

संयोना*–क्रि.स. पा० 'सँजोना'.

संरक्षक–पु. १. संरक्षण करणारा. २. आश्रयदाता. ३. पालक; 'गार्डियन'. [क्षण.

संरक्षकता– स्त्री. आश्रय; संर-

संरक्षण–पु. १. रक्षण; संरक्षण; 'प्रोटेक्शन'. २. देखरेख; निरीक्षण. –**कर**–पु. संरक्षक जकात; 'प्रोटेक्टिव्ह ड्यूटी'.

संरक्षित–वि. १. संरक्षिलेलें; सुरक्षित. २. अधीन; आश्रित.–**राज्य**–पु. संरक्षणाखालील मुलुख; 'प्रोटेक्टोरेट'. ['ॲमल्गम्'.

संरस –पु. पारदमिश्र धातु;

सँरसी*–स्त्री. १. मासे पकडण्याचा गळ. २. सांडशी; चिमटा.

संरसीकरण – पु. एकीकरण; मिश्रण; 'ॲमलगमेशन'.

संराधन –पु. १. आराधना; प्रसन्न करून घेणें. २. समेट; मिलाफ; 'रीकन्सीलिएशन'.

संलग्न–वि. जोडलेला; सामील; जवळचा; लगतचा; संबद्ध.–**कोण**–

पु. लगतचा कोन; 'अॅडजेसंट अँगल'.

संलाप–पु. १. संभाषण; गप्पा–गोष्टी. २. बरळणें. ३. खासगी बोलणें.

संलेख–पु. १. दस्तऐवज; करारपत्र; 'डीड'. २. पथ्य; संयम.

संवत्–पु. १. वर्ष; सन. २. विक्रमादित्य राजाच्या काळापासून चालत आलेली वर्षगणना; विक्रमसंवत्सर. [अल'.

संवत्सरी–*स्त्री.* वार्षिक; 'अॅन्यु-

संवनन–पु. वशीकरण मंत्राच्या साह्यानें वश करून घेणें. २. प्रेम.

सँवर*–*स्त्री.* स्मरण; स्मृति.

संवरण–पु. १. निग्रह. २. निवारण. ३. निवड. ४. बंद करणें; झांकणें.–**शेष**–पु. दिवसअखेरची किंवा विशिष्ट मुदतीच्या शेवटची शिल्लक; 'क्लोजिंग बॅलन्स'.–**स्कंध**–पु. सालअखेर माल शिल्लक; 'क्लोजिंग स्टॉक'.

सँवरना–क्रि. *अ.* १. सांवरणें; सुधारणा होणें. २. सजावट होणें; सजणें.–क्रि. *स.* स्मरण करणें.

सँवरा+–*वि.* सांवळा.

सँवरिया* – पु. कृष्ण. – *वि.* सांवळा. [२. नाश. ३. प्रलय.

संवर्त–पु. १. वांकण; वळण.

संवर्ती सूची–*स्त्री.* एकाच वेळीं अनेक ठिकाणांहून प्रकाशित होणारी यादी; 'कंकरंट लिस्ट'.

संवहन–पु. संनयन; वहन; 'कन्व्हेक्शन'.

संवहन–पु. १. घेऊन जाणें. २ नेतृत्व करणें. ३. दाखविणें.

सँवाँ*–*वि.* समान; सदृश.

संवाद–पु. १. संभाषण; चर्चा. २. बातमी; खबर. ३. प्रसंग.–**दाता**–पु. बातमीदार.–**नियंत्रक**–पु. वृत्त-नियंत्रक; 'सेन्सार'.–**विलोपन**–पु. वर्तमानपत्रांत विशिष्ट बातम्या मुळींच न छापणें; 'ब्लॅक आउट'.

सँवारना–क्रि. *स.* १. सजविणें. २. सुधारणें. ३. व्यवस्थित लावणें किंवा ठेवणें; सांभाळणें.

संविद–*वि.* सचेतन; सज्ञान. –पु. तह; करार; 'पॅक्ट'.

संविदा–पु. करार; ठराव; 'कॉंट्रॅक्ट'.

संविधान–पु. घटना; राज्य-घटना; 'कॉन्स्टिटयूशन'.–**ज्ञ**; –**शास्त्री**–पु. घटनाशास्त्री; घटनातज्ज्ञ; 'कॉन्स्टिटयूशनॅलिस्ट'. –**सभा** –*स्त्री.* घटनापरिषद; 'कॉन्स्टिटयुअंट असेंब्ली'.

संविधि–*स्त्री.* १. व्यवस्था; तयारी. २. कायदा; कानून; 'स्टॅटयूट'. ['अॅपोर्शनमेंट'.

संविभाजन–पु. समान वांटणी;

संवेदन–पु. १. ज्ञान; अनुभूति. २. व्यक्त करणें.–**वाद**–पु. 'सेन्सेशनॅलिझम्'.

संवेदना–*स्त्री.* १. संवेदना; सहानुभूति. २. अभिव्यक्ति.

संवेष्टक–पु. गठ्ठा इ० बांधणारा; 'पॅकर'.

संवेष्टन–पु. १. वेष्टन; झांकण. २. गठ्ठा इ० बांधणें; 'पॅकिंग'.–**व्यय**–पु. गठ्ठा इ० बांधण्याचा खर्च; 'पॅकिंग चार्जेस'. [इ०; 'पॅकेट'.

संवेष्टिका–*स्त्री.* लहान बंडल

संवेष्टित–*वि.* सोबत असलेलें (पत्र इ०); 'एन्क्लोज्ड'.

संशोधक–पु. १. दुरुस्ती करणारा; सुधारणारा. २. परतफेड करणारा.

संशोधन–पु. १. शुद्धीकरण; सुधारणा; 'अॅमेंडमेंट'. २. उपसूचना; दुरुस्ती; ३. फेड (ऋण).

संशोधित – *वि.* सुधारलेला; शुद्ध किंवा दुरुस्त केलेला.

संशोधी–*वि.* दुरुस्ती, सुधारणा करणारा. – **विधेयक** – पु. दुरुस्ती विधेयक; 'अॅमेंडिंग बिल'.

संश्रय–पु. १. मैत्री; सख्यसंबंध; 'अलायन्स'. २. आश्रय; शरण.

संश्लिष्ट – *वि.* १. मिश्रित; संमिलित; संबद्ध. २. अस्पष्ट; अनिश्चित; अनिर्णीत.

संश्लेषण–पु. जोडणें; संलग्न, संबद्ध करणें; संयोगीकरण; 'सिथिसिस्.'

संस*–पु. १. संशय. २. वैपुल्य.

संसइ*–पु. संशय.

संसक्ति–*स्त्री.* घनिष्ठ संबंध; संयोग; मिलाफ, 'कोहीजन'.

संसज्जन–पु. सैन्याची जमवाजमव; एकत्र जमविणें; 'मोबिलायझेशन'.

संसज्जित– *वि.* सुसज्जित (सैन्य); 'मोबिलाइझ्ड'.

संसद्– *स्त्री.* १. संसद्; पार्लमेंट (लोकसभा व राज्यसभा मिळून). २. सभा. ३. न्यायालय.

संसर्ग–पु. १. संयोग. २. संबंध; संपर्क. ३. उपभोग.

संसा*–पु. १. संशय. २. सांडशी.

संसार–पु. १. जग; सृष्टि. २. गृहस्थी; संसार. ३. जन्ममरण. ४. मायाजाल. ५. समूह. –**यात्रा**–*स्त्री.* जगांत राहाणें; जीवन.

संसी+– *स्त्री.* सांडशी.

संसृति– *स्त्री.* १. जन्ममरणाची परंपरा; आवागमन. २. सातत्य.

संसौ*–पु. १. श्वास. २. प्राण.

संस्करण–पु. १. आवृत्ति. २. संस्कार करणें. ३. अंत्यसंस्कार करणें.

संस्तवन– पु. १. प्रशंसा, स्तुति

करणें. २. शिफारस; 'कॉमेंडिंग'.

संस्ताव–*पु.* प्रशंसा; स्तुति. **–करना**–*क्रि. स.* स्तुति, शिफारस करणें; 'कॉमेंड'.

संस्ताव्य– *वि.* प्रशंसनीय; शिफारस करण्यास योग्य; 'कॉमेंडेबल'. [टचूट'.

संस्थान–*पु.* संस्था; 'इन्स्टि-

संस्मरण–*पु.* स्मरण करणें; आठवण. ['कन्फेशन'.

संस्वीकृति– *स्त्री.* कबुली;

संहति– *स्त्री.* १. ऐक्य; संयोग. २. समुदाय; समूह; 'मास'.

संहरना*–*क्रि. अ.* नष्ट होणें. –*क्रि. स.* नाश, संहार करणें.

संहर्ता–*पु.* १. संग्रह करणारा; कर वसूल करणारा अधिकारी. २. संहार, वध, नाश करणारा.

संहिता– *स्त्री.* १. संयोग; संग्रह. २. कायदे, कानून इ० चा क्रमबद्ध संग्रह; संहिता; 'कोड'.

सआदत– *स्त्री.* [*अ.*] १. भलाई; सचोटी. २. सुदैव. **–मंद**– *वि.* १. भाग्यवान्. २. सुयोग्य. ३. आज्ञाधारक; सेवाभावी. (विशेषतः मुलांकरितां).

सइंया*–*पु.* पा० 'सैयाँ'.

सइतना*– *क्रि. स.* पा० 'सैंतना'.

सइ*–*अव्य.* सह; सहित. –*प्रत्य.* तृतीयेचा व पंचमीचा प्रत्यय.

सइगर[+]–*वि.* सर्व; सगळें.

सइना*– *स्त्री.* सैन्य.

सइयो*– *स्त्री.* सखी; मैत्रीण.

सइराना*–*क्रि. अ. स.* पा० 'सेराना'.

सई– *स्त्री.* १. उन्नति; वृद्धि. २.* सरस्वती नदी. ३. सखी.

सई– *स्त्री.* [*अ.*] १. धांवपळ; परिश्रम; मेहनत. २. प्रयत्न. **–सिफ़ारिश**– *स्त्री.* वशिलेबाजी.

सईद–*वि.* [*अ.*] १. शुभ. २. भाग्यवान्.

सईस–*पु.* साईस; मोतद्दार.

सउँ*– *प्रत्य.* पा० 'से'.

सउत[+]– *स्त्री.* सवत.

सउतेला[+]–*वि.* सावत्र.

सऊर[+]–*पु.* पा० 'शऊर'.

सक– *स्त्री.* शक्ति. **–पु.**[+] १. शंका; संशय. २. शक. ३. धाक.

सकट*–*पु.* शकट; गाडा. –*वि.* वाईट; नीच.

सकत*– *स्त्री.* १. शक्ति. २. वैभव. –*अव्य.* यथाशक्ति.

सकता– *स्त्री.* शक्ति; सामर्थ्य.

सकता–*पु.* [*अ.*] १. मूर्च्छा; 'फिट'. २. धक्का; थक्क होणें. ३. यतिभंग. **–(ते)का आलम**– *पु.* विस्मय; थक्क होण्याची अवस्था. [शक्ति.

सकती*–*स्त्री.* १. सक्ती. २.

सकना–*क्रि. अ.* १. समर्थ असणें; शकणें. २. शक्य असणें.

सकपकाना– *क्रि. अ.* १. गडबडणें; आश्चर्यचकित होणें. २. लाजणें. ३. कांकू करणें; मागें-पुढें करणें.

सक़र–*पु.* [*अ.*] नरक.

सकर[+]– *स्त्री.* साखर. **–कंद– –न**–*पु.* रताळें. **–पारा–ला**–*पु.* १. शंकरपाळें. २. शंकरपाळ्याच्या आकाराची शिलाई.

सकरना–*क्रि. अ.* १. स्वीकार केलें जाणें; मंजूर होणें. २. कबूल होणें.

सकरा–*वि.* १. अरुंद; संकुचित. २. उष्टा. –*पु.* उष्टें.

सकल–*वि.* सर्व; संपूर्ण. –*पु.* १. प्रत्येक वस्तु. २. पुरुष व प्रकृति. **–परिसंपत्**– *स्त्री.* एकूण मालमत्ता; 'ग्रॉस ॲसेट्स'.

सकलात–*पु.* १. दुलई; रजई. २. भेट; नजराणा. [२. मखमली.

सकलाती–*वि.* १. अत्यंत उत्कृष्ट.

सकसकाना; सकस(सा)ना*– *क्रि. अ.* थरथर कांपणें; भयभीत होणें.

सकाना*–*क्रि. अ.* १. शंकित होणें. २. घाबरणें. ३. कांकू करणें.

सकारना–*क्रि. अ.* १. स्वीकारणें; मंजूर करणें; मान्य करणें. २. हुंडी (चेक) वर सही करून पैसे देणें.

सकारा–*पु.* १. हुंडी (चेक) स्वीकारण्यासाठीं व मुदत वाढवून देण्यासाठीं घेतली जाणारी रक्कम. २.* सकाळ.

सकारात्मक–*वि.* होकारार्थी.

सकारे*–*अव्य.* १. सकाळीं; पहांटे. २. लौकर; वेळेवर.

सकारैं*–*अव्य.* लौकर; घाईनें.

सक़ालत– *स्त्री.* [*अ.*] १. बोजा; वजन. २. क्लिष्टता.

सकाश–*पु.* १. सामीप्य; शेजार. २. उपस्थिति. **–अव्य.** जवळ; समीप.

सकिलना*–*क्रि. अ.* १. सरकणें. २. संकुचित होणें. ३. एकत्र होणें. ४. शक्य होणें. [रोगी. २. दूषित.

सक़ीम–*वि.* [*अ.*] १. आजारी;

सक़ील–*वि.* [*अ.*] १ पचावयाला जड. २. वजनी; जड; भारी. ३. क्लिष्ट.

सकुच*– *स्त्री.* संकोच; लज्जा.

सकुचना–*क्रि. अ.* १. लाजणें; संकोच करणें. २. संकुचित, बंद होणें; मिटणें (फूल).

सकुचाई*– *स्त्री.* संकोच; लज्जा.

सकुचाना*–*क्रि. अ.* संकोच

करणें; लाजणें. –क्रि. स. १. लाजविणें. २. मिटविणें; बंद, संकुचित करणें. [राचा एक मासा.

सकुची– *स्त्री.* जात्याच्या आका-

सकुचीला; सकुचौहाँ* – *वि.* संकोची; लाजाळू; लाजरा.

सकुन –*पु.* शकुन. [शकुनि.

सकुनी*–*पु.* दुर्योधनाचा मामा;

सकुपना*–*क्रि. अ.* क्रुद्ध होणें; रागावणें.

सकूत–*पु.* [*अ.*] स्तब्धता; मौन.

सकून–*पु.* [*अ.*] १. मनाची शांति. २. स्तब्धता. [स्थान; मुक्काम.

सकूनत– *स्त्री.* [*अ.*] निवास-

सकेत*–*पु.* १. संकेत; इशारा. २. संकट. –*वि.* संकीर्ण; अरुंद.

सकेतना*–*क्रि. अ.* समेटणें; संकोचणें. [गोळा करणें.

सकेर(ल)ना*–*क्रि. स.* एकत्र,

सकेला–*पु.* एक प्रकारचें लोखंड. –*स्त्री.* या लोखंडाची तलवार.

सकोच*–*पु.* संकोच.

सकोड़ना–*क्रि. स.* पा० 'सिकोड़ना'.

सकोतरा–*पु.* साखर–लिंबू; ईडलिंबू; मोसंबी. [क्रुद्ध होणें.

सकोपना*–*क्रि. अ.* रागावणें;

सकोपित*–*वि.* क्रुद्ध; नाराज.

सकोरना*–*क्रि. स.* पा० 'सिकोड़ना'. [रट भांडें.

सकोरा–*पु.* परळ; मातीचें पस-

सक़्क़ा–*पु.* [*अ.*] भिश्ती; पाणक्या. **मु०–(क्क़े) की बादशाही** औट घटकेचें राज्य.

सक्ति*–*स्त्री.* १. शक्ति. २. लपेटणें (वेलीचें). ३. संपर्क; संबंध; आसक्ति. [भाजलेलें जव.

सक्तु; सक्तुक–*पु.* सातू; सत्तू;

सक्र*–*पु.* शक्र; इंद्र. [मेघनाद.

सक्रारि*–*पु.* इंद्राचा शत्रु;

सक्रिय–*वि.* क्रियायुक्त; प्रत्यक्ष. **–सेवा**–*स्त्री.* प्रत्यक्ष कार्य; 'अॅक्टिव्ह सर्व्हिस'.

सक्षम–*वि.* १. शक्तिशाली; समर्थ. २. क्षमायुक्त.

सखत+–*वि.* पा० 'सख़्त'.

सखती+–*स्त्री.* पा० 'सख़्ती'.

सखर*–*वि.* १. खरा; चोख. २. उग्र. –*पु.* एक राक्षस.

सखरा–*पु.* पाण्यांत शिजविलेलें अन्न–भात, भाजी इ० (कच्ची) रसोई. –*वि.* खारट; मीठ असलेला.

सखरी– *स्त्री.* पा० 'सखरा'.

सख़ा; सख़ावत– *स्त्री.* [*अ.*] उदारता; दानशूरता.

सखी– *स्त्री.* मैत्रीण. **–भाव**–*पु.* स्वतःला उपास्य देवाची पत्नी समजणें.

सख़ी– *वि.* [*अ.*] दानी; उदार; दानशूर.

सखुआ–*पु.* शालवृक्ष.

सखुन–*पु.* पा० 'सुख़न'.

सख़्त–*वि.* [*फा.*] १. कठिण; टणक. २. बिकट; सक्त; निर्दय. **–अव्य.** अत्यंत; अगदीं; सक्त. **–कलामी**– *स्त्री.* कठोर भाषण. **–गीर**–*वि.* निर्दय. **–जान**–*वि.* १. निष्ठुर. २. ज्याचे प्राण लौकर जात नाहींत असा. ३. निर्लज्जपणें जगणारा.**–सुस्त**–*पु.* निर्भर्त्सना.

सख़्त*– *स्त्री.* आपत्ति; संकट.

सख़्ती– *स्त्री.* [*फा.*] जुलूम; क्रूरता; कठोरता; सक्ती.

सग–*पु.* [*फा.*] कुत्रा. **–ज़ादा**–*पु.* कुत्र्याचें पिलू (शिवी) –(**गे**) **बाज़ारी**–*पु.* बेवारशी कुत्रें.

सग–'साग'चें समासांतील रूप. **–पह(हि)ती; –पैती**– *स्त्री.* भाजी घालून केलेली आमटी.**–भत्ता**–*पु.* भाजी घालून शिजविलेला भात.

सग–*वि.* सख्खा; आपला.

सगड़–*पु.*; **सगड़ी**– *स्त्री.* लहान बैलगाडी; छकडा. [सामर्थ्य.

सगत–ती+– *स्त्री.* शक्ति;

सगन*–*पु.* १. सगण (छंदशास्त्र). २. शकुन..

सगनौती– *स्त्री.* शकुन पाहाणें.

सगपन–*पु.* नातें; आत्मीय संबंध.

सगबग–*वि.* १. आर्द्र; ओलाचिंब; ओथंबलेला; भिजलेला. २. परिपूर्ण. ३. भयभीत.–*अव्य.* झटपट; लगबगीनें. [होणें.

सगबगना*–*क्रि. अ.* जागृत

सगबगाना–*क्रि.अ.* १. भिजणें; ओलेंचिंब होणें. २. शंकित होणें. ३. घाबरणें.

सगर–*पु.* एक सूर्यवंशी राजा. याला साठ हजार पुत्र होते.

सगर–रा+–*पु.* सागर; तलाव.

सगरा–रो*–*वि.* सगळा; सर्व; समस्त.

सगल*– *वि.* सकळ; सर्व.

सगलगो+– *स्त्री.* १. नातें, आत्मीयता दाखविणें. २. खुशामत करणें. [जमीन; शिवार.

सगवारा+–*पु.* गांवाजवळची

सगा–*वि.* १. सहोदर; सख्खा. २. गोत्रज. **–पन**–*पु.* सख्खेपणा; आत्मीयतापूर्ण संबंध.

सगाई–*स्त्री.* १. लग्न ठरणें; वाङ्निश्चय. २. पाट लावणें; मोहतूर. ३. नातें; सख्खेपणा.

सग़ीर–*वि.* [*अ.*] लहान; अल्पवयीन.**–सिन**–*वि.* अल्पवयस्क. **–(रो) कबीर**–*पु.* लहान मोठा; आबालवृद्ध; सर्व लोक.

सगुन–*पु.* १. शकुन. ३. सगुण रूप. [सांगणें किंवा पाहाणें.

सगुनाना–*क्रि. स.* शकुन

सगुनिया–*पु.* शकुन पाहाणारा, सांगणारा.

सगुनौती–*पु.* शकुन पाहाणें.

सगुरा–*वि.* ज्यानें गुरूकडून दीक्षा घेतलेली आहे असा.

सगोत–ती–*वि.* सगोत्र; एकाच गोत्रांतील. **–***पु.* १. गोत्रज. २. भाऊबंद.

सगौती–*स्त्री.* १. सागु(गो)ती; खाण्याचें मांस. २. शिजविलेलें मांस. [छकडा.

सग्गड़–*पु.* १. हातगाडी. २.

सघन–*वि.* १. निबिड; दाट. २. भरीव. ३. ढगांनीं भरलेलें.

सघली*–*वि. स्त्री.* सगळी.

सच–*वि.* सत्य; खरें; यथार्थ. –*पु.* खरी गोष्ट; सत्य. **–सुच–** *अव्य.* १. खरोखरींच; निस्संदेह; वस्तुत:. २. अवश्य. [विस्मित.

सचकित–*वि.* आश्चर्यचकित;

सचना*–*क्रि. स.* १. पूर्ण करणें. २. सजविणें. ३. जमा, गोळा करणें.

सचर*–*वि.* जंगम; सचल.

सचरना*–*क्रि. अ.* पसरणें; प्रचलित, प्रसिद्ध होणें.

सचाई– *स्त्री.* १. सत्यता; यथार्थता; वास्तविकपणा. २. प्रामाणिकपणा; इमानदारी.

सचान–*पु.* बहिरी ससाणा.

सचारना*–*क्रि. स.* पसरविणें.

सचावट+–*स्त्री.* पा० 'सचाई'.

सचिंत–*वि.* चिंतित; काळजीयुक्त. [गुळीत.

सचिक्कण–*वि.* अत्यंत गुळ-

सचिव–*पु.* १. साथी; मित्र. २. अमात्य; प्रधान. ३. मंत्री; चिटणीस; 'सेक्रेटरी'.

सचिवालय–*पु.* सचिवालय; 'सेक्रेटेरियट'.

सचु*–*पु.* सुख; आनंद.

सचेत; सचेतन–*वि.* १. चैतन्ययुक्त. २. सावध; जागृत. ३. चतुर; हुशार; समजदार.

सचेतक–*पु.* प्रतोद; 'व्हिप'.

सचेती– *स्त्री.* सावधगिरी.

सचेष्ट–*वि.* प्रयत्नशील; धडपड, खटपट करणारा.

सच्चा–*वि.* १. खरा; वास्तविक. २. सत्यवादी; प्रामाणिक, ३. शुद्ध; निर्मळ. ४. योग्य; ठीक. **–ई–** *स्त्री.*; **–पन**–*पु.*; **–हट–** *स्त्री.* १. खरेपणा; सत्यता. २. प्रामाणिकपणा; इमानदारी.

सच्छत*–*वि.* घायाळ. [साक्ष.

सच्छी*–*पु.* साक्षीदार; – *स्त्री.*

सछंद*–*वि.* सपरिवार.

सछिद्रता– *स्त्री.* सच्छिद्रता; 'पोरॉसिटी'.

सज– *स्त्री.* शोभा; सजावट; डौल. **–दार**–*वि.* सुंदर; नटलेला; डौलदार. **–धज**; **–बज**– *स्त्री.* थाटमाट; डामडौल; शृंगार.

सजग–*वि.* सावध.

सजदा–*पु.* पा० 'सिजदा'.

सजन–*पु.* १. पति. २. प्रियकर. ६. सज्जन माणूस. ४. स्वजन; नातेवाईक.

सजना–*क्रि. अ.* १. सजणें; शृंगारलें जाणें. २. खुलून दिसणें; शोभणें. ३. सज्ज होणें. *–क्रि. स.* १. धारण करणें. २. सजविणें; व्यवस्थित करणें. –*पु.* १. शेवगा. २. + साजण; प्रियकर.

सजनी– *स्त्री.* सखी; साजणी.

सजला– *वि.* मधल्यापेक्षां धाकटा (भाऊ). –*वि. स्त्री.* पाण्यानें भरलेली. [तयारी.

सजवना*–*पु.* १. सजावट. २.

सजवल+–*पु.* तयारी; सिद्धता.

सजवाई– *स्त्री.* सजावट; सजविण्याची क्रिया अथवा मजुरी.

सजवाना–*क्रि. स.* दुसऱ्याकडून सजविणें; सजवून घेणें.

सज़ा– *स्त्री.* [*फा.*] शिक्षा; दंड. –*वि.* योग्य; लायक. **–याफ़्ता–** *वि.* शिक्षा झालेला; शिक्षा भोगलेला. **–याब–** *वि.* १. शिक्षेस पात्र. २. शिक्षा भोगलेला. **–वार–** *वि.* १. शिक्षेस पात्र; दंडनीय. २. योग्य; लायक. ३. उचित; उपयुक्त. ४. शुभ फल देणारा; शुभ.

सजा–*पु.* [*अ.*] १. प्रास; अनुप्रास. २. पक्ष्यांचा मधुर कलरव.

सजाइ*– *स्त्री.* शिक्षा; दंड.

सजाई– *स्त्री.* सजविण्याची क्रिया, मजुरी.

सजातीय–*वि.* एकाच जातीचा किंवा वर्गाचा. **–कर्म**–*पु.* क्रियापदाचा जो अर्थ असेल तोच अर्थ व्यक्त करणारें कर्म (उदा० मैं 'दौड़' दौड़ता हूँ); 'कॉग्नेट ऑब्जेक्ट'. [जाणकार.

सजान*–*वि.* सज्ञान; जाणता;

सजाना–*क्रि. स.* १. सजविणें; शृंगारणें. २. व्यवस्थित करणें, ठेवणें.

सजाय–*वि.* सपत्नीक; विवाहित. –*स्त्री.** शिक्षा; दंड.

सजाव–*पु.* १. सायीसकट विरजलेल्या दुधाचें दहीं; चक्कादहीं. २. सजावट.

सजावट–*स्त्री.* आरास; मांडणी; शृंगारणें; शोभा. [शृंगारणें.

सजावन*– *पु.* सजविणें;

सज़ावुल–*पु.* [*तु.*] १. सरकारी कर वसूल करणारा; तलाठी. २. कोतवाल; फौजदार.

सजीउ*–*वि* सजीव; जिवंत.

सजीला–*वि.* १. नखरेबाज. ३. मनोहर; सुंदर; सुडौल.

सजीव–*वि.* जिवंत; प्राणवान्. –*पु.* प्राणी.

सजुग*–*वि.* सावध; हुशार.

सजूरी– *स्त्री.* एक प्रकारची मिठाई.

सजोना+–*क्रि. स.* १. सजविणें; शृंगार करणें. २. तयार, व्यवस्थित करणें. [इल '.

सजोयल*–*वि.* पा० 'सँजो-

सज्जन–*पु.* १. सज्जन, चांगला माणूस. २. गृहस्थ; व्यक्ति.

सज्जा– *स्त्री.* १. सजावट. २. वेशभूषा. ३. शय्या. ४. लष्करी सामान.

सज्जाद–*वि.* [*अ.*] सिजदा, प्रणाम करणारा; उपासक.

सज्जादा–*पु.* [*अ.*] १. ज्याच्यावर बसून नमाज पढतात तें आसन. २. पीर किंवा फकीर यांची गादी. **–नशीं**; **–नशीन**–*पु.* पीर किंवा फकीर यांच्या गादीवर बसणारा, वारसदार. [२. सजलेला; अलंकृत.

सज्जित–*वि.* १. तयार; सुसज्ज.

सज्जी– *वि.* सज्जीखार; कपडे धुण्याची खारी माती. **–खार**–*पु.* सज्जीखार. **–बूटी**–*स्त्री.* ज्याच्यापासून सज्जीखार बनवितात तें झुडूप. [वांटा; भागी.

सझिया+–*पु.* १. भागीदार. २.

सटक–*स्त्री.* १. निसटणें. २. हुक्क्याचा नैचा, नळी. ४. लवचीक छडी.

सटकना–*क्रि. अ.* सटकणें; निसटणें.–*क्रि. स.* दाणे काढण्यासाठीं धान्याचीं कणसें झोडपणें.

सटकाना–*क्रि. स.* १. सडकावणें; छडीनें मारणें. २. निसटूं देणें, पळवून लावणें. ३. 'गुडगुड ' आवाज करीत हुक्का ओढणें.

सटकारना–*क्रि. स.* छडीनें सटासट मारणें; सडकावणें.

सटकारा*–*वि.* लांब व गुळगुळीत (बांबू वगैरे). [चमोटी.

सटकारी– *स्त्री.* लवचीक छडी;

सटक्का–*पु.* धांवणें; धांवून जाणें. मु० **–मारना**– वेगानें जाणें.

सटना–*क्रि. अ.* १. भिडणें; चिकटणें; जुळणें- २. मैथुन होणें. ३.+ मारामारी होणें.

सटपट– *स्त्री.* १. चुटपुट. २. संकोच; मर्यादा. ३. गोंधळ; घोटाळा.

सटपटाना–*क्रि. अ.* १. संकोच करणें. २. किंकर्तव्यमूढ होणें; गोंधळणें. ३. फिकें पडणें. ४. जळफळणें.

सटर-पटर–*वि.* किरकोळ; सटरफटर; तुच्छ; मामुली. –*स्त्री.* १. तुच्छ गोष्ट. २. भांडण-तंटा.

सटसट–*अव्य.* १. 'सट सट' असा आवाज करीत; सटासट. २. ताबडतोब; झटकन.

सटा– *स्त्री.* १. साधूंची जटा. २. सिंहाची आयाळ. ३. डुकराचा केस. ४. वेणी; अंबाडा; शेंडी. –*वि.* चिकटलेला, भिडलेला; लागलेला.

सटाकी– *स्त्री.* चाबकाची वादी.

सटान– *स्त्री.* जोडलें जाणें; जोड.

सटाना–*क्रि. स.* १. भिडविणें; जोडणें. २. चिकटविणें. ३. सडकावणें; मारणें.

सटाल–*वि.* आयाळ असलेला.

सटालु–*पु.* कच्चें फळ.

सटियल–*वि.* कमी प्रतीचा; हलका.

सटिया– *स्त्री.* १. सोन्याचांदीची बांगडी. २. शेंदूर लावण्याची चांदीची सळई. ३. कट. ४.* छडी.

सटीक–*वि.* १. अर्थ व स्पष्टीकरणासहित; टीकेसहित; 'ॲनोटेटेड'. २. बिलकुल ठीक; अगदीं बरोबर. [खेळणारा; सट्टेबाज.

सटोरिया–*पु.* सट्टा, जुगार

सट्टा–*पु.* १. करारनामा. २. सट्टा; जुगार. **–बट्टा**–*पु.* १. मिलाफ; घसट. २. कावेबाजपणा; चलाखी; युक्ति. –(**ट्टे**) **बाज़**–*पु.* स । खेळणारा.

सट्टी– *स्त्री.* एकाच प्रकारच्या वस्तूंचा बाजार. मु० **–मचाना**– आरडाओरडा करणें; गोंधळ माजविणें. **–लगाना**–- वस्तू विस्कटून टाकणें.

सठ*–*पु.* १. शठ; धूर्त; लुच्चा. २. मूर्ख. **–ता**– *स्त्री.* १. धूर्तता; लुच्चेगिरी. २. मूर्खता. ३. दुष्टता.

सठई+– *स्त्री.* १. लुच्चेगिरी. २. मूर्खता.

सठियाना–*क्रि. अ.* १. साठींत येणें (वय). २. म्हातारपण येणें. ३. साठी बुद्धि नाठी होणें.

सठेरा–*पु.* साल नसलेली अंबाडीची काटकी, चिपाड.

सठोरा–*पु.* सुंठवडा.

सड़क– *स्त्री.* मार्ग; रस्ता; सडक. [ण्याची क्रिया.

सड़न– *स्त्री.* सडण्याची, कुज-

सड़ना–*क्रि. अ.* १. सडणें; नासणें. २. आंवणें. ३. दुर्दशाग्रस्त होणें.

सड़सठ–*वि.* सदुसष्ट; ६७.

सड़सी– *स्त्री.* सांडशी.

सड़ाइँद– *स्त्री.* पा० 'सड़ायँध'.

सड़ाक– *स्त्री.* १. लवचीक

छडी सटकावण्याचा आवाज. २. शीघ्रता. [ण्याची क्रिया; घाण.

सड़ान–*स्त्री.* सडण्याची, कुज–

सड़ाना–*क्रि. स.* सडविणें; नासविणें. [वस्तूची घाण; दुर्गंध.

सड़ायँध–*स्त्री.* कुजलेल्या

सड़ाव–*पु.* सडण्याची, कुजण्याची क्रिया किंवा स्थिति.

सड़ियल–*वि.* १. सडलेला; सडका; नासका; कुजका. २. रद्दी; खराब. ३. तुच्छ; नीच.

सत*–*पु.* १. सत्य; यथार्थता. २. सत्त्व. ३. जीवनशक्ति; ताकद. –*वि.* सत्य; खरें.–**कार**–*पु.* सत्कार. – **गुरु** – *पु.* १. सद्‌गुरु. २. परमात्मा. – **जुग**; –**युग**–*पु.* १. एक हजार वर्षांचा कालावधि. २. सुखाचा काल्पनिक काल; सत्ययुग.–**वंती**– *स्त्री.* पतिव्रता; सती.–**संग**–*पु.*; –**संगति** – *स्त्री.* सत्संग; चांगली संगत. मु०–**पर चढ़ना**–सती जाणें.–**पर रहना**–पतिव्रता असणें, राहाणें.

सत*–*वि.* शंभर; शत.–**दल**; –**पत्र***–*पु.* कमळ.–**मूली**– *स्त्री.* शतावरी.

सत–' सात 'चें समासांतील संक्षिप्त रूप.–**कोन**–*वि.* सप्तकोणी. –**पतिया**– *स्त्री.* १. एक प्रकारचें घोसाळें. २. सात नवरे करणारी, व्यभिचारिणी *स्त्री.*–**पुतिया**– *स्त्री.* एक प्रकारचें घोसाळें.–**पदी**– *स्त्री.*; –**फेरा**–*पु.*; –**भौंरी**– *स्त्री.* सप्तपदी (विवाहांतील). –**मासा**; –**वाँसा** –*वि.* सातव्या महिन्यांत जन्मणारें (मूल).–*पु.* १. गरोदरपणीं सातव्या महिन्यांत केला जाणारा विधि, उत्सव. २. सातव्या महिन्यांत जन्मलेलें मूल; सातोळा मुलगा.–**रंगा**–*वि.* सप्तरंगी; सात रंगांचा.–*पु.* इंद्रधनुष्य.–**लड़ा**–*वि.* सातपदरी (हार).–**लड़ी**–**री** – *स्त्री.* सातपदरी हार.–**सई**– *स्त्री.* सातशें पदांचा, श्लोकांचा संग्रह; सप्तशती. [करणें.

सतकारना*– *क्रि. स.* सत्कार

सतनजा–*पु.* सप्तधान्यें; सात प्रकारच्या धान्यांचें मिश्रण.

सतनी+– *स्त्री.* सप्तवर्णी; सातवीण.

सतरंज–*पु. स्त्री.*; **सतरंजी**– *स्त्री.* पा० ' शतरंज '; ' शतरंजी '.

सतर– *स्त्री.* [*अ.*] १. रेघ; रेषा. २. ओळ; रांग.–*वि.** १. वक्र; तिरपा; कुटिल. २. क्रुद्ध.

सतर–*पु.* [*अ.*]. १. लपविणें. २. स्त्री पुरुषांचें गुह्यांग. ३. पडदा; आडोसा. – **पोशी**– *स्त्री.* शरीर झांकणें; लज्जा–निवारण.

सतरह–*वि.* सतरा; सत्रा; १७. [चिडणें.

सतराना*–*क्रि. अ.* रागावणें;

सतराहट+– *स्त्री.* कोप; रोष.

सतरौंहाँ–*वि.* रागावलेला; क्रोधसूचक. [सावध; जागरूक.

सतर्क–*वि.* १. तर्कयुक्त. २.

सतर्कता– *स्त्री.* सावधगिरी हुशारी. [संतुष्ट करणें,

सतर्पना*–*क्रि. स.* तृप्त,

सतह– *स्त्री.* [*अ.*] सपाटी; पातळी.

सतहत्तर–*वि.* सत्याहत्तर; ७७.

सतही–*वि.* वरवरचा; खोली नसलेला.

सतांग*–*पु.* रथ. [तारीफ.

सताइश– *स्त्री.* [*फा.*] प्रशंसा;

सताना–*क्रि. स.* १. सतावणें; त्रास देणें. २. हैराण करणें.

सतालू–*पु.* शांताळू; सप्ताळू.

सतावना* – *क्रि. स.* पा० ' सताना '.

सतावर– *स्त्री.* शतावरी.

सतासी–*वि.* सत्याऐंशी; ८७.

सति– *स्त्री.* १. दान. २. अंत; नाश.–*वि. पु.** सत्य.

सतिमा*– *स्त्री.* सावत्र आई.

सतिया+– *स्त्री.* स्वस्तिक-चिह्न. [सातवणी.

सतिवन–*पु.* सप्तपर्णी;

सती– *स्त्री.* १. साध्वी; पतिव्रता स्त्री. २. सती जाणारी *स्त्री.* –**चौरा**–*पु.* एखाद्या सतीचें स्मारक म्हणून बनविलेला चबुतरा.–**वाड़** –*पु.* सतीचें स्थान; सतीचें स्मशान. मु०–**होना**–१. सती जाणें. २. एखाद्यासाठीं वेडें होणें, जीव टाकणें. [अनुयायी.

सती*–*पु.* सत्यवान्; सत्याचा

सतीर्थ–**र्थ्य**–*पु.* सहाध्यायी; सहपाठी.

सतीला+–*वि.* समर्थ; पराक्रमी.

सतुआ–*पु.* सातू; सातूचें पीठ. –**संक्रांति**– *स्त्री.*; **सतुआन**– *स्त्री. पु.* मेषसंक्रांत.

सतून–*पु.* [*फा.*] स्तंभ; खांब.

सतेस*–*स्त्री.* शीघ्रता.

सतोखना*–*क्रि. स.* १. संतोष देणें; संतुष्ट करणें. २. धीर देणें.

सतौला+–*पु.* प्रसूत झाल्यानंतर सातवे दिवशीं बाळंतिणीनें करावयाचें स्नान.

सत्त–*पु.* १. सत्त्व; सारभाग. २. तत्त्व. ३. सत्य. ४. पातिव्रत्य.

सत्तमी*–*स्त्री.* सप्तमी.

सत्तर–*वि.* सत्तर; ७०.

सत्तांतरित प्रदेश – *पु.* ज्याचें सत्तांतर करण्यांत आलें आहे असा प्रदेश; ' सीडेड टेरिटरी '.

सत्ता–*स्त्री.* १. स्थिति; अस्तित्व. २. अधिकार; अंमल; प्रभुत्व.–

सामान्यत्व–*पु.* एखाद्या सामान्य द्रव्याचें अनेक रूपांतील अस्तित्व.

सत्ताइ(ई)स – *वि.* सत्तावीस; २७.

सत्तानबे–*वि.* सत्याण्णव; ९७.

सत्तावन–*वि.* सत्तावन; ५७.

सत्तासी–*वि.* सत्याऐंशी; ८७.

सत्ति*–*स्त्री.* शक्ति.

सत्तू–*पु.* सातूचें पीठ; गहूं, हरभरे, सातु यांचें भाजून केलेलें पीठ. **मु०–बाँधकर पीछे पड़ना**–१. एखाद्याच्या विरुद्ध सतत प्रयत्न करीत राहाणें. २. संपूर्ण तयारीनिशीं एखाद्या कामांत गढून जाणें.

सत्य–*वि.* खरें; खरोखर.–*पु.* सत्य; खरेपणा.–**पत्र**–*पु.* पालवी; 'फॉलिएज लीफ'.

सत्याग्रह–*पु.* सत्याचा आग्रह; न्यायप्राप्तीसाठीं करावयाचा शांततापूर्ण लढा. [नाश.

सत्यानास–*पु.* संपूर्ण नाश; सर्व-

सत्यानासी–*वि.* १. सत्यानाश, सर्वनाश करणारा. २. दुर्दैवी.–*स्त्री.* १. कांटेधोत्रा; पांढरा धोत्रा. २. करडई.

सत्यापन–*पु.* खरेपणाची तपासणी; 'व्हेरिफिकेशन'.

सत्र–*पु.* १. सत्र; 'टर्म'. २. अधिवेशन. ३. अन्नछत्र. – **न्यायालय**–*पु.* वरिष्ठ दिवाणी न्यायालय; 'सेशन कोर्ट'.

सत्रावसान – *पु.* अधिवेशन–समाप्ति; 'प्रोरोगेशन'.

सत्रु* – *पु.* शत्रु.–**घन**; –**हन**–*पु.* शत्रुघ्न; रामाचा सर्वांत धाकटा भाऊ.

सथर*–*पु.* १. स्थल; भूमि. २. पृथ्वी.

सथरी+– *स्त्री.* चटई.

सथिया–*पु.* १. स्वस्तिक चिन्ह. २. शस्त्रक्रिया करणारा; शस्त्रवैद्य.

सद* – *अव्य.* सद्यः; नुकतेंच. –*वि.* ताजें; नवीन.–*स्त्री.* स्वभाव; संवय.

सद–द्द– *स्त्री.* [*अ.*] १. अडथळा. २. पडदा; आडपडदा. ३. भिंत. **मु० सद्देराह होना** – एखाद्याच्या मार्गांतील धोंड बनणें.

सद–*वि.* [*फा.*] शंभर. –**आफ़रीन**; –**रहमत**; – **शुक्र**; –**शुक्रिया** – *अव्य.* ईश्वराची खूप कृपा; खूप खूप शाबासकी; धन्य-धन्य.–**साला**–*वि.* शंभर वर्षांचा. – **हा** – *वि.* शेंकडों; अनेक.

सदई*–*अव्य.* सदा; नेहमीं.

सदक़ा–*पु.* [*अ.*] १ दान; खैरात. २. समर्पण. ३. कृपा; प्रसाद. ४. ओवाळून टाकलेली वस्तु.–(**क़े**)**का पुतला** – *पु.* ओवाळून टाकलेला बाहुला.–(**क़े**) **की गुड़िया**–*स्त्री.* १. ओवाळून टाकलेली बाहुली. २. अत्यंत कुरूप स्त्री. – मु० – (**क़े**) **जाना**; – **होना** – समर्पित होणें; बलिदान करणें.

सदन – *पु.* १. निवासस्थान; घर. २. सभागृह; 'हाउस'. ३. एक भक्त कसाई.–**त्याग**–*पु.* सभात्याग; 'वॉक आउट'.

सदफ़– *स्त्री.* [*अ.*] मोत्यांचा शिंपला; मोत्याची शिंप.

सदमा–*पु.* [*अ.*] १. जखम; आघात; धक्का. २. खेद; दुःख. **मु०–उठाना**–दुःख, आघात सहन करणें.–**पहुँचना**-आघात, नुकसान होणें.

सदर–*वि.* [*अ.*] प्रधान; मुख्य. –*पु.* १. अध्यक्ष. २. छाती. ३. छावणी; मुख्य ठाणें; 'हेडक्वार्टर'. –*अव्य.* वर.– (**रे**) **अमीन** – *पु.* न्यायाधीशाच्या हाताखालचा अधिकारी; दुय्यम न्यायाधीश; 'सबजज'. –० **आज़म**–*पु.* पंतप्रधान. –०**आला** – *पु.* सत्रन्यायाधीश; 'सेशन जज'. –०**जहाँ**–*पु.* मुसलमान स्त्रियांच्या समजुतीनुसार एक भूत. –०**दीवान** –*पु.* सरकारी खजिन्यावरील सर्वोच्च अधिकारी; महाकोषाध्यक्ष.–**नशीं**–*वि.पु.* १. अध्यक्ष. २. अग्रगण्य; प्रतिष्ठित. –**बाज़ार**–*पु.* मोठा बाजार.–**बोर्ड**–*पु.* महसूल खात्याचा सर्वोच्च विभाग.–**मक़ाम**–*पु.* मुख्य ठाणें; 'हेडक्वार्टर'. –**मालगुज़ार**–*पु.* स्वतःच सरकारांत शेतसारा भरणारा.

सदरी– *स्त्री.* [*अ.*]कोपरी; गंजी; बिनबाह्यांची बंडी.

सदर्थना* – *क्रि. स.* समर्थन करणें; दुजोरा देणें.

सदस्य–*पु.* १. सभासद; घटक; २. यज्ञ करणारा.

सदस्यता– *स्त्री.* सभासदत्व.

सदा–*अव्य.* १. सर्वदा; नेहमीं; २. सारखें; निरंतर–**बरत**–*पु.* सदावर्त; अन्नछत्र.–**बहार** – *वि.* सदैव फुलणारा, टवटवीत राहाणारा.–*पु.* सदाफुली.–**सुहागिन**–*वि. स्त्री.* १. अखंड सौभाग्यवती. २. वेश्या.

सदा– *स्त्री.* [*अ.*] १. प्रतिध्वनि. २. आवाज. मु० – **देना**; –**लगाना**– पुकारणें; हांक मारणें; आवाज देणें.

सदाई*–*अव्य.* सदैव; नेहमीं.

सदाक़त– *स्त्री.* [*अ.*] १. सत्य; सच्चेपणा. २. साक्ष.

सदारत– *स्त्री.* [*अ.*] अध्यक्षता.

सदाशय–*वि.* सज्जन; उदार.

सदिया– *स्त्री.* [*फा.*] लावा पक्ष्याची मादी; लावीण.

सदी– *स्त्री.* [*अ.*] १. शतक. २. शंभर वर्षें; 'सेंचुरी'.

सदूर*–*पु.* शार्दूल; सिंह.

सदोष–*वि.* दोषयुक्त; दोषी. **–मानवहत्या**– *स्त्री.* सदोष मनुष्यवध; 'कल्पेबल् होमिसाइड'.

सद्द+– *वि.* ताजें (सद्द पानी = ताजें पाणी). *–अव्य.** शीघ्र; त्वरित. *–पु.** शब्द; ध्वनि.

सद्द– *स्त्री.* [*फा.*] १. अडथळा; धोंड. २. भिंत. –(**द्दे**) **राह**– *वि.* मार्गांतील धोंड, अडथळा बनणारा.– –० **सिकंदर**– *स्त्री.* १. चीनची प्रचंड भिंत. २. अत्यंत मजबूत व टिकाऊ गोष्ट. [२. युद्ध.

सद्म– *पु.* १. घर; निवास.

सद्यः; **सद्य**–*अव्य.* १. आतांच; नुकतेंच. २. ताबडतोब.

सद्र– *पु.* पा० 'सदर'.

सधना–*क्रि.अ.* १. साधणें; काम पूर्ण होणें. २. स्वार्थ साधणें. ३. संवय होणें. ४. घोडा इ० शिकून तयार होणें.

सधर*–*पु.* वरचा ओंठ.

सधा–*वि.* तयार; निपुण; निष्णात. [अभ्यास करविणें.

सधाना–*क्रि. स.* साधविणें;

सन–*पु.* अंबाडी; ताग. *वि.* स्तब्ध.*–प्रत्य.** तृतीयेचा प्रत्यय.– *स्त्री.* 'सूंऽऽ' असा आवाज होणें.

सन– *पु.* [*अ.*] १. वर्ष; साल. २. संवत; शक.

सनअत– *स्त्री.* [*अ.*] १. कारागिरी; कला; कौशल्य. २. अलंकार. **–गर**–*पु.* कारागीर.

सनई– *स्त्री.* ताग; अंबाडी.

सनक– *स्त्री.* १. लहर; छंद. २. चीड. ३. विक्षिप्तपणा; छांदिष्टपणा. **मु०–चढ़ना;– सवार होना**–छंद लागणें; लहर येणें.

सनकना–*क्रि.अ.* १. लहरीपणा करणें. २. चिडणें. ३. वेडें होणें. ४. रागावणें. [चिडविणें.

सनकाना–*क्रि.स.* भडकाविणें;

सनकारना*–*क्रि.स.* १. खूण, इशारा करणें. २. खूण करून बोलावणें.

सनकियाना–*क्रि.स.* १. खूण करणें. २. वेड लावणें. *–क्रि. अ.* वेडें होणें; लहर येणें. [चक्रम्.

सनकी–*वि.* छांदिष्ट; लहरी;

सनद– *स्त्री.* [*अ.*] १. प्रमाण; पुरावा. २. दाखला; सनद; प्रमाणपत्र; 'सर्टिफिकेट'. ३. परवानगी; अनुमतिपत्र.*–वि.* प्रमाणरूप; विश्वसनीय.**–याफ़्ता**– *वि.* पदवी, सनद मिळविलेला; सनदी; पदवीधर.

सनदी–*वि.* [*अ.*] प्रमाणित; प्रमाणपत्र मिळविलेला. – *स्त्री.** वृत्तांत; हकीगत.

सनना–*क्रि.अ.* १ मिसळणें; भरणें; एकजीव होणें. २. विलीन होणें. ३. बरबटणें.

सननी– *स्त्री.* पाण्यांत भिजविलेला कोंडा इ०.

सनम–*पु.* [*अ.*] १. प्रियकर. २. मूर्ति.**–कदा;–खा़ना**–*पु.* १. मंदिर. २. प्रियतमेचें निवासस्थान.

सनमान*–*पु.* सन्मान. [करणें.

सनमानना*–*क्रि. स.* सन्मान

सनमुख*–*अव्य.*समोर; सन्मुख.

सनसनाना–*क्रि. अ.* सळसळणें; खवळणें; 'सन-सन' किंवा 'सूंऽऽ' असा आवाज होणें.

सनसनाहट – *स्त्री.* खळबळ; गोंगाट; 'सन-सन' असा आवाज.

सनसनी– *स्त्री.* १. खळबळ. २. निःस्तब्धता ३. आश्चर्य (भयामुळें वाटणारें). ४. घाबरेपणा.**–खेज़; –दार**–*वि.* खळबळजनक; खळबळ उडविणारें.

सनहकी– *स्त्री* [*अ.*] मुसलमानी पद्धतीचें मोठ्या बशीसारखें मातीचें भांडें; मोठी ताटली.

सना– *स्त्री.* [*अ.*] १. प्रशंसा. २. स्तुति.**–ख्वाँ**–*वि.* प्रशंसक; स्तुति करणारा

सनाका–*वि.* स्तब्ध; थक्क. **मु० –खाना**–१. थक्क होणें. २. स्तब्ध, सुन्न होणें. **– भरना** – सोसाट्याचा वारा वाहणें.

सनाथ–*वि.* १. स्वामियुक्त २. कृतकृत्य. ३.* सफळ. **मु०–करना**– आश्रय देणें. [पोटजात.

सनाढ्य–*पु.* ब्राह्मणांची एक

सनाय–*स्त्री.* [*फा.*] सोनामुखी.

सना(न्ना)ह–*पु.* कवच.

सनि*–*पु.* शनि.

सनिया–*पु.* रेशमी पंचा; सोवळें.

सनीचर*– *पु.* १. शनिवार. २. शनिग्रह. [साती.

सनीचरी– *स्त्री.* शनीची साडे-

सनेस-सा–*पु.* संदेश.

सनेह*–*पु.* स्नेह; मैत्री.

सनेहिया; सनेही–*वि.* स्नेह, प्रेम करणारा; स्नेही.

सनै–सनै*–*अव्य.* हळू हळू.

सनोबर–*पु.* [*अ.*] देवदार; चीड नांवाचें सुरूसारखें झाड.

सन्–*पु.* [*अ.*] संवत्; वर्ष.

सन्न–*वि.* १. स्तब्ध. २. चुप. ३. आश्चर्यचकित. ४. विषण्ण.

सन्नद्ध–*वि.* १. कसून बांधलेला; कंबर कसलेला; तयार. २. व्याप्त; युक्त.

सन्नाटा–*पु.* १. निःस्तब्धता; सामसूम. २. एकांतता. ३. शांतता. ४. औदासीन्य. ५. सोसाटा; वारा जोरानें वाहात असतां होणारा आवाज.*–वि.* १. स्तब्ध. २. निर्जन. **मु०– खींचना; –मारना** –गप्प बसणें; अळीमिळी करणें. **–छाना**–निःस्तब्धता पसरणें. –

(टे)का–सोसाटयाचा; सूं ऽ ऽअसा आवाज करीत वाहाणारा. (टे) में आना–आश्चर्यचकित होणें. –(टे) से–वेगानें; भर्रकन्; जोरांत.

सन्निकट–*अव्य.* १. जवळ. २. सुमारें; जवळ जवळ; 'अॅप्रॉक्सिमेट.

सन्निपात–*पु.* १. एकदम पडणें. २. एकत्र येणें. ३. वात–पित्त–कफ हीं तीन्ही एकाच वेळीं बिघडणें. ४. मेंदूचा विकार; चित्तभ्रम.

सन्निविष्ट–*वि.* १. जवळ बसलेला. २. लीन; प्रविष्ट. **–करना** –*क्रि. स.* काढलेल्या शब्दांच्या जागीं दुसरे शब्द घालणें; 'टु इन्सर्ट'.

सपक्ष–*वि.* १. पंख असलेला. २. पक्षाचा. ३. मित्र, सहायक असलेला.–*पु.* मित्र; सहायक; समर्थक. [बाजूचीं लाकडें.

सपट्टी–*स्त्री.* चौकटीचीं दोन्ही

सपत–दि–*–*अव्य.* शीघ्र; लवकर.

सपन*–*पु.* स्वप्न.

सपना–*पु.* स्वप्न. **मु०– होना**–अप्राप्य, दुर्लभ होणें.

सपरदा; सपरदाई–*पु.* कलावंतिणीबरोबर वाद्य वाजविणारा साथीदार; साजिंदा.

सपरना–*क्रि. अ.* १. पुरें होणें; होऊं शकणें. २.+ स्नान करणें.

सपरस*–*वि.* स्पृश्य; स्पर्शयुक्त.

सपराना–*क्रि. स.* १. पूर्ण, समाप्त करणें. २.+ न्हाऊं घालणें.

सपरिश्रम–*वि.* परिश्रमासह; परिश्रमपूर्वक. **–कारावास**–*पु.* सक्तमजुरीची शिक्षा; 'रिगरस इम्प्रिझनमेंट'.

सपरिषद गवर्नर–*पु.* 'गव्हर्नर इन कौन्सिल'.

सपाट–*वि.* १. समतल; चौरस; सपाट. २. गुळगुळीत.

सपाटा–*पु.* झपाटा; वेग; गति. **मु० सैरसपाटा**–*पु.* सहल.

सपित्र्य–*वि.* सगोत्र; 'अॅग्नेट'.

सपुर्द–*स्त्री.* [*फा*]. अनामत; ठेव.–*वि.* सोंपविलेला; एखाद्याच्या हवालीं केलेला.

सपूत–*पु.* सुपुत्र.

सपूती–*स्त्री.* सत्पुत्राला जन्म देणारी माता; सुपुत्राची माता.

सपेत*–*वि.* सफेद; पांढरा.

सपेद–*वि.* [फा.] १. श्वेत; सफेद; पांढरा. २. गौर वर्णाचा. ३. कोरा.

सपेरा–*पु.* गारुडी.

सपे(पो)ला–*पु.* सापाचें पिलूं.

सप्ताह–*पु.* १. आठवडा. २. सप्ता (उत्सव; कथा इ० चा).

सप्रतिबंध–*वि.* सशर्त. **–स्वीकृति**–*स्त्री.* सशर्त मान्यता; 'कंडीशनल ऑर क्वालिफाइड अॅक्सेप्टन्स'.

सफ़–*स्त्री.* [*अ.*] १. ओळ; रांग. २. मोठी चटई. **–आरा**–*वि.* युद्धासाठीं सैनिकांना ओळींत उभें करणारा; जिद्दीनें लढणारा. **–बंदी**–*स्त्री.* रांग करणें. **–बस्ता**–*वि.* पंक्तिबद्ध. **मु०–उलट देना**–सैनिकांची आघाडी उधळून लावणें.

सफताल़ू–*पु.* सप्ताळू (एक फळ).

सफ़र–*पु.* [*अ.*] १. प्रवास. २. हिजरी सनाचा दुसरा महिना. **–खर्च**–*पु.* प्रवासखर्च. **–नामा**–*पु.* प्रवासवर्णन.

सफ़रजल–*पु.* [*अ.*] १. नासपातीसारखें बिही नांवाचे एक फळ. २. पेरू. [दाई'.

सफरदाई–*पु.* पा० 'सपर-

सफ़रमैना–*पु.* [*इं.*] सैन्याच्या पुढें जाऊन रस्ते करणें, खंदक खोदणें इ० कामें करणारे शिपाई; 'सॅपर्स अॅंड मायनर्स'.

सफरा–*पु.* [*अ.*] पित्त.

सफ़री–*वि.* [*अ.*] प्रवासांत उपयोगी पडणारा; प्रवासी. –*पु.* १. प्रवासी. २. पेरू; जांब. –*स्त्री.* २. प्रवासखर्च. २. शिदोरी.

सफल–*वि.* १. फळ लागलेलें (झाड). २. यशस्वी; कृतकार्य; सफळ.

सफलता–*स्त्री.* १. यश; यशस्विता. २. पूर्णता.

सफ़हा–*पु.* [*अ.*] १. पृष्ठ; पान. २. विस्तार; फैलाव. – (**हए) हस्ती**–*पु.* जग; इहलोक. **मु० सफ़हए हस्ती से उठ जाना**–मरणें.

सफ़ा–*वि.* [*अ.*] १. साफ; स्वच्छ. २. पवित्र; शुद्ध. ३. गुळगुळीत.–*स्त्री.* १. सफाई; स्वच्छता. २. मक्केजवळची एक टेकडी.**–चट**–*वि.* १. गुळगुळीत; तुळतुळीत. २. स्वच्छ; साफसूफ. **मु०–कर देना**–१. साफ करून टाकणें. २. निकाल लावणें; चटणी उडविणें.

सफ़ाई–*स्त्री.* [*अ.*] १. स्वच्छता; झाडलोट. २. स्पष्टता. ३. निष्कपटता. ४. निर्दोषपणा. ५. निर्णय; निकाल. ६. बचाव; कैफियत. ७. नाश. ८. चपळता; सफाईदारपणा. ९. मिलाफ; तडजोड. **–का गवाह**–*पु.* बचाव पक्षाचा साक्षीदार. **मु०–कर देना**–१. साफ करून टाकणें. २. देणें चुकतें करणें. ३. निकाल लावणें. **–देना**–बाजू मांडणें. **–हो जाना**–मिलाफ, तडजोड होणें.

सफ़ाया–*पु.* [*अ.*] १. फडशा; निकाल. २. पूर्ण नाश; संहार.

सफ़ीना–*पु.* [*अ.*] १. आज्ञापत्र; बोलावणें; 'समन्स'. २. होडी; नाव. ३. पुस्तक; वही.

सफ़ीर–*पु.* [*अ.*] १. राजदूत. २. परराष्ट्रीय वकील.

सफीर–ल–*स्त्री.* १. पक्ष्यांची किलबिल. २ शिटी. ३. आवाज.

सफ़ूफ़–*पु.* [*अ.*] चूर्ण; चूर्णरूप औषध.

सफ़ेद–*वि.* [*फा.*] १. पांढरा; शुभ्र. २. कोरा. **–झूट**–*वि.* साफ खोटें; धडधडीत असत्य. **–पोश–पु.** १. स्वच्छ कपडे वापरणारा; पांढरपेशा. २. सज्जन; शिष्ट. ३. श्रीमंत नसून चांगले कपडे वापरणारा. **मु०–पड़ जाना**–भीतीनें, किंवा आजारानें चेहरा पांढरा फटफटीत पडणें.

सफ़ेदा–*पु.* [*फा.*] १. जस्त फूल. २. आंब्याचा एक प्रकार. ३. खरबुजाचा एक प्रकार. ४. पांढरें खोड असलेलें एक काश्मीरी झाड.

सफ़ेदी–*स्त्री.* [*फा.*] १. शुभ्रपणा. २. चुना देणें; रंग देणें. **मु० –आना**– १. म्हातारपण येणें. २. केस पिकणें.

सफ़्फ़ाक–*वि.* [*अ.*] क्रूर; निर्दय.

सबंध–*वि.* जामीन दिलेला. **–मुक्ति**–*स्त्री.* विशिष्ट मुदतीसाठीं केलेली सशर्त सुटका; 'पॅरोल'.

सब–*वि.* १. सर्व; सगळें. २. एकंदर. **–दूर**–*अव्य.* सर्वत्र; सगळीकडे.

सबक़–*पु.* [*अ.*] १. धडा; पाठ. २. अद्दल. **मु०–पढ़ाना**– १. शिकविणें. २. भलतेंच मनांत भरवून देणें. **–सिखाना**–१. अद्दल घडविणें. २. शिकविणें.

सबज–*वि.* पा० 'सब्ज़'.

सबद*–*पु.* १. शब्द. २. संतवाणी; भजन.

सबनाना–*क्रि. स.* साबू लावणें.

सबब–*पु.* [*अ.*] १. कारण; सबब. २. साधन. –*अव्य.* कारणानें; मुळें.

सबर–*पु.* पा० 'सब्र'.

सबरा*–*वि.* सर्व; सगळें.

सबरी–*स्त्री.* १. पहार. २.* शबरी. [२. सेनायुक्त.

सबल–*वि.* १. सशक्त; बलवान्.

सबल(ला)ई–*स्त्री.* सामर्थ्य; सबलता.

सबा–*स्त्री.* [*अ.*] सकाळीं पूर्वेकडून येणारा थंड वारा; मंद समीर. [काळ.

सबार–रा*–*पु.* सकाळ; प्रातः-

सबार–रै*–*अव्य.* लौकर; घाईनें.

सबी*–*स्त्री.* चित्र; तसबीर.

सबील–*स्त्री.* [*अ.*] १. मार्ग; सडक. २. उपाय; युक्ति. ३. पाणपोई.

सबीह–*स्त्री.* पा० 'शबीह'. –*वि.* [*अ.*] गोरापान.

सबू–*पु.* पा० 'सुबू'.

सबूत–*पु.* [*अ.*] पुरावा; प्रमाण.

सबूर–*वि.* [*अ.*] १. धीर धरणारा. २. क्षमाशील.

सबूरा–*पु.* स्त्रियांची (विशेषतः विधवांची) कामवासना तृप्त करण्यासाठीं वापरलें जाणारें लाकडी किंवा कातडी पुरुषी जननेंद्रिय.

सबूस–*स्त्री.* [*फा.*] कोंडा; भुसा.

सबूह–*स्त्री.* [*अ.*] सकाळीं पिण्याची मदिरा.

सबूही–*स्त्री.* [*अ.*] १. सकाळीं पिण्याची मदिरा. २. दारूची बाटली.

सबेरा–*पु.* सकाळ.

सब्ज़–*वि.* [*फा.*] १. कच्चा; ताजा. २. हिरवें (फळ; फूल); हिरवेंगार. ३. शुभ. **मु० – बाग़ दिखलाना**–काम करून घेण्यासाठीं आमिष दाखविणें. **–क़दम**–*वि.* पांढऱ्या पायाचा; अपशकुनी. **–परी –स्त्री.** १. मदिरा. २. सुंदर हिरवी वस्तु. **–पोश**–*वि.* हिरव्या रंगाचें कपडे वापरणारा, घातलेला.

सब्ज़ा–*पु.* [*फा.*] १. हिरवळ. २. भांग. ३. एक रत्न. ४. करड्या रंगाचा घोडा. ५. नुकतीच उगवलेली दाढी, मिसरुड. **–ज़ार–पु.** हिरवळ; हिरवेंगार मैदान. **मु०– आना**–दाढी-मिशा येऊं लागणें.

सब्ज़ी–*स्त्री.* [*फा.*] १. भाजी; पाले-भाजी. २. भांग ३. हिरवा पाला, वनस्पति इ० **– मंडी**–*स्त्री.* मंडई; भाजीबाजार.

सब्त–*पु.* [*अ.*] लेख; लिखाण. **मु०– करना**–लिहिणें.

सब्र–*पु.* [*अ.*] १. सहनशीलता. २. धैर्य; धीर. ३. संतोष. **–आज़्मा** –*वि.* सहनशीलतेची कसोटी पाहाणारा. **मु०– आना**–धीर येणें. **–करना**–१. सहन करणें. २. धीर धरणें. **–का फल मीठा**–धीर धरल्यास त्याचा चांगला परिणाम होतो. **–पड़ना**–१. दुःखिताच्या कष्टांचा परिणाम होणें. २. धीर धरल्यामुळें केलेल्या कष्टाचें फळ मिळणें. ३. सहनशीलतेच्या मोबदल्यांत जुलूम करणाऱ्याला ईश्वराकडून शिक्षा मिळणें.

सभा–*स्त्री.* १. सभा; बैठक. २. संस्था; समिति. ३. दरबार; न्यायालय. **–कक्ष–पु.** सभागृहाबाहेरील मोकळी जागा, दिवाणखाना; 'लॉबी'. **–त्याग–पु.**

सभात्याग; 'वॉक आउट'.**–नेता** *पु.* सभागृहाचा; नेता; 'लीडर ऑफ दि हाउस'. **–पति** *पु.*– अध्यक्ष.**–सचिव–***पु.* संसद्‌–सचिव; 'पार्लमेंटरी सेक्रेटरी'.

सभाग्रणी–*पु.* पा० 'सभानेता'.

सभी–*वि.* [सब + ही] सर्वच; सर्वजण; सगळेच.

सभ्य–*वि.* १. सुसंस्कृत; शिष्ट; नम्र. २. सभेशीं संबंधित. *–पु.* १. सभासद. २. पंच. ३. कुलीन पुरुष.

सभ्यता– *स्त्री.* १. संस्कृति; नागरिकता; 'सिव्हिलायझेशन'. २. शिष्टाचार; सभ्यपणा. ३. सुशिक्षितपणा. ४. भलेपणा; माणुसकी.

समंजन–*पु.* सोय; तडजोड; व्यवस्था; 'अॅड्‌जस्टमेंट'.**–कारी** *–वि.* तडजोडीचें; 'अॅडजस्टिंग'.

समंजस–*वि.* १. उचित; योग्य. २. अभ्यास केलेला; माहितगार; अनुभवी. ['अॅडजस्टेड'.

समंजित–*वि.* तडजोड केलेलें;

समंद–*पु.* [*फा.*] चांगल्या जातीचा घोडा.

समंदर*–*पु.* समुद्र; सागर.

सम–*वि.* १. तुल्य; बरोबरीचा; समान. २. विषम नसलेला; सम.– *स्त्री.* १. संगीतांतील सम. २.* समता; बरोबरी.**–कक्ष** *–वि.* बरोबरीचा; तोडीचा. **–०सरकार–** *स्त्री.* प्रतिसरकार; 'पॅरलल गव्हर्नमेंट'.**–कालीन** *–वि.* समकालीन; 'कॉंटेंपोररी'. **–कोण–***पु.* काटकोन; समकोन; 'राइट अँगल'.**–० त्रिभुज–***पु.* काटकोन त्रिकोण; 'राइट अँगल्ड टॅंगल'. **–कोणिक रेखा–** *स्त्री.* समकोनिक रेखा; 'आयसोगॉनिक लाइन'. **–क्षणिक–***वि.* एककालीन; एकदम होणारा; 'सिमल्टेनियस'.**–क्षेत्र** *–पु.* सपाट भागाची आकृति; 'प्लेन फिगर'.**–घात–***वि.* सजातीय; एकजिनसी; 'होमोजीनियस'.**–चतुर्भुज–***पु.* समभुज चौकोन; 'ऱ्हॉम्बस'.**–जातीय–***वि.* सजातीय; एकजिनसी; 'होमोजीनियस'.**–तल–***वि.* सपाट; 'प्लेन'. **–***पु.* सपाट पृष्ठभाग; 'प्लेन सरफेस'.**–० कोण–***पु.* 'प्लेन अँगल.'**–कलाकृति–** *स्त्री.* पा० 'समक्षेत्र.'**–तापीय–***वि.* समोष्णदर्शक; 'आइसोथर्मल'.**–त्रिबाहु त्रिभुज–***पु.* समभुज त्रिकोण; 'ईक्विलॅटरल ट्रॅंगल'.**–त्रिभाजन** *–पु.* समान तीन भाग करणें; **–दाब रेखा–** *स्त्री.* 'ट्रायसेक्शन'. समभार रेषा; 'आइसोबार'. **–दिक्–***वि.* समदिक्; समगुण; 'आइसोट्रॉपिक'.**–द्विबाहु त्रिभुज** *–पु.* समद्विभुज त्रिकोण; 'आइसॉसिलीस ट्रॅंगल'.**–द्विभाग करना** *क्रि. स.* दोन समानभाग करणें; 'टु बायसेक्ट'.**–द्विभाजक–***पु.* दोन समान भाग करणारी रेषा; 'वायसेक्टर'.**–नतिक–***वि.* समचुंबकरेखीय; समपात रेखीय; 'आइसॉक्लिनिक'. **–परिधान–***पु.* गणवेश; 'युनिफॉर्म'. **–बहुभुज–***पु.* 'रेग्युलर पॉलिगॉन'. **–बाहु–***वि.* समभुज; 'ईक्विलॅटरल'.**–भुज बहुभुज–***पु.* 'इॅक्विलॅटरल पॉलिगॉन'. **–मत** *–वि.* प्रमाणबद्ध; समप्रमाणांतला; 'सिमिट्रिकल'. **–मिति–** *स्त्री.* प्रमाणबद्धता; बांधेसूदपणा; 'सिमिट्री'.**–मूल्य–***पु.* साधारण, नेहमींची किंमत; 'पार'.**–मूल्य-पर–***अव्य.* दर्शनी किंमतीबरोबर; 'अॅट पार'.**–रूप–***वि.* सारखा; तसाच; 'सिमिलर'.**–० प्रस्ताव** *–पु.* एखाद्या दुसऱ्या ठरावासारखा ठराव; 'आयडेंटिकल मोशन'. **–रूपता–** *स्त्री.* सादृश्यता; 'अॅनॅलॉजी'.**–वर्ती–***वि.* बरोबर असणारा; 'कंकरंट'.**–वितरण–***पु.* शिधावांटप; 'राशनिंग'.**–शीतोष्ण कटिबंध–***पु.* समशीतोष्ण कटिबंध; 'टेंपरेट झोन'.**–सामयिक–***वि.* समकालीन; 'कॉंटेंपोररी'. [गरळ.

सम–म्म–*पु.* [*अ.*] विष;

समअ–*पु.* [*अ.*] कान.**–खराशी** *– स्त्री.* बडबड करून डोकें उठविणें.

समग्ग–*वि.* समग्र; पूर्ण.

समझ– *स्त्री.* १. समजूत. २. बुद्धि; अक्कल.**–दार–***वि.* समजूतदार; शहाणा.

समझना–*क्रि. अ.* १. जाणणें; समजून घेणें. २. समजणें; वाटणें. **समझ–बूझकर–***अव्य.* जाणून बुजून; मुद्दाम. **मु० समझ रखना** –लक्षांत ठेवणें; जाणून असणें. **समझ लेना**–१. सूड उगविणें. २. तडजोड करणें. ३. जाणणें; समजून घेणें. [समजूत घालणें.

समझाना–*क्रि. स.* समजाविणें;

समझाव–वा–*पु.* समजूत; समजावणी.

समझौता–*पु.* तडजोड; आपसांतील करार.

समतल–*वि.* सपाट. [बरी.

समताई*– *स्त्री.* समता; बरो-

समतूल*–*वि.* १. समान; २सदृश. . समतोल.

समथ*–*वि.* समर्थ.

समथल–*वि.* सपाट.

समदन–*पु.* १. लढाई. २. भेट; नजराणा.

समदना*–*क्रि. अ.* भेटणें.–*क्रि.*

स. १. भेट, नजराणा देणें; अहेर करणें. २. लग्न करून देणें.

समदाना*–क्रि. स. १. सोंपविणें; सुपुर्त करणें. २. ठेवणें.

समधिन– स्त्री. विहीण.

समधियान–ना– पु. मुलाची सासुरवाडी; मुलीचें सासर; व्याह्याचें घर.

समधी–पु. व्याही.

समधौरा+– पु. लग्नामध्यें व्याह्यांनीं एकमेकांना भेटण्याचा विधि. [कारी बोलावणें.

समन–पु. [इं.] समन्स; सर-

समनुदेशन– पु. सोंपविणें; 'असाइनमेंट'. [प्लोरेशन'.

समन्वेषण–पु. संशोधन; 'एक्स्-

समपहरण–पु. जप्ती; सरकारजमा करणें; 'कॉन्फिस्केशन'.

समप्पन*–पु. समर्पण.

समय–पु. १. वेळ; काळ. २. सवड; फुरसत. **–क**–पु. अधिकारपत्र; 'चार्टर'. **–दान**–पु. भेट इ० साठीं वेळ देणें, ठरविणें; 'एंगेजमेंट'. **–निष्ठ**–वि. वक्तशीर; 'पंक्चुअल'. **–पत्र**–पु. पा० 'प्रतिश्रुतिपत्र'. **–सारिणी; –सूची**– स्त्री. वेळापत्रक; 'टाइम टेबल'.

समर–पु. लढाई; युद्ध.

समर–रा–पु. [अ.] १. फळ. २. लाभ. ३. धन; संपत्ति. ४. संतान. [बलवान्.

समरत्थ; समरथ*–वि. समर्थ;

समराना*–क्रि. स. १. नेसविणें; अंगावर, अंगांत घालणें. २. सजविणें. [पुरावा.

समर्थन–पु. पाठिंबा; पाठ-

समर्पक–पु. समर्पण करणारा.

समर्पण–पु. देणें; अर्पण करणें. **–मूल्य**–पु. मुदत भरण्यापूर्वीं विमापत्रक परत दिल्यास विमाधारकाला मिळणारें धन; 'सरेंडर व्हॅल्यू'.

समर्पना*–क्रि. स. १. देणें; सोंपविणें. २. समर्पण करणें.

समर्पित–वि. दिलेला; समर्पण केलेला. ['ब्लॉकेड'.

समवरोध– पु. नाकेबंदी;

समवाय–पु. १. संयोग. २. समूह. ३. अनुबंध; मेळ. ४. नित्य संबंध. ५. मंडळ; मंडळी; 'कंपनी'.

समवेत–वि. संयुक्त; संबद्ध; अंतर्भूत. **–होना**–क्रि. अ. एकत्र असणें, येणें, होणें; 'टु मीट'; 'टु असेंबल'. [मेळावा; 'रॅली'.

समवेतन–पु. एकत्र येणें, जमणें;

समवेदना– स्त्री. सहानुभूति.

समसर*– स्त्री. बरोबरी.

समसेर*– स्त्री. समशेर; तलवार.

समस्या– स्त्री. १. कूट, बिकट प्रश्न; 'प्रॉब्लेम'. २. मिश्रण. ३. संघटन. **–पूर्ति**– स्त्री. १. समस्या पुरी करणें. २. दिलेल्या चरणावरून श्लोक पुरा करणें. ३. कोडें सोडविणें

समाँ–पु. १. समय; ऋतु; वेळ. २. सुंदर दृश्य. **मु०–बँधना**– मैफिल रंगणें; रंग येणें.

समांग–वि. सजातीय; सारखा; एकजिनसी; 'होमोजीनियस'.

समा–पु. [अ.] १. आकाश. २. पा० 'समाँ'.

समाअत– स्त्री. [अ.] १. ऐकणें; श्रवणशक्ति. २. खटल्याची सुनावणी.

समाई– स्त्री. १. समावेश. २. सामर्थ्य.

समाई––वि. [अ.] ऐकीव; दुसऱ्यांनीं सांगितलेला. [सोय.

समाउ*–पु. १. समावेश. २.

समाकलन–पु. जमा; जमा करणें; 'क्रेडिट'. [येणें; 'रॅली'.

समागमन–पु. मेळावा; एकत्र

समाचार–पु. बातमी; हकीगत. **–पत्र**–पु. वृत्तपत्र. **–प्रसारण**–पु. आकाशवाणीवरून बातम्या देणें; वृत्तक्षेपण. **–प्रेष**–पु. वृत्तपत्राला पाठविलेली बातमी; 'न्यूज डिस्पॅच'. **–सूचना**– स्त्री. सरकारी विज्ञप्ति; बातमीच्या रूपानें प्रसिद्ध झालेली माहिती; 'प्रेस-नोट'.

समाज–पु. समाज; समुदाय; समूह. **–वाद**–पु. समाजवाद; 'सोशॅलिझम'. **–वादी**–वि. समाजवादी; 'सोशॅलिस्ट'. **–शास्त्र**–पु. समाजशास्त्र; 'सोशियॉलॉजी'.

समाजत– स्त्री. खुशामत; अनुनय. [२. साजिंदा.

समाजी–पु. १, आर्यसमाजी.

समाजीकरण–पु. समाजाच्या मालकीचें करणें; 'सोशलायझेशन'.

समाधान–पु. १. मेळ घालणें. २. शंका-निवारण. ३. ध्यान; समाधि. [संतोष, समाधान करणें.

समाधानना*–क्रि. स. सांत्वन,

समाधिलेख–पु. समाधीवरील मजकूर; 'एपिटा'.

समाधेय–वि. आपसांत मिटवितां येण्यासारखा (गुन्हा, भांडण इ.); 'कंपाउंडेबल'.

समान–वि. सारखा. **–कोणिक बहुभुज**–पु. 'ईक्विॲंग्युलर पॉलिगॉन'. ['आयडेंटिकल'

समानक–वि. सारखा; तसाच;

समानांतर–वि. समांतर; 'पॅरलल'. **–चतुर्भुज**–पु. समांतरभुज चौकोन; 'पॅरललोग्राम'. **–रेखाएँ**– स्त्री. समांतर रेषा; 'पॅरलल लाइन्स'.

समाना–*क्रि. अ.* सामावणें; आंत राहाणें. –*क्रि. स.* भरणें; ठेवणें.

समानार्थक–*वि.* समान किंवा सारखा अर्थ असलेले (शब्द).

समापन–*पु.* पूर्ण, समाप्त करणें; समारोप; 'वाइंडिंग अप'; 'क्लोजर'. **–प्रस्ताव**–*पु.* चर्चाबंदीचा ठराव; 'मोशन ऑफ क्लोजर'.

समापनीय–*वि.* १. समाप्त करण्यास योग्य. २. वध्य. ३. संपणारा; समाप्त होणारा. **–पट्टा**–*पु.* कांहीं काळानंतर रद्द होणारा मक्ता, करार, कौल; 'टर्मिनेबल लीज'.

समापिका–*स्त्री.* वाक्यपूर्ति करणारें क्रियापद. ['अॅबेटमेंट'.

समाप्ति–*स्त्री.* अंत; शेवट;

समायतिक रेखा–*स्त्री.* 'आयसोकोर'. ['सप्लाय'.

समायोजन–*पु.* पुरवठा;

समारंभ–*पु.* १. आरंभ. २. कार्य.

समारोपण–*पु.* १. आरोप करणें. २. ठेवणें. ३. स्थानांतरण.

समारोह–*पु.* १. समारंभ; उत्सव. २. धामधूम. ['पॅरिटी'.

समार्हता–*स्त्री.* समानता;

समाली–*स्त्री.* फुलांचा गुच्छ; पुष्पगुच्छ. [कार.

समालोचक–*पु.* विवेचक; टीका-

समालोचन–*पु.* परीक्षण; गुणदोषविवेचन. [क्षण; निरीक्षण.

समालोचना–*स्त्री.* टीका; परी-

समावर्तन–*पु.* १. परत येणें. २. अध्ययन संपल्यावर विद्यार्थ्यानें घरीं जाणें. **–संस्कार**–*पु.* विद्यार्थ्यांचें शिक्षण संपल्यावर होणारा निरोपाचा किंवा पदवीदानाचा संस्कार, उत्सव.

समाविष्ट–*वि.* १. समावेश केलेला; समाविष्ट. २. बसलेला. ३. एकाग्रचित्त. [अस्मानी.

समावी–*वि.* [*अ.*] दैवी;

समावेशन–*पु.* १. समावेश करणें; 'इन्कॉर्पोरेशन'. २. जोडून घेणें; खालसा करणें; 'अॅनेक्सेशन'.

समाश्रित–*वि.* अधिष्ठित; अवलंबित; आधारित. ['वॉरंट'.

समाश्वासन–*पु.* हमी; खात्री;

समास–*पु.* १. समास. २. संक्षेप. **–चिह्न**–*पु.*; **–रेखा**–*स्त्री.* संयोगचिन्ह; 'हायफन'.

समाहर्ता–*वि.* गोळा करणारा. –*पु.* कर इ० गोळा करणारा.

समाहार–*पु.* १. समूह. २. जोड. ३ संक्षेप.

समिति–*स्त्री.* संस्था; सभा; समाज; समिति; मंडळ.

समीकरण–*पु.* १. समान, बरोबर करणें; समीकरण; 'ईक्वेशन'. –*पु.* जमीन, रस्ता इ० करण्याचा रूळ; 'रोलर'.

समीक्षा–*स्त्री.* १. परीक्षण. २. टीका. ३. बुद्धि. ४. प्रयत्न.

समीचीन–*वि.* सुसंगत; यथार्थ; योग्य. ['ब्रीझ'.

समीर–*पु.* मंदवायु; झुळुक;

समीरण–*पु.* १. वारा. २. प्राणवायु.

समुंद; **समुंदर***–*पु.* समुद्र.

समुचित–*वि.* १. उचित; योग्य. २. हवातसा. [सॉर मेकॅनिझम'.

समुच्छल विधि–*स्त्री.* 'सेन्-

समुझ; समुझ (झा) ना*–पा० 'समझ'; 'समझ (झा) ना'.

समुझनि*–*स्त्री.* समज; बुद्धि.

समुद*–*पु.* समुद्र. [२. समुदाय.

समुदय–*पु.* १. उदय; सूर्योदय.

समुदायि-व–*पु.* समुदाय; समूह; रास.

समुद्री–*वि.* सागरी. **–तार**–*पु.* जलमार्गानें पाठविलेली तार; 'केबल'.

समुन्नत–*वि.* १. वर उचललेला; उंच. २. विशेष उन्नत.

समुन्नति–*स्त्री.* १. उन्नति; विकास. २. मोठेपणा.

समुल्लास–*पु.* १. उल्हास; आनंद. २. प्रकरण; परिच्छेद.

समुहा*–*वि.* समोरील; पुढचा. –*अव्य.* समोर; पुढें. [येणें.

समुहाना*–*क्रि. अ.* पुढें, समोर

समुहें–**अव्य.* समोर. [सर्व.

समूचा–*वि.* संपूर्ण; समग्र;

समूर-रु–*पु.* सांबर.

समूह–*पु.* १. समुदाय. २. ढीग; रास. ३. समाज. **–कार्य**–*पु.* समाजकार्य. **–फल**–*पु.* 'इटॅरिओ' **–वाद**–*पु.* सामुदायिकतावाद; 'कलेक्टिव्हिझम्'.

समूहोत्पादन–*पु.* प्रचंड प्रमाणावरील उत्पादन; 'मास प्रॉडक्शन'.

समेटना–*क्रि. स.* १. गोळा करणें; आवरणें; एकत्र करणें. २. आपल्यावर ओढून घेणें. ३ घडी घालून ठेवणें.

समेत–*अव्य.* समवेत; सह. –*वि.* संयुक्त; एकत्र.

समै; **समैया**; **समो***–*पु.* समय; वेळ.

समोना–*क्रि. स.* १. मिसळणें; विसण घालणें. २.* समन्वय करणें; मेळ घालणें. –*क्रि. अ.** अनुरक्त होणें.

समोय*–*अव्य.* अनुरक्त होऊन.

समोसा–*पु.* सामोसा (तिखटमिठाचें एक पक्वान्न).

समौ*–*पु.* समय; वेळ.

समौरिया+–*वि.* १. समवयस्क. २. ज्यांचीं लग्नें एकाच वेळीं झालीं

आहेत असे.

सम्बुल–*पु.* [*अ.*] एक प्रकारची सुगंधित वनस्पति (याची उपमा केसांना देण्यांत येते).

सम्मंत्रणा–*स्त्री.* विचारविनमय; 'कॉन्फरन्स'.

सम्म–*पु.* [*अ.*] विष.

सम्मत–*वि.* १. सहमत; अनुकूल. २. मान्य; मंजूर.

सम्मति– *स्त्री.* १. अभिप्राय. २. सल्ला. ३. अनुमति; आज्ञा; मान्यता. ['समन्स'.

सम्मन–*पु.* [इं.] हुकूमनामा;

सम्मान–*पु.* १. सन्मान; आदर. २. मोजमाप; तुलना.

सम्मिलन–*पु.* १. एकत्र होणें; सम्मेलन. २. विलीनीकरण; 'ॲक्सेशन'. **–विलेख**–*पु.* विलीनीकरणाचा करार; 'इन्स्ट्रुमेंट ऑफ ॲक्सेशन'. [लेला; एकत्र.

सम्मिलित–*वि.* मिश्रित; मिसळ-

सम्मिश्रक – *पु.* दवाखान्यांत औषध तयार करणारा; 'कंपाउंडर'.

सम्मीलन–*पु.* १. मिटणें; झांकून घेणें; बंद होणें (फूल डोळे इ०). २. खग्रास ग्रहण.

सम्मीलित–*वि.* ज्यानें डोळे झांकून घेतले आहेत असा; सुप्त; मिटलेला.

सम्मुख–*अव्य.* समोर; समक्ष. –*वि.* १. समोरचा. २. अनुकूल. **–कोण**–*पु.* 'व्हर्टिकली ऑपोझिट ॲंगल्स'.

सम्मेलन–*पु.* १. सभा; समाज; परिषद; सम्मेलन; मेळावा. २. मिश्रण. ['रिलीज'.

सम्मोचन *पु.* सुटका; मुक्तता;

सम्मोदन–*पु.* अधिकृत स्वीकृति; 'सँक्शन'.

सम्मोहनविद्या–*स्त्री.* वशीकरणविद्या; 'हिप्नॉटिझम्'.

सम्यक्–*वि.* १. पूर्ण; सर्व. २. योग्य; उपयुक्त. –*अव्य.* १. सर्व प्रकारें. २. योग्य प्रकारें.

सम्रथ*–*वि.* समर्थ.

सम्हलना–*क्रि. अ.* सांभाळणें; आवरणें; धरणें.

सम्हार*–*पु.* पा० 'सँभार'.

सम्हालना–*क्रि. स.* पा० 'सँभालना'.

सय[+] –*पु.* शंभर (संख्या).

सयं–*पु.* [*फा.* 'शय'] १. वस्तु. २. छाया.

सयन*– *स्त्री.* सैन्य. –*पु.* १. शयन. २. अंथरूण. ३. पा० 'सैन'.

सयल*–*वि.* सकल; सर्व.

सयान*–*पु.* शहाणपणा; समजूतदारपणा. –*वि.* चतुर. **–प; –पन**–*पु.* शहाणपणा; हुशारी; चातुर्य.

सयाना–*पु.* १. वयस्क; अनुभविक. २. मांत्रिक; पंचाक्षरी. ३. वयांत आलेला. ४. पुढारी. –*वि.* १. वयांत आलेला. २. तरतरीत; हुशार. ३. चलाख. ४. शहाणा.

सरंजाम–*पु.* [*फा.*] १. पूर्तता; कामाची परिसमाप्ति. २. तयारी; व्यवस्था.

सरंध्र–*वि.* सच्छिद्र; 'पोरस'.

सर–*पु.* [*फा.*] १. डोकें. २. सरदार; नेता. ३. शक्ति; बळ. ४. आरंभ. ५. पत्त्याच्या डावांतील मोठा पत्ता (राजा, एक्का इ०). –वि. जिंकलेला; विजित. **–अंजाम** –*पु.* १. कार्याची समाप्ति; पूर्तता. २. सामग्री. ३. व्यवस्था **–अफ़राज़** –*वि.* १. उच्च पदावर असलेला. २. घमेंडखोर. **–करदा**–*वि.* सरदार; पुढारी. **–कश**–*वि.* १. बंडखोर. २. उद्धट; न दबणारा. **–कशी**–*स्त्री.* १. उद्धटपणा. २. बंडखोरी. **–कोब**–*वि.* डोकें ठेंचणारा. २. शिक्षा करणारा. –पु. तोफखाना. **–कोबी**– *स्त्री.* डोकें ठेंचणें; पारिपत्य. **–खत**–*पु.* १. भाडेचिठ्ठी. २. पट्टीची पावती. ३. आज्ञापत्र; परवाना. ४. कर्जखत. ५. दस्तऐवज. ६. पगारपत्रक. **–ग़ना**–*पु.* सरदार; अग्रणी. **–गराँ**–*वि.* १. रुष्ट; क्रुद्ध. २. घमेंडखोर. **–गरामी**– *स्त्री.* १. डोकें जड होणें. २. रोष. **–गरोह**–*पु.* सरदार; पुढारी. **–गर्म**–*वि.* तत्पर; तयार; उत्साही. **–गर्मी**–*स्त्री.* उत्साह; तत्परता. **–गुज़श्त**–*स्त्री.* १. येऊन ठेपलेला, व्यतीत झालेला प्रसंग २. वर्णन; हकीगत; घटना. ३. जीवनचरित्र. **–गोशी**–*स्त्री.* १. कान भरणें; चुगली. २. निंदा. **–चश्मा**–*पु.* १. नदी वगैरेचा उगम; स्रोत. २. जलस्रोत; झरा. **–ज़द**–*वि.* प्रकट; जाहीर. **–ज़मीं; –ज़मीन**– *स्त्री.* १. देश; मुलूख. २. भूमि; जमीन. **–ज़ोर**–*वि.* १. शिरजोर; जबरदस्त. २. दुष्ट. ३. विरोधी; बंडखोर. **–ताज**–*पु.* पा० 'सिरताज'. **–दर्द**–*पु.* डोकेंदुखी; त्रास; कटकट. **–दार**–*पु.* १. पुढारी; नायक. २. शासक. ३. अमीर; श्रीमंत. **–०सभा**– *स्त्री.* 'हाउस ऑफ लॉर्डस्.' **–दारनी**–*स्त्री.* सरदारीण; सरदाराची बायको. **–दारी**– *स्त्री.* सरदारकी. **–नविश्त**–*स्त्री.* भाग्यलेख; नशीब. **–नाम**–*वि.* प्रसिद्ध; मशहूर. **–नामा**–*पु.* १. शीर्षक. २. पत्रावर लिहिला जाणारा पत्ता. ३. पत्राचा आरंभ किंवा शेवट; मायना. **–निगूँ**–*वि.* १. नतशिर. २. लज्जित. **–पंच**–*पु.*

मुख्य पंच; पंचांचा पुढारी. **–परस्त** –*पु.* आश्रयदाता; संरक्षक; विश्वस्त. **–परस्ती**– *स्त्री.* आश्रय; संरक्षण. **–पें(पे)च**–*पु.* शिरपेंच; पागोट्यांत खोंवण्याचा जडावाचा मोत्यांचा तुरा. **–पोश**–*पु.* १. झांकण. २. रहस्य; गुपित. **–फ़राज़** –*वि.* १. प्रतिष्ठित; सन्मानित. २. घमेंडखोर. ३. जिच्याशीं प्रथमच समागम झालेला आहे अशी वेश्या. (**मु० –करना–** मोठेपणा देणें; सन्मान करणें). **–फ़रोश**–*वि.* जिवावर उदार झालेला; आत्मबलिदान करणारा; निर्भय. **–फ़रोशी**– *स्त्री.* जिवावर उदार होणें; शौर्य; निर्भयता. **–बराह; –बराहकार**–*पु.* १. व्यवस्थापक. २. मजुरांचा पुढारी. **–बराही**– *स्त्री.* व्यवस्था; सरबराई. **–बुलंद**–*वि.* उन्नत–मस्तक; प्रतिष्ठित; सन्मानित. **– बुलंदी –** *स्त्री.* उच्च पद; सन्मान. **– मस्त –** *वि.* १. मस्त; उन्मत्त. २. झिंगलेला. **– मस्ती –** *स्त्री.* १. मस्ती; उन्मत्तता. २. नशा. **–व(रो) पा** –*पु.* सर्वांग. –*अव्य.* नखशिखांत. **–वरक़**–*पु.* मुखपृष्ठ. **–व (रो) सामान**–*पु.* सामानसुमान. **–शार** –*वि.* १. कांठोकांठ भरलेला; परिपूर्ण. २. झिंगलेला; मस्त. **–सब्ज़**–*वि.* हिरवेंगार; टवटवीत. **–हंग**–*पु.* १. सेनापति. २. कोतवाल. ३. पहिलवान. ४. सैनिक; योद्धा –*वि.* उद्दंड; न दबणारा. **–हद**– *स्त्री.* १. सरहद्द; सीमा. २. सीमेची खूण. **–हदी**–*वि.* सहदद्दीसंबंधींचा; सीमेवरील. **–(रे) आम**–*अव्य.* जाहीरपणें; उघडउघड. **–०दरबार** –*अव्य.* भरलेल्या दरबारांत; उघडउघड. **–०दस्त**–*अव्य.* तावडतोब; नुकतेंच; या वेळी. **–०नौ**–*अव्य.* नव्यानें; पुनः पहिल्यापासून. **–०बाज़ार**– *अव्य.* उघडपणें; जाहीररीत्या. **–०शाम**– *अव्य.* संध्याकाळीं. **मु० –करना–** १. जिंकणें; सर करणें. २. डागणें.

सर–*पु.* १. तलाव; जलाशय. २. पाणी.

सर*–*पु.* १. बाण. २. चिता. –*स्त्री.* माळ. **–धर**–*पु.* बाणांचा भाता. [सनकाडी. ३. गोवरी.

सरकंडा–*पु.* १. बोरू. २.

सरक–*पु.* १. प्रवाशांचा तांडा, काफिला. २. तलाव; सरोवर. ३. मदिरा; मदिरापान; मदिरापात्र. –*वि.* सरकणारा; गतिशील.

सरक*– *स्त्री.* १. सरकणें. २. मदिरेची लज्जत; खुमारी. ३. वेदना.

सरकना–*क्रि. अ.* १. सरकणें; सरपटणें. २. टळणें. ३. निभणें.

सरकफूँद; सरफूँद+– *स्त्री.* सरकफांस. [**–बिलजब्र**–*पु.* दरोडा.

सरक़ा–*पु.* [*अ.*] चोरी.

सरकार– *स्त्री.* [*फा.*] १. मालक; प्रभु. २. राज्यसंस्था; शासनसंस्था. ३. संस्थान. –*पु.* १. प्रांताचा एक विभाग; जिल्हा. २. हुजूर. **–दरबार**–*पु.* कोर्टकचेरी. **मु०– दरबार करना, चढ़ना–** कोर्टकचेरी करणें; खटला भरणें.

सरकारी–*वि.* [*फा.*] १. सरकारचा; सरकारी. २. मालकाचा. **–अहलकार, मुलाज़िम**–*पु.* सरकारी नोकर. **–साँड़**–*पु.* १. गायी-बैलांच्या उत्तम पैदाशीसाठीं ठेवण्यांत येणारा सरकारी वळू. २. व्यभिचारी; लंपट.

सरग*–*पु.* स्वर्ग. **–तिय**– *स्त्री.* अप्सरा.

सरगम–*पु.* १. संगीताचे सप्तस्वर; सारेगम. २. स्वरलिपि; 'नोटेशन'. [व्यक्ति.

सरगुनिया*–*पु.* सगुणोपासक

सरजना–*क्रि. स.* १. रचणें. २. निर्माण करणें.

सरजा–*पु.* १. श्रेष्ठ व्यक्ति. २. सिंह. ३. सरदार. ४. शिवाजी महाराजांची पदवी.

सरजीव*–*वि.* सजीव.

सरजीवन+–*वि.* १. सुपीक. २. हिरवेंगार. ३. जिवंत करणारा; जगविणारा.

सरजू– *स्त्री.* शरयू (नदी).

सरणि–णी– *स्त्री.* १. मार्ग; रस्ता. २. व्यवस्था. ३. पद्धति. ४. पाट; कालवा; 'चॅनेल'.

सरतान–*पु.* [*अ.*] १. खकडा. २. कर्कराशि. ३. कर्करोग; 'कॅन्सर'.

सरता–बरता–*पु.* वांटणी; वांटा. **मु० –करना–** एकमेकांच्या मदतीनें काम करणें, भागविणें.

सरतारा*–*वि.* १. निश्चित. २. रिकामटेकडा. [शरद् ऋतु.

सरद*–*वि.* थंड; गार. –*स्त्री.*

सरदई–*वि.* हिरवट पिवळ्या रंगाचा.

सरदर–*अव्य.* १. सरासरी. २. एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत.

सरदा–*पु.* [*फा.*] एक प्रकारचें खरबूज.

सरदी– *स्त्री.* पा० 'सर्दी'.

सरधन*–*वि.* श्रीमंत.

सरधा*– *स्त्री.* श्रद्धा.

सरन*– *स्त्री.* शरण.

सरनदीप–*पु.* स्वर्णद्वीप; सिंहलद्वीप; लंका; सिलोन.

सरना–*क्रि. अ.* १. सरकणें. २. हालणें; डोलणें. ३. गरज भागणें. ४. संपणें; काम होणें

५* सडणें; कुजणें. ६. व्यतीत होणें; निघून जाणें.

सरनागत*–*वि.* शरण आलेला.

सरनी*– *स्त्री.* रस्ता; मार्ग.

सरप*–*पु.* सर्प; साप.

सरपट– *स्त्री.* घोडयाची एक चाल. –*अव्य.* भरधांव; जोरांत. –*वि.* सपाट.

सरपत–*पु.* छपराचें गवत; घायपात; पाणकणीस.

सरफराना*–*क्रि. अ.* घाबरणें; व्यग्र होणें.

सरफा–*पु.* पा० 'सर्फा'.

सरफोका–*पु.* वोरू.

सरब*–*वि.* सर्व. –**बियापी**– *वि.* सर्वव्यापक.

सरबत्तरि*–*अव्य.* सर्वत्र.

सरबदा*– *अव्य.* सर्वदा; नेहमीं.

सरबर*– *स्त्री.* बरोबरी.

सरबरना*–*क्रि. स.* उपमा देणें; तुलना करणें.

सरबस*–*पु.* सर्वस्व.

सरबोर*–*वि.* पा० 'सराबोर'.

सरभ*–*पु.* शलभ; पतंग (किडा). [लाज.

सरम*– *स्त्री.* लज्जा; शरम;

सरमद–*वि.* [*अ.*] १. अविनश्वर; नित्य. २. मस्त; तल्लीन.

सरमा–*पु.* [*फा.*] हिंवाळा.

सरमाई– *स्त्री.* [*फा.*] हिंवाळयांत वापरावयाचे कपडे. –*वि.* हिंवाळयासंबंधींचा.

सरमाया–*पु.* [*फा.*] १. भांडवल; मुद्दल; मूलधन. २. संपत्ति. –**दार**–*पु.* भांडवलदार; श्रीमंत. 'कॅपिटॅलिस्ट.' –**दारी**– *स्त्री.* भांडवलशाही; 'कॅपिटॅलिझम्'.

सरयू– *स्त्री.* शरयू नदी; घाघरा. – **पारी**–*पु.* ब्राह्मणांची एक जात.

सरराना*–*क्रि. अ.* १. सोसाटयाचा सूंसूं असा आवाज उत्पन्न होणें. २. वेगानें जाणें; धांवणें.

सरल–*वि.* १. सरळ; सोपा. २. साधा-सुधा; भोळा-भावडा. –*पु.* १. देवदार. २. गंधाबिरोजा. –**आवर्तगति**– *स्त्री.* 'सिंपल हार्मोनिक मोशन'. –**व्याज**–*पु.* सरळव्याज; 'सिंपल इंटरेस्ट.' – **रेखा** – *स्त्री.* सरळ रेघ; 'स्ट्रेट लाइन'.

सरलीकरण–*पु.* सोपें बनविणें; सरळ रूप देणें; सुलभीकरण; 'सिंप्लिफिकेशन'.

सरव*–*पु.* १. पेला; वाटी. २. मद्यपात्र. ३. पणती; दिवा.

सरवत– *स्त्री.* [*अ.*] वैभव; श्रीमंती. [२. श्रमण.

सरवन*–*पु.* १. श्रवण; कान.

सरवनी*– *स्त्री.* स्मरणी.

सरवर–*पु.* [*फा.*] १. सरदार. २. अधिकारी. ३* सरोवर.–*स्त्री.** बरोबरी. [२. स्पर्धा.

सरवरि*– *स्त्री.* १. बरोबरी.

सरवरिया–*पु.* सरयूपारी ब्राह्मण.

सरवरी– *स्त्री.* [*फा.*]सरदारकी.

सरवा–*पु.* १. मद्याचा पेला; वाडगा. २. झारी. ३. सुरई.

सरवाक–*पु.* १. पेला; वाडगा. २. दिवा; पणती.

सरवान+–*पु.* तंबू; डेरा.

सरस–*वि.* १. रसाळ. २. स्वादिष्ट. ३. चांगला.–*पु.* सरोवर.

सरसई*– *स्त्री.* १. सरस्वती. २. रसाळपणा; ताजेपणा. ३. मोहरीचे दाणे.

सरसठ–*वि.* सदुसष्ट; ६७.

सरसना–*क्रि. अ.* १. टवटवीत, हिरवेंगार होणें. २. शोभणें.

सरसर–*पु.* सळसळ. [वारा.

सरसर– *स्त्री.* [*अ.*] सोसाटयाचा

सरसराना–*क्रि. अ.* १. सळसळणें; हवा खेळणें. २. सरपटणें.

सरसराहट– *स्त्री.* १. सळसळ. २. सरपटणें. ३. वायु वाहणें. ४. कंड; खाज.

सरसरी–*वि.* [*फा.*] वरवरचें; घाईंतील; स्थूल.–*अव्य.* १. घाईनें; वरवर. २. स्थूल मानानें; सरासरीनें. –**नजर**; –**निगाह**– *स्त्री.* वरवरचा दृष्टिक्षेप.–**तौरपर**–*अव्य.* सुमारें; साधारणतः; सामान्यतः.

सरसाई*– *स्त्री.* १. शोभा; सौंदर्य. २. अधिकता. ३. सरसपणा.

सरसाना–*क्रि. स.* १. टवटवीत करणें. २. रसाळ बनविणें. –*क्रि. अ.* पा० 'सरसना'.

सरसाम–*पु.* [*फा.*] १. सन्निपात; मेंदूचा एक रोग. २. मग्न; नशेंत चूर.

सरसिज–*पु.* कमळ. [शारदा.

सरसुति–ती*– *स्त्री.* सरस्वती;

सरसेटना–*क्रि. स.* फटकारणें; खरडपट्टी काढणें.

सरसों– *स्त्री.* मोहरी; राई.

सरसौंहाँ*–*वि.* रसाळ; सरस बनविलेला. [(किडा).

सरह*–*पु.* शलभ; पतंग

सरहज– *स्त्री.* मेहुण्याची बायको (पत्नीच्या भावाची बायको).

सरहटी– *स्त्री.* एक वनस्पति; मुंगुसवेल.

सरहना–*पु.* माशाचा खवला.

सरहरा–*वि.* १. सरळसोट; उंच. २. गुळगुळीत; तुळतुळीत.

सरहिंद–*पु.* यमुना व सतलज या नद्यांमधील प्रदेश.

सरा*– *स्त्री.* चिता. –*वि.* सडलेला; कुजका.

सरा– *स्त्री*. [*फा.*] १. घर. २. धर्मशाळा. –*प्रत्य*. गाणारा– [नग्मासरा– गीत गाणारा; गायक].

सराइँध– *स्त्री*. दुर्गंध; घाण.

सराई– *स्त्री*. १. दिवा; पणती. २.+ काडी; सळई. ३. विजार. ४.* थंडी; गारवा. [शीग; गज.

सराग–गा+–*पु*. सळई; काडी;

सराजाम+– *पु*. सरंजाम; सामान; सामग्री.

सराध*–*पु*. श्राद्ध. **–पाख**–*पु*. पितृपक्ष; पक्षपंधरवडा.

सराना*–*क्रि. स*. १. संपादित करणें. २. पूर्ण करणें.

सराप+–*पु*. शाप.

सरापना*–*क्रि. स*. १. शाप देणें. २. शिव्या देणें.

सरापा–*अव्य*. [*फा.*] नखशिखांत; आदीपासून अंतापर्यंत. –*वि*. मूर्तिमंत. –*पु*. १. सर्वांग. २. नखशिखांत वर्णन असलेली कविता.

सराफ़–*पु*. [*अ*. 'सर्राफ़']. १. सराफ; सोन्याचांदीचा व्यापारी. २. पैशाच्या मोडीचा धंदा करणारा. **–ख़ाना**–*पु*. पेढी; 'बँक'.

सराफ़ा–*पु*. [*अ.*] १. सराफी काम. २. सराफकट्टा. ३. पेढी; 'बँक'.

सराफ़ी– *स्त्री*. [*अ.*] १. सराफाचा धंदा; सराफी. २. पैशाच्या मोडीचा धंदा. ३. पेढीवर चालणारी लिपि. **–पारचा**–*पु*. हुंडी; 'चेक'. [२. भ्रम; भ्रांति.

सराब–*पु*. [*अ.*] १. मृगतृष्णा.

सराब+– *स्त्री*. शराब; दारू.

सराबोर–*वि*. भिजलेलें; ओलेंचिंब; चपचपीत.

सराय– *स्त्री*. [*फा.*] १. घर. २. धर्मशाळा. **–ए फ़ानी**– *स्त्री*. जग. **–का कुत्ता**–*वि*. अत्यंत लोभी; लुब्रा.

सरारत+–*स्त्री*. पा० 'शरारत'.

सराव*–*पु*. १. मद्याचा पेला; शराब. २. झांकण.

सरावग–गी–*पु*. जैन; श्रावक.

सरावन+–*पु*. कुळव.

सरावना+–*क्रि. स*. सडविणें; कुजविणें.

सरास*–*पु*. भुसा; कोंडा.

सरासर–*अव्य*. [*फा.*] १. एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत; पूर्णपणें. २. अगदीं; बिलकुल; मुळींच. ३. प्रत्यक्ष; स्पष्ट.

सरासरी– *स्त्री*. [*फा.*] १. शीघ्रता; घाई. २. सुगमता. ३. स्थूल अंदाज. –*अव्य*. १. स्थूल मानानें. २. घाईनें; गडबडीनें.

सराह; सराहन*– *स्त्री*. प्रशंसा; स्तुति.

सराहना– *क्रि. स*. प्रशंसा, तारीफ करणें. –*स्त्री*. प्रशंसा; स्तुति; तारीफ.

सराहनीय–*वि* १. स्तुत्य; प्रशंसनीय. २. सुंदर; चांगला; उत्तम.

सरि*– *स्त्री*. १. झरा; धबधबा. २. नदी. ३. समता; बरोबरी. –*वि.** तुल्य; सदृश; समान. –*अव्य*. पर्यंत. [नदी; प्रवाह.

सरित–त्त*– *स्त्री*. सरिता;

सरिया+–*पु*. १. बोरू. २. सळई; कामटी.

सरियाना–*क्रि.स*. पद्धतशीरपणें ठेवणें; लावणें; मांडणें. [समता.

सरिवर–रि*– *स्त्री*. बरोबरी;

सरिश्त– *स्त्री*. [*फा.*] १. स्वभाव; प्रकृति. २. गुण. –*वि*. मिसळलेला.

सरिश्ता–*पु*. [*फा.*] १. रीत; उपाय. २. कचेरी. ३. कार्यालयाचा विभाग. ४. नोकरचाकर. ५. संबंध. ६. मिलाफ. **–(श्ते)दार**–*पु*. १. कचेरींतील मुख्य अधिकारी. २. शिरस्तेदार. [समान.

सरिस*–*वि*. सदृश; तुल्य;

सरीक+–*वि*. पा० 'शरीक'.

सरीकता*– *स्त्री*. हिस्सा; वांटा.

सरीखा– *वि*. सारखा; समान; तुल्य.

सरीफा+– *पु*. पा. 'शरीफा'.

सरीर*–*पु*. १. शरीर. २. पा० 'शरीर'.–*स्त्री*. कागदावर लिहितांना होणारा टांकाचा किंवा लेखणीचा आवाज. [समोर.

सरीहन्–*अव्य*. [*अ.*] समक्ष;

सरुहना*– *क्रि. अ*. सुधारणें; चांगलें, बरें होणें.

सरुहाना*– *क्रि.स*. चांगलें, बरें करणें; सुधारणें.

सरूप– *वि*. १. साकार. २. समान; तुल्य. –*पु*.* स्वरूप.

सरूर– *पु*. [*फा.*] १. आनंद; खुशी; प्रसन्नता. २. मामुली नशा; गुंगी.

सरे आम; सरे दस्त; सरे नौ; सरे बाज़ार–पा० 'सर'.

सरेख–खा*–*वि*. १. सज्ञान; प्रौढ व चलाख. २. समजदार; शहाणा. [करणें. २. सोंपविणें.

सरेखना–*क्रि. स*. १. गोळा

सरेश–स– *पु*. [*फा.*] सरस; (चिकटविण्याचा पदार्थ); शिरस; 'ग्लू'.

सरोंट*– *स्त्री*. सुरकुती.

सरो– *पु*. [*फा.*] सुरूचें झाड.

सरोकार–*पु*. [*फा.*] १. परस्पर-संबंध; संबंध. २. प्रयोजन.

सरोज– *पु*. कमळ.

सरोजना*– *क्रि.स.* मिळविणें.

सरोट*– *स्त्री.* सुरकुती; वळी.

सरोतर*–*वि.* साफ; स्पष्ट.

सरोता*– *पु.* श्रोता. २. अडकित्ता. [राग. ३. एक वाद्य.

सरोद– *पु.* [*फा.*] १. गीत. २.

सरोधा– *पु.* होरा; श्वासावरून भविष्य सांगण्याची विद्या.

सरोश–*पु.* [*फा.*] १. ईश्वरी संदेश आणणारा; प्रेषित; पैगंबर. २. ईश्वरी संदेश; आकाशवाणी.

सरोसामान– *पु.* [*फा.*] सामग्री; सामान; साहित्य.

सरौट*– *स्त्री.* सुरकुती; वळी.

सरौता– *पु.* अडकित्ता.

सरौती– *स्त्री.* १. लहान अडकित्ता. २. उसाची एक जात.

सर्कस– *स्त्री.* [*इं.*] माणसें व जनावरें यांच्या कसरतीचा खेळ; 'सर्कस'. [वाङ्मय-चौर्य.

सर्क़ा–*पु.* [*अ.*] १. चोरी. २.

सर्ग*–*पु.* स्वर्ग.–**पताली**–*पु.* १. तिरळा माणूस. २. एक शिंग वर व दुसरें खालतीं असलेला बैल.

सर्जन– *पु.* १. रचना; निर्मिति; उत्पत्ति. २. त्याग. ३. अर्पण.–**हार**–*वि.* निर्माण करणारा; निर्माता.

सर्त*– *स्त्री.* पा० 'शर्त'.

सर्द–*वि.* [*फा.*] १. थंड; गार. २. आळशी; सुस्त. ३. मंद; धीमा. ४. नपुंसक. ५. उदास; निरुत्साही. –**गर्म**–*वि.* बरेंवाईट (दिवस); उच्च-नीच.–**बाज़ारी**– *स्त्री.* मंदी. –**मिज़ाज**–*वि.* १. उदासीन. २. निष्ठुर; बेमुर्वत. मु०–**हो जाना**– १. थंड होणें. २. मरणें.

सर्दई– *वि.* हिरवट पिवळा.

सर्दा– *पु.* एक प्रकारचें उत्तम व गोड टरबूज.

सर्दी– *स्त्री.* [*फा.*] १. थंडी. २. शीतलता; गारठा. ३. पडसें. ४. हिंवाळा.

सर्पिल–*वि.* नागमोडी.

सर्फ़–*पु.* [*अ.*] १. खर्च; वापर; व्यय; २. अपव्यय.– *स्त्री.* व्याकरणाची एक शाखा; पदव्याख्या.–(**फ़ों**) **नहो**– *स्त्री.* व्याकरणशास्त्र.

सर्बस*–*पु.* सर्वस्व; सर्व कांहीं.

सर्म*– *स्त्री.* पा० 'शर्म'.

सर्राफ़-फ़ा-फ़ी–पा० 'सराफ़-फ़ा-फ़ी'. [देणारा; निर्दय.

सर्वंकष–*वि.* सर्वांना त्रास

सर्व–*वि.* सर्व; समग्र; एकूण. –**क्षमा**– *स्त्री.* सार्वत्रिक माफी; 'ॲमनेस्टी'.–**क्षारनीति**– *स्त्री.* जाळपोळीचें धोरण; 'स्कॉर्च्ड अर्थ पॉलिसी'.–**जनीन**–*वि.* सार्वजनिक.–**दर्शी**–*वि.* सर्व कांहीं पाहाणारा.–*पु.* ईश्वर.–**देशीय**–*वि.* सर्वत्र आढळणारा.–**नाम**–*पु.* सर्वनाम.–**श्री**–*वि.* अनेक व्यक्तींचीं नांवें एकत्र आलीं असतां प्रत्येकासाठीं स्वतंत्र 'श्री' या विशेषणाचा वापर न करितां सर्वांसाठीं मिळून एकत्रित वापरला जाणारा शब्द; 'मेसर्स'.–**सम**–*वि.* हुबेहूब तसाच; 'आयडेंटिकल'. –**सम्मत**–*वि.* सर्वांना मान्य असलेला.–**सम्मति**– *स्त्री.* सर्वांची अनुमति. –०**से**– *अव्य.* सर्वानुमतें. –**सामान्य**–*वि.* सार्वत्रिक; सर्वसामान्य; 'कॉमन'; 'पब्लिक'. –**स्व युद्ध**–*पु.* सर्वंकष युद्ध; 'टोटल वॉर'.–**स्वाहानीति**– *स्त्री.* पा० 'सर्वक्षार नीति'.–**हारा**–*पु.* गरीब, श्रमिक वर्ग; 'प्रोलेटेरियट'.

सर्वतोदक्ष–*वि.* अष्टपैलू; 'ऑल राउंडर'.

सर्वतोभद्र–*वि.* १. सर्व प्रकारें कल्याणकारक. २. ज्याच्या डोकीचे केस व दाढी–मिशा वगैरेचें संपूर्णपणें मुंडन केलेलें आहे असा.–*पु.* चारी बाजूंना दारें असलेलें चौकोनी मंदिर किंवा प्रासाद.

सर्वथा–*अव्य.* १. बिलकुल; अगदीं. २. सर्व तऱ्हेनें; सर्व प्रकारें; पूर्णपणें. [हमेशा.

सर्वदा–*अव्य.* सदैव; सदा;

सर्वरी*– *स्त्री.* रात्र.

सर्वस*–*पु.* सर्वस्व. [संपत्ति.

सर्वस्व–*पु.* सर्व कांहीं; सारी

सर्वांग सम त्रिभुज–*पु.* समरूप त्रिकोण; 'आयडेंटिकली ईक्वल, कॉंग्रुएंट ट्रँगल.'.

सर्वात्मक राष्ट्र–*पु.* एकपक्षीय सर्वंकष सत्ता असलेलें राष्ट्र; 'टोटॅलिटेरियन स्टेट'.

सर्वाधिकारी–*पु.* १. हुकूमशहा. न्यायाधीश; जज्ज. ३. अध्यक्ष.

सर्वाशी–*वि.* सर्वभक्षक.

सर्वेक्षण–*पु.* पाहाणी; 'सर्व्हे'.

सर्वेश्वरवाद–*पु.* अद्वैतमत; 'पँथिइझम्'. [हुकूमशहा.

सर्वेसर्वा–*वि.* सर्वाधिकारी;

सर्वोच्च–*वि.* सर्वांत मोठा; सर्वश्रेष्ठ; सर्वोच्च.–**न्यायालय**–*पु.* सर्वोच्च न्यायालय; 'सुप्रीम कोर्ट'. –**सत्ता**– *स्त्री.* सर्वोच्च सत्ता; 'पॅरामाउंट पॉवर'.

सर्वोपरि–*अव्य.* सर्वांत वर; सर्वांहून अधिक.–*वि.* सर्वश्रेष्ठ; सर्वोत्कृष्ट. [वळी. २. घडी.

सल+– *स्त्री.* १. सुरकुती;

सलकी+– *स्त्री.* कमळाचा गड्डा, कांदा. [अखंडित.

सलग*–*वि.* समग्र; पूर्ण;

सलग(ज)म–*पु.* [*फा.*] नवलकोल.

सलतनत– *स्त्री.* [*अ.*] १. सत्ता.

२. राज्य; साम्राज्य. ३. व्यवस्था. ४. आराम.

सलना*–*क्रि. अ.* १. सलणें; खुपणें. २. ओंवळें जाणें.

सलफ़–*वि.* [*अ.*] प्राचीन; पुरातन.–*पु.* पूर्वज; जुन्या काळचे लोक.–**से**–*अव्य.* पूर्वीपासून.

सलब–*पु.* [*अ.*] १. निवारण. २. नाश; लोप; निकाल.**मु०–हो जाना**–१. लुप्त होणें. २. हिरावून घेतलें जाणें.

सलभ*–*पु.* शलभ; पतंग.

सलमा–*पु.* [*अ.*] कलाबूत; जर.

सलवट– *स्त्री.* सुरकुती.

सलवात– *स्त्री.* [*अ.*] १. देवाची दया; प्रार्थना. २. सलाम; दुवा. ३. सोडून देणें. ४. शिवी. **मु०–(तें) सुनाना**–शिव्या देणें.; लाखोली वाहाणें.

सलवार– *स्त्री.* उत्तर भारतांतील, विशेषत: पंजाबांतील, बायका वापरतात ती विशिष्ट पद्धतीची विजार.

सलसलाना–*क्रि. अ.* १. गुदगुल्या होणें. २. खाज सुटणें ३. वळवळणें; सरपटणें. ४. ओलें होऊन ढिलें पडणें.–*क्रि. स.* १. गुदगुल्या करणें. २. घाई करणें.

सलहज– *स्त्री.* मेहुण्याची (शालकाची) बायको.

सलाई– *स्त्री.* १. सळई; गज. २. काडी.; आगकाडी. ३. सुरम्याची सळई. **मु०–फेरना**–१. डोळ्यांत सुरमा, औषध घालणें. २. सळई तापवून डोळ्यांत खुपसणें; डोळे फोडणें.

सलाक– *स्त्री.* [*फा.*] सोन्याचांदीची काडी.

सलाकना+–*क्रि. अ.* सळईनें चिह्न, खूण बनविणें.

सलाख़– *स्त्री.* [*तु.*] छड; शलाका; सळई.

सलाद–*पु.* [*इं.* ' सॅलड '] १. मुळे, गाजरें, कांदे इ० कंद व त्यांचा पाला यांची कोशिंबीर. २. सॅलडचा पाला.

सलाबत–*स्त्री.* [*अ.*] १. कठोरता; निष्ठुरता. २. शौर्य; प्रताप.

सलाम–*पु.* [*अ.*] १. प्रणाम; नमस्कार. २. शांति. ३. कल्याण; सुरक्षितता; खुशाली.–**अलैक;–अलैकुम**–*स्त्री.* १. तुझी, तुमची खुशाली असो २. सलाम; नमस्कार. **–पयाम**–*पु.* १. संभाषण; बातचीत. २. लग्नाचें बोलणें. **मु० (किसीको)-करना**–१. दूर राहाणें; निरोप घेणें २. श्रेष्ठत्व मान्य करणें.**–देना; –बोलना**–निरोप देणें. २. वरिष्ठ अधिकाऱ्यानें भेटीस आंत बोलावणें. **–है**–१. विटलों; पुरें झालें. २. माफ करा.

सलामत–*स्त्री.* [*अ.*] १. बचाव; संरक्षण. २. खुशाली. –*वि.* १. संकटांतून निसटलेला; सुरक्षित बाहेर पडलेला. २. निकोप; धडधाकट. –*अव्य.* सकुशल; सुरक्षितपणें; सही सलामत.

सलामती–*स्त्री.* [*अ.*] १. रक्षण; बचाव. २. कुशल; क्षेत्र. ३. अस्तित्व; जीवन. **मु०–जाम पीना** –आरोग्य इच्छून पेय पिणें.

सलामी– *स्त्री.* [*अ.*] १. सैनिकी वंदना; सलामी. २. प्रणाम. ३. नजराणा.–*वि.* उतरता.–*पु.* सलाम, प्रणाम करणारा. **मु०–उतारना;–दागना**–स्वागताकरितां तोफांची सलामी देणें.

सलासत–*स्त्री.* [*अ.*] भाषेंतील प्रसादगुण; सहजता; साधेपणा.

सलाह– *स्त्री.* [*अ.*] १. सल्ला; मत. २. विचारविनिमय. ३. भलेपणा; मैत्री. ४. नैतिक आचरण. **– मशविरा** – *पु.* सल्लामसलत. **–कार**– १. सल्लागार; सल्ला देणारा. २. नीतिपूर्वक आचरण करणारा.

सलाहि(ही)यत– *स्त्री.* [*अ.*] १. योग्यता; प्राविण्य. २ भलाई; चांगुलपणा, समजूतदारपणा. ३. कोमलता.

सलि*– *स्त्री.* चिता.

सलिता*–*स्त्री.* सरिता; नदी.

सलिल–*पु.* १. पाणी; पाऊस. २. अश्रू.

सलीक़ा–*पु.* [*अ.*] १. काम करण्याची चांगली पद्धत. २. लायकी; योग्यता. ३. सभ्य वर्तणूक; ढंग; सभ्यपणा. **–मंद**– *वि.* १. वाकबगार; कुशल; चतुर; तज्ज्ञ. २. सभ्य. ३. हुन्नरी.

सलीता–*पु.* एक प्रकारचें जाड सुती कापड.

सलीब–*स्त्री.* [*अ.*] १. शूळ; सूळ. २. येशू ख्रिस्ताचा क्रूस; 'क्रॉस'.

सलीबी–*वि.* [*अ.*]क्रूसासंबंधींचा. **–पु.** ख्रिस्ती माणूस; किरिस्तांव. **–जंग**– *स्त्री.* जेरूसलेमवर कबजा मिळविण्यासाठीं ख्रिस्ती व मुसलमान यांच्यांत झालेलीं धर्मयुद्धें; 'क्रूसेड्स'.

सलीम–*वि.* [*अ.*] १. ठीक; बरोबर. २. शुद्ध अंत:करणाचा. ३. निकोप प्रकृतीचा. ४. गंभीर; शांत. ५. सहनशील. **–शाही**–*स्त्री.* दिल्लींत तयार होणारा एक उत्तम प्रकारचा मऊ जोडा.

सलीस–*वि.* [*अ.*] १. सहज; सुबोध; सुगम. २. प्रसादयुक्त;

सोपी (भाषा).

सलूक–*पु.* [*अ.*] १. व्यवहार; वागणूक. २. मिलाफ. ३. उपकार.

सलूका–*पु.* लांब बाह्यांचा कमरेपर्यंतचा अंगरखा.

सलूना–नो–*पा० 'सलोना–नो'.

सलैला*–*वि.* निसरडा; शेवाळलेला.

सलोट*–*स्त्री.* सुरकुती.

सलोतर–*पु.* शालिहोत्र; पशुचिकित्सा–शास्त्र (विशेषतः अश्वचिकित्सा).

सलोत(त्त)री–*पु.* शालिहोत्री; पशुचिकित्सक; गुरांचा डॉक्टर; अश्ववैद्य.

सलोन*–*वि.* पा० 'सलोना'.

सलोना–*वि.* १. तिखटामिठाचा; खमंग; स्वादिष्ट. २. सुंदर; लावण्ययुक्त.–**पन**–*पु.* १. लावण्य; सौंदर्य. २. खुसखुशीतपणा. [राखी पौर्णिमा.

सलो(लौ)नो–*पु.* रक्षाबंधन;

सल्तनत–*स्त्री.* पा० 'सलतनत'.

सल्लना+–*क्रि. स.* दुःख देणें.

सल्लम–*स्त्री.* जाडें–भरडें कापड; खादी. [दोरी.

सल्लू+–*पु.* वादी; कातड्याची

सव–*पु.* १. सोमरस पिळून काढणें. २. यज्ञ. ३. पाणी. ४.* शव; प्रेत. [प्रसव.

सवन–*पु.* १. पा० 'सव'. २.

सवाँग*–*पु.* पा० 'स्वाँग'.

सवा–*वि.* सव्वा.

सवाई–*वि.* १. सव्वा. २. वरचढ. –*स्त्री.* पंचवीस टक्के व्याजाचा दर. ['टॉकी'.

सवाक् चित्र–*पु.* बोलपट;

सवागी–*पु.* पा० 'सुहागा'.

सवाचना+–*क्रि. स.* शोधणें; तपासणें.

सवाती–*स्त्री.* स्वाती नक्षत्र.

सवाद*–*पु.* स्वाद; रुचि.

सवादिक–ल*–*वि.* स्वाद असलेला; स्वादिष्ट.

सवानेह–*पु.* [*अ.* 'सानिहा'चें अनेक०] घटना; हकीगती; वृत्तें. **–उमरी**–*स्त्री.* जीवन–चरित्र; चरित्र. **–नवीस;–निगार**–*पु.* १. वृत्तलेखक; बातमीदार. २. इतिहासकार. ३. चरित्रलेखक.

सवाब–*पु.* १. पुण्य. २. सत्यता; खरेपणा. ३. भलेपणा. –*वि.* ठीक; बरोबर; यथार्थ. [वरचढ.

सवाया–*वि.* सव्वापट; सवाई;

सवार–*पु.* [*फा.*] स्वार; घोडेस्वार. –*वि.* १. वर चढलेला अगर बसलेला. २. वाहनांत बसलेला. ३. गुंग; धुंद. –*अव्य.** पहांटे; लौकर.

सवारना–*क्रि. स.* १. सजविणें. २. सुधारणें.

सवारी–*स्त्री.* [*फा.*] १. वाहन. २. स्वारी. ३. आरोहण. **मु०–कसना; –गाँठना**–१. स्वारी भरणें. २. पेचांत अडकविणें. ३. दाबून टाकणें. [शीघ्र.

सवारे–रै* –*अव्य.* लौकर;

सवाल–*पु.* [*अ.*] १. प्रश्न. २. पृच्छा; विचारणा. ३. अर्ज; विनंती. ४. मागणी; याचना. –**जवाब**–*पु.* १. प्रश्नोत्तर. २. वादविवाद. ३. हुज्जत; झगडा. **मु०–देना**–सोडविण्यासाठीं प्रश्न, गणित इ० देणें, घालणें. **– बनाना; –** प्रश्नपत्र तयार करणें. **– लगाना; – हल करना**–प्रश्न सोडविणें.

सवालात–*पु.* [*अ.* 'सवाल'चें अनेक०] अनेक प्रश्न; समस्या.

सवालिया–*वि.* [*अ.*] प्रश्नार्थक.

सवाली–*वि.* [*अ.*] मागणारा; याचक.

सविनय–*वि.* विनम्र; शिष्टतापूर्ण.–**अवज्ञा**–*स्त्री.* सविनय कायदेभंग; 'सिव्हिल डिसओबीडिअन्स'.

सवेरा – *पु.* सकाळ; पहांट; प्रातःकाल. [२. लौकर.

सवेरे–*अव्य.* १. सकाळीं; पहांटे.

सवैया – *पु.* १. सव्वा शेराचें वजन. २. सवाकी. ३. एक वृत्त. –*वि.* सवाई.

सव्य–*वि.* १. डावा; प्रतिकूल. २. उजवा.–*पु.* जानवें.

सव्याज–*वि.* कपटी; धूर्त.

सशंकना*–*क्रि. अ.* १. भिणें. २. शंकित होणें.

सशरीर–*वि.* शरीरयुक्त; मूर्त. –*अव्य.* शरीरासह. **– प्रतिभू** – *पु.* ओलीस ठेवलेला मनुष्य; 'होस्टेज'.

सश्रम–*वि.* श्रमयुक्त; थकलेला. –*अव्य.* – श्रमपूर्वक. **– कारावास–** *पु.* सक्तमजुरीची शिक्षा; 'रिगरस इम्प्रिझनमेंट'.

सस*–*पु.* शशि; चंद्र. २. शस्य; धान्य; साळी.–**घर;–हर**–*पु.* चंद्र.

ससक*–*स्त्री.* हुंदका.– *पु.* ससा.

ससकना; सस(सा)ना* – *क्रि. अ.* १. धडधडणें (हृदय); घाबरणें. २. पा० 'सिसकना'.

ससि*–*पु.* पा० 'सस'.–**रिपु***–*पु.* दिवस. **–हर*** – *स्त्री.* शिशिर ऋतु. [संपन्न.

ससील* – *वि.* सुशील; शील-

ससुर–*पु.* सासरा.

ससुरा–*पु.* १. सासरा. २. एक शिवी (शिचा, लेकाचा या अर्थी). ३.+ सासर. [सासुरवाडी.

ससुराल–*स्त्री.* १. सासर. २.

ससुरार-रि*–*स्त्री.* पा० 'ससुराल'.

सस्ता–*वि.* स्वस्त; कमी किमतीचा.–**पन**–*पु.* स्वस्ताई. **मु०–(स्ते) छूटना**–थोडक्या परिश्रमांत एखादें

काम होणें; स्वस्तांत मिळणें.

सस्ताना+ – *क्रि. अ.* स्वस्त होणें.–*क्रि. स.* स्वस्त करणें.

सस्ती– *स्त्री.* १. स्वताई; सवंगाई. २. सर्व वस्तू स्वस्त मिळतील अशी वेळ; मंदी.

सस्त्रीक – *वि.* सपत्नीक; विवाहित.

सस्य–*पु.* १. धान्य. २. साळी. **–आवर्तन** – *पु.* आळीपाळीनें पिकें काढणें; 'क्रॉप रोटेशन '.**–विज्ञान; –वेद**–*पु.* कृषि-शास्त्र; 'ॲग्रॉलॉजी '. [च्या उलट.

सहँगा* – *वि.* स्वस्त; 'महँगा'-

सह–*अव्य.* सहित; संगें; बरोबर.–*वि.* १. हजर; उपस्थित. २. सहनशील. ३. समर्थ; योग्य.**–अस्तित्व का सिद्धांत**–*पु.* सहअस्तित्वाचा सिद्धांत; 'प्रन्सिपल ऑफ को-एक्झिस्टन्स'.– **कार** – *पु.* १. सहकार्य; सहयोग.२. आंब्याची मंजरी, मोहोर, रस. –**कार(रि)ता** –*स्त्री.* सहकार्य.**–कारी**–*पु.* १. सहयोगी; बरोबर काम तरणारा. २. मदतनीस; साहाय्यक; सहकार्य करणारा.**–गमन; –गवन; *–गौन**– *पु.* सती जाणें. – **गान**–*पु.* समूहगीत; ' कोरस '. – **चर**–*पु.* १. सेवक. २. मित्र; २. दोस्त; ३. जामीन.**–चरी** – *स्त्री.* सखी; पत्नी.**–चारी**–*पु.* १. साथी; सहकारी- २. सेवक.**–ज**–*पु.* १. सख्खा भाऊ. २. स्वभाव. –*वि.* १. स्वाभाविक; जन्मजात. २. साधारण. ३. सहज. ४. जुळा. **–०पंथ**–*पु.* गौडीय वैष्णव संप्रदायांतील एक वर्ग.**–जानि**–*वि.* सपत्नीक. – **धर्मिणी** –*स्त्री.* पत्नी; बायको. **–धर्मी**– *वि.* समानधर्मा.**– पाठी**–*पु.* सहाध्यायी; बरोबर शिकणारा; वर्गमित्र.**–प्रतिवादी**–*पु.* दुय्यम प्रतिवादी; ' को-डिफेंडंट '.**–भाव** –*पु.* सहअस्तित्व; 'कोएक्झिस्टन्स'. –**भोज**–*पु.* सहभोजन. – **मति** – *स्त्री.* सहमत होणें; ' ॲग्रीमेंट '.**–योग** – *पु.* सहकार्य.**–योगी**–*पु.* १. सहकारी. २. समकालीन. ३. बरोबर प्रकाशित होणारा **–विस्तारी**–*वि.* बरोबर पसरलेला; ' को-एक्स्टेन्सिव्ह '.

सहजन*–*पु.* शेवगा (झाड व शेंगा).

सहजिया–*पु.* १. एका धर्मांतून दुसऱ्या धर्मांत विनाकारण जाणारा; अकारण धर्म बदलणारा. २. वैष्णव संप्रदायांतील सहज पंथाचा.

सहजें*–*अव्य.* सहज; अनायासें; सहजासहजीं.

सहत+–*पु.* मध. –*वि.* स्वस्त.

सहतरा–*पु.* पित्तपापडा.

सहतूत+–*पु.* [*फा.*] तुती (झाड व फळ).

सहदानी*– *स्त्री.* चिह्न; खूण.

सहदेई– *स्त्री.* चिकणीचें झाड.

सहन–*पु.* [*अ.*] १. अंगण; घरापुढील मोकळा भाग. २. मूल्यवान् रेशमी कपडा. ३. मोठी थाळी; परात. [क्षमा.

सहन–*पु.* १. सहनशक्ति. २.

सहनभंडार* – *पु.* खजिना; संपत्ति.

सहना–*क्रि. स.* १. सहन करणें. २. फळ भोगणें. ३. जबाबदारी पत्करणें.

सहनाई*– *स्त्री.* [*फा.*] सनई.

सहनायन– *स्त्री.* सनई वाजविणारी.

सहम–*पु.* [*फा.*] १. भय; भीति. २. संकोच; मर्यादा.**–नाक**– *वि.* भयंकर; भीतिदायक.

सहमना–*वि. अ.* १. घाबरणें; भयभीत होणें. २. संकोचणें.

सहमाना–*क्रि. स.* भिवविणें; घाबरविणें.

सहर–*पु. स्त्री.* [*अ.*] १. पहांट; प्रातः काल. २. जादूटोणा. **–गही**– *स्त्री.* उपवास सुरू होण्यापूर्वी उत्तर रात्रीं करावयाचें भोजन. **–गाह; –दम**–*अव्य.* भल्या पहांटे; सकाळीं. **–नुमा**–*वि.* पहांटेचें दर्शन घडविणारा.

सहरा–*पु. अ.* १.जंगल; अरण्य. २. मोकळें मैदान; वाळवंट. **–एआज़म**–*पु.* सहाराचें वाळवंट.**–नशीं** –*पु. वि.* वनवासी; तपस्वी.

सहराई–*वि.* जंगली; वन्य.

सहराती+–*वि.* शहरी; नागरी.

सहराना*–*क्रि. स.* पा० ' सहलाना '. –*क्रि. अ.* थरथरणें; घाबरणें.

सहरी– *स्त्री.* १. शफरी नांवाची मासळी. २. पा० ' सहरगही '. –*वि.* प्रातःकालीन.

सहल–*वि.* [*अ.*] सोपा; सरळ.

सहलाना–*क्रि. स.* १. गोंजारणें; हात फिरविणें. २. चोळणें; रगडणें. ३. गुदगुल्या करणें. –*क्रि. अ.* गुदगुल्या होणें.

सहवैया–*वि.* सहन करणारा; सहनशील.

सहस*–*वि.* सहस्र; हजार. **–कर; –किरण; –गो**–*पु.* सूर्य. **–जीभ; –फण–न; –ब(व)दन; –सीस**–*पु.* शेष नाग. **–दल; –पत्र** –*पु.* कमल. **–नैन**–*पु.* इंद्र.

सहसा–*अव्य.* एकाएकीं; अचानक; एकदम.

सहसाक्रामक चमू– *स्त्री.* अकस्मात् छापा घालणाऱ्या सैन्याच्या तुकड्या; ' शॉकट्रुप्स '. [यज्ञ.

सहसान–*वि.* सहनशील. –*पु.*

सहसानन*–*पु.* शेषनाग.

सहसोपचार–*पु.* धक्का देऊन बरें करण्याचा उपाय; 'शॉक ट्रीटमेंट'. [हजार वर्षांचा काळ.

सहस्त्राब्द–*पु.*; **सहस्त्राब्दी**–*स्त्री.*

सहाइ–ई–उ*– *स्त्री.* साहाय्य; मदत. –*पु.* साहाय्यक.

सहानुभूति– *स्त्री.* कळवळा; आत्मीयता.

सहापराधी–*पु.* गुन्ह्यांतील साथीदार; 'अकॉम्प्लिस'.

सहाब–*पु.* पा० 'शहाब'.

सहाबत– *स्त्री.* [*अ.*] मैत्री; सहकार्य; संगत.

सहाबा–*पु.* [*अ.*] १. मित्र; मुहंमद पैगंबरांचे मित्र, सहकारी. २. मैत्री करणें.

सहाबी–*पु.* [*अ.*] मुसलमान बनून मुहंमद पैगंबरांबरोबर शेवटपर्यंत राहिलेला अनुयायी.

सहाय–*पु.* १. साहाय्य; मदत. २. आश्रय. ३. साहाय्यक; मदतगार.

सहायक–*पु.* १. साहाय्यक; मदतनीस; सहकारी. –*वि.* मदत करणारा. **–अनुदान**–*पु.* साहाय्यक अनुदान; 'ग्रॅण्ट इन एड'; **–आजीविका**–*स्त्री.* जोडधंदा; 'सबसिडियरी ऑक्युपेशन'. **–करणिक**–*पु.* साहाय्यक कारकून; 'असिस्टंट क्लार्क'. **–नदी**– *स्त्री.* उपनदी. **–भंडारी**–*पु.* साहाय्यक कोठीवाला; 'असिस्टंट स्टोअरकीपर'. **–संपादक**–*पु.* सहसंपादक.

सहायता–*स्त्री.* १.साह्य. २. मैत्री. **–गृह**–*पु.* संकटांत सांपडलेल्यांना सोडविण्यासाठीं स्थापन केलेली संस्था; 'रेस्क्यू होम'. **–यान**–*पु.* अपघातांत सांपडलेल्यांना मदत करणारें वाहन; 'अॅक्सिडेंट रिलीफ व्हॅन'.

सहायी–*वि.* बरोबर जाणारा; अनुयायी.

सहारना*–*क्रि. अ.* १. सहन करणें. २. जबाबदारी पत्करणें; सांभाळणें.

सहारा–*पु.* १. आश्रय; आधार. २. साहाय्य; मदत. ३. विश्वास.

सहालग–*पु.* १. लग्नसराई; लग्नाचे मुहूर्त ज्या महिन्यांत असतांत तो काल. २. शुभ वर्ष.

सहावल– *पु.* [*फा.* 'शाकूल'] ओळंबा.

सहिदोली*– *स्त्री.* सखी; मैत्रीण.

सहिजन–*पु.* शेवग्याची शेंग किंवा झाड.

सहिजानी*– *स्त्री.* १. खूण; चिह्न. २. ओळख.

सहिथी*– *स्त्री.* बरछी.

सहिदान*–*पु.* खूण; ओळख.

सहिदानी– *स्त्री.* १. चिह्न; खूण. २. उपमा. ३. ओळख.

सही–*वि.* [*अ.*] १. निर्दोष. २. अखंड. ३. सत्य; यथार्थ; बरोबर; ठीक. –*अव्य.* नक्की; निश्चयपूर्वक. –*स्त्री.* १. सही; हस्ताक्षर. २.* सखी. **–सलामत**–*वि.* १. निकोप; आरोग्ययुक्त. २. निर्दोष; उणीव नसलेला. ३. सुखरूप. **मु०–भरना**– मान्य करणें; ऐकणें.

सहीफ़ा–*पु.* [*अ.*] १. पुस्तक. २. मासिक; नियतकालिक. ३. धर्मग्रंथ.

सहीह– *वि.* [*अ.*] १. दोषरहित; अव्यंग. २. पूर्ण; अखंड. ३. योग्य बरोबर.–*स्त्री.* १. सही; हस्ताक्षर. २. खूण; चिह्न. ३. प्रमाणित करणें. **–सलामत**–*वि.* सुखरूप; निरोगी.**–सालिम**–*वि.*पूर्ण; अखंड; जशाच्या तसा; सुखरूप.

सहुँ*–*अव्य.* १. समोर; पुढें. २. बाजूस; कडे.

सहूर+–*पु.* पा० 'शऊर.'

सहूलत; सहूलियत– *स्त्री.* [*अ.*] सुगमता; सोय. [दयाळू.

सहृदय–*वि.* रसिक; सहृदय;

सहेजना–*क्रि. स.* १. सांभाळणें; गोळा करणें; राखण करणें. २. नीट पाहून देणें; सोंपविणें.

सहेजवाना–*क्रि. स.* सोंपविणें.

सहेट–त*–*पु.* प्रेमी जनांच्या भेटीचें स्थान; संकेतस्थळ.

सहेलरी*– *स्त्री.* सखी; मैत्रीण.

सहेली– *स्त्री.* १. सखी; मैत्रीण. २. दासी.

सहैया*–*पु.* साहाय्यक; मदतगार. –*वि.* सहन करणारा; सहनशील.

सहोदर–*पु.* सख्खा भाऊ. –*वि.* सख्खा; आपला; खास.

सहोर–*पु.* साधु; संत.

साँई–*पु.* १. मालक; स्वामी. २. परमेश्वर. ३. पति. ४. मुसलमान फकिराची एक पदवी; फकीर.

साँऊगी+– पा० 'साँगी'.

साँकड़– *स्त्री.* १. सांखळी; सांखळदंड. २. पायांतील सांखळचा.

साँकड़ा–*पु.* १. पायांत घालावयाचा एक दागिना; सांखळचा. २. सांखळदंड.

साँकर*– *स्त्री.* सांखळदंड; सांखळी. –*पु.* संकट; कष्ट. –*वि.* १. कष्टमय; दुःखमय. २. संकीर्ण; संकुचित; अरुंद.

साँकरा*–*पु.* त्रास; कष्ट. –*वि.* पा० 'साँगरा'. –*पु.* पा० 'साँगड़ा'

साँकल+– *स्त्री.* शृंखला; सांखळी. ['स्टॅटिस्टीशियन'.

सांख्यिक–*पु.* आंकडेशास्त्रज्ञ;

सांख्यिकी– *स्त्री.* आंकडेशास्त्र; 'स्टॅटिस्टिक्स'.

सांख्यिकीय–*वि.* आंकडेशास्त्रासंबंधींचा. **–ग्राफ**–*पु.* आंकडचांचा, सांख्यिकीय आलेख; 'स्टॅटिस्टिकल ग्राफ'. **–मंत्रणाकार**–*पु.* आंकडेशास्त्रांतील सल्लागार; 'स्टॅटिस्टिकल ॲडव्हायजर'.

साँग– *स्त्री.* १. शक्ति. २. फेंकून मारण्याची बरछी; भाला. ३. ओझें उचलण्याचा दंडुका.

साँगी– *स्त्री.* १. बरछी; भाला. २. बैलगाडीमध्यें गाडीवान बसतो ती जागा. ३. सामान ठेवण्यासाठीं गाडीच्या खालीं लावलेली जाळी. –*पु.* पा० 'स्वाँगी'.

साँघर+–*पु.* पहिल्या नवऱ्यापासून झालेला मुलगा. [भयंकर.

सांघातिक–*वि.* प्राणघातक;

साँच*–*वि.*; *पु.* सत्य; खरें.

साँचला*–*वि.* सत्यवादी.

साँचा–*पु.* १. सांचा; नमुना (उपकरण या अर्थी) २. सांचा; नमुना (बनविलेल्या पदार्थासाठीं); वेलबुट्टी काढण्याचा छाप; ठसा. –*वि.** खरा. **मु० साँचेमें ढला होना**– अतिशय सुंदर असणें; जणूं काय सांच्यांतून काढल्यासारखें असणें.

साँचिला*–*वि.* खरा; सच्चा.

साँची–*पु.* एक प्रकारचें विडचाचें पान. –*स्त्री.* छपाईचा एक प्रकार. –*वि. स्त्री.* खरी.

साँझ– *स्त्री.* संध्याकाळ.

साँझा–*पु.* पा० 'साझा'. –*स्त्री.*+ संध्याकाळ.

साँझी– *स्त्री.* देवळामध्यें देवासमोर काढलेली फुलांची रांगोळी, गालिचा.

साँट– *स्त्री.* १. छडी; चमोटी. २. चाबूक; कोरडा. ३. शरीरावर पडलेला चाबूक इत्यादीचा वळ.

साँटना+–*क्रि. स.* १. जोडणें; मिसळणें. २. चिकटविणें. [ऊंस.

साँटा–*पु.* १. दंडुका; चाबूक. २.

साँटिया*–*पु.* ढोलकें पिटणारा; दवंडी देणारा.

साँटी– *स्त्री.* १. कामटी; पातळ छडी. २.* तडजोड; मिलाफ. ३. सूड; प्रतिकार; बदला.

साँठ–*पु.* १. ऊंस. २. सरकांडें. ३. गांठभेंट; दोस्ती. ४. दंडुका. **–गाँठ**– *स्त्री.* अनुचित गुप्त संबंध; संगनमत; कारस्थान; कट; कटांत सामील होणें.

साँठना*–*क्रि. स.* १. धरून ठेवणें २. गुप्त, अनुचित संबंध ठेवणें.

साँठि–ठी*– *स्त्री.* भांडवल; संपत्ति.

साँड़–*पु.* १. देवाला सोडलेला पोळ. २. वळू. –*वि.* १. बलवान्. २. उडाणटप्पू.

साँड़नी– *स्त्री.* सांडणी; उंटीण.

साँड़िया–*पु.* सांडणीस्वार.

सांत*–*वि.* शांत.

सांति*– *स्त्री.* शांतता.

सांत्वना– *स्त्री.* सांत्वन; धीर; आश्वासन.

सांद्रण–*पु.* आटवून किंवा गाळून तीव्रता वाढविणें; एकाग्रता; 'कॉन्सेंट्रेशन'.

साँध*–*पु.* लक्ष्य; वेध.

साँधना–**क्रि. स.* १. सांधणें; एकत्र करणें; जुळविणें. २. संधि साधणें. ३. नेम मारणें, धरणें.

साँप–*पु.* सर्प; साप. **मु० कलेजेपर–लोटना**–अत्यंत दुःखी होणें; चडफडणें (ईर्ष्या इ० मुळें). **–छछूँदरकी गति** (दशा)– गोंधळलेली स्थिति; इकडे आड तिकडे विहीर होणें; कांहीं न सुचणें. **–सूँघ जाना**– १. निर्जीव होणें; मरणें. २. साप चावणें. **आस्तीनका साँप**– अस्तनींतील निखारा.

साँपिन–नी– *स्त्री.* सर्पिणी; सर्पीण. [सारखा रंग.

साँपिया–*पु.* सापाच्या रंगा-

सांप्रत–*वि.* १. उपयुक्त. २. उचित; योग्य. ३. वर्तमानकाळाशीं संबंधित. –*अव्य.* १. आतां; आतांच. २. तावडतोब. **–काल**–*पु* वर्तमानकाळ. [योग्य; उचित.

सांप्रतिक–*वि.* १. आधुनिक. २.

सांप्रदायिक–*वि.* १. संप्रदाय किंवा धर्म यांसंबंधींचा. २. धार्मिक; जातीय.

सांप्रदायिकता–*स्त्री.* जातीयवाद.

साँभर–*पु.* १. राजपुतान्यांतील सांभर नामक तळें. २. सांभर मीठ. ३. सांबर. ४.* प्रवासांतील फराळ; शिदोरी.

साँमुहे+–*अव्य.* समोर.

साँवर-रो+–*वि.* पा० 'साँवला'.

साँवलताई+–*स्त्री.* सांवळेपणा.

साँवला–*वि.* श्याम; सांवळा; काळसर. –*पु.* १. श्रीकृष्ण. २. पति किंवा प्रेमी यांचें सूचक नांव (पद्यांत). **–पन**–*पु.* सांवळेपणा.

साँवलिया–*पु.* श्रीकृष्ण.–*वि.* सांवळा.

साँवाँ–*पु.* वरी (धान्य).

साँवादिक–*पु.* १ नैयायिक. २. बातमीदार. ३. वृत्तपत्रकार. ४. वृत्तपत्रें विकणारा; 'न्यूजमॅन'. –*वि.* १. प्रचलित. २. विवादग्रस्त.

साँस– *स्त्री.* १. श्वास. २. अवकाश; फुरसत. ३. गुंजाईस; सामावणी. ४. श्वास; दमा (रोग). ५. चीर; फट. ६. दम (थकल्यानंतरचा). ७. भरलेला वारा.– **उखड़ना या टूटना**–१. दम उखडणें. २. श्वास लागणें (मरतांना).

–उलटी चलना–आसन्नमरण होणें. **–चढ़ना**–धापा टाकणें; दम लागणें. **–तक न लेना**–मौन धारण करणें; कांहींहि न बोलणें.–**फूलना**–दम लागणें; धापा टाकणें.–**भरना**–१. श्वास घेणें. २. धापा टाकणें. ३. उत्साहित करणें; जिवंतपणा आणणें.–**रहते**–जिवांत जीव असतों. **–रुकना**– १. श्वासोच्छ्वास बंद पडणें. २. श्वासोच्छ्वास करण्यास त्रास होणें.–**लेने की फुरसत**–फार थोडी फुरसत.–**लेना**–विसांवा घेणें.

साँसत–*स्त्री*. १. गुदमरणें; श्वास कोंडणें. २. अत्यंत कष्ट; त्रास. ३. झगडा; बखेडा.–**घर**–*पु*. अंधारकोठडी; अगदीं लहान, अंधार असलेली खोली.

साँसति*–*स्त्री*. पा० 'साँसत'.

सांसद–*वि*. संसदेच्या मर्यादेंत बसणारें; 'पार्लमेंटरी'.

साँसना–*क्रि. स*. १. शिक्षा करणें; दंड करणें. २. दटावणें. ३. कष्ट, त्रास, यातना देणें.

साँसा–*पु*. १. श्वास; जीवन; प्राण. २. संशय. ३. भय. ४. चिंता. ५. क्लेश; त्रास. मु० **–चढ़ना**–काळजी वाटणें.–**पड़ना**–शंका, चिंता वाटणें.–**रहना**–भीति, शंका वाटणें. [ऐहिक; संसारी.

सांसारिक–*वि*. लौकिक;

सांस्पर्शिक–*वि*. सांसर्गिक; 'कंटेजस'.

सा–*अव्य*. सारखें; तुल्य; समान.–*पु*. संगीतांतील षड्ज.

साअत–*स्त्री*. [*अ*.] १. अडीच घटकांचा काळ; तास; क्षण; घटका. २. निश्चित काळ.

साइक*–*पु*. १. बाण. २. संध्याकाळ. [बिजली.

साइक़ा–*स्त्री*. [*अ*.] वीज;

साइकिल–*स्त्री*. [*इं*.] दुचाकी; 'सायकल'.

साइत–*स्त्री*. [*अ*.] १. मुहूर्त; शुभ वेळ. २ पळ. ३. एक तास; अडीच घटका.–*अव्य*.* पा० 'शायद'.

साइद–*पु*. [*अ*.] मनगट.

साइयाँ; **साईं**–*पु*. पा० 'सांई'.

साई–*वि*. [*अ*.] उद्योगी; प्रयत्न, धांवपळ करणारा.

साई–*स्त्री*. १. विसार; बयाणा. २.+ शेतकऱ्यांचें परस्पर-साह्य.

साईस–*पु*. मोतद्दार; घोडयाची सेवा व देखरेख करणारा नोकर.

साईसी–*स्त्री*. मोत्तद्दाराचें काम.

साउ+–*पु*. पा० 'साहु'.

साउज*–*पु*. सावज.

साकंभरी–*स्त्री*. शाकंभरी देवी. –*पु*. सांबर सरोवर व त्याच्या सभोंवतालचा प्रदेश.

साक़–*स्त्री*. [*अ*.] १. पोटरी. २. वृक्षाचें खोड. ३. रोपाचा देंठ.

साक–*पु*. १. पालेभाजी. २. सागवान.–*स्त्री*.* पा० 'साख'.

साकट–त*–*पु*. १. शाक्तपंथी; शाक्त. २. मद्य-मांस सेवन करणारा; छाकटा. ३. दुष्ट. ४. गुरु नसलेला.

साकर-ल–+*वि*. अरुंद.–*स्त्री*. सांखळी.

साकवर+–*पु*. बैल.

साका–*पु*. १. शक; संवत्. २. प्रसिद्धि; ख्याति. ३.* अभिलाषा. ४. संधि. ५. धाक; दरारा. मु०–**चलना**– दरारा बसणें.–**चलाना**; **–बांधना**–दरारा बसविणें. [हीन.

साकित–*वि*. [*अ*.] गप्प; गति-

साकिन–*वि*. [*अ*.] १. रहिवासी. २. हलन्त (अक्षर).–*वि*. एका स्थानावर स्थिर झालेला; गतिहीन. **–हाल**–*अव्य*. हल्लीं मुक्काम.

साक़ी–*पु*. [*अ*.] १. दुसऱ्यांना मद्य, पाणी किंवा हुक्का पाजणारा. २. प्रियकर, प्रेमिका यांच्या करितां उपयोगांत आणला जाणारा शब्द.

साकेत; **साकेतन**–*पु*. अयोध्या.

साकेतक–*पु*. अयोध्यावासी.

साक्षरता– *स्त्री*. साक्षरता; 'लिटरसी'.–**आंदोलन**–*पु*. साक्षरता प्रसाराची मोहीम; 'लिटरसी कँपेन'.

साक्षात्–*अव्य*. १. डोळयांसमोर; प्रत्यक्ष; सन्मुख. २. वस्तुतः.–*वि*. साकार; मूर्तिमान्. –*पु*. भेट; दर्शन; मुलाखत.–**कार** –*पु*. १. ज्ञान; अनुभूति. २. भेट; मुलाखत.

साक्षिपरीक्षा–*स्त्री*. उलट तपासणी; 'क्रॉस एक्झामिनेशन'.

साक्षी–*पु*. १. पाहाणारा. २. साक्ष देणारा; साक्षीदार.–*स्त्री*. साक्ष. –*वि*. स्वतःच्या डोळयांनीं पाहाणारा. **–करण**–*पु*. साक्षीदार म्हणून सही करणें; 'अटेस्टेशन'. **–कृत**–*वि*. साक्षीदार म्हणून सही केलेला; 'अटेस्टेड'.

साक्ष्य–*पु*. १. साक्ष. २. पुरावा; 'एव्हिडन्स'.–**विधि**–*स्त्री*. साक्षीसंबंधींचा कायदा; 'लॉ ऑफ एव्हिडन्स'.

साख–*स्त्री*. २. दरारा; वजन; दबाव; १. मर्यादा. ३. पत; 'क्रेडिट'. ४*. फांदी.–*पु*. १. साक्ष. २. साक्षीदार. **–पत्र**–*पु*. रोखे; कर्जरोखे; 'सिक्यूरिटीज'.

साखना*–*क्रि. स*. साक्ष देणें.

साखर*–*वि*. साक्षर; सुशिक्षित.

साखा*–*स्त्री*. १. शाखा; फांदी. २. जात्याचा आंस, कणा.

साखी+–*पु.* १. साक्षीदार. २. पंच. ३.* वृक्ष. – *स्त्री.* १. साक्ष. २. ज्ञान-वैराग्यविषयक पद किंवा कविता; दोहा. मु०– **पुकारना**–१. साक्ष देणें. २. धांवा करणें.

साखू–*पु.* शालवृक्ष.

साखोचार; **साखोचारन***–*पु.* गोत्रोच्चार (लग्न इ० प्रसंगीं).

साख़्त– *स्त्री.* [*फा.*] १. बनविणें; घडणें; घडण; ढंग. २. कपोलकल्पित गोष्ट.

साख़्ता–*वि.* [*फा.*] बनविलेला; बनावटी; नकली.–**परदाख़्ता**–*वि.* १. बनविलेला; तयार केलेला. २. सजविलेला.

साग–*पु.* १. पालेभाजी. २. शिजविलेली भाजी.–**पात**–१. चटणीभाकर; मीठभाकरी; साधें व कोरडें भोजन. २. भाजीपाला. **मु०–समझना**–तुच्छ समजणें.

सागर–*पु.* १. समुद्र. २. सरोवर.

साग़र–*पु.* [*अ.*] १. पेला. २. दारू पिण्याचा पेला; मद्यचषक.

सागू–*पु.* [*इं.*] साबुदाण्याचें झाड.–**दाना**–*पु.* साबुदाणा. [झाड.

सागौन–*पु.* सागवान; सागाचें

साग्निक–*वि.* १. अग्नीशीं संबंधित. २. अग्नीनें साक्ष दिलेला. –*पु.* अग्निहोत्री.

साचक़– *स्त्री.* [*तु*] लग्नांतील एक चाल. लग्नाच्या आधल्या दिवशीं वरपक्षाकडून वधूसाठीं कपडे, मेंदी, मेवा-मिठाई इ० पाठविण्यांत येते. याला साचक़ असें म्हणतात (मुसल०).

साचिविक–*वि.* सचिव किंवा चिटणीस यांच्याशीं संबंधित; 'सेक्रेटेरियल.' – **स्तरपर**– *अव्य.* सचिवांच्या पातळीवर; 'ऑन सेक्रेटेरियल लेव्हल.'

साची+–*स्त्री.* खरी गोष्ट; सत्य.

साज़–*पु.* [*फा.*] १. सजावट; थाटमाट. २. सजावटीची सामग्री; सामान. ३. गाण्यांतील साथीचें वाद्य. ४. लढाईंतील हत्यार. ५. मेळ; मिलाफ. –*वि.* तयार करणारा; बनविणारा (उदा० घडीसाज़ = घडचाळ बनविणारा).–**गार**– १. अनुकूल; शुभ. २. दुरुस्त; ठीक.–**बाज़**–*पु.* संगनमत; कट; बनवाबनवी. – **सामान**–*पु.* १. सामग्री; सामानसुमान. २. थाटमाट. **मु०–करना**–१. तडजोड करणें. २. कट करणें. – **छेड़ना**– वाद्य वाजविणें. –**सजाना**–१. सजविणें. २. शृंगार करणें.

साज*–*वि.* सारखा; सदृश.

साजन–*पु.* १. पति; स्वामी. २. ईश्वर. ३. प्रेमी; वल्लभ. ४. सज्जन.

साजना*–*क्रि. स.* १. सजविणें. २. सुसज्जित, तयार करणें. – *पु.** पा० 'साजन'.

साजा*–*वि.* १. सुंदर. २. स्वच्छ; चांगला.

साज़िंदा–*पु.* [*फा.*] १. वादक. २. गवयाची साथ करणारा (तबलजी, सारंगीवादक इ०).

साज़िश– *स्त्री.* [*फा.*] १. कट; कारस्थान. २. मेल; मिलाफ.

साझा–*पु.* १. भागीदारी; पाती. २. वांटा; हिस्सा. –(**झे**) **दार**–*पु.* भागीदार; वांटेकरी.– (**झे**) **दारी**– *स्त्री.* भागीदारी; वांटणी; वांटा.

साझी–*पु.* भागीदार; वांटेकरी.

साट– *स्त्री.* १. छडी. २. छडीचा वळ.–**मार**–*पु.* हत्तींना झुंजविणारा; साठमारी करणारा.

साटक*–*पु.* १. कोंडा; सालपट; भुसा. २. टाकाऊ, तुच्छ वस्तु. ३. एक प्रकारचा छंद.

साटन–*पु.* [*इं.*] एक प्रकारचें उत्तम रेशमी कापड; 'सॅटिन'.

साटना–*क्रि. स.* जोडणें; चिकटविणें.

साटा*–*पु.* बदला. [कामटी.

साटी– *स्त्री.* १. छडी. २.

साठ–*वि.* साठ; ६०. – *स्त्री.** भांडवल; संपत्ति. –**नाट** *वि.* १. दरिद्री; गरीब. २. नीरस; रुक्ष. ३. अस्ताव्यस्त; विखुरलेलें.

साठसाती– *स्त्री.* साडेसाती.

साठा–*पु.* १. ऊंस. २. लांबरुंद शेत. –*वि.* साठ वर्षें वयाचा; साठीचा. [भात (साळी)

साठी–*पु.* लौकर तयार होणारें

साड़ी– *स्त्री.* लुगडें; साडी.

साढ़साती*– *स्त्री.* शनीची साडेसाती.

साढ़ी– *स्त्री.* १. आषाढ महिन्यांत पेरलें जाणारें धान्य. २. मलई; साय. ३.+ साडी.

साढ़ू–*पु.* साडू; मेहुणीचा नवरा.

साढ़े–*वि.* साडे.–**साती**– *स्त्री.* साडेसाती. **मु०–आना, चढ़ना**– साडेसाती येणें, लागणें; आपत्काल येणें.

सात–*वि.* सात; ७.–**पाँच**–*पु.* चलाखी; लुच्चेगिरी. (**मु०–० न जानना**–छक्केपंजे माहीत नसणें; भोळें असणें). –**पूती**– *स्त्री.* एकप्रकारचें घोसाळें. – **फेरी**– *स्त्री.* लग्नांतील सप्तपदी. मु०–**की नाक कटना**–सबंध कुटुंबाची बदनामी होणें.–**पाँच की लाठी एक जनेका बोझ**–दसकी लकडी एकका बोजा. –**राजाओंकी साक्षी देना**– एखादी गोष्ट खरी असल्याबद्दल ठासून सांगणें.– **समुंदरपार**– खूप दूर. –

–(तों) भूल जाना – घाबरगुंडी वळणें. ['कंटीन्युइटी '.

सातत्य–निरंतरता; सातत्य;

साता*– *स्त्री.* शांतता.

सातिक-ग*–*वि.*– सात्त्विक.

सात्त्विक–*वि.* सत्त्वगुण असलेला; चांगला.

सात्रिक परीक्षा– *स्त्री.* सहामाही परीक्षा; ' टर्मिनल एक्झामिनेशन '.

साथ–*पु.* १. संगत; सहवास; साहचर्य. २. साथीदार; सहचर. ३. घनिष्ठता; दाट परिचय; मैत्री. –*अव्य.* १. सहित; सह. २* द्वारा. **एक साथ**–*अव्य.* एकदम; एकाच क्रमांत.–**ही**–*अव्य.* शिवाय; तसेंच; अतिरिक्त. –**ही साथ**–*अव्य.* बरोबर; एकत्र. **मु०– का खेला**–बालमित्र. –**को**–तोंडीं लावण्यास; कोरड्यास; तोंडीं लावणें.–**देना**–बरोबर राहाणें; साह्य करणें.–**होना**–सामील होणें.

साथरई*–*पु.* चटई; कुशासन.

साथरा–*पु.*; **साथरी**– *स्त्री.* १. गवताचें अंथरूण; बिछाना. २. चटई. [कारिणी.

साथिन– *स्त्री.* मैत्रीण; सह-

साथी–*पु.* १. मित्र; साहाय्यक; दोस्त. २. बरोबर राहाणारा; सहचर.

सादगी–*स्त्री.* [*फा.*] १. निष्कपटता; सरळपणा. २. साधेपणा.

सादा– *वि.* [*फा.*] १. साधा; सोपा. २. निर्मळ; शुद्ध. ३. सरळ; निष्कपटी; भोळा. ४. मूर्ख.–**काग़ज़**–*पु.* कोरा कागद. –**दिल**–*वि.* भोळा; सरळ. –**पन**–*पु.* साधेपणा. –**मिज़ाज**–*वि.* साधाभोळा. –**रू**–*वि.* दाढीमिशा नसलेला.

सादात–*पु.* [*अ.*] सैयद जातीचे किंवा वंशाचे लोक.

सादिक़–*वि.* [*अ.*] १. सत्यनिष्ठ; खरा. २. उपयुक्त. **मु०– आना**–१. घडणें. २. सिद्ध होणें.

सादी– *स्त्री.* १. एक पक्षी. २. भरण न घातलेली पुरी. ३. मांजा न लावलेला पतंगाचा दोरा. ४⁺ लग्न.

सादी–*पु.* [*फा.*] फारसीचा प्रसिद्ध कवि सादी शीराज़ी. –*वि. स्त्री.* साधी.–**ज़बान**– *स्त्री.* सोपी व अकृत्रिम भाषा. [२. हिंस्त्र पशु.

सादूर*–*पु.* १. शार्दूल; सिंह.

साध– *स्त्री.* कामना; इच्छा. – *वि.* उत्तम; चांगला.–*पु.** १. साधु; महात्मा. २. सज्जन.

साधक–*पु.* १. साधना किंवा उपासना करणारा. २. सिद्ध, पूर्ण करणारा; योग्य; साधणारा; कुशल.

साधन–*पु.* १. साधन; उपाय; मार्ग; उपकरण. २. सिद्धि; उद्देश्यप्राप्ति. –**करना**–*क्रि. स.* सोडविणें; उत्तर काढणें; 'टु सॉल्व्ह '. –**पत्र**–*पु.* लेखी पुरावा.–**हार**–*वि.* सिद्ध करणारा, होणारा.

साधना–*स्त्री.* १- कार्यसिद्धि. २. आराधना; उपासना. ३. साधन. –*क्रि. स.* १. साधणें. २. लक्ष्य साधणें; नेम धरणें. ३. मापणें. ४. संचय लावणें. ५. ठरविणें; निश्चित करणें. ६. वश करणें. ७. गोळा करणें; जमविणें.

साधनी– *स्त्री.* जमीन सपाट करण्याचें अवजार.

साधा*–*पु.* उत्कंठा.

साधारण–*वि.* १. सामान्य; मामुली. २. समान. ३. सोपें. ४. सार्वत्रिक.–**निर्वाचन**–*पु.* सार्वत्रिक निवडणूक; 'जनरल इलेक्शन'.

साधुवाद–*पु.* १. वाहवा; शाबासकी. २. आशीर्वाद. ३. आभार; धन्यवाद.

साधो*–*पु.* हे साधु (संबोधन).

साध्य–*वि.* सिद्ध करण्यास योग्य; सोपें; सहज.–*पु.* १. उद्दिष्ट. २. शक्ति. ३. देव. ४. सिद्धांत; ' प्रॉपोझिशन '.

सान–*पु.* १. धार लावण्याचा दगड; सहाण. २. धार. – *स्त्री.*⁺ पा० ' शान. ' **मु०–देना अथवा धरना**–धार लावणें.

सानना–*क्रि. स.* १. मिसळणें; मळणें; मिश्रण करणें. २. चूर्ण इ० द्रव पदार्थांत मिसळून एकत्र करणें; ढवळणें. ३. सहभागी करणें. ४. गुंडाळणें. [अपघात.

सानिहा–*पु.* [*अ.*] दुर्घटना;

सानी–*स्त्री.* १. गुरांचें आंबोण; पाण्यांत भिजविलेली वैरण. २. अनेक वस्तूंचें किंवा पदार्थांचें मिश्रण; खिचडी (उपहास). ३. गाडीच्या चाकाखालीं टेकण लावावयाचा दगड. ४.⁺ सनई.

सानी–वि. [*अ.*] १. दुसरा. २. बरोबरीचा; जोडीचा; तोडीचा. **मु०–न रखना, होना**–तोड नसणें; अद्वितीय असणें.

सानुक्रम संस्थान–*पु.* उच्चनीच पातळ्यांवरील पदांनीं युक्त अशी संस्था, संघटना; ' हायरार्कि. '

साप-पा*–*पु.* शाप.

सापत्न्य–*पु.* सावत्रपणा; शत्रुत्व.

सापन–*पु.* डोकीचे केंस गळण्याचा रोग.

सापना*– *क्रि. स.* शाप देणें; एखाद्याच्या नांवानें बोटें मोडणें.–*पु.* स्वप्न.

साफ़– *वि.* [*अ.*] १. स्वच्छ; निर्मळ. २. शुद्ध. ३. निर्दोष. ४. स्पष्ट; सुवाच्य. ५. उज्ज्वल.

६. चमकदार. ७. निष्कपट. –*अव्य.* स्पष्टपणें; स्वच्छ; साफ; उघडपणें. **–गो**–*वि.* स्पष्टवादी.**–जबाब** –*पु.* १. स्पष्ट नकार. २. फटकळ उत्तर.**–दिल**–वि. निष्कपट; निर्मळ अंतःकरणाचा.**–साफ़्**–*अव्य.* स्पष्ट; उघड उघड. **मु०–करना**–१. सफाई करणें. २. पुनः उत्तम अक्षरांत लिहिणें. ३. निकाल लावणें; नष्ट करणें.**–मैदान होना** – १. कांहीं अडचण न राहाणें. २. एकांत मिळणें.

साफ़ा–*पु.* [*अ.*] पागोटें; फेटा; पगडी. **मु०–देना**–१. शिकारी पशूनें सावजावर जोराचा हल्ला करावा म्हणून त्याला उपाशी ठवणें. २. कबुतरानें अधिक उंच उडावें म्हणून त्याला उपाशी ठेवणें.

साफ़ी– *स्त्री.* [*अ.*] १. रुमाल. २. तंबाखू किंवा गांजा पितांना चिलमीस गुंडाळावयाचें फडकें. ३. भांग छानावयाचें, गाळावयाचें वस्त्र. ४. चुलीवरून भांडें उतरतांना वापरावयाचें फडकें.**–नामा**–*पु.* पा० ' राजीनामा. '

साबिक़्–वि. [*अ.*] माजी; भूतपूर्व; पूर्वीचा. **–दस्तूर**–*अव्य.* पूर्वींसारखेंच; पहिल्याप्रमाणेंच; यथापूर्व.

साबिक़ा–*पु.* [*अ.*] १. संबंध. २. मुलाखत; भेट. **मु०–पड़ना**; **–होना**–गांठ पडणें, असणें.

साबित–*वि.* [*अ.*] १. प्रमाणभूत; शाबीत; सिद्ध झालेला. २. शाबूत; अखंड; अभंग. ३. दुरुस्त; ठीक. ४. दृढ; मजबूत. ५. स्थिर; एकाच ठिकाणीं राहणारा. **–क़दम** *वि.* दृढ; न डगमगणारा.

साबिर–*वि.* [*अ.*] १. सबूर करणारा; धीर धरणारा. २. सहन करणारा. [ठीक. ३. स्थिर.

साबुत+–*वि.* १. शाबूत. २.

साबुन–*पु.* [*अ.*] साबण.–**साज़ी**– *स्त्री.* साबण तयार करणें.

साबूत+–*वि.* अखंड; अभंग; शाबूत.

साबूदाना–*पु.* साबुदाणा.

साबून–*पु.* पा० ' साबुन. '

सामंजस्य–*पु.* १. मेळ; संगति; समन्वय. २. औचित्य; उपयुक्तता.

सामंत–*पु.* १. शेजारचा राजा. २. मांडलिक; सरदार; मोठा जमीनदार. ३. योद्धा; वीर.**–तंत्र**; **–वाद**–*पु.*; **–शाही**– *स्त्री.* सरंजामशाही; सरदारशाही; ' फ्यूडॅलिझम् '; ' फ्यूडल सिस्टिम '.**–देश**–*पु.* मांडलिक राज्य, देश; ' प्रिन्सिपॅलिटी '.

सामग्री– *स्त्री.* १. सामान. २. जरुरीच्या वस्तू; साधनें; उपकरणें.

सामत*– *स्त्री.* पा० ' शामत '. –*पु.* पा० ' सामंत '.

सामध*–*पु.* व्याह्यांनीं एकमेकांना भेटण्याचा विधि.

सामना–*पु.* १. संघर्ष; विरोध; सामना; स्पर्धा. २. भेट; मुलाखत. ३. दृष्टादृष्ट. ४. वस्तूचा दर्शनी भाग.

सामने– *अव्य.* १. सन्मुख; समोर. २. हजर असतांना. ३. तुलनेंत. ४. विरुद्ध. **मु०–होना**– १. समोर येणें. २. विरोधास उभें राहाणें. ३. धृष्टतेनें वागणें.

सामयिक– *वि.* १. समयानुकूल. २. वर्तमानकालीन. ३. हंगामी; प्रचलित; तात्पुरतें; ' प्रोव्हिजिनल '. **–पत्र**–*पु.* नियतकालिक; ' पीरियॉडिकल '.**–वार्ता**–*स्त्री.* प्रचलित विषयावरील चर्चा, भाषण; ' टॉपिकल टॉक '.

सामरथ+– *स्त्री.* सामर्थ्य.

सामरिक–*वि.* युद्धासंबंधींचें; लढाईचें.

सामर्थ+– *स्त्री.* सामर्थ्य.

सामर्थ्य– *स्त्री.* शक्ति; बळ; पौरुष. [नीतिज्ञ; राजकारणी.

सामसाली*– *वि.* *पु.* राज-

सामहिँ–**हि**–*अव्य.* समोर.

सामाँ–*पु.* पा० 'सामान'.

सामाँ–मा–* *पु.* १. सावा; वरी. २. सामान.–*स्त्री.* व्यवस्था.

सामाजिक– *वि.* समाजासंबंधींचा; ' सोशल '. **–व्यवस्था**– *स्त्री.* समाजव्यवस्था; ' सोशल ऑर्डर '. **–सुरक्षा**–*स्त्री.* सामाजिक सुरक्षितता; ' सोशल सिक्युरिटी '.

सामान–*पु.* [*फ़ा.*] १. सामान; उपकरण; सामग्री. २. व्यवस्था. **–घर**–*पु.* रेल्वेस्टेशन इ० ठिकाणीं सामान ठेवण्याची खोली; ' लगेज ऑफिस '. **–दान**– *पु.* मोटार इ० मध्यें सामान ठेवण्याची जागा. **–यान**–*पु.* सामानाचें वाहन, गाडी; 'बॅगेज कार '.

सामान्य– *वि.* सर्वसाधारण; मामुली.**–गुणज**–*पु.* ल. सा. वि; ' एल्. सी. एम् '.

सामान्यतः ; **सामान्यतया**– *अव्य.* साधारणपणें; सामान्यतः

सामान्या–*स्त्री.* वारांगना; वेश्या. [याना '.

सामियाना+– *पु.* पा० ' शामि-

सामिष–*वि.* मांसयुक्त; मांसाहारी; ' नॉन व्हेजिटेरियन '.**–भोजनालय**–*पु.* मांसाहारी भोजनालय; 'नॉनव्हेंजिटेरियन रिफ्रेशमेंट रूम '.

सामी*– *पु.* स्वामी.– *स्त्री.*+ छडी इ० ला बसविलेली शेंबी, वेढें.–*वि.* सयामी.

सामुझि*– *स्त्री.* पा० 'समझ'.

सामुदायिक– *वि.* सामूहिक; समुदायाशीं संबंधित; सामुदायिक. **–योजना**– *स्त्री.* सामुदायिक योजना; 'कम्युनिटी प्रॉजेक्ट'.

सामुहाँ–हें*– *अव्य.* समोर.

साम्य–*पु.* १. सादृश्य. २. समानता; बरोबरी.**–वाद**–*पु.* समाजसत्तावाद; समाजवाद; साम्यवाद; 'कम्यूनिझम'.

साम्यावस्था– *स्त्री.* १. सत्त्व, रज व तम या गुणांची सम अवस्था. २. समतोलपणा; साम्य; स्थिरता; 'ईक्विलिब्रियम.'. [साम्राज्य.

साम्राज्य–*पु.* सार्वभौम सत्ता;

साम्राज्यांतर्गत अधिमान्यता– *स्त्री.* 'इंपीरियल प्रेफरन्स'. [वार.

सायक– *पु.* १. बाण. २. तल-

सायत+– *स्त्री.* मुहूर्त.

सायबान– *पु.* [*फा.*] १. घराचें पुढील छप्पर; वळचण; 'पोर्च'. २. ऊन्ह व पाऊस यांपासून बचाव व्हावा म्हणून टांगलेला पडदा.

सायमाश–*पु.* रात्रीचें जेवण; 'डिनर'. [वरचा भाग.

सायर*– *पु.* १. समुद्र. २.

सायर– *वि.* [*अ.* 'साइर'] १. भटकणारा; प्रवासी. २. एकंदर; संपूर्ण. ३. उरलेला; अवशिष्ट. ४. मजा मारणारा; अडाणटप्पू. ५. अनिश्चित; अस्थायी.**–पु.** १. जकात. २. सारा नसलेली जमीन. ३* कवि.

सायल–*वि. पु.* [*अ.*] १. प्रश्न करणारा; पृच्छक. २. मागणारा. ३. भिकारी. ४. प्रार्थना करणारा. ५. उमेदवार.

साया– *पु.* [इं. 'शेमीज़'] लेहंग्यासारखा बायकी पेहराव; साडीच्या आंत नेसण्याचा परकर.

साया– *पु.* [*फा.*] १. छाया. सावली. २. प्रतिबिंब. ३. भूत, प्रेत इ०ची बाधा.**–दार**–*वि.* छायादार; दाट सावली असलेलें. **मु०–उठना**– कृपाछत्र नाहींसें होणें.**–उतरना**– भूतबाधा दूर होणें. **–होना**–भूतबाधा होणें.

सायुज्य–*पु.* १. मुक्तीचा, मोक्षाचा एक भेद. यामध्यें जीवात्मा परमात्म्यांत लीन होऊन जातो. २. एकीकरण; मिलाफ; 'फ्यूजन'.

सायुज्यित– *वि.* एकीभवन झालेला; 'फ्यूज्ड'.

सारंग– *पु.* १. कोकिळा. २. हंस. ३. मोर. ४. बहिरी ससाणा. ५. हरिण. ६. सूर्य. ७. चंद्र. ८. विष्णु. ९ मेघ. १० एक राग. (संगीत). **–पाणि–नि***–*पु.* विष्णु. **–हर***– *पु.* शार्ङ्गधर; विष्णु.

सारंगिया–*पु.* सारंगी वाजविणारा.

सार–*पु.* १ सत्त्व; तत्त्व; सारांश. २. अर्क. ३. पालन-पोषण. **–र्गभित**–*वि.* उद्‌बोधक; भरीव; तत्त्वपूर्ण. **–भूत**–*वि.* सर्वश्रेष्ठ; सर्वोत्तम. **–सँभार– ल**–*पु.* पालनपोषण; मशागत.

सार+–*स्त्री.* गोठा.

सार–*पु.* [*फा.*] उंट. **–बान**–*पु.* उंट चालविणारा; सांडणीस्वार.

सारणी–*स्त्री.* तक्ता; पत्रक; 'टेबल'. [सरस्वती.

सारद–दा*–*स्त्री.* शारदा;

सारदी*–*वि.* शारदीय; शरद् ऋतूंतील.

सारदूल*–*पु.* शार्दूल; सिंह.

सारना*–*क्रि.स.* १. दूर करणें; सारणें. २. पुसणें; साफ करणें. ३. पूर्ण करणें. ४. लावणें; काढणें. ५. दुरुस्त करणें. ६. सांभाळणें. ७. सुंदर बनविणें.

सारभाटा–*पु.* भरती-ओहोटी.

सारस–*पु.* १. चक्रवाक पक्षी. २. हंस. ३. कमल. ४. चंद्र. [*–स्त्री.* **सारसी**].

सारसुता*– *स्त्री.* यमुना नदी.

सारसुती*–*स्त्री.* सरस्वती.

सारांश–*पु.* तात्पर्य; सारांश; मथितार्थ.

सारा–*वि.* सगळा; संपूर्ण.–*पु.** पा० 'साला'.

सारि–*पु. स्त्री.* सोंगटी. – *स्त्री.* १. मैना. २. फांसा. **–फलक**–*पु.* सारीपट. ['सारि'.

सारिका–*स्त्री.* १. मैना. २. पा०

सारिखा*–*वि.* सारखा; सदृश.

सारी–*स्त्री.* पा० 'सारि'.

सारु*–*पु.* १. सार. २. निष्कर्ष.

सारूप्य–*पु.* चार प्रकारच्या मुक्तींपैकीं एक. या वेळीं उपासक आपल्या इष्ट देवतेशीं एकरूप होऊन जातो.

सारो+–*पु.* मेहुणा; साला. **–वि.** सारा; सर्व. **–स्त्री.** मैना; साळुंकी.

सारौं*– *स्त्री.* मैना.

सार्थ–*वि.* १. अर्थयुक्त. २. उपयुक्त. –*पु.* १. श्रीमंत माणूस. २. व्यापाऱ्यांचा तांडा; काफिला. **–वाह**–*पु.* १. तांड्याचा पुढारी. २. व्यापारी.

सार्थक–*वि.* अर्थपूर्ण; सार्थ; सूचक; 'सिग्निफिकंट'. २. सफळ; उपकारी; उपयोगी.

सार्दूल–*पु.* सिंह. [नेहमींचा.

सार्वकालिक–*वि.* सर्वकाळांचा;

सार्वगुणज–*पु.* ल. सा. वि.; 'एल्. सी. एम्.'

सार्वजनिक–*वि.* सार्वजनिक; 'पब्लिक'. **–निर्माणविभाग–पु.**

सार्वजनिक बांधकाम खातें; ' पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट '. **–व्यवस्था–** *स्त्री*. सार्वजनिक सुव्यवस्था; ' पब्लिक ऑर्डर '.

सार्वजनीन–*वि*. सार्वजनिक; सर्वांचा; सार्वत्रिक. [संबंधित.

सार्वदेशिक–*वि*. सर्व देशांशीं

साल–*पु*. १. छेद; धाव; जखम. २. दुःख; पीडा. ३. शाल वृक्ष. ४. बाजेच्या खुरांचीं भोकें ५*– साळी; भात –*स्त्री*.* शाळा.

साल–*पु*. [*फा.*] वर्ष.–**खुर्दा**–*वि*. १. जुना; पुष्कळ दिवसांचा. २. वृद्ध; म्हातारा. ३. अनुभवी. **–गिरह–** *स्त्री*.वाढदिवस.–**नामा**–*पु*. वार्षिक विशेषांक.–**हा साल**–*अव्य*. पुष्कळ वर्षेंपर्यंत; वर्षानुवर्षें. –(**ले**) **इलाही**–*पु*. अकबरानें सुरू केलेला शक.– (**ले**) **कबीसा**–*पु*. १. अधिक मास असलेले वर्ष. २. फेब्रुवारी महिन्यांत २९ दिवस असलेलें वर्ष. –(**ले**) **पैवस्ता**–*पु*. मागील वर्ष. –(**ले**) **रवाँ**–*पु*. चालू वर्ष. –(**ले**) **हाल**–*पु*. चालू वर्ष. [देणारा.

सालक*–*पु*. सलणारा; दुःख

सालन–*पु*. १. मसालेदार भाजी; कोरड्यास; तोंडीं लावणें. २. मांसाचा रस्सा.

सालना–*क्रि. अ*. १ सलणें; दुःख होणें. २. बोचणें; टोंचणें; ठुसठुसणें. –*क्रि. स*. १. दुःख देणें. २. बोंचविणें. [औषध.

सालसा–*पु*. एक रक्तशुद्धिकारक

साला–*पु*. १. मेहुणा (बायकोचा भाऊ); साला. २. एक शिवी. ३.* मैना.

साला–*वि*. [*फा.*] वर्षाचा. (पंजसाला=पांच वर्षांचा; पंचवार्षिक). [३. शाळा.

साला+–*स्त्री*. १. घर. २. भिंत.

सालाना–*वि*. [*फा.*] वार्षिक; दर वर्षींचा. –*अव्य*.–दरसाल. –*पु*. वार्षिक तनखा.

सालार–*पु*. [*फा.*] नेता; पुढारी.–(**रे**)**जंग**–*पु*. १. सेनापति. २, मेहुणा; साला (थट्टेंत).

सालिक–*वि*. [*अ.*] १. प्रवासी. २. धार्मिक व नीतिमान्. –*पु*. गृहस्थाश्रमी साधक.

सालिम–*वि*. [*अ.*] १. संपूर्ण; अखंड; सर्व. २. निरोगी. ३. सहीसलामत; सुखरूप.

सालियाना–*पु*. [*फा.*] वार्षिक वृत्ति; तनखा. –*वि*. वार्षिक.

सालिस–*वि*. [*अ.*] तिसरा; तृतीय. –*पु*. मध्यस्थ; पंच. –**नामा** –*पु*. पंचनामा.

सालि(ले)ह–*वि*. [*अ.*] १. प्रामाणिक. २. सदाचारी. ३. भाग्यवान्. [बलुतें; वार्षिक तनखा.

साली– *स्त्री*. १. मेहुणी. २.

सालु+–*पु*. १. दुःख; त्रास. २. ईर्ष्या.

सालू+–*पु*. १. शालू. २. शाल.

सालूर–*पु*. १. शालू. २. शाल. ३. शिंपला. ४. बेडूक.

सालोक्य–*पु*. चार प्रकारच्या मुक्तींपैकीं एक. यावेळीं मुक्त जीव परमात्म्याबरोबर त्याच्या लोकीं निवास करतो .

सावँ–वाँ–*वि*.+ सांवळा.[घोडा.

सावँकरन+–*पु*. श्यामकर्ण;

सावँर–रा*–*वि*. पा० 'साँवला'.

सावकाश–*पु*. १. सवड; फुरसत; सुट्टी. २. संधि; अवसर. –*वि*. ज्याला सवड, फुरसत आहे असा. –*अव्य*. सवडीनें; फुरसतीनें.

सावचेत*–*वि*. सावध; सचेत.

सावचेती+– *स्त्री*. सावधगिरी; सावधानता.

सावज*–*पु*. सावज; शिकारी जनावर.

सावत*–*पु*. १. सवती–मत्सर. २. ईर्ष्या; द्वेष.

सावधान–*वि*. सावध; जागरूक.

सावधानता; सावधानी– *स्त्री*. सावधपणा; सावधगिरी; खबरदारी; काळजी.

सावधि–*वि* मुदतीचा. –**निक्षेप** –*पु*. मुदतीची ठेव; ' फिक्स्ड डिपॉझिट '.

सावधिक–*वि*. नियतकालीन; ' पीरियॉडिकल '. –पत्र–*पु*. नियतकालिक; ' पीरियाडिकल '. **–प्रस्फोट**–*पु*. ' टाइम बॉंब '.

सावन–*पु*. १. श्रावण महिना. २. श्रावण महिन्यांत गायिलें जाणारें गीत (कजरी).

सावनी– *स्त्री*. १. वर पक्षाकडून वधूच्या माहेरीं श्रावणांत धाडली जाणारी भेट; श्रावणपाटी. २. श्रावणी. ३. श्रावणी पौर्णिमा.

सावरणी– *स्त्री*. जैन साधूंची केरसुणी.

सावाँ–*पु*. वरी (धान्य); सावा.

साष्टांग–*वि*. आठहि अंगें जमिनीस टेकतील असा; आठ अंगांसहित. **मु०– प्रणाम, दंडवत करना**– दुरून नमस्कार करणें; दूर राहाणें.

सास– *स्त्री*. सासू.

सासत– *स्त्री*. कष्ट; त्रास.

सासति*– *स्त्री*. शासन; शिक्षा.

सासन+– *स्त्री*. १. शासन; सजा. २. राज्यकारभार.

सासनलेट–*पु*. एक प्रकारचें पांढरें जाळीचें कापड.

सासना*– *स्त्री*. १. शासन; राज्य. २. कष्ट; त्रास. [वाडी.

सासरा*–*पु*. सासर; सासुर-

सासा*– *स्त्री*. १. संशय; शंका. २. श्वास. [एक राजवंश.

सासानी–*पु.* [*फा.*] इराणचा

सासु*– *स्त्री*. सासू.

साहु–*पु.* १. सज्जन. २. व्यापारी. ३. सावकार; शट. ४.+ पा० 'शाह'. ['असोसिएशन'.

साहचर्य–*पु.* संबंध; साहचर्य;

साहनी*–*स्त्री*. १. सैन्य; फौज. २. सहचर. ३. दरबारी; सभासद.

साहब–बा–बी– पा० 'साहिब–बा–बी'.

साहस–*पु.* १. हिम्मत; धैर्य; धाडस. २. जबर्दस्ती; जुलूम.

साहसिक–*वि*. १. साहस करणारा; पराक्रमी; निर्भय. २. अत्याचारी. –*पु.* डाकू; चोर.

साहा+–*पु.* शुभमुहूर्त; लग्नमुहूर्त. [माणूस.

साहि*–*पु.* १. राजा. २. सज्जन

साहिती– *स्त्री*. साहित्य.

साहित्य–*पु.* १. साहित्य; वाङमय. २. मिलाफ. **–परिषद्**–*स्त्री*. 'अकादेमी'.

साहित्यादि महाविद्यालय–*पु.* साहित्य– कला– महाविद्यालय; 'आर्ट्स कॉलेज'.

साहिब–*पु.* [*अ.*] १. मित्र; दोस्त. २. मालक. ३. परमेश्वर. ४. आदरसूचक शब्द; महाशय. ५. साहेब; युरोपियन; गोरा माणूस. **–ज़ादा**–*पु.* १. प्रतिष्ठित व्यक्तीचा मुलगा. २. पुत्र; मुलगा. ३. अल्लड, अननुभवी तरुण; ऐतोबा; बाजीराव (व्यंग). **–बहादुर**–*पु.* १. इंग्रज, गोरा अधिकारी. २. साहेबी थाटानें राहाणारा हिंदी अधिकारी. **–सलामत**– *स्त्री*. १. परस्पर–अभिवादन; नमस्कार. २. सामान्य ओळख. –(बे) **इन्साफ़**–*वि*. न्यायी –०**इल्म**–*वि*. विद्वान्. –०**कमाल**–*वि*. १. सिद्ध; द्रष्टा. २. अद्‌भुत कार्य करणारा. –०**ख़ाना**–*पु.* घरचा मालक; यजमान. –०**ज़बान**–*वि*. विशिष्ट भाषेचा पंडित. –०**दिमाग़**–*वि* १. घमेंडखोर. २. बुद्धिमान् –०**दिल**–*वि*. दयाळु; महात्मा.

साहिबा–*स्त्री*. [*अ.* 'साहिब' शब्दाचें स्त्रीलिंग] बाईसाहेब; श्रीमती.

साहिबाना–*वि*. [*अ.* + *फा.*] साहेबासारखें; साहेबी.

साहिबी– *स्त्री*. [*अ.*] १. प्रभुता. २. मोठेपणा. –*वि*. साहेबी. **मु०– करना**–अधिकाराचा तोरा दाखविणें.

साहियाँ*–*पु.* पा० 'साँई'.

साहिर–*पु.* [*अ.*] जादूगार.

साहिल–*पु.* [*अ.*] समुद्राचा किंवा नदीचा किनारा.

साही– *स्त्री*. साळ (प्राणी); साळिंदर. –*वि.*+पा० 'शाही'.

साहु–*पु.* १. सज्जन. २. सावकार. ३. शहाजी; शाहू.

साहुल–*पु.* ओळंबा; 'प्लम'.

साहू–*पु.* पा० 'साहु'.

साहूकार–*पु.* १. सावकार. २. श्रीमंत माणूस. ३. मोठा व्यापारी.

साहूकारा–*पु.* १. रुपयांची देवघेव. २. सावकारांचा व्यवहार चालतो ती पेठ; सराफकट्टा.

साहूकारी– *स्त्री*. सावकारी.

साहेब–*पु.* पा० साहिब'.

साहैं*– *स्त्री*. भुजा; बाहु. –*अव्य*. समोर. [२. जवळ.

सिउँ*–*अव्य*. १. सह; सहित.

सिकना–*क्रि. अ.* शेकलें जाणें; तापणें; भाजलें जाणें.

सिंग+– पा० 'सींग'.

सिंगरफ–*पु.* हिंगुळ.

सिंगरी– *स्त्री*. एक प्रकारचा मासा. [रणशिंग.

सिंगा–*पु.* शिंग (वाद्य);

सिंगार–*पु.* १. शृंगार; सजावट. २. शोभा. ३. शृंगाररस. **–दान**–*पु.* वेणीफणीची पेटी; फणेर पेटी. **–हाट**– *स्त्री*. वेश्यांची वस्ती. **–हार**–*पु.* पारीजातक. [शृंगारणें.

सिंगारना*–*क्रि. स*. सजविणें;

सिंगारिया; सिंगारी–*वि.*; *पु.* मूर्तीला शृंगारणारा, सजविणारा; पुजारी.

सिंगाल+–*पु.* पहाडी बकरा.

सिंगाला–*वि*. शिंगें असलेला.

सिंगिया–*पु.* एक विष. हें एका झाडाचें मूळ असून तें वाळल्यानंतर शिंगाच्या आकाराचें बनतें.

सिंगी–*पु.* शिंग (वाद्य).– *स्त्री*. १. पावसाळयांत उत्पन्न झालेली मासळी. २. रक्त शोषण्याचें शिंग; तुंबडी. ३. घोडयांचें एक वाईट लक्षण.

सिंगौटी– *स्त्री*. १. बैलाच्या शिंगाचें आभूषण. २. शिंग. ३. वेणीफणीची पेटी. ४. तेल इ० ठेवण्याचें शिंगाचें भांडें.

सिंघ*–*पु.* सिंह. [सिलोन.

सिंघल*–*पु.* सिंहलद्वीप; लंका;

सिंघा+–*पु.* पा० 'सिंगा'.

सिंघाड़ा–*पु.* १. शिंगाडा. २. सामोसा. ३. त्रिकोणी आकाराची शिलाई.

सिंघाड़ी– *स्त्री*. शिंगाडयाचें तळें.

सिंघासन*–*पु.* सिंहासन.

सिंघी– *स्त्री*. १. सुंठ. २. एक प्रकारची मासळी. ३. राजस्थानी लोकांची एक पोटजात, आडनांव.

सिंघेला*–*पु.* सिंहाचा छावा.

सिँचना–*क्रि. अ.* शिंपडलें जाणें

सिंचाई– *स्त्री.* १. शिंपडण्याचें काम किंवा मजुरी; शिडकाव. २. पाणी पुरवठा (शेतांना); 'इरिगशन'. [काम दुसऱ्याकडून करविणें.

सिंचाना–*क्रि. स.* शिंपडण्याचें

सिंजा– *स्त्री.*; **सिंजित**– *पु.* दागिन्यांचा कर्णमधुर आवाज; झंकार.

सिंजाफ़–*पु.* [*फा.*] १. कपड्याची किनार; गोठ. २. काळसर पांढरा घोडा.

सिंदन*–*पु.* रथ.

सिंदूर–*पु.* शेंदूर; कुंकू. **–तिलका** – *स्त्री.* सौभाग्यवती स्त्री. **–दान**; **–बंदन**–*पु.* विवाहप्रसंगीं वरानें वधूच्या भांगांत शेंदूर भरण्याचा विधि. [लालसर.

सिंदूरिया; सिंदूरी–*वि.* शेंदरी;

सिंदो(धो–धौ) रा–*पु.* शेंदूर ठेवण्याची लांकडी डबी; करंडा. [–स्त्री. **सिंधोरी**]. [वीचें झाड.

सिंसप–*पु.*; **सिंसपा**–*स्त्री.* शिस-

सिंह–*पु.* १. सिंह. २. सिंह राशि. ३. श्रेष्ठ. व्यक्ति. **–द्वार**–*पु.* मुख्य दरवाजा; मोठा दरवाजा.– **नाद**–*पु.* १. सिंहाची गर्जना. २. आह्वान. **–पौर**–*पु.* सिंहद्वार; मोठें फाटक. **–स्थ**–*पु.* १. सिंह राशींतील गुरु. २. त्या वेळीं होणारें एक पर्व.

सिंहनी– *स्त्री.* सिंहीण.

सिंहल–*पु.* लंका; 'सिलोन'.

सिंहावलोकन–*पु.* सिंहाप्रमाणें पुढें जात असतां मागें वळून पाहाणें.

सिंहासन–*पु.* राजाचें किंवा देवाचें आसन; गादी.

सिंहिनी; * **सिंही**–*स्त्री.* सिंहीण.

सिअन–नि*– *स्त्री.* शिवण; शिलाई.

सिअरा*–*वि.* गार केलेला; गार; थंड. **–पु.** १. छाया; सावली. २. कोल्हा. ['सिलाना'.

सिआना*–*क्रि. स.* पा०

सिआर–*पु.* कोल्हा.

सिकंजबीन– *स्त्री.* [*फा.*] लिंबाच्या रसाचें शिजविलेलें सरबत; आसव.

सिकंजा–*पु.* पा० 'शिकंजा'.

सिकंदरा–*पु.* रेल्वेचा सिग्नल.

सिकंदरी–*वि.* शिकंदराचा. –*स्त्री.* घोड्याचें ठेंचकळणें.

सिकचा+–*पु.* पा० 'सीख़चा'.

सिकटा+–*पु.* मातीच्या भांड्याचा, खापराचा तुकडा. [–स्त्री. **सिकटी**].

सिकड़ी– *स्त्री.* १. दाराची कडी. २. करगोटा. ३. गळ्यांतील सांखळी.

सिकत*– *स्त्री.* वाळू.

सिकता– *स्त्री.* १. वाळू; रेती. २. रेताड जमीन.

सिकत्तर*– *पु.* [*इं.*] मंत्री; चिटणीस; 'सेक्रेटरी'.

सिकन+– *स्त्री.* चुणी; सुरकुती.

सिकर– *स्त्री.* सांखळी. –*पु.* कोल्हा.

सिकरा–*पु.* बहिरी ससाणा.

सिकली– *स्त्री.* [*अ.*] हत्याराला धार लावण्याचें काम. **–गर–पु.** १. हत्याराला धार लावणारा. २. झिलई देणारा.

सिकहर–रा*–*पु.* शिंकें.

सिक़ा– *वि. पु.* [*अ.*] विश्वासू व्यक्ति. ['फोमेंटशन'.

सिकाई–*स्त्री.* शेकण्याची क्रिया;

सिकार*–*पु.* पा० 'शिकार'.

सिकुड़न– *स्त्री* १. आकुंचन; संकोच. २. सुरकुती.

सिकुड़ना–*क्रि.अ.* १. आकसणें; संकोचणें. २. सुरकुती पडणें. ३. आवळ, तंग होणें.

सिकोड़ना–*क्रि. स.* १. संकुचित, चिंचोळें करणें. २. गोळा करणें. [वाडगा.

सिकोरा–*पु.* मातीचा पेला,

सिकोही*–*वि.* १. अभिमानी; दृढप्रतिज्ञ. २. पराक्रमी.

सिक्कड़–र*–*पु.* १. पाण्याचा थेंब. २. घाम. –*स्त्री.* १. शृंखला; बेडी. २. सांखळी.

सिक्का–*पु.* [*अ.*] १. शिक्का; मोहर. २. छाप; ठसा (नाण्यावरील). ३. नाणें (विशेषतः रुपया). ४. पदक. **मु०–जमना; –बैठना**–१. सत्ता स्थापित होणें. २. छाप बसणें. **–जमाना; –बैठाना**–१. छाप पाडणें. २. अधिकार स्थापित करणें.

सिक्ख–*पु.* १. शीख; नानकपंथी. २. शिष्य; अनुयायी.

सिख–*पु.* पा. 'सिक्ख'.–*स्त्री.** १. शिकवण; उपदेश. २. शिखा; शेंडी. ३. शिखर.

सिखना*–*क्रि. स.* शिकणें.

सिखर*–*पु.* १. शिखर. २. मुकुट.

सिखरन– *स्त्री.* शिकरण; दह्यांत साखर, केशर, खोबरें इ० घालून बनविलेलें एक पेय.

सिखलाना; सिखवना*–*क्रि. स.* १. शिकविणें. २. उपदेश देणें.

सिखा*– *स्त्री.* शिखा; शेंडी.

सिखाई+– *स्त्री.* शिकवण; शिक्षण; उपदेश.

सिखाना–*क्रि. स.* १. शिकविणें २. उपदेश देणें. ३. शिक्षा देणें.

सिखापन–*पु.* १. शिकवण; उपदेश. २. शिकविण्याचें काम.

सिखावन– *स्त्री.* उपदेश; शिकवण.

सिखावना*–*क्रि. स.* १. शिकविणें. २. उपदेश देणें.

सिखी*–*पु.* १. मोर. २. कोंबडा.

सिग़र–*पु.* [*अ.*] बालपण.–**सिन** –*वि.* अल्पवयी. [संपूर्ण; सर्व.

सिगरा–रो*–*वि.* सगळा;

सिचान*–*पु.* ससाणा.

सिचाना–*क्रि. स.* पा० 'सिंचाना.'

सिच्छा*– *स्त्री.* पा० 'शिक्षा'.

सिजदा–*पु.* [*अ.*] गुडघे मोडून, जमिनीवर डोकें टेकून केलेला नमस्कार; प्रणाम. [चें दोरखंड.

सिजदार–*पु.* तंबू, राहुटी; इ०

सिजल⁺–*वि.* सुंदर.

सिज्या*– *स्त्री.* शय्या.

सिझना–*क्रि. अ.* शिजणें.

सिझाना–*क्रि. स.* १. शिजविणें. २. उकळणें. ३.तपस्या करणें. शरीर झिजविणें. ४. चिखल तुडविणें (कुंभार). ५. कमविणें (कातडें). [बोलट.

सिटकिनी– *स्त्री.* दाराची खिटी;

सिटपिटाना–*क्रि. अ.* १. फिकें पडणें; वजन न पडणें. २. गडबडून जाणें; किंकर्तव्यमूढ होणें. ३. मनांतल्या मनांत जिरणें.

सिट्टा⁺–*पु.* १. ज्वारीचें कणीस. २. शेतांतील भागी.

सिट्टी– *स्त्री.* वाक्पटुता; बडबड. **मु०–गुम होना; –भूल जाना**–१. दांतखिळी बसणें; घाबरून गप्प बसणें. २. गाळण, घाबरगुंडी उडणें; गडबडून जाणें.

सिठनी– *स्त्री.* उत्तर भारतांत विवाहप्रसंगी गाइलें जाणारें शिव्यायुक्त गाणें, उखाणा इ०.

सिठाई– *स्त्री.* १. नीरसता; फिकेपणा. २. मंदपणा.

सिड्– *स्त्री.* १. उन्माद. २. नाद; वेड; छंद.

सिड़ी–*वि.* १. बावचळलेला; वेडा. २. छांदिष्ट. ३. ध्येयवेडा.

सितंबर–*पु.* [*इं.*] सप्टेंबर महिना.

सित–*वि.* १. पांढरा; श्वेत. २. चमकदार. –*पु.* १. शुक्लपक्ष. २. चांदी. ३. साखर. **–मणि**–*पु.* स्फटिक.

सितम–*पु.* [*फा.*] १. जुलूम; अत्याचार. २.अनर्थ; गहजब.–**गर**–*वि.* अन्यायी; जुलमी. **–ज़दा**–*वि.* ज्याच्यावर जुलूम झालेला आहे असा; अत्याचारपीडित.– **ज़रीफ़** –*वि.* हंसत-हंसत जुलूम, अत्याचार करणारा; विनोदाच्या आवरणाखालीं कोपरखळ्या मारणारा. **मु०– ढाना; – तोड़ना**– अन्याय, जुलूम करणें.

सितरी–ली– **स्त्री.* आजारांत अंगाला सुटणारा घाम.

सिता– *स्त्री.* १. साखर; खडीसाखर. २. दारू. ३. चांदणें.

सिताइश– *स्त्री.* [*फा.*] स्तुति; प्रशंसा.

सिताब*–*अव्य.* तावडतोब.– *स्त्री.* शीघ्रता; घाई.

सिताबी*– *स्त्री.* १. शीघ्रता; घाई. २. चांदणें.

सितार–*पु.* सतार (वद्य).

सितारा–*पु.* [*फा.*] १. तारा; नक्षत्र. २. नशीब; दैव. ३. चांदीची किंवा सोन्याची टिकली. **–दाँ; –शनास**–*पु.* ज्योतिषी. **मु० –र्गादिश पर (में) होना**–दिवस बरे नसणें. **–चमकना अथवा बलंद होना**–भाग्य चमकणें किंवा उदयास येणें.**–भारी होना**–वाईट दिवस येणें.

सितारिया–*पु.* सतार वाजविणारा; सतारिया.

सितारी– *स्त्री.* १. लहान सतार. २. तुणतुणें.

सितारे हिंद–*पु.* [*फा.*] 'स्टार ऑफ इंडिया' चा किताब. इंग्रज सरकारकडून हा किताब दिला जात असे.

सितुई–ही– *स्त्री.* शिंप. [खांब.

सितून–*पु.* [*फा.*] स्तंभ;

सिथिल*–*वि.* १. शिथिल; ढिला. २. थकलेला.

सिदक़ा–*पु.* पा० 'सदक़ा'

सिदना*–*क्रि. स.* त्रास देणें; सतावणें. [दालन.

सिदरी–*स्त्री.* तीन दारें असलेलें

सिदिक⁺–*वि.* सच्चा; खरा. – *स्त्री.* पा० 'सिद्क़.'

सिदौसी–*अव्य.* लौकर; शीघ्र; तावडतोब; तत्काळ.

सिद्क़–*स्त्री.* [*अ.*] १. सत्यता; खरेपणा. २. मनाचा सरळपणा; निष्कपटता.

सिद्दीक़–*वि.* [*अ.*] अत्यंत सच्चा; परम सत्यनिष्ठ.

सिद्ध–*वि.* १. सफल; कृतार्थ. २. शाबित; प्रमाणित.–*पु.* ज्ञानी; महात्मा.–**दोष**–*वि. पु.* गुन्हा शाबीत झालेला; शिक्षा झालेला गुन्हेगार; 'कन्व्हिक्ट'. **–रस**–*पु.* पारा.–**हस्त**–*वि.* निपुण.

सिद्धांत–*पु.* निश्चित मत; उद्देश; सिद्धांत.

सिद्धार्थ–*वि.* ज्याच्या वासना पूर्ण झाल्या आहेत असा; पूर्णकाम. –*पु.* गौतम बुद्ध.

सिध*–*वि.* सिद्ध.

सिधई– *स्त्री.* सरळपणा; साधेपणा. [जाणें. २. येणें.

सिधाना*–*क्रि. अ.* १. निघून

सिधारना–*क्रि. अ.* १. जाणें; प्रस्थान करणें. २. स्वर्गवास होणें.

सिधि*– *स्त्री.* सिद्धि.

सिन–*पु.* [*अ.*] वय.–**रसीदा**–*वि.* वय झालेला; वयोवृद्ध.

सिनक–*स्त्री.* शेंबूड. [शिंकरणें.

सिनकना–*क्रि. स.* नाक

सिनीवाली–*स्त्री.* १. एक वैदिक देवता (गर्भप्रसव अथवा प्रतिपदा यांची अधिष्ठात्री देवता). २. शुक्ल पक्षाची प्रतिपदा. ३. दुर्गा.

सिन्नी+– *स्त्री.* मिठाई; शेरणी; देवाला नैवेद्य दाखवून वांटलेली साखर इ०. **मु०–चढ़ाना;–मानना**–१. नवस करणें, फेडणें; साखर, पेढे इ० वांटणें. २. अत्यंत आनंदित होणें.

सिपर– *स्त्री.* [*फा.*] १. ढाल; फरी; रक्षण करणारी वस्तु. २. शरण–स्थान; मदतगार. **मु०–डाल या फेंक देना**–शस्त्र खालीं ठेवणें; पराभव कबूल करणें.

सिपह– *स्त्री.* [*फा.* 'सिपाह 'चें लघु रूप] सेना; सैन्य. **–गरी** *स्त्री.* शिपाईगिरी; सैनिकी पेशा. **–सालार**–*पु.* सेनापति.

सिपाई*–*पु.* पा० 'सिपाही '.

सिपारस+– *स्त्री.* पा० 'सिफ़ारिश '.

सिपारा–+–*पु.* पा० 'सीपारा'.

सिपास– *स्त्री.* [*फा*] १. प्रशंसा; अभिनंदन. २. कृतज्ञता; आभार. **–नामा**–*पु.* मानपत्र.

सिपाह– *पु. स्त्री.* [*फा.*] सैन्य; फौज. **–गरी**– *स्त्री.* शिपाईगिरी; सैनिकाचा पेशा. **–सालार–पु.** सेनापति.

सिपाहियाना–*वि.* [*फा.*] शिपायासारखा; वीरोचित.

सिपाही–*पु.* [*फा.*] १. सैनिक; शिपाई. २. पट्टेवाला; चपराशी.

सिपुर्द–*वि.* [*फा.*] हवालीं केलेला; सोंपविलेला. *–अव्य.* हवालीं.–**गी**– *स्त्री.* हवालीं करणें; ताब्यांत देणें. **मु०–करना**–सोंपविणें; हवालीं करणें; ताब्यांत देणें.

सिप्पर*– *स्त्री.* पा० 'सिपर '.

सिप्पा–*पु.* १. लक्ष्य. २. कार्यारंभ. ३. शिफारस. ४. दरारा; धाक. ५. उपाय; युक्ति. ६. शिप. **मु०–जमाना**–अनुकूल परिस्थिति उत्पन्न करणें; प्रस्तावना करणें. **–बाँधना**–दरारा बसविणें. **–भिड़ाना; –लड़ाना**–मोका साधणें. **–मारना; लगाना**–१. नेम धरणें, मारणें. २. जाळें पसरणें.

सिप्रा–*स्त्री.* १. स्त्रियांचा कंबरपट्टा. २. क्षिप्रा नदी.

सिफ़त– *स्त्री.* [*अ.*] १. गुण; विशेषता. २. लक्षण. ३. स्वभाव. ४. विशेषण. [–*वि.* मूल्यरहित.

सिफ़र–*पु.* [*अ.*] शून्य; बिंदु.

सिफ़लगी– *स्त्री.* [*अ.*] नीचता; हलकटपणा.

सिफ़ला–*वि.* [*अ.*] १. नीच; हलकट. २. छचोर. **–पन–पु.** हलकटपणा.

सिफ़ली–*वि.* [*अ.*] नीच; हलका. **–अमल**–*पु.* भुताखेतांकडून मदत मिळविण्याचा मंत्र.

सिफ़ात– *स्त्री.* [अ. 'सिफ़त 'चें अनेक०] गुण; वैशिष्टचें.– **(ते) जाती**– *स्त्री.* स्वाभाविक गुण; वैशिष्टचें.

सिफ़ारत *स्त्री.* [*फा.*] १. परराष्ट्रीय वकील अथवा राजदूत याचें कार्य, पद वगैरे. २. शिष्टमंडळ. **–ख़ाना**–*पु.* परराष्ट्रीय वकिलाची कचेरी; परराष्ट्रीय वकिलात.

सिफ़ारिश– *स्त्री.* [*फा.*] १. शिफारस. २. वशिला. ३. खुशामत. **–नामा**–*पु.* शिफारस करणारें पत्र.

सिफ़ारिशी–*वि.* [*फा.*] १. शिफारस केलेला; वशिला असलेला. २. शिफारस करणारा. **–मु०–टट्टू**–वशिल्याचें तट्टू.

सिबिका*– *स्त्री.* मेणा; पालखी.

सिब्त–*पु.* [*अ.*] १. नातू; मुलीचा मुलगा. २. वंशज; संतान

सिमंत*–*पु.* भांग (केंसांचा).

सिमई– *स्त्री.* शेवया.

सिमट– *स्त्री.* आकुंचन.

सिमटना, सिमिटना–*क्रि. अ.* १. आकुंचित, संकुचित होणें; आकसणें. २. सुरकुत्या पडणें. ३. एकत्र होणें. ४. क्रमवार लागणें. ५. पूर्ण होणें; संपणें. ६. संकोच करणें; लाजणें.

सिमर*–*पु.* पा० 'सेमर '.

सिमरना*–*क्रि. स.* स्मरण करणें; जप करणें.

सिमसिमाना+–*क्रि. अ.* १. थंड, कोमट लागणें. २. दमट असणें.

सिमाना+–*पु.* हद्द; सीमा; सीमेवरील खूण. *–क्रि. स.* * पा० 'सिलाना '. ['सिमटना '.

सिमिटना*–*क्रि. अ.* पा०

सिमृति*– *स्त्री.* स्मृति; आठवण; स्मरण. ['समेटना '.

सिमेटना*–*क्रि. स.* पा०

सिम्त– *स्त्री.* [*अ.*] दिशा; बाजू; कड.

सिय*– *स्त्री.* जानकी; सीता.

सियना*–*क्रि. स.* १. बनविणें; रचणें; निर्माण करणें. २+ शिवणें.

सियरा*–*वि.* १. शीतल; थंड. २. कच्चा.–*पु.* १. छाया; सावली. २+ कोल्हा. [थंडपणा.

सियराई– *स्त्री.* शीतलता;

सियराना–*क्रि. अ.* शीतल, थंड होणें.

सियह–*वि.* [*फा.*] १. काळा.

२. अशुभ. पा० 'सियाह'.

सिया*– *स्त्री.* सीता; जानकी.

सियादत– *स्त्री.* [*अ.*] १. नेतृत्व; पुढारीपण. २. अधिकार; हुकमत. ३. फातिमा बीबीचे वंशज; सैयद जाति.

सियाना+–*वि.* पा० 'सयाना'. – *क्रि. स.* पा० 'सिलाना'.

सियापा– *पु.* [*फा.* 'सियाह पोश'] मृतासाठीं स्त्रियांनीं एकत्र बसून शोक करण्याची पद्धत; सामुदायिक विलाप. [खोकड.

सियार–ल+–*पु.* कोल्हा;

सियारा–*पु.* १. कुळव; नांगरलेली जमीन सारखी करण्याचें अवजार. २. पा० 'सियाला'.

सियाला+–*पु.* हिंवाळा.

सियाली+–*वि.* हिंवाळी; हिंवाळ्यांतील.

सियावड़–*पु.*; **सियावड़ी**– *स्त्री.* १. कापणीनंतर धर्मादायासाठीं काढून ठेवलेलें धान्य. २. पक्ष्यांना भिवविण्यासाठीं शेतांत उंच उभी केलेली हंडी.

सियासत– *स्त्री.* [*अ.*[१. राजकारण. २. राष्ट्रसंरक्षण व शासन; शासनव्यवस्था. ३. ताकीद; तंबी. ४. गडबड; धिंगाणा.–**दाँ**–*वि.* राजकारणी; राजनीतिज्ञ.

सियासती–*वि. अ.* राजकीय.

सियासी–वि. [*अ.*] राजकीय; राजनैतिक.

सियाह–*वि.*]*फा.*] १. अशुभ. २. काळा. –**कार**–*वि.* दुराचारी; अत्याचारी. – **कारी** – *स्त्री.* दुराचार; पाप; अत्याचार. –**गोश**–*पु.* रानमांजर. –**चश्म**–*वि.* १. काळ्या डोळ्यांचा. २. निर्लज्ज. –**ज़बान**–*वि.* ज्यानें उच्चारिलेली अशुभ गोष्ट खरी ठरते असा.–**ताब**–*वि.* चमचमणारा; चमकदार. –**दिल**–वि. निर्दय. –**पोश**– *स्त्री.* मृत्युशोक किंवा सुतक म्हणून ज्यानें काळे किंवा निळे कपडे परिधान केले आहेत असा (**मु०–० होना**–शोक करणें). –**फ़ाम**–*वि.* काळा. –**बख़्त**–*वि.* दुर्दैवी; करंटा. –**बख़्ती** – *स्त्री.* दुर्दैव. –**बातिन**–*वि.* कलुषित अंतःकरणाचा; कुटिल.–**मस्त** –*वि.* झिंगलेला.–**रू**–*वि.* काळा; नीच. –**सफ़ेद**–*पु.* भलें-बुरें. (**मु० –० करना**–भलें बुरें, वाटेल तें करणें. –**०का मालिक होना** सर्वाधिकारी असणें). **मु० (कागज़)–करना**–पांढऱ्यावर काळें करणें; खूप लिहिणें.

सियाहत– *स्त्री.* [*अ.*] प्रवास; सफर; पर्यटन; भ्रमण.

सियाहा–*पु.* [फा.] १. जमाखर्चाची वही. २. सरकारी वसुलाची नोंदवही. –**नवीस**–*पु.* १. जमाखर्च लिहिणारा. २. रजिस्टरामध्यें हुकूम नोंदणारा.

सियाही– *स्त्री.* [फा.] १. शाई. २. अंधार; काळोख. ३. कलंक; बदनामी. – **चट**; –**सोख** –पु. टिपकागद; 'ब्लॉटिंग पेपर'.

सिर–*पु.*१ डोकें; शिर. २. कवटी. ३. मेंदू. ४. वरचा भाग. ५. टोंक; किनारा. ६. आरंभ.–**कटा**–*वि.* १. ज्याचें शिर कापलें आहे असा. २. अपशकुनी. २. दुसऱ्याचें शिर कापणारा; अपकारी. – **खप**–*वि.* १. डोकें लढविणारा; खूप विचार करणारा. २. मेहनती. ३. शूर.–**खपी**–*स्त्री.* १. डोकें–फोड. २. खूप परिश्रम, धडपड.–**चंद**–*पु.* हत्तीच्या मस्तकावरील एक अर्धचंद्राकार भूषण. –**चढ़ा**–*वि.* डोक्यावर बसलेला; उद्धट. –**ताज** –*पु.* १. मुकुट. २. शिरोमणि; श्रेष्ठ व्यक्ति ३. नेता; सरदार. –**दार***–*पु.* पा० 'सरदार'.–**नामा**–*पु.* १. मथळा; शीर्षक. २. पाकिटावर लिहिलेला पत्ता. ३. मायना (पत्राच्या सुरुवातीचा). –**नेत**–*पु.* पगडी; साफा. –**पाव***–*पु.* पा० 'सिरोपाव.' –**पेंच**–*पु.* १. शिरपेंच. २. पगडीवर बांधण्याचा तुरा. –**पोश**–*पु.* टोपी, पगडी इ० शिरोभूषण. –**फुटौवल**; – **फोड़ौवल**– *स्त्री.* भांडण; मारामारी; डोकेफोड; ठोकाठोकी. – **फेंटा**; –**बंद**–*पु.* १. साफा; कोशा. २. पागोटें. –**मनि***–*पु.* शिरोमणि. – **मुँड़ा**–*वि.* १. ज्याच्या डोक्यावरील केस भादरलेले आहेत असा. २. निर्लज्ज (बा०). –**मौर**–*पु.* १. मुकुट. २. श्रेष्ठ व्यक्ति; शिरोमणि. **मु०–अलग करना**–डोकें उडविणें; ठार मारणें.–**आँखोंपर**; –**आँखोंसे**–मान्य आहे; छान; खुशाल; आनंदानें.–**आँखोंपर बिठाना, बैठाना, रखना** –अत्यंत आदरसत्कार किंवा प्रेम करणें; डोकीवर घेणें.–**आँखोंपर होना**–शिरसावंद्य, मान्य असणें.–**आना**–१. डोकीवर वार करणें. २. भुताकडून झपाटलें जाणें. ३. एखाद्याच्या मागें हात धुवून लागणें; भांडणें. – **उठाकर चलना** – गर्व, अभिमान होणें.–**उठाना**–१. सवड, फुरसत मिळणें. २. विरोध करणें; डोकें वर काढणें. ३. स्वाभिमानानें राहाणें. –**उड़ाना**; –**उतारना**–डोकें उडविणें. –**ऊँचा करना**–१. सन्मानानें राहाणें; प्रतिष्ठा मिळविणें. २. मान देणें; प्रतिष्ठा, लौकिक वाढविणें. –**कटना**–१. डोकींत घाव होणें. २. ठार मारलें जाणें.–**करना** १. केंस विंचरणें; वेणीफणी करणें.

२. जबाबदारी सोंपविणें. ३. माथीं मारणें. **–क़लम करना**–डोकें उडविणें. – **काढ़ना**–प्रख्यात होणें. **–का न पाँवका**–असंबद्ध. **–का बोझ उतारना, टालना, डालना**–एखादें काम कसेंबसें, बेपर्वाईनें करणें. **–का वबाल होना**–डोकेंदुखी बनणें; जीव नकोसा होणें. **–की क़सम, सौं**–गळ्याचाशपथ. **–के बल जाना**–१. डोकें खालीं करून जाणें. २. अत्यंत नम्रतेनें जाणें. ३. शरण जाणें. **–खपाना**–डोकें–फोड करणें; डोकें लढविणें; खूप विचार करणें **–खाना**–डोकें उठविणें; त्रास देणें; कटकट करणें. **– ख़ाली करना**– १. डोकें पिकविणें. २. व्यर्थ बडबडणें. **–खुजलाना; –खुजाना**– मार खाण्याची इच्छा होणें; अवदसा आठवणें. **–गंजा करना**–१. डोकीवर केस उरणार नाहींत इतकें मारणें. २. कंगाल बनविणें. **–गाडी, पैर पहिया करना**–अत्यंत परिश्रम करणें. **–गाला, मुँह बाला**–डोकीचे केस पिकले असले तरी तोंडावर तारुण्य झळकणें; म्हातारपणीं तरुणांशीं स्पर्धा करणें. **–गूँधना**–वेणीफणी करणें; केंस विचरणें. **–घूमना; –चकराना**–१. डोकें दुखणें, भणभणणें. २. चक्कर येणें. **–चढ़कर बोलना**– १. आपोआप रहस्य उलगडणें. २. भुतानें झपाटल्यामुळें बोलूं लागणें. **–चढ़ाना**–*वि.* १. डोकीवर घेणें; चढवून ठेवणें; लाडावून ठेवणें. २. शिरसावंद्य मानणें. ३. देवासमोर बळी देणें.– **चला जाना; – जाना** – मरणें; मारलें जाणें. **–झाड़ मुँह पहाड़**–जंगली; असभ्य.**–झुकाना**–१. मान लवविणें, नमविणें. २. लाजेनें मान खालीं घालणें. ३. निमूटपणें मान्य करणें.**–टकराकर मर जाना**–१. डोकें फोडून घेणें. २. निष्कारण हैराण होणें.**–डालना**–माथीं मारणें. **–तोड़ कोशिश करना**–खूप प्रयत्न करणें.**–थाम लेना**–दुःखातिशयामुळें डोकें धरून बसणें. **–थोपना**–माथी मारणें; आरोप करणें.**–देना**–प्राण देणें; बलिदान करणें. **–धुनना**–१. शोकानें किंवा पश्चात्तापानें डोकें बडवून घेणें; विलाप करणें. २. पस्तावणें; पश्चात्ताप करणें; हळहळणें. – **नंगा करना**–बेइज्जती करणें. **–न उठाने देना**– १. दडपून, दाबून टाकणें. २. थोडीहि सवड न देणें. **–निहुराना**– १. शरमेनें मान खालीं घालणें. २. कृतज्ञ होणें.**–नीचा करना**–१. लाजेनें मान खालीं घालणें. २. लज्जित करणें. – **नीचा होना**– लज्जित, शरमिंदा, अपमानित होणें. **–पचाना**–खूप विचार करणें. **–पटकना**–१. डोकें, कपाळ बडवून घेणें. २. पस्तावणें. **–पड़ना**–माथीं येणें; जबाबदारी येऊन पडणें.**–पर** जवळ; अत्यंत निकट.**–०आ जाना**–फार जवळ येणें.**–० आ पड़ना**–१. डोकीवर येऊन कोसळणें. १. जबाबदारी येणें.**–०आसमान उठाना**–भयंकर आरडाओरडा करणें.– **० आसमान टूटना**–अत्यंत मोठें संकट किंवा दैवी आपत्ति कोसळणें. **–० उठा लेना**–भयंकर आरडा–ओरडा, गोंगाट करणें. **–० उठा ले जाना**–१. डोकीवरून वाहून नेणें. २. मेल्यानंतर बरोबर नेणें. – **० कफ़न बाँधना**–प्राणावर उदार होणें; मरण्यास तयार होणें.–**० क़यामत टूटना**–डोकीवर आपत्तीचा डोंगर कोसळणें.**–० काली हाँड़ी रखना**–शरमिंदा होणें (बा०).**–० कोई न होना**–कोणी मदतगार किंवा पाठीराखा नसणें.**–० खड़ा होना**– १. समोर असणें. २. बेअदबीनें उभें राहाणें.**–० ख़ाक डालना**–शोक, विलाप करणें. **–० ख़ून चढ़ना; –० ख़ून सवार होना**– एखाद्यावर खून चढणें; खून करण्याचा आवेश येणें, दिसूं लागणें; सूडानें वेडें, बेभान होणें.**–० खेलना**–१. भुताकडून झपाटलें जाणें. २. जीव धोक्यांत घालणें.**– ० चढ़ना**–१. डोक्यावर बसणें. २. अंगांत भूत संचारणें. **–० चढ़ाना** –१. चढवून ठेवणें. २. आदर करणें. **–०डालना, धरना**–माथीं मारणें. **–० पड़ना**– जबाबदारी अंगावर पडणें. **–०पाँव रखकर भाग जाना**–वेगानें पळून जाणें; सूंबाल्या करणें. **–०बनना**–संकटांत सांपडणें. **–० बाल होना**–बोलण्याचें सामर्थ्य, मजाल असणें. **–० बिठाना, बैठना**–शिरसावंद्य मानणें; अत्यंत आदर करणें. – **० बोलना**–साप चावलेल्या व्यक्तीनें मंत्रबळानें सापाच्या वतीनें बोलणें. **–० भूत सवार होना**– १. पछाडलें जाणें. २. नाद, छंद लागणें.**–०मिट्टी डालना**–शोक, विलाप करणें. – **० मौतका खेलना**–यमाचे पाश पडणें; मृत्यु समोर दिसूं लागणें.– **० लेना**–डोक्यावर घेणें; जबाबदारी घेणें. **–० वारना**–ओवाळून टाकणें. **–० सवार होना**–१. पछाडलें जाणें. २. घ्यास लागणें. – **० साया होना**–संरक्षण, पालन-पोषण करणारी व्यक्ति असणें; आधार असणें. – **० सींग होना**–वैशिष्टय, वैचित्र्य असणें. – **० हाथ धरके रोना**–पस्तावणें; शोक करणें. – **० होना**– १. आधार असणें. २. जबाबदारी असणें. ३. फार नजीक

असणें. **–पाँव न होना**–क्रम, सुसंबद्धता नसणें. **–पीटना**–शोकावेगानें डोकें बडवून घेणें. **– फटा जाता है**–डोकें भयंकर दुखत आहे; ठणका लागला आहे. **–फिरना**–वेड लागणें; डोकें फिरणें. **–फिराना** डोकें पिकविणें. **– बाँधना** – केस विंचरून वेणी किंवा अंबाडा घालणें (बा०). **– बेचना** – प्राण धोक्यांत घालणें. **–भारी होना**–डोकें जड होणें. **– भिन्नाना**–चक्कर येणें. **– मढ़ना**–माथीं मारणें. **– मारना**–खूप विचार करणें; डोकें लढविणें. **–मुँड़वा देना**–विधवा स्त्रीचें केशवपन करविणें (महाराष्ट्र); केस भादरून टाकण्याची एक शिक्षा. **–मुँड़ाते ही ओले पड़ना**–कार्य सुरू होतांच त्यांत विघ्न येणें. **–में आग लगना, तलुवोंमें बुझना**–तळपायाची आग मस्तकाला जाणें. **–में खाक डालना**–शोक करणें. **–में बाल होना**–मार खाण्याची ताकत असणें. **–में सौदा होना**–ध्यास, वेड असणें. **–रहना**–१. मागें लागणें २. अहोरात्र परिश्रम करणें. **– लेना** – शिरावर घेणें; जबाबदारी पत्करणें. **–सफ़ेद होना** –१. केस पिकणें. २. म्हातारपण येणें. **– सलामत रहे**– चिरंजीव होवो; जिवंत राहो. **– सहरा रहना**–प्रतिष्ठा, सरदारकी मिळणें. **–सहरा होना**–अवलंबून असणें. **–सहलाये भेजा खाये**–मित्र बनून नुकसान करणें. **– सुखाना** – केंस वाळविणें (बा०). **–से उतारना**–ओवाळून टाकणें. **–से कफ़न बाँधना** –तळहातावर शिर घेणें; सर्वस्वत्यागाची तयारी असणें. **– से खेल जाना**–१. प्राणावर उदार होणें. २. शौर्याचें कृत्य करणें. **–से गुज़रना**–१. बुडण्याइतकें पाणी असणें. २. मरणें. **–से टलना**–कटकट जाणे, टळणें. **–से पाँव (पैर) तक**–१. डोक्यापासून पायापर्यंत; संपूर्णपणें. २. साद्यंत.–०**आग लगना**–अंगाचा भडका होणें. **–से पानी ऊपर होना या गुज़रना**–हद्द होणें; असह्य होणें. **–से सेहरा बँधना**–विजय मिळणें; वरचढ ठरणें. **–हथेलीपर धरना, रखना, लिये फिरना, लेना** – तळहातावर शिर घेणें; प्राणावर उदार होणें. **(किसीका किसीके) –होना**–१. मागें लागणें; गळ्यांत पडणें. २. भांडण करणें. **(किसीके) –होना**–जबाबदारी असणें, येणें. **(किसी बातके)–होना** – ताडणें; ध्यानांत येणें.

सिरका–पु. [*फा.*] उन्हांत आंबविलेली काकवी किंवा द्राक्ष इ० चा रस; आसव; शिरका; 'व्हिनिगर'.

सिरकी– *स्त्री.* १. बोरू; सणकाडी. २. बोरूचा तट्टचा. [जात.

सिरगा[+]–पु. घोडयांची एक

सिरजक*–पु. सृजन करणारा; निर्माता; सृष्टिकर्ता.

सिरजन*–पु. निर्मिति; सृष्टि. **–हार–रा**– पु. निर्माण करणारा; सृष्टिकर्ता; परमेश्वर.

सिरजना*–*क्रि. स.* उत्पन्न करणें; रचणें.–*स्त्री.* सृष्टि; रचना.

सिरजित*–*वि.* रचलेला; निर्मित. [कार. २. मालगुजार.

सिरतान– पु. १. कूळ; काश्त-

सिरती[+]–*स्त्री.* शेतसारा; महसूल.

सिरवा–पु. धान्य उफणतांना वारा घालावयास वापरतात तें वस्त्र. मु०**–मारना**–वस्त्रानें वारा घालणें (उफणतांना).

सिरवार[+]– पु. जमीनदाराच्या शेतीची व्यवस्था पाहाणारा; गुमास्ता.

सिर(रि)स–पु. शिरीष (झाड व फूल).

सिरह(हा)ना– पु. बाजेचा डोक्याकडील भाग; उसें.

सिराँचा[+]–पु. वेत.

सिराँह*– *स्त्री.* शीलता.

सिरा– पु. १. टोंक; अग्र; अखेरचा भाग. २. वरचा भाग. ३. अणकुची. ४. आरंभींचा भाग. मु० **सिरेका**–सर्वप्रथम; पहिल्या दर्जाचा. **परले या पल्ले सिरेका**–कमालीचा; अत्यंत.

सिरा– *स्त्री.* शीर; नाडी.

सिराज– पु. [*अ.*] १. सूर्य. २. दिवा. [घोडा, दारू, कबुतर इ०

सिराजी– पु. [*फा.*] शिराजचा

सिरात– *स्त्री.* [*अ.*] १. मार्ग; रस्ता. २. नरकावरील पूल.*–*वि.* थंड; गार.

सिराना*–*क्रि. अ.* १. थंड होणें. २. मंद होणें. ३. संपणें; व्यतीत होणें. ४. सवड मिळणें. –*क्रि. स.* १. थंड करणें. २. पाण्यांत बुडविणें. ३. घालविणें. ४. संपविणें.

सिराली–*स्त्री.* मोराचा तुरा.

सिराय(व)ना*– *क्रि. स.* थंड करणें; पाण्यांत बुडविणें.

सिरावन*–*वि.* थंड किंवा दूर करणारा. –पु. कुळव.

सिरावना*–*क्रि. स.* १. थंड करणें. २. समाप्त करणें. ३. कंठणें. घालविणें.

सिरिश्क– पु. [*फा.*] अश्रु.

सिरिश्ता–पु. [*फा.*] विभाग; खातें. पा० 'सरिश्ता'.–**(श्ते)दार** –पु. शिरस्तेदार. [फूल).

सिरिस–पु. शिरीष (वृक्ष व

सिरी – *स्त्री*. १. घोटा (मागाचा); माग. २* श्री; लक्ष्मी; ऐश्वर्य; सौंदर्य. **–पंचमी–** –*स्त्री*. वसंतपंचमी.

सिरे–*पु.* टोंकें; 'एक्स्ट्रिमिटीज'.

सिरोना–*पु.* घागर ठेवण्याची दोरीची चुंबळ.

सिरोपाव–*पु.* राजाकडून मिळणारा मानाचा पोषाख.

सिरोही–*पु.* तलवारीसाठी प्रसिद्ध असलेलें राजस्थानांतील एक शहर. –*स्त्री*. तलवार.

सिर्का–*पु.* पा० 'सिरका'.

सिर्फ़–*अव्य.* [*अ.*] केवळ; मात्र; फक्त. –*वि*. १. एकमात्र; एकटा. २. शुद्ध; निर्भेळ.

सिर्री+–*वि*. पा० 'सिड़ी'.

सिल– *स्त्री*. [*अ.*] क्षयरोगापूर्वीची फुपफुसांची स्थिति.

सिल–*स्त्री*. १. दगड; शिळा. २. पाटा (चटणी वगैरे वाटण्यासाठीं). ३. दगडाची चीप. ४. लगड; 'इंगॉट'. ५. पेळू बनविण्याची फळी. –*पु.* शेतांत पडलेले धान्याचे दाणे वेंचून त्यांवर उदरनिर्वाह करणें. **–खड़ी–री**– *स्त्री*. १. संगजिऱ्याचा दगड. २. खडू. ३. शाडूची माती. **–पोहनी**– *स्त्री*. लग्नांतील घाणा भरण्याचा विधि. **–बट्टा**–*पु.* पाटा-वरवंटा. **–हार–रा**–*पु.* शेतांत गळून पडलेल्या दाण्यांवर उपजीविका करणारा; शिलोंछ किंवा उंछ वृत्तीचा. [ओळ.

सिलक–*पु.* धागा. –*स्त्री*. लड;

सिलकी*–*पु.* बेल; बेलफळ.

सिलगना*–*क्रि. अ.* पा० 'सुलगना'.

सिलप*–*पु.* शिल्प; कारागिरी.

सिलपट–*वि*. १. चौरस. २. सपाट. ३. झिजलेला ४. नाश पावलेला. –*पु.* चप्पल.

सिलवट– *स्त्री*. सुरकुती. –*पु.* पाटा–वरवंटा.

सिलवाना–*क्रि. स.* शिववून घेणें; शिवण्याचें काम दुसऱ्याकडून करवून घेणें. [बावळट.

सिलबिल+–*वि*. गबाळचा;

सिलसिला–*पु.* [*अ.*] १. क्रम; परंपरा; संबंध. २. श्रेणी; पंक्ति. ३. लोखंडाची सांखळी; शृंखला. ४. व्यवस्था. ५. वंशावळ. –*वि*.* १. ओला. २. घसरडा; निसरडा. ३. गुळगळीत.**–बंदी**–*स्त्री*. क्रमबद्धपणा; क्रम. –**(ले) वार**– *वि*. क्रमानुसार; क्रमवार. **मु०– निकलना**– १. प्रारंभ होणें. २. मार्ग मोकळा होणें.**–निकालना**– संबंध जोडणें.

सिलह्–*पु.* [*अ.*] हत्यार; आयुध. **–ख़ाना**–*पु.* शस्त्रागार. **–पोश**–*पु.* शस्त्रधारी; शस्त्रसज्ज.

सिलहिला–*वि*. निसरडा.

सिला*–*पु.* १. शिळा; दगड. २. शेतांत उरलेंसुरलें धान्य.–*स्त्री*. शिळा; दगड.

सिला–*पु.* [*अ.*] १. इनाम; पारितोषिक. २. मोबदला.

सिलाई– *स्त्री*. १. शिलाई; शिवणकाम. २. शिवण्याची मजुरी; शिलाई. ३. टांका; शिवण.

सिलाना–*क्रि. स.* पा० 'सिलवाना.'

सिलाम*–*पु.* सलाम; प्रणाम.

सिलावट–*पु.* पाथरवट.

सिलाह–*पु.* [*अ.*] हत्यार; आयुध.**–ख़ाना**–*पु.* शस्त्रागार. **–पोश**;**–बंद**–*वि*.हत्यारबंद; शस्त्रसज्ज. **–साज़**–*वि*. शस्त्रें तयार करणारा. [शिपाई.

सिलाही–*पु.* [*अ.*] सैनिक;

सिलिप*–*पु.* शिल्प; कारागिरी.

सिलिया– *स्त्री*. घराच्या बांधकामासाठीं उपयोगी पडणारा एक प्रकारचा दगड. [गोंद.

सिलसिलिक–*पु.* चीक; डिंक;

सिलीमुख–*पु.* १. बाण. २. भोंवरा.

सिलेट–*स्त्री*. [इं. 'स्लेट'] दगडी पाटी. [पाटा व वरवंटा.

सिलौट–टा–*पु.* १. पाटा. २.

सिलौटी– *स्त्री*. भांग इ० वांटण्याचा लहान पाटा.

सिल्क–*पु.* [इं.] रेशीम.

सिल्क–*पु.* [*अ.*] १. मोत्याची लड. २. हार, माळ इ० चा दोरा. ३. क्रम.**–बंदी**–*स्त्री*. मालगुजारीच्या दैनिक प्राप्तीचा हिशेब.

सिल्ला–*पु.* शेतांत पडलेले दाणे, कणसें इ०.

सिल्ली– *स्त्री*. १. धार लावण्याचा दगड. २. शिला; दगडी चीप.

सिव*–*पु.* शिव.

सिवई– *स्त्री*. शेवया.

सिवा–*अव्य.* [*अ.*] शिवाय; वांचून; व्यतिरिक्त; खेरीज.–*वि*. अधिक; जादा.

सिवा*– *स्त्री*. पार्वती. –*पु.* १. शिवाजी २. शिव.

सिवाइ+–*अव्य.* शिवाय.

सिवान–*पु.* सरहद्द; सीमा (प्रदेशाची); शींव.

सिवाय–*अव्य.* शिवाय; खेरीज. –*पु.* वरची प्राप्ति.

सिवार–ल–*पु.* शेवाळ.

सिवाला–*पु.* १. शंकराचें मंदिर. २. मंदिर; देऊळ (क्वचित्).

सिविका*–*स्त्री*. मेणा; पालखी.

सिवैयाँ–*स्त्री* शेवया.

सिष–ष्य*–*पु.* शिष्य; चेला.

सिस*–*पु.* शिशु; बालक.

सिसकना–*क्रि. अ.* १. स्फुंदणें; रडणें. २. छाती धडधडणें. ३. मरणाचे वेळीं उचकी लागणें. ४. तळमळणें; व्याकुळ होणें (एखाद्या वस्तूकरितां).

सिसकारना– *क्रि. अ.* तोंडानें शीळ वाजविणें.–*क्रि. स.* कुत्र्याला छू करून दुसऱ्याच्या अंगावर सोडणें. [वालणें.

सिसकारी– *स्त्री.* शीळ; शीळ

सिसकी– *स्त्री.* हुंदका; स्फुंदन.

सिसिर*– *पु.* शिशिर ऋतु.

सिसु*– *पु.* शिशु; बालक.

सिसृक्षा–*स्त्री.* निर्मितीची इच्छा.

सिस्टि*– *स्त्री.* सृष्टि.

सिस्य*– *पु.* शिष्य.

सिह–*वि.* [*फा.*] तीन.–**गूना**– *वि.* तिप्पट.–**गोशा**–*वि.* त्रिकोणी. –**चंद**–*वि.* तिप्पट.–**दरा**–*स्त्री. पु.* तीन दारें असलेली खोली.–**पहर**– *पु.* तिसरा प्रहर.–**पहल–लू**– *वि.* तिपदरी.–**पाई**– *स्त्री.*;–**पाया**– *पु.* तिवई. तिपाई-**फ़सला**–*वि.* तीन पिकें येणारी (जमीन).–**बंदी**–*पु.* सरकारी महसूल गोळा करण्यासाठीं नेमलेला शिपाई; शिबंदी.–*स्त्री.* दर तीन महिन्यांनीं दिलें जाणारें वेतन किंवा हप्ता.–**बारा**– *अव्य.* तिसऱ्यांदां.–**मंज़िला**–*वि.* तिमजली. –**माही**–*वि.* तिमाही.–**रोज़ा**–*वि.* तीन दिवस टिकणारा; त्रिदैनिक (पत्र). – **शंबा**– *पु.* मंगळवार. –**साला**–*वि.* तीन वर्षांचा; त्रैवार्षिक.–**हद्दा**–*पु.* तीन गांवांच्या हद्दी जेथें मिळतात त्या ठिकाणीं उभारलेला खांब किंवा चबुतरा.

सिहद्दा–*पु.* तीन सरहद्दी जेथें मिळतात तें स्थान.

सिहरन– *स्त्री.* हुडहुडी; कंपन.

सिहरना–*क्रि. अ.* १. कांकडणें; थंडीनें कांपणें. २. अंगावर शहारे येणें. ३. भयभीत होणें; थरकांप उडणें.

सिहरा–*पु.* पा० 'सेहरा'.

सिहराना–*क्रि. स.* थरकांप उडविणें; घाबरविणें. –*क्रि. अ.* गोंजारणें. [गारठा.

सिहरा(ला)वन–*पु.* थंडी;

सिहरी– *स्त्री.* १. गारठ्यामुळें कांपणें; हुडहुडी. २. थंडीताप. ३. रोमांच उभे राहाणें; शहारे येणें. ४. भय; भीति.

सिहलाना–*क्रि. अ.* १. थंड होणें. २. थंडी पडणें.

सिहाना–*क्रि. अ.* १. ईर्ष्या करणें; द्वेष करणें. २. स्पर्धा करणें. ३. हांव सुटणें. ४. मुग्ध होणें. –*क्रि. स.* प्रशंसा करणें.

सिहारना*–*क्रि. स.* शोध करणें; शोधून आणणें.

सिहिकना–*क्रि. अ.* वाळणें (पिकें इ०).

सिहिटि*– *स्त्री.* सृष्टि.

सिहुंड; +सिहोड़–र+–*पु.* शेराचें झाड.

सींक–*स्त्री.* १. गवताची काडी; केरसुणीची काडी. २. नाकांतील लवंग, चमकी.

सींका–*पु.* १. डहाळी. २. शिंकें.

सींकिया–*पु.* रेघांचें रंगीत कापड. –*वि.* बारीक; हडकुळा. –**पहलवान** – *पु.* काडीपैलवान; स्वतःला बलवान् समजणारा मरतुकडा माणूस.

सींग–*पु.* १. शिंग (जनावरांचें). २. शिंग (वाद्य). **मु०–कटाकर, तुड़ाकर बछडोंमें मिलना**–शिंग मोडून वासरांत शिरणें. –**समाना**– जागा, संधि मिळणें. (**किसीके सिरपर**)–**होना**–कांहींतरी विचित्रपणा, वेगळेपणा असणें.

सींगना–*क्रि. स.* शिंगावरून चोरीचें जनावर ओळखणें.

सींगरी– *स्त्री.* १. डिंगरी. २. चवळीची शेंग. ३. बाभळीची शेंग.

सींगी– *स्त्री.* १. शिंग (वाद्य). २. शरीरांतील दूषित रक्त बाहेर काढण्याचें शिंगाचें उपकरण; तुंबडी. **मु०–लगाना**–तुंबडी लावून रक्त काढणें.

सींच– *स्त्री.* शिंपण.

सींचना–*क्रि. स.* १. शिंपणें; पाणी शिंपडणें. २. भिजविणें.

सींवँ–व–*पु.* सीमा; हद्द; मर्यादा **मु०–काँडना; –चरना**–अधिकार गाजविणें; जुलूम करणें.

सी–*वि. स्त्री.* सारखी; समान; तुल्य. – *स्त्री.* पीडा किंवा आनंद झाल्यानंतर तोंडांतून निघणारा आवाज. सू ऽ; ई ऽ.

सीउ*–*पु.* १. थंडी. २. शिव.

सीकर–*पु.* १. तुषार; पाण्याचा थेंब, कण. २. घामाचा थेंब. ३.* कोल्हा.

सीकर*– *स्त्री.* हातकडी; शृंखला. [आंबा.

सीकल–*पु.* झाडावर पिकलेला

सीक़ल– *स्त्री.* [*अ.* 'सैक़ल'] हत्यारावर चढलेला गंज काढणें; साफ करणें; चमकदार बनविणें.

सीका–*पु.* १. शिंकें. २. मुकुट; डोकीवरील एक सोन्याचा दागिना.

सीकाकाई– *स्त्री.* शिकेकाई.

सीकी– *स्त्री.* १. लहान शिंकें. २. भोंक; छिद्र. [वरील फुलोरा.

सीकुर+–*पु.* धान्याच्या कणसा-

सीख– *स्त्री.* १. शिकवण; उपदेश. २. सल्ला. ३. शिक्षण. **मु०–लेना**–धडा घेणें.

सीख़– *स्त्री.* [*फा.*] १. लोखंडी छड. २. मांस भाजण्याची लोखंडी सळई. **–पा**–*वि.* मागील पायांवर उभा राहिलेला (घोडा). [गज.

सीखचा–*पु.* लहान लोखंडी

सीखन*–*पु.* शिकवण; उपदेश.

सीखना–*क्रि. अ.* १. शिकणें; ज्ञान संपादन करणें. २. (एखादी गोष्ट) समजावून घेणें; अभ्यास करणें. ३. अनुभव मिळविणें.

सीखा–*वि.* शिकलेला. **–पढ़ा**–*वि.* शिकलेला; सुशिक्षित. **–सिखाया**–*वि.* प्रशिक्षित; कुशल.

सीग़ा–*पु.* [*अ.*] १. सांचा. २. व्यापार; पेशा. ३. विभाग; खातें. ४. क्रियापदाचें रूप.

सीच*– *स्त्री.* स्थिति.

सीज; –सीजना–पा० ' सीझ; ' ' सीझना '.

सीझ– *स्त्री.* शिजणें; उकडणें.

सीझना–*क्रि. अ.* १. शिजणें; उष्णतेमुळें वितळणें किंवा मऊ पडणें. २. कातडें मऊ होणें. ३. कष्ट सहन करणें. ४. थंडीमुळें काकडणें; गारठणें. ५. कर्जाची फेड होणें. ६. मुदत भरणें (कर्ज, व्याज इ० ची). [*स्त्री.* बढाई; शेखी.

सीट$^{+}$– *स्त्री.* बढाई; **–पटाँग**–

सीटना–*क्रि. स.* बढाई मारणें; शेखी मिरविणें.

सीटी– *स्त्री.* १. शीळ. २. शिटी (आवाज). ३. शिटी (वाजविण्याचें साधन). **मु०–देना; –बजाना**–१. शीळ घालणें. २. शिटी वाजविणें.

सीठ– *स्त्री.* पा० ' सीठी '.

सीठना$^{+}$–*पु.* उत्तर हिन्दुस्तानांत विवाहप्रसंगीं स्त्रिया गातात तें अश्लील गीत. [*–स्त्री.* **' सीठनी '**].

सेंहुड़–*पु.* वई-निवडुंग; शेर (झाड).

से–*अव्य.* तृतीया (करण) व पंचमी (अपादान) या विभक्तींचा प्रत्यय. (नें-ऊन-हून).–*सर्व.** ते; त्या; तीं.–*वि.* समान; सदृश.

सेइ*–*क्रि.* १. सेवन करून. २. सेवा करून. [एक लांकडी भांडें.

सेई+– *स्त्री.* धान्य मापण्याचें

सेउ*–*पु.* सफरचंद.

सेक–*पु.* १. जलसिंचन; शिंपण. २. शुक्रस्राव.

सेकड़ा+–*पु.* शेतकऱ्याची बैल हांकण्याची काठी किंवा चाबूक.

सेकुवा[+]–*पु.* हलवायांचा लांब लांकडी पळा.

सेख[*]–*पु.* १. शेषनाग. २. उरलेला भाग; शिल्लक. ३. समाप्ति. ४. पा० 'शेख'.

सेखी[+]– *स्त्री.* पा० 'शेखी'.

सेग़ा–*पु.* [*अ.*] विभाग; खातें.

सेज– *स्त्री.* शय्या; पलंग.–**पाल** –*पु.* शयनागाररक्षक; राजाच्या शयनागारावरील पहारेकरी.

सेजरिया; सेजिया; सेज्या*– *स्त्री.* शय्या; अंथरूण; पलंग.

सेझदादि*–*पु.* सह्याद्रि. [होणें.

सेझना*–*क्रि. अ.* दूर, वेगळें

सेटना*–*क्रि. स.* मानणें; समजणें; कांहीं महत्त्व देणें.

सेठ–*पु.* १. मोठा सावकार; शेठ. २. मोठा व्यापारी. ३. श्रीमंत माणूस. ४. सोनार.

सेठन[+]–*पु.* केरसुणी; झाडू.

सेठा[+]–*पु.* पा० 'सेंठा'.

सेठानी– *स्त्री.* सावकाराची, शेटजीची बायको; शेटाणी.

सेढ़ा*–*पु.* १. शेंबूड. २. भाद्रपदांत होणारें एक प्रकरचें भात.

सेत*–*वि.* श्वेत; पांढरा. –*पु.* १. सेतु; पूल. २. सीमा; मर्यादा. –**कुली**–*पु.* १. नागकुल. २. पांढरा साप.–**दुति**–*पु.* चंद्र.

सेतना[+]–*क्रि. स.* पा. 'सैंतना'.

सेतवा[+]–*पु.* अफू गोळा करण्याची पळी.

सेतिका– *स्त्री.* अयोध्या.

सेती*–*प्रत्य.* पा० 'से'.

सेतु–*पु.* १. बांध. २. बंधन. ३. पूल; सेतु. ४. मर्यादा; सीमा. –*वि.** श्वेत; पांढरा.

सेतुक–*पु.* १. सेतु; पूल. २. बांध. –*अव्य.** समोर.

सेतुवा*–*पु.* सातू.

सेथिया–*पु.* [तेलुगु] नेत्रवैद्य.

सेद*–*पु.* स्वेद; घाम.

सेदरा–*पु.* [*फा.* 'सेहदरा'] तीन दारें असलेलें दालन.

सेन–*पु.* १. शरीर. २. जीवन. ३. डोळ्यानें केलेली खूण; इशारा. ४.* बहिरी ससाणा –*स्त्री.** सैन्य.

सेना–*क्रि. स.* १. उबविणें (अंडें). २. आराधना करणें. ३. घेऊन बसणें. ४. सेवाशुश्रूषा करणें.

सेना– *स्त्री.* सैन्य; फौज; लष्कर. –**कक्ष**–*पु.* सैन्याची डावी-उजवी बाजू. –**जीवी**–*वि. पु.* सैनिक. –**नायक; –नी**–*पु.* सेनापति.–**रसद-विभाग**–*पु.* लष्करी पुरवठाखातें; मोदीखाना; 'कॉमिसेरिअट'.

सेनावास–*पु.* १. सैन्याची छावणी; शिबिर. २. तंबू.

सेनानी–*पु.* सेनापति.

सेनायत्त–*वि.* लष्कराच्या ताब्यांतील. –**करना**– *क्रि. स.* १. लष्करी उपयोगासाठीं घेणें. २. बळजबरीनें सैन्यांत दाखल करणें; 'कॉमांडियर'. [रांग.

सेनि*– *स्त्री.* श्रेणी; पंक्ति;

सेनिका*– *स्त्री.* १. बहिरी ससाण्याची मादी. २. एक छंद.

सेनी–*पु.* सहदेवाचें अज्ञातवासांतील नांव. –*स्त्री.* १. मोठी बशी; नक्षीदार थाळी. २.* श्रेणी. ३. पायरी. ४. पा० 'सेनिका'.

सेनुर[+]–*पु.* शेंदूर.

सेब–*पु.* [*फा.*] सफरचंद (झाड व फळ).

सेम– *स्त्री.* भाजीची शेंग (घेवडा, गवारी इ०); वालपापडी.

सेमई*– *स्त्री.* शेवया.

सेमई–*वि.* फिकट हिरवा.–**पु.** फिकट हिरवा रंग.–*स्त्री.** शेवया.

सेमर*–*पु.* १. सांवरी (झाड व फूल). २. दलदलीची जमीन.

सेमल–*पु.* सांवरी; कांटेसांवरी.

सेमा–*पु.* भाजीची मोठी शेंग.

सेर–*पु.* १. शेर. २.* वाघ. –*स्त्री.*[+] एक प्रकारचा मासा. –**साहि***– *पु.* शेरशाह. **मु० –के लिए सवा सेर**– शेरास सव्वा शेर; एकाहून दुसरा वरचढ.

सेर– *वि.* [*फा.*] १. तृप्त झालेला; संतुष्ट. २. भरलेला. ३. खूप.

सेरखड़ी[+]– *स्त्री.* पा० 'सेलखड़ी'.

सेरवा[+]–*पु.* १. धान्य वांरवतांना कोंडा उडविण्याचें कापड. २. पा० 'सेरा'. ३. दिवाळीच्या दिवशीं सकाळीं सूप वाजविण्याची प्रथा. [द्यावा लागणारा एक कर.

सेरही– *स्त्री.* शेतांतील पिकावर

सेरा–*पु.* १. बाजेचें डोक्याकडील बाजूचें लांकूड. २. पाण्यानें भिजविलेली जमीन.

सेराना*–*क्रि. अ.* १. थंड होणें; शीतल होणें. २. तृप्त होणें. ३. जिवंत न राहाणें; मरणें. ४. संपणें. ५. ठरणें.–*क्रि. स.* १. थंड करणें. २. तृप्त करणें.

सेराब– *वि.* [फा.] १. हिरवेंगार; प्रफुल्ल; टवटवीत. २. पाण्यानें थवथवलेला; ओलाचिंब. **मु०–होना**–तृप्त, संतुष्ट होणें.

सेरी– *स्त्री.* [*फा.*] १. तृप्ति; तुष्टि. २. वीट येणें. ३.* रस्ता; मार्ग.

सेरीना–*स्त्री.* कुळाकडून जमीन-मालकाला मिळणारा धान्याचा किंवा गवताचा भाग; खंड.

सेल– *पु.* १. भाला; बरछी. २.[+] पाणी उपसण्याचें लाकडी भांडें. ३. पेरणी करण्याची लाकडी

नळी.*–स्त्री. १. माळ. २. दोरी; दावें.

सेल–पु. [इं.] विक्री.

सेलखड़ी–स्त्री. १. शाडू. २. खडू. ३. ज्यापासून भांडीं इ० बनविलीं जातात असा एक मऊ दगड.

सेलना+–क्रि. अ. मरणें.

सेला–पु. शेला; रेशमी चादर.

सेली–स्त्री. १. बरची. २. उपरणें. ३. बैराग्यांची माळ, दोरी इ०. ४. बायकांचा एक दागिना.

सेल्ल-ल्ला-ल्ह*–पु. भाला; बरची. [मरणें.

सेल्हना+–क्रि.अ. मरण पावणें;

सेल्हा–पु. शाल; रेशमी उपरणें, पटका.

सेवँई–स्त्री. शेवया.

सेवँर*–पु. सावरी (वृक्ष).

सेव–पु. १. पा. 'सेव'. २. हरभऱ्याच्या डाळीची शेव. –स्त्री.* सेवा.

सेवईं–स्त्री. शेवया.

सेवक–पु. १. सेवा करणारा; सेवक; नोकर. २. भक्त.

सेवकाई–स्त्री. सेवा; चाकरी; परिचर्या. [मोलकरीण.

सेवकी*–स्त्री. दासी;

सेवग*–पु. पा० 'सेवक'.

सेवड़ा–पु. १. शेवखंड (तिखटामिठाचें). २. जैन साधूंचा एक पोटभेद.

सेवति*–स्त्री. स्वाति.

सेवती–स्त्री. १. पांढरा गुलाब. २. शेवंती.

सेवदाना–पु. सोयाबीनचे दाणे.

सेवन–पु. १. सेवा. २. खाणें. ३. उपभोग; वापर. ४. शिवण.

सेवना*–क्रि. स. १. सेवा करणें. २. उपभोग घेणें. ३. अंडें उबविणें.

सेवनी–स्त्री. १. सुई. २. शिवणी. ३* दासी. ४. जुई.

सेवर–पु. १. शबर (एक आदिवासी जमात). २. पा० 'सेमल'. –वि.+ कमी भाजलेलें, कच्चें (मातीचें भांडें).

सेवरा*–पु. पा० 'सेवड़ा'.

सेवरी*–स्त्री. १. शबरी. २. शेवरी.

सेवल+–पु. नवरदेवानें आरतीच्या ताम्हनाला डोक्यानें स्पर्श करण्याचा लग्नांतील एक विधि.

सेवा–स्त्री. १. परिचर्या; सेवा. २. नोकरी; चाकरी. ३. आराधना; उपासना. ४. आश्रय; आधार. ५. रक्षण. **–टहल**–स्त्री. सेवा-शुश्रूषा. **–नियोजनालय**–पु. व्यवसायविनिमय केंद्र; 'एम्प्लॉयमेंट ब्यूरो'. **–बंदगी**–स्त्री. आराधना; पूजा. **–में**–अव्य. सेवेसीं; चरणीं; सादर. **–योजक**–पु. नोकरी देणारा, लावणारा. 'एम्प्लॉयर'. **–योजनालय**–पु. पा० 'सेवानियोजनालय'.

सेवाती*–स्त्री. १. स्वाति. २. शेवंती. [लेला; 'एम्प्लॉइड'.

सेवायुक्त–वि. नोकरींत अस-

सेवार-ल*–स्त्री. शेवाळ.

सेवी–वि. सेवा किंवा पूजा करणारा.

सेवोपहार–पु. नोकरी संपतांना नोकराला मिळणारें इनाम; 'ग्रॅच्युइटी'.

सेव्य–वि. सेवा किंवा पूजा करण्यास योग्य. २. उपभोग घेण्यास किंवा खाण्यास योग्य. –पु. स्वामी; प्रभु. [उरलेला; अवशिष्ट.

सेष-स*–पु. शेषनाग. –वि.

सेसर–पु. [फा.] १. ठकबाजी; फसवेगिरी. २. दोषारोप; कुभांड; आळ. ३. पत्त्यांचा एक खेळ.

सेसरिया–वि. ठक; फसव्या.

सेह–वि. [फा.] १. तीन. २. पा० 'सिंह'. **–खाना**–पु. तीन मजली घर. **–माही**–वि. त्रैमासिक. **–शंबा**–पु. मंगळवार.

सेहत–स्त्री. [अ.] १. आरोग्य; स्वास्थ्य; प्रकृति. २. चुकीची सुधारणा; दुरुस्ती. **–खाना**–पु. शौचकूप. **–नामा**–पु. १. शुद्धिपत्र. २. प्रकृति चांगली असल्याबद्दलचें प्रमाणपत्र. **–बख्श**–वि. आरोग्यदायक. **–याब**–वि. आजारांतून उठलेला; बरा झालेला. मु० **–पाना**–आजारांतून बरें होणें; रोगमुक्त होणें.

सेहथना+–क्रि. स. झाडलोट व सारवण इ० करून साफसूफ करणें.

सेहर–पु. [अ.] जादू; इंद्रजाल; मंत्र. **–बयाँ**–वि. आपल्या भाषणानें जादूचा प्रभाव उत्पन्न करणारा; सुवक्ता; आपल्या वाणीनें मोहित करणारा. **–साज़**–वि. जादूगार.

सेहरा–पु. १. मुंडावळ. २. विवाहप्रसंगीं वराच्या घरीं गायिलीं जाणारीं गाणीं. ३. विवाहप्रसंगीं घालावयाची पगडी. ४. कबरीच्या कोनाड्यावर ठेवली जाणारी फुलांची माळ. मु०–(किसीके सिर) **–बाँधना**–१. मुंडावळ बांधणें. २. यशस्वी करणें; यश, श्रेय देणें.

सेहरी–स्त्री. मासळीची एक जात.

सेहा–पु. विहीर खणणारा.

सेही–स्त्री. पा० 'साही'.

सेहुँआ–पु. अंगावर चट्टे पडण्याचा रोग.

सेहुँड़–पु. शेर (झाड).

सेह्र–पु. [अ.] पा० 'सेहर'.

सैंगर–पु. बाभळीची शेंग. –वि.+ पुष्कळ.

सैंतना–क्रि. स. १. संचय करणें.

२. गोळा करणें; हातानें ओढून घेणें. ३. सांभाळणें; राखणें. [४७.

सैंतालीस–*वि.* सत्तेचाळीस;

सैंतीस–*वि.* सदतीस; ३७.

सैंथी*– *स्त्री.* १. भाला. २. शक्ति. [रंगाचा.

सैंदूर–*वि.* शेंदरी; शेंदराच्या

सैंधव–*पु.* १. सैंधव मीठ. २. सिंधी घोडा.

सैंयाँ–*पु.* पा० 'सैयाँ'.

सैंवर*–*पु.* पा० 'साँभर'.

सैंवार*–*पु.* शेवाळ.

सैंह*–*अव्य.* पा० 'सौंह'.

सैंहुड़–*पु.* शेर (झाड).

***सै**–*वि. पु.* पा० 'सौ'.–*स्त्री.* १. शक्ति. २. बढती; वाढ.

सैकड़ा–*पु.* शंभर; शेंकडा.

सैकड़े–*अव्य.* शेंकडयानें; दर शेंकडा.

सैकडों–*वि.* शेंकडों; अनेक.

सैकत–*वि.* १. वाळूचें बनलेलें. २. वाळवंट असलेलें. –*पु.* वालुकामय किनारा.

सैक़ल–*पु.* [*अ.*] १. हत्यारें साफ करून धार लावण्याचें काम. २. सफाई; झिलई. **–गर**–*वि.* हत्यारांना धार लावणारा.

सैका⁺–*पु.* १. चरकांतून निघणारा रस भरण्याचें घागरीसारखें भांडें. २. कापलेल्या पिकाचा ढीग. ३. शंभर पेंढया.

सैजन⁺–*पु.* शेवगा.

सैथी– *स्त्री.* बरची; भाला.

सैद–*पु.* [*अ.*] १. शिकार; शिकारी जनावर. २.*पा० 'सैयद'. **–गाह**–*पु. स्त्री.* शिकारीची जागा.

सैदानी⁺– *स्त्री.* पा० 'सैयदानी'.

सैन– *स्त्री.* १. चिह्न; खूण. २. इशारा; संकेत. ३.* सैन्य. –*पु.** १. शयन. २. बहिरी ससाणा. **–पति**–*पु.* सेनापति. **–भोग**–*पु.* झोंपण्याच्या वेळचा नैवेद्य.

सैना*– *स्त्री.* सैन्य. –*पु.* १. खूण; इशारा. २. पा० 'सीना'. **–सैनी**– *स्त्री.* नेत्रसंकेत; खुणांनीं बोलणें.

सैनिक–*पु.* शिपाई; योद्धा; सैनिक. **–कार्यालयका विभाग-अध्यक्ष**–*पु.* सेनाधिपतीचा मदतगार; 'अॅडजूटंट जनरल.'**–सहचारी**–*पु.* लष्करी मदतनीस; 'मिलिटरी अॅटशे'. **–सुलह**– *स्त्री.* तात्पुरता तह; 'आर्मिस्टिस'.

सैनिकीकरण–*पु.* सैनिकीकरण; 'मिलिटॅरिझेशन'.

सैनी*– *स्त्री.* १. श्रेणी; पंक्ति. २. सैन्य. –*पु.* न्हावी.

सैन्य–*पु.* सैन्य; फौज. **–क्षोभ**–*पु.* सैन्याचें बंड. **–छात्र**–*पु.* सैनिक-विद्यार्थी; 'कॅडेट'. **–द्रोह**–*पु.* लष्करी बंड, उठावणी; 'म्यूटिनी'. **–विभागाध्यक्ष**–*पु.* सेनाधिपतीचा मदतगार; 'अॅडजूटंट जनरल'. **–वियोजन**–*पु.* सैन्याचें विघटन; 'डीमोबिलायझेशन'. **–शिक्षार्थी**–*पु.* विद्यार्थी–सैनिक; 'कॅडेट'. **–संसज्जन**–*पु.* सैन्याची जमवाजमव; 'मोबिलायझेशन ऑफ दि आर्मी'.

सैन्यादेशवाहक–*पु.* लष्करी खात्यांतील निरोप्या, जासूद; 'एड-कॉंग'.

सैन्यावास–*पु.* बराक; 'बरॅक'.

सैफ़– *स्त्री.* [*अ.*] तलवार. **–ज़बाँ**–*वि.* १. प्रभावी भाषण करणारा. २. फटकळ तोंडाचा. ३. ज्याचा आशीर्वाद खरा ठरतो असा.

सैफ़ी– *स्त्री.* जपमाळ.

सैफी*–तिरपा; वांकडा.

सैयद–*पु.* [*अ.*] १. नेता; इमाम; सरदार. २. हजरत मुहंमदांचे नातू हुसेन, यांचे वंशज. ३. मुसलमानांच्या चार वर्गांपैकीं एक वर्ग. [– *स्त्री* **सैयदा; सैयदानी**]

सैयदुश्शुहदा–*पु.* हजरत इमाम हुसैन.

सैयाँ*–*पु.* स्वामी; पति.

सैया*– *स्त्री.* शय्या; बिछाना.

सैयाद–*पु.* [*अ.*] १. शिकारी. २. कवितेंतील प्रियकर किंवा प्रेमिका.

सैयार–*वि.* [*अ.*] खूप प्रवास करणारा; भटक्या. –*पु.* ग्रह.

सैयारा–*पु.* [*अ.*] गतिमान् तारा; ग्रह.

सैयाल–*वि.* [*अ.*] प्रवाही; पातळ. –*पु.* द्रव पदार्थ.

सैयाह–*वि.* [*अ.*] प्रवासी; मुशाफिर; यात्रेकरू. [प्रवास.

सैयाही– *स्त्री.* [*अ.*] सफर;

सैर– *स्त्री.* [*अ.*] १. फेरफटका; सहल. २. मौज; आनंद; मजा. ३. वनभोजन. ४. मनोहर दृश्य. **–गाह**–*पु. स्त्री.* १. सहलीचें ठिकाण. २. हत्ती घोडयांचीं फिरतीं चित्रें असलेला आकाशदिवा. **–सपाटा**–*पु.* सहल; फेरफटका.

सैरा⁺–*पु.* पा० 'आल्हा'.

सैल–*पु.; स्त्री.* [*अ.*] १. पूर (नदीचा). २. प्रवाह.

सैल*–*पु.* शैल; पर्वत. –*स्त्री.* पा० 'सैर'.

सैला–*पु.* १. लाकडाची फळी, तुकडा; पाचर. २. जुआच्या वरच्या बाजूस लावावयाची खुंटी. ३. धान्य झाडण्याचा दंडा.

सैलानी–*वि.* [*फा.*] १. आनंदी; मनमौजी. २. स्वैर भटकणारा; प्रवासी; सहल करणारा.

सैलाब–*पु.* [*अ.* + *फा.*] पूर; पाण्याचा लोंढा. [बुडालेलें पीक.

सैलाबा–*पु.* [*फा.*] पाण्याखालीं

सैलाबी–*स्त्री.* [*फा.*] १. नदीचा पूर. २. मळीची जमीन ३. आर्द्रता; ओलावा. –*वि.* पुरासंबंधींचा.

सैलूख*–*पु.* नट; अभिनेता.

सैलून–*पु.* [*इं.* 'सलून'] १. मोठ्या अधिकाऱ्यांसाठीं असलेला रेल्वेचा खास सुसज्जित डबा. २. न्हाव्याचें दुकान.

सैव(वा)ल–*पु.* शेवाळ.

सैसव–*पु.*; **सैसवता***–*स्त्री.* बालपण; शिशुपण.

सैह–*वि.* पा० 'सिंह'.

सैहा+–*पु.* पाणी इ० ओतण्याचें मातीचें भांडें.

सों*–*प्रत्य.* तृतीयेचा किंवा पंचमीचा प्रत्यय (नें; कडून; द्वारा; ऊन; हून.) –*अव्य.* १. बरोबर. २. समोर. –सर्व. पा० 'सो'. –*वि.* समान; तुल्य. –*स्त्री.* शपथ.

सोंच+–*पु.* विचार; मनन.

सोंचर नमक–*पु.* पादेलोण; काळें मीठ.

सोंझ+–*स्त्री.* भागीदारी; वांटणी.

सोंटा–*पु.* १. सोटा; दंडा; काठी. २. भांग घोटण्याचा दंडा. **–बरदार**–*पु.* भालदार; चोपदार.

सोंठ–*स्त्री.* सुंठ. **मु०–(ठे) करना**–खूप बडविणें. [लाडू.

सोंठौरा–*पु.* सुंठवडा; सुंठीचे

सोंध*–*पु.* पा० 'सौंध'. –*वि.* पा० 'सोंधा.'

सोंधा–*वि.* सुवासिक; सुगंधित. –*पु.* १. शिकेकाई; गव्हला कचरा; स्त्रिया केस धुतांना उपयोग करतात असा एक सुगंधित मसाला. २. सुगंध; घमघमाट. ३. धान्य भाजतांना किंवा मातीच्या नव्या भांड्यांत पाणी घातलें असतां येणारा वास; मातीचा खमंग वास.

सोंपना–*क्रि. स.* पा० 'सौंपना'.

सोंह*–*अव्य.* समोर; पुढें. –*स्त्री.* पा० 'सौंह'.

सोंही–हें*–*अव्य.* समोर.

सो–*सर्व.* तो. –*वि.* प्रमाणें; सारखा. –*अव्य.* म्हणून; यासाठीं; एवंच.

सोअना*–*क्रि. अ.* पा०'सोना'.

सोआ–*पु.* १. बडीशेप. २. शेंपूची भाजी.

सोई*–*सर्व.* तोच. –*अव्य.* म्हणून. –*स्त्री.* सखल जमीन; पाण्याचा निचरा न होणारी जमीन.

सोक*–*पु.* शोक.

सोकना*–*क्रि. अ.* शोक करणें. –*क्रि. स.* शोषून घेणें. [न्वित.

सोकित*–*वि.* शोकयुक्त; शोका-

सोख़ता–*वि.* [*फा.*] १. दग्ध; जळालेला. २. दुःखी. –*पु.* टिपकागद; 'ब्लॉटिंग पेपर'. [घेणें.

सोखना–*क्रि. स.* शोषणें; शोषून

सोखपत्र–*पु.* टिपकागद; 'ब्लॉटिंग पेपर.'.

सोखा+–*पु.* मांत्रिक; ज्याच्या अंगांत देव संचारतो असा.

सोखाई–*स्त्री.* १. जादूटोणा; मंत्रतंत्र. २. शोषण.

सोख़्त–*स्त्री.* [*फा.*] जळजळ; दुःख. –*वि.* नष्ट.

सोख़्ता–*पु.* [*फा.*] १. दग्ध; जळालेला. २. खिन्न; विषादयुक्त. ३. प्रेमी. –*पु.* टिपकागद.

सोगंद*–*स्त्री.* शपथ.

सोग–*पु.* [*फा.*] १. शोक; दुःख. २. मृत्युशोक; विलाप. **–वार**–*वि.* दुःखी; शोकग्रस्त.

सोगी–*वि.* शोकाकुल; दुःखी.

सोच–*पु.* १. विचार; मनन. २. चिंता; काळजी. ३. शोक; दुःख. ४. पश्चात्ताप. **–विचार**–*पु.* मनन; चिंतन; विचार.

सोचना–*क्रि. स.* विचार करणें; मनन करणें. –*क्रि. अ.* १. शोक, दुःख करणें. २. काळजी करणें. ३. पस्तावणें. [सामान.

सोज–*स्त्री.* १. सूज; शोथ. २.

सोज़–*पु.* [*फा.*] जळजळ; दुःख; कष्ट; मनस्ताप; कारुण्य. **–(जो) गुदाज़**–*पु.* करुण रस.

सोज़न–*स्त्री.* [*फा.*] सुई. **–कारी**–*स्त्री.* सुईचें काम; कशिदा.

सोज़नी–*स्त्री.* [*फा.*] १. गोधडी; पासोडी. २. अनेक घड्यांचें बनविलेलें अंथरूण, बिछायत.

सोज़ाँ–*वि.* [*फा.*] तापदायक; दुःखद; करुणाजनक.

सोजाक–*पु.* पा० 'सूज़ाक'.

सोज़िश–*स्त्री.* [*फा.*] १. दाह; ईर्ष्या. २. मानसिक कष्ट; व्यथा.

सोझ-झा–*वि.* १. सरळ. २. उभा. –*अव्य.* समोर.

सोटा–*पु.* १. पोपट. २. सोटा.

सोठ–*स्त्री.* सुंठ. [मूर्ख; मठ्ठ.

सोढर*–*वि.* अजागळ; गबाळ;

सोत*–**ता**–*पु.* १. झरा. २. ओढा. ३. पाट; कालवा. ४. उगम; मूलस्थान; स्रोत.

सोती–*स्त्री.* १. स्रोत; झरा; प्रवाह. २.* स्वाती नक्षत्र.

सोथ+–*पु.* सूज. [भाऊ.

सोदर–*पु.* सहोदर; सख्खा

सोदरा–री–*स्त्री.* सख्खी बहीण.

सोध*–*पु.* १. शोध; चौकशी; तपास. २. सुधारणा. ३. वास्तपुस्त. ४. पैशांची परतफेड.

सोधक*–*पु.* १. शुद्ध करणारा; दुरुस्त करणारा. २. शोधक; संशोधक.

सोधन*– *पु.* १. शोध, संशोधन करणें. २. दुरुस्ती करणें; सुधारणें. ३. फेडणें (कर्ज); परत करणें.

सोधना*–*क्रि. स.* १. शुद्ध करणें; साफ करणें. २. दुरुस्त करणें. ३. निश्चित करणें. ४. शोधणें; धुंडाळणें. ५. चुकतें करणें; फेडणें (ऋण).

सोधवाना; सोधाना+–१. शोधविणें; शोध करविणें. २. दुरुस्त करवून घेणें.

सोन–पु.–१. सोनें. २. बिहारमधील एक मोठी नदी; शोण. –*वि.** लाल; पिवळा. **–कीकर–पु.** देवबाभळ. **–केला–पु.** सोनकेळें. **–चंपा–पु.** सोनचांफा. **–ज़(जि)रद;–जर्द; –जूही–** *स्त्री.* पिवळी जुई. [सोनेरी.

सोनवाना*–*वि.* सोन्याचा;

सोनहला–*वि.* सोनेरी.

सोनहा–*पु.* लांडग्यासारखा एक हिंस्र पशु. हा वाघालाहि ठार मारतो, असें म्हणतात.

सोना–*पु.* १. सोनें; सुवर्ण. २. मौल्यवान् वस्तु. ३. राजहंस. –*स्त्री.* एका जातीची मासळी. **–चाँदी–** *स्त्री.* संपत्ति; धनदौलत. **–पाठा–पु.** पाटला (एक उंच वृक्ष). **–मक्खी; –माखी–** *स्त्री.* सोनामुखी. **मु०–(ने) का घर मिट्टी होना**–सर्वस्व नष्ट होणें. **–(ने) का पानी**–सोन्याचा मुलामा. **–(ने) की चिड़िया**–श्रीमंत माणूस. **–(ने) में घुन लगना**–असंभव गोष्ट होणें. **–(ने) में सुगंध**–दुधांत खडीसाखर. **–(ने) में सुहागा**–एखाद्या व्यक्तीचें स्थान उच्चतर होणें; अधिक उत्तम होणें; दुधांत साखर पडणें.

सोना–*क्रि. अ.* १. झोपणें; निजणें; पहुडणें. २. अंग बधिर होणें; मुंग्या यणें. **मु०–हराम होना**–काम किंवा काळजी यामुळें झोंप न येणें; झोपण्यास सवड न मिळणें. **सोते जागते**–रात्रंदिवस; सदैव.

सोनार; सोनी*–*पु.* सोनार.

सोप–*पु.* [इं.] साबण.

सोपत*–*पु.* सोय; सवड.

सोपान–*पु.* शिडी; जिना; पायरी. **–तंत्र–पु.** अधिकारपरंपरा; ' हायरार्की '.

सोपानक–*पु.* १. पा० 'सोपान'. २. सोन्याच्या तारेंत ओवलेली मोत्यांची माळ. ३. ' एशेलॉन '.

सोपारी–*स्त्री.* सुपारी.

सोफ़्ता–*पु.* १. एकांत स्थान. २. रोगाचा उतार.

सोफ़ा–*पु.* [इं.]. गादी; गादी असलेली खुर्ची; ' कोच '.

सोफ़ियाना–*वि.* [अ.+ फा.] १.दिसण्यांत साधें पण सुंदर. २. सूफी संप्रदाय अथवा सूफी लोक यांच्या संबंधींचा; सूफींसारखा.

सोफी–*पु.* पा० ' सूफी '.

सोब्रन+–*पु.* सुवर्ण; सोनें.

सोभ*–*स्त्री.* शोभा.

सोभन*–*वि.* शोभिवंत; सुंदर. –*पु.* सौंदर्य. [शोभिवंत दिसणें.

सोभना*–*क्रि. अ.* शोभणें;

सोभनीक*–*वि.* शोभिवंत; सुंदर.

सोभर–*पु.* सूतिकागृह.

सोभा*–*स्त्री.* शोभा; सौंदर्य. **–कारी**–*वि.* शोभिवंत; सुंदर.

सोभित*–*वि.* शोभणारें; शोभिवंत.

सोमकर–*पु.* चंद्राचे किरण.

सोमवारी –*स्त्री.* सोमवती आमावस्या. –*वि.* सोमवारासंबंधींचा.

सोय*–*सर्व.* तोच.–*वि.* तसा.

सोयम–*वि.* [फा.] तिसरा.

सोया–*पु.* शेपूची भाजी.

सोर+–*पु.* १. पा० ' शोर '. २. प्रसिद्धि; ख्याति.–*स्त्री.* मुळी.

सोरठ–*पु.* १. सौराष्ट्र. २. सुरत. ३. सोरठा छंद. ४. एक रागिणी. [छंद.

सोरठा–*पु.* ४८ मात्रांचा एक

सोरन+–*पु.* सुरण.

सोरनी+–*स्त्री.* १. झाडणी; केरसुणी. २. चितेची राख सावडणें.

सोरबा+–*पु.* पा० ' शोरबा '.

सोरह–*वि.* पा० ' सोलह '.

सोरही–*स्त्री.* १. सोळा कवड्यांनीं खेळण्याचा जुगार. २. जुगाराच्या सोळा कवड्या; सोळा ठिपके असलेले फांसे.

सोरा*–*पु.* सोडा.

सोलह–*वि.* सोळा; १६. **–सिंगार**–*पु.* सर्व प्रकारचे शृंगार. **मु० –आने पाव रत्ती–** भरपूर; सव्वासोळा आणे. **–(हों) आने**–परिपूर्ण; सर्वच्या सर्व.

सोलही–*स्त्री.* पा० ' सोरही '.

सोला–*पु.* ज्याच्या कामट्यांपासून हॅट तयार करतात असें एक झाड; बुचाचें झाड. [निजविणें.

सोलाना+–*क्रि. स.* झोंपविणें;

सोल्लास–*वि.* उल्हासयुक्त; आनंदमय. –*अव्य.* उल्हासानें; आनंदानें.

सोवज*–*पु.* सावज; शिकार.

सोवड़–*पु.* सूतिकागृह.

सोवन*–*पु.* झोंपण्याची क्रिया.

सोवना*–*क्रि. अ.* झोंपणें; निजणें. [खोली; शयनागार.

सोवनार*–*स्त्री.* झोंपण्याची

सोवरी*–*स्त्री.* पा० ' सौरी '.

सोवा–*पु.* शेपू; शेपूची भाजी.

सोवाना*–*क्रि. स.* पा० ‘सुलाना’. [झोंपाळू.

सोवैया*–*पु.* झोंपणारा;

सोषक–ण–ना*–पा० ‘शोषक–ण;’ ‘सोखना’.

सोसन–*स्त्री.* पा० ‘सौसन’.

सोसनी–*वि.* [*फा.*] जांभळा; लालसर निळा. [मंडळी.

सोसाइटी– *स्त्री.* [इं.] संस्था;

सोहँ*–*अव्य.* समोर; पुढें.

सोहं; सोहंग; सोहंगम*–*वि.* सोऽहम्; मी तो आहें; मी ब्रह्म आहें.

सोहँन*–*अव्य.* समोर.

सोहगी– *स्त्री.* १. वाङ्निश्चयानंतर वधूला कपडे, दागिने इ० वस्तू पाठविण्याची प्रथा; तेलफळ. २. सौभाग्य–चिह्न (कुंकू, शेंदूर).

सोहदा+–*पु.* पा० ‘शुहदा’.

सोहन*–*वि.* सुंदर; मनोहर. –*पु.* सुंदर पुरुष; नायक. –*स्त्री.* एक पक्षी (याची शिकार करतात). **–पपड़ी**– *स्त्री.* शेवयांसारखी एक प्रकारची मिठाई (हिच्यांत मैदा व साखर असते). **–हलवा**–*पु.* माहीम हलव्यासारखी एक प्रकारची मिठाई (हिच्यांत सुका मेवा, तूप व साखर असते).

सोहना–*क्रि. अ.* शोभणें; सुंदर, शोभून दिसणें. –*वि.* सुंदर. –*क्रि. स.* पा० ‘निराना’.

सोहनी– *स्त्री.* १. केरसुणी; झाडू. २. एक रागिनी. ३. पा० ‘निराई’. –*वि. स्त्री.* सुंदर; मनोहर.

सोहबत– *स्त्री.* [*अ.*] १. सहवास; संगत; सोबत. २. संभोग. **–याफ़्ता**–*वि.* चांगल्या लोकांच्या सहवासांत राहिलेला; सत्संग लाभलेला; सुशिक्षित.

सोहबती–*वि. पु.* सोबती; साथीदार; मित्र; दोस्त.

सोहर– *स्त्री.* १. सूतिकागृह. २. पुत्र-जन्माचें मांगलिक गीत.

सोहरत*– *स्त्री.* पा० ‘शोहरत’.

सोहराना*–*क्रि. स.* १. गोंजारणें; हात फिरविणें. २. गुदगुल्या करणें. –*क्रि. अ.* गुदगुल्या होणें.

सोहला–*पु.* १. मूल जन्मल्यावर घरांतील स्त्रिया गातात तें मंगल गीत. २. पूजेच्या वेळीं गायिलें जाणारें मंगल गीत.

सोहाइन*–*वि.* सुंदर; रमणीय.

सोहाई– *स्त्री.* १. निंदणी; मांगलणी. २. सुंदर दिसणें; शोभणें. –*वि. स्त्री.* सुंदर; गोजिरवाणी.

सोहाग*–*पु.* १. सौभाग्य. २. सौभाग्य-गीत. [२. कुळव.

सोहागा*–*पु.* १. पा० ‘सुहागा’.

सोहागिन–नी–ल– *स्त्री.* सौभाग्यवती स्त्री. [चांगला; सुंदर.

सोहाता–*वि.* शोभिवंत;

सोहाना–*क्रि. अ.* १. रुचणें; आवडणें; गोड लागणें. २. शोभणें; शोभून दिसणें. –*वि.* सुंदर; शोभिवंत.

सोहाया–*वि.* सुंदर; शोभिवंत.

सोहारद*–*पु.* सौहार्द; मित्रत्व.

सोहारी-- *स्त्री.* पुरी.

सोहावन+–*वि.* सुंदर; मनोहर.

सोहावना–*वि. क्रि. अ.* पा० ‘सोहाना’.

सोहासित*–*वि.* १. प्रिय; आवडीचा. २. खुशामती. ३. शोभिवंत; सुंदर.

सोंहिं–*अव्य.* पा० ‘सौंह’.

सोहिनी–*वि. स्त्री.* सुंदरी. –*स्त्री.* संगीतांतील करुद्रणरसाची एक रागिणी.

सोहिल*–*पु.* [*अ.*] १. अगस्त्य तारा. २. पा० ‘सुहैल.’.

सोहिला*–*पु.* पा० ‘सोहला’.

सोहीं–हैं–*अव्य.* समोर.

सौं*– *स्त्री.* शपथ. –*प्रत्य.* तृतीयेचा व पंचमीचा प्रत्यय–कडून; द्वारा; ऊन; हून. –*अव्य.* समान; प्रमाणें.

सौंका (के) रा+–*पु.* सकाळ; पहांट. [अधिक.

सौंघा*–*वि.* १: उत्तम. २.

सौंघाई*– *स्त्री.* १. आधिक्य; प्रचुरता. २. उत्तमता; उपयुक्तता.

सौंचना*–*क्रि. स.* १. मलत्याग करणें; शौचास जाणें. २. शौचास गेल्यानंतर गुदद्वार धुणें. [काळें मीठ.

सौंचर नमक–*पु.* पादेलोण;

सौंचाना+–*क्रि. स.* १. मलत्याग करविणें; हगविणें. २. ढुंगणावर पाणी घालणें.

सौंज*– *स्त्री.* सामग्री; सामान.

सौंड़–ड़ा+–*पु.* जाडजूड पांघरूण (पासोडी, रजई, घोंगडी इ०).

सौंड़ियाना+– *क्रि. अ.* १. लाजणें. २. भयभीत, साशंक होणें.

सौंतना*–*क्रि. स.* १. सांठविणें. २. म्यानांतून तलवार बाहेर काढणें; तलवार फिरविणें.

सौंतुख*–*अव्य.* समोर; प्रत्यक्ष.

सौंदन– *स्त्री.* धोब्यानें खाऱ्या मातींत कपडे भिजविणें; भट्टींत घालणें. [एकजीव करणें.

सौंदना– *क्रि. स.* मिसळणें;

सौंदर्ज*–*पु.* सुंदरता; सौंदर्य.

सौंदर्य–*पु.* सौंदर्य; सुंदरता. **–विज्ञान**–*पु.* सौंदर्यशास्त्र; रूपदर्शन; ‘एस्थेटिक्स’.

सौंध– *स्त्री.* सुगंध; सुवास. –*पु.* महाल; प्रासाद.

सौंधना–*क्रि. स.* १. सुगंधित करणें. २. मिसळणें.

सौंधा–*वि.* १. स्वादिष्ट; रुचकर. २. सुगंधित. –*पु.* १. सुगंध. २. केसांना लावण्याचें एक सुगंधित द्रव्य. [२. सुगंध; सुवास.

सौंधाई*–*स्त्री.* १. स्वादिष्टपणा.

सौंनी*–*पु.* सोनार.

सौंपना–*क्रि. स.* सोंपविणें; हवालीं करणें.

सौंफ–*स्त्री.* बडीशेप.

सौंफिया; सौंफी–*वि.* बडीशेप घातलेला खाद्यपदार्थ किंवा पेय. –*स्त्री.* १. बडीशेप घातलेलें मद्य. २. बडीशेपेची विडी.

सौंर–*स्त्री.* चादर; अंथरूण. –*पु.*+ मूल जन्मल्यानंतर दहाव्या दिवशीं फेंकलीं किंवा फोडलीं जाणारीं मातीचीं भांडीं.

सौंरई*–*स्त्री.* सांवळेपणा.

सौंरना–*क्रि. अ.* सांवरणें; संभाळणें. –*क्रि. स.* स्मरण करणें.

सौंरा*–*वि.* सांवळा.

सौंसे+–*वि.* १. संपूर्ण. २. फार मोठा. [–*अव्य.* समोर.

सौंह–*स्त्री.* शपथ; आणभाक.

सौ–*वि.* शंभर; १००. **मु०–के सवाये होना**–पंचवीस टक्के फायदा होणें. **–तरहका** – नानाप्रकारचा. **–पचास**–शेंपन्नास; अनेक. **–बातकी एक बात**–तात्पर्य; सारांश. **–सुनाना**–खरडपट्टी काढणें; शिव्या देणें. **–सुनारकी एक लुहारकी**– अनेक लहान आघातांपेक्षां एक मोठा आघात जोरदार असतो. **–हाथ की ज़बान होना**–स्वादलोलुप, अधाशी असणें. [–*पु.*+ पा० 'शौक़'.

सौक–*स्त्री.* सवत. –*वि.* *शंभर.

सौकन+–*स्त्री.* सवत.

सौकर्य–*पु.* १. सुकरता; सुलभता. २. सोय.

सौकीन–नी–पा० 'शौक़ीन-नी'.

सौख*–*पु.* पा० 'शौक'.

सौखीन+–*वि.* पा० 'शौक़ीन'.

सौगंद–*स्त्री.* शपथ; प्रतिज्ञा.

सौगंध–*स्त्री.* शपथ. –*वि.* सुगंधित. –*पु.* १. तेल; अत्तर वगैरे विकणारा; सुगंधी. २. सुगंध; सुवास.

सौग़ात–*स्त्री.* [*तु.*] १. नजराणा; भेट. २. इष्टमित्रांना देण्यासाठीं परदेशाहून आणलेली वस्तु. [सारखा; उत्तम.

सौग़ाती–*वि.* [*तु.*] भेट देण्या-

सौघा*–*वि.* स्वस्त.

सौच*–*पु.* १. शौच. २. स्वच्छता

सौज*–*स्त्री.* उपकरण; सामग्री; सामान.

सौजना*–*क्रि. अ.* १. शोभणें; शोभून दिसणें. २. सजणें.

सौजन्य–*पु.* १. शिष्टाचार; सभ्यपणा. २. नम्रपणा.

सौजा+–*पु.* शिकार; सावज.

सौड़+–*पु.* पा० 'सौंड'.

सौडि*–*स्त्री.* शय्या.

सौत; सौत(ति)न; सौति*–*स्त्री.* सवत; एखाद्या स्त्रीच्या पतीची किंवा प्रियकराची दुसरी पत्नी किंवा प्रेमिका.

सौतिया डाह–*पु.* १. सवतीमत्सर. २. द्वेष; मत्सर.

सौतुक–ख–ष*–*अव्य.* समोर.

सौतेला–*वि.* सावत्र.

सौदा–*पु.* [*अ.*] १. खरेदीविक्रीची वस्तु; माल. २. देवघेवीचा व्यवहार. ३. व्यापार. **–गर**–*पु.* व्यापारी. **–गरी**– *स्त्री.* व्यापार; व्यवसाय. **–सुल(लु) फ़**–*पु.* बाजारांतून विकत घेतलेल्या वस्तू. **मु० –पटना**– भाव ठरणें; खरेदी निश्चित होणें. **–होना**– खरेदी होणें.

सौदा–*पु.* [*अ.*] १. युनानी वैद्यकानुसार चार दोषांपैकीं एक. याचा रंग काळा मानला जातो. २. उन्माद रोग; वेड. ३. प्रेम; प्रीति.

सौदाई–*वि.* [*अ.*] १. वेडा; पागल; खुळा. २. चक्रम. ३. प्रेमी; आषक. [विद्युत्.

सौदाम(मि)नी– *स्त्री.* वीज;

सौध–*पु.* १. भवन; प्रासाद. २. चांदी; रुपें.

सौन*–*अव्य.* समोर. –*पु.* १. खाटीक; कसाई. २. ताजें मांस.

सौना*–*पु.* सोनें. [पना'.

सौपना*–*क्रि. स.* पा० 'सौं-

सौफ–*स्त्री.* बडीशेप. [याना'.

सौफ़ियाना–*वि.* पा० 'सूफ़ि-

सौबर*–*पु.* सुवर्ण; सोनें.

सौभग–*पु.* १. सुदैव; सौभाग्य. २. सुख; आनंद. ३. ऐश्वर्य. ४. सौंदर्य. [स्त्री; सौभाग्यवती.

सौभागिनी– *स्त्री.* सुवासिनी

सौभाग्य–*पु.* १. भाग्य; सुदैव. २. सुख; आनंद. ३. क्षेम; कुशल. ४. सौभाग्य. ५. सौंदर्य. ६. ऐश्वर्य; वैभव. **–तृतीया**– *स्त्री.* हरितालिका. [आह्लाद. २. विवेक.

सौमनस्य–*पु.* १. प्रसन्नता;

सौमित्र–त्रि–*पु.* १. सुमित्रेचे पुत्र: लक्ष्मण व शत्रुघ्न. २. मैत्री.

सौम्य–*वि.* शीतळ; स्निग्ध; शांत; सुशील.

सौर–*वि.* १. सूर्यासंबंधींचा. २. सूर्यापासून उत्पन्न झालेला. –*पु.* शनि ग्रह. –*स्त्री.* १. चादर. २. एक प्रकारची मासळी.

सौरज*–*पु.* शौर्य. [३. आंबा.

सौरभ–*पु.* १. सुगंध. २. केशर.

सौरि*–*पु.* १. कृष्ण. २. वसुदेव. **–रत्न**–*पु.* नीलम (रत्न).

सौरी– *स्त्री.* १. बाळंतिणीची खोली; सूतिकागृह. २. एका जातीची मासळी; सहरी.

सौल–ला[+]–*पु.* ओळंवा.

सौष्ठव–*पु.* १. उत्तमता; सौंदर्य. २. अवयवांचा रेखीवपणा; सौष्ठव.

सौसन–*पु.* [*फा.*] इराणांतील लालसर निळ्या, जांभळ्या रंगाचें एक प्रसिद्ध फूल. याची पाकळी जिभेसारखी असते.

सौसनी–*वि.* [*फा.*] लालसर निळा; जांभळा. [पुढें; समोर.

सौहँ*– *स्त्री.* शपथ. –*अव्य.*

सौहर[+]–*पु.* 'शौहर'.

सौहार्द–*पु.* मैत्री; मित्रता. **–निधि**–*पु.* राम.

सौहीं*–*अव्य.* समोर.

सौहृद–*पु.* १. मित्र; दोस्त. २. दोस्ती; मित्रता.

स्कंदन–*पु.* विरजणें; घट्ट होणें; घनीभवन; 'कोअ‍ॅग्युलेशन'.

स्कंध–*पु.* १. खांदा. २. खोड; फांदी. ३. सैन्याचा व्यूह. ४. सांठा; भांडार; 'स्टॉक'. **–पंजी**–*स्त्री.* मालाची नोंदवही; 'स्टॉक रजिस्टर'.

स्खलन–*पु.* पतन; खालीं पडणें.

स्टीमर–*पु.* [*इं.*] आगबोट; जहाज.

स्तंभ–*पु.* १. खांब. २. स्तंभ; 'कॉलम'. **–लेखक**–*पु.* स्तंभ-लेखक; 'कॉलमिस्ट'.

स्तंभन–*पु.* रोकणें; थांबविणें.

स्तंभित–*वि.* १. निःस्तब्ध; सुन्न. २. स्थिर, दृढ केलेला.

स्तन–*पु.* १. स्तन. २. सड. **–पान**–*पु.* स्तनांतील दूध पिणें. **–पायी**–*वि.* अंगावर दूध पिणारें (मूल).

स्तबक–*पु.* १. फुलांचा गुच्छ. २. समूह; राशि. ३. पुस्तकाचा अध्याय किंवा परिच्छेद. ४. स्तुति करणारा. [२. थक्क.

स्तब्ध–*वि.* १. स्थिर; अचल.

स्तर–*पु.* थर; दर्जा.

स्तरीभूत–*वि.* थरांमध्यें परिणत झालेला; 'स्ट्रॅटिफाइड'.

स्तवक–*वि.* स्तुति करणारा. –*पु.* १. स्तुतिपाठक. २. पा० 'स्तवक'.

स्तिमित–*वि.* १. स्थिर; निश्चल; थक्क. २. ओला. ३. प्रसन्न.

स्तीर्ण–*वि.* पसरलेला; विस्तीर्ण.

स्तुत–*वि.* प्रशंसित; स्तुति केलेला.

स्तुति– *स्त्री.* प्रशंसा; तारीफ.

स्तूप– *पु.* १. उंच ढीग. २. भगवान् बुद्धाचे अथवा अन्य महात्म्याचे अवशेष ज्याच्या खालीं पुरलेले आहेत असा भरीव उंच घुमट.

स्तेय–*पु.* चोरी.

स्तोक–*पु.* १. थेंब. २. चातक. –*वि.* लहान; अल्प.

स्तोत्र–*पु.* देवाची स्तुति; प्रशंसा.

स्त्री– *स्त्री.* १. स्त्री. २. बायको. **–चरित्र**–*पु.* बायकांचें चरित्र, कार्य. **–तंत्र; – राज्य**– *पु.* स्त्रीराज्य; 'आयनॅरकीं'. **–धन**–*पु.* ज्या धनावर स्त्रीचा पूर्ण ताबा असतो तें. **–व्रत**– *पु.* एकपत्नीव्रत.

स्थकित*–*वि.* थकलेला. [मेंट'.

स्थगन–*पु.* तहकुबी; 'अ‍ॅडजर्न-

स्थगित–*वि.* तहकूब.

स्थल–*पु.* कोरडी जमीन; स्थान. **–चर**––*वि.* जमिनीवर राहाणारा (प्राणी). **–मार्ग**–*पु.* खुष्कीचा मार्ग.

स्थली– *स्त्री.* कोरडी जमीन; स्थळ; जागा.

स्थविर–*पु.* १. वृद्ध किंवा म्हातारा मनुष्य. २. ब्रह्मदेव ३. वृद्ध भिक्षु.

स्थान–*पु.* १. जमीन. २. स्थळ; ठिकाण. ३. पद; हुद्दा. ४. मंदिर. ५. संधि; अवसर. ६. स्थिति. ७. घर. **–ग्राही पदाधिकारी**– *पु.* बदल्या अधिकारी; 'रिलीव्हिंग ऑफिसर'. **–बद्ध करना**–*क्रि. स.* स्थानबद्ध करणें; 'टु इंटर्न'. **–वंचित**–*वि.* पा० 'अनासीन'. **–सीमन**–*पु.* विखुरलेल्या गोष्टी एकत्र करणें; सीमित करणें; 'लोकॅलिझेशन'. ['ट्रान्स्फर'.

स्थानांतरण– *पु.* बदली;

स्थानांतरित–*पु.* बदली झालेला; 'ट्रान्स्फर्ड'.

स्थानापन्न–*वि.* दुसऱ्याच्या जागेवर तात्पुरता नेमला गेलेला; बदल्या; ऐवजीं काम करणारा; 'सब्स्टिटयूट'.

स्थानाबद्धकारी अधिनियम–*पु.* कांहीं लोकांना विशिष्ट सीमेंत राहावयास लावणारा कायदा; 'पेंगिंग अ‍ॅक्ट'. ['इंटर्नमेंट'.

स्थानासेध– *पु.* स्थानबद्धता;

स्थानीय–*वि.* स्थानिक; त्या ठिकाणचा; 'लोकल'. **–करण**–*पु.* पा० 'स्थानसीमन'. **–स्वशासन**–*पु.* स्थानिक स्वराज्य; 'लोकल सेल्फ गव्हर्नमेंट'.

स्थापक–*वि.* स्थापन करणारा.

स्थापत्य– *पु.* गवंडी काम; भवन-निर्माण; घर-बांधणी; वास्तु-विद्या.

स्थापना– *स्त्री.* १. स्थापन करणें; ठेवणें २. प्रतिपादन; विधान; सिद्धांत; मुद्दा.

स्थायित्व–*पु.* स्थिरता; दृढता.

स्थायी–*वि.* कायमचा; स्थिर,

टिकून राहाणारा. **–करण–** पु. कायम, पक्कें करणें; ‘ कन्फर्मेशन’. **–समिति–** स्त्री. स्थायी समिति; ‘ स्टँडिंग कमिटी ’.

स्थाली– स्त्री. १. स्वयंपाकाचें मातीचें भांडें; हंडी; कढई. २. थाळी. **मु०–पुलाक-न्याय–** एका गोष्टीवरून तिच्याशीं संबंध असलेल्या इतर गोष्टी ओळखणें.

स्थावर–वि. अचल; स्थिर; न हलणारें.

स्थित–वि. १. अवलंबित. २. बसलेला. ३. विद्यमान; उपस्थित. ४. दृढनिश्चयी. **–धी–** वि. स्थिरबुद्धि; धीराचा. **–प्रज्ञ–**वि. संयमी, आत्मसंतुष्ट, धीराचा, स्थिरबुद्धि व निष्काम.

स्थिति– स्त्री. दशा; अवस्था; परिस्थिति. **–पालक–** वि. चालू स्थिति तशीच ठेवणारा; बदल नको असलेला. **–स्थापकत्व–** पु. लवचीकपणा; स्थितिस्थापकत्व; ‘ इलॅस्टिसिटी ’. [२. दृढ.

स्थिर–वि. १. अचल; निश्चल.

स्थूल–वि. १. लठ्ठ; जाड; मोठा. २. अंदाजी; कच्चा; ‘ रफ ’.

स्थैतिकी– स्त्री. स्थितिशास्त्र; ‘ स्टॅटिक्स ’.

स्नातक– पु. पदवी घेतलेला; पदवीधर; ‘ ग्रॅज्युएट. ’

स्नातकोत्तर अध्ययन–पु. पदव्युत्तर अभ्यास; ‘ पोस्ट ग्रॅज्युएट स्टडी ’.

स्नान– पु. आंघोळ.

स्नानागार– पु. स्नानगृह; न्हाणी; ‘ बाथरूम ’.

स्नायविक–वि. नाडी अथवा स्नायु यांसंबंधीं.

स्नायु– पु. १. स्नायु. २. नाडी. **–मंडल; –संस्थान–**पु. मज्जातंतूंची अंतर्गत व्यवस्था; ‘ नर्व्हस सिस्टिम ’.

स्निग्ध– वि. १. ज्यांत तेल किंवा स्नेह आहे असा; तुळतुळीत. २. प्रेमळ; स्नेहयुक्त.

स्नुषा– स्त्री. सून.

स्नेह–पु. १. प्रेम. २. मैत्री. ३. चिकट पदार्थ; तेल. ४. आर्द्रता. **–पात्र; –भाजन–**वि. प्रेम करण्यास योग्य; ज्याच्यावर प्रेम आहे असा. **–मापी यंत्र–**पु. स्निग्धतामापक यंत्र; ‘ बुटाईरोमीटर ’ **–सम्मेलन–**पु. स्नेहसम्मेलन; ‘ सोशल गॅदरिंग ’.

स्नेहक–वि. प्रेम, स्नेह करणारा. –पु. यंत्राचें तेल; ‘ लुब्रिकंट ’,

स्नेहन–पु. १. तेल लावणें. २. वंगण घालणें; ‘ लुब्रिकेशन. ’

स्पंज–पु. [इं.] पाणी शोषून घेणारा एक स्थितिस्थापक पदार्थ; ‘ स्पंज. ’ [स्फुरणें.

स्पंदन – पु. कंपन; हलणें;

स्पर्द्धा–र्धा– स्त्री. १. स्पर्धा; चढाओढ. २. द्वेष; संघर्ष. ३. बरोबरी. ४. अभिलाषा.

स्पर्श–पु. १. शिवणें; स्पर्श करणें. २. संपर्क; ‘ कॉंटॅक्ट. ’ **–जन्य–**वि. सांसर्गिक (रोग-वगैरे). **–ज विष–**पु. स्पर्शानें बाधणारें विष; ‘ कॉंटॅक्ट पॉयझन ’. **–रेखा–** स्त्री. स्पर्शज्या; ‘ टॅन्जंट ’.

स्पर्शास्पर्श–पु. शिवाशीव.

स्पष्ट–वि. साफ; व्यक्त; प्रत्यक्ष. **–तया–**अव्य. स्पष्टपणें; उघड.

स्पृहा– स्त्री. अभिलाषा.

स्प्रिट– स्त्री. [इं.] १. ‘ स्पिरिट ’. २. भाव; उत्साह.

स्फटन – पु. स्फटिकीकरण; ‘ क्रिस्टलायझेशन ’.

स्फटिक – वि. स्फटिकाचा; बिलोरी; ‘ क्रिस्टलाइन ’. –पु. १. स्फटिक. २. तुरटी.

स्फीत–वि. १. फुगलेला. २. लठ्ठ; मातलेला.

स्फुट–वि. १. दृश्य; व्यक्त झालेलें. २. स्पष्ट. ३. विकसित. ४. किरकोळ.

स्फुटित–वि. १. विकसित; उमललेला. २. स्पष्ट केलेला. ३. हंसतमुख. [व्यक्त होणें. ३. भडकणें.

स्फुरना*–क्रि. अ. १. हलणें. २.

स्फोट–पु. १. बाहेर येणें; फुटणें. २. स्फोट. ३. फोड.

स्फोटक–पु. फोड; पुटकुळी. –वि. स्फोट होणारा.

स्मर–पु. १. मदन; कामदेव. २. स्मृति; आठवण. –वि. स्मरण करणारा; आठवण ठेवणारा.

स्मरण–पु. आठवण; स्मृति. **–पत्र; –पत्रक–**पु. आठवणीदाखल लिहिलेलें पत्र; ‘ रिमाइंडर. ’

स्मरना*– क्रि. स. स्मरण करणें.

स्मर्ण*–पु. स्मरण; आठवण.

स्मसान+–पु. स्मशान.

स्मार–पु. पा० ‘ ज्ञापन. ’

स्मारक–पु. स्मारक. **–ग्रंथ–**पु. स्मृतिग्रंथ; ‘ कॉमेमोरेशन व्हॉल्यूम ’.

स्मित–पु. मृदु हास्य.

स्मृति– स्त्री. १. आठवण; स्मरण. २. धर्मशास्त्र. **–उपायन–** पु. स्मृतिग्रंथ; ‘ सूवेनीर ’. **–शेष–** पु. १. मृत; ज्याची केवळ आठवण उरली आहे असा. २. पवित्र अवशेष; ‘ रेलिक ’. **–सम्मत–**वि. धर्मशास्त्रविहित.

स्यात्–अव्य. कदाचित्.

स्याद्वाद–पु. जैनांचा संशयवाद; अनेकांतवाद.

स्यान*–वि. शहाणा; चलाख. **–पत–न–**पु. शहाणपणा; चलाखी.

स्याना–*वि.* १. शहाणा; चतुर. २. धूर्त; चलाख. ३. प्रौढ; वयांत आलेला; वयस्क. –पु. १. वृद्ध पुरुष. २. वैद्य; हकीम. ३. मांत्रिक; पंचाक्षरी. –**पन**–पु. १. शहाणपणा; चलाखी; हुशारी. २. वयांत यणें; प्रौढपणा.

स्यापा–पु. [*फा.*] सुतकांत स्त्रियांनीं एकत्र जमून मृताबद्दल शोक करण्याची रीत. **मु०–छाना; –पड़ना**– १. आक्रोश, विलाप चालणें. २. वैराण, निर्मनुष्य होणें.

स्याम*–*वि.* श्याम; सांवळा; काळा. –*पु.* १. श्रीकृष्ण. २. सयाम (देश). –**ता***; –**ताई***– *स्त्री.* सांवळेपणा; काळेपणा.

स्यामक*–*पु.* वसुदेवाचा भाऊ; श्यामक. [सर.

स्यामल*–*वि.* सांवळा; काळ-

स्यामलिया*–*पु.* कृष्ण.

स्यामा*– *स्त्री.* पा० ' श्यामा '.

स्यार–*पु.* कोल्हा; शृगाल.–**जन**–*पु.* भेकड माणूस.

स्यारी– *स्त्री.* कोल्हीण.

स्यारी+– खरीपाचें पीक.

स्याल–*पु.* १. कोल्हा. २. मेहुणा; बायकोचा भाऊ; शालक.

स्यालू+–*पु.* १. शालू. २. ओढणी; चादर; शाल.

स्यावाज*–*पु.* सावज; शिकार.

स्याह– *वि.* [*फा.*] काळा.

स्याहा– *पु.* पा० ' सियाहा '.

स्याही– *स्त्री.* [*फा.*] १. शाई. २. काळेपण. ३. काजळ. ४. अंधार. ५. कलंक. ६. सालिंदर. –**दान**–*पु.* दौत. –**सोख**; –**सोख़्ता**–*पु.* टिपकागद. **मु०–जाना**–केंसांचें काळेंपण नष्ट होणें; तारुण्य नष्ट होणें. –**लगना**–काळोखी फासली जाणें; बदनामी होणें.

स्यों; **स्यो***– *अव्य.* १. सह; सहित. २. जवळ; समीप.

स्रक्; **स्रग***– *स्त्री.* फुलांची माळ (विशेषतः डोक्यावर बांधण्याची). [करणें; रचणें.

स्रजना*– *क्रि. स.* निर्माण

स्रम*–*पु.* श्रम; मेहनत; खटपट.

स्रमित*– *वि.* श्रमित; थकलेला.

स्रवण–न*– *पु.* १. प्रवाह. २. गर्भपात. ३. मूत्र. ४. घाम. ५.* कान.

स्रवना*– *क्रि. स.* १. ठिबकणें. २. वाहणें; पाझरणें. –*क्रि. स.* १. वाहविणें. २. ओतणें. [२. ब्रह्मा.

स्रष्टा– *वि. पु.* १. निर्माता;

स्राध*– *पु.* श्राद्ध.

स्राप*– *पु.* शाप.

स्रिजन*– *पु.* रचना; सृष्टि.

स्रिय*– *स्त्री.* श्री; मंगल; कल्याण.

स्रुति– *स्त्री.* १. प्रवाह. २. फवारा; चिळकांडी; फवाऱ्याची तोटी; ' जेट '. ३.* श्रुति; वेद.

स्रोत– *पु.* १. जलप्रवाह; पाण्याची धार. २. उगम. ३. वंशपरंपरा. [कान.

स्रोन*; **स्रौन***– *पु.* श्रवण;

स्लेट– *स्त्री.* [*इं.*] दगडी पाटी (लिहिण्याची).

स्वक्षालन शौचालय–*पु.* भंग्याची जरुरी नसलेला, पाणी टाकतांच स्वच्छ होणारा संडास; ' फ्लश लॅट्रिन '.

स्वगत– *वि.* स्वतःशीं बोललेलें. –**कथन**–*पु.* नाटकांतील स्वगत.

स्वगृहस्मारी– *वि.* गृहविरहदुःखी; ' होमसिक '.

स्वचलित तोप– *स्त्री.* स्वयंचलित तोफ; ' ऑटोमॅटिक गन '.

स्वच्छंद–*वि.* स्वतंत्र; निरंकुश.

स्वकीय– *वि.* आपला. –*पु.* मित्र.

स्वच्छ– *वि.* १. साफ; स्वच्छ; निर्मळ. २. शुद्ध.

स्वच्छता– *स्त्री.* स्वच्छता; सफाई. –**वर्द्धक**– *वि.* स्वच्छता ठेवणारा, वाढविणारा; ' सॅनिटरी '.

स्वजन– *पु.* १. आपल्या कुटुंबांतील लोक. २. नातलग. –**पक्षपात** –*पु.* नातलगांच्या बाबतींतील वशिलेबाजी; ' नीपॉटिझम् '.

स्वतंत्र– *वि.* स्वतंत्र; मुक्त. –**पत्रकार**– *पु.* नोकरी न करितां वृत्तपत्रांत लिखाण लिहून उपजीविका चालविणारा पत्रकार; ' फ्रीलान्स जर्नॅलिस्ट '.

स्वतंत्रता– *स्त्री.* स्वातंत्र्य.

स्वतः– *अव्य.* आपण होऊन; स्वतः. –**चलित**– स्वयंचलित; ' ऑटोमॅटिक '. –**प्रमाण**; –**सिद्ध**– *वि.* स्वयंसिद्ध.

स्वत्व–*पु.* १. हक्क; स्वामित्व; अधिकार. २. निजत्व; आपलेपणा. –**संलेख**– *पु.* स्वामित्व–लेख; ' टायटलडीड. ' –**स्व**– *पु.* स्वामित्व-धन; ' रॉयल्टी '. –**हस्तांतरण**– *पु.* मालकी हक्क दुसऱ्याला देणें; ' एलिएनेट '.

स्वदेश–*पु.* आपला देश; जन्मभूमि. –**निस्सारण**– *पु.* हद्दपारी; ' एक्सपॅट्रिएशन '. –**प्रतिप्रेषण**– *पु.* स्वदेशीं परत धाडणें; ' रीपॅट्रिएशन '. [ध्वनि.

स्वन– *पु.* शब्द; आवाज;

स्वनामधन्य– *वि.* आपलें नांव धन्य करणारा; सुप्रसिद्ध.

स्वपच*– *पु.* श्वपच; चांडाळ.

स्वपन–ना*– *पु.* स्वप्न.

स्वप्न– *पु.* १. झोंप; निद्रा. २. स्वप्न. –**दोष**– *पु.* स्वप्नावस्था.

स्वप्नावस्था– *स्त्री.* स्वप्नाची स्थिति (जीवनाला उद्देशून हा शब्द वापरला जातो).

स्वबरन*– *पु.* सुवर्ण; सोनें.

स्वभाउ*– *पु.* स्वभाव.

स्वभावतः–*अव्य.* १. स्वभावानें. २. आपोआप; सहज; ओघानें.

स्व–मत(पक्ष)त्यागी – *वि.* आपलीं मतें किंवा पक्ष सोडणारा; 'रेनीगेड'.

स्वयं; स्वयम्–*अव्य.* १. आपण स्वतः २. स्वतः; खुद्द. **–तथ्य**–*पु.* प्रत्यक्षसिद्ध तत्त्व; 'ॲक्सिअम'. **–सिद्ध**–*वि.* स्वतःसिद्ध; स्वयंसिद्ध. **–सिद्धि**–*स्त्री.* स्वयंसिद्ध गोष्ट; 'ॲक्सिअम'.**–सेवक**–*पु.* स्वयंसेवक 'व्हॉलंटियर'.

स्वर– *पु.* १. आवाज; ध्वनि. २. शब्द. ३. स्वर (व्या०).**–ग्राम** –*पु.* संगीतांतील सात स्वरांचा क्रम; स्वरसप्तक. **–पात**– *पु.* स्वराघात; उच्चारणपद्धति; **–लिपि**– *स्त्री.* स्वरलेखन; संकेत-लिपि; 'ॲक्सेंट'. 'नोटेशन'.

स्वरग*–*पु.* स्वर्ग.

स्वराज-ज्य – *पु.* स्वराज्य; आपले राज्य; स्वातंत्र्य.

स्वराजी – *वि.* स्वातंत्र्याच्या आंदोलनांत भाग घेणारा; सत्याग्रही.

स्वरानुपात – *पु.* दोन स्वरां मधला काळ (संगीत). 'इंटव्हेल (म्यूझिक)'. [मिनिस्टर'.

स्वराष्ट्रमंत्री–*पु.* गृहमंत्री; 'होम-

स्वर्ग–*पु.* स्वर्ग.**–की धार** –*स्त्री.* आकाशगंगा **– वधू; –वधूटी** – *स्त्री.* अप्सरा. **– वास** – *पु.* १. स्वर्गांत राहाणें. २. मृत्यु; निधन; मरणें. (**मु०–होना**–मरण पावणें; निधन होणें). **मु० – सिधारना** – कैलासवासी होणें; मरण पावणें.

स्वर्गवासी; स्वर्गस्थ-*वि.* कैलासवासी; मरहूम; मेलेला.

स्वर्गीय – *वि.* १. स्वर्गांतील; अलौकिक. २. कैलासवासी; मृत.

स्वर्ण–*पु.* सोनें.**–कमल**–*पु.* लाल कमळ.**–कार**–*पु.* सोनार.**–जयंती**–*स्त्री.* पन्नास वर्षें पूर्ण झाल्यानंतर केला जाणारा उत्सव; सुवर्ण जयंती; 'गोल्डन ज्युबिली'.

स्वर्णिम–*वि.* सोन्याचा; सोनेरी.

स्वर्धुनी–*स्त्री.* गंगा नदी.

स्वल्प–*वि.* अत्यंत थोडा.

स्वशु(सु)र–*पु.* सासरा.

स्व सचिव – *पु.* खासगी चिटणीस; 'प्रायव्हेट सेक्रेटरी'.

स्वसा– *स्त्री.* बहीण.

स्वस्ति – *अव्य.* कल्याण किंवा मंगल होवो.– *स्त्री.* कल्याण; मंगल. **–वचन**–*पु.* 'स्वस्ति' असें म्हणणें; शुभवचन.

स्वस्थ–*वि.* १. निरोगी; धडधाकट. २. शांत; सावध.

स्वाँग–*पु.* १. सोंग; वेष. २. हुबेहूब अनुकरण; नक्कल. **मु०– बनाना; – भरना; – लाना** – सोंग घेणें; नक्कल करणें. [वेष बदलणें.

स्वाँगना*–*क्रि. स.* सोंग घेणें;

स्वाँगी–*पु.* १.बहुरूपी (मनुष्य); नकलाकार. २. ढोंगी माणूस.

स्वांगीकरण – *पु.* आत्मसात् करणें; 'ॲसीमिलेशन'.

स्वांतःसुखाय – *अव्य.* स्वतःच्या आनंदासाठीं; स्वतःसाठीं.

स्वांत–*पु.* १. मन; अंतःकरण. २. आपला मृत्यु. ३. आपलें राज्य.

स्वाँस*–*पु. स्त्री.* पा० 'साँस'.

स्वाँसा*– *पु.* पा० 'साँस'.

स्वाक्षर–*पु.* स्वाक्षरी; सही; 'ऑटोग्राफ'.

स्वाक्षरी– *स्त्री.* हस्ताक्षर; सही.

स्वागत – *पु.* आदरसत्कार; स्वागत.**–कारिणी सभा; –समिति**–*स्त्री.* स्वागत समिति; 'रिसेप्शन कमिटी'. **– पतिका** – *स्त्री.* पा० 'आगतभर्तृका' – **भाषण** – *पु.* स्वागताध्यक्षाचें भाषण.

स्वागतिका–*स्त्री.* हवाई सुंदरी; 'एयर होस्टेस'.

स्वातंत्र्य–*पु.* स्वातंत्र्य.**–युद्ध; –संग्राम**–*पु.* स्वातंत्र्य युद्ध; 'वॉर ऑफ इंडिपेंडन्स'.

स्वात*–*स्त्री.* स्वाति नक्षत्र.

स्वाद–*पु.* १. स्वाद; लज्जत. २.* इच्छा; अभिलाषा. **मु०– चखाना**–पा० 'मजा चखाना'.

स्वादक–*पु.* पदार्थ तयार झाल्याबरोबर चाखून पाहाणारा.

स्वादिष्ट–*वि.* रुचकर; चविष्ट.

स्वादी – *वि.* १. चाखणारा; चव घेणारा. २. रसिक.

स्वादु–*पु.* १. मधुरता. २. गूळ. ३. दूध.–*वि.* १. मधुर; गोड. २. स्वादिष्ट; चवदार. ३. सुंदर.

स्वाधीन–*वि.* १. स्वतंत्र; मुक्त २. स्वछंदी.–*पु.* समर्पण; हवालीं करणें. **– पतिका; – भर्तृका** – *स्त्री.* पतीला आपल्या ताब्यांत ठेवणारी नायिका. **मु०– करना** – १. सोंपविणें; हवालीं करणें. २. स्वतंत्र करणें.

स्वाधीनता–*स्त्री.* स्वातंत्र्य.

स्वाध्याय–१. नियमपूर्वक अध्ययन; अभ्यास. २. वेदाध्ययन. ३. वेद.**–सदन**–*पु.* अभ्यासिका; 'स्टडी-रूम'.

स्वान*–*पु.* कुत्रा.

स्वाना*–*क्रि. स.* पा० 'सुलाना'.

स्वाप्त–*वि.* १. खूप; पुष्कळ. २. स्वतः मिळविलेला.**–समाचार**–

पु. खास बातमी; 'स्कूप न्यूज'.

स्वाभाविक – *वि*. नैसर्गिक; सहज.

स्वाभिमानी–*वि*. स्वाभिमान असणारा; अभिमानी.

स्वामि–* *पु*. स्वामी.

स्वामित–* *पु*. स्वामित्व.

स्वामिता–*स्त्री*.; स्वामित्व. –*पु*. स्वामित्व; प्रभुत्व; मालकी.

स्वामिनी –*स्त्री*. १. मालकीण. २. राधा. ['रॉयल्टी'.

स्वामिस्व–*पु*. स्वामित्वधन;

स्वामिहीनत्व–*पु*. बेवारशीपणा; 'बोना व्हेकन्शिया'.

स्वामी–*पु*. १. स्वामी; मालक. २. राजा. ३. पति. ४. ईश्वर.

स्वायत्त–*वि*. स्वायत्त; स्वतंत्र; 'ऑटोनॉमस'. **–शासन**–*पु*. राजकीय स्वातंत्र्य; शासनपद्धति; 'ऑटोनॉमी'.**–शासी**–*वि*.राजकीय दृष्टचा स्वतंत्र; स्वायत्त; 'ऑटोनॉमस'.

स्वारथ*–*पु*. स्वार्थ; मतलब. –*वि*. सार्थक; कृतार्थ.

स्वार्थता– *स्त्री*. स्वार्थीपणा.

स्वार्थपर–*वि*. स्वार्थी.

स्वाल*–*पु*. पा० 'सवाल'.

स्वावना*– *क्रि. स*. झोंपविणें.

स्वाश्रयी–*वि*. स्वावलंबी.

स्वास*–*पु*. श्वास.

स्वासा–*स्त्री*. *पु*. श्वास.

स्वास्थ्य–*पु*. आरोग्य; प्रकृति. **–निवास**–*पु*. आरोग्यधाम; 'सॅनिटोरियम'.**–प्रद**–*वि*. आरोग्यकारक. **–विज्ञान**–*पु*. आरोग्यशास्त्र; 'हायजिन'. **–सदन**–*पु*. पा० 'स्वास्थ्य –निवास'.

स्वाहा–*अव्य*. देवांना आहुति देतांना वापरण्याचा शब्द. **मु०– करना** – नष्ट करणें; जाळणें. **–होना**–नष्ट होणें; जळणें. [करणें.

स्वीकरण–*पु*. स्वीकार, ग्रहण

स्वीकार–*पु*. १. स्वीकार; अंगीकार; घेणें. २. कबुली. ३. मंजुरी. ४. पाणिग्रहण.

स्वीकारना*–*क्रि. स*. स्वीकार, ग्रहण करणें. ['अॅफरमेटिव्ह'.

स्वीकारात्मक–*वि*. होकारार्थी;

स्वीकृत–*वि*. मंजूर; स्वीकार केलेला.

स्वीकृति– *स्त्री*. मंजुरी; संमति.

स्वीय–*वि*. स्वतःचा; आपला. –*पु*. स्वजन.

स्वेच्छा–*स्त्री*. आपली इच्छा, मर्जी. **–कृत**; **–दत्त**; **–प्रेरित** –*वि*. ऐच्छिक; आवडीचा; 'व्हॉलंटरी'. **–सैनिकदल**–*पु*. स्वेच्छेनें भरती झालेल्यांचें सैन्य; 'व्हॉलंटरी कोर'.

स्वेच्छाचार–*पु*. स्वैराचार; निरंकुशता. [निरंकुश.

स्वेच्छाचारी–*वि*. स्वैराचारी;

स्वेछोपहार–*पु*. खुषीचा नजराणा; 'फ्री गिफ्ट'.

स्वेत+–*वि*. श्वेत; उज्ज्वल.

स्वेद–*पु*. १. घाम. २. वाफ. ३. उष्णता; उकाडा. **–ज**–*पु*. घामापासून उत्पन्न होणारे जीव (ढेकूण इ०).

स्वै*– सर्व. तोच.

स्वैरचारी–*वि*. १. स्वैराचारी; स्वच्छंदी. २ व्यभिचारी.

स्वैरता–*स्त्री*. स्वैराचार.

स्वैरिणी– *स्त्री*. व्यभिचारिणी स्त्री. [स्वतः मिळविलेलें.

स्वोपार्जित–*वि*. स्वकष्टार्जित;

ह

ह– नागरी वर्णमालेंतील तेहेतीसावा वर्ण.

हंक*–*स्त्री*. १. हांक २. आह्वान.

हँकड़(र)ना– *क्रि. अ*. १. कुर्‍यानें, खसा खरडून बोलणें. २. ललकारणें; डरकाळी फोडणें.

हँकड़ान– *स्त्री*.; **हँकडाव**–*पु*. जोरानें ओरडणें; आह्वान देणें. **मु० –देना**; **–भरना**; **मारना**– खूप जोरानें ओरडणें; आह्वान देणें; डरकाळी फोडणें.

हँकनी+– *स्त्री*. बैलांना हांकण्याची, खिळा मारलेली काठी.

हँकर(रा)ना*– *क्रि. स*. हांका मारणें; बोलावणें.

हँकराव–वा–*पु*. हांक; बोलावणें; निमंत्रण. [उठविणें.

हँकवा–*पु*. शिकारीसाठीं रान

हँकवाना*–*क्रि. स*. १. हांक मारविणें. २. हांकविणें. [हांकणारा.

हँकवैया–*पु*. हांक मारणारा;

हंका*– *स्त्री*. हांक; ललकार. **मु०–देना**; **–मारना**–हांक मारणें; साद घालणें.

हँकाई– *स्त्री*. हांकण्याची क्रिया किंवा मजुरी. [२. हांकणें.

हँकाना–*क्रि. स*. १. बोलाविणें.

हंकार– *स्त्री*. १. युद्धाचें आह्वान. २.* अहंकार.

हँकार– *स्त्री*. हांक; साद. **मु०– देना**– बोलावणें; हांक मारणें; साद घालणें. **–पड़ना**; **–लगना**– हांक ऐकू येणें; साद घातली जाणें.

हँकारना–*क्रि. स*. १. हांक मारणें; बोलाविणें. २. आह्वान

देणें. –*क्रि. अ.* हुंकारणें; 'हुं हुं' म्हणणें. [आमंत्रण; हांक.

हँकारा–*पु.* १. आह्वान. २.

हँकारी–*वि. पु.* बोलावणारा; दूत. [खोर.

हंकारी*–*वि.* अहंकारी; घमेंड-

हंगाम–*पु.* [*फा.*] १. वेळ; समय. २. हंगाम; ऋतु; मोसम.

हंगामा–*पु.* [*फा.*] १. गर्दी; जनसमूह. २. लढाई; मारामारी; दंगल; झगडा; दंगा. ३. आरडा-ओरड; कल्लोळ.

हंगामी–*वि.* [*फा.*] १. तात्पुरता; तात्कालिक; हंगामी. २. आवश्यक. ३. आणीबाणीचा.

हंटर–*पु.* [*इं.*] चाबूक; कोरडा. **मु० –जमाना; –लगाना**– हंटर मारणें.

हंडना–*क्रि. अ.* भटकणें; स्वैर हिंडणें. –*क्रि. स.* १. वस्त्र नेसणें, पांघरणें. २. वस्तू उलट सुलट करून धुंडाळणें.

हंडा–*पु.* तांब्याचा किंवा पितळेचा हंडा.

हँडिया– *स्त्री.* १. हंडी; लहान मातीचें भांडें. २. कांचेची हंडी. ३. एक प्रकारचें मद्य. **मु० –चढाना**– अन्न शिजविण्यासाठीं भांड्यांत पाणी इ० घालून अग्नीवर ठेवणें. **–दागना**– स्वयंपाक करणें. [अथवा खेद-सूचक शब्द.

हंत– *अव्य.* अरेरे! शोक

हंता–*पु.* वध करणारा; ठार मारणारा.

हँथोरी*– *स्त्री.* तळहात.

हँथौरा–री–पा० 'हथौड़ा–ड़ी'.

हँफनि*– *स्त्री.* धापा टाकणें; दम; धाप. **मु० –मिटाना**–थकवा दूर करणें.

हंस– *पु.* १. हंस पक्षी. २. जीवात्मा; परमात्मा. ३. परमेश्वर.

हंसक–*पु.* १. हंस पक्षी. २. पायांतील जोडवें.

हँसतामुखो*– *वि.* हंसतमुख; आनंदी; प्रसन्नवदन. [हास्य.

हँसन–नि*– *स्त्री.* हंसणें;

हँसना–*क्रि. अ.* १. हंसणें. २. प्रसन्न, आनंदित, खुष होणें. –*क्रि. स.* उपहास, थट्टा करणें. **मु० –खेलना**– आनंद, मजा करणें. **–हँसाना**– करमणूक करणें. **हँसकर बात उड़ाना** – एखादी गोष्ट क्षुद्र समजून ती हंसण्यावारी नेणें; टाळणें. **हँसते हँसते**– थट्टेंत; गमतीनें. **–०पेटमें बल पड़ना**–हंसून हंसून मुरकुंडी वळणें. **–०लोट जाना**– हंसतां हंसतां गडबडां लोळूं लागणें.

हँसनि*– *स्त्री.* हंसणें; हंसूं.

हंसनी–*स्त्री.* हंसाची मादी; हंसी.

हँसमुख–*वि.* १. हंसतमुख; हंसरा; आनंदी. २. विनोदी; थट्टेखोर.

हँसली– *स्त्री.* १. गळ्यांत घालावयाचा स्त्रियांचा अलंकार; हंसळी; सरी. २. जत्रु; हासळीचें हाड; गळ्याच्या खालील हाड.

हँसाई– *स्त्री.* १. हंसणें. २. हंसें; उपहास. ३. बदनामी.

हँसाना–*क्रि. स.* हंसविणें.

हँसाय*– *स्त्री.* हास्य; हंसूं.

हंसिनी– *स्त्री.* हंसी.

हँसिया– *स्त्री.* विळा; कोयता.

हँसी– *स्त्री.* १. हंसूं; हास्य. २. विनोद. ३. थट्टा; मस्करी; उपहास; हंसें. ४. सोपें काम. **–खुशी**– *स्त्री.* प्रसन्नता. –*अव्य.* आनंदानें; मजेनें. **–खेल–पु.** १. थट्टा-मस्करी. २. विनोद. ३. सोपें काम. **–ठठोली**– *स्त्री.*; **–ठठ्ठा**– *पु.* गंमत; थट्टा-मस्करी. **मु० –उड़ाना**– टर उडविणें; टिंगल करणें; उपहास करणें. **–छूटना**– जोरानें हंसूं येणें. **–ज़ब्त कर लेना**– हंसूं आवरणें. **–मानना**– सामान्य गोष्ट समजणें. **–में उड़ाना, टालना, लेना**– थट्टेवारी नेणें; विशेष मनावर न घेणें. **–में फूल झड़ना**– एखाद्याचें हास्य सुंदर वाटणें किंवा आवडणें. **–समझना**– १. सोपी गोष्ट समजणें. २. दुर्लक्ष करणें.

हँसुआ–वा+–*पु.* विळा; कोयता.

हँसुली+– *स्त्री.* पा० 'हँसली'.

हँसोड़–र– *वि.* गमत्या; विनोदी; थट्टेखोर.

हँसो (सौ) हाँ–*वि.* १. हास्ययुक्त. २. विनोदी; थट्टेखोर.

हइयत– *स्त्री.* [*अ.*] १. बनविलें जाणें; तयार केलें जाणें. २. आकृति; रूप. ३. रचना. ४. ज्योतिषशास्त्र.

हक़– पु. [*अ.*] १. सत्य; सत्पक्ष; न्याय. २. परमेश्वर. ३. हक्क; स्वत्व; अधिकार. ४. कर्तव्य. ५. परंपरागत मिळणारी रक्कम, देणगी किंवा बक्षीस. –*वि.* १. सत्य; खरें. २. योग्य; उचित; न्याय्य. **–गो**–*वि.* खरें बोलणारा. **–दार**–*वि.* हक्कदार; अधिकारी. **–नाहक़**– *अव्य.* १. हकनाक; अकारण; व्यर्थ. २. बळेंच; जबरदस्तीनें. **–परस्त**– *वि.* १. ईश्वरपूजक; आस्तिक. २. सत्यभक्त; न्यायशील. **–ब·जानिब**–*वि.* योग्य; न्याय्य. **–श(शु)फ़ा**– *पु.* जमीन किंवा घर विकतेवेळीं शेजारच्या जागेच्या मालकाचा खरेदी करण्याचा प्रथम हक्क. –(**क़े**) **तस्नीफ़**– *पु.* लेखकाचा आपल्या लेखावर किंवा पुस्तकावर असलेला

हक्क; 'कॉपी राइट'. **–शिनास** –वि. १. गुणग्राहक. २. न्यायशील. ३. आस्तिक. **मु० –अदा करना**– कर्तव्यपालन करणें. **– पर होना**– न्यायाचा पक्ष घेणें; न्याय्य अधिकाराचा आग्रह धरणें. **–में**– बाजूनें; साठीं; विषयीं.

हकबकाना–क्रि.अ. १. गोंधळून जाणें; बुचकळ्यांत पडणें. २. घाबरणें.

हकला–वि. तोतरा.

हकलाना– क्रि. अ. तोतरें बोलणें; बोलतांना अडखळणें.

हकलाहट–स्त्री. तोतरेपणा.

हकलाहा+– वि. तोतरा.

हक़ारत– [अ.] १. घृणा. २. बेइज्जती. ३. तिरस्कार.

हक़ीक़त– स्त्री. [अ.] १. वास्तविकता. २. तथ्य; सार. ३. वस्तुस्थिति; खरी गोष्ट.**–में**–अव्य. वास्तविक; वस्तुतः.**मु०–खुल जाना** –वस्तुस्थिति जाहीर होणें; खरी गोष्ट प्रकट होणें.

हक़ीक़तन्– अव्य. [अ.] वस्तुतः; खरोखरीं.

हक़ीक़ी– वि. [अ.] १. खरा; सच्चा. २. सख्खा.

हकीम– पु. [अ.] १. विद्वान्. २. तत्त्ववेत्ता. ३. हकीम; वैद्य.

हकीमी – स्त्री. [अ.] युनानी चिकित्सा; युनानी वैद्यकी; हकीमाकडून केली जाणारी चिकित्सा.

हक़ी(क्का)यत–स्त्री. [अ.] १. हक्क; अधिकार. २. मालमत्ता.

हक़ीर–वि. [अ.] १. तुच्छ; हीन; क्षुद्र. २. अत्यंत लहान; फार थोडा.

हक़ूक़– पु. [अ. 'हक़' चें अनेक०] अधिकार; हक्क.

हकूमत– स्त्री. पा० 'हुकूमत'.

हक़्क़ा–अव्य. [अ.] देवाची शपथ.

हक्काक– पु. [अ.] सोन्याचांदीवर नक्षीचें काम करणारा.

हक़्क़ानी–वि. [अ.] १. सत्याशीं संबंधित. २. ईश्वरविषयक; ईश्वराभिमुख.

हक्काबक्का– वि. १. गोंधळलेला; घाबरलेला. २. थक्क; आश्चर्यचकित.

हक़्क़ुत्तहसील– पु. [अ.] पाटील किंवा मालगुजार यांना सरकारला मालगुजारी देण्याबद्दल मिळणारा अधिकार.

हगनहटी+– स्त्री. १. गुदद्वार; गुदा. २. शौचकूप; हगंद(दा)री; सार्वजनिक शौचाची जागा. **मु०– मचाना**–वारंवार शौचाला जाणें.

हगना– क्रि. अ. १. हगणें; शौच करणें. २. धमकीला भिऊन देऊन टाकणें.–वि. हगरा; सारखा हगणारा. ['हगनहटी'.

हगने(नौ)टी– स्त्री. पा०

हगाना– क्रि. स. हगविणें; शौचास करविणें. **मु० हगा मारना** –खूप थकविणें; हैराण करणें. **हगा लेना**–बळजबरीनें वसूल करणें.

हगास– स्त्री. शौचास जाण्याची इच्छा होणें; परसाकडेस लागणें. **मु०– लगना**-शौचास लागणें.

हगोड़ा; हग्गन; हग्गू– वि. हगरा; वारंवार शौचाला जाणारा.

हचक– स्त्री. धक्का; हिसका; झटका. **मु०–खाना**–धक्का, हिसडा बसणें.

हचकना– क्रि. अ. गदगदां हलणें; हिंदळणें – क्रि. स. १. गदगदां हलविणें. २. जोरानें मारणें.

हचका– पु. पा० 'हचक'.

हचकाना– क्रि. स. गदगदां हलविणें.

हचकोला–पु. हिसका; धक्का; हिसडा. [कना'.

हचना*– क्रि. अ. पा० 'हिच-

हचर मचर– पु. १. हालणें; हिंदकळणें. २. आगापीछा करणें; कांकूं करणें. [डोलणें.

हचहचाना– क्रि. अ. हलणें;

हज– पु. [अ.] मुसलमानांची मक्का-मदीना-यात्रा; हज्ज.

हज़– पु. [अ.] १. सुदैव. २. आनंद; प्रसन्नता. ३. मजा. ४. स्वाद; रुचि. [लठ्ठपणा; आकार.

हजम– पु. [अ.] जाडी;

हज़म– पु. [अ.] पचनक्रिया; पाचन.–वि. १. पचलेलें. २. बळकावून घेतलेलें; लुबाडलेलें; **म०– कर जाना; –करना**–१. पचविणें. २. गिळंकृत करणें (धन, संपत्ति इ०). **–होना**– १. पचणें. २. गिळंकृत केलेलें उघडकीस न येणें.

हजर–पु. [अ.] दगड; फत्तर. –(रे) **असवद**– पु. मक्का येथील काब्याच्या भिंतींत असलेला काळा दगड. [बचाव; उपेक्षा. ३. पथ्य.

हज़र– पु. [अ.] १. भय. २.

हज़र– पु. [अ.] घरांत राहाणें; हजिरी; उपस्थिति.

हज़रत– पु. [अ.] १. निकटता; सामीप्य. २. बादशाह किंवा महात्मा यांची पदवी; राजेश्री; महाराज. ३. मुहम्मद पैगंबर.–वि. धूर्त; चलाख; दुष्ट; पाजी (उपरोधात्मक). [–अनेक० **हज़रात**]

हजाम– पु. पा० 'हज्जाम'.

हजामत – स्त्री. [अ.] १. हजामाचें काम. २. हजामत; केंस कापणें; क्षौर. ३. केंस कापण्याची मजुरी. ४. दुर्दशा. **मु०–बनना**–१. हजामत होणें. २. फसविलें जाणें; लुटलें जाणें.**–बनाना**– १. हजामत

करणें. २. फसविणें; लुटणें.

हज़ार–*वि.* [*फा.*] १. हजार; सहस्र. २. पुष्कळ. –*अव्य.* कितीहि; कितीतरी. **–चश्म**–*पु.* खेंकडा. **–पा**–*पु.* गोम (किडा). **–हा**– *वि.* हजारों; असंख्य.

हज़ारा–*पु.* [*फा.*] १. कारंजें; फवारा. २. झेंडूचें फूल; हजार पाकळ्यांचें फूल.

हज़ारी–*वि.* [*फा.*] हजाराशीं संबंधित. –*पु.* १. हजार सैनिकांचा सरदार. २. हजार सैनिकांची. तुकडी ३. वेश्यापुत्र. **– बज़ारी**– *वि.* हलक्या लोकांत वावरणारा; बाजारू. **–रोज़ा**–*पु.* 'रज्जब' महिन्याच्या सत्ताविसाव्या दिवशींचा उपवास. (स्त्रियांचा).

हज़ारों–*वि.* [*फा.*] हजारों; अनेक. **मु०–में**–१. अनेकांपैकीं; पुष्कळांमध्यें. २. उघडउघड.

हजूम–*पु.* [*अ.*] गर्दी; दाटी.

हजूर*–*पु.* पा० 'हुजूर'.

हजूरी+–*पु.* [*अ.* 'हुज़ूरी'] हुजऱ्या; सेवक.

हजो–*स्त्री.* [*अ.*] १. निंदा; उपहास. २. व्यंगोक्ति; काव्यांतून केलेली टिंगल; विडंबन-काव्य.

हज्ज–*पु.* [*अ.*] १. संकल्प करणें. २. मक्केची यात्रा. –**(ज्जे) अकबर**–*पु.* श्रेष्ठ हज्ज; शुक्रवारीं केलेली मक्केची यात्रा. [हजाम.

हज्जाम–*पु.* [*अ.*] न्हावी;

हज्जामी–*स्त्री.* [*अ.*] न्हाव्याचें काम.

हज़्म–*वि.* [*अ.*] १. पचलेला; पचविलेला. २. अयोग्य मार्गानें गिळंकृत केलेला.

हट–*पु.* पा० 'हठ'.

हटक;* हटकन+– *स्त्री.* १. अटकाव; अडथळा. २. गुरें हांकणें; हांकलणें. ३. गुरें वळण्याची काठी. **मु०– मानना**–मनाई केल्यानंतर एखादें काम न करणें.

हटकना*–*क्रि. स.* १. मनाई करणें; हटकणें; अडविणें. २. जनावरांना हटकविणें; वळविणें; हांकणें; हांकलणें. –*क्रि. अ.* १. पाय मागें घेणें. २. कांकूं करणें.

हटका+– *पु.* १. अडसर; अडणा; कडी. २. दाराचें टेकण.

हटकि*–*अव्य.* १. विनाकारण. २. अनिच्छेनें; नाइलाजानें.

हटतार*– *स्त्री.* १. हरताळ; संप. २. क्रम. ३. टक. –*पु.* माळेचा धागा.

हटताल–*पु.* हरताळ; संप.

हटना–*क्रि. अ.* १. सरकणें. २. दूर होणें; मागें होणें. ३. अंग चोरणें. ४. आपल्या वचनापासून च्युत होणें. –*क्रि. स.**– पा० 'हटकना'.

हटबया; हटवा–*पु.* बाजारांत दुकान लावून बसलेला; दुकानदार.

हटवाई*–*स्त्री.* १. बाजारांतील खरेदी-विक्रीचें काम; दुकानदारी. २. + हटविण्याची मजुरी.

हटवाना–*क्रि. स.* हटविणें; दूर करविणें; दूर सारणें; लोटविणें. [हटविणारा.

हटवार–*पु.* दुकानदार. –*वि.*

हटवैया–*वि.* हटविणारा; मागें सारणारा.

हटाना– *क्रि. स.* १. हटविणें; दूर करणें, सारणें, लोटणें. २. सरकविणें; हलविणें. ३. मागें सारणें; पळावयास लावणें. ४. नोकरीवरून काढून टाकणें.

हटिया–*स्त्री.* बाजार.

हटुवा+–*पु.* बाजारांतील व्यक्ति; दुकानदार.

हटुई–*स्त्री.* दुकानदारी.

हटैता+–*पु.* सौदा; सामान; माल. [ठेवण; बांधा.

हटौ(ड़ौ)ती+– *स्त्री.* शरिराची

हट्ट–*पु.* १. बाजार; हाट. २. दुकान. **चौहट्ट**–*पु.* बाजारांतील चौक. [कट्टा.

हट्टाकट्टा–*वि.* घष्टपुष्ट; घट्टा-

हठ–*पु.* १. हट्ट; आग्रह. २. दृढ प्रतिज्ञा; संकल्प. ३. जबरदस्ती. **–धर्म**–*पु.*; **–धर्मी**– *स्त्री.* दुराग्रह; हट्टीपणा; कट्टरपणा. **मु० –पकड़ना**– हट्ट धरणें. **–माँडना*; –में पड़ना; –रोपना**–हट्ट करणें, धरणें. **–रखना**–प्रतिज्ञा, संकल्प पूर्ण करणें.

हठना*–*क्रि. अ.* १. हेका, हट्ट करणें, धरणें; अडून बसणें. २. प्रतिज्ञा करणें.

हठात्–*अव्य.* १. हट्टानें. २. बळजबरीनें; जुलुमानें. ३. अकस्मात्; अचानक. ४. अवश्य.

हठी–*वि.* हेकेखोर; हट्टी.

हठीला–*वि.* १. हट्टी; आग्रही. २. धैर्यशाली. ३. दृढप्रतिज्ञ. ४. युद्धांत मागें न हटणारा.

हड़– *स्त्री.* १. हिरडा. २. डोरलें (दागिना).

हड़–'हाड'चें समासांतील रूप. **–कंप**-*पु.* खळबळ; कल्लोळ; गडबड. (**मु०–मचना**– खळबळ माजणें, उडणें.) **–गिल्ल; –गीला**– *पु.* बगळ्याच्या जातीचा एक पक्षी. **–जोड़**–*पु.* एक औषधी वेली (हाडें बसविणारी). **–फूटन**+– *स्त्री.* हाडांतील वेदना. **–फूटनी**+– *स्त्री.* वटवाघुळ.

हड़क–*स्त्री.* १. पिसाळलेलें कुत्रें चावलें असतां पाण्यासाठीं होणारी तळमळ. २. छंद; नाद.

हड़कना–*क्रि. अ.* तळमळणें;

व्याकुळ होणें.

हड़का–पु. तळमळ; व्याकुळता.

हड़काना–क्रि. स. १. एखा-द्याच्या मागें लावणें; दुसऱ्याकडून सतावणें. २. हाकलून लावणें. ३. सतावणें; त्रास देणें (एखादी वस्तु न देऊन).

हड़काया–वि. १. पिसाळलेला (कुत्रा). २. बावरलेला. ३. उताचळा.

हड़ताल– स्त्री. हरताळ; संप. **–तोड़क**–पु. संपफोडचा; 'ब्लॅक लेग'.

हड़ना– क्रि. स. वजन, तोल होणें; जोखलें जाणें.

हड़प– वि. १. गिळलेलें; खाल्लेलें. २. लुबाडलेलें.– पु. गिळणें; गिळंकृत करणें.

हड़पना– क्रि. स. १. गिळणें; खाणें. २. गिळंकृत करणें; लुबाडणें; लाटणें. [उतावीळ.

हड़बड़– स्त्री. घाई; जल्दी;

हड़बड़ाना– क्रि. अ. १. घाई करणें; उतावळें होणें; आतुर होणें. २. गडबडून जाणें. –क्रि. स. एखाद्याला घाई करणें.

हड़बड़िया– वि. उतावळा; चांदरट.

हड़बड़ी– स्त्री. घाई; गडबड; उतावीळ. **मु०–पड़ना**–घाई होणें; गोंधळणें. **(पेटमें)– पड़ना**[+]– गोंधळणें; घाबरणें.**–सवार होना**– एखादें काम घाईनें करण्याची उत्कंठा लागणें.

हड़हड़ाना– क्रि. स. १. घाई करणें. २. घाबरून सोडणें.

हड़हा– वि. १. हाडविषयक. २. शरीरांत नुसतीं हाडें उरलेला; हडकुळा. ३. हाडवैरी.

हड़ा–पु. १. एक प्रकारची बंदूक. २. शेतांतून पक्ष्यांना उडवून लावण्याचा शब्द.

हड़ावरि;हड़ावल– स्त्री. १. अस्थिपंजर; हाडांचा सांगाडा. २. हाडांची माळ.

हड़ीला– वि. पा० 'हड़हा'.

हड्डा– पु. १. मोठी गांधिलमाशी. २. मोठें हाड.

हड्डी– स्त्री. १. हाड. २. कुळ; वंश. **मु०–उखड़ना**–हाडांचा सांधा निखळणें.**–गढ़ना अथवा तोड़ना**– खूप मारणें; चोपणें.**–चूसना**– सर्वस्व हिरावून घेणें. **पुरानी हड्डी** –जुन्या माणसाचें सुदृढ शरीर. **हड्डियाँ निकल आना**– अत्यंत मरतुकडें, हडकुळें होणें.

हत– वि. १. मारला गेलेला. २. जखमी. ३. रहित; विहीन. ४. हताश.**–दैव**– वि. अभागी; दुर्दैवी. **–धी;– बुद्धि**– वि. हतबुद्ध; घाबरलेला. **–प्रभ**– वि. निष्प्रभ; कांतिहीन.**– भागा–गी***;**– भाग्य**– वि. दुर्दैवी; अभागी.

हतक– स्त्री. [अ.] अपमान; पाणउतारा; बेइज्जती.**–इज्जती**– स्त्री. विनयभंग; अप्रतिष्ठा; मानहानि; बेइज्जती.

हतना*– क्रि. स. १. वध करणें. २. मारणें; पिटणें. ३. पालन न करणें.

हतवाना*– क्रि. स. मारविणें; वध करविणें. [चा भूत०]होता.

हता*– क्रि. अ. ['होना'

हताना*– क्रि. स. पा० 'हतवाना'.

हताहत– वि. मृत व जखमी; घायाळ व मेलेले; 'कॅज्युअॅलिटीज'.

हते*– क्रि. अ. होते.

हतो*– क्रि. अ. पा० 'हता'.

हतोत्साह– वि. निरुत्साही.

हत्ता– अव्य. [अ.] १. जोंपर्यंत. २. जसें. ३. इतकें कीं. **–कि**– अव्य. इतकें कीं; इतकेंच काय पण.

हत्तुल इमकान– अव्य. [अ.] शक्य तितकें; शक्यतोंवर; यथासंभव; यथासाध्य. [यथाशक्ति.

हत्तुलमक्दूर– अव्य. [अ.]

हत्था– पु. १. मूठ; दांडा (हत्यार इ० चा); हात (खुर्ची इ० चा); २ हाताच्या पंजाचा ठसा. ३. केळचाचा घड. ४. शेतांतील पाटाचें पाणी उपसण्याचें एक अवजार.

हत्थी– स्त्री. मूठ; दस्ता.

हत्थे– अव्य. हातीं; मार्फत; हातांत. **मु०–चढ़ना**– तावडींत सांपडणें.**–लगना**–हातीं येणें.

हत्या– स्त्री. १. खून; वध. २. कटकट. ३. मरतुकडी व्यक्ति. **मु०– टलना**– कटकट दूर होणें. **–मोल लेना**– श्राद्ध विकत घेणें. **–सवार होना**– खून चढणें. **–सिर मढ़ना**– १. गुन्हेगार ठरविणें. २. कटकट गळचांत बांधणें.

हत्यारा– पु. हत्या करणारा किंवा खुनी माणूस. –वि. निर्दय; क्रूर.

हत्यारी– स्त्री. १. हत्या करणारी स्त्री; खुनी स्त्री. २. हत्येचें पाप.

हथ– 'हाथ'चें समासांतील रूप. **–उधार**–पु. वि. हात उसनी रक्कम देणें. **–कंडा**–पु. १. हातचलाखी; हस्तलाघव. २. हातखंडेपणा; हस्तकौशल्य. ३. गुप्त कारवाई. (**मु०– ०दिखाना**–हातचलाखी करणें). **–कड़ी**– स्त्री. बेडी (हातांतील); हातकडी. (**मु०– ०पड़ना**–हातकडचा पडणें;

कैदी होणें). –छुट–*वि*. मारकुटा; थोड्याशा कारणानें रागावून मारण्याची संवय असलेला. –फूल–*पु*. हाताच्या पंजावर घालावयाचा एक दागिना; चुटक्या. **–फेर–पु**. १. गोंजारणें; पाठीवरून हात फिरविणें. २. हातचलाखी; लुबाडणूक. ३. हातउसनें द्रव्य; थोड्या दिवसांसाठीं घेतलेलें कर्ज. ४. नजर चुकवून खोटे किंवा कमी पैसे देणें; फसविणें. **–लपकका–वका–** *वि*. उचल्या; पैशाचा व्यवहार करतांना नजर चुकवून फसविणारा.–**लेवा– पु**. १. पाणिग्रहण; विवाहांतील पाणिग्रहणाची रीत. २. दुसऱ्याचा हात हातांत घेणारा. **–बाँस–पु**. नाव चालविण्याचें सामान (सुकाणूं, वल्हें इ०).–**संकर**; **–साँकड़–र –ल–ला– पु**. पा० 'हथफूल'.

हथ– 'हाथी' चें समासांतील रूप.–**नाल–** *स्त्री*. हत्तीवरील तोफ. **–वाल–पु**. माहूत. **–सार–पु**. हत्तीशाळा; पीलखाना.

हथनी– *स्त्री*. हत्तीण.

हथबाँसना*–*क्रि. स*. १. हातीं ताब्यांत घेणें. २. प्रथम वापरणें.

हथा+– *पु*. हाताच्या पंजाचा ठसा.

हथाहथी*– *अव्य*. हातोंहात; ताबडतोब.

हथिनी– *स्त्री*. हत्तीण.

हथिया–पु. हस्तनक्षत्र.

हथियाना–*क्रि. स*. १. हस्तगत करणें; ताब्यांत घेणें. २. हातीं धरणें. ३. लुबाडणें; ठकविणें.

हथियार–पु. हत्यार; शस्त्र. **–बंद–पु**. सशस्त्र; हत्यारबंद. **मु०–उठाना–** शस्त्र उचलणें; युद्धास तयार होणें. **–डालना–** शस्त्र खालीं ठेवणें; पराभव कबूल करून युद्ध बंद करणें.–**बाँधना**; **–लगाना–** शस्त्रसज्ज होणें.

हथुई रोटी– *स्त्री*. पोळपाटलाटणें न वापरतां हातावर केलेली भाकरी किंवा चपाती.

हथेरा–पु. शेतांतील पाटांतून पाणी उपसण्याचें भांडें.

हथेरी*– *स्त्री*. पा० 'हथेली'.

हथेली– *स्त्री*. १. हाताचा तळवा. तळहात. २. चरख्याची मूठ. **मु०–का फफोला–** अत्यंत नाजुक वस्तु; तळहातावरील फोड. **–खुजलाना–** द्रव्यप्राप्तीची पूर्वसूचना, शकुन मिळणें. **–पर जान लेना–** तळहातावर शिर घेणें; मृत्यूस तयार राहाणें. **–पर जान होना–** मरण जवळ येणें. **–पर बाल जमना–** साहस, सामर्थ्य येणे. **–पर सरसों जमाना–** एखादें अवघड काम चटकन् करणें. **–पीटना**; **–बजाना–** टाळी वाजविणें.

हथेव–पु. हतोडा.

हथोड़ा–पु. पा० 'हथौड़ा'.

हथोरी– *स्त्री*. पा० 'हथेली'.

हथौटी– *स्त्री*. १. हातोटी; हस्तकौशल्य. २. काम हातीं घेणें. **मु०–जमना**; **–मँजना**; **–सधना–** हातोटी साधणें; कौशल्य जमणें.

हथौड़ा–पु. हातोडा.

हथौड़ी– *स्त्री*. हातोडी.

हथौनी+**–पु**. वधुवरांच्या हातांत मिठाई देण्याचा विधि.

हथ्थि*–*पु*. हत्ती.

हथ्याना*– *क्रि. स*. पा० 'हथियाना'.

हथ्यार*–*पु*. पा० 'हत्यार'.

हद– *स्त्री*. [*अ*.] हद्द; सीमा; मर्यादा. **–बंदी–** *स्त्री*. हद्द घालणें, ठरविणें. **–दर्जेका–** पराकाष्ठेचा. **मु०– कर देना–** हद्द करणें; औचित्याची मर्यादा ओलांडणें. **–बाँधना–** मर्यादा ठरविणें. **–से ज्यादा–** वाजवीपेक्षां जास्त; अत्यंत.

हदका*–*पु*. धक्का; हिसका.

हदसना– *क्रि. न*. घाबरणें; हबकणें. [नजराणा.

हदि(दी)या–पु. [*अ*.] भेट;

हदीस– *स्त्री*. [*अ*.] १. नवीन गोष्ट. २. हजरत मुहंमद पैगंबरांच्या वचनांचा संग्रह; मुसलमानी स्मृतिग्रंथ ३. वर्णन; इतिहास.

हदूद– *स्त्री*. [*अ*. 'हद'चें अनेक०] हद्दी; सीमा.

हद्द– *स्त्री*. [*अ*.] पा० 'हद'. **–(द्दे) समाअत–** *स्त्री*. एखाद्या खटल्याच्या सुनावणीचा अवधि. **हद्दोहिसाब न होना–** बेहद्द, अत्यधिक होणें.

हनना*–*क्रि. स*. १. ठार मारणें; वध करणें. २. मारणें; पिटणें. ३. नगारा इ० वाजविणें.

हनफ़ी–*वि. पु*. [*अ*.] इमाम अबू हनीफा यांचे अनुयायी असलेल्या सुन्नी मुसलमानांचा एक पंथ; या पंथाचा मुसलमान.

हनवाना*–*क्रि. स*. १. वध करविणें. २. मारविणें. ३.+ न्हाऊं घालणें.

हनाना*–*क्रि. अ*. पा० 'नहाना'.

हनितवंत*– *पु*. हनुमान.

हनु– *स्त्री*. १. हनुवटी. २. जबडा. ३. व्यभिचारिणी स्त्री; वेश्या. [हनुमान; मारुती.

हनुमं(म)त; **हनुव***–*पु*.

हनू; **हनूमान–** पा० 'हनु'; 'हनुमंत'. [अजून.

हनोज़–अव्य*. [*फा*.] अद्यापि;

हप–पु. दोन्ही ओठ जोरानें एकदम दाबल्यानें उत्पन्न होणारा

आवाज; गडप. **मु०– कर जाना–** **१.** वका वका खाणें. २. गिळंकृत करणें.

हपटाना+–*क्रि.अ.*धांपा टाकणें.

हप्पा–*पु.* १. मऊ अन्न; घांस. २. लांच. **मु०– देना–** लांच देणें.

हप्पू– *पु.* अफू. –*वि.* खादाड.

हफ़्त–*वि.* [*फा.*] सात. **–इमाम–** इस्लाम धर्मातील सात इमाम. [सप्ताह.

हफ़्ता–*पु.* [*फा.*] आठवडा;

हब–*पु.* [*अ.*] दाणा; बीज.

हबकना+–*क्रि. स.* १. बोकणा भरणें. २. लचका तोडणें.

हबड़ा–*वि.* १. कुरूप; दांतांचे फाळ पुढें आलेला. २. अजागळ.

हबन्नक–*वि.* [*अ.*] मूर्ख; मूढ.

हबरद(ह)बर– *अव्य.* घाईनें; उतावीळपणें. [‘हड़बड़ाना’.

हबराना+–*क्रि. अ.* पा०

हबश–शा–*पु.* [*अ.*] हबशी लोकांचा देश; ‘ॲबिसीनिया’.

हबश(शि)न– *स्त्री.* [*अ.*] १. हबशीण; काळीकुट्ट बाई. २. जनानखान्यावरील स्त्री–पहारेकरी.

हबशी–*पु.* [*अ.*] १. ॲबिसीनियाचा रहिवासी. २. अत्यंत काळा असा निग्रो जातीचा मनुष्य. –*वि.* काळाकुट्ट.

हबाब–*पु.* [*अ.*] १. बुडबुडा. २. घरामध्यें शोभेसाठीं लावण्यांत येणारा शिशाचा गोळा.**–सा–***वि.* १. बारीक. २. क्षणभंगूर.

हबाबी–*वि.* [*अ.*] बुडबुड्या-सारखा. **–आईना–***पु.* अपारदर्शक कांच.

हबीब–*वि. पु.* [*अ.*] १. मित्र; दोस्त. २. प्रिय; आवडता.

हबूब–*पु.* [*अ.*] **१.** पाण्याचा बुडबुडा. २. थाप; बनावट गोष्ट. ३. गोळ्या; वटिका.

हबेली+– *स्त्री.* हवेली; महाल.

हब्ब–*पु.* [*अ.*] १. गोळी; वटिका. २. दाणा; बीज.

हब्बा–*पु.* [*अ.*] १. धान्याचा कण. २. अत्यंत अल्प वस्तु. ३. पैसा; कवडी. **–भर–***वि.* गुंजभर; फार थोडा. **–हब्बा–***पु.* पैन् पै.

हब्बाडब्बा–*पु.* लहान मुलांना सारखा श्वास लागतो तो रोग; पोटाचा डबा होणें.

हब्स–*पु.* [*अ.*] १. कैद. २. तुरुंग. ३. उकाडा; काहिली; श्वास गुदमरणें.

हम–*सर्व.* आम्ही; आपण.– *पु.** अहंकार. **–ता*–** *स्त्री.* घमेंड.

हम–*अव्य.* [*फा.*] १. सुद्धां. २. सह; बरोबर. ३. समान; तुल्य. **– असर–***वि.* समकालीन.– **उम्र–***वि.* समवयस्क.**–कलाम–***वि.* बरोबर गप्पागोष्टी करणारा.– **क़िस्मत–***वि.* ज्यांचें नशीब सारखें आहे असे. **–क़ौम** *–वि.* एकाच राष्ट्राचे; एका जातीचे; सजातीय. **–ख़याल–***वि.* समान विचाराचे. **–ज़बान–***वि.* ज्यांची भाषा एक आहे असे. **–जिन्स–***वि.* सजातीय. **–जोली–***वि. पु.* १. मित्र; साथी; सहकारी. २. समवयस्क. **–दम–***वि.* जिवांत जीव असेपर्यंत साथ देणारा; मित्र; साथी. **–दर्द–***वि.* संकटांत किंवा विपत्तींत साथ देणारा; सहानुभूति दाखविणारा. **–दर्दी–** *स्त्री.* सहानुभूति. **–दिगर–** *अव्य.* आपसांत; परस्पर. **–दीवार–** *वि.* शेजारी. **–नवा–***वि.* १. ज्यांचे आवाज एक आहेत असे. २. सहमत; एकमत. **–नशीं–***वि.* एकत्र उठणारा–बसणारा; साथी; सहकारी. **–नस्ल–***वि.* एकाच वंशाचे किंवा घराण्यांतील. **– नाम–***वि.* एकच नांव असलेले; समनाम.– **निवाला–***वि.* एकत्र खाणारा.– **पल्ला–***वि.* बरोबरीचा; तोडीचा; जोडीचा. **– पेशा–***वि.* समव्यवसायी. **–मक़तब–***वि.* सहाध्यायी; वर्गबंधु. **– मज़हब** *–वि.* एकाच धर्माचे; धर्मबंधु. **– रकाब–***वि.* बरोबर आरोहण करणारा.**–राय–** *वि.* एकमत असलेले. **–राह–***वि.* सोबती; साथी. –*अव्य.* सह; बरोबर. (**मु०– ० होना–**बरोबर जाणें). **– राही** – *वि.* बरोबर जाणारा; साथी; सहकारी.**–वतन** –*वि.* एकाच देशांत किंवा गांवांत राहाणारे; देशबंधु. **–वार–***वि.* १. सपाट; समतल. २. राजी.**–शीरा** –*स्त्री.* बहीण. **–सफ़र–***वि.* प्रवासांतील साथी; सहप्रवासी.**–सफ़ीर** –*वि.* १. बागेंत एकत्र चिवचिवणारे. २. मित्र; दोस्त. **–सबक़–***वि.* वर्गबंधु. **–सर–***वि.*समान दर्जाचा; बरोबरीचा (गुण, बळ किंवा दर्जा या बाबतींत)**–सरी–** *स्त्री.*बरोबरी. **–साज़–***पु.* मित्र; दोस्त. **–सायगी–** *स्त्री.* शेजारपण; शेजार.**–साया–** *पु.*शेजारी.**–सिन–***वि.* समवयस्क.– **सुख़न–***वि.* १. एकत्र बसून गप्पा गोष्टी करणारे. २. एकत्र कविता करणारे. **–सूरत–***वि.* सारखे चेहरे किंवा आकार असलेले.

हमन*– *सर्व.* आम्ही.

हमरा–रो+– *सर्व.* आमचा; आपला. (हमराके = आम्हांला. हमरोके = आम्हांलाहि.)

हमल–*पु.* [*अ.*] १. गर्भ. २. ओझें; वजन. **इस्काते हमल–***पु.* गर्भपात. **मु० –गिराना–**गर्भपात करणें.

हमला–*पु.* [*अ.*] १. हल्ला;

आक्रमण; चढाई. २. वार; प्रहार. –आवर; हमलावर–*वि.* हल्लेखोर; आक्रमक.

हमहमा–*पु.* [फा.] १. सिंहाची, वाघाची गर्जना; डरकाळी. २. दहशत. ३. धामधूम.

हमहमाव*–आपपरभाव.

हमहमी–*स्त्री.* पा० 'हमाहमी'.

हमां–*वि.* [फा.] तोच; तो; ती; तें.

हमा–*वि.* [फा] १. पूर्ण; सर्व. २. समग्र. –**गीर**–*वि.* सर्वव्यापी; सार्वभौम. –**तन**–*अव्य.* १. नखशिखांत. २. संपूर्ण. –**तन गोश**–*वि.* सारे प्राण कानांत आणून ऐकण्यास उत्सुक झालेला. –**दाँ**–*वि.* सर्वज्ञ; सर्व गोष्टी जाणणारा; विद्वान्.

हमाक़त–*स्त्री.* [अ.] मूर्खपणा; अडाणीपणा.

हमाम–*पु.* पा० 'हम्माम'.

हमामदस्ता–*पु.* [फा.] खलबत्ता.

हमायल–*स्त्री.* [अ.] १. तलवार अडकविण्याचा गळ्यांतील पट्टा. २. गळ्यांतील जानवें, दागिदा इ०. ३. गळ्यांत बांधावयाचें अत्यंत लहान कुराण.

हमार*–*सर्व.* आमचा-ची-चें.

हमारा–*सर्व.* आमचा–ची–चें.

हमाल–*पु.* पा० 'हम्माल'

हमाशुमा–*सर्व.* [*हि.* + *फा.*] तुम्ही-आही; आमच्या-तुमच्यासारखे सामान्य लोक.

हमाहमी–*स्त्री.* १. स्वार्थीपणा; अप्पलपोटेपणा. २. अहंकार.

हमीर–*पु.* पा० 'हम्मीर'.

हमें–*सर्व.* आम्हांला. [माळ.

हमेल–*स्त्री.* [अ.] पुतळ्यांची

हमेव*–*पु.* अहंकार; घमेंड. **मु०–टूटना**–गर्वपरिहार होणें.

हमेशा–*अव्य.* [*फा.*] नेहमीं; सर्वदा; सदैव. [सर्वदा.

हमेस–सा* – *अव्य.* सदैव;

हमैं*–*सर्व.* आम्हांला.

हम्द–*स्त्री.* [अ.] परमेश्वराची स्तुति; प्रार्थना; ईशस्तोत्र.

हम्माम–*पु.* [अ.] स्नानगृह. **मु०–की लुंगी**–१. स्नान करतांना नेसावयाचा पंचा. २. सर्वांच्या उपयोगीं पडणारी वस्तु.

हम्मामी–*पु.* [अ.] स्नान घालणारा.

हम्मार*–*सर्व.* आमचा–ची–चें.

हम्माल–*पु.* [अ.] ओझें वाहाणारा मजूर; हमाल.

हम्मीर–*पु.* १. रणथंभोरचा चौदाव्या शतकांतील एक शूर राजा. हा अल्लाउद्दिनाशीं लढतांना मारला गेला होता. २. एक संकर राग.

हयंद*–*पु.* उत्तम, मोठा घोडा.

हय–*पु.* १. घोडा. २. इंद्र. –**नाल**–*स्त्री.* घोड्यावरील तोफ. –**शाला**–*स्त्री.* तबेला; अश्वशाला.

हयना*–*क्रि. स.* मारून टाकणें; कापून टाकणें.

हया–*स्त्री.* [अ.] लाज; मर्यादा. –**दार**–*पु.* लज्जाशील; सलज्ज.

हयात–*स्त्री.* [अ.] १. जीवन; जिंदगी; आयुष्य. २. प्राण. **मु० हीनहयात में**–आयुष्यांत; जन्मभर.

हर–*वि.* [*फा.*] प्रत्येक. –**एक** –*वि.* प्रत्येक. –**कहीं**–*अव्य.* सर्वत्र. –**कोई**–प्रत्येक जण; सर्वजण. –**गाह**–*अव्य.* जेथें; ज्या स्थितींत; जेव्हां. –**चंद**–*अव्य.* १. यद्यपि. २. जितकें कांहीं; कितीहि. –**जाई**–*वि.* १. भटक्या; २. उडाणटप्पू. *वि. स्त्री.* व्यभिचारिणी स्त्री. –**तरह**–*अव्य.* १. सर्वप्रकारें. २. कोणत्याहि परिस्थितींत. –**दम**–*अव्य.* नेहमीं; सतत; सदैव. –**दिल अज़ीज़**–*वि.* लोकप्रिय; सर्वप्रिय. –**फ़न मौला**–*वि.* सर्व कला जाणणारा; अष्टपैलू. –**रोज़**–*अव्य.* दररोज. –**सूँ**–*अव्य.* सर्वत्र; चोहोंकडे.

हर–*वि.* हरण, दूर, नष्ट करणारा. –*पु.* १. शंकर. २. छेद; भाजक; 'डिनॉमिनेटर'. –**शंकरी**–*स्त्री.* पिंपरी व पिंपळ यांचा जोडवृक्ष. हा पवित्र मानला जातो.

हर–*पु.* पा० 'हल'.

हरई*–*स्त्री.* हलकेपणा.

हरएँ*–*अव्य.* हळूहळू; धीरेधीरे.

हरकत–*स्त्री.* [अ.] १. गति; चाल. २. प्रयत्न. ३. स्वर; मात्रा (**व्या०**). ४. दुर्व्यवहार; खटचाळपणा. [–अनेक० हरकात]

हरकना*–*क्रि. स.* १. थांबविणें; अडविणें. २. वर्जन करणें.

हरकारा–ला–*पु.* [*फा.*] १. जासूद; निरोप्या. २. टपालवाला; 'पोस्टमन'.

हरख*–*पु.* हर्ष.

हरखना*–*क्रि. अ.* आनंदित, प्रसन्न, खुष होणें; हरखणें.

हरखाना–*क्रि. स.* प्रसन्न खुष करणें. –*क्रि. अ.* प्रसन्न होणें.

हरगिज़–*अव्य.* [*फा.*] केव्हांहि; देखील; कदापि; मुळीच.

हरज–*पु.* [अ.] १. नुकसान; हानि. २. अडचण; बाधा. ३. उशीर; खोटी.

हरजा–*पु.* [अ.] १. नुकसान. २. नुकसानभरपाई. ३. + पाथरवटांचें एक अवजार.

हरज़ा–*वि.* [*फा.*] १. निरर्थक; व्यर्थ. २. वाह्यात; खराब.

हरजाना–*पु.* [*फा.*] नुकसानभरपाई; क्षतिपूर्ति.

हरट्ट*–*वि.* घष्टपुष्ट; घट्टाकट्टा.

हरठिया+–*पु.* पाण्याच्या रहाटाला जुंपलेल्या बैलांना हांकणारा.

हरड़ा–*पु.* हिरडा.

हरता*–*वि. पु.* हरण, नष्ट करणारा. **–धरता**–*वि. पु.* सर्वशक्तिमान्; बरेंवाईट करूं शकणारा.

हरतार–ल– *स्त्री.* हरताळ (पिवळा खनिज पदार्थ). **मु०–फेरना;–लगाना**–हरताळ फांसणें; नष्ट करणें.

हरद–दी*– *स्त्री.* हळद.

हरदिया*–*वि.* हळदीच्या रंगाचा; पिवळा. **–पु.** पिवळ्या रंगाचा घोडा.

हरना–*क्रि. स.* १. हरण करणें; हिसकून घेणें. २. दूर करणें; लोटणें. ३. नष्ट करणें. ४. उचलून नेणें. –*क्रि. अ.* हरणें; पराभूत होणें. –*पु.** हरिण; मृग. [कशिपु.

हरनाक(कु)स*–*पु.* हिरण्य-

हरनाच्छ*–*पु.* हिरण्याक्ष.

हरनी– *स्त्री.* हरिणी; मृगी.

हरनौटा–*पु.* हरिणाचें पाडस.

हरपरेवरी– *स्त्री.* पाऊस पडावा म्हणून बायका एक तांत्रिक विधि करतात तो.

हरपा+–*पु.* १. सोनाराचा तराजू इ० ठेवण्याचा लहान डबा. २. फणेरपेटी.

हरफ़–*पु.* [*अ.*] अक्षर; वर्ण. **मु० किसी पर–आना**–दोष लागणें. **–उठाना**–अक्षर ओळखून वाचणें.

हरफ़ारेवड़ी– *स्त्री.* रायआवळा.

हरबा–*पु.* [*अ.*] १. शस्त्र; हत्यार. २. आक्रमण; हल्ला. **–हथियार**–*पु.* शस्त्रास्त्रें.

हरबोंग–*वि.* १. गुंड; मवाली. २. अडाणी; गांवठी; मूर्ख. **–पु.** १. अंदाधुंदी; अव्यवस्था. २. उपद्रव; अत्याचार. **–पुर–पु.** पा० 'अंधेर नगरी'.

हरम–*पु.* [*अ.*] १. काव्याचा तट, आवार. २. अंतःपुर; जनानखाना; विवाहित स्त्री; पत्नी. ३. रखेली स्त्री; दासी. **–ख़ाना;–सरा**–अंतःपुर; जनानखाना.

हरमज़दगी–*स्त्री.* [*अ.*] हरामखोरपणा; नीचता; दुष्टपणा.

हरमुष्ठा+–*वि. पु.* घष्टपुष्ट; घट्टाकट्टा.

हरयाल*–*स्त्री.* हिरवळ.

हरये*–*अव्य.* हळूहळू; सावकाश.

हरवल+–*पु.* १. शेतकऱ्याला, कुळाला दिलेली बिनव्याजी रक्कम. २. पा० 'हरावल'.

हरवली*–*स्त्री.* [*तु.*] १. सेनेचें पुढारीपण, नेतृत्व. २. स्वामित्व.

हरवा*–*पु.* हार; माळ. –*वि.* हलका.

हरवाना*–*क्रि. अ.* १. घाई करणें; गोंधळणें. २. हलकें होणें. –*क्रि. स.* हरविणें; पराभूत करविणें.

हरवाह–हा+–*पु.* दुसऱ्याचें शेत नांगरणारा; कसणारा; कूळ.

हरष*–*पु.* हर्ष; आनंद.

हरष(स)ना–**क्रि. अ.* आनंदित, खुष होणें.

हरषा(सा)ना*–*क्रि. अ.* आनंदित,प्रसन्न होणें. –*क्रि. स.* प्रसन्न करणें.

हरषित*–*वि.* आनंदित.

हरसिंगार–*पु.* पारिजातक(फूल व झाड).

हरहट;हरहा–*वि.* १. हैराण करणारा; त्रास देणारा. २. मोकाट सुटलेलें (जनावर).–*पु.* १. नांगराला जुंपावयाचा बैल. २ + लांडगा.

हरहाई–*वि. स्त्री.* खोडकर; वांड; त्रासदायक (गाय).

हरांस*–*पु. स्त्री.* १. ज्वरांश; कणकण. २. थकवा.

हरा–*वि.* १. हिरवा. २. ताजा; नवीन. ३. टवटवीत; प्रफुल्ल; प्रसन्न. ४. ओली, भरून न आलेली (जखम). ५. अपरिपक्व; कच्चा. **–पु.** हिरवा रंग. २. हिरवा चारा. ३. हार; माला. **–पन–पु.** हिरवेपणा; ताजेपणा. **–भरा**–हिरवेंगार; न सुकलेलें. **मु०–करना**–आनंदित, खुष करणें. **–दिखाई पड़ना; –सूझना; –बाग़ दिखाई पड़ना या सूझना**–अज्ञामुळें सुखाची आशा वाटणें; तोंडाला पाणी सुटणें.

हराई+–*स्त्री* १. एक किंवा अधिक नांगरांच्या साह्यानें एका खेपेंत नांगरली जाणारी जमीन. २. हार; पराभव. **मु०–फाँदना; –फानना**–नांगरट सुरू करणें; सऱ्या पाडणें.

हराना–*क्रि. स.* १. पराभूत करणें; हरविणें. २. शत्रूचे बेत हाणून पाडणें.

हराम–*वि.* [*अ.*] १. निषिद्ध; त्याज्य; अपवित्र. २. अनुचित. ३. अयोग्य. **–पु.** १. धर्मनिषिद्ध गोष्ट. २. डुक्कर (मुसल०). ३. बेइमानी. ४. व्यभिचार.**–का**–*वि.* १ बेइमानानें मिळविलेला. २. फुकटचा; मोफतचा. **–कार**–*वि. पु.* व्यभिचारी.**–कारी**– *स्त्री.* व्यभिचार.**–ख़ोर–पु.** १. फुकटचें खाणारा; आयतोबा. २. आळशी. ३. पापानें मिळविलेल्या कमाईवर जगणारा ४. निमकहराम; कृतघ्न; लांच

घेणारा. ५. निषिद्ध पदार्थ खाणारा. **–खोरी–** *स्त्री.* कृतघ्नपणा; नीचपणा.**–ज़दगी–** *स्त्री.* १. हरामखोरी. २. दुष्टपणा.**–ज़ादा**–*वि.* १. दुष्ट; पाजी. २. वर्णसंकर झालेला; अकुलीन. **मु०–कर देना–** अशक्य, दुःखद करून टाकणें.**–का खाना–** श्रम न करतां फुकटचें खाणें.**–का जना**–हरामजादा.**–का पिल्ला–का; बच्चा–** नीच; अधम. **–का माल–** अप्रामाणिकपणानें मिळविलेलें धन; फुकटचा माल. **–की मौत मरना–** विष खाऊन मरणें; आत्महत्या करणें.**–होना–** कठिण, दुःखद, अशक्य होणें. [नीच; दुष्ट.

हरामी–*वि.* [*अ.*] हरामखोर;

हरारत *स्त्री.* [*अ.*] १. उष्णता; ताप. २. साधारण ताप; कणकण; ज्वरांश. ३. आवेश; क्रोध.

हरावर*–*पु.* पा० ' हरावल. '

हरावरि*– *स्त्री.* अस्थिपंजर; हाडांची माळ; हांडाचा ढीग.

हरावल–*पु.* [*तु.*] १. आघाडीवरील फौज; सैन्याची आघाडी. २. ठगांचा पुढारी.

हरास–*पु.* १. ऱ्हास. २. विषाद; दुःख; नैराश्य. ३. भय; आशंका.

हराहर*– *स्त्री.* झोंबाझोंबी; ओढाताण. –*पु.* हलाहल.

हराहरि*–*स्त्री.* थकवा; ग्लानि.

हरि–*पु.* १. विष्णु. २. सूर्य. ३. मयूर. ४. घोडा. ५. सर्प. –*वि.* १. हिरवा. २. पिंगट. **–कथा–** *स्त्री.* पुराण (कथा कीर्तन). **–जन–** *पु.* १. परमेश्वराचा दास किंवा भक्त. २. अस्पृश्य. **–जान***–*पु.* गरुड. **–ताल**–*पु.* हरताळ. **–रस**; **–राग**–*पु.* ईश्वरप्रेम; कृष्णभक्ति.

हरि*– *अव्य.* हळू.**–हरि**–*अव्य.* हळूहळू.

हरिअर*–*वि.* हिरवा.

हरिअराना+–*क्रि. अ.* हिरवें होणें.

हरिअरी*– *स्त्री.* १. हिरवळ. २. दूर्वा. ३. हिरवा रंग.

हरिआना*–*क्रि. अ.* १. हिरवें होणें. २. ताजेतवाने होणें. ३. आनंदित होणें.

हरिआली– *स्त्री.* पा० 'हरियाली'.

हरिकारा+–*पु.* पा० 'हरकारा'.

हरिखंड–*पु.* मोरपीस.

हरिचंद*–*पु.* हरिश्चंद्र. [जाई'.

हरिजाई*–*वि. स्त्री.* पा० ' हर-

हरिण–*पु.* हरण; हरिण.

हरित–*वि.* १. हिरवा. २. ताजा. ३. पिवळा. ४. गडद निळा–**धान्य–** *पु.* कच्चें धान्य.

हरिन–*पु.* १. हरिण. २. 'क्लोरिन' (गॅस).

हरिनाकुस*–*पु.* हिरण्यकशिपु; हिरण्यकश्यप.

हरिनाक्ष–च्छ*–*पु.* हिरण्याक्ष.

हरिनी– *स्त्री.* हरिणी.

हरियर*–*वि.* हिरवा. [होणें.

हरियराना*– *क्रि. अ.* हिरवें

हरिया+–*पु.* शेतकरी.

हरियाई*– *स्त्री.* पा०'हरियाली'

हरियाथोथा–*पु.* मोरचूद.

हरियाना– *क्रि. अ.* पा० ' हरिआना '.–*पु.* पंजाबमधील एक भाग; हरियाणा.

हरियानी+– *स्त्री.* हरियाना प्रांतात बोलली जाणारी हिंदीची एक बोली भाषा; बांगडू; जाट लोकांची भाषा.

हरियाली– *स्त्री.* हिरवळ; हिरवेपणा. **मु० –सूझना–** सर्वत्र आनंदी आनंद दिसणें. [वद्य तृतीया.

हरियाली तीज– *स्त्री.* श्रावण

हरियाँव+–*पु.* शेताचें उत्पन्न वांटून घेण्याची एक पद्धत. या पद्धतींत जमीन मालकाला ७ भाग व कुळाला ९ भाग मिळतात.

हरिस– *स्त्री.* नांगराची धुरा; हळस.

हरिसिंगार–*पु.* पारिजातक.

हरिहाई*–*वि. स्त्री.* खटयाळ; खोडकर गाय. -*स्त्री.* गुरांकडून त्रास होणें.

हरी– *स्त्री.* जमीनदाराला दिली जाणारी नांगराची वेठ. –*वि. स्त्री.* हिरवी.**–छाल केला**–*पु.* हिरव्या सालीचें मुंबईकडील केळें. याला ' बंबइया केला ' असेंहि म्हणतात. पिवळचा केळचास ' चिनिया केला' असें म्हणतात.

हरीकेन–*पु.* [*इं.*] १. वावटळ. २. एक प्रकारचा कंदील.

हरीत–*पु.* पारवा.

हरीफ़–*पु.* [*अ.*] १. समव्यवसायी; वर्गबंधु; व्यवसायबंधु २. प्रतिद्वंद्वी; शत्रु. ३. धूर्त ४.विरोधक.

हरीर–*पु.* [*अ.*] १. रेशीम. २ रेशमी कापड.

हरीश–*पु.* [*अ.*] १. दुधांतील खीर. २. पातळ शिरा; सांजा.

हरीस– *स्त्री.* पा० ' हरिस '.

हरीस–*वि.* [*अ.*] लोभी; खादाड.

हरुअ–आ–वा*–*वि.* हलका; हळवा. [पणा.

हरुआ(वा)ई*– *स्त्री.* हलके-

हरुआना*–*क्रि. अ.* १. हलकें होणें. २. घाई करणें. [हलकें.

हरुए*– *अव्य.* हळूहळू; हलकें-

हरू+–*वि.* हलका.

हरूफ–*पु.* [*अ.* ' हरफ़ ' चें अनेक०] अक्षरें; वर्ण.

हरें*– *अव्य.* हलकें-हलकें.**–हरें** – *अव्य.* हळू-हळू.

हरे*– *अव्य*. हळू-हळू.–हरे*– *अव्य*. १. हळू-हळू; सावकाश. २. अरे बापरे; हरे राम.

हरेक–*वि*. प्रत्येक.

हरेरी*– *स्त्री*. हिरवळ.

हरेव*–*पु*. मंगोल जाति; देश; मंगोलिया. [बुल पक्षी.

हरेवा–*पु*. हिरव्या रंगाचा बुल-

हरें*–*अव्य*. पा० 'हरे'.

हरैना–*पु*. १. नांगराचा फाळ ज्यांत बसविलेला असतो तो भाग. २. बैलगाडीचा समोर आलेला भाग. [णारा, लुबाडणारा.

हरैया*–पु. हरण; दूर कर-

हरोल; **हरौला***–*पु*. पा० 'हरावल'.

हर्गिज़– *अव्य*. पा० 'हरगिज़'.

हर्ज–*पु*.[*अ*.] १. तंटा; बखेडा. २. नुकसान; हानि. ३. अडथळा; बाधा; हरकत. ['हरजाना'

हर्जा; **हर्जाना**– पा० 'हरजा';

हर्फ़–*पु*. [*अ*.] १. अक्षर; वर्ण. २. दोष; उणीव. ३. तक्रार. –**–आशना**– *वि*. अक्षर ओळख असलेला; नवशिक्या. **–गीरी**– *स्त्री*. छिद्रान्वेषण. **–ब हर्फ़**–*अव्य*.अक्षरशः. **मु०–आना**– दोष लागणें, येणें. **–उठाना**– वर्णमालेंतील अक्षरें सावकाश वाचणें. **–पकड़ना**– दोष काढणें; अडविणें (बा०). **–बनाना** – १. कित्ता लिहिणें. शिळाप्रेसवरील चुकीचीं अक्षरें दुरुस्त करणें. **–बैठाना**–अक्षरांचे खिळे जुळविणें; कंपोज करणें. **–लाना**– दोष देणें.

हर्ब– पु. [*अ*.] युद्ध; संग्राम. **–गाह**–*पु*. *स्त्री*. रणभूमि.

हर्बा– *पु*. पा० 'हरबा'.

हर्म्य–*पु*. प्रासाद; राजवाडा.

हर्र; **हर्रे**– *स्त्री*. बाळहिरडा.

हर्रा–*पु*. हिरडा. **मु०–लगे न फिटकरी और रंग चोखा आवै**– कांहीं घस सोसावी न लागतां फुकटांत काम व्हावें.

हर्षना*–*क्रि.अ*. आनंदित होणें.

हर्षाना*– *क्रि. अ*. आनंदित होणें. – *क्रि. स*. आनंदित करणें.

हर्स–र्सा⁺–*पु*.– पा० 'हरिस'.

हलंत–*वि*. ज्याच्या शेवटीं स्वररहित व्यंजन आहे असा शब्द.

हल–*पु*. १. नांगर. २. भांडण. **–जुता**–*पु*. शेतकरी; नांगऱ्या.**–धर** **–**पु. श्रीकृष्णाचा भाऊ बलराम. **–वाह–हा**–*पु*. दुसऱ्याचें शेत नांगरणारा; कूळ. **मु०–जोतना**–पु. १. शेत नांगरणें. २. शेती करणें.

हल–*पु*. [*अ*.] १. कठिण काम सोपें करणें. २. निराकरण; उलगडा (प्रश्न; समस्या) ३. एकजीव होणें. **मु०–करना**– १. सोडविणें. २. मिसळणें; एकजीव करणें.

हलकंप–*पु*. खळबळ; गडबड.

हलक़–*पु*. [*अ*.] कंठ; गळा; मान. **मु०–के नीचे उतरना**;**–से उतरना**– गळीं उतरणें; पटणें.

हलकई⁺– *स्त्री*. हलकेपणा. २. तुच्छता. ३. अप्रतिष्ठा.

हलकन*– *स्त्री*. हलणें.

हलकना*–*क्रि. अ*. १. हिसळणें. २. तरंग उठणें. ३. दिवा मिणमिणणें. ४. हलणें.

हलका–*वि*. १. वजनानें कमी. २. पातळ. ३. नापीक; बरड (जमीन). ४. फिका. ५. थोडा. ६. मंद. ७. तुच्छ. ८. सोपा. ९. निश्चित. १० नीच; हलकट; हलक्या दर्जाचा; मामुली. ११. रिकामा. १२. बारीक. **–पन**–*पु*. १. हलकेपणा. २. नीचता; हलकटपणा. **मु०–करना**– अपमान करणें. **–पड़ना**– १. तुलनेंत कमी भरणें. २. बरोबरी होऊं न शकणें.

हलक़ा–*पु*. [*अ*.] १. वतुळ. २. परीघ; घेरा. ३. झुंड; थवा. ४. हत्तींचा कळप. ५. मोहल्ला; पेठ; कांहीं गांवांचा समुदाय; मंडल. **मु०–बाँधना**– घेरणें; वेढा घालणें.

हलक़ान–*वि*. [*अ*.] १. अर्धमेला २. थकलेला; दमलेला. ३. त्रस्त; हैराण.

हलकाना⁺– *क्रि. अ*. हलकें होणें. – *क्रि. स*. १. हलकें करणें. २. हिसळणें; हलविणें.

हलकारा*–*पु*. पा० 'हरकारा'.

हलकारी– *स्त्री*. १. कापड रंगविण्यापूर्वी त्याचा रंग पक्का व्हावा म्हणून तुरटी, तेजाब इ० चा हात देण्याची क्रिया. २. विशिष्ट रंगानें केलेली किनारीची खडी.

हलकोरना⁺–*क्रि.स*. १. गोळा, जमा करणें. २. हलविणें; हेलकाविणें. [हेलकावा.

हलकोरा–*पु*. तरंग; झुळूक;

हलकौवा⁺–*पु*. कंपन; तरंग.

हलचल– *स्त्री*. १. खळबळ; गोंधळ; गडबड. २. दंगा; उपद्रव; हुल्लड. ३. हालचाल. **मु०–डालना**; **–मचाना**–गोंधळ माजविणें. **–पड़ना**;**–मचना**–गोंधळ, हुल्लड माजणें.

हलद⁺– *स्त्री*. हळद. **–हात–थ–** **–**स्त्री. लग्नांत हळद लावण्याची रीत. [कावीळ. ३. एक विष.

हलदिया–*पु*. १. पांडु रोग. २.

हलदी– *स्त्री*. हळद; हळकुंड. **मु०–उठना**;**–तेल उठना**–लग्नांत हळद लागणें. **–का हाथ होना**– लग्न होणें. **–चढ़ना**–पा० 'हलदी उठना'. **–लगना**–लग्न होणें.– **–लगाकर बैठना**–कांहीं काम न

करणें; स्वतःला विशेष मोठें समजणें. **–लगे न फिटकरी रंग चोखा आवे**–फुकटांत काम व्हावें.

हलद्दू–*पु.* एक खूप उंच झाड; हेद. [२. घुसणें.

हलना*–*क्रि. अ.* १. हालणें.

हलफ़–*पु.* [*अ.*] शपथ. **–दरोग़ी**–*स्त्री.* खोटी शपथ घेणें. **–नामा**–*पु.* शपथपूर्वक दिलेली लेखी जबानी. **मु०–उठाना**; **–लेना**–१. शपथ घेणें. २. पवित्र ग्रंथ किंवा वस्तु हातांत घेऊन शपथ घेणें–**से**–शपथपूर्वक; शपथेवर.

हलफ़न–*अव्य.* [*अ.*] शपथपूर्वक; शपथेवर.

हलफा–*पु.* १. लहर; तरंग. २. जोराचा श्वासोच्छ्वास. **मु०–चलना**–श्वास लागणें. **–मारना**–लाटा उठणें. [पूर्वक सांगितलेलें.

हलफ़िया; **हलफ़ी**–*वि.* शपथ-

हलब–*पु.* [*अ.*] सीरियांतील एक शहर. येथील कांच पूर्वी फार प्रसिद्ध होती.

हलबल*–*स्त्री.* खळबळ.

हलबलाना*–*क्रि. अ.* घाबरणें; गोंधळणें. –*क्रि. स.* दुसऱ्याला घाबरवून, गोंधळून सोडणें.

हलबली*–*स्त्री.* खळबळ.

हलबी–ब्बी–*वि.* [*अ.*] हलबशीं संबंधित. –*पु.* स्वच्छ व सर्वोत्तम कांच. [चल'.

हलभल-ली*–*स्त्री.* पा० 'हल-

हलरा–*पु.* १. तरंग; लहर; लाट. २. हेलकावा.

हलराना–*क्रि. स.* डोलविणें (लहान मुलाला); हलविणें; झोंका देणें.

हलरावना+–*क्रि. स.* १. मन रमविणें; विनोद करणें. २. हलविणें; झोंका देणें.

हलवत–*स्त्री.* वर्षांत प्रथम शेतामध्यें नांगर नेण्याचा विधि.

हलवा–*पु.* [*अ.*] १. सांजा; शिरा. २. सोपी गोष्ट. **मु०–निकल जाना**–दुर्दशा होणें; कढी पातळ होणें –**(वे) माँडे से काम**–केवळ आपल्या स्वार्थाशींच मतलब; दुसऱ्याच्या नफानुकसानीची पर्वा न करणें. [विकणारा; हलवाई.

हलवाई–*पु.* [*अ.*] मिठाई

हलवान–*पु.* [*अ.*] कोंकरू किंवा त्याचें मांस.

हलहलाना+–*क्रि. स.* गदगदां हलविणें. –*क्रि. अ.* थरारणें.

हलहलाहट–*स्त्री.* हुडहुडी.

हलहलिया+–*पु.* १. थंडीताप; हिंवताप. २. विष.

हलहली+–*स्त्री.* १. थंडीताप. २. रोग; आजार.

हला–*अव्य.* हे सखे.

हलाई+–*स्त्री.* १. नांगरणी; पेरणी. २. हेलकावा.

हलाक–*वि.* [*अ.*] १. नष्ट झालेला. २. मेलेला. ३. थकलेला. –*पु.* १. मृत्यु. २. नाश. **मु०–होना** मारलें जाणें; नष्ट होणें.

हलाकत–*स्त्री.* [*अ.*] १. मृत्यु. २. नाश. ३. थकवा.

हलाकान+–*वि.* हैराण; उद्विग्न.

हलाकानी+–*स्त्री.* हैराणी; त्रास.

हलाकी–*स्त्री.* [*अ.*] १. मृत्यु. २. नाश; हलाखी. –*वि.* घातक.

हलाकू–*वि.* [*अ.*] घातक; हत्या करणारा.–*पु.* चंगेजखानाचा नातू. हा अत्यंत क्रूर होता.

हलाना*–*क्रि. स.* १. पा० 'हिलाना'. २. घुसविणें.

हलाभला–*पु.* निर्णय; परिणाम. –*वि.* सामान्य; कामचलाऊ.

हलाल–*वि.* [*अ.*] इस्लाम धर्मशास्त्रानुकूल; विहित. –*पु.* ज्याचें मांस खाणें शास्त्रसंमत आहे असा पशु. **–खोर**–*पु.* १. मेहनत करून आपली उपजीविका चालविणारा. २. भंगी. **मु०–करना**–१ एखाद्या पशूला इस्लामच्या आज्ञेप्रमाणें हळूहळू गळा कापून ठार मारणें. २. छळणें. ३. आपलें कर्तव्य बजावणें. **–का**–स्वकष्टार्जित; धर्मविहित. **–की कमाई**–अंगमेहनतीनें मिळविलेला पैसा. [गोडी.

हलावत–*स्त्री.* [*अ.*] माधुर्य;

हलाहल–*पु.* जहर; विष.

हलिक–*पु.* नांगर चालविणारा; शेतकरी.

हलिया+–*पु.* बैलांचा कळप.

हलियाना+–*क्रि. अ.* मळमळणें; ओकारी येणें. [बलराम.

हली–*पु.* १. पा० 'हलिक'. २.

हलीम–*वि.* [*अ.*] शांत; सहनशील. –*पु.* एक प्रकारची खिचडी (मुसल०).

हलीमा–*स्त्री.* [*अ.*] १. सहनशील स्त्री. २. मुहम्मद साहेबांना आपलें दूध जिनें पाजविलें होतें ती स्त्री.

हलीमुत्तबअ–*वि.* [*अ.*] सहिष्णु व गंभीर स्वभावाचा.

हलुआ–वा+–*पु.* पा० 'हलवा'.

हलुक–का*–*वि.* १. हलका. २. तुच्छ.

हलूक+–*स्त्री.* वांती; ओकारी.

हलूका+–*स्त्री.* ओकारींतून एकावेळीं बाहेर पडणारी घाण; उलटी.

हलेरा; **हलोर-रा**+–*पु.* १. लहर; तरंग. २. हेलकावा.

हलोरना–*क्रि. स.* १. पाण्यांत हात घालून पाणी हलविणें.

२. घुसळणें. ३. ढवळणें. ४. धान्य पाखडणें. ५. सहजासहज़ीं खूप द्रव्य जमविणें.

हल्क; हल्का; हल्द; हल्दी– पा० 'हलक'; 'हलका'; 'हलद'; 'हलदी'.

हल्ला–*पु.* १. आरडाओरडा; गोंधळ; गडबड; गोंगाट. २. आक्रमण; हल्ला. **–गुल्ला**–*पु.* गोंगाट; आरडाओरडा. **मु० –बोलना**– हल्ला करणें. **–मचना**– गोंधळ माजणें. **–मचाना**– गोंधळ, गोंगाट माजविणें.

हल्लित्र–*पु.* हलविण्याचें यंत्र.

हवन्नक़–*वि.* [*अ.*] १. मूर्ख; मठ्ठ. २. कुरूप.

हवलदार–*पु.* [*अ.* 'हवाला'+ *फा.* 'दार'] हवालदार; सैन्यांतील एक लहान अधिकारी.

हवस–*स्त्री.* [*अ.*] १. कामना; लालसा; इच्छा. २. लोभ; हव्यास. ३. कामवासना. ४. हौस. **–परस्त**–*वि.* इंद्रियलोलुप; सुखलोलुप. **मु० –निकालना**– इच्छा पूर्ण करणें. **–पकाना**– मनोराज्यें करणें. **–बुझना**– हौस, इच्छा तृप्त होणें.

हवा–*स्त्री.* [*अ.*] १. हवा. २. वारा; वातावरण. ३. श्वास. ४. वासना; लालसा. ५. अफवा. ६. अत्यंत हलकी वस्तु. **–ख़ोरी**–*स्त्री.* हवा खाणें; फिरावयास जाणें. **–गीर**–*पु.* शोभेची दारू बनविणारा. **–चक्की**–*स्त्री.* पवनचक्की. **–दार**–*वि.* १. इच्छुक. २. प्रेमी; आसक्त. ३. हवेशीर (जागा). –*पु.* एक प्रकारची पालखी. **–पानी**–*पु.* हवामान; हवापाणी. **–बाज़**–*वि.* वैमानिक. **–रोक**–*वि.* हवाबंद; 'एअर टाइट'. **–सा**–*वि.* अत्यंत हलका. **मु० –उखड़ना**– बाजारांत पत न राहाणें. **–उड़ना**– बातमी, अफवा पसरणें. **–उड़ाना**– अफवा पसरविणें. **–करना**– वारा घालणें; पंखा हलविणें. **–का गुज़र न होना**– कोणाचाहि प्रवेश न होणें. **–का रुख़ जानना**– परिस्थिति ओळखणें. **–का रुख़ देखना**– काळवेळ पाहून काम करणें. **–के घोड़ेपर आना**– खूप वेगानें येणें. **–के घोड़ेपर सवार होना**– फार घाईंत असणें. **–खाना**– १. हवा खाणें; फिरावयास जाणें. २. अयशस्वी होणें. **–खिलाना**– फसविणें; अयशस्वी करणें. **(कहींकी) –खिलाना**– कोठेंतरी पाठविणें. **–गरम होना**– १. उकाडा होणें. २. तेजी असणें. **–गिरना**– वारें पडणें. **–छोडना**– पादणें. **–देखना**– काळवेळ ओळखणें. **–देना**– १. वारा घालणें; फुंकर घालणें. २. भांडण लावणें. **–निकल जाना**– चकित, थक्क, निरुत्तर होणें. **–पर गिरह लगाना**– चलाखी करणें. **–पलटना**– १. वाऱ्याची दिशा बदलणें. २. परिस्थिति बदलणें. **–पी कर या फाँककर रहना**– कांहींहि न खाणें (उपरोध). **–पीटना**– निरर्थक काम करणें. **–फिरना**– पा० 'हवा पलटना'. **–बंदी करना**– १. क्षुद्र गोष्टींना प्रसिद्धि देणें; बदनामी करणें. २. मनोराज्यें उभारणें. **–बँधना**– १. वारा थांबणें. २. रंग येणें; छाप बसणें; जमणें. **–बताना**– टाळाटाळ करणें. **–बदलना**– पा० 'हवा पलटना'. **–बाँधना**– १. छाप पाडणें; ख्याति मिळविणें. २. थापा मारणें. ३. शेखी, प्रौढी मिरविणें. **–बिगड़ना**– १. वातावरण दूषित होणें. २. पत नाहींशी होणें. ३. घडी विस्कटणें. **–भर जाना**– १. आनंदानें फुगून जाणें. २. घमेंड होणें. **–लगना**– १. वारें, पाणी लागणें. २. वात (रोग) होणें. ३. झपाटलें जाणें. ४. परिणाम, प्रभाव होणें. **–से बातें करना**– १. वायुवेगानें धांवणें; अत्यंत जोरांत पळणें. २. स्वतःशीं बडबडणें. **–से लड़ना**– वाऱ्याशीं भांडणें; निष्कारण झगडणें. **–हो जाना**– १. अत्यंत वेगानें धांवणें. २. पसार होणें; उडून जाणें; नाहीसें होणें.

हवाई–*वि.* [*अ.*] १. हवेसंबंधींचा. २. चपळ; वेगवान्. ३. चलाख. ४. काल्पनिक; निराधार. निर्मूल. –*स्त्री.* १. एक प्रकारची शोभेची दारू; फुलबाजी. २. अफवा. ३. वरची प्राप्ति. ४. निरर्थक गोष्ट. ५. नकली वस्तु. ६. मिठाईवर अथवा सरबतांत घालावयाचा सुकामेवा. **–अड्डा**–*पु.* विमानतळ; 'एरोड्रोम'. **–आश्रय**–*पु.* विमान हल्ल्यापासून रक्षण करणारें शरणगृह; 'एअर शेल्टर'. **–क़िला; –महल**–*पु.* मनोराज्य. **–ख़तरेका भोंपू**–*पु.* वैमानिक हल्ल्याचा इशारा; 'एअर रेड अलार्म'. **–ख़बर; –बात**–*स्त्री.* अफवा. **–जहाज़**–*पु.* विमान. **–डाक**–*स्त्री.* विमानानें जाणारें टपाल. **–फ़ैर**–*पु.* हवेंत केलेला गोळीबार. **–तोपची**–*पु.* विमानांतील तोफ चालविणारा; 'एअर गनर'. **–दस्ता**–*पु.* विमानदलाची तुकडी; 'एअर स्क्वाड्रन'. **–पत्र-चित्र**–*पु.* विमानानें पाठविण्याच्या पत्रांचें घेतलें जाणारें छायाचित्र; 'एअरग्राफ'. **–बंदूक़**–*स्त्री.* नकली बंदूक. **–बमवर्षा**–*पु.* विमानांतून

केला जाणारा बाँबहल्ला; 'एरियल बंबार्डमेंट'. **–मार्ग;–रास्ता–** पु. विमानमार्ग. **–युद्ध–पु.; –लड़ाई–** स्त्री. विमानयुद्ध.**–हमला–** पु. विमानांचा हल्ला. **–हमलेसे हिफ़ाज़त–** (ह० ह० हि०) पु. विमान-हल्ल्यापासून संरक्षण; 'एअर-रेड-प्रिकॉशन' (ए. आर. पी.). **मु० –उड़ना–** १. अफवा पसरणें. २. तोंड उतरणें. **–गुम होना–** गोंधळणें; गडबडून जाणें. **(चेहरे, मुँहपर) हवाइयाँ उड़ना–** तोंड उतरणें; चेहरा निस्तेज होणें.

हवाल***–पु.** [अ. 'अहवाल'] १. अवस्था; स्थिति. २. बातमी; वृत्तांत. ३. परिणाम; फळ.

हवालदार–पु. पा० 'हवलदार'.

हवाला–पु. [अ.] १. पुरावा; आधार; दाखला; हवाला. २. उदाहरण. ३. स्वाधीन, हवालीं करणें. ४. पत्ता; खूण. **मु०– देना–** १. खूण, पत्ता सांगणें. २. पुरावा आधार देणें. **–(ले) करना–** हवालीं, स्वाधीन करणें.

हवालात– स्त्री. [अ. 'हवाला'-चें अनेक०] नजरबंदी; नजरकैद; कच्ची कैद; 'पोलिस कस्टडी'; 'लॉकअप'.

हवालाती–वि. [अ.] कच्च्या कैदेंत, पोलिस कस्टडींत असलेला; 'अंडर ट्रायल'.

हवालादार–पु. पा० 'हवलदार'.

हवाली– स्त्री. [अ.] जवळपासचीं ठिकाणें. **–मवाली–पु.** सोबती; सहकारी.

हवास–पु. [अ. 'हासा' चें अनेक०] १. पंच ज्ञानेंद्रियें व पंच कर्मेंद्रियें. २. संज्ञा; चेतना; शुद्ध; भान. **–बाख़्ता–**वि. घाबरलेला; गाळण उडालेला. **मु० –उड़ना; –गुम होना; –बाख़्ता होना–** घाबरणें; गाळण उडणें.

हवि–पु. हवनीय द्रव्य; आहुति.

हविस+**–** स्त्री. पा० 'हवस'.

हवेली– स्त्री. [अ.] १. महाल; हवेली; मोठी भव्य इमारत. २. पत्नी.

हव्वा– स्त्री. [अ.] 'आदम'ची बायको; 'ईव्ह'. **–पु.** बागुलबुवा.

हशम–पु. [अ.] नोकर-चाकर; गडीमाणसांचा लवाजमा.

हशमत– स्त्री. [अ.] १. नोकरचाकर. २. संपत्ति. ३. रुबाब.

हशर–पु. पा० 'हश्र'.

हशरात–पु. [अ. 'हशरा'चें अनेक०] जीवजंतू; लहान किडे वगैरे; कृमिकीटक. **–उल्-अर्ज़–पु.** पृथ्वीवर राहाणारे किडे वगैरे.

हश्त–वि. [फा.] आठ; ८.

हश्तुम्–अव्य. [फा.] आठवा.

हश्मत– स्त्री. पा० 'हशमत'.

हश्र–पु. [अ.] १. प्रलय; मुसलमानी श्रद्धेप्रमाणें ज्या दिवशीं सर्व प्रेतें कबरींतून उठणार आहेत व त्यांच्या पापपुण्याचा हिशेब होणार आहे तो दिवस. २. आपत्ति; शोक; विलाप. ३. खूप जोराचा आरडा-ओरडा. **मु० –टूटना; –बरपा होना–** १. आपत्ति कोसळणें. २. कोप होणें. **–ढाना; –बरपा करना–** खूप आरडा-ओरडा करून गोंधळ माजविणें; संकट कोसळविणें.

हश्शाश–वि. [अ.] अत्यंत प्रसन्न व हंसतमुख. **–बश्शाश–** अत्यंत खुष. [हेवा.

हसद–पु. [अ.] ईर्ष्या; मत्सर;

हसन–वि. [अ.] १. उत्तम; भला; चांगला. २. सुंदर. **–पु.** हजरत अलींच्या मुलाचें नांव.

हसन–पु. १. ॅसणें; विनोद. २. थट्टा; उपहास.

हसब–अव्य. [अ.] अनुसार; प्रमाणें. **–मामूल–** अव्य. नेहमीप्रमाणें.

हसब– पु. [अ.] घराणें; कुळ; वंश. **–नसब–** पु. घराणें; वंशपरंपरा; कुलक्रम.

हसर–पु. पा० 'हस्र'.

हसरत– स्त्री. [अ.] १. एखादी वस्तु न मिळाल्यानें होणारें दुःख; हळहळ; विषाद. २. कामना; लालसा. **मु०– निकालना–**अभिलाषा पूर्ण करून घेणें.

हसित–वि. १. उपहासित; ज्याला लोक हंसतात असा. २. हंसणारा. ३. विकसित.**–पु.** हास्य; स्मित.

हसीन–वि. [अ.] स्त्री. सुंदर; मोहक; गोजिरवाणा. [मोहिनी.

हसीना–वि. [अ.] सुंदरी;

हसीर–पु. [अ.] चटई. **–**वि. १. दुःखी. २. थकलेला.

हसील+**–**वि. सरळ; साधा.

हस्त– स्त्री. [फा.] १. अस्तित्व. २. जीवन.

हस्त–पु. १. हात. २. एका हाताचें माप. ३. हस्ताक्षर.**–कला–** स्त्री. हस्तकौशल्य; 'मॅन्युअल आर्ट'. **–पुस्तिका–** स्त्री. लहान पुस्तक; 'मॅन्युअल'. **–क्षेप–पु.** ढवळाढवळ. **–लाघव–पु.** १. हस्तकौशल्य. २. हातचलाखी. **–लिपि विशेषज्ञ–पु.** हस्ताक्षर–तज्ज्ञ; 'हँडरायटिंग एक्स्पर्ट'. **–विज्ञापक–पु.** जाहिरात; 'हँडबिल'. **–श्रम–पु.** शारीरिक परिश्रम; 'मॅन्युअल लेबर'.

हस्तक–पु. १. हात. २. हाताचा आधार. ३. खालच्या वर्गातील सेवक.

हस्तांकित ऋणपत्र–*पु.* वचन–चिठ्ठी; 'प्रॉमिसरी नोट'.

हस्तांतरण–*पु.* हस्तांतरित, तवदील करणें.

हस्तांतरपत्र–*पु.* संपत्ति इ० दुसऱ्याला देण्यासंबंधींचा दस्त-ऐवज; 'कॉनव्हेयन्स'.

हस्तांतरित–*वि.* दुसऱ्याला दिलेला; 'ट्रान्सफर्ड'.

हस्ताक्षर–*पु.* १. सही. २. हातानें लिहिलेलें अक्षर. –**कर्ता**–*पु.* सही करणारा; 'सिग्नेटरी'.

हस्तामलक–*पु.* हातावर ठेवलेला आवळा; स्पष्ट दिसणारी वस्तु. –**वत्**–*अव्य.* स्पष्ट; साफ.

हस्ताहस्तिका– *स्त्री.* हात-घाईची लढाई; 'हॅन्ड टु हॅंड फाइट'. [हत्तीचा दांत.

हस्ति-स्ती–*पु.* हत्ती. –**दंत**–*पु.*

हस्ती– *स्त्री.* [फा.] १. अस्तित्व. २. जीवन. ३. संपत्ति. **मु०–मिटाना**–नष्ट करणें.

हस्ब–*अव्य.* [अ.] अनुसार; प्रमाणें. –**(स्बे) ज़ाबिता**–*अव्य.* नियमानुसार; कायद्याप्रमाणें. –**जैल**–*अव्य.* खालीं दिल्याप्रमाणें. –**मामूल**-*अव्य.* नेहमींप्रमाणें. –**हाल**–*अव्य.* परिस्थितीप्रमाणें.

हस्रत– *स्त्री.* पा० 'हसरत'.

हहर– *स्त्री.* १. थरकांप २. भय. ३. हुडहुडी.

हहर(रा)ना– *क्रि. अ.* १. कांपणें; हुडहुडी भरणें. २. थरकांप होणें; भयभीत होणें. ३. आश्चर्यानें थक्क होणें. ४. मत्सर करणें. ५. अत्यंत आनंदानें व उत्सुकतेनें एखाद्याला भेटणें.

हहराना–*क्रि. स.* भिवविणें; घाबरविणें.

हहल(ला)ना– *क्रि. अ. स.* पा० 'हहर(रा) ना'.

हहा– *स्त्री.* १. हंसणें; खो खो करून हंसणें. २. खुशामत; विनंती; गयावया. **मु०–खाना**–गयावया करणें.

हहागति*–*स्त्री.* दुर्दशा.

हाँ–*अव्य.* होय; बरें; एवढें खरें; मात्र; असो. –*स्त्री.*–होकार; अनुमति. –**हाँ**–*अव्य.* नको. –**हुजूर**–*वि.* जी हुजूर; खुशामतया. –**मु०–जो हाँ जी करना**–खुशामत करणें; हंजी हंजी करणें. –**में हाँ मिलाना**–होस हो करणें; खुशामत करणें.

हाँक– *स्त्री.* १. हांक. २. ललकार; आव्हान. ३. धांवा; हांक. **मु०–देना; –मारना; –लगाना**–हांक मारणें; बोलावणें; धांवा करणें.

हाँकना–*क्रि. स.* १. जोरानें हांक मारणें. २. लढण्याकरितां आव्हान देणें; ललकारणें. ३. बाता मारणें; ४. हांकणें; चालविणें. ५. हांकलणें; घालवून देणें. ६. पंख्यानें वारा घालणें. **मु० हाँक पुकारकर कहना**–जाहीरपणें सांगणें, बोलणें.

हाँका–*पु.* 'हॅकवा'; 'हाँक'.

हाँकारी–*पु.* एखाद्या ठरावाच्या बाजूनें 'हाँ' किंवा 'हो' म्हणणारे सभासद; 'आइज'.

हाँगा–*पु.* १. ताकत; जोर. २. बलप्रयोग. **मु०–करना**–बळजबरी करणें. –**छूटना**–शारीरिक सामर्थ्य न राहाणें.

हाँगी–*स्त्री.* स्वीकृति; मान्यता; मंजुरी. **मु०–भरना**– मंजूर करणें; हमी देणें.

हाँड़ना–*क्रि. अ.* रिकामटेकडें भटकणें. –*वि.* उडाणटप्पू.

हाँड़ी–*स्त्री.* १. मातीची हंडी, भांडें. २. कांचेची हंडी. **मु०–उबलना**–१. हंडींतील वस्तु शिजणें. २. अत्यंत आनंद होणें. –**पकना**–१. हंडींतील वस्तु शिजणें. २. कट, प्रकरण शिजणें. **(किसीके नामपर) –फोड़ना**–एखादी अप्रिय व्यक्ति नाहींशी झाल्यानंतर आनंद व्यक्त करणें.

हाता–**वि.* १. टाकलेला; सोडलेला. २. दूर केलेला.

हाँप(फ)ना–*क्रि. अ.* धांपा टाकणें; दम लागणें.

हाँफ़ा –*पु.*; **हाँफी**– *स्त्री.* दम; धांप. **मु०–छूटना** –धांप लागणें; धांपा टाकणें.

हाँस⁺– *स्त्री.* हास्य.

हाँसना*–*क्रि. अ.* हंसणें.

हांस(सु)ल–*पु.* काळसर पायांचा व मेंदीच्या रंगाचा घोडा.

हाँसी– *स्त्री.* १. हास्य. २. थट्टा. ३. उपहास; निंदा.

हाँसु*– *स्त्री.* १. पा० 'हँसी'. २. पा० 'हँसली'.

हा– *अव्य.* १. हाय ! अरेरे ! दुःखोद्गार. २. आनंद, आश्चर्य, क्रोध इ० व्यक्त करणारा उद्गार.

हाइ*– *अव्य.* हाय ! अरेरे !

हाइल– *वि.* पा० 'हायल'.

हाइस्कूल– *पु.* [इं.] माध्यमिक शाळा; 'हायस्कूल'.

हाई*– *स्त्री.* १. दशा; स्थिति. २. तऱ्हा; रीत; पद्धत.

हाऊ– *पु.* बागुलबोवा.

हाकिम– *पु.* [अ.] १. मोठा अधिकारी. २. शासनकर्ता. –**(मे) बाला**– *पु.* १. वरिष्ठ अधिकारी. २. ईश्वर. –**(मे) वक़्त**–*पु.* तत्कालीन राजा. **मु०–के कुत्ते**–मोठ्या अधिकाऱ्यांचे लांचखाऊ कनिष्ठ नोकर.

हाकिमाना– *वि.* [*अ.*] अधिकाऱ्यासारखा; अधिकारयुक्त.

हाकिमी– *स्त्री.* [*अ.*] शासन; हुकूमत.–*वि.* शासनाशीं संबंधित.

हाजत– *स्त्री.* [*अ.*] १. आवश्यकता. २. गरज; जरूर. ३. कैद. ४. शौचास लागणें.–**मंद**– *वि.* गरजू; इच्छुक. **मु०–रफ़ा करना** १. गरज भागविणें. २. शौचास जाऊन येणें.

हाजती– *स्त्री.* [*अ.*] आजाऱ्याला अंथरुणांत पडल्या पडल्या लघ्वी करितां यावी म्हणून वापरलें जाणारें भांडें; श्रीमंतांच्या बिछान्याजवळील मूत्र–पात्र.–*पु.* फकीर; याचक.–*वि.* १. गरजू. २. कच्च्या कैदेंत असलेला.

हाज़मा– *पु.* [*अ.*] पचनशक्ति; पाचन. **मु०–खराब होना; –बिगड़ना**–पाचनक्रिया बिघडणें; पोट बिघडणें.

हाज़िक़–*वि* [*अ.*] पंडित; कुशल; निपुण. [विणारा.

हाज़िम– *वि.* पाचक; पच-

हाजिर– *वि.* [*अ.*] १. परदेशीं जाऊन वसाहत करणारा. २. मक्केंत जाऊन राहाणारा. ३. निर्वासित; शरणार्थी.

हाज़िर– *वि.* [*अ.*] १. हजर; उपस्थित. २. समोर असलेला; विद्यमान. ३. तयार. **–जबाब**– हजरजबाबी, प्रत्युत्पन्न-मति. **–ज़ामिन**– *पु.* एखाद्या व्यक्तीला न्यायालयांत हजर करण्याची जबाबदारी घेणारा.**–नाज़िर**–*वि.* विद्यमान व पाहाणारा. [जादूगार.

हाजिराई– *पु.* १. मांत्रिक. २.

हाज़िरात– *स्त्री.* [*अ.*] १. एखाद्याच्या अंगांत संचार मृतात्म्याचा करण्यासाठीं करतात ती प्रार्थना. २. अंगात आणणें.

हाज़िरी– *स्त्री.* [*अ.*] १. हजिरी; उपस्थिति. २. इंग्रजांची न्याहारी; नाश्ता. ३. उपस्थितिपत्रक; हजिरीची वही. ४. अंत्यसंस्कार झाल्यानंतर मृत व्यक्तीच्या कुटुंबांतील लोकांसाठीं पाठविण्यांत येणारें जेवण (मुसल०). **मु०–देना**–हजिरी देणें; उपस्थित असल्याची सूचना देणें. **–बजाना**– एखाद्या मोठ्या माणसाबरोबर सतत राहाणें.**–लेना**– हजिरी घेणें, लिहिणें.

हाज़िरीन–*पु.* [*अ.* ' हाज़िर'चें अनेक०] हजर असलेले लोक; श्रोते; प्रेक्षक.

हाजी– *पु.* [*अ.*] हज करणारा; मक्केची यात्रा (हज) करून आलेला.

हाट– *स्त्री.* १. बाजार. २. बाजाराचा दिवस. ३. दुकान. **–व्यवस्था**– *स्त्री.* विक्रीची व्यवस्था; ' मार्केटिंग '. **मु०–करना**–खरेदीविक्री करणें. **–खोलना**– दुकान घालणें.**–चढ़ना**–बाजारांत विक्रीसाठीं येणें, जाणें.**–लगना**– बाजार भरणें.

हाटक– *वि.* सोन्याचा. –*पु.* १. सोनें. २. दुकानाचें भाडें.**–पुर**– *पु.*; **–पुरी**–*स्त्री.* लंका.**–लोचन**– *पु.* हिरण्याक्ष.

हाड़–*पु.* १. हाड. २. कुलीनता.

हाड़ा– *पु.* क्षत्रियांची एक शाखा.

हाड़ी+– *स्त्री.* १. उखळ. २. गांधिलमाशी.– *पु.* एक प्रकारचा बगळा.

हाता– *पु.* [*अ.* ' अहाता '] १. आवार. २. सीमा; हद्द. ३. प्रदेश. ४. अडथळा.

हाता– *वि.* १. परित्यक्त; दूर, निराळा केलेला. २. नाश पावलेला. ३. नाशक.

हातिम– *वि.* [*अ.*] १. निपुण. कुशल माणूस. २. तज्ज्ञ. ३. दानशूर. –*पु.* अरबस्तानांतील तै टोळीचा एक सरदार; हातिमताई. **मु०–की क़ब्रपर लात मारना**–फार मोठा उदारपणा दाखविणें; कर्णाचा अवतार बनणें; कर्णाला लाजविणें (उपरोधात्मक).

हाथ– *पु.* १. हात. २. पत्त्यांतील डाव. ३. हत्यार इ०ची मूठ. ४. कामगार.–**कंडा**–*पु.* पा० ' हथकंडा '.**–पान**–*पु.* हाताच्या पंजावर घालावयाचा पानाच्या आकाराचा दागिना.**–फूल**–*पु.* हाताच्या पंजावर घालावयाचा फुलाच्या आकाराचा दागिना. **मु०– आँखोंसे लगाना**– खूप प्रशंसा, सन्मान करणें.**–आज़माना**–एखादें काम आपल्याला करितां येतें किंवा नाहीं याचा अंदाज घेणें.**–आना** १. मिळणें; प्राप्त होणें. २. ताब्यांत येणें.**–उठना** –१. हात वर होणें २. वेगळें दूर होणें. **–उठाकर देना**–स्वेच्छेनें देणें; दान देणें. (**किसीको**)**–उठाना** –नमस्कार, प्रणाम करणें. (**किसीपर**)**–उठाना**–हात टाकणें; हात उगारणें; मारणें. **–उठा बैठना, लेना**–१. मारपीट करणें. २. अंग काढून घेणें; असहकार्य करणें– **ऊँचा करना**–१. खूप खर्च करणें. २. आशीर्वाद देणें **–ऊँचा होना**– १. दानशूर असणें.– २. खर्चिक असणें.**–ओट लेना**–दोन्ही हात पसरून एखादी गोष्ट घेणें.**–कट जाना**– १. हात बांधले जाणें. २. नाइलाज होणें.**–कटा देना;– कटाना**– वचनबद्ध होणें. **–करना**– पत्त्यां-

तील हात करणें; डाव जिंकणें. **–क़लम करना–** हात छाटून टाकणें. **–का झूठा–**पैशांच्या बाबतींत अविश्वासार्ह; बेइमानी.**–काट देना–** १. नाइलाज करणें. २. बांधून टाकणें.**–का दिया–**दान दिलेला.**–कानोंपर रखना–** १. कानांवर हात ठेवणें. २. कानाला खडा लावणें. ३. शरण जाणें.**–का मैल–**हातचा मळ; तुच्छ वस्तु. **–का सच्चा–**पैशाच्या बाबतींत विश्वासार्ह. **–को हाथ नज़र न आना–** अत्यंत दाट काळोख असणें. **–ख़ाली जाना–** १. डाव हुकणें. २. वार चुकणें. ३. युक्ति सफळ न होणें.**–ख़ाली न होना–**फुरसत न मिळणें**–ख़ाली होना–** जवळ पैसा किंवा काम नसणें.; **–खींचना–** १. हात आवरणें; हात आंखडता घेणें. २. सहकार्य, मदत बंद करणें.**–खुजलाना–** १. द्रव्यप्राप्तीची पूर्वसूचना मिळणें. २. मारण्यासाठीं हात शिवशिवणें. **–खुलना–** १. खर्चिक होणें. २. दान देण्यास तयार असणें. ३. मारपीट करणें.**–खोलना** १. दान देणें. २. खूप खर्च करणें. ३. स्वातंत्र्य देणें. **–गलना–**थंडीनें हात गारठणें.**–चढ़ना–** पा० 'हाथ आना'. **–चमकाना–** बायकांसारखे हातवारे करणें.**–चलना–** १. एखादें काम उत्तम प्रकारें करितां येणें. २. मारपीट करण्यास प्रवृत्त होणें. **–चूमना–**एखाद्याच्या कलेवर खुष होणें. **–छूटना–** १. मारण्यासाठीं हात उचलणें. २. काडीमोड होणें.**–छोटा होना–** कृपण, चिक्कू असणें. **–छोड़ना–** १. मारपीट करणें. २. काडीमोड घेणें. **–जड़ना–** थप्पड मारणें; प्रहार, आघात करणें. **–जमना–**१. थप्पड बसणें. २. प्रवीण, निपुण होणें. **–जमाना–** १. थप्पड मारणें. २. निपुण, कुशल बनणें.**–जूठा करना–** थोडेसें खाणें.**–जोड़ देना–** १. पराभव कबूल करणें. २. क्षमा मागणें. ३. संबंध तोडणें; कोपरांपासून नमस्कार करणें; दूर ठेवणें.**–झाड़ना –**१. जवळ एक पैसाहि नाहीं, असें सांगून मोकळें होणें. २. हात टाकणें; मारणें.**–टेकना–** आधार घेणें.**–डालना–** १. एखादें काम सुरू करणें. २. हस्तक्षेप करणें. **–ढीला करना–** १. हात सैल सोडणें; भरपूर खर्च करणें. २. कामांत दिरंगाई करणें. **–तंग होना –**पैशाची चणचण असणें.**–तकना–** एखाद्यावर अवलंबून राहाणें. **–दबना–**आर्थिक सामर्थ्य न उरणें. **–दिखाना–**ज्योतिषी किंवा वैद्य यांना हात दाखविणें. **–देना–** १. आधार, साह्य देणें. २. थांबण्याची खूण करणें, ३. डाव हरणें. ४. मारणें.**–धरना–** १. आधार, साह्य देणें. २. अडविणें. ३. पाणिग्रहण करणें. **–धोकर पीछे पड़ना–**हात धुवून पाठीस लागणें; पिच्छा पुरविणें; सतावणें.**– धोना; – धो बैठना–**घालवून, गमावून बसणें. **(पुट्ठेपर)–न धरने, न रखने देना–** कुणाच्या कह्यांत न जाणें; कोणाचें न ऐकणें; आपलेंच म्हणणें खरें करणें. **–पकड़ते पहुँचा पकड़ना–** थोडीशी सवलत मिळतांच जास्त हातपाय पसरणें; सवलतीचा गैरफायदा घेणें. **–पकड़ना–**पा० 'हाथ धरना'. **–पकडेकी लाज करना, रखना–**एखाद्याला वचन किंवा आश्रय दिल्यानंतर तें शेवटपर्यंत पाळणें. **–पड़ जाना–** १. सहजासहजीं मिळणें; सांपडणें. २. चोरीस जाणें.**–पड़ना–**१. हातीं येणें; मिळणें. २. चोरीस जाणें.**–पर कुरान गंगाजल या गंगाजली रखना–**एखाद्याला कुराणाची किंवा गंगेची शपथ घ्यावयास लावणें.**–पर तोता पालना–**१. हाताला फोड इ० आल्यामुळें काम न करणें. २ हातावरील फोड बरा होऊं न देणें; हात जखमी करणें.**–पर धरा हुआ होना–**हातांत तयार असणें.**–पर नाग खेलाना–**जीव संकटांत घालणें. **–पर हाथ धरकर बैठ जाना–** निराश होणें.**–पर हाथ धरे बैठना या बैठे रहना–** गप्प बसणें; निरुद्योगी राहाणें.**–पर हाथ मारना–** १. वचन देणें. २. पैज मारणें.– **–पसारना–**हात पसरणें; याचना करणें; भीक मागणें.**–पसारे जाना –**या जगांतून बरोबर कांहीं न घेतां परलोकीं जाणें; रिक्तहस्तानें इहलोकाचा निरोप घेणें.**–पाँव चलना –**हातापायांत काम करण्याची शक्ति असणें.**–पाँव चलाना–**हातपाय हलविणें; हालचाल करणें. **–पाँव जोड़ना–**हातांपायां पडणें; गयावया करणें. **–पाँव ठंढे होना–** हातपाय गार पडणें; मरणोन्मुख होणें. **–पाँव ढीले पड़ना–**गळून जाणें.**–पाँव निकालना–** १. खूप धष्टपुष्ट बनणें, बनविणें; फुगत जाणें. २. मर्यादा ओलांडणें. ३. खटचाळपणा करणें; छेडणें; मस्करी करणें.**–पाँव पटकना, फटफटाना –**१. तळमळणें; तडफडणें. २. धांवपळ, प्रयत्न करणें.**–पाँव पसारना–** जास्तीची हांव बाळगणें. **–पाँव पीटना–**निरर्थक धडपड करणें.**–पाँव फूलना–** घाबरून जाणें; निराश होऊन, हाय खाऊन बसणें. **–पाँव फैलाना–** कार्यक्षेत्र विस्ता-

रणें; उन्नति करणें. **–पाँव मारना; –पाँव हिलाना**– खूप प्रयत्न, परिश्रम, धडपड करणें. **–पीले करना**– लग्न करणें. **–पैर**– पा० 'हाथपाँव'. **–फेंकना**–जुगार इ० मध्यें डाव (दान) टाकणें. **–फेर देना**–चोरणें; लंपास करणें. **फेरना**–प्रेमानें थोपटणें, कुरवाळणें. **–फैलाना**–याचना करणें. **–बँटाना**–हातभार लावणें; सहकार्य करणें. **–बंद होना**– पा० 'हाथ तंग होना'. **–बढ़ाना**–१. हात पुढें करणें. २. मदत करणें. ३. आपल्या हक्कापेक्षां अधिक मागणें. **–बाँधे खड़े रहना; –बाँधे रहना**– सेवेसाठीं सदैव तयार राहाणें. **(किसीके)– बिकना, बिकाना**– एखाद्याचा दास बनणें; अध्यी वचनांत राहाणें. **–बैठना**–सराव होणें. **–भरका कलेजा होना**–अत्यंत आनंदित होणें. **–भर की ज़बान होना**– १. अशिष्टभाषी असणें; उद्धट असणें. २. अधाशी असणें. **–भरा होना**– १. श्रीमंत असणें. २. हाताला मेंदी इ० लावलेली असणें. **–भेजना**–हातून, मार्फत धाडणें. **–मँजना**–सराव होणें. **–मलना**–हळहळणें; पस्तावणें; चुटपुटणें. **–माँजना**–सराव करणें. **–मारना**– १. सफाईनें लुबाडणें; लंपास करणें. २. ताव मारणें. **–मिलाना**– १. हस्तांदोलन करणें. २. कुस्तींत सलामी करणें. **–में करना**–आधीन करणें; ताब्यांत घेणें. **–में ठीकरा देना**–भिकारी बनविणें. **–में लेना**– हातीं घेणें; जबाबदारी घेणें. **–में सनीचर आना**–दारिद्र्य येणें. **–में हाथ देना**–पाणिग्रहण, लग्न करणें. **–में होना**–हातांत, ताब्यांत असणें. **–रंगना**–१. एखादें दुष्कृत्य करून बदनाम होणें २. हाताला मेंदी लावणें. ३. लांच घेणें. **–रोकना**– अडविणें; अडथळा आणणें; थांबविणें. **–रोपना**–याचनेसाठीं हात पसरणें. **–लगना**– १. हातीं येणें; मिळणें; ताब्यांत येणें. २. एखाद्या कामाची सुरुवात होणें. **–लगाना**– १. सुरुवात करणें; हातीं घेणें. २ स्पर्श करणें **–लगाये कुम्हलाना**– अत्यंत नाजुक असणें. **–लगे मैला होना** –केवळ स्पर्शानें मलिन किंवा अपवित्र होईल इतकें स्वच्छ व पवित्र असणें. **–लपकाना**–पा० 'हाथ बढ़ाना'. **–समेटना**–पा० 'हाथ खींचना'. **–साधना**–पा० 'हाथ आज़माना'; 'हाथ माँजना'; 'हाथ साफ़ करना'. **(किसीपर)– साफ़ करना**– १. ठार मारणें. २. लुबाडणें. **–से जाना, निकलना**– हातांतून निसटणें. – **(थों) हाथ लेना**– मनापासून स्वागत करणें.

हाथा– *पु.* १. मूठ; दस्ता. २. हातवा; हळदीकुंकवानें हात भिजवून भिंतीवर मारलेला छाप.

हाथाछाँटी– *स्त्री.* देण्याघेण्यांत चलाखी करणें; हातचलाखी.

हाथापाई; हाथाबाँही– *स्त्री.* हातघाई; लाथाबुक्क्यांची मारामारी.

हाथी–*पु.* हत्ती.–*स्त्री.** हाताचा आधार. **–खाना**–*पु.* हस्तिशाला; हत्तीशाळा. **–दाँत**– *पु.* हस्तिदंत. **–पाँव**–पाय सुजण्याचा एक रोग. **–वान**–*पु.* माहूत. **मु०–की राह**– आकाशगंगा. **–के संग गाँड़े खाना** –अत्यंत बलवानाची बरोबरी करूं पाहाणें. **–पर चढ़ना**–१. खूप मोठा सन्मान मिळविणें. २. खूप श्रीमंत होणें. **–बाँधना**–१. खूप श्रीमंत असणें. २. अत्यंत खर्चाचें काम करणें.

हादसा–*पु.* पा० 'हादिसा'.

हादिम–*वि.* [*अ.*] नाश करणारा; विध्वंसक. [२. नश्वर.

हादिस–*वि.* [*अ.*] १. नवीन.

हादिसा–*पु.* [*अ.*] १. नवी घडामोड. २. घटना. ३. दुर्घटना; अपघात.

हादी–*पु.* [*अ.*] मार्गदर्शक; नेता; उपदेशक.

हान*– *स्त्री.* हानि.

हानि– *स्त्री.* १. नुकसान; क्षति. २. तोटा. **–कर; –कारक; –कारी**–*वि.* हानिकारक. **मु०– उठाना**–तोटा, नुकसान सहन करणें.

हाफ़िज़–*पु.* [*अ.*] संपूर्ण कुराण तोंडपाठ असलेला मनुष्य. –*वि.* रक्षण करणारा; रक्षक. **मु० ख़ुदा हाफ़िज़** – ईश्वर रक्षण करणारा आहे; ईश्वर तुमचें रक्षण करो.

हाफ़िज़ा–*पु.* [*अ*] स्मरणशक्ति.

हामिद–*वि.* [*अ.*] ईश्वराची स्तुति, गुणगान करणारा.

हामिल–*वि.* [*अ.*] १. ओझें वाहणारा; हमाली करणारा. २. वाहक.

हामिला–*वि.* *स्त्री.* [*अ.*] गर्भवती; गर्भिणी; गरोदर.

हामी–*वि.* [*अ.*] साहाय्यक; समर्थन करणारा; पक्षपाती.– *स्त्री.* हमी; स्वीकारोक्ति; होकार; मान्यता; स्वीकृति. **मु०–भरना** –मान्यता, हमी देणें.

हाय–*अव्य.* दुःख, कष्ट किंवा शोक व्यक्त करणारा शब्द; अरेरे; हाय हाय.– *स्त्री.* त्रास; व्यथा. **–हाय**–*अव्य.* अरेरे.– *स्त्री.* मानसिक अस्वस्थता; बेचैनी (**मु०–० करना**–उद्विग्न होणें.–० **पड़ना** घाबरून, गोंधळून जाणें). **मु०–**

कर के रह जाना–नाइलाजानें दुःख सहन करीत राहाणें.–पड़ना–तळतळाट लागणें; त्रास देणाऱ्याला त्याची अद्दल घडणें.–मारना–दुःखानें हाय–हाय करणें.–लगना –पा० ' हाय पड़ना. '–होना–जळफळाट होणें.

हायल–*वि.* [*अ.*] १. बाधक; अडथळा आणणारा. २. भयानक; भीषण. ३. कठोर; कठिण. ४.* घायाळ.

हार– *स्त्री.* पराजय; अपयश. –जोत– *स्त्री.* जय–पराजय. मु०– –खाना–पराभूत होणें.–देना–पराभव करणें.

हार–*पु.* १. हार; माळ. २. थकवा. ३. हानि. ४. हरण; जप्ती. ५. विरह.

हारक–*पु.* १. अपहरण करणारा. २. मनोहर; सुंदर. ३. चोर; लुटारू. ४. भाजक (गणित). ५. माळ; हार.

हारना–*क्रि. अ.* १. पराजित होणें; हरणें. २. थकणें.–*क्रि. स.* १. गमावणें. २. सोडून देणें. ३. देऊन टाकणें. मु० हारकर–१. पराभूत होऊन. २. नाइलाजानें.

हारल+–*पु.* पा० ' हारिल '.

हारवार–*– *स्त्री.* घाई; उतावीळ; गडबड.

हारसिंगार–*पु.* पारिजातक.

हारा–*प्रत्य.* ' वाला ' या अर्थाचा प्रत्यय.

हारिज–*वि.* [*अ.*] अडथळा आणणारा; बाधक.

हारिल–*पु.* एक पक्षी (हा आपल्या पंजांत नेहमीं कामटी धरून ठेवतो). मु०–की लकड़ी–नेहमीं जवळ असणारी प्रिय वस्तु.

हारी–*वि.* १. हरण करणारा; अपहारक. २. वाहक.

हारौल–*पु.* पा० ' हरावल '.

हार्द–*वि.* हृदयासंबंधींचा. –*पु.* १. प्रेम. २. प्रयोजन.

हार्दिक–*वि.* आंतरिक; अंतःकरणपूर्वक असलेला.

हाल–*पु.* [*अ.*] १. स्थिति; दशा. २. बातमी; वृत्तांत. ३. विवरण. ४. कथा. ५. भक्तिगीत. ६. आत्मविस्मृति; तल्लीनता. –*वि.* वर्तमानकालीन.–*अव्य.* १. सध्यां; यावेळीं. २. लगेच. मु०– –आना– भक्तिभावनेनें आत्मविस्मृत, तल्लीन होणें. –का– नवीन; ताजा. –में–नुकतेंच.

हाल– *स्त्री.* १. गाडीच्या चाकावरील धांवपट्टी. २. कंपन; हलणें. –गोला–*पु.* चेंडू. –डोल–*पु.* हालचाल.

हालत– *स्त्री.* [*अ.*] १. दशा; स्थिति. २. सांपत्तिक स्थिति. मु० –ग़ैर, तबाह होना–दुर्दशा होणें.

हालना*–*क्रि. अ.* १. हलणें; थरथरणें २. झोंका घेणें.

हालरा–*पु.* १. डोलविणें (मूल). २. झोका. ३. लहर; तरंग.

हालहूल– *स्त्री.* १. आरडा–ओरडा; गोंधळ. २. उलथापालथ.

हालाँकि–*अव्य.* [*फा.*] यद्यपि; जरी.

हाला–*पु.* १. मद्य; दारू. २. सूर्य–चंद्राभोंवतीचें खळें. ३. मंडळ.

हालाडोल–*पु.* हालचाल; खळबळ.

हालात–*पु.* [*अ.* ' हाल ' चें अनेक०] परिस्थिती; गोष्टी; बातम्या. [भयंकर विष.

हालाहल–*पु.* हलाहल; विष;

हालाहाली+– *स्त्री.* घाई; त्वरा.–*अव्य.* घाईनें; गडबडींत.

हाली–*अव्य.* [*अ.*] जलद; लवकर–*वि.* १. यावेळचा; सध्यांचा; आधुनिक; तत्कालीन. २. सजविलेला; शृंगारित. –मवाली–*पु.* साथी; सोबती.

हालों–*पु.* अहाळीव (एक औषधी वनस्पति). [–*पु.* खलबत्ता.

हावन–*पु.* [*फा.*] खल.–दस्ता

हावला–बावला–*वि.* वेडा; वेडपट; विक्षिप्त. [हव्यास.

हावहाव– *स्त्री.* हांव; लालसा;

हावी–*वि.* [*अ.*] १. पसरलेला; आच्छादित; झांकून टाकणारा. २. प्रवीण; कुशल. ३. वश करणारा; घेरणारा.

हाशा–*अव्य.* [*अ.*] १. कदापि; मुळींच. २. पण; परंतु.

हाशिया–*पु.* [*अ.*] १. समास; ' मार्जिन '. २. गोठ; किनार; कांठ. ३. टीप; समासांत दिलेली नोंद; ' फुटनोट '. –नशीन–*वि.* दरबार इ० ठिकाणीं मंडलाकार बसणारे सभासद.–(ये) का गवाह–*पु.* दस्तऐवजाच्या समासांत सही करणारा साक्षीदार. मु०–चढ़ाना– १. कांठ लावणें. २. तिखटमीठ लावून सांगणें.

हास–*पु.* १. हास्य; हसूं. २. विनोद. ३. उपहास; टिंगल.

हासिद–*वि.* [*अ.*] ईर्ष्या, द्वेष करणारा; हितशत्रु.

हासिल–*वि.* [*अ.*] १. उपलब्ध; प्राप्त. २. उरलेला; हातचा.–*पु.* १. हातचा आंकडा (गणित). २. पीक. ३. लाभ; नफा. ४. सारावसुली; जमा. ५. गुणनफल; गुणाकार. –कलाम–*पु.* सार; सारांश; तात्पर्य.–जमा–*पु.* बेरीज. –ज़रब; –ज़र्ब–*पु.* गुणनफल; गुणाकार. –तक़सीम–*पु.* भागाकार; भागफल.

मु०–आना; –लगना–हातचें येणें. (ग०). –करना–मिळविणें; प्राप्त करणें. –होना–मिळणें. [हास्य.

हासी–*वि.* हंसणारा. –*स्त्री.*+

हाहा–*अव्य.* आश्चर्य, शोक इ० सूचित करणारा उद्‌गार. –कार–*पु.* १. विलाप. २. कोलाहल; हाहाकार; गोंधळ; घबराट.

हाहा–*पु.* १. खदखदून हंसण्याचा आवाज. २. गयावयां करणें. –ठीठी–*स्त्री.* थट्टा–मस्करी. –हीही–*स्त्री.* थट्टा–विनोद; मस्करी. (मु०–०करना–थट्टा मस्करी करणें. –०मचना;–० होना–थट्टाविनोद चालणें). –हूहू–*पु.* थट्टा–मस्करी. मु०–करना, खाना–गयावयां करणें. –मचना,होना–हास्यविनोद चालणें.

हाही–*स्त्री.* एखादी वस्तु मिळावी म्हणून होणारी व्यग्रता. मु०–पड़ना–एखादी वस्तु मिळावी म्हणून अत्यंत व्यग्र होणें.

हाहू*–*पु.* धुडगूस; गोंधळ; आरडाओरडा.

हाहूबेर–*पु.* रानबोर.

हिं– प्रत्यय. पा० 'हि'.

हिंकरना–*क्रि. अ.* घोडचाचें खिंकाळणें.

हिंग–*स्त्री.* हिंग.

हिंगलाज–*स्त्री* पा० 'हिंगुलाजा'.

हिंगुला–*स्त्री.* सिंध व बलुचिस्तान यांच्यामध्यें असलेला एक प्रदेश. –जा–*स्त्री.* या प्रदेशात असलेली दुर्गा–देवीची मूर्ति.

हिंगोट–*पु.* हिंगणबेट.

हिंछना+–*क्रि. अ.* इच्छिणें.

हिंछा*–*स्त्री.* इच्छा.

हिंडक–पोत–*पु.* युद्धनौका; 'क्रूझर'.

हिंडोरना+–*पु.* पा० 'हिंडोला'. –*क्रि. स.* पा० 'हिंडोलना'.

हिंडोरा*–*पु.* पा० 'हिंडोलना'.

हिंडोरी*–*स्त्री.* लहान झोपाळा, पाळणा.

हिंडोल–*पु.* १. झोंपाळा. २. पाळणा. ३. एक राग.

हिंडोलना+–*पु.* पा० 'हिंडोला'. –*क्रि. स.* १. हलविणें; झोंका देणें. २. खळबळणें.

हिंडोला–*पु.* १. झोंपाळा. २. पाळणा. ३. हिंदोळा; झोंका. ४. रहाट.

हिंद–*पु.* [*फा.*] भारत; हिंदुस्ता (स्था) न. हें नांव 'सिंधु' शब्दाचें फारसी व परिवर्तित रूप आहे. [टरबूज.

हिंदवाना–*पु.* [*फा.*] कलिंगड;

हिंदवी–*स्त्री.* [*फा.*] हिंदुस्थानची भाषा; हिंदी. –*वि.* हिंदुस्थानचा; भारतीय.

हिंदी–*स्त्री.* [*फा.*] उत्तर भारतांत सर्वसामान्यतः प्रचलित असलेली भाषा; भारताची राज्यभाषा, राष्ट्रभाषा. –*पु.* भारतीय; हिंदी व्यक्ति.–*वि.* हिंदुस्थानांतील; भारतीय; हिंदी. [कलिंगड.

हिंदुआना–*पु.* [*फा.*] टरबूज;

हिंदुआनी–*स्त्री.* [*फा.*] हिंदुत्व.

हिंदुस्तानी–*वि.* [*फा.*] भारतीय; हिंदुस्थानचा राहणारा; हिंदुस्थानविषयक.–*पु.* भारतवासी; भारतीय. –*स्त्री.* भारताची भाषा; रोजच्या वापरांतील हिंदी भाषा; संस्कृतचे किंवा अरबी-फारसीचे अवघड व अप्रचलित शब्द नसलेली सोपी हिंदी भाषा.

हिंदू–*पु.* [*फा.*] १. हिंदुधर्म मानणारा. २. हिंदी; भारतवासी.

हिंदोरना–*क्रि. स.* ढवळणें; खळबळणें.

हिंदोस्तां; हिंदोस्तान–*पु.* [*फा.*] हिंदुस्थान; भारत. ['हिंदुस्तानी'.

हिंदोस्तानी–*वि. पु. स्त्री.* पा०

हियां*–*अव्य.* येथें.

हिंव+–*पु.* १. हिम; बर्फ. २. हृदय. ३. दंव.

हिंवार+–*पु.* हिम; बर्फ; दंव.

हिंस*–*स्त्री.* घोडचाचें खिंकाळणें.

हिंसना*–*क्रि. अ.* खिंकाळणें. –*क्रि. स.* १. ठार मारणें. २. नुकसान करणें. ३. त्रास देणें; सतावणें. [२. कष्ट; पीडा.

हिंसा–*स्त्री.* १. हत्या; वध.

हिंस्त्र–*वि.* १. हिंसा करणारा; घातक. २. जंगली. ३. भयंकर; हानिकारक.

हि*–*प्रत्य.* अनेक विभक्तींचा, विशेषतः द्वितीया व चतुर्थी या विभक्तीचा प्रत्यय म्हणून पूर्वी वापरला जाणारा शब्द.–*अव्य.* च.

हिअ–आ*–*पु.* १. हृदय; छाती. २. मन. [धाडस; साहस.

हिआउ–व–*पु.* हिम्मत;

हिकमत–*स्त्री.* [*अ.*] १. हुशारी; चातुर्य. २. कला–कौशल्य. ३. युक्ति; उपाय. ४. तत्वज्ञान. ५. वैद्यकी –(ते) अमली–*स्त्री.* १. राजकारण. २. चलाखी.

हिकमती–*वि.* [*अ.*] १. कार्यकुशल. २. चतुर; चलाख.

हिकलाना–*क्रि. अ.* पा० 'हकलाना'.

हिकायत–*स्त्री.* [*अ.*] १. कहाणी; गोष्ट. २. नीतिकथा. [–अनेक० 'हिकायात']

हिक़ारत–*स्त्री.* [*अ.*] तुच्छता.

हिक्का–*पु.* १. उचकी; उचकीचा आजार. २. अस्पष्ट ध्वनि.

हिचक–*स्त्री.* कांकू करणें; अनमान; घुटमळणें.

हिचकना–*क्रि. अ.* १. घुटमळणें; कचरणें; मागेंपुढें पाहाणें; कांकू करणें. २. उचकी लागणें.

हिचकिचाना–*क्रि. अ.* कचरणें; कांकू करणें.

हिचकिचाहट; हिचकिची–*स्त्री.* कांकू करणें; पा० 'हिचक'.

हिचकी–*स्त्री.* १. उचकी २. हुंदका; स्फुंदणें. **मु०–बँध जाना; –लगना**–जास्त रडल्यामुळें श्वास लागणें. **हिचकियाँ लगना**–शेवटची उचकी लागणें; घरघर लागणें. **–लेना**–स्फुंदणें; हुंदका देणें.

हिच(चि)र–मिच(चि)र –पु. कुचराई; टाळाटाळ; कचरणें; कांकू करणें. [षंढ.

हिजड़ा–*पु.* नपुंसक; हिजडा;

हिजरत–*स्त्री.* [*अ.*] देशत्याग; पलायन.

हिजरी–*वि.* [*अ.*] हिजरत, देशत्याग, पलायन करणारा.–*पु.* हजरत मुहम्मद पैगंबर यांनीं मक्केहून मदीनेला पलायन केल्याच्या तारखेपासून (१५ जुलै सन ६२२ पासून) सुरू होणारा मुसलमानी सन.

हिजाज़–*पु.* [*अ.*] अरबस्तानचा एक भाग. मक्का व मदिना हीं मुस्लिम तीर्थस्थानें या भागांत येतात.

हिजाब–*पु.* [*अ.*] १. पडदा. २. लाज; संकोच. **मु०–उठना**–१. पडदा न राहाणें. २. निर्लज्ज बनणें.

हिज्जे–*पु.* [*अ.*] एखाद्या शब्दांतील अक्षरें अथवा मात्रा फोडून सांगणें; शुद्धलेखन; वर्णविवृति; 'स्पेलिंग'. **मु०–करना**–१. अक्षरें जोडणें. २. हुज्जत घालणें. **–निकालना**–१. तुकडे करणें. २. हरकत घेणें. **–पकड़ना**–चूक काढणें.

हिज्र–*पु.* [*अ.*] वियोग; विरह.

हिटकना+–*क्रि. स.* हटकणें; अडविणें; रोखणें.

हिडोरा–ला; पा० 'हिंडोला'.

हित–*पु.* १. कल्याण. २. लाभ. ३. उपकार. ४. मित्र. ५. प्रेम; सद्भाव. –*अव्य.* करितां; साठीं. –*वि.* १. योग्य; चांगला. २. हित करणारा; मित्र. **–कर; –कारक; –कारी**–हितचिंतक; हित इच्छिणारा; हितेच्छु; उपकार करणारा. **–वचन; –वाक्य; –वाद–पु.** हिताची गोष्ट.

हितवना*–*क्रि. अ.* १. मित्राप्रमाणें वागणें. २. बरें वाटणें.

हितवार*–*पु.* प्रेम; स्नेह.

हिताई–*स्त्री.* नातें.

हिताधिकारी–*पु.* फायदा मिळविणारा, मिळणारा, 'बेनीफिशियरी'.

हिताना*–*क्रि. अ.* १. मित्राप्रमाणें वागणें. २. प्रिय वाटणें; आवडणें. ३. अनुकूल होणें.

हिताहित–*पु* १. लाभहानि. २. नफातोटा.

हिती; हितु–तू–*–पु. १. हित–चिंतक. २. नातेवाईक. ३. स्नेही; मित्र.

हितेच्छु; हितैषी – *वि.* भलें इच्छिणारा; हितचिंतक.

हितौना*– *क्रि. अ.* पा० 'हिताना'.

हिदायत–*स्त्री.* [*अ.*] १. उपदेश; शिकवण. २. सूचना; मार्गदर्शन. ३. ताकीद. **–नामा–पु.** सूचना–पुस्तक.

हिद्दत–*स्त्री.* [*अ.*] १. तीव्रता; उग्रता; प्रकोप. २. क्रोध. ३. उष्णता.

हिनकाना+–*क्रि. अ.* खिंकाळणें.

हिनती*– *स्त्री.* हीनता.

हिनहिनाना–*क्रि. अ.* खिंकाळणें (घोड्याचें); खेंकाळणें.

हिनहिनाहट– *स्त्री.* खिंकाळणें (घोड्याचें).

हिना–*स्त्री.* [*अ.*] मेंदी.**–बंदी**–*स्त्री.* मुसलमानांतील एक विवाहविधि. **–का चोर–पु.** मेंदी न लागलेला हाताचा भाग (बा०).

हिनाई–*वि.* मेंदीच्या रंगाचा. *स्त्री.* १. पिवळसर लाल रंग. २. हीनता; दुर्बळता; मानहानि.

हिन्द; हिन्दी; हिन्दुआनी–पा० 'हिंद' 'हिंदी', 'हिंदुआनी' इ०

हिफ़ाजत–*स्त्री.* [*अ.*] १. रक्षण; बचाव; संरक्षण. २. देखरेख. –(ते) **ख़ुदइख़्तियारी**–*स्त्री.* आत्मरक्षण.

हिफ़ाजती–*वि.* [*अ.*] संरक्षक. **–दस्ता–पु.** संरक्षक तुकडी.

हिफ़्ज़–*पु.* रक्षण; संरक्षण.–*वि.* तोंडपाठ; कंठस्थ (करना, होना). **–सेहत–पु.** आरोग्यरक्षण.

हिब्बा–*पु.* [*अ.*] १. दान. २. दाता. **–नामा–पु.** १. दानपत्र. २. ताम्रपट.

हिमंचल+–*पु.* हिमालय.

हिम–*वि.* थंड; गार.–*पु.* १. बर्फ. २. दंव; धुकें. ३. थंडी. ४. हिंवाळा.**–कण–पु.** दंवबिंदु. **–नदी**– *स्त्री.* बर्फाची नदी; 'ग्लेशियर'. **–मय वृष्टि**– *स्त्री.* पावसाबरोबर गारा किंवा बर्फ पडणें; 'स्लीट'. **–रेखा**– *स्त्री.* पर्वतावर जेथें सदैव बर्फ असतें अशा स्थानाखालील कल्पित रेखा; 'स्नोलाइन'. **–शिलास्खलन–पु.** बर्फाचा कडा कोसळणें, 'ॲव्हेलान्श'. **–शैल–पु.** हिमपर्वत; बर्फाचा डोंगर; 'आइसबर्ग'.

हिमयानी– *स्त्री.* [*फा.*] १. कसा (पैशाची). २. कमरेभोंवतीं बांधण्याची लांब पिशवी.

हिमांक– *पु.* १. कापूर. २. थिजण्याचा बिंदु; 'फ्रीझिंग पॉइंट'.

हिमाक़त– *स्त्री.* [*अ.*] मूर्ख-पणा; निर्बुद्धता.

हिमामदस्ता– *पु.* [*फा.*] खल-बत्ता. ['अॅव्हेलान्श'.

हिमानी– *स्त्री.* बर्फाचा खडक;

हिमायत– *स्त्री.* [*अ.*] १. समर्थन; पक्षपात; तरफदारी; शाबासकी. २. साह्य; मदत. ३. मैत्री.

हिमायती–*वि.* [*अ.*] १. समर्थन करणारा. २. सहाय्यक. ३. पक्षपाती.

हिमाला– *पु.* हिमालय.

हिमि*– *पु.* हिम; बर्फ; दंव.

हिमीकर– *पु.* प्रशीतक; 'रिफ्रीजरेटर'.

हिमीकरण– *पु.* गोठविणें; थिजविणें; 'फ्रीझ'. ['फ्रीझ'.

हिमीभवन– *पु.* गोठणें; थिजणें;

हिम्मत– *स्त्री.* [*अ.*] १. धाडस; धीर; हिम्मत. २. पौरुष; पराक्रम. **मु०–का धनी;––वाला**– धाडसी; धैर्यवान्.**–पड़ना**–धीर होणें. **–हारना**– धीर सोडणें.

हिम्मती–*वि.* [*अ.*] १. धाडसी; धीराचा २. पराक्रमी.

हिय*– *पु.* हृदय; छाती. **मु० –हारना**–निराश, हतोत्साह होणें. पा० 'हिया'.

हियरा*– *पु.* पा० 'हिय–या'.

हियाँ+–*अव्य.* येथें.

हिया– *पु.* हृदय; मन; अंतःकरण; छाती. **मु०–जलना**– जळफळाट होणें; क्रोध येणें. **–ठंढा होना**– हृदय, मन शांत होणें. **–फटना**– हृदय विदीर्ण होणें; भयंकर दुःख होणें.**–भर आना**– हृदय भरून येणें; करुणार्द्र, दुःखार्त होणें. –(**ये**) **का अंधा**– अडाणी; मूर्ख. **–की फूटना**– सत्-असत्चें ज्ञान न राहाणें; अज्ञानांत राहाणें. **–पर पत्थर धरना**– धीर धरणें; सहन करणें. **–में लोन-सा लगना**– जखमेवर मीठ चोळलें जाणें. **–लगाना**– आलिंगन देणें; मिठी मारणें; छातीशीं धरणें.

हियाव*– *पु.* धीर; धाडस; हिंमत. **मु०–खुलना**– धीर येणें. **–पड़ना**– हिम्मत होणें.

हियैल*– *स्त्री.* हातांत मागील बाजूस घालावयाचा एक दागिना.

हिरकना*– *क्रि.अ.* चिकटणें; जवळ जाणें; भिडणें.

हिरकाना*–*क्रि.स.* जवळ नेणें; भिडविणें; स्पर्श करविणें.

हिरन–*पु.* १. सुवर्ण; सोनें. २. वीर्य. ३.* हरिण.

हिरणमय–*वि.*सोन्याचा; सोनेरी. –*पु.* ब्रह्मा.**–कोश**–*पु.* सूक्ष्म शरीर.

हिरण्य–*पु.* १. सोनें; चांदी. २. शुक्र; वीर्य. ३ अमृत. –*वि.* सोन्याचा. **–कशिपु**– *पु.* भक्त प्रल्हादाचा पिता.**–कार**–*पु.* सोनार. **–गर्भ**– *पु.* १. ब्रह्मा. २. सूक्ष्म शरीर धारण करणारा आत्मा.

हिरण्याक्ष– *पु.* हिरण्यकशिपूचा जुळा भाऊ. याला विष्णूनें वराह-रूप घेऊन ठार मारलें.

हिरदय; हिरदा; हिरदै– *पु.* १. हृदय. २. मन.

हिरन–*पु.*हरिण.**मु०–हो जाना**– पळून जाणें; नाहींसे होणें.

हिरनाकुस*–*पु.* हिरण्यकशिपु.

हिरनौटा–*पु.* हरिणाचें पाडस.

हिरफ़त– *स्त्री.* [*अ.*] १. हस्त-कौशल्य; कारागिरी. २. धूर्तपण ३. विद्या; हुन्नर. ४. पेशा; धंदा. **–बाज़**–*वि.* चलाख; चतुर.

हिरम(मि)ज़ी– *स्त्री.* [*अ.*] १. विशिष्ट प्रकारची लाल माती; काव. २. हुरमूज (रंग).

हिरस– *स्त्री.* पा० 'हिर्स'.

हिरात– *पु.* अफगाणिस्तानच्या सीमेजवळील एक नगर.

हिराना–*क्रि.अ.* १. हरवणें. २. चकित होणें. ३. स्वतःस विसरणें. ४. न टिकणें; न राहाणें. –*क्रि.स.* १. विसरणें; लक्षांत न ठेवणें. २. खतासाठीं शेतांत शेळ्या-मेंढ्या बसविणें. [आघाडी.

हिरावल– *पु.* [*अ.*] सैन्याची

हिरास– *स्त्री.* [*फा.*] १. भीति. २. दहशत. ३. नैराश्य. –*वि.* पा० 'हिरासाँ'.

हिरासत– *स्त्री.* [*अ.*] कच्ची कैद; पोलीस कोठडी; पहारा; नजरबंदी; 'कस्टडी'.

हिरासाँ– *वि.* [*फा.*] १. भ्यालेला; घाबरलेला. २. निराश.

हिरौंजी+–*स्त्री.* [*अ.*'हिरमज़ी'] एक प्रकारची लाल माती.

हिरौल*– *पु.* पा० 'हरावल'.

हिर्फ़त– *स्त्री.* [*अ.*] पा० 'हिरफ़त'.

हिर्स– *स्त्री.* [*अ.*] लोभ; लालसा; तृष्णा. **मु०–करना;–छूटना;–होना**– लोभ सुटणें; हव्यास लागणें. **–दिलाना;–देना**– लालूच, लोभ दाखविणें. [अधाशी.

हिर्साहा–*वि.* [*अ.*] लोभी;

हिर्साहिर्सी– *अव्य.* दुसऱ्यांचें पाहून; अनुकरणानें.

हिर्सी– *वि.* [*अ.*] लोभी; अधाशी. **–टट्टू**–*पु.* दुसऱ्याचें पाहून लोभ सुटणारा.

हिर्सो हवस; हिर्सो हवा– *स्त्री.* [*अ.*+फा.] लोभ; लालूच; हव्यास.

हिलकना⁺–*क्रि. अ.* १. पा० 'हिरकना'. २. कांकूं करणें. ३. स्फुंदणें. –*क्रि.* स गोळा करणें.

हिलकी*– *स्त्री.* १. उचकी. २. हुंदका; स्फुंदन. ३. लहर.

हिलकोर–*पु.* तरंग; लाट.

हिलकोरना– *क्रि.* स. पाणी ढवळणें; लाटा निर्माण करणें.

हिलकोरा–*पु.* पाण्याची लाट; तरंग. **मु० –देना–** पाणी हलविणें; लाटा उठविणें. **–लेना–** तरंगित होणें.

हिलग– *स्त्री.* १. माणसाळणें. २. घनिष्ठ संबंध; प्रेम; जवळीक.

हिलगना–*क्रि. अ.* १. माणसाळणें. २. जवळीक होणें; प्रेम होणें. ३. जवळ येणें. ४. अडकणें; गुंतणें.

हिलगाना–*क्रि. स.* १. माणसाळविणें; संवय लावणें. २. जवळ आणणें. ३. अडकविणें; गुंतविणें.

हिलना–*क्रि. अ.* १. हलणें; अस्थिर, चंचल होणें. २. कांपणें; थरथरणें. ३. माणसाळणें; परिचित होणें. ४. पाण्यांत शिरणें. **मु० हिल जाना–** संवय होणें; माणसाळणें. **–डोलना–** १. चंचल, अस्थिर होणें. २. हिंडणें–फिरणें. ३. कामधंदा करणें. ४. प्रयत्न, धडपड करणें. **–मिलना–** मिसळणें; घनिष्ठ संबंध ठेवणें. **हिलमिलकर–** मिळून-मिसळून; गुण्यागोविंदानें. [मासळी.

हिलसा– *स्त्री.* एक प्रकारची

हिलाना–*क्रि. स.* १. हलविणें. २. दूर करणें. ३. कंपविणें; हेलकावा देणें. ४. पाण्यांत सोडणें. ५. माणसाळविणें; संवय लावणें. ६. डोलविणें.

हिलाल–*पु.* [*अ.*] नवीन चंद्र; बालचंद्र; शुक्ल प्रतिपदेचा किंवा द्वितीयेचा चंद्र. [हेलकावा.

हिलोर–*पु.* तरंग; लाट;

हिलोरना–*क्रि. स.* १. ढवळणें; खळबळणें. २. फडकविणें.

हिलोरा–*पु.* तरंग; लाट; हेलकावा. **मु०–(रे) लेना**–हेलकावे खाणें; तरंगित होणें.

हिलो(ल्लो)ल–*पु.* १. तरंग; हेलकावा; लाट. २. मौज; आनंद. ३. लहर. [दंव.

हिवँ⁺–*पु.* हिम; हिंव; बर्फ;

हिवंचल⁺–*पु.* १. हिमालय. २. दंव; हिम; बर्फ.

हिवाँर–*पु.* हिम; दंव. **मु० –होना–** थंडगार पडणें.

हिस– *स्त्री.* [*अ.*] १. अनुभूति; संवदेना. २. गति; हालचाल.

हिसका⁺–*पु.* १. द्वेष; ईर्ष्या. २. स्पर्धा.

हिसाब–*पु.* [*अ.*] १. हिशेब. २. गणना; मोजदाद. ३. गणित; गणिताचा प्रश्न; गणितशास्त्र. ४. भाव; दर. ५. मत; विचार. ६. नियम; रीत; पद्धत. ७. व्यवहार; देवाण-घेवाण. ८. काटकसर. ९. व्यवस्था. १०. स्थिति; दशा. **–किताब**–*पु.* १. हिशेबठिशेब; हिशेब; जमाखर्च. २. रीत; पद्धत. **–दाँ**–*वि.* १. गणितज्ञ. २. हिशेब जाणणारा. **–बही**– *स्त्री.* जमाखर्चाची वही. **मु० –करना–** हिशेब करणें; देणें-घेणें निश्चित करणें; हिशेब पुरा करणें. **–चुकता करना–** देणें देऊन टाकणें. **–तलब करना–** हिशेब मागणें. **–देना–** हिशेब समजाऊन सांगणें. **–न होना–** मोजदाद नसणें. **–पर चढ़ना–** हिशेबाच्या वहींत नमूद होणें. **–पाक करना–** देणें देऊन टाकणें. **–पूछना–** हिशेब मागणें. **–बेबाक करना–** खात्यावर बाकी न ठेवणें. **–बैठना–** १. व्यवस्था होणें. २. मेळ बसणें. **–साफ़ करना–** देणें-घेणें पूर्ण करणें. **–से–** १. योग्य प्रमाणांत; काटकसरीनें. २. क्रमानें. ३. हिशेबाप्रमाणें. **(किसीके)– से–** मतानें; दृष्टीनें. **–से चलना–** १. मोजूनमापून काम करणें. २. काटकसरीनें खर्च करणें.

हिसाबी–*वि.* [*अ.*] १. हिशेब जाणणारा. २. व्यवस्थित वागणारा.

हिसार–*पु.* [*अ.*] १. घेरा; वेढा. २. आवार; शहराचा तट. ३. किल्ला. **मु० –करना–** वेढा घालणें. **–बाँधना–** वेढणें; वेढा घालणें. [२. स्पर्धा; चढाओढ.

हिसिखा–षा*– *स्त्री.* १. ईर्ष्या.

हिस्सा–*पु.* [*अ.*] १. भाग; अंश; खंड. २. वांटा; पाती. ३. तुकडा. ४. अवयव. **–बखरा**–*पु.* अंश; भाग. (**मु०– होना–** वांटणी होणें; तुकडे पडणें). **–बाँट**–*पु.* विभाजन; वाटणी. **–रसदी**–*अव्य.* हिश्शाप्रमाणें. **–(स्से)दार**–*पु.* १. भागीदार; पातीदार. २. वांटा मिळालेला. **मु० –लेना–** भाग घेणें. **–(स्से) करना–** वांटणी करणें. **–(स्से)में आना–** वांटा मिळणें.

हिहिनाना*–*क्रि. अ.* खिकाळणें.

हींग– *स्त्री.* हिंग; हिंगाचें झाड.

हींछना*–*क्रि. अ.* इच्छिणें; अभिलाषा बाळगणें.

हींछा*– *स्त्री.* इच्छा; कामना.

हींडना⁺–*क्रि. स.* हलवून गढूळ करणें.

हींस– *स्त्री.* घोड्याचें किंवा गाढवाचें ओरडणें; खिकाळणें.

हींसना–*क्रि. अ.* खिकाळणें.
हींसा+–*पु.* पा० 'हिस्सा'.
हींहीं– *स्त्री.* हास्यध्वनि.
ही–*अव्य.* च. –*पु.** हृदय; मन; चित्त. –*क्रि. अ.** होती.
हीअ*–*पु.* १. हृदय. २. छाती.
हीक– *स्त्री.* १. ओकारी येण्यासारखी घाण; दुर्गंध. २. उचकी. **मु० –मारना**– १. वारंवार दुर्गंध सोडणें. २. घाण सुटणें.
हीचना*– *क्रि. अ.* १. कांकूं करणें. २. अडणें. ३. ओढणें.
हीछना+–*क्रि.अ.*पा० 'हींछना'.
हीठना–*क्रि. अ.* १. जाणें; जवळ जाणें. २. पोहोंचणें.
हीन–*वि.* १. अधम; नीच. २. निंद्य; गर्ह्य. ३. रहित; वंचित; वर्जित. ४. निकृष्ट; तुच्छ; दीन. ५. अल्प; क्षीण. **–यान**–*पु.* बौद्ध धर्माच्या दोन पंथांपैकी एक. या पंथाचे अनुयायी केवळ बुद्ध-वचनच प्रमाण मानतात. **–वादी**–*वि.* परस्परविरोधी विधानें करणारा.
हीन–*पु.* [*अ.*] काळ; समय. **–हयात**–*पु.* आयुष्य; जीवन-काल. –*अव्य.* जन्मभर; आमरण. **–हयाती**–*वि.* ज्याच्यावर जन्मभर अधिकार आहे असा. **–०काश्तकार**–*पु.* जमिनीवर आमरण वहिवाटीचा अधिकार असलेलें कूळ.
हीनोपमा– *स्त्री.* ज्यामध्यें मोठ्याची उपमा लहानाला दिलेली असते, असा एक उपमा–अलंकार.
हीय–या; हीयरा*–*पु.* हृदय; मन; चित्त.
हीर–*पु.* १. सार; सत्त्व; सारांश. २. गर; गीर. ३. वीर्य; शक्ति. ५. हिरा. ६. वीज. ७. सर्प.
हीरक–*पु.* हिरा.–*वि.* हिऱ्याचा. **–जयंती**–*स्त्री.*; **–महोत्सव**–*पु.* साठ वर्षे पूर्ण झाल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ केला जाणारा उत्सव.
हीरा–*पु.* १. हिरा. २. उत्तम व्यक्ति किंवा वस्तु. **– आदमी** –*पु.* चांगला माणूस.**–कसीस**–*पु.* हिराकस. **– मन** – *पु.* लोककथांतून येणारा एक काल्पनिक सोनेरी पोपट. **मु०– खाना; – चाटना; –(रे) की कनी खाना या चाटना**–हिरकणी खाऊन आत्महत्या करणें.
हील– *स्त्री.* [*फा.*] लहान वेलदोडा.
हील–*पु.* १. वीर्य; शुक्र. २.+ गटारांतील गाळ; चिखल.
हील–*पु.* [*इं.*] वाहणेची किंवा बुटाची टांच.
हीलतन्–*अव्य.* [*अ.*] मिषानें; कपटानें.
हीलना*–*क्रि. अ.* पा०'हिलना'.
हीला – *पु.* [*अ.*] १. मिष; बहाणा; कपट. २. काम; रोजगार. ३.+ चिखल. **– गर; –बाज; –साज**–*वि.* १. बहाणा करणारा. २. धूर्त. **– हवाला** – *पु.* टाळाटाळ. **मु०–निकलना**–उपाय, मार्ग निघणें. **–होना–**१. बहाणा होणें. २. नोकर बनणें. ३. प्रयत्न होणें.
हीसका*– *स्त्री.* ईर्ष्या; स्पर्धा.
ही ही– *स्त्री.* १. जोराचा हास्यध्वनि; खिदळणें. २. विकट हास्य.
हुँ – *अव्य.* १. हं; होय. २.* पा० 'हूं'. ['हुंकारना'.
हुंकना; हुँकरना–*क्रि. अ.* पा०
हुंकार–*पु.* १. डरकाळी; गर्जना. २. दटावणी; आह्वान.
हुंकारना – *क्रि. अ.* डरकाळी फोडणें; गर्जना करणें; जोरानें ओरडणें.–*क्रि. स.* आह्वान देणें; दटावणें.
हुँकारी – *स्त्री.* होकार; 'हूं' म्हणणें. **मु०–भरना**–१. गोष्ट ऐकतांना 'हूं हूं' म्हणणें. २. सम्मति, स्वीकृति देणें.
हुंडा – *पु.* १. लग्नांत दिला जाणारा हुंडा. २. जमीनमालकाला मिळणारें धान्य.
हुँड़ार–*पु.* लांडगा.
हुंडावन–*पु.* १. हुंडीची वटणावळ; २. हुंडीचा दर.
हुंडी– *स्त्री.* हुंडी; 'चेक'. **मु०–करना**–हुंडी लिहिणें.**–खड़ी रखना –**१. हुंडी न स्वीकारणें. २. हुंडी तहकूब ठेवणें.**–पटना**–हुंडीचा पैसा दिला जाणें. **– सकारना** – हुंडी स्वीकारणें; हुंडींत लिहिलेली रक्कम देण्याचें मान्य करणें.
हुँत-ते*–*प्रत्य.* तृतीया व पंचमीचे विभक्ति–प्रत्यय.**–*अव्य.*** १. साठीं. २. कडून. [२. होय.
हु*–*अव्य.* १. सुद्धां; हि; देखील
हुआँ– *पु.* कोल्हेकुई. – *अव्य.*+ तेथें. [डणें; कोल्हेकुई करणें.
हुआना–*क्रि.अ.*कोल्ह्याचें ओर-
हुक–*पु.* [*इं.*] आकडा; गळ; कडी; 'हूक'.– *स्त्री.*+ उसण; हूक; चमक.
हुकना–*क्रि. अ.* चुकणें. हुकणें.
हुकना–*पु.* [*अ.*] बस्ती; शौचाला व्हावें म्हणून दिली जाणारी पिचकारी किंवा वात; 'एनिमा'.
हुकरना–*क्रि.अ.* पा० 'हुँकरना'.
हुकारना – *क्रि. अ. स.* पा० 'हुँकारना'.
हुकुम+–*पु.* पा० 'हुक्म'.
हुकुर-पु(हु)कुर – *स्त्री.* अशक्तपणा, भीति इ० मुळें छातींत होणारी धडधड. [हक्क; अधिकार.
हुक़ूक़–*पु.* [*अ.* 'हक़'चें अनेक०]
हुकूमत– *स्त्री.* [*अ.*] १. सत्ता; अधिकार. २. राज्य; शासन;

आधिपत्य. मु० – चलाना – सत्ता, अधिकार चालविणें. – जताना – अधिकार गाजविणें; सत्तेचा टेंभा मिरविणें.

हुक़्का–पु.]अ.] १. हुक्का; गुडगुडी. २. जडजवाहीर ठेवण्याची डबी.–**तमाखू**–पु. हुक्का ओढण्यास देऊन सत्कार करणें.–**पानी**–पु. १. हुक्का ओढणें, ओढावयास देणें २. फराळ; आदरसत्कार. ३. जातींतील परस्परसंबंध. (मु०–०करना १. फराळ करणें. २. समेट करणें; संबंध ठेवणें. – ०पिलाना – आदर सत्कार करणें.–०बंद करना–जातिबहिष्कृत करणें संबंध तोडणें).–**बरदार**–पु. हुक्का घेऊन बरोबर राहाणारा नोकर; – **बाज़** – पु. १. फार हुक्का ओढणारा; व्यसनी. २. डोंबारी; जादूगार; गारुडी.

हुक्काम–पु. [अ. 'हाकिम'चें अनेक०] अधिकारीवर्ग; वरिष्ठ अधिकारी.

हुक्म–पु.[अ.] १. हुकूम; आज्ञा; आदेश. २. निर्णय; निकाल. ३. परवानगी; अनुमति. ४. अधिकार; सत्ता. ५. पत्त्यांतील एक रंग; इस्पिक.–**क़तई**–पु. अखेरचा निर्णय. –**गश्ती**–पु. परिपत्रानें पाठविण्यांत आलेली आज्ञा. – **दरमियानी** –पु. तात्पुरता हुकूम.–**नामा**.–पु. आज्ञापत्र; हुकूमनामा. – **बरदार** –वि. आज्ञाधारक. –पु. सेवक; नोकर. –**राँ**; –**रान**–वि. हुकुम देणारा; आज्ञा करणारा.–पु. शासक; सत्ताधीश.–**रानी**– स्त्री. सत्ता; शासन. मु० – **की तामील करना**–आज्ञापालन करणें; हुकुमाची अंमलबजावणी करणें. – **चलना** – सत्ता, अधिकार असणें, चालणें.–**चलाना**–शासन, राज्य करणें.–**बजा लाना**–आज्ञेचें पालन करणें.–**में होना**–आज्ञेंत असणें. – **लगाना** – निका , निर्णय देणें.

हुक्मी–वि.[अ.]१. अचूक; रामबाण. २. आज्ञाधारक.–**बंदा** – वि. पु. आज्ञेंत राहाणारा; हुकमाची अंमलबजावणी करणारा.

हुचकी– स्त्री. उचकी.

हुजरा–पु. [अ.] १. खोली; खासगी खोली. २. उपासना करण्याची खोली.

हुजूम–पु. [अ.] गर्दी; दाटी.

हुज़ूर–पु. [अ.] १. हजर होणें; उपस्थित राहाणें; सामीप्य; उपस्थिति; समोर येणें. २. दरबार; सभा; कचेरी. ३. वरिष्ठासाठीं वापरलें जाणारें संबोधन; महाराज; महाशय. –**वाला** – (संबोधन) महाराज; महाशय. – मु० (**किसीके**) – **में** – समोर; सेवेसीं; दरबारांत.

–**हुज़ूरी**– स्त्री. [अ.] १. समीपता; सामीप्य. २. हजिरी; उपस्थिति. ३. दरबार. – पु. खास नोकर; हुजऱ्या. –वि. खाशा स्वारीचा; सरकारी.

हुज्जत– स्त्री. [अ.] १. हुज्जत; झगडा. २. वादविवाद; निरर्थक वाद.

हुज्जती–वि. भांडखोर; हुज्जत घालणारा.

हुड़कना–क्रि. अ. १. भयभीत अथवा दुःखी होणें. २. तळमळणें.

हुड़का–पु. वियोगामुळे होणारें दुःख (विशेषतः लहान मुलांना).

हुड़काना–क्रि. स. १. भयभीत किंवा दुःखी करणें. २. सतावणें; व्याकुळ करणें.

हुड़दंग–**गा**–पु. धुमाकूळ; दंगा; दंगल बखेड़ा; उत्पात.

हुडुक–**क्क**–पु. १. डमरूच्या आकाराचें पण त्यापेक्षां मोठें असें एक वाद्य. २. झिंगलेला माणूस. ३. अडाणी. –**हिक्का**– स्त्री. हुडुक वाद्याचा ध्वनि.

हुडुडुवा–पु. हुतुतूचा खेळ.

हुडुत्–पु. १. बैलाची डरकाळी. २. धमकी. [असंस्कृत; मूर्ख.

हुडु–वि. १. हूड. २. अडाणी;

हुढक्क*–पु. पा० 'हुडुक'.

हुताशन–पु. अग्नि.

हुति*– प्रत्य. तृतीया व पंचमी या विभक्तींचा प्रत्यय.

हुती*– क्रि. अ. होती.

हुते–अव्य. द्वारा; कडून; पासून.

हुतो*– क्रि. अ. होता.

हुदकाना*–क्रि. स. बहकाविणें; खवळविणें.

हुदना*–क्रि. अ. आश्चर्यचकित होणें; थक्क होणें.

हुदहुद–पु. [अ.] १. सुतारपक्षी. २. टिटवी. ३. डोकीवर तुरा व सुंदर पिसारा असलेला एक पक्षी.

हुदूद–पु. स्त्री. [अ. 'हद'चें अनेक०] सरहद्दी; सीमा; चतुस्सीमा; मर्यादा; चारी दिशा.

हुन–पु. १. सोनें. २. सोन्याची मोहोर; सुवर्णमुद्रा. मु० –**बरसना**–खूप पैसा, द्रव्य असणें, मिळणें.

हुनना–क्रि. स. १. यज्ञ, होम करणें. २. आहुति देणें.

हुनर–पु. [फा.] १. कला; हुन्नर; कौशल्य. २. गुण; कर्तृत्व; नैपुण्य. ३. योग्यता; युक्ति. –**मंद**–वि. १. गुणी; कारागीर; कलावंत. २. निपुण; कुशल. –**मंदी**– स्त्री. १. कारागिरी. २. कौशल्य.

हुन्न–**न्ना***–पु. पा० 'हुन'.

हुब– स्त्री. पा० 'हुब्ब'.

हुबाब–पु. [अ.] १. पाण्या-

वरील बुडबुडा. २. हातांतील एक दागिना. ३. कांचेचे रंगीबेरंगी गोळे.

हुब्ब–*पु. स्त्री.* [*अ.*] १. प्रेम; स्नेह. २. मैत्री. ३. इच्छा. ४. मर्जी. **–उल वतन;– (ब्बे) वतन**–*पु. स्त्री.* देशप्रेम; देशभक्ति.

हुमक(ग)ना– *क्रि. अ.* १. उडया मारणें. २. खेळणें. ३. वागडणें. ४. पाय आपटणें. ५. जोरानें दाबून ठेवणें. ६. ठोकर मारणें. ७. आनंदित होणें.

हुमसाना; हुमसावना*–*क्रि.स.* १. मनांत इच्छा, वासना इ० उत्पन्न करणें. २. उत्तेजित करणें. ३. उभें करणें.

हुमा–*पु.* [*फा.*] एक काल्पनिक पक्षी. हा ज्याच्या डोकीवरून उडत जातो तो राजा होतो, अशी समजूत आहे.

हुमाई–*वि.* [*फा.*] भाग्यवान्.

हुमुक्–*पु.* [*अ.*] मूर्खता; अडाणीपणा.

हुमेल– *स्त्री.* १. पुतळयांची माळ (बायकांनीं गळयांत घालण्याची). २. पशूंच्या गळयांतील नाण्यांची माळ.

हुरकनी⁺– *स्त्री.* वेश्या.

हुरदंग–गा–*पु.* पा० 'हुड़दंग'.

हुरमत– *स्त्री.* [*अ.*] १. प्रतिष्ठा. २. इज्जत; अब्रू. **–वाला**–*वि.* प्रतिष्ठित; अब्रूदार. **मु० –उतारना; –लेना**– अब्रू घेणें; बेइज्जती करणें; अप्रतिष्ठा करणें.

हुरमति*–*स्त्री.* पा० 'हुरमत'.

हुरिहाई–*स्त्री.* होली खेळणारी; रंग उडविणारी. पा० 'होली'.

हुरिहार*–*पु.* होळींत रंग उडविणारा; होळी खेळणारा.

हुर्रा–*पु.* [*इं.*] हुर्यो; एक प्रकारचा हर्षध्वनि.

हुलकना–*क्रि. अ.* ओकणें; उलटी होणें.

हुलकी– *स्त्री.* उलटी; ओकारी.

हुलना–*क्रि. अ.* सरकणें; ढकललें जाणें.

हुलसना–*क्रि. अ.* १. उल्हसित होणें; आनंदानें फुलणें. २. भरून येणें. ३.* शोभणें. *–क्रि. स.** पा० 'हुलसाना'.

हुलसाना–*क्रि. स.* आनंदित, प्रसन्न करणें. *–क्रि. अ.** पा० 'हुलसना'.

हुलसी– *स्त्री.* १. उल्हास. २. आनंद. ३. संत तुलसीदास यांच्या मातेचें नांव.

हुलहुल–*पु.* पिवळी तिळवण (एक पावसाळी झाड).

हुलहुली– *स्त्री.* आनंदाच्या किंवा मंगल प्रसंगीं स्त्रिया जो विशिष्ट आवाज काढतात तो.

हुलाना⁺–*क्रि. स.* पा० 'हूलना'.

हुलास–*पु.* उल्हास; उत्साह; आनंद. *–स्त्री.*⁺ तपकीर. **–दानी**–*स्त्री.* तपकिरीची डबी.

हुलिया–*पु.* [*अ.*] १. आकृति; चेहरेपट्टी. २. एखाद्याच्या रूपरंगाचें विशेष वर्णन किंवा माहिती. **–नामा**–*पु.* चेहरेपट्टीचें वर्णन असलेला कागद. **मु० –कराना; –लिखाना**– पळून गेलेल्या अपराध्याच्या अथवा हरवलेल्या व्यक्तीच्या खाणाखुणा पोलिसांना सांगून लिहविणें. **–तंग होना**– संकटांत, त्रासांत पडणें. **–बताना; –बयान करना**– चेहरेपट्टीचें वर्णन करणें. **–बिगड़ना**– दुर्दशा होणें. **–बिगाड़ देना; –बिगाड़ना**– १. मारानें चेहरा बदलून टाकणें. २. दुर्दशा करणें.

हुलिहुली– *स्त्री.* १. भुंकणें. २. गर्जना. ३. लग्नप्रसंगीं गायिलें जाणारें गीत.

हुलूक⁺–*पु.* एकप्रकारचें माकड.

हुलैया– *स्त्री.* बुडण्यापूर्वीचें नौकेचें डळमळणें.

हुल्लड़–*पु.* [*अनु.*] १. कोलाहल; आरडा ओरडा; दंगल. २. धुमाकूळ; उत्पात. ३. चळवळ; आंदोलन.

हुशि(सि)यार–*वि.* पा० ['होशियार'.

हुसैन–*पु.* [*अ.*] हजरत अली यांचे धाकटे चिरंजीव. हे करबल्याच्या युद्धांत मारले गेले. **–बंद**–*पु.* साखळीनें जोडलेलीं चांदीचीं दोन कडीं. मोहरमच्या दिवसांत मुसलमान बायका आपल्या मुलांच्या गळयांत हीं कडीं घालतात.

हुसैनी–*पु.* [*अ.*] १. एक प्रकारचें कातडयाचें भांडें. २. द्राक्षाची एक जात. ३. एक राग (सं०).

हुस्न–*पु.* [*अ.*] १. लावण्य; सौंदर्य. २. विशेषता; खुबी. **–दान**–*पु.* पानाचा डबा. **–परस्त**–*वि.* सौंदर्योपासक; सौंदयप्रेमी **–परस्ती** – *स्त्री.* सौंदर्योपासना. **–शिनास**–*वि.* सौंदर्य ओळखणारा. **–(स्ने) खुदादाद**–*पु.* सहज सौंदर्य; नैसर्गिक, स्वाभाविक सौंदर्य. **–तलब**–*पु.* एखादी वस्तु खुणेनें, खुबीनें मागणें. **मु० –का आलम**–सौंदर्याचा काळ.

हुस्यार*–*वि.* पा० 'होशियार'.

हूँ–*अव्य.* होय; हं. *–क्रि. अ.* मी आहें. *–सर्व.* मी.

हूँकना–*क्रि. अ.* १. चुचकारणें; गोंजारणें. २. गर्जना करणें; ललकारणें. ३. 'हुं' म्हणणें. ४. हंबरणें.

हूँठ*–*वि.* औट; साडेतीन.

हूँठा–पु. औटकी (पाढा).

हूँड़–स्त्री. शेतीच्या कामांतील शेतकऱ्यांचें परस्पर–सहकार्य.

हूँस–स्त्री. १. ईर्ष्या; द्वेष. २. वाईट नजर; दृष्ट. ३. टोंचणी; निर्भर्त्सना; निंदा; कुचाळकी.

हूँसना–क्रि. स. दृष्ट लावणें. –क्रि. अ. १. जळफळणें; इर्ष्या करणें. २. लालचावणें. ३. डिवचणें. ४. टोंचून बोलणें; निंदा करणें. [देखील; सुद्धां.

हू–पु. कोल्हेकुई. –अव्य.* हि;

हूक–स्त्री. १. हृदयांत होणारी पीडा; कळ. २. वेदना; ठणका; पीडा. ३. दुःख. ४. शंका; अंदेशा.

हूकना–क्रि. अ. सलणें; ठसठसणें; दुखणें.

हूटना*–क्रि. अ. १. वेगळें, दूर होणें; हटणें. २. तोंड फिरविणें; पाठ दाखविणें.

हूठा–पु. अंगठा. मु०–देना–अंगठा दाखविणें.

हूड़–वि. १. बेपर्वा. २. अडाणी; मूर्ख.

हूतो*–अव्य. पा० 'हुति'.

हूदा–वि. [अ.] योग्य; उचित.

हूदा+–पु. १. पीडा; कळ. २. धक्का. [भाजणें.

हूनना–क्रि. स. आगींत घालून

हूब+–स्त्री. उत्साह; हिम्मत.

हूबहू–वि. [फा.] सदृश; समान; हुबेहूब; जसाच्या तसा.

हूर–स्त्री. [अ.] १. स्वर्गांतील अप्सरा (मुसल०) २. अत्यंत सुंदर स्त्री. [२. भोसकणें.

हूरना–क्रि. स. १. ढकलणें.

हूरा+–पु. लाठी इ० चें टोंक.

हूल–स्त्री. १. पीडा; वेदना; कळ. २. भोसकणें. ३. कोलाहल; खळबळ. ४. हर्षध्वनि. ५. गर्जना. ६. खुषी; आनंद. ७. पक्षी पकडण्याचा गळ लावलेला बांबू.

हूलना–क्रि. स. भोसकणें.

हूला–पु. भोसकण्याची क्रिया. –स्त्री. १. कळ; पीडा. २. कोलाहल. [असंस्कृत.

हूश–वि. जंगली; असभ्य;

हूह–स्त्री. युद्धाचें आह्वान; गर्जना.

हूहू–पु. एक गंधर्व.

हृत–वि. १. हरण करण्यांत आलेला. २. हिरावून घेतलेला; जप्त केलला. –प्रतिदान–पु. घेतलेली, जप्त केलेली वस्तु परत देणें; ' रेस्टीटयूशन. ' –प्रत्यर्पण–पु. जिंकून घेतलेलें परत देणें; ' रेस्टोरेशन. ' [हृदय. २. काळीज.

हृत्–पु. हृदय. –पिंड–पु. १.

हृदयंगम–वि. १. मनांत ठसलेलें; लक्षांत आलेलें. २. मर्मस्पर्शी; सुंदर; मनोहर.

हृदय–पु. १. हृदय; मन; अंतःकरण. २. छाती.

हृद्य–वि. १. हृदयांतील; हार्दिक. २. सुंदर; मोहक. ३. रुचिकर; प्रिय; रोचक.

हृष्ट–वि. १. प्रसन्न; आनंदित. २. कडक. –पुष्ट–क्रि. धट्टाकट्टा; जाडजूड; धष्टपुष्ट; धडधाकट.

हेंगा–पु. कुळव; नांगरलेली जमीन सपाट बनविण्याचें अवजार.

हेंहें–पु. १. हळूहळू हंसण्याचा आवाज. २. गयावया करण्याचा शब्द. मु०–करना– १. गयावया करणें. २. खुशामत करणें. [होते.

हे–अव्य. अरे; अहो.–क्रि.अ.*

हेकड़–वि. १. दांडगट; धष्टपुष्ट. २. प्रबळ ३. उच्छृंखल; अशिष्ट.

हेकड़ी–स्त्री. १. दांडगाई; जुलूम. २. जबरदस्ती. ३. उच्छृंखलपणा. ४. तिरसटपणा. ५. हेकेखोरपणा; हेकटपणा.

हेच–वि. [फा.] १. तुच्छ; क्षुद्र. २. निःसत्त्व. ३. निरर्थक. ४. बेकार. –पु. थोडीशी वस्तु. –दाँ–वि. कांहींहि न कळणारा; मूर्ख. –पोच–वि. सामान्य; क्षुद्र. –पु. तुच्छ व्यक्ति.

हेजाज–पु. पा० ' हिजाज '.

हेट*–पु. संकेतस्थळ.

हेठ*–वि. १. हलका; कमी प्रतीचा. २. हीन; नीच. –अव्य. खालीं.

हेठा–वि. १. हलका; कमी प्रतीचा २. नीच. –पन–पु. नीचता; हलकटपणा.

हेठी–स्त्री. १. अप्रतिष्ठा; मानहानि; अनादर. २. नीचपणा; हीनता. [व्यापारी.

हेडावुक्क–पु. घोडयांचा

हेड़ी+–स्त्री. विक्रीसाठीं असलेला पशूंचा कळप.

हेत*–पु. १. हेतु; कारण. २. मित्र. ३. हित. ४. प्रेम. –अव्य. साठीं; करितां. [३. नातेवाईक.

हेती–पु. १. मित्र. २. प्रेमी.

हेतु–पु. १. उद्देश्य; हेतु; अभिप्राय. २. कारण. ३.* प्रेम. –अव्य. साठीं; करितां. –वाद–पु. १. तार्किकता. २. नास्तिकता. –वादी –पु. १. तार्किक. २. नास्तिक.

हेत्वाभास*–पु. कुतर्क; हेत्वाभास; हेतुदोष; ' फॅलसी '.

हेना–पु. पा० ' हिना '. [सोनें.

हेम–पु. १. हिम; दंव. २. सुवर्ण;

हेमा–स्त्री. १. पृथ्वी. २. सुंदर स्त्री. ३. एक अप्सरा. ४. माधवी लता. [कसा.

हेमियानी–स्त्री. पैशांची थैली;

हेय–*वि.* १. त्याज्य; निकृष्ट. २. नीच; तुच्छ.

हेर–* *स्त्री.* शोध; तपास.

हेरना–*क्रि. स.* १. शोधणें; तपास काढणें. २. पाहाणें; निरीक्षण करणें. ३. पारख करणें. **मु०–फेरना**– फेरफार, बदल करणें.

हेरफेर–*पु.* १. फेरफार; फेरबदल; अदलाबदल; फरक. २. डावपेंच; कारस्थान. **–कर**–*अव्य.* या ना त्या प्रकारें; इरून फिरून.

हेरवाना+–*क्रि. स.* १. गमावणें; हरविणें. २. तपास करविणें.

हेराना*–*क्रि. अ.* १. हरवणें; लुप्त, नाहींसें होणें. २. फिकें पडणें. ३. बेशुद्ध होणें. *–क्रि. स.* पा० 'हेरवाना'. [उलटापालट; फेरफार.

हेराफेरी–*स्त्री.* अदलाबदल;

हेरी*–*स्त्री.* १. हांक; बोलावणें. २. आह्वान. **मु०–देना**– १. हांक मारणें. २. आह्वान देणें.

हेल+–१. चिखल; शेण. २. शेणामातीचा गोळा. ३. संगत; संबंध.

हेल–*पु.* परिचय; ओळख. **–मेल**–*पु.* १. स्नेहसंबंध; घनिष्ठता. २. संगत; साथ. ३. परिचय.

हेलना–*स्त्री.* अवहेलना; तिरस्कार.–*क्रि. अ.** १. क्रीडा करणें; मौज, थट्टामस्करी करणें. २. निश्चित राहाणें; पर्वा न करणें. ३. घुसणें; प्रवेश करणें. *–क्रि. स.* १. अवहेलना, उपेक्षा करणें. २. पोहणें; तरंगणें; पैलतीरास जाणें.

हेलया–*अव्य.* सहजासहजीं; गमतीनें.

हेला– *स्त्री.* १. अवहेलना; तिरस्कार. २. खेळ; गम्मत; क्रीडा. ३. सरलता; सहजता. ४. स्त्रियांमधील तीव्र कामवासना; स्त्रियांचा शृंगारसूचक हावभाव.

हेला–*पु.* १. हांक; धांवा. २. चढाई; आक्रमण. ३. खेप; पाळी.

हेला–*पु.* भंगी.

हेलि– *स्त्री.* १. आलिंगन. २. रस्त्यानें चाललेली वरात. *–पु.* सूर्य.

हेलिन–नी– *स्त्री.* भंगीण.

हेली*– *स्त्री.* सखी; मैत्रीण.

हेली–मेली–*पु.* घनिष्ठ मित्र; साथी.

हेवंत*–*पु.* हेमंत ऋतु.

हैं–*क्रि. अ.* आहेत. *–अव्य.* १. आश्चर्योद्‌गार; अरे! २. निषेधोद्‌गार; अंहं; नको.

है–*क्रि. अ.* आहे. *–पु.** घोडा. **–बर**–*पु.* सुंदर, चांगला घोडा.

हैकड़–*वि.* पा० 'हेकड़'.

हैकल– *स्त्री.* [*अ.*] १. एखाद्या ग्रहाची मूर्ति. २. मंदिर. ३. शोभा. ४. यंत्र. ५. डौल. ६. चिह्न; लक्षण.

हैकल– *स्त्री.* १. घोड्याच्या गळ्यांतील एक दागिना. यांत चौकोनी, पानाच्या किंवा अन्य आकारांचे धातूचे तुकडे असतात. २. पुतळ्यांची माळ; नाना प्रकारच्या धातूच्या तुकड्यांनीं बनविलेला बायकांचा एक दागिना.

हैज़–*पु.* [*अ.*] स्त्रियांचा मासिक धर्म; रजःस्राव.

हैज़ा–*पु.* [*अ.*] पटकी; 'कॉलरा'.

हैजान–*पु.* [*अ.*] १. जोश; आवेश; वेग. २. अशांति; गोंधळ; अव्यवस्था.

हैजी– *वि.* [*अ.*] १. हरामखोर; दोगला. २. दुष्ट. ['हॅट'.

हैट–*पु.* [*इ.*] साहेबी टोपी;

हैदर–*पु.* [*अ.*] वाघ.

हैना*– *क्रि. स.* ठार मारणें; हत्या करणें.

हैफ़– *पु.* [*अ.*] १. दुःख. २. अत्याचार.–*अव्य.* हाय! अरेरे!

हैबत– *स्त्री.* [*अ.*] १. भय. २. धाक; दहशत. **–ज़दा**–*वि.* भयभीत; घाबरलेला.**–नाक**– *वि.* भयानक; भयंकर. **मु०– छाना**– घाबरणें; दहशत पसरणें.**–मचना**– भीतीचें वातावरण पसरणें.

हैम–*वि.* सोन्याचा; सोनेरी.

हैयत– *स्त्री.* पा० 'हइयत'.

हैरत–*स्त्री.* [*अ.*] अचंबा; आश्चर्य. **–अंगेज़**– आश्चर्यकारक. **–ज़दा**–*वि.* चकित; थक्क.

हैरान–*वि.* [*अ.*] १. हैराण; त्रस्त. २. आश्चर्यचकित.

हैरानी– *स्त्री.* [*अ.*] १. आश्चर्य; विस्मय. २. त्रास.

हैलो–*अव्य.* [*इ.*] ओहो! (उद्‌गारवाचक अव्यय); 'हॅलो.'

हैवान–*पु.* [*अ.*] १. पशु; जनावर. २. मूर्ख किंवा गांवठी माणूस. ३. प्राणी; जीव. [–अनेक० **हैवानात**]

हैवानियत– *स्त्री.* [*अ.*] १. पशुता; जंगलीपणा; अमानुषता. २. मूर्खता.

हैवानी–*वि.* १. पाशविक; जंगली; जनावरासारखा. २. अमानुष.

हैसबैस– *स्त्री.* [*अ.*] १. वादविवाद. २. झगडा; भांडण.

हैसि(सी)यत –*स्त्री.* [*अ.*] १. योग्यता; अधिकार. २. बिशाद; सामर्थ्य. ३. श्रेणी; दर्जा. ४. धन; दौलत. ५. पत. **–दार**–*वि.* प्रतिष्ठित; पत असलेला.

हैहै–*अव्य.* अरेरे! हाय हाय!

हों–*क्रि. अ.* असोत; असतील.

होंठ–*पु.* ओठ. **मु० –काटना या चबाना**– दांत–ओंठ खाणें; राग प्रकट करणें. **–चाटना**– जिभल्या

चाटणें. –चिपकना– तोंडाला पाणी सुटणें. –फड़कना–रागानें ओंठ थरथरणें. –मिलाना– चुंबन घेणें. –सी लेना–गप्प राहाणें. –हिलाना –बोलणें. [असलेला.

होंठल–*वि.* जाड व मोठे ओंठ

होंठी⁺–*स्त्री.* कांठ; किनार.

हो–*क्रि. अ.* १. आहेस; आहांत. २.* होता. –*अव्य.* अहो; अरे.

होई⁺–*स्त्री.* दिवाळीच्या आधीं आठ दिवस केलें जाणारें एक पूजन. –*क्रि. अ.** १. होईल. २. होतें.

होऊ*–*क्रि. अ.* हो; व्हा; व्हावें.

होटल–*पु.* [इ.] १. उपाहारगृह. 'हॉटेल'. २. खानावळ.

होड़–*स्त्री.* १. शर्त; पैज. २. स्पर्धा; चढाओढ. ३. हट्ट. –बदना– पैज मारणें; लावणें. [२. पैज.

होड़ाबादी–*स्त्री.* १. चढाओढ.

होडाहोडी–*स्त्री.* पा० 'होड'. –*अव्य.* पैजेवर; पैज लावून.

होत⁺–*स्त्री.* १. संपन्नता; समृद्धि. २. सामर्थ्य. –*क्रि. अ.* १. होतें; आहे. २. असेल.

होतब–व्य; होतव्यता*–*स्त्री.* होणारी गोष्ट; भवितव्य.

होतर*–*वि.* होण्यासारखें; होण्यास योग्य.

होता–*वि. पु.* यज्ञ करणारा; आहुति देणारा. –*क्रि. अ.* असता.

होती–*स्त्री.* १. संपन्नता; समृद्धि; संपत्ति. २. सामर्थ्य. मु०–दिखाना–१. श्रीमंतीची ऐट दाखविणें. २. उधळपट्टी करणें.

होनहार–*वि.* १. होतकरू; सुलक्षणी. २. होणारा; भावी. –*पु. स्त्री.* भवितव्यता; होणारी गोष्ट; भावी घटना. मु०–बिरवान के होत चीकने पात– मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात.

होना–*क्रि. अ.* १. असणें. २. होणें; घडणें. ३. उत्पन्न होणें. मु० (जो) हुआ सो हुआ–झालें तें झालें; झालें गेलें गंगेला मिळालें. तो क्या हुआ–जाऊं द्या; हरकत नाहीं. हो आना– १. जाऊन येणें; भेटून येणें. २. भेटावयास जाणें. होकर–जवळून; मार्गानें; वरून; मधून. होकर रहना– अवश्य होणें. घडणें. हो गुज़रना–घटना घडणें; समाप्त होणें. हो चलना–संपत येणें. पुष्कळ होणें. हो चुकना–१. समाप्त होणें; संपणें. २. मरणें. हो जाना– १, एक काम पूर्ण होणें. २. मरणें. होते हुए–१. असून. २. पा० 'होकर'. हो न हो–कोण जाणें; असेलहि; कदाचित्. (किसीका) होना– एखाद्याचें प्रेमपात्र, विश्वासपात्र बनणें. हो निकलना–जवळून जाणें. होनेका–होणारा. होने लगना–होऊं लागणें; प्रारंभ होणें. हो पड़ना– अकस्मात् घडणें. हो बैठना– १. होणें; बनणें. २. विटाळशी होणें, असणें, बसणें. हो रहना– १. होऊन जाणें; होणें. २. थांबणें; कायम राहाणें. (किसीका) हो रहना– एखाद्याचें प्रेमपात्र किंवा प्रेमी बनणें. हो लेना–१. समाप्त होणें; पूर्ण होणें. २. उत्पन्न होणें. हो सो हो– वाटेल तें होवो (निश्चयार्थक). हो–हवा चुकना– –होऊन जाणें. हो– होकर–पा० 'होकर'. [हार'.

होनिहार*–*वि. पु.* पा० 'होन-

होनी–*स्त्री.* १. उत्पत्ति. २. वृत्तांत. ३. अपरिहार्यतेनें घडणारी गोष्ट; भवितव्यता; संभाव्य गोष्ट. मु० –जानना या देखना–भविष्य पाहाणें; जाणणें. –न टलना– होणारें न चुकणें.

होम–*पु.* होम; हवन; यज्ञ. मु०–करते हाथ जलना–एखाद्याचें भलें करूं जातां आपलेंच नुकसान होणें. –कर देना–१. बलिदान, त्याग करणें. २. जाळून टाकणें; नष्ट करणें.

होमना–*क्रि. स.* १. हवन करणें. २. बलिदान, त्याग करणें. ३. नष्ट करणें.

होर⁺–*पु.* १. मार्ग. २. पा० 'ओर'. –*वि.* थांबलेला.

होरसा–*पु.* १. सहाण (गंध उगाळण्याची). २. दगडी पोळपाट; पाटा.

होरहा–**पु.* १. दाणे भरलेलें हरभऱ्याचें हिरवें झाड. २. भाजलेला सोलाणा.

होरा–*पु.* १. भाजलेला सोलाणा २. हरभऱ्याचें झाड.

होरा– *स्त्री.* [हा शब्द लॅटिन अथवा यूनानी (ग्रीक) भाषेंतून संस्कृतमध्यें आला आहे असें म्हणतात.] १. एक तास. २. जन्मकुंडली. ३. अर्धी रास. ४. ज्योतिषशास्त्र. ५. चिह्न; रेखा.– शास्त्र– *पु.* फलज्योतिष.

होरिल–ला; होरिलवा. –*पु.** नुकतेंच जन्मलेलें मूल; नवजात शिशु.

होरिहार*–*पु.* होळी खेळणारा.

होरी–*स्त्री.* १. होळी; शिमगा. २. होळींतील गाण्याचा एक प्रकार. ३. जहाजावर माल चढविण्यासाठीं व उतरविण्यासाठीं वापरली जाणारी मोठी नाव. [२. हुरडा.

होला–*पु.* १. सोलाणा; हरभरा.

होला–*स्त्री.* होळीचा सण. –*पु.* शिखांची होळी. ही हिंदूंच्या होळीच्या दुसऱ्या दिवशीं असते. –खेलन–*पु.* होळी खेळणें; रंग उडविणें.

होली–*स्त्री*. १. होळी; शिमगा. २. होळीच्या वेळीं गायिलें जाणारें विशिष्ट गाणें. **मु०– खेलना**–होळी खेळणें; एकमेकांवर रंग उडविणें.

होले होले–*अव्य*. पा० 'हौले हौले'.

होश–*पु*. [*फा.*] १. ज्ञान; चेतना; शुद्धि. २. बुद्धि. ३. स्मरण. **–मंद**–*वि*. बुद्धिमान्; समजूतदार. **–वाला**–*वि*. अनुभवी.– **हवास**–*पु*. चेतना; शुद्धि. **मु०–आना**– १. समज येणें; समजूं लागणें. २. चतुर, हुशार बनणें. ३. शुद्धीवर येणें ४. आठवणें; स्मरण येणें. **–उड़ जाना; – उड़ना**– १. बेशुद्ध होणें. २. घाबरगुंडी उडणें; गर्भगळित होणें. ३. थक्क होणें. **–उड़ा देना**– १. थक्क करून सोडणें. २. घाबरवून सोडणें. **–करना**– १. शुद्धीवर येणें; सावध होणें. २. आठवण करणें. ३. लक्षांत ठेवणें. **– काफ़ूर होना**–पा० 'होश उड़ जाना'. **–की दवा करो**–डोकें ठिकाणावर, ताळचावर ठेवून बोला; शुद्धीवर या. **–खोना**–पा० 'होशसे बाहर होना.'**–गुम होना; –जाता रहना; –जाना** –पा० 'होश उड़ना.' **–ठिकाने होना**– १. बुद्धि ताळचावर असणें. २. भ्रम, मोह नष्ट होणें· **–दंग होना**– १. थक्क होणें. २. पा० 'होश उड़ना' **–दिलाना**– आठवण, स्मरण करून देणें. **–न रहना**– १. पत्ता नसणें. २. शुद्धीवर नसणें.**–न होना**–शुद्धीवर नसणें. **–पकड़ना**– १. वयांत येणें. २. सावध होणें. **–पैतरे होना; – बाख्ता होना; –बिखरना**–पा० 'होश उड़ जाना'. **–में आना**–शुद्धीवर येणें.**–रखना**–बुद्धि,अक्कल असणें. **–रहना**– शुद्धीवर असणें. **–सँभालकर बातें करना**–नीट समजून बोलणें. **–सँभालना**– १. सावध होणें. २. वयांत येणें; वयानें मोठें होणें.**–से बाहर होना**– बेशुद्ध होणें. **–हवा होना; – हिरन होना**– पा० 'होश उड़ जाना.' **–होना**– १. बुद्धि असणें. २. शुद्धीवर असणें. ३. वयांत येणें.

होशियार–*वि*.[*फा.*] १.हुशार; तरतरीत २. निपुण; कुशल; प्रवीण. ३. सावध. ४. धूर्त.

होशियारी–*स्त्री*. [*फा.*] १. हुशारी; तरतरीतपणा. २. सावधगिरी. ३. नैपुण्य; कौशल्य. ४. चलाखी.

होस*–*पु*. पा० 'होश.' [आहें.

हौं⁺– *सर्व*. मी. –*क्रि. अ*. मी

हौंकना–*क्रि. अ*. १. हुंकारणें; गर्जना करणें. २. धांपा टाकणें. ३. ⁺ पंख्यानें वारा घालणें.

हौंस–*स्त्री*. पा० 'हौस'

हौंसला⁺– *पु*. पा० 'हौसला'.

हौ*– *क्रि. अ*. १. आहेस; आहांत. २. होता.

हौआ–*पु*. बागुलबोवा; बुजगावणें.– *स्त्री*. पा० 'हौवा.'

हौका–*पु*. अधाशीपणा; लोभ.

हौज़–*पु*. [*अ.*] कुंड; हौद. **मु०–भरे तो फौवारा छूटे**– आडांत असेल तर पोहऱ्यांत येईल; हौद भरला तर फवारा उडणार.

हौज़ा–*पु*. [*फा.*] हत्तीची अंबारी; हौदा.

हौड़*– *स्त्री*. पा० 'होड.'

हौद–⁺ *पु*. पा० 'हौज़'

हौदा⁺–*पु*. पा० 'हौज़ा'; 'हौज़'.

हौन*–*पु*. आत्मीयता.

हौरा⁺–*पु*. आरडा ओरडा; गोंधळ. [हळूहळू.

हौरे-हौरे*–*अव्य*. धीरे-धीरे;

हौल–*पु*. [*अ.*] १. भीति; भय. २. दहशत.**–खौल; –जौल**–*स्त्री*. १. घाई; उतावीळपणा. २. घाबरगुंडी. **–दिल**–*पु*. हृदयाची धडपड.–*वि*. भयभीत झालेला; हवालदिल. **–दिला**–*वि*. भित्रा; भ्याड. **– नाक** –*वि*. भयानक; भयंकर. **मु०– पैठना; –बैठना**–दहशत बसणें. [बड.

हौलाजौली–*स्त्री*. घाई; गड-

हौली– *स्त्री*. दारूचा गुत्ता.

हौले; हौले-हौले–*अव्य*. हळू हळू; सावकाश; हलकेंच.

हौवा– *स्त्री*. [*अ.*] आदिमानव (अॅडम) ची पत्नी; 'ईव्ह'; आदिमाता. –*पु*. बागुलबुवा; बुजगावणें.

हौस– *स्त्री*. [अ.] १. लालसा; हौस. २. हर्ष. ३. उल्हास.

हौसला–[*अ.*] १. हिंमत; सामर्थ्य. २. हौस; इच्छा; आकांक्षा; लालसा. ३. उत्साह, उल्हास.**–मंद**–*वि*. १. हौशी. २. हिंमतवान्; धीराचा; उत्साही. ३. महत्त्वाकांक्षी. **मु०–निकालना**–हौस पुरी करून घेणें. **–पस्त होना**–आवेश ओसरणें; निरुत्साही होणें.

ह्याँ*–*अव्य*. येथें.

ह्यो*–*पु*. हृदय.

ह्रद–*पु*. १. सरोवर. २. ध्वनि. ३. किरण. [विद्युत्.

ह्रदिनी–*स्त्री*. १. नदी. २.

ह्रस्व;–*वि*. १. ह्रस्व; लहान; छोटा; २. ठेंगणा.

ह्रास–*पु*. १. क्षय. २. ऱ्हास; अवनति; क्षीणता; उतार; घट; 'अॅबेट मेंट'. [हर्ष.

ह्लाद–*पु*. आल्हाद; आनंद;

ह्वाँ*–*अव्य*. तेथें; तिकडे.

● ● ●